म. ग्रं. सं. ठाणे
विषय ३/०५
सं. नं. ९३३
१९८२५

REFBK-0002870

सत्कार्योत्तेजक सभा—धुळें
२८५०।

श्री

# श्रीरामदास आणि रामदासी

## भाग पहिला

# श्रीमत् दासबोध

डोमगांव येथील मठांत असलेल्या हुबेहुब
श्रीकल्याणस्वामींच्या हातच्या
मूळ प्रतीवरून

स्थळ प्रत
REFBK-0002870

आवृत्ति सहावी

भक्तांचेनि साभिमानें। कृपा केली दाशरथीनें।
समर्थकृपेचीं वचनें। तो हा दासबोध॥

सर्व हक्क राखून ठेविले आहेत.

... बुकसेलर, ठाकुरद्वार, मुंबई

श्रीरामदासनवमी १८४७

किंमत तीन रुपये

पहिली आवृत्ति दोन हजारांची, विजया दशमी १८२७
दुसरी आवृत्ति दोन हजाराची, विजया दशमी १८२९
तिसरी आवृत्ति पाच हजाराची, दासनवमी १८३२
—मध्यतरीं दीड वर्षांत विक्रीस प्रत शिल्लक नव्हती—
चवथी आवृत्ति दोन हजाराची, आषाढी एकादशी १८४२
—मध्यतरीं वर्षभर विक्रीस प्रत शिल्लक नव्हती—
पांचवी आवृत्ति चार हजाराची, विजया दशमी १८४४
—मध्यंतरीं वर्षभर विक्रीस प्रत शिल्लक नव्हती—
सहावी आवृत्ति चार हजाराची, दासनवमी १८४७

हा ग्रन्थ धुळे येथें वि. ग. जावडेकर यांनीं आत्माराम
प्रिं. व प. लि. कंपनीच्या आत्माराम छापखान्यांत
छापून शंकर श्रीकृष्ण देव यांनीं
धुळें येथें प्रसिद्ध केला

॥ श्रीराम ॥

# सहावी आवृत्ति

श्रीसमर्थकृपेनें शके १८२७ पासून तों १८४७ पर्यंत वीस वर्षांत ग्रन्थराजाच्या एकंदर एकोणवीस हजार प्रती निघाल्या. पहिली व तिसरी आवृत्ति आडवी पोथीवजा तर दुसरी आणि चवथी आवृत्ति उभी पुस्तकवजा छापली होती. पांचवी आवृत्ति हि पुस्तकवजा च, पण आकारानें खिशात मावण्याजोगी योजिली होती. तथापि आतापर्यंतच्या सर्व आवृत्तींत ओव्या धावत्या छापल्या होत्या. प्रस्तुतच्या सहाव्या आवृत्तींत मात्र प्रत्येक ओवी स्वतंत्र छापली आहे. हा या आवृत्तीचा विशेष होय. त्यामुळें पृष्ठसंख्या आणि तत्येबरोबर किंमत दीडपट वाढली आहे; पण त्यात फायदा मात्र चौपट आहे. धावत्या ओळींनीं छापलेल्या ओव्या ध्यानात ठेवण्यास जो त्रास पडतो, तो सर्व त्रास प्रत्येक ओवी स्वतंत्र छापल्यानें आणि वाचल्यानें चुकतो. स्वतन्त्रपणें छापलेली प्रत्येक ओवी शांतपणें पाहिली आणि वाचिली आणि मग ग्रंथ दूर ठेऊन डोळे मिटून निवांत बसलें, तरी ती ओवी दिसते आणि आठवते, आणि अशा रीतीनें एकामागें एक सर्व ओव्या अंतश्चक्षूपुढें उभ्या राहतात, असा कित्येकांचा अनुभव आहे. तो अनुभव सर्वांना घेतां यावा ह्मणून ही स्वतंत्र ओव्यांची आवृत्ति काढिली आहे. तिचा स्वीकार श्रीरामदासांकित वाचकांनीं प्रेमानें करावा, अशी विनंति आहे.

पाचव्या आवृत्तीच्या प्रस्तावनेंत ह्मटल्याप्रमाणें आता मला फक्त एक च सर्वोत्कृष्ट आवृत्ति काढावयाची राहिली आहे त्या आवृत्तींत कांहीं च उणें पडूं नये, अशी माझी इच्छा आहे आतापर्यंतच्या आवृत्तींत माझ्या आवडीची आवृत्ति ह्मणजे तिसरी होय. तिच्या पेक्षां किती तरी सरस शेवटची सर्वोत्कृष्ट आवृत्ति निघाली पाहिजे. अर्थात् अशी पूर्ण आवृत्ति निघेल कां न निघेल आणि निघावयाची असल्यास केव्हा निघेल, तें सांगतां येणें कठीण आहे, पण तिच्या तयारीस श्रीसमर्थचरणस्मरणपूर्वक येत्या श्रीरामदासनवमीपासून लागावें, असा हेतु आहे, तो श्री चरणीं नम्रपणें निवेदन करून ठेवावा.

धुळें
१८४७ माघ वद्य १

चिटणीस
सत्कार्योत्तेजक सभा

## श्रीसद्गुरुस्तवन

### पद

( चालः— श्रीविधिहरिहर मूर्ति सावळी० )

स्वामी माझा योगिराजा आवडतो हृदईं ।
दिवसरजनी न गमे जनीं नावडे कांहीं ॥ ध्रु० ॥

आदिशक्ती परमेश्वर षड्गुण ईश्वर ।
त्याचें अंतर परात्पर शुद्ध विचार ।
योगेश्वर अपरांपर तो चि अवतार ।
हीन दीन जना करि पावन माझें माहेर ॥ १ ॥

अध्यात्मखाणी ग्रंथ वाणी वदोन गेली ।
न कळे महिमा न गणे सीमा काये बोलिली ।
भक्तमंडळी भूमंडळीं कोणें मोजिली ।
उत्तम मूर्ति अपार कीर्ति विश्वीं दुमदुमिली ॥ २ ॥

करुणानिधि करुणाकर कृपें पाहिलें ।
बद्ध मुमुक्ष साधक सिद्ध होउनी ठेले ।
जडमूढ प्राणी चरणस्पर्शें कल्याण जाले ।
माया ममता विवरुनि पाहाता निजपद लाधलें ॥ ३ ॥



# श्रीमत् दासबोध

## अनुक्रमणिका

### ॥ दशक प्रथम स्तवननाम ॥१॥


१ ग्रन्थारंभलक्षण
२ गणेशस्तवन
३ शारदास्तवन
४ सद्गुरुस्तवन
५ संतस्तवन
६ श्रोतेस्तवन
७ कवेश्वरस्तवन
८ सभास्तवन
९ परमार्थस्तवन
१० नरदेहस्तवन


### ॥ मूर्खलक्षणनाम दशक द्वितीय ॥ २ ॥


१ मूर्खलक्षण
२ उत्तमलक्षण
३ कुविद्यालक्षण
४ भक्तिनिरूपण
५ रजोगुणलक्षण
६ तमोगुणनाम
७ सत्वगुणनाम
८ सद्विद्यानिरूपण
९ विरक्तलक्षण
१० पढतमूर्खलक्षण


### ॥ स्वगुणपरीक्षा दशक ॥ ३ ॥


१ जन्मदुःखनिरूपण
२ स्वगुणपरीक्षा
३ स्वगुणपरीक्षा
४ स्वगुणपरीक्षा
५ स्वगुणपरीक्षा
६ आध्यात्मिकताप
७ आदिभूतिकताप
८ आदिदैविकताप
९ मृत्युनिरूपण
१० वैराग्यनिरूपण


### ॥ नवविधा भक्तिनाम चतुर्थ दशक ॥ ४ ॥


१ श्रवणभक्ति
२ कीर्तनभजन
३ नामस्मरणभक्ति
४ पादसेवनभक्ति
५ अर्चनभक्ति
६ वंदनभक्ति
७ दास्यभक्ति
८ सख्यभक्ति
९ आत्मनिवेदनभक्ति
१० मुक्तिचतुष्टये

॥ दशक पांचवा मंत्रांचा ॥ ५ ॥

१ गुरुनिश्चये
२ गुरुलक्षण
३ शिष्यलक्षण
४ उपदेश
५ बहुधाज्ञान
६ शुद्धज्ञाननिरूपण
७ बद्धलक्षण
८ मुमुक्षलक्षण
९ साधकलक्षण
१० सिद्धलक्षण

॥ दशक षष्ठ देवशोधननाम ॥६॥

१ देवशोधन
२ ब्रह्मपावन
३ मायोद्भवनिरूपण
४ ब्रह्मनिरूपण
५ मायाब्रह्मनिरूपण
६ सृष्टिकथन
७ सगुणभजन
८ दृश्यनिरसन
९ सारशोधन
१० अनुर्वाच्य

॥ दशक सातवा चतुर्दश ब्रह्मनाम ॥ ७ ॥

१ मंगलाचरण
२ ब्रह्मनिरूपण
३ चतुर्दशब्रह्म
४ विमलब्रह्म
५ द्वैतकल्पनानिर्शन
६ बद्धमुक्तनिरूपण
७ साधनप्रतिष्ठा
८ श्रवणनिरूपण
९ श्रवणनिरूपण
१० देहांतनिरूपण

॥ ज्ञानदशक मायोद्भवनाम अष्टम ॥ ८ ॥

१ देवदर्शन
२ सूक्ष्म आशंका
३ सूक्ष्म आशंका
४ सूक्ष्म पंचभूतें
५ स्थूळ पंचमहाभूतें स्वरूपाकाश-मेदोनाम
६ दुश्चीलनिरूपण
७ मोक्षलक्षण
८ आत्मदर्शन
९ सिद्धलक्षण
१० सुन्यत्वनिर्शन

॥ दशक नवम गुणरूपनाम ॥९॥

१ आशंका
२ ब्रह्मनिरूपण
३ निःसंदेहनिरूपण
४ जाणपणनिरूपण
५ अनुमाननिर्शन
६ गुणरूपनिरूपण
७ विकल्पनिर्शन
८ देहांतनिरूपण
९ संदेहवारण
१० स्थितिनिरूपण

॥ दशक दहावा जगज्ज्योतीनाम ॥ १० ॥

१ अंत:कर्णयेकनाम

२ अशंकानिरूपण
३ देहअशंकाशोधन
४ बीजलक्षण
५ पंचप्रळये
६ भ्रमनिरूपण
७ सगुणभजन
८ प्रचितनिरूपण
९ पुरुषप्रकृती
१० चळाचळनिरूपण

## भीमदशक एकादश ॥ ११ ॥

१ सिद्धातनिरूपण
२ चत्वारदेवनिरूपण
३ सिकवणनिरूपण
४ सारविवेक
५ राजकारण
६ महंतलक्षण
७ चंचळनदी
८ अंतरात्माविवरण
९ उपदेशनिरूपण
१० निस्पृहवर्तणूक

## ॥ विवेकवैराग्यनाम दशक द्वादश ॥ १२ ॥

१ विमळलक्षण
२ प्रत्ययनिरूपण
३ भक्तनिरूपण
४ विवेकवैराग्य
५ आत्मनिवेदन
६ सृष्टिक्रम
७ विषयत्याग
८ काळरूप
९ येत्नसिकवण
१० उत्तम पुरुष

## ॥ नामरूप दशक त्रयोदश ॥१३॥

१ आत्मानात्मविवेक
२ सारासारनिरूपण
३ उभारणी
४ प्रळयेनाम
५ काहाणी
६ लघुबोध
७ प्रत्ययेविवरण
८ श्रीकर्तानिरूपण
९ आत्माविवरण
१० सिकवण

## ॥ अखंडध्याननाम दशक चतुर्दश ॥ १४ ॥

१ निस्पृहलक्षण
२ भिक्षा
३ कवित्वकळा
४ कीर्तनलक्षण
५ हरिकथालक्षण
६ चातुर्यलक्षण
७ युगधर्म
८ अखंडध्यान
९ शाश्वतनिरूपण
१० मायानिरूपण

## ॥ आत्मदशकनाम पंचदश ॥१५॥

१ चातुर्यलक्षण
२ निस्पृहव्यापलक्षण
३ श्रेष्ठ अतरात्मा

४ शाश्वत ब्रह्म
५ चंचळलक्षण
६ चातुर्यविवरण
७ अधोर्ध्वनिरूपण
८ सूक्ष्मजीवनिरूपण
९ पिंडोत्पत्तिनिरूपण
१० सिद्धांतनिरूपण

---

**॥ दशक षोडश सप्ततिन्वयाचा ॥ १६ ॥**

१ वाल्मीकस्तवन
२ सूर्यस्तवन
३ पृथ्वीस्तवन
४ आपनिरूपण
५ अग्नीनिरूपण
६ वायोस्तवन
७ महद्भूतनिरूपण
८ आत्मारामनिरूपण
९ नाना उपासना
१० गुणभूतनिरूपण

---

**॥ दशक सप्तदश प्रकृति पुरुषनाम ॥ १७ ॥**

१ देवबळात्कार
२ शिवशक्ति
३ श्रवणनिरूपण
४ अनुमाननिर्शन
५ अजपानिरूपण
६ देहात्मनिरूपण
७ जगज्जीवन
८ तत्त्वनिरूपण
९ तनुचतुष्टये
१० दोणपसिद्धलक्षण

---

**दशक अष्टादश बहुजिनसी ॥ १८ ॥**

१ बहुदेवस्थान
२ सर्वज्ञसग
३ निस्पृहसिकवण
४ देहेदुर्लभनिरूपण
५ करंटपरीक्षा
६ उत्तम पुरुष
७ जनस्वभाव
८ अंतर्देवनिरूपण
९ निद्रानिरूपण
१० श्रोताअवलक्षण

---

**॥ दशक शिकवणनाम एकोनविंशति ॥ १९ ॥**

१ लेखनक्रिया
२ विवरण
३ करंटलक्षण
४ सदेवलक्षण
५ देहमान्यनिरूपण
६ बुद्धिवादनिरूपण
७ येत्ननिरूपण
८ उपाधिलक्षण
९ राजकारण
१० विवेकलक्षण

---

**॥ विमाचा पूर्ण दशक ॥ २० ॥**

१ पूर्णापूर्णनिरूपण
२ सृष्टित्रिविधलक्षण
३ सूक्ष्मनामाभिधान
४ आत्मानिरूपण
५ चत्वारजिनस
६ आत्मागुणनिरूपण
७ आत्मनिरूपण
८ देहक्षेत्रनिरूपण
९ सूक्ष्मनिरूपण
१० निमळब्रह्मनिरूपण

ক্রা: ৭৭৩৩

৬৩৫৪





श्रीसमर्थपादुका

श्रीसमर्थ

स. क्र.
सा.
ठा ग्रं.
नों. २४



# ॥ श्रीमत् दासबोध ॥

२८००

## ॥ दशक प्रथम स्तवननाम ॥

### ॥ श्रीराम ॥

श्रोते पुसती कोण ग्रंथ । काय बोलिलें जी येथ ।
श्रवण केलियानें प्राप्त । काय आहे ॥ १ ॥
ग्रंथा नाम दासबोध । गुरुशिष्यांचा संवाद ।
येथ बोलिला विशद । भक्तिमार्ग ॥ २ ॥
नवविधा भक्ति आणि ज्ञान । बोलिलें वैराग्याचें लक्षण ।
बहुधा अध्यात्मनिरोपण । निरोपिलें ॥ ३ ॥
भक्तिचेन योगें देव । निश्चयें पावती मानव ।
ऐसा आहे अभिप्राव । ईये ग्रंथीं ॥ ४ ॥
मुख्य भक्तीचा निश्चयो । शुद्धज्ञानाचा निश्चयो ।
आत्मस्थितीचा निश्चयो । बोलिला असे ॥ ५ ॥
शुद्ध उपदेशाचा निश्चयो । सायोज्यमुक्तीचा निश्चयो ।
मोक्षप्राप्तीचा निश्चयो । बोलिला असे ॥ ६ ॥

---

१ स्पष्ट. २ वैराग्य द. १२–४, मुख्य भक्ति ४–९; शुद्धज्ञान ५–६; आत्मस्थिति ८–९; उपदेश ६–२, सायोज्य मुक्ति ४–१०; मोक्षप्राप्ती ८–७; शुद्ध स्वरूप २०–१०; विदेहस्थिति ७–७, अलिप्तपण ९–१०; मुख्य देव ११–२; मुख्य भक्त १०–७; जीवशिव ११–१; मुख्य ब्रह्म ७–४; नाना मतें ८–१०; आपण कोण १२–३; मुख्य उपासना १५–९, नाना कवित्व १४–३, चातुर्य १८–६; मायोद्भव ६–३; पंच भूतें ८–४, कर्ता कोण १३–८ इत्यादि विषय पुढें ग्रन्थांत यथावकाश येणार आहेत, म्हणून येथें निराळ्या टिपा देणे नको. ग्रन्थ प्रथम च वाचतांना जरी कांहीं शब्द किंवा ओव्या किंवा एकादा विषय समजला नाहीं, तरी जसजशीं पारायणें होतील, तसतसा ग्रन्थ समजू लागेल, असा पूर्ण विश्वास असू द्यावा.

शुद्ध स्वरूपाचा निश्चयो । विदेहस्थितीचा निश्चयो ।
अलिप्तपणाचा निश्चयो । बोलिला असे ॥ ७ ॥
मुख्य देवाचा निश्चयो । मुख्य भक्ताचा निश्चयो ।
जीवशिवाचा निश्चयो । बोलिला असे ॥ ८ ॥
मुख्य ब्रह्माचा निश्चयो । नाना मतांचा निश्चयो ।
आपण कोण हा निश्चयो । बोलिला असे ॥ ९ ॥
मुख्य उपासनालक्षण । नाना कवित्वलक्षण ।
नाना चातुर्यलक्षण । बोलिलें असे ॥ १० ॥
मायोद्भवाचें लक्षण । पंचभूतांचें लक्षण ।
कर्ता कोण हें लक्षण । बोलिलें असे ॥ ११ ॥
नाना किंतु निवारिले । नाना संशयो छेदिले ।
नाना आशंका फेडिले । नाना प्रश्न ॥ १२ ॥
ऐसें बहुधा निरोपिलें । ग्रंथगर्भी जें बोलिलें ।
तें अवघें चि अनुवादलें । न वचे किं कदा ॥ १३ ॥
तथापि अवघा दासबोध । दशक फोडून केला विशद ।
जे जे दशकीचा अनुवाद । ते ते दशकीं बोलिला ॥ १४ ॥
नाना ग्रंथांच्या संमती । उपनिषदें वेदांत श्रुती ।
आणि मुख्य आत्मप्रचीती । शास्त्रेंसहित ॥ १५ ॥
नाना संमतीअन्वयें । ह्मणौनि मिथ्या ह्मणतां न ये ।
तथापि हें अनुभवासि ये । प्रत्यक्ष आतां ॥ १६ ॥
मत्सरें यासी मिथ्या ह्मणती । तरी अवघे चि ग्रंथ उच्छेदती ।
नाना ग्रंथांच्या संमती । भगवद्वाक्यें ॥ १७ ॥
शिवगीता रामगीता । गुरुगीता गर्भगीता ।
उत्तरगीता अवधूतगीता । वेद आणी वेदांत ॥ १८ ॥
भगवद्गीता ब्रह्मगीता । हंसगीता पांडवगीता ।
गणेशगीता येमगीता । उपनिषदें भागवत ॥ १९ ॥

---

१ शंका. २ संमती, अनुमोदन, आधार.

इत्यादिक नाना ग्रंथ । समतीस बोलिले येथ ।
भगवद्वाक्यें येथार्थ । निश्चयेंसीं ॥ २० ॥
भगवद्वचनीं अविश्वासे । ऐसा कोण पतित असे ।
भगवद्वाक्याविरहित नसे । बोलणें येथीचें ॥ २१ ॥
पूर्ण ग्रंथ पाहिल्याविण । उगा च ठेवी जो दूषण ।
तो दुरात्मा दुराभिमान । मत्सरें करी ॥ २२ ॥
अभिमानें उठे मत्सर । मत्सरें ये तिरस्कार ।
पुढें क्रोधाचा विकार । प्रबळे बळें ॥ २३ ॥
ऐसा अंतरीं नासला । कामक्रोधें खवळला ।
अहंभावें पालटला[1] । प्रत्यक्ष दिसे ॥ २४ ॥
कामक्रोधें लिथाडिला । तो कैसा ह्मणावा भला ।
अमृत[2] सेवितां च पावला । मृत्य राहो ॥ २५ ॥
आतां असो हें बोलणें । अधिकारासारिखें घेणें ।
परंतु अभिमान त्यागणें । हें उत्तमोत्तम ॥ २६ ॥
मागां श्रोतीं आक्षेपिलें । जी ये ग्रथीं काय बोलिलें ।
तें सकळ हि निरोपिलें । संकळीतें[3] मागें ॥ २७ ॥
आता श्रवण केलियाचें फळ । क्रिया पालटे तत्काळ ।
तुटे संशयाचें मूळ । येकसरा ॥ २८ ॥
मार्ग सापडे सुगम । न लगे साधन दुर्गम ।
सायोज्यमुक्तीचें वर्म । ठाइ पडे ॥ २९ ॥
नासे अज्ञान दुःख भ्रांती । शीघ्र चि येथें ज्ञानप्राप्ती ।
ऐसी आहे फळश्रुती । इये ग्रथीं ॥ ३० ॥

---

१ बरबटला. २ मोहिनीरूप श्री विष्णु देवांस अमृत वाढीत असतां राहु लबाडीनें देवांच्या पंक्तींत जाऊन बसला. ही गोष्ट चंद्रसूर्यांनीं श्रीविष्णूच्या नजरेस आणल्यावरून राहु अमृत सेवित असता च श्रीविष्णूनें त्याचा शिरच्छेद केला. तद्वत् राहूप्रमाणें अंतरीं नासलेल्या लोकाना ह्या अमृततुल्य ग्रन्थापासून कांहीं उपयोग होणें नाहीं. ३ संक्षिप्त रीतीनें.

योगियांचें परम भाग्य । आंगीं बाणे तें वैराग्य ।
चातुर्य कळे यथायोग्य । विवेकेंसहित ॥ ३१ ॥
भ्रात अवगुणी अवलक्षण । ते चि होती सुलक्षण ।
धूर्त तार्किक विचक्षण । समयो जाणती ॥ ३२ ॥
आळसी ते चि साक्षपी होती । पापी ते चि प्रस्तावती ।
निंदक ते चि वंदू लागती । भक्तिमार्गासी ॥ ३३ ॥
बद्ध चि होती मुमुक्ष । मूर्ख होती अति दक्ष ।
अभक्त चि पावती मोक्ष । भक्तिमार्गें ॥ ३४ ॥
नाना दोष ते नासती । पतित ते चि पावन होती ।
प्राणी पावे उत्तम गती । श्रवणमात्रें ॥ ३५ ॥
नाना धोके देहबुद्धीचे । नाना किंत संदेहाचे ।
नाना उद्वेग संसाराचे । नासती श्रवणें ॥ ३६ ॥
ऐसी याची फलश्रुती । श्रवणें चुके अधोगती ।
मनास होय विश्रांती । समाधान ॥ ३७ ॥
जयाचा भावार्थ जैसा । तयास लाभ तैसा ।
मत्सर धरी जो पुंसा । तयास तें चि प्राप्त ॥ ३८ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे ग्रंथारंभलक्षणनाम समास प्रथम । १ ॥

---

॥ श्रीराम ॥

ओं नमो जि गणनायेका । सर्वसिद्धिफळदायेका ।
अज्ञानभ्रांतिछेदका । बोधरूपा ॥ १ ॥
माझिये अंतरीं भरावें । सर्वकाळ वास्तव्य करावें ।
मज वाग्सुंन्यासें वदवावें । कृपाकटाक्षेंकरूनी ॥ २ ॥
तुझिये कृपेचेनि बळें । वितुळती भ्रांतीचीं पैडळें ।
आणी विश्वभक्षक काळें । दास्यत्व कीजे ॥ ३ ॥

---

१ उद्योगी. २ पुरुष, मनुष्य. ३ वाक्शून्यास. ४ पडळे.

येतां कृपेची निज उडी । विघ्नें कांपती बापुडीं ।
होऊन जाती देशधडी । नाममात्रें ॥ ४ ॥
ह्मणौन नामें विघ्नहर । आह्मा अनाथांचें माहेर ।
आदिकरूनी हरीहर । अमर वंदिती ॥ ५ ॥
वंदूनियां मंगळनिधी । कार्य करितां सर्वसिद्धी ।
आघात अडथाळे उपाधी । बाधूं सकेना ॥ ६ ॥
जयाचें आठवितां ध्यान । वाटे परम समाधान ।
नेत्रीं रिघोनियां मन । पांगुळे सर्वांगीं ॥ ७ ॥
सगुण रूपाची टेवं । माहा लावण्य लाघव ।
नृत्य करितां सकळ देव । तटस्त होती ॥ ८ ॥
सर्वकाळ मदोन्मत्त । सदा आनंदें डुल्लत ।
हरुषें निर्भर उदितें । सुप्रसन्नवदनु ॥ ९ ॥
भव्यरूप वितंड । भीममूर्ति माहा प्रचंड ।
विस्तीर्ण मस्तकीं उदंड । सिंधूर चर्चिला ॥ १० ॥
नाना सुगंध परिमळें । थबथबां गळती गंडस्थळें ।
तेथें आलीं षट्पदकुळें । झुंकारशब्दें ॥ ११ ॥
मुर्डिव शुंडादंड सरळे । शोभे अभिनव आंवाळें ।
लंबित अधर तिक्षण गळे । क्षणक्षणा मदैसत्वी ॥ १२ ॥
चौदा विद्यांचा गोसांवी । हरस्व लोचन ते हिलावी ।
लवलवित फडकावी । फडै फडै कर्णथापा ॥ १३ ॥
रत्नखचित मुगुटीं झळाळ । नाना सुरंग फांकती कीळें ।
कुंडलें तळपती नीळें । वरी जडिले झमकती ॥ १४ ॥

---

१ ध्यानाचे वेळीं मन इतर सर्व इंद्रियांतून निघून फक्त डोळ्यांत येऊन बसतें. २ ढब किंवा आवड ३ पुष्कळ, अतिशय. ४ उल्हासयुक्त. ५ भ्रमरांचा समुदाय. ६ गंडस्थळ ७ मदसत्व, तीक्ष्ण मदसत्व क्षणक्षणा गळे. ८ ऱ्हस्व. ९ हालवी. १० तेज. ११ विलेपनें साहित्य भाळ । प्रकाशलें तेणें ॥ अशीं चरणें होतीं तीं खोडून पावल्या ओळीन च प्रस्तुतचीं लिहिलीं आहेत.

दंत शुभ्र सद्दंट[1] । रत्नखचित हेमकडु[2] ।
तयां तळवटीं पत्रें नीट । तळपती लघु लघु ॥ १५ ॥
लवथवित मेळपे दोंद । वेष्टित कटि नागबंद ।
क्षुद्र घंटिका मंद मद । वाजती झणत्कारें ॥ १६ ॥
चतुर्भुज लंबोदर । कासे कासिला पीतांबर ।
फडके दोंदिचा फणीवर । धुधूकार टाकी ॥ १७ ॥
डोलवी मस्तक जिव्हा लाळी । घालून बैसला वेटाळी ।
उभारोनि नाभिकमळीं । टकमकां पाहे ॥ १८ ॥
नाना याति कुशममाळा[6] । व्याळपैरियंत[7] रुळती गळा ।
रत्नजडित हृदयकमळा । वरी पदक शोभे ॥ १९ ॥
शोभे फरश आणी कमळ । अंकुश तिक्षण तेजाळ ।
येके करीं मोदकगोळ । तयावरी अति प्रीति ॥ २० ॥
नट नाट्य कळा कुसरी । नाना छंदें नृत्य करी ।
टाळ मृदांग भरोवरी । उपांगें हुंकारे ॥ २१ ॥
स्थिरता नाहीं येक क्षण । चपळविशईं अग्रगण ।
साजिरी मूर्ति सुलक्षण । लावण्यखाणी ॥ २२ ॥
रुणझुणा वाजती नेपुरें । वाकी वोमाटती गजरें ।
घागरियासहित मनोहरें । पाउलें दोनी ॥ २३ ॥
ईश्वरसभेसी आली शोभा । दिव्यांबराची फाकली प्रभा ।
साहित्यविशईं सुलभा । अष्ट नायका होती ॥ २४ ॥
ऐसा सर्वांगें सुंदरु । सकळ विद्यांचा आगरु ।
त्यासी माझा नमस्कारु । साष्टांग भावें ॥ २५ ॥

---

१ ठळठसित, घट. २ रत्नखचित सुवर्णाची कडीं दांताला बसविलेली असतात. ३ दांतांच्या तळवटीं ह्मणजे खालीं सुवर्णादिकाचीं पत्रें चकाकतात. ४ हालतें. ५ कटी. ६ कुसुममाळा. ७ सर्पापर्यंत; सर्प नाभिस्थानीं असल्यामुळें नाभीपर्यंत असा अर्थ. ८ कौशल्य. ९ सामुग्री. १० नृत्य होत असताना जो हुंकार होतो, तो मुखाचा उपांग होय.

ध्यान गणेशाचें वर्णितां । मतिप्रकाश होये[1] भ्रांता ।
गुणानुवाद श्रवण करितां । [2]बोले सरस्वती ॥ २६ ॥
जयासी ब्रह्मादिक वंदिती । तेथें मानव बापुडे किती ।
असो प्राणी मंदमती । तेहीं गणेश चिंतावा ॥ २७ ॥
जे मूर्ख अवलक्षण । जे कां हीणाहूनि हीण ।
ते चि होती दक्ष प्रवीण । सर्वविशईं ॥ २८ ॥
ऐसा जो परम समर्थ । पूर्ण करी मनोरथ ।
सप्रचीत भजन स्वार्थ । कलौ चंडीविनायेका ॥ २९ ॥
ऐसा गणेश मंगळमूर्ती । तो म्यां स्तविला येथामती ।
वांछ्या धरून चित्तीं । परमार्थाची ॥ ३० ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे गणेशस्तवननाम समास दुसरा ॥ २ ॥

---

॥ श्रीराम ॥

आतां वंदीन वेदमाता । श्रीशारदा ब्रह्मसुता ।
शब्दमूळ वाग्देवता । माहं[3] माया ॥ १ ॥
जे[4] उठवी शब्दांकुर । वंदे[5] वैखरी अपार ।
जे शब्दाचें अभ्यांतरें[6] । उकलून दावी ॥ २ ॥
जे योगियांची समाधी । जे धारिष्ठाची कर्तबुद्धी[7] ।
जे विद्या अविद्या उपाधी । तोडून टाकी ॥ ३ ॥
जे माहापुरुषाची भार्या । अति सलग्न अवस्ता तुर्या[8] ।
जयेकारितां महत्कार्या । प्रवर्तले साधु ॥ ४ ॥
जे महंतांची शांती । जे ईश्वराची निज शक्ती ।
जे ज्ञानियांची विरक्ती । नैराशशोभा ॥ ५ ॥

---

१ प्रसन्न होते, अनुकूल होते. २ गणपतीचें स्तवन केलें असतां सर्व मनोरथ पूर्ण होतात याची प्रतीति श्रीदासांना आलेली आहे, म्हणून श्रीगणेशाचें भजन करणें हा च आपला स्वार्थ होय ३ महा माया. ४ जी परा वाणीच्या रूपानें शब्दाचें स्फुरण उठविते व ५ वैखरीच्या रूपानें नाना प्रकारचे शब्द उच्चारविते. ६ लक्ष्यांश, रहस्य. ७ करारीपणा. ८ जाणे ब्रह्म जाणे माया । ते येक जाणावी तुर्या ॥

जे अनंत ब्रह्मांडें घडी । लीळाविनोदें चि मोडी ।
आपण आदिपुरुषीं दडी । मारून राहे ॥ ६ ॥
जे प्रत्यक्ष पाहातां आडळे । विचार घेतां तरी नाडळे ।
जयेचा पार न कळे । ब्रह्मादिकांसी ॥ ७ ॥
जे सर्व नाटकअंतर्कळा । जाणीव स्फूर्ति निर्मळा ।
जयेचेनि स्वानंदसोहळा । ज्ञानशक्ती ॥ ८ ॥
जे लावण्यस्वरूपाची शोभा । जे परब्रह्मसूर्याची प्रभा ।
जे शब्दीं वदोनि उभा । संसार नासी ॥ ९ ॥
जे मोक्षश्रिया माहांमंगळा । जे सत्रावी जीवनकळा ।
जे सत्वलीळा सुसीतळा । लावण्यखाणी ॥ १० ॥
जे अव्यक्त पुरुषाची वेक्ती । विस्तारें वाढली इछाशक्ती ।
जे कळीकाळाची नियंती । सद्गुरुकृपा ॥ ११ ॥
जे परमार्थमार्गींचा विचार । निवडून दावी सारासार ।
भवसिंधूचा पैलपार । पाववी शब्दबळें ॥ १२ ॥
ऐसी बहुवेषें नटली । माया शारदा येकली ।
सिद्धांचे अंतरीं संचली । चतुर्विधा प्रकारें ॥ १३ ॥
तींहीं वाचा अंतरीं आलें । तें वैखरिया प्रगट केलें ।
म्हणोन कर्तुत्व जितुकें जालें । तें शारदागुणें ॥ १४ ॥
जे ब्रह्मादिकांची जननी । हरीहर जयेपासुनी ।
सृष्टिरचना लोक तिनी । विस्तार जयेचा ॥ १५ ॥
जे परमार्थाचें मूळ । नांतरी सद्विद्या चि केवळ ।
निवांत निर्मळ निश्चळ । स्वरूपस्थिती ॥ १६ ॥

---

१ जी या सृष्टिरूप नाटकाचीं सूत्रें चालविणारी आहे. २ " मी एक आहे तो बहुविध व्हावें " अशी ब्रह्माचे ठिकाणीं होणारी स्फूर्ति. ३ ब्रह्मरंध्रांतून जो अमृताचा स्राव होतो तो. ४ अव्यक्त जें परब्रह्म त्याची व्यक्त दशा ती माया. ५ परा, पश्यंती, मध्यमा व वैखरी या चत्वार वाणींच्या रूपानें.

जे योगियांचे ध्यानीं । जे साधकांचे चिंतनीं ।
जे सिद्धांचे अंतःकर्णीं । समाधिरूपें ॥ १७ ॥
जे निर्गुणाची वोळखण । जे अनुभवाची खूण ।
जे व्यापकपणें संपूर्ण । सर्वां घटीं ॥ १८ ॥
शास्त्रें पुराणें वेद श्रुति । अखंड जयेचें स्तवन करिती ।
नाना रूपीं जयेसि स्तविती । प्राणीमात्र ॥ १९ ॥
जे वेदशास्त्रांची महिमा । जे निरोपमाची उपमा ।
जयेकरितां परमात्मा । ऐसें बोलिजे ॥ २० ॥
नाना विद्या कळा सिद्धी । नाना निश्चयाची बुद्धी ।
जे सूक्ष्म वस्तूची शुद्धी । ज्ञेप्तीमात्र ॥ २१ ॥
जे हरिभक्तांची निजभक्ती । अंतर्निष्ठाची अंतरस्थिती ।
जे जीवन्मुक्ताची मुक्ती । सायोज्यता ते ॥ २२ ॥
जे अनंत माया वैष्णवी । न कळे नाटक लाघवी ।
जे थोरथोरासी गोवी । जाणपणें ॥ २३ ॥
जें जें दृष्टीनें देखिलें । जें जें शब्दें वोळखिलें ।
जें जें मनास भासलें । तितुकें रूप जयेचें ॥ २४ ॥
स्तवन भजन भक्ति भाव । मायेवांचून नाहीं ठाव ।
या वचनाचा अभिप्राव । अनुभवी जाणती ॥ २५ ॥
ह्मणौनि थोराहूनि थोर । जे ईश्वराचा ईश्वर ।
तयेसी माझा नमस्कार । तदांशें चि आतां ॥ २६ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे शारदास्तवननाम समास तृतीय ॥ ३ ॥

---

१ जिच्या सापेक्षतेमुळें ईश्वराला परमात्मा असें ह्मणतात, एरव्हीं वस्तुतः तो निर्गुण, निर्नाम आहे. २ ज्ञानस्वरूप. ३ शारदा ह्मणजे माया, जगदंबा, आदिशक्ति. तिचें स्तवन या समासांत आहे.

॥ श्रीराम ॥

आतां सद्गुरु वर्णवेना । जेथें माया स्पर्शों सकेना ।
तें स्वरूप मज अज्ञाना । काय कळे ॥ १ ॥
न कळे न कळे नेति नेति । ऐसें बोलतसे श्रुती ।
तेथें मज मूर्खाची मती । पवांडेल कोठें ॥ २ ॥
मज न कळे हा विचारु । तुम्हूनि माझा नमस्कारु ।
गुरुदेवा पैलपारु । पाववीं मज ॥ ३ ॥
होती स्तवनाची दुराशा । तुटला मायेचा भर्वसा ।
आतां असाल तैसे असा । सद्गुरु स्वामी ॥ ४ ॥
मायेच्या बळें करीन स्तवन । ऐसें वांछित होतें मन ।
माया जाली लज्यायमान । काय करूं ॥ ५ ॥
नातुडे मुख्य परमात्मा । म्हणौनि करावी लागे प्रतिमा ।
तैसा मायायोगें महिमा । वर्णीन सद्गुरूचा ॥ ६ ॥
आपल्या भावासारिखा मनीं । देव आठवावा ध्यानीं ।
तैसा सद्गुरु हा स्तवनीं । स्तऊं आतां ॥ ७ ॥
जय जया जि सद्गुरुराजा । विश्वंभरा विश्वबीजा ।
परमपुरुषा मोक्षध्वजा । दीनबंधु ॥ ८ ॥
तुझीयेन अभयकरें । अनावर माया हे वोसरे ।
जैसें सूर्यप्रकाशें अंधारें । पळोन जाये ॥ ९ ॥
आदित्यें अंधकार निवारे । परंतु मागुतें ब्रह्मांड भरे ।
नीसी जालिया नंतरें । पुन्हा काळोखें ॥ १० ॥
तैसा नव्हे स्वामीराव । करी जन्ममृत्य वाव ।
समूळ अज्ञानाचा ठाव । पुसून टाकी ॥ ११ ॥

---

१ शिरकेल. २ सद्गुरूचें स्तवन करावें अशी ( अवास्तव ) इच्छा होती, परंतु श्रीसद्गुरुस्वरूप दृष्टीस पडतां, व माया विलयाला गेली, तेव्हां आतां स्तवन तरी कसें करावं, कारण " स्तवन भजन भक्ति भाव । मायेवांचून नाहीं ठाव ॥ ." ३ सांपडत नाहीं. ४ रात्र. ५ व्यर्थ, नष्ट.

सुवर्णाचें लोहो कांहीं । सर्वथा होणार नाहीं ।
तैसा गुरुदास संदेहीं । पडों चि नेणे सर्वथा ॥ १२ ॥
कां सरिता गंगेसी मिळाली । मिळणी होतां गंगा जाली ।
मग जरी वेगळी केली । तरी होणार नाहीं सर्वथा ॥ १३
परी ते सरिता मिळणीमागें । वाहाळ मानिजेत जगें ।
तैसा नव्हे शिष्य वेगें । स्वामी च होये ॥ १४ ॥
परीस आपणा ऐसें करीना । सुवर्णें लोहो पालटेना ।
उपदेश करी बहुत जना । अंकित सद्गुरूचा ॥ १५ ॥
शिष्यास गुरुत्व प्राप्त होये । सुवर्णें सुवर्ण करितां न ये ।
ह्मणौनि उपमा न साहे । सद्गुरूसी परिसाची ॥ १६ ॥
उपमे द्यावा सागर । तरी तो अत्यंत चि क्षार ।
अथवा ह्मणों क्षीरसागर । तरी तो नासेल कल्पांतीं ॥ १७ ॥
उपमे द्यावा जरी मेरु । तरी तो जड पाषाण कठोरु ।
तैसा नव्हे कीं सद्गुरु । कोमळ दिनाचा ॥ १८ ॥
उपमे ह्मणों गगन । तरी गगनापरीस तें निर्गुण ।
या कारणें दृष्टांत हीण । सद्गुरूस गगनाचा ॥ १९ ॥
धीरपणें उपमूं जगती । तरी हे हि खचेल कल्पांतीं ।
ह्मणौन धीरत्वास दृष्टांतीं । हीण वसुंधरा ॥ २० ॥
आतां उपमावा गभस्ती । तरी गभस्तीचा प्रकाश किती ।
शास्त्रें मर्यादा बोलती । सद्गुरु अमर्याद ॥ २१ ॥
ह्मणौनि उपमे उणा दिनकर । सद्गुरुज्ञानप्रकाश थोर ।
आतां उपमावा फणीवर । तरी तो हि भारवाही ॥ २२ ॥
आतां उपमे द्यावें जळ । तरी तें काळांतरीं आटेल सकळ ।
सद्गुरुरूप तें निश्चळ । जाणार नाहीं ॥ २३ ॥
सद्गुरूसी उपमावें अमृत । तरी अमर[2] धरिती मृत्यपंथ ।
सद्गुरुकृपा यथार्थ । अमर[3] करी ॥ २४ ॥

१ लवण. २ देव. ३ मरणरहित.

सद्गुरूसी ह्मणावें कल्पतरु । तरी हा कल्पनेतीत विचारु ।
कल्पवृक्षाचा अंगिकारु । कोण करी ॥ २५ ॥
चिंता मात्र नाहीं मनीं । कोण पुसे चिंतामणी ।
कामधेनूचीं दुभणीं । निःकामासी न लगती ॥ २६ ॥
सद्गुरु ह्मणों लक्ष्मीवंत । तरी तें लक्ष्मी नाशिवंत ।
ज्याचे द्वारीं असे तिष्ठत । मोक्षलक्ष्मी ॥ २७ ॥
स्वर्गलोक इंद्र संपती । हे काळांतरीं विटंबती ।
सद्गुरुकृपेची प्राप्ती । काळांतरीं चळेना ॥ २८ ॥
हरीहर ब्रह्मादिक । नाश पावती सकळिक ।
सर्वदा अविनाश येक । सद्गुरुपद ॥ २९ ॥
तयासी उपमा काय द्यावी । नाशिवंत सृष्टी आघवी ।
पंचभूतिक उठाठेवी । न चले तेथें ॥ ३० ॥
ह्मणौनि सद्गुरु वर्णवेना । हे गे हे चि माझी वर्णना ।
अंतरस्थितीचिया खुणा । अंतर्निष्ठ जाणती ॥ ३१ ॥

इति सद्गुरुस्तवन नाम समास ॥ ४ ॥

---

॥ श्रीराम ॥

आतां वंदीन सज्जन । जे परमार्थाचें अधिष्ठान ।
जयांचेनि गुह्यज्ञान । प्रगटे जनीं ॥ १ ॥
जे वस्तु परम दुल्लभ । जयेचा अलभ्य लाभ ।
तें चि होये सुल्लभ । सतसंगेंकरूनी ॥ २ ॥
वस्तु प्रगट चि असे । पाहातां कोणासी च न दिसे ।
नाना साधनीं सायासें । न पडे ठाईं ॥ ३ ॥

---

१ दोहन किंवा पान्हा. २ नाश पावती. ३ हे गे हे चि = ही जी आहे ती च. गे हें पादपूरणार्थ आहे. " सद्गुरूचें वर्णन होत नाहीं हें च सद्गुरूचें वर्णन " असा अर्थ. ४ " सज्जन " ऐ. रामागें समासांत " संत " शब्द लिहिला आहे व खोडला आहे. ५ आश्रय. ६ महा.

जेथें परीक्षवंत ठकले । नांतरी डोळस चि अंध जाले ।
पाहात असता चि चुकले । निजवस्तूसी ॥ ४ ॥
जें दीपाचेनि दिसेना । नाना प्रकाशें गवसेना ।
नेत्रांजनें हि वसेना । दृष्टीपुढें ॥ ५ ॥
सोळा कळी पूर्ण शशी । दाखऊं सकेना वस्तूसी ।
तीव्र आदित्य कळारासी । तो हि दाखवीना ॥ ६ ॥
जया सूर्याचेनि प्रकाशें । ऊर्णतंतु[१] तो हि दिसे ।
नाना सूक्ष्म पदार्थ भासे । अणुरेणादिक ॥ ७ ॥
चिरलें वाळाग्र[२] तें हि प्रकासी । परी तो दाखवीना वस्तूसी ।
तें जयाचेनि साधकांसी । प्राप्त होये ॥ ८ ॥
जेथें आक्षेप आटले । जेथें प्रेत्न प्रस्तावले ।
जेथें तर्क मदावले । तर्कितां निजवस्तूसी ॥ ९ ॥
वळे विवेकाची वेंगडी[३] । पडे शब्दाची बोबडी ।
जेथें मनाची तातडी । कामा नये ॥ १० ॥
जो बोलकेपणें विशेष । सहस्र मुखाचा जो शेष ।
तो हि सिणला निःशेष । वस्तु न संगवे ॥ ११ ॥
वेदें प्रकाशिलें सर्व हि । वेदविरहित कांहीं नाहीं ।
तो वेद कोणास हि । दाखऊं सकेना ॥ १२ ॥
ते चि वस्तु संतसंगें । स्वानुभवें कळों लागे ।
त्याचा महिमा वचनीं सांगे । ऐसा कवणु ॥ १३ ॥
विचित्र कळा ये मायेची । परी बोळखी न सगवे वस्तूची ।
मायातीता अनंताची । सत सोये सांगती ॥ १४ ॥
वस्तूसी वर्णिलें नवचे । तें चि स्वरूप संतांचें ।
या कारणें वचनाचें । कार्य नाहीं ॥ १५ ॥
संत आनंदाचें स्थळ । संत सुख चि केवळ ।

---

१ लोंकरीचा बारीक धागा किंवा कोळी पोटांतून तंतु काढतो तो. २ बाळाग्र, केसाचें टोंक. ३ वेंगडी, आग आवळलें जाणें किंवा आकुंचित होणें त्याचें नांव वेंगडी

नाना संतोषाचें मूळ । ते हे संत ॥ १६ ॥
संत विश्रांतीची विश्रांती । संत तृप्तीची निजतृप्ती ।
नांतरी भक्तीची फळश्रुती । ते हे संत ॥ १७ ॥
संत धर्माचें धर्मक्षेत्र । संत स्वरूपाचें सत्पात्र ।
नातरी पुण्याची पवित्र । पुण्य भूमी ॥ १८ ॥
संत समाधीचें मंदिर । संत विवेकाचें भांडार ।
नातरी बोलिजे माहेर । सायोज्यमुक्तीचें ॥ १९ ॥
संत सत्याचा निश्चयो । संत सार्थकाचा जयो ।
संत प्राप्तीचा समयो[1] । सिद्धरूप ॥ २० ॥
मोक्षश्रिया आळंकृत । ऐसे हे संत श्रीमंत ।
जीव दरिद्री असंख्यात । नृपती केले ॥ २१ ॥
जे समर्थपणें उदार । जे कां अत्यंत दानशूर ।
तयांचेनि हा ज्ञानविचार । दिधला न वचे ॥ २२ ॥
माहांराजे चक्रवती । जाले आहेत पुढें होती ।
परंतु कोणी सायोज्यमुक्ती । देणार नाहीं ॥ २३ ॥
जें त्रैलोकीं नाहीं दान । तें करिती संतसज्जन ।
तयां संताचें महिमान । काय ह्मणौनि वर्णावें ॥ २४ ॥
जें त्रैलोक्याहून वेगळें । जें वेदश्रुतीसी नाकळे ।
तें चि जयांचेनि वोळे । परब्रह्म अंतरीं ॥ २५ ॥
ऐसी संताची महिमां । बोलिजे तितुकी उणी उपमा ।
जयांचेनि मुख्य परमात्मा । प्रगट होये ॥ २६ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे संतस्तवननाम समास पांचवा ॥ ५ ॥

---

॥ श्रीराम ॥

आतां वंदूं श्रोते जन । भक्त ज्ञानी संत सज्जन ।
विरक्त योगी गुणसंपन्न । सत्यवादी ॥ १ ॥

---

१ आकलन होत नाहीं.

येक सत्वाचे सागर । येक बुद्धीचे आगर ।
येक श्रोते बैरागरें । नाना शब्दरत्नाचे ॥ २ ॥
जे नाना अर्थांबृताचे भोक्ते । जे प्रसंगीं वक्तयाचे वक्ते ।
नाना सशयातें छेदिते । निश्चै पुरुप ॥ ३ ॥
ज्याची धारणा अपार । जे ईश्वराचे अवतार ।
नातरी प्रत्यक्ष सुरवर । बैसले जैसे ॥ ४ ॥
किं हे ऋषेश्वरांची मंडळी । शांतस्वरूप सत्वागळी ।
जयांचेनि सभामडळीं । परम शोभा ॥ ५ ॥
हृदईं वेदगर्भ विलसे । मुखीं सरस्वती विळासे ।
सौहित्य बोलता जैसे । भासती देवगुरु ॥ ६ ॥
जे पवित्रपणें वैश्वानर । जे स्फूर्तिकिरणाचे दिनकर
ज्ञातेपणें दृष्टीसमोर । ब्रह्मांड न ये ॥ ७ ॥
जे अखड सावधान । जयास त्रिकाळाचें ज्ञान ।
सर्वकाळ निराभिमान । आत्मज्ञानी ॥ ८ ॥
ज्यांचे दृष्टीखाल्हून गेलें । ऐसें कांहीं च नाहीं उरलें
पदार्थमात्रासी लक्षिलें । मनें जयाच्या ॥ ९ ॥
जें जें काहीं आठवावें । तें तें तयांस पूर्वीं च ठावें
तेथें काये अनुवादावें । ज्ञातेपणेंकरूनी ॥ १० ॥
परंतु हे गुणग्राहिक । ह्मणौन बोलतों निःशंक ।
भाग्यपुरुष काये येक । सेवीत नाहीं ॥ ११ ॥
सदा सेविती दिव्यान्नें । पालटाकारणें आवेर्टं अन्नें ।
तैसीं च माझीं वचनें । पैराकृतें ॥ १२ ॥
आपुले शक्तिनसार । भावें पुजावा परमेश्वर ।
परतु पुजू नये हा विचार । कोठें चि नाहीं ॥ १३ ॥

---

१ खाण. २ अर्थामृताचे. ३ सत्वगुण आगळा ह्मणजे विशेष अधिक ज्यांच्यांत. ४ कवित्व, वक्तृत्व, अलकारशास्त्र. ५ बृहस्पति. ६ अग्नि. ७ ज्यांच्या ज्ञानापुढें ब्रह्मांड हि तुच्छ आहे. ८ ज्याचा वीट येत नाहीं अशीं. ९ प्राकृतें.

तैसा मी येक वाग्दुर्बळ । श्रोते परमेश्वर चि केवळ ।
यांची पूजा वांचाबरळ । करूं पाहे ॥ १४ ॥
वित्पत्ती नाहीं कळा नाहीं । चातुर्य नाहीं प्रबंद नाहीं ।
भक्ति ज्ञान वैराग्य नाहीं । गौल्यतां नाहीं वचनाचीं ॥ १५ ॥
ऐसा माझा वाग्विळास । ह्मणौन बोलतों सावकाश ।
भावाचा भोक्ता जगदीश । ह्मणौनिया ॥ १६ ॥
तुह्मी श्रोते जगदीशमूर्ति । तेथें माझी वित्पत्ती किती ।
बुद्धिहीण अल्पमती । सलगी करितों ॥ १७ ॥
समर्थाचा पुत्र मूर्ख जगीं । परी सामर्थ्य असे त्याचा आगीं ।
तुह्मां संतांचा सलगी । ह्मणौनि करितों ॥ १८ ॥
व्याघ्र सिंह भयानक । देखोनि भयाचकित लोक ।
परी त्यांचीं पिलीं निःशक । तयांपुढें खेळती ॥ १९ ॥
तैसा मी संतांचा अंकित । तुह्मां सतांपासीं बोलत ।
तरी माझी चिंता तुमचें चित्त । वाहेल च कीं ॥ २० ॥
आपलें चि बोले वाउगें । त्याची संपादणी करणें लागे ।
परंतु कांहीं सांगणें नलगे । न्यून तें पूर्ण करावें ॥ २१ ॥
हें तों प्रीतीचें लक्षण । स्वभावें चि करी मन ।
तैसे तुह्मी सतसज्जन । मायेबाप विश्वाचे ॥ २२ ॥
माझा आशय जाणोनि जीवें । आतां उचित तें करावें ।
पुढें कथेसि अवधान द्यावें । ह्मणे दासानुदास ॥ २३ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे श्रोतेस्तवननाम समास साहवा ॥ ६ ॥

---

॥ श्रीराम ॥

आतां वंदूं कवेश्वर । शब्दसृष्टीचे ईश्वर ।
नातरी हे परमेश्वर । वेदावतारी ॥ १ ॥

---

१ वाचेनें कांहीं तरी बरळणारा. २ काव्यप्रबंध. ३ गोडी, रसाळपणा, माधुर्य.

कीं हे सरस्वतीचें निजस्थान । कीं हे नाना कळाचें जीवन ।
नाना शब्दांचें भुवन । येथार्थ होये ॥ २ ॥
कीं हे पुरुषार्थाचें वैभव । कीं हे जगदेश्वराचें महत्व[1] ।
नाना लाघवें सत्कीर्तीस्तव । निर्माण कवी ॥ ३ ॥
कीं हे शब्दरत्नाचे सागर । कीं हे मुक्तांचें मुक्त सरोवर ।
नाना बुद्धीचे वैरागर । निर्माण जाले ॥ ४ ॥
अध्यात्मग्रथाची खाणी । कीं हे बोलिके चिंतामणी ।
नाना कामधेनूचीं दुभणीं । वोळलीं श्रोतयांसी ॥ ५ ॥
कीं हे कल्पनेचे कल्पतरु । कीं हे मोक्षाचे मुख्य पडीभरु[2] ।
नाना सायोज्यतेचे विस्तारु । विस्तारले ॥ ६ ॥
कीं हा परलोकींचा निजस्वार्थु । कीं हा योगियांचा गुप्त पंथु ।
नाना ज्ञानियांचा परमार्थु । रूपासि आला ॥ ७ ॥
कीं हे निरंजनाची खूण । कीं हे निर्गुणाची वोळखण ।
मायाविलक्षणाचें[3] लक्षण । ते हे कवी ॥ ८ ॥
कीं हा श्रुतीचा भावगर्भ । कीं हा परमेश्वराचा अलभ्य लाभ ।
नातरी होये सुल्लभ । निजबोध कविरूपें ॥ ९ ॥
कवि मुमुक्षाचें अंजन । कवि साधकांचें साधन ।
कवि सिद्धांचें समाधान । निश्चयात्मक ॥ १० ॥
कवि स्वधर्माचा आश्रयो । कवि मनाचा मनोजयो ।
कवि धार्मिकाचा विनयो । विनयकर्ते ॥ ११ ॥
कवि वैराग्याचें संरक्षण । कवि भक्तांचें भूषण ।
नाना स्वधर्मरक्षण । ते हे कवी ॥ १२ ॥
कवि प्रेमळांची प्रेमळ स्थिती । कवि ध्यानस्थाची ध्यानमूर्ती ।
कवि उपासकाची वाढ कीर्ती । विस्तारली ॥ १३ ॥

---

१ जगदीश्वराचें महत्त्व, त्याची अगाध लीला व सत्कीर्ति यांच्या वर्णनासाठीं कवि हे निर्माण झाले आहेत. २ पडिभार, पडिवार, वडिवार, श्रेष्ठ, असा अर्थ किंवा खांब, आधार, आश्रय असा अर्थ. ३ मायेपासून भिन्न अशा परमात्म्याचें.

नाना साधनाचें मूळ । कवि नाना प्रेत्नाचें फळ ।
नाना कार्यसिद्धी केवळ । कविचेनि प्रसादें ॥ १४ ॥
आधीं कवीचा वाग्विळास । तरी मग श्रवणीं तुबळे रस ।
कवीचेनि मतिप्रकाश । कवित्वास होये ॥ १५ ॥
कवि वित्पन्नाची योग्यता । कवि सामर्थ्यवंताची सत्ता ।
कवि विचक्षणाची कुशळता । नाना प्रकारें ॥ १६ ॥
कवि कवित्वाचा प्रबद । कवि नाना धाटी मुद्रा छंद ।
कवि गद्यपद्यभेदाभेद । पदत्रासकर्ते[1] ॥ १७ ॥
कवि सृष्टीचा आळंकार । कवि लक्ष्मीचा शृंघार ।
सकळ सिद्धीचा निर्धार । ते हे कवी ॥ १८ ॥
कवि सभेचें मंडण । कवि भाग्याचें भूषण ।
नाना सुखाचें सरक्षण । ते हे कवी ॥ १९ ॥
कवि देवाचें रूपकर्ते । कवि ऋषींचे महत्ववर्णिते ।
नाना शास्त्रांचें सामर्थ्य ते । कवि वाखाणिती ॥ २० ॥
नस्ता कवींचा व्यापार । तरी कैचा अस्ता जगोद्धार ।
ह्मणौनि कवि हे आधार । सकळ सृष्टीसी ॥ २१ ॥
नाना विद्या ज्ञातृत्व कांहीं । कवेश्वरेंविण तों नाहीं ।
कवीपासून सर्व हि । सर्वज्ञता ॥ २२ ॥
मागां वाल्मीक व्यासादिक । जाले कवेश्वर अनेक ।
तयापासून विवेक । सकळ जनासी ॥ २३ ॥
पूर्वी काव्यें होतीं केलीं । तरी च वित्पत्ती प्राप्त जाली ।
तेणें पडिताआंगीं आणली । परम योग्यता ॥ २४ ॥
ऐसे पूर्वी थोर थोर । जाले कवेश्वर अपार ।
आता आहेत पुढें होणार । नमन त्यासी ॥ २५ ॥

---

१ मूळ पोथींत " पदत्रासकर्ते " असें स्पष्ट आहे. " त्रा " च्या ठिकाणीं " प्रा " पाहिजे असें मनांत येतें. पण अन्यत्र हि श्रीसमर्थकवितेंत " पदें त्रास " असा च प्रयोग आढळतो.

नाना चातुर्याच्या मूर्ती । कीं हे साक्षात् बृहस्पती ।
वेद श्रुती बोलों ह्मणती । ज्याच्या मुखें ॥ २६ ॥
परोपकाराकारणें । नाना निश्चय अनुवादणें ।
सेखीं बोलिले पूर्णपणें । संशयातीत ॥ २७ ॥
कीं हे अमृताचे मेघ वोळले । कीं हे नवरसाचे वोघ लोटले ।
नाना सुखाचे उचंबळले । सरोवर हे ॥ २८ ॥
कीं हे विवेकनिधीचीं भांडारें । प्रगट जालीं मनुष्याकारें ।
नाना वस्तूचेनि विचारें । कोंदाटले हे ॥ २९ ॥
कीं हें आदिशक्तीचें ठेवणें । नाना पदार्थास आणी उणें ।
लाधलें पूर्व संचिताच्या गुणें । विश्वजनासी ॥ ३० ॥
कीं हें सुखाचीं तारुवें लोटलीं । आक्षे आनंदें उतटलीं ।
विश्वजनास उपेगा आलीं । नाना प्रयोगाकारणें ॥ ३१ ॥
कीं हे निरंजनाची संपत्ती । कीं हे विराटाची योगस्थिती ।
नातरी भक्तीची फळश्रुती । फळास आली ॥ ३२ ॥
कीं हा ईश्वराचा पवाडे । पाहातां गगनाहून वाड ।
ब्रह्मांडरचनेहून जाड । कविप्रबंदरचना ॥ ३३ ॥
आतां असो हा विचार । जगास आधार कवेश्वर ।
तयांसी माझा नमस्कार । साष्टांग भावें ॥ ३४ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसवादे कवेश्वरस्तवननाम समास सप्तम ॥ ७ ॥

---

॥ श्रीराम ॥

आतां वंदू सकळ सभा । जये सभेसी मुक्ति सुल्लभा ।
जेथें स्वयें जगदीश उभा । तिष्ठतु भेरें ॥ १ ॥
श्लोक ॥ नाहं वसामि वैकुंठे । योगिनां हृदये रवौ ।
मद्भक्ता यत्र गायन्ति तत्र तिष्ठामि नारद ॥ ५ ॥

---

१ शेवटीं. २ भरून आलीं. ३ उपयोगा. ४ मोठेपणा, कीर्ति. ५ आनंदाच्या भरानें.

नाहीं वैकुंठीचा ठाईं । नाहीं योगियांचा ह्रदईं ।
माझे भक्त गाती ठाईं ठाईं । तेथें मीं तिष्ठतु नारदा ॥ २ ॥
याकारणें सभा श्रेष्ठ । भक्त गाती तें वैकुंठ ।
नामघोषें घडघडाट । जयजयकारें गर्जती ॥ ३ ॥
प्रेमळ भक्तांचीं गायनें । भगवत्कथा हरिकीर्तनें ।
वेदव्याख्यान पुराणश्रवणें । जेथें निरंतर ॥ ४ ॥
परमेश्वराचे गुणानुवाद । नाना निरूपणाचे संवाद ।
अध्यात्मविद्या भेदाभेद । मथंन जेथें ॥ ५ ॥
नाना समाधानें तृप्ती । नाना आशंकानिवृत्ती ।
चित्तीं बैसे ध्यानमूर्ति । वाग्विळासें ॥ ६ ॥
भक्त प्रेमळ भाविक । सभ्य सखोलें सात्विक ।
रम्य रसाळ गायक । निष्ठावंत ॥ ७ ॥
कर्मसीळ आचारसीळ । दानसीळ धर्मसीळ ।
सुचिस्मत पुण्यसीळ । अंतरशुद्ध कृपाळु ॥ ८ ॥
योगी वीतरागी उदास । नेमक निग्रह तापस ।
विरक्त निस्पृह बहुवस । आरण्यवासी ॥ ९ ॥
दंडधारी जटाधारी । नाथपंथी मुद्राधारी ।
येक बाळब्रह्मच्यारी । योगेश्वर ॥ १० ॥
पुरश्चरणी आणी तपस्वी । तीर्थवासी आणी मनस्वी ।
माहायोगी आणी जनस्वी । जनासारिखे ॥ ११ ॥
सिद्ध साधु आणी साधक । मंत्रयंत्रशोधक ।
येकनिष्ठ उपासक । गुणग्राही ॥ १२ ॥
संत सज्जन विद्वज्जन । वेदज्ञ शास्त्रज्ञ माहाजन ।
प्रबुद्ध सर्वज्ञ समाधान । विमळकर्तें ॥ १३ ॥

---

१ अध्यात्मशास्त्रांतील भिन्न भिन्न विषयांबद्दल जेथें चर्चा चालते. २ गंभीर. ३ वैराग्यसंपन्न. ४ मन स्वाधीन ठेवणारे. ५ जनाप्रमाणे वागणारे. ६ विमल ( म्हणजे शुद्ध ) समाधान करणारे.

योगी वित्पन्न ऋषेश्वर । धूर्त तार्किक कवेश्वर ।
मनोजयाचे मुनेश्वर । आणी दिग्वल्की[1] ॥ १४ ॥
ब्रह्मज्ञानी आत्मज्ञानी । तत्वज्ञानी पिंडज्ञानी ।
योगाभ्यासी योगज्ञानी । उदासीन ॥ १५ ॥
पंडित आणी पुराणिक । विद्वांस आणी वैदिक ।
भट आणी पाठक । येजुर्वेदी ॥ १६ ॥
माहाभले माहाश्रोत्री । याज्ञिक आणी आग्नहोत्री ।
वैद्य आणी पचाक्षरी । परोपकारकर्ते ॥ १७ ॥
भूत भविष्य वर्तमान । जयांस त्रिकाळाचें ज्ञान ।
बहुश्रुत निराभिमान । निरापेक्षी ॥ १८ ॥
शांति क्षमा दयासीळ । पवित्र आणी सत्वसीळ ।
अतरशुद्ध ज्ञानसीळ । ईश्वरी पुरुष ॥ १९ ॥
ऐसे जे कां सभानायेक । जेथें नित्यानित्यविवेक ।
त्याचा महिमा अलोलिक । काय ह्मणोनि वर्णावा ॥ २० ॥
जेथें श्रवणाचा उपाये । आणी परमार्थसमुदाये ।
तेथें जनासी तरणोपाये । सहज चि होये ॥ २१ ॥
उत्तम गुणाची मडळी । सत्वधीर सत्वागळी ।
नित्य सुखाची नव्हाळी[2] । जेथें वसे ॥ २२ ॥
विद्यापात्रें कळापात्रें । विशेष गुणाची सत्पात्रें ।
भगवंताचीं प्रीतिपात्रें । मिळालीं जेथें ॥ २३ ॥
प्रवृत्ती आणी निवृत्ती । प्रपची आणी परमार्थी ।
गृहस्ताश्रमी वानप्रहस्ती । सन्यासादिक ॥ २४ ॥
वृद्ध तरुण आणी बाळ । पुरुष स्त्रियादिक सकळ ।
अखड ध्याती तमाळनीळें[3] । अंतर्यामीं ॥ २५ ॥

---

१ दिशा हें च वल्कल आहे ज्यांचें. २ नूतनपणा, प्राप्ति ( हंसकोश ). ३ तमालनील, विष्णु.

ऐसे परमेश्वराचे जन । त्यासी माझें अभिवंदन ।
जयांचेनि समाधान । अकस्मात बाणे ॥ २६ ॥
ऐसिये सभेचा गजर । तेथें माझा नमस्कार ।
जेथें नित्य निरंतर । कीर्तन भगवंताचें ॥ २७ ॥
जेथें भगवंताच्या मूर्ती । तेथें पाविजे उत्तम गती ।
ऐसा निश्चय बहुतां ग्रंथीं । महंत बोलिले ॥ २८ ॥
कलौ कीर्तन वरिष्ठ । जेथें होय ते सभा श्रेष्ठ ।
कथाश्रवणें नाना नष्ट । संदेह मावळती ॥ २९ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सभास्तवन ॥ ८ ॥

---

॥ श्रीराम ॥

आतां स्तऊं हा परमार्थ । जो साधकाचा निजस्वार्थ ।
नांतरी समर्थामध्यें समर्थ । योग हा ॥ १ ॥
आहे तरी परम सुगम । परी जनासी जाला दुर्गम ।
कां जयाचें चुकलें वर्म । सत्समागमाकडे[1] ॥ २ ॥
नाना साधनाचे उधार । हा रोकडा ब्रह्मसाक्षात्कार ।
वेदशास्त्रीं जें सार । तें अनुभवास ये ॥ ३ ॥
आहे तरी चहूंकडे । परी अणुमात्र दृष्टी न पडे ।
उदास परी येकीकडे । पाहातां दिसेना ॥ ४ ॥
आकाशमार्गीं गुप्त पंथ । जाणती योगिये समर्थ ।
इतरांस हा गुह्यार्थ । सहसा न कळे ॥ ५ ॥
साराचें हि निजसार । अखंड अक्षै अपार ।
नेऊं न सकती तस्कर । कांहीं केल्यां ॥ ६ ॥
तयास नाहीं राजभये । अथवा नाहीं अग्निभये ।
अथवा स्वापदभये । दोलों च नये ॥ ७ ॥

---

१ सत्समागमाचें वर्म न समजल्यामुळें, सत्समागम न घडल्यामुळें.

परब्रह्म तें हालवेना । अथवा ठाव हि चुकेना ।
काळांतरीं चळेना । जेथीचा तेथें ॥ ८ ॥
ऐसें तें निज ठेवणें । कदापी पालटों नेणे ।
अथवा नव्हे आदिक उणें । बहुतां काळें ॥ ९ ॥
अथवा तें घसवटेना । अथवा अदृश्य होयेना ।
नातरी पाहातां दिसेना । गुरुअंजनेंविण ॥ १० ॥
मागा योगिये समर्थ । त्यांचा हि निजस्वार्थ ।
यासी बोलिजे परमार्थ । परमगुह्य ह्मणौनि ॥ ११ ॥
जेंहीं शोधून पाहिला । त्यासी अर्थ सापडला ।
येरां असोनि अलभ्य जाला । जन्मोजन्मीं ॥ १२ ॥
अपूर्वता या परमार्थाची । वार्ता नाहीं जन्ममृत्याची ।
आणी पदवी सायोज्यतेची । सन्निध चि लाभे ॥ १३ ॥
माया विवेकें मावळे । सारासार विचार कळे ।
परब्रह्म तें हि निवळे । अंतर्यामीं ॥ १४ ॥
ब्रह्म भासलें उदंड । ब्रह्मीं बुडालें ब्रह्मांड ।
पञ्चभूतांचें थोतांड । तुछ्य वाटे ॥ १५ ॥
प्रपंच वाटे लटिका । माया वाटे लापणिका[2] ।
शुद्ध आत्मा विवेका । अंतरीं आला ॥ १६ ॥
ब्रह्मस्थित बाणता अंतरीं । सदेह गेला ब्रह्मांडाबाहेरी ।
दृश्याची जुनी जर्जरी । कुहिट जाली ॥ १७ ॥
ऐसा हा परमार्थ । जो करी त्याचा निजस्वार्थ ।
आतां या समर्थास समर्थ । किती ह्मणौनि ह्मणावें ॥ १८ ॥
या परमार्थाकरितां । ब्रह्मादिकांसि विश्रामता ।
योगी पावती तन्मयता । परब्रह्मीं ॥ १९ ॥

---

१ घांसत किंवा झिजत नाहीं. २ लपंडावाप्रमाणें मिथ्या. ३ जर्जरी=आगाचा खिळखिळितपणा. कुहिट जाली=विटली. " दृश्य हें जुनें व जर्जर होऊन विटलें " असा अर्थ.

परमार्थ सकळांस विसांवा । सिद्ध साधु माहानुभावां ।
सेखीं सात्विक जड जीवा । सत्संगेंकरूनी ॥ २० ॥
परमार्थ जन्माचें सार्थक । परमार्थ संसारीं तारक ।
परमार्थ दाखवी परलोक । धार्मिकासी ॥ २१ ॥
परमार्थ तापसांसी थार । परमार्थ साधकांसी आधार ।
परमार्थ दाखवी पार । भवसागराचा ॥ २२ ॥
परमार्थी तो राज्यधारी । परमार्थ नाहीं तो भिकारी ।
या परमार्थाची सरी । कोणास द्यावी ॥ २३ ॥
अनंत जन्मीचें पुण्य जोडे । तरी च परमार्थ घडे ।
मुख्य परमात्मा आतुडे । अनुभवासी ॥ २४ ॥
जेणें परमार्थ वोळखिला । तेणें जन्म सार्थक केला ।
येर तो पापी जन्मला । कुळक्षयाकारणें ॥ २५ ॥
असो भगवत्प्राप्तीविण । करी संसाराचा सीण ।
त्या मूर्खाचें मुखावलोकन । करू च नये ॥ २६ ॥
भल्यानें परमार्थी भरावें । शरीर सार्थक करावें ।
पूर्वजांस उद्धरावें । हरिभक्ती करूनी ॥ २७ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे परमार्थस्तवन ॥ ९ ॥

---

॥ श्रीराम ॥

धन्य धन्य हा नरदेहो । येथील अपूर्वता पाहो ।
जो जो कीजे परमार्थलाहो । तो तो पावे सिद्धीतें ॥ १ ॥
या नरदेहाचेनि लागवेगें । येक लागले भक्तिसंगें ।
येकीं परम वीतरागें । गिरिकंदरें सेविलीं ॥ २ ॥
येक फिरती तीर्थाटणें । येक करिती पुरश्चरणें ।
येक अखंड नामस्मरणें । निष्ठावंत राहिले ॥ ३ ॥

---

१ बरोबरीची योग्यता. २ लाहो म्हणजे लाभ.

येक तपें करूं लागले । येक योगाभ्यासी माहाभले ।
येक अभ्यासयोगें जाले । वेदशास्त्रीं वित्पन्न ॥ ४ ॥
येकीं हटनिग्रह केला । देह अत्यत पीडिला ।
येकीं देव ठाईं पाडिला । भावार्थबळें ॥ ५ ॥
येक माहानुभाव विख्यात । येक भक्त जाले ख्यात ।
येक सिद्ध अकस्मात । गगन वोळगती[1] ॥ ६ ॥
येक तेजीं तेज चि जाले । येक जळीं मिळोन गेले ।
येक ते दिसत चि अदृश्य जाले । वायोस्वरूपीं ॥ ७ ॥
येक येक चि बहुधा होती । येक देखत चि निघोनि जाती ।
येक बैसले असतां चि भ्रमती । नाना स्थानीं समुद्रीं ॥ ८ ॥
येक भयानकावरी बैसती । येक अचेतनें चाळविती ।
येक प्रेतें उठविती । तपोबळेंकरूनी ॥ ९ ॥
येक तेजें मंद करिती । येक जळें आटविती ।
येक वायो निरोधिती । विश्वजनाचा ॥ १० ॥
ऐसे हटनिग्रही कृतबुद्धी[2] । जयास वोळल्या नाना सिद्धि ।
ऐसे सिद्ध लक्षावधी । होऊन गेले ॥ ११ ॥
येक मनोसिद्ध येक वाचासिद्ध । येक अल्पसिद्ध येक सर्वसिद्ध ।
ऐसे नाना प्रकारीचे सिद्ध । विख्यात जाले ॥ १२ ॥
येक नवविधाभक्तिराजपथें । गेले तरले परलोकींच्या निजस्वार्थें ।
येक योगी गुप्तपथें । ब्रह्मभुवना पावले ॥ १३ ॥
येक वैकुंठास गेले । येक सत्यलोकीं राहिले ।
येक कैळासीं बैसले । शिवरूप होउनी ॥ १४ ॥
येक इंद्रलोकीं इंद्र जाले । येक पितृलोकीं मिळाले ।
येक ते उडगणीं[3] बैसले । येक ते क्षीरसागरीं ॥ १५ ॥
सलोकता समीपता । स्वरूपता सायोज्यता ।
या च्यत्वार मुक्ती तत्वता । इच्छा सेऊन राहिले ॥ १६ ॥

---

१ सचरती. २ निश्चयी. ३ उडुगण, नक्षत्रें.

४

ऐसे सिद्ध साधु संत । स्वहिता प्रवर्तले अनंत ।  
ऐसा हा नरदेह विख्यात । काय ह्मणौनि वर्णावा ॥ १७ ॥  
या नरदेहाचेनि आधारें । नाना साधनांचेनि द्वारें ।  
मुख्य सारासारविचारें । बहुत सुटले ॥ १८ ॥  
या नरदेहाचेनि संमंधें । बहुत पावले उत्तम पदें ।  
अहंता सांडून स्वानंदें । सुखी जाले ॥ १९ ॥  
नरदेहीं येऊन सकळ । उधरोगती पावले केवळ ।  
येथें सशयाचें मूळ । खंडोन गेलें ॥ २० ॥  
पशुदेहीं नाहीं गती । ऐसें सर्वत्र बोलती ।  
ह्मणौन नरदेहीं च प्राप्ती । परलोकाची ॥ २१ ॥  
संत महंत ऋषी मुनी । सिद्ध साधु समाधानी ।  
भक्त मुक्त ब्रह्मज्ञानी । विरक्त योगी तपस्वी ॥ २२ ॥  
तत्वज्ञानी योगाभ्यासी । ब्रह्मच्यारी दिगंबर संन्यासी ।  
शडदर्शनी तापसी । नरदेहीं च जाले ॥ २३ ॥  
ह्मणौनि नरदेह श्रेष्ठ । नाना देहांमधें वरिष्ठ ।  
जयाचेनि चुके आरिष्ट । येमयातनेचें ॥ २४ ॥  
नरदेह हा स्वाधेन । सहसा नव्हे पराधेन ।  
परंतु हा परोपकारीं झिजऊन । कीर्तिरूपें उरवावा ॥ २५ ॥  
अश्व वृषभ गाई ह्मैसी । नाना पशु स्त्रिया दासी ।  
कृपाळूपणें सोडितां त्यांसी । कोणी तरी धरील ॥ २६ ॥  
तैसा नव्हे नरदेहो । इछा जाव अथवा राहो ।  
परी यास कोणी पाहो । बंधन करूं सकेना ॥ २७ ॥  
नरदेह पांगुळ असता । तरी तो कार्यास न येतां ।  
अथवा थोटा जरी असता । तरी परोपकारास नये ॥ २८ ॥  
नरदेह अंध असिला । तरी तो निपटें चि वायां गेला ।  
अथवा ब्रधिर जरी असिला । तरी निरूपण नाहीं ॥ २९ ॥

१ सद्गति पावले, उद्धरून गेले. २ केवळ.

नरदेह असिला मुका । तरी घेतां नये आशंका ।
अशक्त रोगी नासका । तरी तो निःकारण ॥ ३० ॥
नरदेह असिला मूर्ख । अथवा फेंपऱ्या समंधाचें दुःख ।
तरी तो जाणावा निरार्थक । निश्चयेंसीं ॥ ३१ ॥
इतुकें हें नस्तां वेंग[1] । नरदेह आणी सकळ सांग ।
तेणें धरावा परमार्थमार्ग । लागवेगें ॥ ३२ ॥
सांग नरदेह जोडलें । आणी परमार्थबुद्धि विसर्लें ।
तें मूर्ख कैसें भ्रमलें । मायाजाळीं ॥ ३३ ॥
मृत्तिका खाणोन घर केलें । तें माझें ऐसें दृढ कल्पिलें ।
परी तें बहुतांचें हें कळलें । नाहीं च तयासी ॥ ३४ ॥
मुष्यकें[2] ह्मणती घर आमुचें । पाली ह्मणती घर आमुचें ।
मक्षिका ह्मणती घर आमुचें । निश्चयेंसीं ॥ ३५ ॥
कांतण्या ह्मणती घर आमुचें । मुंगळे ह्मणती घर आमुचें ।
मुंग्या ह्मणती घर आमुचें । निश्चयेंसीं ॥ ३६ ॥
विंचू ह्मणती आमुचें घर । सर्प ह्मणती आमुचें घर ।
झुरळें ह्मणती आमुचें घर । निश्चयेंसीं ॥ ३७ ॥
भ्रमर ह्मणती आमुचें घर । भिंगोऱ्यां[3] ह्मणती आमुचें घर ।
आळिका ह्मणती आमुचें घर । काष्ठामधें ॥ ३८ ॥
मार्जरें ह्मणती आमुचें घर । स्वानें ह्मणती आमुचें घर ।
मुंगसें ह्मणती आमुचें घर । निश्चयेंसी ॥ ३९ ॥
पुगळें ह्मणती आमुचें घर । वाळव्या ह्मणती आमुचें घर ।
पिसुवा ह्मणती आमुचें घर । निश्चयेंसी ॥ ४० ॥
ढेंकुण ह्मणती आमुचें घर । चांचण्यें ह्मणती आमुचें घर ।
घुगर्डी म्हणती आमुचें घर । निश्चयेंसी ॥ ४१ ॥

---

१ व्यंग. २ मूषक. ३ भ्रमरीची आळी. ४ एक पादा किडा. ५ तांबडा मुंगळा.

[1]पिसोळे म्हणती आमुचें घर । गांधेलें म्हणती आमुचें घर ।
सोटें म्हणती आमुचें घर । आणी गोंबी ॥ ४२ ॥
बहुत किड्याचा जोजार । किती सांगावा विस्तार ।
समस्त म्हणती आमुचें घर । निश्चयेंसी ॥ ४३ ॥
पशु म्हणती आमुचें घर । दासी म्हणती आमुचें घर ।
घरीचीं म्हणती आमुचें घर । निश्चयेंसी ॥ ४४ ॥
पाहुणे म्हणती आमुचें घर । मित्र म्हणती आमुचें घर ।
ग्रामस्त म्हणती आमुचें घर । निश्चयेंसीं ॥ ४५ ॥
तश्कर म्हणती आमुचें घर । राजकी[2] म्हणती आमुचें घर ।
आग्न म्हणे आमुचें घर । भस्म करूं ॥ ४६ ॥
समस्त म्हणती घर माझें । हें मूर्ख हि म्हणे माझें माझें ।
सेवट जड जालें वोझें । टाकिला देश ॥ ४७ ॥
अवघीं घरें भगलीं । गावाची पाढेरी पडिली ।
मग ते गृहीं राहिलीं । आरण्यस्वापदें ॥ ४८ ॥
किडा मुंगी वाळवी मूषक । त्यांचें च घर हें निश्चयात्मक ।
हें प्राणी बापुडें मूर्ख । निघोन गेलें ॥ ४९ ॥
ऐसी गृहाची स्थिती । मिथ्या आली आत्मप्रचिती ।
जन्म दों दिसांची वस्ती । कोठें तरी करावी ॥ ५० ॥
देह ह्मणावें आपुलें । तरी हें बहुतां कारणें निर्मिलें ।
प्राणीयांच्या माथां घर केलें । वों मस्तकीं भक्षिती ॥ ५१ ॥
रोमेंमुळीं किडे भक्षिती । खांडुक जाल्यां किडे पडती ।
पोटामध्यें जत होती । प्रत्यक्ष प्राणियांच्या ॥ ५२ ॥
कीड लागे दांतासी । कीड लागे डोळ्यांसी ।
कीड लागे कर्णासी । आणी गोमाशा भरती ॥ ५३ ॥
गोंचिड अशुद्ध[6] सेविती । चामवा मासांत घुसती ।
पिसोळे चाऊन पळती । अकस्मात ॥ ५४ ॥

---

१ एक प्रकारचा किडा. २ राजाचे अधिकारी. ३ गावें उजाड, उध्वस्त झालीं. ४ उवा. ५ रोमरध्रीं. ६ रक्त.

भोंगे[1] गांधेलें चाविती । गोंबी[2] जळवा अशुद्ध घेती ।
विंचू सर्प दंश करिती । कोंनटें[3] फुर्सी ॥ ५५ ॥
जन्मून देह पाळिलें । तें अकस्मात व्याघ्रें नेलें ।
कां तें लांडगीं च भक्षिलें । बळात्कारें ॥ ५६ ॥
मूषकें मार्जरें दंश करिती । स्वानें अश्वें लोले तोडिती ।
रीसें मर्कटें मारिती । कासाबीस करूनी ॥ ५७ ॥
उंष्ट्रें डसोन उचलिती । हस्ती चिर्डून टाकिती ।
वृषभ टोंचून मारिती । अकस्मात ॥ ५८ ॥
तश्कर तडतडां तोडिती । भूतें झडपोन मारिती ।
असो या देहाची स्थिती । ऐसी असे ॥ ५९ ॥
ऐसें शरीर बहुतांचें । मूर्ख म्हणे आमुचें ।
परंतु खांजें जिवाचें । तापत्रैं[7] बोलिलें ॥ ६० ॥
देह परमार्थी लाविलें । तरी च याचें सार्थक जालें ।
नाहीं तरी हें वेर्थ चि गेलें । नाना आघातें मृत्यपथें ॥ ६१ ॥
असो जे प्रपंचिक मूर्ख । ते काये जाणती परमार्थसुख ।
त्या मूर्खाचें लक्षण कांहीं येक । पुढें बोलिलें असे ॥ ६२ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे नरदेहस्तवननिरूपणनाम समास दाहावा

---

## ॥ मूर्खलक्षणनाम दशक द्वितीय ॥ २ ॥

### ॥ श्रीराम ॥

ॐ नमो जि गजानना । येकदंता त्रिनयना ।
कृपादृष्टी भक्तजना । अवलोकावें ॥ १ ॥
तुज नमूं वेदमाते । श्रीशारदे ब्रह्मसुते ।
अंतरीं वसे कृपावंते । स्फूर्तिरूपें ॥ २ ॥

---

१ भुंगे. २ गोम. ३ कोंकणातील सर्पांच्या जाती आहेत. ४ मांसाचे भाग. ५ उंट. ६ खाद. ७ तापत्रयाच्या समासांमध्यें, म्हणजे द. ३ स. ६–८.

वदून सद्गुरुचरण । करून रघुनाथस्मरण ।
त्यागार्थ मूर्खलक्षण । बोलिजेल ॥ ३ ॥
येक मूर्ख येक पढतमूर्ख । उभय लक्षणीं कौतुक ।
श्रोतीं सादर विवेक । केला पाहिजे ॥ ४ ॥
पढतमूर्खाचें लक्षण । पुढिले समासीं निरूपण ।
सावध होऊनि विचक्षण । परिसोत पुढें ॥ ५ ॥
आतां प्रस्तुत विचार । लक्षणें सांगतां अपार ।
परी कांहींयेक तत्पर । होऊन ऐका ॥ ६ ॥
जे प्रपंचिक जन । जयांस नाहीं आत्मज्ञान ।
जे केवळ अज्ञान । त्यांचीं लक्षणें ॥ ७ ॥
जन्मला जयाचे[1] उदरीं । तयांसी जो विरोध करी ।
सखी मानिली अंतुरी । तो येक मूर्ख ॥ ८ ॥
सांडून सर्व हि गोत । स्त्रीआधेन जीवित ।
सांगे अंतरींची मात । तो येक मूर्ख ॥ ९ ॥
परस्त्रीसीं प्रेमा धरी । श्वशुरगृहीं वास करी ।
कुळेंविण कन्या वरी । तो येक मूर्ख ॥ १० ॥
समर्थावरी अहंता । अंतरीं मानी समता ।
सामर्थ्येंविण करी सत्ता । तो येक मूर्ख ॥ ११ ॥
आपली आपण करी स्तुती । स्वदेशीं भोगी विपत्ति ।
सांगे वडिलांची कीर्ती । तो येक मूर्ख ॥ १२ ॥
अकारण हास्य करी । विवेक सांगता न धरी ।
जो बहुतांचा वैरी । तो येक मूर्ख ॥ १३ ॥
आपुलीं धरूनियां दुरी । पराव्यासीं करी मीत्री ।
परन्यून बोले रात्रीं । तो येक मूर्ख ॥ १४ ॥
बहुत जागते जन । तयामध्यें करी शयन ।
परस्थळीं बहु भोजन् । करी तो येक मूर्ख ॥ १५ ॥

---

१ चीं.

मान अथवा अपमान । स्वयें करी परिच्छिन्न[1] ।
संत[2] वेसनीं जयाचें मन । तो येक मूर्ख ॥ १६ ॥
धरून परावी[3] आस[4] । प्रेत्न सांडी सावकास ।
निसुगोईचा[5] संतोष । मानी तो येक मूर्ख ॥ १७ ॥
घरीं विवेक उमजे । आणी सभेमध्यें लाजे ।
शब्द बोलतां निर्बुजे[6] । तो येक मूर्ख ॥ १८ ॥
आपणाहून जो श्रेष्ठ । तयासीं अत्यंत निकट ।
सिकवणेचा मानी वीट । तो येक मूर्ख ॥ १९ ॥
नायेके त्यांसी सिकवी । वडिलांसीं जाणीवें[7] दावी ।
जो आरजास[8] गोवी[9] । तो येक मूर्ख ॥ २० ॥
येकायेकीं येकसरा । जाला विषईं[10] निलाजिरा ।
मर्यादा साडून सैरा । वर्ते तो येक मूर्ख ॥ २१ ॥
औषध ने घे असोन वेथा । पथ्य न करी सर्वथा ।
न मिळे आलिया पदार्था । तो येक मूर्ख ॥ २२ ॥
संगेंविण विदेश करी । वोळखीविण संग धरी ।
उडी घाली माहापुरीं । तो येक मूर्ख ॥ २३ ॥
आपणास जेथें मान । तेथें अखंड करी गमन ।
रक्षू नेणे मानाभिमान । तो येक मूर्ख ॥ २४ ॥
सेवक जाला लक्ष्मीवंत । तयाचा होय अंकित ।
सर्वकाळ जो दुश्चित्त । तो येक मूर्ख ॥ २५ ॥
विचार न करितां कारण । दंड करी अपराधेंविण ।
स्वल्पासाठीं जो कृपण । तो येक मूर्ख ॥ २६ ॥

---

१ उघड. २ द्यूत, वेश्यागमन, चोरी, चहाडी, परदारारमण, लघुपक्षीक्रीडा व किन्नरी गायन. स्वा. दि. ५-४-६७. ३ परक्याची, दुसऱ्याची. ४ आशा. ५ आळसाचा. ६ अडखळतो, घाबरतो ७ शहाणपण. ८ आरज=आर्य, श्रेष्ठ. ९ घोटाळ्यांत पाडतो. १० अनायासें प्राप्त झालेल्या वस्तूचा अव्हेर करतो तो, जी स्थिति प्राप्त झाली तींत जो समाधान घेत नाहीं तो.

देवलड पितृलंड । शक्तिवीण करी तोंड ।
ज्याचे मुखीं भंडउभंड । तो येक मूर्ख ॥ २७ ॥
वरीच्यावरी खाय दादा । बाहेरी दीन बापुडा ।
ऐसा जो कां वेड मूढा । तो येक मूर्ख ॥ २८ ॥
नीच यातीसीं सांगात । परांगनेसीं येकात ।
मार्गें जाय खात खात । तो येक मूर्ख ॥ २९ ॥
स्वयें नेणे परोपकार । उपकाराचा अनोपकार ।
करी थोडें बोले फार । तो येक मूर्ख ॥ ३० ॥
तैपीळ खादाड आळसी । कुश्चीळ कुटीळ मानसीं ।
धारीष्ट नाहीं जयापासीं । तो येक मूर्ख ॥ ३१ ॥
विद्या वैभव ना धन । पुरुषार्थ सामर्थ्य ना मान ।
कोरडा च वाहे अभिमान । तो येक मूर्ख ॥ ३२ ॥
लंडी लटिका लाबाड । कुकर्मी कुटीळ निचाडें ।
निद्रा जयाची वाडें । तो येक मूर्ख ॥ ३३ ॥
उंचीं जाऊन वस्त्र नेसे । चौबारां बाहेरी बैसे ।
सर्वकाळ नग्न दिसे । तो येक मूर्ख ॥ ३४ ॥
दंत चक्षु आणी घ्राण । पाणी वसन आणी चरण ।
सर्वकाळ जयाचे मळिण । तो येक मूर्ख ॥ ३५ ॥
वैधृति आणी वितिपात । नाना कुमुहूर्तें जात ।
अपशकुनें करी घात । तो येक मूर्ख ॥ ३६ ॥
क्रोधें अपमानें कुबुद्धि । आपणास आपण वधी ।
जयास नाहीं दृढ बुद्धि । तो येक मूर्ख ॥ ३७ ॥
जिवलगांस परम खेदी । सुखाचा शब्द तो हि नेदी ।
नीच जनास वंदी । तो येक मूर्ख ॥ ३८ ॥
आपणास राखे परोपरी । शरणागतांस अव्हेरी ।
लक्ष्मीचा भर्वसा धरी । तो येक मूर्ख ॥ ३९ ॥

---

१ बडबड. २ संगति, सोबत. ३ तापट. ४ निगरगट्ट; बोलण्याची चाड, लाज नसणारा; उर्मट. ५ फार. ६ चव्हाटा.

पुत्र कळत्र आणी दारा । इतुका चि मानुनियां थारा ।
विसरोन गेला ईश्वरा । तो येक मूर्ख ॥ ४० ॥
जैसें जैसें करावें । तैसे तैसें पावावें ।
हें जयास नेणवे । तो येक मूर्ख ॥ ४१ ॥
पुरुषाचेनि अष्टगुणें[1] । स्त्रियास ईश्वरी देणें ।
ऐसा केल्या बहुत जेणें । तो येक मूर्ख ॥ ४२ ॥
दुर्जनाचेनि बोलें । मर्यादा सांडून चाले ।
दिवसा झांकिले डोळे । तो येक मूर्ख ॥ ४३ ॥
देवद्रोही गुरुद्रोही । मातृद्रोही पितृद्रोही ।
ब्रह्मद्रोही स्वामीद्रोही । तो येक मूर्ख ॥ ४४ ॥
परपीडेचें मानी सुख । परसंतोषाचें मानी दुःख ।
गेले वस्तूचा करी शोक । तो येक मूर्ख ॥ ४५ ॥
आदरेंविण बोलणें । न पुसतां साक्ष देणें ।
निंद्य वस्तु आंगिकारणें । तो येक मूर्ख ॥ ४६ ॥
तुक[2] तोडून बोले । मार्ग सांडून चाले ।
कुकर्मी मित्र केले । तो येक मूर्ख ॥ ४७ ॥
पैल्य राखों[3] नेणे कदा । विनोद करी सर्वदा ।
हासतां खिजे पेंटे द्वंदा । तो येक मूर्ख ॥ ४८ ॥
होडे[4] घाली अवघड । काजेंविण करी बडबड ।
बोलों चि नेणे मुखजड । तो येक मूर्ख ॥ ४९ ॥
वस्त्र शास्त्र दोनी नसे । उंचे स्थळीं जाऊन बैसे ।
जो गोत्रजांस विस्वासे । तो येक मूर्ख ॥ ५० ॥
तस्करासी वोळखी सांगे । देखिली वस्तु ते चि मागे ।
आपलें अन्हीत[5] करी रागें । तो येक मूर्ख ॥ ५१ ॥

---

१ "स्त्रीणामष्टगुणः कामः". २ वजन, महत्त्व. ३ पत, सचोटी. ४ पैज. ५ अनहित.

हीन जनासीं बराबरी । बोल बोले सरोत्तरीं ।
वामहस्तें प्राशन करी । तो येक मूर्ख ॥ ५२ ॥
समर्थासीं मत्सर धरी । अलभ्य वस्तूचा हेवा करी ।
घरीचा घरीं करी चोरी । तो येक मूर्ख ॥ ५३ ॥
सांडूनियां जगदीशा । मनुष्याचा मानी भर्वसा ।
सार्थकेंविण वेची वयसा । तो येक मूर्ख ॥ ५४ ॥
संसारदुःखाचेनि गुणें । देवास गाळी देणें ।
मैत्राचें बोले उणें । तो येक मूर्ख ॥ ५५ ॥
अल्प अन्याय क्षमा न करी । सर्वकाळ धारकीं धरी ।
जो विश्वासघात करी । तो येक मूर्ख ॥ ५६ ॥
समर्थाचे मनींचे तुटे । जयाचेनि सभा विटे ।
क्षणा बरा क्षणा पालटे । तो येक मूर्ख ॥ ५७ ॥
बहुतां दिवसाचे सेवक । त्यागून ठेवी आणिक ।
ज्याची सभा निर्नायेक । तो येक मूर्ख ॥ ५८ ॥
अनीतीनें द्रव्य जोडी । धर्म नीति न्याय सोडी ।
संगतीचें मनुष्य तोडी । तो येक मूर्ख ॥ ५९ ॥
घरीं असोन सुंदरी । जो सदांचा परद्वारी ।
बहुतांचें उच्छिष्ट अंगीकारी । तो येक मूर्ख ॥ ६० ॥
आपुलें अर्थ दुसऱ्यापासीं । आणी दुसऱ्याचें अभिळासी ।
पर्वतें करी हीनासी । तो येक मूर्ख ॥ ६१ ॥
अतिताचा अंत पाहे । कुग्रामामधें राहे ।
सर्वकाळ चिंता वाहे । तो येक मूर्ख ॥ ६२ ॥
दोघे बोलत असती जेथें । तिसरा जाऊन बैसे तेथें ।
डोई खाजवी दोहीं हातें । तो येक मूर्ख ॥ ६३ ॥
उदकांमधें सांडी गुरळी । पायें पाये कांडोळी ।
सेवा करी हीन कुळीं । तो येक मूर्ख ॥ ६४ ॥

१ बरोबरीनें. २ धारेवर. ३ घेणें देणें, व्यवहार ४ चूळ, ५ खाजवी.

स्त्री बाळका सलगी देणें । पिशाच्या सन्निध बैसणें ।
मर्यादेविण पाळी सुणें । तो येक मूर्ख ॥ ६५ ॥
परस्त्रीसीं कलह करी । मुकी वस्तु निवातें मारी ।
मूर्खांची संगती धरी । तो येक मूर्ख ॥ ६६ ॥
कळह पाहात उभा राहे । तोडविना कौतुक पाहे ।
खरें अस्तां खोटें साहे । तो येक मूर्ख ॥ ६७ ॥
लक्ष्मी आलियावरी । जो मागील वोळखी न धरी ।
देवीं ब्राह्मणीं सत्ता करी । तो येक मूर्ख ॥ ६८ ॥
आपलें काज होये तंवरी । बहुसाल नम्रता धरी ।
पुढिलांचें कार्य न करी । तो येक मूर्ख ॥ ६९ ॥
अक्षरें गाळून वाची । कां तें घाली पदरिचीं ।
नीघा न करी पुस्तकाची । तो येक मूर्ख ॥ ७० ॥
आपण वाचीना कधीं । कोणास वाचावया नेदी ।
बाधोन ठेवी बंदीं । तो येक मूर्ख ॥ ७१ ॥
ऐसीं हें मूर्खलक्षणें । श्रवणें चातुर्य बाणे ।
चित्त देउनियां शहाणे । ऐकती सदा ॥ ७२ ॥
लक्षणें अपार असती । परी कांहीं येक येथामती ।
त्यागार्थ बोलिलें श्रोतीं । क्षमा केलें पाहिजे ॥ ७३ ॥
उत्तम लक्षणें घ्यावीं । मूर्खलक्षणें त्यागावीं ।
पुढिले समासीं आघवीं । निरोपिलीं ॥ ७४ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे मूर्खलक्षणनाम समास प्रथम ॥ १ ॥

---

॥ श्रीराम ॥

श्रोता व्हावें सावधान । आतां सांगतों उत्तम गुण ।
जेणें करितां बाणे खूण । सर्वज्ञपणाची ॥ १ ॥

---

१ कुत्रे. २ दुसऱ्यांचें. ३ ही ओवी मागाहून शोध देतांना श्रीसमर्थांनीं स्वहस्तानें घातली आहे.

वाट पुसिल्याविण जाऊं नये । फळ वोळखिल्याविण खाऊं नये ।
पडिली वस्तु घेऊं नये । येकायेकीं ॥ २ ॥
अति वाद करूं नये । पोटीं कपट धरूं नये ।
शोधिल्याविण करूं नये । कुळहीन कांता ॥ ३ ॥
विचारेंविण बोलों नये । विवचनेंविण चालों नये ।
मर्यादेविण हालों नये । काहीं येक ॥ ४ ॥
प्रीतीविण रुसों नये । चोरास वोळखी पुसों नये ।
रात्रीं पंथ क्रमूं नये । येकायेकीं ॥ ५ ॥
जनीं आर्जव तोडूं नये । पापद्रव्य जोडूं नये ।
पुण्यमार्ग सोडूं नये । कदाकाळीं ॥ ६ ॥
निंदा द्वेष करूं नये । असत्संग धरूं नये ।
द्रव्यदारा हरूं नये । बळात्कारें ॥ ७ ॥
वक्तयास खोदूं[1] नये । ऐक्यतेसी फोडूं नये ।
विद्याअभ्यास सोडूं नये । कांहीं केल्या ॥ ८ ॥
तोंडाळासीं भाडों नये । वाचाळासीं तडों नये ।
संतसंग खंडूं नये । अतर्यामीं ॥ ९ ॥
अति क्रोध करूं नये । जिवलगांस खेदूं नये ।
मनीं वीट मानूं नये । सिकवणेचा ॥ १० ॥
क्षणक्षणा रुसों नये । लटिका पुरुषार्थ बोलों नये ।
केल्याविण सांगों नये । आपला पराक्रमु ॥ ११ ॥
बोलिला बोल विसरों नये । प्रसंगीं सामर्थ्य चुकों नये ।
केल्याविण निखंदूं[2] नये । पुढिलांसी कदा ॥ १२ ॥
आळसें सुख मानूं नये । चाहाडी मनास आणूं नये ।
शोधिल्याविण करूं नये । कार्य काहीं ॥ १३ ॥
सुखा आंग देऊं नये । प्रेत्न पुरुषें सांडूं नये ।
कष्ट करितां त्रासों नये । निरंतर ॥ १४ ॥

१ खोदखोदून विचारणें. २ निषेध, तिरस्कार करणें

समेमध्यें लाजों नये । बाष्कळपणें बोलों नये ।
पैज होड घालूं नये । काहीं केल्या ॥ १५ ॥
बहुत चिंता करूं नये । निसुगपणें राहों नये ।
परस्त्रीतें पाहों नये । पापबुद्धी ॥ १६ ॥
कोणाचा उपकार घेऊं नये । घेतला तरी राखों नये ।
परपीडा करूं नये । विस्वासघात ॥ १७ ॥
शोच्येंविण असों नये । मळिण वस्त्र नेसों नये ।
जाणारास पुसों नये । कोठें जातोस ह्मणोनी ॥ १८ ॥
व्यापकपण सांडूं नये । पराधेन होऊं नये ।
आपलें वोझें घालूं नये । कोणीयेकासी ॥ १९ ॥
पत्रेंविण पर्वत करूं नये । हीनाचें रुण घेऊं नये ।
गोहीविणें जाऊं नये । राजद्वारा ॥ २० ॥
लटिकी जाळूं घेऊं नये । सभेस लटिकें करूं नये ।
आदर नसता बोलों नये । स्वभाविक ॥ २१ ॥
आदखणेपणें करूं नये । अन्यायेंविण गांजूं नये ।
अवनीतीनें वर्तों नये । आंगबळें ॥ २२ ॥
बहुत अन्न खाऊं नये । बहुत निद्रा करूं नये ।
बहुत दिवस राहों नये । पिसुणाचेथें ॥ २३ ॥
आपल्याची गोही देऊं नये । आपली कीर्ती वर्णूं नये ।
आपलें आपण हासों नये । गोष्टी सांगोनी ॥ २४ ॥
धूम्रपान घेऊं नये । उन्मत्त द्रव्य सेऊं नये ।
बहुचकासीं करूं नये । मैत्री कदा ॥ २५ ॥
कामेंविण राहों नये । नीच उत्तर साहों नये ।
आसुदें अन्न सेऊं नये । वडिलांचें हि ॥ २६ ॥

---

१ आळसानें. २ गोही=ग्वाही=साक्षी. ३ आळ, आरोप ४ अदेखणेपण, न पाहिल्यासारखें, किंवा मत्सर. ५ पिसुणाचे येथ, म्हणजे दुष्ट, चहाडखोर मनुष्याचे येथें. ६ बहुवाचक, वाचाळ, बाचक. ७ आयतें, कष्टावांचून.

तोंडीं सीवी असों नये । दुसऱ्यास देखोन हांसों नये ।
उणें अंगीं संचारों नये । कुळवंताचे ॥ २७ ॥
देखिली वस्तु चोरूं नये । बहुत कृपण होऊं नये ।
जिवलगांसी करूं नये । कळह कदा ॥ २८ ॥
येकाचा घात करूं नये । लटिकी गोही देऊं नये ।
अप्रमाण वर्तों नये । कदाकाळीं ॥ २९ ॥
चाहाडी चोरी धरूं नये । परद्वार करूं नये ।
मागें उणें बोलों नये । कोणीयेकाचें ॥ ३० ॥
समई यावा चुकों नये । सत्वगुण सांडूं नये ।
वैरियांस दंडूं नये । शरण आलियां ॥ ३१ ॥
अल्पधनें माजों नये । हरिभक्तीस लाजों नये ।
मर्यादेविण चालों नये । पवित्र जनीं ॥ ३२ ॥
मूर्खासीं समंध पडों नये । अंधारीं हात घालूं नये ।
दुश्चितपणें विसरों नये । वस्तु आपुली ॥ ३३ ॥
स्नानसंध्या सांडूं नये । कुळाचार खंडूं नये ।
अनाचार मांडूं नये । चुकुरपणें ॥ ३४ ॥
हरिकथा सांडूं नये । निरूपण तोडूं नये ।
परमार्थास मोडूं नये । प्रपंचबळें ॥ ३५ ॥
देवाचा नवस बुडऊं नये । आपला धर्म उडऊं नये ।
भलते भरीं भरों नये । विचारेंविण ॥ ३६ ॥
निष्ठुरपण धरूं नये । जीवहत्या करूं नये ।
पाउस देखोन जाऊं नये । अथवा अवकाळीं ॥ ३७ ॥
सभा देखोन गळों नये । समई उत्तर टळों नये ।
धि:कारितां चळों नये । धारिष्ट आपुलें ॥ ३८ ॥
गुरुविरहित असों नये । नीच यातीचा गुरु करूं नये ।
जिणें शाश्वत मानूं नये । वैभवेंसीं ॥ ३९ ॥

१ वैरी. २ [illegible]

सत्यमार्ग सांडूं नये । असत्य पंथें जाऊं नये ।
कदा अभिमान घेऊं नये । असत्याचा ॥ ४० ॥
अपकीर्ति ते सांडावी । सदकीर्ति वाढवावी ।
विवेकें दृढ धरावी । वाट सत्याची ॥ ४१ ॥
नेघेतां हे उत्तम गुण । तें मनुष्य अवलक्षण ।
ऐक तयांचें लक्षण । पुढिले समासीं ॥ ४२ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे उत्तमलक्षणनाम समास दुसरा ॥ २ ॥

---

॥ श्रीराम ॥

ऐका कुविद्येचीं लक्षणें । अति हीनें कुलक्षणें ।
त्यागार्थ बोलिलीं ते श्रवणें । त्याग घडे ॥ १ ॥
ऐका कुविद्येचा प्राणी । जन्मा येऊन केली हानी ।
सांगिजेल येहीं लक्षणीं । वोळखावा ॥ २ ॥
कुविद्येचा प्राणी असे । तो कठिण निरूपणें त्रासे ।
अवगुणाची समृद्धि असे । ह्मणौनियां ॥ ३ ॥

श्लोक ॥ दंभो दर्पोऽभिमानश्च क्रोधः पारुष्यमेव च ।
अज्ञानं चाभिजातस्य पार्थ संपदमासुरीम् ॥ ध ॥

काम क्रोध मद मत्सर । लोभ दंभ तिरस्कार ।
गर्व ताठा अहंकार । द्वेष विषाद विकल्पी ॥ ४ ॥
आशा ममता तृष्णा कल्पना । चिंता अहंता कामना भावना ।
असूया अविद्या ईर्षणा वासना । अतृप्ती लोलंगता ॥ ५ ॥
इछया वांछया चिकिछया निंदा । आनित्य प्रामैणी मस्ती सदा ।
जाणीव अवज्ञा विपत्ती आपदा । दुर्वृत्ती दुर्वासना ॥ ६ ॥
स्पर्धा खटपट आणी चटपट । तर्‍हे झटपट आणी वटवट ।
सदा खटखट आणी लटपट । परम वेथा कुविद्या ॥ ७ ॥

---

१ न घेत. २ ' कुविद्येचा-ची-च ' जेथें जेथें आहे तेथें तेथें मुळांत बहुधा " कुविद्यचा-ची-चे " असें आहे. ३ मत्सर. ४ इच्छा. ५ आसक्ती. ६ अनीति. ७ हरामीपणा. ८ तन्हेवाइकपणा, नाद.

कुरूप आणी कुलक्षण । अशक्त आणी दुर्जन ।
दरिद्री आणी कृपण । आतिशयेंसीं ॥ ८ ॥
आळसी आणी खादाड । दुर्बळ आणी ढोताड ।
तुटक आणी लाबाड । आतिशयेंसीं ॥ ९ ॥
मूर्ख आणी तर्पीळें । वेडें आणी वाचाळ ।
लटिकें आणी टोंडाळ । आतिशयेंसीं ॥ १० ॥
नेणे आणी नायके । न ये आणी न सीके ।
न करी आणी न देखे । अभ्यासदृष्टी ॥ ११ ॥
अज्ञान आणी अविस्वासी । छळवादी आणी दोषी ।
अभक्त आणी भक्तांसी । देखों सकेना ॥ १२ ॥
पापी आणी निंदक । कष्टी आणी घातक ।
दुःखी आणी हिंसक । आतिशयेंसीं ॥ १३ ॥
हीन आणी कृत्रिमी । रोगी आणी कुकर्मी ।
आचंगुळ आणी अधर्मी । वासना रमे ॥ १४ ॥
हीन देह आणी ताठा । अप्रमाण आणी फांटा ।
बाष्कळ आणी करटा । निवेक सांगे ॥ १५ ॥
लंडी आणी उन्मत्त । निकामी आणी डुल्लत ।
भ्याड आणी बोलत । पराक्रमु ॥ १६ ॥
कनिष्ठ आणी गर्विष्ठ । नेुपरतें आणी नष्ट ।
द्वेषी आणी भ्रष्ट । आतिशयेंसीं ॥ १७ ॥
अभिमानी आणी निसगळ । वोडगस्त आणी खट्ट ।
दंभिक आणी अनर्गळ । आतिशयेंसीं ॥ १८ ॥
वोखटें आणी विकारी । खोटें आणी अनोपकारी ।
अवलक्षण आणी धिःकारी । प्राणिमात्रासी ॥ १९ ॥
अल्पमती आणी वादक । दीनरूप आणी भेदक ।
सूक्ष्म आणी त्रासक । कुशब्दैंकरूनि ॥ २० ॥

१ पायपोसखाऊ, वखवख करणारा. २ तापट. ३ कृपण. ४ फांटे फोडणारा. ५ विषयासक्त. ६ निर्लज्ज.

कठिणवचनी कर्कशवचनी । कापट्यवचनी संदेहवचनी ।
दुःखवचनी तीव्रवचनी । क्रूर निष्ठुर दुरात्मा ॥ २१ ॥
न्यूनवचनी पैशून्यवचनी । अशुभवचनी आनिन्द्यवचनी ।
द्वेषवचनी अनृत्यवचनी । वाष्कळवचनी धिःकारु ॥ २२ ॥
कपटी कुटिल गाठ्योंळ । कुंटें कुचर नठ्याळें ।
कोपी कुधन टवाळ । अतिशयेंसीं ॥ २३ ॥
तपीळ तामस अविचार । पापी अनर्था अपस्मार ।
भूत समंधी संचार । आगीं वसे ॥ २४ ॥
आत्महत्यारा स्त्रीहत्यारा । गोहत्यारा ब्रह्मत्यारा ॥
मातृहत्यारा पितृहत्यारा । माहापापी पतित ॥ २५ ॥
उणें कुपात्र कुतर्की । मित्रद्रोही विस्वासघातकी ।
कृतघ्न तैल्पकी नारकी । आतिशाई जल्पक ॥ २६ ॥
किंत भांडण झगडा कळ्हो । अधर्म अनराहाटी शोक संग्रहो ।
चाहाड वेसनी विग्रहो । निग्रहकर्ता ॥ २७ ॥
द्वाड आपेसी वोंगळ । चाळकें चुंबकें लच्याळें ।
स्वार्थी अभिळासी वोढाळ । आदत्त झोर्डें आदखणें ॥ २८ ॥
शठ शुंभ कातरु । लंड तेमुंड सितरु ।
वंड पाषांड तस्करु । अपहारकर्ता ॥ २९ ॥
धीट सैरोंट मोकाटे । चाटें चावट वाजेंट ।
थोटें उद्धट लंपट । बटवाल कुबुद्धी ॥ ३० ॥

---

१ आतल्या गाठीचा २ मनांत कुडणारा. ३ नष्ट, द्वाड. ४ ब्रह्महत्यारा. " ह " पुढें " ह " आला तर स्थूलपणें एक च " ह " ऐकूं येतो. श्रीसमर्थांनीं सांगावें ४ श्रीकल्याणांनीं लिहावें असें ह्मणतात त्याला हें एक लहानसें प्रमाण आहे. पुढील २५६२ व ३६२२ पहा. ५ मात्रागमनी. ६ नकोला योग्य ७ अघोर कृत्यें करणारा. ८ वडवड्या. ९ किंतु, विपरीत भावना १० भेद, भाडण. ११ लोकांस दावांत ठेवणारा. १२ चाळविणारा. १३ कृपण. १४ लोंचट. १५ कृपण, कवडीचुंबक. १६ कोडगा. १७ परोत्कर्षासहिष्णु, मत्सरी. १८ भ्याड. १९ डोंबखुपशा. २० ठक. २१ अद्वातद्वा. २२ अनर्गल. २३ बडबड्या. २४ वादःख्या, वात्रट. २५ कुभांडी. २६ भ्रष्ट.

मारेकरी बरपेकरी । दरवडेकरी खाणोरी ।
मैंद भोंदु परद्वारी । भुररेकरी चेटकी ॥ ३१ ॥
निशक निलाजिरा कळभंट टौणपा लौंदे धट उद्धट ।
ठसें टोंबस खट नटं । जगभांड विकारी ॥ ३२ ॥
अधीर आळिका अनाचारी । अंध पंगु खोकलेकरी ।
थोंटा बधिर दमेकरी । तऱ्ही ताठा न सडी ॥ ३३ ॥
विद्याहीन वैभवहीन । कुळहीन लक्ष्मीहीन ।
शक्तिहीन सामर्थ्यहीन । अदृष्टहीन भिकारी ॥ ३४ ॥
बळहीन कळाहीन । मुद्राहीन दीक्षाहीन ।
लक्षणहीन लावण्यहीन । अंगहीन विपारी ॥ ३५ ॥
युक्तिहीन बुद्धिहीन । आचारहीन विचारहीन ।
क्रियाहीन सत्वहीन । विवेकहीन संशई ॥ ३६ ॥
भक्तिहीन भावहीन । ज्ञानहीन वैराग्यहीन ।
शांतिहीन क्षमाहीन । सर्वहीन क्षुल्लकु ॥ ३७ ॥
समयो नेणे प्रसंग नेणे । प्रेत्न नेणे अभ्यास नेणे ।
आर्जव नेणे मैत्री नेणे । कांहीं च नेणे अभागी ॥ ३८ ॥
असो ऐसे नाना विकार । कुलक्षणाचें कोठार ।
ऐसा कुविद्येचा नर श्रोतीं वोळखावा । ३९ ॥
ऐसीं कुविद्येचीं लक्षणें । ऐकोनि त्याग चि करणें ।
अभिमानें तऱ्हें भरणें । हें विहित नव्हे ॥ ४० ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे कुविद्यालक्षणनाम समास तिसरा ॥ ३ ॥

---

॥ श्रीराम ॥

नाना सुकृताचें फळ । तो हा नरदेह केवळ ।
त्याहिमधें भाग्य सफळ । तरी च सन्मार्ग लागे ॥ १ ॥

---

१ खुशाल. २ काळीजखाऊ. ३ भुरळ पाडणारा. ४ भांडकुदळ ५ गळेलठ्ठ. ६ धटिंगण, निर्भय. ७ निर्लज्ज. ८ ठोंब्या, अक्षरशत्रु ९ शठ. १० नष्ट. ११ हावरा. १२ दैवहीन. १३ विरूप, कुरूप १४ मुळांत 'यचा', 'यचीं आहे. १५ हट्टास पेटणें.

नरदेहीं विशेष ब्राह्मण । त्याहिवरी संध्यास्नान ।
सद्वासना भगवद्भजन । घडे पूर्वपुण्यें ॥ २ ॥
भगवद्भक्ति हे उत्तम । त्याहिवरी सत्समागम ।
काळ सार्थक हा चि परम । लाभ जाणावा ॥ ३ ॥
प्रेमप्रीतीचा सद्भाव । आणी भक्तांचा समुदाव ।
हरिकथा मोहोत्साव । तेणें प्रेमा दुणावे ॥ ४ ॥
नरदेहीं आलियां येकं । कांहीं करावे सार्थक ।
जेणें पाविजे परलोक । परम दुल्लभ जो ॥ ५ ॥
विधियुक्त ब्रह्मकर्म । अथवा दया दान धर्म ।
अथवा करणें सुगम । भजन भगवताचें ॥ ६ ॥
अनुतापें करावा त्याग । अथवा करणें भक्तियोग ।
नाहीं तरी धरणें संग । साधुजनाचा ॥ ७ ॥
नाना शास्त्रें धांडोळावीं । अथवा तीर्थें तरी करावीं ।
अथवा पुरश्चरणें बरवीं । पापक्षयाकारणें ॥ ८ ॥
अथवा कीजे परोपकार । अथवा ज्ञानाचा विचार ।
निरूपणीं सारासार । विवेक करणें ॥ ९ ॥
पाळावी वेदांची आज्ञा । कर्मकांड उपासना ।
जेणें होइजे ज्ञाना । आधिकारपात्र ॥ १० ॥
काया वाचा आणी मनें । पत्रें पुष्पें फळें जीवनें ।
कांहीं तरी येका भजनें । सार्थक करावें ॥ ११ ॥
जन्मा आलियाचें फळ । कांहीं करावें सफळ ।
ऐसें न करितां निर्फळ । भूमिभार होये ॥ १२ ॥
नरदेहाचें उचित । कांहीं करावे आत्महित ।
येथानुशक्त्या चित्तवित्त । सर्वोत्तमीं लावावें ॥ १३ ॥
हें कांहीं च न धरी जो मनीं । तो मृत्यप्राय वर्ते जनीं ।
जन्मा येऊन तेणें जननी । वायां च कष्टविली ॥ १४ ॥

१ कांहीं एक.

नाहीं संध्या नाहीं स्नान । नाहीं भजन देवतार्चन ।
नाहीं मंत्र जप ध्यान१ मानसपूजा ॥ १५ ॥
नाहीं भक्ति नाहीं प्रेम । नाहीं निष्ठा नाहीं नेम ।
नाहीं देव नाहीं धर्म । अतीत अभ्यागत ॥ १६ ॥
नाहीं सद्बुद्धि नाहीं गुण । नाहीं कथा नाहीं श्रवण ।
नाहीं अध्यात्मनिरूपण । ऐकिलें कदा ॥ १७ ॥
नाहीं भल्यांची संगती । नाहीं शुद्ध चित्तवृत्ती ।
नाहीं कैवल्याची प्राप्ती । मिथ्यामदें ॥ १८ ॥
नाहीं नीति नाहीं न्याये । नाहीं पुण्याचा उपाये ।
नाहीं परत्रीची सोये । युक्तायुक्त क्रिया ॥ १९ ॥
नाहीं विद्या नाहीं वैभव । नाहीं चातुर्याचा भाव ।
नाहीं कळा नाहीं लाघव । रम्यसरस्वतीचें ॥ २० ॥
शांती नाहीं क्षमा नाहीं । दीक्षा नाहीं मैत्री नाहीं ।
शुभाशुभ कांहीं च नाहीं । साधनादिक ॥ २१ ॥
सुचि२ नाहीं स्वधर्म नाहीं । आचार नाहीं विचार नाहीं ।
आरत्र नाहीं परत्र नाहीं । मुक्त क्रिया मनाची ॥ २२ ॥
कर्म नाहीं उपासना नाहीं । ज्ञान नाहीं वैराग्य नाहीं ।
योग नाहीं धारिष्ट नाहीं । कांहीं च नाहीं पाहातां ॥ २३ ॥
उपरती नाहीं त्याग नाहीं । समता नाहीं लक्षण नाहीं ।
आदर नाहीं प्रीति नाहीं । परमेश्वराची ॥ २४ ॥
परगुणाचा संतोष नाहीं । परोपकारें सुख नाहीं ।
हरिभक्तीचा लेश नाहीं । अंतर्यामीं ॥ २५ ॥
ऐसे प्रकारीचे पाहातां जन । ते जीत चि प्रेतासमान ।
त्यांसीं न करावें भाषण । पवित्र जनीं ॥ २६ ॥

१ स. धो २ पवित्र, शुद्ध.

पुण्यसामग्री पुरती । तयासी च घडे भगवद्भक्ती ।
जे जे जैसें करिती । ते पावती तैसें चि ॥ २७ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे भक्तिनिरूपणनाम समास चतुर्थ ॥ ४ ॥

---

॥ श्रीराम ॥

मुळीं देह त्रिगुणाचा । सत्वरजतमाचा ।
त्यामध्यें सत्वाचा । उत्तम गुण ॥ १ ॥
सत्वगुणें भगवद्भक्ती । रजोगुणें पुनरावृत्ती[1] ।
तमोगुणें अधोगती । पावति प्राणी ॥ २ ॥
श्लोक ॥ ऊर्ध्वं गच्छन्ति सत्त्वस्था मध्ये तिष्ठन्ति राजसाः ।
जघन्यगुणवृत्तिस्था अधो गच्छन्ति तामसाः ॥ ५ ॥
त्यात हि शुद्ध आणी सबेळ[2] । ते हि बोलिजेति सकळ ।
शुद्ध तें चि जें निर्मळ । सबळ बाधक जाणावें ॥ ३ ॥
शुद्धसबळाचें लक्षण । सावध परिसा विचक्षण ।
शुद्ध तो परमार्थी जाण । सबळ तो संसारिक ॥ ४ ॥
तया ससारिकांची स्थिती । देहीं त्रिगुण वर्तती ।
येक येतां दोनी जाती । निघोनियां ॥ ५ ॥
रज तम आणी सत्व । येणें चि चाले जीवित्व ।
रजोगुणाचें कर्तुत्व । दाखऊं आतां ॥ ६ ॥
रजोगुण येतां शरीरीं । वर्तणुक कैसी करी ।
सावध होउनी चतुरीं । परिसावें ॥ ७ ॥
माझें घर माझा संसार  देव कैंचा आणिला थोर ।
ऐसा करी जो निर्धार । तो रजोगुण ॥ ८ ॥
माता पिता आणि कांता । पुत्र सुना आणि दुहिता ।
इतुकियाची वाहे चिंता । तो रजोगुण ॥ ९ ॥

---

१ प्रथम या ठिकाणीं " पुनरावृत्ती " अशीं अक्षरें पडलीं होतीं, त्या ठिकाणीं " पुनरावृ " हीं अक्षरें खोडून श्रीसमर्थांनीं स्वहस्तानें " अधोग " अशीं अक्षरें घातलीं. २ समल, औपाधिक, मायिक.

[stamp]

बरें खावें बरें जेवावें । बरें ल्यावें बरें नेसावें ।
दुसऱ्याचें अभिळाषावें । तो रजोगुण ॥ १० ॥
कैंचा धर्म कैंचें दान । कैंचा जप कैंचें ध्यान ।
विचारीना पापपुण्य । तो रजोगुण ॥ ११ ॥
नेणे तीर्थ नेणे व्रत । नेणे अतीत अभ्यागत ।
अनाचारीं मनोगत । तो रजोगुण ॥ १२ ॥
धनधान्याचें संचित । मन होये द्रव्यासक्त ।
अत्यंत कृपण जीवित्व । तो रजोगुण ॥ १३ ॥
मी तरुणा मी सुंदर । मी बळाढ्य मी चतुर ।
मी सकळांमध्यें थोर । ह्मणे तो रजोगुण ॥ १४ ॥
माझा देश माझा गांव । माझा वाडा माझा ठाव ।
ऐसी मनीं धरी हाव । तो रजोगुण ॥ १५ ॥
दुसऱ्याचें सर्व जावें । माझें चि बरें असावें ।
ऐसें आठवे स्वभावें । तो रजोगुण ॥ १६ ॥
कपट आणी मत्सर । उठे देहीं तिरस्कार ।
अथवा कामाचा विकार । तो रजोगुण ॥ १७ ॥
बाळकावरी ममता । प्रीतीनें आवडे कांता ।
लोभ वाटे समस्तां । तो रजोगुण ॥ १८ ॥
जिवलगाची खंती । जेणें काळें वाटे चित्तीं ।
तेणें काळें मीच्रगती । रजोगुण आला ॥ १९ ॥
संसाराचे बहुत कष्ट । कैसा होईल सवट ।
मनास आठवे संकट । तो रजोगुण ॥ २० ॥
कां मागें जें जें भोगिलें । तें तें मनीं आठवलें ।
दुःख अत्यंत वाटलें । तो रजोगुण ॥ २१ ॥
वैभव देखोन दृष्टी । आवडी उपजली पोटीं ।
आशागुणें हिंपुटी । करी तो रजोगुण ॥ २२ ॥

---

१ सखी.

जें जें दृष्टी पडिलें । तें तें मनें मागितलें ।
लभ्य नस्तां दुःख जालें । तो रजोगुण ॥ २३ ॥
विनोदार्थी भरे मन । शृंगारिक करी गायेन ।
राग रंग तान मान । तो रजोगुण ॥ २४ ॥
टवाळी ढवाळी निंदा । सांगणे घडे वेवादा ।
हास्य विनोद करी सर्वदा । तो रजोगुण ॥ २५ ॥
आळस उठे प्रबळ । मणुकेचा नाना खेळ ।
कां उपभोगाचे गोंधळ । तो रजोगुण ॥ २६ ॥
कळावंत बहुरूपी । नटावलोकी साक्षपी ।
नाना खेळीं दान अर्पी । तो रजोगुण ॥ २७ ॥
उन्मत्त द्रव्यावरी अति प्रीती । ग्रामज्य आठवे चित्तीं ।
आवडे नीचाची संगती । तो रजोगुण ॥ २८ ॥
तस्करविद्या जीवीं उठे । परन्यून बोलावें वाटे ।
नित्य नेमास मन विटे । तो रजोगुण ॥ २९ ॥
देवकारणीं लाजाळु । उदरालागीं कष्टाळु ।
प्रपंचीं जो स्नेहाळु । तो रजोगुण ॥ ३० ॥
गोडग्रासीं आळकेपण । अत्यादरें पिंडपोषण ।
रजोगुणें उपोषण । केलें न वचे ॥ ३१ ॥
शृंगारिक तें आवडे । भक्ती वैराग्य नावडे ।
कळालाघवीं पवाडे । तो रजोगुण ॥ ३२ ॥
नेणोनियां परमात्मा । सकळ पदार्थी प्रेमा ।
बळात्कारें घाली जन्मा । तो रजोगुण ॥ ३३ ॥
असो ऐसा रजोगुण । लोभें दावी जन्ममरण ।
प्रपंची तो सबळ जाण । दारुण दुःख भोगवी ॥ ३४ ॥
आतां रजोगुण हा सुटेना । संसारिक हे तुटेना ।
प्रपंचीं गुतली वासना । यास उपाय कोण ॥ ३५ ॥

---

१ थट्टा. २ शरीरसुख. ३ आवड ४ शिरके

उपायें येक भगवद्भक्ती । जरी ठाकेना विरक्ती ।
तरीं येथानुशक्ती । भजन करावें ॥ ३६ ॥
काया वाचा आणी मनें । पत्रें पुष्पें फळें जीवनें ।
ईश्वरीं अर्पूनियां मनें । सार्थक करावें ॥ ३७ ॥
येथानुशक्ती दानपुण्य । परी भगवंतीं अनन्य ।
सुखदुःखें परी चिंतन । देवाचें चि करावें ॥ ३८ ॥
आदिअंतीं येक देव । मध्यें चि लाविली माव ।
ह्मणोनिया पूर्ण भाव । भगवंतीं असावा ॥ ३९ ॥
ऐसा सबळ रजोगुण । सक्षेपें केलें कथन ।
आतां शुद्ध तो तू जाण । परमार्थिक ॥ ४० ॥
त्याचें वोळखीचें चिन्ह । सत्वगुणीं असे जाण ।
तो रजोगुण परिपूर्ण । भजनमूळ ॥ ४१ ॥
ऐसा रजोगुण बोलिला । श्रोतीं मनें अनुमानिला ।
आतां पुढें परिसिला । पाहिजे तमोगुण ॥ ४२ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे रजोगुणलक्षणनाम समास पंचम ॥ ५ ॥

---

॥ श्रीराम ॥

मागां बोलिला रजोगुण । क्रियेसहित लक्षण ।
आतां ऐका तमोगुण । तो हि सांगिजेल ॥ १ ॥
संसारीं दुःखसंमंध । प्राप्त होतां उठे खेद ।
कां अद्भुत आला क्रोध । तो तमोगुण ॥ २ ॥
शेरीरीं क्रोध भरतां । नोळखे माता पिता ।
बंधु बहिण कांता । ताडी तो तमोगुण ॥ ३ ॥
दुसऱ्याचा प्राण घ्यावा । आपला आपण स्वयें द्यावा ।
विसरवी जीवभावा । तो तमोगुण ॥ ४ ॥
भरलें क्रोधाचें काविरें[1] । पिश्याच्यापरी वावरे[2] ।
नाना उपायें नावरे । तो तमोगुण ॥ ५ ॥

---

१ माया. २ वेड, भ्रम.

आपला आपण शस्त्रपात । पराचा करी घात ।
ऐसा समय वर्तत । तो तमोगुण ॥ ६ ॥
डोळां युध्य चि पाहावें । रण पडिलें तेथें जावें ।
ऐसें घेतलें जीवें । तो तमोगुण ॥ ७ ॥
अखंड भ्रांती पडे । केला निश्चय विघडे ।
अत्यंत निद्रा आवडे । तो तमोगुण ॥ ८ ॥
क्षुधा जयाची वाड[१] । नेगे कडु अथवा गोड ।
अत्यंत जो कां मूढ । तो तमोगुण ॥ ९ ॥
प्रीतिपात्र गेलें मरणें । तयालागीं जीव देणें ।
स्वयें आत्महत्या करणें । तो तमोगुण ॥ १० ॥
किडा मुंगी आणी स्वापद । याचा करूं आवडे वध ।
अत्यंत जो कृपामंद । तो तमोगुण ॥ ११ ॥
स्त्रीहत्या बाळहत्या । द्रव्यालागीं ब्रह्मत्यों[२] ।
करूं आवडे गोहत्या । तो तमोगुण ॥ १२ ॥
विसाळाचेनि नेटें । वीष घ्यावेंसें वाटे ।
परवध मनीं उठे । तो तमोगुण ॥ १३ ॥
अंतरीं धरूनि कपट । पराचें करी तळपट ।
सदा मस्त सदा उद्धट । तो तमोगुण ॥ १४ ॥
कळह व्हावा ऐसें वाटे । झोंबी घ्यावी ऐसें उठे ।
अंतरीं द्वेष प्रगटे । तो तमोगुण ॥ १५ ॥
युध्य देखावें ऐकावें । स्वयें युध्य चि करावें ।
मारावें कीं मरावें । तो तमोगुण ॥ १६ ॥
मत्सरें भक्ति मोडावी । देवाळयें विघडावीं ।
फळतीं झाडें तोडावीं । तो तमोगुण ॥ १७ ॥

---

१ मोठी. २ मागील २-३-२५ पहा ३ एक प्रकारची बाधा आहे.

सत्कर्मे ते नावडती । नाना दोष ते आवडती ।
पापभय नाहीं चित्तीं । तो तमोगुण ॥ १८ ॥
ब्रह्मवृत्तीचा उछेद । जीवमात्रास देणें खेद ।
करूं आवडे अप्रमाद । तो तमोगुण ॥ १९ ॥
आग्नप्रळयें शस्त्रप्रळयें । भूतप्रळयें वीषप्रळयें ।
मत्सरें करी जीवक्षयें । तो तमोगुण ॥ २० ॥
परपीडेचा संतोष । निष्ठुरपणाचा हव्यास ।
संसाराचा नये त्रास । तो तमोगुण ॥ २१ ॥
भांडण लाऊन द्यावें । स्वयें कौतुक पाहावें ।
कुबुद्धि घेतली जीवें । तो तमोगुण ॥ २२ ॥
प्राप्त जालियां संपत्ती । जीवांस करी यातायाती ।
कळवळा नये चित्तीं । तो तमोगुण ॥ २३ ॥
नावडे भक्ति नावडे भाव । नावडे तीर्थ नावडे देव ।
वेदशास्त्र नलगे सर्व । तो तमोगुण ॥ २४ ॥
स्नानसंध्या नेम नसे । स्वधर्मी भ्रष्टला दिसे ।
अकर्तव्य करीतसे । तो तमोगुण ॥ २५ ॥
जेष्ठ बंधु बाप मायें । त्यांचीं वचनें न साहे ।
सीघ्रकोपी निघोन जाये । तो तमोगुण ॥ २६ ॥
उगें चि खावें उगें चि असावें । स्तब्ध होऊन बैसावें ।
काहीं च स्मरेना स्वभावें । तो तमोगुण ॥ २७ ॥
चेटकविद्येचा अभ्यास । शस्त्रविद्येचा हव्यास ।
मल्लविद्या व्हावी ज्यास । तो तमोगुण ॥ २८ ॥
केले गळाचे नवस । रांडिबेडीचे सायास ।
काष्ठयंत्र छेदी जिव्हेस । तो तमोगुण ॥ २९ ॥

---

१ प्रमाद. पुष्कळ ठिकाणीं नकारार्थी " अ " शब्दाच्या मागें निरर्थक लावलेला आढळतो. याचें ठळक उदाहरण म्हणजे " अचपळ मन माझें नावरे आवरीतां ". २ मुळांत " व्यथा " आहे ३ मानेला फास लावून घेण्याचे. ४ राडी = धगधगीत निखाऱ्यांची खाई.

मस्तकीं भेदें[1] जाळावें । पोतें[2] आंग हुरपळावें ।
स्वयें शस्त्र टोंचून घ्यावें । तो तमोगुण ॥ ३० ॥

देवास सिर वाहावें । का तें आंग समर्पावें ।
पडणीवरूनें[3] घालून घ्यावें । तो तमोगुण ॥ ३१ ॥

निग्रह करून धरणें । कां तें टांगून घेणें ।
देवद्वारीं जीव देणें । तो तमोगुण ॥ ३२ ॥

निराहार उपोषण । पंचाग्नी धूम्रपान ।
आपणास घ्यावें पुरून । तो तमोगुण ॥ ३३ ॥

सकाम जें कां अनुष्ठान । का तें वायोनिरोधन ।
अथवा राहावें पडोन । तो तमोगुण ॥ ३४ ॥

नखें केश वाढवावे । हस्त चि वर्ते करावे ।
अथवा वाग्शुन्य व्हावें । तो तमोगुण ॥ ३५ ॥

नाना निग्रहें पिडावें । देहदुःखें चर्फडावें ।
क्रोधें देवास फोडावें । तो तमोगुण ॥ ३६ ॥

देवाची जो निंदा करी । तो आशाबद्धि अघोरी ।
जो संतसंग न धरी । तो तमोगुण ॥ ३७ ॥

ऐसा हा तमोगुण । सांगता तो असाधारण ।
परी त्यागार्थ निरूपण । कांहीं येक ॥ ३८ ॥

ऐसें वर्ते तो तमोगुण । परी हा पतनास कारण ।
मोक्षप्राप्तीचें लक्षण । नव्हे येणें ॥ ३९ ॥

केल्या कर्माचें फळ । प्राप्त होईल सकळ ।
जन्म दुःखाचें मूळ । तुटेना कीं ॥ ४० ॥

ग्रं. ... क्र. 2560 ...

---

१ खापरात सरक्या घालून त्या पेटवून तें खापर डोक्यावर घेतात. त्या खापरास भेदें ह्मणतात २ आराधी लोकांजवळ असणारा काकडा त्याचें नांव पोत. ३ उतरणीवरून स्वतःचें शरीर खालीं टाकून देणें ४ मूळ " पडावें " होतें त्याचें श्रीसमर्थांनीं " पिडावे " केलें

व्हावया जन्माचें खंडण । पाहिजे तो सत्वगुण ।
तेंचि असे निरूपण । पुढिले समासीं ॥ ४१ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे तमोगुणनाम समास साहवा ॥ ६ ॥

---

॥ श्रीराम ॥

मागां बोलिला तमोगुण । जो दुःखदायक दारुण ।
आतां ऐका सत्वगुण । परम दुल्लभ ॥ १ ॥
जो भजनाचा आधार । जो योगियाची थार ।
जो निरसी संसार । दुःखमूळ जो ॥ २ ॥
जेणें होये उत्तम गती । मार्ग फुटे भगवंतीं ।
जेणें पाविजे मुक्ती । सायोज्यता ते ॥ ३ ॥
जो भक्तांचा कोंवसा । जो भवार्णवींचा भर्वसा ।
मोक्षलक्ष्मीची दशा । तो सत्वगुण ॥ ४ ॥
जो परमार्थाचें मंडण । जो महंतांचें भूषण ।
रजतमाचें निर्शनें । जयाचेनी ॥ ५ ॥
जो परम सुखकारी । जो आनंदाची लहरी ।
देऊनियां निवारी । जन्ममृत्य ॥ ६ ॥
जो अज्ञानाचा सेवट । जो पुण्याचें मूळ पीठ ।
जयाचेनि सांपडे वाट । परलोकाची ॥ ७ ॥
ऐसा हा सत्वगुण । देहीं उमटतां आपण ।
तये क्रियेचें लक्षण । ऐसें असे ॥ ८ ॥
ईश्वरीं प्रेमा अधिक । प्रपंच संपादणें लौकिक ।
सदा सन्निध विवेक । तो सत्वगुण ॥ ९ ॥
संसारदुःख विसरवी । भक्तिमार्ग विमळ दावी ।
भजनक्रिया उपजवी । तो सत्वगुण ॥ १० ॥
परमार्थाची आवडी । उठे भावार्थाची गोडी ।
परोपकारीं तांतडी । तो सत्वगुण ॥ ११ ॥

---

१ आधार, आश्रय २ निरसन, नाश

स्नानसंध्या पुण्यसीळ । अभ्यांतरींचा निर्मळ ।
शरीर वस्त्रें सोज्वळ । तो सत्वगुण ॥ १२ ॥
येजन आणी याजन । आधेन आणी अध्यापन ।
स्वयें करी दानपुण्य । तो सत्वगुण ॥ १३ ॥
निरूपणाची आवडी । जया हरिकथेची गोडी ।
क्रिया पालटे रोकडी । तो सत्वगुण ॥ १४ ॥
अश्वदानें गजदानें । गोदानें भूमिदानें ।
नाना रत्नांचीं दानें । करी तो सत्वगुण ॥ १५ ॥
धनदान वस्त्रदान । अन्नदान उदकदान ।
करी ब्राह्मणसंतर्पण । तो सत्वगुण ॥ १६ ॥
कार्तिकस्नानें माघस्नानें । व्रतें उद्यापनें दानें ।
निःकाम तीर्थें उपोषणें । तो सत्वगुण ॥ १७ ॥
सहस्र भोजनें लक्ष भोजनें । विविध प्रकारींचीं दानें ।
निःकाम करी सत्वगुणें । कामना रजोगुण ॥ १८ ॥
तीर्थी अर्पी जो अग्रारें[1] । बांधे वापी सरोवरें ।
बांधे देवाळयें सिखरें । तो सत्वगुण ॥ १९ ॥
देवद्वारीं पडशाळा[2] । पाईरीया दीपमाळा ।
वृंदावनें पार पिंपळा । बांधे तो सत्वगुण ॥ २० ॥
लावी वनें उपवनें । पुष्पवाटिका जीवनें ।
निववी तापस्यांचीं मनें । तो सत्वगुण ॥ २१ ॥
संध्यामठ[3] आणी भुयेरीं[4] । पाईरीया नदीतीरीं ।
भांडारगृहें देवद्वारीं । बांधे तो सत्वगुण ॥ २२ ॥
नाना देवांचीं जें स्थानें । तेथें नंदादीप घालणें ।
वाहे आळंकार भूषणें । तो सत्वगुण ॥ २३ ॥

---

१ देवस्थानास अर्पण केलेली इनाम जमीन २ धर्मशाळा. ३ श्रीसमर्थांचा परळीस नदीचे तीरीं होता तसा ४ तळघरें चाफळ, शहापूर इत्यादि श्रीस्थळीं आहेत तशीं.

जेंगट मृदांग टाळ । दमामे नगारे काहळें ।
नाना वाद्याचे कल्लोळ । सुस्वरादिक ॥ २४ ॥
नाना सामग्री सुंदर । देवाळईं घाली नर ।
हरिभजनीं जो तत्पर । तो सत्वगुण ॥ २५ ॥
छेत्रें आणी सुखासनें । दिंड्या पताका निशाणें ।
वाहे चामरें सूर्यापानें । तो सत्वगुण ॥ २६ ॥
वृंदावनें तुळसीवनें । रंगमाळा समार्जनें ।
ऐसी प्रीति घेतली मनें । तो सत्वगुण ॥ २७ ॥
सुंदरें नाना उपकर्णें । मंडप चांदवे आसनें ।
देवाळईं समर्पणें । हा सत्वगुण ॥ २८ ॥
देवाकारणें खाद्य । नाना प्रकारीं नैवेद्य ।
अपूर्व फळें अर्पी सद्य । तो सत्वगुण ॥ २९ ॥
ऐसी भक्तीची आवडी । नीच दास्यत्वाची गोडी ।
स्वयें देवद्वार झाडी । तो सत्वगुण ॥ ३० ॥
तिथी पर्व मोहोत्साव । तेथें ज्याचा अतर्भाव ।
काया वाचा मनें सर्व । अर्पी तो सत्वगुण ॥ ३१ ॥
हरिकथेसी तत्पर । गंधें माळा आणी धुशैर ।
घेऊन उभीं निरंतर । तो सत्वगुण ॥ ३२ ॥
नर अथवा नारी । येथानशक्ति सामग्री ।
घेऊन उभीं देवद्वारीं । तो सत्वगुण ॥ ३३ ॥
महत्कृत्य सांडून मागें । देवास ये लागवेगें ।
भक्ति निकट आंतरगें । तो सत्वगुण ॥ ३४ ॥
थोरपण सांडून दुरी । नीच कृत्य आंगीकारी ।
तिष्ठत उभी देवद्वारीं । तो सत्वगुण ॥ ३५ ॥

---

१ हातघड्याळ. २ एक चर्मवाद्य ३ पालख्या, वगैरे. ४ सूर्यपान = अब्दागिरी. ५ मुका.

देवालागीं उपोषण । वर्जी तांबोल भोजन ।
नित्य नेम जप ध्यान । करी तो सत्वगुण ॥ ३६ ॥
शब्द कठीण न बोले । अतिनेमेंसी चाले ।
योगी जेणें तोषविले । तो सत्वगुण ॥ ३७ ॥
सांडूनियां अभिमान । निःकाम करी कीर्तन ।
श्वेद रोमांच स्फुराण । तो सत्वगुण ॥ ३८ ॥
अंतरीं देवाचें ध्यान । तेणें निडारले नयन[1] ।
पडे देहाचें विस्मरण । तो सत्वगुण ॥ ३९ ॥
हरिकथेची अति प्रीती । सर्वथा नये विकृती[2] ।
आदिकं[3] प्रेमा आदिअंतीं । तो सत्वगुण ॥ ४० ॥
मुखीं नाम हातीं टाळी । नाचत बोले ब्रीदावळी ।
घेऊन लावी पायधुळी । तो सत्वगुण ॥ ४१ ॥
देहाभिमान गळे । विषईं[4] वैराग्य प्रबळे ।
मिथ्या माया ऐसें कळे । तो सत्वगुण ॥ ४२ ॥
कांहीं करावा उपाये । संसारीं गुतोन काये ।
उकलवी ऐसें हृदये । तो सत्वगुण ॥ ४३ ॥
संसारासी त्रासे मन । कांहीं करावें भजन ।
ऐसें मनीं उठे ज्ञान । तो सत्वगुण ॥ ४४ ॥
असतां आपुले आश्रमीं । अत्यादरें नित्यनेमी ।
सदा प्रीती लागे रामीं । तो सत्वगुण ॥ ४५ ॥
सकळांचा आला वीट । परमार्थीं जो निकट ।
आघातीं उपजे धारिष्ट । तो सत्वगुण ॥ ४६ ॥
सर्वकाळ उदासीन । नाना भोगीं विटे मन ।
आठवे भगवद्भजन । तो सत्वगुण ॥ ४७ ॥
पदार्थीं न बैसे चित्त । मनीं आठवे भगवंत ।
ऐसा दृढ भावार्थ । तो सत्वगुण ॥ ४८ ॥

१ अश्रुपूर्ण झाले. २ कुबुद्धि, कंटाळा. ३ अधिक. ४ गुणावाद.

ग्रंथ संग्रहालय

लोक बोलती विकारी । तरीं आदिक प्रेमा धरी ।
निश्चय बाणे अंतरीं । तो सत्वगुण ॥ ४९ ॥
अंतरीं स्फूर्ती स्फूरे । सत्स्वरूपीं तर्क भरे ।
नष्ट संदेह निवारे । तो सत्वगुण ॥ ५० ॥
शरीर लावावें कारणीं । साक्षेप उठे अंत:कर्णीं ।
सत्वगुणाची करणी । ऐसी असे ॥ ५१ ॥
शांति क्षमा आणि दया । निश्चय उपजे जया ।
सत्वगुण जाणावा तया । अंतरीं आला ॥ ५२ ॥
आले अतीत अभ्यागत । जाऊ नेदी जो भुकिस्त ।
येथानशक्ती दान देत । तो सत्वगुण ॥ ५३ ॥
तडितापडीं दैन्यवाणें । आलें आश्रमाचेनि गुणें ।
तयालागीं स्थळ देणें । तो सत्वगुण ॥ ५४ ॥
आश्रमीं अन्नाची आपदा । परी विमुख नव्हे कदा ।
शक्तिनसार दे सर्वदा । तो सत्वगुण ॥ ५५ ॥
जेणें जिंकिली रसना । तृप्त जयाची वासना ।
जयास नाहीं कामना । तो सत्वगुण ॥ ५६ ॥
होणार तैसें होत जात । प्रपंचीं जाला आघात ।
डळमळिना ज्याचें चित्त । तो सत्वगुण ॥ ५७ ॥
येका भगवताकारणें । सर्व सुख सोडिलें जेणें ।
केलें देहाचें सांडणें । तो सत्वगुण ॥ ५८ ॥
विषईं धांवे वासना । परी तो कदा डळमळिना ।
ज्याचें धारिष्ट चळेना । तो सत्वगुण ॥ ५९ ॥
देह आपदेनें पीडला । क्षुधे तृषेनें वोसावला[2] ।
तरी निश्चयो राहिला । तो सत्वगुण ॥ ६० ॥
श्रवण आणी मनन । निजध्यासें समाधान ।
शुद्ध जालें आत्मज्ञान । तो सत्वगुण ॥ ६१ ॥

---

१ तपस्वी, वैरागी  २ गळाला, कष्टी झाला

जयास अहंकार नसे । नैराशता विलसे ।
जयापासीं कृपा वसे । तो सत्वगुण ॥ ६२ ॥
सकळांसीं नम्र बोले । मर्यादा धरून चाले ।
सर्व जन तोषविले । तो सत्वगुण ॥ ६३ ॥
सकळ जनासी आर्जव । नाहीं विरोधास ठाव ।
परोपकारीं वेची जीव । तो सत्वगुण ॥ ६४ ॥
आपकार्याहून जीवीं । परकार्यसिद्धी करावी ।
मरोन कीर्ती उरवावी । तो सत्वगुण ॥ ६५ ॥
पराव्याचे दोषगुण । दृष्टीस देखे[1] आपण ।
समुद्रा ऐसी सांठवण । तो सत्वगुण ॥ ६६ ॥
नीच उत्तर साहाणें । प्रत्योत्तर न देणें ।
आला क्रोध सावरणें । तो सत्वगुण ॥ ६७ ॥
अन्यायेंवीण गांजिती । नानापरी पीडा करिती ।
तितुकेंहि साहावी चित्तीं । तो सत्वगुण ॥ ६८ ॥
शरीरें घीस साहाणें । दुर्जनासीं मिळोन जाणें ।
निंदकास उपकार करणें । हा सत्वगुण ॥ ६९ ॥
मन भलतीकडे धावें । तें विवेकें आवरावें ।
इंद्रियें दमन करावें । तो सत्वगुण ॥ ७० ॥
सत्क्रिया आचरावी । असत्क्रिया त्यागावी ।
वाट भक्तीची धरावी । तो सत्वगुण ॥ ७१ ॥
जया आवडे प्रातःस्नान । आवडे पुराणश्रवण ।
नाना मंत्रीं देवतार्चन । करी तो सत्वगुण ॥ ७२ ॥
पर्वकाळीं अतिसादर । वसंतपूजेस तत्पर ।
जयंत्याची प्रीती थोर । तो सत्वगुण ॥ ७३ ॥
विदेसिं मेलें मरणें । तयास संस्कार देणें ।
अथवा सादर होणें । तो सत्वगुण ॥ ७४ ॥

---

१ प्रथम " न देखे " असून " न " खोडला आहे. " न " असला किंवा नसला तरी अर्थ एक च करावयाचा.

कोणी येकास मारी । तयास जाऊन वारी ।
जीव बंधनमुक्त करी । तो सत्वगुण ॥ ७५ ॥
लिंगें लाखोलीं अभिशेषें[1] । नामस्मरणीं विस्वास ।
देवदर्शनीं अवकाश । तो सत्वगुण ॥ ७६ ॥
संत देखोनि धावें । परम सुख हेलावे[2] ।
नमस्कारी सर्वभावें । तो सत्वगुण ॥ ७७ ॥
संतकृपा होय जयास । तेणें उद्धारिला वंश ।
तो ईश्वराचा अंश । सत्वगुणें ॥ ७८ ॥
सन्मार्ग दाखवी जना । जो लावी हरिभजना ।
ज्ञान सिकवी अज्ञाना । तो सत्वगुण ॥ ७९ ॥
आवडे पुण्य संस्कार । प्रदक्षणा नमस्कार ।
जया राहे पाठांतर । तो सत्वगुण ॥ ८० ॥
भक्तीचा ह्व्यास भारी । ग्रंथसामग्री जो करी ।
धातुमूर्ति नानापरी । पूजी तो सत्वगुण ॥ ८१ ॥
झळफळित उपकर्णें । माळा गवाळी आसनें ।
पवित्रें सोज्वळें वसनें । तो सत्वगुण ॥ ८२ ॥
परपीडेचें वाहे दुःख । परसंतोषाचें सुख ।
वैराग्य देखोन हरिख । मानी[3] तो सत्वगुण ॥ ८३ ॥
परभूषणें भूषण । परदूषणें दूषण ।
परदुःखें सिणे जाण । तो सत्वगुण ॥ ८४ ॥
आतां असो हें बहुत । देवीं धर्मीं ज्याचें चित्त ।
भजे कामनारहित । तो सत्वगुण ॥ ८५ ॥
ऐसा हा सत्वगुण सात्विक । संसारसागरीं तारक ।
येणें उपजे विवेक । ज्ञानमार्गाचा ॥ ८६ ॥
सत्वगुणें भगवद्भक्ती । सत्वगुणें ज्ञानप्राप्ती ।
सत्वगुणें सायोज्यमुक्ती । पाविजेते ॥ ८७ ॥

१ अभिषेक. २ उचंबळे. ३ हा शब्द समासांत मागाहून स. शो.

ऐसी सत्वगुणाची स्थिती । स्वल्प बोलिलें येथामती ।
सावध होऊन श्रोतीं । पुढें अवधान द्यावें ॥ ८८ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सत्वगुणनाम समास सातवा ॥ ७ ॥

---

॥ श्रीराम ॥

ऐका सद्विद्येचीं लक्षणें । परम शुद्ध सुलक्षणें ।
विचार घेतां बळेंचि बाणे । सद्विद्या आंगीं ॥ १ ॥
सद्विद्येचा जो पुरुष । तो उत्तम लक्षणी विशेष ।
त्याचे गुण ऐकतां संतोष । परम वाटे ॥ २ ॥
भाविक सात्विक प्रेमळ । शांति क्षमा दयासीळ ।
लीन तत्पर केवळ । अमृतवचनी ॥ ३ ॥
परम सुंदर आणी चतुर । परम सबळ आणी धीर ।
परम सपन्न आणी उदार । आतिशयेंसीं ॥ ४ ॥
परम ज्ञाता आणी भक्त । माहा पडित आणी विरक्त ।
माहा तपस्वी आणी शांत । आतिशयेंसीं ॥ ५ ॥
वक्ता आणी नैराशता । सर्वज्ञ आणी सादरता ।
श्रेष्ठ आणी नम्रता । सर्वत्रासीं ॥ ६ ॥
राजा आणी धार्मिक । शूर आणी विवेक ।
तारुण्य आणी नेमक[1] । आतिशयेंसीं ॥ ७ ॥
वृधाचारी कुळाचारी । युक्ताहारी निर्विकारी ।
धन्वंतरी परोपकारी । पद्महेस्ती[2] ॥ ८ ॥
कार्यकर्ता निराभिमानी । गायक आणी वैष्णव जनी ।
वैभव आणी भगवद्भजनी । अत्यादरें ॥ ९ ॥
तत्वज्ञ आणी उदासीन । बहुश्रुत आणी सज्जन ।
मंत्री आणी सगुण । नीतिवंत ॥ १० ॥

---

[1] नियमबद्ध [2] ज्याच्या क्रियेस निश्चयानें यश येतें असा, यशस्वी.

साधु पवित्र पुण्यसीळ । अंतरशुद्ध धर्मात्मा कृपाळ ।
कर्मनिष्ठ स्वधर्मे निर्मळ । निर्लोभ अनुतापी ॥ ११ ॥
गोडी आवडी परमार्थप्रीती । सन्मार्ग सत्क्रिया धारणा धृती ।
श्रुति स्मृती लीळा युक्ति । स्तुती मती परीक्षा ॥ १२ ॥
दक्ष धूर्त योग्य तार्किक । सत्य साहित्य नेमक भेदक ।
कुशळ चपळ चमत्कारिक । नाना प्रकारें ॥ १३ ॥
आदर सन्मान तार्तम्य जाणे । प्रयोग समयो प्रसंग जाणे ।
कार्याकारण चिन्हें जाणे । विचक्षण बोलिका ॥ १४ ॥
सावध साक्षेपी साधक । आगमानिगमशोधक ।
ज्ञानविज्ञानबोधक । निश्चयात्मक ॥ १५ ॥
पुरश्चरणी तीर्थवासी । दृढव्रती कायाक्लेसी ।
उपासक निग्रहासी । करूं जाणे ॥ १६ ॥
सत्यवचनी शुभवचनी । कोमळवचनी येकवचनी ।
निश्चयवचनी सौख्यवचनी । सर्वकाळ ॥ १७ ॥
वासनातृप्त सखोल योगी । भव्य सुप्रसन्न वीतरागी ।
सौम्य सात्विक शुद्धमार्गी । निःकपट निर्वेसनी ॥ १८ ॥
सुगड संगीत गुणग्राही । अनापेक्षी लोकसंग्रही ।
आर्जव सख्य सर्वहि । प्राणीमात्रासी ॥ १९ ॥
द्रव्यसुची दारासुची । न्यायसुची अंतरसुची ।
प्रवृत्तिसुची निवृत्तिसुची । सर्वसुची निःसंगपणें ॥ २० ॥
मित्रपण परहितकारी । वाग्माधुर्य परशोकहारी ।
सामर्थ्यपणें येत्नधारी । पुरुषार्थे जगमित्र ॥ २१ ॥
संशयछेदक विशाळ वक्ता । सकळ कुशं असोनि श्रोता ।
कथानिरूपणीं शब्दार्थी । जाऊंच नेदी ॥ २२ ॥

---

१ शास्त्र २ वेद. ३ चतुर ४ रक्षण करणारा ५ मूळांत ' कुरुपु " अशीं अक्षरें पडलीं आहेत. कुंस = धरणा, कोणती हि शंका विचारता च समाधान करणारा.

विवादरहित संवादी । संगरहित निरोपाधी ।
दुराशारहित अक्रोधी । निर्दोष निर्मत्सरी ॥ २३ ॥
विमळज्ञानी निश्चयात्मक । समाधानी आणी भजक ।
सिद्ध असोनी साधक । साधन रक्षी ॥ २४ ॥
सुखरूप संतोषरूप । आनंदरूप हास्यरूप ।
ऐक्यरूप आत्मरूप । सर्वत्रांसी ॥ २५ ॥
भाग्यवंत जयवंत । रूपवंत गुणवंत ।
आचारवंत क्रियावंत । विचारवंत स्थिती ॥ २६ ॥
येशवंत कीर्तिवंत । शक्तिवंत सामर्थ्यवंत ।
वीर्यवंत वरदवंत । सत्यवंत सुकृती ॥ २७ ॥
विद्यावंत कळावंत । लक्ष्मीवंत लक्षणवंत ।
कुळवंत सुचिष्मंत । बळवंत दयाळु ॥ २८ ॥
युक्तिवंत गुणवंत वरिष्ठ । बुद्धिवंत बहुधारिष्ट ।
दीक्षावंत[1] सदा संतुष्ट । निस्पृह वीतरागी ॥ २९ ॥
असो ऐसे उत्तम गुण । हें सद्विद्येचें[2] लक्षण ।
अभ्यासाया निरूपण । अल्पमात्र बोलिलें ॥ ३० ॥
रूप लावण्य अभ्यासितां नये । सहज गुणास न चले उपाये ।
कांहीं तरी धरावी सोये । अगांतुक गुणाची[3] ॥ ३१ ॥
ऐसी हे सद्विद्या बरवी । सर्वत्रांपासी असावी ।
पैरी[4] विरक्त पुरुषें अभ्यासावी । अगत्यरूप ॥ ३२ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सद्विद्यानिरूपणनाम समास आठवा ॥ ८ ॥

---

१ प्रथम या ठिकाणीं " दयावंत " शब्द होता, तो खोडून मूळ पोथींत " दीक्षावंत " शब्द घातलेला आहे. २ मागीलप्रमाणें च मुळांत " •द्येचें " आहे. ३ चवदाव्या दशकाच्या सहाव्या समासांत ही ओवी प्रथम घेऊन तिचें विवरण केलें आहे, तें पहावें. ४ हा शब्द शोध देतांना समासांत लिहिलेला आहे.

॥ श्रीराम ॥

ऐका विरक्ताचीं लक्षणें । विरक्तें असावें कोण्या गुणें ।
जेणें आंगीं सामर्थ्य बाणे । योगियाचें ॥ १ ॥

जेणें सद्कीर्ति वाढे । जेणें सार्थकता घडे ।
जेणें करितां महिमा चढे । विरक्तांसी ॥ २ ॥

जेणें परमार्थ फावे । जेणें आनंद हेलावे ।
जेणें विरक्ती दुणावे । विवेकेंसहित ॥ ३ ॥

जेणें सुख उचंबळे । जेणें सद्विद्या वोळे ।
जेणें भाग्यश्री प्रबळे । मोक्षेंसहित ॥ ४ ॥

मनोरथ पूर्ण होती । सकळ कामना पुरती ।
मुखीं राहे सरस्वती । मधुर बोलावया ॥ ५ ॥

हे लक्षणें श्रवण कीजे । आणी सदृढ जीवीं धरिजे ।
तरी मग विख्यात होईजे । भूमंडळीं ॥ ६ ॥

विरक्तें विवेकें असावें । विरक्तें अध्यात्म वाढवावें ।
विरक्तें धारिष्ट धरावें । दमनविषईं ॥ ७ ॥

विरक्तें राखावें साधन । विरक्तें लावावें भजन ।
विरक्तें विशेष ब्रह्मज्ञान । प्रगटवावें ॥ ८ ॥

विरक्तें भक्ती वाढवावी । विरक्तें शांती दाखवावी ।
विरक्तें येत्नें करावी । विरक्ती आपुली ॥ ९ ॥

विरक्तें सदक्रिया प्रतिष्ठावी । विरक्तें निवृत्ति विस्तारावी ।
विरक्तें नैराशता धरावी । सदृढ जिवेंसीं ॥ १० ॥

विरक्तें धर्मस्थापना करावी । विरक्तें नीति आवलंबावी ।
विरक्तें क्षमा सांभाळावी । अत्यादरेंसीं ॥ ११ ॥

विरक्तें परमार्थ उजळावा । विरक्तें विचार शोधावा ।
विरक्तें सन्निध ठेवावा । सन्मार्ग सत्वगुण ॥ १२ ॥

विरक्तें भाविकें सांभाळावीं । विरक्तें प्रेमळें निववावीं ।
विरक्तें सावडीं नुपेक्षावीं । शरणागतें ॥ १३ ॥
विरक्तें असावें परम दक्ष । विरक्तें असावें अंतरसाक्ष ।
विरक्तें घोढावा कैपक्ष । परमार्थाचा ॥ १४ ॥
विरक्तें अभ्यास करावा । विरक्तें साक्षेप धरावा ।
विरक्तें वगत्रृत्वें उभारावा । मोडला परमार्थ ॥ १५ ॥
विरक्तें विमळ ज्ञान बोलावें । विरक्तें वैराग्य स्तवीत जावें ।
विरक्तें निश्चयाचें करावें । समाधान ॥ १६ ॥
पर्वें करावीं अचाटें । चालवावीं भक्ताची थाटें ।
नाना वैभवें कचाटें । उपासनामार्गें ॥ १७ ॥
हरिकीर्तनें करावीं । निरूपणें माजवावीं ।
भक्तिमार्गें लाजवावीं । निंदक दुर्जनें ॥ १८ ॥
बहुतांस करावे परोपकार । भलेपणाचा जीर्णोद्धार ।
पुण्यमार्गाचा विस्तार । बळें चि करावा ॥ १९ ॥
स्नान संध्या जप ध्यान । तीर्थयात्रा भगवद्भजन ।
नित्यनेम पवित्रपण । अंतरशुद्ध असावें ॥ २० ॥
दृढ निश्चयो धरावा । संसार सुखाचा करावा ।
विश्व जन उद्धरावा । संसर्गमात्रें ॥ २१ ॥
विरक्तें असावें धीर । विरक्तें असावें उदार ।
विरक्तें असावें तत्पर । निरूपणविषईं ॥ २२ ॥
विरक्तें सावध असावें । विरक्तें शुद्धमार्गें जावें ।
विरक्तें झिजोन उरवावें । सदकीर्तिसी ॥ २३ ॥
विरक्तें विरक्त धुंडावें । विरक्तें साधु वोळखावें ।
विरक्तें मित्र करावें । सत योगी सज्जन ॥ २४ ॥
विरक्तें करावीं पुरश्चरणें । विरक्तें फिरावीं तीर्थाटणें ।
विरक्तें करावीं नाना स्थानें । परम रमणीय ॥ २५ ॥

१ भोळीं माणसें. २ कैवार. ३ खटपट.

विरक्तें उपाधी करावी । आणी उदास वृत्ति न संडावी ।
दुराशा जडों नेदावी । कोणयेकविषईं ॥ २६ ॥
विरक्तें असावें अंतरनिष्ठ । विरक्तें नसावें क्रियाभ्रष्ट ।
विरक्तें न व्हावें कनिष्ठ । पराधेनपणें ॥ २७ ॥
विरक्तें समय जाणावा । विरक्तें प्रसंग वोळखावा ।
विरक्त चतुर असावा । सर्व प्रकारें ॥ २८ ॥
विरक्तें येकदेसी नसावें । विरक्तें सर्व अभ्यासावें ।
विरक्तें अवघें जाणावें । ज्याचें त्यापरी ॥ २९ ॥
हरिकथा निरूपण । सगुणभजन ब्रह्मज्ञान ।
पिंडज्ञान तत्वज्ञान । सर्व जाणावें ॥ ३० ॥
कर्ममार्ग उपासनामार्ग । ज्ञानमार्ग सिद्धांतमार्ग ।
प्रवृत्तिमार्ग निवृत्तिमार्ग । सकळ जाणावें ॥ ३१ ॥
प्रेमळ स्थिती उदास स्थिती । योगस्थिती ध्यानस्थिती ।
विदेह स्थिती सहज स्थिती । सकळ जाणावें ॥ ३२ ॥
ध्वनी लक्ष मुद्रा आसनें । मंत्र यंत्र विधी विधानें ।
नाना मतांचें देखणें । पाहोन सांडावें ॥ ३३ ॥
विरक्तें असावें जगमित्र । विरक्तें असावें स्वतंत्र ।
विरक्तें असावें विचित्र । बहुगुणी ॥ ३४ ॥
विरक्तें असावें विरक्त । विरक्तें असावें हरिभक्त ।
विरक्तें असावें नित्यमुक्त । अलिप्तपणें ॥ ३५ ॥
विरक्तें शास्त्रें धांडोळावीं । विरक्तें मतें विभांडावीं ।
विरक्तें मुमुक्षें लावावीं । शुद्धमार्गें ॥ ३६ ॥
विरक्तें शुद्धमार्ग सांगावा । विरक्तें संशय छेदावा ।
विरक्तें आपला ह्मणावा । विश्वजन ॥ ३७ ॥

---

१ हा द्वितीय पाद श्रीसमर्थांनीं स्वहस्तें घातला आहे " अंतरस्थिती अलिप्त-स्थिती " असा तिसरा पाद होता तो खोडला आहे. २ विभांडणें = खंडन करणें, जिंकणें. ३ शुद्ध उपासना विमल ज्ञान । वीतराग आणि ब्राह्मण्यरक्षण । गुरुपरंपरेचें लक्षण । शुद्धमार्ग ॥

विरक्तें निंदक वंदावे । विरक्तें साधक बोधावे ।
विरक्तें बद्ध चेववावे । मुमुक्षनिरूपणें ॥ ३८ ॥
विरक्तें उत्तम गुण घ्यावे । विरक्तें अवगुण त्यागावे ।
नाना अपाय भगावे । विवेकबळें ॥ ३९ ॥
ऐसीं हें उत्तम लक्षणें । ऐकावीं येकाग्र मनें ।
याचा अव्हेर न करणें । विरक्त पुरुषें ॥ ४० ॥
इतुकें बोलिलें स्वभावें । त्यांत मानेल तितुकें घ्यावें ।
श्रोतीं उदास न करावें । बहु बोलिलें ह्मणौनी ॥ ४१ ॥
परतु लक्षणें ने घेतां । अवलक्षणें वाळ्कळतां ।
तेणें त्यास पढतमूर्खता । येवों पाहे ॥ ४२ ॥
त्या पढतमूर्खाचें लक्षण । पुढिले समासीं निरूपण ।
बोलिलें असे सावधान । होऊन ऐका ॥ ४३ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसवादे विरक्तलक्षणनाम समास नवम ॥ ९ ॥

---

॥ श्रीराम ॥

मागां सांगितलीं लक्षणें । मूर्खाआंगीं चातुर्य बाणे ।
आतां ऐका शाहाणे । असोनि मूर्ख ॥ १ ॥
तया नाव पढतमूर्ख । श्रोतीं न मनावें दुःख ।
अवगुण त्यागितां सुख । प्राप्त होये ॥ २ ॥
बहुश्रुत आणी वित्पन्न । प्रांजळ बोले ब्रह्मज्ञान ।
दुराशा आणी अभिमान । धरी तो येक पढतमूर्ख ॥ ३ ॥
मुक्त क्रिया प्रतिपादी । सगुण भक्ति उछेदी ।
स्वधर्म आणी साधन निंदी । तो येक पढतमूर्ख ॥ ४ ॥
आपलेन ज्ञातेपणें । सकळांस शब्द ठेवणें ।
प्राणीमात्राचें पाहे उणें । तो येक पढतमूर्ख ॥ ५ ॥
शिष्यास अवज्ञा घडे । का तो संकटीं पडे ।
जयाचेनि शब्दें मन मोडे । तो येक पढतमूर्ख ॥ ६ ॥

रजोगुणी तमोगुणी । कपटी कुटिळ अंतःकर्णी ।
वैभव देखोन वाखाणी । तो येक पढतमूर्ख ॥ ७ ॥
समूळ ग्रंथ पाहिल्याविण । उगा च ठेवी जो दूषण ।
गुण सांगता अवगुण । पाहे तो येक पढतमूर्ख ॥ ८ ॥
लक्षणें ऐकोन मानी वीट । मत्सरें करी खटपट ।
नीतिन्याय उद्धट । तो येक पढतमूर्ख ॥ ९ ॥
जाणपणें भरीं भरे[1] । आला क्रोध नावरे ।
क्रिया शब्दास अंतरे । तो येक पढतमूर्ख ॥ १० ॥
वक्ता अधिकारेंवीण । वगत्रृत्वाचा करी सीण ।
वचन जयाचें कठीण । तो येक पढतमूर्ख ॥ ११ ॥
श्रोता बहुश्रुतपणें । वक्तयास आणी उणें ।
वाचाळपणाचेनि गुणें । तो येक पढतमूर्ख ॥ १२ ॥
दोष ठेवी पुढिलांसी । तें चि स्वयें आपणापासीं ।
ऐसें कळेना जयासी । तो येक पढतमूर्ख ॥ १३ ॥
अभ्यासाचेनि गुणें । सकळ विद्या जाणे ।
जनास निवऊं नेणे । तो येक पढतमूर्ख ॥ १४ ॥
हस्त[2] बांधीजे ऊर्णतंतें[3] । लोभें मृत्य भ्रमरातें ।
ऐसा जो प्रपचीं गुंते । तो येक पढतमूर्ख ॥ १५ ॥
स्त्रियांचा संग धरी । स्त्रियांसी निरूपण करी ।
निंद्य वस्तु आंगिकारी । तो येक पढतमूर्ख ॥ १६ ॥
जेणें उणीव ये आंगासी । तें चि दृढ धरी मानसीं ।
देहबुद्धि जयापासीं । तो येक पढतमूर्ख ॥ १७ ॥
सांडुनियां श्रीपती । जो करी नरस्तुती ।
का दृष्टी पडिल्यांची कीर्ती । वर्णी तो येक पढतमूर्ख ॥ १८ ॥

---

१ शहाणपणाच्या अभिमानामुळे हट्टास पेटतो २ हस्ती, हत्ती ३ ऊर्णनाभी-च्या तंतुसूत्राने, कोळी नावाचा किडा जें सूत काढतो त्यानें.

वर्णी स्त्रियांचे आवेव । नाना नाटकें हावभाव ।
देवा विसरे जो मानव । तो येक पढतमूर्ख ॥ १९ ॥
भरोन वैभवाचे भरीं । जीवमात्रास तुछ्य करी ।
पाषांड मत थांवरी । तो येक पढतमूर्ख ॥ २० ॥
चित्पन्न आणी वीतरागी । ब्रह्मज्ञानी माहायोगी ।
भविष्य सांगों लागे जगीं । तो येक पढतमूर्ख ॥ २१ ॥
श्रवण होतां अभ्यांतरीं । गुणदोषाची चाळणा करी ।
परभूषणें मत्सरी । तो येक पढतमूर्ख ॥ २२ ॥
नाहीं भक्तीचें साधन । नाहीं वैराग्य ना भजन ।
क्रियेविण ब्रह्मज्ञान । बोले तो येक पढतमूर्ख ॥ २३ ॥
न मनी तीर्थ न मनी क्षेत्र । न मनी वेद न मनी शास्त्र ।
पवित्र कुळीं जो अपवित्र । तो येक पढतमूर्ख ॥ २४ ॥
आदर देखोनि मन धरी । कीर्तीविण स्तुती करी ।
सवें चि निंदी अनादरी । तो येक पढतमूर्ख ॥ २५ ॥
मागें येक पुढें येक । ऐसा जयाचा दडक ।
बोले येक करी येक । तो येक पढतमूर्ख ॥ २६ ॥
प्रपंचविशीं सादर । परमार्थी ज्याचा अनादर ।
जाणपणें घे अंधार । तो येक पढतमूर्ख ॥ २७ ॥
येथार्थ सांडून वचन । जो रक्षूनं बोले मन ।
ज्याचें जिणें पराधेन । तो येक पढतमूर्ख ॥ २८ ॥
सोंग सपाधी बरीवरी । करूं नये तें चि करी ।
मार्ग चुकोन भरे भरीं । तो येक पढतमूर्ख ॥ २९ ॥
रात्रंदिवस करी श्रवण । न सडी आपले अवगुण ।
स्वहित आपलें आपण । नेणे तो येक पढतमूर्ख ॥ ३० ॥
निरूपणीं भले भले । श्रोते येऊन बैसले ।
क्षुद्रें लक्षुनी बोले । तो येक पढतमूर्ख ॥ ३१ ॥

---

१ सांभाळी, प्रतिपादी. २ रूढी, नियम ३ अंधार, अज्ञान· कां आधार ?

शिष्य जाला अनाधिकारी । आपली अवज्ञा करी ।
पुन्हा त्याची आशा धरी । तो येक पढतमूर्ख ॥ ३२ ॥
होत असतां श्रवण । देहास आलें उणेपण ।
क्रोधें करी चिणचिण । तो येक पढतमूर्ख ॥ ३३ ॥
भरोन वैभवाचे भरीं । सद्गुरूची उपेक्षा करी ।
गुरुपरंपरा चोरी । तो येक पढतमूर्ख ॥ ३४ ॥
ज्ञान बोलोन करी स्वार्थ । कृपणा ऐसा सांची अर्थ ।
अर्थासाठीं लावी परमार्थ । तो येक पढतमूर्ख ॥ ३५ ॥
वर्तल्यावीण सिकवी । ब्रह्मज्ञान लावणी लावी ।
पराधेन गोसावी । तो येक पढतमूर्ख ॥ ३६ ॥
भक्तिमार्ग अवघा मोडे । आपणामधें उधंदरें पडे ।
ऐसिये कर्मी प्वाडे । तो येक पढतमूर्ख ॥ ३७ ॥
प्रपंच गेला हातीचा । लेश नाहीं परमार्थाचा ।
द्वेषी देवां ब्राह्मणाचा । तो येक पढतमूर्ख ॥ ३८ ॥
त्यागावया अवगुण । बोलिलें पढतमूर्खाचें लक्षण ।
विचक्षणें नीउन पूर्ण । क्षमा केलें पाहिजे ॥ ३९ ॥
परम मूर्खांमाजी मूर्ख । जो संसारीं मानी सुख ।
या संसारदुःखा ऐसें दुःख । आणीक नाहीं ॥ ४० ॥
तें चि पुढें निरूपण । जन्मदुःखाचें लक्षण ।
गर्भवास हा दारुण । पुढें निरोपिला ॥ ४१ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे पढतमूर्खलक्षणनिरूपणनाम समास दाहावा ॥ १० ॥

---

१ गमावून बसतो. २ अव्यवस्था ३ न्यून

## ॥ स्वगुणपरीक्षा दशक ॥ ३ ॥

॥ श्रीराम ॥

जन्म दुःखाचा अंकुर । जन्म शोकाचा सागर ।
जन्म भयाचा डोंगर । चळेना ऐसा ॥ १ ॥
जन्म कर्माची आटणी । जन्म पातकाची खाणी ।
जन्म काळाची जाचणी । निचें नवी ॥ २ ॥
जन्म कुविद्येचें फळ । जन्म लोभाचें कमळ ।
जन्म भ्रांतीचें पडळ । ज्ञानहीन ॥ ३ ॥
जन्म जिवासी बंधन । जन्म मृत्यासी कारण ।
जन्म हें चि अकारण । गथागोवी ॥ ४ ॥
जन्म सुखाचा विसर । जन्म चिंतेचा आगर ।
जन्म वासनाविस्तार । विस्तारला ॥ ५ ॥
जन्म जिवाची आवदसा । जन्म कल्पनेचा ठसा ।
जन्म लांवेचा वळसा । ममतारूप ॥ ६ ॥
जन्म मायेचें मैंदावें । जन्म क्रोधाचें विरावें ।
जन्म मोक्षास आडवें । विघ्न आहे ॥ ७ ॥
जन्म जिवाचें मीपण । जन्म अहंतेचा गुण ।
जन्म हें चि विस्मरण । ईश्वराचें ॥ ८ ॥
जन्म विषयांची आवडी । जन्म दुराशेची बेडी ।
जन्म काळाची कांकडी । भक्षिताहे ॥ ९ ॥
जन्म हा चि विषम काळ । जन्म हे चि वोखटी वेळ
जन्म हा अति कुश्चीळ । नर्कपतन ॥ १० ॥
पाहातां शरीराचें मूळ । या ऐसें नाहीं अमंगळ ।
रजस्वलेचा जो विटाळ । त्यामध्यें जन्म यासी ॥ ११ ॥
अत्यंत दोष ज्या विटाळा । त्या विटाळाचा चि पुतळा ।
तेथें निर्मळपणाचा सोहळा । केवी घडे ॥ १२ ॥

---

१ मूस २ नित्य. ३ मागीलप्रमाणें ४ डाकीण. ५ फेरा. ६ लबाडी, फसवणूक ७ शौर्य. ८ वाईट. ९ घाणेरडा

रजस्वलेच्या जो विटाळ । त्याचा आळोन जाला गाळ ।
त्या गाळाचें च केवळ । शरीर हें ॥ १३ ॥
वरिवरि दिसे वैभवाचें । अंतरीं पोतडें नर्काचें ।
जैसें झांकणें चर्मकुंडाचें । उघाडितां च नये ॥ १४ ॥
कुंड धुतां शुद्ध होतें । यास प्रत्यहीं धुईजेतें ।
तरी दुर्गंधी देहातें । शुद्धता न ये ॥ १५ ॥
अस्तीपंजर उभविला । सीरानाडीं गुडाळिला ।
मेद्मांसें सरसाविला । सादोसादीं भरूनी ॥ १६ ॥
अशुद्ध शब्दें शुद्ध नाहीं । तें हि भरलें असे देहीं ।
नाना व्याधी दुःखें तें हि । अभ्यांतरीं वसती ॥ १७ ॥
नर्काचें कोठार भरलें । आत बाहेरी लिडीबिडिलें ।
मूत्रपोतडें जमलें । दुर्गंधीचें ॥ १८ ॥
जंत किडे आणी आंतडी । नाना दुर्गंधीची पोतडी ।
असुप लवथविती कातडी । काटाळवाणी ॥ १९ ॥
सर्वांगास सिर प्रमाण । तेथें वेळसें वाहे त्राण ।
उठे घाणी फुटता श्रवण । ते दुर्गंधी ने घवे ॥ २० ॥
डोळां निघती चिपडें । नाकीं दाटतीं मे कडें ।
प्रात काळीं घाणी पडे । मुखीं मळासारिखी ॥ २१ ॥
लाळ थुका आणी मळ । पीत श्लेष्मा प्रबळ ।
तयास ह्मणती मुखकमळ । चंद्रासारिखें ॥ २२ ॥
मुख ऐसें कुश्चीळ दिसे । पोटीं विष्ठा भरली असे ।
प्रत्यक्षास प्रमाण नसे । भूमंडळीं ॥ २३ ॥
पोटीं घालितां दिव्यान्न । कांहीं विष्ठा कांहीं वमन ।
भागीरथीचें घेतां जीवन । त्याची होये लघुशंका ॥ २४ ॥

---

१ मुळांत तीनदा " वरि " पडलें आहे. २ प्रत्यही, दररोज. ३ रक्त
४ मुखनासिकांतून स्रवणारा मळ

एव मळ मूत्र आणी वमन । हें चि देहाचें जीवन ।
येणें चि देह वाढे जाण । यदर्थीं संशय नाहीं ॥ २५ ॥
पोटीं नस्तां मळ मूत्र वोक । मरोन जाती सकळ लोक ।
जाला राव अथवा रंक । पोटीं विष्ठा चुकेना ॥ २६ ॥
निर्मळपणें काढूं जातां । तरी देह पडेल तत्वता ।
एवं देहाची वेवस्ता । ऐसी असे ॥ २७ ॥
ऐसा हा धड असतां । येथाभूत पाहों जाता ।
मग ते दुर्दशा सागता । शंका बाधी ॥ २८ ॥
ऐसिये कारागृहीं वस्ती । नवमास बहु विपत्ती ।
नव हि द्वारें निरोधती । वायो कैचा तेथें ॥ २९ ॥
वोका नरकाचे रस झिरपती । ते जठराग्नीस्तव तापती ।
तेणें सर्व हि उकडती । अस्तिमांस ॥ ३० ॥
त्वचेविण गर्भ खोळे[1] । तव मातेसी होती डोहळे ।
कटवतिक्षणें[2] सर्वांग पोळे । तया बाळकाचें ॥ ३१ ॥
बांधले चर्माचें मोटाळें । तेथें विष्ठेचें पेटाळें ।
रसउपाय वंकनाळें[3] । होत असे ॥ ३२ ॥
विष्ठा मूत्र वांती पीत । नाकीं तोंडीं निघती जंत ।
तेणें निबुजलें चित्त । आतिशयेंसीं ॥ ३३ ॥
ऐसिये कारागृहीं प्राणी । पडिला अत्यंत दाटणीं ।
कळवळोन ह्मणे चक्रपाणी । सोडवीं[4] येथून आता ॥ ३४ ॥
देवा सोडविसी येथून । तरी मी स्वहित करीन ।
गर्भवास हा चुकवीन । पुन्हां न ये येथें ॥ ३५ ॥
ऐसी दुखवोन प्रतिज्ञा केली । तव जन्मवेळ पुढें आली ।
माता आक्रंदों लागली । प्रसूतकाळीं ॥ ३६ ॥

---

१ खवळतो, हालचाल करितो २ कटु व तीक्ष्ण रसामुळें. ३ मातेच्या उदरांत ज्या नाळानें मुलाला रस पोंचतो तें नाळ ४ प्रथम "सोडिसी" होतें. स. शो.

नाकीं तोंडीं बैसलें मांस । मस्तकद्वारें साडी स्वास ।
तें हि बुजलें[1] निशेष । जन्मकाळीं ॥ ३७ ॥
मस्तकद्वार तें बुजलें । तेणें चित्त निर्बुजलें ।
प्राणी तळमळूं लागलें । चहूंकडे ॥ ३८ ॥
स्वास उस्वास कोंडला । तेणें प्राणी जाजावला[2] ।
मार्ग दिसेनासा जाला । कासावीस ॥ ३९ ॥
चित्त बहु निर्बुजलें । तेणें आडभरीं भरलें ।
लोक ह्मणती आडवें आलें । खांडून काढा ॥ ४० ॥
मग ते खांडून काढिती । हस्तपाद छेदून घेती ।
हाता पडिलें तें चि कापिती । मुख नासिक उदर ॥ ४१ ॥
ऐसे टवके तोडिले । बाळकें प्राण सोडिले ।
मातेनें हि सांडिलें । कळिवरें[3] ॥ ४२ ॥
मृत्य पावला आपण । मातेचा घेतला प्राण ।
दुःख भोगिलें दारुण । गर्भवासीं ॥ ४३ ॥
तथापी सुकृतेंकरूनी । मार्ग सापडला योनी ।
तर्‍हीं आडकला जाउनी । कंठ स्कंदीं मागुता ॥ ४४ ॥
तये संकोचित पंथीं । बळें चि वोढून काढिती ।
तेणें गुणें प्राण जाती । बाळकाचे ॥ ४५ ॥
बाळकाचे जाता प्राण । अंतीं होये विस्मरण ।
तेणें पूर्वील स्मरण । विसरोन गेला ॥ ४६ ॥
गर्भीं ह्मणे सोहं सोहं । बाहेरी पडता ह्मणे कोहं ।
ऐसा कष्टी जाला बहु । गर्भवासीं ॥ ४७ ॥
दुःखा वरपडा होता जाला । थोरा कष्टीं बाहेरी आला ।
सर्वे च कष्ट विसरला । गर्भवासाचे ॥ ४८ ॥
सुन्याकार जाली वृत्ती । कांहीं आठवेना चित्ती ।
अज्ञानें पडिली भ्रांती । तेणें सुख चि मानिलें ॥ ४९ ॥

---

१ "ज्ञ" चा "ज" समासांत केला आहे तो स शो. २ त्रासला.
३ देह. ४ गुंतलेला, व्यास, पात्र

देह विकार पावलें । सुखदु:खें झळबळें ।
असो ऐसें गुंडाळलें । मायाजाळीं ॥ ५० ॥
ऐसें दु:ख गर्भवासीं । होतें प्राणीमात्रासीं ।
ह्मणोनियां भगवतासी । शरण जावें ॥ ५१ ॥
जो भगवंताचा भक्त । तो जन्मापासून मुक्त ।
ज्ञानबळें विरक्त । सर्वकाळ ॥ ५२ ॥
ऐशा गर्भवासीं विपत्ती । निरोपिल्या येथामती ।
सावध होऊन श्रोतीं । पुढें अवधान द्यावें ॥ ५३ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे जन्मदु:खनिरूपणनाम समास प्रथम ॥१॥

॥ श्रीराम ॥

संसार हा चि दु:खमूळ । लागती दु:खाचे इंगळ[1] ।
मागा बोलिली तळमळ । गर्भवासाची ॥ १ ॥
गर्भवासीं दु:ख जालें । तें बाळक विसरलें ।
पुढें वाढों लागलें । दिवसेंदिवस ॥ २ ॥
बाळपणीं त्वचा कोंवळी । दु:ख होतां चि तळमळी ।
वाचा नाहीं तये काळीं । सुखदु:ख सांगावया ॥ ३ ॥
देहास कांहीं दु:ख जालें । अथवा क्षुधेनें पीडलें ।
तरी तें परम आक्रंदलें । परी अंतर नेणवे ॥ ४ ॥
माता कुरवाळी वरी । परी जे पीडा जाली अंतरीं ।
ते मायेसी न कळे अभ्यांतरीं । दु:ख होये बाळकासीं ॥ ५ ॥
मागुतें मागुतें फुंजे रडे । माता बुझावी[2] घेऊन कडे ।
वेथा नेणती बापुडें । तळमळी जीवीं ॥ ६ ॥
नाना व्याधीचे उमाळे । तेणें दु:खें आंदोळे[3] ।
रडे पडे का पोळे । अग्निसगें ॥ ७ ॥

---

१ निखारा २ समजावी. ३ कंपित होतें.

शरीर रक्षितां नये । घडती नाना अपाये ।
खोडी अथातरीं होये । अविवेहीन बाळक ॥ ८ ॥
अथवा अपाय चुकले । पूर्व पुण्य पुढें ठाकलें ।
मातेस वोळखों लागलें । दिवसेंदिवस ॥ ९ ॥
क्षणभरी मातेस न देखे । तरी आक्रंदे रुदन करी दुःखें ।
ते समईं मातेसारिखें । आणीक कांहीं च नाहीं ॥ १० ॥
आस करून वासें पाहे । मातेविण कदा न राहे ।
वियोग पळमात्र न साहे । स्मरण जालियां नतरें ॥ ११ ॥
जरी ब्रह्मादिक देव आले । अथवा लक्ष्मीनें अवलोकिलें ।
तरी नवचे बुझाविलें । आपले मातेवांचुनी ॥ १२ ॥
कुरूप अथवा कुलक्षण । सकळांहूनि करटेपण ।
तरी नाहीं तीसमान । भूमंडळीं कोणी ॥ १३ ॥
ऐसें तें केविलवाणें । मातेविण दिसे उणें ।
रागे परतें केलें तिनें । तरी आक्रंदोनि मिठी घाली ॥ १४ ॥
सुख पावे मातेजवळी । दुरी करिता चि तळमळी ।
अति प्रीति तये काळीं । मातेवरी लागली ॥ १५ ॥
तव ते मातेस मरण आलें । प्राणी पोरटें जालें ।
दुःखें झुरों लागलें । आई आई ह्मणोनी ॥ १६ ॥
आई पाहातां दिसेना । दीनरूप पाहे जना ।
आस लागलिसे मना । आई येईल ह्मणोनी ॥ १७ ॥
माता ह्मणौन मुख पाहे । तव ते आपुली माता नव्हे ।
मग हिंवासलें राहे । दैन्यवाणें ॥ १८ ॥
मातावियोगें कष्टलें । तेणें मानसीं दुःख जालें ।
देह हि क्षीणत्व पावलें । आतिशयेंसीं ॥ १९ ॥
अथवा माता हि वांचली । मायलेंकुरा भेटी जाली ।
बाळदशा ते राहिली । दिवसेंदिवस ॥ २० ॥

१ एकाएकी २ अवयवहीन. ३ वाट. ४ हिरमुसलेलें

बाळपण जालें उणें । दिवसेंदिवस होये शाहाणें ।
मग ते मायेचें अत्यंत पेखणें । होतें तें राहिलें ॥ २१ ॥
पुढें लो लागला खेळाचा । कळप मेळविला पोरांचा ।
आल्यागेल्या डायाचा । आनंद शोक आहे ॥ २२ ॥
मायबापें सिकविती पोटें । तयाचें परम दुःख वाटे ।
चट लागली न सुटे । संगती लेंकुरांची ॥ २३ ॥
लेंकुरांमधें खेळतां । नाठवे माता आणि पिता ।
तव तेथें हि अशचिता । दुःख पावला ॥ २४ ॥
पडिले दांत फुटला डोळा । मोडले पाय जाला खुळा ।
गेला मोंज अवकळा । ठाकून आली ॥ २५ ॥
निघाल्या देवी आणी गोवर । उठलें कपाळ लागला ज्वर ।
पोटसुळीं निरंतर । नायगोळा ॥ २६ ॥
लागलीं भूतें जाली झडपणी । जळीच्या मेसको मायेराणी ।
मुंज्या झोटिंग करणी । ह्वैसोबाची ॥ २७ ॥
वेताळ खवाळ लागला । ब्रह्मगिऱ्हो संचरला ।
नेणों चेडा बोलाडिला । कांहीं कळेना ॥ २८ ॥
येक ह्मणती बीरेदेव । येक ह्मणती खंडेराव ।
येक ह्मणती सकळ वाव । हा ब्राह्मणसमंध ॥ २९ ॥
येक ह्मणती कोणें केलें । आंगीं देवत घातलें ।
येक ह्मणती चुकलें । सटवाईचें ॥ ३० ॥
येक ह्मणती कर्मभोग । आंगीं जडले नाना रोग ।
वैद्य पचाक्षरी चांग । बोलाऊन आणिले ॥ ३१ ॥
येक ह्मणती हा वाचेना । येक ह्मणती हा मरेना ।
भोग भोगितो यातना । पापास्तव ॥ ३२ ॥

---

१ वाट पाहणें २ लय, नाद, छंद ३ प्रथम "दु ख" शब्द होता तो खोडून समासात 'आनंद' शब्द लिहिला आहे तो स शो ४ प्रथम "पोटस्तें" शब्द होता तो खोडून "पोटे" शब्द केला आहे. पोटस्तें=पोटासाठीं पोटे=मन लावून ५ मस्ती ६ काहीं जलदेवता. ७ दुष्ट. ८ ब्रह्मसमंध. ९ चेटूक.

गर्भदुःख विसरला। तो त्रिविधतापें पोळला।
प्राणी बहुत कष्टी जाला। संसारदुःखें॥ ३३ ॥
इतुकें हि चुकोन वांचला। तरी मारमारूं शाहाणा केला।
लौकिकीं नेटका जाला। नांव राखे ऐसा॥ ३४ ॥
पुढें मायेबापीं लोभास्तव। सभ्रमें मांडिला विव्हावं।
दाऊनियां सकळ वैभव। नोवरी पाहिली॥ ३५ ॥
व-हाडीवैभव दाटलें। देखोन परम सुख वाटलें।
मन हें रंगोन गेलें। सासुरवाडीकडे॥ ३६ ॥
मायबापीं भलतैसें असावें। परी सासुरवाडीस नेटकें जावें।
द्रव्य नसेल तरी घ्यावें। रुण कळांतरें॥ ३७ ॥
आंतर्भाव ते सासुरवाडीं। मायेबापें राहिलीं बापुडीं।
होतांतीं सर्वस्वें कुडकुडीं। तितुकें च कार्य त्याचें॥ ३८ ॥
नोवरी आलियां घरा। अती हव्यास वाटे वरा।
ह्मणे मजसारिखा दुसरा। कोणी च नाहीं॥ ३९ ॥
मायबाप बंधु बहिणी। नोवरी न दिसतां वाटे काणी।
अत्यंत लोधला पापिणी। अविद्येनें भुलविला॥ ४० ॥
संभोग नस्तां इतुका प्रेमा। योग्य जालिया उलघी सीमा।
प्रीती वाढविली कामा। करितां प्राणी गुंतला॥ ४१ ॥
जरी न देखे क्षण येक डोळां। तरी जीव होय उताविळा।
प्रीतीपात्र अतर्कळा। घेऊन गेली॥ ४२ ॥
कोवळे कोवळे शब्द मंजुळ। मर्यादा लज्या मुखकमळ।
वक्त्रलोकनें केवळ। ग्रामज्यांचें मैंदावें॥ ४३ ॥
कळवळा येतां सांवरेना। शरीर निकळ आवरेना।
अनेत्र व्यवसाईं क्रमेना। हुरहुर वाटे॥ ४४ ॥

---

१ विवाह. २ व्याजानें. (कळा=व्याज.) ३ क्लेशदायक, अप्रिय ४ लोंबला, निकटला ५ मुळांत "०वाने". ६ ग्रामज्य=ग्राम्य मनोवृत्ति ७ मैंदावें=मैंदपण भुलवणें ८ अन्यत्र.

वेवसाय करितां बाहेरी। मन लागलेंसे घरीं।
क्षणक्षणा अभ्यांतरीं। स्मरण होये कामिनीचें॥ ४५॥
तुह्मीं माझिया जिवांतील जीव। ह्मणौनि अत्यंत लाघव।
दाऊनिया चित्त सर्व। हिरोन घेतलें॥ ४६॥
मैंद[1] सोइरीक काढिती। फासे घालून प्राण घेती।
तैसें आयुष्य गेलियां अंतीं। प्राणीयास होये॥ ४७॥
प्रीति कामिनीसीं लागली। जरी तयेसी कोणी रागेजलीं।
तरी परम क्षिती वाटली। मानसीं गुप्तरूपें॥ ४८॥
तये भार्येचेनि कैवारें। मायेबापासीं नीच उत्तरें।
बोलोनियां तिरस्कारें। वेगळा निघे॥ ४९॥
स्त्रीकारणें लाज सांडिली। स्त्रीकारणें सखीं सोडिलीं।
स्त्रीकारणें विघडिलीं। सकळ हि जिवलगें॥ ५०॥
स्त्रीकारणें देह विकिला। स्त्रीकारणें सेवक जाला।
स्त्रीकारणें सांडवला। विवेकासी॥ ५१॥
स्त्रीकारणें लोलंगता[2]। स्त्रीकारणें अतिनम्रता।
स्त्रीकारणें पराधेनता। अंगिकारिली॥ ५२॥
स्त्रीकारणें लोभी जाला। स्त्रीकारणें धर्म सांडिला।
स्त्रीकारणें अंतरला। तीर्थयात्रा स्वधर्म॥ ५३॥
स्त्रीकारणें सर्वथा कांहीं। शुभाशुभ विचारिलें नाहीं।
तनु मनु धनु सर्व हि। अनन्यभावें अर्पिलें॥ ५४॥
स्त्रीकारणें परमार्थ बुडविला। प्राणी स्वहितास नाडला।
ईश्वरीं कानकोंडा जाला। स्त्रीकारणें कामबुद्धी॥ ५५॥
स्त्रीकारणें सोडिली भक्ती। स्त्रीकारणें सोडिली विरक्ती।
स्त्रीकारणें सायोज्य मुक्ती। ते हि तुछ्य मानिली॥ ५६॥
येके स्त्रियेचेनि गुणें ब्रह्मांड मानिलें ठेंगणें।
जिवलगें तीं पिशुणें[3]। ऐसीं वाटलीं॥ ५७॥

---

१ फांसेगार घातकी लोक. २ आसक्ति ३ पिशुन, दुष्ट.

ऐसी अंतरप्रीति जडली । सर्वस्वाची साडी केली ।
तव ते मरोन गेली । अकस्मात भार्या ॥ ५८ ॥
तेणें मनीं शोक वाढला । ह्मणे थोर घात जाला ।
आतां कैंचा बुडाला संसार माझा ॥ ५९ ॥
जिवलगाचा सोडिला संग । अवचिता जाला घरभंग ।
आता करू मायात्याग । ह्मणे दुःखें ॥ ६० ॥
स्त्री घेऊन आडवी ऊर बडवी पोट बडवी ।
लाज सांडून गौरवी । लोकां देखतां ॥ ६१ ॥
ह्मणे माझें बुडालें घर । आता न करी हा संसार ।
दुःखें आक्रंदला थोर । घोर घोषें ॥ ६२ ॥
तेणें जीव वारयावेवळो । सर्वस्वाचा उबग आला ।
तेणें दुःखें जाला । जोगी का माहात्मा ॥ ६३ ॥
का तें निघोन जाणें चुकलें । पुन्हां मागुतें लग्न केलें ।
तेणें अत्यंत चि मग्न जालें । मन द्वितीय संमंधीं ॥ ६४ ॥
जाला द्वितीय संमंध । सर्वे चि माडिला आनंद ।
श्रोतीं व्हावें सावध । पुढिले समासीं ॥ ६५ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे स्वगुणपरीक्षानाम समास दुसरा ॥ २ ॥

---

॥ श्रीराम ॥

द्वितीय संमंध जाला । दुःख मागील विसरला ।
सुख मानून राहिला । संसाराचें ॥ १ ॥
जाला अत्यंत कृपण पोटें न खाय अन्न ।
रुक्याकारणें सांडी प्राण । येकसरा ॥ २ ॥
कदा कल्पांतीं न वेची । सांचिलें चि पुन्हा सांची ।
अंतरीं असेल कैंची । सद्वासना ॥ ३ ॥

---

१ वायुचक्राप्रमाणें भ्रमूं लागला २ कंटाळा

स्वयें धर्म न करी । धर्मकर्त्यास हि वारी ।
सर्वकाळ निंदा करी । साधुजनाची ॥ ४ ॥
नेणे तीर्थ नेणे व्रत । नेणे अतित अभ्यागत ।
मुंगीमुखींचें जें सीत । तें हि वेंचून साची ॥ ५ ॥
स्वयें पुण्य करवेना । केलें तरी देखवेना ।
उपहास्य करी मना । नये ह्मणौनी ॥ ६ ॥
देवां भक्तास उच्छेदी । आगबळें सकळास खेदी ।
निष्ठुर शब्दें अंतर भेदी । प्राणीमात्राचें ॥ ७ ॥
नीति सांडून मागें । अनीतीनें वर्तों लागे ।
गर्व धरून फुगे । सर्वकाळ ॥ ८ ॥
पूर्वजास सिंतरिलें[1] । पक्षश्राद्ध हि नाहीं केलें ।
कुळदैवत ठकिलें । कोणेपरी ॥ ९ ॥
आक्षत भरिली भाणा[2] । दुजा ब्राह्मण मेहुणा ।
आला होता पाहुणा । स्त्रियेस मूळ ॥ १० ॥
कदा नावडे हरिकथा । देव नलगे सर्वथा ।
स्नानसंध्या म्हणे वृथा । कासया करावी ॥ ११ ॥
अभिळाषें साचीं वित्त । स्वयें करी विश्वासघात ।
मदें मातला उन्मत्त । तारुण्यपणें ॥ १२ ॥
तारुण्य आंगीं भरलें । धारिष्ट नवचे धरिलें ।
करूं नये ते चि केलें । माहा पाप ॥ १३ ॥
स्त्री केली परी धाकुटी । धीर न धरवे चि पोटीं ।
विषयलोभें सेवटीं । वोळखी सांडिली ॥ १४ ॥
माये बहिण न विचारी । जाला पापी परद्वारी
दंड पावला राजद्वारीं । तऱ्हीं पाळटेना ॥ १५ ॥

---

१ फसविलें २ भाणें ह्मणजे भांडें, तेव्हां भाणा ह्मणजे भांड्याला, भांड्यात, असा अर्थ कदाचित् होईल भाणा ह्मणजे बहीण असा हि अर्थ आहे. ( हंसकोश ) दुसरा अर्थ जास्त बरा वाटतो बहिणीला सवाष्ण ह्मणून अक्षत दिली व मेहुणा पाहुणा आला होता त्याला ब्राह्मण सांगितलें

परस्त्री देखोनि दृष्टी । अभिळाष उठे पोटीं ।
अकर्तव्यें हिंपुटी । पुन्हा होये ॥ १६ ॥
ऐसें पाप उदंड केलें । शुभाशुभ नाहीं उरलें ।
तेणें दोषें दुःख भरलें । अकस्मात आंगीं ॥ १७ ॥
व्याधी भरली सर्वांगीं । प्राणी जाला क्षयरोगी ।
केले दोष आपुले भोगी । सीघ्र काळें ॥ १८ ॥
दुःखें सर्वांग फुटलें । नासिक अवघें चि बैसलें ।
लक्षण जाऊन जालें । कुलक्षण ॥ १९ ॥
देहास क्षीणता आली । नाना वेथा उद्भवली ।
तारुण्यशक्ती राहिली । खंगला प्राणी ॥ २० ॥
सर्वांगीं लागल्या कळा । देहास आली अवकळा ।
प्राणी कांपे चळचळां । शक्ति नाहीं ॥ २१ ॥
हस्तपादादिक झडले । सर्वांगीं किडे पडिले ।
देखोन थुकों लागले । लाहानथोर ॥ २२ ॥
जाली विष्टेची सारणी । भोंवती उठली वैद्राणी ।
अत्यंत खंगला प्राणी । जीव न वचे ॥ २३ ॥
आतां मरण दे गा देवा । बहुत कष्ट जाले जीवा ।
जाला नाहीं नेणों ठेवा । पातकाचा ॥ २४ ॥
दुःखें घळघळां रडे । जों जों पाहे आंगाकडे ।
तों तों दैन्यवाणें बापुडें । तळमळी जीवीं ॥ २५ ॥
ऐसे कष्ट जाले बहुत । सकळ जालें वाताहात ।
दरवडा घालून वित्त । चोरटीं नेलें ॥ २६ ॥
जालें आरत्र ना परत्र । प्रारब्ध ठाकलें विचित्र ।
आपला आपण मळमूत्र । सेविला दुःखें ॥ २७ ॥
पापसामग्री सरली । दिवसेंदिवस वेथा हरली ।
वैद्यें औषधें दिधलीं । उपचार जाला ॥ २८ ॥

---

१ कष्टी. २ दुर्गंधी

मरत मरत वांचला । यास पुन्हां जन्म जाला ।
लोक ह्मणती पडिला । माणसांमधें ॥ २९ ॥
येरें स्त्री आणिली । बरवी[1] घरवात माडिली ।
अति स्वार्थबुद्धी धरिली । पुन्हा मागुती ॥ ३० ॥
कांहीं वैभव मेळविलें । पुन्हां सर्व हि संचिलें ।
परंतु गृह बुडालें । संतान नाहीं ॥ ३१ ॥
पुत्रसंतान नस्तां दुःखी । वांज नांव पडिलें लोकिकीं ।
तें न फिटे ह्मणोनी लेंकी । तरी हो आतां ॥ ३२ ॥
ह्मणोन नाना सायास । बहुत देवांस केले नवस ।
तीर्थें व्रतें उपवास । धरणें पारणें मांडिलें ॥ ३३ ॥
विषयसुख तें राहिलें । वांजपणें दुःखी केलें ।
तव तें कुळदैवत पावलें । जाली वृद्धी ॥ ३४ ॥
त्या लेंकुरावरी अति प्रीती । दोघे हि क्षण येक न विशंभती ।
कांहीं जाल्यां आक्रंदती । दीर्घ स्वरें ॥ ३५ ॥
ऐसी ते दुःखिस्ते । पूजीत होतीं नाना दैवतें ।
तव तें हि मेलें अवचितें । पूर्वपापेंकरूनी ॥ ३६ ॥
तेणें बहुत दुःख जालें । घरीं आरधें पडिलें ।
ह्मणती आह्मांस का ठेविलें । देवें वांज करूनी ॥ ३७ ॥
आह्मांस द्रव्य काये करावें । तें जावें परी अपत्य व्हावें ।
अपत्यालागी त्यजावें । लागेल सर्व ॥ ३८ ॥
वांजपण[2] सदिसें[3] गेलें । तों मरतवांज नांव पडिलें ।
तें न फिटे कांहीं केलें । तेणें दुःखें आक्रंदती ॥ ३९ ॥
आमुची वेली कां खुंटिली । हा हा देवा वृत्ती बुडाली ।
कुळस्वामीण कां क्षोभली । विझाला कुळदीप ॥ ४० ॥

---

१ प्रथम "पुन्हा" शब्द होता, तो खोडून समासांत "बरवी" शब्द लिहिला आहे तो स. शो २ अनपत्यत्वदुःख ३ मुकतेंच.

आतां लेंकुराचें मुख देखेन । तरी आनंदें[1] रांडी चालेन ।
आणी गळ हि टोंचीन । कुळस्वामिणीपासीं ॥ ४१ ॥
आई भुत्या[2] करीन तुझा । नाव ठेवीन केरपुंजा ।
वेसणी[3] घालीन माझा । मनोरथ पुरवीं ॥ ४२ ॥
बहुत देवास नवस केले । बहुत गोसावी धुंडिले ।
गटगटां गिळिले । सगळे विंचु ॥ ४३ ॥
केले समधाचे सायास । राहाणे[4] घातलें बहुवस ।
केळें नारिकेळे ब्राह्मणास । अन्नदानें दिधलीं ॥ ४४ ॥
केलीं नाना कवटाळें[5] । पुत्रलोभें केलीं टौलें[6] ।
तरी अदृष्ट[7] फिरलें  पुत्र नाहीं ॥ ४५ ॥
वृक्षाखालें जाऊन नाहाती । फळतीं झाडें करपती ।
ऐसे नाना दोष करिती । पुत्रलोभाकारणें ॥ ४६ ॥
सोडून सकळ वैभव । त्यांचा वारयावेवर्ला[8] जीव ।
तव तो पावला खंडेराव । आणी कुळस्वामिणी ॥ ४७ ॥
आतां मनोरथ पुरती । स्त्रीपुरुषें आनदती ।
सावध होऊन श्रोतीं । पुढें अवधान द्यावें ॥ ४८ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे स्वगुणपरीक्षानाम समास तृतीय ॥ ३ ॥

॥ श्रीराम ॥

लेंकुरें उदंड जालीं । तों ते लक्ष्मी निघोन गेली ।
बापडीं भिकेसी लागलीं । कांहीं खाया मिळेना ॥ १ ॥
लेंकुरें खेळती धाकुटीं । येकें रांगती येकें पोटीं ।
ऐसी घरभरी जाली दाटी । कन्या आणी पुत्रांची ॥ २ ॥
दिवसेंदिवस खर्च वाढला । याबा होता तो खुंटोन गेला ।
कन्या उपवरी जाल्या त्यांला । उजवावया द्रव्य नाहीं ॥ ३ ॥

१ धगधगीत निखाऱ्याची खाई. २ देवीचा आराधी ३ नथणी. ४ अगांत दैवत घालणें ५ कृत्रिमें. ६ मंत्रप्रयोगांपैकीं एक क्षुद्र साधन आहे ७ दैव, नशीब. ८ वायुचक्राप्रमाणें भ्रमूं लागला.

मायेबापें होतीं संपन्न । त्यांचें उदंड होतें धन ।
तेणें करिता प्रतिष्ठा मान । जनीं जाला होता ॥ ४ ॥
भरम आहे लोकाचारीं । पहिली नादणूक नाहीं घरीं ।
दिवसेंदिवस अभ्यांतरीं । दरिद्र आलें ॥ ५ ॥
ऐसी घरवात वाढली । खातीं तोंडें मिळालीं ।
तेणें प्राणीयास लागली । काळजी उद्वेगाची ॥ ६ ॥
कन्या उपवरी जाल्या । पुत्रांस नोवऱ्या आल्या ।
आतां उजवणा केल्या । पाहिजेत कीं ॥ ७ ॥
जरी मुलें तैसीं च राहिलीं । तरी पुन्हा लोकलाज जाली ।
ह्मणती कासया व्यालीं । जन्मदारिद्रें ॥ ८ ॥
ऐसी लोकलाज होईल । वडिलांचें नांव जाईल ।
आतां रुण कोण देईल । लग्नापुरतें ॥ ९ ॥
मागें रुण ज्याचें घेतलें । त्याचें परतोन नाहीं दिल्हें ।
ऐसें आभाळ कोसळलें । उद्वेगाचें ॥ १० ॥
आपण खातों अन्नासी । अन्न खातें आपणासीं ।
सर्वकाळ मानसीं । चिंतातुर ॥ ११ ॥
पती[1] अवघी च मोडली । वस्तभाव गाहाण पडिली ।
अहा देवा वेळ आली । आता डिवाळ्याची ॥ १२ ॥
काहीं केला ताडामोडा । विकिला घरींचा पाडारेडा ।
कांहीं पैका रोकडा । कळांतरें[2] काढिला ॥ १३ ॥
ऐसें रुण घेतलें । लोकिकीं दभ केलें ।
सकळ ह्मणती नांव राखिलें । वडिलांचें ॥ १४ ॥
ऐसें रुण उदंड जालें । रिणाइतीं[3] वेढून घेतलें ।
मग प्रयाण आरंभिलें । विदेशाप्रती ॥ १५ ॥
दोनी वरुषें बुडी मारिली । नीच सेवा अंगीकारिली ।
शरीरें आपदा भोगिली । अतिशयेंसीं ॥ १६ ॥

---

१ पत, २ व्याजानें. ३ सावकारानीं.

काहीं मेळविलें विदेशीं । जीव लागला मनुष्यांपासीं ।
मग पुसोनियां स्वामीसी । मुरडता जाला ॥ १७ ॥
तव तें अत्यंत पीडावलीं । वाट पाहात बैसलीं ।
ह्मणती दिवसगती कां लागली । काये करणें देवा ॥ १८ ॥
आता आह्मीं काये खावें । किती उपवासीं मरावें ।
ऐसियाचे संगतीस देवें । का पां घातलें आह्मासी ॥ १९ ॥
ऐसें आपुलें सुख पाहाती । परी त्याचें दु:ख नेणती ।
आणी शक्ति गेलिया अंतीं । कोणी च कामा न येती ॥२०॥
असो ऐसी वाट पाहतां । दृष्टीं देखिला अवचिता ।
मुलें धावती ताता । भागलास ह्मणौनी ॥ २१ ॥
स्त्री देखोन आनंदली । ह्मणे आमुची दैन्य फिटली ।
तव येरें दिधली । गाठोडी हातीं ॥ २२ ॥
सकळास आनंद जाला । ह्मणती आमुचा वडील आला ।
तेणें तरी आह्मांला आग्या टोप्या आणिल्या ॥ २३ ॥
ऐसा आनंद च्यारी दिवस । सर्वें च मांडिली कुसमुसे ।
ह्मणती हें गेलियां आह्मास । पुन्हां आपदा लागती ॥ २४ ॥
ह्मणौनी आणिलें तें असावें । येणें मागुतें विदेशास जावें ।
आम्ही हें खाऊ न लों यावें । द्रव्य मेळऊन ॥ २५ ॥
ऐसी वासना सकळांची । अवघीं सोइरीं सुखाचीं ।
स्त्री अत्यंत प्रीतीची । ते हि सुखा च लागली ॥ २६ ॥
विदेसीं बहु दगदला । विश्रांती घ्यावया आला ।
स्वास हि नाही टाकिला । तों जाणें वोढवलें ॥ २७ ॥
पुढें अपेक्षा जोसियांची । केली विवंचना मुहूर्तांची ।
वृत्ति गुंतली तयाची । जाता प्रशस्त न वटे ॥ २८ ॥
मायां मात्रीं सिद्ध केली । कांहीं सामग्री बांधली ।
लेंकुरें दृष्टीस पाहिलीं । मार्गस्त जाला ॥ २९ ॥

---

१ परत घराकडे फिरला. २ कुरकुर. ३ पैसा ४ फराळाचें साहित्य

स्त्रियेस अवलोकिलें । वियोगें दुःख बहुत वाटलें ।
प्रारब्धसूत्र-तुंकलें । रुणानबधाचें ॥ ३० ॥
कंठ सद्गदित जाला । न संवरे च गहिवरला ।
लेंकुरा आणी पियाला । तडातोडी जाली ॥ ३१ ॥
जरी रुणानबध असेल । तरी मागुती भेटी होईल ।
नाहीं तरी संगती पुरेल । ये चि भेटीनें तुमची ॥ ३२ ॥
ऐसें बोलोन स्वार होये । मागुता फीरफिरों पाहे ।
वियोगदुःख न साहे । परंतु काहीं न चले ॥ ३३ ॥
आपुला गांव राहिला मागें । चित्त भ्रमलें संसारउद्वेगें ।
दुःखवला प्रपंचसंगें । अभिमानास्तव ॥ ३४ ॥
ते समई माता आठवली । ह्मणे धन्य धन्य ते माउली ।
मजकारणें बहुत कष्टली । परी मी नेणें चि मूर्ख ॥ ३५ ॥
आजी जरी ते असती । तरी मजला कदा न विसंभती ।
वियोग होता आक्रंदती । ते पोटागि वेगळी च ॥ ३६ ॥
पुत्र वैभवहीन भिकारी । माता तैसा चि अंगिकारी ।
दगदला देखोनि अंतरीं । त्याच्या दुःखें दुःखवे ॥ ३७ ॥
प्रपंच विचारें पाहाता । हें सकळ जोडे न जोडे माता ।
हें शरीर जयेकरितां । निर्माण जालें ॥ ३८ ॥
लांव तरी ते माया । काय कराविया सहस्र जाया ।
परी भुलोन गेलों वायां । मकरंध्वजाचेनी ॥ ३९ ॥
या येका कामाकारणें । जिवलगांसि द्वंद घेणें ।
सखीं तीं च पिसुणें । ऐसीं वाटतीं ॥ ४० ॥
म्हणौन धन्य धन्य ते प्रपंची जन । जे मायेबापाचें भजन ।
करिती न करिती मन । निष्ठुर जिवलगांसीं ॥ ४१ ॥

---

१ तुटलें ? २ पोटाची आग, कळवळा, प्रेम ३ जिच्यापासून. ४ डांकीण. ५ कामविकारानें.

संगती स्त्रीबाळकांची[1] । आहे सांठी जन्माची ।
परी मायेबापें कैंचीं । मिळतील पुढें ॥ ४२ ॥
ऐसें पूर्वी होतें ऐकिलें । परी तें समई नाहीं कळलें ।
मन हें बुडोन गेलें । रतिसुखाचा डोहीं ॥ ४३ ॥
हे सखीं वाटती परी पिसुणें । मिळालीं वैभवाकारणें ।
रितें जाता लाजिरवाणें । अत्यंत वाटे ॥ ४४ ॥
आतां भलतैसें करावें । परि द्रव्य मेळऊन न्यावें ।
रितें जातां स्वभावें । दुःख आहे ॥ ४५ ॥
ऐसी वेवर्धना[2] करी । दुःख वाटलें अंतरीं ।
चिंतेचिये माहापुरीं । बुडोन गेला ॥ ४६ ॥
ऐसा हा देह आपुला । असतां च पराधेन केला ।
ईश्वरीं कानकोंडा जाला । कुटुंबकाबाडी ॥ ४७ ॥
या येका कामासाठीं । जन्म गेला आटाटी ।
वय वेचल्यां सेवटीं । येकलें चि जावें ॥ ४८ ॥
ऐसा मनीं प्रस्तावला । क्षण येक उदास जाला ।
सर्वे चि प्राणी झळंबला[3] । मायाजाळें ॥ ४९ ॥
कन्यापुत्रें आठवलीं । मनीहूनि क्षिती वाटली ।
म्हणे लेंकुरें अंतरलीं । माझीं मज ॥ ५० ॥
मागील दुःख आठवलें । जें जें होतें प्राप्त जालें ।
मग रुदन आरंभिलें । दीर्घ स्वरें ॥ ५१ ॥
आरण्यरुदन करिता । कोणी नाहीं बुझाविता ।
मग होये विचारिता । आपुले मनीं ॥ ५२ ॥
आतां कासया रडावें । प्राप्त होतें तें भोगावें ।
ऐसें बोलोनिया जीवें । धारिष्ट केलें ॥ ५३ ॥

---

१ सोबती २ विवंचना. ३ गुंडाळला गेला.

ऐसा दुःखें दगदला । मग विदेशाप्रती गेला ।
पुढें प्रसंग वर्तला । तो सावध ऐका ॥ ५४ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे स्वगुणपरीक्षानाम समास चतुर्थ ॥ ४ ॥

---

॥ श्रीराम ॥

पुढें गेला विदेशासी । प्राणी लागला व्यासगासी ।
आपल्या जिवेंसीं सोसी । नाना श्रम ॥ १ ॥
ऐसा दुस्तर संसार । करितां कष्टला थोर ।
पुढें दोनी च्यारी संवत्सर । द्रव्य मेळविलें ॥ २ ॥
सवें चि आला देशासी । तों आवर्षण पडिलें देसीं ।
तेणें गुणें मनुष्यांसी । बहुत कष्ट जाले ॥ ३ ॥
येकांच्या बैसल्या अमृतकळा[1] । येकास चद्री लागली डोळा ।
येकें कापतीं चळचळा । दैन्यवाणीं ॥ ४ ॥
येकें दीनरूप बैसलीं । येकें सुजलीं येकें मेलीं ।
ऐसीं कन्यापुत्रें देखिलीं । अकस्मात डोळा ॥ ५ ॥
तेणें बहुत दुःखी जाला । देखोनियां उभडें[2] आला ।
प्राणी आक्रंदों लागला । दैन्यवाणा ॥ ६ ॥
तंव तीं अवघीं सावध जालीं । ह्मणती बाबा बाबा जेऊ घाली ।
अन्नालागीं मिडकेलीं[3] । झडा घालिती ॥ ७ ॥
गाठोडें सोडून पाहाती । हाता पडिलें तें चि खाती ।
कांहीं तोंडीं काहीं हातीं । प्राण जाती निघोनी ॥ ८ ॥
तांतडी तातडी जेऊं घाली । तों तें जेवितां जेवितां कांहीं मेलीं ।
कांहीं होतीं धादावलीं । तें हि मेलीं अजीर्णें ॥ ९ ॥
ऐसीं बहुतेकें मेलीं । येक दोनी मुलें उरलीं ।
तें हि दैन्यवाणी जालीं । आपले मातेवांचुनी ॥ १० ॥

---

१ गालफड. २ गहिंवर ३ धाधावलीं, आशाळभूत झालीं.

ऐसें आवर्षण आलें । तेणें घर चि बुडालें ।
पुढें देसीं सुभिक्ष जालें । आतिशयेंसीं ॥ ११ ॥
लेंकुरां नाहीं वाढवितें । अन्न करावें लागे आपुलेन हातें ।
बहु त्रास घेतला चित्तें । स्वयंपाकाचा ॥ १२ ॥
लोकीं भरीस घातलें । पुन्हां मागुतें लग्न केलें ।
द्रव्य होतें तें वेचलें । लग्नाकारणें ॥ १३ ॥
पुन्हां विदेशासी गेला । द्रव्य मेळऊन आला ।
तव घरीं कळहो लागला । सावत्र पुत्रांसी ॥ १४ ॥
स्त्री जाली न्हातीधुती । पुत्र देखों न सकती ।
भ्रताराची गेली शक्ती । वृद्ध जाला ॥ १५ ॥
सदां भाडण पुत्रांचें । कोणी नायकती कोणाचें ।
वनिता अति प्रीतीचें । प्रीतिपात्र ॥ १६ ॥
किंत बैसला मना । येके ठाइं पडेना ।
ह्मणोनियां पाचा जणा । मेळविलें ॥ १७ ॥
पांच जण वाटे करिती । तों ते पुत्र नायेकती ।
निवाडा नव्हे चि अंतीं । भाडण लागलें ॥ १८ ॥
बापलेंका भांडण जालें । लेंकीं बापास मारिलें ।
तव ते मातेनें घेतलें । शंखतीर्थ[1] ॥ १९ ॥
ऐकोनि मिळाले लोक । उभे पाहाती कौतुक ।
ह्मणती बापास लेक । कामा आले ॥ २० ॥
ज्या कारणें केले नवस । ज्या कारणें केले सायास ।
ते पुत्र पितीयास । मारिती पाहा ॥ २१ ॥
ऐसी आली पापकळी[2] । आश्चिर्य मानिलें सकळीं ।
उभे तोडिती कळी[3] । नगरलोक ॥ २२ ॥
पुढें बैसोन पाच जण । वांटे केले तत्समान ।
बापलेंकाचें भांडण । तोडिलें तेहीं ॥ २३ ॥

१ शंखध्वनी करूं लागली. २ पापमूलक कलह ३ कलह, भांडण.

बापास वेगळें घातलें । कोंपट बांधोन दिधलें ।
मन कांतेचें लागलें । स्वार्थबुद्धी ॥ २४ ॥
कांता तरुण पुरुष वृद्ध । दोघांस पडिला संमंध ।
खेद सांडून आनंद । मानिला तेहीं ॥ २५ ॥
स्त्री सांपडली सुंदर । गुणवंत आणी चतुर ।
ह्मणे माझें भाग्य थोर । वृद्धपणीं ॥ २६ ॥
ऐसा आनंद मानिला । दुःख सर्व हि विसरला ।
तव तों गल्बला ज़ाला । परचक्र आलें ॥ २७ ॥
अकस्मात धाडी आली । कांता बंदीं धरून नेली ।
वस्तभाव हि गेली । प्राणीयाची ॥ २८ ॥
तेणें दुःख जालें भारी । दीर्घ स्वरें रुदन करी ।
मनीं आठवे सुंदरी । गुणवंत ॥ २९ ॥
तव तिची वार्ता आली । तुमची कांता भ्रष्टली ।
ऐकोनियां आग घाली । पृथ्वीवरी ॥ ३० ॥
सव्य अपसव्य लोळे । जळें पाझरती डोळे ।
आठवितां चित्त पोळे । दुःखानळें ॥ ३१ ॥
द्रव्य होतें मेळविलें । तें हि लग्नास वेचलें ।
कांतेसि हि धरून नेलें । दुराचारीं ॥ ३२ ॥
मज हि वृद्धाप्य आलें । लेकीं वेगळें घातलें ।
अहा देवा वोढवलें । अदृष्ट माझें ॥ ३३ ॥
द्रव्य नाहीं कांता नाहीं । ठाव नाहीं शक्ति नाहीं ।
देवा मज कोणी च नाहीं । तुजवेगळें ॥ ३४ ॥
पूर्वीं देव नाहीं पुजिला । वैभव देखोन भुलला ।
सेखीं प्राणी प्रस्तावला । वृद्धपणीं ॥ ३५ ॥
देह अत्यंत खंगलें । सर्वांग वाळोन गेलें ।
वातपीत उसळलें । कंठ दाटला कफें ॥ ३६ ॥

वळे जिव्हेची बोबडी । कफें कंठ घडघडी ।
दुर्गंधी सुटली तोंडीं । नाकीं स्लेष्मा वाहे ॥ ३७ ॥
मान कांपे चळचळां । डोळे गळती भळभळां ।
वृद्धपणीं अवकळा । ठाकून आली ॥ ३८ ॥
दंतपाटी उखळली । तेणें बोचरखिंडी पडिली ।
मुखीं लाळ गळों लागली । दुर्गंधीची ॥ ३९ ॥
डोळां पाहातां दिसेना । कानीं शब्द ऐकेना ।
दीर्घ स्वरें बोलवेना । दमा दाटे ॥ ४० ॥
शक्ती पायांची राहिली । बैसवेना मुरकुंडी घाली ।
बृहती वाजों लागली । तोंडा च ऐसी ॥ ४१ ॥
क्षुधा लागतां आवरेना । अन्न समईं मिळेना ।
मिळालें तरी चावेना । दात गेले ॥ ४२ ॥
पित्तें जिरेना अन्न । भक्षीता च होये वमन ।
तैसें चि जाये निघोन । अपानद्वारें ॥ ४३ ॥
विष्ठा मूत्र आणी वेंळस । भोवता वमनें केला नास ।
दुरून जातां कोंडे स्वास । विश्वजनाचा ॥ ४४ ॥
नाना दुःखें नाना व्याधी । वृद्धपणीं चळे बुद्धी ।
तऱ्हीं पुरेना आवधी । आयुष्याची ॥ ४५ ॥
पापण्या भवयाचे केश । पिकोन झडले निःशेष ।
सर्वांगीं लोंबलें मास । चिरकुटासारिखें ॥ ४६ ॥
देह सर्व पोरिखें जालें । सवंगडे निःशेष राहिले ।
सकळ प्राणीमात्र बोले । मरेना कां ॥ ४७ ॥
जें जन्मून पोसिलीं । तें चि फिरोन पडिलीं ।
अतीं विषम वेळ आली । प्राणीयासी ॥ ४८ ॥

---

१ मुखनासिकादिकांतील मळ. २ परकी, परस्वाधीन ३ स्नेही, सोबती.

गेलें तारुण्य गेलें बळ । गेलें संसारींचें सळ ।
वाताहात जालें सकळ । शरीर आणी संपत्ती ॥ ४९ ॥
जन्मवरी स्वार्थ केला । तितुका हि वेर्थ गेला ।
कैसा विषम काळ आला । अंतकाळीं ॥ ५० ॥
सुखाकारणें झुरला । सेखीं दुःखें कष्टी जाला ।
पुढें मागुता धोका आला । येमयातनेचा ॥ ५१ ॥
जन्म अवघा दुःखमूळ । लागती दुःखाचे इगळ ।
ह्मणोनिया तत्काळ । स्वहित करावें ॥ ५२ ॥
असो ऐसें वृद्धपण । सकळास आहे दारुण ।
ह्मणोनियां शरण । भगवंतास जावें ॥ ५३ ॥
पुढें वृद्धीसें तत्वता । गर्भीं प्रस्तावा होता ।
तो चि आला मागुता । अंतकाळीं ॥ ५४ ॥
ह्मणौनि मागुतें जन्मांतर । प्राप्त मातेचें उदर ।
संसार हा अति दुस्तर । तो चि ठाकून आला ॥ ५५ ॥
भगवद्भजनावांचुनी । चुकेना हे जन्मयोनीं ।
तापत्रयांची जाचणी । सांगिजेल पुढें ॥ ५६ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे स्वगुणपरीक्षानाम समास ॥५॥

॥ श्रीराम ॥

तापत्रयाचें लक्षण । आता सांगिजेल निरूपण ।
श्रोतीं करावें श्रवण । येकाग्र होऊनी ॥ १ ॥
जो तापत्रैं पोळला । तो सतसगें निवाला ।
आर्तभूत[3] तोषला । पैंदार्थ[4] जेवी ॥ २ ॥
क्षुधाक्रांतास मिळे अन्न । तृषाक्रांतास जीवन ।
बंदीं पडिल्याचें बंधन । तोडितां सुख ॥ ३ ॥

1 उकळी, बळ किंवा घडामोड २ वृद्धपणीं ३ आतुर. ४ हस्तदोष असावा काय? "पदार्थें" असतें ह्मणजे अर्थ लागतो आतुर मनुष्याला जें पाहिजे असतें तें मिळालें ह्मणजे तो जसा संतुष्ट होतो त्याप्रमाणें

माहापुरें जाजावला । तो पैलतीरास नेला ।
कां तो स्वप्नींचा चेइला[१] । स्वप्नदुःखी ॥ ४ ॥
कोणी येकासी मरण । येतां दिलें जीवदान ।
संकटास निवारण । तोडितां सुख ॥ ५ ॥
रोगीयास औषध । सप्रचित आणी शुद्ध ।
तयासी होये आनद । आरोग्य होतां ॥ ६ ॥
तैसा संसारें दुःखवला । त्रिविधतापें पोळला ।
तो चि येक अधिकारी जाला । परमार्थासी ॥ ७ ॥
ते त्रिविध ताप ते कैसे । आतां बोलिजेत तैसे ।
येविषईं येक असे । वाक्याधार ॥ ८ ॥

॥ श्लोक ॥ देहेंद्रियप्राणेन सुखं दुःख च प्राप्यते ।
इममाध्यात्मिकं तापं जायते दुःखं देहिनां ॥ १ ॥
सर्वभूतेन संयोगात् सुख दुःख च जायते ।
द्वितीयतापसताप: सत्य चैवाधिभौतिकः ॥ २ ॥
शुभाशुभेन कर्मणा देहांते यमयातना ।
स्वर्गनरकादि भोक्तव्यमिद चैवाधिदैविकम्* ॥ ३ ॥

येक ताप आध्यात्मिक । दुजा तो आदिभूतिक ।
तिसरा आदिदैविक । ताप जाणावा ॥ ९ ॥
आध्यात्मिक तो कोण । कैसी त्याची वोळखण ।
आदिभूतिकाचें लक्षण । जाणिजे कैसें ॥ १० ॥
आदिदैविक तो कैसा । कवण तयाची दशा ।
हें हि विशद कळे ऐसा । विस्तार कीजे ॥ ११ ॥
हां जी ह्मणोनि वक्ता । जाला कथा विस्तारिता ।
आध्यात्मिक ताप आता । सावध ऐका ॥ १२ ॥
देह इंद्रिय आणी प्राण । याचेनि योगें आपण ।
सुखदुःखें सिणे जाण । या नाव आध्यात्मिक ॥ १३ ॥

---

१ जागा झाला. * ह्या श्लोकात छंदोभंगादि दोष दिसतात, पण मुळांत ते असे होते तसे च दिले अ हेत.

मराठी ग्रंथ संग्रह स्थळ प्रत

देहामधून जें आलें । इंद्रियें प्राणें दुःख जालें ।
तें आध्यात्मिक बोलिलें । तापत्रईं ॥ १४ ॥

देहामधून काये आलें । प्राणें कोण दुःख जालें ।
आता हें विशद केलें । पाहिजे कीं ॥ १५ ॥

खरुज खवडे पुळिया नारु । नखरुडें मांजऱ्या देवि गोवरु ।
देहामधील विकारु । या नांव आध्यात्मिक ॥ १६ ॥

काखमांजरी केशतोड । वोखटें वर्ण काळफोड ।
व्याधी मूळव्याधी माहाजंड[1] । या नाव आध्यात्मिक ॥ १७ ॥

अंगुळवेडे गालफुगी । कंड लागे जे वाउगी ।
हिरडी सुजे भेरे[2] बेलंगी[3] । या नाव आध्यात्मिक ॥ १८ ॥

वाउगे फोड उठती । कां ते सुजे आंगकांती ।
वात आणी तिडका लागती । या नाव आध्यात्मिक ॥ १९ ॥

नाइटे अर्दु गजकर्ण । पेंहांचें पोट विस्तीर्ण ।
बैसलें टाळें फुटती कर्ण । या नाव आध्यात्मिक ॥ २० ॥

कुष्ट आणी वोला कुष्ट । पंड्यारोग आतिश्रेष्ठ ।
क्षयरोगाचे कष्ट । या नाव आध्यात्मिक ॥ २१ ॥

वांटी वटकैं वायेगोळा । हातीं पाईं लागती कळा ।
भोवडी लागे वेळोवेळां । या नाव आध्यात्मिक ॥ २२ ॥

वोलांडा आणी वळ । पोटसुळाची तळमळ ।
आर्वेशिसी उठे कपाळ । या नाव आध्यात्मिक ॥ २३ ॥

दुःखे मांज आणि मान । पुष्टी ग्रीवा आणि वदन ।
अस्तिसांदे दुःखती जाण । या नाव आध्यात्मिक ॥ २४ ॥

---

१ दुःसह. २ ( दातांत ) भेरे ३ बाजरीच्या निंबुराचें कसपट. ४ पायहंसळी, हाड्यावर्ण ५ पोटफुगी ६ गुडघी रोग. ७ लहान मूल दूध प्याल्यावर त्या दुधाच्या गोळ्या बनून तें ओकतें त्याचें नांव. ८ कंबर.

कुळिक तरेळ कामिणी । मुरमा सुंठरें माळिणी ।
विदेसीं लागलें पाणी । या नाव आध्यात्मिक ॥ २५ ॥
जळसोस आणी हिवारें । गिरीविरी आणि अधारें ।
ज्वर पाचार्वं आणी शरें । या नाव आध्यात्मिक ॥ २६ ॥
शैत्य उष्ण आणी तृषा । क्षुधा निद्रा आणी दिशा ।
विषयतृष्णेची दुर्दशा । या नाव आध्यात्मिक ॥ २७ ॥
आळसी मूर्ख आणी अपेसी । भय उद्भवे मानसीं ।
विसराळु दुश्चित्त आहिर्निशीं । या नाव आध्यात्मिक ॥ २८ ॥
मूत्रकोड आणी परमें । रक्तपिती रक्तपरमें ।
खडांचढाचेनि श्रमे । या नाव आध्यात्मिक ॥ २९ ॥
मुरडा हागवण उन्हाळे । दिशा कोंडता आंदोळे ।
येक वेथा असोन न कळे । या नाव आध्यात्मिक ॥ ३० ॥
गाठी ढळली जाले जंत । पडे आव आणी रक्त ।
अन्न तैसें चि पडत । या नाव आध्यात्मिक ॥ ३१ ॥
पोटफुगी आणि तडस । भरला हिरें[10] लागला घांस ।
फोडी[11] लागता कासावीस । या नाव आध्यात्मिक ॥ ३२ ॥
उचकी लागली उसितें[12] गेला । पीत उसळलें उलाट जाला ।
खरे[13] पडसा आणी खोंकला । या नाव आध्यात्मिक ॥ ३३ ॥
उसळला दमा आणी धाप । पडजिभ ढाशि आणी कफ ।
मोवाज्वेर आणी सताप । या नांव आध्यात्मिक ॥ ३४ ॥
कोणी सेंदुर घातला । तेणें प्राणी निर्बुजला ।
घशामध्यें फोड जाला । या नाव आध्यात्मिक ॥ ३५ ॥

---

१ मोडशी. २ अजीर्णापासून होणारी हागओक ३ कावीळ. ४ पिवळ्या फडवात सात किंवा पाच जोंधळे बांधून फोडावरून उतरून रस्त्यांत टाकितात, ते ओलल्यापासून होणारी गळवें. ५ हिंवताप. ६ दृष्टि लागून दुखणें उलटणें. ७ शारे, शहा: ८ आमाश. ९ पोटांत विष्ठा खड्यासारखी होऊन होणारें दुःख. १० लचक. ११ हान फोड, १२ उसित जाणें = मानेंत घास अडकणें. १३ जीभकांटे. १४ [illegible]

गळसोध्या आणी जीभ झडे । सदा मुखीं दुर्गंधी पडे ।
दंतहीन लागती किडे । या नाव आध्यात्मिक ॥ ३६ ॥
जेरडी[1] घोलाणा गडमाळा । अवचिता स्वयें फुटे डोळा ।
आपण चि कापी अगुळा । या नाव आध्यात्मिक ॥ ३७ ॥
काळा तिडका लागती । कां ते दंत उन्मळती ।
अधर जिव्हा रगडती । या नाव आध्यात्मिक ॥ ३८ ॥
कर्णदुःख नेत्रदुःख । नानादु:खें घडे शोक ।
गर्भांध[4] आणी नपुश्यक । या नाव आध्यात्मिक ॥ ३९ ॥
फुलें वडस आणी पडळें[2] । कीड गेर्ता[3] रातांधळें ।
दुश्चित्त भ्रमिष्ट आणी खुळें । या नाव आध्यात्मिक ॥ ४० ॥
मुकें बधीर रेंखोंडें[5] । थोटें चळलें आणी वेडें ।
पांगुळ कुन्हें आणी पाँवडें[6] । या नाव आध्यात्मिक ॥ ४१ ॥
तौंरसें घुलें काणें केरें[9] । गोंरोळे[10] जामुंन[11] टांफेरें[12] ।
शडागुळें गेंगाणें विदरें[13] । या नाव आध्यात्मिक ॥ ४२ ॥
दांतिरें बोचिरें घानोळ[14] । घ्राणहीन श्रोत्रहीन बरळ ।
अति कृश अति स्थूळ । या नाव आध्यात्मिक ॥ ४३ ॥
तोंतरें बोंबडें निर्बळ । रोगी कुरूप कुटीळ ।
मत्सरी खादाड तपीळ । या नाव आध्यात्मिक ॥ ४४ ॥
संतापी अनुतापी मत्सरी । कामिक हेवा तिरस्कारी ।
पापी अवगुणी विकारी । या नाव आध्यात्मिक ॥ ४५ ॥
उठवणें ताठा करक । आवटळे आणी लचक ।
सुजी आणी चाळेकें[15] । या नाव आध्यात्मिक ॥ ४६ ॥

---

१ पानथरी २ मोतीबिंदु. ३ डोळे चांगले असून न दिसणें. ४ जन्मत च ओंठतुटके. ५ कुबडें ६ पांगळें ७ तारडोळें. ८ मान वाकडी करून पाहणें ९ तिरळें. १० घारडोळे ११ अति ठेंगणें. १२ ठेंचाळत चालणारें १३ कुरूप १४ लावनाक्या. १५ " चाळकबाऊ. " नावाचा पायाचे संधी धरतो तो रोग

सल[1] आडवें गर्भपात । स्तनगुते[2] सनपात[3] ।
संसारकोंडे[4] आपमृत्य । या नाव आध्यात्मिक ॥ ४७ ॥
नेखविख[5] आणी हिंगुडें[6] । बाष्टें आणी वावडें ।
उगीच दांतखिळ पडे । या नाव आध्यात्मिक ॥ ४८ ॥
झडती पातीं सुजती भवया । नेत्रीं होती राझणवडीया ।
चाळसी लागे प्राणियां । या नाव आध्यात्मिक ॥ ४९ ॥
वांगं तिळ सुरमे[9] लसें[10] । चामखिळ गलंडें मसें ।
चुकुर[11] होइजे मानसें । या नाव आध्यात्मिक ॥ ५० ॥
नाना फुग आणी आवाळें । आंगीं दुर्गंधी प्रबळे ।
चाईचांटी[12] लाळ गळे । या नाव आध्यात्मिक ॥ ५१ ॥
नाना चिंतेची काजळी । नाना दुःखें चित्त पोळी ।
व्याधीवाचून तळमळी । या नाव आध्यात्मिक ॥ ५२ ॥
वृद्धपणीच्या आपदा । नाना रोग होती सदा ।
देह क्षीण सर्वदा । या नाव आध्यात्मिक ॥ ५३ ॥
नाना व्याधी नाना दु·खें । नाना भोग नाना खांडकें ।
प्राणी तळमळी शोकें । या नाव आध्यात्मिक ॥ ५४ ॥
ऐसा आध्यात्मिक ताप । पूर्व पापाचा संताप ।
सांगतां सरेना अमूप । दु·खसागर ॥ ५५ ॥
बहुत काय बोलावें । श्रोतीं सकेतें जाणावें ।
पुढें बोलिजे स्वभावें । आदिभूतिक ॥ ५६ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे आध्यात्मिकतापनिरूपणनाम समास ॥६॥

---

१ वृद्धि न पावता पोटात राहिलेला गर्भ २ स्तनांत दुधाच्या गुठळ्या बनून होणाऱ्या वेदना ३ सन्निपात ४ संसारांतील अडचणी.(?) ५ नखाचें वीष ६ कुपथ्यापासून जखमेची गाठ बनते ती. ७ ओशट. ८ काळसर पुळ्या ९ शिबें, पांढरे चट्टे. १० लसरूं. ११ भ्रमिष्ट. १२ केंस गळून पडतात असा रोग.

॥ श्रीराम ॥

मागा जालें निरूपण । आध्यात्मिकाचें लक्षण ।
आतां आदिभूतिक तो कोण । सांगिजेल ॥ १ ॥

॥ श्लोक ॥ सर्वभूतेन संयोगात् सुख दुःखं च जायते ।
द्वितीयतापसंतापः सत्यं चैवाधिभौतिकः ॥ १ ॥

सर्व भूताचेनि संयोगें । सुख दुःख उपजों लागे ।
ताप होतां मन भंगे । या नाव आदिभूतिक ॥ २ ॥
तरी या आदिभूतिकाचें लक्षण । प्रांजळ करूं निरूपण ।
जेणें अनुभवास ये पूर्ण । वोळखी तापत्रयाची ॥ ३ ॥
ठेंचा लागती मोडती कांटे । विंधती[1] शस्त्राचे घांयटे[2] ।
सलें[3] सिलकों[4] आणी सरांटे । या नाव आदिभूतिक ॥ ४ ॥
अंग्यों[5] आणी कांचकुहिरी । आवचटा लागे शरीरीं ।
गांधील येऊन दंश करी । या नांव आदिभूतिक ॥ ५ ॥
मासी गोमासी मोहळमासी । मुंगी तेलमुंगी डांस दसी[6] ।
सोट जळु लागे यासी । आदिभूतिक बोलिजे ॥ ६ ॥
पिसा पिसोळे चांचण । कुसळें मुगळे ढेंकुण ।
विसीफ[7] भोंर्वर[8] गोंचिड जाण । या नाव आदिभूतिक ॥ ७ ॥
गोंवी विंचु आणी विखार । व्याघ्र लांडिगे आणी शूकर ।
गौसायळ[9] सामरं[10] । या नाव आदिभूतिक ॥ ८ ॥
रानगाई रानहैसे । रानशेंकर[11] आणी रीसे ।
रानहाती लेंवपिसें[12] । या नाव आदिभूतिक ॥ ९ ॥
सुसरीनें वोढून नेलें । कां तें आवचितें बुडाले ।
आथवा[13] खज्याळीं पडिलें । या नाव आदिभूतिक ॥ १० ॥

१ बाजती २ घाव, घायवटा = जखम ३ शरीरात धस शिरणें ४ चुया. ५ आग्या, अंगाची आग करणारी एक वनस्पती ६ दंशी ७ इसब ८ भुंगा. ९ सायळ पक्ष्याची जात. १० साबर. ११ एका जातीचें श्वापद १२ डांकिणीपासून लागणारें वेड. १३ " कां तें " होतें, तें खोडून समासांत " आथवा " लिहिलेलें आहे, तो स. शो

नाना विखारें आजगर । नाना मगरें जळचर ।
नाना वनचरें अपार । या नाव आदिभूतिक ॥ ११ ॥
अश्व वृषभ आणी खर । स्वान शूकर जबुक मार्जर ।
ऐसीं बहुविध क्रूर । या नाव आदिभूतिक ॥ १२ ॥
ऐसीं कर्कशें भयानकें । बहुविध दुःखदायकें ।
दुःखें दारुणें अनेकें । या नाव आदिभूतिक ॥ १३ ॥
भिंती माळवदें पडती । कडे भुयेरीं कोंसळती ।
वृक्ष आगावरी मोडती । या नाव आदिभूतिक ॥ १४ ॥
कोणी येकाचा श्राप जडे । कोणी येकें केले चेडे ।
आधांतरीं होती वेडे । या नाव आदिभूतिक ॥ १५ ॥
कोणी येकें चाळविलें । कोणी येकें भ्रष्टविलें ।
कोणी येकें धरून नेलें । या नाव आदिभूतिक ॥ १६ ॥
कोणी येकें दिलें वीष । कोणी येकें लाविले दोष ।
कोणी येकें घातले पाश । या नाव आदिभूतिक ॥ १७ ॥
अवचिता सेर लागला । नेणो बिबवा चिडला ।
प्राणी धुरें जाजावला । या नाव आदिभूतिक ॥ १८ ॥
इंगळावरी पाय पडे । शिळेखालें हात सांपडे ।
धावतां आडखुळे पडे । या नाव आदिभूतिक ॥ १९ ॥
वापी कूप सगेवर । गर्ता[1] कडा नदीतीर ।
आवचितें पडे शरीर । या नाव आदिभूतिक ॥ २० ॥
दुर्गाखालें कोंसळती । झाडावरून पडती ।
तेणें दुःखें आक्रंदती । या नाव आदिभूतिक ॥ २१ ॥
सीतें वोठ तरकती । हात पाव टांका फुटती ।
चिखल्या[2] जिव्हाळ्या लागती । या नाव आदिभूतिक ॥ २२ ॥

---

१ खाडा. २ हाताच्या किंवा पायाच्या बोटामधील जागा सतत पाणी लागल्यामुळें सडून पांढरी होते, त्याला चिखली म्हणतात.

अशनपानाचिये वेळे । उष्ण रसें जिव्हा पोळे ।
दांत करकरे[1] आणि हेरळे[2] । या नाव आदिभूतिक ॥ २३ ॥
पराधेन बाळपणीं । कुशब्दमारजाचणी ।
अन्नवस्त्रेंवीण आळणी । या नाव आदिभूतिक ॥ २४ ॥
सासुरवास गालोरे[3] । ठुणके[4] डासणें[5] चिमोरे[6] ।
आलें रुदन न धरे । या नाव आदिभूतिक ॥ २५ ॥
चुकतां कान पिळिती । कां तो डोळा हिंग घालिती ।
सर्वकाळ धारकीं धरिती । या नाव आदिभूतिक ॥ २६
नाना प्रकारीचे मार । दुर्जन मारिती अपार ।
दुरी अंतरे माहेर । या नाव आदिभूतिक ॥ २७ ॥
कर्ण नासिक विंधिलें । बळें चि धरून गोंधिलें ।
खोडी जालियां पोळविलें । या नाव आदिभूतिक ॥ २८ ॥
परचक्रीं धरून नेलें । नीच यातीस दिधलें ।
दुर्दशा होऊन मेलें । या नाव आदिभूतिक ॥ २९ ॥
नाना रोग उद्भवले । जे आध्यात्मिकीं बोलिले ।
वैद्य पंचाक्षरी आणिले । या नाव आदिभूतिक ॥ ३० ॥
नाना वेथेचें निर्शन । व्हावया औषध दारुण ।
बळात्कारें देती जाण । या नाव आदिभूतिक ॥ ३१ ॥
नाना वल्लीचे रस । काडे गर्गोड कर्कश ।
घेता होये कासावीस । या नाव आदिभूतिक ॥ ३२ ॥
ढाळ आणी उंखाळ देती[7] । पथ्य कठीण सांगती ।
अनुपान चुकतां विपत्ती । या नाव आदिभूतिक ॥ ३३ [redacted]
फाड रक्त फांसणी[8] । गुल्हडागोंची[9] जाचणी ।
तेणें दु:खें दु खवे प्राणी । या नाव आदिभूतिक ॥ ३४ ॥

---

१ करकरे. २ फटी पडणें ३ गालगुच्चे. ४ ठोसे. ५ डागणें. ६ चिमटे. ७ वांतीचें औषध ८ वस्तऱ्यानें किंवा एकाद्या शस्त्रानें बेंडावर किंवा गांठीवर चिरा पाडणें. ९ चोचे.

रुचिकें बिबवे घालिती । नाना दुःखें दडपे देती ।
सिरा तोडिती जळों लाविती । या नाव आदिभूतिक ॥ ३५ ॥
बहु रोग बहु औषधें । सागतां अपारें अगाधें ।
प्राणी दुखवे तेणें खेदें । या नाव आदिभूतिक ॥ ३६ ॥
बोलाविला पचाक्षरी । धूरमार पीडा करी ।
नाना यातना चतुरीं । आदिभूतिक जाणिजे ॥ ३७ ॥
दरवडे घालूनियां जना । तस्कर करिती यातना ।
तेणें दुःख होये मना । या नाव आदिभूतिक ॥ ३८ ॥
अग्नीचेनि ज्वाळें पोळे । तेणें दुःखें प्राणी हरबळे ।
हानी जालियां विवळे । या नाव आदिभूतिक ॥ ३९ ॥
नाना मदिरें सुदरें । नाना रत्नांचीं भांडारें ।
दिव्यांबरें मनोहरें । दग्ध होती ॥ ४० ॥
नाना धान्यें नाना पदार्थ । नाना पशु नाना स्वार्थ ।
नाना पात्रें नाना अर्थ । मनुष्यें भस्म होती ॥ ४१ ॥
आग्न लागला सेती । धान्यें बणव्यों आणी खडकुती ।
युंक्षदड जळोन जाती । आकस्मात ॥ ४२ ॥
ऐसा आग्न लागला । अथवा कोणीं लाविला ।
हानी जाली का पोळला । या नाव आदिभूतिक ॥ ४३ ॥
ऐसे सांगता बहुत । होती वन्हीचे आघात ।
तेणें दुःखें दुःखवे चित्त । या नाव आदिभूतिक ॥ ४४ ॥
हारपे विसरे आणी सांडे । नाले गाहाळे फुटे पडे ।
असाध्य होये कोणीकडे । या नाव आदिभूतिक ॥ ४५ ॥

---

१ रुईचा चीक. २ जळवा ३ तळमळे या चरणाऐवजी प्रथम "तेणें दुःखें आंदोळे" असा चरण होता, तो खोडून प्रस्तुतचा चरण घातला आहे, तो स. शो. ४ विव्हल होणे. ५ हा कर्नाटकी शब्द आहे बंगव्या = गवताच्या गंजी. कणसातील दाणे काढल्यावर जें भुसकट राहतें त्यास खानदेशांत "बणग्या" म्हणतात. ६ हा शब्द वऱ्हाडांत प्रचलित आहे. खडकूत = धान्य मळून नेल्यावर शेतांत उरलेलें कुटार. ७ इक्षुदंड, ऊंस

प्राणी स्थानभ्रष्ट जालें । नाना पशूतें चुकलें ।
कन्यापुत्र गव्हाळले । या नाव आदिभूतिक ॥ ४६ ॥
तश्कर अथवा दावेदार । आवचिता करिती संव्हार ।
लुटिती घरें नेती खिल्लार । या नाव आदिभूतिक ॥ ४७ ॥
नाना धान्यें केळी कापिती । पानमळां मीठ घालिती ।
ऐसे नाना आघात करिती । या नाव आदिभूतिक ॥ ४८ ॥
मैंद[1] उचले[2] खाणोरी[3] । सुवर्णपंथी[4] भुरेकरी ।
ठकु सितरु वरपेकरी । वरपा[5] घालिती ॥ ४९ ॥
गंठीछोडे[6] द्रव्य सोडिती । नाना आळंकार काढिती ।
नाना वस्तु मूषक नेती । या नाव आदिभूतिक ॥ ५० ॥
वीज पडे हिंव पडे । प्राणी प्रजंनीं सांपडे ।
कां तो माहापुरीं बुडे । या नाव आदिभूतिक ॥ ५१ ॥
भोवरे वळणें आणी धार । वोसाणें[7] लाटा अपार ।
वृश्चिक गोंबी आजगर । वाहोन जाती ॥ ५२ ॥
तयामधें प्राणी सापडला । खडकीं वेटीं आडकला ।
बुडत बुडत वांचला । या नाव आदिभूतिक ॥ ५३ ॥
मनासारिखा नसे ससार । कुरूप कर्कश स्त्री क्रूर ।
विधवा कन्या मूर्ख पुत्र । या नाव आदिभूतिक ॥ ५४ ॥
भूत पिशाच्य लागलें । आंगावरून वारें गेलें ।
अर्वद्ध मत्रें प्राणी चळलें[8] । या नाव आदिभूतिक ॥ ५५ ॥
ब्राह्मणसमंध शरीरीं । बहुसाल पीडा करी ।
शनेश्वराचा धोका धरी । या नाव आदिभूतिक ॥ ५६ ॥
नाना ग्रहे काळवार । काळतिथी घातचद्र ।
काळवेळ घातनक्षत्र । या नाव आदिभूतिक ॥ ५७ ॥

---

१ फासेगार २ काळीजखाऊ ३ किमयागार. ४ भुरळ पाडणारे. ५ लुटारु. ६ भामटे, ग्रंथिभेदक ७ पुरामधील लांकडें, केरकचरा वगैरे. ८ पिशाच्यादि साधनाचा मंत्र चुकून वेडे झाले.

सिंकं[1] पिंगळा[2] आणी पाली । वोखटें होलों[3] काक कलोली[4] ।
चिंता काजळी लागली । या नाव आदिभूतिक ॥ ५८ ॥
दिवटा सरवदा[4] भाकूनं[5] गेला । अतरीं धोका लागला ।
दुःस्वप्नें जाजावला । या नाव आदिभूतिक ॥ ५९ ॥
भालु[6] भुंके स्वान रडे । पाली अंगावरी पडे ।
नाना चिन्हें चिंता पवाडे । या नाव आदिभूतिक ॥ ६० ॥
बाहेरी निघतां अपशकुन । नाना प्रकारें विछिन्न ।
तेणें गुणें भंगे मन । या नाव आदिभूतिक ॥ ६१ ॥
प्राणी बंदीं सापडला । यातने वरपडा[7] जाला ।
नाना दुःखें दुःखवला । या नाव आदिभूतिक ॥ ६२ ॥
प्राणी राजदंड पावत । जेरबंद चाबुक वेत ।
दरेमार[8] तळवेमार[9] होत । या नाव आदिभूतिक ॥ ६३ ॥
कोरडे पारब्या फोक । बहु प्रकारें अनेक ।
बहु ताडिती आदिभूतिक । या नाव बोलिजे ॥ ६४ ॥
मोघरीमार[10] बुधलेमार[11] । चौखरूनं[12] डगारणेमार[13] ।
बुक्या गचाड्या गुडघेमार । या नाव आदिभूतिक ॥ ६५ ॥
लाता तपराखा सेणमार । कानखडे दगडमार ।
नाना प्रकारींचे मार । या नाव आदिभूतिक ॥ ६६ ॥
टांगणें टिपऱ्या[14] पिछोडे[15] । बेडी बुधनाल[16] कोलदंडे ।
रक्षणनिग्रह[17] चहूकडे । या नाव आदिभूतिक ॥ ६७ ॥
नाकवणी[18] चुनवणी । मीठवणी रायवणी[19] ।
गुळवण्याची जाचणी । या नाव आदिभूतिक ॥ ६८ ॥

---

१ शिंक. २ एक पक्षी ३ खुडबुड जोशी ४ सरोदा, भविष्य सांगणारा ५ भविष्य सांगून. ६ कोल्ही ७ आश्रयभूत, पात्र ८ दरींत लोटून देऊन मारणें ९ तापल्या तव्यावर उभे करून मारणें १० अपानद्वारीं मेख ठोकून मारणें. ११ दारू भरलेल्या बुधल्याशीं बांधून त्या दारूस आग लावून मारणें. १२ चारी बाजूंस ताणून. १३ बडगेमार १४ चाप. १५ मागले बाजूस हात वळवून बांधणें. १६ झाडाच्या बुंधाशीं नालाकृती करून बांधून मारणें. १७ पहारा ठेवून बंदी करणें १८ नाकांत ओतावयाचे तीक्ष्ण पदार्थ. १९ मोहऱ्यांचें पाणी.

जळामध्यें बुचकुळिती । हस्तीपुढें बाधोन टाकिती ।
हाकिती छळिती यातायाती । या नाव आदिभूतिक ॥ ६९ ॥
कर्णछेद घ्राणछेद । हस्तछेद पादछेद ।
जिव्हाछेद अधरछेद । या नाव आदिभूतिक ॥ ७० ॥
तीरमार सुळीं देती । नेत्र वृषण काढिती ।
नखोनखीं सुया मारिती । या नाव आदिभूतिक ॥ ७१ ॥
पारड्यांमध्यें घालणें । का कडेलोट करणें ।
का भांड्यामुखें उडवणें । या नाव आदिभूतिक ॥ ७२ ॥
कानीं खुट्या आदाळिती । अपानीं मेखा मारिती ।
खौल काढून टाकिती । या नाव आदिभूतिक ॥ ७३ ॥
भोत आणी बोटेंबोटी । अथवा गळ घालणें कंठीं ।
सांडस लाऊन आटाटी । या नाव आदिभूतिक ॥ ७४ ॥
सिसें पाजणें वीष देणें । अथवा सिरछेद करणें ।
कां पायातळीं घालणें । या नाव आदिभूतिक ॥ ७५ ॥
सरंड माजेरें भरिती । अथवा फांसीं नेऊन देती ।
नानापरी पीडा करिती । या नाव आदिभूतिक ॥ ७६ ॥
स्वानप्रळये व्याघ्रप्रळये । भूतप्रळय सुसरीप्रळये ।
शस्त्रप्रळये विझप्रळये । या नाव आदिभूतिक ॥ ७७ ॥
सीरा वोढून घेती । टेंभे लाऊन भाजिती ।
ऐशा नाना विपत्ती । या नाव आदिभूतिक ॥ ७८ ॥
मनुष्यहानी वित्तहानी । वैभवहानी महत्वहानी ।
पशुहानी पदार्थहानी । या नाव आदिभूतिक ॥ ७९ ॥

---

१ प्रतिदिवशीं वजन करून कमी भरत आईल असे हाल करणें. २ तोफेच्या तोंडीं ३ आगाचें कातडें. ४ नखशिखात आगाचें कातडें काढणें ( हंसकोश ). ५ टोचून मारणें. ६ ज्याला शिक्षा करावयाची त्याला विजार नेसवून त्या विजारींत सरडा सोडून विजार सर्व बाजूंनी बंद करतात, याचें नाव सरड भरणें. ७ क्षुब्ध माजराला व मनुष्याला एका खोलींत घालून त्या माजराकडून मनुष्य मारविणें.

बाळपणीं मरे माता । तारुण्यपणीं मरे काता ।
वृद्धपणीं मृत्य सुता । या नाव आदिभूतिक ॥ ८० ॥
दुःख दारिद्र आणी रुण । विदेशपळणी नागवण ।
आपदा अनुंपत्ति कदान्न । या नाव आदिभूतिक ॥ ८१ ॥
आकांत वाखाप्रळये । युध्य होता पराजये ।
जिवलगांचा होये क्षये । या नाव आदिभूतिक ॥ ८२ ॥
कठीण काळ आणी दुष्काळ । साशक आणी वोखटी वेळ ।
उद्वेग चिंतेचे हळाळे । या नाव आदिभूतिक ॥ ८३ ॥
घाणा चरखीं सिरकला । चाकाखालें सापडला ।
नाना वन्हींत पडिला । या नाव आदिभूतिक ॥ ८४ ॥
नाना शस्त्रें भेदिला । नाना स्वापदीं भक्षिला ।
नाना बंदीं पडिला । या नाव आदिभूतिक ॥ ८५ ॥
नाना कुवासें निर्बुजे । नाना अपमानें लाजे ।
नाना शोकें प्राणी झिजे । या नाव आदिभूतिक ॥ ८६ ॥
ऐसें सांगतां अपार । आहेत दुःखाचे डोंगर ।
श्रोतीं जाणावा विचार । आदिभूतिकाचा ॥ ८७ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे आदिभूतिकतापनिरूपणनाम समास ॥७॥

---

॥ श्रीराम ॥

मागां बोलिला आध्यात्मिक । त्याउपरी आदिभूतिक ।
आतां बोलिजेल आदिदैविक । तो सावध ऐका ॥ १ ॥

॥ श्लोक ॥ शुभाशुभेन कर्मणा देहांते यमयातना ।
स्वर्गनरकादि भोक्तव्यमिदं चैवाधिदैविक ॥ १ ॥

शुभाशुभ कर्मानें जना । देहांतीं येमयातना ।
स्वर्ग नर्क भोग नाना । या नाव आदिदैविक ॥ २ ॥

---

१ अनुपपत्ति, विपत्ति. २ हालाहल विष कीं हळहळ ?

नाना दोष नाना पातकें । मदांधपणें अविवेकें ।
केलीं परी तें दुःखदायकें । येमयातना भोगविती ॥ ३ ॥
आगबळें द्रव्यबळें । मनुष्यबळें राजबळें ।
नाना सामर्थ्याचेनि बळें । अकृत्य करिती ॥ ४ ॥
नीती सांडूनियां तत्वता । करूं नये तें चि करितां ।
येमयातना भोगिता । जीव जाये ॥ ५ ॥
डोळे झांकून स्वार्थबुद्धी । नाना अभिळाश कुबुद्धी ।
वृत्ति भूमिसिमा सांधी । द्रव्य दारा पदार्थ ॥ ६ ॥
मातलेपणें उन्मत्त । जीवघात कुटुंबघात ।
अप्रमाण क्रिया करीत । ह्मणौन येमयातना ॥ ७ ॥
मर्यादा सांडूनि चालती । ग्रामा दंडी ग्रामाधिपती ।
देशा दडी देशाधिपती । नीतिन्याय सांडितां ॥ ८ ॥
देशाधिपतीस दडिता रावो । रायास दंडिता देवो ।
राजा न करितां नीतिन्यावो । ह्मणौन येमयातना ॥ ९ ॥
अनीतीनें स्वार्थ पाहे । राजा पापी होऊन राहे ।
राज्या अतीं नर्क आहे । ह्मणौनियां ॥ १० ॥
राजा साडितां राजनीति । तयास येम गांजिती ।
येम नीति साडितां धावती । देवगण ॥ ११ ॥
ऐसी मर्यादा लाविली देवें । ह्मणौनि नीतीनें वर्तावें ।
नीति न्याय साडितां भोगावें । येमयातनेसी ॥ १२ ॥
देवें प्रेरिले येम । ह्मणौनि आदिदैविक नाम ।
तृतीय ताप दुर्गम । येमयातनेचा ॥ १३ ॥
येमदंड येमयातना । शास्त्रीं बोलिले प्रकार नाना ।
तो भोग कदापि चुकेना । या नाव आदिदैविक ॥ १४ ॥
येमयातनेचे खेद । शास्त्रीं बोलिले विशद ।
शेरीरी घाहून अप्रमाद । नाना प्रकारें ॥ १५ ॥

पापपुण्याचीं शरीरें । स्वर्गीं असती कळीवरें ।
त्यांत घालून नाना प्रकारें । पापपुण्य भोगविती ॥ १६ ॥
नाना पुण्यें नाना विळास । नाना दोषें यातना कर्कश ।
शास्त्रीं बोलिलें अविश्वास । मानू च नये ॥ १७ ॥
वेदाज्ञेनें न चालती । हरिभक्ती न करिती ।
त्यास येमयातना करिती । या नाव आदिदैविक ॥ १८ ॥
अक्षोभ नर्कीं उदंड जीव । कुनाट-किडे करिती रवरव ।
बाधोन टाकिती हातपाव । या नाव आदिदैविक ॥ १९ ॥
उदंड पैस लाहान मुख । कुंभाकार कुंड येक ।
दुर्गंधी उकाडा कुंभपाक । या नाव आदिदैविक ॥ २० ॥
तप्त भूमिका ताविती । जळत स्थंभ पोटाळविती ।
नाना साडसे लाविती । या नाव आदिदैविक ॥ २१ ॥
येमदंडाचे उदंड मार । यातनेची सामग्री अपार ।
भोग भोगिती पापी नर । या नाव आदिदैविक ॥ २२ ॥
पृथ्वीमध्यें मार नाना । त्याहून कठीण येमयातना ।
मारिता उसंतं चि असेना । या नाव आदिदैविक ॥ २३ ॥
चौघे चौंकडे वोढिती । येक ते झोंकून पाडिती ।
ताणिती मारिती वोढूनि नेती । या नाव आदिदैविक ॥ २४ ॥
उठवेना बैसवेना । रडवेना पडवेना ।
यातनेवरी यातना । या नाव आदिदैविक ॥ २५ ॥
आक्रंद रडे आणी फुंजे । धकाधकीनें निबुंजे ।
झुर्झुरों पजर होऊन झिजे । या नाव आदिदैविक ॥ २६ ॥
कर्कश वचनें कर्कश मार । यातनेचे नाना प्रकार ।
त्रास पावती दोषी नर । या नाव आदिदैविक ॥ २७ ॥

---

१ लिंगदेह स्वर्गीं गेल्यावर त्याला स्थूल देहांत घालून पापपुण्यानुसार दुःख सुख भोगवितात. २ देह. ३ अक्षोभ नांवाचा एक नरक आहे. ४ एका नरकाचें नांव. ५ चिमटा. ६ विसांवा, थारा.

मागां बोलिला राजदंड । त्याहून येमदंड उदंड ।
तेथील यातना प्रचंड । भीमरूप दारुण ॥ २८ ॥
आध्यात्मिक आदिभूतिक । त्याहूनि विशेष आदिदैविक ।
अल्प संकेतें कांहींयेक । कळावया बोलिलें ॥ २९ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे आदिदैविकतापनाम समास आठ ॥८॥

---

॥ श्रीराम ॥

संसार ह्मणिजे सवेंच स्वार । नाहीं मरणास उधार ।
मापीं लागलें शरीर । घडीनें घडी ॥ १ ॥
नित्य काळाची संगती । न कळे होणाराची गती ।
कर्मासारिखे प्राणी पडती । नाना देसीं विदेसीं ॥ २ ॥
सरतां संचिताचें शेष । नाहीं क्षणाचा अवकाश ।
भरतां न भरतां निमिष्य । जाणें लागे ॥ ३ ॥
अवचितें काळाचे ह्मणियारे । मारित सुटती येकसरें ।
नेऊन घालिती पुढारे । मृत्यपंथें ॥ ४ ॥
होतां मृत्याची आटाटी । कोणी घालू न सकती पाठीं ।
सर्वत्रांस कुटाकुटी । मागें पुढें होतसे ॥ ५ ॥
मृत्यकाळ काठी निकी । बैसे बळियाचे मस्तकीं ।
माहाराजे बळिये लोकीं । राहों न सकती ॥ ६ ॥
मृत्य न म्हणे किं हा क्रूर । मृत्य न म्हणे हा जुंझार ।
मृत्य न म्हणे संग्रामशूर । समरंगणीं ॥ ७ ॥
मृत्य न म्हणे किं हा कोपी । मृत्य न म्हणे हा प्रतापी ।
मृत्य न म्हणे उग्ररूपी । माहांखळ ॥ ८ ॥
मृत्य न म्हणे बळाढ्य । मृत्य न म्हणे धनाढ्य ।
मृत्य न ह्मणे आढ्य । सर्वगुणें ॥ ९ ॥

---

१ मृत्यु पावताल. २ सेवक, दूत. ३ पुढारां, पुढें. ४ संपन्न, युक्त.

मृत्य न ह्मणे हा विख्यात । मृत्य न ह्मणे हा श्रीमत ।
मृत्य न ह्मणे हा अद्भुत । पराक्रमी ॥ १० ॥
मृत्य न ह्मणे हा भूपती । मृत्य न ह्मणे हा चक्रवती ।
मृत्य न ह्मणे हा करामती । कैवाड[१] जाणे ॥ ११ ॥
मृत्य न ह्मणे हयपती । मृत्य न ह्मणे गजपती ।
मृत्य न ह्मणे नरपती । विख्यात राजा ॥ १२ ॥
मृत्य न ह्मणे वरिष्ठ जनीं । मृत्य न ह्मणे राजकारणी ।
मृत्य न ह्मणे वेतनी । वेतनधर्ता ॥ १३ ॥
मृत्य न ह्मणे देसाई । मृत्य न ह्मणे वेव्हसाई ।
मृत्य न म्हणे ठाईं ठाईं । पुंडराजे ॥ १४ ॥
मृत्य न ह्मणे मुद्राधारी । मृत्य न ह्मणे व्यापारी ।
मृत्य न ह्मणे परनारी । राजकन्या ॥ १५ ॥
मृत्य न म्हणे कार्याकारण । मृत्य न म्हणे वर्णावर्ण ।
मृत्य न ह्मणे हा ब्राह्मण । कर्मनिष्ट ॥ १६ ॥
मृत्य न ह्मणे वित्पन्न । मृत्य न म्हणे संपन्न ।
मृत्य न म्हणे विद्वज्जन । समुदाई ॥ १७ ॥
मृत्य न म्हणे हा धूर्त । मृत्य न म्हणे बहुश्रुत ।
मृत्य न म्हणे हा पंडित । माहाभला ॥ १८ ॥
मृत्य न म्हणे पुराणिक । मृत्य न म्हणे हा वैदिक ।
मृत्य न म्हणे हा याज्ञिक । अथवा जोसी ॥ १९ ॥
मृत्य न म्हणे अग्नहोत्री । मृत्य न म्हणे हा श्रोत्री ।
मृत्य न म्हणे मन्त्रयन्त्री[२] । पूर्णागमी ॥ २० ॥
मृत्य न म्हणे शास्त्रज्ञ । मृत्य न म्हणे वेदज्ञ ।
मृत्य न म्हणे सर्वज्ञ । सर्व जाणे ॥ २१ ॥
मृत्य न म्हणे ब्रह्मत्या[३] । मृत्य न म्हणे गोहत्या ।
मृत्य न म्हणे नाना हत्या । स्त्रीबाळकादिक ॥ २२ ॥

---

१ नाना प्रकारच्या युक्ति, योजना २ शास्त्रसंपन्न ३ मागील २-३-२५ व २-६-१२ पहा.

मृत्य न म्हणे रागज्ञानी । मृत्य न म्हणे ताळज्ञानी ।
मृत्य न म्हणे तत्वज्ञानी । तत्ववेत्तां ॥ २३ ॥
मृत्य न म्हणे योगाभ्यासी । मृत्य न म्हणे संन्यासी ।
मृत्य न म्हणे काळासी । वंचू जाणे ॥ २४ ॥
मृत्य न म्हणे हा सावध । मृत्य न म्हणे हा सिद्ध ।
मृत्य न म्हणे वैद्य प्रसिद्ध । पंचाक्षरी ॥ २५ ॥
मृत्य न म्हणे हा गोसावी । मृत्य न म्हणे हा तपस्वी ।
मृत्य न म्हणे हा मनस्वी । उदासीन ॥ २६ ॥
मृत्य न म्हणे ऋषेश्वर । मृत्य न म्हणे कवेश्वर ।
मृत्य न म्हणे दिगंबर । समाधिस्थ ॥ २७ ॥
मृत्य न म्हणे हटयोगी । मृत्य न म्हणे राजयोगी ।
मृत्य न म्हणे वीतरागी । निरंतर ॥ २८ ॥
मृत्य न म्हणे ब्रह्मच्यारी । मृत्य न म्हणे जटाधारी ।
मृत्य न म्हणे निराहारी । योगेश्वर ॥ २९ ॥
मृत्य न म्हणे हा संत । मृत्य न म्हणे हा महंत ।
मृत्य न म्हणे हा गुप्त । होत असे ॥ ३० ॥
मृत्य न म्हणे स्वाधेन । मृत्य न म्हणे पराधेन ।
सकळ जीवांस प्राशन । मृत्य चि करी ॥ ३१ ॥
येक मृत्यमार्गीं लागले । येकीं आर्ध पंथ क्रमिले ।
येक ते सेवटास गेले । वृद्धपणीं ॥ ३२ ॥
मृत्य न म्हणे बाळ तारुण्य । मृत्य न म्हणे सुलक्षण ।
मृत्य न म्हणे विचक्षण । बहु बोलिका ॥ ३३ ॥
मृत्य न म्हणे हा आधारु । मृत्य न म्हणे उदारु ।
मृत्य न म्हणे हा सुंदर । चतुरांग जाणे ॥ ३४ ॥

---

१ तेविसावी ओंवी समासात मागाहून लिहिलेली आहे. २ काळाला देखील जे फसवितात म्हणजे योगाभ्यासानें जे मरण लांबणीवर टाकूं शकतात असे लोक. ३ मन स्वाधीन ठेवणारा.

मृत्य न म्हणे पुण्य पुरुष । मृत्य न म्हणे हरिदास ।
मृत्य न म्हणे विशेष । सुकृती नर ॥ ३५ ॥
आतां असो हें बोलणें । मृत्यापासून सुटिजे कोणें ।
मागें पुढें विश्वास जाणें । मृत्यपथें ॥ ३६ ॥
च्यारी खाणी च्यारी वाणी । चौऱ्यासी लक्ष जीवयोनी ।
जन्मा आले तितुके प्राणी । मृत्य पावती ॥ ३७ ॥
मृत्याभेणें पळों जातां । तरी मृत्य सोडिना सर्वथा ।
मृत्यास न ये चुकवितां । कांहीं केल्या ॥ ३८ ॥
मृत्य न म्हणे हा स्वदेसी । मृत्य न म्हणे हा विदेसी ।
मृत्य न म्हणे हा उपवासी । निरंतर ॥ ३९ ॥
मृत्य न म्हणे थोर थोर । मृत्य न म्हणे हरिहर ।
मृत्य न म्हणे अवतार । भगवंताचे ॥ ४० ॥
श्रोतीं कोप न करावा । हा मृत्यलोक सकळांसु ठावा ।
उपजला प्राणी जाईल बरवा । मृत्यपथें ॥ ४१ ॥
येथें न मनावा कित । हा मृत्यलोक विख्यात ।
प्रगट जाणती समस्त । लाहान थोर ॥ ४२ ॥
तथापी कित मानिजेल । तरी हा मृत्यलोक नव्हेल ।
याकारणें नासेल । उपजला प्राणी ॥ ४३ ॥
ऐसें जाणोनिया जीवें । याचें सार्थक चि करावें ।
जनीं मरोन उरवावें । कीर्तिरूपें ॥ ४४ ॥
येरवीं प्राणी लाहान थोर । मृत्य पावती हा निर्धार ।
बोलिलें हें अन्यथा उत्तर । मानूं चि नये ॥ ४५ ॥
गेले बहुत वैभवाचे । गेले बहुत आयुष्याचे ।
गेले अगाध महिमेचे । मृत्यपंथें ॥ ४६ ॥

---

१ जरायुज, अंडज, स्वेदज व उद्भिज्ज. २ परा, पश्यंती, मध्यमा व वैखरी. ३ आपण संशय घेतला तरी हा जो मृत्युलोक आहे, तो तसा नाहीं असें थोडें च होणार आहे ?

गेले बहुत पराक्रमी । गेले बहुत कपटकर्मी ।
गेले बहुत संग्रामी । सग्रांमसौरे[१] ॥ ४७ ॥
गेले बहुतां बळाचे । गेले बहुतां काळाचे ।
गेले बहुतां कुळाचे । कुळवंत राजे ॥ ४८ ॥
गेले बहुतांचे पाळक । गेले बुद्धीचे चाळक ।
गेले युक्तीचे तार्किक । तर्कवादी ॥ ४९ ॥
गेले विद्येचे[२] सागर । गेले बळाचे डोंगर ।
गेले धनाचे कुबेर । मृत्यपंथें ॥ ५० ॥
गेले बहुत पुरुषार्थाचे । गेले बहुत विक्रमाचे ।
गेले बहुत आटोपाचे । कार्यकर्ते ॥ ५१ ॥
गेले बहुत शस्त्रधारी । गेले बहुत परोपकारी ।
गेले बहुत नानापरी । धर्मरक्षक ॥ ५२ ॥
गेले बहुत प्रतापाचे । गेले बहुत सत्कीर्तीचे ।
गेले बहुत नीतीचे । नीतिवंत राजे ॥ ५३ ॥
गेले बहुत मतवादी । गेले बहुत कार्यवादी ।
गेले बहुत वेवादी । बहुता परींचे ॥ ५४ ॥
गेलीं पंडिताचीं थाटें । गेलीं शब्दांचीं कचाटें[३] ।
गेलीं वादकें अचाटें । नाना मतें ॥ ५५ ॥
गेले तापसाचे भार । गेले सन्यासी अपार ।
गेले विचारकर्ते सार । मृत्यपथें ॥ ५६ ॥
गेले बहुत ससारी । गेले बहुत वेषधारी ।
गेले बहुत नानापरी । नाना छंद करूनी ॥ ५७ ॥
गेले ब्राह्मणसमुदाये । गेले बहुत आच्यार्य ।
गेले बहुत सांगों काये । किती ह्मणौनि ॥ ५८ ॥

---

१ संग्रामशूर ( सौरा=शूर ). २ मुळांत " विद्यचे " आहे. ३ खटपट ( शब्दांची खटपट करणारे, वैय्याकरणी ).

असो ऐसे सकळ हि गेले । परतु येक चि राहिले ।
जे स्वरूपाकार जाले । आत्मज्ञानी ॥ ५९ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे मृत्यनिरूपण समास नवम ॥ ९ ॥

---

॥ श्रीराम ॥

संसार म्हणिजे माहापूर । माजीं जळचरें अपार ।
डरवूं धावती विखारें[1] । काळसर्प ॥ १ ॥
आशा ममता देहीं बेडी । सुसरी करिताती तडातोडी ।
नेऊन दुःखाचे सांकडीं[2] । माजीं घालिती ॥ २ ॥
अहंकारनक्रें उडविलें । नेऊन पाताळीं बुडविलें ।
तेथुनियां सोडविलें । नवचे प्राणी ॥ ३ ॥
काममगरमिठी सुटेना । तिरस्कार लागला तुटेना ।
मद मत्सर वोहटेना । भूलि पडिली ॥ ४ ॥
वासनाधामिणी पडिली गळां । घालून वेंटाळें बमी गरळा ।
जिव्हा लाळी वेळोवेळां । भयानक ॥ ५ ॥
माथा प्रपंचाचें वोझें । घेऊन म्हणे माझें माझें ।
बुडतां हि न सोडी फुजे[3] । कुळाभिमानें ॥ ६ ॥
पडिलें भ्रांतीचें अधारें । नागविलें अभिमानचोरें ।
आलें अहंतेचें काविरें । भूतबाधा ॥ ७ ॥
बहुतेक आवर्तीं[4] पडिले । प्राणी वाहात चि गेले ।
जेंहिं भगवतासी बोभाइलें[5] । भावार्थबळें ॥ ८ ॥
देव आपण घालूनि उडी । तयांसी नेलें पैलथडी ।
येर तें अभाविकें बापुडीं । वाहात चि गेलीं ॥ ९ ॥
भगवंत भावाचा भुकेला । भावार्थ देखोन भुलला ।
संकटीं पावे भाविकाला । रक्षितसे ॥ १० ॥

---

१ विषारी सर्प. २ संकट. ३ अभिमानानें फुगतो ४ भोंवऱ्यांत ५ मोठ्यान हाक मारली, धांवा केला.

जयास भगवंत आवडे । तयाचें देवासीं साकडें ।
संसारदुःख सकळ उडे । निज दासाचें ॥ ११ ॥
जे अंकित ईश्वराचे । तयास सोहळे निजसुखाचे ।
धन्य ते चि दैवाचे । भाविक जन ॥ १२ ॥
जैसा भाव जयापासीं । तैसा देव तयासी ।
जाणे भाव अंतरसाक्षी । प्राणीमात्राचा ॥ १३ ॥
जरी भाव असिला माईक । तरी देव होये माहा ठक ।
नवल तयाचें कौतुक । जैशास तैसा ॥ १४ ॥
जैसें जयाचें भजन । तैसें चि दे समाधान ।
भाव होतां किंचित न्यून । आपण हि दुरावे ॥ १५ ॥
दर्पणीं प्रतिबिंब दिसे । जैस्यास तैसें भासे ।
तयाचें सूत्र असे । आपणाचपासीं ॥ १६ ॥
जैसें आपण करावें । तैसें चि तेणें व्हावें ।
जरी डोळे पसरूनि पाहावें । तरी तें हि टवकारे ॥ १७ ॥
भृकुटीस घालून मिठी । पाहातां क्रोधें तें हि उठी ।
आपण हास्य करिता पोटीं । तें हि आनंदे ॥ १८ ॥
जैसा भाव प्रतिबिंबला । तयाचा चि देव जाला ।
जो जैसें भजे त्याला । तैसा चि बोळे ॥ १९ ॥
भावें परमार्थाचिया वाटा । वाहाती भक्तीचिया पेंठा ।
भरला मोक्षाचा चोहाटा[1] । सज्जनसंगें ॥ २० ॥
भावें भजनीं जे लागले । ते ईश्वरीं पावन जाले ।
भावार्थबळें उद्धरिले । पूर्वज तेहीं ॥ २१ ॥
आपण स्वयें तरले । जनास हि उपेगा आले ।
कीर्तिश्रवणें जाले । अभक्त भावार्थी ॥ २२ ॥
धन्य तयांची जननी । जे लागले हरिभजनीं ।
तेहिं च येक जन्म जनीं । सार्थक केला ॥ २३ ॥

१ बाजारचौक, चव्हाटा.

तयांची वर्णूं काय थोरी । जयांचा भगवंत कैवारी ।
कासे लाऊन उतरी । पार दुःखाच्या ॥ २४ ॥
बहुतां जन्माचे सेवटीं । जेणें चुके अटाटी ।
तो हा नरदेह भेटी । करी भगवंतीं ॥ २५ ॥
म्हणौनि धन्य ते भाविक जन । जेहिं जोडिलें हरिनिधान ।
अनंत जन्मांतरींचें पुण्य । फळासि आलें ॥ २६ ॥
आयुष्य हे चि रत्नपेटी । माजीं भजनरत्नें गोमटीं ।
ईश्वरीं अर्पूनियां लुटी । आनंदाची करावी ॥ २७ ॥
हरिभक्त वैभवें कनिष्ठ । परी तो ब्रह्मादिकां वरिष्ठ ।
सदा सर्वदा संतुष्ट । नैराशबोधें ॥ २८ ॥
धरून ईश्वराची कास । केली संसाराची नैरास ।
तयां भाविकां जगदीश । सबाह्य[1] साभाळी ॥ २९ ॥
जया संसाराचें दुःख । विवेकें वाटे परम सुख ।
संसारसुखाचेनि पढतमूर्ख । लोधोनें पडती ॥ ३० ॥
जयांचा ईश्वरीं जिव्हाळा । ते भोगिती स्वानंदसोहळा ।
जयांचा जनावेगळा । ठेवा आक्षै ॥ ३१ ॥
ते आक्षै सुखें सुखावले । संसारदुःखें विसरले ।
विषयेरंगीं वोरंगले । श्रीरंगेंरंगीं[3] ॥ ३२ ॥
तयांस फावली नरदेह पेटी । केली ईश्वरेंसिं सैाटी ।
येरें अभाविकें करंटीं । नरदेह गेला ॥ ३३ ॥
आविचटें निधान जोडलें । तें कवडिच्या बदल नेलें ।
तैसें आयुष्य निघोनि गेलें । अभाविकाचें ॥ ३४ ॥
बहुत तपाचा सांठा । तेणें लाधला परीस गोटा ।
परी तो ठाइचा करंटा । भोगू च नेणे ॥ ३५ ॥

१ अंतर्बाह्य. २ लोधणें=चिकटणें, झोंबणें. ३ श्रीरंगात रममाण होणारे विषय-रंगापासून पराङ्मुख झाले. ४ मिळाली. ५ संगति, सोबत. ६ अनायासें.

तैसा संसारास आला । मायाजाळीं गुंडाळला ।
अंतीं येकला चि गेला । हात झाडुनी ॥ ३६ ॥
या नरदेहाचेनि संगतीं । बहुत पावले उत्तम गती ।
येकें बापुडीं यातायाती । वरपडीं जालीं ॥ ३७ ॥
या नरदेहाचेनि लागवेगें । सार्थक करावें संतसगें ।
नीच योनीं दुःख मागें । बहुत भोगिलें ॥ ३८ ॥
कोण समयो येईल कैसा । याचा न कळे किं भर्वसा ।
जैसे पक्षी दाही दिशा । उडोन जाती ॥ ३९ ॥
तैसें वैभव हें सकळ । कोण जाणे कैसी वेळ ।
पुत्रकळत्रादि सकळ । विघडोन जाती ॥ ४० ॥
पाहिली घडी नव्हे आपुली । वयसा तरी निघोन गेली ।
देह पडता च ठेविली । आहे नीच योनी ॥ ४१ ॥
स्वान शुकरादिक नीच याती । भोगणें घडे विपत्ती ।
तेथें कांहीं उत्तम गती । पाविजेत नाहीं ॥ ४२ ॥
मागां गर्भवासीं आटाटी । भोगितां जालासि रे हिंपुटी ।
तेथुनियां थोरा कष्टीं । सुटलासि दैवें ॥ ४३ ॥
दुःख भोगिलें आपुल्या जीवें । तेथें कैंचि होतीं सर्वें ।
तैसें चि पुढें येकलें जावें । लागेल बापा ॥ ४४ ॥
कैंची माता कैचा पिता । कैंची बहिण कैचा भ्राता ।
कैंचीं सुहृदें कैंची वनिता । पुत्र कळत्रादिक ॥ ४५ ॥
हे तू जाण मविचीं । आवघीं सोइरीं सुखाचीं ।
हे तुझ्या सुखदुःखाचीं । सांगातीं नव्हेती ॥ ४६ ॥
कैंचा प्रपंच कैंचें कुळ । कासया होतोसी व्याकुळ ।
धन कैण लक्ष्मी सकळ । जाईजणें ॥ ४७ ॥
कैंचें घर कैचा संसार । कासया करिसी जोजार ।
जन्मवरी वाहोन भार । सेखीं सांडून जासी ॥ ४८ ॥

---

१ स्वाधीन. २ त्वरेनें. ३ वय, आयुष्य. ४ कष्टी. ५ धान्य. ६ अशाश्वत. ७ खटपट, कष्ट.

कैंचें तारुण्य कैंचें वैभव । कैचे सोहळे हावभाव ।
हें सकळ हि जाण माव । माईक माया ॥ ४९ ॥
ये च क्षणीं मरोन जासी । तरी रघुनाथीं अंतरलासी ।
माझें माझें ह्मणतोसी । ह्मणौनियां ॥ ५० ॥
तुवा भोगिल्या पुनरावृत्ती । ऐसीं मायबापें किती ।
स्त्री कन्या पुत्र होती । लक्षानलक्ष ॥ ५१ ॥
कर्मयोगें सकळ मिळालीं । येके स्थळीं जन्मास आलीं ।
तें तुवा आपुलीं मानिलीं । कैसीं रे पढतमूर्खा ॥ ५२ ॥
तुझें तुज नव्हे शरीर । तेथें इतरांचा कोण विचार ।
आतां येक भगवंत साचार । धरीं भावार्थबळें ॥ ५३ ॥
येका दुर्भराकारणें[1] । नाना नीचांची सेवा करणें ।
नाना स्तुती आणी स्तवनें । मर्यादा धरावी ॥ ५४ ॥
जो अन्न देतो उदरासी । शरीर विकावें लागे त्यासी ।
मा जेणें घातलें जन्मासी । त्यासी कैसें विसरावें ॥ ५५ ॥
अहिर्निशीं ज्या भगवंता । सकळ जिवांची लागली चिंता ।
मेघ वरुषे जयाची सत्ता । सिंधु मर्यादा धरी ॥ ५६ ॥
भूमि धरिली धराधरें[3] । प्रगट होईजे दिनकरें[4] ।
ऐसी सृष्टी सत्तामात्रें । चालवी जो कां ॥ ५७ ॥
ऐसा कृपाळु देवाधिदेव । नेणत्रे जयाचें लाघव[5] ।
जो सांभाळी सकळ जीव । कृपाळुपणें ॥ ५८ ॥
ऐसा सर्वात्मा श्रीराम । सांडून धरिती विषयकाम ।
ते प्राणी दुरात्मे अधम । केलें पावती ॥ ५९ ॥
रामेविण जे जे आस । तितुकी जाणावी नैराश ।
माझें माझें सावकाश । सीण चि उरे ॥ ६० ॥
जयास वाटे सीण व्हावा । तेणें विषयीं चिंतीत जावा ।
विषयो न मिळतां जीवा । तगबग सुटे ॥ ६१ ॥

---

१ पोटासाठीं २ मग. ३ शेषानें. ४ सूर्यानें. ५ कौशल्य.

सांडून राम आनंदघन । ज्याचे मनीं विषयचिंतन ।
त्यासी कैंचें समाधान । लोलंगतासी ॥ ६२ ॥
जयास वाटे सुख चि असावें । तेणें रघुनाथभजनीं लागावें ।
स्वजन सकळ हि त्यागावे । दुःखमूळ जे ॥ ६३ ॥
जेथें वासना झोंबोन पडे । तेणें चि अपाय दुःख जडे ।
ह्मणौनि विषयवासना मोडे । तो येक सुखी ॥ ६४ ॥
विषयजनित जें जें सुख । तेथें चि होतें परम दुःख ।
पूर्वी गोड अंतीं शोक । नेमस्त आहे ॥ ६५ ॥
गळ गिळितां सुख वाटे । वोढून घेतां घसा फाटे ।
कां तें बापुडें मृग आपटे । चारा घेऊन पळतां ॥ ६६ ॥
तैसी विषयेसुखाची गोडी । गोड वाटे परी ते कुडी[1] ।
ह्मणौनियां आवडी । रघुनाथीं धरावी ॥ ६७ ॥
ऐकोनि बोले भाविक । कैसेनि घडे जी सार्थक ।
सांगा स्वामी येमलोक । चुके जेणें ॥ ६८ ॥
देवासी वास्तव्य कोठें । तो मज कैसेंनि भेटे ।
दुःखमूळ संसार तुटे । कोणेपरी स्वामी ॥ ६९ ॥
धडपुडी[2] भगवत्प्राप्ती । होऊन चुके अधोगती ।
ऐसा उपाये कृपामूर्ती । मज दीनास करावा ॥ ७० ॥
वक्ता ह्मणे हो येकभावें । भगवद्भजन करावें ।
तेणें होईल स्वभावें । समाधान ॥ ७१ ॥
कैसें करावें भगवद्भजन । कोठें ठेवावें हें मन ।
भगवद्भजनाचें लक्षण । मज निरोपावें ॥ ७२ ॥
ऐसा म्लानवदनें बोले । धरिले सदृढ पाउलें ।
कंठ सद्गदित गळाले । अश्रुपात दुःखें ॥ ७३ ॥
देखोन शिष्याची अनन्यता । भावें बोळला सद्गुरु दाता ।
स्वानंद तुबळेल आतां । पुढिले समासीं ॥ ७४ ॥

---

१ वाईट. २ धडधडीत, खरोखर, निश्चयात्मक.

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे वैराग्यनिरूपणनाम समास दशम॥१०॥

## ॥ नवविधा भक्तिनाम चतुर्थ दशक ॥ ४ ॥

॥ श्रीराम ॥

जयजय जी गणनाथा । तूं विद्यावैभवें समर्था ।
अध्यात्मविद्येच्या परमार्था । मज बोलवावें ॥ १ ॥
नमूं शारदा वेदजननी । सकळ सिद्धि जयेचेनी ।
मानस प्रवर्तलें मननीं । स्फूर्तिरूपें ॥ २ ॥
आतां आठऊं सद्गुरु । जो पराचा हि परु ।
जयाचेनि ज्ञानविचारु । कळों लागे ॥ ३ ॥
श्रोतेन पुसिलें बरवें । भगवद्भजन कैसें करावें ।
म्हणौनि बोलिलें स्वभावें । ग्रन्थांतरीं ॥ ४ ॥
सावध होऊन श्रोतेजन । ऐका नवविधा भजन ।
सत्शास्त्रीं बोलिलें पावन । होईजे येणें ॥ ५ ॥

॥ श्लोक ॥ श्रवणं कीर्तनं विष्णोःस्मरणं पादसेवनम् ।
अर्चनं वंदनं दास्य सख्यमात्मनिवेदनम् ॥ ७

नवविधा भजन बोलिलें । तें चि पुढें प्राजळ केलें ।
श्रोतीं अवधान दिधलें । पाहिजे आतां ॥ ६ ॥
प्रथम भजन ऐसें जाण । हरिकथापुराणश्रवण ।
नाना अध्यात्मनिरूपण । ऐकत जावें ॥ ७ ॥
कर्ममार्ग उपासनामार्ग । ज्ञानमार्ग सिद्धांतमार्ग ।
योगमार्ग वैराग्यमार्ग । ऐकत जावें ॥ ८ ॥
नाना व्रतांचे महिमे । नाना तीर्थांचे महिमे ।
नाना दानाचे महिमे । ऐकत जावें ॥ ९ ॥

१ मुळांत " ०द्यच्या " २ गुरुभक्तिमार्ग.

नाना माहात्में नाना स्थानें । नाना मंत्र नाना साधनें ।
नाना तपें पुरश्चरणें । ऐकत जावीं ॥ १० ॥
दुग्धाहारी निराहारी । फळाहारी पर्णाहारी ।
तृणाहारी नानाहारी । कैसे ते ऐकावे ॥ ११ ॥
उष्णवास जळवास । सीतवास आरण्यवास ।
भूगर्भ आणी आकाशवास । कैसे ते ऐकावे ॥ १२ ॥
जपी तपी तामस योगी । नाना निग्रह हटयोगी ।
शाक्त[1]आगम आघोर[2]योगी । कैसे ते ऐकावे ॥ १३ ॥
नाना मुद्रा[3] नाना आसनें[4] । नाना देखणीं[5] लक्षस्थानें ।
पिंडज्ञानें तत्वज्ञानें । कैसीं तें ऐकावीं ॥ १४ ॥
नाना पिंडांची रचना । नाना भूगोळरचना ।
नाना सृष्टीची रचना । कैसी ते ऐकावी ॥ १५ ॥
चंद्र सूर्य तारामडळें । ग्रहमडळें मेघमडळें ।
येकवीस स्वर्गें सप्त पाताळें । कैसीं ते ऐकावीं ॥ १६ ॥
ब्रह्माविष्णुमहेशस्थानें । इन्द्रदेवऋषीस्थानें ।
वायोवरुणकुबेरस्थानें । कैसीं ते ऐकावीं ॥ १७ ॥
नव खडें चौदा भूवनें । अष्ट दिग्पाळांचीं स्थानें ।
नाना वनें उपवनें गहनें । कैसीं ते ऐकावीं ॥ १८ ॥
गण गंधर्व विद्याधर । येक्ष किन्नर नारद तुंबर ।
अष्ट नायका सगीतविचार । कैसा तो ऐकावा ॥ १९ ॥
रागज्ञान ताळज्ञान । नृत्यज्ञान वाद्यज्ञानें[6] ।
[7]अमृतवेळ प्रसगज्ञान । कैसें तें ऐकावें ॥ २० ॥

---

१ शाक्तमार्ग. ( देवताप्राप्त्यर्थ मद्यप्राशन करणें हा या मार्गाचा विशेष आहे. ) २ भूतप्रेतादिकांचें साधन करणारा ३ खेचरी, भूचरी, चाचरी, अगोचरी अशा ध्यानाच्या वेळच्या चार मुद्रा आहेत. यापैकीं श्रीसमर्थांची अगोचरी मुद्रा होती. ४ योगांतील चौऱ्यायशी आसनें पैकीं श्रीसमर्थांचें सिद्धासन असे. ५ चमत्कार. ६ " विद्याज्ञान " चें " वाद्यज्ञान " केलें आहे ७ उत्तम काल.

चौदा विद्या चौसष्टी कळा । सामुद्रिक लक्षणें सकळ कळा ।
बत्तिस लक्षणें नाना कळा । कैशा त्या ऐकाव्या ॥ २१ ॥
मंत्र मोहरे[1] तोटके[2] सिद्धी । नाना वल्ली नाना औषधी ।
धातु रसायण बुद्धी । नाडिज्ञानें ऐकावीं ॥ २२ ॥
कोण्या दोषें कोण रोग । कोणा रोगास कोण प्रयोग ।
कोण्या प्रयोगास कोण योग । साधे तो ऐकावा ॥ २३ ॥
रवरवादि कुंभपाकें[3] । नाना यातना येमलोक ।
सुखदुःखादि स्वर्गनर्क । कैसा तो ऐकावा ॥ २४ ॥
कैशा नवविधा भक्ती । कैशा चतुर्विधा मुक्ती ।
कैसी पाविजे उत्तम गती । ऐसें हें ऐकावें ॥ २५ ॥
पिंडब्रह्मांडाची रचना । नाना तत्वविवंचना ।
सारासारविचारणा । कैसी ते ऐकावी ॥ २६ ॥
सायोज्यता मुक्ती कैसी होते । कैसें पाविजे मोक्षातें ।
या कारणें नाना मतें । शोधित जावीं ॥ २७ ॥
वेद शास्त्रें आणी पुराणें । माहावाक्यांचीं विवरणें ।
तनुचतुष्टयनिर्शनें[4] । कैसीं ते ऐकावीं ॥ २८ ॥
ऐसें हें अवघें चि ऐकावें । परंतु सार शोधून घ्यावें ।
असार तें जाणोनि त्यागावें । या नाव श्रवणभक्ती ॥ २९ ॥
सगुणाचीं चरित्रें ऐकावीं । का तें निर्गुण अध्यात्में शोधावीं ।
श्रवणभक्तीचीं जाणावीं । लक्षणें ऐसीं ॥ ३० ॥
सगुण देवाचीं चरित्रें । निर्गुणाचीं तत्वें यंत्रें ।
हे दोनी परम पवित्रें । ऐकत जावीं ॥ ३१ ॥
जयंत्या उपोषणें नाना साधनें । मंत्र यंत्र जप ध्यानें ।
कीर्ति स्तुती स्तवनें भजनें । नानाविधें ऐकावीं ॥ ३२ ॥

---

१ औषधी मणी. २ तोडगे. ३ नरक ४ स्थूल, सूक्ष्म, कारण, महाकारण ह्या तनुचतुष्टयाचें निरसन.

ऐसें श्रवण सगुणाचें । अध्यात्मनिरूपण निर्गुणाचें ।
विभक्ती सांडून भक्तीचें । मूळ शोधावें ॥ ३३ ॥
श्रवणभक्तीचें निरूपण । निरोपिलें असे जाण ।
पुढें कीर्तनभजनाचें लक्षण । बोलिलें असे ॥ ३४ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे श्रवणभक्तिनिरूपणनाम समास प्रथम ॥१॥

---

॥ श्रीराम ॥

श्रोतीं भगवद्भजन पुसिलें । तें नवविधा प्रकारें बोलिलें ।
त्यांत प्रथम श्रवण निरोपिलें । दुसरें कीर्तन ऐका ॥ १ ॥
सगुण हरिकथा करावी । भगवत्कीर्ति वाढवावी ।
अखंड वैखरी वदवावी । येथायोग्य ॥ २ ॥
बहुत करावें पाठांतर । कठीं धरावें ग्रन्थांतर ।
भगवत्कथा निरंतर । करीत जावी ॥ ३ ॥
आपुलिया सुखस्वार्था । केली च करावी हरिकथा ।
हरिकथेविण सर्वथा । राहों चि नये ॥ ४ ॥
नित्य नवा हव्यास धरावा । साक्षेप अत्यत चि करावा ।
हरिकीर्तनें भरावा । ब्रह्मगोळ अवघा ॥ ५ ॥
मनापासून आवडी । जीवापासून अत्यंत गोडी ।
सदा सर्वदा तातडी । हरिकीर्तनाची ॥ ६ ॥
भगवंतास कीर्तन प्रिये । कीर्तनें समाधान होये ।
बहुत जनासी उपाये । हरिकीर्तनें कलयुगीं ॥ ७ ॥
विविध विचित्रें ध्यानें । वर्णावीं आळकार भूषणें ।
ध्यान मूर्ति अंतःकर्णीं । लक्षून कथा करावी ॥ ८ ॥
येश कीर्ति प्रताप महिमा । आवडीं वर्णावा परमात्मा ।
जेणें भगवद्भक्तांचा आत्मा । संतुष्ट होये ॥ ९ ॥

कथा अन्वय लापणिका । नामघोष करताळिका ।
प्रसंगें बोलाव्या अनेका । धातु माता नेमस्त ॥ १० ॥
ताळ मृदांग हरिकीर्तन । संगीत नृत्य तान मान ।
नाना कथानुसंधान । तुटों चि नेदावें ॥ ११ ॥
करुणाकीर्तनाच्या थाटें । कथा करावी घडघडाटें ।
श्रोतयांचीं श्रवणपुटें । आनंदें भरावीं ॥ १२ ॥
कंप रोमांच स्फुराणें । प्रेमाश्रुसहित गाणें ।
देवद्वारीं लोटांगणें । नमस्कार घालावे ॥ १३ ॥
पदें दोहडे श्लोक प्रबंद । धाटी मुद्रा अनेक छंद ।
वीरभाटिव विनोद । प्रसंगें करावे ॥ १४ ॥
नाना नवरसिक शृंघारिक । गद्यपद्यांचें कौतुक ।
नाना वचनें प्रस्ताविक । शास्त्राधारें बोलावीं ॥ १५ ॥
भक्तिज्ञानवैराग्यलक्षण । नीतिन्यायस्वधर्मरक्षण ।
साधनमार्ग अध्यात्मनिरूपण । प्रांजळ बोलावें ॥ १६ ॥
प्रसंगें हरिकथा करावी । सगुणीं सगुणकीर्ति धरावी ।
निर्गुणप्रसंगें वाढवावी । अध्यात्मविद्या ॥ १७ ॥
पूर्वपक्ष त्यागून सिद्धांत । निरूपण करावें नेमस्त ।
बहुधा बोलणें अव्यावेस्त । बोलों चि नये ॥ १८ ॥
करावें वेदपारायेण । सांगावें जनासी पुराण ।
मायाब्रह्मीचें विवरण । साकल्य वदावें ॥ १९ ॥
ब्राह्मण्य रक्षावें आदरें । उपासनेचीं भजनद्वारें ।
गुरुपरंपरा निर्धारें । चळों च नेदावी ॥ २० ॥
करावें वैराग्यरक्षण । रक्षावें ज्ञानाचें लक्षण ।
परम दक्ष विचक्षण । सर्व हि सांभाळी ॥ २१ ॥

---

१ शब्दपांडित्य, भाषण २ धात बोलिजे गीतप्रबंधास ॥ स्वानुभवदिनकर ८-४-२७ ३ मात बोलिजे ग्रन्थपाठांतरास । आणी मुखें गोष्टी सांगणें तें ॥ स्वा. दि. ८-४-२७ ४ समासांत "सं" मागाहून लिहिलें आहे. तो स. शो ५ वीरश्रीचें भाषण. वीरभाटीव=वीररस. ( हंसकोश )

कीर्तन ऐकतां संदेह पडे । सत्य समाधान तें उडे ।
नीतिन्यायसाधन मोडे । ऐसें न बोलावें ॥ २२ ॥
सगुणकथा या नाव कीर्तन । अद्वैत म्हणिजे निरूपण ।
सगुण रक्षून निर्गुण । बोलत जावें ॥ २३ ॥
असो वगतृत्वाचा अधिकार । अल्पास न घडे सत्योत्तर ।
वक्ता पाहिजे साचार । अनुभवाचा ॥ २४ ॥
सकळ रक्षून ज्ञान सांगे । जेणें वेदज्ञा न भगे ।
उत्तम सन्मार्ग लागे । प्राणीमात्रासी ॥ २५ ॥
असो हें सकळ सांडून । करावें गुणानुवादकीर्तन ।
या नाव भगवद्भजन । दुसरी भक्ती ॥ २६ ॥
कीर्तनें माहा दोष जाती । कीर्तनें होये उत्तम गती ।
कीर्तनें भगवत्प्राप्ती । येदर्थीं संदेह नाहीं ॥ २७ ॥
कीर्तनें वा[1]चा पवित्र । कीर्तनें होये सत्पात्र ।
हरिकीर्तनें प्राणीमात्र । सुसिळ होती ॥ २८ ॥
कीर्तनें अवेग्रता घडे । कीर्तनें निश्चये सांपडे ।
कीर्तनें संदेह [2]वुडे । श्रोतयांवक्तयांचा ॥ २९ ॥
सदा सर्वदा हरिकीर्तन । ब्रह्मसुत करी आपण ।
तेणें नारद तो चि नारायेण । बोलिजेत आहे ॥ ३० ॥
ह्मणोनि कीर्तनाचा अगाध महिमा । कीर्तनें संतोषे परमात्मा ।
सकळ तीर्थें आणी जगदात्मा । हरिकीर्तनीं वसे ॥ ३१ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे कीर्तनभजननिरूपणनाम समास द्वितीय॥ २ ॥

---

॥ श्रीराम ॥

मागां निरोपिलें कीर्तन । जें सकळांस करी पावन ।
आतां ऐका विष्णो.स्मरण । तिसरी भक्ती ॥ १ ॥

---

१ "वाचा" शब्दापुढे आणखी " देह " शब्द होता तो खोडलेला आहे २ उडे.

स्मरण देवाचें करावें । अखंड नाम जपत जावें ।
नामस्मरणें पावावें । समाधान ॥ २ ॥
नित्य नेम प्रातःकाळीं । माध्यानकाळीं सायंकाळीं ।
नामस्मरण सर्वकाळीं । करीत जावें ॥ ३ ॥
सुख दुःख उद्वेग चिंता । अथवा आनंदरूप असतां ।
नामस्मरणेंविण सर्वथा । राहों च नये ॥ ४ ॥
हरुषकाळीं विषमकाळीं । पर्वकाळीं प्रस्तावकाळीं[1] ।
विश्रांतिकाळीं निद्राकाळीं । नामस्मरण करावें ॥ ५ ॥
कोडें सांकडें संकट । नाना संसारखटपट ।
आवस्था लागतां चटपट । नामस्मरण करावें ॥ ६ ॥
चालतां बोलतां धंदा करितां । खातां जेवितां सुखी होतां ।
नाना उपभोग भोगितां । नाम विसरों नये ॥ ७ ॥
संपत्ती अथवा विपत्ती । जैसी पडेल काळगती ।
नामस्मरणाची स्थिती । सांडूं च नये ॥ ८ ॥
वैभव सामर्थ्य आणी सत्ता । नाना पदार्थ चालतां ।
उत्कट भाग्यश्री भोगितां । नामस्मरण सांडूं नये ॥ ९ ॥
आधीं आवदसा मग दसा । अथवा दसेउपरी आवदसा ।
प्रसंग असो भलतैसा । परंतु नाम सोडूं नये ॥ १० ॥
नामें संकटें नासती । नामें विघ्नें निवारती ।
नामस्मरणें पाविजेती । उत्तम पदें ॥ ११ ॥
भूत पिशाच्य नाना छंद । ब्रह्मगिऱ्हो ब्राह्मणसमंध ।
मंत्रचळे[2] नाना खेद । नामनिष्ठें नासती ॥ १२ ॥
नामें विषबाधा हरती । नामें चेडे चेटकें नासती ।
नामें होये उत्तम गती । अंतकाळीं ॥ १३ ॥
बाळपणीं तारुण्यकाळीं । कठिण काळीं वृधाप्यकाळीं ।
सर्वकाळीं अंतकाळीं । नामस्मरण असावें ॥ १४ ॥

---

१ प्रस्ताव=पश्चात्ताप २ मंत्रप्रयोगांत चूक होऊन लागणारें वेड.

सं. नं. १२५ ता.

नामाचा महिमा जाणे शंकर । जना उपदेसीं विश्वेश्वर ।
वाराणसी मुक्तिक्षेत्र । रामनामेंकरूनी ॥ १५ ॥
उफराट्या नामासाठीं । वाल्मिक तरला उठाउठी ।
भविष्य वदला शतकोटी । चरित्र रघुनाथाचें ॥ १६ ॥
हरिनामें प्रल्हाद तरला । नाना आघातापासून सुटला ।
नारायेणनामें पावन जाला । अजामेळ ॥ १७ ॥
नामें पाषाण तरले । असंख्यात भक्त उद्धरले ।
माहा पापी ते चि जाले । परम पवित्र ॥ १८ ॥
परमेश्वराचीं अनंत नामें । स्मरतां तरिजे नित्यनेमें ।
नामस्मरण करितां येमें । बाधिजेना ॥ १९ ॥
सहस्रा नामामधें कोणी येक । ह्मणतां होतसे सार्थक ।
नाम स्मरतां पुण्यश्लोक । होईजे स्वयें ॥ २० ॥
कांहीं च न करूनि प्राणी । रामनाम जपे वाणी ।
तेणें संतुष्ट चक्रपाणी । भक्तांलागीं सांभाळी ॥ २१ ॥
नाम स्मरे निरंतर । तें जाणावें पुण्यशरीर ।
माहां दोषाचे गिरिवर । रामनामें नासती ॥ २२ ॥
अगाध महिमा न वचे वदला । नामें बहुत जन उद्धरला ।
हळहळापासून सुटला । प्रत्यक्ष चंद्रमौळी ॥ २३ ॥
चहु वर्णां नामाधिकार । नामीं नाहीं लाहानथोर ।
जड मूढ पैलपार । पावती नामें ॥ २४ ॥
ह्मणौन नाम अखंड स्मरावें । रूप मनीं आठवावें ।
तिसरी भक्ती स्वभावें । निरोपिली ॥ २५ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे नामस्मरणभक्तिनाम समास तिसरा ॥३॥

---

॥ श्रीराम ॥

मागा जालें निरूपण । नामस्मरणाचें लक्षण ।
आतां ऐका पादसेवन । चौथी भक्ती ॥ १ ॥

पादसेवन तें चि जाणावें । कायावाचामनोभावें ।
सद्गुरूचे पाय सेवावे । सद्गतिकारणें ॥ २ ॥

या नांव पादसेवन । सद्गुरुपदीं अनन्यपर्ण ।
निरसावया जन्ममरण । यातायाती ॥ ३ ॥

सद्गुरुकृपेविण कांहीं । भवतरणोपाव तों नाहीं ।
याकारणें लवलाहीं । सद्गुरुपाय सेवावे ॥ ४ ॥

सद्वस्तु[1] दाखवी सद्गुरु । सकळ सारासारविचारु ।
परब्रह्माचा निर्धारु । अतरीं बाणे ॥ ५ ॥

जे वस्तु दृष्टीस दिसेना । आणी मनास ते हि भासेना ।
सगत्यागेंविण[2] येना । अनुभवासी ॥ ६ ॥

अनुभव घेता सगत्याग नसे । संगत्यागें अनुभव[3] न दिसे ।
हें अनुभवी यासी च भासे । येरां गथागोवी ॥ ७ ॥

संगत्याग आणी निवेदनें । विदेहस्थिती अलिप्तपण ।
सहजस्थिती उन्मनी विज्ञान । हे सप्त हि येकरूप ॥ ८ ॥

याहिवेगळीं नामाभिधानें । समाधानाचीं संकेतवचनें ।
सकळ कांहीं पादसेवनें । उमजों लागे ॥ ९ ॥

वेद वेदगर्भ वेदांत । सिद्ध सिद्धभावगर्भ सिद्धात ।
अनुभव अनुर्वाच्य धादात । सत्य वस्तु ॥ १० ॥

बहुधा अनुभवाचीं आगें । सकळ कळती सतसगें ।
चौथे[4] भक्तीचे प्रसंगें । गोप्य तें प्रगटे ॥ ११ ॥

---

१ ब्रह्म २ अहंकार, अभिमान, देहबुद्धि यांचा त्याग केल्याशिवाय. ३ अनुभव घेत असता संगत्याग होत नाहीं, कारण अनुभव घ्यावयाचा ह्मणजे अनुभव, अनुभविता, अनुभाव्य ही त्रिपुटी उत्पन्न होते. बरें, हा संगत्याग करावा तर मग अनुभव असा शब्द च उरत नाहीं. अहंभाव च नाहीं तर मग अनुभव कसला आणि कोणाला ? साराश, या गोष्टी अनुभवी च जाणतात, इतरांना हा सारा गोंधळ वाटणार. ४ आत्मनिवेदन ( द ४ स ९ पहा )

प्रगट वसोनि नसे । गोप्य असोनि भासे ।
भासाअभासाहून अनारिसे[1] । गुरुगम्य मार्ग ॥ १२ ॥
मार्ग होये परी अंतरिक्ष[2] । जेथें सर्व हि पूर्वपक्ष ।
पाहों जातां अलक्ष । लक्षवेना ॥ १३ ॥
लक्षें जयासी लक्षावें । ध्यानें जयासी ध्यावें ।
तें गे तें चि आपण व्हावें । त्रिविधा[3] प्रचिती ॥ १४ ॥
असो हीं अनुभवाचीं द्वारें । कळती सारासारविचारें ।
सत्संगेंकरून सत्योत्तरें । प्रत्ययासि येती ॥ १५ ॥
सत्य पाहातां नाहीं असत्य । असत्य पाहातां नाहीं सत्य ।
सत्याअसत्याचें कृत्य । पाहाणारापासीं ॥ १६ ॥
पाहाणारें पाहाणें जया लागलें । तें तद्रूपत्वें प्राप्त जालें ।
तरी मग जाणावें आणलें । समाधान ॥ १७ ॥
नाना समाधानें पाहाता । बाणती सद्गुरु करितां ।
सद्गुरुविण सर्वथा । सन्मार्ग नसे ॥ १८ ॥
प्रयोग साधनें सायास । नाना साक्षेपें विद्याअभ्यास ।
अभ्यासें कांहीं गुरुगम्यास । पाविजेत नाहीं ॥ १९ ॥
जें अभ्यासें अभ्यासिता नये । जें साधनें असाध्य होये ।
तें हें सद्गुरुविण काये । उमजों जाणे ॥ २० ॥

---

१ निराळे २ अंतरिक्ष ऐसें आकाशाचें नांव । शुद्ध ते जाणीव अतरात्मा ॥ १ ॥ काढिता तेथील शुद्धत्वाचा डाग । गुरुगम्य मार्ग उफराटा ॥२ ॥ चहूं भूतातील शुद्ध जें आकाश । तें चि चिदाकाश ज्ञानघन ॥ ३ ॥ ईक्ष् तें पाहणें अंत तें अतीत । अंतरिक्ष पंथ यचें नांव ॥ ४ ॥ स्थूळांतरीं सूक्ष्म सूक्ष्मीं कारण । त्यापरतें ज्ञान ज्ञानी द्रष्टा ॥ ५ ॥ दृष्टत्वीं चालता होय निराधार । मग परात्पर स्वयें वस्तु ॥ ६ ॥ येणें पंथें जाता अंतरीचा ईश । व्यापे सावकाश भेदातीत ॥ ७ ॥ जेथें पूर्व पक्ष होय सर्वस्वासी । तो देव अनयासी आत्माराम ॥ ८ ॥ असा " दासविश्रामधामात " याचा अर्थ दिला आहे ३ शास्त्रप्रतीति, गुरुप्रतीति व आत्मप्रतीति ४ पाहणारा आणि पाहण्याची क्रिया यानीं जें पाहावयाचें तें पाहणाराच्या रूपीं लीन झालें, ह्मणजे द्रष्टा, दर्शन व दृश्य ही त्रिपुटी नाहींशीं झाली तर मग समाधान काय दूर आहे ?

याकारणें ज्ञानमार्ग । कळाया धरावा सत्संग ।
सत्संगेंविण प्रसंग । बोलों चि नये ॥ २१ ॥
सेवावे सद्गुरूचे चरण । या नांव पादसेवन ।
चौथे भक्तीचें लक्षण । तें हें निरोपिलें ॥ २२ ॥
देव ब्राह्मण माहानुभाव । सत्पात्र भजनाचे ठाव ।
ऐसिये ठाईं सद्भाव । दृढ धरावा ॥ २३ ॥
हें प्रवृत्तीचें बोलणें । बोलिलें रक्षाया कारणें ।
परंतु सद्गुरुपाय सेवणें । या नाव पादसेवन ॥ २४ ॥
पादसेवन चौथी भक्ती । पावन करितसे त्रिजगती ।
जयेकरितां सायोज्यमुक्ती । साधकास होये ॥ २५ ॥
ह्मणौनि थोराहूनि थोर । चौथे भक्तीचा निर्धार ।
जयेकरितां पैलपार । बहुत प्राणी पावती ॥ २६ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे पादसेवनभक्तिनिरूपणनाम समास चतुर्थ ॥ ४ ॥

---

॥ श्रीराम ॥

मागां जालें निरूपण । चौथे भक्तीचें लक्षण ।
आता ऐका सावधान । पाचवी भक्ती ॥ १ ॥
पांचवी भक्ति तें आर्चन । आर्चन ह्मणिजे देवतार्चन ।
शास्त्रोक्त पूजाविधान । केलें पाहिजे ॥ २ ॥
नाना आसनें उपकर्णें । वस्त्रें आळंकार भूषणें ।
मानसपूजा मूर्तिध्यानें । या नाव पांचवी भक्ती ॥ ३ ॥
देवब्राह्मणअग्नीपूजन । साधुसंतअतीतपूजन ।
ईतिमाहानुभावगाइत्रीपूजन । या नाव पांचवी भक्ती ॥ ४ ॥

---

१ देवब्राह्मणादिकाच्या ठिकाणीं सद्भाव धरण्यास सांगितलें, हें जनरूढी प्रमाणें बोलणें झालें, परंतु सद्गुरुचरणसेवा ही च खरोखर चवथी पादसेवनभक्ति
२ "करितां" ह्मणजे योगानें, पासून, मुळें; अशा अर्थी "करिता" शब्दाची योजना पुष्कळ ठिकाणीं झालेली आहे ३ यति

धातुपाषाणमृत्तिकापूजन । चित्रलेपसत्पात्रपूजन ।
आपले गृहींचें देवतार्चन । या नाव पांचवी भक्ती ॥ ५ ॥
सीळा सताकित नवांकित । शालिग्राम शकलें चक्रांकित ।
लिंगें सूर्यकात सोमकांत । बाण तांदळे नर्बदे ॥ ६ ॥
भैरव भगवती मल्हारी । मुंज्या नृसिंह बनशकरी ।
नाग नाणी नानापरी । पंचायेत्नपूजा ॥ ७ ॥
गणेशशारदाविठलमूर्ती । रंगनाथजगंनाथताडवमूर्ती ।
श्रीरंगहनुमंतगरुडमूर्ती । देवतार्चनीं पूजाव्यां ॥ ८ ॥
मत्छकूर्मवऱ्हावमूर्ती । नृसिंहवामनभार्गवमूर्ती ।
रामकृष्णहयग्रीवमूर्ती । देवतार्चनीं पूजाव्या ॥ ९ ॥
केशवनारायणमाधवमूर्ती । गोविंदविष्णुमदसूदनमूर्ती ।
त्रिविक्रमवामनश्रीधरमूर्ती । रुषीकेश पद्मनाभि ॥ १० ॥
दामोदरसंकर्षणवासुदेवमूर्ती । प्रद्युम्नअनुरधपुरुषोत्तममूर्ती ।
अधोक्षजनारसिंहअच्युतमूर्ती । जनार्दन आणी उपेंद्र ॥ ११ ॥
हरिहरांच्या अनंत मूर्ती । भगवंतजगदात्माजगदीशमूर्ती ।
शिवशक्तीच्या बहुधा मूर्ती । देवतार्चनीं पूजाव्या ॥ १२ ॥
अश्वत्थनारायेण सूर्यनारायेण । लक्ष्मीनारायेण त्रिमल्लनारायेण ।
श्रीहरीनारायण आदिनारायण । शेषशाई परमात्मा ॥ १३ ॥
ऐश्या परमेश्वराच्या मूर्ती । पाहों जातां उदंड असती ।
त्यांचें आर्चन करावें भक्ती । पांचवी ऐसी ॥ १४ ॥
या हि वेगळे कुळधर्म । सोडूं नये अनुक्रम ।
उत्तम अथवा मध्यम । करीत जावें ॥ १५ ॥
जाखमाता मायराणी । बाळा बगुळा मानाविणी ।
पूजा मांगिणी जोगिणी । कुळधर्में करावीं ॥ १६ ॥

---

१ तसबीर २ " कराव्या " होतें त्याचें " पूजाव्या " केलें आहे. ३ हा चरण समासांत लिहिलेला आहे, तो स. शो.

नाना तीर्थीं क्षत्रांस जावें। तेथें त्या देवाचें पूजन करावें।
नाना उपचारीं अर्चावें। परमेश्वरासी ॥ १७ ॥
पचामृतें गधाक्षतें। पुष्पें परिमळद्रव्यें बहुतें।
धूपदीप असंख्यातें। नीरांजनें कर्पुराचीं ॥ १८ ॥
नाना खाद्य नैवेद्य सुंदर। नाना फळें तांबोलप्रकार।
दक्षणा नाना आळंकार। दिव्यांबरें वनमाळा ॥ १९ ॥
सिबिका छत्रें सुखासनें। मोहि मेघडंब्रें सूर्यापानें।
दिंड्या पताका निशाणें। टाळ घोळ मृदांग ॥ २० ॥
नाना वाद्यें नाना उत्साव। नाना भक्तसमुदाव।
गाती हरिदास सद्भाव। लागला भगवतीं ॥ २१ ॥
पापी कूप सरोवरें। नाना देवाळयें सिखरें।
राजांगणें मनोहरें। वृंदावनें भुयरीं ॥ २२ ॥
मठ मंड्यो धर्मशाळा। देवद्वारीं पडशाळा।
नाना उपकर्णें नक्षत्रमाळा। नाना वस्त्र सामग्री ॥ २३ ॥
नाना पडदे मंडप चादोवे। नाना रत्नघोष लोंबती बरवे।
नाना देवाळईं समर्पावे। हस्थि घोडे शकटें ॥ २४ ॥
आळंकार आणी आळंकारपात्रें। द्रव्य आणी द्रव्यपात्रें।
अन्नोदक आणी अन्नोदकपात्रें। नाना प्रकारीचीं ॥ २५ ॥
वनें उपवनें पुष्पवाटिका। तापस्याच्या पर्णकुटिका।
ऐसी पूजा जगन्नायका। येथासांग समर्पावी ॥ २६ ॥
शुक शारिका मयोरें। बदकें चक्रवाकें चकोरें।
कोकिळा चितळें सामरें। देवाळईं समर्पावीं ॥ २७ ॥
सुगधमृगें आणी मार्जेरें। गाई ह्मैसी वृषभ वानरें।
नाना पदार्थ आणी लेंकुरें। देवाळईं समर्पावीं ॥ २८ ॥

---

१ शिबिका, पालखी. २ छत्री ३ उंच छत्री. ४ अब्दागीर. ५ प्रथम निराळें अक्षर असून त्यावर हरताळ लावून "पा" केला आहे "पा" किंचित् "या" सारखा दिसतो, ह्मणून प्रथमावृत्तींत "मंड्या' असा शब्द लिहिला होता तो तिसऱ्या आवृत्तींत 'मंडपा' असा छापला पण मंड्या च पाहिजे. हकिकतवाक्यात "मड्या" च आहे

काया वाचा आणी मनें । चित्तें वित्तें जीवें प्राणें ।
सद्भावें भगवत आर्चनें । या नाव आर्चनभक्ती ॥ २९ ॥
ऐसें चि सद्गुरूचें भजन । करून असावें अनन्य ।
या नाव भगवद्भजन । पांचवी भक्ती ॥ ३० ॥
ऐसी पूजा न घडे बरवी । तरी मानसपूजा करावी ।
मानसपूजा अगत्य व्हावी । परमेश्वरासी ॥ ३१ ॥
मनें भगवतास पूजावें । कल्पून सर्व हि समर्पावें ।
मानसपूजेचें जाणावें । लक्षण ऐसें ॥ ३२ ॥
जें जें आपणास पाहिजे । तें तें कल्पून वाहिजे ।
येणें प्रकारें कीजे । मानसपूजा ॥ ३३ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे आर्चनभक्तिनाम समास पांचवा ॥ ५ ॥

---

॥ श्रीराम ॥

मागां जालें निरूपण । पांचवे भक्तीचें लक्षण ।
आतां ऐका सावधान । साहावी भक्ती ॥ १ ॥
साहावी भक्ती तें वंदन । करावें देवासी नमन ।
संत साधु आणी सज्जन । नमस्कारीत जावे ॥ २ ॥
सूर्यासि करावे नमस्कार । देवासि करावे नमस्कार ।
सद्गुरूस करावे नमस्कार । साष्टांग भावें ॥ ३ ॥
साष्टांग नमस्कारास अधिकारु । नाना प्रतिमा देव गुरु ।
अन्यत्र नमनाचा विचारु । अधिकारें करावा ॥ ४ ॥
छपन्न कोटी वसुमती । मधें विष्णुमूर्ती असती ।
तयांस नमस्कार प्रीती । साष्टांग घालावे ॥ ५ ॥
पशुपति श्रीपति आणी गभस्ती । यांच्या दर्शनें दोष जाती ।
तैसा चि नमावा मारुती । नित्य नेमें विशेष ॥ ६ ॥

॥ श्लोक ॥ शंकरः शेषशायी च मार्तंडो मारुतिस्तथा ।
एतेषां दर्शनं पुण्यं नित्यनेमे विशेषतः ॥ ७ ॥

भक्त ज्ञानी आणी वीतरागी । माहानुभाव तापसी योगी ।
सत्पात्रें देखोनि वेगीं । नमस्कार घालावे ॥ ७ ॥
वेदज्ञ शास्त्रज्ञ आणी सर्वज्ञ । पंडित पुराणिक आणी विद्वजन ।
याज्ञिक वैदिक पवित्रजन । नमस्कारीत जावे ॥ ८ ॥
जेथें दिसती विशेष गुण । तें सद्गुरूचें अधिष्ठान ।
या कारणें तयासी नमन । अत्यादरें करावें ॥ ९ ॥
गणेश शारदा नाना शक्ती । हरिहरांच्या अवतारमूर्ती ।
नाना देव सांगों किती । पृथकाकारें ॥ १० ॥
सर्व देवास नमस्कारिलें । ते येका भगवंतास पावलें ।
येदर्थी येक वचन बोलिलें । आहे तें ऐका ॥ ११ ॥

॥ श्लोक ॥ आकाशात्पतितं तोयं यथा गच्छति सागरं ।
सर्वदेवनमस्कारः केशवं प्रतिगच्छति ॥ ७ ॥

या कारणें सर्व देवांसी । नमस्कारावें अत्यादरेंसीं ।
अधिष्ठान मानिता देवांसी । परम सौख्य वाटे ॥ १२ ॥
देव देवाचीं अधिष्ठानें । सत्पात्रें सद्गुरूचीं स्थानें ।
या कारणें नमस्कार करणें । उभय मार्गीं[1] ॥ १३ ॥
नमस्कारें लीनता घडे । नमस्कारें विकल्प मोडे ।
नमस्कारें सख्य घडे । नाना सत्पात्रासीं ॥ १४ ॥
नमस्कारें दोष जाती । नमस्कारें अन्याय क्षमती ।
नमस्कारें मोडलीं जडतीं । समाधानें ॥ १५ ॥
सिसापरता[2] नाहीं दंड । ऐसें बोलती उदंड ।
याकारणें अखंड । देव भक्त वंदावे ॥ १६ ॥
नमस्कारें कृपा उचंबळे । नमस्कारें प्रसन्नता प्रबळे ।
नमस्कारें गुरुदेव वोळे । साधकावरी ॥ १७ ॥

---

१ सद्गुरु आणि सद्गुरूचीं अधिष्ठानें किंवा देव आणि देवाचीं अधिष्ठानें.
२ शीर्ष.

निशेषं[1] कारितां नमस्कार । नासती दोषांचे गिरिवर ।
आणी मुख्य परमेश्वर । कृपा करी ॥ १८ ॥
नमस्कारें पतित पावन । नमस्कारें संतांसी शरण ।
नमस्कारें जन्ममरण । दुरी दुऱ्हावे ॥ १९ ॥
परम अन्याय करूनि आला । आणी साष्टांग नमस्कार घातला ।
तरी तो अन्यायें क्षमा केला । पाहिजे श्रेष्ठीं ॥ २० ॥
याकारणें नमस्कारापरतें । आणीक नाहीं अनुसरतें[2] ।
नमस्कारें प्राणीयातें । सद्बुद्धि लागे ॥ २१ ॥
नमस्कारास वेचावें नलगे । नमस्कारास कष्टावें नलगे ।
नमस्कारास कांहीं च नलगे । उपकर्ण सामग्री ॥ २२ ॥
नमस्कारा ऐसें नाहीं सोपें । नमस्कार करावा अनन्यरूपें ।
नाना साधनीं साक्षपें । कासया सिणावें ॥ २३ ॥
साधक भावें नमस्कार घाली । त्याची चिंता साधूस लागली ।
सुगम पंथें नेऊन घाली । जेथील तेथें ॥ २४ ॥
या कारणें नमस्कार श्रेष्ठ । नमस्कारें बोळती वरिष्ठ ।
येथें सांगितली पष्टै[3] । साहावी भक्ती ॥ २५ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे वंदनभक्तिनाम समास षष्ठ ॥ ६ ॥

---

॥ श्रीराम ॥

मागां जालें निरूपण । साहवे भक्तीचें लक्षण ।
आता ऐका सावधान । सातवी भक्ती ॥ १ ॥
सातवें भजन तें दास्य जाणावें । पडिलें कार्य तितुकें करावें ।
सदा सन्निध चि असावें । देवद्वारीं ॥ २ ॥
देवाचें वैभव सांभाळावें । न्यूनपूर्ण पडों चि नेदावें ।
चढतें वाढतें वाढवावें । भजन देवाचें ॥ ३ ॥
भगलीं देवाळयें करावीं । मोडलीं सरोवरें बांधावीं ।
सोफे धर्मशाळा चालवावीं । नूतन चि कार्यें ॥ ४ ॥

---

१ अनन्य भावानें २ इष्ट, योग्य ३ स्पष्ट.

नाना रचना जीर्ण जर्जर । त्यांचे करावे जीर्णोद्धार ।
पडिलें कार्य तें सत्वर । चालवित जावें ॥ ५ ॥
गज रथ तुरग सिंहासनें । चौकिया सिबिका सुखासनें ।
मचक डोल्हारे विमानें । नूतन चि करावीं ॥ ६ ॥
मेघडंबरें[1] छत्रें चामरें । सूर्यापानें[2] निशाणें अपारें ।
नित्य नूतन अत्यादरें । सांभाळित जावीं ॥ ७ ॥
नाना प्रकारींचीं यानें । बैसावयाचीं उत्तम स्थानें ।
बहुविध सुवर्णासनें । येत्नें करीत जावीं ॥ ८ ॥
भुवनें कोठड्या पेट्या मादुसा[3] । राझण कोहळीं घागरी बहुवसा ।
संपूर्ण द्रव्यांश ऐसा । अति येत्नें करावा ॥ ९ ॥
भुयेरीं तळघरें आणी विवरें । नाना स्थळें गुप्त द्वारें ।
अनर्घ्यें[4] वस्तूचीं भांडारें । येत्नें करीत जावीं ॥ १० ॥
आळंकार भूषणें दिव्याबरें । नाना रत्नें मनोहरें ।
नाना धातु सुवर्णपात्रें । येत्नें करीत जावीं ॥ ११ ॥
पुष्पवाटिका नाना वनें । नाना तरुवराचीं वनें ।
पावतीं करावीं जीवनें । तया वृक्षांसी ॥ १२ ॥
नाना पशूंचिया शाळा । नाना पक्षी चित्रशाळा ।
नाना वाद्यें नाट्यशाळा[5] । गुणी गायेक बहुसाल ॥ १३ ॥
स्वयंपाकगृहें भोजनशाळा । सामग्रीगृहें धर्मशाळा ।
निद्रिस्ताकारणें पडशाळा । विशाळ स्थळें ॥ १४ ॥
नाना परिमळद्रव्यांचीं स्थळें । नाना खाद्यफळाचीं स्थळें ।
नाना रसांचीं नाना स्थळें । येत्नें करीत जावीं ॥ १५ ॥
नाना वस्तांचीं[6] नाना स्थानें । भंगलीं करावीं नूतनें ।
देवाचें वैभव वचनें । किती ह्मणौनि बोलावें ॥ १६ ॥
सर्वां ठाईं अति सादर । आणी दास्यत्वास हि तत्पर ।
कार्यभागाचा विसर । पडणार नाहीं ॥ १७ ॥

---

१ उंच छत्री २ अब्दागीर ३ कोथळी ? करंडा. ४ अमोल्य. ५ 'नाटक' होतें त्याचें "नाट्य" केलें आहे. ६ वस्तूंचीं.

जयंत्या पर्वें मोहोत्साव । असंभाव्य चालवी वैभव ।
जें देखतां स्वर्गीचे देव । तटस्त होती ॥ १८ ॥
ऐसें वैभव चालवावें । आणी नीच दास्यत्व हि करावें ।
पडिले प्रसंगीं सावध असावें । सर्वकाळ ॥ १९ ॥
जें जें कांही पाहिजे । तें तें तत्काळ चि देजे[1] ।
अत्यंत आवडीं कीजे । सकळ सेवा ॥ २० ॥
चरणक्षाळणें स्नानें आच्मनें । गंधाक्षतें वसनें भूषणें ।
आसनें जीवनें नाना सुमनें । धूप दीप नैवेद्य ॥ २१ ॥
शयेनाकारणें उत्तम स्थळें । जळें ठेवावीं सुसीतळें ।
तांबोल गायनें रसाळें । रागरंगें करावीं ॥ २२ ॥
परिमळद्रव्यें आणी फुलेलें । नाना सुगंधेल तेलें ।
खाद्य फळें बहुसालें । सन्निध चि असावीं ॥ २३ ॥
सडे संमार्जनें करावीं । उदकपात्रें उदकें भरावीं ।
वसनें प्रक्षाळून आणावीं । उत्तमोत्तमें ॥ २४ ॥
सकळांचें करावें पारपैत्य[3] । आलयाचें करावें आतित्य[4] ।
ऐसी हे जाणावी सत्य । सातवी भक्ती ॥ २५ ॥
वचनें बोलावीं करुणेचीं । नाना प्रकारें स्तुतीचीं ।
अंतरें[2] निवती सकळाचीं । ऐसें वदावें ॥ २६ ॥
ऐसी हे सातवी भक्ती । निरोपिली येथामती ।
प्रत्यक्ष न घडे तरी चित्तीं । मानसपूजा करावी ॥ २७ ॥
ऐसें दास्य करावें देवाचें । येणें चि प्रकारें सद्गुरूचें ।
प्रत्यक्ष न घडे तरी मानसपूजेचें । कारित जावें ॥ २८ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे दास्यभक्तिनिरूपणनाम समास सप्तम ॥

---

१ "देईजे" होतें, त्यातील "ई" खोडली आहे. २ अंतःकरणें. ३ शासन, शिक्षण, समाचार ४ आतिथ्य, अतिथिसत्कार.

॥ श्रीराम ॥

मागा जालें निरूपण । सातवे भक्तीचें लक्षण ।
आतां ऐका सावधान । आठवी भक्ती ॥ १ ॥
देवासी परम सख्य करावें । प्रेम प्रीतीनें बांधावें ।
आठवे भक्तीचें जाणावें । लक्षण ऐसें ॥ २ ॥
देवास जयाची अत्यंत प्रीती । आपण वर्तावें तेणें रीतीं ।
येणें करितां भगवंतीं । सख्य घडे नेमस्त ॥ ३ ॥
भक्ति भाव आणी भजन । निरूपण आणी कथाकीर्तन ।
प्रेमळ भक्ताचें[1] गायन । आवडे देवा ॥ ४ ॥
आपण तैसें चि वर्तावें । आपणासि तें च आवडावें ।
मनासारिखें होतां स्वभावें । सख्य घडे नेमस्त ॥ ५ ॥
देवाच्या सख्यत्वाकारणें । आपलें सौख्य सोडून देणें ।
अनन्यभावें जीवें प्राणें । शरीर तें हि वेंचावें ॥ ६ ॥
सांडून आपली संसारवेथा । करित जावी देवाची चिंता ।
निरूपण कीर्तन कथा वार्ता । देवाच्या चि सांगाव्या ॥ ७ ॥
देवाच्या सख्यत्वासाठीं । पडाव्या जिवलगांसीं तुटी ।
सर्व अर्पावें सेवटीं । प्राण तो हि वेचावा ॥ ८ ॥
आपुलें आवघें चि जावें । परी देवासीं सख्य राहावें ।
ऐसी प्रीती जिवें भावें । भगवंतीं लागावी ॥ ९ ॥
देव म्हणिजे आपुला प्राण । प्राणासी न करावें निर्वाण[2] ।
परम प्रीतीचें लक्षण । तें हें ऐसें असे ॥ १० ॥
ऐसें परम सख्य धरितां । देवास लागे भक्ताची चिंता ।
पांडव लाखाजोहरीं[3] जळतां[4] । विवरद्वारें काढिले ॥ ११ ॥
देव सख्यत्वें राहे आपणासीं । तें तों वर्म आपणा चि पासीं ।
आपण वचनें बोलावीं जैसीं । तैसीं येती पडसादें[5] ॥ १२ ॥

---

१ "भक्तिचें" होतें तेथें "भक्ताचें" केलें आहे. २ नाश, अंत.
३ लाक्षाग्नि. जोहर= अग्नि ४ "पडतां" चें "जळतां" केलें आहे. ५ प्रतिध्वनि.

आपण असतां अनन्यभावें । देव तत्काळ चि पावे ।
आपण त्रास घेतां जीवें । देव हि त्रासे ॥ १३ ॥
॥ श्लोक ॥ ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम् ॥
जैसें जयाचें भजन । तैसा चि देव हि आपण ।
म्हणौन हें आवघें जाण । आपणा चि पासीं ॥ १४ ॥
आपुल्या मनासारिखें न घडे । तेणें गुणें निष्ठा मोडे ।
तरी गोष्टी आपणाकडे । सहज चि आली ॥ १५ ॥
मेघ चातकावरी वोळेना । तरी चातक पालटेना ।
चंद्र वेळेसि उगवेना । तऱ्ही चकोर अनन्य ॥ १६ ॥
ऐसें असावें सख्यत्व । विवेकें धरावें सत्व ।
भगवतावरील ममत्व । साडूं चि नये ॥ १७ ॥
सखा मानावा भगवत । माता पिता गण गोत ।
विद्या लक्ष्मी धन वित्त । सकळ परमात्मा ॥ १८ ॥
देवावेगळें कोणी नाहीं । ऐसें बोलती सर्व हि ।
परंतु त्यांची निष्ठा कांहीं । तैसी च नसे ॥ १९ ॥
म्हणोनि ऐसें न करावें । सख्य तरी खरें चि करावें ।
अंतरीं सदृढ धरावें । परमेश्वरासी ॥ २० ॥
आपुलिया मनोगताकारणें । देवावरी क्रोधास येणें ।
ऐसीं नव्हेत किं लक्षणें । सख्यभक्तीचीं ॥ २१ ॥
देवाचें जें मनोगत । तें चि आपुलें उचित ।
इच्छेसाठीं भगवत । अंतरूं नये कीं ॥ २२ ॥
देवाचे इच्छेनें वर्तावें । देव करील तें मानावें ।
मग सहज चि स्वभावें । कृपाळु देव ॥ २३ ॥
पाहातां देवाचे कृपेसी । मातेची कृपा कायेसी ।
माता वधी बाळकासी । विपत्तिकाळीं ॥ २४ ॥
देवें भक्त कोण वधिला । कधीं देखिला ना ऐकिला ।
शरणागतास देव जाला । वज्रपंजर[1] ॥ २५ ॥

1 वज्राचा पिंजरा, बळकट आश्रय, आधार.

देव भक्ताचा कैवारी[1] । देव पतितांसि तारी ।
देव होये साहाकारी । अनाथाचा ॥ २६ ॥
देव अनाथाचा कैपक्षी । नाना संकटापासून रक्षी ।
धाविन्नला अंतरसाक्षी । गजेंद्राकारणें ॥ २७ ॥
देव कृपेचा सागरु । देव करुणेचा जळधरु ।
देवासि भक्तांचा विसरु । पडणार नाहीं ॥ २८ ॥
देव प्रीती राखों जाणे । देवासी करावें साजणें[2] ।
जिवलगें आवघीं पिसुणें । कामा न येती ॥ २९ ॥
सख्य देवाचें तुटेना । प्रीती देवाची विटेना ।
देव कदा पालटेना । शरणागतांसी ॥ ३० ॥
ह्मणोनि सख्य देवासी करावें । हितगुज तयासी सांगावें ।
आठवे भक्तीचें जाणावें । लक्षण ऐसें ॥ ३१ ॥
जैसा देव तैसा गुरु । शास्त्रीं बोलिला हा विचारु ।
म्हणौन सख्यत्वाचा प्रकारु । सद्गुरूसीं असावा ॥ ३२ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सख्यभक्तिनिरूपणनाम समास आठवा॥८॥

---

॥ श्रीराम ॥

मागां जालें निरूपण । आठवे भक्तीचें लक्षण ।
आतां ऐका सावधान । भक्ति नवमी ॥ १ ॥
नवमी निवेदन जाणावें । आत्मनिवेदन करावें ।
तें हि सांगिजेल स्वभावें । प्रांजळ करूनि ॥ २ ॥
ऐका निवेदनाचें लक्षण । देवासि वाहावें आपण ।
करावें तत्वविवरण । म्हणिजे कळे ॥ ३ ॥
मी भक्त ऐसें ह्मणावें । आणी विभक्तपणें चि भजावें ।
हें आवघें चि जाणावें । विलक्षण ॥ ४ ॥

---

1 पक्षपाती, कैवारी 2 मैत्री.

लक्षण असोन विलक्षण । ज्ञान असोन अज्ञान ।
भक्त असोन विभक्तपण । तें हें ऐसें ॥ ५ ॥
भक्त ह्मणिजे विभक्त नव्हे । आणी विभक्त ह्मणिजे भक्त नव्हे ।
विचारेंविण कांहीं च नव्हे । समाधान ॥ ६ ॥
तस्मात् विचार करावा । देव कोण तो वोळखावा ।
आपला आपण शोध घ्यावा । अतर्यामीं ॥ ७ ॥
मी कोण ऐसा निवाडा । पाहों जाता तत्वझाडा ।
विचार करिता उघडा । आपण नाहीं ॥ ८ ॥
तत्वें[1] तत्व जेव्हां सरे । तेव्हां आपण कैंचा उरे ।
आत्मनिवेदन येणें प्रकारें । सहज चि जालें ॥ ९ ॥
तत्वरूप सकळ भासे । विवेक पाहाता निरसे ।
प्रकृतिनिरासें आत्मा असे । आपण कैंचा ॥ १० ॥
येक मुख्य परमेश्वरु । दुसरी प्रकृति जगदाकारु ।
तिसरा आपण कैंचा चोरु । [2]आणिला मधें ॥ ११ ॥
ऐसें हें सिद्ध चि असतां । नाथिली लागे देहअहता ।
परंतु विचारें पाहों जातां । कांहीं च नसे ॥ १२ ॥
पाहातां तत्वविवंचना । पिंडब्रह्मांडतत्वरचना ।
विश्वाकारें वर्त्ती नाना । तत्वें विस्तारलीं ॥ १३ ॥
तत्वें[3] साक्षत्वें वोसरतीं । साक्षत्व नुरे आत्मप्रचिती ।
आत्मा असे आदिअंतीं । आपण कैंचा ॥ १४ ॥

---

१ तत्त्वाच्या योगानें तत्त्वाचा जेव्हा नाश होतो=पचभूतात्मक शरीरांतील तत्त्वें तत्त्वांत जेव्हा मिळतात=ज्या तत्त्वापासून जें तत्त्व निर्माण होतें तें पुन्हां त्यांत च लय पावतें, हें ज्ञान झाल्यावर २ लटकी, मिथ्या ३ मी तत्त्वाचा साक्षी आहे, सबरून मी तत्त्वांपासून भिन्न आहे, माझ्या साक्षित्वाच्या योगानें तत्त्वें वोसरतीं, ह्मणजे मी तत्त्वें नाहीं असें ठरतें. " सर्वं खल्विदं ब्रह्म " अशी आत्मप्रतीति आल्यावर मग पाहणें ह्मणजे साक्षित्व तरी कोठें उरतें? सारांश, आदिअंतीं एक च आत्मा आहे, आपण ह्मणून कोणी त्यापासून निराळा नाहीं.

आत्मा येक स्वानंदघन । आणी अहमात्मा हें वचन ।
तरी मग आपण कैंचा भिन्न । उरला तेथें ॥ १५ ॥
सोहं हंसा हें उत्तर । याचें पाहावें अर्थांतर ।
पाहातां आत्मयाचा विचार । आपण कैंचा तेथें ॥ १६ ॥
आत्मा निर्गुण निरंजन । तयासी असावें अनन्य ।
अनन्य ह्मणिजे नाहीं अन्य । आपण कैंचा तेथें ॥ १७ ॥
आत्मा ह्मणिजे तो अद्वैत । जेथें नाहीं द्वैताद्वैत ।
तेथें मीपणाचा हेत । उरेल कैंचा ॥ १८ ॥
आत्मा पूर्णत्वें परिपूर्ण । जेथें नाहीं गुणागुण ।
निखळ निर्गुणीं आपण । कोण कैंचा ॥ १९ ॥
त्वंपद[1] तत्पद असिपद । निरसुनि सकळ भेदाभेद ।
वस्तु ठाईंची अभेद । आपण कैंचा ॥ २० ॥
निरसितां जीवशिवउपाधी । जीवशिव चि कैंचे आधीं ।
स्वरूपीं होतां दृढबुद्धि । आपण कैंचा ॥ २१ ॥
आपण मिथ्या साच देव । देव भक्त अनन्यभाव ।
या वचनाचा अभिप्राव । अनुभवी जाणती ॥ २२ ॥
या नाव आत्मनिवेदन । ज्ञानियांचें समाधान ।
नवमे भक्तीचें लक्षण । निरोपिलें ॥ २३ ॥
पंचभूतांमध्यें आकाश । सकळ देवांमध्यें जगदीश ।
नवविधा भक्तिमध्यें विशेष । भक्ति नवमी ॥ २४ ॥
नवमी भक्ती आत्मनिवेदन । न होतां न चुके जन्ममरण ।
हें वचन सत्य प्रमाण । अन्यथा नव्हे ॥ २५ ॥
ऐसी हे नवविधा भक्ती । केल्यां पाविजे सायोज्यमुक्ती ।
सायोज्यमुक्तीस कल्पांतीं । चळण नाहीं ॥ २६ ॥

---

१ "तत्त्वमसि" या महावाक्यांतील त्वंपद व तत्पद यांचा भेद असिपदानें काढून टाकल्यावर, ह्मणजे तें तूं आहेस असें ऐक्य झाल्यावर, मग अवशिष्ट शुद्ध परब्रह्म उरतें मग तेथें आपण ह्मणून कोणी वेगळा राहत नाहीं

तिहीं मुक्तीस आहे चळण । सायोज्यमुक्ती अचळ जाण ।
त्रैलोक्यास होतां निर्वाण¹ । सायोज्यमुक्ती चळेना ॥ २७ ॥
आवघीया चत्वार मुक्ती । वेदशास्त्रें बोलती ।
तयामधें तीन नासती । चौथी ते अविनाश ॥ २८ ॥
पहिली मुक्ती ते स्वलोकता । दुसरी ते समीपता ।
तिसरी ते स्वरूपता । चौथी सायोज्यमुक्ती ॥ २९ ॥
ऐसिया चत्वार मुक्ती । भगवद्भजनें प्राणी पावती ।
हें चि निरूपण प्रांजळ श्रोतीं । सावध पुढें परिसावें² ॥ ३० ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे आत्मनिवेदनभक्तिनाम समास नवम ॥९॥

---

॥ श्रीराम ॥

मुळीं ब्रह्म निराकार । तेथें स्फूर्तिरूप अहंकार ।
तो पंचभूतांचा विचार । ज्ञानदर्शकीं बोलिला ॥ १ ॥
तो अहकार वायोरूप । तयावरी तेजाचें स्वरूप ।
तया तेजाच्या आधारें आप । आवर्णोदक दाटलें ॥ २ ॥
तया आवर्णोदकाच्या आधारें । धरा³ धरिली फणिवरें⁴ ।
वरती छपन्न कोटी विस्तारें । वसुंधरा हे ॥ ३ ॥
इयेवरी परिघ सप्त सागर । मध्य मेरु माहा थोर ।
अष्ट दिग्पाळ तो परिवार । अंतरें वेष्टित राहिला ॥ ४ ॥
तो सुवर्णाचा माहा मेरु । पृथ्वीस तयाचा आधारु ।
चौऱ्यासी सहस्र विस्तारु । रुंदी तयाची ॥ ५ ॥
उच तरी मर्यादेवेगळा । भूमीमधें सहस्र सोळा ।
तया भोवता वेष्टित पाळा⁵ । लोकालोक⁶ पर्वताचा ॥ ६ ॥

---

१ प्रथम " चळण " होतें त्याचें " निर्वाण " केलें आहे, स. शो. २ आठव्या दशकात. ३ पृथ्वी ४ शेषानें. ५ वेढा. ६ लोकालोक नावाचा पर्वत.

तया ऐलिकडे हिमाचळ । जेथें पांडव गळाले सकळ ।
धर्म आणी तमाळनीळ । पुढें गेले ॥ ७ ॥
जेथें जावया मार्ग नाहीं । मार्गीं पसरले माहा अही ।
सितेसुखें सुखावले ते हि । पर्वतरूप भासती ॥ ८ ॥
तया ऐलिकडे सेवटीं जाण । बद्रिकाश्रम बद्रिनारायण ।
तेथें माहां तापसी निर्वाण । देहत्यागार्थ जाती ॥ ९ ॥
तया ऐलिकडे बद्रिकेदार । पाहोन येती लाहान थोर ।
ऐसा हा अवघा विस्तार । मेरुपर्वताचा ॥ १० ॥
तया मेरुपर्वता पाठारीं । तीन श्रृंगें विर्षमहारी ।
परिवारें राहिले तयावरी । ब्रह्मा विष्णु महेश ॥ ११ ॥
ब्रह्मश्रृंग तो पर्वताचा । विष्णुश्रृंग तो मर्गजाचा ।
शिवश्रृंग तो स्फटिकाचा । कैळास नाम त्याचें ॥ १२ ॥
वैकुंठ नाम विष्णुश्रृंगाचें । सत्यलोक नाम ब्रह्मश्रृंगाचें ।
अमरावती इंद्राचें । स्थळ खालतें ॥ १३ ॥
तेथें गण गंधर्व लोकपाळ । तेतिस कोटी देव सकळ ।
चौदा लोक सुवर्णाचळ । वेष्टित राहिले ॥ १४ ॥
तेथें कामधेनूचीं खिल्लारें । कल्पतरूचीं बनें अपारें ।
अमृताचीं सरोवरें । ठाईं ठाईं उचंबळती ॥ १५ ॥
तेथें उदंड चिंतामणी । हिरे परिसांचिया खाणी ।
तेथें सुवर्णमये धरणी । लखलखायमान ॥ १६ ॥
परम रमणीये फांकती किळा । नवरत्नांचिया पाषाणसिळा ।
तेथें अखंड हरुषवेळा । आनंदमये ॥ १७ ॥
तेथें अमृताचीं भोजनें । दिव्य गंधें दिव्य सुमनें ।
अष्ट नायका गंधर्वगायनें । निरंतर ॥ १८ ॥

---

१ श्रीकृष्ण २ थंडगार हवेपासून होणाऱ्या सुखानें. ३ पर्वतावरील सपाट जागेवर. ४ एका ओळीनें नव्हे, वाकड्या ओळीनें ५ पाचेचा ६ कीळ=प्रभा.

तेथें तारुण्य वोसरेना । रोगव्याधी हि असेना ।
वृधाप्य आणी मरण येना । कदाकाळीं ॥ १९ ॥
तेथें येकाहूनि येक सुंदर । तेथें येकाहूनि येक चतुर ।
धीर उदार आणी शूर । मर्यादेवेगळे ॥ २० ॥
तेथें दिव्यदेह ज्योतिरूपें । विद्युल्यतेसारिखीं स्वरूपें ।
तेथें येश कीर्ति प्रतापें । सिमा सांडिली ॥ २१ ॥
ऐसें तें[1] स्वर्गभुवन । सकळ देवांचें वस्तें स्थान ।
तथा स्थळाचें महिमान । बोलिजे तितुकें थोडें ॥ २२ ॥
येथें ज्या देवाचें भजन करावें । तेथें ते देवलोकीं राहावें ।
स्वलोकता मुक्तीचें जाणावें । लक्षण ऐसें ॥ २३ ॥
लोकीं राहावें ते स्वलोकता । । समीप असावें ते समीपता ।
स्वरूप चि व्हावें ते स्वरूपता । तिसरी मुक्ती ॥ २४ ॥
देवस्वरूप जाला देही । श्रीवत्स[2] कौस्तुभ लक्ष्मी नाहीं ।
स्वरूपतेचें लक्षण पाहीं । ऐसें असे ॥ २५ ॥
सुकृत आहे तों भोगिती । सुकृत सरतां च ढकलून देती ।
आपण देव ते असती । जैसे तैसे ॥ २६ ॥
ह्मणोनि तिनी मुक्ति नासिवंत । सायोज्यमुक्ती ते शाश्वत ।
ते हि निरोपिजेल सावचित्त । ऐक आतां ॥ २७ ॥
ब्रह्मांड नासेल कल्पांतीं । पर्वतासहित जळेल क्षिती ।
तेव्हा अवघे च देव जाती । मा मुक्ति कैच्या तेथें ॥ २८ ॥
तेव्हा निर्गुण परमात्मा निश्चळ । निर्गुण भक्ती ते[3] हि अचळ ।
सायोज्यमुक्ति ते केवळ । जाणिजे ऐसी ॥ २९ ॥
निर्गुणीं अनन्य असता । तेणें होये सायोज्यता ।
सायोज्यता ह्मणिजे स्वरूपता । निर्गुण भक्ती ॥ ३० ॥

---

१ " तें " समासांत आहे २ स्वरूपता मुक्ति ज्यास मिळते त्यास श्रीविष्णूचें स्वरूप प्राप्त होतें, परंतु त्या स्वरूपाच्या ठिकाणीं श्रीवत्सलाछन, कौस्तुभ मणि आणि लक्ष्मी या तीन गोष्टी कमी असतात. या तीन गोष्टी केवळ श्रीविष्णूच्या च ठिकाणीं असतात. ३ " ते हि " समासात आहे

सगुण भक्ति ते चळे । निर्गुण भक्ति ते न चळे ।
हें आवघें प्राजळ कळे । सद्गुरु केलिया ॥ ३१ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे मुक्तिचतुष्टयेनाम चतुर्थ दशके समास दशम ॥ १० ॥

---

## ॥ दशक पांचवा मंत्रांचा ॥ ५ ॥

॥ श्रीराम ॥

जय जय जी सद्गुरु पूर्णकामा । परमपुरुषा आत्मयारामा ।
अनुर्वाच्य तुमचा महिमा । वर्णिला नवचे ॥ १ ॥
जें वेदांस सांकडें । जें शब्दासि कानडें ।
तें सत्शिष्यास रोकडें । अलभ्य लाभे ॥ २ ॥
जें योगियांचें निजवर्म । जें शंकराचें निजधाम ।
जें विश्रांतीचें निजविश्राम । परम गुह्य अगाध ॥ ३ ॥
तें ब्रह्म तुमचेनि योगें । स्वयें आपण चि होइजे आगें ।
दुर्घट संसाराचेनि पांगें । पांगिजेना सर्वथा ॥ ४ ॥
आता स्वामिचेनि लडिवाळपणें । गुरुशिष्याचीं लक्षणें ।
सांगिजेती तेणें प्रमाणें । मुमुक्षें शरण जावें ॥ ५ ॥
गुरु तो सकळांसी ब्राह्मण । जर्‍ही तो जाला क्रियाहीन ।
तरी तयासी च शरण । अनन्यभावें असावें ॥ ६ ॥
अहो या ब्राह्मणाकारणें । अवतार घेतला नारायेणें ।
विष्णूनें श्रीवत्स मिरविणें । तेथें इतर ते किती ॥ ७ ॥
ब्राह्मणवचनें प्रमाण । होती शूद्रांचे ब्राह्मण ।
धातुपाषाणीं देवपण । ब्राह्मणाचेनि मंत्रें ॥ ८ ॥
मुंजीबंधनेंविरहित । तो शूद्र चि निभ्रांत ।
द्विजन्मी ह्मणोनि संतत । द्विज ऐसें नाम त्याचें ॥ ९ ॥

---

१ कठिण. २ दुर्बोध. ३ पंगुपणामुळें, परस्वाधीनतेमुळें, अडचणीमुळें ४ पंगु होत नाहीं, वाताहत होत नाहीं. ५ सतंत्र, स्वतंत्र, निराळे.

सकळांसि पूज्य ब्राह्मण । हें मुख्य देवाज्ञा प्रमाण ।
वेदविरहित तें अप्रमाण । अप्रिये भगवता ॥ १० ॥
ब्राह्मणीं योग याग व्रतें दानें । ब्राह्मणीं सकळ तीर्थाटणें ।
कर्ममार्ग ब्राह्मणाविणें । होणार नाहीं ॥ ११ ॥
ब्राह्मण वेद मूर्तिमंत । ब्राह्मण तो चि भगवंत ।
पूर्ण होती मनोरथ । विप्रवाक्येंकरूनी ॥ १२ ॥
ब्राह्मणपूजनें शुद्ध वृत्ती । होऊन जडे भगवतीं ।
ब्राह्मणतीर्थें उत्तम गती । पावती प्राणी ॥ १३ ॥
लक्षभोजनीं पूज्य ब्राह्मण । आँन योतिसि पुसे कोण ।
परी भगवंतासि भाव प्रमाण । येरा चाड नाहीं ॥ १४ ॥
असो ब्राह्मणा सुरवर वंदिती । तेथें मानव बापुडें किती ।
जरी ब्राह्मण मूढमती । तरी तो जगद्वंद्य ॥ १५ ॥
अंत्येज शब्दज्ञाता बरवा । परी तो नेऊन काये करावा ।
ब्राह्मणासंन्निध पुजावा । हें तों न घडे कीं ॥ १६ ॥
जें जनावेगळें केलें । तें वेदें[3] अव्हेरिलें ।
ह्मणोनि तयासि नाम ठेविलें । पाषांडमत ॥ १७ ॥
असो जे हरिहरदास । तयास ब्राह्मणीं विस्वास ।
ब्राह्मणभजनें बहुतास । पावन केलें ॥ १८ ॥
ब्राह्मणें पाविजे देवाधिदेवा । तरी किमर्थ सद्गुरु करावा ।
ऐसें ह्मणाल तरी निजठेवा । सद्गुरुविण नाहीं ॥ १९ ॥
स्वधर्मकर्मीं पूज्य ब्राह्मण । परी ज्ञान नव्हे सद्गुरुविण ।
ब्रह्मज्ञान नस्तां सीण । जन्ममृत्य चुकेना ॥ २० ॥
सद्गुरुविण ज्ञान काहीं । सर्वथा होणार नाहीं ।
अज्ञान प्राणी प्रवाहीं । वाहात चि गेले ॥ २१ ॥

---

१ अन्य २ " ति " समासात आहे प्रथम " आनयासि " एवढें च होतें ३ " देवें " चें " वेदें " केलें आहे ४ ' जो " चा " जे " केला आहे. ५ ब्रह्मज्ञान.

ज्ञानविरहित जें जें केलें । तें तें जन्मासि मूळ जालें ।
ह्मणौनि सद्गुरूचीं पाउलें । सदृढ धरावीं ॥ २२ ॥
जयास वाटे देव पाहावा । तेणें सत्संग धरावा ।
सत्संगेंविण देवाधिदेवा । पाविजेत नाहीं ॥ २३ ॥
नाना साधनें बापुडीं । सद्गुरुविण करिती वेडीं ।
गुरुकृपेविण कुडकुडीं । वेर्थ चि होती ॥ २४ ॥
कार्तिकस्नानें माघस्नानें । व्रतें उद्यापनें दानें ।
गोरांजनें[1] धूम्रपानें[2] । साधिती पंचाग्नी[3] ॥ २५ ॥
हरिकथा पुराणश्रवण । आदरें करिती निरूपण ।
सर्व तीर्थें परम कठिण । फिरती प्राणी ॥ २६ ॥
झळफळित देवतार्चनें । स्नानें संध्या दर्भासनें ।
टिळे माळा गोपीचंदनें । ठसे श्रीमुद्रांचे ॥ २७ ॥
अर्घ्यपात्रें संपुष्ट गोकर्णें । मंत्रयंत्रांचीं[4] तांब्रपर्णें ।
नाना प्रकारीचीं उपकर्णें । साहित्यशोभा ॥ २८ ॥
घंटा घणघणा वाजती । स्तोत्रें स्तवनें आणी स्तुती ।
आसनें मुद्रा ध्यानें करिती । प्रदक्षणा नमस्कार ॥ २९ ॥
पंचायेतन पूजा केली । मृत्तिकेचीं लिंगें लाखोली ।
केलें नारिकेळें भारिली । संपूर्ण सांग पूजा ॥ ३० ॥
उपोषणें निष्ठा नेम । परम सायासीं केलें कर्म ।
फळ चि पावती वर्म । चुकले प्राणी ॥ ३१ ॥
येज्ञादिकें कर्मं केलीं । इदइं फळाशा कल्पिली ।
आपले इछेनें घेतली । सूंति[5] जन्माची ॥ ३२ ॥

---

१ भगवत्प्रीत्यर्थ स्वतःस जाळून घेणें. २ झाडास उलटें टांगून घेऊन, खालीं धूर केलेला पिऊन, तप करणें ३ भर उन्हाळ्यात चहूंकडे अग्नि पेटवून मध्यें बसणें व मस्तकीं सूर्यताप सहन करणें, या साधनाचें नाव. ४ ग्रहादिकाची आराधना करण्यासाठीं तांब्याच्या पत्र्यावर मंत्राक्षरासह कांहीं विशिष्ट आकृत्या काढतात त्यास यंत्रें ह्मणतात. ५ विसार, बयाणा.

करूनि नाना सायास । केला चौदा विद्यांचा अभ्यास ।
रिद्धि सिद्धि सावकास । वोळल्या जरी ॥ ३३ ॥
तरी सद्गुरुकृपेविरहित । सर्वथा न घडे स्वहित ।
येमपुरीचा अनर्थ । चुकेना येणें ॥ ३४ ॥
जव नाहीं ज्ञानप्राप्ती । तव चुकेना यातायाती ।
गुरुकृपेविण अधोगती । गर्भवास चुकेना ॥ ३५ ॥
ध्यान धारणा मुद्रा आसन । भक्ती भाव आणी भजन ।
सकळ हि फोल ब्रह्मज्ञान । जव तें प्राप्त नाहीं ॥ ३६ ॥
सद्गुरुकृपा न जोडे । आणी भलतीचकडे वावडे[1] ।
जैसें[2] आंधळें[2] चाचरोन पडे । गारीं[3] आणी गेंडधरा[4] ॥ ३७ ॥
जैसें नेत्रीं घालितां अंजन । पडे दृष्टीस निधान ।
तैसें सद्गुरुवचनें ज्ञान- । प्रकाश होये ॥ ३८ ॥
सद्गुरुविण जन्म निर्फळ । सद्गुरुविण दुःख सकळ ।
सद्गुरुविण तळमळ । जाणार नाहीं ॥ ३९ ॥
सद्गुरुचेनि अभयंकरें । प्रगट होइजे ईश्वरें ।
संसारदुःखें अपारें । नासोन जातीं ॥ ४० ॥
मागें जाले थोर थोर । संत महंत मुनेश्वर ।
तयांस हि ज्ञानविज्ञानविचार । सद्गुरुचेनी ॥ ४१ ॥
श्रीरामकृष्ण आदिकरूनी । अति तत्पर गुरुभजनीं ।
सिद्ध साधु आणी संतजनीं । गुरुदास्य केलें ॥ ४२ ॥
सकळ सृष्टीचे चाळक । हरिहरब्रह्मादिक ।
ते हि सद्गुरुपदीं रंक । महत्वा नें चढेती[5] ॥ ४३ ॥
असो जयासि मोक्ष व्हावा । तेणें सद्गुरु करावा ।
सद्गुरुविण मोक्ष पावावा । हें कल्पांतीं न घडे ॥ ४४ ॥

---

१ भटकतो. २ "सा" चा "सें" व "ळा" चा "ळें" केलें आहे. ३ खाच, खळगा. ४ खाच, खळगा, आड, विहीर. ५ "महत्व चढेना" असा चरण प्रथम होता.

आतां सद्गुरु ते कैसे । नव्हेति इतरां गुरु ऐसे ।
जयाचे कृपेनें प्रकाशे । शुद्ध ज्ञान ॥ ४५ ॥
त्या सद्गुरूची वोळखण । पुढिले समासीं निरूपण ।
बोलिलें असे श्रोतीं श्रवण । अनुक्रमें करावें ॥ ४६ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे गुरुनिश्चयेनाम समास प्रथम ॥ १ ॥

---

॥ श्रीराम ॥

जे करामती दाखविती । ते हि गुरु ह्मणिजेती ।
परंतु सद्गुरु नव्हेती । मोक्षदाते ॥ १ ॥
[1]सभामोहन [2]भुररीं चेटकें । साबरमंत्र [3]कौटालें अनेकें ।
नाना चमत्कार कौतुकें । असभाव्य सांगती ॥ २ ॥
सांगती औषधीप्रयोग । कां सुवर्णधातूचा मार्ग ।
दृष्टिबंधनें लागवेग । अभिळापांचा ॥ ३ ॥
[6]साहित संगीत [7]रागज्ञान । गीत नृत्य तान मान ।
नाना वाद्यें सिकविती जन । ते हि येक गुरु ॥ ४ ॥
विद्या सिकविती पंचाक्षरी । ताडेतोडे नानापरी ।
का पोट भरे जयावरी । ते विद्या सिकविती ॥ ५ ॥
जे यातीचा जो व्यापार । सिकविती भरावया उदर ।
ते हि गुरु परी साचार । सद्गुरु नव्हेती ॥ ६ ॥
आपली माता आणी पिता । ते[8] हि गुरु चि तत्वता ।
परी पैलपार पावविता । तो सद्गुरु वेगळा ॥ ७ ॥
गाईत्रीमंत्राचा [9]उंचारु । सांगे तो साचार कुळगुरु ।
परी ज्ञानेंविण पैलपारु । पाविजेत नाहीं ॥ ८ ॥

---

१ नजरबंद. २ चेटूक, चेडें ३ चेटूक. ४ चेटूक विद्या. ५ नुसत्या दृष्टीनें इच्छित वस्तु तत्काळ प्राप्त करून घेण्याचा मार्ग सांगती ६ साहित्य, अलंकारशास्त्र ७ "राग" समासांत स. शो ८ "तो" चा "ते" केला आहे ९ "विचारु" असा मूळ पाठ होता "वि-" बद्दल 'उ' समासांत. हा स. शो.

जो ब्रह्मज्ञान उपदेसी । अज्ञानअंधारें निरसी ।
जीवात्मयां परमात्मयासी । ऐक्यता करी ॥ ९ ॥
विघडले[1] देव आणी भक्त । जीवशिवपणें द्वैत ।
तया देवभक्ता येकातें[2] । करी तो सद्गुरु ॥ १० ॥
भवव्याघ्रें घालूनि उडी । गोवत्सास तडातोडी ।
केली देखोनि सीघ्र सोडी । तो सद्गुरु जाणावा ॥ ११ ॥
प्राणी मायाजाळीं पडिलें । संसारदुःखें दुःखवलें ।
ऐसें जेणें मुक्त केलें । तो सद्गुरु जाणावा ॥ १२ ॥
वासनानदीमाहांपुरीं । प्राणी बुडतां ग्लाती[3] करी ।
तेथें उडी घालूनि तारी । तो सद्गुरु जाणावा ॥ १३ ॥
गर्भवास अति साकडी । इछाबंधनाची बेडी ।
ज्ञान देऊन सीघ्र सोडी । तो सद्गुरु स्वामी ॥ १४ ॥
फोडूनि शब्दाचें अंतर । वस्तु दाखवी निजसार ।
तो चि गुरु माहेर । अनाथाचें ॥ १५ ॥
जीव येकदेसी बापुडें । तयास ब्रह्म चि करी रोकडें ।
फेडी संसारसाकडें । वचनमात्रें ॥ १६ ॥
जें वेदाचे अभ्यांतरीं । तें काढून अपल्यापरी ।
शिष्यश्रवणीं कवळ भरी । उद्गारवचनें ॥ १७ ॥
वेद शास्त्र माहानुभाव । पाहातां येक चि अनुभव ।
तो चि येक गुरुराव । ऐक्यरूपें ॥ १८ ॥
संदेह निःशेष जाळी । स्वधर्म आदरें प्रतिपाळी ।
वेदविरहित टवाळी । करूं च नेणे ॥ १९ ॥
जें जें मन आगिकारी । तें तें स्वयें मुक्त करी ।
तो गुरु नव्हे भिकारी । झडे[6] आला ॥ २० ॥

---

१ विभक्त झाले. २ एकरूप. ३ गयावया. ४ ग्रास, घास. ५ मनसोक्त ६ लोभाविष्टपणें मागें लागला.

शिष्यास न लविती साधन । न करविती इंद्रियेंदमन ।
ऐसे गुरु आडक्याचे तीन । मिळाले तरी त्यजावे ॥ २१ ॥
जो कोणी ज्ञान बोधी । समूळ अविद्या छेदी ।
इंद्रियेंदमन प्रतिपादी । तो सद्गुरु जाणावा ॥ २२ ॥
येक द्रव्याचे विकिले । येक शिष्याचे आंखिले ।
अति दुराशेनें केले । दीनरूप ॥ २३ ॥
जें जें रुचे शिष्या मनीं । तैसी च करी मनधरणी ।
ऐसी कामना पापिणी । पडली गळा ॥ २४ ॥
जो गुरु भीडसारु । तो अद्धमाहून अद्धम थोरु ।
चोरटा मैंद पामरु । द्रव्यभोंदु ॥ २५ ॥
जैसा वैद्य दुराचारी । केली सर्वस्वें बोहरी ।
आणी सेखीं भीड करी । घांतघेणा ॥ २६ ॥
तैसा गुरु नसावा । जेणें अंतर पडे देवा ।
भीड करूनिया गोवा । घाली बधनाचा ॥ २७ ॥
जेथें शुद्ध ब्रह्मज्ञान । आणी स्थूळ क्रियेचें साधन ।
तो चि सद्गुरु निधान । दाखवी डोळां ॥ २८ ॥
देंखणें दाखविती आदरें । मंत्र फुकिती कर्णद्वारें ।
इतुकें च ज्ञान तें पामरें । अंतरलीं भगवता ॥ २९ ॥
बाणे तिहींची खूण । तो चि गुरु सुलक्षण ।
तेथें चि रिघावें शरण । अत्यादरें मुमुक्षें ॥ ३० ॥
अद्वैतनिरूपणें अगाध वक्ता । परी विषईं लोलंगता ।
ऐसिया गुरूचेनि सार्थकता । होणार नाहीं ॥ ३१ ॥
जैसा निरूपणसमयो । तैसें चि मन हि करी वांयो ।
कृतबुद्धीचा जयो । जाला च नाहीं ॥ ३२ ॥

---

१ अंकित झाले २ राख ३ घातकी ४ गुता ५ भपका ६ गुरुप्रतीति शास्त्रप्रतीति व आत्मप्रतीति ७ वायफट. ( निश्चयात्मक ज्ञान नसल्याकारणानें जसा प्रसंग पडेल तसें वायफट बोलणारा. )

निरूपणीं सामर्थ्य सिद्धी । श्रवण होता दुराशा बाधी ।
नाना चमत्कारें बुद्धी । दडळू[1] लागे ॥ ३३ ॥
पूर्वी ज्ञाते विरक्त भक्त । तयासि सादृश्य भगवत ।
आणी सामर्थ्य हि अद्भुत । सिद्धीचेनि योगें ॥ ३४ ॥
ऐसें तयाचें सामर्थ्य । आमुचें ज्ञान चि नुसदें वेर्थ ।
ऐसा सामर्थ्याचा स्वार्थ । अतरीं वसे[2] ॥ ३५ ॥
निशेष दुराशा तुटे । तरी च भगवंत भेटे ।
दुराशा धरितां ते वोखटे । शब्दज्ञाते कामिक ॥ ३६ ॥
बहुत ज्ञातीं[3] नागवलीं । कामनेनें वेडीं केलीं ।
कामना इछिता च मेलीं । बापुडीं मूर्खें ॥ ३७ ॥
निशेष कामनारहित । ऐसा तो विरुळा सत ।
अवघ्या वेगळें मत । अक्षै ज्याचें ॥ ३८ ॥
अक्षै ठेवा सर्वकाळाचा । परी पांगडा फिटेना शरीराचा ।
तेणें मार्ग ईश्वराचा । चुकोनि जाती ॥ ३९ ॥
सिद्धि आणी सामर्थ्य जालें । सामर्थ्यें देहास महत्व आलें ।
तेणें बेंचाडें बळकावलें । देहबुद्धीचें ॥ ४० ॥
सांडूनि अक्षै सुख । सामर्थ्य इछिती ते मूर्ख ।
कामनेसारिखें दुःख । आणीक काहीं च नाहीं ॥ ४१ ॥
ईश्वरेंविण जे कामना । तेणें चि गुणें नाना यातना ।
पावती होती पतना । वरपडे प्राणी ॥ ४२ ॥
होता शरीरासी अंत । सामर्थ्य हि निघोन जात ।
सेखीं अंतरला भगवत । कामनागुणें ॥ ४३ ॥

---

१ डळमळूं २ " पूर्वी जे ईश्वरतुल्य सामर्थ्यवान् भक्त होऊन गेले, त्याचें सामर्थ्य कोणीकडे आणि माझें ज्ञान तें काय ' अशा रीतीनें सामर्थ्याचा अभिलाष धरून, भगवद्भजन करणारास भगवत्प्राप्ति होत नाहीं, असा ३४ व ३५ या ओव्यांचा भावार्थ आहे ३ ज्ञानी माणसें ४ आत्माख्य धन सर्वांचें आहे. ५ पंगुत्व,, अधीनत्व, ममत्व. ६ जुबाड.

म्हणोनि निःकामताविचारु । दृढबुद्धीचा निर्धारु ।
तो चि सद्गुरु पैलपारु । पाववी भवाचा ॥ ४४ ॥
मुख्य सद्गुरूचें लक्षण । आधीं पाहिजे विमळ ज्ञान ।
निश्चयाचें समाधान । स्वरूपस्थिती ॥ ४५ ॥
याहिवरी वैराग्य प्रबळ । वृत्ति उदास[1] केवळ ।
विशेष आचारें निर्मळ । स्वधर्मविषईं ॥ ४६ ॥
याहिवरी अध्यात्मश्रवण । हरिकथा निरूपण ।
जेथें परमार्थविवरण । निरंतर ॥ ४७ ॥
जेथें सारासारविचार । तेथें होये जगोद्धार ।
नवविधा भक्तीचा आधार । बहुत जनासी ॥ ४८ ॥
म्हणोनि नवविधा भजन । जेथें प्रतिष्ठिलें साधन ।
हें सद्गुरूचें लक्षण । श्रोतीं वोळखावें ॥ ४९ ॥
अंतरीं शुद्ध ब्रह्मज्ञान । बाह्य निष्ठेचें भजन ।
तेथें बहु भक्त जन । विश्रांति पावती ॥ ५० ॥
नाहीं उपासनेचा आधार । तो परमार्थ निराधार ।
कर्मेंविण अनाचार । भ्रष्ट होती ॥ ५१ ॥
म्हणोनि ज्ञान वैराग्य आणि भजन । स्वधर्मकर्म आणि साधन ।
कथा निरूपण श्रवण मनन । नीति न्याये मर्यादा ॥ ५२ ॥
यामधें येक उणें असे । तेणें तें विलक्षण दिसे ।
म्हणौन सर्व हि विलसे । सद्गुरुपासीं ॥ ५३ ॥
तो बहुतांचें पाळणकर्ता । त्यास बहुतांची असे चिंता ।
नाना साधनें समर्था । सद्गुरुपासीं ॥ ५४ ॥
साधनेंविण परमार्थ प्रतिष्ठे । तो मागुता सर्वं च भ्रष्टे ।
याकारणें दुरीद्रष्टे । माहानुभाव ॥ ५५ ॥
आचार उपासना सोडिती । ते भ्रष्ट अभक्त दिसती ।
जळो तयांची महती । कोण पुसे ॥ ५६ ॥

---

१ "उदासिन" होतें त्याचें "उदास" केलें आहे.

कर्म उपासनेचा अभाव । तेथें भक्तांवेसि जाला ठाव ।
तो कानकोंडा समुदाव । प्रपंचीं हांसती ॥ ५७ ॥
नीच यातीचा गुरु । तो हि कानकोंडा विचारु ।
ब्रह्मसभेस जैसा चोरु । तैसा दडे ॥ ५८ ॥
ब्रह्मसभे देखतां । त्याचें तीर्थ नये घेतां ।
अथवा प्रसादें सेवितां । प्राँश्चित पडे ॥ ५९ ॥
तीर्थप्रसादाची सांडी केली । तेथे नीचता दिसोन आली ।
गुरुभक्ति ते सटवेली । येकायेकी ॥ ६० ॥
गुरूची मर्यादा राखतां । ब्राह्मण क्षोभती तत्वता ।
तेथें ब्राह्मण्य रक्षूं जातां । गुरुक्षोभ घडे ॥ ६१ ॥
ऐसीं सांकडीं दोहींकडे । तेथें प्रस्तावा घडे ।
नीच यातीस गुरुत्व न घडे । याकारणें ॥ ६२ ॥
तथापि आवडी घेतली जीवें । तरी आपण चि भ्रष्टावें ।
बहुत जनांसी भ्रष्टवावें । हें तों दूषण चि कीं ॥ ६३ ॥
आतां असो हा विचारु । स्वयातीचा पाहिजे गुरु ।
नाहीं तरी भ्रष्टाकारु । नेमस्त घडे ॥ ६४ ॥
जे जे कांहीं उत्तम गुण । तें तें सद्गुरूचें लक्षण ।
तथापी सांगों वोळखण । होये जेणें ॥ ६५ ॥
येक गुरु येक मंत्रगुरु । येक यंत्रगुरु येक तांत्रगुरु ।
येक वस्तादगुरु येक राजगुरु । म्हणती जनीं ॥ ६६ ॥
येक कुळगुरु येक मानिला गुरु । येक विद्यागुरु येक कुविद्यागुरु ।
येक असद्गुरु येक यातिगुरु । दडकर्ते ॥ ६७ ॥
येक मातागुरु येक पितागुरु । येक राजागुरु येक देवगुरु ।
येक बोलिजे जगद्गुरु । सकळकळा ॥ ६८ ॥

---

१ बहुकण्यास २ मूळ " उच्छिष्ट " पाठ होता त्याचा " प्रसाद " असा सं शो. ३ प्रायश्चित्त. ४ क्षय पावली ५ " तंत्र " होतें त्याचें " तात्र " केलें आहे

ऐसे हे सत्रा[1] गुरु । याहिवेगळे आणीक गुरु
ऐक तयांचा विचारु । सांगिजेल ॥ ६९ ॥
येक स्वप्नगुरु येक दीक्षागुरु । येक म्हणती प्रतिमागुरु ।
येक म्हणती स्वयें गुरु । आपला आपण ॥ ७० ॥
जे जे यातीचा जो व्यापारु । ते ते त्याचे तितुके गुरु ।
याचा पाहातां विचारु । उदंड आहे ॥ ७१ ॥
असो ऐसे उदंड गुरु । नाना मतांचा विचारु ।
परी जो मोक्षदाता सद्गुरु । तो वेगळा चि असे ॥ ७२ ॥
नाना सद्विद्येचे[2] गुण । याहिवरी कृपाळूपण ।
हें सद्गुरूचें लक्षण । जाणिजे श्रोतीं ॥ ७३ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे गुरुलक्षणनाम समास द्वितीये ॥ २ ॥

---

॥ श्रीराम ॥

मागां सद्गुरूचें लक्षण । विशद केलें निरूपण ।
आतां सच्छिष्याची[3] वोळखण । सावध ऐका ॥ १ ॥
सद्गुरुविण सच्छिष्य । तो वायां जाय निशेष ।
कां सच्छिष्येंविण विशेष । सद्गुरु सिणे ॥ २ ॥
उत्तम भूमि शोधिली शुद्ध । तेथें बीज पेरिलें किडखाद ।
कां तें उत्तम बीज परी समध । खडकेंसि पाडिला ॥ ३ ॥
तैसा सच्छिष्य तें सत्पात्र । परंतु गुरु सांगे मंत्र तंत्र ।
तेथें अत्र ना परत्र । कांहीं च नाहीं ॥ ४ ॥
अथवा गुरु पूर्ण कृपा करी । परी शिष्य अनाधिकारी ।
भाग्यपुरुषाचा भिकारी । पुत्र जैसा ॥ ५ ॥
तैसें येकाविण येक । होत असे निरार्थक ।
परलोकींचें सार्थक । तें दुर्‍हावे ॥ ६ ॥

---

१ सहासष्ट ते अडुसष्ट ओव्यांत सतरा प्रकारचे गुरु सांगितले आहेत २ मुळांत " व्द्य चे " आहे. ३ प्रथम मुसतें " शिष्याची " होतें.

ह्मणौनि सद्गुरु आणी सच्छिष्य । तेथें न लगती सायास ।
त्यां उभयताचा हव्यास । पुरे येकसरा ॥ ७ ॥
सुभूमि आणी उत्तम कण । उगवेना प्रजन्येंविण ।
तैसें अध्यात्मनिरूपण । नस्तां होये ॥ ८ ॥
सेत पेरिलें आणी उगवलें । परतु निगेविण गेलें ।
साधनेंविण तैसें जालें । साधकासी ॥ ९ ॥
जंवरी पीक आपणास भोगे । तवरी अवघें चि करणें लागे
पीक आलियां हि उगें । राहों चि नये ॥ १० ॥
तैसें आत्मज्ञान जालें । पैरी साधन पाहिजे केलें ।
येक वेळ उदंड जेविलें । तऱ्हीं सामग्री पाहिजे ॥ ११ ॥
ह्मणौन साधन अभ्यास आणी सद्गुरु ।
सच्छिष्य आणी सच्छास्त्रविचारु ।
सत्कर्म सद्वासना पारु । पाववी भवाचा ॥ १२ ॥
सद्वुपासना सत्कर्म । सत्क्रिया आणी स्वधर्म ।
सत्संग आणी नित्य नेम । निरंतर ॥ १३ ॥
ऐसें हें अवघें चि मिळे । तरी च विमळ ज्ञान निवळे ।
नाहीं तरी पाषांड संचरे बळें । समुदाईं ॥ १४ ॥
येथें शब्द नाहीं शिष्यासी । हें अवघें सद्गुरुपासीं ।
सद्गुरु पालटी अवगुणासी । नाना येत्नेंकरूनी ॥ १५ ॥
सद्गुरुचेनि असच्छिष्य पालटे । परंतु सच्छिष्यें असद्गुरु न पालटे ।
कां जें थोरपण तुटे । ह्मणौनियां ॥ १६ ॥
याकारणें सद्गुरु पाहिजे । तरी च सन्मार्ग लाहिजे ।
नाहीं तरी होईजे । पाषांडा वरपडे ॥ १७ ॥

---

१ पीक हातीं येईपर्यंत. २ प्रथम " तऱ्ही " होतें त्याचें " परी " हा स. शो. ३ सद्वुपासना. ४ शिष्याच्या योगानें गुरु जर पालटला तर गुरुचा मोठेपणा तो काय उरला ?

येथें सद्गुरु चि कारण । येर सर्व निःकारण ।
तथापि सांगों वोळखण । सच्छिष्याची ॥ १८ ॥
मुख्य सच्छिष्याचें लक्षण । सद्गुरुवचनीं विश्वास पूर्ण ।
अनन्यभावें शरण । त्या नाव सच्छिष्य ॥ १९ ॥
शिष्य पाहिजे निर्मळ । शिष्य पाहिजे आचारसीळ ।
शिष्य पाहिजे केवळ । विरक्त अनुतापी ॥ २० ॥
शिष्य पाहिजे निष्ठावंत । शिष्य पाहिजे सुचिष्मंत ।
शिष्य पाहिजे नेमस्त । सर्वप्रकारीं ॥ २१ ॥
शिष्य पाहिजे साक्षपी विशेष । शिष्य पाहिजे परम दक्ष ।
शिष्य पाहिजे अलक्ष । लक्षी ऐसा ॥ २२ ॥
शिष्य पाहिजे अति धीर । शिष्य पाहिजे अति उदार ।
शिष्य पाहिजे अति तत्पर । परमार्थविषईं ॥ २३ ॥
शिष्य पाहिजे परोपकारी । शिष्य पाहिजे निर्मत्सरी ।
शिष्य पाहिजे अर्थांतरीं । प्रवेशकर्ता ॥ २४ ॥
शिष्य पाहिजे परम शुद्ध । शिष्य पाहिजे परम सावध ।
शिष्य पाहिजे अगाध । उत्तम गुणाचा ॥ २५ ॥
शिष्य पाहिजे प्रज्ञावंत । शिष्य पाहिजे प्रेमळ भक्त ।
शिष्य पाहिजे नीतिवंत । मर्यादेचा ॥ २६ ॥
शिष्य पाहिजे युक्तिवंत । शिष्य पाहिजे बुद्धिवंत ।
शिष्य पाहिजे संतासंत । विचारघेता ॥ २७ ॥
शिष्य पाहिजे धारिष्टाचा । शिष्य पाहिजे दृढ व्रताचा ।
शिष्य पाहिजे उत्तम कुळींचा । पुण्यसीळ ॥ २८ ॥
शिष्य असावा सात्विक । शिष्य असावा भजक ।
शिष्य असावा साधक । साधनकर्ता ॥ २९ ॥
शिष्य असावा विश्वासी । शिष्य असावा कायाक्लेशी ।
शिष्य असावा परमार्थासी । वाढऊं जाणे ॥ ३० ॥

१ उद्योगी. २ ब्रह्म. ३ सदसत्, नित्यानित्य.

शिष्य असावा स्वतंत्र । शिष्य असावा जगमित्र ।
शिष्य असावा सत्पात्र । सर्व गुणें ॥ ३१ ॥
शिष्य असावा सद्विद्येचा[1] । शिष्य असावा सद्भावाचा ।
शिष्य असावा अंतरींचा । परम शुद्ध ॥ ३२ ॥
शिष्य नसावा अविवेकी । शिष्य नसावा गर्भसुखी ।
शिष्य असावा संसारदुःखी । संतप्त देही ॥ ३३ ॥
जो ससारदु.खें दुःखवला । जो त्रिविधतापें पोळला ।
तो चि अधिकारी जाला । परमार्थविषीं ॥ ३४ ॥
बहु दुःख भोगिलें जेणें । तयासी च परमार्थ बाणे ।
ससारदुःखाचेनि गुणें । वैराग्य उपजे ॥ ३५ ॥
जया ससाराचा त्रास । तयासी च उपजे विस्वास ।
विस्वासबळें दृढ कास । धरिली सद्गुरूची ॥ ३६ ॥
अविस्वासें कास सोडिली । ऐसीं बहुतेकं[2] भवीं बुडालीं ।
नाना जळचरीं तोडिलीं । मध्यें चि सुखदुःखें[3] ॥ ३७ ॥
या कारणें दृढ विस्वास । तो चि जाणावा सच्छिष्य ।
मोक्षाधिकारी विशेष । आग्रगण्यु ॥ ३८ ॥
जो सद्गुरुवचनें निवाला । तो सायोज्यतेचा आखिला[4] ।
ससारपागें पागिला । न वचे कदा ॥ ३९ ॥
सद्गुरुहून देव मोठा । जयास वाटे तो करंटा ।
सुटला वैभवाचा फांटा । सामर्थ्यविसें ॥ ४० ॥
सद्गुरुस्वरूप तें सत[6] । आणी देवास मांडिलें[7] कल्पांत ।
तेथें कैचें उरेल सामर्थ्य । हरिहराचें ॥ ४१ ॥

---

१ मुळांत " व द्येचा " आहे. २ प्रथम " बहुतें " असून समासांत " क " लिहिला आहे. ३ भवसागरांतील सुखदुःखरूप जळचरांनीं त्यांना तोडिलें. ४ सायुज्यतामुक्तीनें त्याला आपला म्हटलें, ती मुक्ति त्याला निश्चित प्राप्त होते. ५ संसारांतील संकटांनीं तो कधीं व्यथित होत नाहीं. ६ नित्य. ७ " मांडला ". चें " मांडेल " केलें आहे.

म्हणौन सद्गुरुसामर्थ्य आधीक । जेथें आटती ब्रह्मादिक ।
अल्पबुद्धी मानवी रंक । तयांसि हें कळेना ॥ ४२ ॥
गुरुदेवास बराबरी । करी तो शिष्य दुराचारी ।
भ्रांति बैसली अभ्यांतरीं । सिद्धांत नेणवे ॥ ४३ ॥
देव मनुषीं भाविला । मंत्रीं देवपणासि आला ।
सद्गुरु न वचे कल्पिला । ईश्वराचेनी ॥ ४४ ॥
म्हणोनि सद्गुरु पूर्णपणें । देवाहून आधीक कोटिगुणें ।
जयासि वर्णिता भांडणें । वेदशास्त्रीं लागलीं ॥ ४५ ॥
असो सद्गुरुपदापुढें । दुजें कांहीं च न चढे ।
देवसामर्थ्य तें केवढें । मायाजनित ॥ ४६ ॥
अहो सद्गुरुकृपा जयासी । सामर्थ्य न चले तयापासीं ।
ज्ञानबळें वैभवासी । तृणतुछ केलें ॥ ४७ ॥
सद्गुरुकृपेचेनि बळें । अपरोक्षज्ञानाचेनि उसाळें[1] ।
मायेसहित ब्रह्मांड सगळें । दृष्टीस न ये ॥ ४८ ॥
ऐसें सच्छिष्याचें वैभव । सद्गुरुवचनीं दृढ भाव ।
तेणें गुणें देवराव । स्वयें चि होती ॥ ४९ ॥
अंतरीं अनुतापें तापले । तेणें अंतर शुद्ध जालें ।
पुढें सद्गुरुवचनें निवाले । सच्छिष्य ऐसे ॥ ५० ॥
लागता सद्गुरुवचनपंथें । जालें ब्रह्मांड पालथें ।
तरी जयाच्या शुद्ध भावार्थे । पालट न धरिजे ॥ ५१ ॥
शरण सद्गुरूस गेले । सच्छिष्य ऐसे निवडले ।
क्रियापालटें जाले । पावन ईश्वरीं ॥ ५२ ॥
ऐसा सद्भाव अंतरीं । ते चि मुक्तीचे वाटेकरी ।
येर माईक वेषधारी । असच्छिष्य ॥ ५३ ॥
वाटे विषयांचें सुख । परमार्थ संपादणें लौकिक ।
देखोदेखीं पढतमूर्ख । शरण गेले ॥ ५४ ॥

---

1 जोराबर.

जाली विषई वृत्ति अनावर । दृढ धरिला संसार ।
परमार्थचर्चेचा विचार । मळिण जाला ॥ ५५ ॥
मोडें घेतला परमार्थाचा । हव्यास धरिला प्रपंचाचा ।
भार वाहिला कुटुंबाचा । कावाडी जाला ॥ ५६ ॥
मानिला प्रपंचीं आनंद । केला परमार्थीं विनोद ।
भ्रांत मूढ मतिमंद । लोधलीं कामीं ॥ ५७ ॥
सूकर पूजिलें विलेपनें । हैसा मर्दिला चंदनें ।
तैसा विषई ब्रह्मज्ञानें । विवेकें बोधिला ॥ ५८ ॥
रासभ उकरडां लोळे । तयासि परिमळसोहळे ।
उलूक अंधारीं पळे । तया केवी हंसपगती ॥ ५९ ॥
तैसा विषयदारींचा बरोंडी । घाली अधःपतनीं उडी ।
तयास भगवत आवडी । सत्संग कैंचा ॥ ६० ॥
वतीं करून दांताळी । स्वानपुत्र हाडें चगळी ।
तैसा विषई तळमळी । विषयसुखांकारणें ॥ ६१ ॥
तया स्वानमुखीं परमान्न । कीं मर्कटास सिंहासन ।
तैसें विषयशक्तां ज्ञान । जिरेल कैंचें ॥ ६२ ॥
रासभें राखता जन्म गेला । तो पंडितांमधें प्रतिष्ठिला ।
न वचे तैसा आशक्ताला । परमार्थ नाहीं ॥ ६३ ॥
मिळाला राजहंसांचा मेळा । तेथें आला डोंबकावळा ।
लक्षून विष्ठेचा गोळा । हंस ह्मणवी ॥ ६४ ॥
तैसे सज्जनाचे संगती । विषई सज्जन ह्मणविती ।
विषय आमेद्य चित्तीं । गोळा लक्षिला ॥ ६५ ॥
काखे घेऊनियां दारा । ह्मणे मज सन्यासी करा ।
तैसा विषई सैरावैरा । ज्ञान बडबडी ॥ ६६ ॥

---

१ आळस, कंटाळा. २ ओझें वाहणारा. ३ वेधला. ४ दुकळलेला, आशाळभूत. ५ विषयासक्तां. ६ आसक्ताला. ७ "म" चा "ब" केला आहे. ८ अमेध्य, अपवित्र.

असो ऐसे पढतमूर्ख । ते काय जाणती अद्वैतसुख ।
नारकी प्राणी नेर्क । भोगिती स्वइछा ॥ ६७ ॥
वैषेची करील सेवा । तो कैसा मत्री ह्मणावा ।
तैसा विषयदास मानावा । भक्तराज केवी ॥ ६८ ॥
तैसे विषई बापुडे । त्यांस ज्ञान कोणीकडे ।
वाचाळ शाब्दिक बडबडे । वरपडे जाले ॥ ६९ ॥
ऐसे शिष्य परम नष्ट । कनिष्ठांमधें कनिष्ठ ।
हीन अविवेकी आणी दृष्ट । खळ खोटे दुर्जन ॥ ७० ॥
ऐसे जे पापरूप । दीर्घदोषी वज्रलेप ।
तयांस प्राश्चीत अनुताप । उद्भवतां आहे ॥ ७१ ॥
तेंहिं पुन्हा शरण जावे । सद्गुरूस संतोषवावें ।
कृपादृष्टी जालिया व्हावें । पुन्हा शुद्ध ॥ ७२ ॥
स्वामीद्रोह जया घडे । तो यावश्चद्र नरकीं पडे ।
तयास उपाव चि न घडे । स्वामी तुष्टल्यावाचुनी ॥ ७३ ॥
स्मशानवैराग्य आलें । ह्मणोन लाटांगण घातलें ।
तेणें गुणें उपतिष्ठलें । नाहीं ज्ञान ॥ ७४ ॥
भाव आणिला जायाचा । मंत्र घेतला गुरूचा ।
शिष्य जाला दो दिसांचा । मंत्राकारणें ॥ ७५ ॥
ऐसे केले गुरु उदंड । शब्द सिकला पाषांड ।
जाला तोंडाळ तमुंड । माहापाषांडी ॥ ७६ ॥
घडी येक रडे आणी पडे । घडी येक वैराग्य चढे ।
घडी येक अहंभाव जडे । ज्ञातेपणाचा ॥ ७७ ॥
घडी येक विस्वास धरी । सर्वे च घडी येक गुर्गुरी ।
ऐसे नाना छंद करी । पिसाट जैसा ॥ ७८ ॥

---

१ नरकवासी, नरकात वसति करण्याला योग्य. २ वेश्येची ३ दुष्ट ४ अस्थिर, डळमळ. ५ डोयखाशा, छुच्छुप्या

काम क्रोध मद मत्सर । लोभ मोह नाना विकार ।
अभिमान कापव्य तिरस्कार । हृदईं नांदती ॥ ७९ ॥
अहकार आणी देहपांग[1] । अनाचार आणी विषयसंग ।
ससार प्रपंच उद्वेग । अतरीं वसे ॥ ८० ॥
दीर्घसूत्री कृतघ्न पापी । कुकर्मी कुतर्की विकल्पी ।
अभक्त अभाव तीव्रकोपी । निष्ठुर परघातक ॥ ८१ ॥
हृदयेंसुन्य आणी आळसी । अविवेकी आणि अविस्वासी ।
अधीर अविचार संदेहासी । दृढ धर्ता ॥ ८२ ॥
आशा ममता तृष्णा कल्पना । कुबुद्धी दुर्वृत्ति दुर्वासना ।
अल्पबुद्धि विषयकामना । हृदईं वसे ॥ ८३ ॥
ईषणा[2] असूया[3] तिरस्कारें । निंदेसि प्रवर्ते आदरें ।
देहाभिमानें डुंबरे । जाणपणें ॥ ८४ ॥
क्षुधा तृष्णा आवरेना । निद्रा सहसा धरेना ।
कुटुंबचिंता वोसरेना । भ्रांति पडिली ॥ ८५ ॥
शाब्दिक बोले उदंड वाचा । लेश नाहीं वैराग्याचा ।
अनुताप धारिष्ट साधनाचा । मार्ग न धरी ॥ ८६ ॥
भक्ति विरक्ति ना शांती । सद्वृत्ति लीनता ना दांती[4] ।
कृपा दया ना तृप्ती । सुबुद्धि असेच ना ॥ ८७ ॥
कायाक्लेसीं[5] शेरीरहीनें । धर्मविषईं परम कृपण ।
क्रिया पालटेना कठिण । हृदये जयाचें ॥ ८८ ॥
आर्जव नाहीं जनासी । जो अप्रिये सज्जनासी ।
जयाचे जिवीं अहिर्णेसीं[6] । परन्यून वसे ॥ ८९ ॥
सदा सर्वकाळ लटिका । बोले माईक लापणिका ।
क्रिया विचार पाहातां येका । वचनी सत्य नाहीं ॥ ९० ॥

---

१ देहाची आवड २ ईर्षा, इच्छा. ३ मत्सर. ४ दमन. ५ देह कष्टविण्याचे कामीं कुचर. ६ अहर्निशीं.

परपीडेविषईं तत्पर । जैसे विंचु आणी विखार ।
तैसा कुशब्दें जिव्हारें । भेदी सकळाचें ॥ ९१ ॥
आपले झांकी अवगुण । पुढिलांस बोले कठिण ।
मिथ्या गुणदोषेंविण । गुणदोष लावी ॥ ९२ ॥
स्वयें पापात्मा अंतरीं । पुढिलांचि कैणव न करी ।
जैसा हिंसक दुराचारी । परदुःखें शिणेना ॥ ९३ ॥
दुःख पराव्याचें नेणती । दुर्जन गांजिले चि गांजिती ।
श्रम पावता आनंदती । आपुले मनीं ॥ ९४ ॥
स्वदुःखें झुरे अंतरीं । आणी परदुःखें हास्य करी ।
तयास प्राप्त येमपुरी । राजदूत ताडिती ॥ ९५ ॥
असो ऐसे मदांध बापुडे । तयासि भगवंत कैंचा जोडे ।
जयांस सुबुद्धि नावडे । पूर्वपातकेंकरूनी ॥ ९६ ॥
तयास देहाचा अंतीं । गात्रें क्षीणता पावती ।
जिवलगें [3]बोसडिती । जाणवेल तेव्हां ॥ ९७ ॥
असो ऐसे गुणावेगळे । ते सच्छिष्य आगळे ।
दृढ भावार्थें सोहळे । भोगिती स्वानंदाचे ॥ ९८ ॥
जये स्थळीं विकल्प जागे । कुळाभिमान पाठीं लागे ।
ते प्राणी प्रपंचसंगें । हिंपुटी होती ॥ ९९ ॥
जेणेंकरितां दुःख जालें । तें चि मनीं दृढ धरिलें ।
तेणें गुणें प्राप्त जालें । पुन्हा दुःख ॥ १०० ॥
संसारसंगें सुख जालें । ऐसें देखिलें ना ऐकिलें ।
ऐसें जाणोन अनहित केलें । ते दुःखी होती स्वयें ॥ १०१ ॥
संसारीं सुख मानिती । ते प्राणी मूढमती ।
जाणोन डोळे झांकिती । पढतमूर्ख ॥ १०२ ॥
प्रपंच सुखें करावा । परी कांहीं परमार्थ वाढवावा ।
परमार्थ अवघा चि बुडवावा । हें विहित नव्हे ॥ १०३ ॥

---

१ अंतःकरण. २ दया माया. ३ टाकिती.

मागां जालें निरूपण । गुरुशिष्यांची वोळखण ।
आतां उपदेशाचें लक्षण । सांगिजेल ॥ ५० ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे शिष्यलक्षणनाम समास तृतीय ॥ ३ ॥

---

॥ श्रीराम ॥

ऐका उपदेशाचीं लक्षणें । बहुविधें कोण कोणें ।
सांगता तें असाधारणें । परी कांहीं येक सांगों ॥ १ ॥
बहुत मत्र उपदेशिती । कोणी नाम मात्र सांगती ।
येक ते जप करविती । वोंकाराचा ॥ २ ॥
शिवमत्र भवानीमत्र । विष्णुमत्र माहालक्ष्मीमत्र ।
अवधूतमत्र गणेशमत्र । मार्तंडमत्र सांगती ॥ ३ ॥
मछकूर्मवऱ्हावमत्र । नृसिंहमत्र वामनमत्र ।
भार्गवमत्र रघुनाथमत्र । कृष्णमत्र सांगती ॥ ४ ॥
भैरवमत्र मल्हारिमत्र । हनुमतमत्र येक्षिणीमत्र ।
नारायेणमंत्र पांडुरंगमंत्र । अघोरमत्र सांगती ॥ ५ ॥
शेषमत्र गरुडमत्र । वायोमत्र वेताळमंत्र ।
झोटिंगमत्र बहुधा मत्र । किती ह्मणौनि सांगावे ॥ ६ ॥
बाळामंत्र बगुळामंत्र । काळिमत्र ककाळिमत्र ।
बटुकमत्र नाना मत्र । नाना शक्तीचे ॥ ७ ॥
पृथकाकारें स्वतत्र । जितुके देव तितुके मत्र ।
सोपे अवघड विचित्र । खेचर दारुण बीजाचे ॥ ८ ॥
पाहों जातां पृथ्वीवरी । देवाची गणना कोण करी ।
तितुके मत्र वैखरी । किती ह्मणौनि वदवावी ॥ ९ ॥
असख्यात मत्रमाळा । येकाहूनि येक आगळा ।
विचित्र मायेची कळा । कोण जाणे ॥ १० ॥

कित्येक मंत्रीं भूतें जाती। कित्येक मंत्रीं वेथा नासती।
कित्येक मंत्रीं उतरती। सितें[1] विंचू विखार ॥ ११ ॥
ऐसे नाना परीचे मंत्री। उपदेशिती कर्णपात्रीं।
जप ध्यान पूजा यंत्री। विधानयुक्त सांगती ॥ १२ ॥
येक शिव शिव सांगती। येक हरि हरि ह्मणविती।
येक उपदेशिती। विठल विठल ह्मणोनी ॥ १३ ॥
येक सांगती कृष्ण कृष्ण। येक सांगती विष्णु विष्णु।
येक नारायण नारायण। ह्मणौन उपदेशिती ॥ १४ ॥
येक ह्मणती अच्युत अच्युत। येक ह्मणती अनंत अनंत।
येक सांगती दत्त दत्त। ह्मणत जावें ॥ १५ ॥
येक सांगती राम राम। येक सांगती ॐ ॐ म।
येक ह्मणती मेघशाम। बहुतां नामीं स्मरावा ॥ १६ ॥
येक सांगती गुरु गुरु। येक ह्मणती परमेश्वरु।
येक ह्मणती विघ्नहरु। चिंतीत जावा ॥ १७ ॥
येक सांगती शामराज। येक सांगती गरुडध्वज।
येक सांगती अधोक्षज। ह्मणत जावें ॥ १८ ॥
येक सांगती देव देव। येक ह्मणती केशव केशव।
येक ह्मणती भार्गव भार्गव। ह्मणत जावें ॥ १९ ॥
येक विश्वनाथ ह्मणविती। येक मल्लारि सांगती।
येक ते जप करविती। तुकाई तुकाई ह्मणौनी ॥ २० ॥
हें किती ह्मणौनि सांगावें। शिवशक्तीचीं अनंत नांवें।
इछेसारिखीं स्वभावें। उपदेशिती ॥ २१ ॥
येक सांगती मुद्रा च्यारी[2]। खेचरी भूचरी चाचरी अगोचरी।
येक आसनें परोपरी। उपदेशिती ॥ २२ ॥

---

१ हिंव. २ खेचरी, भूचरी, चाचरी, अगोचरी, अशा चार मुद्रा योगशास्त्रात प्रसिद्ध आहेत. मुद्रा=विषयावरून दृष्टि काढून ती कांहीं एका विशेष पदार्थावर एक विशेष प्रकारानें लावणें.

येक दाखविती देखणी[1] । येक अनुहातेंध्वनी[2] ।
येक गुरु पिंडज्ञानी । पिंडज्ञान सांगती ॥ २३ ॥
येक सांगती कर्ममार्ग । येक उपासनामार्ग ।
येक सांगती अष्टांग[3] योग । नाना चक्रें[4] ॥ २४ ॥
येक तपें सांगती । येक अजपा[5] निरोपिती ।
येक तत्वें विस्तारिती । तत्वज्ञानी ॥ २५ ॥
येक सांगती सगुण । येक निरोपिती निर्गुण ।
येक उपदेशिती तीर्थाटण । फिरावें म्हणूनी ॥ २६ ॥
येक माहांवाक्यें[6] सांगती । त्यांचा जप करावा ह्मणती ।
येक उपदेश करिती । सर्व ब्रह्म ह्मणोनी ॥ २७ ॥
येक शाक्तमार्ग सांगती । येक मुक्तमार्ग प्रतिष्ठिती ।
येक इंद्रियें पूजन करविती । येका भावें ॥ २८ ॥
येक सांगती वशीकर्ण । स्तंबन मोहन उच्चाटण ।
नाना चेटकें आपण । स्वयें निरोपिती ॥ २९ ॥
ऐसी उपदेशांची स्थिती । पुरे आतां सांगों किती ।
ऐसे हे उपदेश असती । असंख्यात ॥ ३० ॥
ऐसे उपदेश अनेक । परी ज्ञानेंविण निरार्थक ।
येविषईं असे येक । भगवद्वचन ॥ ३१ ॥

---

१ दृष्टीला कांहीं तरी अपूर्व पदार्थ दाखविणें २ अनाहतध्वनि, प्राण्याच्या देहामध्यें जे ध्वनि सतत चालू असतात ते. हे दहा प्रकारचे आहेत सामान्य बाहेर ऐकूं येणारे ध्वनि आघातानें उत्पन्न होतात, परंतु शरिरातील ध्वनीचा तसा प्रकार नाहीं, ह्मणून त्या अनाहत ह्मणतात ३ यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान आणि समाधि हीं योगाचीं आठ अंगें आहेत. हीं आठ अंगें साधिलीं ह्मणजे योग सिद्ध होतो. योग = चित्तवृत्तिनिरोध ४ शरिरामध्यें गुदद्वारापासून ब्रह्मरंध्रापर्यंत सात स्थानीं सात चक्रें आहेत तीं ५ प्राण्याच्या श्वासोच्छ्वासाबरोबर सतत ' सोहं ' असा शब्द उत्पन्न होत असतो, त्याला अजपा गायत्री असें ह्मणतात. द. १७ स ५ पहा. ६ " प्रज्ञानं ब्रह्म " हें ऋग्वेदांतील, " अहं ब्रह्मास्मि " हें यजुर्वेदांतील, " तत्त्वमसि " हें सामवेदीय व " अयमात्मा ब्रह्म " हें अथर्वणवेदीय अशीं चार महावाक्यें आहेत

॥ श्लोक ॥ नानाशास्त्रं पठेल्लोको नानादैवतपूजनम् ।
आत्मज्ञान विना पार्थ सर्वकर्म निरर्थकम् ॥ ७ ॥
शैवशाक्तागमाद्या ये अन्ये च बहवो मताः ।
अपभ्रंशसमास्तेऽपि जीवाना भ्रातचेतसाम् ॥ ७ ॥
न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिदंमुत्तमम् ॥ ७ ॥
या कारणें ज्ञाना समान । पवित्र उत्तम न दिसे अन्न[1] ।
ह्मणौन आधीं आत्मज्ञान । साधिलें पाहिजे ॥ ३२ ॥
सकळ उपदेशीं विशेष । आत्मज्ञानाचा उपदेश ।
येविषईं जगदीश । बहुतां ठाईं बोलिला ॥ ३३ ॥
॥ श्लोक ॥ यस्य कस्य च वर्णस्य ज्ञान देहे प्रतिष्ठितम् ।
तस्य दासस्य दासोंहं भवे जन्मनि जन्मनि ॥ ७ ॥
आत्मज्ञानाचा महिमा । नेणे चतुर्मुख ब्रह्मा ।
प्राणी बापुडा जीवात्मा । काये जाणे ॥ ३४ ॥
सकळ तीर्थांची संगती । स्नानदानाची फळश्रुती ।
त्याहूनि ज्ञानाची स्थिती । विशेष कोटिगुणें ॥ ३५ ॥
पृथिव्या यानि तीर्थानि स्नानदानेषु यत्फलम् ।
तत्फलं कोटिगुणित ब्रह्मज्ञानसमोपमम् ॥ ७ ॥
ह्मणौनि जें आत्मज्ञान । तें गहनाहूनि गहन ।
ऐक तयाचें लक्षण । सांगिजेल ॥ ३६ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसवादे उपदेशनाम समास ॥ ४ ॥

---

॥ श्रीराम ॥

जव तें ज्ञान नाहीं प्रांजळ । तव सर्व कांहीं निर्फळ ।
ज्ञानरहित तळमळ । जाणार नाहीं ॥ १ ॥
ज्ञान ह्मणता वाटे भर्म[2] । काये रे बा असेल वर्म ।
ह्मणोनि हा अनुक्रम । सांगिजेल आतां ॥ २ ॥

---

१ आन, अन्य, दुसरें २ भ्रम.

भूत भविष्य वर्तमान । ठाउकें आहे परिछिन्न ।
यासी हि ह्मणिजेत ज्ञान । परी तें ज्ञान नव्हे ॥ ३ ॥
बहुत केलें विद्यापठण । संगीतशास्त्र रागज्ञान ।
वैदिक शास्त्र वेदाधेन । हें हि ज्ञान नव्हे ॥ ४ ॥
नाना वेवसायाचें ज्ञान । नाना दीक्षेचें ज्ञान ।
नाना परीक्षेचें ज्ञान । हें ज्ञान नव्हे ॥ ५ ॥
नाना वनितांची परीक्षा । नाना मनुष्याची परीक्षा ।
नाना नराची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ ६ ॥
नाना अश्वाची परीक्षा । नाना गजाची परीक्षा ।
नाना स्वापदांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ ७ ॥
नाना पशूची परीक्षा । नाना पक्षांची परीक्षा ।
नाना भूतांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ ८ ॥
नाना यानांची परीक्षा । नाना वस्त्राची परीक्षा ।
नाना शस्त्राची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ ९ ॥
नाना धातूची परीक्षा । नाना नाण्यांची परीक्षा ।
नाना रत्नांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ १० ॥
नाना पाषाणपरीक्षा । नाना काष्ठांची परीक्षा ।
नाना वाद्याची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ ११ ॥
नाना भूमींची परीक्षा । नाना जळाची परीक्षा ।
नाना सतेज परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ १२ ॥
नाना रसांची परीक्षा । नाना बीजांची परीक्षा ।
नाना अंकुरपरीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ १३ ॥
नाना पुष्पाची परीक्षा । नाना फळाची परीक्षा ।
नाना वल्लींची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ १४ ॥
नाना दुःखांची परीक्षा । नाना रोगाची परीक्षा ।
नाना चिन्हाची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ १५ ॥

नाना मंत्रांची परीक्षा । नाना यंत्रांची परीक्षा ।
नाना मूर्तींची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ १६ ॥
नाना क्षेत्रांची¹ परीक्षा । नाना गृहांची परीक्षा ।
नाना पात्रांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ १७ ॥
नाना होणार परीक्षा । नाना समयांची परीक्षा ।
नाना तर्कांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ १८ ॥
नाना अनुमानपरीक्षा । नाना नेमस्त² परीक्षा ।
नाना प्रकार परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ १९ ॥
नाना विद्येची परीक्षा । नाना कळेची परीक्षा ।
नाना चातुर्यपरीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ २० ॥
नाना शब्दांची परीक्षा । नाना अर्थांची परीक्षा ।
नाना भाषांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ २१ ॥
नाना स्वरांची परीक्षा । नाना वर्णांची परीक्षा ।
नाना लेखनपरीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ २२ ॥
नाना मतांची परीक्षा । नाना ज्ञानाची परीक्षा ।
नाना वृत्तींची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ २३ ॥
नाना रूपांची परीक्षा । नाना रसनेची परीक्षा ।
नाना सुगंधपरीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ २४ ॥
नाना सृष्टींची परीक्षा । नाना विस्तारपरीक्षा ।
नाना पदार्थपरीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ २५ ॥
नेमक चि बोलणें । तत्काळ चि प्रतिवचन देणें ।
सीघ्र चि कवित्व करणें । हें ज्ञान नव्हे ॥ २६ ॥
नेत्रपालवी नादकळा । करपालवी भेदकळा ।
स्वरपालवी संकेतकळा । हें ज्ञान नव्हे ॥ २७ ॥
काव्यकुशळ संगीतकळा । गीत प्रबंद नृत्यकळा ।
सभाच्यातुर्य शब्दकळा । हें ज्ञान नव्हे ॥ २८ ॥

---

१ क्षेत्रांची. २ निश्चय, सिद्धान्त.

वाग्विळास मोहनकळा । रम्य रसाळ गायनकळा ।
हास्य विनोद कामकळा । हें ज्ञान नव्हे ॥ २९ ॥
नाना लाघवें चित्रकळा । नाना वाद्यें संगीतकळा ।
नाना प्रकारें विचित्र कळा । हें ज्ञान नव्हे ॥ ३० ॥
आदिकरूनि चौसष्टि कळा । याहि वेगळ्या[1] नाना कळा ।
चौदा विद्या सिद्धि सकळा । हें ज्ञान नव्हे ॥ ३१ ॥
असो सकळ कळाप्रवीण । विद्यामात्र परिपूर्ण ।
तरी ते कौशल्यता परी ज्ञान । ह्मणों चि नये ॥ ३२ ॥
हें ज्ञान होयेसें भासे । परंतु मुख्य ज्ञान तें अनारिसें ।
जेथें[2] प्रकृतीचें पिसें । समूळ वाव ॥ ३३ ॥
जाणावें दुसऱ्याचें जीवीचें । हें ज्ञान वाटे साचें ।
परंतु हें आत्मज्ञानाचें । लक्षण नव्हे ॥ ३४ ॥
माहानुभाव माहाभला । मानसपूजा करितां चुकला ।
कोणी येकें पाचारिला । ऐसें नव्हे म्हणोनी[3] ॥ ३५ ॥
ऐसी जाणे अंतरस्थिती । तयासि परम ज्ञाता म्हणती ।
परंतु जेणें मोक्षप्राप्ती । तें हें ज्ञान नव्हे ॥ ३६ ॥
बहुत प्रकारींचीं ज्ञानें । सांगों जातां असाधारणें ।
सायोज्यप्राप्ति होये जेणें । तें ज्ञान वेगळें ॥ ३७ ॥
तरी तें कैसें आहे ज्ञान । समाधानाचें लक्षण ।
ऐसें हें विशद करून । मज निरोपावें ॥ ३८ ॥
ऐसें शुद्ध ज्ञान पुसिलें । तें पुढिले समासीं निरोपिलें ।
श्रोतां अवधान दिधलें । पाहिजे पुढें ॥ ३९ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे बहुधाज्ञाननाम समास ॥ ५ ॥

---

१ वेगळे. २ जेथें मायेचें वेड सर्वथैव मिथ्या ठरतें. ३ कोणी एक महानुभाव मानसपूजा करीत असतां कांहीं चुकला, दुसऱ्या कोणीं येऊन अंतर्ज्ञानानें जाणून ह्मटलें कीं " आपण येथें चुकला ".

॥ श्रीराम ॥

ऐक ज्ञानाचें लक्षण । ज्ञान ह्मणिजे आत्मज्ञान ।
पाहावें आपणासि आपण । या नाव ज्ञान ॥ १ ॥
मुख्य देवास जाणावें । सत्य स्वरूप वोळखावें ।
नित्यानित्य विचारावें । या नाव ज्ञान ॥ २ ॥
जेथें दृश्य प्रकृति सरे । पचभूतिक वोसरे ।
समूळ द्वैत निवारे । या नाव ज्ञान ॥ ३ ॥
मनबुद्धिअगोचर । न चले तर्काचा विचार ।
उलेख परेहूनि पर । या नाव ज्ञान ॥ ४ ॥
जेथें नाहीं दृश्यभान । जेथें जाणीव हें अज्ञान ।
विमळ शुद्ध स्वरूपज्ञान । यासि बोलिजे ॥ ५ ॥
सर्वसाक्षी अवस्ता तुर्या । ज्ञान ऐसें ह्मणती तया ।
परी तें जाणिजे वायां । पदार्थज्ञान ॥ ६ ॥
दृश्य पदार्थ जाणिजे । त्यास पदार्थज्ञान बोलिजे ।
शुद्ध स्वरूप जाणिजे । या नाव स्वरूपज्ञान ॥ ७ ॥

---

१ नाहींसें होतें. २ " कळे " चें " चले " केले आहे. ३ निर्देश. ४ नाभिस्थानीं परा, हृदयस्थानीं पश्यंती, कंठस्थानीं मध्यमा व बाहेर उमटणारी वैखरी अशा चार वाणी आहेत " परेचें अग शुद्ध ज्ञान । पश्यंती उपजवी ध्यान । मध्यमा करी शुचि मन । कर्म वैखरीचें ॥ " द. १७ स. ८ पहा ५ आपण ब्रह्मरूप आहोंत हा अनुभव ब्रह्मस्वरूपाची प्राप्ति झाल्यावर ही जाणीव उरत नाहीं. ती उरणें हें अज्ञान च होय. ६ अवस्था चार आहेत. जागृति, स्वप्न, सुषुप्ति आणि तुरीया किंवा तुर्या. जागृतीमध्यें जीव सर्व प्रकारचे बाह्य व्यवहार करितो, स्वप्नामध्यें सर्व इंद्रियांचा लय होऊन केवळ मन च सर्व व्यवहार करितें. सुषुप्ति = गाढ झोंप. या अवस्थेंत सर्व इंद्रियें आणि मन यांचा अज्ञानांत लय होऊन जीव केवळ मूढ अवस्थेंत असतो. या तिन्ही अवस्था अज्ञानापासून होतात तुरीया अवस्थेंत जीवाला स्वस्वरूपाचें ज्ञान होतें ह्मणजे मी ब्रह्मरूप आहे असें त्याच्या अनुभवास येतें, परतु हे हि ज्ञान सोपाधिक च होय, ह्मणून तें हि शुद्ध नव्हे या अवस्थेहून हि पलीकडची आणखी उन्मनी ह्मणून अवस्था आहे, तींत मनाचा हि लय होतो. तें खरें ज्ञान.

जेथें सर्व चि नाहीं ठाईचें । तेथें सर्वसाक्षत्व कैचें ।
ह्मणौनि शुद्ध ज्ञान तुर्येचें । मानूं चि नये ॥ ८ ॥
ज्ञान ह्मणिजे अद्वैत । तुर्या प्रत्यक्ष द्वैत ।
ह्मणौनि शुद्ध ज्ञान तें सतत । वेगळें चि असे ॥ ९ ॥
ऐक शुद्ध ज्ञानाचें लक्षण । शुद्ध स्वरूप चि आपण ।
या नाव शुद्ध स्वरूपज्ञान । जाणिजे श्रोतीं ॥ १० ॥
माहांवाक्य[3] उपदेश भला । परी त्याचा जप नाहीं बोलिला ।
तेथीचा तो विचार चि केला । पाहिजे साधकें ॥ ११ ॥
माहांवाक्य उपदेशसार । परी घेतला पाहिजे विचार ।
त्याच्या जपें अंधकार । न फिटे भ्रांतीचा ॥ १२ ॥
माहावाक्याचा अर्थ घेतां । आपण वस्तु चि तत्वतां ।
त्याचा जप करितां वृथा । सीण चि होये ॥ १३ ॥
माहावाक्याचें विवरण । हें मुख्य ज्ञानाचें लक्षण ।
शुद्ध लक्ष्याशें आपण । वस्तु च आहे ॥ १४॥
आपला आपणासि लाभ । हें ज्ञान परम दुल्लभ ।
जें आदिअंतीं स्वयभ । स्वरूप चि स्वयें ॥ १५ ॥
जेथून हें सर्व ही प्रगटे । आणी सकळ ही जेथें आटे ।
तें ज्ञान जालिया फिटे । भ्रांति बंधनाची ॥ १६ ॥
मतें आणी मतांतरें । जेथें होती निर्विकारें ।
अति सूक्ष्म विचारें । पाहातां ऐक्य ॥ १७ ॥
जें या चराचरार्चें मूळ । शुद्ध स्वरूप निर्मळ ।
या नाव ज्ञान केवळ । वेदांतमतें ॥ १८ ॥
शोधितां आपलें मूळ स्थान । सहज चि उडे अज्ञान ।
या नाव ह्मणिजे ब्रह्मज्ञान । मोक्षदायेक ॥ १९ ॥
आपणासि वोळखों जातां । आंगीं बाणे सर्वज्ञता ।
तेणें येकदेसी वार्ता । निशेष उडे ॥ २० ॥

---

१ मुळीचें. २ स्वतंत्र ? ३ तत्त्वमसि. ४ महावाक्याचा लक्ष्यांश पाहिला तर आपण ब्रह्मस्वरूप आहोंत, असें ठरतें. ५ निर्बळ.

मी कोण ऐसा हेत । धरून पाहातां देहातीत ।
आवलोकितां नेमस्त । स्वरूप चि होये ॥ २१ ॥
असो पूर्वी थोर थोर । जेणें ज्ञानें पैलपार ।
पावले ते साचार । ऐक आता ॥ २२ ॥
व्यास वसिष्ठ माहामुनी । शुक नारद समाधानी ।
जनकादिक माहाज्ञानी । येणें चि ज्ञानें ॥ २३ ॥
वामदेवादिक योगेश्वर । वाल्मीक अत्रि ऋषेश्वर ।
शोनिकादि अध्यात्मसार । वेदांतमतें ॥ २४ ॥
सनकादिक मुख्यकरूनी । आदिनाथ मीन गोरक्षमुनी ।
आणीक बोलतां वचनी । अगाध असती ॥ २५ ॥
सिद्ध मुनी माहानुभाव । सकळांचा जो अंतर्भाव ।
जेणें सुखें माहादेव । डुल्लत सदा ॥ २६ ॥
जें वेदशास्त्राचें सार । सिद्धांतधांदांतविचार ।
ज्याची प्राप्ती भाग्यानुसार । भाविकांस होये ॥ २७ ॥
साधु सत आणी सज्जन । भूत भविष्य वर्तमान ।
सर्वत्रांचें गुह्य ज्ञान । तें सांगिजेल आतां ॥ २८ ॥
तीर्थें व्रतें तपें दानें । जें न जोडे धूम्रपानें[३] ।
पंचाग्नी[४] गोरांजनें[५] । जें प्राप्त नव्हे ॥ २९ ॥
सकळ साधनाचें फळ । ज्ञानाची सिंग[६] चि केवळ ।
जेणें संशयाचें मूळ । निशेष तुटे ॥ ३० ॥
छपन्न भाषा तितुके ग्रन्थ । आदिकरून वेदांत ।
या इतुकियांचा गहनार्थ । येक चि आहे ॥ ३१ ॥

---

१ गुरुप्रतीति २ आत्मप्रतीति ३ झाडास उलटें टांगून घेऊन खालीं केलेला धूर पिऊन तप करणें ४ भर उन्हाळ्यांत चहूंकडे अग्नि पेटवून मध्यें बसणें व मस्तकीं सूर्यताप घेणें, या साधनाचें नाव. ५ भगवत्प्रीत्यर्थ स्वतःस जाळून घेणें, या साधनाचें नांव. ६ माप भरल्यावर हि जें धान्य मावतें त्यास सींग ह्मणतात, ह्मणजे या ठिकाणीं अर्थात् सिंग ह्मणजे शिरोभाग, शिखर असा अर्थ करावयाचा

जें नेणवे पुराणीं । जेथें सिणल्या वेदवाणी ।
तें चि आतां ये चि क्षणीं । बोधीन गुरुकृपें ॥ ३२ ॥
पाहिलें नस्तां संस्कृतीं । रीग नाहीं मऱ्हाष्ट ग्रन्थीं ।
हृदईं वसल्यां कृपामूर्ती । सद्गुरुस्वामी ॥ ३३ ॥
आतां नलगे संस्कृत । अथवा ग्रन्थ प्राकृत ।
माझा स्वामी कृपेसहित । हृदईं वसे ॥ ३४ ॥
न करितां वेदाभ्यास । अथवा श्रवणसायास ।
प्रेत्नेंविण सौरसें[1] । सद्गुरुकृपा ॥ ३५ ॥
ग्रन्थ मात्र मऱ्हाष्ट । त्याहून संस्कृत श्रेष्ठ ।
त्या संस्कृतामधें पष्ट । थोर तो वेदांत ॥ ३६ ॥
त्या वेदांतापरतें काहीं । सर्वथा श्रेष्ठ नाहीं ।
जेथें वेदगर्भ सर्व ही । प्रगट जाला ॥ ३७ ॥
असो ऐसा जो वेदांत । त्या वेदांताचा हि मथितार्थ ।
अति गहन जो परमार्थ । तो तू ऐक आतां ॥ ३८ ॥
अरे गहनाचें ही गहन । तें तूं जाण सद्गुरुवचन ।
सद्गुरुवचनें समाधान । नेमस्त आहे ॥ ३९ ॥
सद्गुरुवचन तो चि वेदांत । सद्गुरुवचन तो चि सिद्धांत ।
सद्गुरुवचन तो चि धादांत । सप्रचीत आतां ॥ ४० ॥
जें अत्यंत गहन । माझ्या स्वामीचें वचन ।
जेणें माझें समाधान । अत्यंत जालें ॥ ४१ ॥
तें हें माझें जीवींचें गुज । मी सांगेन ह्मणतों तुज ।
जरी अवधान देसी मज । तरी आतां ये च क्षणीं ॥ ४२ ॥
शिष्य म्लान्वदनें बोले । धरिले सदृढ पाउलें ।
मग बोलों आरंभिलें । गुरुदेवें ॥ ४३ ॥
अहं ब्रह्मास्मि[2] माहांवाक्य । येथीचा अर्थ अतर्क्य ।
तो ही सांगतों ऐक्य । गुरुशिष्य जेथें ॥ ४४ ॥

---

१ गोड, प्रसादरूप. २ यजुर्वेदातील हें महावाक्य होय.

ऐक शिष्या येथीचें वर्म । स्वयें तूं चि आहेसि ब्रह्म ।
ये विषईं संदेह भ्रम । धरूं चि नको ॥ ४५ ॥
नवविधा प्रकारें भजन । त्यांत मुख्य तें आत्मनिवेदन ।
तें समग्र प्रकारें कथन । कीजेल आता ॥ ४६ ॥
निर्माण पंचभूतें थीयें[1] । कल्पांतीं नासतीं येथान्वयें ।
प्रकृति पुरुष जीयें[2] । ते हीं ब्रह्म होती ॥ ४७ ॥
दृश्य पदार्थ आटतां । आपण हि नुरे तत्वता ।
ऐक्यरूपें ऐक्यता । मुळीं च आहे ॥ ४८ ॥
सृष्टीची नाहीं वार्ता । तेथें मुळीं[3] च ऐक्यता ।
पिंड ब्रह्मांड पाहों जातां । दिसेल कोठें ॥ ४९ ॥
ज्ञानवन्ही प्रगटे । तेणें दृश्य केर आटे ।
तदाकारें मूळ तुटे । भिन्नत्वाचें ॥ ५० ॥
मिथ्यत्वें वृत्ति फिरे[4] । तों दृश्य असतां च वोसरे ।
सहज चि येणें प्रकारें । जालें आत्मनिवेदन ॥ ५१ ॥
असो गुरूचे ठाईं अनन्यता । तरी तुज कायेसी रे चिंता ।
वेगळेपणें अभक्ता । उरों चि नको ॥ ५२ ॥
आतां हें चि दृढीकर्ण । व्हावया करीं सद्गुरुभजन ।
सद्गुरुभजनें समाधान । नेमस्त आहे ॥ ५३ ॥
या नाव शिष्या आत्मज्ञान । येणें पाविजे समाधान ।
भवभयाचें बंधन । समूळ मिथ्या ॥ ५४ ॥
देह मी वाटे ज्या नरा । तो जाणावा आत्महत्यारा ।
देहाभिमानें येरझारा । भोगिल्या च भोगी ॥ ५५ ॥
असो चहू देहावेगळा । जन्मकर्मासी निराळा ।
सकळ आबोळगोवळा[5] । सबाह्य तूं ॥ ५६ ॥

---

१ हीं. २ जीं. ३ येथें प्रथम "सर्व ही" असा पाठ होता, तो खोडून श्रीसमर्थांनीं समासात "मुळीं च" केलें ४ जगत् मिथ्या आहे असें ज्ञान झाल्यावर वृत्ति आसक्त होत नाहीं, मागें फिरते, आणि मग दृश्य असून हि नसल्यासारखें होतें. ५ एकंदर.

कोणासी च नाहीं बंधन । भ्रांतिस्तव भुलले जन ।
दृढ घेतला देहाभिमान । ह्मणौनियां ॥ ५७ ॥
शिष्या येकांतीं बैसावें । स्वरूपीं विश्रांतीस जावें ।
तेणें गुणें दृढावे । परमार्थ हा ॥ ५८ ॥
अखंड घडे श्रवण मनन । तरी च पाविजे समाधान ।
पूर्ण जालियां ब्रह्मज्ञान । वैराग्य भरे आंगीं ॥ ५९ ॥
शिष्या मुक्तपणें[1] अनर्गळ[2] । करिसी इंद्रियें बाष्कळ ।
तेणें तुझी तळमळ । जाणार नाहीं ॥ ६० ॥
विषईं वैराग्य उपजलें । तयासी च पूर्ण ज्ञान जालें ।
मणी टाकितां चि लाधलें । राज्य जेवीं ॥ ६१ ॥
मणी होता सीगटाचा[3] । लोभ धरूनियां तयाचा ।
मूर्खपणें राज्याचा । अव्हेर केला[4] ॥ ६२ ॥
ऐक शिष्या सावधान । आतां भविष्य मी सांगेन ।
जया पुरुषास जें ध्यान । तयासि तें चि प्राप्त ॥ ६३ ॥
ह्मणोनि जे अविद्या । सांडून धरावी सुविद्या ।
तेणें गुणें जगद्वंद्या । पाविजे सीघ्र ॥ ६४ ॥
सन्यपाताचेनि दुःखें । भयानक दृष्टीस देखे ।
औषध घेता चि सुखें । आनंद पावे ॥ ६५ ॥
तैसें अज्ञानसन्यपातें । मिथ्या दृष्टीस दिसतें ।
ज्ञानऔषध घेतां तें । मुळीं च नाहीं ॥ ६६ ॥
मिथ्या स्वप्नें वोसणाला[5] । तो जागृतीस आणिला ।
तेणें पूर्वदशा पावला । निर्भय जे ॥ ६७ ॥

---

१ स्वच्छंदपणें. २ निर्बंध, यथेच्छ, मनसोक्त. ३ सीगट = शिंगट = क्षुद्र शिंग. ४ एखाद्या क्षुद्र मण्यासाठीं हव्यला पेटून जसें एखाद्यानें स्वराज्याला आंचवावें, त्याप्रमाणें विषयांच्या नादीं लागून ब्रह्मानंदाला मुकणें बरें नव्हे. ही सबंध ओवी मागाहून समासांत लिहिलेली असून तिला ६२ वा अंक दिला आहे, पण पुढील ओव्यांचे अंक मात्र मुळात बदलले नाहींत. ५ झोपेंत बरळला, भीतीनें ओरडला.

मिथ्या च परी सत्य वाटलें । तेणें गुणें दुःख जालें ।
मिथ्या आणी निरसलें । हें तों घडेना ॥ ६८ ॥
मिथ्या आहे जागृतासी । परी वेढा लाविलें निद्रिस्तासी ।
जागा जालियां तयासी । भये चि नाहीं ॥ ६९ ॥
परी अविद्याझोंप येते भरें । भरे सर्वांगीं कांविरें ।
पूर्ण जागृती श्रवणद्वारें । मननें करावी ॥ ७० ॥
जागृतीची वोळखण । ऐक तयाचें लक्षण ।
जो विषईं विरक्त पूर्ण । अंतरापासुनी ॥ ७१ ॥
जेणें विरक्तीस न यावें । तो साधक ऐसें जाणावें ।
तेणें साधन करावें । थोरीव सांडुनी ॥ ७२ ॥
साधन न मने जयाला । तो सिद्धपणें बद्ध जाला ।
त्याहूनि मुमुक्ष भला । ज्ञानाधिकारी ॥ ७३ ॥
तंव शिष्यें केला प्रश्न । कैसें बद्धमुमुक्षाचें लक्षण ।
साधक सिद्ध वोळखण । कैसी जाणावी ॥ ७४ ॥
याचें उत्तर श्रोतयासी । दिधलें पुढिलीये समासीं ।
सावध श्रोतीं कथेसी । अवधान द्यावें ॥ ७५ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसवादे शुद्धज्ञाननिरूपणनाम समास साहा ॥६॥

---

॥ श्रीराम ॥

सृष्टी जे का चराचर । जीव दाटले अपार ।
परी ते अवघे चत्वार । बोलिजेती ॥ १ ॥
ऐक तयाचें लक्षण । चत्वार ते कोण कोण ।
बद्ध मुमुक्ष साधक जाण । चौथा सिद्ध ॥ २ ॥

---

१ नाहींसें झालें. स्वप्न मिथ्या खरें, परतु मनावर त्याचा परिणाम घडावयाचा तो घडतो च परिणामावांचून तें नाहींसें झालें असें होत नाहीं. २ वेढां लावणें=भुलविणें. ३ पुष्कळ, गाढ ४ वेड, भ्रम. ५ मनुष्य सिद्ध झाला तरी त्यानें साधन सोडूं नये. परंतु आपल्या सिद्धपणाच्या घमेंडींत जर कोणी साधन करणार नाहीं, तर त्याचें सिद्धपण ही च त्याची बद्धता होय.

यां चौघांविरहित कांहीं । सचराचरीं पांचवा नाहीं ।
आता असो हें सर्व ही । विशद करूं ॥ ३ ॥
बद्ध ह्मणिजे तो कोण । कैसें मुमुक्षाचें लक्षण ।
साधकसिद्धवोळखण । कैसी जाणावी ॥ ४ ॥
श्रोतीं व्हावें सावध । प्रस्तुत ऐका बद्ध ।
मुमुक्ष साधक आणि सिद्ध । पुढें निरोपिले ॥ ५ ॥
आतां बद्ध तो जाणिजे ऐसा । अधारींचा अंध जैसा ।
चक्षुविण दाही दिशा । सुन्याकार ॥ ६ ॥
भक्त ज्ञाते तापसी । योगी वीत[1]रागी संन्यासी ।
पुढें देखतां दृष्टीसी । येणार नाहीं ॥ ७ ॥
न दिसे नेणे कर्माकर्म । न दिसे नेणे धर्माधर्म ।
न दिसे नेणे सुगम । परमार्थपथ ॥ ८ ॥
तयास न दिसे सच्छास्त्र । सत्सगति सत्पात्र ।
सन्मार्ग जो कां पवित्र । तो ही न दिसे ॥ ९ ॥
न कळे सारासार विचार । न कळे स्वधर्म आचार ।
न कळे कैसा परोपकार । दान पुण्य ॥ १० ॥
नाहीं पोटीं भूतदया । नाहीं सुचिष्मत काया ।
नाहीं जनासि निववावया । वचन मृद ॥ ११ ॥
न कळे भक्ति न कळे ज्ञान । न कळे वैराग्य न कळे ध्यान ।
न कळे मोक्ष न कळे साधन । या नाव बद्ध ॥ १२ ॥
न कळे देव निश्चयात्मक । न कळे संतांचा विवेक ।
न कळे मायेचें कौतुक । या नाव बद्ध ॥ १३ ॥
न कळे परमार्थाची खूण । न कळे अध्यात्मनिरूपण ।
न कळे आपणासि आपण । या नाव बद्ध ॥ १४ ॥
न कळे जीवाचें जन्ममूळ । न कळे साधनाचें फळ ।
न कळे तत्वता केवळ । या नाव बद्ध ॥ १५ ॥

---

१ वीत ( वि+इत ) = गेलेला, राग = विषयांवरील प्रेम, गेलें आहे विषयांवरील प्रेम ज्याचें, ह्मणजे विरक्त.

न कळे कैसें तें बंधन । न कळे मुक्तीचें लक्षण ।
न कळे वस्तु विलक्षण । या नाव बद्ध ॥ १६ ॥
न कळे शास्त्रार्थ बोलिला । न कळे निजस्वार्थ आपुला ।
न कळे संकल्पें बांधला । या नाव बद्ध ॥ १७ ॥
जयासि नाहीं आत्मज्ञान । हें मुख्य बद्धाचें लक्षण ।
तीर्थ व्रत दान पुण्य । कांहीं च नाहीं ॥ १८ ॥
दया नाहीं करुणा नाहीं । आर्जव नाहीं मित्रि नाहीं ।
शांति नाहीं क्षमा नाहीं । या नाव बद्ध ॥ १९ ॥
जें ज्ञानविशिं उणें । तेथें कैचीं ज्ञानाचीं लक्षणें ।
बहुसाल कुलक्षणें । या नाव बद्ध ॥ २० ॥
नाना प्रकारीचे दोष । कारितां वाटे परम संतोष ।
बाष्कळपणाचा हव्यास । या नाव बद्ध ॥ २१ ॥
बहु काम बहु क्रोध । बहु गर्व बहु मद ।
बहु द्वंद्व बहु खेद । या नाव बद्ध ॥ २२ ॥
बहु दर्प बहु दंभ । बहु विषये बहु लोभ ।
बहु कर्कश बहु अशुभ । या नाव बद्ध ॥ २३ ॥
बहु ग्रामणी बहु मत्सर । बहु असूया तिरस्कार ।
बहु पापी बहु विकार । या नाव बद्ध ॥ २४ ॥
बहु अभिमान बहु ताठा । बहु अहंकार बहु फांटा ।
बहु कुकर्माचा सांठा । या नाव बद्ध ॥ २५ ॥
बहु कापट्य वादवेवाद । बहु कुतर्क भेदाभेद ।
बहु क्रूर कुपामद । या नाव बद्ध ॥ २६ ॥
बहु निंदा बहु द्वेष । बहु अधर्म बहु अभिळाष ।
बहु प्रकारीचे दोष । या नाव बद्ध ॥ २७ ॥
बहु भ्रष्ट अनाचार । बहु नष्ट येकंकार ।
बहु अनित्य अविचार । या नाव बद्ध ॥ २८ ॥

---

१ हरामखोरपणा. २ दुसऱ्याच्या गुणाच्या ठिकाणी दोषारोप करण्याची बुद्धि
३ बडबड. ४ क्रूर. ५ अनीति

बहु निष्ठुर बहु घातकी । बहु हत्यारा बहु पातकी ।
तपीळ[1] कुविद्या अनेकी । या नाव बद्ध ॥ २९ ॥
बहु दुराशा बहु स्वार्थी । बहु कळह बहु अनर्थी ।
बहु डाईक[2] दुर्मती । या नाव बद्ध ॥ ३० ॥
बहु कल्पना बहु कामना । बहु तृष्णा बहु वासना ।
बहु ममता बहु भावना । या नाव बद्ध ॥ ३१ ॥
बहु विकल्पी बहु विषादी । बहु मूर्ख बहु संबंधी[3] ।
बहु प्रपंची बहु उपाधी । या नाव बद्ध ॥ ३२ ॥
बहु वाचाळ बहु पाषांडी । बहु दुर्जन बहु थोतांडी ।
बहु पैशून्य बहु खोडी । या नाव बद्ध ॥ ३३ ॥
बहु अभावें[4] बहु भ्रम । बहु भ्रांति बहु तम ।
बहु विक्षेपें बहु विरामें[6] । या नाव बद्ध ॥ ३४ ॥
बहु कृपण बहु खंदस्ती[7] । बहु आदखणा[8] बहु मस्ती ।
बहु असत्क्रिया व्यस्ती[9] । या नाव बद्ध ॥ ३५ ॥
परमार्थविषईं अज्ञान । प्रपंचाचें उदंड ज्ञान ।
नेणे स्वयें समाधान । या नाव बद्ध ॥ ३६ ॥
परमार्थाचा अनादर । प्रपंचाचा अत्यादर ।
संसारभार जोजार । या नाव बद्ध ॥ ३७ ॥
सत्संगाची नाहीं गोडी । संतनिंदेची आवडी ।
देहेबुद्धीची घातली बेडी । या नाव बद्ध ॥ ३८ ॥
हातीं द्रव्याची जपमाळ । कांताध्यान सर्वकाळ ।
सत्संगाचा दुष्काळ । या नाव बद्ध ॥ ३९ ॥
नेत्रीं द्रव्य दारा पाहावी । श्रवणीं द्रव्य दारा ऐकावी ।
चिंतनीं द्रव्य दारा चिंतावी । या नाव बद्ध ॥ ४० ॥

---

१ तापट. २ दावा धरणारा ३ संबंधी जनाचा हव्यास असणारा. ४ नास्तिकपणा ५ पसारा. ६ विश्रांति, आळस. ७ दांडगा. ८ अदेखणा, मत्सर. ९ उफराटी.

काया वाचा आणि मन । चित्त वित्त जीव प्राण ।
द्रव्यदारेचें करी भजन । या नाव बद्ध ॥ ४१ ॥
इन्द्रियें करून निश्चळ । चंचळ होऊं नेदी पळ ।
द्रव्यदारेसि लावी सकळ । या नाव बद्ध ॥ ४२ ॥
द्रव्य दारा तें चि तीर्थ । द्रव्य दारा तो चि परमार्थ ।
द्रव्य दारा सकळ स्वार्थ । म्हणे तो बद्ध ॥ ४३ ॥
वेर्थ जाऊं नेदी काळ । संसारचिंता सर्वकाळ ।
कथा वार्ता ते चि सकळ । या नाव बद्ध ॥ ४४ ॥
नाना चिंता नाना उद्वेग । नाना दुःखाचे संसर्ग ।
करी परमार्थाचा त्याग । या नाव बद्ध ॥ ४५ ॥
घटिका पळ निमिष्यभरी । दुश्चीत नव्हता अंतरीं ।
सर्वकाळ ध्यान करी । द्रव्यदाराप्रपंचाचें ॥ ४६ ॥
तीर्थ यात्रा दान पुण्य । भक्ति कथा निरूपण ।
मंत्र पूजा जप ध्यान । सर्व ही द्रव्य दारा ॥ ४७ ॥
जागृति स्वप्न रात्रि दिवस । ऐसा लागला विषयेध्यास ।
नाहीं क्षणाचा अवकाश । या नाव बद्ध ॥ ४८ ॥
ऐसें बद्धाचें लक्षण । मुमुक्षपणीं पालटे जाण ।
ऐक ते ही वोळखण । पुढिलीये समासीं ॥ ४९ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे बद्धलक्षणनाम समास सप्तम ॥ ७ ॥

---

॥ श्रीराम ॥

संसारमदाचेनि गुणें । नाना हीनें कुलक्षणें ।
जयाचेनि मुखावलोकनें । दोष चि लागे ॥ १ ॥
ऐसा प्राणी जो कां बद्ध । संसारीं वर्तता अबद्ध[1] ।
तयास प्राप्त जाला खेद । काळांतरीं ॥ २ ॥

---

१ मूर्खपणें.

संसारदुःखें दुखवला । त्रिविध तापें पोळला ।
निरूपणें प्रस्तावला । अंतर्यामीं ॥ ३ ॥
जाला प्रपंचीं उदास । मनें घेतला विषयत्रास ।
ह्मणे आतां पुरे सोस । संसारींचा ॥ ४ ॥
प्रपंच जाईल सकळ । येथील श्रम तो निर्फळ ।
आतां कांहीं आपुला काळ । सार्थक करूं ॥ ५ ॥
ऐसी बुद्धि प्रस्तावली । पोटीं आवस्तों लागली ।
म्हणे माझी वेयेसा गेली । वेर्थ चि आवघी ॥ ६ ॥
पूर्वीं नाना दोष केले । ते अवघे चि आठवले ।
पुढें येऊनि उभे ठेले । अंतर्यामीं ॥ ७ ॥
आठवे येमाची यातना । तेणें भये चि वाटे मना ।
नाहीं पापासि गणना । ह्मणौनियां ॥ ८ ॥
नाहीं पुण्याचा विचार । जाले पापाचे डोंगर ।
आतां दुस्तर हा ससार । कैसा तरों ॥ ९ ॥
आपले दोष आछ्यादिले । भल्यांस गुणदोष लाविले ।
देवा म्या वेर्थ च निंदिले । संत साधु सज्जन ॥ १० ॥
निंदे ऐसे नाहीं दोष । ते मज घडले कीं विशेष ।
माझे अवगुणीं आकाश । बुडों पाहे ॥ ११ ॥
नाहीं वोळखिले सत । नाहीं अर्चिला भगवत ।
नाहीं अतित अभ्यागत । सतुष्ट केले ॥ १२ ॥
पूर्वे पाप वोढवलें । मज कांहीं च नाहीं घडलें ।
मन अव्हाटीं पडिलें । सर्वकाळ ॥ १३ ॥
नाहीं कष्टविलें शरीर । नाहीं केला परोपकार ।
नाहीं रक्षिला आचार । काममदें ॥ १४ ॥
भक्ति माता हे बुडविली । शांति विश्रांति मोडिली ।
मूर्खपणें म्यां विघडिली । सद्बुद्धि सद्वासना ॥ १५ ॥

---

१ चिंता, काळजी. २ वय, आयुष्य. ३ आडमार्गी, कुमार्गी.

आतां कैसें घडे सार्थक । दोष केले निरार्थक ।
पाहों जातां विवेक । उरला नाहीं ॥ १६ ॥
कोण उपाये करावा । कैसा परलोक पावावा ।
कोण्या गुणें देवाधिदेवा । पाविजेल ॥ १७ ॥
नाहीं सद्भाव उपजला । अवघा लौकिक संपादिला ।
दंभ वरपंगें केला । खटाटोप कर्माचा ॥ १८ ॥
कीर्तन केलें पोटासाठीं । देव मांडिले हाटवटीं[1] ।
आहा देवा बुद्धि खोटी । माझी मी च जाणे ॥ १९ ॥
पोटीं धरूनि अभिमान । शब्दीं बोले निराभिमान ।
अंतरीं वांछूनियां धन । ध्यानस्त जालों ॥ २० ॥
वित्पत्तीनें[2] लोक भोंदिले । पोटासाठीं संत निंदिले ।
माझे पोटीं दोष भरले । नाना प्रकारीचे ॥ २१ ॥
सत्य तें चि उछेदिलें । मिथ्य तें चि प्रतिपादिलें ।
ऐसें नाना कर्म केलें । उदरंभराकारणें ॥ २२ ॥
ऐसा पोटीं प्रस्तावला । निरूपणें पालटला ।
तो चि मुमुक्ष बोलिला । ग्रन्थांतरीं ॥ २३ ॥
पुण्यमार्ग पोटीं धरी । सत्संगाची वांछा करी ।
विरक्त जाला संसारीं । या नाव मुमुक्ष ॥ २४ ॥
गेले राजे चक्रवती । माझें वैभव तें किती ।
ह्मणे धरूं सत्संगती । या नाव मुमुक्ष ॥ २५ ॥
आपुले अवगुण देखे । विरक्तिबळें वोळखे ।
आपणासि निंदी दुःखें । या नाव मुमुक्ष ॥ २६ ॥
ह्मणे मी काये अनोपकारी । ह्मणे मी काय दंभधारी
ह्मणे मी काये अनाचारी । या नाव मुमुक्ष ॥ २७ ॥
ह्मणे मी पतित चांडाळ । ह्मणे मी दुराचारी खळ ।
ह्मणे मी पापी केवळ । या नाव मुमुक्ष ॥ २८ ॥

---

१ बाजारांत. २ व्युत्पत्तीनें, शास्त्रज्ञानानें.

ह्मणे मी अभक्त दुर्जन । ह्मणे मी हीनाहूनि हीन ।
ह्मणे मी जन्मलों पाषाण । या नाव मुमुक्ष ॥ २९ ॥
ह्मणे मी दुराभिमानी । ह्मणे मी तपीळ जनीं ।
ह्मणे मी नाना वेसनी । या नाव मुमुक्ष ॥ ३० ॥
ह्मणे मी आळसी आंगचोर । ह्मणे मी कपटी कातर ।
ह्मणे मी मूर्ख अविचार । या नाव मुमुक्ष ॥ ३१ ॥
ह्मणे मी निकामी वाचाळ । ह्मणे मी पाषांडी तोंडाळ ।
ह्मणे मी कुबुद्धि कुटिळ । या नाव मुमुक्ष ॥ ३२ ॥
ह्मणे मी काहीं च नेणे । ह्मणे मी सकळाहूनि उणें ।
आपलीं वर्णी कुलक्षणें । या नाव मुमुक्ष ॥ ३३ ॥
ह्मणे मी अनाधिकारी । ह्मणे मी कुश्चिळ अघोरी ।
ह्मणे मी नीच नानापरी । या नाव मुमुक्ष ॥ ३४ ॥
ह्मणे मी काये आपस्वार्थी । ह्मणे मी काये अनर्थी ।
ह्मणे मी नव्हे परमार्थी । या नाव मुमुक्ष ॥ ३५ ॥
ह्मणे मी अवगुणाची रासी । ह्मणे मी वेर्थ आलों जन्मासी ।
ह्मणे मी भार जालों भूमीसी । या नाव मुमुक्ष ॥ ३६ ॥
आपणास निंदी सावकास । पोटीं संसाराचा त्रास ।
धरी सत्संगाचा हव्यास । या नाव मुमुक्ष ॥ ३७ ॥
नाना तीर्थें धुडाळिलीं । शमदमादि साधनें केलीं ।
नाना ग्रन्थांतरें पाहिलीं । शोधूनियां ॥ ३८ ॥
तेणें नव्हे समाधान । वाटे अवघा च अनुमान ।
ह्मणे रिघों संतांस शरण । या नाव मुमुक्ष ॥ ३९ ॥
देहाभिमान कुळाभिमान । द्रव्याभिमान नानाभिमान ।
सांडूनि संतचरणीं अनन्य । या नाव मुमुक्ष ॥ ४० ॥
अहंता सांडूनि दूरी । आपणास निंदी नानापरी ।
मोक्षाची अपेक्षा करी । या नाव मुमुक्ष ॥ ४१ ॥

---

१ मित्रा.

ज्याचें थोरपण लाजे । जो परमार्थाकारणें झिजे ।
संतापाईं विश्वास उपजे । या नाव मुमुक्ष ॥ ४२ ॥
स्वार्थ सांडून प्रपंचाचा । हव्यास धरिला परमार्थाचा ।
अंकित होईन सज्जनाचा । ह्मणे तो मुमुक्ष ॥ ४३ ॥
ऐसा मुमुक्ष जाणिजे । संकेतचिन्हें वोळखिजे ।
पुढें श्रोतीं अवधान दीजे । साधकलक्षणीं ॥ ४४ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे मुमुक्षलक्षणंनाम समास अष्टम ॥ ८ ॥

---

॥ श्रीराम ॥

मागां मुमुक्षाचें लक्षण । संकेतें केलें कथन ।
आतां परिसा सावधान । साधक तो कैसा ॥ १ ॥
अवगुणाचा करूनि त्याग । जेणें धरिला सतसंग ।
तयासी बोलिजे मग । साधक ऐसा ॥ २ ॥
जो संतांसी शरण गेला । सतजनीं आश्वासिला ।
मग तो साधक बोलिला । ग्रन्थांतरीं ॥ ३ ॥
उपदेशिलें आत्मज्ञान । तुटलें संसारबंधन ।
दृढतेकारणें करी साधन । या नाव साधक ॥ ४ ॥
धरी श्रवणाची आवडी । अद्वैतनिरूपणाची गोडी ।
मननें अर्थांतर काढी । या नाव साधक ॥ ५ ॥
होतां सारासारविचार । ऐके होऊनि तत्पर ।
संदेह छेदूनि दृढोत्तर । आत्मज्ञान पाहे ॥ ६ ॥
नाना संदेहनिवृत्ती । व्हावया धरी सत्संगती ।
आत्मशास्त्रगुरुप्रचीती[1] । ऐक्यतेसि आणी ॥ ७ ॥
देहबुद्धि विवेकें वारी । आत्मबुद्धि सदृढ धरी ।
श्रवण मनन केलें चि करी । या नाव साधक ॥ ८ ॥

---

१ आत्मप्रतीति, शास्त्रप्रतीति, गुरुप्रतीति प्रतीति = अनुभव. शास्त्रांतील सिद्धांत, गुरूंनीं केलेला उपदेश आणि आपला स्वतःचा अनुभव हीं तिन्ही एक च आहेत असा अनुभव घेतो.

विसर्चूनि[1] दृश्यभान । दृढ धरी आत्मज्ञान ।
विचारें राखे समाधान । या नाव साधक ॥ ९ ॥
तोडूनि द्वैताची उपाधी । अद्वैत वस्तु साधनें साधी ।
लावी ऐक्यतेची समाधी । या नाव साधक ॥ १० ॥
आत्मज्ञान जीर्ण जर्जर । त्याचा करी जीर्णोद्धार ।
विवेकें पावे पैलपार । या नाव साधक ॥ ११ ॥
उत्तमें साधूचीं लक्षणें । आंगिकारी निरूपणें ।
बळें चि स्वरूपाकार होणें । या नाव साधक ॥ १२ ॥
असत्क्रिया ते सोडिली । आणी सत्क्रिया ते वाढविली ।
स्वरूपस्थिती बळावली । या नाव साधक ॥ १३ ॥
अवगुण त्यागी दिवसेंदिवस । करी उत्तम गुणाचा अभ्यास ।
स्वरूपीं लावी निजध्यास । या नाव साधक ॥ १४ ॥
दृढ निश्चयाचेनि बळें । दृश्यें[2] असतां च नाडळे ।
सदा स्वरूपीं मिसळे । या नाव साधक ॥ १५ ॥
प्रत्यक्ष माया अलक्ष करी । अलक्ष वस्तु लक्षी अतरीं ।
आत्मस्थितीची धारणा धरी । या नाव साधक ॥ १६ ॥
जें या जनासि चोरलें । मनास न वचे अनुमानलें ।
तें चि जेणें दृढ केलें । या नाव साधक ॥ १७ ॥
जें बोलता चि वाचा[3] धरी । जें पाहाता चि अध करी ।
तें साधी नाना परी । या नाव साधक ॥ १८ ॥
जें साधू जातां साधवेना । जें लक्षू जाता लक्षवेना ।
तें चि अनुभवें आणी मना । या नाव साधक ॥ १९ ॥

---

१ नासून, घालवूंन, दवडून. २ तो दृश्य खरा, परंतु स्वरूपीं त्याचें लक्ष नाहीं असा तो केव्हां च आढळत नाहीं, असा कोणी अर्थ करितात; दृश्य पदार्थ असून हि तिकडे त्याचें लक्ष नसतें, असा अर्थ दुसरे कित्येक करितात. प्रत्यक्ष माया अलक्ष करी । हा च भावार्थ. ३ वाचा धरी = वाणी बंद करितें, जेथें वाणी कुंठित होते.

जेथें मन चि मावळे । जेथें तर्क चि पांगुळे ।
तें चि अनुभवा आणी बळें । या नाव साधक ॥ २० ॥
स्वानुभवाचेनि योगें । वस्तु साधी लागवेगें ।
तें चि वस्तु होये आंगें । या नाव साधक ॥ २१ ॥
अनुभवाचीं आगें जाणे । योगियांचे खुणे बाणे ।
कांहीं च नेंहोन असणें । या नाव साधक ॥ २२ ॥
परती सारून उपाधी । असाध्य वस्तु साधनें साधी ।
स्वरूपीं करी दृढ बुद्धी । या नाव साधक ॥ २३ ॥
देवाभक्तांचें मूळ । शोधून पाहे सकळ ।
साध्य चि होये तत्काळ । या नाव साधक ॥ २४ ॥
विवेकबळें गुप्त जाला । आपेंआप मावळला ।
दिसतो परी देखिला । नाहीं च कोणीं ॥ २५ ॥
मीपण मागें सांडिलें । स्वयें आपणास धुंडिलें ।
तुर्येस हि वोलांडिलें । या नाव साधक ॥ २६ ॥
पुढें उन्मनीचा सेवटीं । आपली आपण अखंड भेटी ।
अखंड अनुभवीं ज्याची दृष्टी । या नाव साधक ॥ २७ ॥
द्वैताचा तटका तोडिला । भासाचा भास मोडिला ।
देहीं असोनि विदेह जाला । या नाव साधक ॥ २८ ॥
जयास अखंड स्वरूपस्थिती । नाहीं देहाची अहंकृती ।
सकळ संदेहनिवृत्ती । या नाव साधक ॥ २९ ॥
पंचभूतांचा विस्तार । जयासि वाटे स्वप्नाकार ।
निर्गुणीं जयाचा निर्धार । या नाव साधक ॥ ३० ॥
स्वप्नीं भये जें वाटलें । तें जागृतीस नाहीं आलें ।
सकळ मिथ्या निर्धारिलें । या नाव साधक ॥ ३१ ॥

---

१ नसून. २ आंत चालला, अंतर्मुख झाला ३ स्वरूपीं कायमचा लय पावला. ४ द. ५ स. ६ ओ. ६ वरील टीप पहा. ५ सबध (हंसकोश).

मायेचें जें प्रत्यक्षपण । जनास वाटे हें प्रमाण ।
स्वानुभवें अप्रमाण । साधकें केलें ॥ ३२ ॥
निद्रा सांडूनि चेइरा[1] जाला । तो स्वप्नभयापासून सुटला ।
माया सांडून तैसा गेला । साधक स्वरूपीं ॥ ३३ ॥
ऐसी अंतरस्थिती बाणली । बाह्य निस्पृहता अवलंबिली ।
संसारउपाधी त्यागिली । या नाव साधक ॥ ३४ ॥
कामापासून सुटला । क्रोधापासूनि पळाला ।
मद मत्सर सांडिला । येकीकडे ॥ ३५ ॥
कुळाभिमानासि सांडिलें । लोकलाजेस लाजविलें ।
परमार्थास माजविलें । विरक्तिबळें ॥ ३६ ॥
अविद्येपासून फडकला । प्रपंचापासून निष्टला ।
लोभाचे हातींचा गेला । अकस्मात ॥ ३७ ॥
थोरपणासि पाडिलें । वैभवासि लिथाडिलें ।
महत्वासि झिंजाडिलें । विरक्तिबळें ॥ ३८ ॥
भेदाचा मढ[2] मोडिला । अहंकार सोडून पाडिला ।
पाइं धरूनि आपटिला । संदेहशत्रु ॥ ३९ ॥
विकल्पाचा केला वधु । थापें मारिला भवसिंधु ।
सकळ भूतांचा विरोधु । तोडून टाकिला ॥ ४० ॥
भवभयासि भडकाविलें । काळाचें टांगें मोडिलें ।
मस्तक हाणोनि फोडिलें । जन्ममृत्याचें ॥ ४१ ॥
देहसमंधावरी लोटला । संकल्पावरी उठावला ।
कल्पनेचा घात केला । अकस्मात ॥ ४२ ॥
अपधा[3]कासि ताडिलें । लिंगदेहासि विभांडिलें ।
पाषांडास पछ्याडिलें । विवेकबळें ॥ ४३ ॥
गर्वावरी गर्व केला । स्वार्थ अनर्थी घातला ।
अनर्थ तो हि निर्दाळिला । नीतिन्यायें ॥ ४४ ॥

---

१ जागृत. २ मठ, घर ( हंसकोश ) ३ अप+धाक, आपली भीति ४ वासनात्मक सूक्ष्म देह. ५ पराभूत केलें, जिंकिलें

मोहासी मधें चि तोडिलें । दुःखासि दुःखड चि केलें ।
शोकास खंडून[1] सांडिलें । येकीकडे ॥ ४५ ॥
द्वेष केला देशधडी । अभावाची[2] घेतली नरडी ।
धाकें उदर तडाडी । कुतर्कांचें ॥ ४६ ॥
ज्ञानेंविवेक[3] माजला । तेणें निश्चयो बळावला ।
अवगुणाचा संव्हार केला । वैराग्यबळें ॥ ४७ ॥
अधर्मास स्वधर्में लुटिलें । कुकर्मासि सत्कर्में झुगटिलें[4] ।
लाटून वाटा लाविलें । विचारें अविचारासी ॥ ४८ ॥
तिरस्कार तो चिरडिला । द्वेष खिरडूनि सांडिला ।
विषाद अविषादें घातला । पायांतळीं ॥ ४९ ॥
कोपावरी घाळणें घातलें । कापठ्य अतरीं कुटिलें ।
सख्य आपुलें मानिलें । विश्वजनीं ॥ ५० ॥
प्रवृत्तीचा केला त्याग । सुहृदाचा सोडिला संग ।
निवृत्तिपथें ज्ञानयोग । साधिता जाला ॥ ५१ ॥
विषेयेमैंदास[5] सितरिलें । कुविद्येसि वेढा लाविलें ।
आपणास सोडविलें । आशतस्करापासुनी ॥ ५२ ॥
पराधेनतेवरी कोपला । ममतेवरी संतापला ।
दुराशेचा त्याग केला । येकायेकी ॥ ५३ ॥
स्वरूपीं घातलें मना । यातनेसि केली यातना ।
संक्षेप आणि प्रेत्ना[6] । प्रतिष्ठिलें ॥ ५४ ॥
अभ्यासाचा संग धरिला । साक्षपासरिसा[7] निघाला ।
प्रेत्न सार्गाती भला । साधनपथें ॥ ५५ ॥
सावध दक्ष तो साधक । पाहे नित्यानित्य विवेक ।
संग[8] त्यागूनि येक । सत्संग धरी ॥ ५६ ॥

---

१ " खिरडून " होतें, त्याचें हरताळ लावून " खंडून " केलें आहे. २ नास्तिकपणाची ३ ज्ञानविवेक. ४ झुगारिलें ५ विषयरूपी फांसेगारास ६ दीर्घोद्योग ७ दीर्घोद्योगाबरोबर. साधनमार्ग क्रमण्यास दीर्घोद्योगाला बरोबर घेऊन निघाला– ८ सोबती. ९ देहबुद्धीचा सग

बळें चि सारिला संसार । विवेकें टाकिला जोजार ।
शुद्धाचारें अनाचार । भ्रष्टविला ॥ ५७ ॥
विसरास विसरला । आळसाचा आळस केला ।
सावध नाहीं दुश्चित्त जाला । दुश्चित्तपणासी[1] ॥ ५८ ॥
आतां असो हें बोलणें । अवगुण सांडी निरूपणें ।
तो साधक ऐसा येणें प्रमाणें । बुझावा[2] ॥ ५९ ॥
बळें चि अवघा त्याग कीजे । ह्मणौनि साधक बोलिजे ।
आता सिद्ध तो जाणिजे । पुढिले समासीं ॥ ६० ॥
येथें संशय उठिला । निस्पृह तो चि साधक जाला ।
त्याग न घडे संसारिकाला । तरी तो साधक नव्हे कीं ॥६१॥
ऐसें श्रोतयांचें उत्तर । याचें कैसें प्रत्योत्तर ।
पुढिले समासीं तत्पर । होऊन ऐका ॥ ६२ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे साधकलक्षणनिरूपणनाम समास नवम ॥९

---

॥ श्रीराम ॥

मागें बोलिला संसारिक । त्यागेंविण नव्हे कीं साधक ।
ऐका हो याचा विवेक । ऐसा असे ॥ १ ॥
सन्मार्ग तो जीवीं धरणें । अंनमार्गाचा[3] त्याग करणें ।
ससारिकां त्याग येणें । प्रकारें ऐसा ॥ २ ॥
कुबुद्धित्यागेंविण कांहीं । सुबुद्धि लागणार नाहीं ।
ससारिकां त्याग पाहीं । ऐसा असे ॥ ३ ॥
प्रपंचीं वीट मानिला । मनें विषयेंत्याग केला ।
तरी च पुढें आवलंबिला । परमार्थमार्ग ॥ ४ ॥
त्याग घडे अभावाचा । त्याग घडे संशयाचा ।
त्याग घडे अज्ञानाचा । शनै शैनै[4] ॥ ५ ॥

---

१ दुश्चित्तपणाविषयीं सावध नसतो तर दुश्चित्त असतो, ह्मणजे एकंदरींत दुश्चित्त नसतो. २ जाणावा ३ असन्मार्गाचा ४ शनै शनै., हळुहळु.

ऐसा सूक्ष्म अंतर्त्याग । उभयांस घडे सांग ।
निस्पृहास बाह्यत्याग । विशेष आहे ॥ ६ ॥
संसारिकां ठाईं ठाईं । बाह्यत्याग घडे कांहीं ।
नित्यनेम श्रवण नाहीं । त्यागेंविण ॥ ७ ॥
फिटली आशंका स्वभावें । त्यागेंविण साधक नव्हे ।
पुढें कथेचा अन्वय । सावध ऐका ॥ ८ ॥
मागां जालें निरूपण । साधकाची वोळखण ।
आतां सांगिजेल खूण । सिद्धलक्षणाची ॥ ९ ॥
साधु वस्तु होऊन ठेला । संशय ब्रह्मांडाबाहेरि गेला ।
निश्चये चळेना ऐसा जाला । या नाव सिद्ध ॥ १० ॥
बद्धपणाचे अवगुण । मुमुक्षपणीं नाहीं जाण ।
मुमुक्षपणाचें लक्षण । साधकपणीं नाहीं ॥ ११ ॥
साधकासि संदेहवृत्ती । पुढें होतसे निवृत्ती ।
याकारणें नि.संदेह श्रोतीं । साधु वोळखावा ॥ १२ ॥
संशयरहित ज्ञान । तें चि साधूचें लक्षण ।
सिद्धाआंगीं संशय हीन । लागेल कैसा ॥ १३ ॥
कर्ममार्ग संशयें भरला । साधनीं संशये कालवला ।
सर्वांमधें संशये भरला । साधु तो निःसंदेह ॥ १४ ॥
संशयाचें ज्ञान खोटें । संशयाचें वैराग्य पोरटें ।
संशयाचें भजन वोखटें । निर्फळ होये ॥ १५ ॥
वेर्थ संशयाचा देव । वेर्थ संशयाचा भाव ।
वेर्थ संशयाचा स्वभाव । सर्व कांहीं ॥ १६ ॥
वेर्थ संशयाचें व्रत । वेर्थ संशयाचें तीर्थ ।
वेर्थ संशयाचा परमार्थ । निश्चयेंविण ॥ १७ ॥
वेर्थ संशयाची भक्ती । वेर्थ संशयाची प्रीती ।
वेर्थ संशयाची संगती । संशयो वाढवी ॥ १८ ॥

---

१ हा शब्द समासात मागाहून. स. शो. २ ब्रह्म.

वेर्थ संशयाचें जिणें । वेर्थ संशयाचें धरणें ।
वेर्थ संशयाचें करणें । सर्व कांहीं ॥ १९ ॥
वेर्थ संशयाची पोथी । वेर्थ संशयाची वित्पत्ती ।
वेर्थ संशयाची गती । निश्चयेंविण ॥ २० ॥
वेर्थ संशयाचा दक्ष । वेर्थ संशयाचा पक्ष ।
वेर्थ संशयाचा मोक्ष । होणार नाहीं ॥ २१ ॥
वेर्थ संशयाचा संत । वेर्थ संशयाचा पंडित ।
वेर्थ संशयाचा बहुश्रुत । निश्चयेंविण ॥ २२ ॥
वेर्थ संशयाची श्रेष्ठता । वेर्थ संशयाची वित्पन्नता ।
वेर्थ संशयाचा ज्ञाता । निश्चयेंविण ॥ २३ ॥
निश्चयेंविण सर्व कांहीं । अणुमात्र तें प्रमाण नाहीं ।
वेर्थ चि पडिले प्रवाहीं । संदेहाचे ॥ २४ ॥
निश्चयेंविण जें बोलणें । तें अवघें चि कंटाळवाणें ।
बाष्कळ बोलिजे वाचाळपणें । निरार्थक ॥ २५ ॥
असो निश्चयेंविण जे वल्गना[1] । ते अवघी च विटंबना ।
संशयें कांहीं समाधाना । ठेरी[2] नाहीं ॥ २६ ॥
म्हणोनि संदेहरहित ज्ञान । निश्चयाचें समाधान ।
तें चि सिद्धाचें लक्षण । निश्चयेंसीं ॥ २७ ॥
तव श्रोता करी प्रश्न । निश्चय करावा कवण ।
मुख्य निश्चयाचें लक्षण । मज निरोपावें ॥ २८ ॥
ऐक निश्चय तो ऐसा । मुख्य देव आहे कैसा ।
नाना देवाचा वळैसा[3] । करूं चि नये ॥ २९ ॥
जेणें निर्मिलें सचराचर । त्याचा करावा विचार ।
शुद्ध विवेकें परमेश्वर । वोळखावा ॥ ३० ॥
मुख्य देव तो कवण । भक्ताचें कैसें लक्षण ।
असत्य सांडून वोळखण । सत्याची धरावी ॥ ३१ ॥

1 " कल्प " खोडून " वल्ग " केलें आहे. २ ठाव. ३ गलबला, घोंटाळा.

आपल्या देवास वोळखावें । मग मी कोण हें पाहावें ।
संग त्यागून राहावें । वस्तुरूप ॥ ३२ ॥
तोडावा बंधनाचा संशयो । करावा मोक्षाचा निश्चयो ।
पाहावा भूतांचा अन्वयो । वितिरेकेंसीं[1] ॥ ३३ ॥
पूर्वपक्षेंसिं सिद्धांत । पाहावा प्रकृतीचा अंत ।
मग पावावा निवांत । निश्चय देवाचा ॥ ३४ ॥
देहाचेनि योगें संशयो । करी समाधानाचा क्षयो ।
कळों नेदावा निश्चयो । आत्मत्वाचा ॥ ३५ ॥
सिद्ध असतां आत्मज्ञान । संदेह वाढवी देहाभिमान ।
याकारणें समाधान । आत्मनिश्चयें राखावें ॥ ३६ ॥
आठवतां देहबुद्धी । उडे विवेकाची शुद्धी ।
याकारणें आत्मबुद्धी । सदृढ करावी ॥ ३७ ॥
आत्मबुद्धि निश्चयाची । ते चि दशा मोक्षश्रीची ।
अहमात्मा हें कधीं चि । विसरों नये ॥ ३८ ॥
निरोपिलें निश्चयाचें लक्षण । परी हें न कळे सत्संगेंविण ।
संतांसि गेलियां शरण । संशये तुटती ॥ ३९ ॥
आतां असो हें बोलणें । ऐका सिद्धांचीं लक्षणें ।
मुख्य निःसंदेहपणें । सिद्ध बोलिजे ॥ ४० ॥
सिद्धस्वरूपीं नाहीं देहो । तेथें कैंचा हो संदेहो ।
याकारणें सिद्ध पाहो । निःसंदेही ॥ ४१ ॥
देहसंबंधाचेनि गुणें । लक्षणासि काये उणें ।
देहातीताचीं लक्षणें । काये ह्मणोनि सांगावीं ॥ ४२ ॥
जें लक्षवेना चक्षूसी । त्याचीं लक्षणें सांगावीं कैसीं ।
निर्मळ वस्तु सिद्ध त्यासी । लक्षणें कैसीं ॥ ४३ ॥
लक्षणें ह्मणिजे केवळ गुण । वस्तु ठाईंची निर्गुण ।
तें चि सिद्धाचें लक्षण । वस्तुरूप ॥ ४४ ॥

---

१ व्यतिरेकासह, पंचभूतांची उभारणी आणि संहारणी.

तथापि ज्ञानदशकीं बोलिलें । ह्मणौनि वगतृत्व आटोपिलें ।
न्यूनपूर्ण क्ष्मा केलें । पाहिजे श्रोतीं ॥ ४५ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सिद्धलक्षणनाम समास दाहावा ॥१०॥

---

## ॥ दशक षष्ठ देवशोधन नाम ॥ ६ ॥

॥ श्रीराम ॥

चित्त सुचित करावें । बोलिलें तें जीवीं धरावें ।
सावध होऊन बैसावें । निमिष्य येक ॥ १ ॥
कोणी येके ग्रामीं अथवा देसीं । राहाणें आहे आपणासी ।
न भेटतां तेथिल्या प्रभूसी । सौख्य कैचें ॥ २ ॥
ह्मणौन ज्यास जेथें राहाणें । तेणें त्या प्रभूची भेटी घेणें ।
ह्मणिजे होये श्लाघ्यवाणें । सर्व कांहीं ॥ ३ ॥
प्रभूची भेटी न घेता । तेथें कैंची मान्यता ।
आपुलें महत्व जाता । वेळ नाहीं ॥ ४ ॥
ह्मणौनि रायापासूनि रंक । कोणी येक तरी नायेक ।
त्यास भेटणें हा विवेक । विवेकी जाणती ॥ ५ ॥
त्यास न भेटतां त्याचे नगरीं । राहातां धरितील बेगारी ।
तेथें न करितां चोरी । आंगीं लागे ॥ ६ ॥
या कारणें जो शाहाणा । तेणें प्रभूसी भेटावें जाणा ।
ऐसें न करिता दैन्यवाणा । संसार त्याचा ॥ ७ ॥
ग्रामीं थोर ग्रामाधिपती । त्याहूनि थोर देशाधिपती ।
देशाधिपतीहूनि नृपती । थोर जाणावा ॥ ८ ॥
राष्ट्रांचा प्रभु तो राजा । बहुराष्ट्र तो माहाराजा ।
माहाराजाचा हि राजा । तो चक्रवती ॥ ९ ॥

---

१ आठव्या दशकात. २ कष्टमय संसार, त्रिविध ताप, नवविधा भक्ति, विरक्त, सद्गुरु, सच्छिष्य, शुद्ध ज्ञान इत्यादिकाचें वर्णन येथवर झाल्यावर आता अध्यात्मनिरूपण लागणार म्हणून 'चित्त सुचित करावें' असा आरंभीं इशारा दिला आहे.

येक नरपति येक गजपती । येक हयपति येक भूपती ।
सकळांमध्यें चक्रवती । थोर राजा ॥ १० ॥
असो ऐसियां समस्ता । येक ब्रह्मा निर्माणकर्ता ।
त्या ब्रह्यास हि निर्मिता । कोण आहे ॥ ११ ॥
ब्रह्मा विष्णु आणि हर । त्यांसी निर्मिता तो चि थोर ।
तो वोळखावा परमेश्वर । नाना येत्नें ॥ १२ ॥
तो देव ठाईं पडेना । तरी येमयातना चुकेना ।
ब्रह्मांडनायेक चोजवेना[1] । हें बरें नव्हे ॥ १३ ॥
जेणें संसारीं घातलें । आवघें ब्रह्मांड निर्माण केलें ।
त्यासी नाहीं वोळखिलें । तो चि पतित ॥ १४ ॥
ह्मणोनि देव वोळखावा । जन्म सार्थक चि करावा ।
न कळे तरी सत्संग धरावा । ह्मणिजे कळे ॥ १५ ॥
जो जाणेल भगवंत । तया नाव बोलिजे संत ।
जो शाश्वत आणी अशाश्वत । निवाडा करी ॥ १६ ॥
चळेना ढळेना देव । ऐसा ज्याचा अंतर्भाव ।
तो चि जाणिजे माहानुभाव । संत साधु ॥ १७ ॥
जो जनामधें वागे । परि जनावेगळी गोष्टी सांगे ।
ज्याचे अंतरीं ज्ञान जागे । तो चि साधु ॥ १८ ॥
जाणिजे परमात्मा निर्गुण । त्यासी च ह्मणावें ज्ञान ।
त्यावेगळें तें अज्ञान । सर्व कांहीं ॥ १९ ॥
पोट भराव्याकारणें । नाना विद्या अभ्यास करणें ।
त्यासी ज्ञान ह्मणती परी तेणें । सार्थक नव्हे ॥ २० ॥
देव वोळखावा येक । तें चि ज्ञान तें सार्थक ।
येर आवघें चि निरार्थक । पोटविद्या ॥ २१ ॥
जन्मवरी पोट भरिलें । देहाचें संरक्षण केलें ।
पुढें अवघें चि वेर्थ गेलें । अंतकाळीं ॥ २२ ॥

१ जाणवत नाही.

येवं पोट भराव्याची विद्या । तयेसी ह्मणों नये सद्विद्या ।
सर्वव्यापक वस्तु सद्या[1] । पाविजे तें ज्ञान ॥ २३ ॥
ऐसें जयापासीं ज्ञान । तो चि जाणावा सज्जन ।
तयापासीं समाधान । पुसिलें पाहिजे ॥ २४ ॥
अज्ञानास भेटतां अज्ञान । तेथें कैंचें सांपडेल ज्ञान ।
करंट्यास करंट्याचें दर्शन । होतां भाग्य कैंचें ॥ २५ ॥
रोग्यापासीं रोगी गेला । तेथें कैंचें आरोग्य त्याला ।
निर्बळापासीं निर्बळाला । पाठी कैंची ॥ २६ ॥
पिशाच्यापासीं पिशाच्य गेलें । तेथें कोण सार्थक जालें ।
उन्मत्तास उन्मत्त भेटलें । त्यास उमजवी कवणु ॥ २७ ॥
भिकाऱ्यापासीं मागतां भिक्षा । दीक्षाहीनापासीं दीक्षा ।
उजेड पाहतां कृष्णपक्षा । पाविजे कैंचा ॥ २८ ॥
अबद्धापासीं गेला अबद्ध[2] । तो कैसेनि होईल सुबद्ध[3] ।
बद्धास भेटता बद्ध । सिद्ध नव्हे ॥ २९ ॥
देहापासीं गेला देही । तो कैसेनि होईल विदेही ।
ह्मणौनि ज्ञात्यावांचून नाहीं । ज्ञानमार्ग ॥ ३० ॥
याकारणें ज्ञाता पाहावा । त्याचा अनुग्रह घ्यावा ।
सारासार विचारें जीवा । मोक्ष प्राप्त ॥ ३१ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे देवशोधननाम समास प्रथम ॥ १ ॥

---

॥ श्रीराम ॥

ऐका उपदेशाचीं लक्षणें । सायोज्यप्राप्ती होय जेणें ।
नाना मताचें पेखणें[4] । कामा नये सर्वथा ॥ १ ॥
ब्रह्मज्ञानेंविण उपदेश । तो ह्मणों नये विशेष ।
धान्येंविण जैसें भूंस । खातां नये ॥ २ ॥

---

१ सद्यः, या चि जन्में येणें चि काळें. २ विसंगत, गैरशिस्त, मूर्ख. ३ सुसंगत, शिस्तवार, शहाणा. ४ पाहणें.

नाना काबाड बडविलें । नातरी तक्र चि गुसळिलें ।
अथवा घुणें चि सेविलें । सावकास ॥ ३ ॥
नाना साली भाक्षिल्या । अथवा चोइट्या चोखिल्या ।
खोबरें सांडून खादल्या । नरोट्या जैश्या ॥ ४ ॥
तैसें ब्रह्मज्ञानेंविण । नाना उपदेशाचा सिण ।
सार सांडून असार कोण । शाहाणा सेवी ॥ ५ ॥
आतां ब्रह्म जें का निर्गुण । तें चि केलें निरूपण ।
सुचित करावें अंतःकर्ण । श्रोतेजनीं ॥ ६ ॥
सकळ सृष्टीची रचना । ते हे पंचभूतिक जाणा ।
परंतु हे तगेना । सर्वकाळ ॥ ७ ॥
आदि अंतीं ब्रह्म निर्गुण । ते चि शाश्वताची खूण ।
येर पंचभूतिक जाण । नासिवंत ॥ ८ ॥
येऱ्हवीं हें पाहातां भूतें । देव कैसें म्हणावें त्यातें ।
भूत म्हणतां मनुष्यातें । विषाद वाटे ॥ ९ ॥
मीं तो जगज्जनक परमात्मा । त्यास आणि भूतउपमा ।
ज्याची कळेना महिमां । ब्रह्मादिकांसी ॥ १० ॥
भूतां ऐसा जगदीश । म्हणतां उत्पन्न होतो दोष ।
याकारणें माहापुरुष । सर्व जाणती ॥ ११ ॥
पृथ्वी आप तेज वायो आकाश । यां सबाह्य जगदीश ।
पंचभूतांसी आहे नाश । आत्मा अविनाशरूपी ॥ १२ ॥
जें जें रूप आणी नाम । तो तो आवघा चि भ्रम ।
नामरूपातीत वर्म । अनुभवें जाणावें ॥ १३ ॥
पंचभूतें आणि त्रिगुण । ऐसी अष्टधा प्रकृति जाण ।
अष्टधा प्रकृतीस नामाभिधान । दृश्य ऐसें ॥ १४ ॥

---

१ कडबा. २ धुवण. ३ प्रथम या ठिकाणीं "सगुण" होतें, त्याचें "जाण" केलें आहे. हा स. शो. ४ मग. ५ आतून आणि बाहेरून.

तें हें दृश्य नासिवंत । ऐसें वेद श्रुति बोलत ।
निर्गुण ब्रह्म शाश्वत । जाणती ज्ञानी ॥ १५ ॥
जें शस्त्रें तोडितां तुटेना । जें पावकें जाळितां जळेना ।
कालवितां कालवेना । आपेंकरूनी ॥ १६ ॥
जें वायोचेनि उडेना । जें पडेना ना झडेना ।
जें घडेना ना दडेना । परब्रह्म तें ॥ १७ ॥
ज्यासी वर्ण चि नसे । जें सर्वांहूनि अनारिसें ।
परंतु असत चि असे । सर्वकाळ ॥ १८ ॥
दिसेना तरी काये जालें । परतु तें सर्वत्र संचलें ।
सूक्ष्म चि कोंदाटलें । जेथें तेथें ॥ १९ ॥
दृष्टीस लागली संवे[1] । जें दिसेल तें चि पाहावें ।
परंतु गुज तें जाणावें । गोप्य आहे ॥ २० ॥
प्रगट तें जाणावें असार । आणी गुप्त तें जाणावें सार ।
गुरुमुखें हा विचार । उमजों लागे ॥ २१ ॥
जें उमजेना तें उमजावें । जें दिसेना तें पाहावें ।
जें कळेना तें जाणावें । विवेकबळें ॥ २२ ॥
गुप्त तें चि प्रगटवावें । असाध्य तें चि साधावें ।
[2]कोनडें चि अभ्यासावें । सावकास ॥ २३ ॥
वेद विरंची[3] आणि शेष । जेथें सिणले निशेष ।
तें चि साधावें विशेष । परब्रह्म तें ॥ २४ ॥
तरी तें कोणेपरी साधावें । तें चि बोलिलें स्वभावें ।
अध्यात्मश्रवणें पावावें । परब्रह्म तें ॥ २५ ॥
पृथ्वी नव्हे आप नव्हे । तेज नव्हे वायु नव्हे ।
वर्णवेक्त[4] ऐसें नव्हे । अव्यक्त तें ॥ २६ ॥
तयास ह्मणावें देव । वरकड लोकांचा स्वभाव ।
जितुके गाव तितुके देव । जनाकारणें ॥ २७ ॥

---

१ संवय. २ अवघड, कठीण, दुर्बोध. ३ ब्रह्मदेव. ४ वर्णव्यक्त.

ऐसा देवाचा निश्चये जाला । देव निर्गुण प्रत्यया आला ।
आतां आपण चि आपला । शोध घ्यावा ॥ २८ ॥
माझें शरीर ऐसें ह्मणतो । तरी तो जाण देहावेगळा चि तो ।
मन माझें ऐसें जाणतो । तरी तो मन हि नव्हे ॥ २९ ॥
पाहातां देहाचा विचार । अवघा तत्वांचा विस्तार ।
तत्वें तत्व झाडितां सार । आत्मा च उरे ॥ ३० ॥
आपणासी ठाव चि नाहीं । येथें पाहाणें नलगे कांहीं ।
तत्वें ठाईंचा ठाईं । विभागून गेलीं ॥ ३१ ॥
बांधली आहे तों गांठोडी । जो कोणी विचारें सोडी ।
विचार पाहातां ही गांठोडी । आडळेना ॥ ३२ ॥
तत्वाचें गांठोडें शरीर । याचा पाहातां विचार ।
येक आत्मा निरंतर । आपण नाहीं ॥ ३३ ॥
आपणासी ठाव चि नाहीं । जन्ममृत्य कैचें काई ।
पाहातां वस्तुचो[1] ठाईं । पापपुण्य नसे ॥ ३४ ॥
पापपुण्य येमयातना । हे निर्गुणीं तों असेना ।
आपण तो[2] चि तरी जन्ममरणा । ठाव कैंचा ॥ ३५ ॥
देहेबुद्धीनें बांधला । तो विवेकें मोकळा केला ।
देहातीत होतां पावला । मोक्षपद ॥ ३६ ॥
जालें जन्माचें सार्थक । निर्गुण आत्मा आपण येक ।
परंतु हा विवेक । पाहिला च पाहावा ॥ ३७ ॥
जागें होतां स्वप्न सरे । विवेक पाहाता दृश्य वोसरे ।
स्वरूपानुसधानें तरे । प्राणीमात्र ॥ ३८ ॥
आपणास निवेदावें । आपण विवेकें नुरावें ।
आत्मनिवेदन जाणावें । याचें नाव ॥ ३९ ॥
आधीं अध्यात्मश्रवण । मग सद्गुरुपादसेवन ।
पुढें आत्मनिवेदन । सद्गुरुप्रसादें ॥ ४० ॥

---

१ वस्तूच्या, आत्म्याच्या. २ तो च निर्गुण आत्मा.

आत्मनिवेदना उपरी । निखळ वस्तु निरंतरी ।
आपण आत्मा अंतरीं । बोध जाला ॥ ४१ ॥
त्या ब्रह्मबोधें ब्रह्म चि जाला । संसारखेद तो उडाला ।
देहो प्रारब्धीं टाकिला । सावकास ॥ ४२ ॥
यासी ह्मणिजे आत्मज्ञान । येणें पाविजे समाधान ।
परब्रह्मीं अभिन्न । भक्त चि जाला ॥ ४३ ॥
आतां होणार तें होयेना कां । आणि जाणार तें जायेना कां ।
तुटली मनांतील आशंका । जन्ममृत्याची ॥ ४४ ॥
संसारीं पुंडावें[1] चुकलें । देवा भक्तां ऐक्य जालें ।
मुख्य देवास वोळखिलें । सत्संगेंकरूनी ॥ ४५ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे ब्रह्मपावननाम समास द्वितीय ॥ २ ॥

---

॥ श्रीराम ॥

निर्गुण आत्मा तो निर्मळ । जैसें आकाश अंतराळ ।
घनदाट निर्मळ निश्चळ । सदोदित ॥ १ ॥
जें खंडलें चि नाहीं अखंड । जें उदंडाहूनि उदंड ।
जें गगनाहूनि वाड[2] । आणि सूक्ष्म ॥ २ ॥
जें दिसेना ना भासेना । जें उपजेना ना नासेना ।
जें येयना ना जायना । परब्रह्म तें ॥ ३ ॥
जें चळेना ना ढळेना । जें तुटेना ना फुटेना ।
जें रचेना ना खचेना । परब्रह्म तें ॥ ४ ॥
जें सन्मुख चि सर्वकाळ । जें निःकळंक आणि निखळ ।
सर्वांतर आकाशपाताळ । व्यापूनि असे ॥ ५ ॥
अविनाश तें ब्रह्म निर्गुण । नासे ते माया सगुण ।
सगुण आणि निर्गुण । कालवलें ॥ ६ ॥

---

१ संसारातील पुंडाई, ओढाताण, चेरझारा. २ मोठें.

या कर्दमाचा विचार । करूं जाणती योगेश्वर ।
जैसें क्षीर आणि नीर । राजहंस निवडिती ॥ ७ ॥
जड सबळ पंचभूतिक । त्यामधें आत्मा व्यापक ।
तो नित्यानित्यविवेक । पाहातां कळे ॥ ८ ॥
उसांमध्यें घेईजे रस । येर तें सांडिजे बाकस ।
तैसा जगामध्यें जगदीश । विवेकें वोळखावा ॥ ९ ॥
रस नासिवंत पातळ । आत्मा शाश्वत निश्चळ ।
रस अपूर्ण आत्मा केवळ । परिपूर्ण जाणावा ॥ १० ॥
आत्म्यासारिखें येक असावें । मा तें दृष्टांतासि द्यावें ।
दृष्टांतमिसें समजावें । कैसें तरी ॥ ११ ॥
ऐसी आत्मस्थिती संचली । तेथें माया कैसी जाली ।
जैसी आकाशीं वाहिली । झुळुक वायोची ॥ १२ ॥
वायोपासूनि तेज जालें । तेजापासूनि आप निपजलें ।
आपापासूनि आकारलें । भूमंडळ ॥ १३ ॥
भूमंडळापासूनि उत्पत्ती । जीव नेणों जाले किती ।
परंतु ब्रह्म आदिअंतीं । व्यापूनि आहे ॥ १४ ॥
जें जें कांहीं निर्माण जालें । तें तें अवघें चि नासलें ।
परी मुळीं ब्रह्म तें संचलें । जैसें तैसें ॥ १५ ॥
घटापूर्वीं आकाश असे । घटामधें आकाश भासे ।
घट फुटतां न नासे । आकाश जैसें ॥ १६ ॥
तैसें परब्रह्म केवळ । अचळ आणी अढळ ।
मधें होत जात सकळ । सचराचर ॥ १७ ॥
जें जें कांहीं निर्माण जालें । तें तें आधीं च ब्रह्में व्यापिलें ।
सर्व नाशतां उरलें । अविनाश ब्रह्म ॥ १८ ॥

---

१ चिखलाचा, मिश्रणाचा २ अचेतन. ३ औपाधिक ४ चोइटी. ५ आत्म्यासारखी एकादी वस्तु असेल तर, तिची उपमा द्यावयाची कीं नाहीं ?

ऐसें ब्रह्म अविनाश । तें चि सेविती ज्ञाते पुरुष ।
तत्वनिर्शनें आपणास । आपण लाभे ॥ १९ ॥
तत्वें तत्व मेळविलें । त्यासी देह हें नाम ठेविलें ।
तें जाणते पुरुषीं शोधिलें । तत्वें तत्व ॥ २० ॥
तत्वझाडा निशेष होतां । तेथें निमाली देहअहंता ।
निर्गुण ब्रह्मीं ऐक्यता । विवेकें जाली ॥ २१ ॥
विवेकें देहाकडे पाहिलें । तों तत्वें तत्व वोसरलें ।
आपण कांहीं नाहीं आलें । प्रत्ययांसी[1] ॥ २२ ॥
आपला आपण शोध घेतां । आपली तों माईक वार्ता ।
तत्वांतीं उरलें तत्वता । निर्गुण ब्रह्म ॥ २३ ॥
आपणाविण निर्गुण ब्रह्म । हें चि निवेदनाचें वर्म ।
तत्वासरिसा गेला भ्रम । मीतूंपणाचा ॥ २४ ॥
मी पाहाता आडळेना । निर्गुण ब्रह्म तें चळेना ।
आपण तें चि परी कळेना । सद्गुरुविण ॥ २५ ॥
सारासार अवघें शोधिलें । तों असार तें निवोन गेलें ।
पुढें सार तें उरलें । निर्गुण ब्रह्म ॥ २६ ॥
आधीं ब्रह्म निरोपिलें । तें चि सकळांमध्यें व्यापलें ।
सकळ आवघें चि नासलें । उरलें तें केवळ ब्रह्म ॥ २७ ॥
होता विवेकें सव्हार । तेथें निवडे सारासार ।
आपला आपणासि विचार । ठाईं पडे ॥ २८ ॥
आपण कल्पिलें मीपण । मीपण शोधिता नुरे जाण ।
मीपण गेलियां निर्गुण । आत्मा स्वयें ॥ २९ ॥
जालियां तत्वाचें निर्शन । निर्गुण आत्मा तो चि आपण ।
कां दाखवावें मीपण । तत्वनिर्शनाउपरी ॥ ३० ॥

---

१ देहाचा विचार करून पाहिला तर तो केवळ पंचभूतात्मक दिसतो त्या पंचभौतिक शरिरांतील तत्त्वें तत्त्वांना मिळविलीं तर मग शेष काय उरलें ? निर्गुण ब्रह्माशिवाय कांहीं नाहीं. मुळांत " प्रत्यासी " पडलें आहे.

तत्वांमध्यें मीपण गेलें । तरी निर्गुण सहज चि उरलें ।
सोहंभावें प्रत्यया आलें । आत्मनिवेदन ॥ २१ ॥
आत्मनिवेदन होतां । देवाभक्तासी ऐक्यता ।
साचार भक्त विभक्तता । साडूनि जाला ॥ २२ ॥
निर्गुणासी नाहीं जन्ममरण । निर्गुणासी नाहीं पापपुण्य ।
निर्गुणीं अनन्य होतां आपण । मुक्त जाला ॥ २३ ॥
तत्वीं वेटाळून घेतला । प्राणी सशयें गुंडाळला ।
आपणासी आपण भुलला । कोहं ह्मणे ॥ २४ ॥
तत्वीं गुतला ह्मणे कोहं । विवेक पाहातां म्हणे सोहं ।
अनन्य होता अहं सोहं । मावळलीं ॥ २५ ॥
याउपरी उर्वरित । तें चि स्वरूप संत ।
देहीं असोनि देहातीत । जाणिजे ऐसा ॥ २६ ॥
संदेहवृत्ति ते न भगे । म्हणोनि बोलिलें चि बोलावें लागे ।
आम्हासी हें घडलें प्रसंगें । श्रोतीं क्षमा करावें ॥ २७ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे मायोद्भवनाम समास तृतीय ॥ ३ ॥

---

॥ श्रीराम ॥

कृतायुग सत्रा लक्ष अठाविस सहस्र । त्रेयायुग बारा लक्ष शाहाणौ सहस्र ।
द्वापार आठ लक्ष चौसष्टी सहस्र । आतां कलयुग ऐका ॥ १ ॥
कलयुग च्यारि लक्ष बतीस सहस्र । च्यतुर्युगें त्रेतालिस लक्ष वीस सहस्र ।
ऐसीं च्यतुर्युगें सहस्र । तो ब्रह्मयाचा येक दिवस ॥ २ ॥
ऐसे ब्रह्मे सहस्र देखा । तेव्हां विष्णूची येक घटिका ।
विष्णु सहस्र होतां ऐका । पळ येक ईश्वराचें ॥ ३ ॥

---

१ तो च मी, असा अनुभव आल्यानें. २ खराखरा. ३ मी कोण. ४ देहबुद्धि सुटली नाहीं तोंवर, ' मी कोण " ह्याचें ज्ञान होत नाहीं, विचार करून देहाची अहंता सुटली तर " ब्रह्म तो च मी " असा प्रत्यय येतो आणि त्या ब्रह्मस्वरूपीं हा लीन होऊन अनन्य झाला, तर " तो आणि मी " हा निराळा प्रत्यय सुद्धां मावळून जातो. ५ शेष. ६ अक्षयी, त्रिकालाबाधित ब्रह्म

ईश्वर जाये सहस्त्र वेळ । तें शक्तीचें अर्ध पळ ।
ऐसी संख्या बोलिली सकळ । शास्त्रांतरीं ॥ ४ ॥

चतुर्युगसहस्त्राणि दिनमेक पितामहम् ।
पितामहसहस्त्राणि विष्णोर्घटिकमेवच ॥ १ ॥
विष्णोरेकसहस्त्राणि पलमेकं महेश्वरम् ।
महेश्वरसहस्त्राणि शक्तेरर्धं पल भवेत् ॥ २ ॥

ऐशा अनंत शक्ती होती । अनंत रचना होति जाती ।
तरी अखंड खंडेना स्थिती । परब्रह्माची ॥ ५ ॥
परब्रह्मासी कैंची स्थिती । परी हे बोलावयाची रीती ।
वेदश्रुति नेति नेति । परब्रह्मीं ॥ ६ ॥
च्यारि सहस्त्र सातसें साठीं । इतुकी[१] कल्युगाची राहाटी ।
उरल्या कल्युगाची गोष्टी । ऐसी असे ॥ ७ ॥
च्यारि लक्ष सत्ताविस सहस्त्र । दोनिसें चाळीस संवछर ।
पुढें अंन्योविण्य[२] वर्णसंकर । होणार आहे ॥ ८ ॥
ऐसें रचलें सचराचर । येथें येकाहूनि येक थोर ।
पाहातां येथीचा विचार । अंत न लगे ॥ ९ ॥
येक ह्मणती विष्णु थोर । येक ह्मणती रुद्र थोर ।
येक ह्मणती शक्ति थोर । सकळामध्यें ॥ १० ॥
ऐसें आपुलालेपरी बोलती । परंतु अवघें चि नासेल कल्पांतीं ।
यदृष्ट त नष्ट[३] हें श्रुती । बोलतसे ॥ ११ ॥
आपुलाली उपासना । अभिमान लागला जना ।
याचा निश्चयो निवडेना । साधुविण ॥ १२ ॥
साधु निश्चय करिती येक । आत्मा सर्वत्र व्यापक ।
येर हें अवघें चि माईक । सचराचर ॥ १३ ॥

---

१ गतकली ४७६० ह्मणजे शके १५८१ हें साल येतें. श्रीमत् दासबोधाची रचना कोणत्या शकांत झाली हें जाणण्यास येथें आधार मिळतो. २ अन्योन्यिन्य, सरसकट. ३ जें दिसतें तें नाहींसें होतें.

चित्रीं लिहिली सेना । त्यांत कोण थोर कोण साना ।
हें तुह्मी विचाराना । आपुले ठाइं ॥ १४ ॥
स्वप्नीं उदंड देखिलें । लाहानथोर हि कल्पिलें ।
परंतु जागें जालियां जालें । कैसें पाहा ॥ १५ ॥
पाहातां जागृतीचा विचार । कोण लाहान कोण थोर ।
जाला अवघा चि विस्तार । स्वप्नरचनेचा ॥ १६ ॥
अवघा चि माईक विचार । कैंचें लाहान कैंचें थोर ।
लाहानथोराचा निर्धार । जाणती ज्ञानी ॥ १७ ॥
जो जन्मासी येऊन गेला । तो मी थोर ह्मणतां च मेला ।
परी याचा विचार पाहिला । पाहिजे श्रेष्ठीं ॥ १८ ॥
जयांसि जालें आत्मज्ञान । ते चि थोर माहाजन ।
वेद शास्त्रें पुराण । साधुसंत बोलिले ॥ १९ ॥
एवं सकळांमध्यें थोर । तो येक चि परमेश्वर ।
तयामधें हरिहर । होति जाती ॥ २० ॥
तो निर्गुण निराकार । तेथें नाहीं उत्पत्ती विस्तार ।
स्थानमानाचा विचार । ऐलिकडे ॥ २१ ॥
नावरूप स्थानमान । हा तों आवघा चि अनुमान ।
तथापी होईल निदान[1] । ब्रह्मप्रळइं ॥ २२ ॥
ब्रह्म प्रळयावेगळें । ब्रह्म नावरूपानिराळें ।
ब्रह्म कोणी येका काळें । जैसें तैसें ॥ २३ ॥
कारिती ब्रह्मनिरूपण । जाणती ब्रह्म संपूर्ण ।
ते चि जाणावे ब्राह्मण । ब्रह्मविद ॥ २४ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे ब्रह्मनिरूपणनाम समास चतुर्थ ॥ ४ ॥

---

१ अंत किंवा चिकित्सा, यांपैकीं कोणता हि अर्थ चालेल. ब्रह्मप्रळयीं या सर्वांचा शेवट होईल, किंवा नामरूपादि गोष्टी नाशवंत आहेत, हे जें आज नुसत्य अनुमानानें ह्मणावयाचें त्याची चिकित्सा किंवा निर्णय ब्रह्मप्रळयीं होणार आहे.

॥ श्रीराम ॥

श्रोते पुसती ऐसें । माया ब्रह्म तें कैसें ।
श्रोत्यां वक्तयाच्या मिसें । निरूपण ऐका ॥ १ ॥
ब्रह्म निर्गुण निराकार । माया सगुण साकार ।
ब्रह्मासि नाहीं पारावार । मायेसि आहे ॥ २ ॥
ब्रह्म निर्मळ निश्चळ । माया चंचळ चपळ ।
ब्रह्म निरोपाधी केवळ । माया उपाधिरूपी ॥ ३ ॥
माया दिसे ब्रह्म दिसेना । माया भासे ब्रह्म भासेना ।
माया नासे ब्रह्म नासेना । कल्पांतकाळीं ॥ ४ ॥
माया रचे ब्रह्म रचेना । माया खचे ब्रह्म खचेना ।
माया रुचे ब्रह्म रुचेना । अज्ञानासी ॥ ५ ॥
माया उपजे ब्रह्म उपजेना । माया मरे ब्रह्म मरेना ।
माया धरे ब्रह्म धरेना । धारणेसी ॥ ६ ॥
माया फुटे ब्रह्म फुटेना । माया तुटे ब्रह्म तुटेना ।
माया विटे ब्रह्म विटेना । अविनाश तें ॥ ७ ॥
माया विकारी ब्रह्म निर्विकारी । माया सर्व करी ब्रह्म कांहीं च न करी ।
माया नाना रूपें धरी । ब्रह्म तें अरूप ॥ ८ ॥
माया पंचभूतिक अनेक । ब्रह्म तें शाश्वत येक ।
मायाब्रह्मांचा विवेक । विवेकी जाणती ॥ ९ ॥
माया लाहान ब्रह्म थोर । माया असार ब्रह्म सार ।
माया अर्ति पैर । ब्रह्मासी नाहीं ॥ १० ॥
सकळ माया विस्तारली । ब्रह्मस्थिति अच्छादेली ।
परी ते निवडूनि घेतली । साधुजनीं ॥ ११ ॥
गोंडाळें सांडून नीर घेइजे । नीर सांडूनि क्षीर सेविजे ।
माया सांडूनि अनुभविजे । ब्रह्म तैसें ॥ १२ ॥

---

१ आकलन करण्याची बुद्धी ( बुद्धीला मायेचें आकलन होतें, ब्रह्माचें होत नाहीं. ) २ अलिकडे. ३ अंत, शेवट. ४ मायेच्या विस्तारानें ब्रह्मस्वरूप झाकून गेलें आहे. ५ शेवाळ.

ब्रह्म आकाशऐसें निवळ। माया वसुंधरा डहुळ।
ब्रह्म सूक्ष्म केवळ। माया स्थूळरूपी॥ १३॥
ब्रह्म तें अप्रत्यक्ष असे। माया ते प्रत्यक्ष दिसे।
ब्रह्म तें सम चि असे। माया ते विषमरूपी॥ १४॥
माया लक्ष ब्रह्म अलक्ष। माया साक्ष ब्रह्म असाक्ष।
मायेमध्यें दोनि पक्ष। ब्रह्मीं पक्ष चि नाहीं॥ १५॥
माया पूर्वपक्ष ब्रह्म सिद्धांत। माया असंत[1] ब्रह्म संत[2]।
ब्रह्मासि नाहीं करणें हेत। मायेसि आहे॥ १६॥
ब्रह्म अखंड घनदाट। माया पंचभूतिक पोचट।
ब्रह्म तें निरंतर निघोट[3]। माया ते जुनी जर्जरी॥ १७॥
माया घडे ब्रह्म घडेना। माया पडे ब्रह्म पडेना।
माया विघडे ब्रह्म विघडेना। जैसें तैसें॥ १८॥
ब्रह्म असत चि असे। माया निरसितां च निरसे।
ब्रह्मास कल्पांत नसे। मायेसि आहे॥ १९॥
माया कठिण ब्रह्म कोमळ। माया अल्प ब्रह्म विशाळ।
माया नासे सर्वकाळ। ब्रह्म चि असे॥ २०॥
वस्तु[4] नव्हे बोलिजे ऐसी। माया जैसी बोलिजे तैसी।
काळ पावेना वस्तुसी। मायेसि झडपी॥ २१॥
नाना रूप नाना रंग। तितुका मायेचा प्रसंग।
माया भंगे ब्रह्म अभंग। जैसें तैसें॥ २२॥
आतां असो हा विस्तार। चालत जातें सचराचर।
तितुकी माया परमेश्वर। सबाह्यअभ्यंतरीं॥ २३॥
सकळ उपाधीवेगळा। तो परमात्मा निराळा।
जळीं असोनि नातळे[5] जळा। आकाश जैसें॥ २४॥
मायाब्रह्माचें विवरण। करितां चुके जन्ममरण।
संतास गेलिया शरण। मोक्ष लाभे॥ २५॥

---

1 अनित्य. 2 नित्य. 3 परिपूर्ण 4 ब्रह्म. 5 स्पर्श करीत नाहीं.

अरे या संताचा महिमा । बोलावया नाहीं सीमा ।
जयांचेनि जगदात्मा । अंतर चि होये ॥ २६ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे मायाब्रह्मनिरूपणनाम समास पंचम ॥ ५ ॥

---

॥ श्रीराम ॥

सृष्टीपूर्वी ब्रह्म असे । तेथें सृष्टि मुळीं च नसे ।
आतां सृष्टि दिसत असे । ते सत्य किं मिथ्या ॥ १ ॥
तुह्मी सर्वज्ञ गोसावी । माझी आशंका फेडावी ।
ऐसा श्रोता विनवी । वक्तयासी ॥ २ ॥
आतां ऐका प्रत्योत्तर । कथेसि व्हावें तत्पर ।
वक्ता सर्वज्ञ उदार । बोलता जाला ॥ ३ ॥
जीवभूतः सनातन । ऐसें गीतेचें वचन ।
येणें वाक्यें सत्यपण । सृष्टीस आलें ॥ ४ ॥
यदृष्ट तन्नष्ट येणें । वाक्य सृष्टी मिथ्यापणें ।
सत्य मिथ्या ऐसें कोणें । निवडावें ॥ ५ ॥
सत्य ह्मणों तरी नासे । मिथ्या ह्मणों तरी दिसे ।
आतां जैसें आहे तैसें । बोलिजेल ॥ ६ ॥
सृष्टीमधें बहुजन । अज्ञान आणी सज्ञान ।
ह्मणौनिया समाधान । होत नाहीं ॥ ७ ॥
ऐका अज्ञानाचें मत । सृष्टि आहे ते शाश्वत ।
देव धर्म तीर्थ व्रत । सत्य चि आहे ॥ ८ ॥
बोले सर्वज्ञाचा राजा । मूर्खस्य प्रतिमापूजा ।
ब्रह्मप्रळयाच्या पैजा । घालू पाहे ॥ ९ ॥

---

१ "ममैवांशो जीवलोके जीवभूत सनातन"; सृष्टीमध्यें जीवरूप जें कांहीं आहे, तें माझा च अंश असून अविनाशी आहे. २ जें दिसतें तें नासतें. ३ "वाक्यें" पाहिजे. ४ सगुण मूर्तींची केवळ पूजा करण्यांत च आयुष्य कंठणारा मूर्ख ब्रह्माच्या आणि प्रळयाच्या गोष्टी तो काय करणार !

तव बोले तो अज्ञान । तरी कां करिसी संध्यास्नान ।
गुरुभजन तीर्थाटण । कासया फिरावें ॥ १० ॥

॥ श्लोक ॥ तीर्थे तीर्थे निर्मलं ब्रह्मवृंदं । वृंदे वृंदे तत्त्वचिंतानुवादः ।
वादे वादे जायते तत्त्वबोधः । बोधे बोधे भासते चंद्रचूडः ॥ ५ ॥

चंद्रचूडाचें[1] वचन । सद्गुरूचें उपासन ।
गुरुगीतानिरूपण । बोलिलें हरें ॥ ११ ॥

गुरूसि कैसें भजावें । आधीं तयासि वोळखावें ।
त्याचें समाधान घ्यावें । विवेकें स्वयें ॥ १२ ॥

॥ श्लोक ॥ ब्रह्मानंदं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्तिं ।
द्वंद्वातीतं गगनसदृशं तत्त्वमस्यादिलक्ष्यं ।
एकं नित्यं विमलमचलं सर्वधीसाक्षिभूतं ।
भावातीतं त्रिगुणरहितं सद्गुरुं तं नमामि ॥ १ ॥

गुरुगीतेचें वचन । ऐसें सद्गुरूचें ध्यान ।
तेथें सृष्टिमिथ्याभान । उरेल कैचें ॥ १३ ॥

ऐसा सज्ञान बोलिला । सद्गुरु तो वोळखिला ।
सृष्टि मिथ्या ऐसा केला । निश्चितार्थ ॥ १४ ॥

श्रोता ऐसें न मनी कदा । आधीक उठिला वेवादा ।
म्हणे कैसा रे गोविंदा । अज्ञान म्हणतोसी ॥ १५ ॥

जीवभूतः सनातनः । ऐसें गीतेचें वचन ।
तयासि तूं अज्ञान । ह्मणतोसि कैसा ॥ १६ ॥

ऐसा श्रोता आक्षेप करी । विषाद मानिला अंतरीं ।
याचें प्रत्योत्तर चतुरीं । सावध परिसावें ॥ १७ ॥

गीतेस बोलिला गोविंद । त्याचा न कळे तुज भेद ।
म्हणोनियां वेर्थ खेद । वाहातोसी ॥ १८ ॥

॥ श्लोक ॥ अश्वत्थः सर्ववृक्षाणां ॥ ६ ॥

माझी विभूति पिंपळ । ह्मणोनि बोलिला गोपाळ ।
वृक्ष तोडितां तत्काळ । तुटत आहे ॥ १९ ॥

---

1 श्री शंकराचें

॥ श्लोक ॥ नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः ।
न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारुतः ॥ १ ॥

शस्त्राचेनि तुटेना । अग्निचेनि जळेना ।
उदकामध्यें कालवेना । स्वरूप माझें ॥ २० ॥
पिंपळ तुटे शस्त्रानें । पिंपळ जळे पावकानें ।
पिंपळ कालवे उदकानें । नाशिवंत ॥ २१ ॥
तुटे जळे बुडे उडे । आतां ऐक्य कैसें घडे ।
ह्मणोनि हें उजेडे । सद्गुरुमुखें ॥ २२ ॥
इंद्रियाणां मनश्चास्मि । कृष्ण ह्मणे मन तो मी ।
तरी कां आवरावी उर्मी । चंचळ मनाची ॥ २३ ॥
ऐसें कृष्ण कां बोलिला । साधनमार्ग दाखविला ।
खडे मांडूनि सिकविला । चोनामा जेवी ॥ २४ ॥
ऐसा आहे वाक्यभेद । सर्व जाणे तो गोविंद ।
देहबुद्धीचा वेवाद । कामा नये ॥ २५ ॥
वेद शास्त्र श्रुति स्मृती । तेथें वाक्यभेद पडती ।
ते सर्व हि निवडती । सद्गुरूचेनि वचनें ॥ २६ ॥
वेदशास्त्रांचें भांडण । शैस्त्रें तोडी ऐसा कोण ।
हें निवडेना साधुविण । कदा कैल्पांतीं ॥ २७ ॥
पूर्वपक्ष आणि सिद्धांत । शास्त्रीं बोलिला संकेत ।
याचा होये निश्चितार्थ । साधुमुखें ॥ २८ ॥
येरवीं वादाचीं उत्तरें । येकाहूनि येक थोरें ।
बोलों जातां अपारें । वेदशास्त्रीं ॥ २९ ॥
ह्मणोनि वादवेवाद । सांडून कीजे संवाद ।
तेणें होये ब्रह्मानंद । स्वानुभवें ॥ ३० ॥

---

१ उडे. २ लहर ३ "शा" चा "श" हरताळ लावून केला आहे. ४ "काळीं" चें "कल्पांती" केलें आहे

येके कल्पनेचे पोटीं। होंति जाती अनंत सृष्टी।
तया सृष्टीची गोष्टी। साच केवी॥ ३१॥
कल्पनेचा केला देव। तेथें जाला दृढ भाव।
देवालागीं येतां खेवं। भक्त दुःखें दुःखवला॥ ३२॥
पाषाणाचा देव केला। येके दिवसीं भगोन गेला।
तेणें भक्त दुखवला। रडे पडे आक्रंदे॥ ३३॥
देव हारपला घरीं। येक देव नेला चोरीं।
येक देव दुराचारीं। फोडिला बळें॥ ३४॥
येक देव ओपाणिला। येक देव उदकीं टाकिला।
येक देव नेऊन घातला। पायातळीं॥ ३५॥
काय सांगों तीर्थमहिमा। मोडूनि गेला दुरात्मा।
थोर सत्व होतें तें मा। काय जालें कळेना॥ ३६॥
देव घडिला सोनारीं। देव वोतिला वोतारीं।
येक देव घडिला पाथरीं। पाषाणाचा॥ ३७॥
नर्बदागंडिकातीरीं। देव पडिले लक्षवरी।
त्यांची संख्या कोण करी। असंख्यात गोटे॥ ३८॥
चक्रतीर्थीं चक्रांकित। देव असती असंख्यात।
नाहीं मनीं निश्चितार्थ। येक देव॥ ३९॥
बाण तांदळें तांब्रनाणें। स्फटिक देव्हारां पूजणें।
ऐसे देव कोण जाणें। खरे किं खोटे॥ ४०॥
देव रेसिमाचा केला। तो हि तुटोनियां गेला।
आतां नवा नेम धरिला। मृत्तिकेचा॥ ४१॥
आमचा देव बहु सत्य। आक्षां आकांतीं पावत।
पूर्ण करी मनोरथ। सर्वकाळ॥ ४२॥

---

१ ".अपाय. "द" चा "व" केला आहे २ भ्रष्ट केला ३ मग ४ तांदळा—शेंदूर वगैरे फांसलेला ओबडधोबड दगड.

आतां याचें सत्व गेलें । प्राप्त होतें तें जालें ।
प्राप्त न बचे पालटिलें । ईश्वराचेनी ॥ ४३ ॥
धातु पाषाण मृत्तिका । चित्रलेप काष्ठ देखा ।
तेथें देव कैंचा मूर्खा । भ्रांति पडिली ॥ ४४ ॥
हे आपुली कल्पना । प्राप्तीऐसीं फळें जाणा ।
परी त्या देवाचिया खुणा । वेगळ्या चि ॥ ४५ ॥
ह्मणौनि हें मायाभ्रमणें । सृष्टि मिथ्या कोटिगुणें ।
वेद शास्त्रें पुराणें । ऐसीं च बोलती ॥ ४६ ॥
साधुसंत मानुभाव[2] । त्यांचा ऐसा चि अनुभव ।
पंचभूतातीत देव । सृष्टि मिथ्या ॥ ४७ ॥
सृष्टीपूर्वीं सृष्टि चालता । सृष्टि अवघी सन्हारतां ।
शाश्वत देव तत्वता । आदिअंतीं ॥ ४८ ॥
ऐसा सर्वांचा निश्चयो । येदर्थीं नाहीं संशयो ।
वीतरेकें[3] आणि अन्वयो । कल्पनारूप ॥ ४९ ॥
येके कल्पनेचे पोटीं । बोलजेती अष्ट सृष्टि ।
तया सृष्टीची गोष्टी । सावध ऐका ॥ ५० ॥
येकी कल्पनेची सृष्टी । दुजी शाब्दिक सृष्टी ।
तिजी प्रत्यक्ष सृष्टी । जाणती सर्व ॥ ५१ ॥
चौथी चित्रलेपसृष्टी । पाचवी स्वप्नसृष्टी ।
साहावी गंधर्वसृष्टी । ज्वरसृष्टी सातवी ॥ ५२ ॥
आठवी दृष्टिबंधन । ऐशा अष्ट सृष्टी जाण ।
यामधें श्रेष्ठ कोण । सत्य मानावी ॥ ५३ ॥
ह्मणोनि सृष्टी नासिवंत । जाणती संत महंत ।
सगुणीं भजावें निश्चित । निश्चयालागीं ॥ ५४ ॥
सगुणाचेनि आधारें । निर्गुण पाविजे निर्धारें ।
सारासारविचारें । संतसंगें ॥ ५५ ॥

१ कृतकर्मानुरूप. २ महानुभाव. ३ व्यतिरेक.

आतां असो हें बहुत । संतसगें कळे नेमस्त ।
येऱ्हवीं चित्त दुश्चित । सशई पडे ॥ ५६ ॥
तव शिष्यें आक्षेपिलें । सृष्टी मिथ्या[1] ऐसें कळलें ।
परी हें अवघें नांथिलें । तरी दिसतें कां ॥ ५७ ॥
दृश्य प्रत्यक्ष दिसतें । ह्मणोन सत्य चि वाटतें ।
यासि काय करावें तें । सागा स्वामी ॥ ५८ ॥
याचें प्रत्योत्तर भलें । पुढिले समासीं बोलिलें ।
श्रोतां श्रवण केलें । पाहिजे पुंढें ॥ ५९ ॥
एवं सृष्टी मिथ्या जाण ।[2] जाणोनि रक्षावें सगुण ।
ऐसी हे अनुभवाची खूण । अनुभवी जाणती ॥ ६० ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सृष्टिकथननाम समास साहवा ॥ ६ ॥

---

॥ श्रीराम ॥

ज्ञानें दृश्य मिथ्या जालें । तरी कां पाहिजे भजन केलें ।
तेणें काये प्राप्त जालें । हें मज निरोपावें ॥ १ ॥
ज्ञानाहूनि श्रेष्ठ असेना । तरी कां पाहिजे उपासना ।
उपासनेनें जना । काये प्राप्त ॥ २ ॥
मुख्य सार तें निर्गुण । तेथें दिसेचिना सगुण ।
भजन केलियाचा गुण । मज निरोपावा ॥ ३ ॥
जें समस्त नासिवत । त्यासि भजावें किंनिमित्य ।
सत्य सांडून असत्य । कोणें भजावें ॥ ४ ॥
असत्याचा प्रत्यये आला । तरी मग नेम कां लागला ।
सत्य सांडून गल्बला । कासया करावा ॥ ५ ॥
निर्गुणानें मोक्ष होतो । प्रत्यक्ष प्रत्यया येतो ।
सगुण काये देऊं पाहातो । सांगा स्वामी ॥ ६ ॥

---

१ लटकें. मिथ्या २ ओव्या ५७, ५८, ५९ ह्या मूळ प्रतींत मागाहून समासांत लिहिल्या आहेत.

सगुण नासिवत ऐसें सागता । पुन्हा भजन करावें ह्मणतां ।
तरी काशासाठीं आतां । भजन करूं ॥ ७ ॥
स्वामीचे भिडेनें बोलवेना । येऱ्हवीं हें कांहीं च मानेना ।
साध्य चि जालियां साधना । कां प्रवर्तावें ॥ ८ ॥
ऐसें श्रोतयाचें बोलणें । शब्द बोले निर्बुजलेपणें ।
याचें उत्तर ऐकणें । ह्मणे वक्ता ॥ ९ ॥
गुरूचें वचन प्रतिपाळणें । हें मुख्य परमार्थाचें लक्षण
वचनभग करिता विलक्षण । सहजें चि जालें ॥ १० ॥
ह्मणोनी आज्ञेसी वंदावें । सगुणभजन मानावें ।
श्रोता ह्मणे हें देवें । का प्रयोजिलें ॥ ११ ॥
काय मानिला उपकार । कोण जाला साक्षात्कार ।
किंवा प्रारब्धाचें अक्षर । पुसिलें देवें ॥ १२ ॥
होणार हें तों पालटेना । भजनें काय करावें जना ।
हें तों पाहातां अनुमाना । कांहीं च नये ॥ १३ ॥
स्वामीची आज्ञा प्रमाण । कोण करील अप्रमाण ।
परंतु याचा काय गुण । मज निरोपावा ॥ १४ ॥
वक्ता ह्मणे सावधपणें । सांग ज्ञानाचीं लक्षणें ।
तुज कांहीं लागे करणें । किंवा नाहीं ॥ १५ ॥
करणें लागे भोजन । करणें लागे उदकप्राशन ।
मळमूत्रत्याग लक्षण । तें हि सुटेना ॥ १६ ॥
जनाचें समाधान राहावें । आपुलें पारिखें वोळखावें ।
आणि भजन चि मोडावें । हें कोण ज्ञान ॥ १७ ॥
ज्ञानविवेकें मिथ्या जालें । परतु अवघें नाहीं टाकिलें ।
तरी मग भजनें चि काय केलें । सांग बापा ॥ १८ ॥

---

१ अडखळत २ देवाचें भजन केलें तरी प्रारब्धीं जें लिहिलेलें असेल तें थोडें च पुसलें जाणार आहे. ।

साहेबांस लोटांगणीं जावें । नीचासारिखें व्हावें ।
आणि देवास न मनावें । हें कोण ज्ञान ॥ १९ ॥
हरीहर ब्रह्मादिक । हे जयाचे आज्ञाधारक ।
तूं येक मानवी रंक । भजेसिना तरी काय गेलें ॥ २० ॥
आमुचे कुळीं रघुनाथ । रघुनाथें आमुचा परमार्थ ।
जो समर्थाचा हि समर्थ । देवां सोडविता ॥ २१ ॥
त्याचे आह्मी सेवकजन । सेवेंकरितां जालें ज्ञान ।
तेथें अभाव धरितां पतन । पाविजेल कीं ॥ २२ ॥
गुरु सांगती सारासार । त्यासें[3] कैसें ह्मणावें असार ।
तुज काय सांगणें विचार । शाहाणे जाणती ॥ २३ ॥
समर्थाचे मनींचें तुटे । तें चि जाणावें अदृष्ट खोटें ।
राज्यपदापासून करंटे । चेवलें जैसें ॥ २४ ॥
मी थोर वाटे मनीं । तो नव्हे ब्रह्मज्ञानी ।
विचार पाहातां देहाभिमानी । प्रत्यक्ष दिसे ॥ २५ ॥
वस्तुभजन करीना । ना न करीं ऐसें हि म्हणेना ।
तरी हे जाणावी कल्पना । दडोन राहिली ॥ २६ ॥
ना तें ज्ञान ना तें भजन । उगा चि आला देहाभिमान ।
येथें नाहीं किं अनुमान । प्रत्यय तुझा ॥ २७ ॥
तरी आतां ऐसें न करावें । रघुनाथभजनीं लागावें ।
तेणें चि ज्ञान बोलावें । चळेना ऐसें ॥ २८ ॥
करी दुर्जनाचा संव्हार । भक्तजनासी आधार ।
ऐसा हा तों चमत्कार । रोकडा चाले ॥ २९ ॥

---

१ धन्याला, यजमानाला. २ सेवेपासून, सेवा केली ह्मणून. ३ " ति " चा " स " करून समासांत " कैसें " लिहिलें आहे. तो स शो. ४ नशीब. ५ निराकार ब्रह्माची उपासना करित नाहीं, परंतु करित नाहीं, असें हि ह्मणत नाहीं, तेव्हां आतां याला काय ह्मणावें ? संशयरहित ज्ञान याला झालें नाहीं, अजून मनांत कल्पना लपून बसली आहे असें च ह्मणावयाचें

मनीं धरावें तें होतें । विघ्न अवघें चि नासोन जातें ।
कृपा केलियां रघुनाथें । प्रचित येते ॥ ३० ॥
रघुनाथभजनें ज्ञान जालें । रघुनाथभजनें महत्व वाढलें ।
म्हणौनियां तुवां केलें । पाहिजे आधीं ॥ ३१ ॥
हें तों आहे सप्रचित । आणी तुज वाटेना प्रचित ।
साक्षात्कारें नेमस्त । प्रत्ययो करावा ॥ ३२ ॥
रघुनाथ स्मरोनि कार्य करावें । तें तत्काळ चि सिद्धी पावे ।
कर्ता राम हें असावें । अभ्यांतरीं ॥ ३३ ॥
कर्ता राम मी नव्हे आपण । ऐसें सगुणनिवेदन ।
निर्गुणीं तें अनन्य । निर्गुण चि होइजे ॥ ३४ ॥
मी कर्ता ऐसें म्हणतां । कांहीं च घडेना सर्वथा ।
प्रचित पाहासी तरी आतां । सीघ्र चि पाहें ॥ ३५ ॥
मी कर्ता ऐसें म्हणसी । तेणें तू कष्टी होसी ।
राम कर्ता म्हणतां पावसी । येश कीर्ती प्रताप ॥ ३६ ॥
येके भावनेसाठीं । देवासीं पडे तुटी ।
कां ते होये कृपादृष्टी । देव कर्ता भावितां ॥ ३७ ॥
आपण आहे दों दिसांचा । आणी देव बहुतां काळांचा ।
आपण थोडे वोळखिचा । देवासि त्रैलोक्य जाणे ॥ ३८ ॥
याकारणें रघुनाथभजन । त्यासि मानिती बहुत जन ।
ब्रह्मादिक आदिकरून । रामभजनीं तत्पर ॥ ३९ ॥
ज्ञानबळें उपासना । आम्ही भक्त जरी मानू ना ।
तरी या दोषाच्या पतना । पावों अभक्तपणें ॥ ४० ॥
देव उपेक्षी थोरपणें । तरी मग त्याचें तो जाणे ।
अप्रमाण तें श्लाघ्यवाणें । नव्हे किं श्रेष्ठा ॥ ४१ ॥
देहास लागली उपासना । आपण विवेकें उरेना[1] ।
ऐसी स्थिति सज्जना । अंतरींची ॥ ४२ ॥

---

१ देह आहे तोंवर उपासना लागली च आहे, परंतु विवेक करून आपण मात्र उरत नाहीं. ( अहंकार सोडतो )

सकळ मिथ्या होऊन जाते । हें रामभजनें कळों येतें ।
दृश्य ज्ञानियाचेनि मतें । स्वप्न जैसें ॥ ४३ ॥
मिथ्या स्वप्नविवचना । तैसी सृष्टीची रचना ।
दृश्य मिथ्या साधुजना । कळों आलें ॥ ४४ ॥
आक्षेप जाला श्रोतयासी । मिथ्या तरी का दिसतें आम्हांसी ।
याचें उत्तर पुढिले समासीं । बोलिलें असे ॥ ४५ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सगुणभजननाम समास ॥ ७ ॥

---

॥ श्रीराम ॥

मागा श्रोतीं पुसिलें होतें । दृश्य मिथ्या तरी का दिसतें ।
याचें उत्तर बोलिजेल तें । सावध ऐका ॥ १ ॥
देखिलें तें सत्य चि मानावें । हें ज्ञात्याचें देखणें नव्हे ।
जड मूढ अज्ञान जीवें । हें सत्य मानिजे ॥ २ ॥
येक्या देखिल्यासाठीं । लटिक्या कराव्या ग्रथकोटी ।
संतांमहंताच्या गोष्टी । त्या हि मिथ्या मानाव्या ॥ ३ ॥
माझें दिसतें हें चि खरें । येथें चालेना दुसरें ।
ऐशिया संशयाच्या भरें । भरों चि नये ॥ ४ ॥
मृगें देखिलें मृगजळ । तेथें धावतें बरळ[1] ।
जळ नव्हे मिथ्या सकळ । त्या पशूस कोणें म्हणावें ॥ ५ ॥
रात्रौ स्वप्न देखिलें । बहुत द्रव्य सापडलें ।
बहुत जनांसी वेव्हारिलें[2] । तें खरें कैसेनि मानावें ॥ ६ ॥
कुशळ चितारी विचित्र । तेणें निर्माण केलें चित्र ।
देखतां उठे प्रीति मात्र । परतु तेथें मृत्तिका ॥ ७ ॥
नाना वनिता हस्ति घोडे । रात्रौ देखतां मन बुडे ।
दिवसा पाहातां कातडें । कटाळवाणें ॥ ८ ॥

---

१ वेडें, भ्रमिष्ट २ व्यवहार केला

काष्ठी पाषाणी पुतळ्या। नाना ठकारें निर्मिल्या।
परम सुंदर वाटल्या। परंतु तेथें पाषाण ॥ ९ ॥
नाना गोपुरीं पुतळ्या असती। वक्रामें वक्रदृष्टी पाहाती।
लाघव देखतां भरे वृत्ती। परतु तेथें त्रिभागें ॥ १० ॥
खेळतां नेटके दशावतारी। तेथें येती सुंदर नारी।
नेत्र मोडिती कळाकुसरी। परंतु अवघे घटिंगण ॥ ११ ॥
सृष्टी बहुरंगी असत्य। बहुरूपाचें हें कृत्य।
तुज वाटे दृश्य सत्य। परी हे जाण अविद्या ॥ १२ ॥
मिथ्या साचासारिखें देखिलें। परि तें पाहिजे विचारिलें।
दृष्टि तरळतां भासलें। तें साच कैसें मानावें ॥ १३ ॥
वरी पाहातां पालथें आकाश। उदकीं पाहातां उताणें आकाश।
मध्यें चांदिण्या हि प्रकाश। परी तें अवघें मिथ्या ॥ १४ ॥
नृपतीनें चितारी आणिले। ज्याचे त्या ऐसे पुतळे केले।
पाहातां ते चि ऐसे गमले। परी अवघे माईक ॥ १५ ॥
नेत्रीं कांहीं बाहोलि नसे। जेव्हां जें पाहावें तेव्हां तें भासे।
डोळां प्रतिबिंब दिसे। तें साच कैसेनी ॥ १६ ॥
जितुके बुडबुडे उठती। तितुक्यांमधें रूपें दिसती।
क्षणामधें फुटोन जाती। रूपें मिथ्या ॥ १७ ॥
लघुदर्पणें दोन्हि च्यारी हातीं। तितुकीं मुखें प्रतिबिंबती।
परी तें मिथ्या आदिअंतीं। येक चि मुख ॥ १८ ॥
नदीतीरें भार जाता। दुसरा भार दिसे पालथा।
का पडसादांचा अवचिता। गजर उठे ॥ १९ ॥
वापीसरोवराचें तीर। तेथें पशु पक्षी नर वानर।
नाना पात्रें वृक्षविस्तार। दिसे दोहि सवा ॥ २० ॥

---

१ मनोहर. २ देवालयाच्या पुढील दरवाज्यावर जे मजले असतात ते. ३ चुना, वाळु, ताग यांचा कर्दम ४ दशावतारांचीं नाटकें. ५ " रूपी " चें "रंगी" समासांत केलें आहे. ६ तरळणें=भावावणें ७ प्रतिध्वनीचा. ८ कांठ, किनारा.

येक शब्द झाडूं जातां । दोनि दिसती तत्वता ।
नाना तंतु टणत्कारितां । द्विधा भासती ॥ २१ ॥
कां ते दर्पणाचे मंदिरीं । बैसली सभा दिसे दुसरी ।
बहुत दीपाचिये हारीं । बहुत छाया दिसती ॥ २२ ॥
ऐसें हें बहुविध असे । साचासारिखें चि दिसे ।
परि हें सत्य ह्मणोनि कैसें । विश्वासावें ॥ २३ ॥
माया मिथ्या बाजीगरी[4] । दिसे साचाचिये परी ।
परी हे जाणत्यानें खरी । मानूं चि नये कीं ॥ २४ ॥
लटिकें साचाऐसें भावावें । तरी पारखी कासया असावें ।
येवं ये अविद्येचें[3] थांवे । ऐसे चि असती ॥ २५ ॥
मनुष्यांची बाजीगरी । बहुत जनास वाटे खरी ।
सेवट पाहातां निर्धारीं । मिथ्या होये ॥ २६ ॥
तैसी च मावें राक्षसांची । देवांस हि वाटे साची ।
पंचवटिकेसि मृगाची । पाठी घेतली रामें ॥ २७ ॥
पूर्वी काया पालटिती । येकाचे चि बहुत होती ।
रक्तबिंदीं[6] च जन्मती । रजनीचर ॥ २८ ॥
नाना पदार्थ फळें चि जाले । द्वारकेमधें प्रवेशले ।
कृष्णें दैत्य किती वधिले । कपटरूपी ॥ २९ ॥
कैसें कपट रावणाचें । सिर केलें मायेचें ।
काळनेमीच्या आश्रमाचें । अपूर्व कैसें ॥ ३० ॥
नाना दैत्य कपटमती । जे देवांस हि नाटोपती ।
मग निर्माण होऊन शक्ती । संव्हार केला ॥ ३१ ॥
ऐसी राक्षसांची माव । जाणों न सकती देव ।
कपटविद्येचें लाघव । अघटित ज्यांचें ॥ ३२ ॥

---

१ गारुडविद्या. २ मुळांत " ०यचे " आहे. ३ भ्रांति, कृति ४ " वोसंबरी " होते त्याचें हरताळ लावून " बाजीगरी " केलें आहे. ५ माया, कपट. ६ रक्तबिंदूं.

मनुष्यांची बाजीगरी । राक्षसाची बोडंबरी ।
भगवंताची नाना परी । विचित्र माया ॥ ३३ ॥
हे साचासारिखी च दिसे । विचारितां च नसे ।
मिथ्या चि आभासे । निरंतर पाहातां ॥ ३४ ॥
साच म्हणावी तरी हे नासे । मिथ्या म्हणावी तरी हे दिसे ।
दोहीं पदार्थी अविश्वासे । सागतां मन ॥ ३५ ॥
परंतु हें नव्हे साचार । मायेचा मिथ्या विचार ।
दिसतें हें स्वप्नाकार । जाण बापा ॥ ३६ ॥
तथापी असो तुजला । भास चि सत्य वाटला ।
तरी येथें चुका पडिला । ऐक बापा ॥ ३७ ॥
दृश्यभास अविद्यात्मक । तुझा हि देहो तदात्मक ।
म्हणौनि हा अविवेक । तेथें संचरला ॥ ३८ ॥
दृष्टीनें दृश्य देखिलें । मन भासावरी बैसलें ।
तरी तें लिंगदेह जालें । अविद्यात्मक ॥ ३९ ॥
अविद्येनें अविद्या देखिली । म्हणोनि गोष्टि विश्वासली ।
तुझी काया अवघी सचली । अविद्येची ॥ ४० ॥
ते चि काया मी आपण । हें देहबुद्धीचें लक्षण ।
येणें कारितां जालें प्रमाण । दृश्य आवघें ॥ ४१ ॥
इकडे सत्य मानिला देहो । तिकडे दृश्य सत्य हा निर्वाहो ।
दोहींमधें माहा संदेहो । पैसावला बळें ॥ ४२ ॥
देहबुद्धि केली बळकट । आणी ब्रह्म पाहों गेला धीट ।
तों दृश्यानें रुधिली वाट । परब्रह्माची ॥ ४३ ॥
तेथें साच मानी दृश्याला । निश्चय चि बाणोनि गेला ।
पाहा हो केवढा चुका पडिला । अकस्मात ॥ ४४ ॥

---

१ गारुडविद्या २ मुळात " ० यनें " आहे. ३ मुळात " ० यची " आहे. दृश्य हें अविद्यात्मक व तुझा देह हि अविद्यात्मक च, तेव्हां अर्थात् अविद्यात्मक तुझ्या शरिराला ( आणि शरीर म्हणजे च मी अशी तुझी बुद्धि असल्याकारणानें तुला ) अविद्यात्मक असें हें दृश्य जगत् खरें वाटावें हें साहजिक च आहे.

आतां असो हें बोलणें । ब्रह्म न पविजे मीपणें ।
देहबुद्धीचीं लक्षणें । दृश्य भाविती ॥ ४५ ॥
अस्तिंचा देहीं मांसाचा डोळा । पाहेन म्हणे ब्रह्माचा गोळा ।
तो ज्ञाता नव्हे आंधळा । केवळ मूर्ख ॥ ४६ ॥
दृष्टीसि दिसे मनासि भासे । तितुकें काळांतरीं नासे ।
म्हणोनि दृश्यातीत असे । परब्रह्म तें ॥ ४७ ॥
परब्रह्म तें शाश्वत । माया ते चि अशाश्वत ।
ऐसा बोलिला निश्चितार्थ । नाना शास्त्रीं ॥ ४८ ॥
आतां पुढें निरूपण । देहबुधीचें लक्षण ।
चुका पडिला तो मी कोण । बोलिलें असे ॥ ४९ ॥
मी कोण हें जाणावें । मीपण त्यागूनि अनन्य व्हावें ।
मग समाधान तें स्वभावें । आंगीं बाणे ॥ ५० ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे दृश्यनिर्शननाम समास अष्टम ॥ ८ ॥

---

॥ श्रीराम ॥

गुप्त आहे उदंड धन । काये जाणती सेवक जन ।
तयांस आहे तें ज्ञान । बाह्याकाराचें ॥ १ ॥
गुप्त ठेविलें उदंड अर्थ । आणी प्रगट दिसती पदार्थ ।
शाहाणे शोधिती स्वार्थ । अंतरीं असे ॥ २ ॥
तैसें दृश्य हें माईक । पाहात असती सकळ लोक ।
परी जयास ठाउका विवेक । ते तदनंतर जाणती ॥ ३ ॥
द्रव्य ठेऊन जळ सोडिलें । लोक ह्मणती सरोवर भरलें ।
तयाचें अभ्यांतर कळलें । समर्थ जनासी ॥ ४ ॥

---

१ अस्थीच्या, हाडाच्या. २ मांसाचा ३ स शो. ही ओवी मागाहून लिहिलेली आहे. ४ छान्दोग्यात हा च दृष्टांत आहे: यथाऽपि हिरण्यनिधिं निहितम क्षेत्रज्ञा उपर्युपरि संचरन्तो न विन्देयु ॥ इत्यादि ( छां. ८×३×२ ) ५ तदंतर

तैसे ज्ञाते ते समर्थ । तिहीं वोळखिला परमार्थ ।
इतर ते करिती स्वार्थ । दृश्य पदार्थाचा ॥ ५ ॥
कांबाडी वाहाती काबाडें । श्रेष्ठ भोगिती रत्नें जाड ।
हें जयाचें तयास गोड । कर्मयोगें ॥ ६ ॥
येक काष्ठस्वार्थ करिती । येक शुभ्रां येंकुवाटिती ।
तैसे नव्हेत कीं नृपति । सारभोक्ते ॥ ७ ॥
जयास आहे विचार । ते सुकांसनीं जाले स्वार ।
इतर जवळील भार । वाहात चि मेले ॥ ८ ॥
येक दिव्यान्नें भक्षिती । येक विष्ठा सावडिती ।
आपण वर्तल्याचा घेती । साभिमान ॥ ९ ॥
सार सेविजे श्रेष्ठीं । असार घेयिजे वृथापृष्ठीं ।
साराअसाराची गोष्टी । सज्ञान जाणती ॥ १० ॥
गुप्त परीस चिंतामणी । प्रगट खडे कांचमणी ।
गुप्त हेमरत्नखाणी । प्रगट पाषाण मृतिका ॥ ११ ॥
अव्हांशंख अव्हावेल । गुप्त वनस्पति अमोल ।
येरंड धोत्रे बहुसाल । प्रगट सिंपी ॥ १२ ॥
कोठें दिसेना कल्पतरु । उदंड सेगचा विस्तारु ।
पाहातां नाहीं मळियागरु । बोरि बाभळा उदंडी ॥ १३ ॥
कामधेनु जाणिजे इंद्रें । सृष्टींत उदंड खिल्लारें ।
महद्भाग्य भोगिजे नृपवरें । इतर कर्मानुसार ॥ १४ ॥
नाना व्यापार करिती जन । आवघे चि ह्मणती सकांचन ।
परंतु कुबेराचें महिमान । कोणासी चि न ये ॥ १५ ॥
तैसा ज्ञानी योगेश्वर । गुप्तार्थलाभाचा ईश्वर ।
इतर ते पोटाचे किंकरें । नाना मतें धुंडिती ॥ १६ ॥

---

१ ओझीं वाहणारे २ निकृष्ट ओझीं ३ गोवऱ्या ४ गोळा करिती. ५ सुखासनीं. ६ वृथापुष्ट, आळशी, निरुद्योगी यानीं. ७ दक्षिणावर्ति शंख. ८ दक्षिणावर्ति वेल. ९ शिंपा. १० मलयागिरी चंदन ११ दास, सेवक.

तस्मात सार तें दिसेना । आणी असार तें दिसे जना ।
सारासारविवंचना । साधु जाणती ॥ १७ ॥
इतरांस हें काये सांगणें । खरें खोटें कोण जाणे ।
साधुसंतांचिये खुणे । साधुसंत जाणती ॥ १८ ॥
दिसेना जें गुप्त धन । तयासि करणें लागे अंजन ।
गुप्त परमात्मा सज्जन— । संगतीं शोधावा ॥ १९ ॥
रायाचे सन्निध होतां । सहज चि लाभे श्रीमंतता ।
तैसा हा सत्संग धरितां । सद्वस्तु लाभे ॥ २० ॥
सद्वस्तूस लाभे सद्वस्तु । अव्यावेस्तास अव्यावेस्तु ।
पाहातां प्रशस्तास प्रशस्तु । विचार लाभे ॥ २१ ॥
ह्मणौनि हें दृश्यजात । आवघें चि आहे अशाश्वत ।
परमात्मा अच्युत अनंत । तो या दृश्यावेगळा ॥ २२ ॥
दृश्यावेगळा दृश्याअंतरीं । सर्वात्मा तो सचराचरीं ।
विचार पाहातां अंतरीं । निश्चयें[3] बाणे ॥ २३ ॥
संसारत्याग न करितां । प्रपंचउपाधी न सांडितां ।
जनामध्यें सार्थकता । विचारें चि होये ॥ २४ ॥
हें प्रचितीचें बोलणें । विवेकें प्रचित पाहाणें ।
प्रचित पाहे तें शाहाणे । अन्यथा नव्हे ॥ २५ ॥
सप्रचित आणी अनुमान । उधार आणी रोकडें धन ।
मानसपूजा प्रत्यक्ष दर्शन । यांस महदांतर ॥ २६ ॥
पुढें जन्मांतरीं होणार । हा तों अवघा च उधार ।
तैसा नव्हे सारासार । तत्काळ लाभे ॥ २७ ॥
तत्काळ चि लाभ होतो । प्राणी संसारीं सुटतो ।
संशय अवघा चि तुटतो । जन्ममरणाचा ॥ २८ ॥

---

१ डोळ्याचें औषध. २ अखिल दृश्य पदार्थ. ३ "यो" चा "ये" केला आहे. ४ येथून शेवटपर्यंतच्या ओव्या अनेकदां वाचून मनन करण्यासारख्या आहेत. सारासारविचारानें सार्थकता करावी, ह्या च जन्मात—नव्हे ह्या च क्षणाला—विवेकानें मुक्ति प्राप्त करून घ्यावी असा उपदेश, उपासनेची शपथ घेऊन, श्रीसमर्थ येथें करित आहेत.

या चि जन्में येणें चि काळें । संसारीं होइजे निराळें ।
मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें ॥ २९ ॥
ये गोष्टीस करी अनुमान । तो सिद्ध चि पावेल पतन ।
मिथ्या वदे त्यास आण । उपासनेची ॥ ३० ॥
हें येथार्थ चि आहे बोलणें । विवेकें सीघ्र चि मुक्त होणें ।
असोनी कांहीं चा नसणें । जनामधें ॥ ३१ ॥
देवपद आहे निर्गुण । देवपदीं अनन्यपण ।
हा चि अर्थ पाहातां पूर्ण । समाधान बाणे ॥ ३२ ॥
देहीं च विदेह होणें । करून कांहीं च न करणें ।
जीवन्मुक्ताचीं लक्षणें । जीवन्मुक्त जाणे ॥ ३३ ॥
येरवीं हें खरें न वटे । अनुमानें चि संदेह वाटे ।
संदेहाचें मूळ तुटे । सद्गुरुवचनें ॥ ३४ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सारशोधननाम समास नवम ॥ ९ ॥

---

॥ श्रीराम ॥

समाधान पुसतां कांहीं । ह्मणती बोलिजे ऐसें नाहीं ।
तरी तें कैसें आहे सर्व हि । निरोपावें ॥ १ ॥
मुक्यानें गूळ खादला । गोडी न ये सांगाव्याला ।
याचा अभिप्राव मजला । निरोपण कीजे ॥ २ ॥
अनुभव हि पुसों जातां । ह्मणती न ये किं सांगतां ।
कोणापासीं पुसों आतां । समाधान ॥ ३ ॥
जे ते अगम्य सांगती । न ये माझिये प्रचिती ।
विचार बसे माझे चित्तीं । ऐसें करावें ॥ ४ ॥

---

१ निर्गुण अशा ब्रह्मस्वरूपाच्या ठिकाणीं अनन्य व्हावयाचें, एवढा च जरी विचार कळला तरी समाधान आहे. सद्गुरुपासून च हा विचार समजावून घेतला पाहिजे.

ऐसें श्रोत्याचें उत्तर । याचें कैसें प्रत्योत्तर ।
निरोपिजेल तत्पर । होऊन ऐका ॥ ५ ॥
जें समाधानाचें स्थळ । किं [1]तो अनुभव चि केवळ ।
तें स्वरूप प्रांजळ । बोलोन दाऊं ॥ ६ ॥
जें बोलास आकळेना । बोलिल्याविण हि कळेना ।
जयासी कल्पिता कल्पना । हिंपुटी होये ॥ ७ ॥
तें जाणावें परब्रह्म । जें वेदाचें गुह्य परम ।
धरितां सतसमागम । सर्व हि कळे ॥ ८ ॥
तें चि आतां सांगिजेल । जें समाधान सखोल ।
ऐक अनुभवाचे बोल । अनुर्वाच्य वस्तु ॥ ९ ॥
सांगता न ये तें सांगणें । गोडी कळाया गूळ देणें ।
ऐसें हें सद्गुरुविणें । होणार नाहीं ॥ १० ॥
सद्गुरुकृपा कळे त्यासी । जो शोधील आपणासी ।
पुढें कळे अनुभवासी । आपेआप वस्तु ॥ ११ ॥
दृढ करूनियां बुद्धी । आधीं ध्यावी आप[2]शुद्धी ।
तेणें लागे समाधी । अकस्मात ॥ १२ ॥
आपलें मूळ बरें शोधितां । आपली तों माईक वार्ता ।
पुढें वस्तु च तत्वता । समाधान ॥ १३ ॥
आत्मा आहे सर्वसाक्षी । हें बोलिजे पूर्वपक्षीं ।
जो कोणी सिद्धांत लक्षी । तो चि सिद्ध ॥ १४ ॥
सिद्धांतवस्तु लक्षूं जातां । सर्वसाक्षी ते अवस्ता ।
आत्मा तीहून पर्तां । अवस्तातीत ॥ १५ ॥

---

१ "या" चा "तो" केला आहे. २ कष्टी. ३ आपण कोण याचा विचार. ४ ब्रह्म पाहूं गेलें असतां सर्वसाक्षी अवस्था प्राप्त होते आणि ब्रह्म हें त्या अवस्थेच्या पलिकडे आहे, तें अवस्थातीत आहे. तेव्हां ब्रह्म हें सर्वसाक्षी आहे हें म्हणणें बरोबर नाहीं; हें म्हणणें पूर्वपक्षांतले म्हणजे मिथ्या, लटकें आहे.

पदार्थज्ञान जेव्हां सरे । द्रष्टा द्रष्टेपणें नुरे[1] ।
ते समई उतरे । फुज मीपणाचा ॥ १६ ॥
जेथें मुरालें मीपण । तें चि अनुभवाची खूण ।
अनुर्वाच्य समाधान । या कारणें बोलिजे[2] ॥ १७ ॥
अत्यंत विचाराचे बोल । तरी ते माईक फोल ।
शब्द सबाह्य सखोल । अर्थ चि अवघा ॥ १८ ॥
शब्दाकारितां[3] कळे अर्थ । अर्थ पाहातां शब्द वेर्थ ।
शब्द सांगे तें येथार्थ । परी आपणं मिथ्या ॥ १९ ॥
शब्दाकारितां[3] वस्तु भासे । वस्तु पाहाता शब्द नासे ।
शब्द फोल अर्थ असे । घनवटपणें ॥ २० ॥
भुसाकारितां[3] धान्य निपजे । धान्ये घेऊन भूंस टाकिजे ।
तैसें शब्द भूस जाणिजे । अर्थ धान्य ॥ २१ ॥
पोचटामधें घनवट । घेनवटीं उडे पोचट ।
तैसा शब्द हा फलगट । परब्रह्मीं ॥ २२ ॥
शब्द बोलोनि राहे । अर्थ शब्दापूर्वी च आहे ।
या कारणे न साहे । उपमा तया अर्थासी[6] ॥ २३ ॥
भूस सांडून कण घ्यावा । तैसा वाच्यांश त्यजावा ।
कण लक्ष्यांश लक्षावा । शुद्ध स्वानुभवें ॥ २४ ॥

---

१ आपण ब्रह्म पाहणारे आहोंत असें ह्मटले ह्मणजे आपल्यापासून ब्रह्म वेगळें पडतें, तेव्हा पाहणारा हा पाहणारा ह्मणून उरला न पाहिजे आणि असें झालें ह्मणजे मीपणाचा अभिमान गळून जातो. २ जोंपर्यंत अहंभाव आहे तोंपर्यंत ब्रह्मसाक्षात्कार होत नाहीं. अहंभाव नाहींसा होणें ही च अनुभवाची खूण आहे आणि माझा मीपणा च जर नाहींसा झाला तर ब्रह्मस्वरूप हे असें आहे आणि तसें आहे हें बोलणार कोण आणि कसे ? ह्मणून ब्रह्म हें अनिर्वाच्य ह्मटलें आहे. ३ पासून, मुळें, योगानें. ४ शब्द हे स्वतः. ५ " घनवटामधें " असें प्रथम होतें, " टा " ची " टीं " केली आहे व " मधें " खोडून समासांत " उडे " लिहिलें आहे. ६ शब्दाला भुंसाची व अर्थाला धान्याची उपमा दिली खरी, परंतु ही उपमा पूर्णपणें लागूं पडत नाहीं, कारण, शब्दानें व्यक्त होणारा पदार्थ शब्दापूर्वी च असतो, तसें भुंसापूर्वी धान्य नसतें.

दृश्यावेगळें बोलिजे । त्यासी वाच्यांश ह्मणिजे ।
त्याचा अर्थ तो जाणिजे । शुद्ध लक्ष्यांश ॥ २५ ॥
ऐसा जो शुद्ध लक्ष्यांश । तो चि जाणावा पूर्वपक्ष ।
स्वानुभव तो अलक्ष । लक्षिला नवचे ॥ २६ ॥
जेथें गाळून सांडिलें नभा । जो अनुभवाचा गाभा ।
ऐसा तो हि उभा । कल्पित केला ॥ २७ ॥
मिथ्या कल्पनेपासूनि जाला । खरेंपण कैंचें असेल त्याला ।
ह्मणौनि तेथें अनुभवाला । ठाव चि नाहीं ॥ २८ ॥
दुजेविण अनुभव । हें बोलणें चिं तों वाव ।
याकारणें नाहीं ठाव । अनुभवासी ॥ २९ ॥
अनुभवें त्रिपुटी उपजे । अद्वैतीं द्वैत चि लाजे ।
ह्मणौनि बोलणें साजे । अनुर्वाच्य ॥ ३० ॥
दिवसरजनीचें परमित्यें । करावया मूळ आदित्य ।
तो आदित्य गेलियां उर्वरित । त्यासी काये ह्मणावें ॥ ३१ ॥
शब्दमौन्याचा विचार । व्हावया मूळ वोंकार ।
तो वोंकार गेलिया उच्चार । कैसा करावा ॥ ३२ ॥
अनुभव आणि अनुभविता । सकळ ये माये चि करितां ।
ते माया मुळीं नस्ता । त्यासी काये ह्मणावें ॥ ३३ ॥
वस्तु येक आपण येक । ऐसी अस्ती वेगळिक ।
तरि अनुभवाचा विवेक । बोलों येता सुखें ॥ ३४ ॥

---

१ दृश्यावेगळें जें ब्रह्म त्यासबंधानें जें बोलणें तो वाच्यांश. त्या बोलण्याचा अर्थ तो लक्ष्यांश, आणि तो लक्ष्यांश देखील पूर्वपक्षात च येतो. २ ब्रह्मस्वरूपाचा बोध होण्यासाठीं नेहमीं गगनाची उपमा देतात, पण तें गगन देखील ज्याच्या ठिकाणीं गळून पडतें, ह्मणजे ज्यास गगनाची देखील उपमा पूर्णपणें लागूं पडत नाहीं, असें जें केवळ अनुभवरूप ब्रह्मस्वरूप त्यासंबंधानें कल्पना करून जर कांहीं निर्णय केला तर तो खरा कोठून असणार ? ३ अनुभविता, अनुभाव्य व अनुभव अशी त्रिपुटी. ४ परिमिति, मर्यादा ५ शिल्लक, बाकी, शेष ६ भाषण आणि मौन यास कारण ओंकार; तो ओंकार च नाहींसा झाला तर भाषण कसलें आणि मौन तरी कसलें !

वेगळेपणाची मातो । ते लटिके बवेची सुता ।
ह्मणोनिया अभिन्नता । मुळीं च आहे ॥ ३५ ॥
अजन्मा होता निजेला । तेणें स्वप्नीं स्वप्न देखिला ।
सद्गुरूस शरण गेला । संसारदुःखें ॥ ३६ ॥
सद्गुरुकृपेस्तव । जाला ससार वाव ।
ज्ञान जालिया ठाव । पुसे अज्ञानाचा ॥ ३७ ॥
आहे तितुकें नाहीं जालें । नाहीं नाहींपणें निमालें ।
आहे नाहीं जाऊन उरलें । नसोनें काहीं ॥ ३८ ॥
सुन्यत्वातीत शुद्धज्ञान । तेणें जालें समाधान ।
ऐक्यरूपें अभिन्न । सहजस्थिती ॥ ३९ ॥
अद्वैतनिरूपण होता । निमाली द्वैताची वार्ता ।
ज्ञानचर्चा बोलों जाता । जागृती आली ॥ ४० ॥
श्रोता व्हावें सावधान । अर्थी घालावें मन ।
खुणे पावता समाधान । अतरीं कळे ॥ ४१ ॥

---

१ ज्या मायेपासून भिन्नभाव निर्माण झाला ती माया च मुळीं वंध्यासुतेप्रमाणें लटकी आहे. २ कोणी एक मनुष्य संसाराला त्रासून सद्गुरूस शरण गेला, तेणेंकरून आपण ज्ञानसंपन्न झालों असें त्यास वाटून, तो ज्ञानाच्या गोष्टी बोलूं लागला कीं " मी किती तरी अज्ञानी होतों, हें जें आहे तें सर्व नश्वर आहे, जें नाहीं तें नाहीं च नाहीं, असें हें आहे आणि नाहीं जाऊन जें उरलें तें ब्रह्म, पण तें शून्यवत् नाहीं, तर शुद्ध ज्ञानरूप आहे, मी तद्रूप आहें, इतके दिवस मला हें ज्ञान नव्हतें, तोंपर्यंत मी निजलेला होतों, आता मी खरा जागा झालों. " या ठिकाणीं ससार हें च एक मूळ स्वप्न आहे, त्यांत आपण सद्गुरूस शरण जाऊन ज्ञानी झालों असें जें त्याला वाटू लागलें तें स्वप्नांत स्वप्न होय साराश, मला असें असें ज्ञान झालें असें जोंपर्यंत कोणी ह्मणत असतो तोंपर्यंत तो स्वप्नांत च असतो, खरा जागा झाला नसतो, असें समजावें खरें ज्ञान शब्दातीत आहे, त्या ठिकाणीं द्वैत नसतें खरी जागृती ह्मणजे ती, कीं जेथें शब्द कुंठित होतो. ३ धन्य गुरुकृपा लाभता चि वर। होय निर्विकार स्वयें वस्तु ॥१॥ आहे स्थूलादिक जितुका दृश्याकार। करितां विचार नाहीं जालें ॥ २ ॥ नाहीं शून्यपण गेले नाहींसरिस । आहे मी ब्रह्मांश भ्रांति उडे ॥ ३ ॥ नाहीं मजमाजी काहीं च ह्मणणें । हें हि नसे भान अनुभवीं ॥ ४ ॥ अनुभवीं कैचें भेदाचें सांगणें । काहीं हें नसोन स्वयें तूं रे ॥ ५ ॥ उरलें पुरलें जेथ हे न साजे । खेळे सहजीसहज आत्माराम ॥ ६ ॥ ( दासविश्रामधाम )

तेणें जितुकें ज्ञान कथिलें । तितुकें स्वप्नावारीं गेलें ।
अनुर्वाच्य सुख उरलें । शब्दातीत ॥ ४२ ॥
तेथें शब्देंविण ऐक्यता । अनुभव ना अनुभविता ।
ऐसा निर्वांत तो मागुता । जागृती आला ॥ ४३ ॥
तेणें स्वप्नीं स्वप्न देखिला । जागा होऊनि जागृती आला ।
तेथें शब्द कुंठित जाला । अत नलगे ॥ ४४ ॥
या निरूपणाचें मूळ । केलें चि करूं प्राजळ ।
तेणें अतरीं निवळ । समाधान कळे ॥ ४५ ॥
तव शिष्यें विनविलें । जी हें आतां निरोपिलें ।
तें पाहिजे बोलिलें । मागुतें स्वामी ॥ ४६ ॥
मज कळाया कारण । केलें चि करावें निरूपण ।
येथील जे कां निजखूण । ते मज अनुभवावी ॥ ४७
अजन्मा तो सांग कवण । तेणें देखिला कैसा स्वप्न ।
तेथें कैसें निरूपण । बोलिलें आहे ॥ ४८ ॥
आणोनी शिष्याचा आदर । स्वामी देती प्रत्योत्तर ।
तें चि आता अति तत्पर । श्रोतीं येथें परिसावें ॥ ४९ ॥
ऐक शिष्या सावधान । अजन्मा तो तूं चि जाण ।
तुवा देखिला स्वप्नीं स्वप्न । तो हि आतां सांगतों ॥ ५० ॥
स्वप्नीं स्वप्नाचा विचार । तो तूं जाण हा संसार ।
येथें तुवा सारासार । विचार केला ॥ ५१ ॥
रिघोनि सद्गुरूस शरण । काढून शुद्ध निरूपण ।
याची करिसी ऊणखूण । प्रत्यक्ष आता ॥ ५२ ॥
याचा चि घेता अनुभव । बोलणें तितुकें होतें वाव ।
निवांत विश्रांतीचा ठाव । ते तूं जाण जागृती ॥ ५३ ॥

---

१ अद्वैतस्वरूप २ मी जागा झालों असें जें त्याला प्रथम वाटलें तें स्वप्नांत च होय. त्यानंतर मग त्यास पुढें खरें ज्ञान झालें ३ वाटाघाट, चर्चा. ४ सद्गुरुपासून ज्ञान प्राप्त झालें ह्मणून तूं जी चर्चा करितोस तिचा अनुभव घे, ह्मणजे तुला कळून येईल की जितकें तूं बोलतोस तितकें सारें व्यर्थ आहे नंतर तुला खरी विश्रांति मिळेल, तू खरा जागा होशील

ज्ञानगोष्टीचा गल्बला । सरोन अर्थ प्रगटला ।
याचा विचार घेतां आला । अतरीं अनुभव ॥ ५४ ॥
तुज वाटे हे जागृती । मज जाली अनुभवप्राप्ती ।
या नाव केवळ भ्रांती । फिटली च नाहीं ॥ ५५ ॥
अनुभव अनुभवीं विराला । अनुभवेंविण अनुभव आला ।
हा हि स्वप्नीचा चेईला । नाहींसे बापा ॥ ५६ ॥
जागा जालियां स्वप्नउर्मी । स्वप्नीं म्हणसी अजन्मा तो मी ।
जागेपणें स्वप्नउर्मी । गेली च नाहीं ॥ ५७ ॥
स्वप्नीं वाटे जागेपण । तैसी अनुभवाची खूण ।
आली परी तें सत्य स्वप्न । भ्रमरूप ॥ ५८ ॥
जागृती या पैलिकडे । तें सांगणें केवि घडे ।
जेथें धारणा चि मोडे । विवेकाची ॥ ५९ ॥
म्हणोनि तें समाधान । बोलतां चि न ये ऐसें जाण ।
निशब्दाची ऐसी खूण । वोळखावी ॥ ६० ॥
ऐसें आहे समाधान । बोलता च न ये जाण ।
इतुकेन बाणली खूण । निशब्दाची ॥ ६१ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे अनुर्वाच्यनाम समास दाहवा ॥ १० ॥

---

## ॥ दशक सातवा चतुर्दश ब्रह्म नाम ॥ ७ ॥

॥ श्रीराम ॥

विद्यावंतांचा पूर्वजु । मत्तांननु येकद्विजुं ।
त्रिनयेन चतुर्भुजु । फरशपाणी ॥ १ ॥

---

१ हरताळ लावून " वा " चा " व " केला आहे. २ हरताळ लावून " च " चा " स " केला आहे. ३ अनुभविता, अनुभाव्य व अनुभव ही त्रिपुटी नाहींसी होऊन, अनुभवावांचून अनुभव आला पाहिजे, ह्मणजे तूं अनुभवस्वरूप झाला पाहिजेस; बाकी खरें ह्मणशील तर तूं अजून काहीं स्वप्नांतून जागा झाला नाहींस ४ तुला वाटतें मी जागा झालों, पण अजून तूं जागा झाला नाहींस व तुझी स्वप्नऊर्मि हि गेली नाहीं. " मी अजन्मा " असें जें तूं ह्मणतोस तें स्वप्नांत होय ५ मत्त ( मत्त हत्तीचें ) आहे आनन ज्याचें ह्मणजे अर्थात् गजमुख. ६ एकदंत.

कुबेरापासूनि अर्थ । वेदापासून परमार्थ ।
लक्ष्मीपासून समर्थ । भाग्यासि आले ॥ २ ॥
तैसी मंगळमूर्ति आद्या । पासूनि जाल्या सकळ विद्या ।
तेणें कवी लाघव गद्या । सत्पात्रें जाले ॥ ३ ॥
जैसीं समर्थाची लेंकुरें । नाना आळंकारीं सुंदरें ।
मूळ पुरुषाचेनि द्वारें । तैसे कवी ॥ ४ ॥
नमू ऐसिया गणेंद्रा । विद्याप्रकाशें पूर्णचंद्रा ।
जयाचेनि बोधसमुद्रा । भरितें दाटे बळें ॥ ५ ॥
जो कर्तुत्वास आरंभ । मूळपुरुष मुळारंभ ।
जो परात्पर स्वयंभ । आदिअंतीं ॥ ६ ॥
तयापासून प्रेमदा[2] । ईछा[3] कुमारी शारदा ।
आदिल्यापासून गोदीं[4] । मृगजळ वाहे ॥ ७ ॥
जे मिथ्या ह्मणता च गोवी[5] । माईकपणें[6] लाघवी ।
वक्तयास वेढा[7] लावी । वेगळेपणें ॥ ८ ॥
जे द्वैताची जननी । किं ते अद्वैताची खाणी ।
मूळमाया गवसणी । अनंत ब्रह्मांडांची ॥ ९ ॥
कीं ते अवदबरी वल्ली । अनंत ब्रह्मांडीं लगडली ।
मूळपुरुषाची माउली । दुहितारूपें ॥ १० ॥
वंदू ऐसी वेदमाता । आदिपुरुषाची जे सत्ता ।
आता आठवीन समर्था । सद्गुरूसी ॥ ११ ॥

---

१ हरताळ लावून " लि " चा " ल्या " केला आहे. २ स्त्री. ३ इच्छा ही च शारदा कुमारी ४ गोदारूप मृगजळ. येथें " गोदा ' हा शब्द प्रासार्थ दिसतो. ५ गोवी=गुंतवी. माया मिथ्या आहे असें नुसत ह्मटले ह्मणजे तेवढ्याने काहीं तिचें निरसन होत नाहीं ६ नाटकी ७ वेढा लावी=भुलवी ८ वक्ता ब्रह्मनिरूपण करतो ह्मणजे च तो त्या ब्रह्मापासून वेगळा पडतो ९ मायेपासून द्वैताची उत्पत्ति तर आहे च परंतु मायेच्या च योगानें ब्रह्मप्राप्ति होत असते. १० व्याप्ति, आच्छादन. ११ ब्रह्मापासून मूळमाया व मूळमायेपासून गुणमाया ह्या च गुणमायेला मूळपुरुष ह्मणतात. अर्थात् मूळमाया ही ब्रह्माची दुहिता असून मूळपुरुषाची माउली आहे

जयाचेनि कृपादृष्टी । होये आनंदाची वृष्टी ।
तेणें सुखें सर्व सृष्टी । आनंदमये ॥ १२ ॥
किं तो आनंदाचा जनक । सायोज्यमुक्तीचा नायेक ।
कैवल्यपददायक । अनाथबंधु ॥ १३ ॥
मुमुक्षें चातकीं सुस्वर । करुणा पाहिजे अंबर ।
वोळे कृपेचा जळधर । साधकांवरी ॥ १४ ॥
किं तें भवार्णवींचें तारूं । बोधें पाववी पैलपारु ।
माहा आवर्तीं आधारु । भाविकासी ॥ १५ ॥
किं तो काळाचा नियंता । नातरी संकटीं सोडविता ।
किं ते भाविकांची माता । परम स्नेहाळु ॥ १६ ॥
कीं जो परत्रींचा आधार । किं ते विश्रांतीची थार
नांतरी सुखाचें माहेर । सुखस्वरूप ॥ १७ ॥
ऐसा सद्गुरु पूर्णपणी । तुटे भेदाची कैडसणी ।
देहविण लोटांगणी । तया प्रभूसी ॥ १८ ॥
साधु संत आणी सज्जन । वदूनियां श्रोतेजन ।
आतां कथानुसंधान । सावध ऐका ॥ १९ ॥
संसार हा चि दीर्घ स्वप्न । लोभे वोसणाती जन ।
माझी कांता माझें धन । कन्या पुत्र माझे ॥ २० ॥
ज्ञानसूर्य मावळला । तेणें प्रकाश लोपला ।
अंधकारें पूर्ण जाला । ब्रह्मगोळ आवघा ॥ २१ ॥

---

१ चातकरूपी मुमुक्षूनें अंबररूपी सद्गुरुकरुणा भाकली म्हणजे जलधररूपी सद्गुरु-कृपा साधकांवर होते. २ होते ( मुमुक्षु हा चातक तर करुणा ही अंबर होते. ) किंवा पाहिजे=पहावा मुमुक्षुरूप चातकानीं सुस्वरानें म्हणजे आर्तचित्तानें करुणारूप अंबर पहावें म्हणजे मग सद्गुरुरूप कृपाघन त्यावर वर्षाव करील, असा या ओवीचा कोणी अर्थ करतात ३ भोंवऱ्यात, संकटांत. ४ बटव्याच्या दोरीला कडसणी म्हणतात. बटव्याला जशी दोरी तशी भेदाला माया, ती माया सद्गुरूच्या कृपेनें लयाला जाते ५ जीव आणि शिव यांचें ऐक्य होऊन ६ बरळतात

नाहीं सत्वाचें चांदिणें। काहीं मार्ग दिसे जेणें।
सर्व भ्रांतीचेनि गुणें। आपेंआप न दिसे॥ २२॥
देहबुद्धिअहंकारें। निजेले घोरती घोरें।
दु:खें आक्रंदती थोरें। विषयसुखाकारणें॥ २३॥
निजेले असतां च मेले। पुन्हा उपजतां च निजेले।
ऐसे आले आणी गेले। बहुत लोक॥ २४॥
निदसुरेपणें चि सैरा। बहुतीं केल्या येरझारा।
नेणोनिया परमेश्वरा। भोगिले कष्ट॥ २५॥
तथा कष्टाचें निर्शन। व्हावया पाहिजे आत्मज्ञान।
ह्मणोनि हें निरूपण। अध्यात्मग्रंथ॥ २६॥
सकळ विद्येमध्यें सार। अध्यात्मविद्येचा विचार।
दशमोध्याइं सारंगधर। भगवद्गीतेसि बोलिला॥ २७॥

॥ श्लोक॥ अध्यात्मविद्या विद्यानां वादः प्रवदतामहम्॥ ७॥

याकारणें अद्वैतग्रंथ। अध्यात्मविद्येचा परमार्थ।
पाहावया तो चि समर्थ। जो सर्वांगें श्रोता॥ २८॥
जयाचें चंचळ हृदये। तेणें ग्रंथ सोडूं चि नये।
सोडितां अलभ्य होये। अर्थ येथीचा॥ २९॥
जयास जोडला परमार्थ। तेणें पाहावा हा ग्रंथ।
अर्थ शोधितां परमार्थ। निश्चयें बाणे॥ ३०॥
जयासि नाहीं परमार्थ। तयासि न कळे येथीचा अर्थ।
नेत्रेंविण निधानस्वार्थ। अंधास कळेना॥ ३१॥
येक ह्मणती मऱ्हाटें काये। हें तों भल्यांसि ऐकों नये।
तीं मूर्खें नेणती सोये। अर्थान्वयाची॥ ३२॥
लोहाची मांदुस केली। नाना रत्नें साठविलीं।
ते अभाग्यानें त्यागिली। लोखंड ह्मणौनी॥ ३३॥

---

१ झोंपेच्या योगें २ पेटी

तैसी भाषा प्राकृत । अर्थ वेदांत आणी सिद्धांत ।
नेणोनि त्यागी भ्रांत । मंदबुद्धिस्तव ॥ ३४ ॥
आहाच सांपडता धन । त्याग करणें मूर्खपण ।
द्रव्य घ्यावें सांठवेण । पाहों चि नये ॥ ३५ ॥
परिस देखिला आंगणीं । मार्गीं पडिला चिंतामणी ।
आव्हेंवेल माहां गुणी । कूपांमधें ॥ ३६ ॥
तैसें प्राकृतीं अद्वैत । सुगम आणी सप्रचित ।
अध्यात्म लाभे अकस्मात । तरी अवश्य घ्यावें ॥ ३७ ॥
न करिता वित्पत्तीचा श्रम । सकळ शास्त्रार्थ होये सुगम ।
सत्समागमाचें वर्म । तें हें ऐसें असे ॥ ३८ ॥
जें वित्पत्तीनें न कळे । तें सत्समागमें कळे ।
सकळ शास्त्रार्थ आकळे । स्वानुभवासी ॥ ३९ ॥
ह्मणौनि कारण सत्समागम । तेथें नलगे वित्पत्तीश्रम ।
जन्मसार्थकाचें वर्म । वेगळें चि आहे ॥ ४० ॥

॥ श्लोक ॥ भाषाभेदाश्च वर्तन्ते ह्यर्थ एको न संशयः ।
पात्रद्वये यथा खाद्यं स्वादभेदो न विद्यते ॥ १ ॥

भाषापालटें कांहीं । अर्थ वायां जात नाहीं ।
कार्यसिद्धि ते सर्व हि । अर्थाचपासीं ॥ ४१ ॥
तथापी प्राकृताकरिता । संस्कृताची सार्थकता ।
येर्‍हवीं त्या गुप्तार्था । कोण जाणे ॥ ४२ ॥
आतां असो हें बोलणें । भाषा त्यागूनि अर्थ घेणें ।
उत्तम घेऊन त्याग करणें । सालीटरफलांचा ॥ ४३ ॥
अर्थ सार भाषा पोंचट । अभिमानें करावी खटपट ।
नाना अहंतेनें वाट । रुधिली मोक्षाची ॥ ४४ ॥
शोध घेता लक्ष्यांशाचा । तेथें आधीं वाच्यांश कैंचा ।
अगाध महिमा भगवंताचा । कळला पाहिजे ॥ ४५ ॥

---

१ सहजगत्या. २ ज्याच्यांत साठविलें ती पेटी किंवा भांडें वगैरे. ३ दक्षिणावर्ति वेल, ज्याचें वेष्टण उजव्या बाजूनें असतें असा वेल.

मुकेपणाचें बोलणें । हें जयाचें तो चि जाणे ।
स्वानुभवाचिये खुणे । स्वानुभवी पाहिजे ॥ ४६ ॥
अर्थ जाणे अध्यात्माचा । ऐसा श्रोता मिळेल कैंचा ।
जयासि बोलता वाचेचा । हव्यास चि पुरे ॥ ४७ ॥
परीक्षवतांपुढें रत्न । ठेविता होये समाधान ।
तैसें ज्ञानियांपुढें ज्ञान । बोलावें वाटे ॥ ४८ ॥
मायाजाळें दुश्चीत होये । तें निरूपणीं कामा न ये ।
संसारिकां कळे काये । अर्थ येथींचा ॥ ४९ ॥

॥ श्लोक ॥ व्यवसायात्मिका बुद्धिरेकेह कुरुनंदन ।
बहुशाखा ह्यनंताश्च बुद्धयोऽव्यवसायिनाम् ॥ १ ॥

वेवसाईं जो मळिण । त्यासि न कळे निरूपण ।
येथें पाहिजे सावधपण । अतिशयेंसीं ॥ ५० ॥
नाना रत्नें नाना नाणीं । दुश्चीतपणें घेतां हानी ।
परीक्षा नेणतां प्राणी । ठकला तेथें ॥ ५१ ॥
तैसें निरूपणीं जाणा । आहाच पाहातां कळेना ।
मऱ्हाटें चि उमजेना । कांहीं केल्या ॥ ५२ ॥
जेथें निरूपणाचे बोल । आणी अनुभवाचे बोल ।
तें संस्कृतापरीस खोल । अध्यात्मश्रवण ॥ ५३ ॥
मायाब्रह्म वोळखावें । तयास अध्यात्म ह्मणावें ।
तरी तें मायेचें जाणावें । स्वरूप आधीं ॥ ५४ ॥
माया सगुण साकार । माया सर्वस्व विकार ।
माया जाणिजे विस्तार । पंचभूतांचा ॥ ५५ ॥
माया दृश्य दृष्टीस दिसे । माया भास मनासि भासे ।
माया क्षणभंगुर नासे । विवेकें पाहातां ॥ ५६ ॥
माया अनेक विश्वरूप । माया विष्णूचें[1] स्वरूप ।
मायेची सीमा अमूप । बोलिजे तितुकी ॥ ५७ ॥

---

१ विष्णूचें स्वरूप ह्मणजे सगुण ब्रह्मरूप, ब्रह्माचें सगुण रूप ह्मणजे माया, ह्मणून माया हें च विष्णूचें स्वरूप

माया बहुरूपी बहुरंग । माया ईश्वराचा सर्ग[1] ।
माया पाहातां अभंग । अखिळ वाटे ॥ ५८ ॥
माया सृष्टीची रचना । माया आपुली कल्पना ।
माया तोडितां तुटेना । ज्ञानेंविण ॥ ५९ ॥
ऐसी माया निरोपिली । स्वल्प संकेतें बोलिली ।
पुढें वृत्ति सावध केली । पाहिजे श्रोतीं ॥ ६० ॥
पुढें ब्रह्मनिरोपण । निरोपिलें ब्रह्मज्ञान ।
जेणें तुटे मायाभान । येकसरें ॥ ६१ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे मंगळाचरणनाम समास प्रथम ॥ १ ॥

---

॥ श्रीराम ॥

ब्रह्म निर्गुण निराकार । ब्रह्म निःसंग निर्विकार ।
ब्रह्मासि नाहीं पारावार । बोलती साधु ॥ १ ॥
ब्रह्म सर्वांस व्यापक । ब्रह्म अनेकीं येक ।
ब्रह्म शाश्वत हा विवेक । बोलिला शास्त्रीं ॥ २ ॥
ब्रह्म अच्युत अनंत । ब्रह्म सदोदित संत ।
ब्रह्म कल्पनेरहित । निर्विकल्प ॥ ३ ॥
ब्रह्म या दृश्यावेगळें । ब्रह्म सुन्यत्वास निराळें ।
ब्रह्म इंद्रियांच्या मेळें । चोजवेना[2] ॥ ४ ॥
ब्रह्म दृष्टीस दिसेना । ब्रह्म मूर्खासी असेना ।
ब्रह्म साधुविण येना । अनुभवासी ॥ ५ ॥
ब्रह्म सकळांहूनि थोर । ब्रह्मा ऐसें नाहीं सार ।
ब्रह्म सूक्ष्म अगोचर । ब्रह्मादिकासी ॥ ६ ॥

---

१ माया ही ईश्वराला धरून आहे, माया ही ईश्वराच्या आश्रयानें असते, असा अर्थ कोणी करतात, व ब्रह्माच्या ठिकाणीं मायेनें ईश्वरत्व आणलें असा अर्थ कित्येक करतात संग=अहंकार, मी एक आहे तो बहुविध व्हावें अशी स्फूर्ति ती च माया.
२ जाणवत नाहीं.

ब्रह्म शब्दीं ऐसें तैसें । बोलिजे त्याहूनि अनारिसें [redacted]
परी तें श्रवणअभ्यासें । पाविजे ब्रह्म ॥ ७ ॥
ब्रह्मास नामें अनंत । परी तें ब्रह्म नामातीत ।
ब्रह्मास हेतंदृष्टांत । देतां न शोभती ॥ ८ ॥
ब्रह्मासारिखें दुसरें । पाहातां काय आहे खरें ।
ब्रह्म दृष्टांतउत्तरें । कदा न साहे ॥ ९ ॥

श्रुति ॥ यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह ॥ ७ ॥

जेथें वाचा निवर्तती । मनासी नाहीं ब्रह्मप्राप्ती ।
ऐसी बोलिली श्रुती । सिद्धांतवचन ॥ १० ॥
कल्पनारूप मन पाहीं । ब्रह्मीं कल्पना चि नाहीं [redacted]
ह्मणौनि वाक्य काहीं । अन्यथा नव्हे ॥ ११ ॥
आतां मनासि जें अप्राप्त । तें कैसें होईल प्राप्त ।
ऐसें ह्मणाल तरी कृत्य । सद्गुरुविण नाहीं ॥ १२
भांडारगृहें भरलीं । परी असती आडकिलीं ।
हातास न येतां किली । सर्व हि अप्राप्त ॥ १३ ·
तरी ते किली ते कवण । मज करावी निरूपण ।
ऐसा श्रोता पुसे खूण । वक्तयासी ॥ १४ ॥
सद्गुरुकृपा ते चि किली । जेणें बुद्धि प्रकाशली ।
द्वैतकपाटें उघडलीं । येकसरीं ॥ १५ ॥
तेथें सुख असे वाड । नाहीं मनास पवाड ।
मनेंविण कैवाड । साधनाचा ॥ १६ ॥
त्याचा मनेंविण प्राप्ती । किं वासनेविण तृप्ती ।
तेथें न चले वित्पत्ती । कल्पनेची ॥ १७ ॥
तें परेहूनि पर । मनबुद्धीअगोचर ।
संग सोडितां सत्वर । पाविजेतें ॥ १८ ॥

---

१ हेतु व दृष्टांत. २ ठाव, गति ३ कैवार, अंगिकार.

संग सोडावा आपुला । मग पाहावें तयाला ।
अनुभवी तो या बोला । सुखावेल गा ॥ १९ ॥
आपण म्हणिजे मीपण । मीपण ह्मणिजे जीवपण ।
जीवपण ह्मणिजे अज्ञान । संग जडला ॥ २० ॥
सोडितां तया संगासी । ऐक्य होये निःसंगासी ।
कल्पनेविण प्राप्तीसी । अधिकार ऐसा ॥ २१ ॥
मी कोण ऐसें नेणिजे । तया नाव अज्ञान बोलिजे ।
अज्ञान गेलियां पाविजे । परब्रह्म तें ॥ २२ ॥
देहबुद्धीचें थोरपण । परब्रह्मीं न चले जाण ।
तेथें होतसे निर्वाण । अहंभावासी ॥ २३ ॥
उंच नीच नाहीं परी[1] । राया रंका येकि च सरी[2] ।
जाला पुरुष अथवा नारी । येक चि पद ॥ २४ ॥
ब्राह्मणाचें ब्रह्म तें सोवळें । शूद्राचें ब्रह्म तें वोवळें ।
ऐसें वेगळें आगळें । तेथें असेचिना ॥ २५ ॥
उंच ब्रह्म तें रायासी । नीच ब्रह्म तें परिवारासी ।
ऐसा भेद तयापासीं । मुळीं च नाहीं ॥ २६ ॥
सकळांसि मिळोन ब्रह्म येक । तेथें नाहीं हे अनेक ।
रंक अथवा ब्रह्मादिक । तेथें चि जाती ॥ २७ ॥
स्वर्ग मृत्य आणि पाताळ । तिहीं लोकींचे ज्ञाते सकळ ।
सकळांसि मिळोन येक चि स्थळ । विश्रांतीचें ॥ २८ ॥
गुरुशिष्या येक चि पद । तेथें नाहीं भेदाभेद ।
परी या देहाचा समंध । तोडिला पाहिजे ॥ २९ ॥
देहबुद्धीचा अंतीं । सकळांसि येक चि प्राप्ती ।
येक ब्रह्म द्वितीयं नास्ति । हें श्रुतिवचन ॥ ३० ॥
साधु दिसती वेगळाले । परी ते स्वरूपीं मिळाले ।
अवघे मिळोन येक चि जाले । देहातीत वस्तु ॥ ३१ ॥

---

१ प्रकार, पर्याय. २ बरोबरी.

ब्रह्म नाहीं नवें जुनें। ब्रह्म नाहीं अदिक उणें।
उणें भाविल तें सुणें[1]। देहबुद्धीचें ॥ ३२ ॥
देहबुद्धीचा संशयो। करी समाधानाचा क्षयो।
चुके समाधानसमयो। देहबुद्धियोगें ॥ ३३ ॥
देहाचें जें थोरपण। तें चि देहबुद्धीचें लक्षण।
मिथ्या जाणोनि विचक्षण। निंदिती देहो ॥ ३४ ॥
देह पावे जंवरी मरण। तंवरी धरी देहाभिमान।
पुन्हा दाखवी पुनरागमन। देहबुद्धि मागुती ॥ ३५ ॥
देहाचेनि थोरपणें। समाधानासी आलें उणें।
देहो पडेल कोण्या गुणें। हें हि कळेना ॥ ३६ ॥
हित आहे देहातीत। ह्मणोनि निरोपिती संत।
देहबुद्धीनें अन्हित। हों चि लागे ॥ ३७ ॥
सामर्थ्यबळें देहबुद्धी। योगीयासि ते हि बाधी।
देहबुद्धीची उपाधी। पैसावों लागे ॥ ३८ ॥
ह्मणौनि देहबुद्धि हे झडे। तरी च परमार्थ घडे।
देहबुद्धीनें विघडे। ऐक्यता ब्रह्मीची ॥ ३९ ॥
विवेक वस्तूकडे मोढी। देहबुद्धि तेथूनि पाडी।
अहंता लाऊन निवडी। वेगळेपणें ॥ ४० ॥
विचक्षणें याकारणें। देहबुद्धि त्यजावी श्रवणें।
सत्यब्रह्मीं साचारपणें। मिळोन जावें ॥ ४१ ॥
सत्यब्रह्म तें कवण। ऐसा श्रोता करी प्रश्न।
प्रत्योत्तर दे आपण। वक्ता श्रोतयासी ॥ ४२ ॥
ह्मणे ब्रह्म येक चि असे। परी तें बहुविध भासे।
अनुभव देहीं अनारिसें। नाना मतीं ॥ ४३ ॥
जें जें जया अनुभवलें। तें चि तयासि मानलें।
तेथें चि त्याचें विस्वासलें। अतःकर्ण ॥ ४४ ॥

---

1 शून्यें।

ब्रह्म नामरूपातीत । असोनि नामें बहुत ।
निर्मळ निश्चळ निवांत । निजानंद ॥ ४५ ॥
अरूप अलक्ष अगोचर । अच्युत अनंत अपरांपर ।
अदृश्य अतर्क्य अपार । ऐसीं नामें ॥ ४६ ॥
नादरूप जोतिरूप । चैतन्यरूप सत्तारूप ।
साक्षरूप सस्वरूप । ऐसीं नामें ॥ ४७ ॥
सुन्य आणी सनातन । सर्वेश्वर आणी सर्वज्ञ ।
सर्वात्मा जगजीवन । ऐसीं नामें ॥ ४८ ॥
सहज आणी सदोदित । शुद्ध बुद्ध सर्वातीत ।
शाश्वत आणी शब्दातीत । ऐसीं नामें ॥ ४९ ॥
विशाळ विस्तीर्ण विश्वंभर । विमळ वस्तु व्योमाकार ।
आत्मा परमात्मा परमेश्वर । ऐसीं नामें ॥ ५० ॥
परमात्मा ज्ञानघन । येकरूप पुरातन ।
चिद्रूप चिन्मात्र जाण । नामें अनाम्याचीं ॥ ५१ ॥
ऐसीं नामें असख्यात । परी तो परेश नामातीत ।
त्याचा करोवा निश्चितार्थ । ठेविलीं नामें ॥ ५२ ॥
तो विश्रांतीचा विश्राम । आदिपुरुष आत्माराम ।
तें येक चि परब्रह्म । दुसरें नाहीं ॥ ५३ ॥
तें चि कळायाकारणें । चौदा ब्रह्मांचीं लक्षणें ।
सांगिजेती तेणें श्रवणें । निश्चयो बाणे ॥ ५४ ॥
खोटें निवडितां येकसरें । उरलें तें जाणिजे खरें ।
चौदा ब्रह्में शास्त्राधारें । बोलिजेती ॥ ५५ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे ब्रह्मनिरूपणनाम समास दुसरा ॥ २ ॥

---

श्रीराम

श्रोतां व्हावें सावधान । आतां सांगतों ब्रह्मज्ञान ।
जेणें होये समाधान । साधकाचें ॥ १ ॥

---

१ करावया.

रत्नें साधायाकारणें । मृत्तिका लागे येकवटणें ।
चौदा ब्रह्मांचीं लक्षणें । जाणिजे तैसीं ॥ २ ॥
पदार्थेंविण संकेत[1] । द्वैतावेगळा दृष्टांत ।
पूर्वपक्षेंविण सिद्धांत । बोलतां चि न ये ॥ ३ ॥
आधीं मिथ्या उभारावें । मग तें वोळखोन सांडावें ।
पुढें सत्य तें स्वभावें । अंतरीं बाणे ॥ ४ ॥
ह्मणौन चौदा ब्रह्मांचा संकेत । बोलिला कळाया सिद्धांत ।
येथें श्रोतीं सावचित । क्षण येक असावें ॥ ५ ॥
पहिलें तें शब्दब्रह्म । दुजें मीतिकाक्षरब्रह्म[2] ।
तिसरें खंब्रह्म । बोलिली श्रुती ॥ ६ ॥
चौथें जाण सर्वब्रह्म । पांचवें चैतन्यब्रह्म ।
साहावें सत्ताब्रह्म । साक्षब्रह्म सातवें ॥ ७ ॥
आठवें सगुणब्रह्म । नेवें[3] निर्गुणब्रह्म ।
दाहावें वाच्यब्रह्म । जाणावें पैं ॥ ८ ॥
अनुभव तें अक्रावें । आनदब्रह्म तें बारावें ।
तदाकार तेरावें । चौदावें अनुर्वाच्य ॥ ९ ॥
ऐसीं हे चौदा ब्रह्में । यांचीं निरोपिलीं नामें ।
आतां स्वरूपाचीं वर्में[4] । संकेत दाऊं ॥ १० ॥
अनुभवेंविण भ्रम । या नांव शब्दब्रह्म ।
आतां मीतिकाक्षरब्रह्म । तें येकाक्षर ॥ ११ ॥
खंशब्दें आकाशब्रह्म । महदाकाश व्यापकधर्म ।
आतां बोलिलें सूक्ष्म । सर्वब्रह्म ॥ १२ ॥
पंचभूतांचें कुवाडें । जें जें तत्व दृष्टी पडे ।
तें तें ब्रह्म चि चोखडें । बोलिजेत आहे ॥ १३ ॥

---

१ खूण, नामनिर्देश २ ओमित्येकाक्षरं ब्रह्म. ३ नववें ४ कोडें.

या नाव सर्वब्रह्म । श्रुतिआश्रयाचें वर्म[1] ।
आतां चैतन्यब्रह्म । बोलिजेल[2] ॥ १४ ॥
पंचभूतादि मायेतें । चैतन्य चि चेतवितें ।
म्हणौनि त्या चैतन्यातें । चैतन्यब्रह्म बोलिजे ॥ १५ ॥
चैतन्यास ज्याची सत्ता । तें सत्ताब्रह्म तत्वता ।
तये सत्तेस जाणता । या नाव साक्षब्रह्म ॥ १६ ॥
साक्षत्व जयापासुनी । तें हि आकळिलें गुणीं ।
सगुणब्रह्म हे वाणी । तयासि वदे ॥ १७ ॥
जेथें नाहीं गुणवार्ता । तें निर्गुणब्रह्म तत्वता ।
वाच्यब्रह्म तें हि आता । बोलिजेल ॥ १८ ॥
जें वाचें बोलतां आलें । तें वाच्यब्रह्म बोलिलें ।
अनुभवासि कथिलें । नवचे सर्वथा ॥ १९ ॥
या नाव अनुभवब्रह्म । आनंदवृत्तीचा धर्म ।
परंतु याचें हि वर्म । बोलिजेलें ॥ २० ॥
ऐसें हें ब्रह्म आनंद । तदाकार[3] तें अभेद ।
अनुर्वाचीं संवाद । तुटोन गेला ॥ २१ ॥
ऐसीं हे चौदा ब्रह्में । निरोपिलीं अनुक्रमें ।
साधकें पाहाता भ्रमें । बाधिजेना ॥ २२ ॥
ब्रह्म जाणावें शाश्वत । माया ते चि अशाश्वत ।
चौदा ब्रह्माचा सिद्धांत । होईल आतां ॥ २३ ॥
शब्दब्रह्म तें शाब्दिक । अनुभवेंविण माईक ।
शाश्वताचा विवेक । तेथें नाहीं ॥ २४ ॥

---

१ 'सर्वं खल्विदं ब्रह्म' या श्रुतीच्या आधारानें सर्वब्रह्म असे म्हटलें आहे. २ प्रथम "बोलवेना" होतें त्याचें श्रीसमर्थांनीं "बोलिजेल" केलें. ३ तदाकार= तद्रूप=आनंदरूप, अर्थात् तें आनंदापासून निराळे नाहीं.

जें क्षर[1] ना अक्षर[2] । तेथें कैंचें मीतिकाक्षर ।
शाश्वताचा विचार । तेथें हि न दिसे ॥ २५ ॥
खं ब्रह्म[3] ऐसें वचन । तरी सुन्यातें[4] नासी ज्ञान ।
शाश्वताचें अधिष्ठान । तेथे हि न दिसे ॥ २६ ॥
सर्वत्रास आहे अत । सर्वब्रह्म नासिवत ।
प्रळये बोलिला निश्चित । वेदांतशास्त्रीं ॥ २७ ॥
ब्रह्मप्रळये मांडेल जेथें । भूतान्वय कैचा तेथें ।
ह्मणौनियां सर्वब्रह्मातें । नाश आहे ॥ २८ ॥
अचळासि आणी चळण । निर्गुणास लावितां गुण ।
आकारास विचक्षण । मानीतना ॥ २९ ॥
जें निर्माण पचभूत । तें प्रत्यक्ष नासिवत ।
सर्वब्रह्म हे मात । घडे केवी ॥ ३० ॥
असो आता हें बहुत । सर्वब्रह्म नासिवंत ।
वेगळेपणास[5] अत । पाहाणें कैचें ॥ ३१ ॥
आतां जयास चेतवावें । तें चि माईक स्वभावें ।
तेथें चैतन्याच्या नावें । नास आला ॥ ३२ ॥
परिवारेंविण सत्ता । ते सत्ता नव्हे तत्वता ।
पदार्थेंविण साक्षता । ते हि मिथ्या ॥ ३३ ॥
सगुणास नाश आहे । प्रत्यक्षास प्रमाण काये ।
सगुणब्रह्म निश्चयें । नासिवत ॥ ३४ ॥

---

१ नाशवंत २ अविनाशी ब्रह्म हें क्षर नाहीं आणि अक्षर ह्मणजे अविनाशी हि नहीं प्र० अविनाशी नाहीं कसें ? उ० जेथें नाश च नाहीं तेथें अविनाशी अशा शब्दप्रयोगाचा संभव तरी कोठे ? क्षर नाहीं व अक्षर हि नाहीं असें जें ब्रह्म तेथें "येकाक्षर" ब्रह्म कोठून आणलें ? ३ खं=आकाश=अवकाश=शून्य=अज्ञान द ८–४–१६ पहा ४ शून्यातें ५ सर्व च जेथें नाशवंत आहे तेथे वेगळेपणा कोठून राहणार ? आणि मग पाहणें तरी कोठ उरलें ? "पाहणें" यात वेगळेपणा, द्वैत आलें, पण सर्व नाशवंत झाल्यावर हे द्वैत तरी कसें उरणार ?

निर्गुण ऐसें जें नाव । त्या नावास कैंचा ठाव ।
गुणेंविण गौरव । येईल कैंचें ॥ ३५ ॥

माया जैसें मृगजळ । ऐसें बोलती सकळ ।
कां तें कल्पनेचें आभाळ । नाथिलें चि ॥ ३६ ॥

ग्रामो नास्ति कुतः सीमा । जन्मेंविण जीवात्मा ।
अद्वैतासी उपमा । द्वैताची ॥ ३७ ॥

मायेविरहित सत्ता । पदार्थेंविण जाणता ।
अविद्येंविण चैतन्यता । कोणास आली ॥ ३८ ॥

सत्ता चैतन्यता साक्षी । सर्व हि गुणाचपासीं ।
ठाईचें निर्गुण त्यासी । गुण कैंचे ॥ ३९ ॥

ऐसें जें गुणरहित । तेथें नामाचा संकेत ।
तो चि जाणावा अशाश्वत । निश्चयेंसी ॥ ४० ॥

निर्गुण ब्रह्मासि संकेतें । नामें ठेविलीं बहुतें ।
तें वाच्यब्रह्म त्यातें । नाश आहे ॥ ४१ ॥

आनंदाचा अनुभव । हा हि वृत्तीचा चि भाव ।
तदाकारीं ठाव । वृत्तीस नाहीं ॥ ४२ ॥

अनुर्वाच्य याकारणें । संकेत वृत्तीच्या गुणें ।
तया संकेतास उणें । निवृत्तीनें आणिलें ॥ ४३ ॥

---

१ "गुण" च नाहींत तर "निर्गुण" असा शब्दप्रयोग होईल कसा? "गुणा" वाचून "निर्गुण" या नामाची प्रवृत्ती कशी होणार? ब्रह्म हें गुणरहित खरें पण त्याला "निर्गुण" असा नामनिर्देश निरर्थक आहे "गुण" मिथ्या आहेत. ते च जर नाहींत तर "निर्गुण' असा नामनिर्देश निरर्थक नव्हे काय? गांव च नाहीं तेथें गांवकस कोठचे जीव (जन्म) नाहीं तेथें जीवात्मा कोठचा? सारांश अद्वैत असें जें ब्रह्म त्याला "ज्याच्या ठिकाणीं गुण नाहीं" असें म्हणण्यानें द्वैताची उपमा दिल्यासारखें होतें २ "आनंद" ही मनोवृत्ति आहे, परंतु आनंदाकार किंवा आनंदरूप झाल्यावर आनंदवृत्ति निराळी उरत नाहीं ३ वृत्तीच्या योगानें नामनिर्देश करता येतो, परंतु निवृत्त झाल्यावर संकेत करता येत नाहीं

अनुर्वाच्य ते निवृत्ती । ते चि उन्मनीची स्थिती ।
निरोपाधी विश्रांति । योगियांची ॥ ४४ ॥
वस्तु जे कां निरोपाधी । ते चि सहज समाधी ।
जेणें तुटे आदिव्याधी । भवदुखाची ॥ ४५ ॥
जो उपाधीचा अंत । तो चि जाणावा सिद्धांत ।
सिद्धांत आणी वेदांत । धादांत आत्मा ॥ ४६ ॥
असो ऐसें जें शाश्वत ब्रह्म । जेथें नाहीं मायाभ्रम ।
अनुभवी जाणे वर्म स्वानुभवें ॥ ४७ ॥
आपुलेन अनुभवें । कल्पनेसि मोडावें ।
मग सुकाळीं पडावें । अनुभवाचे ॥ ४८ ॥
निर्विकल्पास कल्पावें । कल्पना मोडे स्वभावें ।
मग नसोनि असावें । कल्पकोटी ॥ ४९ ॥
कल्पनेचें येक बरें । मोहरितां च मोहरे ।
स्वरूपीं घालितां भरे । निर्विकल्पीं ॥ ५० ॥
निर्विकल्पासी कल्पितां । कल्पनेची नुरे वार्ता ।
निसंगास भेटों जातां । निःसंग होइजे ॥ ५१ ॥
पदार्थाऐसें ब्रह्म नव्हे । मी तें हातीं धरून द्यावें ।
असो हें अनुभवावें । सद्गुरुमुखें ॥ ५२ ॥
पुढें कथेचा अन्वये । केला चि करूं निश्चये ।
जेणें अनुभवासि ये । केवळब्रह्म ॥ ५३ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे चतुर्दशब्रह्मनिरूपणनाम समास तृतीय ॥ ३

---

१ शिरकविता च २ मग ३ चौदा ब्रह्माची स्थापना वामनपंडितांना मान्य झाली, परंतु तीं उडविलीं कशीं याबद्दल त्यांना शंका होती बृहदारण्यकोपनिषद् पाहण्यास सांगून श्रीसमर्थांनी पंडितांची ही शंका दूर केल्याची गोष्ट सर्वविश्रुत आहे.

॥ श्रीराम ॥

ब्रह्म नभाहून निर्मळ । पाहातां तैसें चि पोकळ ।
अरूप आणी विशाळ । मर्यादेवेगळें ॥ १ ॥
येकविस स्वर्गें सप्त पाताळ । मिळोन एक ब्रह्मगोळें ।
ऐसीं अनंत तें निर्मळ । व्यापून असे ॥ २ ॥
अनंत ब्रह्मांडांखालतें । अनंत ब्रह्मांडांवरुतें ।
तेणेंविण स्थळ रितें । अणुमात्र नाहीं ॥ ३ ॥
जळीं स्थळीं काष्ठीं पाषाणीं । ऐसी वदे लोकवाणी ।
तेणेंविण रिता प्राणी । येक हि नाहीं ॥ ४ ॥
जळचरांस जैसें जळ । बाह्याभ्यांतरीं निखळ ।
तैसें ब्रह्म हें केवळ । जीवमात्रासी ॥ ५ ॥
जळावेगळा ठाव आहे । ब्रह्माबाहेरी जाता नये ।
ह्मणौनि उपमा न साहे । जळाची तया ॥ ६ ॥
आकाशाबाहेरी पळों जातां । पुढें आकाश चि तत्वता ।
तैसा तया अनंता । अंत चि नाहीं ॥ ७ ॥
परी जें अखंड भेटलें । सर्वांगास लिगटलें ।
[1]अति निकट परी चोरलें । सकळांसि जें ॥ ८ ॥
तयामधें चि असिजे । परी तयास नेणिजे ।
[2]उमजे भास नुमजे । परब्रह्म तें ॥ ९ ॥
आकाशामधें आभाळ[3] । तेणें आकाश वाटे डहुळ ।
परी तें मिथ्या निवळ । आकाश चि असे ॥ १० ॥
नेहार[4] देतां आकाशीं । चक्रें दिसतीं डोळयासी ।
तैसें दृश्य ज्ञानियासी । मिथ्यारूप ॥ ११ ॥
मिथ्या चि परी आभासे । निद्रिस्तांस स्वप्न जैसें ।
जागा जालियां अपैसें[5] । बुझों[6] लागे ॥ १२ ॥

स्थळ प्रत

---

१ अगदीं जवळ असून हि सर्वांपासून चोरून राहिलें आहे २ उमजलें असें वाटतें तो भास, ब्रह्म उमजलेलें नसतें. ३ अभ्र. ४ न्याहार, दृष्टी. ५ आपोआप. ६ समजूं.

तैसें आपुलेन अनुभवें । ज्ञानें जागृतीसि यावें ।
मग माईक स्वभावें । कळों लागे ॥ १३ ॥

आतां असो हें कुवाडें । जें ब्रह्मांडापैलिकडे ।
तें चि आतां निवाडें । उमजोन दाऊं ॥ १४ ॥

ब्रह्म ब्रह्मांडीं कालवलें । पदार्थासी व्यापून ठेलें ।
सर्वांमधें विस्तारलें । अंशमात्रें ॥ १५ ॥

ब्रह्मामधें सृष्टी भासे । सृष्टीमधें ब्रह्म असे ।
अनुभव घेता आभासे । अंशमात्रें ॥ १६ ॥

अंशमात्रें सृष्टीभीतरीं । बाहेरी मर्यादा कोण करी ।
सगळें ब्रह्म ब्रह्मांडोदरीं । माईल कैसें ॥ १७ ॥

अमृतीमधें आकाश । सगळें साठवतां प्रयास ।
ह्मणोन तयाचा अंश । बोलिजेतो ॥ १८ ॥

ब्रह्म तैसें कालवलें । परी तें नाहीं हालवलें ।
सर्वांमधें परी सचलें । सचलेपणें ॥ १९ ॥

पंचभूतीं असे मिश्रित । परतु तें पंचभूतातीत ।
पंकीं आकाश अलिप्त । असोनि जैसें ॥ २० ॥

ब्रह्मास दृष्टांत न घडे । बुझावया देणें घडे ।
परी दृष्टांतीं साहित्य पडे । विचारितां आकाश ॥ २१ ॥

खंब्रह्म ऐसी श्रुती । गगनसदृश हे स्मृती ।
ह्मणौनि ब्रह्मास दृष्टांतीं । आकाश घडे ॥ २२ ॥

---

१ कोडें २ वैष्णव लोकाजवळ चरणामृत ठेवण्याची तीर्थगिंडी ( चंबू ) असते तिला अमृती ह्मणतात. ३ ब्रह्माच्या सारखें दुसरें काय आहे ? दृष्टांत देण्याला सामग्री मिळेल तर त्याला दृष्टांत द्यावा, तथापि कांहीं उमज पडण्यासाठीं दृष्टांत द्यावा लागतो, आणि अशा रीतीनें विचार केला तर आकाशाच्या ठिकाणीं ब्रह्माचें सामर्थ्य विशेष आहे आकाशाच्या ठिकाणीं शून्यत्व आहे, तें ब्रह्मीं नाहीं इतका च काय तो फरक दृष्टांतीं साहित्य पडे=दृष्टांत देण्याला सामग्री मिळते.

काळिमा नस्तां पितळ । मग तें सोनें चि केवळ ।
सुन्यत्व नस्तां निवळ । आकाश ब्रह्म ॥ २३ ॥
म्हणौनि ब्रह्म जैसें गगन । आणि माया जैसा पवन ।
आडळे परी दर्शन । नव्हे त्याचें ॥ २४ ॥
शब्दसृष्टीची रचना । होत जात क्षणक्षणा ।
परंतु ते स्थिरावेना । वायु च ऐसी ॥ २५ ॥
असो ऐसी माया माईक । शाश्वत तें ब्रह्म येक ।
पाहों जाता अनेक । व्यापून आहे ॥ २६ ॥
पृथ्वीसी भेदून आहे । परी तें ब्रह्म कठीण नव्हे ।
दुजी उपमा न साहे । तया मृदत्वासी ॥ २७ ॥
पृथ्वीहूनि मृद[1] जळ । जळाहूनि तो अनळ ।
अनळाहून कोमळ । वायो जाणावा ॥ २८ ॥
वायोहून तें गगन । अत्यंत चि मृद जाण ।
गगनाहून मृद पूर्ण । ब्रह्म जाणावें ॥ २९ ॥
वज्रास असे भेदिलें । परी मृदत्व नाहीं गेलें ।
उपमेरहित संचलें । कठिण ना मृद ॥ ३० ॥
पृथ्वीमधें व्यापून असे । पृथ्वी नासे तें न नासे ।
जळ शोषे तें न शोषे । जळीं असोनी ॥ ३१ ॥
तेजीं असे परी जळेना । पवनीं असे परी चळेना ।
गगनीं असे परी कळेना । परब्रह्म तें ॥ ३२ ॥
शेरीर अवघें व्यापलें । परी तें नाहीं आडळलें ।
जवळि च दुरावलें । नवल कैसें ॥ ३३ ॥
सन्मुख चि चहुंकडे । तयामधें पाहाणें घडे ।
बाह्याभ्यांतरीं रोकडें । सिद्ध चि आहे ॥ ३४ ॥
तयाभधें चि आपण । आपणा सबाह्य तें जाण ।
दृश्यावेगळी खूण । गगनासारिखी[2] ॥ ३५ ॥

---

१ मृदु, सूक्ष्म २ ब्रह्माला अदृश्य पदार्थाची उपमा द्यावयाची झणजे फक्त गगनाची उपमा देतां येते.

काहीं नाहींसें वाटलें । तेथें चि तें कोंदाटलें ।
जैसें न दिसे आपलें । आपणासि धनें ॥ ३६ ॥
जो जो पदार्थ दृष्टी पडे । तें त्या पदार्था ऐलिकडे ।
अनुभवें हें कुवाडें । उकलावें ॥ ३७ ॥
मागें पुढें आकाश । पदार्थेंविण जो पैस ।
पृथ्वीविण भकास[1] । येकरूप ॥ ३८ ॥
जें जें रूप आणी नाम । तो तो नाथिला च भ्रम ।
नामरूपातीत वर्म । अनुभवी जाणे ॥ ३९ ॥
नभीं धूम्राचे डोंगर । उचलती थोर थोर ।
तैसें दावी वोडंबर । माया देवी ॥ ४० ॥
ऐसी माया अशाश्वत । ब्रह्म जाणावें शाश्वत ।
सर्वां ठाईं सदोदित । भरलें असे ॥ ४१ ॥
पोथी वाचूं जातां पाहे । मातृकांमधें चि आहे ।
नेत्रीं निघोनि राहे । सूक्ष्मपणें ॥ ४२ ॥
श्रवणें शब्द ऐकतां । मनें विचार पाहाता ।
मना सबाह्य तत्वता । परब्रह्म तें ॥ ४३ ॥
चरणें चालतां मार्गीं । जें आडळे सर्वांगीं ।
करें घेतां वस्तुलागीं । आडवें ब्रह्म ॥ ४४ ॥
असो इंद्रियेंसमुदाव । तयांमधें वर्ते सर्व ।
जाणों जातां मोडे हांव । इंद्रियांची ॥ ४५ ॥
तें जवळि च असे । पाहों जातां न दिसे ।
न दिसोन वसे । कांहीं येक ॥ ४६ ॥
जें अनुभवें चि जाणावें । सृष्टीचेनि अभावें ।
आपुलेन स्वानुभवें । पाविजे ब्रह्म ॥ ४७ ॥

---

1 अवकाश.

ज्ञानदृष्टीचें देखणें । चर्मदृष्टी पाहों नेणे ।
अंतरवृत्तीचिये खुणे । अंतरवृत्ति साक्ष ॥ ४८ ॥
जाणे ब्रह्म जाणे माया । जाणे अनुभवाच्या ठाया ।
ते येक जाणावी तुर्या । सर्वसाक्षिणी ॥ ४९ ॥
साक्षत्व वृत्तीचें कारण । उन्मनी ते निवृत्ति जाण ।
जेथें विरे जाणपण । विज्ञान तें ॥ ५० ॥
जेथें अज्ञान सरे । ज्ञान तें हि नुरे ।
विज्ञानवृत्ति मुरे । परब्रह्मीं ॥ ५१ ॥
ऐसें ब्रह्म शाश्वत । जेथें कल्पनेसी अंत ।
योगी जना येकांत । अनुभवें जाणावा ॥ ५२ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे विमळब्रह्मनिरूपणनाम समास चौथा ॥४॥

---

॥ श्रीराम ॥

केवळ ब्रह्म जें बोलिलें । तें अनुभवास आलें ।
आणी मायेचें हि लागलें । अनुसंधान ॥ १ ॥
ब्रह्म अंतरीं प्रकाशे । आणी माया हि प्रत्यक्ष दिसे ।
आतां हें द्वैत निरसे । कवणेपरी हो ॥ २ ॥
तरी आतां सावधान । येकाग्र करूनियां मन ।
माया ब्रह्म हें कवण । जाणताहे ॥ ३ ॥
सत्य ब्रह्माचा संकल्प । मिथ्या मायेचा विकल्प ।
ऐसिया द्वैताचा जल्प । मन चि करी ॥ ४ ॥

---

१ माया ह्मणजे काय व ब्रह्म ह्मणजे काय हें समजलें, पण माया आणि ब्रह्म असें जें द्वैत भासतें त्याचा निरास कसा होईल हा शिष्याचा प्रश्न त्याचें उत्तरः—माया व ब्रह्म यांची कल्पना मनाला होते. ती कल्पना उडाली किंवा ती मनोवृत्ति मावळली, साराश मन उन्मन झालें ह्मणजे मग द्वैत कोठें उरणार? परंतु ही कल्पना कशी उडावी? कल्पनेन कल्पना उडते ब्रह्माची कल्पना ती शुद्ध कल्पना, तो संकल्प. मायेची कल्पना ती शबल, अशुद्ध कल्पना, तो विकल्प संकल्पानें विकल्पाचा नाश करावा, ह्मणजे मग अखेरीस संकल्प हि ब्रह्मांत लीन होऊन केवळ ब्रह्मप्राप्ति होते.

जाणे ब्रह्म जाणे माया । ते येक जाणावी तुर्या ।
सर्व जाणे म्हणोनिया । सर्वसाक्षिणी ॥ ५ ॥
ऐक तुर्येचें लक्षण । जेथें सर्व जाणपण ।
सर्व चि नाहीं कवण । जाणेल गा ॥ ६ ॥
सकल्पविकल्पाची सृष्टी । जाली मनाचिये पोटीं ।
तें मन चि मिथ्या सेवटीं । साक्षी कवणु ॥ ७ ॥
साक्षत्व चैतन्यत्व सत्ता । हे गुण ब्रह्माचिया माथा ।
आरोपले जाण वृथा । मायागुणें ॥ ८ ॥
घटमठाचेनि गुणें । त्रिविधा[1] आकाश बोलणें ।
मायेचेनि खरेंपणें । गुण ब्रह्मीं ॥ ९ ॥
जव खरेंपण मायेसी । तव चि साक्षत्व ब्रह्मासी ।
मायेअविद्येचे निरासीं । द्वैत कैचें ॥ १० ॥
म्हणोनि सर्वसाक्षी मन । तें चि जालिया उन्मन ।
मग तुर्यारूप ज्ञान । तें मावळोन गेलें ॥ ११ ॥
जयास द्वैत भासलें । तें मन उन्मन जालें ।
द्वैताअद्वैताचें तुटलें । अनुसंधान ॥ १२ ॥
येवं द्वैत आणी अद्वैत । होये वृत्तीचा संकेत ।
वृत्ति जालिया निवृत्त । द्वैत कैचें ॥ १३ ॥
वृत्तिरहित जें ज्ञान । तें चि पूर्ण समाधान ।
जेथें तुटे अनुसंधान । मायाब्रह्मीचें ॥ १४ ॥
मायाब्रह्म ऐसा हेत । मनें कल्पिला संकेत ।
ब्रह्म कल्पनेरहित । जाणती ज्ञानी ॥ १५ ॥
जें मनबुद्धिअगोचर । जें कल्पनेहून पर ।
तें अनुभवितां साचार । द्वैत कैचें ॥ १६ ॥

---

१ घटाकाश, मठाकाश व महदाकाश असे आकाशाचे तीन प्रकार होण्यास जसे घट व मठ हीं कारणें आहेत, तसें मायेच्या योगानें ब्रह्माच्या ठिकाणीं गुणांचा आरोप होत आहे, परंतु वस्तुत आकाश एक च आहे, व ब्रह्म हि निर्गुण आहे.

द्वैत पाहातां ब्रह्म नसे । ब्रह्म पाहातां द्वैत नासे ।
द्वैताद्वैत भासे । कल्पनेसी ॥ १७ ॥
कल्पना माया निवारी । कल्पना ब्रह्म थांवरी[1] ।
संशय धरी आणी वारी । ते हि कल्पना ॥ १८ ॥
कल्पना करी बंधन । कल्पना दे समाधान ।
ब्रह्मीं लावी अनुसंधान । ते हि कल्पना ॥ १९ ॥
कल्पना द्वैताची माता । कल्पना ज्ञेती[2] तत्वता ।
बद्धता आणी मुक्तता । कल्पनागुणें ॥ २० ॥
कल्पना अंतरीं सबळ । नस्ते दावी ब्रह्मगोळ ।
क्षणा येकातें निर्मळ । स्वरूप कल्पी ॥ २१ ॥
क्षणा येका धोका वाहे । क्षणा येका स्थिर राहे ।
क्षणा येका पाहे । विस्मित होउनी ॥ २२ ॥
क्षणा येकातें उमजे । क्षणा येकातें निर्बुजे[3] ।
नाना विकार करिजे । ते कल्पना जाणावी ॥ २३ ॥
कल्पना जन्माचें मूळ । कल्पना भक्तीचें फळ ।
कल्पना ते चि केवळ । मोक्षदाती ॥ २४ ॥
असो ऐसी हे कल्पना । साधनें दे समाधाना ।
येरवी हे पतना । मूळ च कीं ॥ २५ ॥
ह्मणौन सर्वांचें मूळ । ते हे कल्पना च केवळ ।
इचें केलिया निर्मूळ । ब्रह्मप्राप्ती ॥ २६ ॥
श्रवण आणी मनन । निजध्यासें समाधान ।
मिथ्या कल्पनेचें भान । उडोन जाये ॥ २७ ॥
शुद्ध ब्रह्माचा निश्चयो । करी कल्पनेचा जयो ।
निश्चितार्थें संशयो । तुटोन गेला[4] ॥ २८ ॥

---

१ स्थापित करिते २ ज्ञान ३ अडखळते, घाबरते, न उमजे. ४ शुद्ध ब्रह्माचा निश्चय झाला ह्मणजे कल्पना नाहींशी होते, निश्चयापुढें संशय कसा उरणार ?

मिथ्या कल्पनेचें कोडें । कैसें राहे साचापुढें ।
जैसें सूर्याचेनि उजेडें । नासे तम ॥ २९ ॥
तैसें ज्ञानाचेनि प्रकाशें । मिथ्या कल्पना हे नासे ।
मग हें तुटे अपैसें[1] । द्वैतानुसंधान ॥ ३० ॥
कल्पनेनें कल्पना उडे । जैसा मृगें मृग सांपडे[2] ।
कां शरें शर ओंतुडे । आकाशमार्गीं ॥ ३१ ॥
शुद्ध कल्पनेचें बळ । जालियां नासे सबळ[3] ।
हें चि वचन प्रांजळ । सावध ऐका ॥ ३२ ॥
शुद्ध कल्पनेची खूण । स्वयें कल्पिजे निर्गुण ।
सस्वरूपीं विस्मरण । पडों चि नेदी ॥ ३३ ॥
सदा स्वरूपानुसंधान । करी द्वैताचें निर्शन ।
अद्वयनिश्चयाचें ज्ञान । ते चि शुद्ध कल्पना ॥ ३४ ॥
अद्वैत कल्पी ते शुद्ध । द्वैत कल्पी ते अशुद्ध ।
अशुद्ध ते चि प्रसिद्ध । सबळ जाणावी ॥ ३५ ॥
शुद्ध कल्पनेचा अर्थ । अद्वैताचा निश्चितार्थ ।
आणी सबळ वेर्थ । द्वैत कल्पी ॥ ३६ ॥
अद्वैतकल्पना प्रकाशे । ते चि क्षणीं द्वैत नासे ।
द्वैतासरिसी निरसे । सबळ कल्पना ॥ ३७ ॥
कल्पनेनें[4] कल्पना सरे । ऐसी जाणावी चतुरें ।
सबळ गेलियां नंतरें । शुद्ध उरली ॥ ३८ ॥
शुद्ध कल्पनेचें रूप । तें चि जें कल्पी स्वरूप ।
स्वरूप कल्पितां तद्रूप । होये आपण ॥ ३९ ॥
कल्पनेसी मिथ्यत्व आलें । सहज चि तद्रूप जालें ।
आत्मनिश्चयें नासिलें । कल्पनेसी ॥ ४० ॥
जे चि क्षणीं निश्चये चळे । ते चि क्षणीं द्वैत उफाळे ।
जैसा अस्तमानीं प्रबळे । अंधकार ॥ ४१ ॥

---

१ आपोआप. २ सापडे. ३ शबल, अशुद्ध ( कल्पना ). ४ अद्वैतकल्पनेनें. ५ द्वैतकल्पना.

तैसें ज्ञान होतां मळिण । अज्ञान प्रबळे जाण ।
याकारणें श्रवण । अखंड असावें ॥ ४२ ॥
आतां असो हें बोलणें जालें । आशङ्का फेडूं येका बोलें ।
जयास द्वैत भासलें । तें तूं नव्हेसी सर्वथा ॥ ४३ ॥
मागील आशंका फिटली । इतुकेन हे कथा संपली ।
पुढें वृत्ति सावध केली । पाहिजे श्रोतीं ॥ ४४ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे द्वैतकल्पनानिरसननाम समास पंचम ॥ ५ ॥

---

॥ श्रीराम ॥

अद्वैत ब्रह्म निरोपिलें । जें कल्पनेरहित संचलें ।
क्षणयेक तदाकार केलें । मज या निरूपणें ॥ १ ॥
परी म्यां तदाकार व्हावें । ब्रह्म चि होऊन असावें ।
पुन्हा संसारास न यावें । चंचळपणें सर्वथा ॥ २ ॥
कल्पनारहित जें सुख । तेथें नाहीं संसारदुःख ।
ह्मणोनि तें चि येक । होऊन असावें ॥ ३ ॥
ब्रह्म चि होईजे श्रवणें । पुन्हा वृत्तीवरी लागे येणें ।
ऐसें सदा येणें जाणें । चुकेना कीं ॥ ४ ॥
मनें अंतरिक्षें[1] जावें । क्षणयेक ब्रह्म चि व्हावें ।
पुन्हा तेथून कोसळावें । वृत्तीवरी मागुतें ॥ ५ ॥
प्रत्यावृत्ती[2] सैरावैरा । किती करूं येरझारा ।
पाईं लाउनिया दोरा । कीटक जैसा ॥ ६ ॥
उपदेशकाळीं तदाकार । होतां पडे हें शरीर ।
अथवा नेणें आपपर । ऐसें जालें पाहिजे ॥ ७ ॥
ऐसें नसतां जें बोलणें । तें चि वाटे लाजिरवाणें ।
ब्रह्म होऊन संसार करणें । हें हि विपरीत दिसे ॥ ८ ॥

१ अंत: ह्मणजे आंत व ईक्ष् ह्मणजे पहाणें. मनानें अंतरीं पहावें, ह्मणजे मन अंतर्मुख करावें. २ जाणें येणें. ३ आपला उपदेश श्रवण करीत असतां माझी जी तदाकार स्थिति होते, त्या च स्थितींत माझें शरीर अखंड राहिलें पाहिजे, ह्मणजे मला आपपर ही कल्पना उरली न पाहिजे.

जो स्वयें ब्रह्म चि जाला । तो मागुता कैसा आला ।
ऐसें ज्ञान माझें भजला । प्रशस्त न वटे ॥ ९ ॥
ब्रह्म चि होऊन जावें । कां तें संसारीं च असावें ।
दोहींकडे भरंगळावें । किती ह्मणूनी ॥ १० ॥
निरूपणीं ज्ञान प्रबळे । उठोन जातां तें मावळे ।
मागुता कामक्रोध खवळे । ब्रह्मरूपासी ॥ ११ ॥
ऐसा कैसा ब्रह्म जाला । दोहींकडे अंतरला ।
वोडगस्तपणें चि गेला । संसार त्याचा ॥ १२ ॥
घेतां ब्रह्मसुखाची गोडी । संसारिकें मागें वोडी ।
संसार करितां आवडी । ब्रह्मीं उपजे मागुती ॥ १३ ॥
ब्रह्मसुख नेलें संसारें । संसार गेला ज्ञानद्वारें ।
दोनी अपुरीं पुरें । येक हि नाहीं ॥ १४ ॥
याकारणें माझें चित्त । चंचळ जालें दुश्चीत ।
काये करणें निश्चीत । येक हि नाहीं ॥ १५ ॥
ऐसा श्रोता करी विनती । आतां राहावें कोणे रीतीं ।
ह्मणे अखंड माझी मती । ब्रह्माकार नाहीं ॥ १६ ॥
आतां याचें प्रत्योत्तर । वक्ता देईल सुंदर ।
श्रोतीं व्हावें निरोत्तर । क्षण येक आतां ॥ १७ ॥
ब्रह्म चि होऊन् जे पडिले । ते चि मुक्तपदास गेले ।
येर ते काये बुडाले । व्यासादिक ॥ १८ ॥
श्रोता विनती करी पुढती । शुको मुक्तो वामदेवो वा हे श्रुती ।
दोघे चि मुक्त आदिअंतीं । बोलतसे ॥ १९ ॥
वेदें बद्ध केले सर्व । मुक्त शुक वामदेव ।
वेदवचनीं अभाव । कैसा धरावा ॥ २० ॥

---

१ घोटाळवें, गोंधळावें. २ ब्रह्मरूप झालेला जो मी त्या माझ्या ठिकाणीं ३ ओढाताणीनें ४ संसारिक सुख

ऐसा श्रोता वेदाधारें । देता जाला प्रश्नोत्तरें ।
दोघे चि मुक्त अस्यादरें । प्रतिपाद्य केले ॥ २१ ॥
वक्ता बोले याउपरी । दोघे चि मुक्त सृष्टीवरी ।
ऐसें बोलतां उरी[1] । कोणास आहे ॥ २२ ॥
बहु ऋषि बहु मुनी । सिद्ध योगी आत्मज्ञानी ।
जाले पुरुष समाधानी । असंख्यात ॥ २३॥

॥ श्लोक ॥ प्रल्हादनारदपराशरपुंडरीक
व्यासांबरीषशुकशौनकभीष्मदाल्भ्यान् ।
रुक्मांगदार्जुनवसिष्ठबिभीषणादीन्
पुण्यानिमान्परमभागवतान्स्मरामि ॥ १ ॥
कविर्हरिरंतरिक्षः प्रबुद्धः पिप्पलायन. ।
आविर्होत्रोऽथद्रुमिलश्चमसः करभाजनः ॥ २ ॥

या हि वेगळे थोर थोर । ब्रह्माविष्णुमहेश्वर ।
आदिकरून दिगंबर । विदेहादिक ॥ २४ ॥
शुक वामदेव मुक्त जाले । येर हे अवघे चि बुडाले ।
या वचना विश्वासले । ते पढतमूर्ख ॥ २५ ॥
तरी वेद कैसें बोलिला । तो काये तुह्मीं मिथ्या केला ।
ऐकोन वक्ता देता जाला । प्रश्नोत्तर ॥ २६ ॥
वेद बोलिला पूर्वपक्ष । मूर्ख तेथें चि लावी लक्ष ।
साधु आणी वित्पन्न दक्ष । त्यांस हें न मने ॥ २७ ॥
तथापी हें जरी मानलें । तरी वेदसामर्थ्य बुडालें ।
वेदाचेनि उद्धरिलें । न वचे कोणा ॥ २८ ॥
वेदा आंगी सामर्थ्य नसे । तरी या वेदास कोण पुसे ।
ह्मणौनि वेदीं सामर्थ्य असे । जन उधरावया ॥ २९ ॥
वेदाक्षर घडे ज्यासी । तो बोलिजे पुण्यरासी ।
ह्मणौन वेदीं सामर्थ्यासी । काये उणें ॥ ३० ॥

---

1 ठाव, ठिकाण, जागा

वेदशास्त्रपुराण । भाग्य जालियां श्रवण ।
तेणें होईजे पावन । हें बोलती साधु ॥ ३१ ॥
श्लोक अथवा श्लोकार्ध । नाहीं तरी श्लोकपाद ।
श्रवण होता येक शब्द । नाना दोष जाती ॥ ३२ ॥
वेदशास्त्रीं पुराणीं । ऐशा वाक्याच्या आईणी ।
अगाध महिमा व्यासवाणी । वदोन गेली ॥ ३३ ॥
येकाक्षर होतां श्रवण । तत्काळ चि होईजे पावन ।
ऐसें ग्रंथाचें महिमान । ठाईं ठाईं बोलिलें ॥ ३४ ॥
दोहींवेगळा तिजा नुधरे । तरी महिमा कैचा उरे ।
असो हें जाणिजे चतुरें । येरां गथागोवी ॥ ३५ ॥
वेदशास्त्रें पुराणें । कैसीं होतीं अप्रमाणें ।
दोघांवांचून तिसरा कोणें । उद्धरावा ॥ ३६ ॥
ह्मणसी काष्टीं लागोन पडिला । तो चि येक मुक्त जाला ।
शुक तो हि अनुवादला । नाना निरूपणें ॥ ३७ ॥
शुक मुक्त ऐसें वचन । वेद बोलिला हें प्रमाण ।
परी तो नव्हता अचेतन । ब्रह्माकार ॥ ३८ ॥
अचेतन ब्रह्माकार । असता शुक योगेश्वर ।
तरी सारासारविचार । बोलणें न घडे ॥ ३९ ॥
जो ब्रह्माकार जाला । तो काष्ठ होऊन पडिला ।
शुक भागवत बोलिला । परीक्षितीपुढें ॥ ४० ॥
निरूपण हें सारासार । बोलिला पाहिजे विचार ।
धांडोळावें सचराचर । दृष्टांताकारणें ॥ ४१ ॥
क्षण येक ब्रह्म चि व्हावें । क्षण येक दृश्य धांडोळावें ।
नाना दृष्टांतीं सपादावें । वगतृत्वासी ॥ ४२ ॥

---

१ इच्छा किंवा सामर्थ्य किंवा मालिका, असे तीन अर्थ तीन ठिकाणीं दिलेले आहेत, पैकीं शेवटला अर्थ येथें बरा लागतो.

असो भागवतनिरूपण । शुक बोलिला आपण ।
तथा आगी बद्धपण । लाऊ नये कीं ॥ ४३ ॥
ह्मणोनी बोलता चालता । निचेष्टित पडिलें नस्ता ।
मुक्ति लाभे सायोज्यता । सद्गुरुबोधें ॥ ४४ ॥
येक मुक्त येक नित्यमुक्त । येक जाणावे जीवन्मुक्त ।
येक योगी विदेहमुक्त । समाधानी ॥ ४५ ॥
सचेतन ते जीवन्मुक्त । अचेतन ते विदेहमुक्त ।
दोहिवेगळे नित्यमुक्त । योगेश्वर जाणावे ॥ ४६ ॥
स्वरूपबोधें स्तब्धता । ते जाणावी ताटस्तता ।
ताटस्तता आणी स्तब्धता । हा देहसमधु ॥ ४७ ॥
येथें अनुभवासी कारण । येर सर्व नि:कारण ।
तृप्ती पावावी आपण । आपुल्या स्वानुभवें ॥ ४८ ॥
कंठमर्याद जेविला । त्यास ह्मणती भुकेला ।
तेणें शब्दें जाजावला । हें तों घडेना ॥ ४९ ॥
स्वरूपीं नाहीं देहो । तेथें काइसा संदेहो ।
बद्ध मुक्त ऐसा भावो । देहाचकडे ॥ ५० ॥
देहबुद्धि धरून चिंती । मुक्त ब्रह्मादिक नव्हेती ।
तेथें शुकाची कोण गती । मुक्तपणाची ॥ ५१ ॥

---

१ जिवंतपणीं च ज्ञान होऊन मुक्त झालेले परंतु व्यवहार करित असलेले २ जिवंतपणीं च मुक्त झालेले, परंतु देहभान विसरून गेलेले ३ मरणोत्तर अक्षय मुक्त झालेले ४ स्वरूपबोध होऊन निचेष्टित पडून राहणें, हें, शिष्याच्या मतानें, मुक्तपणाचें व हालचाल करणे हें बद्धपणाचें लक्षण होय सद्गुरु ह्मणतात, हालचाल करणें किंवा स्तब्ध, तटस्थ राहणें हा देहाचा संबंध आहे ही देहबुद्धि बाळगली तर कोणी च मुक्त होऊं शकत नाहीं. "मी मुक्त" असें कोणी ह्मणेल तर तो च बद्ध आपल्या स्वानुभवानें जो तृप्त झाला तो च मुक्त, मग तुह्मी त्याला त्याची हालचाल पाहून बद्ध ह्मटलें तरी तो थोडा च बद्ध होणार आहे ? आकंठ जेवलेल्याला भुकेला म्हटल्यानें तो थोडा च भुकेला होतो ? ५ चिर्ता (?).

मुक्तपण हें चि बद्ध । मुक्त बद्ध हें अबद्ध ।
सस्वरूप स्वतसिद्ध । बद्ध ना मुक्त ॥ ५२ ॥
मुक्तपणाची पोटीं शिळा । बांधता जाईजे पाताळा
देहबुद्धीचा आंगळा[1] । स्वरूपीं न [2]संटे ॥ ५३ ॥
मीपणापासून सुटला । तो चि येक मुक्त जाला ।
मुका अथवा बोलिला । तरी तो मुक्त ॥ ५४ ॥
जयास बांधावें तें वाव । तेथें कैंचा मुक्तभाव ।
पाहों जाता सकळ वाव । गुणवार्ता ॥ ५५ ॥

बद्धो मुक्त इति व्याख्या गुणतो मे न वस्तुतः ।
गुणस्य मायामूलत्वान्न मे मोक्षो न बंधनम् ॥ [3] ।

तत्वज्ञाता परमशुद्ध । तयासी नाहीं मुक्त बद्ध ।
मुक्त बद्ध हा विनोद । मायागुणें ॥ ५६ ॥
जेथें नामरूप हें सरे । तेथें मुक्तपण कैंचें उरे ।
मुक्त बद्ध हें विसरे । विसरलेपणेंसीं [4] ॥ ५७ ॥
बद्ध मुक्त जाला कोण । तो तरी नव्हे कीं आपण ।
बधंक[6] जाणावें मीपण । धर्यास बाधी ॥ ५८ ॥
एवं हा अवघा भ्रम । अहतेचा जाला श्रम ।
मायातीत जो विश्राम । सेविला नाहीं ॥ ५९ ॥
असो बद्धता आणी मुक्तता । आली कल्पनेच्या माथा[5]
ते कल्पना तरी तत्वता । साच आहे [7] ॥ ६० ॥
ह्मणोनि हें मृगजळ । माया नाथिलें आभाळ ।
स्वप्न मिथ्या तत्काळ । जागृतीसी होये ॥ ६१ ॥

---

१ विशेष देहबुद्धि बाळगणारा. २ संभवत नाहीं ३ वस्तूला मु... बंधन च
...ीं, तेव्हां मुक्तपण तरी कोठलें ? हें सर्व मिथ्या असून हा सारा गुण...च्या खेळ
...े ४ मुक्त आणि बद्ध त्यांचा पूर्ण विसर पडून त्या विसरलेपणाची ...णीव हि
... नाहींशी होते ५ बद्धता व मुक्तता हीं देहाकडे आली, आणि तो ...ई ह्मणजे
...ण नव्हे. ६ बद्धक. ७ हा प्रश्न आहे. आणि ती ... आहे ?

स्वप्नीं बद्ध मुक्त जाला । तो जागृतीस नाहीं आला ।
कैंचा कोण काये जाला । कांहीं कळेना ॥ ६२ ॥
ह्मणोनि मुक्त विश्वजन । जयास जालें आत्मज्ञान ।
शुद्धज्ञानें मुक्तपण । समूळ वाव ॥ ६३ ॥
बद्ध मुक्त हा संदेहो । धरी कल्पनेचा देहो ।
साधु सदा निःसदेहो । देहातीत वस्तु ॥ ६४ ॥
आतां असो हें पुढती । पुढें राहावें कोणे रितीं ।
तें चि निरूपण श्रोतीं । सावध परिसावें ॥ ६५ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे बद्धमुक्तनिरूपणनाम समास साहवा ॥ ६ ॥

---

॥ श्रीराम ॥

वस्तूसि जरी कल्पावें । तरी ते निर्विकल्प स्वभावें ।
तेथें कल्पनेच्या नावें । सुन्याकार ॥ १ ॥
तथापि कल्पूं जातां । न ये कल्पनेच्या हातां ।
वोळखी ठाईं न पडे चित्ता । भ्रंश पडे ॥ २ ॥
कांहीं दृष्टीस चि न दिसे । मनास तें हि न भासे ।
न भासे न दिसे कैसें । वोळखावें ॥ ३ ॥
पाहों जाता निराकार । मनासि पडे सुन्याकार ।
कल्पूं जातां अधकार । भरला वाटे ॥ ४ ॥
कल्पूं जातां वाटे काळें । ब्रह्म काळें ना पिवळें ।
आरक्त निळें ना धवळें । वर्णरहित ॥ ५ ॥
जया वर्णवेक्ती नसे । भासाहून अनारिसें ।
रूप चि नाहीं कैसें । वोळखावें ॥ ६ ॥

---

१ या संसाररूप स्वप्नामध्यें, जो कोणी, आपण बद्ध आहोंत किंवा मुक्त आहोंत असें ह्मणेल, तो अजून जागा झाला नाहीं असें समजावें; आणि ह्मणून बद्ध कोण व मुक्त कोण याचा त्याला काहीं च उलगडा होत नाहीं. २ "माथां"-चें "हाता" केलें आहे.

न दिसतां वोळखण । किती धरावी आपण ।
हें तों श्रमासी च कारण । होतसे ॥ ७ ॥
जो निर्गुण गुणातीत । जो अदृश्य अवेक्त ।
जो अचिंत्य चिंतनातीत । परम पुरुष ॥ ८ ॥

॥ श्लोक ॥ अचिंत्याव्यक्तरूपाय निर्गुणाय गुणात्मने ।
समस्तजगदाधारमूर्तये ब्रह्मणे नमः ॥

अचिंत्य तें चि चिंतावें । अव्यक्तास आठवावें ।
निर्गुणास वोळखावें । कोणेपरी ॥ ९ ॥
जें दृष्टीस चि न पडे । जें मनास हि नातुडे[1] ।
तया कैसें पाहाणें घडे । निर्गुणासी ॥ १० ॥
असंगाचा संग धरणें । निरावलंबीं[2] वास करणें ।
निशब्दासी अनुवादणें । कोणेपरीं ॥ ११ ॥
अचिंत्यासी चिंतूं जाता । निर्विकल्पासी कल्पिता ।
अद्वैताचें ध्यान करितां । द्वैत चि उठे ॥ १२ ॥
आतां ध्यान चि सोडावें । अनुसंधान तें मोडावें[3] ।
तरी मागुतें पडावें । माहा संशईं ॥ १३ ॥
द्वैताच्या[4] भेणें अंतरीं । वस्तु न पाहिजे तरी ।
तेणें समाधाना उरी । कदा असेचिना ॥ १४ ॥
सवें लाविता सवे पडे । सवे पडतां वस्तु आतुडे ।
नित्यानित्यविचारें घडे । समाधान ॥ १५ ॥
वस्तु चिंतिता द्वैत उपजे । सोडी करिता कांहीं च नुमजे ।
सुन्यत्वसदेहीं[5] पडिजे । विवेकेंविण ॥ १६ ॥
ह्मणोनि विवेक धरावा । ज्ञानें प्रपंच सारावा ।
अहंभाव वोसरावा । परी तो वोसरेना ॥ १७ ॥

१ सांपडत नाहीं. २ आधाररहित ठिकाणीं, आकाशात ३ बरें, ध्यान करूं नये, अनुसंधान लावूं नये असें ह्मणावें तर. ४ अद्वैताचें ध्यान करूं आतां द्वैत उत्पन्न होतें या भीतीनें ५ संशय.

परब्रह्म तें अद्वैत । कल्पितां च उठे द्वैत ।
तेथें हेत आणी दृष्टांत । कांहीं च न चले ॥ १८ ॥
तें आठवितां विसरिजे । कां तें विसरोनि आठविजे ।
जाणोनियां नेणिजे । परंब्रह्म तें ॥ १९ ॥
त्यास न भेटतां होये भेटी । भेटों जातां पडे तुटी ।
ऐसी हे नवल गोष्टी । मुकेपणाची ॥ २० ॥
तें साधूं जातां साधवेना । नातरी सोडितां सुटेना ।
लागला संमध तुटेना । निरंतर ॥ २१ ॥
तें असत चि सदां असे । नातरी पाहातां दुरासे ।
न पाहातां प्रकाशे । जेथें तेथें ॥ २२ ॥
जेथें उपाये तो चि अपाये । आणी अपाये तो चि उपाये ।
हें अनुभवेंविण काये । उमजों जाणे ॥ २३ ॥
तें नुमजतां च उमजे । उमजोन कांहीं च नुमजे ।
तें वृत्तीविण पाविजे । निवृत्तिपद ॥ २४ ॥
तें ध्यानीं धरितां नये । चिंतनीं चिंतावें तें काये ।
मनामधें न समाये । परब्रह्म तें ॥ २५ ॥
त्यास उपमे द्यावें जळ । तरी तें निर्मळ निश्चळ ।
विश्व बुडालें सकळ । तरी तें कोरडें चि असे ॥ २६ ॥
नव्हे प्रकाशासारिखें । अथवा नव्हे काळोखें ।
आतां तें कासयासारिखें । सांगावें हो ॥ २७ ॥
ऐसें ब्रह्म निरंजन । कदा नव्हे दृश्यमान ।
लावावें तें अनुसंधान । कोणेपरी ॥ २८ ॥

---

१ स्मरणाचा विसर पडला पाहिजे, परंतु विसर पडून तें आठवलें पाहिजे. तें जाणून जाणीव उरली न पाहिजे २ तें आहे तसें च सर्वदा आहे, परंतु पाहावयास गेलें तर दूर होतें, न पाहतां मात्र तें सर्वत्र प्रकाशतें. जेथें उपाय करावयास ( पाहण्यास ) जावें तेथें अपाय होतो ( तें दूर होतें ) आणि अपाय ( न पाहणें ) करावा तर उपाय होतो ( तें सर्वत्र प्रकाशतें ). ३ मावत नाहीं.

अनुसंधान लाऊं जातां । कांहीं नाहीं वाटे आतां ।
तेणें मनाचिया माथां । संदेह वाजे ॥ २९ ॥
लटिकें चि काये पाहावें । कोठें जाऊन राहावें ।
अभाव घेतला जीवें । सत्य स्वरूपाचा ॥ ३० ॥
अभाव चि ह्मणों सत्य । तरी वेदशास्त्र कैसें मिथ्य
आणी व्यासादिकांचें कृत्य । वाउगें नव्हे ॥ ३१ ॥
ह्मणोनि मिथ्या ह्मणतां नये । बहुत ज्ञानाचे उपाये
बहुतीं निर्मिले तें काये । मिथ्या ह्मणावें ॥ ३२ ॥
अद्वैतज्ञानाचा उपदेश । गुरुगीता तो महेश ।
सांगता होये पार्वतीश । पार्वतीप्रती ॥ ३३ ॥
अवधूतगीता केली । गोरक्षीस निरोपिली ।
ते अवधूतगीता बोलिली । ज्ञानमार्ग ॥ ३४ ॥
विष्णु होऊन राजहंस । विधीस केला उपदेश ।
ते हंसगीता जगदीश । बोलिला स्वमुखें ॥ ३५ ॥
ब्रह्मा नारदा उपदेशित । चतुश्लोकी भागवत ।
पुढें व्यासमुखें बहुत । विस्तारलें ॥ ३६ ॥
वसिष्ठसार वसिष्ठऋषी । सांगता जाला रघुनाथासी ।
कृष्ण सांगे अर्जुनासी । सप्तश्लोकी गीता ॥ ३७ ॥
ऐसें सांगावें तें किती । बहुत ऋषी बोलिले बहुतीं ।
अद्वैत ज्ञान आदिअंतीं । सत्य चि असे ॥ ३८ ॥
ह्मणोनि मिथ्या आत्मज्ञान । ह्मणतां पाविजे पतन ।
प्रज्ञेरहित जे जन । तयासी हें कळेना ॥ ३९ ॥
जेथें शेषाची प्रज्ञा मंदली । श्रुतीस मौन्यमुद्रा पडिली ।
जाणपणें न वचे वदली । स्वरूपास्थिती[1] ॥ ४० ॥
आपणास नुमजे बरवें । ह्मणोनि मिथ्या कैसें करावें ।
नातरी सदृढ धरावें । सद्गुरुमुखें ॥ ४१ ॥

---

१ " मी जाणतों " असा ज्ञातृत्वाचा अभिमान धरून स्वरूपस्थिति सांगितली जाणार नाहीं.

मिथ्य तें चि सत्य जालें । सत्य असोन मिथ्य केलें ।
संदेहसागरीं बुडालें । अकस्मात मन ॥ ४२ ॥
मनास कल्पायाची सवे । मनें कल्पिलें तें नव्हे ।
तेणें गुणें संदेह धावे । मीपणाचेनि पंथें ॥ ४३ ॥
तरी तो पथ चि मोडावा । मग परमात्मा जोडावा ।
समूळ संदेह तोडावा । साधुचेनि सगतीं ॥ ४४ ॥
मीपण शस्त्रें तुटेना । मीपण फोडितां फुटेना ।
मीपण सोडितां सुटेना । काहीं केल्यां ॥ ४५ ॥
मीपणें वस्तु नाकळे । मीपणें भक्ति मावळे ।
मीपणें शक्ति गळे । वैराग्याची ॥ ४६ ॥
मीपणें प्रपंच न घडे । मीपणें परमार्थ बुडे ।
मीपणें सकळ हि उडे । येशकीर्तिप्रताप ॥ ४७ ॥
मीपणें मीत्री तुटे । मीपणें प्रीति आटे ।
मीपणें लिगटे । अभिमान आंगीं ॥ ४८ ॥
मीपणें विकल्प उठे । मीपणें कळह सुटे ।
मीपणें समोह फुटे । ऐक्यतेचा ॥ ४९ ॥
मीपण कोणासि च न साहे । तें भगवतीं कैसेनि माहे ।
ह्मणौनि मीपण सांडून राहे । तो चि समाधानी ॥ ५० ॥
मीपण कैसें त्यागावें । ब्रह्म कैसें अनुभवावें ।
समाधान कैसें पावावें । कोणा प्रकारें ॥ ५१ ॥
मीपण जाणोनि त्यागावें । ब्रह्म होऊन अनुभवावें ।
समाधान तें पावावें । निःसंगपणें ॥ ५२ ॥
आणीक येक समाधान । मीपणेंविण साधन ।
करूं जाणे तो चि धन्य । समाधानी ॥ ५३ ॥
मी तों ब्रह्म चि जालों स्वता । साधन कोण करील आता ।
ऐसें मनीं कल्पूं जातां । कल्पना चि उठे ॥ ५४ ॥

अशीं कल्पना न साहे । ते चि तेथें उभी राहे ।  
तयेसि शोधून पाहे । तो चि साधु ॥ ५५ ॥  
निर्विकल्पासी कल्पावें । परी कल्पितें आपण न व्हावें[1] ।  
मीपणासि त्यागावें । येणे रितीं ॥ ५६ ॥  
या ब्रह्मविद्येच्या[2] लेपणीं[3] । काहीं च नसावें असोनी ।  
दक्ष आणी समाधानी । तो चि हें जाणे ॥ ५७ ॥  
जयासी आपण कल्पावें । तें[4] चि आपण स्वभावें ।  
येथें कल्पनेच्या नांवें । सुन्य आलें ॥ ५८ ॥  
पदीहून चळों नये । करावें साधन उपाये ।  
तरी च सापडे सोये । अलिप्तपणाची ॥ ५९ ॥  
राजा राजपदीं असतां । उगी च चाले सर्व सत्ता ।  
साध्य चि होऊन तत्वता । साधन करावें ॥ ६० ॥  
साधन आलें देहाच्या माथा । आपण देह नव्हे सर्वथा ।  
ऐसा करूनि अकर्ता । सहज चि जाला ॥ ६१ ॥  
देह आपण ऐसें कल्पावें । तरी च साधन त्यागावें ।  
देहातीत अस्ता स्वभावें । देह कैंचा ॥ ६२ ॥  
ना तें साधन ना तें देह । आपला आपण निःसदेह ।  
देही च असोन विदेह । स्थिति ऐसी ॥ ६३ ॥  
साधनेविण ब्रह्म होता । लागों पाहे देहममता ।  
आळस प्रबळे तत्वता । ब्रह्मज्ञानमिसें ॥ ६४ ॥  
परमार्थमिसें अर्थ[5] जागे । ध्यानमिसें निद्रा लागे ।  
मुक्तिमिसें दोष भोगे । अनर्गळता[6] ॥ ६५ ॥  
निरूपणमिसें निंदा घडे । संवादमिसें वेवाँद[7] पडे ।  
उपाधीमिसें येऊन जडे । अभिमान आंगीं ॥ ६६ ॥

---

१ निर्विकल्पाची कल्पना करावी, परंतु कल्पना करणारे आपण कोणी वेगळे आहोंत, अशी आपणांस कल्पना उरली न पाहिजे. २ मुळात " ०चच्या .३ लपंडाव. ४ ज्याची कल्पना करावयाची तें च आपण मूळचें आहोंत हें समजल्यावर कल्पना नाहींशी होते. ५ स्वार्थ ६ स्वच्छंदपणा. ७ वितंडवाद.

तैसा ब्रह्मज्ञानमिसें । आळस अंतरीं प्रवेशे ।
ह्मणे साधनाचें पिसें । काये करावें ॥ ६७ ॥

किं करोमि क्व गच्छामि किं गृण्हामि त्यजामि किम् ।
आत्मना पूरितं सर्वं महाकल्पाम्बुना यथा ॥

वचन आधारीं लाविलें । जैसें शस्त्र फिराविलें ।
स्वता ह्मणोन घेतलें । जयापरी ॥ ६८ ॥
तैसा उपायाचा अपाये । विपरीतपणें स्वहित जाये ।
साधन सोडितां होये । मुक्तपणें बद्ध ॥ ६९ ॥
साधन करितां च सिद्धपण । हातींचें जाईल निघोन ।
तेणें गुणें साधन । करूं च नावडे ॥ ७० ॥
लोक ह्मणती हा साधक । हे चि लज्या वाटे येक ।
साधन करिती ब्रह्मादिक । हें ठाउकें नाहीं ॥ ७१ ॥
आतां असो हे अविद्या । अभ्याससारणी[1] विद्या ।
अभ्यासें पाविजे आद्या । पूर्ण ब्रह्म ॥ ७२ ॥
अभ्यास करावा कवण । ऐसा श्रोता करी प्रश्न ।
परमार्थाचें साधन । बोलिलें पाहिजे ॥ ७३ ॥
याचें उत्तर श्रोतयांसी । दिधलें पुढिले समासीं ।
निरोपिलें साधनासी । परमार्थाच्या ॥ ७४ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे साधनप्रतिष्ठानिरूपणनाम समास ॥७॥

---

॥ श्रीराम ॥

ऐका परमार्थाचें साधन । जेणें होये समाधान ।
तें तूं जाण गा श्रवण । निश्चयेंसीं ॥ १ ॥
श्रवणें आतुडे भक्ती । श्रवणें उद्भवे विरक्ती ।
श्रवणें तुटे आसक्ती । विषयाची ॥ २ ॥

---

१ अभ्यासाचें अनुसरण करणारी, जसा अभ्यास करावा तशी प्राप्त होणारी.

श्रवणें घडे चित्तशुद्धी । श्रवणें होये दृढबुद्धी ।
श्रवणें तुटे उपाधी । अभिमानाची ॥ ३ ॥
श्रवणें निश्चयो घडे । श्रवणें ममता मोडे ।
श्रवणें अंतरीं जडे । समाधान ॥ ४ ॥
श्रवणें आशंका फिटे । श्रवणें संशय तुटे ।
श्रवणें होता पालटे । पूर्वगुण आपुला ॥ ५ ॥
श्रवणें आवरे मन । श्रवणें घडे समाधान ।
श्रवणें तुटे बंधन । देहबुद्धीचें ॥ ६ ॥
श्रवणें मीपण जाये । श्रवणें धोका न ये ।
श्रवणें नाना अपाये । भस्म होती ॥ ७ ॥
श्रवणें होये कार्यसिद्धी । श्रवणें लागे समाधी ।
श्रवणें घडे सर्व सिद्धी । समाधानासी ॥ ८ ॥
सत्संगाचरी श्रवण । तेणें कळे निरूपण ।
श्रवणें होईजे आपण । तदाकार ॥ ९ ॥
श्रवणें प्रबोध वाढे । श्रवणें प्रज्ञा चढे ।
श्रवणें विषयांचे [1]वोढे । तुटोन जाती ॥ १० ॥
श्रवणें विचार कळे । श्रवणें ज्ञान हें प्रबळे ।
श्रवणें वस्तु निवळे । साधकासी ॥ ११ ॥
श्रवणें सद्बुद्धि लागे । श्रवणें विवेक जागे ।
श्रवणें मन हें मागे । भगवंतासी ॥ १२ ॥
श्रवणें कुसंग तुटे । श्रवणें काम [2]वोहटे ।
श्रवणें धोका आटे । येकसरा ॥ १३ ॥
श्रवणें मोह नासे । श्रवणें स्फूर्ति प्रकाशे ।
श्रवणें सद्वस्तु भासे । निश्चयात्मक ॥ १४ ॥
श्रवणें होये उत्तम गती । श्रवणें आतुडे शांती ।
श्रवणें पाविजे निवृत्ती । अचळ पद ॥ १५ ॥

---

१ ओढे, प्र.श. २ ओहटे, मागें हटतो

श्रवणा ऐसें सार नाहीं । श्रवणें घडे सर्व कांहीं ।
भवनदीचा प्रवाहीं । तरणोपाव श्रवणें ॥ १६ ॥
श्रवण भजनाचा आरंभ । श्रवण सर्वी सर्वारंभ ।
श्रवणें होये स्वयंभ । सर्व कांहीं ॥ १७ ॥
प्रवृत्ती अथवा निवृत्ती । श्रवणेंविण न घडे प्राप्ती ।
हे तों सकळांस प्रचिती । प्रत्यक्ष आहे ॥ १८ ॥
ऐकिल्याविण कळेना । हें ठाउकें आहे जना ।
याकारणें मूळ प्रेत्ना । श्रवण आधीं ॥ १९ ॥
जें जन्मीं ऐकिलें चि नाहीं । तेथें पडिजे संदेहीं ।
ह्मणोनियां दुजें कांहीं । साम्यता न घडे ॥ २० ॥
बहुत साधनें पाहातां । श्रवणासे न घडे साम्यता ।
श्रवणेंविण तत्वता । कार्य न चले ॥ २१ ॥
न देखतां दिनकर । पडे अवघा अंधकार ।
श्रवणेंविण प्रकार । तैसा होये ॥ २२ ॥
कैसी नवविधा भक्ती । कैसी चतुर्विधा मुक्ती ।
कैसी आहे सहजस्थिती । हें श्रवणेंविण न कळे ॥ २३ ॥
न कळे शडकर्माचरण । न कळे कैसें पुरश्चरण ।
न कळे कैसें उपासन । विधियुक्त ॥ २४ ॥
नाना व्रतें नाना दानें । नाना तपें नाना साधनें ।
नाना योग तीर्थाटणें । श्रवणेंविण न कळती ॥ २५ ॥
नाना विद्या पिंडज्ञान । नाना तत्वांचें शोधन ।
नाना कळा ब्रह्मज्ञान । श्रवणेंविण न कळे ॥ २६ ॥
आठराभार वनस्पती । येका जळें प्रबळती ।
येका रसें उत्पती । सकळ जीवांची ॥ २७ ॥
सकळ जीवां येक पृथ्वी । सकळ जीवां येक रवी ।
सकळ जीवां वर्तवी । येक वायो ॥ २८ ॥

सकळ जीवां येक पैस । जयास बोलिजे आकाश ।
सकळ जीवाचा वास । येका परब्रह्मीं ॥ २९ ॥
तैसें सकळ जीवांस मिळोन । सार येक चि साधन ।
तें हें जाग श्रवण । प्राणीमात्रांसी ॥ ३० ॥
नाना देश भाषा मतें । भूमंडळीं असंख्यातें ।
सर्वांस श्रवणापरतें । साधन चि नाहीं ॥ ३१ ॥
श्रवणें घडे उपरती । बद्धाचे मुमुक्ष होती ।
मुमुक्षाचे साधक अर्ती । नेमेंसिं चालती ॥ ३१ ॥
साधकाचे होती सिद्ध । आंगीं बाणता प्रबोध ।
हें तों आहे प्रसिद्ध । सकळास ठाउकें ॥ ३३ ॥
ठाईंचे खळ चांडाळ । ते चि होती पुण्यसिळ ।
ऐसा गुण तत्काळ । श्रवणाचा ॥ ३४ ॥
जो दुर्बुद्धि दुरात्मा । तो चि होये पुण्यात्मा ।
अगाध श्रवणाचा महिमा । बोलिला न वचे ॥ ३५ ॥
तीर्थीं व्रतांची फळश्रुती । पुढें होणार सांगती ।
तैसें नव्हे हातीचा हातीं । सप्रचित श्रवण ॥ ३६ ॥
नाना रोग नाना व्याधी । तत्काळ तोडिजे औषधी ।
तैसी आहे श्रवणसिद्धी । अनुभवी जाणती ॥ ३७ ॥
श्रवणाचा विचार कळे । तरी च भाग्यश्री प्रगटे बळें ।
मुख्य परमात्मा च आकळे । स्वानुभवासी ॥ ३८ ॥
या नाव जाणावें मनन । अर्थीलागीं सावधान ।
निजध्यासें समाधान । होत असे ॥ ३९ ॥
बोलिल्याचा अर्थ कळे । तरी च समाधान निवळे ।
अकस्मात अंतरीं बोळे । निःसंदेहता ॥ ४० ॥
संदेह जन्माचें मूळ । तें श्रवणें होये निर्मूळ ।
पुढें सहज चि प्रांजळ । समाधान ॥ ४१ ॥

जेथें नाहीं श्रवण मनन । तेथें कैचें समाधान ।
मुक्तपणाचें बंधन । जडलें पाईं[1] ॥ ४२ ॥
मुमुक्ष साधक अथवा सिद्ध । श्रवणेंविण तो अबद्ध[2] ।
श्रवणमननें शुद्ध । चित्तवृत्ति होये ॥ ४३ ॥
जेथें नाहीं नित्य श्रवण । तें जाणावें विलक्षण ।
तेथें साधकें येक क्षण । क्रमूं नये सर्वथा ॥ ४४ ॥
जेथें नाहीं श्रवणस्वार्थ । तेथें कैंचा हो परमार्थ ।
मागें केलें तितुकें वेर्थ । श्रवणेंविण होये ॥ ४५ ॥
तस्मात् श्रवण करावें । साधन मनीं धरावें ।
नित्यनेमें तरावें । संसारसागरीं ॥ ४६ ॥
सेविलें च सेवावें अन्न । घेतलें चि घ्यावें जीवन ।
तैसें श्रवणमनन । केलें चि करावें ॥ ४७ ॥
श्रवणाचा अनादर । आळसें करी जो नर ।
त्याचा होये अपहार । स्वहितविषईं ॥ ४८ ॥
आळसाचें संरक्षण । परमार्थाची बुडवण ।
याकारणें श्रवण । केलें चि पाहिजे ॥ ४९ ॥
आतां श्रवण कैसें करावें । कोण्या पंथास पाहावें ।
पुढिले समासीं आघवें । सांगिजेल ॥ ५० ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे श्रवणनिरूपणनाम समास आठवा ॥८॥

---

॥ श्रीराम ॥

आतां श्रवण कैसें करावें । तें हि सांगिजेल अघवें ।
श्रोतां अवधान द्यावें । येकचित्तें ॥ १ ॥

---

१ आपण मुक्त आहोंत, आपणास कशाला श्रवण मनन पाहिजे असें जर कोणी म्हणेल तर त्याचा मुक्तपणा हें च त्याचें बंधन होय. २ अव्यवस्थित.

येक वगतृत्व श्रवणीं पडे । तेणें जालें समाधान मोडे ।
केला निश्चय विवडे । अकस्मात ॥ २ ॥
तें वगतृत्व त्यागावें । जें माईक स्वभावें ।
जेथें निश्चयाच्या नांवें । सुन्याकार ॥ ३ ॥
येक्या ग्रंथें निश्चय केला । तो दुजयानें उडविला ।
तेणें संशयो चि वाढला । जन्मवरी ॥ ४ ॥
जेथें संशय तुटती । होये आशंकानिवृत्ती ।
अद्वैत ग्रंथ परमार्थी । श्रवण करावे ॥ ५ ॥
जो मोक्षाचा अधिकारी । तो परमार्थपथ धरी ।
प्रीति लागली अंतरीं । अद्वैतग्रंथाची ॥ ६ ॥
जेणें सांडिला इहलोक । जो परलोकींचा साधक ।
तेणें पाहावा विवेक । अद्वैतशास्त्रीं ॥ ७ ॥
जयास पाहिजे अद्वैत । तयापुढें ठेवितां द्वैत ।
तेणें क्षोभलें उठे चित्त । तया श्रोतयाचें ॥ ८ ॥
आवडीसारिखें मिळे । तेणें सुख चि उचंबळे ।
नाहीं तरी कटाळे । मानस ऐकतां ॥ ९ ॥
ज्याची उपासना जैसी । त्यासी प्रीति वाटे तैसी ।
तेथें वर्णितां दुजयासी । प्रशस्त न वटे ॥ १० ॥
प्रीतीचें लक्षण ऐसें । अंतरीं उठे अनयासें ।
पाणी पाणवाटें जैसें । आपण चि धांवे ॥ ११ ॥
तैसा जो आत्मज्ञानी नर । तयास नावडे इतर ।
तेथें पाहिजे सारासार । विचारणा ते ॥ १२ ॥
जेथें कुळदेव्या भगवती । तेथें पाहिजे सप्तशती ।
इतर देवाची स्तुती । कामा नये सर्वथा ॥ १३ ॥
घेतां अनंताच्या व्रता । तेथें नलगे भगवद्गीता ।
साधुजनासी वार्ता । फळाशेची नाहीं ॥ १४ ॥

वीरकंकण घालितां नाकीं । परी तें शोभा पावेना कीं ।
जेथील तेथें आणिकीं । कामा न ये सर्वथा ॥ १५ ॥
नाना माहात्में बोलिलीं । जेथील तेथें वद्य जालीं ।
विपरीत करून वाचिलीं । तरी तें विलक्षण ॥ १६ ॥
मल्हारमाहात्म द्वारकेसी । द्वारकामाहात्म नेलें कासीं ।
कासीमाहात्म वेंकटेसीं । शोभा न पवे ॥ १७ ॥
ऐसें सांगता असे वाड । परी जेथील तेथें चि गोड ।
तैसी ज्ञानीयास चाड । अद्वैत ग्रंथाची ॥ १८ ॥
योगियांपुढें राहाणें । परीक्षवंतापुढें पाषाण ।
पंडितापुढें डफगाण । शोभा न पवे ॥ १९ ॥
वेदज्ञापुढें जती । निस्पृहापुढें फळश्रुती ।
ज्ञानीयांपुढें पोथी । कोकशास्त्राची ॥ २० ॥
ब्रह्मचर्यापुढें नाचणीं । रासक्रीडा निरूपणीं ।
राजहंसापुढें पाणी । ठेविलें जैसें ॥ २१ ॥
तैसें अतर्निष्ठांपुढें । ठेविलें शृंगारिक टिपेंडें ।
तेणें त्याचें कैसें घडे । समाधान ॥ २२ ॥
रायास रंकाचा आशा । तक्र सांगणें पीयूर्षा ।
संन्याशासी वोवसा । उचिष्ट चाडाळी ॥ २३ ॥
कर्मनिष्ठां वशीकर्ण । पंचाक्षरी निरूपण ।
तेथें भग अतःकर्ण । सहज चि त्याचें ॥ २४ ॥
तैसे परमार्थिक जन । तयांस नस्तां आत्मज्ञान ।
ग्रंथ वाचितां समाधान । होणार नाहीं ॥ २५ ॥
आतां असो हें बोलणें । जयासि स्वहित करणें ।
तेणें सदा विचरणें । अद्वैतग्रंथीं ॥ २६ ॥

---

१ इतर ठिकाणीं, अन्यत्र २ व्यंकटेशीं ३ अंगात दैवत आणवून बोलवणें. ४ कामशास्त्राची. ५ चोपडी. ६ अमृताला. ७ व्रत ८ " उच्छिष्ट चाडाळी " हा एक मंत्र आहे.

आत्मज्ञानी येकचित्त । तेणें पाहाणें अद्वैत ।
येकांत स्थळीं निवात । समाधान ॥ २७ ॥
बहुत प्रकारें पाहातां । ग्रंथ नाहीं अद्वैतापरता ।
परमार्थास तत्वता । तारू च कीं ॥ २८ ॥
इतर जे प्रपंचिक । । हास्य विनोद नवरसिक ।
हित नव्हे तें पुस्तक । परमार्थासी ॥ २९ ॥
जेणें परमार्थ वाढे । आंगीं अनुताप चढे ।
भक्तीसाधन आवडे । त्या नाव ग्रंथ ॥ ३० ॥
जो ऐकतां च गर्व गळे । कां ते भ्रांती च मावळे ।
नातरी येकसरें वोळे । मन भगवतीं ॥ ३१ ॥
जेणें होये उपरती । अवगुण पालटती ।
जेणें चुके अधोगती । त्या नाव ग्रंथ ॥ ३२ ॥
जेणें धारिष्ट चढे । जेणें परोपकार घडे ।
जेणें विषयवासना मोडे । त्या नाव ग्रंथ ॥ ३३ ॥
जेणें परत्रसाधन । जेणें ग्रंथें होये ज्ञान ।
जेणें होईजे पावन । या नाव ग्रंथ ॥ ३४ ॥
ग्रंथ बहुत असती । नाना विधानें फळश्रुती ।
जेथें नुपजे विरक्ती भक्ती । तो ग्रंथ चि नव्हे ॥ ३५ ॥
मोक्षेंविण फळश्रुती । ते दुराशेची पोथी ।
ऐकतां ऐकतां पुढती । दुराशा चि वाढे ॥ ३६ ॥
श्रवणीं लोभ उपजेल जेथें । विवेक कैंचा असेल तेथें ।
बैसलीं दुराशेचीं भूतें । तयां अधोगती ॥ ३७ ॥
ऐकोनि च फळश्रुती । पुढें तरि पांवोन ह्मणती ।
तयां जन्म अधोगती । सहज चि जाली ॥ ३८ ॥

---

१ पावूं.

नाना फळें पक्षी खाती । तेणें चि तयां होये तृप्ति ।
परी त्या चकोराचे चित्तीं । अमृत वसे ॥ ३९ ॥
तैसें संसारी मनुष्य । पाहे संसाराची वासें[1] ।
परी ते भगवंताचे अंश । भगवत चि इछिती ॥ ४० ॥
ज्ञानियास पाहिजे ज्ञान । भजकास पाहिजे भजन ।
साधकास पाहिजे साधन । इछेसारिखें ॥ ४१ ॥
परमार्थ्यास परमार्थ । स्वार्थ्यास पाहिजे स्वार्थ ।
कृपणास पाहिजे अर्थ । मनापासुनी ॥ ४२ ॥
योगियास पाहिजे योग । भोगियांस पाहिजे भोग ।
रोगियांस पाहिजे रोग— । हर्ति मात्रा ॥ ४३ ॥
कवीस पाहिजे प्रबद । तार्किकांस तर्कवाद ।
भाविकांस संवाद । गोड वाटे ॥ ४४ ॥
पंडितांस पाहिजे विपत्ती । विद्वांसास अधेनप्रीती[2] ।
कळावंतां आवडती । नाना कळा ॥ ४५ ॥
हरिदासा आवडे कीर्तन । सुचिस्मंतां संध्यास्नान ।
कर्मनिष्ठां विधिविधान । पाहिजे तें ॥ ४६ ॥
प्रेमळास पाहिजे करुणा । दक्षता पाहिजे विचक्षणा ।
चातुर्य पाहे शाहाणा । आदरेंसीं ॥ ४७ ॥
भक्त पाहे मूर्तिध्यान । संगीत पाहे ताळज्ञान ।
रागज्ञानी तानमान[3] । मूर्छनों पाहे ॥ ४८ ॥
योगाभ्यासी पिंडज्ञान । तत्वज्ञासि तत्वज्ञान ।
नाडिज्ञानी मात्राज्ञान । पाहातुसे ॥ ४९ ॥
कामिक पाहे कोकशास्त्र । चेटकी पाहे चेटकमंत्र ।
यंत्री पाहे नाना यंत्र । आदरेंसीं ॥ ५० ॥

---

१ वाट. २ अध्ययनप्रीति ३ रग. ४ सारीगमपधनी याच्या उच्चारास मूर्छना ह्मणतात.

टवाळा आवडे विनोद । उन्मत्तास नाना छंद ।
तामसास अप्रमाद । गोड वाटे ॥ ५१ ॥
मूर्ख हाये नादलुब्धी । निंदक पाहे उणी सधी ।
पापी पाहे पापबुद्धि । लाऊन आंगीं ॥ ५२ ॥
येकां पाहिजे रसाळ । येकां पाहिजे पाल्हाळ ।
येकां पाहिजे केवळ । सांवडी भक्ती ॥ ५३ ॥
आगमी पाहे आगमें । शूर पाहे संग्राम ।
येक पाहाती नाना धर्म । इछेसारिखे ॥ ५४ ॥
मुक्त पाहे मुक्तलीळा । सर्व पाहे सर्व कळा ।
जोतिषी भविष्य पिंगळा । वर्णू पाहे ॥ ५५ ॥
ऐसें सांगावें तें किती । आवडीसारिखें ऐकती ।
नाना पुस्तकें वाचिती । सर्वकाळ ॥ ५६ ॥
परी परत्र साधनेंविण । म्हणों नये तें श्रवण ।
जेथें नाहीं आत्मज्ञान । तया नाव कर्मणाँ ॥ ५७ ॥
गोडीविण गोडपण । नाकेंविण सुलक्षण ।
ज्ञानेंविण निरूपण । बोलों चि नये ॥ ५८ ॥
आतां असो हें बहुत । ऐकावा परमार्थग्रंथ ।
परमार्थग्रंथेंविण वेर्थ । गथागोथी ॥ ५९ ॥
म्हणोनि नित्यानित्यविचार । जेथें बोलिला सारासार ।
तो चि ग्रंथ पैलपार । पाववी विवेकें ॥ ६० ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे श्रवणनिरूपणनाम समास नवम ॥ ९ ॥

---

॥ श्रीराम ॥

मिथ्या तें चि जालें सत्य । सत्य तें चि जालें असत्य ।
मायाविभ्रमाचे कृत्य । ऐसें असे पाहातां ॥ १ ॥

---

१ प्रमाद. २ भोळी ३ तंत्रमार्गानुसारी ४ शास्त्र. ५ सर्वज्ञ ६ पिंगळा हा एक पक्षी आहे, तो चार प्रकारचे आवाज करितो, त्यावरून ज्योतिषी फलाचा निर्णय करितात. ७ कालक्रमणा, करमणूक.

सत्य कळाया कारणें । बोलिलीं नाना निरूपणें ।
तरी उठेना धरणें । असत्याचें ॥ २ ॥
असत्य अंतरीं बिंबलें । न सांगता तें दृढ जालें ।
सत्य असोन हारपलें । जेथील तेथें ॥ ३ ॥
वेदशास्त्रें पुराणें सांगती । सत्याचा निश्चय करिती ।
तरी न ये आत्मप्रचिती । सत्यस्वरूप ॥ ४ ॥
सत्य [1]असोन आछ्यादलें । मिथ्या [2]नसोन सत्य जालें ।
ऐसें विपरीत वर्तलें । देखत देखतां ॥ ५ ॥
ऐसी मायेची करणी । कळों आली तत्क्षणीं ।
संतसंगें निरूपणीं । विचार घेतां ॥ ६ ॥
मागां जालें निरूपण । देखिलें आपणासि आपण ।
तेणें बाणली खूण । परमार्थाची ॥ ७ ॥
तेणें समाधान जालें । चित्त [3]चैतंनीं मिळालें ।
निजस्वरूपें वोळखिलें । निजवस्तुसी ॥ ८ ॥
प्रारब्धीं टाकिला देहो । बोधें फिटला संदेहो ।
आतां चि पडो अथवा राहो । मिथ्या [4]कळेवर ॥ ९ ॥
ज्ञानियांचें जें शरीर । तें मिथ्यत्वें [5]निर्विकारें ।
जेथें पडे ते चि सार । पुण्य भूमी ॥ १० ॥
साधुदर्शनें पावन तीर्थ । पुरती त्यांचे मनोरथ ।
साधु न येतां जिणें व्यर्थ । तयां पुण्यक्षेत्रांचें ॥ ११ ॥
पुण्यनदीचें जें तीर । तेथें पडावें शरीर ।
हा इतर जनाचा विचार । साधु नित्यमुक्त ॥ १२ ॥
उत्तरायेण तें उत्तम । दक्षणायेन तें अधम ।
हा संदेहीं वसे भ्रम । साधु तो निःसंदेह ॥ १३ ॥

---

१ शाश्वत असून. २ नश्वर असून. ३ चैतन्यीं. ४ कलेवर, शरीर
५ ज्ञान्यांचें शरीर मिथ्या असून ते ( ज्ञानी ) स्वतः निर्विकार असतात.

शुक्लपक्ष उत्तरायेण । गृहीं दीप दिवा मरण ।
अंतीं राहावें स्मरण । गतीकारणें ॥ १४ ॥
इतुकें नलगे योगियांसी । तो जीतं चि मुक्त पुण्यरासी ।
तिळांजुळी पापपुण्यासी । दिधली तेणें ॥ १५ ॥
देहाचा अंत बरा आला । देह सुखरूप गेला ।
त्यासी ह्मणती धन्य जाला । अज्ञान जन ॥ १६ ॥
जनाचें विपरीत मत । अंतीं भेटतो भगवत ।
ऐसें कल्पून घात [१]करिती आपुला स्वयें ॥ १७ ॥
जितां सार्थक नाहीं केलें । वेर्थ आयुष्य निवोन गेलें ।
मुळीं धान्ये चि नाहीं पेरिलें । तें उगवेल कैंचें ॥ १८ ॥
जरी केलें ईश्वरभजन । तरी च होईजे पावन ।
जैसें वेव्हारिता धन । रासि माथा [३]लाभे ॥ १९ ॥
दिधल्याविण पाविजेना । पेरिल्याविण उगवेना ।
ऐसें हें वाक्य जना । ठाउकें चि आहे ॥ २० ॥
न करितां सेवच्या व्यापारा । स्वामीस ह्मणे कोठें मुशारा ।
तैसें अतीं अभक्त नरां । स्वहित न घडे ॥ २१ ॥
जितां नाहीं भगवद्भक्ती । मेल्यां कैंची होईल मुक्ती ।
असो जे जे जैसें करिती । ते ते पावती तैसें ॥ २२ ॥
एत्र न करिता भगवद्भजन । अंतीं [४]नेंव्हीजे पावन ।
जरी आलें बरें मरण । तरी भक्तीविण अधोगति ॥ २३ ॥
ह्मणौन साधूनें आपलें । जीत असतां च सार्थक केलें ।
शरीर कारणीं लागलें । धन्य त्याचें ॥ २४ ॥
जे कां जीवन्मुक्त ज्ञानी । त्यांचें शरीर पडो रानीं ।
अथवा पडो स्मशानीं । तरी धन्य जालें ॥ २५ ॥

---

१ "ता" चा "त" हरताळ लावून केला आहे. २ जिवंत असतां. ३ जसें पैशाची देवघेव केली ह्मणजे मुद्दलाची रास होऊन धनाची वृद्धि होते. ४ न होइजे.

 

साधूचा देह खितपला[1] । अथवा श्वानादिकीं भक्षिला ।
हें प्रशस्त न वटे जनाला । मंदबुद्धीस्तव ॥ २६ ॥
अंत बरा नव्हे चि ह्मणोन । कष्टी होती इतर जन ।
परी बापुडे अज्ञान । नेणती वर्म ॥ २७ ॥
जो जन्मला च नाहीं ठाईंचा । त्यास मृत्य येईल कैंचा ।
विवेकबळें जन्ममृत्याचा । घोटें[2] भरिला जेणें ॥ २८ ॥
स्वरूपानुसंधानबळें । सगळी माया च नाडळे ।
तयाचा पार न कळे । ब्रह्मादिकासी ॥ २९ ॥
तो जीत चि असतां मेला । मरणास मारून ज्याला[3] ।
जन्ममृत्य न स्मरे त्याला । विवेकबळें ॥ ३० ॥
तो जनीं दिसतो परी वेगळा । वर्तता भासे निराळा ।
दृश्य पदार्थ त्या निर्मळा । स्पर्शेला चि नाहीं ॥ ३१ ॥
असो ऐसे साधुजन । त्यांचें घडलियां भजन ।
तेणें भजनें पावन । इतर जन होती ॥ ३२ ॥
सद्गुरूचा जो अंकित साधक । तेणें केला चि करावा विवेक ।
विवेक केलियां तर्क । फुटे निरूपणीं ॥ ३३ ॥
हें चि साधकासी निरवणें[4] । अद्वैत प्रांजळ निरूपणें ।
तुमचें हि समाधान बाणे । साधू च ऐसें ॥ ३४ ॥
जो संतांस शरण गेला । तो संत चि होऊन ठेला ।
इतर जनास उपेगा आला । कृपाळूपणें ॥ ३५ ॥
ऐसें संताचें महिमान । सतसंगें होतें ज्ञान ।
सत्संगापरतें साधन । आणीक नाहीं ॥ ३६ ॥
गुरुभजनाचेनि आधारें । निरूपणाचेनि विचारें ।
क्रियाशुद्ध निर्धारें । पाविजे पद ॥ ३७ ॥

---

१ खितपत, झुरत पडला. २ घोट भरणें=जीव घेणें. ३ जिआला, जगला. मृत्यूला हि मारून योगी जगतात. "आपुलें मरण पाहिलें म्यां डोळां।" श्रीतुकाराम. ४ सोपविणें, सांगणें.

परमार्थाचें जन्मस्थान । तें चि सद्गुरूचें भजन ।
सद्गुरुभजनें समाधान । अकस्मात बाणे ॥ ३८ ॥
देह मिथ्या जाणोनि जीवें । याचें सार्थक चि करावें ।
भजनभावें तोषवावें । चित्त सद्गुरूचें ॥ ३९ ॥
शरणागतांची वाहे चिंता । तो येक सद्गुरु दाता ।
जैसें बाळक वाढवी माता । नाना येत्नें करुनी ॥ ४० ॥
ह्मणौन सद्गुरूचें भजन । जयासि घडे तो चि धन्य ।
सद्गुरुविण समाधान । आणीक नाहीं ॥ ४१ ॥
सरली शब्दाची खटपट । आला ग्रंथाचा सेवट ।
येथें सांगितलें पष्ट । सद्गुरुभजन ॥ ४२ ॥
सद्गुरुभजनापरतें काहीं । मोक्षदायेक दुसरें नाहीं ।
जयास न मने तेहीं । अवलोकावी गुरुगीता ॥ ४३ ॥
तेथें निरोपिलें बरवें । पार्वतीप्रति सदाशिवें ।
याकारणें सद्भावें । सद्गुरुचरण सेवावे ॥ ४४ ॥
जो ये ग्रंथींचा विवेक । विवरूनि पाहे साधक ।
तयास सांपडे येक । निश्चय ज्ञानाचा ॥ ४५ ॥
जे ग्रथीं बोलिलें अद्वैत । तो ह्मणों नये प्राकृत ।
सत्य जाणावा वेदांत । अर्थविषईं ॥ ४६ ॥
प्राकृतें वेदांत कळे । सकळ शास्त्रीं पाहातां मिळे ।
आणी समाधान निवळे । अंतर्यामीं ॥ ४७ ॥
तें प्राकृत ह्मणों नये । जेथें ज्ञानाचे उपाये ।
मूर्खासि हें कळे काये । मर्कटा नारिकेळ जैसें ॥ ४८
आतां असो हें बोलणें । अधिकारपरत्वें घेणें ।
शिंपीमधील मुक्त उणें । म्हणों नये ॥ ४९ ॥

---

१ श्रीसद्गुरूचें भजन हा च परमार्थमार्गातील आरंभ. २ मोती.

जेथें नेति नेति श्रुती । तेथें न चले भाषावित्पत्ती ।
परब्रह्म आदिअतीं । अनुर्वाच्य ॥ ५० ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे देहांतनिरूपणनाम समास दाहवा ॥ १० ॥

---

## ॥ ज्ञानदशक मायोद्भवनाम अष्टम ॥ ८ ॥

॥ श्रीराम ॥

श्रोतीं व्हावें सावध । विमळ ज्ञान बाळबोध ।
गुरुशिष्यांचा संवाद । अति सुगम परियेसा ॥ १ ॥
नाना शास्त्रें धांडोळितां । आयुष्य पुरेना सर्वथा ।
अंतरीं संशयाची वेथा । वाढो चि लागे ॥ २ ॥
नाना तीर्थें थोरथोरें । सृष्टीमध्यें अपारें ।
सुगमें दुर्गमें दुष्करें । पुण्यदायकें ॥ ३ ॥
ऐसीं तीर्थें सर्व हि करी । ऐसा कोण रे संसारी ।
फिरों जातां जन्मवरी । आयुष्य पुरेना ॥ ४ ॥
नाना तपें नाना दानें । नाना योग नाना साधनें ।
हें सर्व हि देवाकारणें । करिजेत आहे ॥ ५ ॥
पावावया देवाधिदेवा । बहुविध श्रम करावा ।
तेणें देव ठाईं पाडावा । हें सर्वमत ॥ ६ ॥
पावावया भगवंतातें । नाना पंथ नाना मतें ।
तया देवाचें स्वरूप तें । कैसें आहे ॥ ७ ॥
बहुत देव सृष्टीवरी । त्यांची गणणा कोण करी ।
येक देव कोणेपरी । ठाईं पडेना ॥ ८ ॥
बहुविध उपासना । ज्याची जेथें पुरे कामना ।
तो तेथें चि राहिला मना । सदृढ करूनि ॥ ९ ॥
बहु देव बहु भक्त । इछ्या जाले आसक्त ।
बहु ऋषी बहु मत । वेगळालें ॥ १० ॥

बहु निवडितां निवडेना । येक निश्चय घडेना ।
शास्त्रें भांडती पडेना । निश्चय ठाईं ॥ ११ ॥
बहुत शास्त्रीं बहुत भेद । मतामतांस विरोध ।
ऐसा करितां वेवाद । बहुत गेले ॥ १२ ॥
सहस्रामध्यें कोणी येक । पाहे देवाचा विवेक ।
परी त्या देवाचें कौतुक । ठाईं न पडे ॥ १३ ॥
ठाईं न पडे कैसें ह्मणतां । तेथें लागली अहंता ।
देव राहिला परता । अहंतागुणें ॥ १४ ॥
आता असो हें बोलणें । नाना योग ज्याकारणें ।
तो देव कोण्या गुणें । ठाईं पडे ॥ १५ ॥
देव कोणासी ह्मणावें । कैसें तयासी जाणावें ।
तें चि बोलणें स्वभावें । बोलिजेल ॥ १६ ॥
जेणें केलें चराचर । केले सृष्ट्यादि व्यापार ।
सर्वकर्ता निरंतर । नाम ज्याचें ॥ १७ ॥
तेणें केल्या मेघमाळा । चद्रबिंबीं अमृतकळा ।
तेज दिधलें रविमंडळा । जया देवें ॥ १८ ॥
ज्याची मर्यादा सागरा । जेणें स्थापिलें फणिवरा ।
जयाचेनि गुणें तारा । अंतरिक्ष ॥ १९ ॥
च्यारी खाणी च्यारी वाणी । चौऱ्यासि लक्ष जीवयोनी ।
जेणें निर्मिले लोक तिनी । तया नाव देव ॥ २० ॥
ब्रह्मा विष्णु आणी हर । हे जयाचे अवतार ।
तो चि देव हा निर्धार । निश्चयेंसीं ॥ २१ ॥
देव्हाराचा उठोनि देव । करूं नेणे सर्व जीव ।
तयाचेनि ब्रह्मकटाव । निर्मिला न वचे ॥ २२ ॥
ठाईं ठाईं देव असती । तेहिं केली नाहीं क्षिती ।
चद्र सूर्य तारा जीमूतीं । तयाचेनि नव्हे ॥ २३ ॥

१ मनुष्याणां सहस्रेषु कश्चिद्यतति सिद्धये । यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्त्वतः ॥ भ गी. ७-३ २ ब्रह्मकटाह, ब्रह्मांडगोलक ३ जीमूत, मेघ

सर्वकर्ता तो चि देव । पाहों जातां निरावेव ।
ज्याची कळा लीळा लाघव । नेणती ब्रह्मादिक ॥ २४ ॥
येथें आशंका उठिली । ते पुढिलिये समासीं फिटली ।
आता वृत्ती सावध केली । पाहिजे श्रोतीं ॥ २५ ॥
पैस अवकाश आकाश । कांहीं च नाहीं जें भकास ।
तये निर्मळीं वायोस । जन्म जाला ॥ २६ ॥
वायोपासून जाला वन्ही । वन्हीपासुनी जालें पाणी ।
ऐसी जयाची करणी । अघटित घडली ॥ २७ ॥
उदकापासून सृष्टि जाली । स्तंभेंविण उभारली ।
ऐसी विचित्र कळा केली । त्या नाव देव ॥ २८ ॥
देवें निर्मिली हे क्षिती । तिचे पोटीं पाषाण होती ।
तयास चि देव ह्मणती । विवेकहीन ॥ २९ ॥
जो सृष्टिनिर्माणकर्ता । तो ये सृष्टीपूर्वीं होता ।
मग हे तयाची सत्ता । निर्माण जाली ॥ ३० ॥
कुलाल पात्रापूर्वीं आहे । पात्र काहीं कुलाल नव्हे ।
तैसा देव पूर्वीं च आहे पाषाण नव्हे सर्वथा ॥ ३१ ॥
मृत्तिकेचें शेन्य केलें । कर्तें वेगळें राहिलें ।
कार्यकारण येक केलें । तरी होणार नाहीं ॥ ३२ ॥
तथापी होईल पचभूतिक । निर्गुण नव्हे काहीं येक ।
कार्याकारणाचा विवेक । भूतांपरता नाहीं ॥ ३३ ॥
अवघी सृष्टि जो कर्ता । तो ते सृष्टीहूनि पर्ता ।
तेथें सशयाची वार्ता । काढूं चि नये ॥ ३४ ॥

---

१ पैस=अवकाश=आकाश=कांहीं नाहीं ( शून्य )=भकास=निर्मळ. २ क्षिती, पृथ्वी ३ कुलाल, कुंभार. ४ सैन्य. ५ कार्य=मातीचें सैन्य, कारण=कर्ता. ६ तथापि, कार्य व कर्ता हीं उभयतां पंचभूतात्मक असल्यामुळें एक आहेत असें ह्मणता येईल; परंतु, निर्गुणाच्या ठिकाणी मात्र असलें ऐक्य नसतें. कार्यकारणाचा संबंध पंचभूतांच्या पलीकडे नाहीं.

खांबसूत्रींची बाहुली । जेणें पुरुषें नाचविली ।
तो चि बाहुली हे बोली । घडे केवी ॥ ३५ ॥
छायामंडपीची[1] सेना । सृष्टिसारिखी च रचना ।
सूत्रें चाळी परी तो नाना । व्यक्ति नव्हे ॥ ३६ ॥
तैसा सृष्टिकर्ता देव । परी तो नव्हे सृष्टिभाव ।
जेणें केले नाना जीव । तो जीव कैसेनी ॥ ३७ ॥
जें जें जया करणें पडे । तें तें तो हें कैसें घडे ।
ह्मणोनि वाया चि बापुडे । संदेहीं पडती ॥ ३८ ॥
सृष्टि ऐसें चि स्वभावें । गोपुर[2] निर्मिलें बरवें ।
परी तो गोपुर कर्ता नव्हे । निश्चयेंसीं ॥ ३९ ॥
तैसें जग निर्मिलें जेणें । तो वेगळा पूर्णपणें ।
येक ह्मणती मूर्खपणें । जग तो चि जगदीश ॥ ४० ॥
एवं जगदीश तो वेगळा । जग निर्माण त्याची कळा ।
तो सर्वांमधें परी निराळा । असोन सर्वीं ॥ ४१ ॥
ह्मणोनि भूतांचा कर्दमु । यासी अलिप्त आत्मारामु ।
अविद्यागुणें मायाभ्रमु । सत्य चि वाटे ॥ ४२ ॥
मायोपाधी जगडंबर । आहे सर्व हि साचार ।
ऐसा हा विपरीत विचार । कोठें चि नाहीं ॥ ४३ ॥
ह्मणोनि जग मिथ्या साच आत्मा । सर्वांपर जो परमात्मा
अंतर्बाह्य अंतरात्मा । व्यापूनि असे ॥ ४४ ॥
तयास ह्मणावें देव । येर हें अवघें चि वाव ।
ऐसा आहे अंतर्भाव । वेदांतीचा ॥ ४५ ॥
पदार्थवस्तु नासिवंत । हें तों अनुभवास येत ।
याकारणें भगवंत । पदार्थावेगळा ॥ ४६ ॥

---

१ बारीक शुभ्र वस्त्राचा पडदा सोडून त्याच्या आंत दिवा लावावा, नंतर मनुष्य, जनावरें इत्यादिकांचीं कातरलेलीं चित्रें, दिवा व पडदा यांच्यामधून फिरविलीं असतां, बाहेरून पाहणारास तीं मोठीं दिसतात २ देवालयाच्या पुढल्या दरवाज्यावर [illegible] मजले असतात ते

देव विमळ आणी अचळ । शास्त्रें बोलती सकळ ।
तया निश्चळास चंचळ । म्हणों नये सर्वथा ॥ ४७ ॥
देव आला देव गेला । देव उपजला देव मेला ।
ऐसें बोलतां दुरिताला[1] । काये उणें ॥ ४८ ॥
जन्ममरणाची वार्ता । देवास[2] लागेना सर्वथा ।
देवें[3] अमर ज्याची सत्ता । त्यासी मृत्य कैसेनी ॥ ४९ ॥
उपजणें आणी मरणें । येणें जाणें दुःख भोगणें ।
हें त्या देवाचें करणें । तो कारण वेगळा ॥ ५० ॥
अंतःकरण पंचप्राण । बहुतत्वी पिंडज्ञान ।
यां सर्वांस आहे चळण । ह्मणोनि देव नव्हेती ॥ ५१ ॥
येवं कल्पनेरहित । तया नाव भगवत ।
देवपणाची मात[4] । तेथें नाहीं ॥ ५२ ॥
तव शिष्यें आक्षेपिलें । तरी कैसें ब्रह्मांड केलें ।
कर्तेपणें कारणें[5] पडिलें । कार्यामधें[6] ॥ ५३ ॥
द्रष्टेपणें द्रष्टा दृश्यीं । जैसा पडे अनायासीं ।
कर्तेपणें निर्गुणासी । गुण तैसे ॥ ५४ ॥
ब्रह्मांडकर्ता कवण । कैसी त्याची वोळखण ।
देव सगुण किं निर्गुण । मज निरोप द्या ॥ ५५ ॥
येक ह्मणती त्या ब्रह्मातें । इछयामात्र सृष्टिकर्तें ।
सृष्टिकर्तें त्यापर्तें । कोण आहे ॥ ५६ ॥

---

१ पापाला. २ ब्रह्मास ३ इंद्रादि देव ज्याच्या सत्तेनें इंद्रादि देव हे अमर आहेत त्यास मृत्यु कसा येईल ४ गोष्ट. " देवपण " ह्मणून काहीं नाहीं; कारण, " देवपण " यात कल्पना आली आणि देव तर खरोखर कल्पनारहित आहे. ५ कर्ता. ६ कर्ता हा कर्ता आहे असें ह्मटलें ह्मणजे त्याच्या ठिकाणीं " कर्तेपण " =कर्तृत्व हा गुण येतो आणि ज्याच्या ठिकाणीं गुण असतो तें कार्य होय अशा रीतीनें कारण=कर्ता च कार्य होऊं पाहतो जसें पाहणारा हा पाहणारा असतो ह्मणजे त्याच्या ठिकाणीं पाहण्याचा गुण किंवा धर्म असतो आणि तेणेंकरून तो स्वतः दुसऱ्याचें दृश्य होतो. उ० इंद्रियें हीं विषयाचे द्रष्टे असून स्वतः मनाचें दृश्य असतात.

आता असो हे बहु बोली । सकळ माया कोठून जाली ।
ते हे आतां निरोपिली । पाहिजे स्वामी ॥ ५७ ॥
ऐसें ऐकोनि वचन । वक्ता ह्मणे सावधान ।
पुढिले समासीं निरूपण । सांगिजेल ॥ ५८ ॥
ब्रह्मीं माया कैसी जाली । पुढें असे निरोपिली ।
श्रोतीं वृत्ति सावध केली । पाहिजे आतां ॥ ५९ ॥
पुढें हें चि निरूपण । विशद केलें श्रवण ।
जेणें होये समाधान । साधकांचें ॥ ६० ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे देवदर्शननाम समास प्रथम ॥ १ ॥

---

॥ श्रीराम ॥

मागां श्रोतीं आक्षेपिलें । तें पाहिजे निरोपिलें ।
निराकारीं कैसें जालें । चराचर ॥ १ ॥
याचें ऐसें प्रतिवचन । ब्रह्म जें कां सनातन ।
तेथें माया मिथ्याभान । विवर्तरूप[1] भासे ॥ २ ॥
आदि येक परब्रह्म । नित्यमुक्त अक्रिय परम ।
तेथें अव्यीकृत[2] सूक्ष्म । जाली मूळमाया ॥ ३ ॥

॥ श्लोक ॥ आद्यमेकं परब्रह्म नित्यमुक्तमविक्रियम् ।
तस्य माया समावेशो जीवमव्याकृतात्मकम् ॥४॥

आशंका ॥ येक ब्रह्म निराकार । मुक्त अक्रिये निर्विकार ।
तेथें माया वोडंबर[3] । कोठून जाली ॥ ४ ॥
ब्रह्म अखंड निर्गुण । तेथें इछा धरी कोण ।
निर्गुणीं सगुणेविण । इछा नाहीं ॥ ५ ॥
मुळीं असेचिना सगुण । ह्मणौनि नामें निर्गुण ।
तेथें जालें सगुण । कोणेपरी ॥ ६ ॥

---

१ भासमात्र, नसून दिसणारी, जसें शुक्तिकेच्या ठायीं रजत, दोरीच्या ठायीं सर्प, इत्यादि. २ अस्पष्ट, अदृश्य. ३ लटकी.

निर्गुण चि गुणा आलें । ऐसें जरी अनुवादलें ।
लागों पाहे येणें बोलें । मूर्खपण ॥ ७ ॥
येक ह्मणती निरावेव । करून अकर्ता तो देव ।
त्याची लीळा बापुडे जीव । काये जाणती ॥ ८ ॥
येक ह्मणता तो परमात्मा । कोण जाणे त्याचा महिमा ।
प्राणी बापुडा जीवात्मा । काये जाण ॥ ९ ॥
उगा च महिमा सांगती । शास्त्रार्थ अवघा लोपिती ।
बळें चि निर्गुणास म्हणती । करूनि अकर्ता ॥ १० ॥
मुळीं नाहीं कर्तव्यता । कोण करून अकर्ता ।
कर्ता अकर्ता हे वार्ता । समूळ मिथ्या ॥ ११ ॥
जें ठाईंचें निर्गुण । तेथें कैचें कर्तेपण ।
तरी हे इछा धरी कोण । सृष्टिरचाव्याची ॥ १२ ॥
इछा परमेश्वराची । ऐसी युक्ती बहुतकाची ।
परी त्या निर्गुणास इछा कैंची । हें कळेना ॥ १३ ॥
तरी हें इतुकें कोणें केलें । किंवा आपण चि जालें ।
देवेंविण उभारलें । कोणेपरी ॥ १४ ॥
देवेंविण जालें सर्व । मग देवास कैंचा ठाव ।
येथें देवाचा अभाव । दिसोन आला ॥ १५ ॥
देव ह्मणों सृष्टिकर्ता । तरी येत[1] पाहे सगुणता ।
निर्गुणपणाची वार्ता । देवाची बुडाली ॥ १६ ॥
देव ठाइंचा निर्गुण । तरी सृष्टिकर्ता कोण ।
कर्त्तेपणाचें सगुण । नासिवंत ॥ १७ ॥
येथें पडिले विचार । कैसें जालें सचराचर ।
माया ह्मणों स्वतंतर । तरी हें हि विपरीत दिसे ॥ १८ ॥
माया कोणीं नाहीं केली । हे आपण चि विस्तारली ।
ऐसें बोलतां बुडाली । देवाची वार्ता ॥ १९ ॥

---

१ येकं २ कर्तृत्व देवाकडे आलें तर देव सगुण होतो, आणि सगुण तितकें तर नाशवंत आहे.

देव निर्गुण स्वतसिद्ध । त्यासी मायेसि काये समंध ।
ऐसें बोलतां विरुद्ध । दिसोनें आलें ॥ २० ॥
सकळ कांहीं कर्तव्यता । आली मायेच्या चि माथां ।
तरी भक्तास उद्धरिता । देव नाहीं कीं ॥ २१ ॥
देवेंविण मुक्ती माया । कोण नेईल विलया ।
आह्मां भक्तां सांभाळाया । कोणी च नाहीं ॥ २२ ॥
ह्मणोनि माया स्वतंतर । ऐसा न घडे कीं विचार ।
मायेस निर्मिता सर्वेश्वर । तो येक चि आहे ॥ २३ ॥
तरी तो कैसा आहे ईश्वर । मायेचा कैसा विचार ।
तरी हें आतां सविस्तर । बोलिलें पाहिजे ॥ २४ ॥
श्रोतीं व्हावें सावधान । येकाग्र करूनियां मन ।
आतां कथानुसंधान । सावध ऐका ॥ २५ ॥
येके आशंकेचा भाव । जनीं वेगळाले अनुभव ।
ते हि बोलिजेती सर्व । येथानुक्रमें ॥ २६ ॥
येक ह्मणती देवें केली । ह्मणोनि हे विस्तारली ।
देवास इछ्या नस्ती जाली । तरी हे माया कैंची ॥ २७ ॥
येक ह्मणती देव निर्गुण । तेथें इछा करी कोण ।
माया मिथ्या हे आपण । जाली च नाहीं ॥ २८ ॥
येक ह्मणती प्रत्यक्ष दिसे । तयेसी नाहीं ह्मणतां कैसें ।
माया हे अनादि असे । शक्ती ईश्वराची ॥ २९ ॥
येक ह्मणती साच असे । तरी हे ज्ञानें कैसी निरसे ।
साचासारिखी च दिसे । परी हे मिथ्या ॥ ३० ॥

---

1 ब्रह्माचा आणि मायेचा कांहीं संबंध नाहीं असें ह्मणण्यानें विरोध दिसून येतो. संबंध नाहीं तर मग काय माया आपण होऊन च झाली ? ती जर स्वयंभू असेल तर मग देवाचें प्रयोजन कोठें उरलें ? देव च नाहीं तर भक्तांचा उद्धार कसा होईल व माया विलयाला कोण नेईल ? सारांश, माया आपण होऊन झाली, असें ह्मणण्यानें ही अनर्थपरंपरा ओढवते.

येक ह्मणती मिथ्या स्वभावें । तरी साधन कासया करावें ।
भक्तिसाधन बोलिलें देवें । मायात्यागाकारणें ॥ ३१ ॥
येक ह्मणती मिथ्या दिसतें । भयें अज्ञानसंन्येपातें ।
साधनऔषध हीं घेईजेतें । परी तें दृश्य मिथ्या ॥ ३२ ॥
अनंत साधनें बोलिलीं । नाना मतें भांबावलीं ।
तरी माया नवचे त्यागिली । मिथ्या कैसी ह्मणावी ॥ ३३ ॥
मिथ्या बोले योगवाणी । मिथ्या वेदशास्त्रीं पुराणीं ।
मिथ्या नाना निरूपणीं । बोलिली माया ॥ ३४ ॥
माया मिथ्या ह्मणतां गेली । हे वार्ता नाहीं ऐकिली ।
मिथ्या ह्मणतां च लागली । समागमें ॥ ३५ ॥
जयाचे अंतरीं ज्ञान । नाहीं वोळखिले सज्जन ।
तयास मायामिथ्याभान । सत्य चि वाटे ॥ ३६ ॥
जेणें जैसा निश्चये केला । तयासी तैसा चि फळला ।
पाहे तो चि दिसे बिंबला । तैसी माया ॥ ३७ ॥
येक ह्मणती माया कैंची । आहे तें सर्व ब्रह्म चि ।
थिजल्या विघुरल्या घृताची । ऐक्यता न मोडे ॥ ३८ ॥
थिजलें आणी विघुरलें । हें स्वरूपीं नाहीं बोलिलें ।
साहित्यें भंगलें येणें बोलें । ह्मणती येक ॥ ३९ ॥
येक ह्मणती सर्व ब्रह्म । हें न कळे जयास वर्म ।
तयाचे अंतरींचा भ्रम । गेला च नाहीं ॥ ४० ॥
येक ह्मणती येक चि देव । तेथें कैंचें आणिलें सर्व ।
सर्व ब्रह्म हें अपूर्व । आश्चिर्य वाटे ॥ ४१ ॥

---

१ अज्ञानरूप जो संनिपात त्याच्या योगानें मायेचें भय वाटतें हा अज्ञानरूपी संनिपाताचा आजार बरा होण्यास साधनरूपी औषध घेतलें ह्मणजे, दृश्य तितकें मिथ्या आहे हें कळतें २ ज्याचे अंतरीं ज्ञान नाहीं व ज्यानें सज्जन ओळखिले नाहींत. ३ पाहणारा जसा असतो तसें त्याला प्रतिबिंब ( उ० आरशात ) दिसतें. ४ पातळ झालेल्या. ५ संगती, संबंध

येक ह्मणती येक चि खरें । आनु हि नाहीं दुसरें ।
सर्व ब्रह्म येणें प्रकारें । सहज चि जालें ॥ ४२ ॥
सर्व मिथ्या येकसरें । उरलें तें चि ब्रह्म खरें ।
ऐसीं वाक्यें शास्त्राधारें । बोलती येक ॥ ४३ ॥
आळंकार आणी सुवर्ण । तेथें नाहीं भिन्नपण ।
आटाआटी वेर्थ सीण । ह्मणती येक ॥ ४४ ॥
हीन उपमा येकदेसी । कैसी साहेल वस्तूसी ।
वर्णवेक्ती अव्यक्तासी । साम्यता न घडे ॥ ४५ ॥
सुवर्णी दृष्टी घालितां । मुळीं च आहे वेक्तता ।
आळंकार सोनें पाहातां । सोनें चि असे ॥ ४६ ॥
मुळीं सोनें चि हें वेक्त । जड येकदेसी पीत ।
पूर्णास अपूर्णाचा दृष्टांत । केवी घडे ॥ ४७ ॥
दृष्टांत तितुका येकदेसी । देणें घडे कळायासी ।
सिंधु आणी लहरीसी । भिन्नत्व कैंचें ॥ ४८ ॥
उत्तम मधेम कनिष्ठ । येका दृष्टांतें कळे पष्ट ।
येका दृष्टांतें नष्ट । संदेह वाढे ॥ ४९ ॥
कैंचा सिंधु कैंची लहरी । अचळास चळाची सरी ।
साचाऐसी वोडंबरी । मानू च नये ॥ ५० ॥
वोडंबरी हे कल्पना । नाना भास दाखवी जना ।
येरवी हे जाणा । ब्रह्म चि असे ॥ ५१ ॥
ऐसा वाद येकमेकां । लागतां राहिली आशंका ।
ते चि आतां पुढें ऐका । सावध होउनी ॥ ५२ ॥
माया मिथ्या कळों आली । परी ते ब्रह्मीं कैसी जाली ।
ह्मणावी ते निर्गुणें केली । तरी ते मुळीं च मिथ्या ॥ ५३ ॥
मिथ्या शब्दीं काहीं च नाहीं । तेथें केलें कोणें काई ।
करणें निर्गुणाचा ठाईं । हें हि अघटित ॥ ५४ ॥

१ अणु, यत्किंचित्. २ बरोबरी

कर्ता ठाईंचा अरूप । केलें तें हि मिथ्यारूप ।
तथापी फेडूं आक्षेप । श्रोतयांचा ॥ ५५ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सूक्ष्मआशंकानाम समास दुसरा ॥ २ ॥

ह. ता.

॥ श्रीराम ॥

अरे जें जालें चि नाहीं । त्याची वार्ता पुससी काई ।
तथापि सांगों जेणें काहीं । संशय तुटे ॥ १ ॥
दोरीकारितां भुजंग । जळाकारिता तरंग ।
मार्तंडाकारितां चांगें । मृगजळ वाहे ॥ २ ॥
कल्पनेकारितां स्वप्न दिसे । सिंपीकारितां रुपें भासे ।
जळाकारितां गार वसे । निमिष्य येक ॥ ३ ॥
मातीकारितां भिंती जाली । सिंधुकारिता लहरी आली ।
तिळाकारितां पुतळी । दिसों लागे ॥ ४ ॥
सोन्याकारिता आळंकार । ततुकारितां जालें चीरें ।
कासवा कारितां विस्तार । हातापायांचा ॥ ५ ॥
तूप होतें तें थिजलें । तोयाकारितां मीठ जालें ।
बिंबाकारितां बिंबलें । प्रतिबिंब ॥ ६ ॥
पृथ्वीकारितां जालें झाड । झाडाकारितां छाया वाड ।
धातुकारिता पवाड । उंच नीच वर्णाचा ॥ ७ ॥
आतां असो हा दृष्टांत । अद्वैतास कैंचें द्वैत ।
द्वैतेंविण अद्वैत । बोलतां च न ये ॥ ८ ॥
भासाकारितां भास भासे । दृश्याकारतां अदृश्य दिसे ।
अदृश्यास उपमा नसे । ह्मणोनि निरोपम ॥ ९ ॥
कल्पनेविरहित हेत । दृश्यावेगळा दृष्टांत ।
द्वैतावेगळें द्वैत । कैसें जालें ॥ १० ॥

१ मुळें, योगानें, आहे ह्मणून २ सर्प. ३ लहरी. ४ सूर्य ५ चांगलें. ६ डोळ्यांतली कृष्णतारा. ७ वस्त्र. ८ ह्मणून. ९ खाडी. १० थोरी. ११ अद्वैत ?

विचित्र भगवंताची करणी । वर्णवेना सहस्रफणी ।
तेणें केली उभवणी । अनंत ब्रह्मांडाची ॥ ११ ॥
परमात्मा परमेश्वरु । सर्वकर्ता[1] जो ईश्वरु ।
तयापासूनि विस्तारु । सकळ जाला ॥ १२ ॥
ऐसीं अनंत नामें धरी । अनंत शक्ती निर्माण करी ।
तो चि जाणावा चतुरीं । मूळपुरुष[2] ॥ १३ ॥
त्या मूळपुरुषाची वोळखण । ते मूळमाया चि आपण ।
सकळ कांहीं कर्तेपण । तेथें चि आलें ॥ १४ ॥
॥ श्लोक ॥ कार्यकारणकर्तृत्वे हेतुः प्रकृतिरुच्यते ॥ ५ ॥
हें उघड बोलतां न ये । मोडों पाहातो उपाये ।
येरवीं हें पाहातां काय । साच[3] आहे ॥ १५ ॥
देवापासून सकळ जालें । हें सर्वांस मानलें ।
परी त्या देवास वोळखिलें । पाहिजे कीं ॥ १६ ॥
सिद्धांचें जें निरूपण । तें साधकांस न मने जाण ।
पक्क नाहीं अंतःकर्ण । ह्मणोनिया ॥ १७ ॥
अविद्यागुणें बोलिजे जीवें[4] । मायागुणें बोलिजे शिवें[5] ।
मूळमायागुणें देव । बोलिजेतो ॥ १८ ॥
ह्मणौनि कारण मूळमाया । अनंत शक्ती धरावया ।
तेथीचा अर्थ जाणावया । अनुभवी पाहिजे ॥ १९ ॥

---

१ " सकळ " होतें, हरताळ लावून " सर्व " केलें. २ मूळपुरुष=मूळमाया=मायाविशिष्ट ईश्वर=शबल ब्रह्म. ३ " अद्वैतास कैंचें द्वैत " असें वर ह्मटलें आहे त्याचा अर्थ असा कीं, अद्वैत वस्तुला दृष्टांत कसा देता येईल ? दृष्टांताची कल्पना करणें ह्मणजे च द्वैत कबूल करण्यासारखें होतें. द्वैत उभारल्यावाचून दृष्टांत देतां च येणार नाहीं अद्वैत. वस्तूच्या ठिकाणीं द्वैत कसें संभवणार ? परंतु असें उघड बोलणें बरें नव्हे. कारण, द्वैत नाहीं ह्मटल्यावर बोलणें चालणें, श्रवण मनन इत्यादि सर्व नष्ट होतें आणि अशी कल्पना झाली ह्मणजे ब्रह्मप्राप्तीचा उपाय च खुटतो बाकी खरें पाहूं गेल्यास श्रवणमननादि आपल्या क्रियेंत सत्य काय आहे ? ४ पिंडरूप उपाधी ज्याला आहे तो जीव. ५ ब्रह्मांडाची उपाधी ज्यानें धारण केली आहे तो शिव.

मूळमाया तो चि मूळपुरुष । तो चि सर्वांचा ईश ।
अनंतनामी जगदीश । तयासी च बोलिजे ॥ २० ॥
अवघी माया विस्तारली । परी हे निशेष नाथिली ।
ऐसिया वचनाची खोली । विरुळा जाणे ॥ २१ ॥
ऐसें अनुर्वाच्य बोलिजे । परी हें स्वानुभवें जाणिजे ।
संतसंगेंविण नुमजे । कांहीं केल्यां ॥ २२ ॥
माया तो चि मूळपुरुष । साधकां न मने हें निशेष ।
परी अनंतनामी जगदीश । कोणास ह्मणावें ॥ २३ ॥
नामरूप माये लागलें । तरी हें बोलणें नीट चि जालें ।
येथें श्रोतीं अनुमानिलें । कासयासी ॥ २४ ॥
आतां असो हे सकळ बोली । मागील आशंका राहिली ।
निराकारीं कैसी जाली । मूळमाया ॥ २५ ॥
दृष्टीबंधनें मिथ्या सकळ । परी तो कैसा जाला खेळ ।
हें चि आतां अवघें निवळ । करून दाऊं ॥ २६ ॥
आकाश असतां निश्चळ । मधें वायो जाला चंचळ ।
तैसी जाणावी केवळ । मूळमाया ॥ २७ ॥
रूप वायोचें जालें । तेणें आकाश भंगलें ।
ऐसें हें सत्य मानलें । नवचे किं कदा ॥ २८ ॥
तैसी मूळमाया जाली । आणी निर्गुणता सचली ।
येणें दृष्टांतें तुटली । मागील आशंका ॥ २९ ॥
वायु नव्हता पुरातन । तैसी मूळमाया जाण ।
साच ह्मणतां पुन्हा लीन । होतसे ॥ ३० ॥
वायो रूपें कैसा आहे । तैसी मूळमाया पाहें ।
भासे परी तें न लाहे । रूप तयेचें ॥ ३१ ॥
वायो सत्य ह्मणों जातां । परी तो न ये दाखवितां ।
तयाकडे पाहों जातां । धुळी च दिसे ॥ ३२ ॥

१ मिथ्या, नाशवंत, लटकी. २ इंद्रजालविद्या, गारुड्याचा खेळ.

तैसी मूळमाया भासे । भासे परी ते न दिसे ।
पुढें विस्तारली असे । माया अविद्या ॥ ३३ ॥
जैसें वायोचेनि योगें । दृश्य उडे गगनमार्गें ।
मूळमायेच्या संयोगें । तैसें जग ॥ ३४ ॥
गगनीं अभ्र[1]ळ नाथिलें । अकस्मात उद्भवलें ।
मायेचेनि गुणें जालें । तैसें जग ॥ ३५ ॥
नाथिलें चि गगन नव्हतें । अकस्मात आलें तेथें ।
तैसें दृश्य जालें येथें । तैसियापरी ॥ ३६ ॥
परी त्या अभाळाकारितां । गगनाची गेली निश्चळता ।
वाटे परी ते तत्वता । तैसी च आहे ॥ ३७ ॥
तैसें मायेकारितां निर्गुण । वाटे जालें सगुण ।
परी तें पाहतां संपूर्ण । जैसें तैसें ॥ ३८ ॥
अभाळ आलें आणि गेलें । तरी गगन तें संचलें ।
तैसें गुणा नाहीं आलें । निर्गुण ब्रह्म ॥ ३९ ॥[2]
नभ माथां लागलें दिसे । परी तें जैसें तैसें असे ।
तैसें जाणावें विश्वासें । निर्गुण ब्रह्म ॥ ४० ॥
ऊर्ध्व पाहातां आकाश । निळिमा[3] दिसे सावकास ।
परी तो जाणिजे मिथ्या भास । भासलासे ॥ ४१ ॥
आकाश पालथें घातलें । चहूंकडे आटोपलें ।
वाटे विश्वास कोंडिलें । परी तें मोकळें चि असे ॥ ४२ ॥
पर्वतीं निळा रंग दिसे । परी तो तया लागला नसे ।
अलिप्त जाणावें तैसें । निर्गुण ब्रह्म ॥ ४३ ॥
रथ धावतां पृथ्वी चंचळ । वाटे परी ते असे निश्चळ ।
तैसें परब्रह्म केवळ । निर्गुण जाणावें ॥ ४४ ॥

---

१ अभ्र, ढग २ गगनाच्या ठिकाणीं नश्वर ढग नसतां जसे ते एकाएकीं उद्भवतात, तद्वत् ब्रह्माच्या ठिकाणीं हि लटकी माया उत्पन्न होते परंतु ढग आले आणि गेले तरी गगन जसें निश्चळ असतें तद्वत् मायेपासून ब्रह्माला कांहीं गुणत्व येत नाहीं ३ निळेपणा.

अभाळाकरिता मयंक । वाटे धावतो निशंक ।
परी तें अवघें माईक । अभाळ चळे ॥ ४५ ॥
झळे अथवा अग्निज्वाळ । तेणें कंपित दिसे अंत्राळ ।
वाटे परी तें निश्चळ । जैसें तैसें ॥ ४६ ॥
तैसें स्वरूप हें संचलें । असता वाटे गुणा आलें ।
ऐसें कल्पनेसि गमलें । परी तें मिथ्या ॥ ४७ ॥
दृष्टिबंधनाचा खेळ । तैसी माया हे चंचळ ।
वस्तु शाश्वत निश्चळ । जैसी तैसी ॥ ४८ ॥
ऐसी वस्तु निरावेव । माया दाखवी अवेव ।
ईचा ऐसा च स्वभाव । नाथिली च हे ॥ ४९ ॥
माया पाहातां मुळीं च नसे । परी हे साचाऐसी भासे ।
उद्भवे आणि निरसे । अभाळ जैसें ॥ ५० ॥
ऐसी माया उद्भवली । वस्तु निर्गुण संचली ।
अहं ऐसी स्फूर्ति जाली । ते चि माया ॥ ५१ ॥
गुणमायेचे पवाडे । निर्गुणीं हें कांहीं च न घडे ।
परी हें घडे आणी मोडे । सत्स्वरूपीं ॥ ५२ ॥
जैसी दृष्टी तरळली । तेणें सेना च भासली ।
पाहातां आकाशीं च जाली । परी ते मिथ्या ॥ ५३ ॥
मिथ्या मायेचा खेळ । उद्भव बोलिला सकळ ।
नाना तत्वांचा पाल्हाळ । साङ्गूनियां ॥ ५४ ॥
तत्वें मुळीं च आहेती । ओंकार वायोची गती ।
तेथीचा अर्थ जाणती । दक्ष ज्ञानी ॥ ५५ ॥

---

१ चंद्र २ प्रखर, उष्ण वारा. ३ वातावरण. ४ " मी एक आहें तो बहुविध व्हावें " अशी ब्रह्माच्या ठिकाणीं होणारी स्फूर्ति ५ गुणमायेचा हा सर्व पसारा आहे निर्गुणाच्या ठिकाणीं हें काहीं च घडत नाहीं, तर निर्गुणाच्या साक्षित्वानें किंवा अधिष्ठानामुळें हें सर्व घडत आणि मोडत आहे, जसें दोरीचें अधिष्ठान असतें म्हणून भुजंग भासतो पण वस्तुतः दोरी जशीच्या तशी च असते.

मूळमायेचें चळण । तें चि वायोचें लक्षण ।
सूक्ष्म तत्वें तें चि जाण । जडत्वा पावलीं ॥ ५६ ॥
ऐसीं पंचमाहांभूतें । पूर्वीं होतीं अवेक्तें ।
पुढें जालीं वेक्तें । सृष्टिरचनेसी ॥ ५७ ॥
मूळमायेचें लक्षण । तें चि पंचभूतिक जाण ।
त्याची पाहें वोळखण । सूक्ष्मदृष्टीं ॥ ५८ ॥
आकाश वायोविण । इछ्याशब्द करी कोण ।
इछाशक्ति ते चि जाण । तेजस्वरूप ॥ ५९ ॥
मृदपण तें चि जळ । जडत्व पृथ्वी केवळ ।
ऐसी मूळमाया सकळ । पंचभूतिक जाणावी ॥ ६० ॥
येक येक भूतांपोटीं । पंचभूतांची राहाटी ।
सर्व कळे सूक्ष्मदृष्टी । घालून पाहातां ॥ ६१ ॥
पुढें जडत्वास आलीं । तरी असतीं कालवलीं ।
ऐसी माया विस्तारली । पंचभूतिक ॥ ६२ ॥
मूळमाया पाहाता मुळीं । अथवा अविद्या भूमंडळीं ।
स्वर्ग मृत्य पाताळीं । पांच चि भूतें ॥ ६३ ॥
॥ श्लोक ॥ स्वर्गे मृत्यौ पाताले वा यत्किंचित्सचराचरं ।
सर्वं पंचभूतकं राम षष्ठं किंचिन्न दृश्यते ॥ छ ॥
सत्य स्वरूप आदिअंतीं । मध्यें पंचभूतें वर्तती ।
पंचभूतिक जाणिजे श्रोतीं । मूळमाया ॥ ६४ ॥
येथें उठिली आशंका । सावध होऊन ऐका ।
पंचभूतें जालीं येका । तमोगुणापासुनी ॥ ६५ ॥
मूळमाया गुणापरती । तेथें भूतें कैचीं होतीं ।
ऐसी आशंका हे श्रोतीं । घेतली मागां ॥ ६६ ॥

---

१ आत्म्याच्या ठिकाणीं. आत्म्याच्या ठिकाणची मूळमाया किंवा या भूतलावरील अविद्या हीं उभयता पंचभूतात्मक च आहेत. पंचभूताशिवाय स्वर्गमृत्युपाताल या ठिकाणीं दुसरें कांहीं नाहीं.

ऐसें श्रोतीं आक्षेपिलें । संशयास उभें केलें ।
याचें उत्तर दिधलें । पुढिले समासीं ॥ ६७॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सूक्ष्मआशंकानाम समास तिसरा ॥ ३ ॥

---

॥ श्रीराम ॥

मागील आशंकेचें मूळ । आता होईल प्रांजळ ।
वृत्ति करावी निवळ । निमिष्य येक ॥ १ ॥
ब्रह्मीं मूळमाया जाली । तिच्या पोटा मायां[1] आली ।
मग ते गुणा प्रसवली । म्हणौनि गुणक्षोभिणी ॥ २ ॥
पुढें तिजपासोव[2] कोण । सत्वरजतमोगुण ।
तमोगुणापासून निर्माण । जालीं पंचभूतें ॥ ३ ॥
ऐसीं भूतें उद्भवलीं । पुढें तत्वें विस्तारलीं[3] ।
एव तमोगुणापासून जालीं । पंचमाहांभूतें ॥ ४ ॥
मूळमाया गुणापरतीं । तेथें भूतें कैचीं होतीं ।
ऐसी आशंका हे श्रोतीं । घेतली मागां ॥ ५ ॥
आणीक येक येके भूतीं । पंचभूतें असतीं ।
ते हि आतां कैसी स्थिती । प्रांजळ करू ॥ ६ ॥
सूक्ष्मदृष्टीचें कौतुक । मूळमाया पंचभूतिक ।
श्रोतीं विमळ विवेक । केला पाहिजे ॥ ७ ॥
आधीं भूतें तों जाणावीं । रूपें कैसीं वोळखावीं ।
मग तें शोधून पाहावीं । सूक्ष्मदृष्टीं ॥ ८ ॥
वोळखी नाहीं अंतरीं । ते वोळखावी कोणेपरी ।
म्हणोनि भूतांची वोळखी चतुरीं । नीवेक[4] परिसावी ॥ ९ ॥
जें जें जड आणी कठिण । तें तें पृथ्वीचें लक्षण ।
मृद आणी वोलेपण । तितुकें आप ॥ १० ॥

---

१ "गुणमाया" असें होतें, त्यातील "गुण" शब्द खोडला आहे. २ पासून. ३ तमोगुणापासून प्रथम सूक्ष्म अशीं भूतें निर्माण झालीं व त्यांचा च निस्तार होऊन सृष्टीच्या रूपानें तीं जडत्व पावलीं. ४ क्षणभर.

जें जें उष्ण आणी सतेज । तें तें जाणावें पैं तेज ।
आतां वायो हि सहज । निरोपिजेल ॥ ११ ॥
चैतन्य आणी चचळ । तो हा वायो चि केवळ ।
सुन्य आकाश निश्चळ । आकाश जाणावें ॥ १२ ॥
ऐसीं पचमाहांभूतें । वोळखी धरावी सकेतें ।
आतां येकीं पांच भूतें । सावध ऐका ॥ १३ ॥
जे त्रिगुणाहूनि परं । त्याचा सूक्ष्म विचार ।
याल्लागीं अति तत्पर । होऊन ऐका ॥ १४ ॥
सूक्ष्म आकाशीं कैसी पृथ्वी । ते चि आधीं निरोपावी ।
येथें धारणा धरावी । श्रोतेजनीं ॥ १५ ॥
आकाश ह्मणजे अवकाश सुन्य । सुन्य ह्मणिजे तें अज्ञान
अज्ञान ह्मणिजे जडत्व जाण । ते चि पृथ्वी ॥ १६ ॥
आकाश स्वयें आहे मूढ । तें चि आप स्वतासिद्ध ।
आतां तेज तें हि विशद । करून दाऊं ॥ १७ ॥
अज्ञानें भासला भास । तो चि तेजाचा प्रकाश ।
आतां वायो सावकाश । साकल्य सांगों ॥ १८ ॥
वायु आकाशा नाहीं भेद । आकाशाइतुका असे स्तब्ध ।
तथापी आकाशीं जो निरोधं । तो चि वायो ॥ १९ ॥
आकाशीं आकाश मिसळलें । हें तों नलगे कि बोलिलें ।
येणें प्रकारें निरोपिलें । आकाश पचभूत ॥ २० ॥
वायोमध्यें पचभूतें । ते हि ऐका येकचित्तें ।
बोलिजेती ते समस्तें । येथान्वयें ॥ २१ ॥
हळु फूल तरी जड । हळु वारा तरी निबिड ।
वायो लागतां कडाड । मोडती झाडें ॥ २२ ॥

---

१ त्रिगुणाच्या पलिकडची माया आहे. तिच्या संबंधाचा विचार सूक्ष्म आहे.
२ अटकाव, प्रतिरोध.

तोलेंविण झाड मोडे । ऐसें हें कांहिं च न घडे ।
तोल तो चि तयें जडे । पृथ्वीचा अंश ॥ २३ ॥
येथें श्रोते आशंका घेती । तेथें कैचीं झाडें होतीं ।
झाडें नव्हतीं तरी शक्ती । कठिणरूप आहे ॥ २४ ॥
वन्हीस्फुलिंग लाहान । कांहीं तन्ही असे उष्ण ।
तैसें सूक्ष्मीं जडपण । सूक्ष्मरूपें ॥ २५ ॥
मृदपण तें चि आप । भास तेजाचें स्वरूप ।
वायो तेथ चंचळरूप । सहज चि आहे ॥ २६ ॥
सकळास मिळोन आकाश । सहज चि आहे अवकाश ।
पंचभूतांचे अंश । वायोमधें निरोपिले ॥ २७ ॥
आतां तेजाचें लक्षण । भासलेंपण तें कठिण ।
तेजीं ऐसी वोळखण । पृथ्वीयेची ॥ २८ ॥
भासला भास वाटे मृद । तेजीं आप तें चि प्रसिद्ध ।
तेजीं तेज स्वतासिद्ध । सांगणें चि नलगे ॥ २९ ॥
तेजीं वायो तो चंचळ । तेजीं आकाश निश्चळ ।
तेजीं पंचभूतें सकळ । निरोपिलीं ॥ ३० ॥
आतां आपाचें लक्षण । आप तें चि जें मृदपण ।
मृदपण तें कठिण । तें चि पृथ्वी ॥ ३१ ॥
आपीं आप सहज चि असे । तेज मृदपणें भासे ।
वायो स्तब्धपणें दिसे । मृदत्वाआंगीं ॥ ३२ ॥
आकाश नलगे सांगावें । तें व्यापक चि स्वभावें ।
आपीं पंचभूतांचीं नांवें । सूक्ष्में निरोपिलीं ॥ ३३ ॥
आतां पृथ्वीचें लक्षण । कठिण पृथ्वी आपण ।
कठिणत्वीं मृदपण । तें चि आप ॥ ३४ ॥
कठिणत्वाचा जो भास । तो चि तेजाचा प्रकाश ।
कठिणत्वीं निरोधाश । तो चि वायो ॥ ३५ ॥

---

१ कधीं च. २ तोल हा च वायुमध्यें पृथ्वीचा जड अंश. ३ श्रोते म्हणतात कीं, वायुमध्यें पृथ्वीचा अंश कसा आहे तो सांगतांना हीं झाडें मध्यें कशाला आणतां? सद्गुरु म्हणतात, बरें, झाडें नकोत, पण वायूच्या ठिकाणीं कांहीं शक्ति आहे कीं नाहीं? आहे. शक्ति म्हणजे काठिण्य, तो च पृथ्वीचा अंश.

आकाश सकळांस व्यापक । हा तों प्रगट चि विवेक ।
आकाशीं च कांहीं येक । भास भासे ॥ ३६ ॥
आकाश तोडितां तुटेना । आकाश फोडितां फुटेना ।
आकाश परतें होयना । तिळमात्र ॥ ३७ ॥
असो आतां पृथ्वीअंत । दाविला भूतांचा संकेत ।
येक भूतीं पंचभूत । तें हि निरोपिलें ॥ ३८ ॥
परी हें आहाच पाहातां नातुडे । बळें चि पोटीं संदेह पडे ।
अतिरूपें अहंता चढे । अकस्मात ॥ ३९ ॥
सूक्ष्मदृष्टीनें पाहातां । वायो चि वाटे तत्वता ।
सूक्ष्म वायो शोधूं जातां । पंचभूतें दिसती ॥ ४० ॥
एवं पंचभूतिक पवन । ते चि मूळमाया जाण ।
माया आणी सूक्ष्म त्रिगुण । ते हि पंचभूतिक ॥ ४१ ॥
भूतें गुण मेळविजे । त्यासी अष्टधा बोलिजे ।
पंचभूतिक जाणिजे । अष्टधा प्रकृती ॥ ४२ ॥
शोधून पाहिल्यावीण । संदेह धरणें मूर्खपण ।
याची पाहावी वोळखण । सूक्ष्मदृष्टीं ॥ ४३ ॥
गुणापासुनी भूतें । पावलीं पष्ट दशेतें ।
जडत्वा येऊन समस्तें । तत्वें जालीं ॥ ४४ ॥
पुढें तत्वविवेचना । पिंडब्रह्मांड तत्वरचना ।
बोलिली असे ते जना । प्रगट चि आहे ॥ ४५ ॥
हा भूतकर्दम बोलिला । सूक्ष्म संकेतें दाविला ।
ब्रह्मगोळ उभारला । तत्पूर्वीं ॥ ४६ ॥

---

1 मूळमाया पंचभूतिक आहे, परंतु हीं पंचभूतें मूळमायेंत सूक्ष्मरूपानें आहेत. नंतर मग गुणमाया, त्रिगुण सूक्ष्मभूतें व स्पष्ट भूतें क्रमाक्रमानें निर्माण झालीं. परंतु वर एका मताच्या ठिकाणीं पंचभूतें आहेत असा जो कर्दम सांगितला, तो सूक्ष्म भूतांचा होय, त्या वेळीं हें ब्रह्मांड निर्माण झालें नव्हतें. "उभारला । तत्पूर्वीं" = उभारण्याच्या पूर्वी.

या ब्रह्मांडापैलिकडिल गोष्टी । जैं जाली नव्हती सृष्टी ।
मूळमाया सूक्ष्मदृष्टीं । वोळखावी ॥ ४७ ॥
सप्तकचुक[1] प्रचंड । जालें नव्हतें ब्रह्मांड ।
मायेअविद्येचें[2] बंड । ऐलिकडे ॥ ४८ ॥
ब्रह्मा विष्णु महेश्वर । हा ऐलिकडिल विचार ।
पृथ्वी मेरु सप्त सागर । ऐलिकडे ॥ ४९ ॥
नाना लोक नाना स्थानें । चद्र सूर्य तारांगणें ।
सप्त द्वीपें चौदा भुवनें । ऐलिकडे ॥ ५० ॥
शेष कूर्म सप्त पाताळ । येकविस स्वर्गें अष्ट दिग्पाळ ।
तेतिस कोटी देव सकळ । ऐलिकडे ॥ ५१ ॥
बारा आदित्य अक्रा रुद्र । नव नाग सप्त ऋषेश्वर ।
नाना देवांचे अवतार । ऐलिकडे ॥ ५२ ॥
मेघ मनु चक्रवती । नाना जीवांची उत्पती ।
आतां असो सांगों किती । विस्तार हा ॥ ५३ ॥
सकळ विस्ताराचें मूळ । ते मूळमाया च केवळ ।
मागां निरोपिली सकळ । पंचभूतिक ॥ ५४ ॥
सूक्ष्मभूतें जे बोलिलीं । ते चि पुढें जडत्वा आलीं ।
ते सकळ हि बोलिलीं । पुढिले समासीं ॥ ५५ ॥
पचभूतें पृथक्‌ाकारें । पुढें निरोपिलीं विस्तारें ।
बोळखीकारणें अत्यादरें । श्रोतीं श्रवण करावीं ॥ ५६ ॥
पंचभूतिक ब्रह्मगोळ । जेणें कळे हा प्राजळ ।
दृश्य सांडून केवळ । वस्तु च पाविजे ॥ ५७ ॥
माहाद्वार वोलांडावें । मग देवदर्शन घ्यावें ।
तैसें दृश्य हें सांडावें । जाणोनियां ॥ ५८ ॥

---

१ पंचतत्त्वें+अहंकार+महत्तत्त्व=सप्तकंचुकयुक्त त्रैलोक्य. २ मुळांत “ • यचें”

ह्मणोनि दृश्याचा पोटीं । आहे पंचभूतांची दाटी ।
येकपणें पडिली मिठी । दृश्य पंचभूतां ॥ ५९ ॥[1]
एवं पंचभूतांचें चि दृश्य । सृष्टी रचली सावकास ।
श्रोतीं करून अवकाश । श्रवण करावें ॥ ६० ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सूक्ष्मपंचभूतेंनिरूपणनाम समास चतुर्थ ४

---

॥ श्रीराम ॥

केवळ मूर्ख तें नेणे । म्हणौन घडलें सांगणें ।
पंचभूतांचीं लक्षणें । विशद करूनि ॥ १ ॥
पंचभूतांचा कर्दम जाला । आतां नवचे वेगळा केला ।
परंतु कांहीं येक वेगळाला । करून दाऊं ॥ २ ॥
पर्वत पाषाण शिळा शिखरें । नाना वर्णें लाहान थोरें ।
खडे गुंडे बहु प्रकारें । जाणिजे पृथ्वी ॥ ३ ॥
नाना रंगांची मृत्तिका । नाना स्थळांस्थळीं जे कां ।
वाळुकें वाळु अनेका । मिळोन पृथ्वी ॥ ४ ॥
पुरें पट्टणें मनोहरें । नाना मंदिरें दामोदरें[2] ।
नाना देवाळयें शिखरें । मिळोन पृथ्वी ॥ ५ ॥
सप्त द्वीपावती पृथ्वी । काये ह्मणोनि सांगावी ।
नव खंडें मिळोन जाणावी । वसुंधरा ॥ ६ ॥
नाना देव नाना नृपती । नाना भाषा नाना रिती[3] ।
लक्ष च्यार्‍यासी उत्पत्ती । मिळोन पृथ्वी ॥ ७ ॥
नाना उद्वसें[4] जे वनें । नाना तरुवरांचीं वनें ।
गिरीकंदरें नाना स्थानें । मिळोन पृथ्वी ॥ ८ ॥
नाना रचना केली देवीं । जे जे निर्मिली मानवीं ।
सकळ मिळोन पृथ्वी । जाणिजे श्रोतीं ॥ ९ ॥

---

१ दृश्य आणि पंचभूतें हीं एक च आहेत. जें दृश्य आहे तें पंचभूतात्मक आहे व जें पंचभूतात्मक आहे तें दृश्य आहे. २ रत्नखचित मंदिरें. ३ नाना भाषा बोलणारे लोक व नाना रीतिरिवाजाचे लोक. ४ उदास, उध्वस्त, ओसाड.

नाना धातु सुवर्णादिक । नाना रत्नें जे अनेक ।
नाना काष्ठवृक्षादिक । मिळोन पृथ्वी ॥ १० ॥
आतां असो हें बहुवस । जडांश आणी कठिणांश ।
सकळ पृथ्वी हा विश्वास । मानिला पाहिजे ॥ ११ ॥
बोलिलें पृथ्वीचें रूप । आतां सांगिजेल आप ।
श्रोतीं वोळखावें रूप । सावध होउनी ॥ १२ ॥
वापी कूप सरोवर । नाना सरितांचें जें नीर ।
मेघ आणी सप्त सागर । मिळोन आप ॥ १३ ॥

श्लोकार्ध—क्षारक्षीरसुरासर्पिर्दधि इक्षुर्जलं तथा ॥ ७ ॥

क्षारसमुद्र दिसताहे । सकळ जन दृष्टीस पाहे ।
जेथें लवण होताहे । तो चि क्षारसिंधु ॥ १४ ॥
येक दुधाचा सागर । त्या नाव क्षीरसागर ।
देवें दिधला निरंतर । उपमन्यासी ॥ १५ ॥
येक समुद्र मद्याचा । येक जाणावा घृताचा ।
येक निवळ दह्याचा । समुद्र असे ॥ १६ ॥
येक उसाच्या रसाचा । येक तो शुद्ध जळाचा ।
ऐसा सातां समुद्रांचा । वेढा पृथ्वीयेसी ॥ १७ ॥
एवं भूमंडळीचें जळ । नाना स्थळींचें सकळ ।
मिळोन अवघें केवळ । आप जाणावें ॥ १८ ॥
पृथ्वीगर्भीं कितियेक । पृथ्वीतळीं आवर्णोदक ।
तिहीं लोकींचें उदक । मिळोन आप ॥ १९ ॥
नाना वल्ली बहुवस । नाना तरुवराचे रस ।
मध पारा अमृत विष । मिळोन आप ॥ २० ॥
नाना रस स्नेहादिक । या हि वेगळे अनेक ।
जळावेगळे अवश्यक । आप बोलिजे ॥ २१ ॥

---

१ आवरणोदक, सप्त समुद्राचा वेढा २ जल तेवढें च आप असें नसून जला-वेगळे सर्व सार्द्र पदार्थ हि आप च

सारंद्र आणी सीतळ । जळासारिखें पातळ ।
शुक्लीतें श्रोणीतें मूत्र लाळ । आप बोलिजे ॥ २२ ॥
आप संकेतें जाणावें । पातळ बोलें वोळखावें ।
मृद सीतळ स्वभावें । आप बोलिजे ॥ २३ ॥
जाला आपाचा संकेत । पातळ मृद गुळगुळित ।
स्वेद श्लेष्मा अश्रु समस्त । आप जाणावें ॥ २४ ॥
तेज ऐका सावधपणें । चंद्र सूर्य तारांगणें ।
दिव्य देह सतेजपणें । तेज बोलिजे ॥ २५ ॥
वन्ही मेघीं विद्युल्यता । वन्ही सृष्टी संव्हारिता ।
वन्ही सागरा जाळिता । वडवानळु ॥ २६ ॥
वन्ही शंकराचे नेत्रींचा । वन्ही काळाचे क्षुधेचा ।
वन्ही परीघ भूगोळाचा । तेज बोलिजे ॥ २७ ॥
जें जें प्रकाशरूप । तें तें तेजाचें स्वरूप ।
शोषक उष्णादि आरोप । तेज जाणावें ॥ २८ ॥
वायो जाणावा चंचळ । चैतन्य चेतवी केवळ ।
बोलणें चालणें सकळ । वायोमुळें ॥ २९ ॥
हाले डोले तितुका पवन । कांहीं न चले पवनेंविण ।
सृष्टी चाळाया कारण । मूळ तो वायो ॥ ३० ॥
चळण वळण आणी प्रासारण । निरोध आणी आकोचनें ।
सकळ जाणावा पवन । चंचळरूपी ॥ ३१ ॥
प्राण अपान आणी व्यान । चौथा उदान आणी समान ।
नाग कूर्म कर्कशें जाण । देवदत्त धनंजये ॥ ३२ ॥
जितुकें कांहीं हालतें चळण । तितुकें वायोचें लक्षण ।
चंद्र सूर्य तारांगण । वायो चि धर्ता ॥ ३३ ॥

---

१ सर्द, ओलें. २ रेत ३ रक्त. ४ आकुंचन ५ कृकल. नाग, कूर्म, कृकल, देवदत्त व धनंजय हे पांच उपप्राण आहेत.

आकाश जाणावें पोकळ । निर्मळ आणी निश्चळ ।
अवकाशरूप सकळ । आकाश जाणावें ॥ ३४ ॥
आकाश सकळास व्यापक । आकाश अनेकीं येक ।
आकाशामध्यें कौतुक । चहूं भूतांचें ॥ ३५ ॥
आकाशाऐसें नाहीं सार । आकाश सकळांहून थोर ।
पाहातां आकाशाचा विचार । स्वरूपासारिखा ॥ ३६ ॥
तव शिष्यें केला आक्षेप । दोहींचें सारिखें चि रूप ।
तरी आकाश चि स्वरूप । कां ह्मणों नये ॥ ३७ ॥
आकाश स्वरूपा कोण भेद । पाहातां दिसती अभेद ।
आकाश वस्तु च स्वतसिद्ध । कां न ह्मणावी ॥ ३८ ॥
वस्तु अचळ अढळ । वस्तु निर्मळ निश्चळ ।
तैसें चि आकाश केवळ । वस्तुसारिखें ॥ ३९ ॥
ऐकोनि वक्ता बोले वचन । वस्तु निर्गुण पुरातन ।
आकाशाआंगीं सप्त गुण । शास्त्रीं निरोपिले ॥ ४० ॥
काम क्रोध शोक मोहो । भय अज्ञान सुन्यत्व पाहो ।
ऐसा सप्तविध स्वभाव । आकाशाचा ॥ ४१ ॥
ऐसें शास्त्राकारें बोलिलें । ह्मणौनि आकाश भूत जालें ।
स्वरूप निर्विकार संचलें । उपमेरहित ॥ ४२ ॥
कांचबंदि[1] आणी जळ । सारिखें च वाटे सकळ ।
परी येक कांच येक जळ । शाहाणे जाणती ॥ ४३ ॥
रुवामध्यें स्फटिक पडिला । लोकीं तद्रूप देखिला ।
तेणें कपाळमोक्ष जाला । कापुस न करी ॥ ४४ ॥
तंदुळामधें श्वेत खडे । तंदुळासारिखे च वांकुडे ।
चाऊं जातां दांत पडे । तेव्हां कळे ॥ ४५ ॥
त्रिभागामध्ये[2] खडा असे । त्रिभागासारिखा च भासे ।
शोधूं जातां वेगळा दिसे । कठिणपणें ॥ ४६ ॥

---

१ काच बसविलेली जमीन. २ चुना, वाळू व ताग यांचा कर्दम.

गुळासारिखा गुळदगड । परी तो कठिण निचाडें ।
नागवांडी आणी वेखड । येक ह्मणों नये ॥ ४७ ॥
सोनें आणी सोनपिंवळ । येक चि वाटती केवळ ।
परी पितळेसी मिळतां ज्वाळ । काळिमा चढे ॥ ४८ ॥
असो हे हीन दृष्टांत । आकाश ह्मणिजे केवळ भूत ।
तें भूत आणी अनंत । येक कैसें ॥ ४९ ॥
वस्तुसी वर्ण चि नसे । आकाश शामवर्ण असे ।
दोहींस साम्यता कैसें । करिती विचक्षण ॥ ५० ॥
श्रोते ह्मणती कैंचें रूप । आकाश ठाईंचें अरूप ।
आकाश वस्तु च तद्रूप । भेद नाहीं ॥ ५१ ॥
च्यारी भूतांस नाश आहे । आकाश कैसें नासताहे ।
आकाशास न साहे । वर्ण वेक्ती विकार ॥ ५२ ॥
आकाश अचळ दिसतें । त्याचें काये नासों पाहातें ।
पाहातां आमुचेनि मतें । आकाश शाश्वत ॥ ५३ ॥
ऐसें ऐकोन वचन । वक्ता बोले प्रतिवचन ।
ऐक आतां लक्षण । आकाशाचें ॥ ५४ ॥
आकाश तमापासून जालें । म्हणौन कामक्रोधें वेष्टिलें ।
अज्ञान सुन्यत्व बोलिलें । नाम तयाचें ॥ ५५ ॥
अज्ञानें कामक्रोधादिक । मोहो भये आणी शोक ।
हा अज्ञानाचा विवेक । आकाशागुणें ॥ ५६ ॥
नास्तिक नकारवचन । तें चि सुन्याचें लक्षण ।
तयास ह्मणती हृदयसुन्य । अज्ञान प्राणी ॥ ५७ ॥
आकाश स्तब्धपणें सुन्य । सुन्य ह्मणिजे तें अज्ञान ।
अज्ञान ह्मणिजे कठिण । रूप तयाचें ॥ ५८ ॥
कठिण सुन्य विकारवंत । तयास कैसें म्हणावें संत ।
मनास वाटे हें तद्वत । आहाचें दृष्टीं ॥ ५९ ॥

---

१ केवळ, निखालस २ स्वरूपाप्रमाणे. ३ वर वर पाहिलें तर

अज्ञान कालवलें आकाशीं । तया कर्दमा ज्ञान नासी ।
म्हणोनिया आकाशासी । नाश आहे ॥ ६० ॥
तैसें आकाश आणी स्वरूप । पाहातां वाटती येकरूप ।
परी दोहींमधें विक्षेप । सुन्यत्वाचा ॥ ६१ ॥
आहाच पाहातां कल्पनेसी । सारिखें च वाटे निश्चयेंसीं ।
परी आकाश स्वरूपासी । भेद आहे ॥ ६२ ॥
उन्मनी आणी सुषुप्ति अवस्ता । सारिखे च वाटे तत्वता ।
परी विवचून पाहों जातां । भेद आहे ॥ ६३ ॥
खोटें खऱ्यासारिखें भाविती । परी परीक्षवंत निवडिती ।
कां कुरंगें देखोन भुलती । मृगजळासी ॥ ६४ ॥
आतां असो हा दृष्टांत । बोलिला कळाया संकेत ।
म्हणौनि भूत आणी अनंत । येक न्हेती ॥ ६५ ॥
आकाश वेगळेपणें पाहावें । स्वरूपीं स्वरूप चि व्हावें ।
वस्तुचें पाहाणें स्वभावें । ऐसें असे ॥ ६६ ॥
येथें आशंका फिटली । संदेहवृत्ती मावळली ।
भिन्नपणें नवचे अनुभवली । स्वरूपस्थिती ॥ ६७ ॥
आकाश अनुभवा येतें । स्वरूप अनुभवापरतें ।
म्हणोनियां आकाशातें । साम्यता न घडे ॥ ६८ ॥
धुग्धासारिखा[३] जळाश । निवडूं जाणती राजहस ।
तैसें स्वरूप आणी आकाश । संत जाणती ॥ ६९ ॥
सकळ माया गथागोवी । सतसगें हे उगवावी ।
पाविजे मोक्षाची पदवी । सत्समागमें ॥ ७० ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे स्थूळपंचमाहाभूतें-
स्वरूपाकाशभेदोनाम समास पंचम ॥ ५ ॥

---

अडथळा, विघ्न आकाशाच्या ठिकाणीं शून्यत्व, अज्ञानत्व आहे, तें स्वरूपीं नाहीं, असा स्वरूप व आकाश यांच्यात फरक आहे २ आकाशापासून भिन्न जे आपण त्या आपणास आकाश समजतें, परंतु स्वरूपाच्या ठिकाणीं लीन झाल्याशिवाय स्वरूपाचा अनुभव येत नाहीं. स्वरूप पाहावयाचें ह्मणजे तद्रूप व्हावयाचें, असें च हें स्वरूपाचें पाहणें आहे त्यापासून भिन्न राहून त्या स्वरूपाचा अनुभव येणें नाहीं.
३ दुग्धासारिखा

॥ श्रीराम ॥

श्रोता विनवी वक्तयासी । सत्संगाची महिमा कैसी ।
मोक्ष लाभे किती दिवसीं । हें मज निरोपावें ॥ १ ॥
धरितां साधूची संगती । कितां दिवसां होते मुक्ती ।
हा निश्चय कृपामूर्ती । मज दीनास करावा ॥ २ ॥
मुक्ती लाभे तत्क्षणीं । विश्वासतां निरूपणीं ।
दुश्चीतपणें हानी । होतसे ॥ ३ ॥
सुचितपणें दुश्चीत । मन होतें अकस्मात ।
त्यास करावें निवांत । कोणे परीं ॥ ४ ॥
मनाच्या तोडून वोढी । श्रवणीं बैसावें आवडीं ।
सावधपणें घडीनें घडी । काळ सार्थक करावा ॥ ५ ॥
अर्थप्रमय ग्रथांतरीं । शोधून घ्यावें अभ्यांतरीं ।
दुश्चीतपण आलें तरी । पुन्हा श्रवण करावें ॥ ६ ॥
अर्थांतर पाहिल्याविण । उगें चि करी जो श्रवण ।
तो श्रोता नव्हे पाषाण । मनुष्यवेषें ॥ ७ ॥
येथें श्रोते मानितील सीण । आम्हांस केलें पाषाण ।
तरी पाषाणाचें लक्षण । सावध ऐका ॥ ८ ॥
वांकुडा तिकडा फोडिला । पाषाण घडून नीट केला ।
दुसरे वेळेसी पाहिला । तरी तो तैसा चि असे ॥ ९ ॥
टाकीनें खपली फोडिली । ते मागुती नाहीं जडली ।
मनुष्याची कुबुद्धि झाडिली । तरी ते पुन्हा लागे ॥ १० ॥
सागता अवगुण गेला । पुन्हा मागुता जडला ।
याकारणें माहांभला । पाषाणगोटा ॥ ११ ॥
ज्याचा अवगुण झडेना । तो पाषाणाहून उणा ।
पाषाण आगळा जाणा । कोटिगुणें ॥ १२ ॥

---

१ कांहीं वेळ सुचित्त व पुन्हां कांहीं वेळ दुश्चित्त दुश्चित्त=आपणास काय करावयाचें आहे व आपण काय करीत आहोंत याचें काहीं च भान नसून केवळ आयुष्यक्रमण करणें २ अर्थ व प्रमेय प्रमेय=सिद्धांत

कोटिगुणें कैसा पाषाण । त्याचें हि ऐका लक्षण ।
श्रोतीं करावें श्रवण । सावध होउनी ॥ १३ ॥
माणीक मोतीं प्रवाळ । पाचि वैडूर्य वैज्ञनीळ ।
गोमेदमणी परिस केवळ । पाषाण बोलिजे ॥ १४ ॥
या हि वेगळे बहुत । सूर्यकांत सोमकांत ।
नाना मोहरे सप्रचित । औषधाकारणें ॥ १५ ॥
या हि वेगळे पाषण भले । नाना तीर्थी जे लागले ।
वापी कूप सेखीं जाले । हरिहरमूर्ती ॥ १६ ॥
याचा पाहाता विचार । पाषाणाऐसें नाहीं सार ।
मनुष्य तें काये पामर । पाषाणापुढें ॥ १७ ॥
तरी तो ऐसा नव्हे पाषाण । जो अपवित्र निःकारण ।
तयासारिखा देह जाण । दुश्चीत अभक्ताचा ॥ १८ ॥
आतां असो हें बोलणें । घात होतो दुश्चीतपणें ।
दुश्चीतपणाचेनि गुणें । प्रपंच ना परमार्थ ॥ १९ ॥
दुश्चीतपणें कार्य नासे । दुश्चीतपणें चिंता वसे ।
दुश्चीतपणें स्मरण नसे । क्षण येक पाहातां ॥ २० ॥
दुश्चीतपणें शत्रुंजिणें । दुश्चीतपणें जन्ममरणें ।
दुश्चीतपणाचेनि गुणें । हानी होये ॥ २१ ॥
दुश्चीतपणें नव्हे साधन । दुश्चीतपणें न घडे भजन ।
दुश्चीतपणें नव्हे ज्ञान । साधकांसी ॥ २२ ॥
दुश्चीतपणें नव्हे निश्चयो । दुश्चीतपणें न घडे जयो ।
दुश्चीतपणें होये क्षयो । आपुल्या स्वहिताचा ॥ २३ ॥
दुश्चीतपणें न घडे श्रवण । दुश्चीतपणें न घडे विवरण ।
दुश्चीतपणें निरूपण । हातींचें जाये ॥ २४ ॥
दुश्चीत बैसला चि दिसे । परी तो अमत चि नसे ।
चंचळ चक्रीं पडिलें असे । मानस तयाचें ॥ २५ ॥

---

१ हिरा. २ मोहरा=औषधीमणी. ३ शत्रू हून जिंकलें जाणें.

वेडें पिशाच्य निरंतर । अंध मुकें आणी बधिर ।
तैसा जाणावा संसार । दुश्चीत प्राणियांचा ॥ २६ ॥
सावध असोन उमजेना । श्रवण असोन ऐकेना ।
ज्ञान असोन कळेना । सारासारविचार ॥ २७ ॥
ऐसा जो दुश्चीत आळसी । परलोक कैंचा त्यासी ।
जयाचे जिवीं अहिर्निशीं । आळस वसे ॥ २८ ॥
दुश्चीतपणापासूनि सुटला । तरी तो सर्व च आळस आला ।
आळसाहातीं प्राणीयांला । उसंत चि नाहीं ॥ २९ ॥
आळसें राहिला विचार । आळसें बुडाला आचार ।
आळसें नव्हे पाठांतर । कांहीं केल्या ॥ ३० ॥
आळसें घडेना श्रवण । आळसें नव्हे निरूपण ।
आळसें परमार्थाची खूण । मळिण जाली ॥ ३१ ॥
आळसें नित्यनेम राहिला । आळसें अभ्यास बुडाला ।
आळसें आळस वाढला । असंभाव्य ॥ ३२ ॥
आळसें गेली धारणा धृती । आळसें मळिण जाली वृत्ती ।
आळसें विवेकाची गती । मंद्र जाली ॥ ३३ ॥
आळसें निद्रा वाढली । आळसें वासना विस्तारली ।
आळसें सुन्याकार जाली । सद्बुद्धि निश्चयाची ॥ ३४ ॥
दुश्चीतपणासवें आळस । आळसें निद्राविळास ।
निद्राविळासें केवळ नास । आयुष्याचा ॥ ३५ ॥
निद्रा आळस दुश्चीतपण । हें चि मूर्खाचें लक्षण ।
येणेंकारिता निरूपण । उमजेचिना ॥ ३६ ॥
हें तिन्ही लक्षणें जेथें । विवेक कैचा असेल तेथें ।
अज्ञानास यापरतें । सुख चि नाहीं ॥ ३७ ॥
क्षुधा लागता च जेविला । जेऊन उठतां आळस आला ।
आळस येता निजेला । सावकास ॥ ३८ ॥

---

1 वि त्रा, रिकामा वेळ

निजोन उठतां च दुश्चीत । कदा नाहीं सावचित ।
तेथें कैचें आत्महित । निरूपणीं ॥ ३९ ॥
मर्कटापासीं दिल्हें रत्न । पिशाच्याहातीं निधान ।
दुश्चीतापुढें निरूपण । तयापरी होये ॥ ४० ॥
आतां असो हे उपपत्ती । आशंकेची कोण गती ।
कितां दिवसा होते मुक्ती । सज्जनाचेनि संगें ॥ ४१ ॥
ऐका याचें प्रत्योत्तर । कथेसि व्हावें निरोत्तर ।
संतसंगाचा विचार । ऐसा असे ॥ ४२ ॥
लोहो परीसेसीं लागला । थेंबुटा सागरीं मिळाला ।
गंगे सरिते संगम जाला । तत्क्षणीं ॥ ४३ ॥
सावध साक्षपी आणी दक्ष । तयास तत्काळ चि मोक्ष ।
इतरास तें अलक्ष । लक्षिलें नवचे ॥ ४४ ॥
येथें शिष्यप्रज्ञा च केवळ । प्रज्ञावंतां नलगे वेळ ।
अनन्यास तत्काळ । मोक्ष लाभे ॥ ४५ ॥
प्रज्ञावंत आणी अनन्य । तयास नलगे येक क्षण ।
अनन्य भावार्थेविण । प्रज्ञा खोटी ॥ ४६ ॥
प्रज्ञेविण अर्थ न कळे । विश्वासेंविण वस्तु ना कळे ।
प्रज्ञाविश्वासें गळे । देहाभिमान ॥ ४७ ॥
देहाभिमानाचे अंतीं । सहज चि वस्तुप्राप्ती ।
सत्संगें सद्गती । विलंब चि नाहीं ॥ ४८ ॥
सावध साक्षपी विशेष[3] । प्रज्ञावंत आणी विश्वास ।
तयास साधनीं सायास । करणें चि नलगे ॥ ४९ ॥
इतर भाविक साबडे । तयांस हि साधनें मोक्ष जोडे ।
साधुसंगें तत्काळ उँडे[4] । विवेकदृष्टी ॥ ५० ॥

---

१ ठेव, द्रव्य, खजिना. २ मेधावी. गुरूनें केलेला उपदेश समजून त्या मार्गानें जाण्याला जी बुद्धि लागते ती ज्याला आहे असा. मूढमती नराला गुरु तरी काय करणार? ३ "आणी दक्ष" होतें, त्याला हरताळ लावून "विशेष" केलें आहे. ४ "उघडे" बद्दल "उडे" हस्तदोषामुळे पडलें असावें?

परी तें साधन मोडूं नये । निरूपणाचा उपाये ।
निरूपणें लागे सोय । सर्वत्रासी ॥ ५१ ॥
आतां मोक्ष आहे कैसा । कैसी स्वरूपाची दशा ।
त्याचे प्राप्तीचा भर्वसा । सत्संगें केवी ॥ ५२ ॥
ऐसें निरूपण प्रांजळ । पुढें बोलिलें असे सकळ ।
श्रोतीं होऊनियां निश्चळ । अवधान द्यावें ॥ ५३ ॥
अवगुण त्यागावयाकारणें । न्यायनिष्ठुर लागे बोलणें ।
श्रोतीं कोप न धरणें । ऐसिया वचनाचा ॥ ५४ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे दुश्चीतनिरूपणनाम समास साहावा ॥ ६ ॥

---

॥ श्रीराम ॥

मागां श्रोतयाचा पक्ष । किता दिवसा होतो मोक्ष ।
ते चि कथा श्रोते दक्ष । होऊन ऐका ॥ १ ॥
मोक्षास कैसें जाणावें । मोक्ष कोणास ह्मणावें ।
संतसंगें पावावें । मोक्षास कैसें ॥ २ ॥
तरी बद्ध ह्मणिजे बांधला । आणी मोक्ष ह्मणिजे मोकळा जाला ।
तो संतसंगें कैसा लाधला । तें हि ऐका ॥ ३ ॥
प्राणी संकल्पें बांधला । जीवपणें बद्ध जाला ।
तो विवेकें मुक्त केला । साधुजनीं ॥ ४ ॥
मी जीव ऐसा सकल्प । दृढ धरितां गेले कल्पें ।
तेणें प्राणी जाला अल्प । देहबुद्धीचा ॥ ५ ॥
मी जीव मज बंधन । मज आहे जन्ममरण ।
केल्या कर्माचें फळ आपण । भोगीन आतां ॥ ६ ॥
पापाचें फळ तें दुख । आणी पुण्याचें फळ तें सुख ।
पापपुण्य अवश्यक । भोगणें लागे ॥ ७ ॥

---

१ "ची" ची "त्री" केली आहे. २ युगेंचीं युगें.

पापपुण्यभोग सुटेना । आणी गर्भवास हि तुटेना ।
ऐसी जयाची कल्पना । दृढ जाली ॥ ८ ॥
तया नाव बांधला । जीवपणें बद्ध जाला ।
जैसा स्वयें बांधोन कोसलो । मृत्य पावे ॥ ९ ॥
तैसा प्राणी तो अज्ञान । नेणे भगवताचें ज्ञान ।
ह्मणे माझें जन्ममरण । सुटेचिना ॥ १० ॥
आतां कांहीं दान करूं । पुढिल्या जन्मास आधारु ।
तेणें सुखरूप संसारु । होईल माझा ॥ ११ ॥
पूर्वी दान नाहीं केलें । ह्मणोन दरिद्र प्राप्त जालें ।
आतां तरी कांहीं केलें । पाहिजे कीं ॥ १२ ॥
ह्मणौनी दिलें वस्त्र जुनें । आणी येक तांब्र नाणें ।
ह्मणे आतां कोटिगुणें । पावेन पुढें ॥ १३ ॥
कुशावर्ती कुरुक्षेत्रीं । महिमा ऐकोन दान करी ।
आशा धरिली अभ्यांतरीं । कोटिगुणांची ॥ १४ ॥
रुका आडका दान केला । अतितास टुकडा घातला ।
ह्मणे माझा ढीग जाला । कोटि टुकड्यांचा ॥ १५ ॥
तो मी खाईन पुढिलिये जन्मीं । ऐसें कल्पी अंतर्यामीं ।
वासना गुंतली जन्मकर्मीं । प्राणीयांची ॥ १६ ॥
आता मी जें देईन । तें पुढिले जन्मीं पावेन ।
ऐसें कल्पी तो अज्ञान । बद्ध जाणावा ॥ १७ ॥
बहुता जन्मांचे अतीं । होये नरदेहाची प्राप्ती ।
येथें न होतां ज्ञानें सद्गती । गर्भवास चुकेना ॥ १८ ॥
गर्भवास नरदेहीं घडे । ऐसें हें सर्वथा न घडे ।
अकस्मात भोगणें पडे । पुन्हा नीच योनी ॥ १९ ॥

---

१ रेशिमाच्या किड्यासारखी एक किड्याची जात आहे. तो किडा आपणा भोंवतीं घर करून स्वतःस आंत कोंडून घेऊन मरतो.

ऐसा निश्चयो शास्त्रांतरीं। बहुतीं केला बहुतापरीं।
नरदेह संसारीं। परम दुल्लभ असे॥ २०॥
पापपुण्य समता घडे। तरी च नरदेह जोडे।
येरवीं हा जन्म न घडे। हें व्यासवचन भागवतीं॥ २१॥

॥ श्लोक ॥ नरदेहमाद्यं सुलभं सुदुर्लभं। प्लवं सुकल्पं गुरुकर्णधारं।
मयानुकूलेन नभस्वतेरितं। पुमान्भवाब्धिं न तरेत्स आत्महा॥७॥

नरदेह दुल्लभ। अल्प संकल्पाचा लाभ।[1]
गुरु कर्णधारी स्वयंभ। सुख पाववी॥ २२॥
देव अनुकूळ नव्हे जया। स्वयें पापी तो प्राणीया।
भवाब्धी न तरवे तया। आत्महत्यारा बोलिजे॥ २३॥
ज्ञानेंविण प्राणीयांसी। जन्ममृत्य लक्ष चौऱ्यासी।
तितुक्या आत्महत्या त्यासी। ह्मणौन आत्महत्यारा॥ २४॥
नरदेहीं ज्ञानेंविण। कदा न चुके जन्ममरण।
भोगणें लागती दारुण। नाना नीच योनी॥ २५॥
रीस मर्कट श्वान सूकर। अश्व वृषभ ह्मैसा खर।
काक कुर्कुट[2] जंबुक मार्जर। सरड बेडुक मक्षिका॥ २६॥
इत्यादिक नीच योनी। ज्ञान नस्तां भोगणें जनीं।
आशा धरी मूर्ख प्राणी। पुढिलिया जन्माची॥ २७॥
हा नरदेह पडतां। तो चि पाविजे मागुता।
ऐसा विश्वास धरितां। लाज नाहीं॥ २८॥
कोण पुण्याचा संग्रहो। जे पुन्हा पाविजे नरदेहो।
दुराशा धरिली पाहो। पुढिलिया जन्माची॥ २९॥
ऐसे मूर्ख अज्ञान जन। केलें संकल्पें बंधन।
शत्रु आपणासि आपण। होऊन ठेला॥ ३०॥

---

१ सहजगत्या, थोड्याशा संकल्पानें प्राप्त होणारा, असा हा नरदेह आहे
२ कुक्कुट, कोंबडा.

॥ श्लोक ॥ आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः ॥ ७ ॥

ऐसें संकल्पाचें बधन । सतसगें तुटे जाण ।
ऐक तयाचें लक्षण । सांगिजेल ॥ ३१ ॥
पांचा भूतांचें शरीर । निर्माण जालें सचराचर ।
प्रकृतिस्वभावें जगदाकार । वर्तों लागे ॥ ३२ ॥
देह अवस्ता अभिमान । स्थानें भोग मात्रा गुण ।
शक्ती आदिकरून लक्षण । चौपुटी तत्वाचें ॥ ३३ ॥
ऐसी पिंडब्रह्मांडरचना । विस्तारें वाढली कल्पना ।
निर्धारितां तत्वज्ञाना । मतें भांबावलीं ॥ ३४ ॥
नाना मतीं नाना भेद । भेदें वाढती वेवाद ।
परी तो ऐक्यतेचा संवाद । साधु जाणती ॥ ३५ ॥
तया संवादाचें लक्षण । पंचभूतिक देह जाण ।
त्या देहामधें कारण । आत्मा वोळखावा ॥ ३६ ॥
देह अंतीं नासोन जाये । त्यास आत्मा ह्मणों नये ।
नाना तत्वांचा समुदाय । देहामध्यें आला ॥ ३७ ॥
अंतःकर्ण प्राणादिक । विषये इंद्रियें दशक ।
हा सूक्ष्माचा[२] विवेक । बोलिला शास्त्रीं ॥ ३८ ॥
घेतां सूक्ष्माची शुद्धी । भिन्न अंतःकरण मन बुद्धी[३] ।
नाना तत्वांचे उपाधी । वेगळा आत्मा ॥ ३९ ॥
स्थूळ सूक्ष्म कारण । माहाकारण विराट हिरण्य ।
अव्याकृत मूळप्रकृति जाण । ऐसे अष्टदेह ॥ ४० ॥
च्यारी पिंडीं च्यारी ब्रह्मांडीं । ऐसी अष्टदेहाची प्रौढी ।
प्रकृतिपुरुषांची वाढी । दशदेह बोलिजे ॥ ४१ ॥

---

१ दशक १७°९°१–६ पहा. २ सूक्ष्म देहाचा द १७°९°१–६ पहा. ३ सूक्ष्म देहाचा खोल विचार करून पाहिलें ह्मणजे अंतःकरण, मन, बुद्धि, चित्त व अहंकार हीं वेगळीं आहेत असें दिसून येईल द १७×८ पहा.

ऐसें तत्वांचें लक्षण । आत्मा साक्षी विलक्षण[1] ।
कार्य कर्ता कारण । दृश्य तयाचें ॥ ४२ ॥
जीवशिव पिंडब्रह्मांड । मायेअविद्येचें[2] बंड ।
हें सांगता असे उदंड । परी आत्मा तो वेगळा ॥ ४३ ॥
पाहों जातां आत्मे च्यारी । त्यांचें लक्षण अवधारीं ।
हें जाणोनि अभ्यांतरीं । सदृढ धरावें ॥ ४४ ॥
येक जीवात्मा दुसरा शिवात्मा । तिसरा परमात्मा जो विश्वात्मा ।
चौथा जाणिजे निर्मळात्मा । ऐसे च्यारी आत्मे ॥ ४५ ॥
भेद उंच नीच भासती । परी च्यारी येक चि असती ।
येविषीं दृष्टांतसमती । सावध ऐका ॥ ४६ ॥
घटाकाश मठाकाश । महदाकाश चिदाकाश ।
अवघे मिळोन आकाश । येक चि असे ॥ ४७ ॥
तैसा जीवात्मा आणी शिवात्मा । परमात्मा आणी निर्मळात्मा ।
अवघा मिळोन आत्मा । येक चि असे ॥ ४८ ॥
घटीं व्यापक जें आकाश । तया नाव घटाकाश ।
पिंडीं व्यापक ब्रह्मांश । त्यास जीवात्मा[3] बोलिजे ॥ ४९ ॥
मठीं व्यापक जें आकाश । तया नाव मठाकाश ।
तैसा ब्रह्मांडीं जो ब्रह्मांश । त्यास शिवात्मा[4] बोलिजे ॥ ५० ॥
मठाबाहेरील आकाश । तया नाव महदाकाश ।
ब्रह्मांडाबाहेरील ब्रह्मांश । त्यास परमात्मा बोलिजे ॥ ५१ ॥
उपाधीवेगळें आकाश । तया नाव चिदाकाश ।
तैसा निर्मळात्मा परेश । तो उपाधीवेगळा ॥ ५२ ॥

---

१ आत्मा तत्त्वांचा साक्षी असून त्यापासून निराळा आहे कार्य म्हणजे जगत्, कर्ता ह्मणजे पुरुष व कारण म्हणजे प्रकृति हीं त्याचें दृश्य आहेत, म्हणजे याचा तो द्रष्टा आहे. अर्थात् तो याहून हि निराळा आहे २ मुळांत ० घर्चे. ३ " जीव " होतें त्याचें " जीवात्मा " केलें आहे ४ " शिव " होतें त्याचें " शिवात्मा " केलें आहे.

उपाधीयोगें वाटे भिन्न । परी तें आकाश अभिन्न ।
तैसा आत्मा स्वानंदघन । येक चि असे ॥ ५३ ॥
दृश्या सबाह्य अंतरीं । सूक्ष्मात्मा निरंतरीं ।
त्याची वर्णावया थोरी । शेष समर्थ नव्हे ॥ ५४ ॥
ऐसें आत्म्याचें लक्षण । जाणता नाहीं जीवपण ।
उपाधी शोधितां अभिन्न । मुळीं च आहे ॥ ५५ ॥
जीवपणें येकदेसी । अहंकारें जन्म सोसी ।
विवेक पाहातां प्राणीयांसी । जन्म कैंचा ॥ ५६ ॥
जन्ममृत्यापासून सुटला । या नाव जाणिजे मोक्ष जाला ।
तत्वें शोधितां पावला । तत्वता वस्तु ॥ ५७ ॥
ते चि वस्तु ते आपण । हें माहावाक्याचें लक्षण ।
साधु करिती निरूपण । आपुलेन मुखें ॥ ५८ ॥
जे चि क्षणीं अनुग्रह केला । ते चि क्षणीं मोक्ष जाला ।
बंधन कांहीं आत्मयाला । बोलों चि नये ॥ ५९ ॥
आतां आशंका फिटली । संदेहवृत्ती मावळली ।
संतसंगें तत्काळ जाली । मोक्षपदवी ॥ ६० ॥
स्वप्नामधें जो बांधला । तो जागृतीनें मोकळा केला ।
ज्ञानविवेकें प्राणीयाला । मोक्षप्राप्ती ॥ ६१ ॥
अज्ञाननिसीचा अतीं । संकल्पदुःखें नासती ।
तेणें गुणें होये प्राप्ती । तत्काळ मोक्षाची ॥ ६२ ॥
तोडावया स्वप्नबंधन । नलगे आणीक साधन ।
तयास प्रेत्न जागृतीवीण । बोलों चि नये ॥ ६३ ॥
तैसा संकल्पें बांधला जीव । त्यास आणीक नाहीं उपाव ।
विवेक पाहातां वाव । बंधन होये ॥ ६४ ॥

---

१ हें आत्म्याचें लक्षण पाहिलें म्हणजे जीवात्मादि जे चार भेद सांगितले, ते उपाधींच्या योगानें होत, असें कळून येतें, बाकी वास्तविक आत्मा मूळचा एक च आहे २ जीवात्मा एकदेशी असून अहंकाराच्या योगानें जन्ममृत्यूच्या फेऱ्यात पडला आहे.

विवेक पाहिल्याविण । जो जो उपाव तो तो सीण ।
विवेक पाहातां आपण । आत्मा च असे ॥ ६५ ॥
आत्मयाचा ठाईं कांहीं । बद्ध मोक्ष दोनी नाहीं ।
जन्ममृत्य हें सर्व हि । आत्मत्वीं न घडे ॥ ६६ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे मोक्षलक्षणनाम समास सातवा ॥ ७ ॥

---

॥ श्रीराम ॥

मागां जालें निरूपण । परमात्मा तो तूं चि जाण ।
तया परमात्मयाचें लक्षण । तें हें ऐसें असे ॥ १ ॥
जन्म नाहीं मृत्य नाहीं । येणें नाहीं जाणें नाहीं ।
बद्ध मोक्ष दोनी नाहीं । परमात्मयासी ॥ २ ॥
परमात्मा निर्गुण निराकार । परमात्मा अनंत अपार ।
परमात्मा नित्य निरंतर । जैसा तैसा ॥ ३ ॥
परमात्मा सर्वांस व्यापक । परमात्मा अनेकीं येक ।
परमात्मयाचा विवेक । अतर्क्य आहे ॥ ४ ॥
ऐसी परमात्मयाची स्थिती । बोलताती वेद श्रुती ।
परमात्मा पाविजे भक्ती । येथें संशय नाहीं ॥ ५ ॥
तये भक्तीचें लक्षण । भक्ती नवविधा भजन ।
नवविधा भजनें पावन । बहु भक्त जाले ॥ ६ ॥
तया नवविधामध्यें सार । आत्मनिवेदन थोर ।
तयेचा करावा विचार । स्वानुभवें स्वयें ॥ ७ ॥
आपुलिया स्वानुभवें । आपणास निवेदावें ।
आत्मनिवेदन जाणावें । ऐसें असें ॥ ८ ॥
महत्पूजेच्या अंतीं । देवास मस्तक वाहाती ।
तैसी आहे निकट भक्ती । आत्मनिवेदनाची ॥ ९ ॥
आपणांस निवेदिती । ऐसे भक्त थोडे असती ।
तयास परमात्मा मुक्ती । तत्काळ देतो ॥ १० ॥

आपणास कैसें निवेदावें । कोठें जाऊन पडावें ।
किंवा मस्तक तोडावें । देवापुढें ॥ ११ ॥
ऐसें ऐकोन बोलणें । वक्ता वदे सर्वज्ञपणें ।
श्रोतां सावधान होणें । येकाग्र चित्तें ॥ १२ ॥
आत्मनिवेदनाचें लक्षण । आधीं पाहावें मी कोण ।
मग परमात्मा निर्गुण । तो वोळखावा ॥ १३ ॥
देवाभक्ताचें शोधन । करितां होतें आत्मनिवेदन ।
देव आहे पुरातन । भक्त पाहे ॥ १४ ॥
देवास वोळखों जातां । तेथें जाली तद्रूपता ।
देवभक्तविभक्तता । मुळीं च नाहीं ॥ १५ ॥
विभक्त नाहीं ह्मणोन भक्त । बद्दून[1] नाहीं ह्मणोनि मुक्त ।
अयुक्त नाहीं बोलणें युक्त । शास्त्राधारें ॥ १६ ॥
देवाभक्ताचें पाहातां मूळ । होये भेदाचें निर्मूळ ।
येक परमात्मा सकळ । दृश्यावेगळा ॥ १७ ॥
तयासि होतां मिळणी । उरी नाहीं दुजेपणीं ।
देव भक्त हे कडेसणी[2] । निरसोन गेली ॥ १८ ॥
आत्मनिवेदनाचे अतीं । जे का घडली अभेद भक्ती ।
तये नाव सायोज्यमुक्ती । सत्य जाणावी ॥ १९ ॥
जो संतांस शरण गेला । अद्वैतनिरूपणें बोधला ।
मग जरी वेगळा केला । तरी होणार नाहीं ॥ २० ॥
नदी मिळाली सागरीं । ते निवडावी कोणेपरीं ।
लोहो सोनें होता माघारी । काळिमा न ये ॥ २१ ॥
तैसा भगवतीं मिळाला । तो नवचे वेगळा केला ।
देव भक्त आपण जाला । विभक्त नव्हे ॥ २२ ॥

---

१ प्रथम "बद्ध" होतें तें कायम ठेवून, समासांत "न" लिहिला आहे, तेणेंकरून "बद्धन" झालें, तें अर्थात् "बंधन" बद्दल असावें. २ विचार, प्रकार. देव वेगळा व भक्त वेगळा, असला विभक्तपणाचा प्रकार नाहींसा झाला. १२×३ पहा.

देव भक्त दोनी येक । ज्यासी कळला विवेक ।
साधुजनीं मोक्षदायेक । तो चि जाणावा ॥ २३ ॥
आता असो हें बोलणें । देव पाहावा भक्तपणें ।
तेणें त्याचें ऐश्वर्य बाणे । तत्काळ आंगीं ॥ २४ ॥
देह चि होऊन राहिजे । तेणें देहदुःख [1]साहिजे ।
देहातीत होतां पाविजे । परब्रह्म तें ॥ २५ ॥
देहातीत कैसें होणें । कैसें परब्रह्म पावणें ।
ऐश्वर्याचीं लक्षणें । कवण सांगिजे ॥ २६ ॥
ऐसें श्रोतां आक्षेपिलें । याचें उत्तर काये बोलिलें ।
तें चि आता निरोपिलें । सावध ऐका ॥ २७ ॥
देहातीत वस्तु आहे । तें तू परब्रह्म पाहें ।
देहसंग हा न साहे । तुज विदेहासी ॥ २८ ॥
ज्याची बुद्धि होये ऐसी । वेद वर्णिती तयासी ।
शोधितां नाना शास्त्रांसी । न पडे ठाईं ॥ २९ ॥
ऐश्वर्य ऐसें तत्वता । बाणे देहबुद्धि सोडितां ।
देह मी ऐसें भावितां । अधोगती ॥ ३० ॥
याकारणें साधुवचन । मानूं नये अप्रमाण ।
मिथ्या मानितां दूषण । लागों पाहे ॥ ३१ ॥
साधुवचन तें कैसें । काये धरावें विश्वासें ।
येक वेळ स्वामी ऐसें । मज निरोपावें ॥ ३२ ॥
सोहं आत्मा स्वानंदघन । अजन्मा तो तूं चि जाण ।
हें चि साधूचें वचन । सदृढ धरावें ॥ ३३ ॥
माहावाक्याचें अंतर । तूं चि ब्रह्म निरंतर ।
ऐसिया वचनाचा विसर । पडों चि नये ॥ ३४ ॥
देहासि होईल अंत । मग मी पावेन अनंत ।
ऐसें बोलणें निभ्रांत । मानूं चि नये ॥ ३५ ॥

---

1 देह तो च मी अशी कल्पना असली म्हणजे सहज च देहदुःखें भोगावीं लागतात.

येक मूर्ख ऐसें ह्मणती । माया नासेल कल्पातीं ।
मग आह्मांस ब्रह्मप्राप्ती । येरवीं नाहीं ॥ ३६ ॥
मायेसी होईल कल्पांत । अथवा देहासी येईल अंत ।
तेव्हा पावेन निवांत । परब्रह्म मी ॥ ३७ ॥
हें बोलणें अप्रमाण । ऐसें नव्हे समाधान ।
समाधानाचें लक्षण । वेगळें चि असे ॥ ३८ ॥
शैन्य अवघें चि मरावें । मग राज्यपद प्राप्त व्हावें ।
शैन्य अस्ता चि राज्य करावें । हें कळेना ॥ ३९ ॥
माया असोनि च नाहीं । देह असतां च विदेही ।
ऐसें समाधान कांहीं । वोळखावें ॥ ४० ॥
राज्यपद हातासी आलें । मग परिवारें काय केलें ।
परिवारा देखता राज्य गेलें । हें तों घडेना ॥ ४१ ॥
प्राप्त जालिया आत्मज्ञान । तैसें[1] दृश्य देहभान ।
दृष्टीं पडता समाधान । जाणार नाहीं ॥ ४२ ॥
मार्गीं मुळी सर्पाकार । देखता भये आलें थोर ।
कळतां तेथीचा विचार । मग मारणें काये ॥ ४३ ॥
तैसी माया भयानक । विचार पाहातां माईक ।
मग तयेचा धाक । कासया धरावा ॥ ४४ ॥
देखतां मृगजळाचे पूर । ह्मणे कैसा पावों पैलपार ।
कळता तेथीचा विचार । साकडें कैचें ॥ ४५ ॥
देखता स्वप्न भयानक । स्वप्नीं वाटे परम धाक ।
जागृती आलीया साशंक । कासया व्हावें ॥ ४६ ॥

---

१ जसें इकडे राज्यपद आणि परिवार, तसें तिकडे आत्मज्ञान आणि दृश्य देहभान. सगळें सैन्य मरावें आणि मग आपण राजा व्हावें, यापेक्षा सैन्य असून आपण राजा होणें बरें, माया असून ती मिथ्या आहे हें कळलें पाहिजे, देह असून विदेह स्थिति प्राप्त झाली पाहिजे. राज्यपद प्राप्त झाल्यावर मग परिवार असला ह्मणून काय बिघडतें ? तद्वत् आत्मज्ञान झाल्यावर माया काय करणार आहे ?

तथापी माया कल्पनेसी दिसे । आपण कल्पनेतीत असे ।
तेथें उद्वेग काइसे । निर्विकल्पासी ॥ ४७ ॥
अंतीं मती ते चि गती । ऐसें सर्वत्र बोलती ।
तुझी अंतीं तुझी प्राप्ती । सहज चि जाली ॥ ४८ ॥
चौंदेहाचा अंत । आणी जन्म मुळाचा प्रांत ।
अंताप्रांतासी अलिप्त । तो तूं आत्मा ॥ ४९ ॥
जयासी ऐसी आहे मती । तयास ज्ञानें आत्मगती ।
गती आणी अवगती । वेगळा चि तो ॥ ५० ॥
मति खुंटली वेदांची । तेथें गती आणी अवगती कैंची ।
आत्मशास्त्रगुरुप्रचितीची[2] । ऐक्यता आली ॥ ५१ ॥
जीवपणाची फिटली भ्रांती । वस्तु आली आत्मप्रचिती ।
प्राणी पावला उत्तम गती । सद्गुरुबोधें ॥ ५२ ॥
सद्गुरुबोध जेव्हा जाला । चौंदेहास अंत आला ।
तेणें निजध्यास लागला । सस्वरूपीं ॥ ५३ ॥
तेणें निजध्यासें प्राणी । [3]ध्येये चि जाला निर्वाणीं ।
सायोज्यमुक्तीचा धनी । होऊन बैसला ॥ ५४ ॥
दृश्य पदार्थ वोसरता । आवघा आत्मा चि तत्वता ।
नेहटून विचारें पहातां । दृश्य मुळीं च नाहीं ॥ ५५ ॥
मिथ्या मिथ्यत्वें पाहिलें । मिथ्यापणें अनुभवा आलें ।
श्रोतीं पाहिजे ऐकिलें । या नाव मोक्ष ॥ ५६ ॥
सद्गुरुवचन हृदईं धरी । तो चि मोक्षाचा अधिकारी ।
श्रवण मनन केलें चि करी । अत्यादरें ॥ ५७ ॥

---

१ नरजन्म हा मुळाचा ( परमेश्वराच्या, आत्म्याचा ) प्रांत ( शेवटचा भाग ) आहे स्थूल, सूक्ष्म, कारण, महाकारण या चार देहांचा अंत व जन्म यांपासून आत्मा अलिप्त आहे. २ प्रचिती ऐक्यतेसि आली ॥ असा पाठ प्रथम पडला होता. ३ ध्येय चि ४ लक्ष लावून, त्याहाकून ५ मिथ्या हें मिथ्या आहे असें समजणें आणि अनुभवाला येणें, याचें नाव मोक्ष.

जेथें आटती दोनी पक्ष । तेथें लक्ष ना अलक्ष ।
या नाव जाणिजे मोक्ष । नेमस्त आत्मा ॥ ५८ ॥
जेथें ध्यान धारणा सरे । कल्पना निर्विकल्पीं मुरे ।
केवळ ज्ञप्तिमात्र उरे । सूक्ष्म ब्रह्म ॥ ५९ ॥
भवमृगजळ आटलें । लटिकें बंधन सुटलें ।
अजन्म्यास मुक्त केलें । जन्मदु:खापासुनी ॥ ६० ॥
नि:संगाची संगव्याधी । विदेहाची देहबुद्धी ।
विवेकें तोडिली उपाधी । नि:प्रपचाची ॥ ६१ ॥
अद्वैताचें तोडिलें द्वैत । येकांतास दिला येकांत ।
अनतास दिला अंत । अनंताचा[1] ॥ ६२ ॥
जागृतीस चेवविलें । चेईन्यास सावध केलें ।
निजबोधास प्रबोधिलें । आत्मज्ञान ॥ ६३ ॥
अमृतास केलें अमर । मोक्षास मुक्तीचें घर ।
संयोगास निरंतर । योग केला ॥ ६४ ॥
निर्गुणास निर्गुण केलें । सार्थकाचें सार्थक जालें ।
बहुतां दिवसां भेटलें । आपणासि आपण ॥ ६५ ॥
तुटला द्वैताचा पडदा । अभेदें तोडिलें भेदा ।
भूतपंचकाची बाधा । निरसोन गेली ॥ ६६ ॥
जालें साधनाचें फळ । निश्चळास केलें निश्चळ ।
निर्मळाचा गेला मळ । विवेकबळें ॥ ६७ ॥
होतें सन्निध चुकलें । ज्याचें त्यास प्राप्त जालें ।
आपणा देखता फिटलें । जन्मदु:ख ॥ ६८ ॥
दुष्ट स्वप्नें जाजावला । ब्राह्मण नीच याती पावला ।
आपणासि आपण सांपडला । जागेपणें ॥ ६९ ॥

---

१ अनंताचा अत ( पार ) लावला

ऐसें जयास जालें ज्ञान । तया पुरुषाचें लक्षण ।
पुढिले समासीं निरूपण । बोलिलें असे ॥ ७० ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे आत्मदर्शननाम समास आठवा ॥ ८ ॥

---

॥ श्रीराम ॥

अंतरीं गेलियां अमृत । बाह्य काया लखलखित ।
अंतरस्थिति बाणतां संत । लक्षणें कैसीं ॥ १ ॥
जालें आत्मज्ञान बरवें । हें कैसेनि पां जाणावें ।
ह्मणोनि बोलिलीं स्वभावें । साधुलक्षणें ॥ २ ॥
ऐक सिद्धाचें लक्षण । सिद्ध ह्मणिजे स्वरूप जाण ।
तेथें पाहातां वेगळेपण । मुळीं च नाहीं ॥ ३ ॥
स्वरूप होऊन राहिजे । तया नाव सिद्ध बोलिजे ।
सिद्धस्वरूपीं च साजे । सिद्धपण ॥ ४ ॥
वेदशास्त्रीं जें प्रसिद्ध । सस्वरूप स्वतसिद्ध ।
तयासि च बोलिजे सिद्ध । अन्यथा न घडे ॥ ५ ॥
तथापी बोलों कांहीं येक । साधकास कळाया विवेक ।
सिद्धलक्षणाचें कौतुक । तें हें ऐसें असे ॥ ६ ॥
अंतरस्थितें[1] स्वरूप जाली । पुढें काया कैसी वर्तली ।
जैसी स्वप्नीची नाथिली[2] । स्वप्नरचना ॥ ७ ॥
तथापी सिद्धांचें लक्षण । कांहीं करूं निरूपण ।
जेणें बाणे अंतर्खूण । परमार्थाची ॥ ८ ॥
सदा स्वरूपानुसंधान । हें मुख्य साधूचें लक्षण ।
जनीं असोन आपण । जनावेगळा ॥ ९ ॥
स्वरूपीं दृष्टी पडतां । तुटोन गेली संसारचिंता ।
पुढें लागली ममता । निरूपणाची ॥ १० ॥

---

१ अंतर्वृत्ति स्वरूपाकार झाली २ लटकी.

हें साधकाचें लक्षण । परी सिद्धाआंगीं असे जाण ।
सिद्धलक्षण साधकेंविण । बोलों च नये ॥ ११ ॥
बाह्य साधकाचे परी । आणी स्वरूपाकार अंतरीं ।
सिद्धलक्षण तें चतुरीं । जाणिजे ऐसें ॥ १२ ॥
संदेहरहित साधन । तें चि सिद्धाचें लक्षण ।
अंतर्बाह्य समाधान । चळेना ऐसें ॥ १३ ॥
अचळ जाली अंतरस्थिती । तेथें चळणास कैंची गती ।
स्वरूपीं लागतां वृत्ती । स्वरूप चि जाली ॥ १४ ॥
मग तो चळता च अचळ । चंचळपणें निश्चळ ।
निश्चळ असोन चंचळ । देह त्याचा ॥ १५ ॥
स्वरूपीं स्वरूप चि जाला । मग तो पडोनि च राहिला ।
अथवा उठोनि पळाला । तरी चळेना ॥ १६ ॥
येथें कारण अंतरस्थिती । अंतरीं च पाहिजे निवृत्ती ।
अंतर लागलें भगवंतीं । तो चि साधु ॥ १७ ॥
बाह्य भलतैसें असावें । परी अंतर स्वरूपीं लागावें ।
लक्षणें दिसती स्वभावें । साधुआंगीं ॥ १८ ॥
रांजीं[1] बैसतां अवलिळा[2] । आंगीं बाणे राजकळा ।
स्वरूपीं लागता जिव्हाळा[3] । लक्षणें बाणती ॥ १९ ॥
येरव्हीं अभ्यास करितां । हाता न चढती सर्वथा ।
स्वरूपीं राहावें तत्वता । स्वरूप होउनी ॥ २० ॥
अभ्यासाचा मुगुटमणी । वृत्ती राहावी निर्गुणीं ।
संतसंगें निरूपणीं । स्थिती बाणे ॥ २१ ॥
ऐसीं लक्षणें बरवीं । स्वरूपाकारें अभ्यासावीं ।
स्वरूप सोडितां गोसावी । भाबावती ॥ २२ ॥
आतां असो हें बोलणें । ऐका साधूचीं लक्षणें ।
जेणें समाधान बाणे । साधकाआंगीं ॥ २३ ॥

१ राज्यीं. २ सहज. ३ उत्कट इच्छा, अंतःकरण

स्वरूपीं भरतां कल्पना । तेथें कैंचीं उरेल कामना ।
ह्मणोनियां साधुजना । काम चि नाहीं ॥ २४ ॥
कल्पिला विषयो हातींचा जावा । तेणें गुणें क्रोध यावा ।
साधुजनाचा अक्षै ठेवा । जाणार नाहीं ॥ २५ ॥
ह्मणोनि ते क्रोधरहित । जाणती स्वरूप संत ।
नासिवंत हे पदार्थ । सांडुनियां ॥ २६ ॥
जेथें नाहीं दुसरी परी । क्रोध यावा कोणावरी ।
क्रोधरहित सचराचरीं । साधुजन वर्तती ॥ २७ ॥
आपुला आपण स्वानंद । कोणावरी करावा मद ।
याकारणें वादवेवाद । तुटोन गेला ॥ २८ ॥
साधु स्वरूप निर्विकार । तेथें कैंचा तिरस्कार ।
आपला आपण मत्सर । कोणावरी करावा ॥ २९ ॥
साधु वस्तु अनायासें । याकारणें मत्सर नसे ।
मदमत्सराचें पिसें । साधुसी नाहीं ॥ ३० ॥
साधु स्वरूप स्वयंभ । तेथें कैंचा असेल दंभ ।
जेथें द्वैताचा आरंभ । जाला च नाहीं ॥ ३१ ॥
जेणें दृश्य केलें विसंचें । तयास कैंचा हो प्रपंच ।
याकारणें निःप्रपंच । साधु जाणावा ॥ ३२ ॥
अवघें ब्रह्मांड त्याचें घर । पंचभूतिक हा जोजारें ।
मिथ्या जाणोन सत्वर । त्याग केला ॥ ३३ ॥
याकारणें लोभ नसे । साधु सदा निर्लोभ असे ।
जयासी वासना समरसे[3] । शुद्धस्वरूपीं ॥ ३४ ॥
आपुला आपण आघवा । स्वार्थ कोणाचा करावा ।
ह्मणोनि साधु तो जाणावा । शोकरहित ॥ ३५ ॥
दृश्य सांडून नासिवंत । स्वरूप सेविलें शाश्वत ।
याकारणें शोकरहित । साधु जाणावा ॥ ३६ ॥

---

१ नाशिवंत, नष्ट. २ पसारा, खटपट ३ मिळून जाते, एकवट होते.

शोकें दुखवावी वृत्ती । तरी ते जाहाली निवृत्ती ।
ह्मणौनि साधु आदिअंतीं । शोकरहित ॥ ३७ ॥
मोहें झळंबावें मन । तरी तें जाहालें उन्मन ।
याकारणें साधुजन । मोहातीत ॥ ३८ ॥
साधु वस्तु अद्वये । तेथें कैंचें वाटेल भये ।
परब्रह्म तें निर्भये । तो चि साधु ॥ ३९ ॥
याकारणें भयातीत । साधु निर्भय निवांत ।
सकळांस माडेल अंत । साधु अनंतरूपी ॥ ४० ॥
सत्यस्वरूपें अमर जाला । भये कैंचें वाटेल त्याला ।
याकारणें साधुजनाला । भये चि नाहीं ॥ ४१ ॥
जेथें नाहीं द्वंदभेद । आपला आपण अभेद ।
तेथें कैंचा उठेल खेद । देहबुद्धीचा ॥ ४२ ॥
बुद्धीनें नेमिलें निर्गुणा[२] । त्यास कोणी च नेईना ।
याकारणें साधुजना । खेद चि नाहीं ॥ ४३ ॥
आपण येकला ठाईंचा । स्वार्थ करावा कोणाचा ।
दृश्य नस्तां स्वार्थाचा । ठाव चि नाहीं ॥ ४४ ॥
साधु आपण चि येक । तेथें कैंचा दुःखशोक ।
दुजेविण अविवेक । येणार नाहीं ॥ ४५ ॥
अशा धरिता परमार्थाची । दुराशा तुटली स्वार्थाची ।
ह्मणोन नैराशता साधूची । वोळखण ॥ ४६ ॥
मृदपणें जैसें गगन । तैसें साधूचें लक्षण ।
याकारणें साधुवचन । कठीण नाहीं ॥ ४७ ॥
स्वरूपाचा सयोगीं । स्वरूप चि जाला योगी ।
याकारणें वीतरागी[३] । निरंतर ॥ ४८ ॥

---

१ गुंडाळलें जावें, पच्छाडलें जावें. २ बुद्धीनें निर्गुणाचा निश्चय केला. ३ विषयावरील प्रेम गेलेलें आहे ज्याचें असा.

स्थिती बाणता स्वरूपाची । चिंता सोडिली देहाची ।
याकारणें होणाराची । चिंता नसे ॥ ४९ ॥
स्वरूपीं लागतां बुद्धी । तुटे अवघी उपाधी ।
याकारणें निरोपाधी । साधुजन ॥ ५० ॥
साधु स्वरूपीं च राहे । तेथें संग चि न साहे ।
ह्मणोनि साधु तो न पाहे । मानापमान ॥ ५१ ॥
अलक्षास लावी लक्ष । ह्मणोन साधु परम दक्ष ।
बोढूं जाणती कैपक्ष[1] । परमार्थाचा ॥ ५२ ॥
स्वरूपीं न साहे मळ । ह्मणौन साधु तो निर्मळ ।
साधु स्वरूप चि केवळ । ह्मणोनियां ॥ ५३ ॥
सकळ धर्मांमधें धर्म । स्वरूपीं राहाणें हा स्वधर्म ।
हें चि जाणिजे मुख्य धर्म । साधुलक्षणाचें ॥ ५४ ॥
धरितां साधूची संगती । आपेंषा[2] च लागे स्वरूपस्थिती ।
स्वरूपस्थितीनें बाणती । लक्षणें आंगीं ॥ ५५ ॥
ऐसीं साधूचीं लक्षणें । आंगीं बाणती निरूपणें ।
परंतु स्वरूपीं राहाणें । निरंतर ॥ ५६ ॥
निरंतर स्वरूपीं राहाता । स्वरूप चि होईजे तत्वता ।
मग लक्षणें आंगीं बाणतां । वेळ नाहीं ॥ ५७ ॥
स्वरूपीं राहिल्यां मती । अवगुण अवघे चि सांडती ।
परंतु यासी सत्संगती । निरूपण पाहिजे ॥ ५८ ॥
सकळ सृष्टीचा ठाईं । अनुभव येक चि नाहीं ।
तो बोलिजेल सर्व हि । पुढिले समासीं ॥ ५९ ॥
कोणे स्थितीनें राहाती । कैसा अनुभव पाहाती ।
रामदास ह्मणे श्रोतीं । अवधान देणें ॥ ६० ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सिद्धलक्षणनाम समास नवम ॥ ९ ॥

---

१ कैवार. २ आपोआप.

॥ श्रीराम ॥

जनाचे अनुभव पुसता । कळ्हो उठिला अवचिता ।
हा कथाकल्लोळ श्रोता । कौतुकें ऐकावा ॥ १ ॥
येक ह्मणती हा संसारु । करितां पाविजे पैलपारु ।
आपला नव्हे कीं जोजारु[1] । जीव देवाचे ॥ २ ॥
येक ह्मणती हें न घडे । लोभ येऊन आंगीं जडे ।
पोटस्तें[2] करणें घडे । सेवा कुटुंबाची ॥ ३ ॥
येक ह्मणती स्वभावें । संसार करावा सुखें नावें[3] ।
कांहीं दानपुण्य करावें । सद्गतीकारणें ॥ ४ ॥
येक ह्मणती संसार खोटा । वैराग्यें घ्यावा देशवटा ।
येणें स्वर्गलोकींच्या वाटा । मोकळ्या होती ॥ ५ ॥
येक ह्मणती कोठें जावें । वेर्थ चि कासया हिंडावें ।
आपुले आश्रमीं असावें । आश्रमधर्म करूनी ॥ ६ ॥
येक ह्मणती कैंचा धर्म । अवघा होतसे अधर्म ।
ये संसारीं नाना कर्म । करणें लागे ॥ ७ ॥
येक ह्मणती बहुतांपरी । वासना असावी बरी ।
येणें चि तरिजे ससारीं । अनायासें ॥ ८ ॥
येक ह्मणती कारण भाव । भावें चि पाविजे देव ।
येर हें अवघें चि वाव । गथागोवी ॥ ९ ॥
येक ह्मणती वडिलें जीवीं । अवघीं देव चि मानावीं ।
मायेबापें पूजित जावीं । येकाभावें ॥ १० ॥
येक ह्मणती देवब्राह्मण । त्यांचें करावें पूजन ।
मायेबाप नारायेण । विश्वजनाचा ॥ ११ ॥
येक ह्मणती शास्त्र पाहावें । तेथें निरोपिलें देवें ।
तेणें प्रमाणें चि जावें । परलोकासी ॥ १२ ॥
येक ह्मणती अहो जना । शास्त्र पाहातां पुरवेना ।
याकारणें साधुजना । शरण जावें ॥ १३ ॥

---

1 खटपट, पसारा. 2 पोटास्तव, पोटासाठीं. 3 सुखेनैव.

येक ह्मणती सांडा गोठी[1] । वायां चि करिता चाउटी ।
सर्वांस कारण पोटीं । भूतदया असावी ॥ १४ ॥
येक ह्मणती येक चि बरवें । आपुल्या आचारें असावें ।
अंतकाळीं नाम घ्यावें । सर्वोत्तमाचें ॥ १५ ॥
येक ह्मणती पुण्य असेल । तरी च नाम येईल ।
नाहीं तरी भुली पडेल । अंतकाळीं ॥ १६ ॥
येक ह्मणती जीत असावें । तव चि सार्थक करावें ।
येक ह्मणती फिरावें । तीर्थाटण ॥ १७ ॥
येक ह्मणती हे अटाटी । पाणीपाषाणाची भेटी ।
चुबकुळ्या मारितां हिंपुटी । कासाविस व्हावें ॥ १८ ॥
येक ह्मणती सांडीं वाचाळी । अगाध महिमा भूमंडळीं ।
दर्शनमात्रें होये होळी । माहापातकाची ॥ १९ ॥
येक ह्मणती तीर्थ स्वभावें । कारण मन अवरावें[2] ।
येक ह्मणती कीर्तन करावें । सावकास ॥ २० ॥
येक ह्मणती योग बरवा । मुख्य तो चि आधीं साधावा ।
देहो अमर चि करावा । अकस्मात ॥ २१ ॥
येक ह्मणती ऐसें काये । काळवंचना करूं नये ।
येक ह्मणती धरावी सोये । भक्तिमार्गाची ॥ २२ ॥
येक ह्मणती ज्ञान बरवें । येक ह्मणती साधन करावें ।
येक ह्मणती मुक्त असावें । निरंतर ॥ २३ ॥
येक ह्मणती अनर्गळा[3] । धरीं पापाचा कंटाळा ।
येक ह्मणती रे मोकळा । मार्ग आमुचा ॥ २४ ॥
येक ह्मणती हें विशेष । करूं नये निंदा द्वेष ।
येक ह्मणती सावकास । दुष्टसंग त्यागावा ॥ २५ ॥

---

१ गोष्ठी, गोष्ट. २ मुळांत प्रथम “ कारण मन चि असावें ” असें होतें, त्याचें “ कारण मन अवरावें ” असें केलें आहे ३ उच्छृंखल.

येक ह्मणती ज्याचें खावें । त्या सन्मुख चि मरावें ।
तेणें तत्काळ चि पावावें । मोक्षपद ॥ २६ ॥
येक ह्मणती साडा गोठी । आधीं पाहिजे ते रोटी ।
मग करावी चाउटी । सावकास ॥ २७ ॥
येक ह्मणती पाउस असावा । मग सकळ योग बरवा ।
कारण दुष्काळ न पडावा । ह्मणिजे बरें ॥ २८ ॥
येक ह्मणती तपोनिधी । होतां वोळती सकळ सिद्धी ।
येक ह्मणती रे आधीं । इंद्रपद साधावें ॥ २९ ॥
येक ह्मणती आगम[1] पाहावा । वेताळ प्रसन्न करून घ्यावा ।
तेणें पाविजे देवा । स्वर्गलोकीं ॥ ३० ॥
येक ह्मणती अघोरमत्र । तेणें होईजे स्वतत्र ।
श्रीहरी जयेचा कळेत्र[2] । ते चि वोळे ॥ ३१ ॥
तीं[3] लागले सर्व धर्म । तेथें कैंचें क्रियाकर्म ।
येक ह्मणती कुकर्म । तिच्या मदें ॥ ३२ ॥
येक ह्मणती येक साक्षेप[4] । करावा मृत्यजयाचा जप ।
तेणें गुणें सर्व संकल्प । सिद्धीतें पावती ॥ ३३ ॥
येक ह्मणती बटु भैरव । तेणें पाविजे वैभव ।
येक ह्मणती झोटिंग सर्व । पुर्वितसे ॥ ३४ ॥
येक ह्मणती काली ककाळी । येक ह्मणती भद्रकाळी ।
येक ह्मणती उचिष्ट चाडाळी । सांहें[5] करावी ॥ ३५ ॥
येक ह्मणती विघ्नहर । येक म्हणती भोळा शकर ।
येक म्हणती सत्वर । पावे भगवती ॥ ३६ ॥
येक म्हणती मल्लारी । सत्वर चि सभाग्य करी ।
येक म्हणती माहा बरी । भक्ति वेंकटेशाची ॥ ३७ ॥

---

१ शास्त्र  २ " श्रीहरी जयेचा कळत्र " असें चरण मुळांत आहे त्याचा अर्थ केला पाहिजे. श्रीहरीचें जें कलत्र ह्मणजे लक्ष्मी अशा अर्थी हें चरण आहे. ३ तिला, त्या लक्ष्मीला, संपत्तीला  ४ साक्षेप, प्रयत्न  ५ साह्य.

येक म्हणती धूर्व ठेवा । येक म्हणती प्रेत्न करावा ।
येक म्हणती भार घालावा । देवाचवरी ॥ ३८ ॥
येक म्हणती देव कैंचा । अंत चि पाहातो भल्यांचा ।
येक म्हणती हा युगाचा । युगधर्म ॥ ३९ ॥
येक आश्चीर्य मानिती । येक विस्मयो करिती ।
येक कटाळोन ह्मणती । काये होईल तें पाहावें ॥ ४० ॥
ऐसे प्रपंचिक जन । लक्षणें सागता गहन ।
परतु काहीं येक चिन्ह । अल्पमात्र बोलिलें ॥ ४१ ॥
आतां असो हा स्वभाव । ज्ञात्यांचा कैसा अनुभव ।
तो हि सांगिजल सर्व । सावध ऐका ॥ ४२ ॥
येक ह्मणती करावी भक्ती । श्रीहरी देईल सद्गती ।
येक ह्मणती ब्रह्मप्राप्ती । कर्में चि होये ॥ ४३ ॥
येक ह्मणती भोग सुटेना । जन्ममरण हें तुटेना ।
येक ह्मणती उर्मी नाना । अज्ञानाच्या ॥ ४४ ॥
येक ह्मणती सर्व ब्रह्म । तेथें कैचें क्रियाकर्म ।
येक ह्मणती हा अधर्म । बोलों चि नये ॥ ४५ ॥
येक ह्मणती सर्व नासे । उरलें तें चि ब्रह्म असे ।
येक ह्मणती ऐसें नसे । समाधान[1] ॥ ४६ ॥
सर्व ब्रह्म केवळ ब्रह्म । दोनी पूर्वपक्षाचे भ्रम ।
अनुभवाचें वेगळें वर्म । ह्मणती येक ॥ ४७ ॥
येक ह्मणती हें न घडे । अनुर्वाच्य वस्तु घडे ।
जें बोलतां मोन्य पडे । वेदशास्त्रांसी ॥ ४८ ॥
तव श्रोता अनुवादला । ह्मणे निश्चये कोण केला ।
सिद्धांतमतें अनुभवाला । उरी कैंची ॥ ४९ ॥

---

१ अनुभवाला ठाव नाहीं, अनुभव उरत नाहीं असा सिद्धात आहे; कारण, अनुभव ह्मटला की तेथें द्वैत आलें च

अनुभव देहीं वेगळाले । हें पूर्वीं च बोलिलें ।
आता काहीं येक केलें । नवचे कीं ॥ ५० ॥
येक साक्षत्वें वर्तती । साक्षी वेगळा चि ह्मणती ।
आपण द्रष्टा ऐसी स्थिती । स्वानुभवाची ॥ ५१ ॥
दृश्यापासून द्रष्टा वेगळा । ऐसी अलिप्तपणाची कळा ।
आपण साक्षत्वें निराळा । स्वानुभवें ॥ ५२ ॥
सकळ पदार्थ जाणतां । तो पदार्थाहून पर्ता ।
देहीं असोनी अलिप्तता । सहज चि जाली ॥ ५३ ॥
येक ऐसें स्वानुभवें । ह्मणती साक्षत्वें वर्तावें ।
दृश्य असोनि वेगळें व्हावें । द्रष्टेपणें ॥ ५४ ॥
येक ह्मणती नाहीं भेद । वस्तु ठाईंची अभेद ।
तेथें कैंचा मतिमंद । द्रष्टा आणिला ॥ ५५ ॥
अवघी साकर चि स्वभावें । तेथें कडु काय निवडावें ।
द्रष्टा कैंचा स्वानुभवें । अवघें चि ब्रह्म ॥ ५६ ॥
प्रपंच परब्रह्म अभेद । भेदवादी मानिती भेद ।
परी हा आत्मा स्वानंद । आकारला ॥ ५७ ॥
विथुरलें तुप थिजलें । तैसें निर्गुण चि गुणा आलें ।
तेथें काये वेगळें केलें । द्रष्टेपणें ॥ ५८ ॥
ह्मणोनि द्रष्टा आणी दृश्य । अवघा येक चि जगदीश ।
द्रष्टेपणाचे सायास । कासयासी ॥ ५९ ॥
ब्रह्म चि आकारलें सर्व । ऐसा येकांचा अनुभव ।
ऐसे हे दोनी स्वभाव । निरोपिले ॥ ६० ॥
अवघा आत्मा आकारला । आपण भिन्न कैंचा उरला ।
दुसरा अनुभव बोलिला । ऐसियापरी ॥ ६१ ॥
ऐक तिसरा अनुभव । प्रपंच सारूनिया सर्व ।
काहीं नाहीं तो चि देव । ऐसें ह्मणती ॥ ६२ ॥

दृश्य अवघें वेगळें केलें । केवळ अदृश्य चि उरलें ।
तें चि ब्रह्म अनुभविलें । ह्मणती येक ॥ ६३ ॥
परी तें ब्रह्म ह्मणों नये । उपायासारिखा अपाये ।
सुन्यत्वास ब्रह्म काये । ह्मणों येईल ॥ ६४ ॥
दृश्य अवघें वोलांडिलें । अदृश्य सुन्यत्वीं पडिलें ।
ब्रह्म ह्मणौनि मुरडलें । तेथुनि त्र मागें ॥ ६५ ॥
इकडे दृश्य तिकडे देव । मध्यें सुन्यत्वाचा ठाव ।
तयास मंदबुद्धीस्तव । प्राणी ब्रह्म ह्मणे ॥ ६६ ॥
रायास नाहीं वोळखिलें । सेवकास रावसें कल्पिलें ।
परी तें अवघें वेर्थ गेलें । राजा देखतां ॥ ६७ ॥
तैसें सुन्यत्व कल्पिलें ब्रह्म । पुढें देखतां परब्रह्म ।
सुन्यत्वाचा अवघा भ्रम । तुटोन गेला ॥ ६८ ॥
परी हा सूक्ष्म आडताळा । वारी विवेकें वेगळा ।
जैसें दुग्ध घेऊन जळा । राजहंस-सांडी ॥ ६९ ॥
आधीं दृश्य सोडिलें । मग सुन्यत्व वोलांडिलें ।
मूळमायेपरतें देखिलें । परब्रह्म ॥ ७० ॥
वेगळेंपणें पाहाणें घडे । तेणें वृत्ति सुन्यत्वीं पडे ।
पोटीं संदेह पवाडे । सुन्यत्वाचा ॥ ७१ ॥
भिन्नपणें अनुभविलें । तयास सुन्य ऐसें बोलिलें ।
वस्तु लक्षिता अभिन्न जालें । पाहिजे आधीं ॥ ७२ ॥

---

१ द्रष्टा हा दृश्यापासून वेगळा आहे असें एक मत दुसरें मत असें आहे कीं, द्रष्टा आणि दृश्य हीं एक च आहेत, जें आहे तें सर्व ब्रह्म आहे तिसरें मत असें आहे कीं, जें दृश्य आहे तें वगळून, जें " कांहीं नाहीं " तें ब्रह्म २ शून्याला ब्रह्म ह्मणणें बरोबर आहे उपाय ) असें वाटेल पण तें चुकीचें होईल ( अपाय ), अपाय उपायासारखा वाटतो. ३ अडथळा. दृश्य ओलांडून परब्रह्माकडे जाताना मार्गांत " शून्यत्व " लागतें तें च ब्रह्म समजून कित्येक तेथें च थांबतात तरी असें करूं नये शून्यत्वाचा हा अडथळा विवेकानें मागें टाकून पुढें गेलें पाहिजे

वस्तु आपण चि होणें । ऐसें वस्तूचें पाहाणें ।
निश्चयेंसीं भिन्नपणें । सुन्यत्व लाभे ॥ ७३ ॥
याकारणें सुन्य कांहीं । परब्रह्म होणार नाहीं ।
वस्तुरूप होऊन पाहीं । स्वानुभवें ॥ ७४ ॥
आपण वस्तु सिद्ध चि आहे । मन मी ऐसें कल्पूं नये ।
साधु सांगती उपाये । तूं चि आत्मा ॥ ७५ ॥
मन मी ऐसे नाथिलें । संतीं नाहीं निरोपिलें ।
मानावें कोणाच्या बोलें । मन मी ऐसें ॥ ७६ ॥
संतवचनीं ठेवितां भाव । तो चि शुद्ध स्वानुभव ।
मनाचा तैसा च स्वभाव । आपण वस्तु ॥ ७७ ॥
जयाचा घ्यावा अनुभव । तो चि आपण निरावेव ।
आपुला घेती अनुभव । विश्वजन ॥ ७८ ॥
लोभी धन साधूं गेले । तंव ते लोभी धन चि जाले ।
मग तें भाग्यपुरुषीं भोगिलें । सावकास ॥ ७९ ॥
तैसें देहबुद्धि सोडितां । साधकास जालें तत्वता ।
अनुभवाची मुख्य वार्ता । ते हे ऐसी ॥ ८० ॥
आपण वस्तु मुळीं येक । ऐसा ज्ञानाचा विवेक ।
येथून हा ज्ञानदशक । संपूर्ण जाला ॥ ८१ ॥
आत्मज्ञान निरोपिलें । येथामतीनें बोलिलें ।
न्यूनपूर्ण क्षमा केलें । पाहिजे श्रोतीं ॥ ८२ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सुन्यत्वनिर्शननाम समास दाहवा ॥ १० ॥

---

१ एकादा लोभी मनुष्य धनाची अपेक्षा करून धन मिळवायाला गेला आणि स्वत च धन झाला तर त्या धनाचा उपभोग घेण्यास जसा तो निराळा उरत नाहीं, तद्वत् साधक हा परब्रह्म पाहण्यास गेला आणि स्वत च ब्रह्म झाला, मग पाहणें कोठें उरलें ?

## ॥ दशक नवम गुणरूपनाम ॥ ९ ॥

॥ श्रीराम ॥

निराकार ह्मणिजे काये । निराधार ह्मणिजे काये ।
निर्विकल्प ह्मणिजे काय । मज निरोपावें ॥ १ ॥
निराकार ह्मणिजे आकार नाहीं । निराधार ह्मणिजे आधार नाहीं
निर्विकल्प ह्मणिजे कल्पना नाहीं । परब्रह्मासी ॥ २ ॥
निरामय ह्मणिजे काये । निराभास ह्मणिजे काये ।
निरावेव ह्मणिजे काये । मज निरोपावें ॥ ३ ॥
निरामय ह्मणिजे जळमये[1] नाहीं । निराभास ह्मणिजे भास चि नाहीं ।
निरावेव ह्मणिजे अवेव नाहीं । परब्रह्मासी ॥ ४ ॥
निःप्रपच ह्मणिजे काये । निःकळंक ह्मणिजे काये ।
निरोपाधी ह्मणिजे काये । मज निरोपावें ॥ ५ ॥
निःप्रपंच ह्मणिजे प्रपच नाहीं । निःकळंक ह्मणिजे कळंक नाहीं ।
निरोपाधी ह्मणिजे उपाधी नाहीं । परब्रह्मासी ॥ ६ ॥
निरोपम्य ह्मणिजे काये । निरालंब ह्मणिजे काये ।
निरापेक्षा ह्मणिजे काये । मज निरोपावें ॥ ७ ॥
निरोपम्य ह्मणिजे उपमा नाहीं । निरालंब ह्मणिजे अवलंबन नाहीं ।
निरापेक्षा ह्मणिजे अपेक्षा नाहीं । परब्रह्मासी ॥ ८ ॥
निरंजन ह्मणिजे काये । निरंतर ह्मणिजे काये ।
निर्गुण ह्मणिजे काये । मज निरोपावें ॥ ९ ॥
निरंजन[2] ह्मणिजे जन चि नाहीं । निरंतर ह्मणिजे अंतर नाहीं ।
निर्गुण ह्मणिजे गुण चि नाहीं । परब्रह्मासी ॥ १० ॥

---

1 इतर चरणांची धाटणी पाहिली ह्मणजे येथें " निरामय ह्मणिजे आमय नाहीं " असें असावयाचें होतें, परंतु येथें " आमय " बद्दल " जळमये " आहे. आमय ह्मणजे रोग, विकार पिंड आणि ब्रह्मांड या उभयतांना विकार आहेत. रोग होऊन पिंडाचा जसा अंत होतो, तद्वत् सर्व "जलमय" होऊन ब्रह्मांडाचा हि अंत होतो. अर्थात् " जलमय " हा ब्रह्मांडाचा विकार च होय. ब्रह्माला हा विकार बाधत नाहीं ह्मणून तें निरामय आहे. २ लोकांचा संसर्ग नाहीं, जें एकटें च आहे, तें निरंजन.

निःसंग ह्मणिजे काये । निर्मळ ह्मणिजे काये ।
निश्चळ ह्मणिजे काये । मज निरोपावें ॥ ११ ॥
निःसंग ह्मणिजे संग चि नाहीं । निर्मळ ह्मणिजे मळ चि नाहीं ।
निश्चळ ह्मणिजे चळण नाहीं । परब्रह्मासी ॥ १२ ॥
निशब्द ह्मणिजे काये । निर्दोष ह्मणिजे काये ।
निवृती ह्मणिजे काये । मज निरोपावें ॥ १३ ॥
निशब्द ह्मणिजे शब्द चि नाहीं । निर्दोष ह्मणिजे दोष चि नाहीं
निवृती ह्मणिजे वृति च नाहीं । परब्रह्मासी ॥ १४ ॥
निःकाम ह्मणिजे काये । निर्लेप ह्मणिजे काये ।
निःकर्म ह्मणिजे काये । मज निरोपावें ॥ १५ ॥
निःकाम ह्मणिजे काम चि नाहीं । निर्लेप ह्मणिजे लेप चि नाहीं
निःकर्म म्हणिजे कर्म चि नाहीं । परब्रह्मासी ॥ १६ ॥
अनाम्य म्हणिजे काये । अजन्मा म्हणिजे काये ।
अप्रत्यक्ष म्हणिजे काये । मज निरोपावें ॥ १७ ॥
अनाम्य म्हणिजे नाम चि नाहीं । अजन्मा म्हणिजे जन्म चि नाहीं
अप्रत्यक्ष म्हणिजे प्रत्यक्ष नाहीं । परब्रह्म तें ॥ १८ ॥
अगणीत म्हणिजे काये । अकर्तव्य म्हणिजे काये ।
अक्षै ह्मणिजे काये । मज निरोपावें ॥ १९ ॥
अगणीत ह्मणिजे गणीत नाहीं । अकर्तव्य ह्मणिजे कर्तव्यता नाहीं
अक्षै म्हणिजे क्षय चि नाहीं । परब्रह्मासी ॥ २० ॥
अरूप म्हणिजे काये । अलक्ष म्हणिजे काये ।
अनंत म्हणिजे काये । मज निरोपावें ॥ २१ ॥
अरूप म्हणिजे रूप चि नाहीं । अलक्ष म्हणिजे लक्षत नाहीं
अनंत म्हणिजे अंत चि नाहीं । परब्रह्मासी ॥ २२ ॥
अपार म्हणिजे काये । अढळ म्हणिजे काये ।
अतर्क्य म्हणिजे काये । मज निरोपावें ॥ २३ ॥

अपार म्हणिजे पार चि नाहीं । अढळ म्हणिजे ढळ चि नाहीं ।
अतर्क्य म्हणिजे तर्कत नाहीं । परब्रह्म तें ॥ २४ ॥
अद्वैत म्हणिजे काये । अदृश्य म्हणिजे काये ।
अच्युत म्हणिजे काये । मज निरोपावें ॥ २५ ॥
अद्वैत म्हणिजे द्वैत चि नाहीं । अदृश्य म्हणिजे दृश्य चि नाहीं ।
अच्युत म्हणिजे चेवत नाहीं । परब्रह्म तें ॥ २६ ॥
अछेद म्हाणजे काये । अदाह्य म्हणिजे काये ।
अक्लेद म्हणिजे काये । मज निरोपावें ॥ २७ ॥
अछेद म्हणिजे छेदेना । अदाह्य म्हणिजे जळेना ।
अक्लेद म्हणिजे कालवेना । परब्रह्म तें ॥ २८ ॥
परब्रह्म म्हणिजे सकळांपरतें । तयास पाहातां आपण चि तें ।
हें कळे अनुभवमतें । सद्गुरु केलियां ॥ २९ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे आशंकानाम समास ॥ १ ॥

---

॥ श्रीराम ॥

जें जें कांहीं साकार दिसे । तें तें कल्पांतीं नासे ।
स्वरूप तें असत चि असे । सर्वकाळ ॥ १ ॥
जें सकळांमधें सार । मिथ्या नव्हे तें साचार ।
जें कां नित्य निरंतर । संचलें असे ॥ २ ॥
तें भगवंताचें निजरूप । त्यासि बोलिजे स्वरूप ।
या हि वेगळीं अमूप । नामें तयाचीं ॥ ३ ॥
त्यास नामाचा संकेत । कळावया हा दृष्टांत ।
परी तें स्वरूप नामातीत । असत चि असे ॥ ४ ॥
दृश्यासबाह्य सचलें । परी तें विश्वास चोरलें ।
जवळि च नाहींसें जालें । असत चि कैसें ॥ ५ ॥

ऐसा ऐकोनियां देव । उठे दृष्टीचा भाव ।
पाहों जातां दिसे सर्व । दृश्य चि आवघें[1] ॥ ६ ॥
दृष्टीचा विषयो दृश्य । तो चि जालियां साद्दश्यें[2] ।
तेणें दृष्टी पावे संतोष । परी तें देखणें नव्हे ॥ ७ ॥
दृष्टीस दिसे तें नासे । येतद्विषईं श्रुति असे ।
म्हणौन जें दृष्टीस दिसे । तें स्वरूप नव्हे ॥ ८ ॥
स्वरूप तें निराभास । आणी दृश्य भासलें साभास ।
भासास बोलिला नास । वेदांतशास्त्रीं ॥ ९ ॥
आणी पाहातां दृश्य चि भासे । वस्तु दृश्यावेगळी असे ।
स्वानुभवें पाहातां दिसे । दृश्यासबाह्य ॥ १० ॥
जें निराभास निर्गुण । त्याची काये सांगावी खूण ।
परी तें स्वरूप जाण । सन्निध चि असे ॥ ११ ॥
जैसा आकाशीं भासला भास । आणी सकळांमधें आकाश ।
तैसा जाणिजे जगदीश । सबाह्य अभ्यांतरीं ॥ १२ ॥
उदकामधें परी भिजेना । पृथ्वीमधें परी झिजेना ।
वन्हीमधें परी सिजेना । स्वरूप देवाचें ॥ १३ ॥
तें रेंद्यामध्यें परी बुडेना । तें वायोमधें परी उडेना ।
सुवर्णीं असे परी घडेना । सुवर्णासारिखें ॥ १४ ॥
ऐसें जें संचलें सर्वदा । परी तें आकळेना कदा ।
अभेदामाजीं वाढवी भेदा । ते हे अहंता[3] ॥ १५ ॥
तिच्या स्वरूपाची खूण । सांगों कांहीं वोळखण ।
अहंतेचें निरूपण । सावध ऐका ॥ १६ ॥

---

१ परमेश्वराचें हें वर्णन ऐकून दृष्टीला इच्छा होते कीं तो पाहावा, परंतु पाहावयाला जाता सारें दृश्य च दिसतें. २ प्रत्यक्ष. ३ म्हणे आतां मी च स्वरूप । तें चि अहंतेचे रूप ॥ मी ब्रह्म आहें, अहं ब्रह्मास्मि, असा मीपणा.

जे स्वरूपाकडे पावे । अनुभवासवें झेंपावे ।
अनुभवाचे शब्द आघवे । बोलोन दावी ॥ १७ ॥
ह्मणे आतां मी च स्वरूप । तें चि अहंतेचें रूप ।
निराकारीं आपेंआप । वेगळी पडे ॥ १८ ॥
स्वयें मी च आहे ब्रह्म । ऐसा अहंतेचा भ्रम ।
ऐसिये सूक्ष्मीं सूक्ष्म । पाहातां दिसे ॥ १९ ॥
कल्पना आकळी हेते । वस्तु कल्पनातीत ।
म्हणौन नाकळे अंत । अनंताचा ॥ २० ॥
अन्वये आणी वीतरेकें । हा शब्दभेद कोणियेक ।
निशब्दाचा अंतरविवेक । शोधिला पाहिजे ॥ २१ ॥
आधीं वेईजे वाच्यांश । मग वोळखिजे लक्ष्यांश ।
लक्ष्यांशीं पाहातां वाच्यांश । असेल कैंचा ॥ २२ ॥
सर्वब्रह्म आणी विमळब्रह्म । हा वाच्यांशाचा अनुक्रम ।
शोधितां लक्ष्यांशाचें वर्म । वाच्यांश नसे ॥ २३ ॥
सर्व विमळ दोनी पक्ष । वाच्यांशीं आटेती प्रत्यक्ष ।
लक्ष्यांशीं लाविता लक्ष । पक्षपात घडे ॥ २४ ॥

---

१ जी अहंता " अहं ब्रह्मास्मि " अशी स्वरूपाची ओळख करून देते, तसा अनुभव आणिते आणि आलेला सर्व अनुभव बोलून दाखविते. २ " मी च ब्रह्म " हा जो हेतु, हें जें बोलणें, तें कल्पनेनें जाणलें जातें, परंतु ब्रह्म कल्पनातीत असल्यामुळें त्याचा अंत लागत नाहीं. ३ " अष्ट देहांची उभवणी " याचें नाव अन्वय व त्या " उद्भवाचा संहार " त्याचें नांव व्यतिरेक. अष्ट देहांची उभवणी व संहारणी सांगतां येणें हें नुसतें शाब्दिक ज्ञान आहे, परंतु निःशब्द असें जें परब्रह्म, त्याचा विवेकानें शोध घेतला पाहिजे ४ " हें सर्व ब्रह्म आहे " असे ह्मणणारांचा एक व " मायाविवर्जित तेवढें च विमल ब्रह्म " असें ह्मणणारांचा दुसरा, असे दोन पक्ष आहेत परंतु हे पक्ष बोलण्यापुरते आहेत; परब्रह्म काय आहे त्याच वर्म कळल्यावर हें बोलणें आणि हे पक्ष उरत नाहींत. ५ सर्व आणि विमल हे दोन पक्ष वाच्यांशांत च आटतात, ते बोलण्यापलिकडे जात नाहींत, परंतु लक्ष्यांश जें काहीं आहे त्याच्याकडे लय लागला ह्मणजे तेथें पक्ष उरत नाहीं. पक्षपात घडे=पक्षाचा नाश होतो, " सर्व विमल " असे जे पक्ष त्यांचा पात होतो.

हें लक्ष्यांशें अनुभवणें । येथें नाहीं वाच्यांश बोलणें ।
मुख्य अनुभवाचे खुणे । वाचारंभ कैंचा ॥ २५ ॥
परा पश्यंती मधेमा वैखरी । जेथें वोसरती च्यारी ।
तेथें शब्दकळाकुसरी । कोण काज ॥ २६ ॥
शब्द बोलतां सर्वें च नासे । तेथें शाश्वतता कोठें असे ।
प्रत्यक्षास प्रमाण नसे । बरें पाहा ॥ २७ ॥
शब्द प्रत्यक्ष नासिवंत । म्हणोन घडे पक्षपात ।
सर्व विमळ ऐसा हेत । अनुभवीं नाहीं ॥ २८ ॥
ऐक अनुभवाचें लक्षण । अनुभव म्हणिजे अनन्य जाण ।
ऐक अनन्याचें लक्षण । ऐसें असे ॥ २९ ॥
अनन्य म्हणिजे अन्य नसे । आत्मनिवेदन जैसें ।
संगेंभगें असत चि असे । आत्मा आत्मपणें ॥ ३० ॥
आत्म्यास नाहीं आत्मपण । हें चि निःसंगाचें लक्षण ।
हें वाच्यांशें बोलिलें जाण । कळावया कारणें ॥ ३१ ॥
येरवीं लक्ष्यांश तो वाच्यांशें । सांगिजेल हें घडे कैसें ।
वाक्यविवरणें अपैसें । कळों लागे ॥ ३२ ॥
करावें तत्वविवरण । शोधावें ब्रह्म निर्गुण ।
पाहावें आपणास आपण । ह्मणिजे कळे ॥ ३३ ॥
हें न बोलतां च विवरिजे । विवरोन विरोनि राहिजे ।
मग अबोलणें चि साजे । मोंहापुरुषीं ॥ ३४ ॥
शब्द चि निशब्द होती । श्रुति नेति नेति म्हणती ।
हें तों आलें आत्मप्रचिती । प्रत्यक्ष आतां ॥ ३५ ॥

---

१ ह्या गोष्टी अनुभवाच्या आहेत, तेथें बोलण्याचें काम नाहीं. २ आटतात, मागें हटतात. ३ शब्दांचें कलाकौशल्य. ४ तत्काळ. ५ सग नाहींसा होऊन, त्रिपुटी ( उ॰ उपास्य, उपासक, उपासना ) नाहींशी होऊन, द्वैत नाहींसें होऊन ६ लीन होऊन. २०-३-१ पहा ७ " गुरोस्तु मौनं व्याख्यानम् । " ब्रह्म अनिर्वाच्य असल्यामुळें सत्पुरुष बोलून दाखवीत नाहींत हें योग्य च होय.

प्रचित आलियां[1] अनुमान । हा तों प्रत्यक्ष दुराभिमान ।
तरी आतां मी अज्ञान । मज कांहीं च न कळे ॥ ३६ ॥
मी लटिका माझें बोलणें लटिकें । मी लटिका माझें चालणें लटिकें ।
मी माझें अवघें चि लटिकें । कल्पनिक ॥ ३७ ॥
मज मुळीं च नाहीं ठाव । माझें बोलणें[2] अवघें चि वाव ।
हा प्रकृतीचा[3] स्वभाव । प्रकृती लटिकी ॥ ३८ ॥
प्रकृति[4] आणी पुरुष[5] । यां दोहींस जेथें निरास ।
तेथें मीपण[6] विशेष । हें केवि घडे ॥ ३९ ॥
जेथें सर्व हि अशेष जालें । तेथें विशेष कैंचें आलें ।
मी मौनी म्हणतां भंगलें । मौन्य जैसें[7] ॥ ४० ॥
आतां मौन्य न भगावें । करून कांहीं च न करावें[8] ।
असोन निशेष नसावें[9] । विवेकबळें ॥ ४१ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे अज्ञानिरूपणनाम समास द्वितीय ॥ २ ॥

---

॥ श्रीराम ॥

श्रोतीं केला अनुमान । ऐसें कैसें ब्रह्मज्ञान ।
कांहीं च नाहीं असोन । हें केवि घडे ॥ १ ॥
सकळ करून अकर्ता । सकळ भोगून अभोक्ता ।
सकळामधें अलिप्तता । येईल कैसी ॥ २ ॥

---

१ "णी" ला हरताळ लावून "लियां" केलें आहे. २ माझें बोलणें. ३ वायूचा. ४ वायु. ५ जाणीव ६ "आपण" होतें त्यांतील 'आ' ला हरताळ लावून "मी" केलें आहे ७ जेथें कांहीं च उरल नाहीं तेथें विशेष काय सांगावयाचें ? मी मौनव्रत धारण केल आहे असें कोणीं तोंडानें सांगितलें ह्मणजे जसें त्याचें मौन्य नाहींसें होतें तद्वत् कोणी तोंडानें अनुभव सांगूं लागला तर तो त्याला आला नाहीं असें समजावें. ८ क्रियादोषविरहित क्रिया करावी ९ असोन कांहीं च नसावें

तथापी तुह्मी ह्मणता । योगी भोगून अभोक्ता ।
स्वर्गनर्क हि आतां । येणें न्यायें ॥ ३ ॥
जन्म मृत्य भोगिले च भोगी । परी तो भोगून अभोक्ता योगी ।
यातना हि तयालागीं । येणें चि पाडें ॥ ४ ॥
कुटून नाहीं कुटिला । रडोन नाहीं रडला ।
कुंथोन नाहीं कुंथिला । योगेश्वर ॥ ५ ॥
जन्म नसोन घातला । पतित नसोन जाला ।
यातना नसोन पावला । नानापरी ॥ ६ ॥
ऐसा श्रोतयांचा अनुमान । श्रोतीं घेतलें आडरान ।
आतां याचें समाधान । केलें पाहिजे ॥ ७ ॥
वक्ता ह्मणे सावध व्हावें । तुह्मी बोलतां बरवें ।
परी हें तुमच्या च अनुभवें । तुह्मास घडे ॥ ८ ॥
ज्याचा अनुभव जैसा । तो तो बोलतो तैसा ।
सपदेविण जो धिंवसा । तो निरार्थक ॥ ९ ॥
नाहीं ज्ञानाची संपदा । अज्ञानदारिद्रें आपदा ।
भोगिल्या च भोगी सदा । शब्दज्ञानें ॥ १० ॥
योगी वोळखावा योगेश्वरें । ज्ञानी वोळखावा ज्ञानेश्वरें ।
माहाचतुर तो चतुरें । वोळखावा ॥ ११ ॥
अनुभवी अनुभवियास कळे । अलिप्त अलिप्तपणें निवळे ।
विदेहाचा देहभाव गळे । विदेही देखतां ॥ १२ ॥

---

१ श्रोता आडरानात शिरून प्रश्न विचारतो.-तुह्मी ह्मणतां योगी सर्व करून अकर्ता व सर्व भोगून अभोक्ता आहे, तर मग पापाचरण करण्यास आडकाठी कोठें च उरली नाहीं, कारण, पाप करून न च केल्यासारखे आहे. पापपुण्य,सकृतदुष्कृत हीं सर्व सारखीं च झालीं ह्मणावयाचीं स्वर्गाला जाऊन न च गेल्यासारखे आहे व नरकाला जाऊन हि न च गेल्यासारखें आहे. २ धीर. ३ अलिप्ताला पाहून अलिप्त निवळतो ह्मणजे आनंद पावतो

बद्धासारिखा सिद्ध । आणी सिद्धासारिखा बद्ध ।
येक भावील तो अबद्ध । ह्मणावा च नलगे ॥ १३ ॥
झडपला तो देहधारी । आणी देहधारक पंचाक्षरी ।
परंतु दोघां येकसरी । कैसी थावी ॥ १४ ॥
तैसा अज्ञान पतित । आणी ज्ञानीं जीवन्मुक्त ।
दोघे समान मानील तो युक्त । कैसा म्हणावा ॥ १५ ॥
आतां असो हे दृष्टांत । प्रचित बोलों काहीं हेतें[1] ।
येथें श्रोतीं सावचित्त । क्षणयेक व्हावें ॥ १६ ॥
जो जो ज्ञानें गुप्त जाला । जो विवेकें विरोला[2] ।
जो अनन्यपणें उरला[3] । नाहीं च कांहीं ॥ १७ ॥
तयास कैसें गवसावें । शोधूं जातां तो चि व्हावें ।
तो चि होतां म्हणावें । नलगे काहीं ॥ १८ ॥
देहीं पाहातां दिसेना । तत्वें शोधितां भासेना ।
ब्रह्म आहे निवडेना । कांहीं केल्यां ॥ १९ ॥
दिसतो तरी देहधारी । परी कांहीं च नाहीं अंतरीं ।
तयास पाहातां वरिवरी । कळेल कैसा ॥ २० ॥
कळाया शोधावें अंतर । तव तो नित्य निरंतर ।
जयास धुंडितां विकार । निर्विकार होती ॥ २१ ॥
तो परमात्मा केवळ । तयास नाहीं मायामळ ।
अखंड हेतूचा विटाळ । जाला च नाहीं ॥ २२ ॥
ऐसा जो कां योगीराज । तो आत्मा सहजीं सहज ।
पूर्णब्रह्म वेदबीज[4] । देहाकारें कळेना ॥ २३ ॥
देह भावितां देह चि दिसे । परी अंतर अनारिसें असे ।
तयास शोधितां नसे । जन्ममरण[5] ॥ २४ ॥

---

१ प्रचीतिपूर्वक कांहीं हेतु, विचार सांगतों. २ आत्मस्वरूपीं लीन झाला. ३ जो अनन्य,ब्रह्मस्वरूप झ ल्यामुळें,निराळा राहिला नाहीं ४ पूर्णब्रह्म ह्मणजे च वेदानें सांगितलेलें गुह्य तें. ५ त्या अंतरात्म्याचें स्वरूप पाहूं जाता त्याला जन्ममरण नाहीं.

जयास जन्ममरण व्हावें । तें तों नव्हे चि स्वभावें ।
नाहीं च तें आणावें । कोठून कैंचें ॥ २५ ॥
निर्गुणास जन्म कल्पिला । अथवा निर्गुण उडविला ।
तरी उडाला आणी जन्मला । आपला आपण ॥ २६ ॥
माध्यान्हीं थुंकितां सूर्यावरी । तो थुंका पडेल आपणाचवरी ।
दुसऱ्यास चिंतितां अंतरीं । आपणासि घडे ॥ २७ ॥
समर्थ रायाचें महिमान । जाणतां होतें समाधान ।
परंतु थुंकों लागलें श्वान । तरी तें श्वान चि आहे ॥२८॥
ज्ञानी तो सत्यस्वरूप । अज्ञान देखे मनुष्यरूप ।
भावासारिखा फळद्रूप । देव तैसा ॥ २९ ॥
देव निराकार निर्गुण । लोक भाविती पाषाण ।
पाषाण फुटतो निर्गुण । फुटेल कैसा ॥ ३० ॥
देव सदोदित संचला । लोकीं बहुविध केला ।
परंतु बहुविध जाला । हें तों घडेना ॥ ३१ ॥
तैसा साधु आत्मज्ञानी । बोधें पूर्ण समाधानी ।
विवेकें आत्मनिवेदनी । आत्मरूपी ॥ ३२ ॥
जळोन काष्ठाचा आकार । अग्नि दिसे काष्ठाकार ।
परी काष्ठ होईल हा विचार । बोलों च नये ॥ ३३ ॥
कर्पूर असे तों जळतां दिसे । तैसा ज्ञानीदेह भासे ।
तयास जन्मवितां कैसें । कर्दळीउदरीं ॥ ३४ ॥
बीज भाजलें उगवेना । वस्त्र जळालें उकलेना ।
बोध निवडितां निवडेना । गंगेमधें ॥ ३५ ॥

---

१ होतें जन्ममरण हें ज्याला आहे असा देह कांहीं तो नव्हे. २ अथवा निर्गुणास मृत्यु कल्पिला उडविला=बाध केला, मृत्यु आणला. ३ दुसऱ्याला जसें बरें वाईट चिंतावें तसं तें आपणांस घडतें ४ ज्ञान्याच्या देहाची स्थिती कापरासारखी आहे. एकदा कापुर जळला म्हणजे तो पुन्हां कर्दळीच्या उदरीं निर्माण व्हावयाचा नसतो, तद्वत् ज्ञान्याचा देह एकदा गेला कीं त्यास पुन्हां जन्म नाहीं.

बोध गंगेमार्गे दिसे । गंगा येकदेसी असे ।
साधु कांहीं च न भासे । आणी आत्मा सर्वगत ॥ ३६ ॥
सुवर्ण नव्हे लोखंड । साधूस जन्म थोतांड ।
अज्ञान प्राणी जडमूढ । तयास हें उमजेचिना ॥ ३७ ॥
अंधास कांहीं च न दिसे । तरी ते लोक आंधळे कैसे ।
सनपातें[1] बरळतसे[2] । सनपाती ॥ ३८ ॥
जो स्वप्नामधें भ्याला । तो स्वप्नमयें वोसणाला[3] ।
तें भये जागल्याला । केवि लागे ॥ ३९ ॥
मुळी सर्पाकार देखिली । येक भ्याला येकें वोळखिली ।
दोघांची अवस्ता लेखिली[4] । सारिखी च कैसी ॥ ४० ॥
हातीं धरितां हि डसेना । हें येकास भासेना ।
तरी ते त्याची कल्पना । तयासी च बाधी ॥ ४१ ॥
विंचु सर्प डसला । तेणें तो चि जाकळला[5] ।
तयाचेनि लोक जाला । कासाबीस कैसा ॥ ४२ ॥
आतां तुटला अनुमान । ज्ञानियास कळे ज्ञान ।
अज्ञानास जन्ममरण । चुकेचिना ॥ ४३ ॥
येका जाणण्यासाठीं । लोक पडिले अटाटीं ।
नेणपणें त्रिपुटी होती । जन्ममृत्यें ॥ ४४ ॥
तें चि कथानुसंधान । पुढें केलें परिछिन्न[6] ।
सावधान सावधान । ह्मणे वक्ता ॥ ४५ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे निःसंदेहनिरूपणनाम समास तृतीय ॥३॥

---

॥ श्रीराम ॥

पृथ्वीमधें लोक सकळ । येक सबळ येक दुर्बळ ।
येक निर्मळ येक वोंगळ । काय निमित्य ॥ १ ॥

---

१ सन्निपाताच्या योगानें. २ बरळूं लागला ३ व्यास झाला, व्याकुळ झाला. ४ एक ज्ञान नसल्यामुळें. ५ अज्ञानानें. ६ स्पष्ट.

कित्येक राजे नांदती । कित्येक दरिद्र भोगिती ।
कितीयेकाची उत्तम स्थिती । कित्येक अधमोद्‌म ॥ १ ॥
ऐसें काय निमित्य जालें । हें मज पाहिजे निरोपिलें ।
याचें उत्तर ऐकिलें । पाहिजे श्रोतीं ॥ २ ॥
हे सकळ गुणापासीं गती । सगुण भाग्यश्री भोगिती ।
अवगुणास दरिद्रप्राप्ती । येदर्थीं संदेह नाहीं ॥ ४ ॥
जो जो जेथें उपजला । तो ते वेवसाईं उमजला ।
तयास लोक ह्मणती भला । कार्यकर्ता ॥ ५ ॥
जाणता तो कार्य करी । नेणता कांहीं च न करी ।
जाणता तो पोट भरी । नेणता भीक मागे ॥ ६ ॥
हें तों प्रगट चि असे । जनीं पाहातां प्रत्यक्ष दिसे ।
विद्येवीण करंटा बसे । विद्या तो भाग्यवंत ॥ ७ ॥
आपुली विद्या न सिकसी । तरी काये भीक मागसी ।
जेथें तेथें बुद्धी ऐसी । वडिलें सांगती ॥ ८ ॥
वडिल आहे करंटा । आणी समर्थ होये धाकुटा ।
कां जे विद्येनें मोठा । म्हणोनियां ॥ ९ ॥
विद्या नाहीं बुद्धि नाहीं । विवेक नाहीं साक्षेप नाहीं ।
कुशळता नाहीं व्याप नाहीं । म्हणोन प्राणी करंटा ॥ १० ॥
इतुकें हि जेथें वसे । तेथें वैभवास उणें नसे ।
वैभव सांडितां अपैसें । पाठीं लागे ॥ ११ ॥
वडिल समर्थ धाकुटा भिकारी । ऐका याची कैसी परी ।
वडिलाऐसा व्याप न करी । म्हणोनियां ॥ १२ ॥
जैसी विद्या तैसी हांव । जैसा व्याप तैसें वैभव ।
तोलासारिखा हावभाव । लोक करिती ॥ १३ ॥

---

१ हरताळ लावून "क्षा" चा "क" केला आहे. २ वैभव नको ह्मटलें तरी मग तें पाठीस लागतें.

विद्या नसे वैभव नसे । तेथें निर्मळ कैचा असे ।
करंटपणें वोखटा दिसे । वोंगळ आणी विकारी ॥ १४ ॥
पशु पक्षी गुणवंत । त्यास कृपा करी समर्थ ।
गुण नस्तां जिणें वेर्थ । प्राणीमात्राचें ॥ १५ ॥
गुण नाहीं गौरव नाहीं । सामर्थ्य नाहीं महत्व नाहीं ।
कुशळता नाहीं तर्क नाहीं । प्राणीमात्रासी ॥ १६ ॥
याकारणें उत्तम गुण । तें चि भाग्याचें लक्षण ।
लक्षणेंविण अवलक्षण । सहज चि जालें ॥ १७ ॥
जनामधें जो जाणता । त्यास आहे मान्यता ।
कोणी येक विद्या असतां । महत्व पावे ॥ १८ ॥
प्रपंच अथवा परमार्थ । जाणता तो चि समर्थ ।
नेणता जाणिजे वेर्थ । निःकारण ॥ १९ ॥
नेणतां विंचु सर्प डसे । नेणतां जीवघात असे ।
नेणतां कार्य नासे । कोणी येक ॥ २० ॥
नेणतां प्राणी [१]सिंतरे । नेणपणें तऱ्हे भरे ।
नेणपणें ठके विसरे । पदार्थ कांहीं ॥ २१ ॥
नेणतां वैरी जिंकिती । नेणतां अपाईं पडती ।
नेणतां [२]संव्हारती वडती । जीवनास ॥ २२ ॥
आपुलें स्वहित न कळे जना । तेणें भोगिती यातना ।
ज्ञान नेणता अज्ञाना । अधोगती ॥ २३ ॥
मायाब्रह्म जीवशिव । सारासार भावाभाव ।
जाटिल्यासाठीं होतें वाव । जन्ममरण ॥ २४ ॥
कोण कर्ता निश्चयेंसी । बद्ध मोक्ष तो कोणासी ।
ऐसें जाणतां प्राणीयासी । सुटिका घडे ॥ २५ ॥
जाणिजे देव निर्गुण । जाणिजे मी तो कोण ।
जाणिजे [३]अनन्यलक्षण । ह्मणिजे मुक्त ॥ २६ ॥

१ फसे. २ आणल्यानें. ३ देव तो च मी असा अनन्यभाव.

जितुकें जाणोन सांडिलें । तितुकें दृश्य वोलांडिलें ।
जाणत्यास जाणता तुटलें । मूळ मीपणाचें ॥ २७ ॥
न जाणता कोटीवरी । साधनें केलीं परोपरीं ।
तरी मोक्षास अधिकारी । होणार नाहीं ॥ २८ ॥
मायाब्रह्म वोळखावें । आपणास आपण जाणावें ।
इतुक्यासांठीं स्वभावें । चुके जन्म ॥ २९ ॥
जाणतां समर्थाचें अंतर । प्रसंगें वर्तें तदनंतर ।
भाग्य वैभव अपार । तेणें चि पावे ॥ ३० ॥
ह्मणौन जाणणें नव्हे सामान्य । जाणतां होईजे सर्वमान्य ।
कांहीं च नेणतां अमान्य । सर्वत्र करिती ॥ ३१ ॥
पदार्थ देखोन भून भावी । नेणतें झडपोन प्राण ठेवी ।
मिथ्या आहे उठाठेवी । जाणते जाणती ॥ ३२ ॥
जाणत्यास कळे वर्म । नेणत्याचें खोटें कर्म ।
सकळ कांहीं धर्माधर्म । जाणता कळे ॥ ३३ ॥
नेणत्यास येमयातना । जाणत्यास कांहीं च लागेना ।
सकळ जाणोन विवंचना । करी तो मुक्त ॥ ३४ ॥
नेणता कांहीं राजकारण । अपमान करून घेती प्राण ।
नेणतां कठीण वर्तमान । समस्तांस होये ॥ ३५ ॥
ह्मणोनिया नेणणें खोटें । नेणते प्राणी ते करंटे ।
जाणतां विवरतां तुटे । जन्ममरण ॥ ३६ ॥
ह्मणोन अलक्ष करूं नये । जाणणें हा चि उपाये ।
जाणतां सापडे सोये । परलोकाची ॥ ३७ ॥
जाणणें सकळास प्रमाण । मूर्खास वाटे अप्रमाण ।
परंतु अ[1]क्षिपणाची खूण । जाणता कळे ॥ ३८ ॥
येक जाणणें करून परतें । कोण सोडी प्राणीयातें ।
कोणी येक कार्य जे तें । जाणि[2]ल्याविण न कळे ॥ ३९ ॥

---

१ असें जाणलें ह्मणजे. २ एक जाणणें खेरीज करून, ज्ञानावांचून.

जाणणें ह्मणिजे स्मरण । नेणणें ह्मणिजे विस्मरण ।
दोहींमधें कोण प्रमाण । शाहाणे जाणती ॥ ४० ॥
जाणते लोक ते शाहाणे । नेणते वेडे दैन्यवाणे ।
विज्ञान तें हि जाणपणें । कळों आलें ॥ ४१ ॥
जेथें जाणपण खुंटलें । तेथे बोलणें हि तुटलें ।
हेतुरहित जालें । समाधान ॥ ४२ ॥
श्रोते ह्मणती हें प्रमाण । जालें परम समाधान ।
परी पिंडब्रह्मांडऐक्यलक्षण । मज निरोपावें ॥ ४३ ॥
ब्रह्मांडीं तें चि पिंडीं असे । बहुत बोलती ऐसें ।
परंतु यांचा प्रत्यय विलसे । ऐसें केलें पाहिजे ॥ ४४ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे जाणपणनिरूपणनाम समास चतुर्थ ॥४॥

---

॥ श्रीराम ॥

पिंडासारिखी ब्रह्मांडरचना । न ये आमुच्या अनुमाना ।
प्रचित पाहातां नाना । मतें भांबावती ॥ १ ॥
जें पिंडीं तें चि ब्रह्मांडीं । ऐसी बोलावयाची प्रौढी ।
हें वचन घडीनें घडी । तत्वज्ञ बोलती ॥ २ ॥
पिंड ब्रह्मांड येक राहाटी । ऐसी लोकांची लोकधाटी ।
परी प्रत्ययाचे परीपाटीं[1] । तगों न सके ॥ ३ ॥
स्थूळ सूक्ष्म कारण माहाकारण । हे च्यारी पिंडांचे देह जाण ।
विराट हिरण्य अव्याकृत मूळप्रकृती हे खूण । ब्रह्मांडींची ॥ ४ ॥
हे शास्त्रधाटी जाणावी । परी प्रचित कैसी आणावी ।
प्रचित पाहातां गथागोवी । होत आहे ॥ ५ ॥
पिंडीं आहे अंतःकरण । तरी ब्रह्मांडीं विष्णु जाण ।
पिंडीं बोलिजेतें मन । तरी ब्रह्मांडीं चंद्रमा ॥ ६ ॥

---

१ परिपाठ, रीत. हें ह्मणणें प्रत्ययापुढ टिकत नाहीं.

पिंडीं बुद्धी ऐसें बोलिजे । तरी ब्रह्मांडीं ब्रह्मा ऐसें जाणिजे ।
पिंडीं चित्त ब्रह्मांडीं बोळखिजे. । नारायेणु ॥ ७ ॥
पिंडीं बोलिजे अहंकार । ब्रह्मांडीं रुद्र हा निर्धार ।
ऐसा बोलिला विचार । शास्त्रांतरीं ॥ ८ ॥
तरी कोण विष्णूचें अंत:कर्ण । चंद्राचें कैसें मन ।
ब्रह्मयाचें बुद्धिलक्षण । मज निरोपावें ॥ ९ ॥
नारायेणाचें कैसें चित्त । रुद्रअहंकाराचा हेत ।
हा विचार पाहोन नेमस्त । मज निरोपावा ॥ १० ॥
प्रचितनिश्चयापुढें अनुमान । जैसें सिंहापुढें आलें स्वान ।
खऱ्यापुढें खोटें प्रमाण । होईल कैसें ॥ ११ ॥
परी यास पारखी पाहिजे । पारखीनें निश्चय लाहिजे ।
परीक्षा नस्तां राहिजे । अनुमानसशई ॥ १२ ॥
विष्णु चंद्र आणी ब्रह्मा । नारायेण आणी रुद्रनामा ।
यां पाचांचीं अंत:कर्णपंचकें आम्हा । स्वामी निरोपावीं ॥ १३ ॥
येथें प्रचित हें प्रमाण । नलगे शास्त्राचा अनुमान ।
अथवा शास्त्रीं तरी पाहोन । प्रत्ययो आणावा ॥ १४ ॥
प्रचितीवीण जें बोलणें । तें अवघें चि कटाळवाणें ।
तोंड पसरून जैसें सुणें । रडोन गेलें ॥ १५ ॥
तेथें काये हो ऐकावें । आणी काये शोधून पाहावें ।
जेथें प्रत्ययाच्या नांवें । सुन्याकार ॥ १६ ॥
आवघे आंधळे चि मिळाले । तेथें डोळसाचें काय चाले ।
अनुभवाचे नेत्र गेले । तेथें अंधकार ॥ १७ ॥
नाहीं दुग्ध नाहीं पाणी । केली विष्ठेची सारणी ।
तेथें निवडायाचे धनी । ते येक डोंबकावळे ॥ १८ ॥
आपुले इछेनें बोलिलें । पिंडाऐसें ब्रह्मांड कल्पिलें ।
परी तें प्रचितीस आलें । कोण्या प्रकारें ॥ १९ ॥

जाणणें ह्मणिजे स्मरण । नेणणें ह्मणिजे विस्मरण ।
दोहींमधें कोण प्रमाण । शाहाणे जाणती ॥ ४० ॥
जाणते लोक ते शाहाणे । नेणते वेडे दैन्यवाणे ।
विज्ञान तें हि जाणपणें । कळों आलें ॥ ४१ ॥
जेथें जाणपण खुंटलें । तेथे बोलणें हि तुटलें ।
हेतुरहित जालें । समाधान ॥ ४२ ॥
श्रोते ह्मणती हें प्रमाण । जालें परम समाधान ।
परी पिंडब्रह्मांडऐक्यलक्षण । मज निरोपावें ॥ ४३ ॥
ब्रह्मांडीं तें चि पिंडीं असे । बहुत बोलती ऐसें ।
परंतु याचा प्रत्यय विलसे । ऐसें केलें पाहिजे ॥ ४४ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे जाणपणनिरूपणनाम समास चतुर्थ ॥४॥

---

॥ श्रीराम ॥

पिंडासारिखी ब्रह्मांडरचना । न ये आमुच्या अनुमाना ।
प्रचित पाहातां नाना । मतें भांबावती ॥ १ ॥
जें पिंडीं तें चि ब्रह्मांडीं । ऐसी बोलावयाची प्रौढी ।
हें वचन घडीनें घडी । तत्वज्ञ बोलती ॥ २ ॥
पिंड ब्रह्मांड येक राहाटी । ऐसी लोकांची लोकधाटी ।
परी प्रत्ययाचे परीपाटीं । तगों न सके ॥ ३ ॥
स्थूळ सूक्ष्म कारण माहाकारण । हे च्यारी पिंडींचे देह जाण ।
विराट हिरण्य अव्याकृत मूळप्रकृती हे खूण । ब्रह्मांडींची ॥ ४ ॥
हे शास्त्रधाटी[1] जाणावी । परी प्रचित कैसी आणावी ।
प्रचित पाहाता गथागोवी । होत आहे ॥ ५ ॥
पिंडीं आहे अंतःकरण । तरी ब्रह्मांडीं विष्णु जाण ।
पिंडीं बोलिजेते मन । तरी ब्रह्मांडीं चंद्रमा ॥ ६ ॥

---

१ परिपाठ, रीत. हें ह्मणणें प्रत्ययापुढें टिकत नाहीं.

पिंडीं बुद्धी ऐसें बोलिजे । तरी ब्रह्मांडीं ब्रह्मा ऐसें जाणिजे ।
पिंडीं चित्त ब्रह्मांडीं वोळखिजे,। नारायेणु ॥ ७ ॥
पिंडीं बोलिजे अहंकार । ब्रह्मांडीं रुद्र हा निर्धार ।
ऐसा बोलिला विचार । शास्त्रांतरीं ॥ ८ ॥
तरी कोण विष्णूचें अंतःकर्ण । चंद्राचें कैसें मन ।
ब्रह्मयाचें बुद्धिलक्षण । मज निरोपावें ॥ ९ ॥
नारायेणाचें कैसें चित्त । रुद्रअहंकाराचा हेत ।
हा विचार पाहोन नेमस्त । मज निरोपावा ॥ १० ॥
प्रचितनिश्चयापुढें अनुमान । जैसें सिंहापुढें आलें स्वान ।
खऱ्यापुढें खोटें प्रमाण । होईल कैसें ॥ ११ ॥
परी यास पारखी पाहिजे । पारखीनें निश्चय लाहिजे ।
परीक्षा नस्तां राहिजे । अनुमानसशईं ॥ १२ ॥
विष्णु चंद्र आणी ब्रह्मा । नारायेण आणी रुद्रनामा ।
यां पाचाचीं अंतःकर्णपंचकें आह्मा । स्वामी निरोपावीं ॥ १३ ॥
येथें प्रचित हें प्रमाण । नलगे शास्त्राचा अनुमान ।
अथवा शास्त्रीं तरी पाहोन । प्रत्ययो आणावा ॥ १४ ॥
प्रचितीवीण जें बोलणें । तें अवघें चि कटाळवाणें ।
तोंड पसरून जैसें सुणें । रडोन गेलें ॥ १५ ॥
तेथें काये हो ऐकावें । आणी काये शोधून पाहावें ।
जेथें प्रत्ययाच्या नांवें । सुन्याकार ॥ १६ ॥
आवघे आंधळे चि मिळाले । तेथें डोळसाचें काय चाले ।
अनुभवाचे नेत्र गेले । तेथें अंधकार ॥ १७ ॥
नाहीं दुग्ध नाहीं पाणी । केली विष्ठेची सारणी ।
तेथें निवडायाचे धनी । ते येक डोंबकावळे ॥ १८ ॥
आपुले इछेनें बोलिलें । पिंडाऐसें ब्रह्मांड कल्पिलें ।
परी तें प्रचितीस आलें । कोण्या प्रकारें ॥ १९ ॥

ह्मणोन हा अवघा च अनुमान । अवघें कल्पनेचें रान ।
भेलों न ध्यावें आडरान । तस्करीं ध्यावें ॥ २० ॥
कल्पून निर्मिले मंत्र । देव ते कल्पनामात्र ।
देव नाहीं स्वतंत्र । मंत्राधेनें ॥ २१ ॥
येथें न बोलतां जाणावें । बोलणें विवेका आणावें ।
आधळें पाउलीं वोळखावें । विचक्षणें ॥ २२ ॥
जयास जैसें भासलें । तेणें तैसें कवित्व केलें ।
परी हें पाहिजे निवडिलें । प्रचितीनें ॥ २३ ॥
ब्रह्मयानें सकळ निर्मिलें । ब्रह्मयास कोणें निर्माण केलें ।
विष्णूनें विश्व पाळिलें । विष्णूस पाळिता कवणु ॥ २४ ॥
रुद्र विश्वसंव्हारकर्ता । परी कोण रुद्रास संव्हारिता ।
कोण काळाचा नियता । कळला पाहिजे ॥ २५ ॥
याचा कळेना विचार । तों अवघा अंधकार ।
म्हणोनियां सारासार । विचार करणें ॥ २६ ॥
ब्रह्मांड स्वभावें चि जालें । परतु हें पिंडाकार कल्पिलें ।
कल्पिलें परी प्रत्यया आलें । नाहीं कदा ॥ २७ ॥
पाहातां ब्रह्मांडाची प्रचिती । कित्येक संशय उठती ।
हें कल्पनिक श्रोतीं । नेमस्त जाणावें ॥ २८ ॥

---

१ संशय २ भल्यानें ३ मंत्र हे कल्पनेनें निर्माण केलेले आहेत. अमुक देवाचा अमुक मंत्र ही नुसती कल्पना आहे. अर्थात् त्या मंत्रानीं जी देवाची प्राणप्रतिष्ठा होते ती हि कल्पनेची च होय ४ मंत्राच्या आधीन ५ " आधळ्याचे डोळे पाहणाराला केव्हा केव्हा चागले दिसतात, पण तो चालूं लागला ह्मणजे ओळखूं येतो, तद्वत् शास्त्रांनीं सांगितलेल्या गोष्टी दिसण्यांत खऱ्या दिसत असतील, पण त्या तशा च आहेत ह्मणून काय सांगावें ? आह्मांला प्रत्यय आणून द्या, " असा अर्थ कोणी लावतात पण " हें कांहीं बोलता येण्यासारखें नाहीं, पाहतां येण्यासारखें नाहीं तर हें विवेकानें जाणावयाचें असतें जसें आधळ्याला दिसत नसून हि, तो विचक्षणपणें, जणूं काय, पावलानें च पहातो, तद्वत् हें विवेकानें जाणलें पाहिजे, " असा याचा अर्थ असेल काय ? ६ सहज, अनायासें.

पिंडासारिखी ब्रह्मांडरचना । कोण आणितो अनुमाना ।
ब्रह्मांडीं पदार्थ नाना । ते पिंडीं कैंचे ॥ २९ ॥
औटकोटी भूतावळी । औटकोटी तीर्थावळी ।
औटकोटी मंत्रावळी । पिंडीं कोठें ॥ ३० ॥
तेतीस कोटी सुरवर । अठ्यासि सहस्र ऋषेश्वर ।
नवकोटी कात्यायेणीचा विचार । पिंडीं कोठें ॥ ३१ ॥
च्यामुंडा छपन्न कोटी । कित्येक जीव कोट्यानुकोटी ।
चौऱ्यासी लक्ष योनींची दाटी । पिंडीं[१] कोठें ॥ ३२ ॥
ब्रह्मांडीं पदार्थ निर्माण जाले । पृथकाकारें वेगळाले ।
ते हि तितुके निरोपिले । पाहिजेत पिंडीं ॥ ३३ ॥
जितुक्या औषधी तितुकीं फळें । नाना प्रकारीं रसाळें ।
नाना बीजें धान्यें सकळें । पिंडीं निरोपावीं ॥ ३४ ॥
हें सांगता पुरवेना । तरी उगें चि बोलावेना ।
बोलिलें न येतां अनुमाना । लाजिरवाणें ॥ ३५ ॥
तरी हें निरोपिलें नवचे । फुकट बोलतां काय वेचे ।
याकारणें अनुमानाचें । कार्य नाहीं ॥ ३६ ॥
पाच भूतें ते ब्रह्मांडीं । आणी पाच चि वर्तती पिंडीं ।
याची पाहावी रोकडी । प्रचीत आतां ॥ ३७ ॥
पांचा भूतांचें ब्रह्मांड । आणी पचभूतिक हें पिंड ।
यावेगळें तें उदंड । अनुमानज्ञान ॥ ३८ ॥
जितुकें अनुमानाचें बोलणें । तितुकें वमनप्राये त्यागणें ।
निश्चयात्मक तें चि बोलणें । प्रत्ययाचें ॥ ३९ ॥
जें चि पिंडीं तें चि ब्रह्मांडीं । प्रचित नाहीं कीं रोकडी[२] ।
पंचभूतांची तांतडी[३] । दोहीकडे ॥ ४० ॥

---

१ पहिल्या ओंवीपासून तों येथवर पूर्वपक्ष झाला ; येथवर शिष्याची शंका झाली आतां येथून पुढें सद्गुरु उत्तर देतात २ हा प्रश्न आहे पिंडब्रह्मांड पंचभूतात्मक आहेत म्हणून एक च आहेत, तेव्हा आता नाहीं कां प्रचित येत? ३ गर्दी.

ह्मणोनि देहींचें[1] थानमानें । हा तों अवघा चि अनुमान ।
आतां येक समाधान । मुख्य तें कैसें ॥ ४१ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे अनुमाननिर्शननाम समास पांचवा ॥ ५ ॥

---

॥ श्रीराम ॥

आकाश जैसें निराकार । तैसा ब्रह्माचा विचार ।
तेथें वायोचा विकार । तैसी मूळमाया ॥ १ ॥
हें दासबोधीं असे बोलिलें । ज्ञानदशकीं प्रांजळ केलें ।
मूळमायेंत दाखविलें । पंचभूतिक ॥ २ ॥
तेथें जाणीव तो सत्वगुण । मध्यें[3] तो रजोगुण ।
नेणीव तमोगुण । जाणिजे श्रोतीं ॥ ३ ॥
ह्मणाल तेथें कैंची जाणीव । तरी ऐका याचा अभिप्राव ।
पिंडीं माहांकारण देहीं सर्व- । साक्षिणी अवस्था ॥ ४ ॥
तैसी मूळप्रकृती ब्रह्मांडींचें । देह माहाकारण साचें ।
ह्मणोन तेथें जाणीवेचें । आधिष्ठान आलें ॥ ५ ॥
असो मूळमायेभीतरीं । गुप्त त्रिगुण वास करी ।
पष्ट होती संधी चतुरीं । जाणावी गुर्णक्षोभिणी ॥ ६ ॥
जैसा तृणाचा पोटरींकळा । पुढें उकलोन होये मोकळा ।
तैसी मूळमाया अवलीळा । गुणा प्रसवली ॥ ७ ॥
मूळमाया वायोस्वरूप । ऐक गुणक्षोभिणीचें रूप ।
गुणविकार होतां चि अल्प । गुणक्षोभिणी बोलिजे ॥ ८ ॥

---

१ देहांतील. २ स्थानमान, स्थितिप्रमाण, रचना ३ कांहीं जाणीव व कांहीं नेणीव मिळून. ४ पिंडाच्या ठिकाणीं महाकारण देह ह्मणजे च सर्वसाक्षिणी ( तुर्या ) अवस्था होय ५ पिंडांतील चवथा देह जसा महाकारण, तसा ब्रह्मांडातील चवथा देह मूळप्रकृति होय आणि महाकारण देहाच्या ठिकाणीं जशी सर्वसाक्षिणी अवस्था आहे, तद्वत् मूळप्रकृतींत हि जाणीव आहे. ६ मूळमायेमध्यें गुप्त असलेले त्रिगुण, वेळ आली ह्मणजे जेव्हां स्पष्ट होतात, तेव्हा तिला गुणक्षोभिणी=गुणमाया असें ह्मणतात. ७ उमलण्यापूर्वीचें कणीस ८ सहज.

पुढें जाणीव मध्यस्तें नेणीवें । मिश्रित चालिला स्वभावें ।
तेथें मातृकास ठाव । शब्दें जाला ॥ ९ ॥

तो शब्दगुण आकाशींचा । ऐसा अभिप्राव येथींचा ।
शब्दें चि वेदशास्त्रांचा । आकार जाला ॥ १० ॥

पंचभूतें त्रिगुणाकार । अवघा वायोचा विकार ।
जाणीवनेणीवेचा विचार । वायो चि करितां ॥ ११ ॥

वायो नस्तां कैंची जाणीव । जाणीव नस्तां कैंची नेणीव ।
जाणीवनेणीवेस ठाव । वायोगुणें ॥ १२ ॥

जेथें मुळीं च नाहीं चळण । तेथें कैंचें जाणीवलक्षण ।
म्हणोनि वायोचा गुण । नेमस्त जाणावा ॥ १३ ॥

येकापासून येक जालें । हें येक उगें चि दिसोन आलें ।
स्वरूप मुळीं च भासलें । त्रिगुणभूतांचें ॥ १४ ॥

ऐसा हा मुळींचा कर्दमु । पुढें पष्टतेचा अनुक्रमु ।
सांगतां येकापासून येक उगमु । हें हि खरें ॥ १५ ॥

वायोचा कर्दम बोलिला । तयापासून अग्नि जाला ।
तो हि पाहातां देखिला । कर्दमु चि ॥ १६ ॥

अग्नीपासून जालें आप । तें हि कर्दमस्वरूप ।
आपापासून पृथ्वीचें रूप । तें हि कर्दमरूपी ॥ १७ ॥

---

१ गुणमायेपासून. २ सत्वगुण. ३ रजोगुण. ४ तमोगुण. ५ गुणांच्या ठिकाणीं ६ मातृकात्मक शब्द उत्पन्न झाला, आणि शब्द हा आकाशाचा गुण आहे, तेव्हां तेथें आकाश उत्पन्न झालें आणि पुढें आकाशापासून वायु, वायूपासून अग्नि, अग्नीपासून पाणी आणि पाण्यापासून पृथ्वी अशी परंपरा आहे. ७ तिन्ही गुणांशीं मिळालेलीं पंचभूतें म्हणजे अष्टधा प्रकृति. ८ मूळमाया--गुणमाया--त्रिगुण-पंचभूतें अशी एकापासून एक परंपरा सांगितली खरी, परंतु खरा विचार पाहिला तर तीन गुण आणि पंचभूतें यांचें स्वरूप मुळीं च ( वायुस्वरूप मूळमायेच्या ठिकाणीं ) आहे. ९ प्रत्येक भूताच्या ठिकाणीं इतर भूताचे अंश असतात, हें निरूपण मागें ८×४ त आलें च आहे म्हणून कर्दमरूप.

येथें आशंका उठिली । भूतांस जाणीव कोठें देखिली ।
तरी भूतांत जाणीव हे ऐकिली । नाहीं वार्ता ॥ १८ ॥
जाणीव म्हणिजे जाणतें चळण । तें चि वायोचें लक्षण ।
वायोभांगीं सकळ गुण । मागां निरोपिले ॥ १९ ॥
म्हणोन जाणीवनेणीवमिश्रित । अवघें चालिलें पंचभूत ।
म्हणोनियां भूतांत । जाणीव असे ॥ २० ॥
कोठें दिसे कोठें न दिसे । परी ते भूतीं व्यापून असे ।
तिक्षण बुद्धि करितां भासे । स्थूळ सूक्ष्म ॥ २१ ॥
पंचभूतें आकारलीं । भूतीं भूतें कालवलीं ।
तरी पाहातां भासलीं । येक स्थूळ येक सूक्ष्में ॥ २२ ॥
निरोधवायो न भासे । तैसी जाणीव न दिसे ।
न दिसे परी ते असे । भूतरूपें ॥ २३ ॥
काष्ठीं अग्नी दिसेना । निरोधवायो भासेना ।
जाणीव तैसी लक्षेना । येकायेकीं ॥ २४ ॥
भूतें वेगळालीं दिसती । पाहातां येक चि भासती ।
बहुत धूर्तपणें प्रचिती । वोळखावी ॥ २५ ॥
ब्रह्मापासून मूळमाया । मूळमायेपासून गुणमाया ।
गुणमायेपासून तया । गुणास जन्म ॥ २६ ॥
गुणापासूनियां भूतें । पावलीं पष्ट दशेतें ।
ऐसियांचीं रूपें समस्तें । निरोपिलीं ॥ २७ ॥
आकाश गुणापासून जालें । हें कदापी नाहीं घडलें ।
शब्दगुणास कल्पिलें । आकाश वायां ॥ २८ ॥
येक सांगतां येक चि भावी । उगी च करी गथागोवी ।
तया वेड्याची उगवी । कोणें करावी ॥ २९ ॥
सिकविल्यां हि कळेना । उमजविल्यां हि उमजेना ।
दृष्टांतें हि तर्केना । मंदरूप ॥ ३० ॥

---

१ आकाश गुणापासून झालें हें कसें ? उलट शब्द हा आकाशाचा गुण होय.

भूतांहून भूत थोर । हा हि दाविला विचार ।
परी भूतांवडिल स्वतंत्र । कोण आहे ॥ २१ ॥
जेथें मूळमाया पंचभूतिक। तेथें काये राहिला विवेक ।
मूळमायेपरतें येक । निर्गुणब्रह्म ॥ २२ ॥
ब्रह्मीं मूळमाया जाली । तिची लीळा परीक्षिली ।
तंव ते निखळ वोतली । भूतेंत्रिगुणांची ॥ २३ ॥
भूतें विकारवंत चत्वार । आकाश पाहातां निर्विकार ।
आकाश भूत हा विचार । उपाधीकेरितां ॥ २४ ॥
पिंडी व्यापक ह्मणोन जीव । ब्रह्मांडीं व्यापक ह्मणोन शिव ।
तैसा च हा हि अभिप्राव । आकाशाचा ॥ २५ ॥
उपाधीमधें सांपडलें । सूक्ष्म पाहातां भासलें ।
इतुक्यासाठीं आकाश जालें । भूतरूप ॥ २६ ॥
आकाश अवकाश तो भकास । परब्रह्म तें निराभास ।
उपाधी नस्ता जें आकाश । तें चि ब्रह्म ॥ २७ ॥
जाणीव नेणीव मध्यमान । हें चि गुणाचें प्रमाण ।
येथें निरोपिले त्रिगुण । रूपेंसहित ॥ २८ ॥
प्रकृती पावली विस्तारातें । पुढें येकाचें येक चि होतें ।
विकारवंत चि तयातें । नेम कैंचा ॥ २९ ॥
काळें पांढरें मेळवितां । पारवें होतें तत्वता ।
काळें पिवळें मेळवितां । हिरवें होये ॥ ४० ॥
ऐसे रंग नानापरी । मेळवितां पालट धरी ।
तैसें दृश्य हें विकारी । विकारवंत ॥ ४१ ॥
येका जीवनें नाना रंग । उमटों लागती तरंग ।
पालटाचा लागवेग । किती ह्मणोन पाहावा ॥ ४२ ॥

---

१ माया ही पंचभूतें व त्रिगुण यांची ओतलेली मूस आहे. २ उपाधीच्या योगानें. ३ आकाश=अवकाश=भकास=कांहीं नाहीं असा भास. ४ जाणीवनेणीव-मिश्रित.

येका उदकाचे विकार । पाहातां दिसती अपार ।
पांचा भूतांचे विस्तार । चौऱ्यासीं लक्ष योनी ॥ ४३ ॥
नाना देहाचें बीज उदक । उदकापासून सकळ लोक ।
किडा मुंगी स्वापदादिक । उदकें चि होये ॥ ४४ ॥
शुक्लीत श्रोणीत म्हणिजे नीर । त्या नीराचें हें शरीर ।
नखें दंत अस्तिमात्र । उदकाच्या होती ॥ ४५ ॥
मुळ्यांचे बारीक पांगोरे[1] । तेणें पथें उदक भरे ।
त्या उदकें चि विस्तारे । वृक्षमात्र ॥ ४६ ॥
अम्रवृक्ष मोहरा आले । अवघे उदकाकारितां जाले ।
फळीं फुलीं लगडले । सावकास ॥ ४७ ॥
खोड फोडून अंबे पाहातां । तेथें दिसेना सर्वथा ।
खांद्या फोडून फळें पाहातां । बोलीं सालें ॥ ४८ ॥
मुळापासून सेवटवरी । फळ नाहीं तदनतरीं ।
जळरूप फळ चतुरीं । विवेकें जाणावें ॥ ४९ ॥
तें चि जळ सेंड्या चढे । तेव्हां वृक्षमात्र लगडे ।
येकाचें येक चि घडे । येणें प्रकारें ॥ ५० ॥
पत्रें पुष्पें फळें भेद । किती करावा अनुवाद ।
सूक्ष्म दृष्टीनें विशद । होत आहे ॥ ५१ ॥
भूताचे विकार सांगों किती । क्षणक्षणा पालटती ।
येकाचे येक चि होती । नाना वर्ण ॥ ५२ ॥
त्रिगुणभूतांची लटपट । पाहों जातां हे खटपट ।
बहुरूप बहु पालट । किती ह्मणोन सांगावा ॥ ५३ ॥
ये प्रकृतीचा निरास । विवेकें वारावा सावकास ।
मग परमात्मा परेश । अनन्यभावें भजावा ॥ ५४ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसवादे गुणरूपनिरूपणनाम समास साहावा ॥ ६॥

---

१ पांगोरे, बारीक तत्तु.

॥ श्रीराम ॥

आधीं स्थूळ आहे येक । तरी मग अंतःकर्णपंचक ।
जाणतेपणाचा विवेक । स्थूळाकारितां ॥ १ ॥
तैसें चि ब्रह्मांडेंवीण कांहीं । मूळमायेसि जाणीव नाहीं ।
स्थूळाच्या आधारें सर्व हि । कार्य चाले ॥ २ ॥
तें स्थूळ चि नस्तां निर्माण । कोठें राहेल अंतःकर्ण ।
ऐसा श्रोतीं केला प्रश्न । याचें उत्तर ऐका ॥ ३ ॥
कोसले[1] अथवा काटेघरें । नाना पृष्ठिभागीं चाळती घरें ।
जीव करिती व्हानथोरें । शक्तीनसार ॥ ४ ॥
शंख सिंपी घुला कवडे । आधीं त्यांचें घर घडे ।
किंवा आधीं निर्माण किडे । हें विचारावें ॥ ५ ॥
आधीं प्राणी ते होती । मग घरें निर्माण करिती ।
हे तों प्रत्यक्ष प्रचिती । सांगणें नलगे ॥ ६ ॥
तैसें आधीं सूक्ष्म जाण । मग स्थूळ होतें निर्माण ।
येणें दृष्टांतें प्रश्न । फिटला श्रोतयांचा ॥ ७ ॥
तव श्रोता पुसे आणीक । जी आठवलें कांहीं येक ।
जन्ममृत्याचा विवेक । मज निरोपावा ॥ ८ ॥
कोण जन्मास घालितें । आणी मागुता कोण जन्म घेतें ।
हें प्रत्यया कैसें येतें । कोण्या प्रकारें ॥ ९ ॥
ब्रह्मा जन्मास घालितो । विष्णु प्रतिपाळ करितो, ।
रुद्र अवघें संव्हारितो । ऐसें बोलती ॥ १० ॥
तरी हें प्रवृत्तीचें बोलणें । प्रत्ययास आणी उणें ।
प्रत्यय पाहातां श्लाघ्यवाणें[2] । होणार नाहीं ॥ ११ ॥
ब्रह्मयास कोणें जन्मास घातलें । विष्णूस कोणें प्रतिपाळिलें ।
रुद्रास कोणें संव्हारिलें । माहाप्रळईं ॥ १२ ॥

---

१ आपणाभोंवतीं घर करून आंत स्वतःस कोंडून घेणारा एक किडा.
२ वाडवडिल बोलतात त्याला अनुसरून, परिपाठाचें, जनरूढीचें.

ह्मणौनि हा सृष्टीभाव । अवघा मायेचा स्वभाव ।
कर्ता ह्मणों निर्गुण देव । तरी तो निर्विकारी ॥ १३ ॥
ह्मणावें माया जन्मास घाली । तरी हे आपण चि विस्तारली ।
आणी विचारितां थारली । हें हि घडेना ॥ १४ ॥
आतां जन्मतो तो कोण । कैसी त्याची वोळखण ।
आणी संचिताचें लक्षण । तें हि निरोपावें ॥ १५ ॥
पुण्याचें कैसें रूप । आणी पापाचें कैसें स्वरूप ।
या हि शब्दाचा आक्षेप । कोण कर्ता ॥ १६ ॥
हें कांहीं च न ये अनुमाना । ह्मणती जन्म घेते वासना ।
परी ते पाहातां दिसेना । ना धरितां न ये ॥ १७ ॥
वासना कामना आणी कल्पना । हेतु भावना मति नाना ।
ऐशा अनंत वृत्ती जाणा । अतःकर्णपंचकाच्या ॥ १८ ॥
असो हें अवघें जाणीवयंत्र । जाणीव ह्मणिजे स्मरणमात्र ।
त्या स्मरणास जन्मसूत्र । कैसें लागे ॥ १९ ॥
देहो निर्माण पांचा भूतांचा । वायो चाळक तयाचा ।
जाणणें हा मनाचा । मनोभाव ॥ २० ॥
ऐसें हें सहज चि घडलें । तत्वांचें गुंथाडें जालें ।
कोणास कोणें जन्मविलें । कोण्या प्रकारें ॥ २१ ॥
तरी हें पाहातां दिसेना । ह्मणोन जन्म चि असेना ।
उपजला प्राणी येना । मागुता जन्मा ॥ २२ ॥
कोणासी च जन्म नाहीं । तरी संतसगें केलें काई ।
ऐसा अभिप्राव सर्व हि । श्रोतयांचा ॥ २३ ॥

---

१ सहजगत्या. २ हें सर्व मायेनें केलें असें म्हणावें, तर माया ही आपल्या आपण जन्मास आली व नाहींशी हि झाली. मायेचा विस्तार आपल्या आपण झाला असून ती स्थिर हि नाहीं. तेव्हां अशा या अशाश्वत मायेला कर्ता कसें म्हणावें ? ३ आणि या शब्दांची शंका घेणारा मी कोण ?

पूर्वी स्मरण ना विस्मरण । मधें चि हें जालें स्मरण ।
अंतर्यामीं अंतःकर्ण । जाणती कळा ॥ २४ ॥
सावध आहे तों स्मरण । विकळ होतां विस्मरण ।
विस्मरण पडतां मरण । पावती प्राणी ॥ २५ ॥
स्मरण विस्मरण राहिलें । मग देहास मरण आलें ।
पुढें जन्मास घातलें । कोणास कोणें ॥ २६ ॥
ह्मणोनी जन्म चि असेना । आणी यातना हि दिसेना ।
अवघी वेर्थ चि कल्पना । बळावली ॥ २७ ॥
ह्मणौन जन्म चि नाहीं कोणासी । श्रोतयाची आशंका ऐसी ।
मरोन गेलें तें जन्मासी । मागुतें न ये ॥ २८ ॥
वाळलें काष्ठ हिरवळेना[१] । पडिलें फळ तें पुन्हां लागेना ।
तैसें पडिलें शरीर येना । जन्मास मागुतें ॥ २९ ॥
मडकें अवचितें फुटलें । फुटलें तें फुटोनि च गेलें ।
तैसें चि पुन्हां जन्मलें । नाहीं मनुष्य ॥ ३० ॥
येथें अज्ञान आणी सज्ञान । सारिखे च जाले समान ।
ऐसा बळावला अनुमान[२] । श्रोतयांसी ॥ ३१ ॥
वक्ता ह्मणे हो ऐका । अवघें पाषांड करूं नका ।
अनुमान असेल तरी विवेका । अवलोकावें ॥ ३२ ॥
प्रेत्नेंवीण कार्य जालें । जेविल्यावीण पोट भरलें ।
ज्ञानेंवीण मुक्त जालें । हें तों घडेना ॥ ३३ ॥
स्वयें आपण जेविला । त्यास वाटे लोक धाला ।
परंतु हें समस्तांला । घडलें पाहिजे ॥ ३४ ॥
पोहणें सिकला तो तरेल । पोहणें नेणे तो बुडेल ।
येथें हि अनुमान करील । ऐसा कवणु ॥ ३५ ॥

---

१ हिरवें होत नाहीं. २ शंका, संशय.

तैसें जयांस ज्ञान जालें । ते ते तितुके च तरले ।
ज्याचें बंधन चि तुटलें । तो चि मुक्त ॥ ३६ ॥
मोकळा[1] ह्मणे नाहीं बंधन । आणी प्रत्यक्ष बंदीं पडिले जन
त्यांचें कैसें समाधान । तें तुम्ही पाहा ॥ ३७ ॥
नेणे दुसऱ्याची तळमळ । तें मनुष्य परदुःखसीतळ ।
तैसा च हा हि केवळ । अनुभव जाणावा ॥ ३८ ॥
जयास आत्मज्ञान जालें । तत्वें तत्व विवंचिलें ।
खुणेसी पावतां च बाणलें । समाधान ॥ ३९ ॥
ज्ञानें चुके जन्ममरण । सगट बोलणें अप्रमाण ।
वेदशास्त्र आणी पुराण । मग कासयासी ॥ ४० ॥
वेदशास्त्रविचारबोली । माहानुभावांची मंडळी ।
भूमंडळीं लोक सकळी । हें मानीतना ॥ ४१ ॥
अवघें होतां अप्रमाण । मग आपलें च काय प्रमाण ।
म्हणोन जेथें आत्मज्ञान । तो चि मुक्त ॥ ४२ ॥
अवघे च मुक्त पाहातां नर । हा हि ज्ञानाचा उद्गारें ।
ज्ञानेंविण तो उद्धार । होणार नाहीं ॥ ४३ ॥
आत्मज्ञान कळों आलें । म्हणोन दृश्य मिथ्या जालें ।
परंतु वेढा लाविलें । सकळांस येणें ॥ ४४ ॥
आतां प्रश्न हा फिटला । ज्ञानी ज्ञानें मुक्त जाला ।
अज्ञान तो बांधला । आपले कल्पनेनें ॥ ४५ ॥
विज्ञानासारिखें अज्ञान । आणी मुक्तासारिखें बंधन ।
निश्चयासारिखा अनुमान । मानूं चि नये ॥ ४६ ॥
बंधन ह्मणिजे कांहीं च नाहीं । परी वेढा लाविलें सर्वे[2] हे ।
यास उपाव चि नाहीं । कळल्यावाचुनी ॥ ४७ ॥

---

१ सरसकट. २ सर्व च मुक्त आहेत हें तूं ह्मणतोस तें कांहीं खोटें नाहीं; हें ह्मणणें देखील ज्ञानाचें आहे, पण तूं कांहीं तशा दृष्टीनें हे प्रश्न विचारिले नाहीस. तूं केवळ पाखांडमतानें सरसकट सगळे च मुक्त असें प्रतिपादन करितोस.

कांहीं च नाहीं आणी बाधी । हें चि नवल पाहा आधीं ।
मिथ्या जाणिजेना बंद्धि । ह्मणोन बद्ध ॥ ४८ ॥
भोळा भाव सिद्धी जाव । हा उधाराचा उपाव ।
रोकडा मोक्षाचा अभिप्राव । विवेकें जाणावा ॥ ४९ ॥
प्राणी व्हावया मोकळा । आधीं पाहिजे जाणीवकळा ।
सकळ जाणतां निराळा । सहज चि होये ॥ ५० ॥
कांहीं च नेणिजे तें अज्ञान । सकळ जाणिजे तें ज्ञान ।
जाणीव राहातां विज्ञान । स्वयें चि आत्मा ॥ ५१ ॥
अमृत सेऊन अमर जाला । तो ह्मणे मृत्य कैसा येतो जनाला ।
तैसा विवेकी ह्मणे बद्धाला । जन्म तो कैसा ॥ ५२ ॥
जाणता ह्मणे जनातें । तुह्मांस भूत कैसें झडपितें ।
तुह्मांस वांष कैसें चढतें । निर्विष ह्मणे ॥ ५३ ॥
आधीं बद्धासारिखें व्हावें । मग हें नलगे चि पुसावें ।
विवेक दुरी ठेऊन पाहावें । लक्षण बद्धाचें ॥ ५४ ॥
निजेल्यास चेईलों तो । ह्मणे हा कां रे वोसणातो ।
अनुभव पाहाणें चि आहे तो । तरी मग निजोन पाहावा ॥ ५५ ॥
ज्ञाल्याची उगवली वृत्ती । बद्धाऐसीं न पडे गुंती ।
भुकेल्याची अनुभवप्रासी । धाल्यास नाहीं ॥ ५६ ॥
इतुकेन आशंका तुटली । ज्ञानें मोक्षप्राप्ती जाली ।
विवेक पाहातां बाणली । अंतरस्थिती ॥ ५७ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे विकल्पनिर्शननाम समास सप्तम ॥ ७ ॥

---

॥ श्रीराम ॥

ज्ञाता सुटला ज्ञानमतें । परंतु जन्म कैसा बद्धातें ।
बद्धाचें काये जन्मतें । अंतकाळीं ॥ १ ॥

---

१ बंधन हें मिथ्या आहे असें समजत नाहीं, ह्मणून च तो बद्ध. २ विचारानें, ज्ञानानें ३ जाणीव बाजूस राहिली ह्मणजे, जाणीव न उरली असता, जाणीवदशेचा अभिमान न राहिला ह्मणजे ४. जागृत असलेला. ५ बरळतो.

बद्ध प्राणी मरोन गेले । तेथें कांहीं च नाहीं उरलें ।
जाणीवेचें विस्मरण जालें । मरणापूर्वीं ॥ २ ॥
ऐसी घेतली आशंका । याचें उत्तर ऐका ।
आतां दुश्चीत होऊं नका । ह्मणे वक्ता ॥ ३ ॥
पंचप्राण स्थळें सोडिती । प्राणरूप वासनावृत्ती ।
वासनामिश्रित प्राण जाती । देह सोडुनियां ॥ ४ ॥
वायोसरिसी वासना गेली । ते वायोरूपें चि राहिली ।
पुन्हा जन्म घेऊन आली । हेतुपरत्वें ॥ ५ ॥
कित्येक प्राणी निःशेष मरती । पुन्हां मागुतें जीव येती ।
ढकलून दिल्हें तेणें दुखवती । हस्तपादादिक ॥ ६ ॥[1]
सर्पदृष्टी जालियावरी । [2]तीं दिवसां उठवी धन्वंतरी ।
तेव्हा ते माघारी । वासना येते कीं ॥ ७ ॥
कित्येक सेवें[3] होऊन पडती । कित्येक तयांस उठविती ।
येमलोकींहून आणिती । माघारे प्राणी ॥ ८ ॥
कित्येक पूर्वीं श्रापिले । ते शापें देह पावले ।
उश्रापकाळीं पुन्हां आले । पूर्वदेहीं ॥ ९ ॥
कित्येकीं बहु जन्म घेतले । कित्येक परकाया प्रवेशले ।
ऐसे आले आणी गेले । बहुत लोक ॥ १० ॥
फुंकिल्यासरिसा वायो गेला । तेथें वायोसुत निर्माण जाला[4] ।
ह्मणोन वायोरूप वासनेला । जन्म आहे ॥ ११ ॥
मनाच्या वृत्ती नाना । त्यांत जन्म घेते वासना ।
वासना पाहाता दिसेना । परंतु आहे ॥ १२ ॥

---

१ स्वर्गांतून ढकलून देतात त्यामुळें हातपाय दुखविले जातात. द ४ स. १० ओ. २६ पहा २ तीन. ३ शवें. ४ मरण येतें तेव्हां एका देहांतून प्राणवायु निघून दुसऱ्यांत प्रवेश करितो. एका देहांतून दुसऱ्या देहात जातो ह्मणून त्यास वायुसुत ह्मटलें आहे.

वासना जाणिजे जाणीवहेत । जाणीव मुळींचा मूळतंत ।
मूळमायेंत असे मिश्रित । कारणरूपें[2] ॥ १३ ॥
कारणरूप आहे ब्रह्मांडीं । कार्यरूपें वर्ते पिंडीं ।
अनुमानितां तांतडीं[3] । अनुमानेना ॥ १४ ॥
परंतु आहे सूक्ष्मरूप । जैसें वायोचें स्वरूप ।
सकळ देव वायोरूप । आणी भूतसृष्टि ॥ १५ ॥
वायोमधें विकार नाना । वायो तरी पाहातां दिसेना ।
तैसी जाणीववासना । अति सूक्ष्म ॥ १६ ॥
त्रिगुण आणी पंचभूतें । हे वायोमध्यें मिश्रितें ।
अनुमानेना ह्मणोन त्यातें । मिथ्या ह्मणों नये ॥ १७ ॥
सहज वायो चाले । तरी सुगंध दुर्गंध कळों आले ।
उष्ण सीतळ तप्त निवाले । प्रत्यक्ष प्राणी ॥ १८ ॥
वायोचेनि मेघ वोळती । वायोचेनि नक्षत्रें चालती ।
सकळ सृष्टीची वर्तती गती । सकळ तो वायो ॥ १९ ॥
वायोरूपें देवतें भूतें । आगीं भरती अकस्मातें ।
वीधे केलियां प्रेतें । सावध होतीं ॥ २० ॥
राहाणें ब्राह्मणसमध जाती । राहाणें ठेवणीं सांपडती ।
नाना गुंतले उगवती । प्रत्यक्ष राहाणें ॥ २१ ॥
वारें निराळें न बोले । देहामधें भरोन डोले ।
आँळी घेऊन जन्मा आले । कित्येक प्राणी ॥ २२ ॥
ऐसा वायोचा विकार । येथचें कळेना विस्तार ।
सकळ काहीं चराचर । वायोमुळें ॥ २३ ॥
वायो स्तब्धरूपें सृष्टीधर्ता । वायो चंचळरूपें सृष्टीकर्ता ।
न कळे तरी विचारीं प्रवर्ता । ह्मणिजे कळे ॥ २४ ॥

---

१ हेतुरूप जाणीव. २ मूळमायेचें कारण जाणीव आहे. जाणीवरूप मूळमाया आहे. ३ घाईघाईनें. ४ " सकळ सृष्टी च वर्तती । कळतो वायो ॥ " अशीं चरणें प्रथम असून निराळ्या शाईनें प्रस्तुतचीं केलेलीं दिसतात. ५. विधिविधान, मंत्रप्रयोग, उतारा. ६ अंगांत दैवत आणवून बोलविण्याच्या कृतीनें. ७ इच्छा.

मुळापासून सेवटवरी । वायो चि सकळ कांहीं करी ।
वायोवेगळें कर्तुत्व चतुरीं । मज निरोपावें ॥ २५ ॥
जाणीवरूप मूळमाया । जाणीव जाते आपल्या ठाया ।
गुप्त प्रगट होऊनियां । विश्वीं वर्ते ॥ २६ ॥
कोठें गुप्त कोठें प्रगटे । जैसें जीवन उफाळे आटे ।
पुढें मागुता बोध लोटे । भूमंडळीं ॥ २७ ॥
तैसा च वायोमधें जाणीवप्रकार । उमटे आटे निरंतर ।
कोठें विकारें कोठें समीर । उगा च वाजे ॥ २८ ॥
वारीं आंगावरून जाती । तेणें हातपाये वाळती ।
वारा वाजतां करपती । आलीं पिकें ॥ २९ ॥
नाना रोगांचीं नाना वारीं । पीडा करिती पृथ्वीवरी ।
वीज कडाडी अंबरीं । वायोमुळें ॥ ३० ॥
वायोकरितां रागोद्धार । कळे वोळखीचा निर्धार ।
दीप लागे मेघ पैडे हा चमत्कार । रागोद्धारीं ॥ ३१ ॥
वायो फुंकिता भुली पडती । वायो फुंकितां खांडकें करपती ।
वायोकरितां चालती । नाना मन्त्र ॥ ३२ ॥
मंत्रें देव प्रगटती । मंत्रें भूतें अखैरकिती ।
बाजीगरी वोडवरी करिती । मंत्रसामर्थ्यें ॥ ३३ ॥
राक्षसाची मावरचना । ते हे देवादिकां कळेना ।
विचित्र सामर्थ्यें नाना । स्तंबनमोहनादिकें ॥ ३४ ॥
धड चि पिसें करावें । पिसें च उमजवावें ।
नाना विकार सांगावे । किती ह्मणोनी ॥ ३५ ॥
मन्त्रीं संग्राम देवाचा । मंत्रीं साभिमान ऋषीचा ।
महिमा मन्त्रसामर्थ्याचा । कोण जाणे ॥ ३६ ॥

---

१ एकदम वर येतें, उसळतें २ निरनिराळें स्वरज्ञान होतें. ३ दीपकल्याण रागानें दिवा लागतो. ४ मेघमल्हार रागानें मेघ कोसळतात. ५ फोड. ६ अखेर होतात, नाहींशीं होतात ७ जो धड असतो त्याला वेड लावावयाचें व वेडा असतो त्याला धड करावयाचें.

मंत्रीं पक्षी आटोपिती । मूशकें स्वापदें बांधती ।
मंत्रीं माहांसर्प खिळिती । आणी धनलाभ ॥ ३७ ॥
आतां असो हा प्रश्न जाला । ब्रह्माचा जन्म प्रत्यया आला ।
मागील प्रश्न फिटला । श्रोतयाचा ॥ ३८ ॥
इति देहांतनिरूपणनाम समास अष्टम ॥ ८ ॥

---

॥ श्रीराम ॥

ब्रह्म वारितां वारेना । ब्रह्म सारितां सरेना ।
ब्रह्म कांहीं वोसरेना । येकीकडे ॥ १ ॥
ब्रह्म भेदिता भेदेना । ब्रह्म छेदितां छेदेना ।
ब्रह्म परतें होयेना । केलें तरी ॥ २ ॥
ब्रह्म खंडेना अखड । ब्रह्मीं नाहीं दुसरें बड ।
तरी कैसें हें ब्रह्मांड । सिरकलें मधें ॥ ३ ॥
पर्वत पाषाण सिळा सिखरें । नाना स्थळें स्थळांतरें ।
भूगोळरचना कोण्या प्रकारें । जाली परब्रह्मीं ॥ ४ ॥
भूगोळ आहे ब्रह्मामधें । ब्रह्म आहे भूगोळामधें ।
पाहातां येक येकामधें । प्रत्यक्ष दिसे ॥ ५ ॥
ब्रह्मीं भूगोळें पैस केला । आणी भूगोळ हि ब्रह्में भेदिला
विचार पाहातां प्रत्यय आला । प्रत्यक्ष आतां ॥ ६ ॥
ब्रह्में ब्रह्मांड भेदिलें । हें तों पाहाता नीट चि जालें ।
परी ब्रह्मास ब्रह्मांडें भेदिलें । हें विपरीत दिसे ॥ ७ ॥
भेदिलें नाहीं ह्मणावें । तरी ब्रह्मीं ब्रह्मांड स्वभावें ।
हें सकळांस अनुभवें । दिसत आहे ॥ ८ ॥
तरी हें आता कैसें जालें । विचारून पाहिजे बोलिलें ।
ऐसें श्रोतीं आक्षेपिलें । आक्षेपवचन ॥ ९ ॥

आता याचें प्रश्नोत्तर । सावध ऐका निरोत्तर ।
येथें पडिले कीं विचार । संदेहाचे ॥ १० ॥
ब्रह्मांड नाहीं ह्मणों तरी दिसे । आणी दिसे ह्मणों तरी नासे ।
आतां हें समजती कैसें । श्रोतेजन ॥ ११ ॥
तंव श्रोते जाले उदित[1] । आह्मी ह्मणती सावचित्त ।
प्रसंगें बोलों उचित । प्रश्नोत्तर ॥ १२ ॥
आकाशीं दीपास लाविलें । दीपें आकाश परतें केलें ।
हें तों घडेना पाहिलें । पाहिजे श्रोतीं ॥ १३ ॥
आप तेज अथवा पवन । सारू न सकती गगन ।
गगन पाहातां सघन । चळेल कैसें ॥ १४ ॥
अथवा कठीण जाली मेदनी[2] । तरी गगनें केली चाळणी ।
पृथ्वीचें सर्वांग भेदुनी । राहिलें गगन ॥ १५ ॥
याची प्रचित ऐसी असे । जें जडत्वा आलें तितुकें नासे ।
आकाश जैसें तैसें असे । चळणार नाहीं ॥ १६ ॥
वेगळेपणें पाहावें । तयास आकाश ह्मणावें ।
अभिन्न होता स्वभावें । आकाश ब्रह्म[3] ॥ १७ ॥
तस्मात आकाश चळेना । भेद गगनाचा कळेना ।
भासलें ब्रह्म तयास जाणा । आकाश ह्मणावें ॥ १८ ॥
निर्गुण ब्रह्मसें भासलें । कल्पू जाता अनुमानलें ।
ह्मणोन आकाश बोलिलें । कल्पनेसाठीं ॥ १९ ॥
कल्पनेसि भासे भास । तितुकें जाणावें आकाश ।
परब्रह्म निराभास । निर्विकल्प ॥ २० ॥
पंचभूतांमधें वास । ह्मणौन बोलिजे आकाश ।
भूतांतरीं जो ब्रह्मांश । तें चि गगन ॥ २१ ॥

---

1 उदित, उत्कंठित. २ मेदिनी, पृथ्वी. ३ वस्तुपासून वेगळें राहून जें पाहावयाचें तें आकाश. परब्रह्माचें पाहणें असें नाहीं, तद्रूप होऊन परब्रह्म पाहावें लागतें.

प्रत्यक्ष होतें जातें । अचळ कैसें ह्मणावें त्यातें ।
ह्मणोनियां गगनातें । भेदिकें नाहीं ॥ २२ ॥
पृथ्वी विरोन उरे जीवन । जीवन नस्तां उरे अग्न ।
अग्न विझतां उरे पवन । तो हि नासे ॥ २३ ॥
मिथ्या आलें आणी गेलें । तेणें खरें तें भंगलें ।
ऐसें हें प्रचितीस आलें । कोणेंपरी ॥ २४ ॥
भ्रमें प्रत्यक्ष दिसतें । विचार पाहातां काये तेथें ।
भ्रममूळ या जगातें । खरें कैसें ह्मणावें ॥ २५ ॥
भ्रम शोधितां कांहीं च नाहीं । तेथें भेदिलें कोणें काई ।
भ्रमें भेदिलें ह्मणतां ठाईं । भ्रम चि मिथ्या ॥ २६ ॥
भ्रमाचें रूप मिथ्या जालें । मग सुखें ह्मणावें भेदिलें ।
मुळीं लटिकें त्यानें केलें । तें हि तैसें ॥ २७ ॥
लटिक्यानें उदंड केलें । तरी आमुचें काये गेलें ।
केलें ह्मणतां च नाथिलें । शाहाणे जाणती ॥ २८ ॥
सागरामधें खसखस । तैसें परब्रह्मीं दृश्य ।
मतीसारिखा मतिप्रकाश । अंतरीं वाढे ॥ २९ ॥
मती कारितां विशाळ । कवळों लागे अंतराळें ।
पाहातां भासे ब्रह्मगोळ । कवीठ जैसें ॥ ३० ॥
वृत्ति त्याहून विशाळ । कारितां ब्रह्मांड बद्रिफळें ।
ब्रह्माकार होतां केवळ । कांहीं च नाहीं ॥ ३१ ॥
आपण विवेकें विशाळला । मर्यादेवेगळा जाला ।
मग ब्रह्मगोळ देखिला । वटबीजन्यायें ॥ ३२ ॥

---

१ या ओवींतील पहिलीं दोन चरणें पृथ्वी, आप,तेज व वायु या चार भूतांबद्दल आहेत, हीं चार भूतें होतात, जातात, ह्मणून त्यास अचळ ह्मणतां येत नाहीं, परंतु गगनाचा भेद होत नाहीं ह्मणून तें अचल आहे २ पहिलीं चार नाशवंत भूतें आलीं आणि गेलीं तरी तेणेंकरून सर्वत्र संचलेलें गगन भग पावलें असें होत नाहीं. ३ गगनाला कवटाळतें, गगनाला जाऊन पोंचतें. ४ बदरीफल, बोर.

होतां त्याहून विस्तीर्ण । वटबीज कोटिप्रमाण ।
आपण होतां परिपूर्ण । काहीं च नाहीं ॥ ३३ ॥
आपण भ्रमें लाहानाळला । केवळ देहधारी जाला ।
तरी मग ब्रह्मांड त्याला । कवळेल कैसें ॥ ३४ ॥
वृत्ति ऐसी वाढवावी । पसरून नाहीं च करावी ।
पूर्णब्रह्मास पुरवावी । चहूंकडे ॥ ३५ ॥
जंव येक सुवर्ण आणितां । तेणें ब्रह्मांड मढावितां ।
कैसें होईल तें तत्वतां । बरें पाहा ॥ ३६ ॥
वस्तु वृत्तीस कवंळे । तेणें वृत्ति फाटोन वितुळे ।
निर्गुण आत्मा च निवळे । जैसा तैसों ॥ ३७ ॥
येथें फिटली आशंका । श्रोते हो संदेह धरूं नका ।
अनुमान असेल तरी विवेका । अवलोकावें ॥ ३८ ॥
विवेकें तुटे अनुमान । विवेकें होये समाधान ।
विवेकें आत्मनिवेदन । मोक्ष लाभे ॥ ३९ ॥
केली मोक्षाची उपेक्षा । विवेकें सारिलें पूर्वपक्षा ।
सिद्धांत आत्मा प्रत्यक्षा । प्रमाण नैलगे ॥ ४० ॥
हे प्रचितीचीं उत्तरें । कळती सारासारविचारें ।
मननध्यासें साक्षात्कारें । पावन होइजे ॥ ४१ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे संदेहवारणनाम समास नवम ॥ ९ ॥

---

॥ श्रीराम ॥

देउळामधें जगन्नायेक । आणी देउळावरी बैसला कांक ।
परी तो देवाहून अधिक । ह्मणों नये कीं ॥ १ ॥

---

१ या दोन्ही शब्दांच्या दरम्यान मुळांत "न" आहेसें वाटतें. २ सर्व ब्रह्मांडाला सोन्याच्या एका पत्र्यानें मढवावयाचें ह्मटलें तर त्या पत्र्याचें काय होईल? तो फाटून जाईल. वृत्तीनें ब्रह्माचें आकलन करूं गेल्यास वृत्ति फाटून लीन होऊन जाते आणि मग निवळ आत्मा च उरतो. ३ मोक्षाची देखील उपेक्षा केली, ( कारण अपेक्षा करणे हा पूर्वपक्ष च झाला असता ). विचारानें पूर्वपक्ष उडविला आणि सिद्धांत वस्तु प्रत्यक्ष प्रत्ययाला आली, त्याला आतां प्रमाण नको. ४ कावळा.

सभा बैसली राजद्वारीं । आणी मर्कट गेलें स्तभावरी ।
परी तें सभेहून श्रेष्ठ चतुरीं । कैसें मानावें ॥ २ ॥
ब्राह्मण स्नान करून गेले । आणी बक तैसे चि बैसले ।
परी ते ब्राह्मणापरीस भले । कैसे मानावे ॥ ३ ॥
ब्राह्मणामध्यें कोणी नेमस्त । कोणी जाले अव्यावेस्त ।
आणी स्वान सदा ध्यानस्त । परी तें उत्तम नव्हे ॥ ४ ॥
ब्राह्मण लक्षमुद्रा नेणे । मार्जर लक्षविषईं शाहाणें ।
परी ब्राह्मणापरीस विशेष कोणें । ह्मणावें तयासी ॥ ५ ॥
ब्राह्मण पाहे भेदाभेद । मक्षिका सर्वांस अभेद ।
परी तीस जाला ज्ञानबोध । हें तों न घडे कीं ॥ ६ ॥
उंच वस्त्रें नीच ल्योला । आणी समर्थ उघडा च बैसला ।
परी तो आहे परीक्षिला । परीक्षवंतीं ॥ ७ ॥
बाह्याकार केला अधीक । परी तो अवघा लोकिक ।
येथें पाहिजे मुख्य येक । अंतरनिष्ठा ॥ ८ ॥
लोकिक बरा संपादिला । परी अंतरीं सावध नाहीं जाला ।
मुख्य देवास चुकला । तो आत्मघातकी ॥ ९ ॥
देवास भजतां देवलोक । पित्रांस भजतां पित्रलोक ।
भूतांस भजतां भूतलोक । पाविजेतो ॥ १० ॥
जेणें जयास भजावें । तेणें त्या लोकासी जावें ।
निर्गुणीं भजतां व्हावें । निर्गुण चि स्वयें ॥ ११ ॥
निर्गुणाचें कैसें भजन । निर्गुणीं असावें अनन्य ।
अनन्य होतां होईजे धन्य । निश्चयेंसीं ॥ १२ ॥
सकळ केलियाचें सार्थक । देव वोळखावा येक ।
आपण कोण हा विवेक । पाहिला पाहिजे ॥ १३ ॥
देव पाहातां निराकार । आपला तों माईक विचार ।
सोहं आत्मा हा निर्धार । बाणोन गेला ॥ १४ ॥

---

१ वगळे २ परिधान केलीं.

आतां अनुमान तो काई । वस्तु आहे वस्तुचा ठाईं ।
देहभाव कांहीं च नाहीं । धांडोळितां ॥ १५ ॥
सिद्धास आणी साधन । हा तों अवघा च अनुमान ।
मुक्तास आणी बंधन । आडळेना ॥ १६ ॥
साधनें जें कांहीं साधावें । तें तों आपण चि स्वभावें ।
आतां साधकाच्या नावें । सुन्याकार ॥ १७ ॥
कुल्लाळ पावला राजपदवी । आतां रासभें कासया राखावीं ।
कुल्लाळपणाची उठाठेवी । कासया पाहिजे ॥ १८ ॥
तैसा अवघा वृत्तीभाव । नाना साधनांचा उपाव ।
साध्य जालिया कैंचा ठाव । साधनांसी ॥ १९ ॥
साधनें काये साधावें । नेमें काये फळ घ्यावें ।
आपण वस्तु भरगळावें । कासयासी ॥ २० ॥
देह तरी पांचा भूतांचा । जीव तरी अंश ब्रह्मींचा ।
परमात्मा तरी अनन्याचा । ठाव पाहा ॥ २१ ॥
उगें चि पाहातां मीपण दिसे । शोध घेतां कांहीं च नसे ।
तत्वें तत्व निरसे । पुढें निखळ आत्मा ॥ २२ ॥
आत्मा आहे आत्मपणें । जीव आहे जीवपणें ।
माया आहे मायापणें । विस्तारली ॥ २३ ॥
ऐसें अवघें चि आहे । आणी आपण हि कोणीयेक आहे ।
हें सकळ शोधून पाहे । तो चि ज्ञानी ॥ २४ ॥
शोधू जाणे सकळांसी । परी पाहों नेणे आपणासी ।
ऐसा ज्ञानी येकदेसी । वृत्तिरूपें ॥ २५ ॥
तें वृत्तिरूप जरी पाहिलें । तरी मग कांहीं च नाहीं राहिलें ।
प्रकृतिनिरासें अवघें चि गेलें । विकारवंत ॥ २६ ॥

---

१ आपण ब्रह्म आहोंत हा निर्धार झाल्यावर मग आता शंका कसली उरली? ब्रह्म ठिकाणच्या ठिकाणीं च आहे, आपण च स्वतः ब्रह्म आहोंत २ कुंभार.

उरलें तें निखळ निर्गुण । विवंचितां तें चि आपण ।
ऐसी हे परमार्थाची खूण । अगाध आहे ॥ २७ ॥
फळ येक आपण येक । ऐसा नाहीं हा विवेक[1] ।
फळाचें फळ कोणीयेक । स्वयें चि होईजे ॥ २८ ॥
रंक होता राजा जाला । बरें पाहातां प्रत्यये आला ।
रंकपणाचा गल्बला । रकीं करावा ॥ २९ ॥
वेद शास्त्रें पुराणें । नाना साधनें निरूपणें ।
सिद्ध साधु ज्याकारणें । नाना सायास करिती ॥ ३० ॥
तें ब्रह्मरूप आपण चि आंगें । सारासारविचारप्रसगें ।
करणें न करणें वाउगें । कांहीं च नाहीं ॥ ३१ ॥
रंक राजआज्ञेसि भ्यालें । तें चि पुढें राजा जालें ।
मग तें भये चि उडालें । रकपणासरिसें ॥ ३२ ॥
वेदें वेदाज्ञेनें चालावें । सच्छास्त्रें शास्त्र अभ्यासावें ।
तीर्थें तीर्थास जावें । कोण्या प्रकारें ॥ ३३ ॥
अमृतें सेवावें अमृत । अनतें पाहावा अनंत ।
भगवतें लक्षावा भगवंत । कोण्या प्रकारें ॥ ३४ ॥
संतें असंत त्यागावें । निर्गुणें निर्गुणासी भगावें ।
स्वरूपें स्वरूपीं रंगावें । कोण्या प्रकारें ॥ ३५ ॥
अंजनें ल्यावें अंजन । धनें साधावें धन ।
निरंजनें निरजन । कैसें अनुभवावें ॥ ३६ ॥
साध्य[2] करावें साधनासी । ध्येयें[3] धरावें ध्यानासी ।
उन्मनें आवरावें मनासी । कोण्या प्रकारें ॥ ३७ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसवादे स्थितिनिरूपणनाम समास दाहवा ॥ १० ॥

---

१ आत्मज्ञानाचें फळ मुक्ति आणि मुक्तिभोक्ता आपण, असा निराळेपणा नाहीं. स्वत च आपण फळाचें फळ आहोंत ह्मणजे मुक्तीला हि मुक्तिपद देणारे आहोंत. २ साध्यें. ३ ध्येयें.

## ॥ दशक दाहावा जगज्जोतीनाम ॥ १० ॥

॥ श्रीराम ॥

सकळांचें अंत.करण येक । किंवा येक नव्हे अनेक ।
ऐसें हें निश्चयात्मक । मज निरोपावें ॥ १ ॥
ऐसें श्रोतयानें पुसिलें । अंत:करण येक किं वेगळालें ।
याचें उत्तर ऐकिलें । पाहिजे श्रोतीं ॥ २ ॥
समस्तांचें अंत:कर्ण येक । निश्चयो जाणावा नेमक ।
हा प्रत्ययाचा विवेक । तुज निरोपिला ॥ ३ ॥
श्रोता ह्मणे वक्तयासी । अंत:कर्ण येक समस्तासी ।
तरी मिळेना येकयेकासी । काये निमित्य ॥ ४ ॥
येक जेवितां अवघे धाले । येक निवता अवघे निवाले ।
येक मरता अवघे मेले । पाहिजेत कीं ॥ ५ ॥
येक सुखी येक दु:खी । ऐसें वर्ततें लोकिकीं ।
येका अंत:कर्णाची वोळखी । कैसी जाणावी ॥ ६ ॥
जनीं वेगळाली भावना । कोणास कोणी च मिळेना ।
ह्मणौन हें अनुमाना । येत नाहीं ॥ ७ ॥
अंत:कर्ण येक असतें । तरी येकाचें येकास कळों येतें ।
कांहीं चोरितां च न येतें । गौप्य गुह्य ॥ ८ ॥
याकारणें अनुमानेना । अंत:कर्ण येक हें घडेना ।
विरोध लागला जना । काये निमित्य ॥ ९ ॥
सर्प डसाया येतो । प्राणी मेऊन पळतो ।
येक अंत:करण तरी तो । विरोध नसावा ॥ १० ॥
ऐसी श्रोतयाची आशंका । वक्ता ह्मणे चळों नका ।
सावध होऊन ऐका । निरूपण ॥ ११ ॥

---

१ मुळांत " जगजोती " अशीं अक्षरें सर्वत्र पडलीं आहेत. २ तृप्त झाले

अतःकर्ण ह्मणिजे जाणीव । जाणीव जाणता स्वभाव ।
देहरक्षणाचा उपाव । जाणती कळा ॥ १२ ॥
सर्प जाणोन डंखूं आला । प्राणी जाणोन पळाला ।
दोहींकडे जाणीवेला । बरें पाहा ॥ १३ ॥
दोहींकडे जाणीवेसी पाहिलें । तरी अंतःकर्ण येक चि जालें ।
विचारितां प्रत्यया आलें । जाणीवरूपें ॥ १४ ॥
जाणीवरूपें अंतःकर्ण । सकळांचें येक हें प्रमाण ।
जीवमात्रास जाणपण । येक चि असे ॥ १५ ॥
येकें दृष्टीचें देखणें । येकें जिव्हेचें चाखणें ।
ऐकणें स्पर्शणें वास घेणें । सर्वत्रास येक ॥ १६ ॥
पशु पक्षी किडा मुंगी । जीवमात्र निर्माण जगीं ।
जाणीवकळा सर्वांलागीं । येक चि आहे ॥ १७ ॥
सर्वांस जळ तें सीतळ । सर्वांस अग्नि तेजाळ ।
सर्वांस अंतःकर्ण केवळ । जाणती कळा ॥ १८ ॥
आवडे नावडे ऐसें जालें । तरी हें देहस्वभावावरी गेलें ।
परंतु हें कळों आलें । अंतःकर्णयोगें ॥ १९ ॥
सर्वांचें अंतःकर्ण येक । ऐसा निश्चयो निश्चयात्मक ।
जाणती याचें कौतुक । बहुंकडे ॥ २० ॥
इतुकेन फिटली आशंका । आतां अनुमान करूं नका
जाणणें तितुकें येका । अंतःकर्णाचें ॥ २१ ॥
जाणोन जीव चारा घेती । जाणोन भिती लपती ।
जाणोनिया पळोन जाती । प्राणीमात्र ॥ २२ ॥
किडामुंगीपासून ब्रह्मादिक । समस्तांस अंतःकर्ण येक ।
ये गोष्टीचें कौतुक । प्रत्यें जाणावें ॥ २३ ॥
थोर लाहान तरी अग्नी । थोडें बहु तरी पाणी ।
न्यून पूर्ण तरी प्राणी । अंतःकर्णे जाणती ॥ २४ ॥

कोठें उणें कोठें अधीक । परंतु जिनसमासला येक ।
जंगम प्राणी कोणीयेक । जातिल्यांविण नाहीं ॥ २५ ॥
जाणीव म्हणिजे अंतःकर्ण । अंतःकर्ण विष्णूचा अंश जाण ।
विष्णु करितो पाळण । येणें प्रकारें ॥ २६ ॥
नेणतां प्राणी संव्हारतो । नेणीव तमोगुण बोलिजेतो ।
तमोगुणें रुद्र संव्हारितो । येणें प्रकारें ॥ २७ ॥
कांहीं जाणीव कांहीं नेणीव । हा रजोगुणाचा स्वभाव ।
जाणता नेणतां जीव । जन्मास येती ॥ २८ ॥
जाणीवेनें होतें सुख । नेणीवेनें होतें दुःख ।
सुखदुःख अवश्यक । उत्पत्तिगुणें ॥ २९ ॥
जाणण्यानेणण्याची बुद्धी । तो चि देहीं जाणावा विधी ।
स्थूळ देहीं ब्रह्मा त्रिशुद्धि । उत्पत्तिकर्ता ॥ ३० ॥
ऐसा उत्पत्ति स्थिति संव्हार । प्रसगें बोलिला विचार ।
परंतु याचा निर्धार । प्रत्यें पाहावा ॥ ३१ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे अंतःकर्णयेकनाम समास ॥ १ ॥

---

॥ श्रीराम ॥

स्वामीनें विचार दाखविला । येथें विष्णूचा अभाव दिसोन आला ।
ब्रह्मा विष्णु महेशाला । ठेरी नाहीं ॥ १ ॥
उत्पत्ति स्थिति संव्हार । ब्रह्मा विष्णु महेश्वर ।
याचा पाहातां विचार । प्रत्ययो नाहीं ॥ २ ॥
ब्रह्मा उत्पत्तिकर्ता चौमुखांचा । येथें प्रत्ययो नाहीं त्याचा ।
पाळणकर्ता विष्णु चौभुजाचा । तो हि ऐकोन जाणों ॥ ३ ॥

---

१ जाणीवेवाचून. २ निश्चयेंकरून. कोणी "कफवातपित्त" असा अर्थ करितात.
३ ठाव, ठिकाण

महेश सन्हार करितो । हा हि प्रत्ययो कैसा येतो ।
लिंगमहिमा पुराणीं तो । विपरीत बोलिला ॥ ४ ॥
मूळमायेस कोणें केलें । हें तों पाहिजे कळलें ।
तिही देवांचें रूप जालें । ऐलिकडे ॥ ५ ॥
मूळमाया लोकजननी । तयेपासून गुणक्षोभिणी ।
गुणक्षोभिणीपासून त्रिगुणी । जन्म देवां ॥ ६ ॥
ऐसें बोलती शास्त्रकारक । आणि प्रवृत्तीचे हि लोक ।
प्रत्यये पुसतां कित्येक । अकांत करिती ॥ ७ ॥
ह्मणोन त्यास पुसावेना । त्यांचेन प्रत्ययो आणवेना ।
प्रत्ययेंविण प्रेत्न नाना । ठकाठकी ॥ ८ ॥
प्रचितीविण वैद्य ह्मणवी । उगी च करी उठाठेवी ।
तया मूर्खाला गोवी । प्राणीमात्र ॥ ९ ॥
तैसा च हा हि विचार । प्रत्ययें करावा निर्धार ।
प्रत्यये नस्तां अंधकार । गुरुशिष्यांसी ॥ १० ॥
बरें लोकांस काये ह्मणावें । लोक ह्मणती तें चि बरवें ।
परंतु स्वामीनें सांगावें । विशद करुनी ॥ ११ ॥
ह्मणों देवीं माया केली । तरी देवांचीं रूपें मायेंत आलीं ।
जरी ह्मणों मायेनें माया केली । तरी दुसरी नाहीं ॥ १२ ॥
जरी ह्मणों भूतीं केली । तरी ते भूतांची च वळली ।
ह्मणावें जरी परब्रह्में केली । तरी ब्रह्मीं कर्तुत्व नाहीं ॥ १३ ॥
आणी माया खरी असावी । तरी ब्रह्मीं कर्तुत्वाची गोवी ।
माया मिथ्या ऐसी जाणावी । तरी कर्तुत्व कैंचें ॥ १४ ॥
आतां हें अवघें चि उगवे । आणी मनास प्रत्यये फावे ।
ऐसें केलें पाहिजे देवें । कृपाळुपणें ॥ १५ ॥

---

१ त्रिगुणात्मक ब्रह्मा, विष्णु, महेश हे गुणमायेपासून निर्माण झाले. २ रूढीला, परंपरेला अनुसरून वागणारे.

वेद मात्रुकावीण नाहीं । मात्रृका देहावीण नाहीं ।
देह निर्माण होत नाहीं । देहावेगळा ॥ १६ ॥
तया देहामधें नरदेहो । त्या नरदेहींत ब्राह्मणदेहो ।
तया ब्राह्मणदेहास पाहो । अधिकार वेदीं ॥ १७ ॥
असो वेद कोठून जाले । देह कासयाचे केले ।
देव कैसे प्रगटले । कोण्या प्रकारें ॥ १८ ॥
ऐसा बळावला अनुमान । केलें पाहिजे समाधान ।
वक्ता ह्मणे सावधान । होईं आतां ॥ १९ ॥
प्रत्यये पाहातां साकडी । अवघी होते विघडाविघडी ।
अनुमानितां घडीनें घडी । काळ जातो ॥ २० ॥
लोकधाटी शास्त्रनिर्णये । येथें बहुधा निश्चये ।
ह्मणोनियां येक प्रत्यये । येणार नाहीं ॥ २१ ॥
आतां शास्त्राची भीड धरावी । तरी सुटेना हे गथागोवी ।
गथागोवी हे उगवावी । तरी शास्त्रभेद दिसे ॥ २२ ॥
शास्त्र रक्षून प्रत्यये आणिला । पूर्वपक्ष त्यागून सिद्धांत पाहिला ।
शाहाणा मूर्ख समजाविला । येका वचनें ॥ २३ ॥
शास्त्रीं च पूर्वपक्ष बोलिला । पूर्वपक्ष ह्मणावें लटक्याला ।
विचार पाहातां आम्हांला । शब्द नाहीं ॥ २४ ॥
तथापि बोलों कांहींयेक । शास्त्र रक्षून कौतुक ।
श्रोतीं सादर विवेक । केला पाहिजे ॥ २५ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे देहआशंकानाम समास द्वितीय ॥२॥

---

१ मातृका, अक्षर. २ संकट. लोकव्यवहार व शास्त्रनिर्णय हीं एका च प्रकारचीं नसल्यामुळें प्रत्यय एक प्रकारचा येत नाहीं, आणि तेणेंकरून कोणता निर्णय करावा असें संकट पडतें ३ संशयांत ४ लोकव्यवहार, जनरुढी ५ " बहुविध " होतें त्यांतील ' वि ' खोडून ' ध ' ला मात्रा दिली आहे.

॥ श्रीराम ॥

उपाधीविण जें आकाश । तें चि ब्रह्म निराभास ।
ते निराभासीं मूळमायेस । जन्म जाला ॥ १ ॥
ते मूळमायेचें लक्षण । वायोस्वरूप चि जाण ।
पंचभूतें आणि त्रिगुण । वायोआंगीं ॥ २ ॥
आकाशापासून वायो जाला । तो वायेदेव बोलिला ।
वायोपासून अग्नी जाला । तो अग्निदेव ॥ ३ ॥
अग्नीपासून जालें आप । तें नारायेणाचें स्वरूप ।
आपापासून पृथ्वीचें रूप । तें बीजाकारें ॥ ४ ॥
ते पृथ्वीचे पोटीं पाषाण । बहु देवांचें लक्षण ।
नाना प्रचित प्रमाण । पाषाणदेवीं ॥ ५ ॥
नाना [2]वृक्ष मृत्तिका । प्रचित रोकडी विश्वलोका ।
समस्त देवाचा थारा येका । वायोमध्यें ॥ ६ ॥
देव यक्षिणी कात्यायेणी । चामुंडा जखिणी मानविणी ।
नाना शक्ति नाना स्थानीं । देशपरत्वें ॥ ७ ॥
पुरुषनामें कित्येक । देव असती अनेक ।
भूतें देवतें नपुंषक । नामें बोलिजेती ॥ ८ ॥
देव देवता देवतें भूतें । पृथ्वीमध्यें असंख्यातें ।
परंतु यां समस्तांतें । वायोस्वरूप बोलिजे ॥ ९ ॥
वायोस्वरूप सदा असणें । प्रसंगें नाना देह धरणें ।
गुप्त प्रगट होणें जाणें । समस्तांसी ॥ १० ॥
वायोस्वरूपें विचरती । वायोमध्यें जगज्जोती ।
जाणतीकळा वासना वृत्ति । नाना भेदें ॥ ११ ॥
आकाशापासून वायो जाला । तो दों प्रकारें विभागला ।
सावधपणें विचार केला । पाहिजे श्रोतीं ॥ १२ ॥

---

१ पाषाणमूर्तीपासून नाना प्रकारची प्रचित येते. २ या दोन शब्दामध्यें 'काष्ठ' शब्द होता तो खोडला आहे. ३ कारण, वृक्षापासून वायूपर्यंत एकसारखी चढती परंपरा आहे ४ जाणीव आणीव, वासना इत्यादि अनेक रूपांनीं वायूमध्यें जगज्जोति आहे.

येक तारा सकळ जाणती । येक वायोमधील जगज्जोती ।
जगज्जोतीच्या अनंत मूर्ती । देवदेवतांच्या ॥ १३ ॥
वायो बहुत विकारला । परंतु दों प्रकारें विभागला ।
आतां विचार ऐकिला । पाहिजे तेजाचा ॥ १४ ॥
वायोपासून तेज जालें । उष्ण सीतळ प्रकाशलें ।
द्विविध रूप ऐकिलें । पाहिजे तेजाचें ॥ १५ ॥
उष्णापासून जाला भानु । प्रकाशरूप दैदीप्यमानु ।
सर्वभक्षक हुताशनु । आणी विद्युल्यता ॥ १६ ॥
सीतळापासून आप अमृत । चंद्र तारा आणी सीत ।
आतां परिसा सावचित्त । होऊन श्रोते ॥ १७ ॥
तेज बहुत विकारलें । परंतु द्विविधा च बोलिलें ।
आप हि द्विविधा च निरोपिलें । आप आणि अमृत ॥ १८ ॥
ऐकें पृथ्वीचा विचार । पाषाण मृत्तिका निरंतर ।
आणीक दुसरा प्रकार । सुवर्ण परीस नाना रत्नें ॥ १९ ॥
बहुरत्ना वसुंधरा । कोण खोटा कोण खरा ।
अवघें कळे विचारा- । रूढ होतां ॥ २० ॥
मनुष्यें कोठून जालीं । हे मुख्य आशंका राहिली ।
पुढें वृत्ति सावध केली । पाहिजे श्रोतीं ॥ २१ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे देहआशंकाशोधननाम समास तृतीय ॥३॥

---

॥ श्रीराम ॥

आतां पाहों जातां उत्पत्ती । मनुष्यापासून मनुष्यें होती ।
पशुपासून पशु निपजती । प्रत्यक्ष आतां ॥ १ ॥
खेचरें आणी भूचरें । वनचरें आणी जळचरें
नाना प्रकारींचीं शरीरें । शरीरांपासून होतीं ॥ २ ॥
प्रत्यक्षास आणी प्रमाण । निश्चयास आणी अनुमान
मार्ग देखोन आडरान । घेऊं च नये ॥ ३ ॥

विपरीतांपासून विपरीतें होती । परी शरीरें चि बोलिजेती ।
शरीरावांचून उत्पत्ती । होणार नाहीं ॥ ४ ॥
तरी हे उत्पत्ति कैसी जाली । कासयाची कोणें केली ।
जेणें केली त्याची निर्मिली । काया कोणें ॥ ५ ॥
ऐसें पाहातां उदंड लांबलें । परी मुळीं शरीर कैसें जालें ।
कासयाचें उभारिलें । कोणें कैसें ॥ ६ ॥
ऐसी हे मागील आशंका । राहात गेली ते ऐका ।
कदापी जाजु[1] घेऊं नका । प्रत्ययो आलियानें ॥ ७ ॥
प्रत्ययो चि आहे प्रमाण । मूर्खांस वाटे अप्रमाण ।
पिंडें प्रचितशब्दें[2] जाण । विश्वासेंसी ॥ ८ ॥
ब्रह्मीं मूळमाया जाली । ते चि अष्टधा प्रकृति बोलिली ।
भूतीं त्रिगुणीं कालवली । मूळमाया ॥ ९ ॥
ते मूळमाया वायोस्वरूप । वायोमध्यें जाणीवेचें रूप ।
ते चि इछा परी आरोप । ब्रह्मीं न घडे ॥ १० ॥
तथापि ब्रह्मीं कल्पिला । तरी तो शब्द वायां गेला ।
आत्मा निर्गुण सचला । शब्दातीत ॥ ११ ॥
आत्मा निर्गुण वस्तु ब्रह्म । नाममात्र तितुका भ्रम ।
कल्पून लाविला सभ्रम । तरी तो लागणार नाहीं ॥ १२ ॥
तथापि आग्रहें लाविला । जरी धोंडा मारिला आकाशाला ।
आकाशावरी कुंथिला । तरी तें तुटेना ॥ १३ ॥
तैसें ब्रह्म निर्विकार । निर्विकारीं लाविती विकार[3] ।
विकार नासे निर्विकार । जैसें तैसें ॥ १४ ॥
आतां ऐका प्रत्ययो । जाणोनि धरावा निश्चयो ।
तरी च पाविजे जयो । अनुभवाचा ॥ १५ ॥

---

१ आरोप, संशय  २ आपल्या पूर्वजांचे जे प्रतीतीचे बोल आहेत त्यावर मनुष्यानें विश्वास ठेविला पाहिजे  ३ विकारीं लाविती निर्विकार ॥ असा चरण प्रथम पडला होता

मायाब्रह्मीं जो समीर । त्यांत जाणता तो ईश्वर[1] ।
ईश्वर आणी सर्वेश्वर । तयासी च बोलिजे ॥ १६ ॥
तो चि ईश्वर गुणासी आला[2] । त्याचा त्रिगुणभेद जाला ।
ब्रह्मा विष्णु महेश उपजला । तये ठाईं ॥ १७ ॥
सत्व रज आणी तम । हे त्रिगुण उत्तमोत्तम ।
याच्या स्वरूपाचा अनुक्रम । मागां निरोपिला ॥ १८ ॥
जाणता विष्णु भगवान । जाणतानेणता चतुराननं ।
नेणता महेश पंचानन । अत्यंत भोळा ॥ १९ ॥
त्रिगुण त्रिगुणीं कालवले । कैसे होती वेगळाले ।
परी विशेष न्यून भासले । ते बोलावे लागती ॥ २० ॥
वायोमध्यें विष्णु होता[3] । तो वायोस्वरूप चि तत्वता ।
पुढें जाला देहधर्ता । चतुर्भुज ॥ २१ ॥
तैसा च ब्रह्मा आणी महेश । देह धारिती सावकास ।
गुप्त प्रगट होतां तयांस । वेळ नाहीं ॥ २२ ॥
आतां रोकडी प्रचिती । मनुष्यें गुप्त प्रगटती ।
मां त्या देवांच्या च मूर्ती । सामर्थ्यवंत ॥ २३ ॥
देव देवता भूतें देवतें । चढतें सामर्थ्य आहे तेथें ।
येणें चि न्यायें राक्षसांतें । सामर्थ्यकळा ॥ २४ ॥
झोटिंग वायोस्वरूप असती । सर्वे च खुळखुळां चालती ।
खोबरीं खारिका टाकून देती । अकस्मात ॥ २५ ॥
अवघें चि न्याल अभावें । तरी हें बहुतेकांस ठावें ।
आपुलाल्या अनुभवें । विश्वलोक जाणती ॥ २६ ॥
मनुष्यें धरिती शरीरवेष । नाना परकाया प्रवेश ।
मा तो परमात्मा जगदीश । कैसा न धरी ॥ २७ ॥

---

१ ब्रह्माच्या ठिकाणीं वायुस्वरूप जी मूळमाया तिच्या ठिकाणीं जी जाणीवकळा तो च ईश्वर. २ त्या च जाणीवेपासून गुणमाया झाली ३ वायुस्वरूप मूळमायेंत सत्वगुणात्मक जें विष्णूचें रूप, तें वायुरूप च होतें

ह्मणोनि वायोस्वरूपें देह धरिले । ब्रह्मा विष्णु महेश जाले ।
पुढें ते चि विस्तारले । पुत्रपौत्रीं ॥ २८ ॥
अंतरीं च स्त्रिया कल्पिल्या । तों त्या कल्पितां च निर्माण जाल्या ।
परी तयापासून प्रजा निर्मिल्या । नाहींत कदा ॥ २९ ॥
इछून पुत्र काल्पिले । ते ते प्रसंगीं निर्माण जाले ।
येणें प्रकारें वर्तले । हरिहरादिक ॥ ३० ॥
पुढें ब्रह्मयानें सृष्टी कल्पिली । इछेसरिसी सृष्टी जाली ।
जीवसृष्टि निर्माण केली । ब्रह्मदेवें ॥ ३१ ॥
नाना प्रकारींचे प्राणी कल्पिले । इछेसरिसे निर्माण जाले ।
अवघे जोडे चि उदेले । अंडजजारजादिक ॥ ३२ ॥
येक जळस्वेदापासून जाले । ते प्राणी स्वेदज बोलिले ।
येक वायोकरितां जाले । अकस्मात उद्बिज ॥ ३३ ॥
मनुष्यांची गौडविद्या । राक्षसांची बोडंबरीविद्या ।
ब्रह्मयाची सृष्टिविद्या । येणें प्रकारें ॥ ३४ ॥
कांहींयेक मनुष्यांची । त्याहून विशेष राक्षेसांची ।
त्याहून विशेष ब्रह्मयाची । सृष्टिविद्या ॥ ३५ ॥
जाणते नेणते प्राणी निर्मिले । वेद वदोन मार्ग लाविले ।
ब्रह्मयानें निर्माण केले । येणें प्रकारें ॥ ३६ ॥
मग शरीरांपासून शरीरें । सृष्टि वाढली विकारें ।
सकळ शरीरें येणें प्रकारें । निर्माण जालीं ॥ ३७ ॥
येथें आशंका फिटली । सकळ सृष्टि विस्तारली ।
विचार पाहातां प्रत्यया आली । येथान्वयें ॥ ३८ ॥
ऐसी सृष्टि निर्माण केली । पुढें विष्णूनें कैसी प्रतिपाळिली ।
हे हि विवंचना पाहिली । पाहिजे श्रोतीं ॥ ३९ ॥
सकळ प्राणी निर्माण जाले । ते मूळरूपें जाणोन पाळिले[1] ।
शरीरें दैत्य निर्दाळिले । नाना प्रकारींचे ॥ ४० ॥

---

[1] विष्णूचें मूळरूप ह्मणजे सत्वगुण, जाणीव, ज्ञान हें होय. हें रूप सूक्ष्म, अदृश्य असतें. तेणेंकरून सर्व प्राण्यांचें संरक्षण होतें. तें विष्णूचें सूक्ष्म रूप स्थूल शरीर धारण करून दुष्टांचा संव्हार करितें. परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् । धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगेयुगे ॥

नाना अवतार धरणें । दुष्टांचा संव्हार करणें ।
धर्म स्थापायाकारणें । विष्णूस जन्म ॥ ४१ ॥
ह्मणोन धर्मस्थापनेचे नर । ते हि विष्णूचे अवतार ।
अभक्त दुर्जन रजनीचरें । सहज चि जाले ॥ ४२ ॥
आतां प्राणी जे जन्मले । ते नेणोन संव्हारले ।
मूळरूपें संव्हारिले । येणें प्रकारें ॥ ४३ ॥
शरीरें रुद्र खवळेल । तैं जीवसृष्टि संव्हारेल ।
अवघें ब्रह्मांड चि जळेल । संव्हारकाळीं ॥ ४४ ॥
एवं उत्पत्ती स्थिती संव्हार । याचा ऐसा आहे विचार ।
श्रोतीं होऊन तत्पर । अवधान द्यावें ॥ ४५ ॥
कल्पांतीं संव्हार घडेल । तो चि पुढें सांगिजेल ।
पंचप्रळय वोळखेल । तो चि ज्ञानी ॥ ४६ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे बीजलक्षणनाम समास ॥ ४ ॥

---

॥ श्रीराम ॥

ऐका प्रळयाचें लक्षण । पिंडीं दोनी प्रळये जाण ॥
येक निद्रा येक मरण । देहांतकाळ ॥ १ ॥
देहधारक तिनी मूर्ती । निद्रा जेव्हां सपादिती ।
तो निद्राप्रळय श्रोतीं । ब्रह्मांडींचा जाणावा ॥ २ ॥
तिनी मूर्तीस होईल अंत । ब्रह्मांडास मांडेल कल्पांत ।
तेव्हां जाणावा नेमस्त । ब्रह्मप्रळये जाला ॥ ३ ॥
दोनी पिंडीं दोनी ब्रह्मांडीं । च्यारी प्रळय नवखंडीं[२] ।
पांचवा प्रळय उदंडी । जाणिजे विवेकाचा ॥ ४ ॥
ऐसे हे पाच हि प्रळये । सांगितले येथान्वयें ।
आतां हें अनुभवास ये । ऐसें करूं ॥ ५ ॥

---

१ धर्मस्थापनेचे जे नर ते विष्णूचे अवतार असें मानलें ह्मणजे, त्या कार्या-आड येणारे जे अभक्त दुर्जन ते मग ओघानेंच राक्षसांच्या ठिकाणीं होतात. २ नवखंडपृथ्वीमध्यें.

निद्रा जेव्हां सचरे । तेव्हा जागृतीव्यापार सरे ।
सुषुप्ति अथवा स्वप्न भरे । अकस्मात आगीं ॥ ६ ॥
या नांव निद्राप्रळये । जागृतीचा होये क्षये ।
आतां ऐका देहांतसमये । ह्मणिजे मृत्यप्रळये ॥ ७ ॥
देहीं रोग बळावती । अथवा कठीण प्रसंग पडती ।
तेणें पचप्राण जाती । व्यापार सांडुनी ॥ ८ ॥
तिकडे गेला मनपवनु । इकडे राहिली नुस्ती तनु ।
दुसरा प्रळये अनुमानु । असेचिना ॥ ९ ॥
तिसरा ब्रह्मा निजेला । तों हा मृत्यलोक गोळा जाला ।
अवघा व्यापार खुंटला । प्राणीमात्राचा ॥ १० ॥
तेव्हां प्राणीयाचे सूक्ष्माश । वायोचक्रीं करिती वास ।
कित्येक काळ जातां ब्रह्मयास । जागृती घडे ॥ ११ ॥
पुन्हा मागुती सृष्टि रची । विसंचिले जीव मागुतें संची ।
सीमा होतां आयुष्याची । ब्रह्मप्रळय मांडे ॥ १२ ॥
शत वरुषें मेघ जाती । तेणें प्राणी मृत्य पावती ।
असंभाव्य तेकें क्षिती । मर्यादेवेगळी ॥ १३ ॥
सूर्य तपे बाराकळी । तेणें पृथ्वीची होय होळी ।
अग्नी पावता पाताळीं । शेष विष वमी ॥ १४ ॥
आकाशीं सूर्याच्या ज्वाळा । पाताळीं शेष विष वमी गरळा ।
दोहिकडून जळतां भूगोळा । उरी कैंची ॥ १५ ॥
सूर्यास खडतरता चढे । हलकालोळ चहुंकडे ।
कोंसळती मेरूचे कडे । घडघडायमान ॥ १६ ॥
अमरावती सत्यलोक । वैकुंठ कैळासादिक ।
याहिवेगळे नाना लोक भस्मोन जाती ॥ १७ ॥
मेरु अवघा चि घसरे । तेथील महिमा च वोसरे
देवसमुदाव वावरे । वायोचक्रीं ॥ १८ ॥

---

१ निस्खलित झालेले. २ तडके, फाटे

भस्म जालियां धरत्री । प्रजन्य पडे शुंडाधारी ।
मही विरे जळांतरीं । निमिष्यमात्रें ॥ १९ ॥
पुढें नुस्तें उरेल जळ । तयास शोषील अनळ ।
पुढें येकवटती ज्वाळ । मर्यादेवेगळे ॥ २० ॥
समुद्रींचा वडवानळ । शिवनेत्रींचा नेत्रानळ ।
सप्तकंचुकींचा[1] आवर्णानळ । सूर्य आणी विद्युल्यता ॥ २१ ॥
ऐसे ज्वाळ येकवटती । तेणें देव देह सोडिती ।
पूर्वरूपें मिळोन जाती । प्रभंजनीं[2] ॥ २२ ॥
तो वारा झडपी वैश्वानरा । वन्ही विझेल येकसरा ।
वायो धावे सैरावैरा । परब्रह्मीं ॥ २३ ॥
धूम्र वितुळे आकाशीं । तैसें होईल समीरासी ।
बहुतांमधें थोडियासी । नाश बोलिला ॥ २४ ॥
वायो वितुळतां च जाण । सूक्ष्म भूतें आणी त्रिगुण ।
ईश्वर सांडी अधिष्ठान । निर्विकल्पीं ॥ २५ ॥
तेथें जाणीव राहिली । आणी जगज्जोती निमाली ।
शुद्ध सारांश उरली । स्वरूपस्थिती[3] ॥ २६ ॥
जितुकीं कांहीं नामाभिधानें । तये प्रकृतीचेनि गुणें ।
प्रकृती नस्तां बोलणें । कैसें बोलावें ॥ २७ ॥
प्रकृती अस्ता विवेक कीजे । त्यास विवेकप्रळये बोलिजे ।
पांच हि प्रळय बोजें[4] । तुज निरोपिले ॥ २८॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे पंचप्रळयानिरूपणनाम समास पांचवा ॥५॥

॥ श्रीराम ॥

उत्पत्ती स्थिति संव्हार । याचा निरोपिला वेव्हार ।
परमात्मा निर्गुण निराकार । जैसा तैसा ॥ १ ॥

१ पंचतत्वें, अहंकार व महत्तत्व मिळून सप्तकंचुकयुक्त त्रैलोक्य २ वायूमध्यें ३ पंचभूतें + त्रिगुण=प्रकृति, व ईश्वर=पुरुष. प्रकृति+पुरुष=वायु+जाणीव=मूळमाया ती मूळमाया निर्विकल्प स्वरूपीं लीन होते द. १०—४—१६ व द. १०—९—५ वे ११ पद्य. ४ उत्तम रीतीनें.

होतें वर्ततें आणी जातें । याचा समध नाहीं तेथें ।
आद्य मध्य अवसान तें । संचलें चि आहे ॥ २ ॥
परब्रह्म असत चि असे । मध्यें चि हा भ्रम भासे ।
भासे परंतु अवघा नासे । काळांतरीं ॥ ३ ॥
उत्पत्तीस्थितीसंव्हारत । मध्यें हि अखंड होत जात ।
पुढें सेवटीं कल्पांत । सकळांस आहे ॥ ४ ॥
यामध्यें ज्यास विवेक आहे । तो आधीं च जाणताहे ।
सारासार विचारें पाहे । ह्मणौनिया ॥ ५ ॥
बहुत भ्रमिष्ट मिळाले । त्यांत उमजल्याचें काय चाले ।
सृष्टीमधें उमजले । ऐसे थोडे ॥ ६ ॥
त्या उमजल्यांचें लक्षण । कांहीं करूं निरूपण ।
भ्रमाहून विलक्षण । माहापुरुष ॥ ७ ॥
भ्रम हा नसेल जयासी । मनीं वोळखावें तयासी ।
ऐक आता भ्रमासी । निरोपिजेल ॥ ८ ॥
येक परब्रह्म संचलें । कदापी नाहीं विकारलें ।
त्यावेगळें भासलें । तें भ्रमरूप ॥ ९ ॥
जयासी बोलिला कल्पांत । त्रिगुण आणी पंचभूत ।
हें अवघें चि समस्त । भ्रमरूप ॥ १० ॥
मी तू हा भ्रम । उपासना हि भ्रम ।
ईश्वरभाव हा हि भ्रम । निश्चयेंसी ॥ ११ ॥

॥ श्लोक ॥ भ्रमेणाहं भ्रमेण त्वं । भ्रमेणोपासका जनाः ।
भ्रमेणेश्वरभावत्वं । भ्रममूलमिदं जगत् ॥ १ ॥

याकारणें सृष्टि भासत । परतु भ्रम चि हा समस्त ।
यामध्यें जे विचारवंत । ते चि धन्य ॥ १२ ॥

---

१ "ते" वरील मात्रेला फांटा देऊन समासात "या" आहे, पण "थें" कायम च आहे. बहुधा "तयातें" करावयाचें होतें. २ "ते" ची "सी" केली आहे.

आतां भ्रमाचा विचारु । अत्यंत चि प्रांजळ करूं ।
दृष्टांतद्वारें विवरूं । श्रोतयांसी ॥ १३ ॥
भ्रमण करितां दुरी देसीं । दिशाभूलि आपणासी ।
कां वोळखी मोडे जीवलगांसी । या नाव भ्रम ॥ १४ ॥
कां उन्मत्त द्रव्य सेविलें । तेणें अनेक भासों लागलें ।
नाना वेथां कां झडपिलें । भूतें तो भ्रम ॥ १५ ॥
दशावतारीं वाटती नारी । कां ते मांडली बाजीगरी ।
उगा च संदेह अंतरीं । या नांव भ्रम ॥ १६ ॥
ठेविला ठाव तो विसरला । कां मार्गीं जातां मार्ग चुकला ।
पट्टणामधें भांबावला । या नांव भ्रम ॥ १७ ॥
वस्तु आपणापासीं असतां । गेली ह्मणोनि होये दुचितां[1] ।
आपलें आपण विसरतां । या नांव भ्रम ॥ १८ ॥
कांहीं पदार्थ विसरोन गेला । कां जें सिकला तें विसरला ।
स्वप्नदु:खें घाबिरा जाला । या नांव भ्रम ॥ १९ ॥
दुश्चिन्हें अथवा अपशकुन । मिथ्या वार्तेनें भंगे मन ।
वचके पदार्थ देखोन । या नांव भ्रम ॥ २० ॥
वृक्ष काष्ठ देखिलें । मनांत वाटे भूत आलें ।
कांहीं च नस्तां हडबडिलें । या नांव भ्रम ॥ २१ ॥
काच ह्मणोन उदकांत पडे । कां सभा देखोन दर्पणीं पवाडे ।
द्वार चुकोन भलतीकडे । जाणें या नांव भ्रम ॥ २२ ॥
येक अस्तां येक वाटे । येक सांगता येक निवटे[2] ।
येक दिसतां येक उठे । या नाव भ्रम ॥ २३ ॥
आतां जें जें देइजेतें । तें तें पुढें पाविजेतें ।
मेलें माणुस भोजना येतें । या नांव भ्रम ॥ २४ ॥

---

१ दुश्चित्त २ निष्पन्न होतें.

ये जन्मींचें पुढिले जन्मीं । कांहीं येक पावेन मी ।
प्रीती गुतली मनुष्याचे नामीं । या नाव भ्रम ॥ २५ ॥
मेलें मनुष्य स्वप्ना आलें । तेणें कांहीं मागितलें ।
मनीं अखंड बैसलें । या नाव भ्रम ॥ २६ ॥
अवघें मिथ्या ह्मणौन बोले । आणी सामर्थ्यांवरी मन चाले[1] ।
ज्ञाते वैभवें दपटले[2] । या नांव भ्रम ॥ २७ ॥
कर्मठपणें ज्ञान विटे । कां ज्ञातेपणें बळें भ्रष्टे ।
कोणीयेक सीमा फिटे[3] । या नांव भ्रम ॥ २८ ॥
देहाभिमान कर्माभिमान । ज्याल्याभिमान कुळाभिमान ।
ज्ञानाभिमान मोक्षाभिमान । या नांव भ्रम ॥ २९ ॥
कैसा न्याय तो न कळे । केला अन्याये तो नाडळे ।
उगा च अभिमानें खवळे । या नाव भ्रम ॥ ३० ॥
मागील कांहीं आठवेना । पुढील वि[4]चार सुचेना ।
अखंड आरूढ अनुमाना[5] । या नांव भ्रम ॥ ३१ ॥
प्रचीतिविण औषध घेणें । प्रचित नस्तां पथ्य करणें ।
प्रचीतीवीण ज्ञान सांगणें । या नाव भ्रम ॥ ३२ ॥
फळश्रुतीवीण प्रयोग । ज्ञानेंवीण नुस्ता योग ।
उगा च शरीरें भोगिजे भोग । या नाव भ्रम ॥ ३३ ॥
ब्रह्मा लिहितो अदृष्टीं[6] । आणी वाचून जाते सटी ।
ऐशा प्रकारीच्या गोष्टी । या नाव भ्रम ॥ ३४ ॥
उदंड भ्रम विस्तारला । अज्ञानजनीं पैसावला ।
अल्प सकेंतें बोलिला । कळावयाकारणें ॥ ३५ ॥

---

१ आणि वैभवाचा तर लोभ सुटतो. २ ज्ञाता असून वैभवाला भुलला. ३ कर्मठपणाच्या योगानें ज्ञानाचा वीट येणें किंवा ज्ञातेपणाच्या घमेंडींत जाणूनबुजून भ्रष्टाचार करणें, यांपैकीं कोणत्या हि मर्यादेचें उल्लंघन करणें. ४ प्रथम "कांहीं" होतें, त्याचें "विचार" केलें आहे ५ "मि" खोडून समासांत "नु" आहे. ६ नशिबीं, कपाळावर.

भ्रमरूप विश्व स्वभावें । तेथें काये ह्मणोन सांगावें ।
निर्गुण ब्रह्मावेगळें अघवें । भ्रमरूप ॥ ३६ ॥
ज्ञात्यास नाहीं संसार । ऐसें बोलती अपार ।
गत ज्ञात्याचे चमत्कार । या नाव भ्रम ॥ ३७ ॥
येथें आशंका उठिली । ज्ञात्याची समाधी पूजिली ।
तेथें कांहीं प्रचित आली । किंवा नाहीं ॥ ३८ ॥
तैसे चि अवतारी संपले । त्याचें हि सामर्थ्य उदंड चाले ।
तरी ते काये गुंतले । वासना धरूनी ॥ ३९ ॥
ऐसी आशंका उद्भवली । समर्थें पाहिजे निरसिली ।
इतुकेन हे समाप्त जाली । कथा भ्रमाची ॥ ४० ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे भ्रमनिरूपणनाम समास षष्ठ ॥ ६ ॥

---

॥ श्रीराम ॥

अवतारादिक ज्ञानी संत । सारासारविचारें मुक्त ।
त्यांचें सामर्थ्य चालत । कोण्या प्रकारें ॥ १ ॥
हे श्रोतयांची आशंका । पाहतां प्रश्न केला निका ।
सावध होऊन ऐका । ह्मणे वक्ता ॥ २ ॥
ज्ञानी मुक्त होऊन गेले । मागें त्यांचें सामर्थ्य चाले ।
परंतु ते नाहीं आले । वासना धरूनी[1] ॥ ३ ॥
लोकास होतो चमत्कार । लोक मानिती साचार ।
परंतु याचा विचार । पाहिला पाहिजे ॥ ४ ॥
जीत असतां नेणों किती । जनामधें चमत्कार होती ।
ऐसियाची सद्यप्रचिती । रोकडी पाहावी ॥ ५ ॥
तो तरी आपण नाहीं गेलां[2] । लोकीं प्रत्यक्ष देखिला ।
ऐसा हा चमत्कार जाला । यास काये ह्मणावें ॥ ६ ॥

---

१ "र" ची "रीं" केली आहे २ उदाहरणार्थ, श्रीसमर्थांना एका च दिवशीं अकरा घरचीं भोजनाचीं आमंत्रणें आलीं असतां ते फक्त एका च घरीं गेले पण अकरा हि घरीं लोकांना प्रत्यक्ष दिसले

तरी हा लोकांचा भावार्थ । भाविका देव येथार्थ ।
अनेत्र[1] कल्पना वेर्थ । कुतर्काची ॥ ७ ॥
आवडे तें स्वप्नीं देखिलें । तरी काये तेथून आलें ।
म्हणाल तेणें आठविलें । तरी द्रव्य कां दिसे[2] ॥ ८ ॥
एव आपली कल्पना । स्वप्नीं येती पदार्थ नाना ।
परी ते पदार्थ चालतींना । अथवा आठऊ नाहीं ॥ ९ ॥
येथें तुटली आशंका । झाल्यास जन्म कल्पू नका ।
उमजेना तरी विवेका । बरें पाहा ॥ १० ॥
ज्ञानी मुक्त होऊन गेले । त्यांचें सामर्थ्य उगें चि चाले ।
कां जे पुण्यमार्गें चालिले । म्हणोनियां ॥ ११ ॥
याकारणें पुण्यमार्गें चालावें । भजन देवाचें वाढवावें ।
न्याये सांडून न जावें[3] । अन्यायमार्गें ॥ १२ ॥
नाना पुरश्चरणें[4] करावीं । नाना तीर्थाटणें फिरावीं ।
नाना सामर्थ्यें वाढवावीं । वैराग्यबळें ॥ १३ ॥
निश्चये बैसे वस्तूकडे । तरी ज्ञानमार्गें हि सामर्थ्य चढे ।
कोणीयेक येकांत मोडे । ऐसें न करावें ॥ १४ ॥
येक गुरु येक देव । कोठें तरी असावा भाव ।
भावार्थ नस्ता वाव । सर्व कांहीं ॥ १५ ॥
निर्गुणीं ज्ञान जालें । ह्मणोन सगुण अलक्ष केलें ।
तरी तें ज्ञातें नागवलें । दोहिंकडे ॥ १६ ॥

---

१ अन्यत्र. २ ती त्याची नुसती आठवण असते असें ह्मणाल तर, साक्षात् वस्तु कां त्यास दिसावी ? ३ अन्याय सांडून जावें । न्यायेमार्गें ॥ असा प्रथम पाठ होता. ४ जेथें जेथें आतांपर्यंत हा शब्द आला आहे, तेथें तेथें " पुनश्चरणें " असें प्रथम असून " न " चा " र " केलेला आहे. या ठिकाणीं मुळांत " र " करावयाचा राहिला आहे.

नाहीं भक्ति नाहीं ज्ञान । मधें च पैसावला अभिमान ।
ह्मणोनियां जपध्यान । सांडूं च नये ॥ १७ ॥
सांडील सगुणभजनासी । तरी तो ज्ञाता परी अपेसी ।
ह्मणौनिया सगुणभजनासी । सांडूं चि नये ॥ १८ ॥
नि:काम बुद्धीचिया भजना । त्रैलोकीं नाहीं तुळणा ।
समर्थेंविण घडेना । नि:काम भजन ॥ १९ ॥
कामनेनें फळ घडे । नि:काम भजनें भगवंत जोडे ।
फळभगवंता कोणीकडे । महदांतर ॥ २० ॥
नाना फळें देवापासी । आणी फळ अंतेरी भगवंतासी ।
याकारणें परमेश्वरासी । नि:काम भजावें ॥ २१ ॥
नि:कामभजनाचें फळ आगळें । सामर्थ्य चढे मर्यादेवेगळें ।
तेथें बापुडीं फळें । कोणीकडे ॥ २२ ॥
भक्तें जें मनीं धरावें । तें देवें आपण चि करावें ।
तेथें वेगळें भावावें । नलगे कदा ॥ २३ ॥
दोनी सामर्थ्यें येक होतां । काळास नाटोपे सर्वथा ।
तेथें इतरांची कोण कथा । कीटकन्यायें ॥ २४ ॥
ह्मणोन नि:काम भजन । वरी विशेष ब्रह्मज्ञान ।
तयास तुळितां त्रिभुवन । उणें वाटे ॥ २५ ॥
येथें बुद्धीचा प्रकाश । आणीक न चढे विशेष ।
प्रताप कीर्ती आणी येश । निरंतर ॥ २६ ॥
निरूपणाचा विचार । आणी हरिकथेचा गजर ।
तेथें होती तत्पर । प्राणीमात्र ॥ २७ ॥
जेथें भ्रष्टाकार घडेना । तो परमार्थ हि दडेना ।
समाधान विघडेना । निश्चयाचें ॥ २८ ॥
सारासारविचार करणें । न्यायेअन्यायें अखंड पाहाणें ।
बुद्धि भगवताचें देणें । पालटेना ॥ २९ ॥

---

१ सामर्थ्यावांचून, योग्यतेवाचून. २ अंतरवितें ३ विशेष

भक्त भगवतीं अनन्य । त्यासी बुद्धि देतो आपण ।
येदर्थीं भगवद्वचन । सावध ऐका ॥ ३० ॥

श्लोकार्ध ॥ ददामि बुद्धियोग त येन मामुपयाति ते ॥ ७ ॥

ह्मणौन सगुण भजन । वरी विशेष ब्रह्मज्ञान ।
प्रत्ययाचें समाधान । दुर्लभ जगीं ॥ ३१ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सगुणभजननिरूपणनाम समास सप्तम॥७॥

---

॥ श्रीराम ॥

ऐका प्रचितीचीं लक्षणें । प्रचित पाहेल तें शाहाणें ।
येर वेडे दैन्यवाणे । प्रचितीविण ॥ १ ॥

नाना रत्नें नाना नाणीं । परीक्षून न घेतां हानी ।
प्रचित न येता निरूपणीं । बैसों च नये ॥ २ ॥

तुरंग शस्त्र दमून पाहिलें । बरें पाहातां प्रचितीस आलें ।
तरी मग पाहिजे घेतलें । जाणते पुरुषीं ॥ ३ ॥

बीज उगवेलसें पाहावें । तरी मग द्रव्य घालून घ्यावें ।
प्रचित आलियां ऐकावें । निरूपण ॥ ४ ॥

देहीं आरोग्यता जाली । ऐसी जना प्रचित आली ।
तरी मग आगत्य घेतली । पाहिजे मात्रा ॥ ५ ॥

प्रचितीविण औषध घेणें । तरी मग धड चि विघडणें[1] ।
अनुमानें जें कार्य करणें । तें चि मूर्खपण ॥ ६ ॥

प्रचितीस नाहीं आलें । आणी सुवर्ण करविलें ।
तरी मग जाणावें ठकिलें । देखतदेखतां ॥ ७ ॥

शोधून पाहिल्याविण । कांहींतरी येक कारण ।
होणार नाहीं निर्वाण । प्राणास घडे[2] ॥ ८ ॥

ह्मणोनी अनुमानाचें कार्य । भल्यानीं कदापि करूं नये ।
उपाय पाहातां अपाये । नेमस्त घडे ॥ ९ ॥

---

१ बिघडविणें. २ शोधून पाहिल्यावांचून कोणतें हि कार्य करणें वाजवी होणार नाहीं, जर केलें तर तेणेंकरून प्राणान्तिक अवस्था होते.

पाण्यांतील म्हैसीची साटी । करणें हे बुद्धि च खोटी ।
शोधिल्यविण हिंपुटी । होणें घडे ॥ १० ॥
विश्वासें घर घेतलें । ऐसें किती नाहीं ऐकिलें ।
मैंदें मैंदावें केलें । परी तें शोधिलें पाहिजे ॥ ११ ॥
शोधिल्याविण अन्नवस्त्र घेणें । तेणें प्राणास मुकणें ।
लटिक्याचा विश्वास धरणें । हें चि मूर्खपण ॥ १२ ॥
संगतीं चोराची धरिता । घात होईल तत्वता ।
ठकु सिंतरु शोधितां । ठाइं पडे ॥ १३ ॥
गैरसाळ तामगिरी । कोणी नवी मुद्रा करी ।
नाना कपट परोपरीं । शोधून पाहावें ॥ १४ ॥
दिवाळखोराचा माड । पाहातां वैभव दिसे उदंड ।
परी तें अवघें थोताड । भंड पुढें ॥ १५ ॥
तैसें प्रचितीवीण ज्ञान । तेथें नाहीं समाधान ।
करून बहुताचा अनुमान । अन्हीत जालें ॥ १६ ॥
मत्र यंत्र उपदेसिलें । नेणतें प्राणी तें गोविलें ।
जैसें झांकून मारिलें । दुखणाईत ॥ १७ ॥
वैद्य पाहिला परी कच्चा । तरी प्राण गेला पोराचा ।
येथें उपाये दुसऱ्याचा । काये चाले ॥ १८ ॥
दु:खें अतरीं झिजे । आणी वैद्य पुसतां लाजे ।
तरी च मग त्यासी साजे । आत्महत्यारेपण ॥ १९ ॥
जाणत्यावरी गर्व केला । तरी नेणत्याकरिता बुडाला ।
येथें कोणाचा घात जाला । बरें पाहा ॥ २० ॥

---

१ बदला, संगत, संग्रह, खरेदी. २ कधीं. ३ कपटी मनुष्यानें ४ कपट. ५ लबाड कोण, फसविणारा कोण याचा शोध केला म्हणजे समजतें ६ खोटा, गैरशिस्त वर्तनाचा. ७ ताम्याच्या धातूचें सुवर्ण करणारे ८ कोणी नवीन चमत्कारिक वेष धारण करून लोकांना फसवितात. ९ पसारा. १० फजिती. ११ स्वत अज्ञानी राहिल्यामुळें.

[1]पापाची खंडणा जाली । जन्मयातना चुकली ।
ऐसी स्वयें प्रचित आली । म्हणिजे बरें ॥ २१ ॥
परमेश्वरास वोळखिलें । आपण कोणसें कळलें ।
आत्मनिवेदन जालें । म्हणिजे बरें ॥ २२ ॥
ब्रह्मांड कोणें केलें । कासयाचें उभारलें ।
मुख्य कर्त्यास वोळखिलें । ह्मणिजे बरें ॥ २३ ॥
येथें अनुमान राहिला । तरी परमार्थ केला तो वायां गेला ।
प्राणी संशई[1] बुडाला । प्रचितीविण ॥ २४ ॥
हें परमार्थाचें वर्म । लटिकें बोले तो अधम ।
लटिकें मानी तो अधमोद्धम । येथार्थ जाणावा ॥ २५ ॥
येथें बोलण्याची जाली सीमा । नेणतां न कळे परमात्मा ।
असत्य नाहीं सर्वोत्तमा[2] । तू जाणसी ॥ २६ ॥
माझे उपासनेचा बडिवार । ज्ञान सांगावें साचार ।
मिथ्या बोलतां उत्तर । प्रभूस लागे ॥ २७ ॥
म्हणोनि सत्य चि बोलिलें । कर्त्यास पाहिजे वोळखिलें ।
मायोद्भवाचें शोधिलें । पाहिजे मूळ ॥ २८ ॥
तें चि पुढें निरूपण । बोलिलें चि बोलिलें प्रमाण ।
श्रोतीं सावध अंतःकर्ण । घातलें चि घालावें ॥ २९ ॥
सूक्ष्म निरूपण लागलें । तेथें बोलिलें चि मागुतें बोलिलें ।
श्रोत्यांस पाहिजे उमजलें । ह्मणोनियां ॥ ३० ॥
प्रचित पाहाता निकट । उडोन जाती परिपाठ[3] ।
ह्मणोनि हे खटपट । करणें लागे ॥ ३१ ॥
परिपाठें चि जरी बोलिलें । तरी प्रचितसमाधान बुडालें ।
प्रचितसमाधान राखिलें । तरी परिपाठ उडे ॥ ३२ ॥

---

१ या वरील गोष्टीसंबंधानें जर संशय उरला तर २ रामा ३ लोकांचा दंड-जनरुढि.

ऐसी साकडी दोहींकडे । ह्मणौन बोलिलें चि बोलणें घडे ।
दोनी राखोनिया कोडें । उकलून दाऊं ॥ २३ ॥
परिपाठ आणी प्रचित प्रमाण । दोनी राखोन निरूपण ।
श्रोते परम विचक्षण । विवरोत पुढें ॥ २४ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे प्रचितनिरूपणनाम समास अष्टम ॥ ८ ॥

---

॥ श्रीराम ॥

आकाशीं वायो जाला निर्माण । तैसी ब्रह्मीं मूळमाया जाण ।
त्या वायोमधें त्रिगुण । आणी पंचभूतें ॥ १ ॥
वटबीजीं असे वाड । फोडून पाहातां न दिसे झाड ।
नाना वृक्षाचे झुंबाडें[1] । बीजापासून होती ॥ २ ॥
तैसी बीजरूप मूळमाया । विस्तार जाला तेथुनियां ।
तिचें स्वरूप शोधुनियां । बरें पाहावें ॥ ३ ॥
तेथें दोनी भेद दिसती । विवेकें पाहावी प्रचिती ।
निश्चळीं जे चंचळ स्थिती । तो चि वायो ॥ ४ ॥
तयामधें जाणीवकळा । जगज्जोतीचा जिव्हाळा[2] ।
वायो जाणीव मिळोन मेळा । मूळमाया[3] बोलिजे ॥ ५ ॥
सरितो[4] ह्मणतां बायको भासे । तेथें पाहातां पाणी च असे ।
विवेकी हो समजा तैसें । मूळमायेसी ॥ ६ ॥
वायो जाणीव जगज्जोती । तयास मूळमाया ह्मणती ।
पुरुष[5] आणी प्रकृती । याचें च नांव ॥ ७ ॥
वायोस ह्मणती प्रकृति । आणि पुरुष ह्मणती जगज्जोती ।
पुरुषप्रकृती शिवशक्ती । याचें च नांव ॥ ८ ॥
वायोमधें जाणीव विशेष । तो चि प्रकृतीमधें पुरुष ।
ये गोष्टीचा विश्वास । धरिला पाहिजे ॥ ९ ॥

---

१ समूह. २ झरा. ३ वायु आणि जाणीव मिळून मूळमाया होते ४ नदी. ५ जाणीव ती च जगज्जोति.

वायो शक्ति जाणीव ईश्वरें[1] । अर्धनारी नटेश्वर ।
लोक ह्मणती निरंतर । येणें प्रकारें ॥ १० ॥
वायोमध्यें जाणीव गुण । तें चि ईश्वराचें लक्षण ।
तयापासून त्रिगुण । पुढें जाले ॥ ११ ॥
तया गुणांमधें सत्वगुण । निखळ जाणीवलक्षण ।
त्याचा देहधारी आपण । विष्णु जाला ॥ १२ ॥
त्याच्या अंशें जग चाले । ऐसें भगवद्गीता बोले ।
गुतले ते चि उगवले[2] । विचार पाहातां ॥ १३ ॥
येक जाणीव वाटली । प्राणीमात्रास विभागली ।
जाणजाणों वांचविली । सर्वत्र काया ॥ १४ ॥
तयेचें नांव जगज्जोती । प्राणीमात्र तिचेन जिती[3] ।
याची रोकडी प्रचिती । प्रत्यक्ष पाहावी ॥ १५ ॥
पक्षी श्वापद किडा मुंगी । कोणीयेक प्राणी जगीं ।
जाणीव खेळे त्याचा आंगीं । निरतर ॥ १६ ॥
जाणोनी काया पळविती । तेणें गुणें वांचती ।
दडती आणि लपती । जाणजाणों ॥ १७ ॥
आवघ्या जगास वांचविती । ह्मणोनि नामें जगज्जोती ।
ते गेलिया प्राणी मरती । जेथील तेथें ॥ १८ ॥
मुळींचे[4] जाणीवेचा विकार । पुढें जाला विस्तार ।
जैसे उदकाचे तुषार । अनंत रेणु ॥ १९ ॥
तैसे देव देवता देवतें भूतें । मिथ्या ह्मणों नये त्यातें ।
आपलाल्या सामर्थ्यें ते । सृष्टीमधें फिरती ॥ २० ॥
सदा विचरती वायोस्वरूपें । स्वइछा पालटिती रूपें ।
अज्ञान प्राणी भ्रमें संकल्पें । त्यास बाधिती ॥ २१ ॥

---

१ वायु ही शक्ति व जाणीव हा ईश्वर, याला च अर्धनारीनटेश्वर ह्मणतात. २ विचार केला ह्मणजे कठीण असतें तें समजतें. ३ जगतात. ४ मूळमायेंतील.

ज्ञात्यास संकल्प चि असेना । ह्मणोन त्यांचेन बाधवेना ।
याकारणें आत्मज्ञाना । अभ्यासावें ॥ २२ ॥
अभ्यासिलीयां आत्मज्ञान । सर्व कर्मांस होये खंडण[1] ।
हे रोकडी प्रचित प्रमाण । संदेह नाहीं ॥ २३ ॥
ज्ञानेविण कर्म विघंडे । हें तों कदापि न घडे ।
सद्गुरुवीण ज्ञान जोडे । हें हि अघटीत ॥ २४ ॥
ह्मणोन सद्गुरु करावा । सत्संग शोधून धरावा ।
तत्वविचार विवरावा । अंतर्यामीं ॥ २५ ॥
तत्वें तत्व निरसोन जातां । आपला आपण चि तत्वता ।
अनन्यभावें सार्थकता । सहज चि जाली ॥ २६ ॥
विचार न करितां जें जें केलें । तें तें वाउगें वेर्थ गेलें ।
ह्मणोनि विचारीं प्रवर्तलें । पाहिजे आधीं ॥ २७ ॥
विचार पाहेल तो पुरुषु । विचार न पाहे तो पशु ।
ऐसीं वचनें सर्वेशु । ठाईं ठाईं बोलिला ॥ २८ ॥
सिद्धांत साधायाकारणें । पूर्वपक्ष लागे उडवणें ।
परंतु साधकां निरूपणें । साक्षात्कारें[2] ॥ २९ ॥
श्रवण मनन निजध्यास । प्रचितीनें बाणतां विश्वास ।
रोकडा साक्षात्कार सायास । करणें चि नलगे ॥ ३० ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे पुरुषप्रकृतीनाम समास ॥ ९ ॥

---

॥ श्रीराम ॥

गगनासारिखें ब्रह्म पोकळ । उदंड उंच अंतराळें[3] ।
निर्गुण निर्मळ निश्चळ । सदोदित ॥ १ ॥
त्यास परमात्मा ह्मणती । आणीक नामें नेणों किती ।
परी तें जाणिजे आदिअंतीं । जैसें तैसें ॥ २ ॥

---

१ नाहींसें होतें, खंडण होतें. २ साधकाला निरूपणाच्या योगानें साक्षात्कार होतो. ३ पोकळ

विस्तीर्ण पसरला पैस । भोंवता दाटला अवकाश ।
भास चि नाहीं निराभास । जैसें तैसें ॥ ३ ॥
चहुकडे पाताळतळीं । अंत चि नाहीं अंतराळीं ।
कल्पांतकाळीं सर्वकाळीं । संचलें चि असे ॥ ४ ॥
ऐसें काहींयेक अचंचळ । ते अचचळीं भासे चंचळ ।
त्यास नामें हि पुष्कळ । त्रिविधा प्रकारें ॥ ५ ॥
न दिसतां नांव ठेवणें । न देखतां खूण सांगणें ।
असो हें जाणायाकारणें । नामाभिधानें ॥ ६ ॥
मूळमाया मूळप्रकृति । मूळपुरुष ऐसें ह्मणती ।
शिवशक्ति नामें किती । नाना प्रकारें ॥ ७ ॥
परी जें नाम ठेविलें जया । आधीं वोळखावें तया ।
प्रचितीवीण कासया । वलगना करावी ॥ ८ ॥
रूपाची न धरितां सोये । नामासरिसें भरगळों नये ।
प्रत्ययाविण गळंगा होये । अनुमानज्ञानें ॥ ९ ॥
निश्चळ गगनीं चचळ वारा । वाजों लागला भरारां ।
परी त्या गगना आणि समीरा । भेद आहे ॥ १० ॥
तैसें निश्चळ परब्रह्म । चंचळ माया भासला भ्रम ।
त्या भ्रमाचा च संभ्रम । करून दाऊं ॥ ११ ॥
जैसा गगनीं चालिला पवन । तैसें निश्चळीं जालें चळण ।
इछा स्फूर्तिलक्षणें । स्फूर्णरूप ॥ १२ ॥
अहंपणें जाणीव जाली । ते चि मूळप्रकृति बोलिली ।
माहाकारणकाया रचली । ब्रह्मांडीची ॥ १३ ॥
माहामायाँ मूळप्रकृती । कारण ते अव्याकृती ।
सूक्ष्म हिरण्यगर्भ ह्मणती । विराट ते स्थूळें ॥ १४ ॥

---

१ एकंकार, घोटाळा. २ स्फूर्तिलक्षणरूप जी इच्छा. " मी एक आहें तो बहुविध व्हावें " ही ब्रह्माच्या ठिकाणीं स्फुरण पावलेली इच्छा. ३ महाकारण. ४ स्थूल, सूक्ष्म, कारण, महाकारण हे जसे पिंडातील चार देह, तसे च विराट, हिरण्यगर्भ अव्याकृत, मूळप्रकृति हे ब्रह्मांडातील अनुक्रमें चार देह होत

ऐसें पंचीकर्ण शास्त्रप्रमये[1] । ईश्वरतनुचेतुष्टये[2] ।
ह्मणोन हें बोलणें होये । जाणीव मूळमायां[3] ॥ १५ ॥
परमात्मा परमेश्वरु । परेश ज्ञानघन ईश्वरु ।
जगदीश जगदात्मा जगदेश्वरु । पुरुषनामें ॥ १६ ॥
सत्तारूप ज्ञानस्वरूप । प्रकाशरूप जोतिरूप ।
कारणरूप चिद्रूप । शुद्ध सूक्ष्म अलिप्त ॥ १७ ॥
आत्मा अंतरात्मा विश्वात्मा । द्रष्टा साक्षी सर्वात्मा ।
क्षेत्रज्ञ शिवात्मा जीवात्मा । देही कूटस्त बोलिजे ॥ १८ ॥
इंद्रात्मा ब्रह्मात्मा हरिहरात्मा । येमात्मा धर्मात्मा नैरुत्यात्मा ।
वरुणवायोकुबेरात्मा । ऋषीदेवंमुनिधर्ता ॥ १९ ॥
गण गंधर्व विद्याधर । येक्ष किन्नर नारद तुंबर ।
सर्व लोकांचें अंतर । तो सर्वांतरात्मा बोलिजे ॥ २० ॥
चंद्र सूर्य तारामंडळें । भूमंडळें मेघमंडळें ।
येकवीस स्वर्गें सप्त पाताळें । अंतरात्मा च वर्तवी ॥ २१ ॥
गुप्त वल्ली पाल्हाळली । तिचीं पुरुषनामें घेतलीं ।
आतां स्त्रीनामें ऐकिलीं । पाहिजे श्रोतीं ॥ २२ ॥
मूळमाया जगदेश्वरी । परमविद्या परमेश्वरी ।
विश्वबंद्या विश्वेश्वरी । त्रैलोक्यजननी ॥ २३ ॥
अंतर्हेतु अंतर्कळा । मौन्यगर्भ जाणीवकळा ।
चपळ जगज्जोती जीवनकळा । परा पश्यंती मध्यमा ॥ २४ ॥
युक्ति·बुद्धि मति धारणा । सावधानता नाना चाळणा ।
भूत भविष्य वर्तमाना । उकलून दावी ॥ २५ ॥
जागृति स्वप्न सुषुप्ती जाणे । तुर्या ताटस्ता अवस्ता जाणे ।
सुख दुःख सकळ जाणे । मानापमान ॥ २६ ॥

---

१ अशा प्रकारचें पंचीकरण हें शास्त्रसंमत आहे. २ विराट, हिरण्यगर्भ, अव्याकृत व मूळमाया याना ईश्वरतनुचतुष्टय ह्मणतात ३ वर १३ व्या ओवींत जाणीव ती च मूळमाया असें ह्मटलें आहे तें या च कारणामुळें पिंडातील जी जाणीव किंवा महाकारणकाया ती च ब्रह्मांडांतील मूळमाया

ते परम कठीण कृपाळु । ते परम कामळ स्नेहाळु ।
ते परम क्रोधी लोभाळु । मर्यादेवेगळी ॥ २७ ॥
शांती क्षमा विरक्ती भक्ती । अध्यात्मविद्या सायोज्यमुक्ति ।
विचारणा सहजस्थिति । जयेचेनी ॥ २८ ॥
पूर्वी पुरुषनामें बोलिलीं । उपरी स्त्रीनामें निरोपिलीं ।
आतां नपुषकनामें ऐकिलीं । पाहिजे चचळाचीं ॥ २९ ॥
जाणणें अंत:कर्ण चित्त । श्रवण मनन चैतन्य जीवित ।
येतें जातें सुचीत । होऊन पाहा ॥ ३० ॥
मीपण तूंपण जाणपण । ज्ञातेपण सर्वज्ञपण ।
जीवपण शिवपण ईश्वरपण । अलिप्तपण बोलिजे ॥ ३१ ॥
ऐसीं नामें उदंड असती । परी ते येक चि जगज्जोती ।
विचारवंत ते जाणती । सर्वांतरात्मा ॥ ३२ ॥
आत्मा जगज्जोती सर्वज्ञपण । तीनी मिळोन येक चि जाण ।
अंत:कर्ण चि प्रमाण । ज्ञप्तीमात्र ॥ ३३ ॥
ढीग जाले पदार्थांचे । पुरुष स्त्री नपुंसक नामांचे ।
परंतु सृष्टीरचनेचें । किती ह्मणोन सांगावे ॥ ३४ ॥
सकळ चाळिता येक । अतरात्मा वर्तवी अनेक ।
मुंगीपासून ब्रह्मादिक । तेणें चि चालती ॥ ३५ ॥
तो अंतरात्मा आहे कैसा । प्रस्तुत बोळखाना आमांसा ।
नाना प्रकारींचा तमासा । येथें चि आहे ॥ ३६ ॥
तो कळतो परी दिसेना । प्रचित येते परी भासेना ।
शरीरीं असे परी वसेना । येके ठाईं ॥ ३७ ॥
तीक्षणंपणें गगनीं भरे । सरोवर देखतां च पसरे ।
पदार्थ लक्षूनें उरे । चहुंकडे ॥ ३८ ॥

---

१ आणखी ह्या सृष्टींतील नावें किती तरी सांगतां येतील. २ अंमळसा. ३ एकदम. ४ " र " चा " ल " केला आहे.

जैसा पदार्थ दृष्टीस दिसतो । तो त्यासारिखा च होतो ।
वायोहूनि विशेष तो । चंचळविषईं ॥ ३९ ॥
कित्येक दृष्टीनें देखे । कितीयेक रसनेनें चाखे ।
कितीयेक ते वोळखे । मनेंकरूनि ॥ ४० ॥
श्रोत्रीं बैसोन शब्द ऐकतो । घ्राणेंद्रियें वास घेतो ।
त्वचेइंद्रियें जाणतो । सीतोष्णादिक ॥ ४१ ॥
ऐसा जाणे अंतर्कळा । सकळांमधें परी निराळा ।
पाहाता त्याची अगाध लीळा । तो चि जाणे ॥ ४२ ॥
तो पुरुष ना सुंदरी । बाळ तारुण्य ना कुमारी ।
नपुसकाचा देहधारी[1] । परी नपुसक नव्हे ॥ ४३ ॥
तो चालवी सकळ देहासी । करून अकर्ता ह्मणती त्यासी ।
तो क्षेत्रज्ञ क्षेत्रवासी । देही कूटस्त बोलिजे ॥ ४४ ॥

॥ श्लोक ॥ द्वाविमौ पुरुषौ लोके क्षरश्चाक्षर एव च ।
क्षरः सर्वाणि भूतानि कूटस्थोक्षर उच्यते ॥ ५ ॥

दोनी पुरुष लोकीं असती । क्षराक्षर बोलिजेती ।
सर्व भूतें क्षर ह्मणती । अक्षर कूटस्त बोलिजे ॥ ४५ ॥
उत्तम पुरुष तो आणीक । निःप्रपंच निःकळंक ।
निरंजन परमात्मा येक । निर्विकारी ॥ ४६ ॥
च्यारी देह निरसावे । साधकें देहातीत व्हावें ।
देहातीत होतां जाणावें । अनन्य भक्त ॥ ४७ ॥
देहमात्र निरसुनी गेला । तेथें अंतरात्मा[2] कैसा उरला ।
निर्विकारीं विकाराला । ठाव नाहीं ॥ ४८ ॥

---

१ नपुंसक शरीराचा धारण करणारा जरी आत्मा आहे तरी तो नपुसक हि नव्हे. २ "अंतरात्मा" हा शब्दप्रयोग देहाच्या अपेक्षेनें झाला आहे, तेव्हा देह च निरसून गेल्यावर अंतरात्मा कोठें उरतो ? निर्विकार जें ब्रह्मस्वरूप त्याच्या ठिकाणीं विकार नाहीं अंतरात्मा हा प्रयोग देहाच्या उपाधीयोगें आहे, ती उपाधि ब्रह्माच्या ठिकाणीं नाहीं. ही ओवी समासांत श्रीसमर्थांनीं मागाहून घातली आहे.

निश्चळ परब्रह्म येक । चचळ जाणावें माईक ।
ऐसा प्रत्यय निश्चयात्मक । विवेकें पाहावा ॥ ४९ ॥
येथें बहुत नलगे खळखळ । येक चचळ येक निश्चळ ।
शाश्वत कोणतें केवळ । ज्ञानें वोळखावें ॥ ५० ॥
असार त्यागून घेईजे सार । ह्मणोन सारासार विचार ।
नित्यानित्य निरंतर । पाहाती ज्ञानी ॥ ५१ ॥
जेथें ज्ञान चि होतें विज्ञान । जेथें मन चि होतें उन्मन ।
तेथें कैचें चचळपण । आत्मयासी ॥ ५२ ॥
सांगणोवांगणीचें काम नव्हे । आपुल्या अनुभवें जाणावें ।
प्रत्ययाविण सिणावें । तें चि पाप ॥ ५३ ॥
सत्यायेवढें सुकृत नाहीं । असत्यायेवढें पाप नाहीं ।
प्रचितीविण कोठें चि नाहीं । समाधान ॥ ५४ ॥
सत्य ह्मणिजे स्वरूप जाण । असत्य माया हें प्रमाण ।
येथें निरोपिलें पापपुण्य । रूपेंसहित ॥ ५५ ॥
दृश्य पाप वोसरलें । पुण्य परब्रह्म उरलें ।
अनन्य होतां च जालें । नामातीत ॥ ५६ ॥
आपण वस्तु स्वतसिद्ध । तेथें नाहीं देहसमंध ।
पापरासी होती दग्ध । येणें प्रकारें ॥ ५७ ॥
येरवी ब्रह्मज्ञानेंवीण । जें जें साधन तो तो सीण ।
नाना दोषांचें क्षाळण । होईल कैसें ॥ ५८ ॥
पापाचें वळेलें शरीर । पाप चि घडे तदनंतर ।
अंतरीं रोग वरीवरी उपचार । काय करी ॥ ५९ ॥
नाना क्षत्रीं हें मुंडिलें । नाना तीर्थीं हें दंडिलें ।
नाना निग्रहीं खंडिलें । ठाईं ठाईं ॥ ६० ॥

---

१ दृश्य हें च पाप तें नाहींसें होऊन पुण्य जें परब्रह्म तें उरलें. २ हें शरीर पापापासून बनलेलें आहे व पुढें हि मायेला सत्य मानल्याकारणानें पाप च घडत आहे.

नाना मृत्तिकेनें घांसिलें । अथवा तप्तमुद्रेनें ळासिलें ।
जरी हें वरीवरी तासिलें । तरी शुद्ध नव्हे ॥ ६१ ॥
सेणाचे गोळे गिळिले । गोमुत्राचे मोवे घेतले ।
माळा रुद्राक्ष घातले । काष्ठमणी ॥ ६२ ॥
वेष वरीवरी केला । परी अंतरीं दोष भरला ।
त्या दोषाच्या दहनाला । आत्मज्ञान पाहिजे ॥ ६३ ॥
नाना व्रतें नाना दानें । नाना योग तीर्थाटणें ।
सर्वांहुनी कोटीगुणें । महिमा आत्मज्ञानाचा ॥ ६४ ॥
आत्मज्ञान पाहे सदा । त्याच्या पुण्यास नाहीं मर्यादा ।
दुष्ट पातकाची बाधा । निरसोन गेली ॥ ६५ ॥
वेदशास्त्रीं सत्यस्वरूप । तें चि ज्ञानियाचें रूप ।
पुण्य जालें अमूप । सुकृतें सीमा सांडिली ॥ ६६ ॥
या प्रचिताच्या गोष्टी । प्रचित पाहावी आत्मदृष्टीं ।
प्रचितीवेगळें कष्टी । होऊ च नये ॥ ६७ ॥
आगा ये प्रचितीचे लोक हो । प्रचित नस्तां अवघा शोक हो ।
रघुनाथकृपेनें राहो । प्रत्यय निश्चयाचा ॥ ६८ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे चळाचळनिरूपणनाम समास दाहावा १०

---

## ॥ भीमदशक[3] अकरावा ॥ ११ ॥

### ॥ श्रीराम ॥

आकाशापासून वायो होतो । हा तों प्रत्यये येतो ।
वायोपासून अग्नी जो तो । सावध ऐका ॥ १ ॥

---

१ डाग दिले. २ मोवा=गाडगें. ३ मारुती हा अकरावा रुद्र, म्हणून या अकराव्या दशकाला भीम ( मारुती ) नांव दिलेलें दिसतें.

वायोची कठिण घिसणी । तेथें निर्माण जाला वन्ही ।
मंद वायो सीतळ पाणी । तेथुनि जालें ॥ २ ॥
आपापासून जाली पृथ्वी । ते नाना बीजरूप जाणावी ।
बीजापासून उत्पत्ति व्हावी । हा स्वभाव चि आहे ॥ ३ ॥
मुळीं सृष्टी कल्पनेची । कल्पना आहे मुळींची ।
जयेपासूनं देवत्रयाची । काया जाली ॥ ४ ॥
निश्चळामधें चंचळ । ते चि कल्पना केवळ ।
अष्टधा प्रकृतीचें मूळ । कल्पनारूप ॥ ५ ॥
कल्पना ते चि अष्टधा प्रकृति । अष्टधा ते चि कल्पनामूर्ती ।
मुळाग्रापासून उत्पत्ति । अष्टधा जाणावी ॥ ६ ॥
पांच भूतें तीन गुण । आठ जालीं दोनी मिळोन ।
ह्मणौनि अष्टधा प्रकृति जाण । बोलिजेते ॥ ७ ॥
मुळीं कल्पनारूप जाली । पुढें ते चि फापावली ।
केवळ जडत्वास आली । सृष्टिरूपें ॥ ८ ॥
मुळीं जाली ते मूळमाया । त्रिगुण जाले ते गुणमाया ।
जडत्व पावली ते अविद्या माया । सृष्टिरूपें ॥ ९ ॥
पुढें च्यारी खाणी जाल्या । च्यारी वाणी विस्तारल्या ।
नाना योनी प्रगटल्या । नाना वेक्ती ॥ १० ॥
ऐसी जाली उभारणी । आतां ऐका सव्हारणी ।
मागील दशकीं विशद करूनि । बोलिलें असे ॥ ११ ॥
परंतु आता सकळित । बोलिजेल संव्हारसंकेत ।
श्रोते वक्ते येथें चित्त । देऊन ऐका ॥ १२ ॥

---

१ द. १२–६–१२ ते १४ पहा वायूच्या उष्ण व शीतल अशा दोन झुळुका असून उष्ण झुळुकेपासून रवि, वन्हि, विद्युल्लता इत्यादि निर्माण झाले व शीतल झुळुकेपासून चंद्र, तारा इत्यादि निर्माण झाले. या ठिकाणीं मंद ( शीतल ) वायूपासून शीतल ( तेज ) उत्पन्न झालें त्या शीतल तेजापासून पाणी उत्पन्न झालें असा अर्थ 'सीतळ' हें तेज या अध्याहृत नामाचें विशेषण आहे. २ मूळमायेच्या ठिकाणीं. ३ ज्या मूळमायेपासून सत्त्वरजतमात्मक (देवत्रय) गुणमाया निर्माण झाली.

शत वरुषें अनावृष्टि । तेथें आटेल जीवसृष्टि ।
ऐशा कल्पांताच्या गोष्टी । शास्त्रीं निरोपिल्या ॥ १३ ॥
बाराकळीं तपे सूर्य । तेणें पृथ्वीची रक्षा होये ।
मग ते रक्षा विरोन जाये । जळांतरीं ॥ १४ ॥
तें जळ शोषी वैश्वानरु । वन्ही झडपी समीरु ।
समीर वितुळे निराकारु । जैसें तैसें ॥ १५ ॥
ऐसी सृष्टिसंव्हारणी जाली । मागां विस्तारें बोलिली ।
मायानिरासें उरली । स्वरूपस्थिति ॥ १६ ॥
तेथें जीवशिव पिंडब्रह्मांड । आटोन गेलें थोतांड ।
मायेअविद्येचें बंड । वितळोन गेलें ॥ १७ ॥
विवेकें चि बोलिला क्षये । ह्मणोनि विवेकप्रळये ।
विवेकी जाणती काये । मूर्खास कळे ॥ १८ ॥
सृष्टि शोधितां सकळ । येक चंचळ येक निश्चळ ।
चंचळास कर्ता चचळ । चंचळरूपी ॥ १९ ॥
जो सकळ शरीरीं वर्ते । सकळ कर्तुत्वास प्रवर्ते ।
करून अकर्ता हा वर्ते । शब्द जया ॥ २० ॥
राव रंक ब्रह्मादिक । सकळांमधें वर्ते येक ।
नाना शरीरें चाळक । इंद्रियेंद्वारें ॥ २१ ॥
त्यास परमात्मा बोलती । सकळ कर्ता ऐसें जाणती ।
परि तो नासेल प्रचिती । विवेकें पाहावी ॥ २२ ॥
जो स्वानामधें गुरुगुरितो । जो सूकरांमधें कुरुकुरितो ।
गाढवीं भरोन भुंकतो । आटाहास्यें ॥ २३ ॥
लोक नाना देह देखती । विवेकी देहांत[1] पाहाती ।
पंडित समदर्शनें घेती । येणें प्रकारें ॥ २४ ॥

---

१ देहांतर, अंत:स्थिति.

॥ श्लोक ॥ विद्याविनयसंपन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनि ।
शुनि चैव श्वपाके च पंडिताः समदर्शिनः[1] ॥ ७ ॥

देह पाहातां वेगळाले । परंतु अंतर येक चि जालें ।
प्राणीमात्र देखिलें । येकांतरें ॥ २५ ॥
अनेक प्राणी निर्माण होती । परी येक चि कळा वर्तती ।
तये नाव जगज्जोती । जाणतीकळा ॥ २६ ॥
श्रोत्रीं नाना शब्द जाणे । त्वचेमधें सीतोष्ण जाणे ।
चक्षुमधें पाहों जाणे । नाना पदार्थ ॥ २७ ॥
रसनेमधें रस जाणे । घ्राणामधें वास तो जाणे ।
कर्मेंद्रियामधें जाणे । नाना विषयस्वाद ॥ २८ ॥
सूक्ष्म रूपें स्थूळ रक्षी । नाना सुखदुःखें परीक्षी ।
त्यास ह्मणती अंतरसाक्षी । अंतरात्मा ॥ २९ ॥
आत्मा अंतरात्मा विश्वात्मा । चैतन्य सर्वात्मा सूक्ष्मात्मा ।
जीवात्मा शिवात्मा परमात्मा । द्रष्टा साक्षी सत्तारूप ॥ ३० ॥
विकारामधील विकारीं[2] । अखंड नाना विकार करी ।
तयास वस्तु ह्मणती भिकारी । परम हीन ॥ ३१ ॥
सर्व येक चि दिसती । अवघा येकंकार करिती ।
ते अवघी माईक स्थिती । चंचळामधें ॥ ३२ ॥
चंचळ माया ते माईक । निश्चळ परब्रह्म येक ।
नित्यानित्यविवेक । याकारणें ॥ ३३ ॥
जा[3]तो जीव तो प्राण । नेणे जीव तो अज्ञान ।
जन्मतो जीव तो जाण । वासनात्मक ॥ ३४ ॥
ऐक्य जीवें[4] तो ब्रह्मांश । जेथें पिंडब्रह्मांडनिरास ।
येथें सांगितले विशेष । चत्वार जीव ॥ ३५ ॥

---

१ विद्याविनयसंपन्न ब्राह्मण, गाय, हत्ती, कुत्रें, चांडाळ या सर्वांच्या विषयीं पंडितांची समदृष्टि असते २ विकारात्मक शरीरांतील विकार करणारा ३ मुळांत प्रथम " जाणतो " शब्द असून त्यांतील 'ण' खोडल्यासारखा दिसत आहे. ४ ब्रह्माशीं ऐक्य पावलेला जीव.

असो हें अवघें चंचळ । चंचळ जाईल सकळ ।
निश्चळ तें निश्चळ । आदिअंतीं ॥ ३६ ॥
आद्य मध्य अवसान । जे वस्तु समसमान ।
निर्विकारी निर्गुण निरंजन । निःसंग निःप्रपंच ॥ ३७ ॥
उपाधीनिरासें तत्वता । जीवशिवास ऐक्यता ।
विवंचून पाहों जातां । उपाधि कैंची ॥ ३८ ॥
असो जाणणें तितुकें ज्ञान । परंतु होतें विज्ञान ।
मनें वोळखावें उन्मन । कोण्या प्रकारें ॥ ३९ ॥
वृत्तीस न कळे निवृत्ति । गुणास कैंची निर्गुणप्राप्ती ।
गुणातीत साधक संतीं । विवेकें केलें ॥ ४० ॥
श्रवणापरीस मनन सार । मननें कळे सारासार ।
निजध्यासें साक्षात्कार । निःसंग वस्तु ॥ ४१ ॥
निर्गुणीं जे अनन्यता । ते चि मुक्ति सायोज्यता ।
लक्ष्यांश वाच्यांश आतां । पुरे जाला ॥ ४२ ॥
अलक्षीं राहिलें लक्ष । सिद्धांतीं कैंचा पूर्वपक्ष ।
अप्रत्यक्षास कैंचें प्रत्येक्ष । असोन नाहीं ॥ ४३ ॥
असोन माईक उपाधी । ते चि सहजेंसमाधी ।
श्रवणें वळावी बुद्धी । निश्चयाची ॥ ४४ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सिद्धांतनिरूपण समास ॥ १ ॥

---

॥ श्रीराम ॥

येक निश्चळ येक चंचळ । चंचळीं गुंतलें सकळ ।
निश्चळ तें निश्चळ । जैसें तैसें ॥ १ ॥

---

१ विरालें. २ मनबुद्धीला अगोचर असें जें ब्रह्म त्याच्या ठिकाणीं चर्मचक्षूनें प्रत्यक्षता कशी येईल ? ३ परब्रह्माचा अनुभव असून तो नाहींसा झाला पाहिजे, म्हणजे तेथें द्वैत उरलें न पाहिजे ४ मायिक उपाधि असताना हि स्वरूपाकार वृत्ति राहणें याचें नांव सहजसमाधि.

पाहे निश्चळाचा विवेक । ऐसा लक्षांमधें येक ।
निश्चळाऐसा निश्चयात्मक । निश्चळ चि तो ॥ २ ॥
या निश्चळाच्या गोष्टी सांगती । पुन्हां चंचळाकडे धांवती ।
चंचळचक्रीं[१] निघोन जाती । ऐसे थोडे ॥ ३ ॥
चंचळीं चंचळ जन्मलें । चंचळा चि मधें वाढलें ।
अवघें चंचळ चि बिंबलें । जन्मवरी ॥ ४ ॥
पृथ्वी अवघी चंचळाकडे । करणें तितुकें चंचळीं घडे ।
चंचळ सांडून निश्चळीं पवाडे । ऐसा कैंचा ॥ ५ ॥
चंचळ कांहीं निश्चळेना । निश्चळ कदापी चळेना ।
नित्यानित्यविवेकें जना । उमजे कांहीं ॥ ६ ॥
कांहीं उमजलें तरी नुमजे । काहीं समजलें तरी न समजे ।
कांहीं बुझे तरी निर्बुजे । किंचित मात्र ॥ ७ ॥
संदेह अनुमान आणी भ्रम । अवघा चंचळामधें श्रम ।
निश्चळीं कदा नाहीं वर्म । समजलें पाहिजे ॥ ८ ॥
चंचळाकारी[२] तितुकी माया । माईक जाये विलया ।
लाहान थोर ह्मणावया । कार्य नाहीं ॥ ९ ॥
सगट माया विस्तारली । अष्टधा प्रकृति फांपावली ।
चित्रविचित्र विकारली । नाना रूपें ॥ १० ॥
नाना उत्पत्ती नाना विकार । नाना प्राणी लाहान थोर ।
नाना पदार्थ मकार[३] । नाना रूपें ॥ ११ ॥
विकारवंत विकारलें । सूक्ष्म जडत्वास आलें ।
अमर्याद दिसों लागलें । कांहींचाबाहीं ॥ १२ ॥
मग नाना शरीरें निर्माण जालीं । नाना नामाभिधानें ठेविलीं ।
भाषा परत्वें कळों आलीं । कांहीं कांहीं ॥ १३ ॥
मग नाना रीति नाना दंडक । आचार येकाहून येक ।
वर्तों लागले सकळ लोक । लोकाचारें ॥ १४ ॥

---

१ मायेच्या फेऱ्यांत जे सांपडत नाहींत. २ चंचळाकार. ३ मूळ प्रतींत "म" स्पष्ट आहे पण तो ' प्र ' ऐवजीं हस्तदोष असावा.

अष्टधा प्रकृतीचीं शरीरें । निर्माण जालीं लाहानथोरें ।
पुढें आपुलाल्या प्रकारें । वर्तों लागती ॥ १५ ॥

नाना मतें निर्माण जालीं । नाना पाषांडें वाढलीं ।
नाना प्रकारीचीं उठिलीं । नाना बडें ॥ १६ ॥

जैसा प्रवाहे[1] पडिला । तैसा च लोक चालिला ।
कोण वारील कोणाला । येक नाहीं ॥ १७ ॥

पृथ्वीचा जाला गळांठा । येकाहून येक मोठा ।
कोण खरा कोण खोटा । कोण जाणे ॥ १८ ॥

आचार बहुकचिंत[2] पडिला । कित्येक पोटासाठीं बुडाला ।
अवघा वरपग चि जाला । साभिमानें ॥ १९ ॥

देव जाले उदंड । देवाचें मांडलें भंड ।
भूतादेवतांचें थोतांड । येक चि जालें ॥ २० ॥

मुख्य देव तो कळेना । काशास काहीं च मिळेना ।
येकास येक वळेना । अनावर ॥ २१ ॥

ऐसा नासला विचार । कोण पाहातो सारासार ।
कैंचा लाहान कैंचा थोर । कळेचिना ॥ २२ ॥

शास्त्रांचा बाजार भरला । देवांचा गल्बला जाला ।
लोक कामनेच्या व्रताला । झोंबोन पडती ॥ २३ ॥

ऐसें अवघें नासलें । सत्यासत्य हारपलें ।
अवघें अनायेक[3] जालें । चहूकडे ॥ २४ ॥

मतामतांचा गल्बला । कोणी पुसेना कोणाला ।
जो जे मतीं सांपडला । तयास तें चि थोर ॥ २५ ॥

असत्याचा अभिमान । तेणें पाविजे पतन ।
ह्मणोनिया ज्ञाते जन । सत्य शोधिती ॥ २६ ॥

---

१ रूढि. २ बहुचकित, चावटपणाचा ३ निर्नायक.

लोक वर्तती सकळ । तें ज्ञात्यास करतळामळ ।
आतां ऐका केवळ । विवेकी हो ॥ २७ ॥
लोक कोण्या पंथें जाती । आणि कोण्या देवास भजती ।
ऐसी हे रोकडी प्रचिती । सावध ऐका ॥ २८ ॥
मृत्तिका धातु पाषाणादिक । ऐसिया प्रतिमा अनेक ।
बहुतेक लोकाचा दंडक । प्रतिमादेवीं ॥ २९ ॥
नाना देवांचे अवतार । चरित्रें ऐकती येक नर ।
जप ध्यान निरंतर । करिती पूजा ॥ ३० ॥
येक सकळांचा अंतरात्मा । विश्वीं वर्ते जो विश्वात्मा ।
द्रष्टा साक्षी ज्ञानात्मा । मानिती येक ॥ ३१ ॥
येक ते निर्मळ निश्चळ । कदापी नव्हेति चंचळ ।
अनन्यभावें केवळ । वस्तु च ते ॥ ३२ ॥
येक नाना प्रतिमा । दुसरा अवतारमहिमा ।
तिसरा तो अंतरात्मा । चौथा तो निर्विकारी ॥ ३३ ॥
ऐसे हे च्यार देव । सृष्टीमधील स्वभाव ।
यावेगळा अंतर्भाव । कोठें चि नाहीं ॥ ३४ ॥
अवघे येक चि मानिती । ते साक्ष देव जाणती ।
परंतु अष्टधा प्रकृति । वोळखिली पाहिजे ॥ ३५ ॥
प्रकृतीमधील[1] देव । तो प्रकृतीचा स्वभाव ।
भावातीत माहानभाव । विवेकें जाणावा ॥ ३६ ॥
जो निर्मळास ध्याईल । तो निर्मळ चि होईल ।
जो जयास भजेल । तो तद्रूप जाणावा ॥ ३७ ॥
क्षीर नीर निवडिती । ते राजहंस बोलिजेती ।
सारासार जाणती । ते माहानभाव ॥ ३८ ॥
अरे जो चंचळास ध्याईल । तो सहज चि चळेल ।
जो निश्चळास भजेल । तो निश्चळ चि ॥ ३९ ॥

---

१ मायेमधील.

प्रकृतीसारिखें चालावें । परी अंतरीं शाश्वत वोळखावें ।
सत्य होऊन वर्तावें । लोकांऐसें ॥ १० ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे चत्वारदेवनिरूपणनाम समास दुसरा ॥२॥

---

॥ श्रीराम ॥

बहुता जन्माचा सेवट । नरदेह सांपडे अवचट ।
येथें वर्तावें चोखट । नीतिन्यायें ॥ १ ॥
प्रपंच करावा नेमक । पाहावा परमार्थविवेक ।
जेणेंकरितां उभय लोक । संतुष्ट होती ॥ २ ॥
शत वरुषें वय नेमिलें । त्यांत बाळपण नेणतां गेलें ।
तारुण्य अवघें वेचलें । विषयांकडे ॥ ३ ॥
वृद्धपणीं नाना रोग । भोगणें लागे कर्मभोग ।
आतां भगवंताचा योग । कोणे वेळे ॥ ४ ॥
राजिकें[1] देविकें[2] उद्वेगें[3] चिंता । अन्न वस्त्र देहममता ।
नाना प्रसंगें अवचिता । जन्म गेला ॥ ५ ॥
लोक मरमरों जाती । वडिलें गेलीं हे प्रचिती ।
जाणत जाणत निश्चिती । काये मानिलें ॥ ६ ॥
अग्न गृहासी लागला । आणि सावकास निजेला ।
तो कैसा ह्मणावा भला । आत्महत्यारा ॥ ७ ॥
पुण्यमार्ग अवघा बुडाला । पापसंग्रह उदंड जाला ।
येमयातनेचा झोला । कठीण आहे ॥ ८ ॥
तरी आता ऐसें न करावें । बहुत विवेकें वर्तावें ।
इहलोक परत्र साधावें । दोहीकडे ॥ ९ ॥
आळसाचें फळ रोकडें । जांभया देऊन निद्रा पडे ।
सुख म्हणौन आवडे । आळसी लोकां ॥ १० ॥

---

१ राजकीय. २ दैविक. ३ उद्वेग.

साक्षेप करितां कष्टती । परतु पुढें सुखाडंती ।
खाती जेवितो सुखी होती । येत्नेंकरूनी ॥ ११ ॥
आळस उदास नागवणा । आळस प्रेत्नबुडवणा ।
आळसें करंटपणाच्या खुणा । प्रगट होती ॥ १२ ॥
ह्मणौन आळस नसावा । तरी च पाविजे वैभवा ।
अरत्रीं परत्रीं जीवा । समाधान ॥ १३ ॥
प्रेत्न करावा तो कोण । हें चि ऐका निरूपण ।
सावध करून अंतःकरण । निमिष्य येक ॥ १४ ॥
प्रातःकाळीं उठावें । कांहीं पाठांतर करावें ।
येथानशक्ति आठवावें । सर्वोत्तमासी ॥ १५ ॥
मग दिशेकडे जावें । जे कोणासि च नव्हे ठावें ।
शौच्य आच्मन करावें । निर्मळ जळें ॥ १६ ॥
मुखमार्जन प्रातःस्नान । संध्या तर्पण देवतार्चन ।
पुढें वैश्यदेवउपासन । येथासांग ॥ १७ ॥
कांहीं फळाहार घ्यावा । मग संसारधंदा करावा ।
सुशब्दें राजी राखावा । सकळ लोक ॥ १८ ॥
ज्या ज्याचा जो व्यापार । तेथें असावें खबर्दार ।
दुश्चितपणें तरी पोर । वेढा लावी ॥ १९ ॥
चुके ठके विसरे सांडी । आठवण जालियां चर्फडी ।
दुश्चीत आळसाची रोकडी । प्रचित पाहा ॥ २० ॥
याकारणें सावधान । येकाग्र असावें मन ।
तरी मग जेवितां भोजन । गोड वाटे ॥ २१ ॥
पुढें भोजन जालियांवरी । कांहीं वाची चर्चा करी ।
येकांतीं जाऊन विवरी । नाना ग्रंथ ॥ २२ ॥
तरी च प्राणी शाहाणा होतो । नाहींतरी मूर्ख चि राहातो ।
लोक खाती आपण पाहातो । दैन्यवाणा ॥ २३ ॥

---

१ सुखी होती. २ श्रीरामास. ३ वैश्वदेव. ४ फसवी.

ऐक सदेवपणाचें लक्षण । रिकामा जाऊं नेदी येक क्षण ।
प्रपंचवेवसायाचें ज्ञान । बरें पाहे ॥ २४ ॥
कांहीं मेळवी मग जेवी । गुंतल्या लोकांस उगवी ।
शरीर कारणीं लावी । कांहीं तरी ॥ २५ ॥
कांहीं धर्मचर्चा पुराण । हरिकथा निरूपण ।
वायां जाऊं नेदी क्षण । दोहींकडे ॥ २६ ॥
ऐसा जो सर्वसावध । त्यास कैंचा असेल खेद ।
विवेकें तुटला समंध । देहबुद्धीचा ॥ २७ ॥
आहे तितुकें देवाचें । ऐसें वर्तणें निश्चयाचें ।
मूळ तुटे उद्वेगाचें । येणें रीतीं ॥ २८ ॥
प्रपंचीं पाहिजे सुवर्ण । परमार्थी पंचिकर्ण ।
माहावाक्याचें विवरण । करितां सुटे ॥ २९ ॥
कर्म उपासना आणि ज्ञान । येणें राहे समाधान ।
परमार्थाचें जें साधन । तें चि ऐकत जावें ॥ ३० ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सिकवणनिरूपणनाम समास तिसरा ॥३॥

---

॥ श्रीराम ॥

ब्रह्म ह्मणिजे निराकार । गगनासारिखा विचार ।
विकार नाहीं निर्विकार । तें चि ब्रह्म ॥ १ ॥
ब्रह्म ह्मणिजे निश्चळ । अंतरात्मा तो चंचळ ।
द्रष्टा साक्षी केवळ । बोलिजे तया ॥ २ ॥
तो अंतरात्मा ह्मणिजे देव । त्याचा चंचळ स्वभाव ।
पाळिताहे सकळ जीव । अंतरीं बसोनी ॥ ३ ॥
त्यावेगळे जड पदार्थ । तेणेंवीण देह वेर्थ ।
तेणें चि कळे परमार्थ । सकळ कांहीं ॥ ४ ॥
कर्ममार्ग उपासनामार्ग । ज्ञानमार्ग सिद्धांतमार्ग ।
प्रवृत्तिमार्ग निवृत्तिमार्ग । देव चि चाळवी ॥ ५ ॥

चंचळेविण निश्चळ कळेना । चंचळ तरी स्थिरावेना ।
ऐसे हे विचार नाना । बरे पाहा ॥ ६ ॥
चंचळनिश्चळाची संधी । तेथें भांबावते बुद्धि[1] ।
कर्ममार्गाची जे विधी । ते मग ऐलिकडे[2] ॥ ७ ॥
देव या सकळांचें मूळ । देवास मूळ ना ढाळ[3] ।
परब्रह्म तें निश्चळ । निर्विकारी ॥ ८ ॥
निर्विकारी आणि विकारी । येक ह्मणेल तो भिकारी ।
विचाराची होते वारी[4] । देखतदेखतां ॥ ९ ॥
सकळ परमार्थास मूळ । पंचीकर्ण माहावाक्य केवळ ।
तें चि करावें प्रांजळ । पुनःपुन्हां ॥ १० ॥
पहिला देह स्थूळकाया । आठवा देह मूळमाया ।
अष्ट देह निर्शल्यियां । विकार कैंचा ॥ ११ ॥
याकारणें विकारी । साचाऐसी बाजीगरी ।
येक समजे येक खरी । मानिताहे ॥ १२ ॥
उत्पत्ति स्थिती संव्हार । यावेगळा निर्विकार ।
कळायासाठीं सारासार । विचार केला ॥ १३ ॥
सार असार दोनी येक । तेथें कैंचा उरला विवेक ।
परीक्षा नेणती रंक । पापी करंटे ॥ १४ ॥
जो येक चि विस्तारला । तो अंतरात्मा बोलिला ।
नानां विकारीं विकारला । निर्विकारी नव्हे ॥ १५ ॥
ऐसें प्रगट चि आहे । आपुल्या प्रत्ययें पाहें ।
काय राहे काय न राहे[5] । हें कळेना ॥ १६ ॥

---

१ चंचळ असा अंतरात्मा व निश्चळ असें ब्रह्म याचा जो संधि ती माया; त्या मायेच्या योगानें बुद्धीला उमज पडत नाहीं. २ कर्ममार्गादि मार्ग मायेनंतर मनुष्यास लागले आहेत. ३ ढाळ, फांदी देवास शेंडा नाही व बुडुख नाहीं. ४ वारी=वारण=निवारण. विचार नष्ट होतो. ५ काय शाश्वत आहे व काय अशाश्वत आहे हें कळेना.

जें अखड होत जातें । जें सर्वदा संव्हारतें ।
रोकडें प्रचितीस येतें । जनामधें ॥ १७ ॥
येक रडे येक चर्फडी । येकांची धरी नरडी ।
येकमेकां झोंबती बेराडी[1] । दुकळ्ले[2] जैसे ॥ १८ ॥
नाहीं न्याये नाहीं नीति । ऐसे हे लोक वर्तती ।
आणि अवघें च सार ह्मणती । विवेकहीन ॥ १९ ॥
धोंडे सांडून सोनें घ्यावें । माती सांडून अन्न खावें ।
आणि आवघें चि सार ह्मणावें । बाष्कळपणें ॥ २० ॥
ह्मणौनि हा विचार करावा । सत्यमार्ग तो चि धरावा ।
लाभ जाणोन घ्यावा । विवेकाचा ॥ २१ ॥
सारगारें[3] येक चि सरी । तेथें परीक्षेस कैंची उरी ।
याकारणें चतुरीं । परीक्षा करावी ॥ २२ ॥
जेथें परीक्षेचा अभाव । तेथें दे घाव घे घाव ।
सगट सारिखा स्वभाव । लौंदपणाचा[4] ॥ २३ ॥
घेवें ये[5] तें चि घ्यावें । घेव न ये तें सांडावें ।
उंच नीच वोळखावें । त्या नाव ज्ञान ॥ २४ ॥
संसारसांतेसीं[6] आले । येक लाभें अभर जाले ।
येक ते करंटे ठकले । मुदल गेलें ॥ २५ ॥
जाणत्यानें ऐसें न करावें । सार तें चि शोधून घ्यावें ।
असार तें जाणोन त्यागावें । वमक जैसें ॥ २६ ॥
तें वमक करी प्राशन । तरी तें स्वानाचें लक्षण ।
तेथें सुचिस्मत ब्राह्मण । काय करी ॥ २७ ॥

---

१ आशाळभूत. २ दुकळलेले. ३ पाण्याची गार क्षणिक असते ह्मणून गार या शब्दानें असार असा अर्थ घ्यावयाचा सारगार=सार+असार. ४ लौंद=गलेलठ्ठ, खुशालचंद. लौंदपणाचा=मूर्खपणाचा. ५ घेव ये=घेऊं ये=घेण्यासारखें. ६ सात=सांथ=भरभराट=जेथें व्यापाराची भरभराट चालते असें ठिकाण=बाजारपेठ नरदेह हें मुद्दल घेऊन संसाराच्या बाजाराला लोक येतात, त्यापैकीं कित्येक नरदेहाचा चांगला उपयोग करून अभर ह्मणजे श्रीमंत होतात व कित्येक दुरुपयोग करून मुद्दल दवडून बसतात

जेहिं जैसें संचित केलें । तयास तैसें चि घडलें ।
जें अभ्यासीं पडोन जडलें । तें तों सुटेना ॥ २८ ॥
येक दिव्यान्नें भक्षिती । येक विष्ठा सावडिती ।
आपल्या वडिलांचा घेती । साभिमान ॥ २९ ॥
असो विवेकेंविण । बोलणें तितुका सीण ।
कोणीयेकें श्रवण मनन । केलें चि करावें ॥ ३० ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सारविवेकनिरूपणनाम समास चतुर्थ ॥४॥

---

॥ श्रीराम ॥

कर्म केलें चि करावें । ध्यान धरिलें चि धरावें ।
विवरलें चि विवरावें । पुन्हा निरूपण ॥ १ ॥
तैसें आह्मांस घडलें । बोलिलें चि बोलणें पडिलें
कां जें विघडलें चि घडलें । पाहिजे समाधान ॥ २ ॥
अनन्य राहे समुदाव । इतर जनास उपजे भाव
ऐसा आहे अभिप्राव । उपायाचा ॥ ३ ॥
मुख्य हरिकथा निरूपण । दुसरें तें राजकारण ।
तिसरें तें सावधपण । सर्वविषईं ॥ ४ ॥
चौथा अत्यंत साक्षप । फेडावे नाना आक्षप ।
अन्याये थोर अथवा अल्प । क्षमा करीत जावे । ५ ॥
जाणावें पराचें अंतर । उदासीनता निरंतर ।
नीतिन्यायासि अंतर । पडों च नेदावें ॥ ६ ॥
संकेतें लोक वेधावा । येकूनयेक बोधावा ।
प्रपंच हि सावरावा । येथानशक्त्या ॥ ७ ॥
प्रपंचसमयो वोळखावा । धीर बहुत असावा ।
संमंध पडों नेदावा । अति परी तयाचा[१] ॥ ८ ॥

---

१ अतिपरिचयाचा, किंवा, परी तयाचा ( प्रपंचाचा ) अति संबंध पडों नेदावा.

उपाधीसी विस्तारावें । उपाधींत न संपडावें ।
नीचत्व पहिलें च घ्यावें । आणि मूर्खपण ॥ ९ ॥
दोष देखोन झाकावे । अवगुण अखंड न बोलावे ।
दुर्जन सांपडोन सोडावे । परोपकार करूनी ॥ १० ॥
तऱ्हे भरों च नये । सुचावे नाना उपाये ।
नव्हे तें चि करावें कार्ये । दीर्घ प्रेत्नें ॥ ११ ॥
फड नासों चि नेदावा । पडिला प्रसंग सांवरावा ।
अतिवाद न करावा । कोणीयेकासी ॥ १२ ॥
दुसऱ्याचें अभिष्ट जाणावें । बहुतांचें बहुत सोसावें[1] ।
न सोसे तरी जावें । दिगांतराप्रती ॥ १३ ॥
दुःख दुसऱ्याचें जाणावें । ऐकोन तरी वांटून घ्यावें ।
बरें वाईट सोसावें । समुदायाचें ॥ १४ ॥
अपार असावें पाठांतर । सन्निध चि असावा विचार ।
सदा सर्वदा तत्पर । परोपकारासी ॥ १५ ॥
शांती करून करवावी । तऱ्हे सांडून सांडवावी ।
क्रिया करून करवावी । बहुतांकरवीं ॥ १६ ॥
करणें असेल अपाये । तरी बोलोन दाखऊं नये ।
परस्परें चि प्रत्यये । प्रचितीस आणावा ॥ १७ ॥
जो बहुतांचें सोसीना । त्यास बहुत लोक मिळेना ।
बहुत सोसितां उरेना । महत्व आपुलें ॥ १८ ॥
राजकारण बहुत करावें । परंतु कळों च नेदावें ।
परपीडेवरी नसावें । अंतःकरण ॥ १९ ॥
लोक पारखून सांडावे । राजकारणें अभिमान झाडावे ।
पुन्हा मेळऊन घ्यावें । दुरील दोरे ॥ २० ॥

---

१ बहुतांचें सोसावें ह्मणजे लोक मिळतात हें खरें परंतु फार च सहनशीलता दाखविली तर तिकडून हि आपलें महत्व कमी होण्याचा संभव असतो; सारांश प्रसंग पाहून वागावें.

हिरवटासी दुरी धरावें । कचरटासीं न बोलावें ।
समंध पडतां सोडून जावें । येकीकडे ॥ २१ ॥
ऐसें असो राजकारण [1]। सांगतां तें असाधारण ।
सुचित अस्तां अंतःकरण । राजकारण जाणे ॥ २२ ॥
वृक्षीं रूढासी उचलावें । युध्यकर्त्यांस ढकलून द्यावें ।
कारबाराचें सांगावें । आंग कैसें ॥ २३ ॥
पाहातां तरी सांपडेना । कीर्ति करूं तरी राहेना ।
आलें वैभव अभिळासीना । कांहीं केल्यां ॥ २४ ॥
येकांची पाठी राखणें । येकांस देखों न सकणें ।
ऐसीं नव्हेत कीं लक्षणें । चातुर्याचीं ॥ २५ ॥
न्याय बोलता हि मानेना । हित तें चि न ये मना ।
येथें कांहीं च चालेना । त्यागेंविण ॥ २६ ॥
श्रोतीं काळोन आक्षेपिलें । ह्मणौन बोलिलें चि बोलिलें ।
न्यूनपूर्ण क्षमा केलें । पाहिजे श्रोतीं ॥ २७ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे राजकारणनिरूपणनाम समास पांचवा ॥५

---

॥ श्रीराम ॥

शुद्ध नेटकें ल्याहावें । लेहोन शुद्ध शोधावें ।
शोधून शुद्ध वाचावें । चुकों नये ॥ १ ॥
विस्कळित मात्रुका नेमस्त कराव्या । धाट्या[3] जाणोन सदृढ धराव्या ।
रंग राखोन भराव्या । नाना कथा ॥ २ ॥
जाणायाचें सांगतां न ये । सांगायाचें नेमस्तें न ये ।
समजल्याविण कांहीं च न ये । कोणीयेक ॥ ३ ॥

---

१ भीतीनें झाडावर चढले असतील त्यांना उचलून धरावें ह्मणजे त्याचा गौरव करावा व युद्धकर्ते जे असतील त्याना ढकलून द्यावें ह्मणजे त्यांचा आपण तिरस्कार करतों असें दाखवावें २ कीर्ति व्हावयास लागली तर हा तेथें राहत नाहीं, किंवा कीर्ति केल्याशिवाय राहत नाहीं. ३ धाटण्या, प्रकार ४ थोडक्यांत पण निश्चयेंकरून

हरिकथा निरूपण । नेमस्तपणें राजकारण ।
वर्तायाचें लक्षण । तें हि असावें ॥ ४ ॥
पुसों जाणे सांगों जाणे । अर्थांतर करूं जाणे ।
सकळिकांचें राखों जाणे । समाधान ॥ ५ ॥
दीर्घ सूचना आधीं कळे । सावधपणें तर्क प्रबळे ।
जाणजाणोनि निवळे । येथायोग्य ॥ ६ ॥
ऐसा जाणे जो समस्त । तो चि महत बुद्धिवंत ।
यावेगळें अतवत । सकळ कांहीं ॥ ७ ॥
ताळवेळ तानमानें । प्रबंद कविता जाड वचनें ।
मज्यालसी नाना चिन्हें । सुचती जया ॥ ८ ॥
जो येकांतास तत्पर । आधीं करी पाठांतर ।
अथवा शोधी अर्थांतर । ग्रथगर्भाचें ॥ ९ ॥
आधीं च सिकोन जो सिकवी । तो चि पावे श्रेष्ठ पदवी
गुंतल्या लोकांस उगवी । विवेकबळें ॥ १० ॥
अक्षर सुंदर वाचणें सुंदर । बोलणें सुंदर चालणें सुंदर
भक्ति ज्ञान वैराग्य सुंदर । करून दावी ॥ ११ ॥
जयास येत्न चि आवडे । नाना प्रसंगीं पेवाडे ।
धीटपणें प्रगटे दडे । ऐसा नव्हे ॥ १२ ॥
साकडींमधें वर्तों जाणे । उपाधीमधें मिळों जाणे ।
अलिप्तपणें राखों जाणे । आपणासी ॥ १३ ॥
आहे तरी सर्वां ठाईं । पाहों जाता कोठें चि नाहीं ।
जैसा अंतरात्मा ठाईंचा ठाईं । गुप्त जाला ॥ १४ ॥
त्यावेगळें काहीं च नसे । पाहों जातां तो न दिसे ।
न दिसोन वर्तवीतसे । प्राणिमात्रांसी ॥ १५ ॥

---

१ मजालस=सभा. मज्यालसी चिन्हें=सभाधीटपणाचीं लक्षणं, सभेस जें लागतें तें २ पवाडणें = झिरपणें [illegible]

तैसा च हा हि नानापरी । बहुत जनास शाहाणे करी ।
नाना विद्या त्या विवरी । स्थूळ सूक्ष्मा ॥ १६ ॥
आपणाकरितां शाहाणे होती । ते सहज चि सोये धरिती ।
जाणतेपणाची महती । ऐसी असे ॥ १७ ॥
राखों जाणे नीतिन्याय । न करी न करवी अन्याये ।
कठीण प्रसगीं उपाये । करूं जाणे ॥ १८ ॥
ऐसा पुरुष धारणेचा । तो चि आधार बहुताचा ।
दास ह्मणे रघुनाथाचा । गुण घ्यावा ॥ १९ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे महतलक्षणनाम समास साहवा ॥ ६ ॥

॥ श्रीराम ॥

चंचळ[1] नदी गुप्त[2] गंगा । स्मरणें पावन करी जगा ।
प्रचित रोकडी पाहा गा । अन्यथा नव्हे ॥ १ ॥
केवळ ऐचवळीं[3] निर्माण जाली । अधोमुखें वळें चालिली ।
अखड वाहे परी देखिली । नाहीं च कोणीं ॥ २ ॥
वळणें वांकाणें भोवरे । उकळ्या तरंग झरे ।
लोंढा लाटा कातरे । ठाईं ठाईं ॥ ३ ॥
शुष्क जळाचे चळाळ । धारा धबाबे खळाळ ।
चिपळ्या चळक्या भळाळ । चपळ पाणी ॥ ४ ॥
फेणें फुगे हेलावे । सैरावैरा उदक धावे ।
थेंब फुंई मोजावे । अणुरेणु किती ॥ ५ ॥

---

१ येकदा चचळ नदी गुप्तगगा । पुसतां याचा जी अर्थ सागा । जाणीव तुर्यामूळ ते उमगा । अर्थ परमार्थ अवघा ते ॥ दासविश्रामधाम १२१–८२. २ माया ही नदीप्रमाणें चचळ असून फल्गु वगैरे नद्याप्रमाणें गुप्त आहे. ३ ब्रह्म व पर्वत. माया ब्रह्माच्या ठिकाणीं, जशी नदी पर्वताच्या ठिकाणीं. ४ आपटणें. ५ खडकाच्या योगानें पाणी कातरणें. ६ फेन, फेंस ७ तुषार.

वोसांणे[१] वाहाती उदंड । झोतांवे[२] ढेंकुटे[३] दगड ।
खडकें बेटें आड । वळसा[४] उठे ॥ ६ ॥
मृद भूमी तुटोन गेल्या । कठीण तैश्या चि राहिल्या ।
ठाईं ठाईं उदड पाहिल्या । सृष्टीमधें ॥ ७ ॥
येक ते वाहत चि गेले । येक वळशामधें पडिले ।
येक सांकडींत आडकले । अधोमुख ॥ ८ ॥
येक आपटआपटों च गेलीं । येक चिरडचिडों च मेलीं ।
कितीयेक तें फुगलीं । पाणी भरलें ॥ ९ ॥
येक बळाचे निवडले । ते पोहत चि उगमास गेले ।
उगमदर्शनें पवित्र जाले । तीर्थरूप ॥ १० ॥
तेथें ब्रह्मादिकाचीं भुवनें । ब्रह्मांडदेवताचीं स्थानें ।
उफराटी[६] गंगा पाहातां मिळणें । सकळांस तेथें ॥ ११ ॥
त्या जळाऐसें नाहीं निर्मळ । त्या जळाऐसें नाहीं चंचळ ।
आपोनारायण केवळ । बोलिजे त्यासी ॥ १२ ॥
माहानदी परी अंतराळीं । प्रत्यक्ष वाहे सर्वकाळीं ।
स्वर्गमृत्यपाताळीं । पसरली पाहा ॥ १३ ॥
अधोर्ध[७] अष्ट हि दिशा । तिचें उदक करी वळसा ।
जाणते जाणती जगदीशा । सारिखी च ते ॥ १४ ॥
अनंत पात्रीं उदक भरलें । कोठें पाझपाझरों च गेलें ।
कितीयेक तें वेचलें । संसारासी ॥ १५ ॥
येक्यासंगें तें कडवट । येक्यासंगें तें गुळचट ।
येक्यासंगें तें तिखट । तुरट क्षार ॥ १६ ॥

---

१ पुरामधून वाहात येणारा केरकचरा २ उंचावरून पाणी पडणें ३ लहान धोंडे ४ भोंवरा. ५ ब्रह्माकडे ६ प्रवाहाच्या उलट उगमाकडे पोहत गेल्यास ७ अधोर्ध्व. खालीं वर ८ एकंदर मनुष्यें हीं भाडीं आहेत व तीं मायानदीच्या पाण्यानें भरलेलीं आहेत कोणाचें पाणी पाझरून जातें, ( जशी साधूच्या ठिकाणची माया ) व कोणाचें पाणी संसाराकडे खर्च होतें ( जशी बद्धाच्या ठिकाणची माया ).

ज्या ज्या पदार्थास मिळे । तेथें तद्रूप चि मिसळे ।
सखोल भूमीस तुबळे । सखोलपणें ॥ १७ ॥
विषामधें विष चि होतें । अमृतामधें मिळोन जातें ।
सुगंधीं सुगंध तें । दुर्गंधीं दुर्गंध ॥ १८ ॥
गुणीं अवगुणीं मिळे । ज्याचें त्यापरी निवळे ।
त्या उदकाचा महिमा न कळे । उदकेंविण ॥ १९ ॥
उदक वाहे अपरांपर । न कळे नदी कीं सरोवर ।
जळवास करून नर । राहिले कितीयेक ॥ २० ॥
उगमापैलिकडे गेले । तेथें परतोन पाहिलें ।
तंव तें पाणी च आटलें । कांहीं नाहीं ॥ २१ ॥
वृत्तिसुन्य योगेश्वर । याचा पाहावा विचार ।
दास ह्मणे वारंवार । किती सांगों ॥ २२ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे चंचळनदीनिरूपणनाम समास सातवा ॥७

---

॥ श्रीराम ॥

आधीं वंदूं सकळकर्ता । समस्त देवांचा जो भर्ता ।
त्याचे भजनीं प्रवर्ता । कोणीतरी ॥ १ ॥
तेणेंविण कार्य न चले । पडिलें पर्ण तें हि न हाले ।
अवघें त्रैलोक्ये चि चाले । जयाचेनी ॥ २ ॥
तो अंतरात्मा सकळांचा । देवदानवमानवांचा ।
चत्वारखाणीचत्वारवाणीचा । प्रवर्तकु ॥ ३ ॥
तो येकला चि सकळां घटीं । करी भिन्नभिन्ना राहाटी ।
सकळ सृष्टीची गोष्टी । किती ह्मणौन सांगावी ॥ ४ ॥
ऐसा जो गुप्तेश्वर । त्यास ह्मणावें ईश्वर ।
सकळ ऐश्वर्य थोर थोर । जयाचेनि भोगिती ॥ ५ ॥
ऐसा जेणें वोळखिला । तो विश्वंभर चि जाला ।
समाधी सहजस्थितीला । कोण पुसे ॥ ६ ॥

अवघें त्रैलोक्य विवरावें । तेव्हां वर्म पडेल ठावें ।
आवचटें घबाड सिणावें । नलगे चि कांहीं ॥ ७ ॥
पाहातां ऐसा कोण आहे । जो अंतरात्मा विवरोन पाहे ।
अल्प स्वल्प कळोन राहे । समाधानें ॥ ८ ॥
आरे हें पाहिलें च पाहावें । विवरलें चि मागुतें विवरावें ।
वाचिलें चि वाचावें । पुन्हपुन्हा ॥ ९ ॥
अंतरात्मा केवढा कैसा । पाहाणाराची कोण दशा ।
देखिल्या ऐकिल्या ऐसा । विवेक सांगे ॥ १० ॥
उदड ऐकिलें देखिलें । अंतरात्म्यास नवचे पुरवलें ।
प्राणी देहधारी बाउलें । काये जाणे ॥ ११ ॥
पूर्णास अपूर्ण पुरेना । कां जें अखंड विवरेना ।
विवरतां विवरतां उरेना । देवावेगळा ॥ १२ ॥
विभक्तपणें नसावें । तरी च भक्त ह्मणवावें ।
नाहींतरी वेर्थ चि सिणावें । खटाटोपें ॥ १३ ॥
उगा च घर पाहोन गेला । घरधनी नाहीं वोळखिला ।
राज्यामधून चि आला । परी राजा नेणे ॥ १४ ॥
देहसगें विषये भोगिले । देहसंगें प्राणी मिरवले ।
देहधर्त्यास चुकलें । नवल मोठें ॥ १५ ॥
ऐसे लोक अविवेकी । आणि ह्मणती आम्ही विवेकी ।
बरें ज्याची जैसी टोकी । तैसें करावें ॥ १६ ॥
मूर्ख अंतर राखों नेणे । ह्मणौन असावें शाहाणे ।
ते शाहाणे हि दैन्यवाणे । होऊन गेले ॥ १७ ॥
अक्षरीं ठेवणें चुकलें । दारोदारीं धुंडूं लागलें ।
तैसें अज्ञानास जालें । देव न कळे ॥ १८ ॥

---

१ अपूर्ण ( चंचल ) असे जे आपण, त्या आपणास पूर्ण ( निश्चल ) जें परब्रह्म त्याचें ज्ञान होत नाहीं, कारण अखंड विवरण नाहीं २ दंडक, रीति,

या देवाचें ध्यान करी । ऐसा कोण सृष्टीवरी ।
वृत्ती येकदेसी तर्तरी । पवाडेल कोठें ॥ १९ ॥
ब्रह्मांडीं दाटले प्राणी । बहुरूपें बहुवाणी ।
भूगर्भीं आणि पाषाणीं । कितीयेक ॥ २० ॥
इतुके ठाईं पुरवला । अनेकीं येक चि वर्तला ।
गुप्त आणि प्रगटला । कितीयेक ॥ २१ ॥
चंचळें न होईजे निश्चळ । प्रचित जाणावी केवळ ।
चंचळ तें नव्हे निश्चळ । परब्रह्म तें ॥ २२ ॥
तत्वें तत्व जेव्हां उडे । तेव्हां देहबुद्धि झडे ।
निर्मळ निश्चळ चहुंकडे । निरंजन ॥ २३ ॥
आपण कोण कोठें कैंचा । ऐसा मार्ग विवेकाचा ।
प्राणी जो स्वयें काचा । त्यास हें कळेना ॥ २४ ॥
भल्यानें विवेक धरावा । दुस्तर संसार तरावा ।
अवघा वंश चि उधरावा । हरिभक्ती करूनी ॥ २५ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे अंतरात्माविवरण समास अष्टम ॥ ८ ॥

॥ श्रीराम ॥

आधीं कर्माचा प्रसंग । कर्म केलें पाहिजे सांग ।
कदाचित पडिलें व्यंग । तरी प्रत्यवाय घडे ॥ १ ॥
ह्मणौन कर्म आरंभिलें । कांहींयेक सांग घडलें ।
जेथजेथें अंतर पडिलें । तेथें हरिस्मरण करावें ॥ २ ॥
तरी तो हरी आहे कैसा । विचार पाहावा ऐसा ।
संधेपूर्वीं जगदीशा । चोविसां नामीं स्मरावें ॥ ३ ॥
चोविसनामी सहस्रनामी । अनंतनामी तो अनामी ।
तो कैसा आहे अंतर्यामीं । विवेकें वोळखावा ॥ ४ ॥
ब्राह्मण स्नानसंध्या करून आला । मग तो देवार्चनास बैसला ।
येथासांग तो पूजिला । प्रतिमादेवो ॥ ५ ॥

नाना देवांच्या नाना प्रतिमा । लोक पूजिती धरून प्रेमा ।
ज्याच्या प्रतिमा तो परमात्मा । कैसा आहे ॥ ६ ॥
ऐसें वोळखिलें पाहिजे । वोळखोन भजन कीजे ।
जैसा साहेब नमस्कारिजे । वोळखिल्याउपरी ॥ ७ ॥
तैसा परमात्मा परमेश्वर । बरा वोळखावा पाहोन विचार ।
तरी च पाविजे पार । भ्रमसागराचा[1] ॥ ८ ॥
पूजा घेताती प्रतिमा । आगा येतो अंतरात्मा ।
अवतारी तरी निजधामा । येऊन गेले ॥ ९ ॥
परी ते निजरूपें असती । तें निजरूप ते जगज्जोती ।
सत्वगुण तयेस ह्मणती । जाणती कळा ॥ १० ॥
तये कळेचे पोटीं । देव असती कोट्यान्कोटी ।
या अनुभवाच्या गोष्टी । प्रत्ययें पाहाव्या ॥ ११ ॥
देहपुरामधें ईश । ह्मणोन तया नाव पुरुष ।
जगामधें जगदीश । तैसा वोळखावा ॥ १२ ॥
जाणीवरूपें जगदांतरें । प्रस्तुत वर्तती शरीरें ।
अंतःकरणविष्णु येणें प्रकारें । वोळखावा ॥ १३ ॥
तो विष्णु आहे जगदांतरीं । तो चि आपुले अंतरीं ।
कर्ता भोक्ता चतुरीं । अंतरात्मा वोळखावा ॥ १४ ॥
ऐके देखे हुंगे चाखे । जाणोन विचारें वोळखे ।
कित्येक आपुले पारिखे । जाणताहे ॥ १५ ॥
येक चि जगाचा जिव्हाळा[2] । परी देहलोभाचा आडताळा[3] ।
देहसमर्थे वेगळा । अभिमान धरी ॥ १६ ॥
उघजे वाढे मरे मारी । जैशा उचलती लहरीवरी लहरी ।
चचळ सागरीं भरोवेरीं[4] । त्रैलोक्य होत जातें[5] ॥ १७ ॥

---

१ भव हा भ्रम च आहे, तेव्हां भ्रमसागर आणि भवसागर एक च २ जीवनकळा, अंतःकरण ३ अडथळा. ४ भरोभरी, पुष्कळ ५ जशा चंचल सागरामध्यें लाटावर लाटा निरनिराळ्या उसळतात, तसे मायासमुद्रामध्यें प्राणी असंख्य होतात आणि जातात

त्रैलोक्य वर्तवितो येक । ह्मणौन त्रैलोक्यनायेक ।
ऐसा प्रत्ययाचा विवेक । पाहाना कैसा ॥ १८ ॥
ऐसा अंतरात्मा बोलिला । परी तो हि तत्वामधें आला ।
पुढें विचार पाहिजे केला । माहावाक्याचा ॥ १९ ॥
आधीं देखिला देहधारी । मग पाहावें जगदांतरीं ।
तयाचेनियां उपरी । परब्रह्म पावे ॥ २० ॥
परब्रह्माचा विचार । होतां निवडे सारासार ।
चंचळ जाईल हा निर्धार । चुकेना कीं ॥ २१ ॥
उत्पत्ति स्थिति सव्हार जाण । त्याहून वेगळा निरजन ।
येथें ज्ञानाचें विज्ञान । होत आहे ॥ २२ ॥
अष्टदेह थानमान । जाणोन ज़ालियां निर्शन ।
पुढें उरे निरजन । विमळ ब्रह्म ॥ २३ ॥
विचारें चि अनन्य जाला । पाहोणाराविण प्रत्यय आला[१] ।
ते हि वृत्ति निवृत्तीला । बरें पाहा ॥ २४ ॥
येथें राहिला वाच्यांश । पाहोन सांडिला लक्ष्यांश ।
लक्ष्यांशासारिसा वृत्तिलेश । तो हि गेला ॥ २५ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे उपदेशनाम समास नवम ॥ ९ ॥

---

॥ श्रीराम ॥

मूर्ख येकदेसी होतो । चतुर सर्वत्र पाहातो ।
जैसा बहुधा होऊन भोगितो । नाना सुखें ॥ १ ॥
तो चि अतरात्मा महंत । तो का होईल सकोचित ।
प्रशस्त जाणता समस्त । विख्यात योगी ॥ २ ॥
कर्ता भोक्ता तत्वता । भूमंडळीं सर्व सत्ता ।
त्यावेगळा त्यास ज्ञाता । पाहेसा कवणु ॥ ३ ॥

---

१ परब्रह्माचा प्रत्यय आला ह्मणजे तो ज्याला आला तो पाहणारा वेगळा उरत नाहीं. २ प्रत्यय आला असें ह्मणणें ही देखील वृत्ति च होय.

ऐसें महंतें असावें । सर्व सार शोधून घ्यावें ।
पाहों जातां न सपडावें । येकायेकी ॥ ४ ॥
कीर्तिरूपें उदंड ख्यात । जाणती लाहान थोर समस्त ।
वेश पाहातां शाश्वत । येक हि नाहीं ॥ ५ ॥
प्रगट कीर्ति ते ढळेना । बहुत जनास कळेना ।
पाहों जातां आडळेना । काये कैसें ॥ ६ ॥
वेषभूषण तें दूषण । कीर्तिभूषण तें भूषण ।
चाळणेविण येक क्षण । जाऊं च नेदी ॥ ७ ॥
त्यागी वोळखीचे जन । सर्वकाळ नित्य नूतन ।
लोक शोधून पाहाती मन । परी इच्छा दिसेना ॥ ८ ॥
पुर्तें कोणाकडे पाहेना । पुर्तें कोणासीं बोलेना ।
पुर्तें येके स्थळीं राहेना । उठोन जातो ॥ ९ ॥
जातें स्थळ तें सांगेना । सांगितलें तेथें तरी जायेना ।
आपुली स्थिती अनुमाना । येवों च नेदी ॥ १० ॥
लोकीं केलें तें चुकावी । लोकीं भाविलें तें उलथवी ।
लोकीं तर्किलें तें दावी । निर्फळ करूनी ॥ ११ ॥
लोकांस पाह्याचा आदर । तेथें याचा अनादर ।
लोक सर्वकाळ तत्पर । तेथें याची अनिछ्या ॥ १२ ॥
एव कल्पितां कल्पेना । ना तर्कितां हि तर्केना ।
कदापी भावितां भावेना । योगेश्वर ॥ १३ ॥
ऐसें अंतर सांपडेना । शरीर ठाईं पडेना ।
क्षणयेक विश्रमेना । कथाकीर्तन ॥ १४ ॥
लोक संकल्प विकल्प करिती । ते अवघे चि निर्फळ होती ।
जनाची जना लाजवी वृत्ति । तेव्हां योगेश्वर ॥ १५ ॥

---

१ लोकांनीं याच्या संबंधानें तर्क कुतर्क करावे, ते परभारें च खरे खोटे ठरावे व तेणेंकरून लोकांना, केलेल्या तर्ककुतर्कांबद्दल, लाज उत्पन्न व्हावी, असें योगेश्वरानें वागावें.

बहुतीं शोधून पाहिलें । बहुतांच्या मनास आलें ।
तरी मग जाणावें साधिलें । महत्कृत्य ॥ १६ ॥
अखंड येकात सेवावा । अभ्यास चि करीत जावा ।
काळ सार्थक चि करावा । जनासहित ॥ १७ ॥
उत्तम गुण तितुके घ्यावे । घेऊन जनास सिकवावे ।
उदंड समुदाये करावे । परी गुप्तरूपें ॥ १८ ॥
अखंड कामाची लगबग । उपासनेस लावावें जग ।
लोक समजोन मग । आज्ञा इछिती ॥ १९ ॥
आधीं कष्ट मग फळ । कष्ट चि नाहीं तें निर्फळ ।
साक्षेपेंविण केवळ । वृथापुष्ट ॥ २० ॥
लोक बहुत शोधावे । त्याचे अधिकार जाणावे ।
जाणजाणोन धरावे । जवळी दुरी ॥ २१ ॥
अधिकारपरत्वें कार्य होतें । अधिकार नस्तां वेर्थ जातें ।
जाणोनि शोधावीं चित्तें । नाना प्रकारें ॥ २२ ॥
अधिकार पाहोन कार्य सांगणें । साक्षेप पाहोन विश्वास धरणें ।
आपला मगज राखणें । कांहींतरी ॥ २३ ॥
हें प्रचितीचें बोलिलें । आधीं केलें मग सांगितलें ।
मानेल तरी पाहिजे घेतलें । कोणीयेकें ॥ २४ ॥
महंतें महंत करावे । युक्तिबुद्धीनें भरावे ।
जाणते करून विखरावे । नाना देसीं ॥ २५ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे निस्पृहवर्तणुकनाम समास दाहवा ॥१०॥

---

## विवेकवैराग्यनाम दशक द्वादश ॥ १२ ॥

॥ श्रीरामसमर्थ ॥

आधीं प्रपंच करावा नेटका । मग घ्यावें परमार्थविवेका ।
येथें आळस करूं नका । विवेकी हो ॥ १ ॥

---

१ ह्या समासांत दिलेली निस्पृहाची वर्तणूक आपल्या अनुभवाची आहे. तिच्या प्रमाणें आपण आधीं वागलों व मग ती लोकांना शिकविली असें श्रीसमर्थ ह्मणत आहेत, तेव्हां हा समास ह्मणजे त्यांचें आत्मचरित्र च होय. २ पसरावे, पाठवावे.

प्रपंच साडून परमार्थ कराल । तेणें तुह्मी कष्टी व्हाल ।
प्रपंच परमार्थ चालवाल । तरी तुह्मी विवेकी ॥ २ ॥
प्रपंच साडून परमार्थ केला । तरी अन्न मिळेना खायाला ।
मग तया करंट्याला । परमार्थ कैंचा ॥ ३ ॥
परमार्थ साडून प्रपंच करिसी । तरी तूं येमयातना भोगिसी ।
अंतीं परम कष्टी होसी । येमयातना भोगितां ॥ ४ ॥
साहेबकामास[1] नाहीं गेला । गृहीं च सुखाडोनें[2] बैसला ।
तरी साहेब कुटील तयाला । पाहाती लोक ॥ ५ ॥
तेव्हां महत्व चि गेलें । दुर्जनाचें हासें जालें ।
दुःख उदड भोगिलें । आपुल्या जीवें ॥ ६ ॥
तैसें चि होणार अंतीं । ह्मणौन भजावें भगवंतीं ।
परमार्थाची प्रचिती । रोकडी घ्यावी ॥ ७ ॥
संसारीं असतां मुक्त । तो चि जाणावा सयुक्त[3] ।
अखंड पाहे युक्तायुक्त । विचारणा हे ॥ ८ ॥
प्रपंचीं जो सावधान । तो परमार्थ करील जाण ।
प्रपचीं जो अप्रमाण । तो परमार्थी खोटा ॥ ९ ॥
ह्मणौन सावधानपणें । प्रपच परमार्थ चालवणें ।
ऐसें न करितां भोगणें । नाना दुःखें ॥ १० ॥
पैर्णाळि[4] पाहोन उचले । जीवसृष्टि विवेकें चाले[5] ।
आणि पुरुष होऊन भ्रमले । यासी काये ह्मणावें ॥ ११ ॥
ह्मणौन असावी दीर्घ सूचना । अखंड करावी चाळणा ।
पुढील होणार अनुमाना । आणून सोडावे ॥ १२ ॥

---

१ वरिष्ठाच्या कामास. २ सुखी होऊन, सुखानें. ३ योग्य प्रकारानें ( आत्म्याशीं ) युक्त ४ पर्णावरची आळी, पानावरचा किडा. ५ पानावरची आळी पुढें आश्रय आहे असें चाचपून पाहून मग पाय उचलते, अशा प्रकारें जीवजंतु देखील विवेकानें चालतात, असें असता मनुष्यानें मात्र भ्रमात पडावें याला काय ह्मणावें ? व्रजंस्तिष्ठन्पदैकेन यथैवैकेन गच्छति । यथा तृणजलूकैवं देही कर्मगतिं गत ॥ श्रीभागवत १०-१-४०.

सुखी असतो खबर्दार । दुःखी होतो बेखबर ।
ऐसा हा लौकिक विचार । दिसत चि आहे ॥ १३ ॥
ह्मणौन सर्वसावधान । धन्य तयाचें महिमान ।
जनीं राखे समाधान । तो चि येक ॥ १४ ॥
चाळणेचा आळस केला । तरी अवचिता पडेल घाला ।
ते वेळे सावरायाला । अवकाश कैंचा ॥ १५ ॥
ह्मणौन दीर्घसूचनेचे लोक । त्यांचा पाहावा विवेक ।
लोकांकारितां लोक[1] । शाहाणे होती ॥ १६ ॥
परी ते शाहाणे वोळखावे । गुणवंताचे गुण घ्यावे ।
अवगुण देखोन सांडावे । जनामधें ॥ १७ ॥
मनुष्य पारखूं राहेना[2] । आणि कोणाचें मन तोडीना ।
मनुष्यमात्र अनुमाना । आणून पाहे ॥ १८ ॥
दिसे सकळांस सारिखा । पाहातां विवेकी नेटका ।
कांमी[3] निर्कामी[4] लोकां । बरें पाहे ॥ १९ ॥
जाणोन पाहिजेत सर्व[5] । हें चि तयाचें अपूर्व ।
ज्याचें त्यापरी गौरव[6] । राखों जाणे ॥ २० ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे विमळलक्षणनाम समास प्रथम ॥ १ ॥

---

॥ श्रीराम ॥

ऐका संसारासी आले हो । स्त्री पुरुष निस्पृह हो ।
सुचितपणें पाहो । अर्थांतर ॥ १ ॥
काये ह्मणते वासना । काये कल्पिते कल्पना ।
अंतरींचे तरंग नाना । प्रकारें उठती ॥ २ ॥

---

१ एकाचें उदाहरण पाहून दुसरा. २ विवेकी मनुष्य दुसऱ्याची पारख केल्याशिवाय राहत नाहीं, सर्वांची पारख करितो ३ उद्योगी. ४ आळशी ५ आळशी कोण उद्योगी कोण हें जाणत असून हि दोन्ही प्रकारचे लोक त्याला पाहिजे च असतात. ६ ज्याच्या त्याच्या अधिकाराप्रमाणें तो प्रत्येकाचा गौरव करीत असतो.

बरें खावें बरें जेवावें । बरें ल्यावें बरें नेसावें ।
मनासारिखें असावें । सकळ कांहीं ॥ ३ ॥
ऐसें आहे मनोगत । तरी तें कांहीं च न होत ।
बरें कारितां अकस्मात । वाईट होतें ॥ ४ ॥
येक सुखी येक दुःखी । प्रत्यक्ष वर्ततें लोकीं ।
कष्टी होऊनियां सेखीं । प्रारब्धावरी घालिती ॥ ५ ॥
अचुक येत्न करवेना । ह्मणौन केलें तें सजेना ।
आपला अवगुण जाणवेना । कांहीं केल्यां ॥ ६ ॥
जो आपला आपण नेणे । तो दुसऱ्याचें काये जाणे ।
न्याये सांडितां दैन्यवाणे । होती लोक ॥ ७ ॥
लोकांचें मनोगत कळेना । लोकांसारिखें वर्तवेना ।
मूर्खपणें लोकीं नाना । कळह उठती ॥ ८ ॥
मग ते कळो वाढती । परस्परें कष्टी होती ।
प्रेत्न राहातां अंतीं । श्रम चि होये ॥ ९ ॥
ऐसी नव्हे वर्तणुक । परीक्षावे नाना लोक ।
समजलें पाहिजे नेमक । ज्याचें त्यापरी ॥ १० ॥
शब्दपरीक्षा अंतरपरीक्षा । कांहीं येक कळे दक्षा ।
मनोगत नतद्रक्षा । काय कळे ॥ ११ ॥
दुसऱ्यास शब्द ठेवणें । आपला कैपक्ष घेणें ।
पाहों जातां लोकिक लक्षणें । बहुतेक ऐसीं ॥ १२ ॥
लोकीं बरें ह्मणायाकारणें । भल्यांस लागतें सोसणें ।
न सोसितां भंडवाणें । सहज चि होये ॥ १३ ॥
आपणास जें मानेना । तेथें कदापि राहावेना ।
उरी तोडून जावेना । कोणीयेकें ॥ १४ ॥
बोलतो खरें चालतो खरें । त्यास मानिती लाहानथोरें ।
न्याये अन्याये परस्परें । सहज चि कळे ॥ १५ ॥

---

१ जो जो यत्न करावा त्यात कांहींतरी चुकी होते, आणि तेणेंकरून इष्ट कार्य तडीस जात नाहीं. २ कळहो, कलह. ३ फजिती. ४ भीड.

लोकांस कळेना तंवरी । विवेकें क्षमा जो न करी ।
तेणेंकारितां बराबरी । होत जाते ॥ १६ ॥
जंवरी चंदन झिजेना । तंव तो सुगंध कळेना ।
चदन आणि वृक्ष नाना । सगट होती ॥ १७ ॥
जंव उत्तम गुण न कळे । तों या जनास काये कैंळे ।
उत्तम गुण देखतां निवळे । जगदांतर ॥ १८ ॥
जगदांतर निवळत गेलें । जगदांतरीं सख्य जालें ।
मग जाणावें वोळले । विश्वजन ॥ १९ ॥
जनींजनार्दन वोळला । तरी काये उणें तयाला ।
राजी राखावें सकळांला । कठीण आहे ॥ २० ॥
पेरिलें तें उगवतें । उसिणें द्यावें घ्यावें लागतें ।
वर्म काढितां भंगतें । परांतर ॥ २१ ॥
लोकिकीं बरेंपण केलें । तेणें सौख्य वाढलें ।
उत्तरासारिखें आलें । प्रत्योत्तर ॥ २२ ॥
हें आवघें आपणांपासीं । येथें बोल नाहीं जनासी ।
सिकवावें आपल्या मनासी । क्षणक्षणा ॥ २३ ॥
खळ दुर्जन भेटला । क्षमेचा धीर बुडाला ।
तरी मोनें चि स्थळत्याग केला । पाहिजे साधकें ॥ २४ ॥
लोक नाना परीक्षा जाणती । अंतरपरीक्षा नेणती ।
तेणें प्राणी करंटे होती । संदेह नाहीं ॥ २५ ॥
आपणास आहे मरण । ह्मणौन राखावें बरेंपण ।
कठिण आहे लक्षण । विवेकाचें ॥ २६ ॥

---

१ लोकांना याचें महत्व जोंवर कळत नाहीं, तोंवर यानें शांति राखिली पाहिजे. शांति न राखिली तर मग यांच्यामध्यें आणि लोकामध्यें कांहीं च तफावत उरत नाहीं. यानें लोकाचें सहन केलें नाहीं तर लोक हि याचें सहन करित नाहींत; तेणेंकरून लोकाची व याची बरोबरी होते २ जोंपर्यंत याचे उत्तम गुण लोकांना कळत नाहींत, तोंपर्यंत लोकांना याची काय परीक्षा होणार आहे?

थोर लाहान समान । आपले पारिखे सकळ जन ।
चढतें वाढतें सनेधान । करितां बरें ॥ २७ ॥
बरें करितां बरें होतें । हें तों प्रत्ययास येतें ।
आतां पुढें सांगावें तें । कोणास काये ॥ २८ ॥
हरिकथानिरूपण । बरेंपणें राजकारण ।
प्रसंग पाहिल्याविण । सकळ खोटें ॥ २९ ॥
विद्या उदंड चि सिकला । प्रसंगमान चुकत चि गेला ।
तरी मग तये विद्येला । कोण पुसे ॥ ३० ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे प्रत्ययनिरूपणनाम समास द्वितीय ॥२॥

---

॥ श्रीराम ॥

पृथ्वीमधें बहुत लोक । तेहिं पाहावा विवेक ।
इहलोक आणि परलोक । बरा पाहावा ॥ १ ॥
इहलोक साधायाकारणें । जाणत्याची संगती धरणें ।
परलोक साधायाकारणें । सद्गुरु पाहिजे ॥ २ ॥
सद्गुरुसी काये पुसावें । हें हि कळेना स्वभावें ।
अनन्यभावें येकभावें । दोनी गोष्टी पुसाव्या ॥ ३ ॥
दोनी गोष्टी त्या कोण । देव कोण आपण कोण ।
या गोष्टीचें विवरण । केलें चि करावें ॥ ४ ॥
आधीं मुख्य देव तो कोण । मग आपण भक्त तो कोण ।
पंचीकर्ण माहावाक्यविवरण । केलें चि करावें ॥ ५ ॥
सकळ केलियाचें फळ । शाश्वत वोळखावें निश्चळ ।
आपण कोण हा केवळ । शोध घ्यावा ॥ ६ ॥

---

१ थोर असोत, लहान असोत, बरोबरीचे, असोत, आपले असोत, परके असोत, सर्वांशीं चढती वाढती मैत्री करणें बरें. २ "मान" शब्द समासात मागाहून निराळ्या शाईनें लिहिलेला आहे.

सारासार विचार घेतां । पदास[1] नाहीं शाश्वतता ।
[2]आधी कारण भगवंता । वोळखिलें पाहिजे ॥ ७ ॥
निश्चळ चंचळ आणी जड । अवघा मायेचा पवाड[3] ।
यामधें[4] वस्तु जाड । जाणार नाहीं ॥ ८ ॥
तें परब्रह्म धुंडावें । विवेकें त्रैलोक्य हिंडावें ।
माईक विचारें खंडावें । परीक्षवंतीं ॥ ९ ॥
खोटें सांडून खरें घ्यावें । परीक्षवंतीं परीक्षावें ।
मायेचें अवघें चि जाणावें । रूप माईक ॥ १० ॥
पंचभूतिक हे माया । माईक जाये विलया ।
पिंडब्रह्मांड अष्टकाया । नासिवंत ॥ ११ ॥
दिसेल तितुकें नासेल । उपजेल तितुकें मरेल ।
रचेल तितुकें खचेल । रूप मायेचें ॥ १२ ॥
वाढेल तितुकें मोडेल । येईल तितुकें जाईल ।
भूतांस भूत खाईल । कल्पांतकाळीं ॥ १३ ॥
देहधारक तितुके नासती । हे तों रोकडी प्रचिती ।
मनुष्येंविण उत्पत्ति । रेत कैंचें ॥ १४ ॥
अन्न नस्तां रेत कैंचें । वोषधी नस्तां अन्न कैंचें ।
वोषधीस जीणें कैंचें । पृथ्वी नस्तां ॥ १५ ॥
आप नस्तां पृथ्वी नाहीं । तेज नस्तां आप नाहीं ।
वायो नस्तां तेज नाहीं । ऐसें जाणावें ॥ १६ ॥
अंतरात्मा नस्तां वायो कैंचा । विकार नस्तां अंतरात्मा कैंचा ।
निर्विकारीं विकार कैंचा । बरें पाहा ॥ १७ ॥

---

१ मुळांत प्रथम "पदार्थास" असें होतें, त्यापैकीं 'र्था' हें अक्षर खोडलेलें दिसतें. पदास ह्मणजे इंद्रादि पदास असा अर्थ करावयाचा का महावाक्यांतील तिन्ही पदास ? २ सर्वांना कारण जो भगवान् त्याला अगोदर ओळखिलें पाहिजे, असा अर्थ करावा किंवा आधीकारण=आदिकारण असा अर्थ करावा. ३ विस्तार ४ ब्रह्म तें निश्चल, माया ती चंचल व जगत् तें जड, असा भेद मायेमुळें झाला आहे, परंतु खरोखर या तिघामध्यें ब्रह्म हें च जाड ( सार, सघन ) असून, न जाणारें ह्मणजे शाश्वत असें आहे.

पृथ्वी नाहीं आप नाहीं । तेज नाहीं वायो नाहीं ।
अंतरात्मा विकार नाहीं । निर्विकारीं ॥ १८ ॥
निर्विकार जें निर्गुण । ते चि शाश्वताची खूण ।
अष्टधा प्रकृति संपूर्ण । नासिवंत ॥ १९ ॥
नासिवंत समजोन पाहिलें । तों तें अस्तां चि नस्तें जालें ।
सारासारें कळों आलें । समाधान ॥ २० ॥
विवेकें पाहिला विचार । मनास आलें सारासार ।
येणेंकारिता विचार । सदृढ जाला ॥ २१ ॥
शाश्वत देव तो निर्गुण । ऐसी अंतरीं बाणली खूण ।
देव कळला मी कोण । कळलें पाहिजे ॥ २२ ॥
मी कोण पाहिजे कळलें । देहतत्व तितुकें शोधिलें ।
मनोवृत्तीचा ठाईं आलें । मीतूपण ॥ २३ ॥
सकळ देहाचा शोध घेतां । मीपण दिसेना पाहातां ।
मीतूपण हें तत्वता । तत्वीं मावळलें ॥ २४ ॥
दृश्य पदार्थ चि वोसरे । तत्वें तत्व तेव्हां सरे ।
मीतूपण हें कैंचें उरे । तत्वता वस्तु ॥ २५ ॥
पचीकर्ण तत्वविवर्ण । माहावाक्यें वस्तु आपण ।
निसगपणें निवेदन । केलें पाहिजे ॥ २६ ॥
देवाभक्तांचें मूळ । शोधून पाहातां सकळ ।
उपाधीवेगळा केवळ । निरोपाधी आत्मा ॥ २७ ॥
मीपण तें बुडालें । विवेकें वेगळेपण गेलें ।
निवृत्तिपदास प्राप्त जालें । उन्मनीपद ॥ २८ ॥
विज्ञानीं राहिलें ज्ञान । ध्येये राहिलें ध्यान ।
सकळ काहीं कार्याकारण । पाहोन सांडिलें ॥ २९ ॥
जन्ममरणाचें चुकलें । पाप अवघें चि बुडालें ।
येमयातनेचें जालें । निसतान ॥ ३० ॥

---

१ जन्मास येणें व मरणें हें चुकलें.

निबंद[1] अवघा चि तुटला । विचारें मोक्ष प्राप्त जाला ।
जन्म सार्थक चि वाटला । सकळ कांहीं ॥ २१ ॥
नाना किंत निवारले । धोके अवघे चि तुटले ।
ज्ञानविवेकें पावन जाले । बहुत लोक ॥ २२ ॥
पतितपावनाचे दास[2] । ते हि पावन करिती जगास ।
ऐसी हे प्रचित मनास । बहुताच्या आली ॥ २३ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे भक्तनिरूपणनाम समास तिसरा ॥ ३ ॥

---

॥ श्रीराम ॥

महद्भाग्य हातासी आलें । परी भोगूं नाहीं जाणितलें ।
तैसें वैराग्य उत्पन्न जालें । परी विवेक नाहीं ॥ १ ॥
आदळतें आफळतें । कष्टी होतें दुःखी होतें ।
ऐकतें देखतें येतें । वैराग्य तेणें ॥ २ ॥
नाना प्रपंचाच्या वोढी । नाना संकटें साकडीं ।
संसार सांडुनी देशधडी । होये तेणें ॥ ३ ॥
तो चिंतेपासून सुटला । पराधेनतेपासूनि पळाला ।
दुःखत्यागें मोकळा जाला । रोगी जैसा ॥ ४ ॥
परी तो होऊ नये मोकाट[3] । नष्ट भ्रष्ट आणी चाट[4] ।
सीमा च नाहीं सैराट[5] । गुरूं जैसें ॥ ५ ॥
विवेकेंविण वैराग्ये केलें । तरी अविवेकें अनर्थी घातलें ।
अवघें वेर्थ चि गेलें । दोहिंकडे ॥ ६ ॥
ना प्रपंच ना परमार्थ । अवघें जिणें चि जालें वेर्थ ।
अविवेकें अनर्थ । ऐसा केला ॥ ७ ॥
कां वेर्थ चि ज्ञान वडबडिला । परी वैराग्ययोग नाहीं घडला ।
जैसा कारागृहीं अडकला । पुरुषार्थ सांगे ॥ ८ ॥

---

१ बंध. २ पतितपावन जो राम त्याचे दास, ते रामदास ३ मनसोक, उनाड
४ चावट. ५ सैरावैरा, अस्ताव्यस्त.

वैराग्येंविण ज्ञान । तो वेर्थ चि साभिमान ।
लोभदंभें घोळसून । कासाविस केला ॥ ९ ॥
स्वान बांधलें तरी भुंके । तैसा स्वार्थमुळें थिंकें ।
परावीकें देखों न सके । साभिमानें ॥ १० ॥
हें येकेंविण येक । तेणें उगा च वाढे शोक ।
आतां वैराग्य आणि विवेक । योग ऐका ॥ ११ ॥
विवेकें अंतरीं सुटला । वैराग्यें प्रपंच तुटला ।
अंतर्बाह्य मोकळा जाला । निःसंग योगी ॥ १२ ॥
जैसें मुखें ज्ञान बोले । तैसी च सर्वे क्रिया चाले ।
दीक्षा देखोनी चकित जाले । सुचिस्मंत ॥ १३ ॥
आस्था नाहीं त्रैलोक्याची । स्थिती बाणली वैराग्याची ।
येत्नविवेकधारणेची । सीमा नाहीं ॥ १४ ॥
संगीत रसाळ हारिकीर्तन । ताळबद्ध तानमान ।
प्रेमळ आवडीचें भजन । अंतरापासुनी ॥ १५ ॥
तत्काळ चि सन्मार्गी लागे । ऐसा अतरीं विवेक जागे ।
वगत्रुत्वें कारितां न भंगे । साहित्य प्रत्ययाचें ॥ १६ ॥
सन्मार्गे जगास मिळाला । ह्मणिजे जगदीश वोळला ।
प्रसंग पाहिजे कळला । कोणीयेक ॥ १७ ॥
प्रखर वैराग्य उदासीन । प्रत्ययाचें ब्रह्मज्ञान ।
स्नानसंध्या भगवद्भजन । पुण्यमार्ग ॥ १८ ॥
विवेकवैराग्य तें ऐसें । नुस्तें वैराग्य हें काडेंपिसें ।
शब्दज्ञान येळिलेंसें । आपण चि वाटे ॥ १९ ॥
ह्मणौन विवेक आणि वैराग्य । तें चि जाणिजे महद्भाग्य ।
रामदास ह्मणे योग्य । साधु जाणती ॥ २० ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे विवेकवैराग्यनाम समास चतुर्थ ॥ ४ ॥

---

१ चरफडतो २ परोत्कर्ष. ३ वक्तृत्व. ४ एककल्लीपणाचें वेड. ५ शिळें. नुसतें शब्दज्ञान हें आपोआप च शिळें, कंटाळवाणें वाटतें.

॥ श्रीराम ॥

रेखेचें[1] गुंडाळें केलें। मात्रुकाक्षरीं शब्द जाले।
शब्द मेळऊन चाले। श्लोक गद्य प्रबद ॥ १ ॥
वेदशास्त्रें पुराणें। नाना काव्यें निरूपणें।
ग्रंथभेद अनुवादणें। किती ह्मणोनि ॥ २ ॥
नाना ऋषी नाना मतें। पाहों जातां असंख्यातें।
भाषा लिपी जेथ तेथें। काये उणें ॥ ३ ॥
वर्ग[3] ऋचा[4] श्रुति स्मृति। अधे[5] स्वर्ग[6] स्तबकं[7] जाती।
प्रसंग मानें समास पोथी। बहुधा नामें ॥ ४ ॥
नाना पदें नाना श्लोक। नाना बीरें[8] नाना कडक।
नाना साख्या दोहडे अनेक। नामाभिधानें ॥ ५ ॥
डफगाणें माचिगाणें[9]। दंडिगाणें[10] कथागाणें।
नाना मानें नाना जेसनें[11]। नाना खेळ ॥ ६ ॥
ध्वनि घोष नाद रेखा। चहु वाचामध्यें देखा।
वाचारूपें हि ऐका। नाना भेद ॥ ७ ॥
उन्मेष परा ध्वनि पश्यंती। नाद मध्यमा शब्द[13] चौथी।
वैखरीपासून उमटती। नाना शब्दरत्नें ॥ ८ ॥
अकार उकार मकार। अर्धमात्राचें अंतर।
औटमात्रा तदनंतर। बावन मात्रुका[14] ॥ ९ ॥

---

१ रेषा, रेघ. २ रेघेचें गुडाळें करून व त्यांत मात्रा घालून अक्षर बनतें व त्या अक्षराचा शब्द होतो ३ ऋग्वेदांतील अध्यायाचे पोटभेद ४ ऋग्वेदांतील श्लोक. ५ अध्याय. ६ सर्ग ७ चम्पू इत्यादि काव्यातून पाडलेले भाग. ८ बीर व कडक हे हिंदुस्थानी भाषेंतील छंद आहेत. ९ दिंडीगाण्याचा च एक प्रकार आहे. १० दिंडीगाणें. ११ आडकथा. १२ ध्वनि, घोष, नाद, रेखा हीं चत्वार वाणीमध्यें आहेत. वैखरी प्रगट झाल्यानंतर वाणीचे नाना भेद निर्माण झाले आहेत. १३ उन्मेष ह्मणजे स्फुरण. हें परावाणीच्या ठिकाणीं, ध्वनि पश्यतीच्या ठिकाणीं, नाद मध्यमेच्या ठिकाणीं व शब्द हा वैखरीच्या ठिकाणीं उत्पन्न होतो. १४ ॐ पैकीं अ, उ, म या तीन मात्रा व वरील बिंदु ही अर्धमात्रा, मिळून औट ( साडेतीन ) मात्रा व त्यापासून नंतर बावन मात्रा.

नाना भेद रागज्ञान । नृत्यभेद तानमान ।
अर्थभेद तत्वज्ञान । विवचना ॥ १० ॥
तत्वांमध्यें मुख्य तत्व । तें जाणावें शुद्धसत्व ।
अर्धमात्रा महत्तत्व[1] । मूळमाया ॥ ११ ॥
नाना तत्वें लाहानथोरें । मिळोन अष्ट हि शरीरें ।
अष्टधा प्रकृतीचें वारें । निघोन जातें ॥ १२ ॥
वारें नस्तां जें गगन । तैसें परब्रह्म सघन ।
अष्ट देहाचें निर्शन । करून पाहावें ॥ १३ ॥
ब्रह्मांडपिंडउभार । पिंडब्रह्मांडसंव्हार ।
दोहिंवेगळें[2] सारासार । विमळब्रह्म ॥ १४ ॥
पदार्थ जड आत्मा चंचळ । विमळब्रह्म तें निश्चळ ।
विवरोन विरे तत्काळ । तद्रूपें[3] होये ॥ १५ ॥
पदार्थ मनें काया वाचा । मी हा अवघा चि देवाचा ।
जड आत्मनिवेदनाचा । विचार ऐसा ॥ १६ ॥
चचळकर्ता तो जगदीश । प्राणीमात्र त्याचा अश ।
त्याचा तो चि आपणास । ठाव नाहीं ॥ १७ ॥
चचळ आत्मनिवेदन । याचें सांगितलें लक्षण ।
कर्ता देव तो आपण । कोठें चि नाहीं ॥ १८ ॥
चंचळ चळे स्वभाकार । निश्चळ देव तो निराकार ।
आत्मनिवेदनाचा प्रकार । जाणिजे ऐसा ॥ १९ ॥
ठाव चि नाहीं चंचळाचा । तेथें आधीं आपण कैंचा ।
निश्चळ आत्मनिवेदनाचा । विवेक ऐसा ॥ २० ॥

---

१ साडेतीन मात्रां पैकीं अकार तमोगुणाचा, उकार रजोगुणाचा, मकार सत्वगुणाचा दर्शक होय. अर्धमात्रा ही शुद्धसत्वगुणाची दर्शक आहे शुद्धसत्वाला च महत्तत्व ह्मटलें आहे. द $१७^{१}_{४,५}$ व $२०^{२}_{३}$ पहा. २ उभारणी व संहारणी या व्यतिरिक्त, सारासार विवचून जें उरलें तें विमल ब्रह्म ३ निश्चल ब्रह्माचें विवरण करून त्यांत विरून जाणें ह्मणजे च तत्काळ तद्रूप होणें ४ देवाचे चि सर्व हि जड पदार्थ। त्याची च सत्ता हे चंचळ हेत। निश्चळीं निश्चळ देवभक्तसत। हें जड चंचळ निश्चळ निवेदन ॥ श्रीरामदासी क्रमसार ५–३६.

तिहिं प्रकारें आपण । नाहीं नाहीं दुजेपण[1] ।
आपण नस्तां मीपण । नाहीं च कोठें ॥ २१ ॥
पाहातां पाहातां अनुमानलें । कळतां कळतां कळों आलें ।
पाहातां अवघें चि निवांत जालें । बोलणें आतां ॥ २२ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे आत्मनिवेदननाम समास पंचम ॥ ५ ॥

---

॥ श्रीराम ॥

ब्रह्म निर्मळ निश्चळ । शाश्वत सार अमळ विमळ ।
अवकाश घन पोकळ । गगनाऐसें ॥ १ ॥
तयास करणें ना धरणें । तयास जन्म ना मरणें ।
तेथें जाणणें ना नेणणें[2] । सुन्यातीत ॥ २ ॥
तें रचेना ना खचेना । तें होयेना ना जायेना ।
मायातीत निरंजना । पार चि नाहीं ॥ ३ ॥
पुढें संकल्प उठिला । षड्गुणेश्वर बोलिजे त्याला ।
अर्धनारीनटेश्वराला । बोलिजेतें ॥ ४ ॥
सर्वेश्वर सर्वज्ञ । साक्षी द्रष्टा ज्ञानघन ।
परेश परमात्मा जगजीवन । मूळपुरुष ॥ ५ ॥
ते मूळमाया बहुगुणी । अधोमुखें गुणक्षोभिणी ।
गुणत्रये तिजपासूनि । निर्माण जाले ॥ ६ ॥
पुढें विष्णु जाला निर्माण । जाणतीकळा सत्वगुण ।
जो करिताहे पाळण । त्रैलोक्याचें ॥ ७ ॥
पुढें जाणीवनेणीवमिश्रित । ब्रह्मा जाणावा नेमस्त ।
त्याच्या गुणें उत्पत्ति होत । भुवनत्रैं ॥ ८ ॥
पुढें रुद्र तमोगुण । सकळ सव्हाराचें कारण ।
सकळ कांहीं कर्तेपण । तेथें चि आलें ॥ ९ ॥

---

१ या तिन्ही प्रकारांत आपण नाहीं, दुजेपण नाहीं, ईश्वरस्वरूपापासून निराळेपणा नाहीं. २ तेथें जाणें ना येणें । असा चरण प्रथम होता.

तेथून पुढें पंचभूतें । पावलीं पष्ट दशेतें ।
अष्टधा प्रकृतीचें स्वरूप तें । मुळीं च आहे ॥ १० ॥
निश्चळीं जालें चळण । ते चि वायोचें लक्षण ।
पंचभूतें आणि त्रिगुण । सूक्ष्म अष्टधा ॥ ११ ॥
आकाश ह्मणिजे अंतरात्मा । प्रत्ययें पाहावा महिमा ।
त्या आकाशापासून जन्मा । वायो आला ॥ १२ ॥
तया वायोच्या दोनी झुळुका । उष्ण सीतळ ऐका ।
सीतळापासून तारा मयंका । जन्म जाला ॥ १३ ॥
उष्णापासून रवि वन्ही । विद्युल्यता आदिकरूनि ।
सीतळ उष्ण मिळोनि । तेज जाणावें ॥ १४ ॥
तया तेजापासून जालें आप । आप आळोन पृथ्वीचें रूप ।
पुढें औषधी अमूप । निर्माण जाल्या ॥ १५ ॥
औषधीपासून नाना रस । नाना बीज अन्नरस ।
चौन्यासि लक्ष योनीचा वास । भूमंडळीं ॥ १६ ॥
ऐसी जाली सृष्टिरचना । विचार आणिला पाहिजे मना ।
प्रत्ययेंविण अनुमाना । पात्र होइजे ॥ १७ ॥
ऐसा जाला आकार । येणें चि न्यायें संव्हार ।
सारासारविचार । यास बोलिजे ॥ १८ ॥
जें जें जेथून निर्माण जालें । तें तें तेथें चि निमालें ।
येणें चि न्यायें संव्हारलें । माहाप्रळइं ॥ १९ ॥
आद्य मध्य अवसान[1] । जें शाश्वत निरंजन ।
तेथें लावावें अनुसंधान । जाणते पुरुषीं ॥ २० ॥
होत जाते नाना रचना । परी ते कांहीं च तगेना ।
सारासार विचारणा । याकारणें ॥ २१ ॥

---

१ ब्रह्मांडाच्या उभारणीचे पूर्वी, उभारणी होत असता व संहारणीनंतर.

द्रष्टा साक्षी अंतरात्मा । सर्वत्र बोलती महिमा ।
परी हे सर्वसाक्षिणी अवस्ता मां । प्रत्ययें पाहावी ॥ २२ ॥[1]
मुळापासून सेवटवरी । अवघी मायेची भरोवेरी ।[2]
नाना विद्या कळाकुंसरी । तयेमधें ॥ २३ ॥
जो उपाधीचा सेवट पावेल । त्यास भ्रम ऐसें वाटेल ।
जो उपाधीमधें आडकेल । त्यास काढिता कवण ॥ २४ ॥
विवेकप्रत्ययाचीं कामें । कैसीं घडतील अनुमानभ्रमें ।
सारासारविचाराचेन संभ्रमें । पाविजे ब्रह्म ॥ २५ ॥
ब्रह्मादींचें माहाकारण । ते मूळमाया जाण ।
अपूर्णास ह्मणती ब्रह्म पूर्ण । विवेकहीन ॥ २६ ॥
सृष्टीमधें बहुजन । येक भोगिती नृपासन ।
येक विष्ठा टाकिती जाण । प्रत्येक्ष आतां ॥ २७ ॥
ऐसे उदंड लोक असती । आपणास थोर ह्मणती ।
परी ते विवेकी जाणती । सकळ कांहीं ॥ २८ ॥
ऐसा अहे समाचार । कारण पाहिजे विचार ।[3]
बहुतांच्या बोलें हा संसार । नासूं नये ॥ २९ ॥
पुस्तकज्ञानें निश्चये धरणें । तरी गुरु कासया करणें ।
याकारणें विवरणें । आपुल्या प्रत्ययें ॥ ३० ॥
जो बहुतांच्या बोलें लागला । तो नेमस्त जाणावा बुडाला ।
येक साहेब नस्तां कोणाला । मुस्यारा मागावा ॥ ३१ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सृष्टिक्रमनिरूपणनाम समास षष्ठ ॥ ६ ॥

---

॥ श्रीराम ॥

न्यायें निष्ठुर बोलणें । बहुतांस वाटे कंटाळवाणें ।
मळमळ करितां जेवणें । विहित नव्हे ॥ १ ॥

---

१ अंतरात्मा सर्वसाक्षी आहे, असें लोक ह्मणतात, परतु ह्या सर्वसाक्षिणी अवस्थेचा प्रत्यय पाहिला पाहिजे. २ विस्तार. ३ ह्मणून.

बहुतीं विषय निंदिले । आणि तें चि सेवित गेले ।
विषयत्यागें देह चाले । हें तों घडेना ॥ २ ॥
बोलणें येक चालणें येक । त्याचें नांव हीन विवेक ।
येणें करितां सकळ लोक । हांसों लागती ॥ ३ ॥
विषयत्यागेंविण तों कांहीं । परलोक तो प्राप्त नाहीं ।
ऐसें बोलणें ठाईं ठाईं । बरें पाहा ॥ ४ ॥
प्रपंची खाती जेविती । परमार्थी काये उपवास करिती
उभयता सारिखे दिसती । विषयाविषईं ॥ ५ ॥
देह चालता विषय त्यागी । ऐसा कोण आहे जगीं ।
याचा निर्वाह मजलागीं । देवें निरोपावा ॥ ६ ॥
विषय अवघा त्यागावा । तरी च परमार्थ करावा ।
ऐसें पाहातां गोवा । दिसतो किं ॥ ७ ॥
ऐसा श्रोता अनुवादला । वक्ता उत्तर देता जाला ।
सावध होऊन मन घाला । येतद्विषईं ॥ ८ ॥
वैराग्यें करावा त्याग । तरी च परमार्थयोग ।
प्रपंचत्यागें सर्व सांग । परमार्थ घडे ॥ ९ ॥
मागें ज्ञानी होऊन गेले । तेंहिं बहुत कष्ट केले ।
तरी मग विख्यात जाले । भूमंडळीं ॥ १० ॥
येर मत्सर करितां च गेलीं । अन्न अन्न ह्मणतां मेलीं ।
कित्येक भ्रष्टलीं । पोटासाठीं ॥ ११ ॥
वैराग्य मुळींहून नाहीं । ज्ञान प्रत्ययाचें नाहीं ।
शुचि आचार तो हि नाहीं । भजन कैंचें ॥ १२ ॥
ऐसे प्रकारीचे जन । आपणास ह्मणती सज्जन ।
पाहों जातां अनुमान । अवघा च दिसे ॥ १३ ॥
जयास नाहीं अनुताप । हें चि येक पूर्वपाप ।
क्षणक्षणा विक्षेप । पराधीकपणें ॥ १४ ॥

¬ परोत्कर्षामुळें, दुसऱ्याचा उत्कर्ष पाहून.

मज नाहीं तुज साजेना । हें तों अवघें ठाउकें आहे जना ।
खात्यास [1]नेखातें देखों सकेना । ऐसें आहे ॥ १५ ॥
भाग्यपुरुष थोर थोर । त्यास निंदिती डीवाळखोर ।
सावास देखता चोर । चर्फडी जैसा ॥ १६ ॥
वैराग्यापरतें नाहीं भाग्य । वैराग्य नाहीं तें अभाग्य ।
वैराग्य नस्तां योग्य । परमार्थ नव्हे ॥ १७ ॥
प्रत्ययेज्ञानी वीतरागी । विवेकबळें सकळ त्यागी ।
तो जाणीजे माहांयोगी । ईश्वरी पुरुष ॥ १८ ॥
अष्टमा सिद्धीची उपेक्षा । करून घेतली योगदीक्षा ।
घरोघरीं मागे भिक्षा । माहादेव ॥ १९ ॥
ईश्वराची बराबरी । कैसा करील वेषधारी ।
ह्मणोनियां सगट सरी । होत नाहीं ॥ २० ॥
उदास आणी विवेक । त्यास शोधिती सकळ लोक ।
जैसें लालची मूर्ख रंक । तें दैन्यवाणें ॥ २१ ॥
जे [2]विचारापासून चेवले । जे आचारापासून भ्रष्टले ।
विवेकें करूं विसरले । विषयलोभी ॥ २२ ॥
भजन तरी आवडेना । पुरश्चर्ण कदापि घडेना ।
[3]भल्यांस त्यांस पडेनां । येतन्निमित्य ॥ २३ ॥
वैराग्यें [4]करून भ्रष्टेना । ज्ञान भजन सांडीना ।
वित्पन्न आणि वाद घेना । [5]ऐसा थोडा ॥ २४ ॥
कष्ट करिता सेत पिके । उच वस्त तत्काळ विके ।
जाणत्या लोकांच्या कौतुकें । उड्या पडती ॥ २५ ॥
येर ते अवघे चि मंदले । दुराशेनें खोटे जाले ।
[6]कानकोंडें ज्ञान केलें । भ्रष्टाकारें ॥ २६ ॥

---

१ भिकारी. २ प्रथम "विचार" होता. ३ भल्यांचें आणि त्यांचें यामुळें पटत नाहीं. ४ प्रथम "विचारें" होतें. ५ वैराग्यशील असून ज्याचा आचार भ्रष्ट नाहीं, ज्ञानी असून जो भजन टाकीत नाहीं, व्युत्पन्न असून जो वितंडवादांत शिरत नाहीं असे लोक थोडे. ६ भ्रष्टाचारामुळें ज्याचें ज्ञान कानकोंडें होतें.

सबळ[1] विषय त्यागणें । शुद्ध कार्याकारण[2] घेणें ।
विषयत्यागाचीं लक्षणें । वोळखावीं ऐसीं ॥ २७ ॥
सकळ कांहीं कर्ता देव । नाहीं प्रकृतीचा ठाव ।
विवेकाचा अभिप्राव । विवेकी जाणती ॥ २८ ॥
शूरत्वविषईं खडतर[3] । त्यास मानिती लाहानथोर ।
कामगार आणि आंगचोर । येक कैसा ॥ २९ ॥
त्यागात्याग तार्किकें[4] जाणे । बोलाऐसें चालों जाणे ।
पिंडब्रह्मांड सकळ जाणे । येथायोग्य ॥ ३० ॥
ऐसा जो सर्वजाणता । उत्तमलक्षणी पुरुता ।
तयाचेनि सार्थकता । सहज चि होये ॥ ३१ ॥
विषयत्यागनिरूपणनाम समास सप्तम ॥ ७ ॥

---

॥ श्रीरामसमर्थ ॥

मूळमाया जगदेश्वर । पुढें अष्टधेचा विस्तार ।
सृष्टिक्रमें आकार । आकारला ॥ १ ॥
हें अवघें च नस्तां निर्मळ । जैसें गगन अंतराळ ।
निराकारीं काळवेळ । कांहीं च नाहीं ॥ २ ॥
उपाधीचा विस्तार जाला । तेथें काळ दिसोन आला ।
येरवीं पाहातां काळाला । ठाव चि नाहीं ॥ ३ ॥
येक चंचळ येक निश्चळ । यावेगळा कोठें काळ ।
चंचळ आहे तावत्काळ । काळ ह्मणावें ॥ ४ ॥
आकाश ह्मणिजे अवकाश । अवकाश बोलिजे विलंबास ।
त्या विलंबरूप काळास । जाणोनि घ्यावें ॥ ५ ॥

---

१ उन्मादक २ निरर्थक अशा विषयाचा त्याग करून केवळ जरूर तेवढ्या च विषयाचें सेवन करणें ह्याला च विषयत्याग ह्मणावयाचें ३ प्रखर, मागें पुढें न पाहणारा. ४ तर्कज्ञ असा अर्थ कोणी करतात व काणी तर्काचा विषय असा अर्थ करतात.

सूर्याकरितां विलंब कळे । गणना सकळांची आकळे ।
पळापासून निवळे । युगपरियंत ॥ ६ ॥
पळ घटिका प्रहर दिवस । अहोरात्र पक्ष मास ।
शड्मास वर्षे युगास । ठाव जाला ॥ ७ ॥
कृत त्रेत द्वापार कळी । संख्या चालिली भूमंडळीं ।
देवांचीं आयुष्यें आगळीं । शास्त्रीं निरोपिलीं ॥ ८ ॥
ते देवत्रयाची खटपट । सूक्ष्मरूपें विलगट ।
दडक साडिता चटपट । लोकांस होते ॥ ९ ॥
मिश्रित त्रिगुण निवडेना । तेणें आद्यंत सृष्टिरचना ।
कोण थोर कोण साना । कैसा ह्मणावा ॥ १० ॥
असो हीं जाणत्याचीं कामें । नेणता उगा च गुंते भ्रमें ।
प्रत्यये जाणजाणों वर्मे । ठाईं पाडावीं ॥ ११ ॥
उत्पन्नकाळ सृष्टिकाळ । स्थितिकाळ संव्हारकाळ ।
आद्यंत अवघा काळ । विळबरूपी ॥ १२ ॥
जें जें जये प्रसंगीं जालें । तेथें काळाचें नांव पडिलें ।
बरें नसेल अनुमानलें । तरी पुढें ऐका ॥ १३ ॥
प्रजन्यकाळ शीतकाळ । उष्णकाळ संतोषकाळ ।
सुखदुःखआनंदकाळ । प्रत्यये येतो ॥ १४ ॥
प्रातःकाळ माध्यानकाळ । सायंकाळ वसंतकाळ ।
पर्वकाळ कठिणकाळ । जाणिजे लोकीं ॥ १५ ॥
जन्मकाळ बाळत्वकाळ । तारुण्यकाळ वृधाप्यकाळ ।
अंतकाळ विषमकाळ । वेळरूपें ॥ १६ ॥
सुकाळ आणि दुष्काळ । प्रदोषकाळ पुण्यकाळ ।
सकळ वेळा मिळोन काळ । तयास ह्मणावें ॥ १७ ॥

---

१ त्रिगुणात्मक ब्रह्माविष्णुमहेशाची जी खटपट ( उत्पत्ति, स्थिति, संहार ) ती सूक्ष्मरूपानें व विशेष लगट रीतीनें सर्व पिंडांच्या ठिकाणीं चालू आहे, परंतु लोक दंडक ( सांप्रदाय, रीति ) सोडतात आणि त्यामुळें त्यांना चटपट लागते.

असतें येक वाटतें येक । त्याचें नाव हीन विवेक ।
नाना प्रवृत्तीचे लोक । प्रवृत्ति जाणती ॥ १८ ॥
प्रवृत्ति चाले अधोमुखें । निवृत्ति धावे [1]ऊर्धमुखें ।
ऊर्धमुखें नाना सुखें । विवेकी जाणती ॥ १९ ॥
ब्रह्मांडरचना जेथून जाली । तेथें विवेकी दृष्टि घाली ।
विवरता विवरतां लाधली । [2]पूर्वापर स्थिति ॥ २० ॥
प्रपंचीं असोन परमार्थ पाहे । तो हि ये स्थितीतें लाहे ।
प्रारब्धयोगें करून राहे । लोकांमधें ॥ २१ ॥
सकळांचें येक चि मूळ । येक जाणते येक बाष्कळ ।
विवेकें करून तत्काळ । परलोक साधावा ॥ २२ ॥
तरी च जन्माचें सार्थक । भले पाहाती उभये लोक ।
कारण मुळींचा विवेक । पाहिला पाहिजे ॥ २३ ॥
विवेकहीन जे जन । ते जाणावे पशुसमान ।
त्यांचें ऐकतां भाषण । परलोक कैंचा ॥ २४ ॥
बरें आमचें काये गेलें । जें केलें तें फळास आलें ।
पेरिलें तें उगवलें । भोगिती आतां ॥ २५ ॥
पुढें हि करी तो [3]पावे । भक्तियोगें भगवत फावे ।
देव भक्त मिळतां दुणावें । समाधान ॥ २६ ॥
कीर्ति करून नाहीं मेले । ते उगे च आले आणि गेले ।
शाहाणे होऊन भुलले । काये सांगावें ॥ २७ ॥
येथील येथें अवघें चि राहातें । ऐसें प्रत्ययास येतें ।
कोण काये घेऊन जातें । सांगाना कां ॥ २८ ॥
पदार्थी असावें उदास । विवेक पाहावा सावकास ।
येणेंकारिता जगदीश । अलभ्य लाभे ॥ २९ ॥

---

१ ऊर्ध्वमूलमधःशाखमश्वत्थं प्राहुरव्ययम् । भगवद्गीता अ. १५४१ व त्यावरील श्रीज्ञानेश्वर महाराजांची टीका वाचावी. २ मूळची. ३ जो जसें कर्म करील तसें त्याला फळ मिळेल.

जगदीशापरता लाभ नाहीं । कार्याकारणें सर्व कांहीं ।
संसार करित असता हि । समाधान ॥ ३० ॥
मागां होते जनकादिक । राज्य करिता हि अनेक ।
तैसे चि आतां पुण्यश्लोक । कित्येक असती ॥ ३१ ॥
राजा असतां मृत्य आला । लक्ष कोटी कबुल जाला ।
तरी सोडिना तयाला । मृत्य कांहीं ॥ ३२ ॥
ऐसें हें पराधेन जिणें । यामधें दुखणें बाहाणें ।
नाना उद्वेग चिंता करणें । किती ह्मणोनि ॥ ३३ ॥
हाट भरला संसाराचा । नफा पाहावा देवाचा ।
तरी च या कष्टाचा । परियोये होतो ॥ ३४ ॥
इति श्री काळरूपनाम समास अष्टम ॥ ८ ॥

---

॥ श्रीराम ॥

दुर्बळ नाचारी वोडगस्त । आळसी खादाड रिणगस्त ।
मूर्खपणें अवघें वेस्त । काहीं च नाहीं ॥ १ ॥
खाया नाहीं जेवाया नाहीं । लेया नाहीं नेसाया नाहीं ।
अंथराया नाहीं पांघराया नाहीं । कोंपट नाहीं अभागी ॥ २ ॥
सोयेरे नाहीं धायेरे नाहीं । इष्ट नाहीं मित्र नाहीं ।
पाहातां कोठें वोळखी नाहीं । आश्रयेंविण परदेसी ॥ ३ ॥
तेणें कैसें करावें । काये जीवेंसीं धरावें ।
वाचावें किं मरावें । कोण्या प्रकारें ॥ ४ ॥
ऐसें कोणीयेकें पुसिलें । कोणीयेकें उत्तर दिधलें ।
श्रोतीं सावध ऐकिलें । पाहिजे आतां ॥ ५ ॥
लाहानथोर काम कांहीं । केल्यावेगळें होत नाहीं ।
करंट्या सावध पाहीं । सदेव होसी ॥ ६ ॥

---

१ जरूर तितकें सर्व कांहीं करीत असतां, ह्मणजे संसार चालवीत असतां हि समाधान मिळतें, नाहीं असें नाहीं. २ मोबदला. ३ निराश्रित, ४ व्यस्त, अव्यवस्थ.

अंतरीं नाहीं सावधानता । येत्न ठाकेना पुरता ।
सुखसंतोषाची वार्ता । तेथें कैंची ॥ ७ ॥
ह्मणोन आळस सोडावा । येत्न साक्षेपें जोडावा ।
दुश्चितपणाचा मोडावा । थारा बळें ॥ ८ ॥
प्रात:काळीं उठत जावें । प्रात:स्मरामि करावें ।
नित्य नेमें स्मरावें । पाठांतर ॥ ९ ॥
मागील उजळणी पुढें पाठ । नेम धरावा निकट ।
बाष्कळपणाची बटबट । करूं च नये ॥ १० ॥
दिशेकडे दुरी जावें । सुचिस्मंत होऊन यावें ।
येतां कांहीं तरी आणावें । रितें खोटें ॥ ११ ॥
धूतवस्त्रें घालावीं पिळून । करावें चरणक्षाळण ।
देवदर्शन देवार्चन । येथासांग ॥ १२ ॥
कांहीं फळाहार घ्यावा । पुढें वेवसाये करावा ।
लोक आपला परावा । ह्मणत जावा ॥ १३ ॥
सुंदर अक्षर ल्याहावें । पष्ट नेमस्त वाचावें ।
विवरविवरों जाणावें । अर्थांतर ॥ १४ ॥
नेमस्त नेटकें पुसावें । विशद करून सांगावें ।
प्रत्ययेंविण बोलावें । तें चि पाप ॥ १५ ॥
सावधानता असावी । नीतिमर्यादा राखावी ।
जनास माने ऐसी करावी । क्रियासिद्धि ॥ १६ ॥
आलियाचें समाधान । हरिकथा निरूपण ।
सर्वदा प्रसंग पाहोन । वर्तत जावें ॥ १७ ॥
ताळ धाटी मुद्रा शुद्ध । अर्थ प्रमये अन्वये शुद्ध ।
गद्यपद्यें दृष्टांत शुद्ध । अन्वयाचे ॥ १८ ॥
गाणें वाजवणें नाचणें । हस्तन्यास[2] दाखवणें ।
सभारंजकें वचनें । आडकथा छंदबंद ॥ १९ ॥

---

१ " जा " चा " सा " केला आहे २ हावभाव.

बहुतांचें समाधान राखावें । बहुतास मानेल तें बोलावें[1] ।
विलग पडों नेदावें । कथेमधें ॥ २० ॥
लोकांस उदंड वाजी आणूं नये । लोकांचें उकलावें हृदये ।
तरी मग स्वभावें होये । नामघोष ॥ २१ ॥
भक्ति ज्ञान वैराग्य योग । नाना साधनाचे प्रयोग ।
जेणें तुटे भवरोग । मननमात्रें ॥ २२ ॥
जैसें बोलणें बोलावें । तैसें चि चालणें चालावें ।
मग महंतलीळा स्वभावें । आंगीं बाणे ॥ २३ ॥
युक्तिवीण साजिरा योग । तो दुराशेचा रोग ।
संगतीच्या लोकांचा भोग । उभा ठेला ॥ २४ ॥
ऐसें न करावें सर्वथा । जनास पावऊं नये वेथा ।
हृदईं चिंतावें समर्था । रघुनाथजीसी ॥ २५ ॥
उदासवृत्तीस मानवे जन । विशेष कथानिरूपण ।
रामकथा ब्रह्मांड भेदून । पैलाड न्यावी ॥ २६ ॥
सांग[3] महंती सगीतें[4] गाणें । तेथें वैभवास काये उणें ।
नभामाजी तारांगणें । तैसे लोकें[5] ॥ २७ ॥
आकळबद नाहीं जेथें । अवघें चि विस्कळित तेथें ।
येकें आकलेविण तें । काये आहे ॥ २८ ॥
घालून अकलेचा पवाडु[6] । व्हावें ब्रह्मांडाहून जाड ।
तेथें कैचें आणिलें द्वाड । करटपण ॥ २९ ॥
येथें आशंका फिटली । बुद्धि येत्नीं प्रवेशली ।
कांहींयेक आशा बाढली । अंतःकर्णी[7] ॥ ३० ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे येत्नसिकवणनाम समास नवम ॥ ९ ॥

---

१ "करावें" चें "बोलावें" केलें आहे. २ जिकिरीस. ३ महंताचीं जितकीं अंगें अथवा लक्षणें आहेत तितक्या सर्व लक्षणांनीं युक्त. ४ लोकप्रिय, सुंदर गाणें ५ अशा पुरुषापाशीं आकाशांतील ताऱ्यांप्रमाणें असंख्य लोक गोळा होतील. ६ विस्तार. ७ "काळीं" चें "कर्णीं" केलें आहे.

॥ श्रीराम ॥

आपण येथेष्ट जेवणें । उरलें तें अन्न वाटणें ।
परंतु वाया दवडणें । हा धर्म नव्हे ॥ १ ॥
तैसें ज्ञानें तृप्त व्हावें । तें चि ज्ञान जनास सांगावें ।
तरतेन[1] बुडों नेदावें । बुडतयासी ॥ २ ॥
उत्तम गुण स्वयें घ्यावे । ते बहुतांस सांगावे ।
वर्तल्याविण बोलावे । ते शब्द मिथ्या ॥ ३ ॥
स्नान संध्या देवार्चन । येकाग्र करावें जपध्यान ।
हरिकथा निरूपण । केलें पाहिजे ॥ ४ ॥
शरीर परोपकारीं लावावें । बहुतांच्या कार्यास यावें ।
उणें पडों नेदावें । कोणियेकाचें ॥ ५ ॥
आडलें जाकसलें[2] जाणावें । यथानशक्ति कामास यावें ।
मृदवचनें बोलत जावें । कोणीयेकासी ॥ ६ ॥
दुसऱ्याच्या दुःखें दुःखवावें । परसंतोषें सुखी व्हावें ।
प्राणीमात्रास मेळऊन घ्यावें । बऱ्या शब्दें ॥ ७ ॥
बहुतांचे अन्याये क्षमावे । बहुताचे कार्यभाग करावे ।
आपल्यापरीस व्हावे । पारखे जन ॥ ८ ॥
दुसऱ्याचें अंतर जाणावें । तदनुसार चि वर्तावें ।
लोकांस परीक्षित जावें । नाना प्रकारें ॥ ९ ॥
नेमक चि बोलावें । तत्काळ चि प्रतिवचन द्यावें ।
कदापी रागास न यावें । क्षमारूपें ॥ १० ॥
आलस्य अवघा च दवडावा । येत्न उदंड चि करावा ।
शब्दमत्सर न करावा । कोणीयेकाचा ॥ ११ ॥
उत्तम पदार्थ दुसऱ्यास द्यावा । शब्द निवडून बोलावा ।
सावधपणें करीत जावा । संसार आपला ॥ १२ ॥

---

१ पोहणारानें. २ गांजलेले.

मरणाचें स्मरण असावें । हरिभक्तीस सादर व्हावें ।
मरोन कीर्तीस उरवावें । येणें प्रकारें ॥ १३ ॥
नेमकपणें वर्तों लागला । तो बहुतांस कळों आला ।
सर्व आर्जवी तयाला । काये उणें ॥ १४ ॥
ऐसा उत्तम गुणी विशेष । तयास ह्मणावें पुरुष ।
जयाच्या भजनें जगदीश । तृप्त होये ॥ १५ ॥
उदंड धिःकारून बोलती । तरी चळों नेदावी शांति ।
दुर्जनास मिळोन जाती । धन्य ते साधु ॥ १६ ॥
उत्तम गुणीं शृंघारला । ज्ञानवैराग्यें शोभला ।
तो चि येक जाणावा भला । भूमंडळीं ॥ १७ ॥
स्वयें आपण कष्टावें । बहुतांचें सोसित जावें ।
झिजोन कीर्तीस उरवावें । नाना प्रकारें ॥ १८ ॥
कीर्ती पाहों जाता सुख नाहीं । सुख पाहातां कीर्ती नाहीं ।
विचारेंविण कोठें चि नाहीं । समाधान ॥ १९ ॥
परांतरास न लावावा ढका । कदापि पडों नेदावा चुका ।
क्षमासीळ तयाच्या तुका । [1]हानी नाहीं ॥ २० ॥
आपलें अथवा परावें । कार्य अवघें च करावें ।
प्रसगीं कामास चुकवावें । हें विहित नव्हे ॥ २१ ॥
बरें बोलतां सुख वाटतें । हें तों प्रत्यक्ष कळतें ।
आत्मवत परावें तें । मानीत जावें ॥ २२ ॥
कठिण शब्दें वाईट वाटतें । हें तों प्रत्ययास येतें ।
तरी मग वाईट बोलावें तें । काये निमित्य ॥ २३ ॥
आपणास चिमोटा घेतला । तेणें कासाविस जाला ।
आपणावरून दुसऱ्याला । राखत जावें ॥ २४ ॥
जे दुसऱ्यास दुःख करी । ते अपवित्र वैखरी ।
आपणास घात करी । कोणियेके प्रसंगीं ॥ २५ ॥

---

1 जो क्षमाशील आहे त्याच्या वजनाला हानी नाहीं, त्याचें महत्त्व जात नाहीं.

पोरेलें तें उगवतें । बोलण्यासारिखें उत्तर येतें ।
तरी मग कर्कश बोलावें तें । काये निमित्य ॥ २६
आपल्या पुरुषार्थवैभवें । बहुतांस सुखी करावें ।
परंतु कष्टी करावें । हे राक्षेसी क्रिया ॥ २७ ॥
दंभ दर्प अभिमान । क्रोध आणी कठिण वचन ।
हें अज्ञानाचें लक्षण । भगवद्गीतेंत बोलिलें ॥ २८ ॥[1]
जो उत्तम गुणें शोभला । तो चि पुरुष माहा भला
कित्येक लोक तयाला । शोधीत फिरती ॥ २९ ॥
क्रियेविण शब्दज्ञान । तें चि स्वानाचें वमन ।
भले तेथें अवलोकन । कदापी न करिती ॥ ३० ॥
मनापासून भक्ति करणें । उत्तम गुण अगत्य धरणें ।
तया माहापुरुषाकारणें । धुंडीत येती ॥ ३१ ॥
ऐसा जो माहानुभाव । तेणें करावा समुदाव ।
भक्तियोगें देवाधिदेव । आपुला करावा ॥ ३२ ॥
आपण आवचितें मरोन जावें । मग भजन कोणें कऱ्हावें ।
याकारणें भजनास लावावे । बहुत लोक ॥ ३३ ॥
आमची प्रतिज्ञा ऐसी । कांहीं न मगावें शिष्यासी ।
आपणामागें जगदीशासी । भजत जावें ॥ ३४ ॥
याकारणें समुदाव । जाला पाहिजे मोहोछाव ।
हातोपातीं देवाधिदेव । बोळेसा करावा ॥ ३५ ॥
आतां समुदायाकारणें । पाहिजेती दोनी लक्षणें ।
श्रोतीं येथें सावधपणें । मन घालावें ॥ ३६ ॥
जेणें बहुतांस घडे भक्ति । ते हे रोकडी प्रबोधशक्ति
बहुतांचें मनोगत हातीं । घेतलें पाहिजे ॥ ३७ ॥

---

१ अध्याय १६-४.

मागां बोलिले उत्तम गुण । तयास मानिती प्रमाण ।
प्रबोधशक्तीचें लक्षण । पुढें चाले ॥ ३८ ॥
बोलण्यासारिखें चालणें । स्वयें करून बोलणें ।
तयाचीं वचनें प्रमाणें । मानिती जनीं ॥ ३९ ॥
जें जें जनास मानेना । तें तें जन हि मानीना ।
आपण येकला जन नाना । सृष्टिमधें ॥ ४० ॥
ह्मणोन सांगाती[1] असावे । मानत मानत शिकवावे ।
हळु हळु सेवटा न्यावे । विवेकानें ॥ ४१ ॥
परंतु हे विवेकाचीं कामें । विवेकी करील नेमें ।
इतर ते बापुडे भ्रमें । भांडों च लागले ॥ ४२ ॥
बहुतांसीं भांडतां येकला । सैन्यावाचून पुरवला ।
याकारणें बहुतांला । राजी राखावें ॥ ४३ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे उत्तमपुरुषनिरूपणनाम समास दशम ॥ १०

---

## ॥ नामरूप दशक त्रयोदश ॥ १३ ॥

### ॥ श्रीरामसमर्थ ॥

आत्मानात्माविवेक करावा । करून बरा विवरावा ।
विवरोन सदृढ धरावा । जीवामध्यें ॥ १ ॥
आत्मा कोण अनात्मा कोण । त्याचें करावें विवरण ।
तें चि आतां निरूपण । सावध ऐका ॥ २ ॥
च्यारि खाणी च्यारि वाणी । चौऱ्यासि लक्ष जीवप्राणी ।
सख्या बोलिली पुराणीं । वर्तती[2] आतां ॥ ३ ॥
नाना प्रकारीचीं शरीरें । सृष्टींत दिसती अपारें ।
तयामधे निर्धारें । आत्मा कवणु ॥ ४ ॥

---

१ सोबती २ " वर्तता " चें " सृष्टींत " केलें आहे.

दृष्टीमधें पाहातो । श्रवणामध्यें ऐकतो ।
रसनेमध्यें स्वाद घेतो । प्रत्यक्ष आता ॥ ५ ॥
घ्राणामधें वास घेतो । सर्वांगीं तो स्पर्शतो ।
वाचेमधें बोलवितो । जाणोनि शब्द ॥ ६ ॥
सावधान आणि चचळ । चहुकडे चळवळ ।
येकला चि चालवी सकळ । इद्रियेंद्वारा ॥ ७ ॥
पाये चालवी हात हालवी । भृकुटी पालवी डोळा घालवी ।
सकेतखुणा बोलवी । तो चि आत्मा ॥ ८ ॥
धिटाइ[1] लाजवी खाजवी । खोंकवी वोकवी थुंकवी ।
अन्न जेऊन उदक सेवी । तो चि आत्मा ॥ ९ ॥
मळमूत्रत्याग करी । शरीरमात्र सावरी ।
प्रवृत्ति निवृत्ति विवरी । तो चि आत्मा ॥ १० ॥
ऐके देखे हुगे चाखे । नाना प्रकारें वोळखे ।
संतोष पावे आणी धाके । तो चि आत्मा ॥ ११ ॥
आनद विनोद उदेग[2] चिंता । काया छया[3] माया ममता ।
जीवित्वें पावे नाना वेथ्याँ । तो चि आत्मा ॥ १२ ॥
पदार्थाची आस्था धरी । जनीं वाईट बरें करी ।
आपल्या राखे पराव्या मारी । तो चि आत्मा ॥ १३ ॥
युध्ये होता दोहिंकडे । नाना शरीरीं वावडे ।
परस्परें घाडी पडे । तो चि आत्मा ॥ १४ ॥
तो येतो जातो देहीं वर्तती । हासतो रडतो प्रस्तावतो ।
समर्थ करटा होतो । त्यापासारिखा ॥ १५ ॥
होतो लंडी होतो बळकट । होतो विद्यावत होतो धेट ।
न्यायेवत होतो उत्धट । तो चि आत्मा ॥ १६ ॥

---

१ धीटपणा करवितो २ उद्वेग ३ प्रतिबिंब, आत्म्याची छाया; जीवाला आत्म्याची छाया ह्मणतात ह्मणून या ठिकाणीं छाया=जीव. ४ हा चरण समासात लिहिलेला आहे "आत्मत्वें पावे समता" असा चरण प्रथम होता तो खोडला आहे. ५ दांडगा.

धीर उदार आणि कृपण । वेडा आणि विचक्षण ।
उछर्के आणि सहिष्ण । तो चि आत्मा ॥ १७ ॥
विद्या कुविद्या दोहिकडे । आनंदरूप व्रावडे ।
जेथें तेथें सर्वांकडे । तो चि आत्मा ॥ १८ ॥
निजे उठे बैसे चाले । धावे धावडी डोले तोले ।
सोइरे धायेरे केले । तो चि आत्मा ॥ १९ ॥
पोथी वाची अर्थ सांगे । ताळ धरी गाऊं लागे ।
वाद वेवाद वाउगे । तो चि आत्मा ॥ २० ॥
आत्मा नस्तां देहांतरीं । मग तें प्रेत सचराचरीं ।
देहसंगें आत्मा करी । सर्व कांहीं ॥ २१ ॥
येकेंविण येक काये । कामा नये वाया जाये ।
ह्मणोनि हा उपाये । देहयोगें ॥ २२ ॥
देह अनित्य आत्मा नित्य । हा चि विवेक नित्यानित्य ।
अवघें सूक्ष्माचें कृत्य । जाणती ज्ञानी ॥ २३ ॥
पिंडीं देहधर्ता जीव । ब्रह्मांडीं देहधर्ता शिव ।
ईश्वरतनुचतुष्टये सर्व । ईश्वर धर्ता ॥ २४ ॥
त्रिगुणापर्ता जो ईश्वर । अर्धनारीनटेश्वर ।
सकळ सृष्टीचा विस्तार । तेथून जाला ॥ २५ ॥
बरवें विचारून पाहीं । स्त्री पुरुष तेथें नाहीं ।
चंचळरूप येतें कांहीं । प्रत्ययासी ॥ २६ ॥
मुळींहून सेवटवरी । ब्रह्मादि पिपीकां देहधारी ।
नित्यानित्य विवेक चतुरीं । जाणिजे ऐसा ॥ २७ ॥
जड तितुकें अनित्य । आणि सूक्ष्म तितुकें नित्य ।
याहिमध्यें नित्यानित्य । पुढें निरोपिलें ॥ २८ ॥
स्थूळ सूक्ष्म वोलांडिलें । कारण माहाकारण सांडिलें ।
विराट हिरण्यगर्भ खंडिलें । विवेकानें ॥ २९ ॥

---

१ उच्छृंखल. २ धावड, धावण, धाव ३ पिपीलिका, मुंगी.

अव्याकृत मूळप्रकृती । तेथें जाऊन बैसली वृत्ती ।
ते वृत्ति व्हावया निवृत्ति । निरूपण ऐका ।। ३० ।।
आत्मानात्माविवेक बोलिला । चंचळात्मा प्रत्यया आला ।
पुढिले समासीं निरोपिला । सारासार विचार ।। ३१ ।।
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे आत्मानात्माविवेकनाम समास प्रथम ।।१।।

---

।। श्रीरामसमर्थ ।।

ऐका सारासार विचार । उभारलें जगडंबर ।
त्यांत कोण सार कोण असार । विवेकें वोळखा ।। १ ।।
दिसेल तें नासेल । आणि येईल तें जाईल ।
जें असत चि असेल । तें चि सार ।। २ ।।
मागां आत्मानात्माविवेक बोलिला । अनात्मा वोळखोन सांडिला ।
आत्मा जाणतां लागला । मुळींचा मूळतंतु ।। ३ ।।
मुळीं जे राहिली वृत्ति । जाली पाहिजे निवृत्ति ।
सारासार विचार श्रोतीं । बरा पाहावा ।। ४ ।।
नित्यानित्य विवेक केला । आत्मा नित्यसा निवडिला ।
निवृत्तिरूपें हेत उरला । निराकारीं ।। ५ ।।
हेत ह्मणिजे तो चंचळ । निर्गुण ह्मणिजे निश्चळ ।
सारासारविचारें चंचळ । होऊन जातें ।। ६ ।।
चळे ह्मणोनि तें चंचळ । न चळे ह्मणोनि निश्चळ ।
निश्चळीं उडे चचळ । निश्चयेसीं ।। ७ ।।
ज्ञान आणि उपासना । दोनी येक चि पाहाना ।
उपासनेकारितां जना । जगोद्धार ।। ८ ।।
द्रष्टा साक्षी जाणता । ज्ञानघन चैतन्यसत्ता ।
ज्ञान देव चि तत्वता । बरें पाहा ।। ९ ।।

---

१ मूळमायेचा आरंभ. २ मूळमायेच्या ठिकाणीं ३ नाहींसें होतें

त्या ज्ञानाचें विज्ञान होतें । शोधून पाहा बहुत मतें ।
चचळ अवघें नासतें । येणें प्रकारें ॥ १० ॥
नासिवत नासेल किं नासेना । ऐसा अनुमान चि आहे मना ।
तरी तो पुरुष सहसा ज्ञाना । अधिकारी नव्हे ॥ ११ ॥
नित्य निश्चये केला । संदेह उरत चि गेला ।
तरी तो जाणावा वाहावला । माहा मृगजळीं ॥ १२ ॥
क्षये चि नाहीं जो अक्षई । व्यापकपणें सर्वां ठाई ।
तेथें हेत संदेह नाहीं । निर्विकारीं ॥ १३ ॥
जें उदंड घनदाट । आद्य मध्य सेवट ।
अचळ अढळ अतुट । जैसें तैसें ॥ १४ ॥
पाहातां जैसें गगन । गगनाहून तें सघन ।
जन चि नाहीं निरंजन । सदोदित ॥ १५ ॥
चर्मचक्षु ज्ञानचक्षु । हा तों अवघा च पूर्वपक्षु ।
निर्गुण ठाईंचा अलक्षु । लक्षवेना ॥ १६ ॥
संगत्यागेंविण कांहीं । परब्रह्म होणार नाहीं ।
संगत्याग करून पाहीं । मौन्यगर्भा ॥ १७ ॥
निर्शतां अवघें चि निर्शलें । चंचळ तितुकें निघोन गेलें ।
निश्चळ परब्रह्म उरलें । तें चि सार ॥ १८ ॥
आठवा देह मूळमाया । निर्शोन गेल्या अष्टकाया ।
साधु सांगती उपाया । कृपाळुपणें ॥ १९ ॥
सोहं हंसा तत्वमसी । तें ब्रह्म तूं आहेसी ।
विचार पाहातां स्थिति ऐसी । सहज चि होते ॥ २०॥
साधक असोन ब्रह्म उरलें । तेथें वृत्तिसुन्य जालें ।
सारासार विचारिलें । येणें प्रकारें ॥ २१ ॥

---

१ " कप " हीं अक्षरें समासात आहेत २ ब्रह्म ३ प्रथम " अ " होता तो खोडून समासांत " न " लिहिला, मग पुन्हां " न " ला हरताळ लावली व खोडलेल्या " अ " वर हरताळ लावून पुन्हां " अ " केला आहे. सोनेरी व उंब्रज प्रतींत " आटोन " असा पाठ आहे. ४ बाह्य साधकाचे परी असून जे ब्रह्मरूप होऊन उरले.

तें तापेना ना निवेना । उजळेना ना काळवंडेना ।
डहुळेना ना निवळेना[1] । परब्रह्म तें ॥ २२ ॥
दिसेना ना भासेना । उपजेना ना नासेना ।
तें येना ना जाईना । परब्रह्म तें ॥ २३ ॥
तें भिजेना ना वाळेना । तें विझेना ना जळेना ।
जयास कोणी च नेईना । परब्रह्म तें ॥ २४ ॥
जें सन्मुख चि चहुंकडे । जेथें दृश्य भास उडे ।
धन्य साधु तो पवाडे । निर्विकारीं ॥ २५ ॥
निर्विकल्पीं कल्पनातीत । तो चि वोळखावा सत ।
येर[2] अवघे चि असंत । भ्रमरूप ॥ २६ ॥
खोटें सांडून खरें घ्यावें । तरी च परीक्षवंत ह्मणावें ।
असार सांडून सार ध्यावें । परब्रह्म तें ॥ २७ ॥
जाणतां जाणतां जाणीव[3] जाते । आपली वृत्ति तद्रूप होते ।
आत्मनिवेदनें भक्ति ते । ऐसी आहे ॥ २८ ॥
वाच्यांशें भक्ति मुक्ति बोलावी । लक्ष्यांशें तद्रूपता विवरावी ।
विवरतां हेतु नुरावी । ते तद्रूपता ॥ २९ ॥
सद्रूप चिद्रूप आणि तद्रूप । सस्वरूप ह्मणिजे आपलें रूप ।
आपलें रूप ह्मणिजे अरूप । तत्वनिर्शनाउपरी ॥ ३० ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सारासारनिरूपणनाम समास द्वितीय ॥२॥

---

॥ श्रीराम ॥

ब्रह्म घन आणि पोकळ । आकाशाहून विशाळ ।
निर्मळ आणी निश्चळ । निर्विकारी ॥ १ ॥
ऐसें चि असतां कित्येक काळ । तेथें आरंभला भूगोळ ।
तया भूगोळाचें मूळ । सावध ऐका ॥ २ ॥

---

१ प्रथम " वितुळेना " असें होतें त्याचें श्रीसमर्थांनीं " निवळेना " केलें.
२ " नि " चा " न " केला आहे ३ जाणीव.

परब्रह्म असतां निश्चळ । तेथें संकल्प उठिला चंचळ ।
तयास बोलिजे केवळ । आदिनारायेण ॥ ३ ॥
मूळमाया जगदेश्वर । त्यासी च ह्मणिजे शड्गुणेश्वर ।
अष्टधा प्रकृतीचा विचार । तेथें पाहा ॥ ४ ॥
ऐलिकडे गुणक्षोभिणी । तेथें जन्म घेतला त्रिगुणीं ।
मूळ वोंकाराची मांडणी । तेथून जाणावी ॥ ५ ॥
अकार उकार मकार । तिनी मिळोन वोंकार ।
पुढें पंचभूताचा विस्तार । विस्तारला ॥ ६ ॥
आकाश ह्मणिजेतें अंतरात्म्यासी । तयापासून जन्म वायोसी ।
वायोपासून तेजासी । जन्म जाला ॥ ७ ॥
वायोचा कातरा[1] घसवटे । तेणें उष्णें वन्हि पेटे ।
सूर्यबिंब तें प्रगटे । तये ठाईं ॥ ८ ॥
वारा वाजेतो[2] सीतळ । तेथें निर्माण जालें जळ ।
तें जळ आळोन भूगोळ । निर्माण जाला ॥ ९ ॥
त्या भूगोळाचे पोटीं । अनंत बीजाचिया कोटी ।
पृथ्वी पाण्या होता भेटी । अंकुर निघती ॥ १० ॥
पृथ्वी वल्ली नाना रंग । पत्रें पुष्पाचे तरंग ।
नाना स्वाद ते मग । फळें जालीं ॥ ११ ॥
पत्रें पुष्पें फळें मुळें । नाना वर्ण नाना रसाळें ।
नाना धान्यें अन्नें केवळें । तेथून जालीं ॥ १२ ॥
अन्नापासून जालें रेत । रेतापासून प्राणी निपजत ।
ऐसी हे रोकडी प्रचित । उत्पत्तीची ॥ १३ ॥
अंडज जारज श्वेतज उद्बीज । पृथ्वी पाणी सकळांचें बीज ।
ऐसें हें नवल चोज । सृष्टिरचनेचें ॥ १४ ॥
च्यारि खाणी च्यारि वाणी । चौऱ्यासि लक्ष जीवयोनी ।
निर्माण जाले लोक तिनी । पिंडब्रह्मांड ॥ १५ ॥

---

१ कातरीसारखे निरकस येणारे दोन ओघ. २ " ता " चा " तो " केला आहे. ३ द. ११-१-२ पहा

मुळीं अष्टधा प्रकृती । अवघे पाण्यापासून जन्मती ।
पाणी नस्तां मरती । सकळ प्राणी ॥ १६ ॥
नव्हे अनुमानाचें बोलणें । याचा बरा प्रत्यये घेणें ।
वेदशास्त्रें पुराणें । प्रत्ययें घ्यावीं ॥ १७ ॥
जें आपल्या प्रत्यया येना । तें अनुमानिक घ्यावेना ।
प्रत्ययाविण सकळ जना । वेवसाये नाहीं ॥ १८ ॥
वेवसाये प्रवृत्ती निवृत्ती । दोहिंकडे पाहिजे प्रचिती ।
प्रचितीविण अनुमानें असती । ते विवेकहीन ॥ १९ ॥
ऐसा सृष्टिरचनेचा विचार । संकळित बोलिला प्रकार ।
आतां विस्ताराचा संहार । तो हि ऐका ॥ २० ॥
मुळापासून सेवटवरी । अवघा आत्माराम चि करी ।
करी आणी विवरी । येथायोग्य ॥ २१ ॥
पुढें संव्हार निरोपिला । श्रोतीं पाहिजे ऐकिला ।
इतुक्याउपरी जाला । समास पूर्ण ॥ २२ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे उभारणीनिरूपणनाम समास तृतीये ॥ ३ ॥

---

॥ श्रीराम ॥

पृथ्वीस होईल अंत । भूतांस माडेल कल्पांत ।
ऐसा समाचार साध्यंत । शास्त्रीं निरोपिला ॥ १ ॥
शत वरुषें अनावृष्टि । तेणें जळेल हे सृष्टि ।
पर्वत मोती ऐसी पृष्टी । भूमीची तरके ॥ २ ॥
बारा कळीं सूर्यमंडळा । किर्णांपासून निघती ज्वाळा ।
शत वरुषें भूगोळा । दहन होये ॥ ३ ॥
सिंधुरवर्ण वसुंधरा । ज्वाळा लागतीं फणिवरा ।
तो आहाळोनें सरारा । विष वमी ॥ ४ ॥

---

१ मावती मुद्गलांच्या प्रतींत "माती" ऐवजीं "मातील" असा पाठ आहे
२ पोळून.

त्या विषाच्या ज्वाळा निघती । तेणें पाताळें जळती ।
माहापावकें भस्म होती । पाताळ लोक ॥ ५ ॥
तेथें माहाभूतें खवळती । प्रळयेवात सुटती ।
प्रळयेपावक वाढती । चहुकडे ॥ ६ ॥
तेथें अक्रा रुद्र खवळले । बारा सूर्य कडकाडिले ।
पावकमात्र येकवटले । प्रळयेकाळीं ॥ ७ ॥
वायो विजांचे तडाखे । तेणें पृथ्वी अवघी तरखे ।
कठिणत्व अवघें चि फाके । चहुकडे ॥ ८ ॥
तेथें मेरूची कोण गणना । कोण सांभाळिल कोणा ।
चंद्र सूर्य तारांगणा । मूस जाली ॥ ९ ॥
पृथ्वीनें [1]विरी सांडिली । अवघी धगधगायेमान जाली ।
ब्रह्मांडभटी जळोन गेली । येकसरां ॥ १० ॥
जळोनि विरी साडिली । विशेष माहावृष्टी जाली ।
तेणें पृथ्वी विराली । जळामधें ॥ ११ ॥
भाजला चुना जळीं विरे । तैसा पृथ्वीस धीर न धरे ।
विरी सांडूनियां त्वरें । जळीं मिळाली ॥ १२ ॥
शेष कूर्म वाऱ्हाव गेला । पृथ्वीचा आधार तुटला ।
सत्व सांडून जळाला । मिळोन गेली ॥ १३ ॥
तेथें प्रळयेमेघ उचलले । कठिण घोषें गर्जिनले ।
अखंड विजा कडकडिले । ध्वनि घोष ॥ १४ ॥
पर्वतप्राये पडती गारा । पर्वत उडती ऐसा वारा ।
निबिड तया अंधकारा । उपमा चि नाहीं ॥ १५ ॥
सिंधु नद्या एकवटल्या । नेणो नभींहून रिचवल्या ।
संधि च नाहीं धारा मिळाल्या । अखंड पाणी ॥ १६ ॥

---

१ "येकवटती" चें "वाढती" केलें आहे. २ तरके. ३ एकवटले ४ वीर्य, काठिण्य ५ पृथ्वी जळून तिची विरी गेल्यावर महावृष्टि झाली. ६ ही ओवी मागाहून श्रीसमर्थांनीं शोध देताना घातली आहे. ७ वराह

[library stamp] सं. नं. दा. ठा मं.

तेथें मछ कूर्म सर्प पडती । पर्वतासारिखे दिसती ।
गर्जना होता मिसळती । जळांत जळें ॥ १७ ॥
सप्त सिंधु आवर्णी गेले । आवर्णवेडे मोकळे जाले ।
जळरूप जालियां खवळले । प्रळयेपावक ॥ १८ ॥
ब्रह्मांडाऐसा तप्तलोहो । शोषी जळाचा समूहो ।
तैसें जळास जालें पाहो । अपूर्व मोठें ॥ १९ ॥
तेणें आटोन गेलें पाणी । असभाव्य माजला वन्ही ।
तया वन्हीस केली झडपणी । प्रळयवातें ॥ २० ॥
दीपास पालवें वातला । तैसा प्रळयेपावक विझाला ।
पुढें वायो प्रबळला । असंभाव्य ॥ २१ ॥
उदंड पोकळी थोडा वारा । तेणें वितॅळोन गेला सारा ।
पंचभूतांचा पसारा । आटोपला ॥ २२ ॥
महद्भूत मूळमाया । विस्मरणें वितुळे काया ।
पदार्थमात्र राहावया । ठाव नाहीं ॥ २३ ॥
दृश्य हलकालोळें नेलें । जड चचळ वितुळलें ।
याउपरी शाश्वत उरलें । परब्रह्म तें ॥ २४ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे प्रळयेनाम समास चतुर्थ ॥ ४ ॥

---

॥ श्रीराम ॥

कोणी येक दोघे जण । पृथ्वी फिरती उदासीन ।
काळक्रमणें लागून । कथा आरंभिली ॥ १ ॥
श्रोता पुसे वक्तयासी । काहाणी सांगा जी बरवीसी ।
वक्ता ह्मणे श्रोतयासी । सावध ऐकें ॥ २ ॥

---

१ समुद्रानें मर्यादा सोडली २ पदर. ३ पोकळी ( आकाश ) पुष्कळ आणि त्या मानानें वारा थोडा, तेणेंकरून तो वारा आकाशांत वितळून गेला ४ हरताळ लावून " विझोन " चें " वितळोन " केलें आहे.

येकें स्त्रीपुरुषें[1] होतीं । उभयेतांमधें बहु प्रीति ।
येकरूपें चि वर्तती । भिन्न नाहीं ॥ ३ ॥
ऐसा काहीं येक काळ लोटला । तयांस येक पुत्रें[2] जाला ।
कार्यकर्ता आणि भला । सर्वविषीं ॥ ४ ॥
पुढें त्यास हि जाला कुमरें[3] । तो पित्याहून आतुर ।
काहीं तेंदर्ध[4] चतुर । व्यापकपणें ॥ ५ ॥
तेणें व्याप उदंड केला । बहुत कन्यापुत्रें[5] व्याला ।
उदंड लोक सचिला । नाना प्रकारें ॥ ६ ॥
त्याचा पुत्र जेष्ठ[6] । तो अज्ञान आणि रागिट ।
अथवा चुकतां नीट । संव्हार करी ॥ ७ ॥
पिता[7] उगा च बैसला । लेंकें[8] बहुत व्याप केला ।
सर्वज्ञ जाणता भला । जेष्ठ पुत्रें ॥ ८ ॥
नातुं[9] त्याचें अर्ध जाणे । पणतु[10] तो कांहीं च नेणे ।
चुकतां संव्हारणें । माहा क्रोधी ॥ ९ ॥
लेंकें[12] सकळांचें पाळण करी । नातुं[13] मेळवी वरिचावरी ।
पणतु चुकल्यां संव्हार करी । अकस्मात ॥ १० ॥
नेमस्तपणें वंश वाढला । विस्तार उदंड चि जाला ।
ऐसा बहुत काळ गेला । आनंदरूप ॥ ११ ॥
विस्तार वाढला गणवेना । वडिलास कोणी च मानीना ।
परस्परें[14] कित मना । बहुत पडिला ॥ १२ ॥

---

१ प्रकृति आणि पुरुष. २ सत्वगुणात्मक जाणीवरूप प्रतिपालक विष्णु. ३ रजोगुणी जाणीवनेणीवमिश्रित उत्पत्तिकर्ता ब्रह्मदेव. ४ विष्णुहून अर्धे चतुर, कारण, अर्धा भाग जाणीवेचा व अर्धा भाग नेणीवेचा म्हणून. ५ जगतांतील यच्चयावत् स्त्रीपुरुष ६ तमोगुणी नेणीवरूप संहारक शंकर ७ मूळ पुरुष. ८ विष्णूनें ९ विष्णु १० ब्रह्मा ११ शंकर १२ विष्णु. १३ ब्रह्मा पुन्ह पुन्ह सृष्टि निर्माण करितो. १४ जो विस्तार, व्यवहार वाढला त्या व्यवहारात, सृष्टीत, यच्चयावत् लोकांत, परस्पराविषयीं द्वैतभाव उत्पन्न झाला.

उदंड घरकल्हो लागला । तेणें कित्येक सन्हार जाला ।
विपट[1] पडिलें थोरथोराला । बेबद जालें ॥ १३ ॥
नेणपणें भरीं भरले । मग ते अवघे च संव्हारले ।
जैसे यादव निमाले । उन्मत्तपणें ॥ १४ ॥
बाप लेंक नातु पणतु । सकळांचा जाला निपातु ।
कन्या पुत्र हेतु मातु । अणुमात्र नाहीं ॥ १५ ॥
ऐसी काहाणी जो विवरला । तो जन्मापासून सुटला ।
श्रोता वक्ता धन्य जाला । प्रचितीनें ॥ १६ ॥
ऐसी काहाणी अपूर्व जे ते । उदंड वेळ होत जाते ।
इतुकें बोलोन गोसावी ते । निवांत जाले ॥ १७ ॥
आमची काहाणी सरो । तुमचे अंतरीं भरो ।
ऐसें बोलणें विवरो । कोणीतरी ॥ १८ ॥
चुकत वांकत आठवलें । इतुकें संकळित बोलिलें ।
न्यूनपूर्ण क्ष्मा केलें । पाहिजे श्रोतीं ॥ १९ ॥
ऐसी काहाणी निरंतर । विवेकें ऐकती जे नर ।
दास ह्मणे जग्गोधार । ते चि करिती ॥ २० ॥
त्या जगोद्धाराचें लक्षण । केलें पाहिजे विवरण ।
सार निवडावें निरूपण । यास बोलिजे ॥ २१ ॥
निरूपणीं प्रत्ययें विवरावें । नाना तत्वकोंडें उकलावें ।
समजतां समजता व्हावें । निःसंदेह ॥ २२ ॥
विवरोन पाहाता अष्ट देह । पुढें सहज चि निःसंदेह ।
अखंड निरूपणें राहे । समाधान ॥ २३ ॥
तत्वाचा गलबला[2] जेथें । निवांत कैंचें असेल तेथें ।
याकारणें गुल्हिपरतें[3] । कोणीयेकें असावें ॥ २४ ॥

---

१ विटुष्ट २ तत्वांच्या घोंटाळ्यामध्यें जे गुरफटून गेले आहेत, त्यांना शांतिसुख कोठून असणार ? ३ गलबल्यापासून दूर, या तत्वांच्या घोंटाळ्यापासून दूर.

ऐसा सूक्ष्म संवाद । केला चि करावा विशद ।
पुढिले समासीं लघुबोध । सावध ऐका ॥ २५ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे कहाणीनिरूपण समास पंचम ॥ ५ ॥

---

॥ श्रीराम ॥

जें[2] बोलिजेतीं पंचतत्वें । त्यांचीं अभ्यासाचीं नावें ।
तदुपरी स्वानुभवें । रूपें जाणावीं ॥ १ ॥
यामधें शाश्वत कोण । आणी अशाश्वत कोण ।
ऐसें करावें विवरण । प्रत्ययाचें ॥ २ ॥
पंचभूतांचा विचार । नांवरूप सारासार ।
तो चि बोलिला निर्धार । सावध ऐका ॥ ३ ॥
पृथ्वी आप तेज वायो आकाश । नावें बोलिलीं सावकास ।
आतां रूपाचा विश्वास । श्रवणें धरावा ॥ ४ ॥
पृथ्वी ह्मणिजे ते धरणी । आप ह्मणिजे तें पाणी ।
तेज ह्मणिजे अग्नि तरणी[3] । सतेजादिक ॥ ५ ॥
वायो ह्मणिजे तो वारा । आकाश ह्मणिजे पैस सारा ।
आतां शाश्वत तें विचारा । आपले मनीं ॥ ६ ॥
येक शीत चांचपावें । ह्मणिजे वर्म पडे ठावें ।
तैसें थोड्या अनुभवें । बहुत जाणावें ॥ ७ ॥
पृथ्वी रचते आणि खचते । हें तों प्रत्ययास येतें ।
नाना रचना होत जाते । सृष्टिमधें ॥ ८ ॥
ह्मणौन रचतें तें खचतें । आप तें हि आटोन जातें ।
तेज हि प्रगटोन विझतें । वारें हि राहे ॥ ९ ॥
अवकाश नाममात्र आहे । तें हि विचारितां न राहे ।
एवं पंचभूतिक राहे । हें तों घडेना ॥ १० ॥

---

१ श्रीमच्छत्रपति शिवाजी महाराज यास शिंगणवाडी येथें श्रीसमर्थांनीं हा लघुबोध केला अशी कथा आहे. २ " जे " चा " ला " समासांत केला आहे. ३ सूर्य.

ऐसा पांचा भूतांचा विस्तार। नासिवंत हा निर्धार।
शाश्वत आत्मा निराकार। सत्य जाणावा॥ ११ ॥
तो आत्मा कोणास कळेना। ज्ञानेंविण आकळेना।
ह्मणोनिया संतजना। विचारावें॥ १२ ॥
विचारितां सज्जनासी। ते ह्मणती कीं अविनासी।
जन्म मृत्य आत्मयासी। बोलों च नये॥ १३ ॥
निराकारीं भासे आकार। आणी आकारीं भासे निराकार।
निराकार आणी आकार। विवेकें वोळखावा॥ १४ ॥
निराकार जाणावा नित्य। आकार जाणावा अनित्य।
यास बोलिजे नित्यानित्य। विचारणा॥ १५ ॥
सारीं भासे असार। आणि असारीं भासे सार।
सारासार विचार। शोधून पाहावा.॥ १६ ॥
पंचभूतिक तें माइक। परंतु भासे अनेक।
आणि आत्मा येक। व्यापून असे॥ १७ ॥
चहुं भूतांमधें गगन। तैसें गगनीं असे सघनं[1]।
नेहटून पाहातां अभिन्न। गगन आणि वस्तु॥ १८ ॥
उपाधीयोगें चि आकाश। उपाधी नस्तां निराभास।
निराभास तें अविनाश। तैसें गगन॥ १९ ॥
आता असो हे विवंचना। परंतु जें पाहातां नासेना।
तें गे तें चि अनुमाना। विवेकें आणावें॥ २० ॥
परमात्मा तो निराकार। जाणिजे हा विचार सार।
आणि आपण कोण हा विचार। पाहिला पाहिजे॥ २१ ॥
देहास अंत येता। वायो जातो तत्वता।
हें लटिकें ह्मणाल तरी आतां। स्वासोस्वास धरावा॥ २२ ॥
स्वास कोंडता देह पडे। देह पडतां ह्मणती मढें।
मढ्यास कर्तुत्व न घडे। कदाकाळीं॥ २३ ॥

---

१ गगनाच्या ठिकाणीं ( ब्रह्म ) दाट भरलें आहे.

देहाविगळा वायो न करी । वायोविगळा देह न करी ।
विचार पाहातां कांहीं च न करी । येकाविगळें येक ॥ २४ ॥
उगें च पाहाता मनुष्य दिसे । विचार घेतां कांहीं च नसे ।
अभेदभक्तीचें लक्षण ऐसें । वोळखावें ॥ २५ ॥
कर्ता आपण ऐसें ह्मणावें । तरी आपलें इछेसारिखें व्हावें ।
इछेसारिखें न होतां मानावें । अवघें च वाव ॥ २६ ॥
ह्मणोन कर्ता नव्हे किं आपण । तेथें भोक्ता कैंचा कोण ।
हें विचाराचें लक्षण । अविचारें न घडे ॥ २७ ॥
अविचार आणे विचार । जैसा प्रकाश अंधकार ।
विकार आणि निर्विकार । येक नव्हे कीं ॥ २८ ॥
जेथें नाहीं विवंचना । तेथें कांहीं च चालेना ।
खरें तें चि अनुमाना । कदा न ये ॥ २९ ॥
प्रत्ययास बोलिजे न्याये । अप्रत्यये तो अन्याये ।
ज्यात्यांधास परीक्षा काये । नाना रत्नाची ॥ ३० ॥
ह्मणोन ज्ञाता धन्य धन्य । जो निर्गुणेंसी अनन्य ।
आत्मनिवेदनें मान्य । परम पुरुष ॥ ३१ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे लघुबोधनाम समास षष्ठ ॥ ६ ॥

---

॥ श्रीराम ॥

निर्मळ निश्चळ निराभास । तयास दृष्टांत आकाश ।
आकाश ह्मणिजे अवकाश । पसरला पैस ॥ १ ॥

---

१ "ध" चा "क" केला आहे. २ वास्तविक असतें एकादें लाकूड किंवा झाड, परंतु तें मनुष्य आहे अशी कल्पना होते, तद्वत् सर्वत्र ब्रह्मस्वरूप असून निरनिराळ्या व्यक्तींची आपण कल्पना केली आहे. ती कल्पना टाकून देऊन अभेदभक्ति घडली पाहिजे, असा अर्थ कोणी करितात व प्राणवायुरहित देह दिसतो, पण विचार करतां तो देह ह्मणजे पंचभूतांचें शुद्ध गाठोडें होय, तें गांठोडें सोडून पाहिलें ( तत्वांचें निरसन केलें ) ह्मणजे निर्गुण स्वरूपाव्यतिरिक्त कांहीं उरत नाहीं, असें जाणणें हें च अभेदभक्तीचें लक्षण होय, असा अर्थ कोणी करितात.

आधीं पैस मग पदार्थ[1] । प्रत्यये पाहातां यथार्थ ।
प्रत्ययेंविण पाहातां वेर्थ । सकळ कांहीं ॥ २ ॥
ब्रह्म ह्मणिजे तें निश्चळ । आत्मा ह्मणिजे तो चंचळ ।
तयास दृष्टांत केवळ । वायो[2] जाणावा ॥ ३ ॥
घटाकाश दृष्टांत ब्रह्माचा । घटबिंब दृष्टांत आत्म्याचा[3] ।
विवरतां अर्थ दोहींचा । भिन्न आहे ॥ ४ ॥
भूत ह्मणिजे जितुकें जालें । जालें तितुकें निमालें ।
चंचळ आलें आणी गेलें । ऐसें जाणावें ॥ ५ ॥
अविद्या जड आत्मा चंचळ । जड कर्पूर आत्मा अनळ ।
दोनी जळोन तत्काळ । विझोन जाती ॥ ६ ॥
ब्रह्म आकाश निश्चळ जाती । आत्मा वायो चंचळ जाती ।
परीक्षवंत परीक्षिती । खरें किं खोटें ॥ ७ ॥
जड अनेक आत्मा येक । ऐसा आत्मानात्माविवेक ।
जगा वर्तविता जगन्नायेक । तयास ह्मणावें ॥ ८ ॥
जड अनात्मा चेतवी आत्मा । सर्वीं वर्ते सर्वात्मा ।
अवघा मिळोन चंचळात्मा । निश्चळ नव्हे ॥ ९ ॥
निश्चळ तें परब्रह्म । जेथें नाहीं दृश्यभ्रम ।
विमळ ब्रह्म तें निभ्रम । जैसें तैसें ॥ १० ॥
आधीं आत्मानात्माविवेक थोर । मग सारासारविचार ।
सारासारविचारें संव्हार । प्रकृतीचा ॥ ११ ॥
विचारें प्रकृति संव्हारे । दृश्य अस्तां च वोसरे ।
अंतरात्मा निर्गुणीं संचरे । अध्यात्मश्रवणें ॥ १२ ॥
चढतां अर्थ लागला । तरी अंतरात्मा चढत चि गेला ।
उतरल्या अर्थें उतरला । भूमंडळीं ॥ १३ ॥

---

१ आधीं पोकळी आहे आणि मग तींत सर्व पदार्थ आहेत. आधीं आकाश आणि मग त्याच्यांत बाकीचीं चार भूतें. २ ब्रह्माला दृष्टांत गगनाचा व आत्म्याला दृष्टांत वायूचा ३ ज्याप्रमाणें घटप्रतिबिंबित आकाश असावें, त्याप्रमाणें बुद्धींत प्रतिबिंबित जें चैतन्य तो आत्मा ( जीवात्मा ).

अर्थासारिखा आत्मा होतो । जिकडे नेला तिकडे जातो ।
अनुमानें संदेहीं पडतो । कांहींयेक ॥ १४ ॥
निसंदेह अर्थ चालिला । तरी आत्मा निसंदेह चि जाला ।
अनुमानअर्थें जाला । अनुमानरूपी ॥ १५ ॥
नवरसिक अर्थ चाले । श्रोते तद्रूप चि जाले ।
चाटपणें होऊन गेले । चाट चि आवघे ॥ १६ ॥
जैसा जैसा घडे सग । तैसे गुह्यराचे[1] रंग ।
याकारणें उत्तम मार्ग । पाहोन धरावा ॥ १७ ॥
उत्तम अन्नें बोलत गेले । तरी मन अन्नाकार चि जालें ।
लावण्य वनितेचें वर्णिलें । तरी मन तेथें चि बैसे ॥ १८ ॥
पदार्थवर्णन अघवें । किती ह्मणोन सांगावें ।
परंतु अतरीं समजावें । होये किं नव्हे ॥ १९ ॥
जें जें देखिलें आणी ऐकिलें । तें अंतरीं सदृढ बैसलें ।
हित अन्हित परीक्षिलें । परीक्षवंतीं ॥ २० ॥
याकारणें सर्व सांडावें । येक देवास धुंडावें ।
तरी च वर्म पडे ठावें । कांहींयेक[2] ॥ २१ ॥
नाना सुखें देवें केलीं । लोकें तयास चुकलीं ।
ऐसीं चुकतां च गेलीं । जन्मवरी ॥ २२ ॥
सर्व साडून शोधा मजला । ऐसें देव चि बोलिला ।
लोकीं शब्द अमान्य केला । भगवताचा ॥ २३ ॥
ह्मणोन नाना दुःखें भोगिती । सर्वकाळ कष्टी होती ।
मनीं सुख चि इछिती । परी तें कैचें ॥ २४ ॥
उदंड सुख जया लागलें[3] । वेडें तयास चुकलें ।
सुख सुख ह्मणतां च मेलें । दुःख भोगितां ॥ २५ ॥

---

१ सरड्याची एक जात आहे. २ सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज । भगवद्गीता अ॰ १८–६६. ३ ज्याच्या ठिकाणीं उदंड सुख आहे.

शाहाण्यानें ऐसें न करावें । सुख होये तें चि करावें ।
देवासी धुंडित जावें । ब्रह्मांडापरतें ॥ २६ ॥
मुख्य देव चि ठाईं पडिला । मग काये उणें तयाला ।
लोक वेडे विवेकाळा । सांडून जाती ॥ २७ ॥
विवेकाचें फळ तें सुख । अविवेकाचें फळ तें दुःख ।
यांत मानेल तें अवश्यक । केलें पाहिजे ॥ २८ ॥
कर्तयासी वोळखावें । यास विवेक ह्मणावें ।
विवेक सांडितां व्हावें । परम दुःखी ॥ २९ ॥
आतां असो हें बोलणें । कर्त्यास वोळखणें ।
आपलें हित विचक्षणें । चुकों नये ॥ ३० ॥

इति श्री प्रत्ययेनिवरणनाम समास सप्तम ॥ ७ ॥

---

॥ श्रीराम ॥

श्रोता म्हणे वक्तयासी । कोण कर्ता निश्चयेंसीं ।
सकळ सृष्टि ब्रह्मांडासी । कोणें केलें ॥ १ ॥
तव बोलिले सभानायेक । जे बोलिके येकाहून येक ।
या बोलण्याचें कौतुक । श्रोतीं सादर ऐकावें ॥ २ ॥
येक ह्मणती कर्ता देव । येक ह्मणती कोण देव ।
आपुलाला अभिप्राव । बोलते जाले ॥ ३ ॥
उत्तम मध्यम कनिष्ठ । भावार्थें बोलती पष्ट ।
आपुलाली उपासना श्रेष्ठ । मानिती जनीं ॥ ४ ॥
कोणीयेक ऐसें ह्मणती । कर्ता देव मंगळमूर्ती ।
येक ह्मणती सरस्वती । सर्व करी ॥ ५ ॥
येक ह्मणती कर्ता भैरव । येक ह्मणती खंडेराव ।
येक ह्मणती बीरदेव । येक ह्मणती भगवती ॥ ६ ॥

---

१ " सृष्टीमधें बोलती । " असा चरण होता, तो खोडून समासांत प्रस्तुतचा लिहिला आहे

येक ह्मणती नरहरी । येक ह्मणती बनशंकरी ।
येक ह्मणती सर्व करी । नारायेणु ॥ ७ ॥
येक ह्मणती श्रीराम कर्ता । येक ह्मणती श्रीकृष्ण कर्ता ।
येक ह्मणती भगवंत कर्ता । केशवराज ॥ ८ ॥
येक ह्मणती पांडुरंग । येक ह्मणती श्रीरंग ।
येक ह्मणती झोटिंग । सर्व करी ॥ ९ ॥
येक ह्मणती मुंज्या कर्ता । येक ह्मणती सूर्य कर्ता ।
येक ह्मणती अग्न कर्ता । सकळ कांहीं ॥ १० ॥
येक ह्मणती लक्ष्मी करी । येक ह्मणती मारुती करी ।
येक ह्मणती धरत्री करी । सर्व कांहीं ॥ ११ ॥
येक ह्मणती तुकाई । येक ह्मणती येमाई ।
येक ह्मणती सटवाई । सर्व करी ॥ १२ ॥
येक ह्मणती भार्गव कर्ता । येकं ह्मणती वामन कर्ता ।
येक ह्मणती परमात्मा कर्ता । येक चि आहे ॥ १३ ॥
येक ह्मणती विरणा कर्ता । येक ह्मणती बस्वणा कर्ता ।
येक ह्मणती रेवणा कर्ता । सर्व कांहीं ॥ १४ ॥
कोणी ह्मणती [1]खळ्या कर्ता । येक ह्मणती स्वामी कार्तिक कर्ता ।
येक ह्मणती वेंकटेश कर्ता । सर्व कांहीं ॥ १५ ॥
येक ह्मणती गुरु कर्ता । येक ह्मणती दत्त कर्ता ।
येक ह्मणती मुख्य कर्ता । वोढ्या जगन्नाथ ॥ १६ ॥
येक ह्मणती ब्रह्मा कर्ता । येक ह्मणती विष्णु कर्ता ।
येक ह्मणती महेश कर्ता । निश्चयेंसीं ॥ १७ ॥
येक ह्मणती प्रजन्य कर्ता । येक ह्मणती वायो कर्ता ।
येक ह्मणती करून अकर्ता । निर्गुण देव ॥ १८ ॥
येक ह्मणती माया करी । येक ह्मणती जीव करी ।
येक ह्मणती सर्व करी । प्रारब्धयोग ॥ १९ ॥

---

१ खळनाथ नांवाचें दैवत कोंकणात आहे.

येक ह्मणती प्रेत्न करी । येक ह्मणती स्वभाव करी ।
येक ह्मणती कोण करी । कोण जाणे ॥ २० ॥
ऐसा कर्त्याचा विचार । पुसतां भरला बाजार ।
आतां कोणाचें उत्तर । खरें मानावें ॥ २१ ॥
जेहिं जो देव मानिला । कर्ता ह्मणती तयाला ।
ऐसा लोकांचा गल्बला । वोसरेना ॥ २२ ॥
आपुलाल्या साभिमानें । निश्चये चि केला मनें ।
याचा विचार पाहाणें । घडेचिना ॥ २३ ॥
बहु लोकांचा बहु विचार । अवघा राहों द्या बाजार ।
परंतु याचा विचार । ऐसा आहे ॥ २४ ॥
श्रोतीं व्हावें सावधान । निश्चयें तोडावा अनुमान ।
प्रत्यये मानावा प्रमाण । जाणते पुरुषीं ॥ २५ ॥
जें जें कर्तयानें केलें । तें तें त्याउपरी जालें ।
कर्त्यापूर्वीं आडळलें । न पाहिजे कीं ॥ २६ ॥
केलें तें पंचभूतिक । आणि पंचभूतिक ब्रह्मादिक ।
तरी भूतांसें पंचभूतिक । केलें तें घडेना ॥ २७ ॥
पंचभूतास वेगळें करावें । मग कर्त्यास वोळखावें ।
पंचभूतिक तें स्वभावें । कर्त्यांत आलें ॥ २८ ॥
पंचभूतांवेगळें निर्गुण । तेथें नाहीं कर्तेपण ।
निर्विकारास विकार कोण । लाऊं शके ॥ २९ ॥
निर्गुणास कर्तव्य न घडे । सगुण जाल्यांत सापडे ।
आतां कर्तव्यता कोणेकडे । बरें पाहा ॥ ३० ॥

---

१ पंचभूतें कोणीं केलीं असा प्रश्न आहे, तेव्हा कर्ता पंचभूताहून कोणीतरी निराळा असला पाहिजे, परतु तुह्मी ब्रह्मादिकांना कर्ते ह्मणतां, तर त्यांच्यात पंचभूतिक येतें ह्मणजे ते पंचभूतिक आहेत, अर्थात् ब्रह्मादिकाना कर्ते ह्मणता येत नाहीं, असा अर्थ कोणी करितात, किंवा कोणी कर्त्यांत ह्मणजे कार्यांत असा अर्थ लावतात. २सगुण झालें ह्मणजे तें कार्यांत येतें. जाल्यात—जें झालें त्यांत, कार्यांत.

लटिक्याचा कर्ता कोण । हें पुसणें चि अप्रमाण ।
ह्मणोनि हें चि प्रमाण । जें स्वभावें चि जालें ॥ २१ ॥
येक सगुण येक निर्गुण । कोठें लाऊ कर्तेपण ।
या अर्थाचें विवरण । बरें पाहा ॥ २२ ॥
सगुणें सगुण केलें । तरी तें पूर्वी च आहे जालें ।
निर्गुणास कर्तव्य लाविलें । न वचे कीं कदा ॥ २३ ॥
येथें कर्ता चि दिसेना । प्रत्यये आणावा अनुमाना ।
दृश्य सत्यत्वें असेना । म्हणोनियां ॥ २४ ॥
केलें तें अवघें च लटिकें । तरी कर्ता हें बोलणें चि फिकें ।
वक्ता म्हणे रे विवेकें । बरें पाहा ॥ २५ ॥
बरें पाहातां प्रत्यये आला । तरी कां करावा गलबला ।
प्रचित आलियां आपणाला । अंतर्यामीं ॥ २६ ॥
आतां असो हें बोलणें । विवेकी तो चि हें जाणे ।
पूर्वपक्ष लागे उडवणें । येरवीं अनुर्वाच ॥ २७ ॥
तंव श्रोता करी प्रस्न । देहीं सुखदुःखभोक्ता कोण ।
पुढें हें चि निरूपण । बोलिलें असे ॥ २८ ॥

इति श्री कर्तानिरूपण समास अष्टम ॥ ८ ॥

---

॥ श्रीराम ॥

आत्मयास शरीरयोगें । उद्वेग चिंता करणें लागे ।
शरीरयोगें आत्मा जगे । हें तों प्रगट चि आहे ॥ १ ॥
देह अन्न चि खायेना । तरी आत्मा कदापी जगेना ।
आत्म्याविण चेतना । देहास कैंची ॥ २ ॥
हें येकाविगळें येक । करूं जातां निरार्थक ।
उभयेयोगें कोणीयेक । कार्य चाले ॥ ३ ॥

देहाला नाहीं चेतना । आत्म्यास पदार्थ उचलेना ।
स्वप्नभोजनें भरेना । पोट कांहीं ॥ ४ ॥
आत्मा स्वप्नअवस्थेंत जातो । परन्तु देहामध्यें हि असतो ।
निदसुरेपणें खाजवितो । चमत्कार पाहा ॥ ५ ॥
अन्नरसें वाढे शरीर । शरीरप्रमाणें[1] विचार ।
वृद्धपणीं तदनंतर । दोनी[2] लाहानाळती ॥ ६ ॥
उन्मत्त द्रव्य देह खातो । देहयोगें आत्मा भुलतो ।
विस्मरणें शुद्धि सांडितो । सकळ काहीं ॥ ७ ॥
देहानें घेतलें वीष । आत्मा जाये सावकास ।
वाढणें मोडणें आत्मयास । नेमस्त आहे ॥ ८ ॥
वाढणें मोडणें जाणें येणें । सुख दुःख देहाचेनि गुणें ।
नाना प्रकारें भोगणें । आत्मयास घडे ॥ ९ ॥
वारुळ ह्मणिजे पोकळ । मुंग्यांचे मार्ग चि सकळ ।
तैसें चि हें केवळ । शरीर जाणावें ॥ १० ॥
शरीरीं नाडीचा खेटा[3] । नाडीमधें पोकळ वाटा ।
लाहान थोर सगटा । दाटल्या नाडी ॥ ११ ॥
प्राणी अन्नोदक घेतो । त्याचा अन्नरस होतो ।
त्यास वायो प्रवर्ततो । स्वासोस्वासें ॥ १२ ॥
नाडिद्वारा धांवे जीवन । जीवनामधें खेळे पवन ।
त्या पवनासरिसा जाण । आत्मा हि विवरे ॥ १३ ॥
तृषेनें शोकलें शरीर । आत्म्यास कळे हा विचार ।
मग उठवून[4] शरीर । चालवी उदकाकडे ॥ १४ ॥
उदक मागे शब्द बोलवी । मार्ग पाहोन शरीर चालवी ।
शरीर अवघें च हालवी । प्रसंगानुसार ॥ १५ ॥

---

१ शरीराबरोबर विचार वाढतो. २ म्हातारपणीं शरीर आणि विचार हीं दोन्ही कमी होतात. ३ फेरा, गर्दी. ४ " उठोन " चे " उठवून " केले आहे.

क्षुधा लागते ऐसें जाणतो । मग देहाला उठवितो ।
आच्यावाच्या बोलवितो । ज्यासी त्यासी ॥ १६ ॥
नायेकात ह्मणे जालें जालें । देह सोवळें करून आणिलें ।
पायांत भरून चालविलें । तांतडीं तांतडीं ॥ १७ ॥
त्यासी पात्रावरी बैसविलें । नेत्रीं भरोन पात्र पाहिलें ।
हाताकरवीं आरंभिलें । आपोशन ॥ १८ ॥
हाताकरवीं ग्रास उचलवी । मुखीं जाऊन मुख पसरवी ।
दांताकरवीं चाववी । नेटें नेटें ॥ १९ ॥
आपण जिव्हेमधें खेळे । पाहातो परिमळसोहळे ।
कैंस काडी खडा कळे । तत्काळ थुंकी ॥ २० ॥
आळणी कळतां मीठ मागे । बायलेसि ह्मणे आगे कागे ।
डोळे ताऊन पाहों लागे । रागें रागें ॥ २१ ॥
गोडी लागतां च आनंदे । गोड नस्तां परम खेदे ।
वाकडी गोष्टी अंतरीं भेदे । आत्मयासी ॥ २२ ॥
नाना अन्नाची गोडी । नाना रसें स्वाद निवडी ।
तिखट लागतां मस्तक झाडी । आणी खोंकी ॥ २३ ॥
मिरपुडी घातली फार । कायेसें करितें खापर ।
जिव्हेकरवीं कठिणोत्तर । बोलवी रागें ॥ २४ ॥
आज्य उदंड जेविला । सर्वे च तांब्या उचलिला ।
घळघळां घेऊं लागला[1] । सावकास ॥ २५ ॥
देहीं सुखदु:खभोक्ता । तो येक आत्मा चि पाहातां ।
आत्म्याविण देह वृथा । मडें होये ॥ २६ ॥
मनाच्या अनंत वृत्ति । जाणणें ते चि आत्मस्थिति[2] ।
त्रैलोकीं जितुक्या वेक्ती । तदांतरीं आत्मा ॥ २७ ॥

---

१ घटाघटां पाणी पिऊं लागला. २ जाणणें हा आत्म्याचा धर्म होय

जगामध्यें जगदात्मा । विश्वामधें विश्वात्मा ।
सर्व चालवी सर्वात्मा । नाना रूपें ॥ २८ ॥
हुंगे चाखे ऐके देखे । मृद कठिण वोळखे ।
शीत उष्ण ठाउकें । तत्काळ होये ॥ २९ ॥
सावधपणें लाघवी । बहुत करी उठाठेवी ।
या धूर्तांच्या उगवी[1] । धूर्त चि करी ॥ ३० ॥
वायोसरिसा परिमळ येतो । परि तो परिमळ वितळोन जातो ।
वायो धुळी घेउनी येतो । परी ते हि जाये ॥ ३१ ॥
शीत उष्ण वायोसरिसें । सुवासें अथवा कुवासें ।
असिजे परी सावकासें । तगणें न घडे[2] ॥ ३२ ॥
वायोसरिसे रोग येती । वायोसरिसीं भूतें धावती ।
धूर आणी धुकटें येती । वायोसवें ॥ ३३ ॥
वायोसवें कांहीं च जगेना । आत्म्यासवें वायो तगेना[3] ।
आत्म्याची चपळता जाणा । अधिक आहे ॥ ३४ ॥
वायो कठिणास आडतो । आत्मा कठिण भेदून जातो ।
कठिण पाहों तरी तो । छेदेहिना ॥ ३५ ॥
वायो झडझडां वाजे । आत्मा काहीं च न वाजे ।
मोनें चि अंतरीं समजे । विवरोन पाहातां ॥ ३६ ॥
शरीरास बरें केलें । तें आत्मयास पावलें ।
शरीरयोगें जालें । समाधान ॥ ३७ ॥
देहावेगळे उपाये नाना । करितां आत्मयास पावेना ।
समाधान पावे वासना । देहाचेनि ॥ ३८ ॥
देहआत्मयाचें कौतुक । पाहों जातां हें अनेक ।
देहावेगळी आढणुक । आत्मयास होये ॥ ३९ ॥

---

१ उलगडा. २ फार वेळ टिकत नाहीं. ३ टिकत नाहीं, बरोबरी होत नाहीं.

येक असतां उदंड घडे । वेगळें पाहातां कांहीं च न घडे ।
विवेकें त्रैलोकीं पवाडे । देहात्मयोगें ॥ ४० ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे आत्माविवरणनाम समास नवम ॥ ९ ॥

---

॥ श्रीराम ॥

पालेमाळा सुमनमाळा । फळमाळा बीजमाळा ।
पाषाणमाळा कवडेमाळा । सूत्रें चालती ॥ १ ॥
स्फटिकमाळा मोहरेमाळा[1] । काष्ठमाळा गंधमाळा ।
धातुमाळा रत्नमाळा । जाळ्या वोळि चादोवे ॥ २ ॥
परी हें तंतूनें चालतें । तंतु नस्तां विष्कळित होतें ।
तैसें ह्मणों[2] आत्मयातें । तरी साहित्य न पडे ॥ ३ ॥
तंतूस मणी वोविला । तंतूमध्यें चि राहिला ।
आत्मा सर्वांगीं व्यापला । पाहाना कां ॥ ४ ॥
आत्मा चपळ सहजगुणें । दोरी काये चळों जाणे ।
ह्मणौन दृष्टांत देणें । साहित्य न घडे[3] ॥ ५ ॥
नाना वल्लींत जळांश । उसांमध्यें दाटला रस ।
परी तो रस आणी बाकस । येक नव्हे ॥ ६ ॥
देहीं आत्मा देह अनात्मा । त्याहून पर तो परमात्मा ।
निरंजनास उपमा । असेचिना ॥ ७ ॥
रायापासून रंकवरी । अवघ्या मनुष्याचिया हारी ।
सगट समान सरी । कैसी करावी ॥ ८ ॥
देव दानव मानव । नीच योनी हीन जीव ।
पापी सुकृति अभिप्राव । उदंड आहे ॥ ९ ॥

---

१ मोहरा म्हणून एक औषधी मणी आहे. २ ज्याप्रमाणें एका दोऱ्यांत सर्व मणी ओंवलेले असतात, त्याप्रमाणें सर्व ठिकाणीं एक च आत्मा व्यापून आहे. परंतु हा दोऱ्याचा दृष्टान्त कमसल आहे, तो पूर्णपणें लागू पडत नाहीं. ३ ' विहित नव्हे ' असा चरण प्रथम होता.

येकाशीं जग चाले । परी सामर्थ्य वेगळालें ।
येकासंगें मुक्त केलें । येकासगें रवरव ॥ १० ॥
साकर माती पृथ्वी होये । परी ते माती खातां न ये ।
गरळ आप नव्हे काये । परी तें खोटें ॥ ११ ॥
पुण्यात्मा आणी पापात्मा । दोहिंकडे अंतरात्मा ।
साधु भोंदु सीमा । सांडूं च नये ॥ १२ ॥
अंतर येक तों खरें । परी सांगातें घेऊं न येती माहारें[1] ।
पंडित आणि चाटें पोरें । येक कैसीं ॥ १३ ॥
मनुष्य आणि गधडे । राजहंस आणि कोंबडे ।
राजे आणि माकडें । येक कैसीं ॥ १४ ॥
भागीरथीचें जळ आप । मोरी संवदणी[2] तें हि आप ।
कुश्चिळ उदक अल्प । सेववेना ॥ १५ ॥
याकारणें आचारशुद्ध । त्याउपरी विचारशुद्ध ।
वीतरागी आणि सुबुद्ध । ऐसा पाहिजे ॥ १६ ॥
शूरांहून मानिलें लंडी । तरी युद्धप्रसंगीं नरकाडी[3] ।
श्रीमंत सांडून बराडी[4] । सेवितां कैसें ॥ १७ ॥
येका उदकें सकळ जालें । परी पाहोन पाहिजे सेविलें ।
सगट अवघें च घेतलें । तरी तें मूर्खपण ॥ १८ ॥
जीवनाचें च जालें अन्न । अन्नाचें जालें वमन ।
परी वमनाचें भोजन । करितां न ये ॥ १९ ॥
तैसें निंद्य सोडून द्यावें । वंद्य तें ह्रदईं धरावें ।
सत्कीर्तीनें भरावें । भूमंडळ ॥ २० ॥
उत्तमांसि उत्तम माने । कनिष्ठांस तें न माने ।
ह्मणौन केरटे[5] देवानें । करून ठेविले[6] ॥ २१ ॥

---

१ सर्वांचा अंतरात्मा एक च आहे हें खरें, तरी पण, आपल्या संगतीला महार घेतां येत नाहींत. २ परटाची सताल ( पात्र ). ३ घाण, फजिती ४ दरिद्री. ५ " टा " चा " टे " केला आहे. ६ " ला " चा " ले " केला आहे.

सांडा अवघें करंटपण । धरावें उत्तम लक्षण ।
हरिकथा पुराण श्रवण । नीति न्याये ॥ २२ ॥
वर्तायाचा विवेक । राजी राखणें सकळ लोक ।
हळुहळु पुण्यश्लोक । करीत जावे ॥ २३ ॥
मुलाचे चालीनें चालावें । मुलाच्या मनोगतें बोलावें ।
तैसें जनास सिकवावें । हळुहळु ॥ २४ ॥
मुख्य मनोगत राखणें । हें चि चातुर्याचीं लक्षणें ।
चतुर तो चतुरांग जाणे । इतर तीं वेडीं ॥ २५ ॥
वेड्यास वेडें ह्मणों नये । वर्म कदापि बोलों नये ।
तरी च घडे दिग्विजये । निस्पृहासी ॥ २६ ॥
उदंड स्थळीं उदंड प्रसंग । जाणोनि करणें येथासांग ।
प्राणिमात्राचा अंतरग । होऊन जावें ॥ २७ ॥
मनोगत राखोन जातां । परस्परें होये अवस्ता ।
मनोगत तोडितां वेवस्ता । बरी नाहीं ॥ २८ ॥
याकारणें मनोगत । राखेल तो मोठा महंत ।
मनोगत राखतां समस्त । वोढोन येती ॥ २९ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसवादे सिकवणनिरूपणनाम समास दशम ॥ १० ॥

---

## ॥ अखंडध्याननाम दशक चतुर्दश ॥ १४ ॥

॥ श्रीराम ॥

ऐका निस्पृहाची सिकवण । युक्ति बुद्धि शाहाणपण ।
जेणें राहे समाधान । निरंतर ॥ १ ॥
सोपा मंत्र परी नेमस्त । साधें वोषध गुणवंत ।
साधें बोलणें सप्रचीत । तैसें भाक्षें ॥ २ ॥

---

१ राखों. २ प्रतीति आणून देणारा

तत्काळ चि अवगुण जाती । उत्तम गुणाची होये प्राप्ती ।
शब्दवोषध तीव्र श्रोतीं । साक्षेपें सेवावें ॥ ३ ॥
निस्पृहता धरूं नये । धरिली तरी सोडूं नये ।
सोडिली तरी हिंडों नये । वोळखीमधें ॥ ४ ॥
कांता दृष्टी राखों नये । मनास गोडी चाखऊं नये ।
धारिष्ट चळला दाखऊं नये । मुख आपुलें ॥ ५ ॥
येके स्थळीं राहों नये । कानकोंडें साहों नये ।
द्रव्य दारा पाहों नये । आळकेपणें[1] ॥ ६ ॥
आचारभ्रष्ट होऊं नये । दिल्यां द्रव्य घेऊं नये ।
उणा शब्द येऊं नये । आपणावरी ॥ ७ ॥
भिक्षेविषीं लाजों नये । बहुत भिक्षा घेऊं नये ।
पुसता हि देऊं नये । वोळखी आपली ॥ ८ ॥
धड मळिण नेसों[2] नये । गोड अन्न खाऊं नये ।
दुराग्रह करूं नये । प्रसगें वर्तावें ॥ ९ ॥
भोगीं मन असों नये । देहदुःखें त्रासों नये ।
पुढें आशा धरूं नये । जीवित्वाची ॥ १० ॥
विरक्ती गळों देऊं नये । धारिष्ट चळों देऊं नये ।
ज्ञान मळिण होऊं नये । विवेकबळें ॥ ११ ॥
करुणाकीर्तन सोडूं नये । अतर्ध्यान मोडूं नये ।
प्रेमतंतु तोडूं नये । सगुणमूर्तीचा ॥ १२ ॥
पोटीं चिंता धरूं नये । कष्टें खेद मानूं नये ।
समई धीर सांडूं नये । काहीं केल्यां ॥ १३ ॥
अपमानितां सिणों नये । निखदितां कष्टों नये ।
धिःकारितां झुरों नये । कांहीं केल्यां ॥ १४ ॥
लोकलाज धरूं नये । लाजविता लाजों नये ।
खिजवितां खिजों नये । विरक्त पुरुषें ॥ १५ ॥

---

१ अभिलाषबुद्धीनें. २ धड असावें, मळिण वस्त्र नेसूं नये.

शुद्धमार्ग सोडूं नये । दुर्जनासीं तंडों नये ।
समंध पडों देऊं नये । चांडाळासी ॥ १६ ॥
तपीळपण धरू नये । भाडविता भाडों नये ।
उडविता उडऊं नये । निजस्थिती आपुली ॥ १७ ॥
हांसवितां हासों नये । बोलवितां बोलों नये ।
चालविता चालों नये । क्षणक्षणा ॥ १८ ॥
येक वेष धरूं नये । येक साजे करूं नये ।
येकदेसी होऊं नये । भ्रमण करावें ॥ १९ ॥
सलगी पडों देऊं नये । पतिग्रह घेऊं नये ।
सभेमध्यें बैसों नये । सर्वकाळ ॥ २० ॥
नेम आंगीं लाऊ नये । भरवसा कोणास देऊं नये ।
अंगिकार करूं नये । नेमस्तपणाचा ॥ २१ ॥
नित्यनेम साडूं नये । अभ्यास बुडों देऊ नये ।
परतंत्र होऊं नये । कांहीं केल्यां ॥ २२ ॥
स्वतंत्रता मोडूं नये । निरापेक्षा तोडूं नये ।
परापेक्षा होऊं नये । क्षणक्षणा ॥ २३ ॥
वैभव दृष्टीं पाहों नये । उपाधीसुखें राहों नये ।
येकांत मोडूं देऊं नये । स्वरूपस्थितीचा ॥ २४ ॥
अनर्गळता करूं नये । लोकलाज धरूं नये ।
कोठेंतरी होऊं नये । आसक्त कदां ॥ २५ ॥
परंपरा तोडूं नये । उपाधी मोडूं देऊं नये ।
ज्ञानमार्ग सोडूं नये । कदाकाळीं ॥ २६ ॥
कर्ममार्ग सांडूं नये । वैराग्य मोडूं देऊ नये ।
साधन भजन खंडूं नये । कदाकाळीं ॥ २७ ॥

---

१ एका च थाटानें राहूं नये, निरनिराळे वेष धारण करावे. २ प्रतिग्रह. ३ स्वेच्छाचार ४ " ध " चा " क " केला आहे. ५ " लोकनिंद्य करूं नये । " असा चरण प्रथम होता. ६ उपासनामार्गाची उपाधि.

अतिवाद करूं नये । अनित्य[1] पोटीं धरूं नये ।
रागें भरीं भरों नये । भलतीकडे ॥ २८ ॥
न मनी त्यास सांगों नये । कंटाळवाणें बोलों नये ।
बहुसाल असों नये । येके स्थळीं ॥ २९ ॥
कांहीं उपाधी करूं नये । केली तरी धरूं नये ।
धरिली तरी सापडों नये । उपाधीमधें ॥ ३० ॥
थोरपणें असों नये । महत्व धरून बैसों नये ।
कांहीं मान इछूं नये । कोठेंतरी ॥ ३१ ॥
साधेपण सोडूं नये । सानेपण मोडूं नये ।
बळात्कारें जोडूं नये । अभिमान आगीं ॥ ३२ ॥
अधिकारेवीण सांगों नये । दाटून उपदेश देऊं नये ।
कानकोंडा करूं नये । परमार्थ[2] कदा ॥ ३३ ॥
कठिण वैराग्य सोडूं नये । कठिण अभ्यास सांडूं नये ॥
कठिणता धरूं नये । कोणेकेविशइ ॥ ३४ ॥
कठिण शब्द बोलों नये । कठिण आज्ञा करूं नये ।
कठिण धीरत्व सोडूं नये । कांहीं केल्यां ॥ ३५ ॥
आपण आसक्त होऊं नये । केल्यावीण सांगों नये ।
बहुसाल मागों नये । शिष्यवर्गासी ॥ ३६ ॥
उत्धट शब्द बोलों नये । इंद्रियेंस्मरण करूं नये ।
शाक्तमार्गें भरों नये । मुक्तपणें भरीं ॥ ३७ ॥
नीच कृतीं लाजों नये । वैभव होतां माजों नये ।
क्रोधें भरीं भरों नये । जाणपणें ॥ ३८ ॥
थोरपणें चुकों नये । न्याये नीति सांडूं नये ।
अप्रमाण वर्तों नये । कांहीं केल्यां ॥ ३९ ॥
कळल्यावीण बोलों नये । अनुमानें निश्चये करूं नये ।
सांगतां दुःख धरूं नये । मूर्खपणें ॥ ४० ॥

---

१ अनीति २ कोणाचा अधिकार नसता किंवा एकाद्याच्या पाठीस लागून त्यास उपदेश केला असता गुरूला ओशाळे होण्याचा प्रसंग यावयाचा असा परमार्थ करूं नये.

सावधपण सोडूं नये । व्यापकपण सांडूं नये ।
कदा सुख मानूं नये । निसुगपणाचें ॥ ४१ ॥
विकल्प पोटीं धरूं नये । स्वार्थआज्ञा करूं नये ।
केली तरी टाकूं नये । आपणास पुढें ॥ ४२ ॥
प्रसंगेंवीण बोलों नये । अन्वयेंवीण गाऊं नये ।
विचारेंवीण जाऊं नये । अविचारपथें ॥ ४३ ॥
परोपकार सांडूं नये । परपीडा करूं नये ।
विकल्प पडों देऊं नये । कोणीयेकासी ॥ ४४ ॥
नेणपण सोडूं नये । महंतपण सांडूं नये ।
द्रव्यासाठीं हिंडों नये । कीर्तन करीत ॥ ४५ ॥
संशयात्मक बोलों नये । बहुत निश्चये करूं नये ।
निर्वाहेंवीण धरूं नये । ग्रंथ हातीं ॥ ४६ ॥
जाणपणें पुसों नये । अहंभाव दिसों नये ।
सांगेन ऐसें ह्मणों नये । कोणीयेकासी ॥ ४७ ॥
ज्ञानगर्व धरूं नये । सहसा छळणा करूं नये ।
कोठें वाद घालूं नये । कोणीयेकासीं ॥ ४८ ॥
स्वार्थबुद्धी जडों नये । कारबारीं पडों नये ।
कार्येकर्ते होऊं नये । राजद्वारीं ॥ ४९ ॥
कोणास भर्वसा देऊं नये । जड भिक्षा मागों नये ।
भिक्षेसाठीं सांगों नये । परंपरा आपुली ॥ ५० ॥
सोइरिकींत पडों नये । मर्ध्यावर्ति वडों नये ।
प्रपंचाची जडों नये । उपाधी आंगीं ॥ ५१ ॥

---

१ स्वार्थआज्ञा केली तर निदान तींत आपणास पुढें टाकूं नये, ह्मणजे ती केवळ आपल्या स्वत पुरती च नसावी, सार्वजनिक असावी २ ग्रंथ लावण्याची शक्ति आंगीं असेल तर च लोकाना समजून सांगण्यासाठीं तो हातीं धरावा, एरव्हीं नाहीं. ३ दुसऱ्यांच्या सोयरिकी जमवून देण्याच्या कामांत पडूं नये. ४ मध्यस्ती करूं नये.

प्रपंचप्रस्तीं जाऊं नये । बाष्कळ अन्न खाऊं नये ।
पाहुण्यासरिसें घेऊं नये । आमंत्रणें कदा ॥ ५२ ॥
श्राध पक्ष सटी सामासें । शांती फळशोबन बारसें ।
भोग राहाण बहुवसें । नवस व्रतें उद्यापनें ॥ ५३ ॥
तेथें निस्पृहें जाऊं नये । त्याचें अन्न खाऊं नये ।
येळिलेंवाणें करूं नये । आपणासी ॥ ५४ ॥
लग्नमुहूर्तीं जाऊं नये । पोटासाठीं गाऊं नये ।
मोलें कीर्तन करूं नये । कोठेंतरी ॥ ५५ ॥
आपली भिक्षा सोडूं नये । वारें अन्न खाऊं नये ।
निस्पृहासि घडों नये । मोलयात्रा ॥ ५६ ॥
मोलें सुकृत करूं नये । मोलपुजारी होऊं नये ।
दिल्हा तरी घेऊं नये । इनाम निस्पृहें ॥ ५७ ॥
कोठें मठ करूं नये । केला तरी तो धरूं नये ।
मठपती होऊन बैसों नये । निस्पृह पुरुषें ॥ ५८ ॥
निस्पृहें अवघें चि करावें । परी आपण तेथें न संपडावें ।
परस्परें उभारावें । भक्तिमार्गासी ॥ ५९ ॥
प्रेत्नेंविण राहों नये । आळस दृष्टी आणूं नये ।
देह अस्ता पाहों नये । वियोग उपासनेचा ॥ ६० ॥
उपाधीमध्यें पडों नये । उपाधी आगीं जडों नये ।
भजनमार्ग मोडूं नये । निसंगळपणें[3] ॥ ६१ ॥
बहु उपाधी करूं नये । उपाधीविण कामा नये ।
सगुणभक्ति सोडूं नये । विभक्ति खोटी ॥ ६२ ॥

---

१ प्रपंचाचें फारसें प्रस्थ माजवूं नये, असा अर्थ कोणी लावतात व ज्या ठिकाणीं प्रपंचाचें प्रस्थ फार आहे अशा ठिकाणीं जाऊं नये, असा अर्थ कोणी करितात. २ ओशाळे ३ निर्लज्जपणानें, अव्यवस्थित रीतीनें ४ सगुण भक्तींत भक्त व देव हे साहजिक च वेगळे पडतात, ह्मणून सगुण भक्ति जरी करावयास श्रीसमर्थ सांगतात तरी देवापासून विभक्त राहणें हें हि बरें नव्हे असें ते ह्मणतात.

बहुसाल धांवों नये । बहुसाल राहों नये ।
बहुत कष्ट करूं नये । असुदें[1] खोटें ॥ ६३ ॥
बहुसाल बोलों नये । अबोलणें कामा नये ।
बहुत अन्न खाऊं नये । उपवास खोटा ॥ ६४ ॥
बहुसाल निजों नये । बहुत निद्रा मोडूं नये ।
बहु नेम धरूं नये । बाश्कळ खोटें ॥ ६५ ॥
बहु जनीं असों नये । बहु आरण्य सेऊं नये ।
बहु देह पाळूं नये । आत्महत्या खोटी ॥ ६६ ॥
बहु संग धरूं नये । संतसग सांडूं नये ।
कर्मठपण कामा नये । अनाचार खोटा ॥ ६७ ॥
बहु लोकिकें[2] सांडूं नये । लोकाधेन होऊं नये ।
बहु प्रीती कामा नये । निष्ठुरता खोटी ॥ ६८ ॥
बहु सशये धरूं नये । मुक्तमार्ग कामा नये ।
बहु साधनीं पडों नये । साधनेंवीण खोटें ॥ ६९ ॥
बहु विषये भोगूं नये । विषयत्याग करिता नये[3] ।
देहलोभ धरूं नये । बहु त्रासें[4] खोटा ॥ ७० ॥
वेगळा अनुभव घेऊं नये । अनुभवेंवीण कामा नये ।
आत्मस्थिती बोलों नये । स्तब्धता खोटी ॥ ७१ ॥
मन उरों देऊं नये[5] । मनेंवीण कामा नये ।
अलक्ष वस्तु लक्षा नये[6] । लक्षेंवीण खोटें ॥ ७२ ॥

---

१ आयतें. २ लोकाचार. ३ सर्वस्वीं विषयत्याग करणें शक्य च नाहीं, कार्याकारण विषयसेवन सर्वांना च घडत असतें ४ देहाला फार त्रास देणें हें हि बरें नव्हे. ५ उन्मन व्हावें. ६ अलक्ष जी वस्तु ती लक्षित होत नाहीं, म्हणून तिकडे लक्ष च न लावलें तर चालेल असें नाहीं, तिकडे लक्ष लावलें च पाहिजे.

मनबुद्धीअगोचरें[1] । बुद्धीवीण अंधकार ।
जाणीवेचा पडो विसर[2] । नेणीव खोटी ॥ ७३ ॥
ज्ञातेपण धरूं नये । ज्ञानेंवीण कामा नये ।
अतर्क्य वस्तु तर्का न ये । तर्केंवीण खोटें ॥ ७४ ॥
दृश्यस्मरण कामा नये । विस्मरण पडों नये ।
कांहीं चर्चा करूं नये । केलीयावीण न चले ॥ ७५ ॥
जगीं भेद कामा नये । वर्णसंकर करूं नये ।
आपला धर्म उडऊं नये । अभिमान खोटा ॥ ७६ ॥
आशाबद्धत[3] बोलों नये । विवेकेंवीण चालों नये ।
समाधान हालों नये । कांहीं केल्यां ॥ ७७ ॥
अबद्ध पोथी लेहों नये । पोथीवीण कामा नये ।
अबद्ध वाचूं नये । वाचिल्यावीण खोटें ॥ ७८ ॥
निस्पृहें वगत्रुत्व सांडूं नये । आशंका घेता भांडों नये ।
श्रोतयाचा मानूं नये । वीट कदा ॥ ७९ ॥
हे सिकवण धरितां चित्तीं । सकळ सुखें वोळंगती[4] ।
आंगीं बाणे महंती । अकस्मात ॥ ८० ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे निस्पृहलक्षणनाम समास प्रथम ॥ १ ॥

---

॥ श्रीराम ॥

ब्राह्मणाची मुख्य दीक्षा । मागितली पाहिजे भिक्षा ।
वों भवति या पक्षा । रक्षिलें पाहिजे ॥ १ ॥
भिक्षा मागोन जो जेविला । तो निराहारी बोलिला ।
पतिग्रहोंवेगळा[5] जाला । भिक्षा मागतां ॥ २ ॥

---

१ ब्रह्मस्वरूप मनबुद्धीला अगोचर आहे ह्मणून स्वस्थ बसतां कामा नये, बुद्धीवांचून सर्व अंधकार आहे, स्वरूपाकडे बुद्धि नेली पाहिजे २ जाणीव नाहींशी झाली पाहिजे, ह्मणजे नेणीव चांगली असें मात्र नव्हे. ज्ञानाचें विज्ञान झालें पाहिजे. ३ " बद्धत " असें मुळांत दिसतें, परंतु " द्ध " चा " हु " केला असावा असें वाटतें ४ वोळंगतात, प्राप्त होतात. ५ प्रतिग्रहावेगळा.

संतासंत जे जन । तेथें कोरान्न मागोन करी भोजन ।
तेणें केलें अमृतप्राशन । प्रतिदिनीं ॥ ३ ॥

॥ श्लोक ॥ भिक्षाहारी निराहारी । भिक्षा नैव प्रतिग्रहः ।
असतो वापि संतो वा । सोमपान दिने दिने ॥ १ ॥

ऐसा भिक्षेचा महिमा । भिक्षा माने सर्वोत्तमा ।
ईश्वराचा अगाध महिमा । तो हि भिक्षा मागे ॥ ४ ॥
दत्त गोरक्ष आदिकरुनी । सिद्ध भिक्षा मागती जनीं ।
निस्पृहता भिक्षेपासुनी । प्रगट होये ॥ ५ ॥
वार लाऊन बैसला । तरी तो पराधेन जाला ।
तैसी च नित्यावळीला । स्वतंत्रता कैंची ॥ ६ ॥
आठा दिवसां धान्य मेळविलें । तरी तें कटाळवाणें जालें ।
प्राणी येकायेकीं चेवलें । नित्यनूतनतेपासुनी ॥ ७ ॥
नित्य नूतन हिंडावें । उदंड देशाटण करावें ।
तरी च भिक्षा मागता बरवें । श्लाघ्यवाणें ॥ ८ ॥
अखंड भिक्षेचा अभ्यास । तयास वाटेना परदेश ।
जिकडे तिकडे स्वदेश । भुवनत्रै ॥ ९ ॥
भिक्षा मागतां किरकों नये । भिक्षा मागतां लाजों नये ।
भिक्षा मागतां भागों नये । परिभ्रमण करावें ॥ १० ॥
भिक्षा आणि चमत्कार । चाकाटती[१] लाहानथोर ।
कीर्ति वर्णी निरंतर । भगवंताची ॥ ११ ॥
भिक्षा ह्मणिजे कामधेनु । सदा फळ नव्हे सामान्यु ।
भिक्षेस करी जो अमान्यु । तो करंटा जोगी ॥ १२ ॥
भिक्षेनें वोळखी होती । भिक्षेनें भरमे[२] चुकती ।
सामान्य भिक्षा मान्य करिती । सकळ प्राणी ॥ १३ ॥
भिक्षा ह्मणिजे निर्भये स्थिती । भिक्षेनें प्रगटे महंती ।
स्वतंत्रता ईश्वरप्राप्ती । भिक्षागुणें ॥ १४ ॥

---

१ चकित होतात. ज्याच्या हातून चमत्कार घडत आहेत असा मनुष्य निस्पृहपणें भिक्षा मागतांना पाहून लहान थोर आश्चर्य करितात. २ भ्रम.

भिक्षेस नाहीं आडथाळा । भिक्षाहारी तो मोकळा
भिक्षेकरिता सार्थक वेळा । काळ जातो ॥ १५ ॥
भिक्षा ह्मणिजे अमरवल्ली । जिकडे तिकडे लगडली ।
भवकाळीं फळदायेनी जाली । निर्लजासी ॥ १६ ॥
पृथ्वीमधें देश नाना । फिरतां उपवासी मरेना ।
कोणे येके ठाईं जना । जड नव्हे ॥ १७ ॥
गोरज्य[1] वाणिज्य[2] कृषी[3] । त्याहून प्रतिष्ठा भिक्षेसी ।
विसभों नये झोळीसी । कदाकाळीं ॥ १८ ॥
भिक्षेऐसें नाहीं वैराग्य । वैराग्यापरतें नाहीं भाग्य ।
वैराग्य नस्तां अभाग्य । येकदेसी ॥ १९ ॥
काहीं भिक्षा आहे ह्मणावें । अल्पसंतोषी असावें ।
बहुत आणितां घ्यावें । मुष्टी येक ॥ २० ॥
सुखरूप भिक्षा मागणें । ऐसीं निस्पृहतेचीं लक्षणें ।
मृद वागविळास करणें । परम सौख्यकारी ॥ २१ ॥
ऐसी भिक्षेची स्थिती । अल्प बोलिलें येथामती ।
भिक्षा वांचवी विपत्ती । होणार काळीं ॥ २२ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे भिक्षानिरूपणनाम समास द्वितीय ॥२॥

---

॥ श्रीराम ॥

कवित्व शब्दसुमनमाळा । अर्थ परिमळ आगळा ।
तेणें संतषट्पदकुळा । आनंद होये ॥ १ ॥
ऐसी माळा अंतःकरणीं । गुंफून पूजा रामचरणीं ।
वोंकारतंत अखंडपणीं । खंडूं च नये ॥ २ ॥
परोपकाराकारणें । कवित्व अगत्य करणें ।
तया कवित्वाचीं लक्षणें । बोलिजेती ॥ ३ ॥

---

१ " क्ष " ला हरताळ लावून वर " ज्य " लिहिला आहे. गवळ्याचा धंदा-
२ व्यापार. ३ शेतकी.

जेणें घडे भगवद्भक्ती । जेणें घडे विरक्ती ।
ऐसिया कवित्वाची युक्ती । आधीं वाढवावी ॥ ४ ॥
क्रियेवीण शब्दज्ञान । तया न मनिती सज्जन ।
ह्मणौनी देव प्रसन्न । अनुतापें करावा ॥ ५ ॥
देवाचेन प्रसन्नपणें । जें जें घडे बोलणें ।
तें तें अत्यंत श्लाघ्यवाणें । या नाव प्रसादिक ॥ ६ ॥
धीट पाठ प्रसादिक । ऐसें बोलती अनेक ।
तरी हा त्रिविध विवेक । बोलिजेल ॥ ७ ॥
धीट ह्मणिजे धीटपणें केलें । जें जें आपुल्या मनास आलें ।
बळें चि कवित्व रचिलें । या नाव धीट बोलिजे ॥ ८ ॥
पाठ ह्मणिजे पाठांतर । बहुत पाहिलें ग्रंथांतर ।
तयासारिखा उतार । आपण हि केला ॥ ९ ॥
सीघ्र चि कवित्व जोडिलें । दृष्टी पडिलें तें चि वर्णिलें ।
भक्तिवांचून जें केलें । त्या नाव धीटपाठ ॥ १० ॥
कामिक रसिक शृंगारिक । वीर हास्य प्रस्ताविक ।
कौतुक विनोद अनेक । या नाव धीटपाठ ॥ ११ ॥
मन जालें कामाकार । तैसे चि निघती उद्गार ।
धीटपाठें परपार[1] । पाविजेत नाहीं ॥ १२ ॥
व्हावया उदरशांती । करणें लागे नरस्तुती ।
तेथें केली जे वित्पत्ती । त्या नाव धीटपाठ ॥ १३ ॥
कवित्व नसावें धीटपाठ । कवित्व नसावें खटपट ।
कवित्व नसावें उद्धट । पाषांडमत ॥ १४ ॥
कवित्व नसावें वादांग । कवित्व नसावें रसभंग ।
कवित्व नसावें रंगभंग । दृष्टांतहीन ॥ १५ ॥

---

१ (भवसागराचा) पलिकडचा किनारा.

कवित्व नसावें पाल्हाळ । कावित्व नसावें बाष्कळ ।
कवित्व नसावें कुटीळ । लक्षुनियां ॥ १६ ॥
हीन कवित्व नसावें । बोलिलें चि न बोलावें ।
छंदभंग न करावें । मुद्राहीनें ॥ १७ ॥
वित्पत्तीहीन तर्कहीन । कळाहीन शब्दहीन ।
भक्तिज्ञानवैराग्यहीन । कावित्व नसावें ॥ १८ ॥
भक्तिहीन जें कवित्व । तें चि जाणावें ठोंबें मत ।
आवडीहीन जें वगत्रुत्व । कंटाळवाणें ॥ १९ ॥
भक्तिविण जो अनुवाद । तो चि जाणावा विनोद ।
प्रीतीविण संवाद । घडे केवी ॥ २० ॥
असो धीट पाठ तें ऐसें । नाथिलें अहंतेचें पिसें ।
आतां प्रसादिक तें कैसें । सांगिजेल ॥ २१ ॥
वैभव कांता कांचन । जयास वाटे हें वमन ।
अंतरीं लागलें ध्यान । सर्वोत्तमाचें ॥ २२ ॥
जयास घडीनें घडी । लागे भगवतीं आवडी ।
चढती वाढती गोडी । भगवद्भजनाची ॥ २३ ॥
जो भगवद्भजनेंवीण । जाऊं नेदी येक क्षण ।
सर्वकाळ अंतःकरण । भक्तिरंगें रंगलें ॥ २४ ॥
जया अंतरीं भगवंत । अचळ राहिला निवांत ।
तो स्वभावें जें बोलत । तें ब्रह्मनिरूपण ॥ २५ ॥
अंतरीं बैसला गोविंद । तेणें लागला भक्तिछंद ।
भक्तीविण अनुवाद । आणीक नाहीं ॥ २६ ॥
आवडी लागली अंतरीं । तैसी च वदे वैखरी ।
भावें करुणाकीर्तन करी । प्रेमभरें नाचतु ॥ २७ ॥
भगवंतीं लागलें मन । तेणें नाठवे देहभान ।
शंका लज्या पळोन । दुरी ठेली ॥ २८ ॥

---

१ कवित्वलक्षणविरहित.

तो प्रेमरंगें रंगला । तो भक्तिमदें मातला ।
तेणें अहंभाव घातला । पायांतळीं ॥ २९ ॥
गात नाचत निशंक । तयास कैचे दिसती लोक ।
दृष्टीं त्रैलोक्यनायेक । बसोन ठेला ॥ ३० ॥
ऐसा भगवंतीं रंगला । आणीक कांहीं नलगे त्याला ।
स्वइछा वर्णूं लागला । ध्यान कीर्ती प्रताप ॥ ३१ ॥
नाना ध्यानें नाना मूर्ती । नाना प्रताप नाना कीर्ती ।
तयापुढें नरस्तुती । त्रुणतुल्य वाटे ॥ ३२ ॥
असो ऐसा भगवद्भक्त । जो ये संसारीं विरक्त ।
तयास मानिती मुक्त । साधुजन ॥ ३३ ॥
त्याचे भक्तीचें कौतुक । तया नाव प्रसादिक ।
सहज बोलतां विवेक । प्रगट होय ॥ ३४ ॥
ऐका कवित्वलक्षण । केलें च करूं निरूपण ।
जेणें निवे अंतःकर्ण । श्रोतयांचें ॥ ३५ ॥
कवित्व असावें निर्मळ । कवित्व असावें सरळ ।
कवित्व असावें प्रांजळ । अन्वयाचें ॥ ३६ ॥
कवित्व असावें भक्तिबळें । कवित्व असावें अर्थागळें[१] ।
कवित्व असावें वेगळें । अहंतेसी ॥ ३७ ॥
कवित्व असावें कीर्तिवाड । कवित्व असावें रम्य गोड ।
कवित्व असावें जाड । प्रतापविषीं ॥ ३८ ॥
कवित्व असावें सोपें । कवित्व असावें अल्परूपें ।
कवित्व असावें सुलपें[२] । चरणबंद ॥ ३९ ॥
मृद मंजुळ कोमळ । भव्य अद्भुत विशाळ ।
गौल्य माधुर्य रसाळ । भक्तिरसें ॥ ४० ॥
अक्षरबंद पदबंद । नाना चातुर्य प्रबंद ।
नाना कौशल्यता छंदबंद । घाटी मुद्रा अनेक ॥ ४१ ॥

---

१ अर्थप्रचुर. २ सुलभ, सोपें.

नाना युक्ती नाना बुद्धी। नाना कळा नाना सिद्धी।
नाना अन्वये साधी। नाना कवित्व ॥ ४२ ॥
नाना साहित्य दृष्टांत। नाना तर्क घात मात।
नाना संमती सिद्धांत। पूर्वपक्षेंसीं ॥ ४३ ॥
नाना गती नाना वित्पत्ती। नाना मती नाना स्फूर्ति।
नाना धारणा नाना धृती। या नाव कवित्व ॥ ४४ ॥
शंका आशंका प्रत्योत्तरें। नाना काव्यें शास्त्राधारें।
तुटे संशये निर्धारें। निर्धारितां ॥ ४५ ॥
नाना प्रसंग नाना विचार। नाना योग नाना विवरें[1]।
नाना तत्वचर्चासार। या नाव कवित्व ॥ ४६ ॥
नाना साधनें पुरश्चरणें। नाना तपें तीर्थाटणें।
नाना संदेह फेडणें। या नाव कवित्व ॥ ४७ ॥
जेणें अनुताप उपजे। जेणें लौकिक लाजे।
जेणें ज्ञान उमजे। या नाव कवित्व ॥ ४८ ॥
जेणें ज्ञान हें प्रबळे। जेणें वृत्ती हे मावळे।
जेणें भक्तिमार्ग कळे। या नाव कवित्व ॥ ४९ ॥
जेणें देहबुद्धी तुटे। जेणें भवसिंधु आटे।
जेणें भगवंत प्रगटे। या नाव कवित्व ॥ ५० ॥
जेणें सद्बुद्धि लागे। जेणें पाषांड भगे।
जेणें विवेक जागे। या नाव कवित्व ॥ ५१ ॥
जेणें सद्वस्तु भासे। जेणें भास हा निरसे।
जेणें भिन्नत्व नासे। या नाव कवित्व ॥ ५२ ॥
जेणें होये समाधान। जेणें तुटे संसारबधन।
जया मानिती सज्जन। तया नाव कवित्व ॥ ५३ ॥

---

1 विवरण.

ऐसें कवित्वलक्षण । सांगतां तें असाधारण ।
परंतु कांहींयेक निरूपण । बुझावया केलें ॥ ५४ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे कवित्वकळानिरूपणनाम समास तृतीय॥३

॥ श्रीराम ॥

कळयुगीं कीर्तन करावें । केवळ कोमळ कुशळ गावें ।
कठीण कर्कश कुटें[1] सांडावें । येकीकडे ॥ १ ॥
खटखट खुंटून टाकावी । खळखळ खळांसीं न करावी ।
खरें खोटें खवळों नेदावी । वृत्ती आपुली ॥ २ ॥
गर्वगाणें गाऊं नये । गातां गातां गळों नये ।
गोप्य गुज गजों नये । गुण गावे ॥ ३ ॥
घष्टणी[2] घिसणी[3] घस्मरपणें[4] । घसर घसरूं घसा खाणें ।
घुमघुमों चि घुमणें । योग्य नव्हे ॥ ४ ॥
नाना नामें भगवताचीं । नाना ध्यानें सगुणाचीं ।
नाना कीर्तनें कीर्तीचीं । अद्भुत करावीं ॥ ५ ॥
चेकचक चुकावेना[5] । चाट चावट[6] चळावेना ।
चरचर चुरचुर लागेना । ऐसें करावें ॥ ६ ॥
छळछळ छळणा करूं नये । छळितां छळितां छळों नये ।
छळणें छळणा करूं नये । कोणीयेकाची ॥ ७ ॥
जि जि जि जि ह्मणावेना[7] । जो जो जागे तो तो पावनां
जपजपों जनींजनार्दना । संतुष्ट करावें ॥ ८ ॥
झिरपे झरे पाझरे जळ । झळके दुरुनी झळाळ ।
झडझडां[8] झळकती सकळ । प्राणी तेथें ॥ ९ ॥

---

१ कुचर. २ घासाघासी. ३ घिसघिस ४ घसघस. ५ चकविणें नसावें, चुकूं नये. ६ चावटपणा नसावा, चळूं नये. ७ ह्मणूं नये. ८ पावना ह्मणजे पावेना असें मानून, जो जो जागतो तो तो ( परमेश्वरस्वरूपाला ) पावतो च असें नाहीं, असा कोणी अर्थ करतात व जो जो कीर्तनात जागतो तो तो पावन होतो असा अर्थ कित्येक करितात. ९ नेत्रांवाटें पाणी येतें.

या या या या ह्मणावें नलगे । या या या या उपाव नलगे ।
या या या या कांहीं च नलगे । सुबुद्धासी ॥ १० ॥
टक टक टक करूं नये । टाळाटाळी टिकों नये ।
टम टम टम टम लाऊं नये । कंटाळवाणी ॥ ११ ॥
ठस ठोंबस[1] ठांकावेना । ठक ठक ठक करावेनां[2] ।
ठाकें ठमकें ठसावेना । मूर्तिध्यानें[3] ॥ १२ ॥
डळमळ डळमळ डकों[4] नैये । डगमग डगमग कामा नये ।
डंडळ डंडळ चुकों[5] नैये । हेंकाडपणें ॥ १३ ॥
ढिसाळ[6] ढाळें[7] ढळती[8] [9]कुंचे । ढोबळा[10] ढसकण[11] डुले नाचे ।
ढळेचिना[12] ढिगढिगांचे । कंटाळवाणे ॥ १४ ॥
नाना नेटक नागर[13] । नाना नम्र गुणागर ।
नाना नेमक मधुर । नेमस्त गाणें ॥ १५ ॥
ताळ तंबुरे तानमानें । ताळबद्ध संतगाणें ।
तूर्त[14] तार्किकें[15] तनें मनें । तल्लीन होती ॥ १६ ॥
थर्थरां थरकती रोमांच । थै थै थै स्वरें उंचें[16] ।
थिरथिरं[17] थिरावे[18] नाच । प्रेमळ भक्तांचा ॥ १७ ॥
दक्षदाक्षण्यें[19] दाटलें । बंदें प्रबंदें[20] कोंदाटलें ।
द्रमदम दुमदुमों लागलें । जगदांतर[21] ॥ १८ ॥
धूर्त तूर्त धावोन आला । धिंगबुद्धीनें धिंग जाला[22] ।
धाकें धाकें धोकला । रंग अवघा[23] ॥ १९ ॥

---

१ ठोंबें असूं नये. २ ठकवूं नये. ३ ठाक्यानें व ठमक्यानें मूर्तिध्यान ठसत नाहीं. ४ डगूं नये. ५ डंडळूं नये, चळूं नये. ६ हलक्या हातानें. ७ सढळपणानें. ८ वारतात. ९ चवऱ्या. १० ओबडधोबड. ११ धसकटपणानें. १२ एका जागेवरून ढळत नाहीं, ढिगासारखा स्तब्ध उभा राहतो १३ चतुर १४ तत्काळ. १५ तर्कज्ञ, बुद्धिवान् १६ थै थै थै हा नृत्याचा शब्द इतका मोठा होतो कीं, तो सर्वांना ऐकूं येतो १७ मंद मद १८ मंद होतो. १९ दक्ष कीर्तनकाराचें कौशल्य. २० बंद, प्रबद हे गीतभेद आहेत. २१ प्रथम " संगीत गाणें " असें होतें, त्याऐवजीं " जगदांतर " असा श्रीसमर्थांचा शोध आहे. २२ दंग झाला. २३ जमत जमत सगळा रंग जमला.

नाना नाटक नेटकें । नाना मानें[1] तुकें[2] कौतुकें ।
नाना नेमक अनेकें । विद्यापात्रें ॥ २० ॥
पाप पळोन गेलें दुरी । पुण्य पुष्कळ प्रगटे वरी ।
परतें[3]रतो परे अंतरीं । चटक लागे ॥ २१ ॥
फुकट फाकट फटें[4]वणें नाहीं । फटकळ फुगाडी पिंगा नाहीं[5] ।
फिकें फसकट फोल नाहीं । भकां[6]ध्या निंदा ॥ २२ ॥
बरें बरें बरें ह्मणती । बाबा बाबा उदंड करिती ।
बळें बळें चि बळाविती । कथेलागीं ॥ २३ ॥
भला भला भला लोकीं । भक्तिभावें भव्य अनेकीं ।
भूषण भाविक लोकीं । परोपकारें ॥ २४ ॥
मानेल तरी मानावें मनें । मत्त न व्हावें ममतेनें[7] ।
मी मी मी मी बहुत जनें । ह्मणिजेत आहे ॥ २५ ॥
येकें टोंकत येकांपासीं । येऊं येऊ येती झडेसीं ।
या या या या अर्से[8] तयासी । ह्मणावें नेलगे[9] ॥ २६ ॥
राग रंग रसाळ सुरंगें । अंतर संगित रांगें[10] ।
रत्नपरीक्षा रत्नामार्गें । धांवती लोकें[11] ॥ २७ ॥
लवलवां लवती लोचन । लकलकां लंकेलें[12] मन ।
लपलपों लपती जन । आवडीनें ॥ २८ ॥
वचनें वाउगीं वदेना । वां[13]वरेविवरे वसेनां[14] ।
वगत्रुत्वें निववी जना । विनित होउनी ॥ २९ ॥

---

१ प्रमाण. २ मर्यादा. कौतुकयुक्त, मर्यादायुक्त, व प्रमाणयुक्त (वागतो). ३ श्रोता परत जातो परंतु अंतरीं चटक लागते. (?) ४ फसविणें ५ धांगडधिंगा नाहीं. ६ बडकून जाणें व निंदा हीं नाहींत. ७ (स्त्रीपुत्रद्रव्यादिकाच्या) ममतेनें. ८ असें त्यांना, किंवा 'असतयासी' ह्मणजे जे आलेले असतात त्यांना. ९ प्रथम "ह्मणिजेत आहे" असें होतें तें खोडून त्या जागीं "ह्मणावें नलगे" हा श्रीसमर्थ-शोध आहे. १० सुंदर गाण्याच्या योगानें अंतर रंगून गेलें ११ रत्नपरीक्षक जसे रत्नामार्गें धावतात (तसे हे कीर्तनपरीक्षक कीर्तनामार्गें धावतात). १२ चकित झालें. १३ बावरें. १४ (अंतःकरणीं) वसेना.

सारासार समस्तांला । सिकऊं सिकऊं जनाला ।
साहित[1] संगित सज्जनाला । बरें वाटे ॥ ३० ॥
खरेंखोटें खरें वाटलें । खर्खर खुर्खुर खुटलें ।
खोटें खोटेपणें गेलें । खोटें म्हणोनियां ॥ ३१ ॥
शाहाणे शोधितां शोधेना[2] । शास्त्रार्थ श्रुती बोधेना ।
शुक शारिका शमेना[3] । शब्द तयाचा[4] ॥ ३२ ॥
हरुषें हरुषें हासिला । हाहाहोहोनें भुलला ।
हित होईना तयाला । परत्रीचें ॥ ३३ ॥
लक्षावें लक्षितां अलेक्षीं[5] । लक्षिलें लोचनातें लक्षी[6] ।
लगलें[7] लयेतें अलक्षी । विहिगर्ममार्गें[8] ॥ ३४ ॥
क्षेत्रे[9] क्षेत्रज्ञ[10] क्षोभतो । क्षमेनें क्षमून क्षमवितो ।
क्षमणें क्षोभणें क्षेत्रज्ञ तो । सर्वां[11] ठाईं ॥ ३५ ॥

इति श्री कीर्तनलक्षणनाम समास चतुर्थ ॥ ४ ॥

---

॥ श्रीराम ॥

मागां हरिकथेचें लक्षण । श्रोतीं केला होता प्रश्न ।
सावध होऊन विचक्षण । परिसोत आतां ॥ १ ॥
हरिकथा कैसी करावी । रंगें कैसी भरावी ।
जेणें पाविजे पदवी । रघुनाथकृपेची ॥ २ ॥

---

१ साहित्य. २ शहाण्याला देखील पूर्ण उमजत नाहीं ३ समेना, बरोबरीचा होत नाहीं. ४ शुक व सारिका याच्यानें त्याच्या शब्दाशीं बरोबरी करवत नाहीं, म्हणजे त्याचा आवाज शुकसारिकाच्या आवाजापेक्षा हि गोड असतो. ५ अलक्ष जें ब्रह्म त्याच्याकडे लक्ष ठेवून तें पहावें. ६ पाहणारे जे लोचन त्याना हा पाहतो; म्हणजे त्या लोचनांचा हा पाहणारा होतो. ७ लागलें. अलक्षीं लय लागला. ८ विहंगममार्गें, एकदम; पिपीलिकामार्गे हळु हळु असतो तसा नव्हे. ९ शरीर. १० आत्मा. ११ सर्वां ठायीं असणारा जो क्षेत्रज्ञ त्याच्या ठिकाणीं क्षमा करणें व क्षोभ पावणें हे दोन्ही धर्म आहेत.

सोनें आणी परिमळे । युक्षदंडा लागती फळें ।
गौल्य माधुर्य रसाळें । तरी ते अपूर्वता ॥ ३ ॥
तैसा हरिदास आणी विरक्त । ज्ञाता आणी प्रेमळ भक्त ।
वित्पन्न आणी वादरहित । तरी हे हि अपूर्वता ॥ ४ ॥
रागज्ञानी ताळज्ञानी । सकळकळा ब्रह्मज्ञानी ।
निराभिमानें वर्ते जनीं । तरी हे हि अपूर्वता ॥ ५ ॥
मछर नाहीं जयासी । जो अत्यंत प्रिये सज्जनासी ।
चतुरांग जाणे मानसीं । अंतरनिष्ठ ॥ ६ ॥
जयंत्यादिकें नाना पर्वें । तीर्थे क्षेत्रें जें अपूर्वें ।
जेथें वसिजे देवाधिदेवें । सामर्थ्यरूपें ॥ ७ ॥
तया तीर्थातें जे न मनिती । शब्दज्ञानें मिथ्या ह्मणती ।
तया पामरा श्रीपती । जोडेल कैंचा ॥ ८ ॥
निर्गुण नेलें संदेहानें । सगुण नेलें ब्रह्मज्ञानें ।
दोहिकडे अभिमानें । वोस केलें ॥ ९ ॥
पुढें असता सगुणमूर्ती । निर्गुणकथा जे करिती ।
प्रतिपादून उछेदिती । ते चि पढतमूर्ख ॥ १० ॥
ऐसी न कीजे हरिकथा । अंतर पडे उभये पथा ।
परिस लक्षणें आतां । हरिकथेचीं ॥ ११ ॥
सगुणमूर्तीपुढें भावें । करुणाकीर्तन करावें ।
नाना ध्यानें वर्णावें । प्रतापकीर्तीतें ॥ १२ ॥
ऐसें गातां स्वभावें । रसाळ कथा वोढवे ।
सर्वांतरीं हेलावे । प्रेमसुख ॥ १३ ॥
कथा रचायाची खूण । सगुणीं नाणावें निर्गुण ।
न बोलावे दोष गुण । पुढिलाचे कदा ॥ १४ ॥

---

१ आधीं च सोनें इतकें लोकप्रिय आणि त्यात त्याला सुवास असता, किंवा आधीं च इक्षुदंड ( ऊंस ) इतका गोड आणि त्यात त्याला गोड, मधुर आणि रसाळ अशीं फळें असतीं, तर किती तरी अपूर्व गोष्ट झाली असती.

देवाचें वर्णावें वैभव । नाना प्रकारें महत्व ।
सगुणीं ठेउनिया भाव । हरिकथा करावी ॥ १५ ॥
लाज सांडून जनाची । आस्था सांडून धनाची ।
नीचें[1] नवी कीर्तनाची । आवडी धरावी ॥ १६ ॥
नम्र होऊन राजांगणीं । निःशंक जावें लोटांगणीं ।
करताळिका नृत्य वाणी । नामघोषें गर्जावें ॥ १७ ॥
येकांची कीर्ति येकांपुढें । वर्णितां साहित्य न पडे ।
ह्मणोनियां निवाडे । जेथील तेथें ॥ १८ ॥
मूर्ती नस्तां सगुण । श्रवणीं बैसले साधुजन ।
तरी अद्वैतनिरूपण । अवश्य करावें ॥ १९ ॥
नाहीं मूर्ती नाहीं सज्जन । श्रवणीं बैसले भाविक जन ।
तरी करावें कीर्तन । प्रस्ताविक[2] वैराग्य ॥ २० ॥
श्रुंघारिक नवरसिक । यामधें सांडावें येक ।
स्त्रियादिकांचें कौतुक । वर्णूं नये कीं ॥ २१ ॥
लावण्य स्त्रियांचें वर्णितां । विकार बाधिजे तत्वता ।
धारिष्टापासून श्रोता । चळे तत्काळ ॥ २२ ॥
ह्मणउन तें तैजावें[3] । जें बाधक साधका स्वभावें ।
घेतां अंतरीं ठसावें । ध्यान स्त्रियांचें ॥ २३ ॥
लावण्य स्त्रियांचें ध्यान । कामाकार जालें मन ।
कैचें आठवेल ध्यान । ईश्वराचें ॥ २४ ॥
स्त्री वर्णितां सुखावला । लावण्याचे भरीं भरला ।
तो स्वयें जाणावा चेवला । ईश्वरापासुनी ॥ २५ ॥
हरिकथेसी भावबळें । गेला रंग तो दुर्बळें ।
निमिष्य येक जरी आकळे[4]। ध्यानीं परमात्मा ॥ २६ ॥

---

१ नित्य. २ पश्चात्तापयुक्त. ३ त्यजावें. ४ कोणत्या हि कारणानें कथेमध्यें रसभंग झाला असला, तरी जर क्षणभर परमात्मा ध्यानांत येईल तर गेलेला रंग पुन्हां येईल.

ध्यानीं गुंतलें मन । कैचें आठवेल जन ।
निशंक निर्लज कीर्तन । करितां रंग माजे ॥ २७ ॥
रागज्ञान ताळज्ञान । स्वरज्ञानेंसीं विपन्न ।
अर्थान्वयाचें कीर्तन । करूं जाणे ॥ २८ ॥
छपन्न भाषा नाना कळा । कंठमाधुर्य कोकिळा ।
परी तो भक्तिमार्ग वेगळा । भक्त जाणती ॥ २९ ॥
भक्तांस देवाचें ध्यान । देवावांचून नेणे अन्न[1] ।
कळावंतांचें जें मन । तें कळाकार जालें[2] ॥ ३० ॥
श्रीहरिवीण जे कळा । ते चि जाणावी अवकळा ।
देवास सांडून वेगळा । प्रत्यक्ष पडिला ॥ ३१ ॥
सर्पी वेढिलें चंदनासी । निधानाआड[3] विवसी[4] ।
नाना कळा देवासी । आड तैस्या ॥ ३२ ॥
सांडून देव सर्वज्ञ । नादामध्यें व्हावें मग्न ।
तें प्रत्यक्ष विघ्न । आडवें आलें ॥ ३३ ॥
येक मन गुंतलें स्वरीं । कोणें चिंतावा श्रीहरी ।
बळें चि धरुनिया चोरीं । शिश्रूषा[5] घेतली[6] ॥ ३४ ॥
करितां देवाचें दर्शन । आडवें आलें रागज्ञान ।
तेणें धरुनियां मन । स्वरामागें नेलें ॥ ३५ ॥
भेटों जातां राजद्वारीं । बळें चि धरिला बेगारी ।
कळावंतां तैसी परी । कळेनें केली ॥ ३६ ॥
मन ठेऊन ईश्वरीं । जो कोणी हरिकथा करी ।
तो चि ये संसारीं । धन्य जाणा ॥ ३७ ॥

---

१ आन, दुसरें. २ गवयी वगैरे जे कलावंत लोक असतात त्याचें लक्ष गाण्याच्या विषयाकडे न जातां आलापादि बाह्य स्वरूपानें च वेधलें जातें. ३ द्रव्याच्या आड. ४ भूत, पिशाच्च. ५ शुश्रुषा. ६ जसें चोरानें बळें च एकाद्याला पकडून त्याच्यापासून चाकरी घ्यावी, त्याप्रमाणें तालसुराकडे पूर्णपणें लक्ष ठेवून करुणाकीर्तन करणारांच्या मनाची स्थिति होते. तें मन असतें स्वराकडे व मुखानें कीर्तन चाललें असतें श्रीहरीचें !

जयास हरिकथेची गोडी । उठे नीच नवी आवडी ।
तयास जोडली जोडी । सर्वोत्तमाची ॥ ३८ ॥
हरिकथा माडली जेथें । सर्व सांडून धावे तेथें ।
आलस्य निद्रा दवडून स्वार्थें । हरिकथेसि सादर ॥ ३९ ॥
हरिभक्तांचिये घरीं । नीच कृत्य अंगिकारी ।
साहेभूत[1] सर्वांपरीं । साक्षपें होये ॥ ४० ॥
या नाव हरिदास । जयासि नामीं विश्वास ।
येथून हा समास । सपूर्ण जाला ॥ ४१ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे हरिकथालक्षणनिश्चयनाम समास पचम॥५

---

॥ श्रीराम ॥

रूप लावण्य अभ्यासितां न ये । सहजगुणास न चले उपाये ।
कांहीं तरी धरावी सोये । अगातुक गुणाची ॥ १ ॥
काळें माणुस गोरें होयेना । वनाळीस[2] येत्न चालेना ।
मुक्यास वाचा फुटेना । हा सहजगुण ॥ २ ॥
आंधळें डोळस होयेना । बधिर तें ऐकेना ।
पांगुळ पाये घेइना । हा सहजगुण ॥ ३ ॥
कुरूपतेचीं लक्षणें । किती ह्मणोनि सागणें ।
रूप लावण्य याकारणें । पालटेना ॥ ४ ॥
अवगुण सोडिता जाती । उत्तम गुण अभ्यासितां येती ।
कुविद्या साडून सिकती । शाहाणे विद्या ॥ ५ ॥
मूर्खपण सांडिता जातें । शाहाणपण सिकतां येतें ।
कारबार करितां उमजतें । सकळ कांहीं ॥ ६ ॥
मान्यता आवडे जीवीं । तरी कां उपेक्षा करावी ।
चातुर्यैविण उच पदवी । कदापी नाहीं ॥ ७ ॥

---

१ साह्यभूत २ वनाळ=वणाळ=तोंडावर देवीचे व्रण असलेला.

ऐसी प्रचित येते मना । तरी कां स्वहित कराना ।
सन्मार्गें चालतां जना । सज्जना माने ॥ ८ ॥
देहे नेटकें श्रुंघारिलें । परी चातुर्येंविण नासलें ।
गुणेंविण साजिरें केलें । बाष्कळ जैसें ॥ ९ ॥
अंतर्कळा श्रुघारावी । नानापरी उमजवावी ।
संपदा मेळऊन भोगावी । सावकास ॥ १० ॥
प्रेत्न करीना सिकेना । शरीर तें हि कष्टवीना ।
उत्तम गुण घेईना[1] । सदाकोपी ॥ ११ ॥
आपण दुसऱ्यास करावें । तें उसिणें सर्व चि घ्यावें ।
जना कष्टवितां कष्टावें । लागेल बहु ॥ १२ ॥
न्यायें वर्तेल तो शाहाणा । अन्याइ तो दैन्यवाणा ।
नाना चातुर्यांच्या खुणा । चतुर जाणे ॥ १३ ॥
जें बहुतांस मानलें । तें बहुतीं मान्य केलें ।
येर तें वेर्थ चि गेलें । जगनिंद्य ॥ १४ ॥
लोक आपणासि बोळावे[2] । किंवा आवघे च कोंसळावे ।
आपणास समाधान फावे । ऐसें करावें ॥ १५ ॥
समाधानें समाधान वाढे । मित्रिनें मित्रि जोडे ।
मोडितां क्षणमात्रें मोडे । बरेंपण ॥ १६ ॥
अहो कांहो अरे कारे । जनीं ऐकिजेतें किं रे ।
कळत असतां च का रे । निकामीपण ॥ १७ ॥
चातुर्यें श्रुंघारे अंतर । वस्त्रें श्रुंघारे शरीर ।
दोहिमधें कोण थोर । बरें पाहा ॥ १८ ॥
बाह्याकार श्रुंघारिलें । तेणें लोकांच्या हातासि काये आलें ।
चातुर्यें बहुतासी रक्षिलें । नाना प्रकारें ॥ १९ ॥

---

१ प्रथम " उत्तम बोलों हि सिकेना " असें चरण होतें, त्याचें श्रीसमर्थांनीं स्वहस्तें " उत्तम गुण घेईना " असें केलें. २ लोक आपल्या बाजूला वळावे का त्यानीं आपणावर उलटून पडावें असें तुह्मांस वाटतें ?

बरें खावें बरें जेवावें । बरें ल्यावें बरें नेसावें ।
समस्तीं बरें ह्मणावें । ऐसी वासना ॥ २० ॥
तनें मनें झिजावें । तेणें भले ह्मणोन घ्यावें ।
उगें चि कल्पितां सिणावें । लागेल पुढें ॥ २१ ॥
लोकीं कार्यभाग आडे । तो कार्यभाग जेथें घडे ।
लोक सहज चि वोढे । कामासाठीं ॥ २२ ॥
ह्मणोन दुसऱ्यास सुखी करावें । तेणें आपण सुखी व्हावें ।
दुसऱ्यास कष्टवितां कष्टावें । लागेल स्वयें[1] ॥ २३ ॥
हें तों प्रगट[2] चि आहे । पाहिल्याविण कामा नये ।
समजणें हा उपाये । प्राणीमात्रासी ॥ २४ ॥
समजले आणी वर्तले । ते चि भाग्यपुरुष जाले ।
यावेगळे उरले । ते करंटे पुरुष ॥ २५ ॥
जितुका व्याप तितुकें वैभव । वैभवासारिखा हावभाव ।
समजलें पाहिजे उपाव । प्रगट चि आहे ॥ २६ ॥
आळसें कार्यभाग नासतो । साक्षेप होत होत होतो ।
दिसते गोष्टी कळेना तो । शाहाणा कैसा ॥ २७ ॥
मित्रि करितां होतें कृत्य । वैर करितां होतो मृत्य ।
बोलिलें हें सत्य किं असत्य । वोळखावें ॥ २८ ॥
आपणास शाहाणें करूं नेणे । आपलें हित आपण नेणे ।
जनीं मैत्रि राखों नेणे । वैर करी ॥ २९ ॥
ऐसे प्रकारीचे जन । त्यास ह्मणावें अज्ञान ।
तयापासीं समाधान । कोण पावे ॥ ३० ॥
आपण येकायेकी येकला । सृष्टींत भांडत चालिला ।
बहुतांमध्यें येकल्याला । येश कैचें ॥ ३१ ॥

---

१ "पुढें" ला हरताळ लावून वर "स्वयें" लिहिलें आहे. २ प्रत्यक्ष.

बहुतांचे मुखीं उरावें । बहुतांचे अंतरीं भरावें ।
उत्तम गुणीं विवरावें । प्राणीमात्रासी ॥ ३२ ॥
शाहाणे करावे जन । पतित करावे पावन ।
सृष्टिमधें भगवद्भजन । वाढवावें ॥ ३३ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे चातुर्यलक्षणनाम समास षष्ठ ॥ ६ ॥

---

॥ श्रीराम ॥

नाना वेश नाना आश्रम । सर्वांचें मूळ गृहस्थाश्रम ।
जेथें पावती विश्राम । त्रैलोक्यवासी ॥ १ ॥
देव ऋषी मुनी योगी । नाना तापसी वीतरागी ।
पितृआदिकरून विभागी । अतीत अभ्यागत ॥ २ ॥
गृहस्थाश्रमीं निर्माण जाले । आपला आश्रम टाकून गेले ।
परंतु गृहस्थागृहीं हिंडों लागले । कीर्तिरूपें ॥ ३ ॥
याकारणें गृहस्थाश्रम । सकळांमधें उत्तमोत्तम ।
परंतु पाहिजे स्वधर्म । आणी भूतदया ॥ ४ ॥
जेथें शडकर्में[1] चालती । विध्योक्त क्रिया आचरती ।
वाग्माधुर्यें बोलती । प्राणीमात्रासी ॥ ५ ॥
सर्वप्रकारें नेमक । शास्त्रोक्त करणें कांहींयेक ।
त्याहिमध्यें अलोलिक । तो हा भक्तिमार्ग ॥ ६ ॥
पुरश्चरणी कायाक्लेसी । दृढव्रती परम सायासी ।
जगदीशावेगळें जयासी । थोर नाहीं ॥ ७ ॥
काया वाचा जीवें प्राणें । कष्टे भगवंताकारणें ।
मनें घेतलें धरणें । भजनमार्गीं ॥ ८ ॥
ऐसा भगवंताचा भक्त । विशेष अंतरीं विरक्त ।
संसार साहून, जाला मुक्त । देवाकारणें ॥ ९ ॥

---

१ षट्कर्में.

अंतरापासून वैराग्य । तें चि जाणावें महद्भाग्य ।
वोलगतेयेवढें अभाग्य । आणीक नाहीं ॥ १० ॥
राजे राज्य साडून गेले । भगवंताकारणें हिंडले ।
कीर्तिरूपें पावन जाले । भूमंडळीं ॥ ११ ॥
ऐसा जो कां योगेश्वर । अंतरीं प्रत्ययाचा विचार ।
उकलूं जाणे अंतर । प्राणीमात्राचें ॥ १२ ॥
ऐसी वृत्ति उदासीन । त्याहिवरी विशेष आत्मज्ञान ।
दर्शनमात्रें समाधान । पावती लोक ॥ १३ ॥
बहुतांसी करी उपाये । तो जनाच्या वाट्या ने ये[1] ।
अखंड जयाचें हृदये । भगवद्रूप ॥ १४ ॥
जनास दिसे हा दुश्चित । परी तो आहे सावचित ।
अखंड जयाचें चित्त । परमेश्वरीं ॥ १५ ॥
उपासनामूर्तिध्यानीं[2] । अथवा आत्मानुसंधानीं ।
नाहीं तरी श्रवणमननीं । निरंतर ॥ १६ ॥
पूर्वजांच्या पुण्यकोटी । संग्रह असिल्या गांठीं ।
तरी च ऐसीयाची भेटी । होये जनासी ॥ १७ ॥
प्रचीतिविण जें ज्ञान । तो आवघा चि अनुमान ।
तेथें कैचें परत्रसाधन । प्राणीयासी ॥ १८ ॥
याकारणें मुख्य प्रत्यये । प्रचीतिविण कामा नये ।
उपायासारिखा अपाये । शाहाणे जाणती ॥ १९ ॥
वेडें संसार सांडून गेलें । तरी तें कष्टकष्टों चि मेलें ।
दोहिकडे अंतरलें । इहलोक परत्र ॥ २० ॥
रागें रागें निघोन गेला । तरी तो भांडभांडों चि मेला ।
बहुत लोक कष्टी केला । आपण हि कष्टी ॥ २१ ॥

---

१ जो पुष्कळांच्या उपयोगी पडतो, तो सर्वांच्या वाट्याला येत नाहीं.
२ ज्याचें चित्त उपासनामूर्तीच्या ध्यानामध्यें मग्न असतें.

निघोन गेला परी अज्ञान । त्याचे संगती लागले जन ।
गुरु शिष्य दोघे समान । अज्ञानरूपें ॥ २२ ॥
आशाबद्धी अनाचारी । निघोनि गेला देशांतरीं ।
तरी तो अनाचार चि करी । जनामधें ॥ २३ ॥
गृहीं पोटेंविण कष्टती । कष्टी होऊन निघोन जाती ।
त्यास ठाईं ठाईं मारिती । चोरी भरता ॥ २४ ॥
संसार मिथ्या ऐसा कळला । ज्ञान समजोन निघोन गेला ।
तेणें जन पावन केला । आपणाऐसा ॥ २५ ॥
येकें संगतीनें तरती । येके संगतीनें बुडती ।
याकारणें सत्संगती । बरी पाहावी ॥ २६ ॥
जेथें नाहीं विवेकपरीक्षा । तेथें कैंची असेल दीक्षा ।
घरोघरीं मागतां भिक्षा । कोठें हि मिळेना ॥ २७ ॥
जो दुसऱ्याचें अंतर जाणे । देश काळ प्रसंग जाणे ।
तया पुरुषा काये उणें । भूमंडळीं ॥ २८ ॥
नीच प्राणी गुरुत्व पावला । तेथें आचार चि बुडाला ।
वेदशास्त्रब्राह्मणाला । कोण पुसे ॥ २९ ॥
ब्रह्मज्ञानाचा विचारु । त्याचा ब्राह्मणासी च अधिकारु ।
वर्णानां ब्राह्मणो गुरुः । ऐसें वचन ॥ ३० ॥
ब्राह्मण बुद्धीपासून चेवले । आचारापासून भ्रष्टले ।
गुरुत्व सांडून जाले । शिष्य शिष्यांचे ॥ ३१ ॥
कित्येक दावलमलकास[1] जाती । कित्येक पीरास भजती ।
कित्येक तुरुक होती । आपले इछेनें ॥ ३२ ॥
ऐसा कलयुगींचा आचार । कोठें राहिला विचार ।
पुढें पुढें वर्णसंकर । होणार आहे ॥ ३३ ॥
गुरुत्व आलें नीचयाती । काहींयेक वाढली महंती ।
शूद्र आचार बुडविती । ब्राह्मणाचा ॥ ३४ ॥

---

1 दावलमल्ल ह्मणून मुसलमानांत एक अवलिया होऊन गेला त्याचे अनुयायी ते दावलमलीक.

हें ब्राह्मणास कळेना । त्याची वृत्ति च वळेना ।
मिथ्या अभिमान गळेना । मूर्खपणाचा ॥ ३५ ॥
राज्य नेलें म्लेंछिं क्षेत्रीं । गुरुत्व नेलें कुपात्रीं ।
आपण अरत्रीं ना परत्रीं । कांहीं च नाहीं ॥ ३६ ॥
ब्राह्मणास [1]ग्रामणीनें बुडविलें । विष्णूनें श्रीवत्स मिरविलें ।
त्या च विष्णूनें श्रापिलें । [2]फरशरामें ॥ ३७ ॥
आह्मी हि ते चि ब्राह्मण । दुःखें बोलिलें हें वचन ।
वडिल गेले ग्रामणी करून । आह्मा भोंवते ॥ ३८ ॥
आतांचे ब्राह्मणीं काये केलें । अन्न मिळेना ऐसें जालें ।
तुह्मा बहुताचे प्रचितीस आलें । किंवा नाहीं ॥ ३९ ॥
बरें वडिलांस काये ह्मणावें । ब्राह्मणाचें अदृष्ट जाणावें ।
प्रसंगें बोलिलें स्वभावें । क्षमा केलें पाहिजे ॥ ४० ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे युगधर्मनिरूपणनाम समास सप्तम ॥७॥

---

॥ श्रीरामसमर्थ ॥

बरें ऐसा प्रसंग जाला । जाला तो होऊन गेला ।
आता तरी ब्राह्मणीं आपणाला । शाहाणे करावें ॥ १ ॥
देव पुजावा विमळहस्तीं । तेणें भाग्य पाविजे समस्तीं ।
मूर्ख अभक्त वेस्तीं । दरिद्र भोगिजे ॥ २ ॥
आधीं देवास वोळखावें । मग अनन्यभावें भजावें ।
अखंड ध्यान चि धरावें । सर्वोत्तमाचें ॥ ३ ॥
सर्वांमधें जो उत्तम । तया नाव सर्वोत्तम ।
आत्मानात्मविवेकवर्म । ठाईं पाडावें ॥ ४ ॥
जाणजाणों देह रक्षी । आत्मा द्रष्टा अंतरसाक्षी ।
पदार्थमात्रास परीक्षी । जाणपणें ॥ ५ ॥

---

१ ग्रामण्यानें २ ज्या विष्णूनें ब्राह्मणाकरिता श्रीवत्स मिरविलें त्या च विष्णूनें परशुराम अवतारात ब्राह्मणाना शाप दिला.

तो सकळ देहामधें वर्ततो । इंद्रियेंग्राम चेष्टवितो ।
प्रचितीनें प्रत्यये येतो । प्राणीमात्रीं ॥ ६ ॥
प्राणीमात्रीं जगदांतरें । ह्मणोनि राखावीं अंतरें ।
दाता भोक्ता परस्परें । सकळ कांहीं ॥ ७ ॥
देव वर्ततो जगदांतरीं । तो चि आपुले अंतरीं ।
त्रैलोकींचे प्राणीमात्रीं । बरें पाहा ॥ ८ ॥
मुळीं पाहाणार तो येकला । सकळां ठाईं विभागला ।
देहप्रकृतीनें जाला । भिन्न भिन्न ॥ ९ ॥
भिन्न भासे देहाकारें । प्रस्तुत येक चि अंतरें ।
बोलणें चालणें निर्धारें । त्यासी च घडे ॥ १० ॥
आपुले पारिखे सकळ लोक । पक्षी स्वापद पश्वादिक ।
किडा मुंगी देहधारक । सकळ प्राणी ॥ ११ ॥
खेचर भूचर वनचर । नाना प्रकारें जळचर ।
चत्वार खाणी विस्तार । किती ह्मणोन सांगावा ॥ १२ ॥
समस्त जाणीवेनें वर्तती । रोकडी पाहावी प्रचिती ।
त्याची आपुली संगती । अखंड आहे ॥ १३ ॥
जगदांतरें बोळला धणी । किती येकवटील प्राणी ।
परी ते बोळायाची करणी । आपणांपासीं ॥ १४ ॥
हें आपणाकडे च येतें । राजी राखिजे समस्तें ।
देहासि बरें करावें तें । आत्मयास पात्रे ॥ १५ ॥
दुर्जन प्राणी त्यातील देव । त्याचा लाताड स्वभाव ।
रागास आला जरी राव । तरी तर्डो नये कीं ॥ १६ ॥
प्रसगीं साडी च करणें । पुढें विवेक विवरणें ।
विवेकें सज्जन चि होणें । सकळ लोकीं ॥ १७ ॥

---

१ जगदंतर जो परमेश्वर तो प्राणिमात्रीं आहे ह्मणून २ जगदंतर परमात्मा आपलासा झाला तर कितीतरी प्राणी एकवटणार आहेत, आणि तो प्राप्त करून घेण्याची गोष्ट आपल्या च हातीं आहे

आत्मत्वीं दिसतो भेद । हा अवघा चि देहसमंध ।
येका जीवनें नाना स्वाद । औषधीभेदें ॥ १८ ॥
गरळ आणि अमृत जालें । परी आपपण नाहीं गेलें ।
साक्षत्वें आत्मयास पाहिलें । पाहिजे तैसें ॥ १९ ॥
अंतरनिष्ठ जो पुरुष । तो अंतरनिष्ठेनें विशेष ।
* जगामध्यें जो जगदीश । तो तयास वोळखे ॥ २० ॥
नयनें चि पाहावा नयेन । मनें शोधावें मन ।
तैसा चि हा भगवान् । सकळा घटीं ॥ २१ ॥
तेणेंविण कार्यभाग आडे । सकळ कांहीं तेणें चि घडे ।
प्राणी विवेकें पवाडे । तेणें चि योगें ॥ २२ ॥
जागृतीस व्यापार घडतो । समंध तयासी च पडतो ।
स्वप्नामध्यें घडे जो तो । येणें चि न्यायें ॥ २३ ॥
अखंड ध्यानाचें लक्षण । अखंड देवाचें स्मरण ।
याचें कळतां विवरण । सहज चि घडे ॥ २४ ॥
सहज सांडून सायास । हा चि कोणीयेक दोष ।
आत्मा सांडून अनात्म्यास । ध्यानीं धरिती ॥ २५ ॥
परी तें धरितां हि धरेना । ध्यानीं येती वेक्ति नाना ।
उगें चि कष्टती मना । कासाविस करूनी ॥ २६ ॥
मूर्तिध्यान करितां सायासें । तेथें येकाचें येक चि दिसे ।
भासों नये तें चि भासे । विलक्षण ॥ २७ ॥
ध्यान देवाचें करावें । किंवा देवाल्याचें करावें ।
हें चि बरें विवरावें । आपले ठाईं ॥ २८ ॥
देह देउळ आत्मा देव । कोठें धरूं पाहातां भाव ।
देव वोळखोन जीव । तेथें चि ठावावा ॥ २९ ॥

---

१ सर्व प्राणिमात्राच्या ठिकाणीं परमेश्वर आहे तसा तो आपणांत हि आहे, तेव्हां आपण इतरांचें अंतर जाणावयाचें याचा अर्थ असा होतो कीं, सर्व घटीं असणारा भगवान् भगवानानें च पाहावयाचा आहे.

अंतरनिष्ठा ध्यान ऐसें । दंडकध्यांन[1] अनारिसें ।
प्रत्ययेविण सकळ पिसें । अनुमानध्यान ॥ ३० ॥
अनुमानें अनुमान वाढे । ध्यान धरितां सर्व चि मोडे ।
उगे चि कष्टती बापुडे । स्थूळध्यानें ॥ ३१ ॥
देवास देहधारी कल्पिती । तेथें नाना विकल्प उठती ।
भोगणें त्यागणें विपत्ति । देहयोगें ॥ ३२ ॥
ऐसें मनीं आठवतें । विचारितां भलतें चि होतें ।
दिसों नये तें दिसतें । नाना स्वप्नीं ॥ ३३ ॥
दिसतें तें सांगता न ये । बळें भावार्थ धरितां नये ।
साधक कासाविस होये । अंतर्यामीं ॥ ३४ ॥
सांगोपांग घडे ध्यान । त्यास साक्ष आपुलें मन ।
मनामधें विकल्पदर्शन । होऊं च नये ॥ ३५ ॥
फुटक मन येकवटिलें । तेणें तुटक ध्यान केलें ।
तेथें कोण सार्थक जालें । पाहाना का ॥ ३६ ॥
अखंड ध्यानें न घडे हित । तरी तो जाणावा पतित ।
हा चि अर्थ सावचित । बरा पाहावा ॥ ३७ ॥
ध्यान धरितें तें कोण । ध्यानीं आठवतें तें कोण ।
दोनीमधें अनन्यलक्षण । असिलें पाहिजे ॥ ३८ ॥
अनन्य सहज चि आहे । साधक शोधून न पाहे ।
ज्ञानी तो विवरोन राहे । समाधानें ॥ ३९ ॥
ऐसीं हे प्रत्ययाचीं कामें । प्रत्ययेंविण बाधिजे भ्रमें ।
लोकदंडकसंभ्रमें । चालती प्राणी ॥ ४० ॥
दंडकध्यानाचें लक्षण । धरून बैसलें अवलक्षण ।
प्रमाण आणि अप्रमाण । बाजारी नेणती ॥ ४१ ॥
मिथ्या समाचार उठविती । वाउग्या च बोंबा घालिती ।
मनास आणिता अतीं । आवघें चि मिथ्या ॥ ४२ ॥

---

१ सामान्य लोकांचें, रूढीचें ध्यान तें वेगळें.

कोणीयेक ध्यानस्त बैसला । कोणीयेक सिकवी त्याला ।
मुकुट काढूनि माळ घाला । ह्मणिजे बरें ॥ ४३ ॥
मनाचेथें काये दुष्काळ । जे आखुड कल्पिली माळ ।
सांगते ऐकते केवळ । मूर्ख जाणावे ॥ ४४ ॥
प्रत्यक्ष कष्ट करावे न लगती । दोरे फुलें गुंफावी न लगती ।
कल्पनेची माळ थिटी करिती । काये निमित्य ॥ ४५ ॥
बुधीविण प्राणी सकळ । ते ते अवघे चि बाष्कळ ।
तया मूर्खासीं खळखळ । कोणें करावी ॥ ४६ ॥
जेणें जैसा परमार्थ केला । तैसा च पृथ्वीवरी दंडक चालिला ।
साता पांचाचा बळावला । साभिमान ॥ ४७ ॥
प्रत्ययेंविण साभिमान । रोगी मारिले झांकून ।
तेथें अवघा चि अनुमान । ज्ञान कैचें ॥ ४८ ॥
सर्व साभिमान सांडावा । प्रत्ययें विवेक मांडावा ।
अन्या पूर्वपक्ष खडावा । विवेकबळें ॥ ४९ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे अखंडध्याननिरूपणनाम समास आठवा ८

---

॥ श्रीरामसमर्थ ॥

पिंडाचें पाहिलें कौतुक । शोधिला आत्मानात्मा विवेक ।
पिंड अनात्मा आत्मा येक । सकळ कर्ता ॥ १ ॥
आत्म्यास अनन्यता बोलिली । ते विवेकें प्रत्यया आली ।
आतां पाहिजे समजली । ब्रह्मांडरचना ॥ २ ॥
आत्मानात्माविवेक पिंडीं । सारासारविचार ब्रह्मांडीं ।
विवरविवरों हे गोडी । घेतली पाहिजे ॥ ३ ॥

---

१ कोणी एक मनुष्य स्थूल मूर्ति मनात आणून मानसपूजा करित असता मूर्तीच्या मस्तकीं मुकुट असल्यामुळें फुलांची माळ गळ्यांत जाईना, तेव्हां दुसरा कोणी ह्मणतो कीं मुकुट काढून माळ घाला

पिंड कार्य ब्रह्मांड कारण[1] । याचें करावें विवरण ।
हें चि पुढें निरूपण । बोलिलें असे ॥ ४ ॥
असार ह्मणिजे नासिवत । सार ह्मणिजे तें शाश्वत ।
जयास होईल कल्पांत । तें सार नव्हे ॥ ५ ॥
पृथ्वी जळापासून जाली । पुढें ते जळीं मिळाली[2] ।
जळाची उत्पत्ति वाढली । तेजापासुनी ॥ ६ ॥
तें जळ तेजें शोषिलें । महत्तेजें आटोन गेलें ।
पुढें तेज चि उरलें । सावकाश ॥ ७ ॥
तेज जालें वायोपासुनी । वायो झडपी तयालागुनी ।
तेज जाउनी दाटणी । वायोची च जाली ॥ ८ ॥
वायो गगनापासुनी जाला । मागुता तेथें चि विराला ।
ऐसा हा कल्पांत बोलिला । वेदांतशास्त्रीं ॥ ९ ॥
गुणमाया मूळमाया । परब्रह्मीं पावती लया ।
तें परब्रह्म विवराया । विवेक पाहिजे ॥ १० ॥
सर्व उपाधींचा सेवट । तेथें नाहीं दृश्य खटपट ।
निर्गुण ब्रह्म घनदाट । सकळां ठाईं ॥ ११ ॥
उदंड कल्पांत जाला । तरी नाश नाहीं तयाला ।
मायात्यागें शाश्वताला । वोळखावें ॥ १२ ॥
देव अंतरात्मा सगुण । सगुणें पाविजे निर्गुण ।
निर्गुणज्ञानें विज्ञान[3] । होत असे ॥ १३ ॥
कल्पनेतीत जें निर्मळ । तेथें नाहीं मायामळ ।
मिथ्यत्वें दृश्य सकळ । होत जातें ॥ १४ ॥
जें होतें आणी सर्व चि जातें । तें तें प्रत्ययास येतें ।
जेथें होणें जाणें नाहीं तें । विवेकें वोळखावें ॥ १५ ॥

---

१ ब्रह्मांड=पंचभूतें. तेव्हां हीं पंचभूतें हें कारण व त्यांचे पासून पिंड हें कार्य बनलें आहे २ प्रथम " निमाली " होतें त्याचें " मिळाली " केलें आहे. ३ प्रथम " सगुणज्ञानें निर्गुण " असें चरण होतें त्याचें " निर्गुणज्ञानें विज्ञान " असें केलें आहे.

येक ज्ञान येक अज्ञान । येक जाणाव विपरीत ज्ञान ।
हे त्रिपुटी होये क्षीण । तें चि विज्ञानें[1] ॥ १६ ॥
वेदांत सिधांत धादांत । याची पाहावी प्रचित ।
निर्विकार सदोदित । जेथें तेथें ॥ १७ ॥
तें ज्ञानदृष्टीनें पाहावें । पाहोन अनन्य राहावें ।
मुख्य आत्मनिवेदन जाणावें । याचें नाव ॥ १८ ॥
दृश्यास दिसतें दृश्य । मनास भासतो भास ।
दृश्यभासातीत अविनाश । परब्रह्म तें ॥ १९ ॥
पाहों जातां दुरीच्या दुरी । परब्रह्म सबाह्यअंतरीं ।
अंत चि नाहीं अनंत सरी । कोणास द्यावी ॥ २० ॥
चंचळ तें स्थिरावेना । निश्चळ तें कदापी चळेना ।
आभाळ येतें जातें गगना । चळण नाहीं ॥ २१ ॥
जें विकारें वाढे मोडे । तेथें शाश्वतता कैंची घडे ।
कल्पांत होतां च विघडे । सकळ कांहीं ॥ २२ ॥
जें अंतरीं च भ्रमलें । मायासंभ्रमें सभ्रमलें ।
तयास हें कैसें उकले । आल्होट चक्र ॥ २३ ॥
भिडेनें वेव्हार निवडेना । भिडेनें सिधांत कळेना ।
भिडेनें देव आकळेना । अंतर्यामीं ॥ २४ ॥
वैद्याची प्रचित येईना । आणि भीड हि उलंघेना ।
तरी मग रोगी वांचेना । ऐसें जाणावें ॥ २५ ॥
जेणें राजा वोळखिला । तो राव ह्मणेना भलत्याला ।
जेणें देव वोळखिला । तो देवरूपी ॥ २६ ॥
जयास माईकाची भीड । तें काये बोलेल द्वाड ।
विचार पाहातां उघड । सकळ कांहीं ॥ २७ ॥
भीड मायेऐलीकडे । परब्रह्म तें पैलीकडे ।
पैलीकडे ऐलीकडे । सदोदित ॥ २८ ॥

---

१ प्रथम "ज्ञान" होतें त्याचें "विज्ञान" केलें. २ अफाट.

लटिक्याची भीड धरणें । भ्रमें भलतें चि करणें ।
ऐसीं नव्हेती लक्षणें । विवेकाचीं ॥ २९ ॥
खोटें आवघें चि सांडावें । खरें प्रत्ययें वोळखावें ।
मायात्यागें समजावें । परब्रह्म ॥ ३० ॥
तें मायेचें जें लक्षण । तें चि पुढें निरूपण ।
सुचितपणें विवरण । केलें पाहिजे ॥ ३१ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे शाश्वतनिरूपणनाम समास नवम ॥९॥

---

॥ श्रीरामसमर्थ ॥

माया दिसे परी नासे । वस्तु न दिसे परी न नासे ।
माया सत्य वाटे परी मिथ्या असे । निरंतर ॥ १ ॥
करंटा पडोनी उताणा । करी नानापरी कल्पना ।
परी तें कांहीं च घडेना । तैसी माया ॥ २ ॥
द्रव्यदारेचें स्वप्नवैभव । नाना विळासें हावभाव ।
क्षणीक वाटे परी माव । तैसी माया ॥ ३ ॥
गगनीं गंधर्वनगरें । दिसताती नाना प्रकारें ।
नाना रूपें नाना विकारें । तैसी माया ॥ ४ ॥
लक्षुमी रायेविनोदाची[1] । बोलतां वाटे साची ।
मिथ्या प्रचित तेथीची[2] । तैसी माया ॥ ५ ॥
दसऱ्याचे सुवर्णाचे लाटे । लोक ह्मणती परी ते कांटे ।
परी सर्वत्र राहाटे । तैसी माया ॥ ६ ॥
मेल्याचा मोहोछाव करणें । सतीचें वैभव वाढवणें ।
मसणीं जाउनी रुदन करणें । तैसी माया ॥ ७ ॥
राखेसी ह्मणती लक्षुमी । दुसरी भारदोरी[3] लक्षुमी ।
तिसरी नाममात्र लक्षुमी । तैसी माया ॥ ८ ॥

---

१ रायविनोदी, बहुरूपी २ बहुरुप्याचें वैभव जसें वस्तुत. मिथ्या असतें तशी माया होय. ३ गर्भ गलित न व्हावा ह्मणून कोणी स्त्रिया कंबरेला भारलेली दोरी बांधतात ती.

मुळीं बाळविधवा नारी । तिचें नाव जन्मसावित्री ।
कुबेर हिंडे घरोघरीं । तैसी माया ॥ ९ ॥
दशअवतारांतील कृष्णा । उपजे जीर्ण वस्त्रांची तृष्णा ।
नदी नामें पीयुष्णा । तैसी माया ॥ १० ॥
बहुरूपातील रामदेरावें । ग्रामस्तांपुढें दाखवी हावभाव ।
का माहाराज म्हणोनी लाघवें । तैसी माया ॥ ११ ॥
देव्हारां असे अनपूर्णा । आणी गृहीं अन्न चि मिळेना ।
नामें सरस्वती सिकेना । शुभावलु ॥ १२ ॥
सुण्यास व्याघ्र नाम ठेविलें । पुत्रास इद्रनामें पाचारिलें ।
कुरूप परी आळविलें । सुंदरा ऐसें ॥ १३ ॥
मूर्ख नामें सकळकळा । राशभी नामें कोकिळा ।
नातरी डोळसेचा डोळा । फुटका जैसा ॥ १४ ॥
मातागीचें नाम तुळसी । चर्मिकीचें नाम कासी ।
बोलती अतिशूद्रिणीसी । भागीरथी ऐसें ॥ १५ ॥
साउली आणी अंधकार । येक होतां तेथीचा विचार ।
उगा चि दिसे भासमात्र । तैसी माया ॥ १६॥
श्रवण बोटें सधी करतळ । रविरश्में दिसती इगळ ।
रम्य आरक्तकल्होळ । तैसी माया ॥ १७ ॥
भगवें वस्त्र देखतां मनाला । वाटे अग्न चि लागला ।
विवचिता प्रत्ये आला । तैसी माया ॥ १८ ॥

---

१ दशावताराच्या नाटकात कृष्णाचें सोंग घेणाराला फाटक्या तुटक्या वस्त्राची जशी इच्छा असते. २ पयोष्णी, अमृताची नदी. ३ रामाचें रूप धारण करणारा बहुरूपी, किंवा ( रामदेराव=शूर पुरुष ) शूर पुरुषाचें सोंग आणणारा बहुरूपी, कां श्रीज्ञानेश्वरकालीन रामराजा ? सध्यां आपण जसें उपमानास शेवटच्या बाजीरावाचें नांव घेतों, तद्वत् त्या काळीं यादववंशीय त्या रामराजाचें नाव घेत कीं काय ? ४ महाराज म्हणवून घेऊन अगीं लघुत्व असणें. ५ नांव सरस्वती असून शिकत नाहीं तर शुभा वळु ( गोंवऱ्या थापते ). ६ कुत्र्याला. ७ वाघ्या. ८ मागिणीचें ९ चांभारणीचे. १० अंधारातील सावली जशी भासमात्र असते. ११ लाल गोळा.

जळीं चरणकरांगुळें । आखुड लांबें किरकोळें ।
विपरीत [1]काण दिसती जळें । तैसी माया ॥ १९ ॥
भोवडीनें पृथ्वी कलथली । [2]कामिणीनें पिवळी जाली ।
सन्यपातस्थां अनु[3]भवली । तैसी माया ॥ २० ॥
कोणीयेक पदार्थविकार । उगा चि दिसे भासमात्र ।
अनन्याचा अन्य [4]प्रकार । तैसी माया ॥ २१ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे मायानिरूपणनाम समास दाहावा ॥१०॥

---

## आत्मदशक नाम पंचदश ॥ १५ ॥

### ॥ श्रीरामसमर्थ ॥

अस्तिमांशांचीं शरीरें । त्यांत राहिजे जीवेश्वरें ।
नाना विकारीं विकारे । प्रविण होईजे ॥ १ ॥
घनवट पोंचट स्वभावें । विवरोन जाणिजे जीवें[6] ।
व्हावें न व्हावें आघवें । जीव [7]जाणे ॥ २ ॥
येकीं मागमागों घेणें । येकां न मागता च देणें ।
प्रचीतीनें सुलक्षणें । वोळखावीं ॥ ३ ॥
जीव जीवात घालावा । आत्मा आत्म्यांत मिसळावा ।
राहराहों शोध घ्यावा । परांतराचा ॥ ४ ॥
जानवें हेवडेकारें जालें । ढिलेपणें हेवडें आलें ।
नेमस्तपणें शोभलें । दृष्टीपुढें ॥ ५ ॥

---

१ वाकडीं. २ काविळीच्या योगानें ज्याला कावीळ होते त्याला पृथ्वी पिवळी दिसते ३ सन्निपात ज्याला झाला आहे त्याला पृथ्वी क्षय पावत आहे अशी दिसते ४ असावें एक व दिसावें दुसरें. ५ जीवेश्वर मायाविशिष्ट असल्याकारणानें नाना विकार त्याच्या ठिकाणीं असतात ६ घनवट काय व पोंचट काय हें जीव विचारशक्तीनें जाणतो ७ पाहिजे किंवा नको हें सर्व जीव जाणतो ८ दुसऱ्याच्या अंतःकरणात शिरून त्याचें हृद्गत जाणावें ९ गुंतलेलें. १० गुंतागुंत, जानवें करतांना तंतु ढिला पडून जी वळी पडते तिला हेवड ह्मणतात.

तैसें चि हें मनास मन । विवेकें जावें मिळोन ।
ढिलेपणें अनुमान । होत आहे ॥ ६ ॥
अनुमानें अनुमान वाढतो । भिडेनें कार्यभाग नासतो ।
याकारणें प्रत्यये तो । आधीं पाहावा ॥ ७ ॥
दुसऱ्याचे जीवींचें कळेना । परांतर तें जाणवेना ।
वश्य होती लोक नाना । कोण्या प्रकारें ॥ ८ ॥
आकल[1] सांडून परती । लोक वश्यकर्ण करिती ।
अपूर्णपणें हळु पडती[2] । ठाईं ठाईं ॥ ९ ॥
जगदीश आहे जगदांतरीं । चेटकें करावीं कोणावरी ।
जो कोणी विवेकें विवरी । तो चि श्रेष्ठ ॥ १० ॥
श्रेष्ठ कार्यें करी श्रेष्ठ । कृत्रिम करी तो कनिष्ठ ।
कर्मानुसार प्राणी नष्ट । अथवा भले ॥ ११ ॥
राजे जाती राजपंथें । चोर जाती चोरपंथें ।
वेडें ठके अल्पस्वार्थें । मूर्खपणें ॥ १२ ॥
मूर्खास वाटे मी शाहाणा । परी तो वेडा दैन्यवाणा ।
नाना चातुर्याच्या खुणा । चतुर जाणे ॥ १३ ॥
जो जगदांतरें मिळाला । तो जगदांतर चि जाला ।
अत्रीं परत्रीं तयाला । काये उणें ॥ १४ ॥
बुध्दि देणें भगवंताचें । बुद्धिवीण माणुस काचें[3] ।
राज्यें[4] सांडून फुकाचें । भीक मागे ॥ १५ ॥
जें जें जेथें निर्माण जालें । तें तें तयास मानलें ।
अभिमान[5] देऊन गोविलें । ठाईं ठाईं ॥ १६ ॥
अवघे च ह्मणती आह्मी थोर । अवघे चि ह्मणती आह्मी सुंदर ।
अवघे चि ह्मणती आह्मी चतुर । भूमंडळीं ॥ १७ ॥

---

१ अक्कल. २ वशीकरण अपूर्ण, निष्फळ झालें ह्मणजे मग थंडावतात, नाद सोडतात. ३ कच्चें. ४ बुद्धीचें राज्य ५ अभिमान देऊन=अभिमानाच्या योगानें.

ऐसा विचार आणितां मना । कोणी च लाहान ह्मणवीना ।
जाणते[1] आणिती अनुमाना । सकळ कांहीं ॥ १८ ॥
आपुलाल्या साभिमानें । लोक चालिले अनुमानें ।
परंतु हें विवेकानें । पाहिलें पाहिजे ॥ १९ ॥
लटिक्याचा साभिमान घेणें । सत्य अवघें च सोडणें ।
मूर्खपणाचीं लक्षणें । ते हे ऐसीं ॥ २० ॥
सत्याचा जो साभिमान । तो जाणावा निराभिमान ।
न्याये अन्याये समान । कदापि नव्हे ॥ २१ ॥
न्याये ह्मणिजे तो शाश्वत । अन्याये म्हणिजे तो अशाश्वत ।
बाष्कळ आणि नेमस्त । येक कैसा ॥ २२ ॥
येक उघड भाग्य भोगिती । येक तश्कर पळोन जाती ।
येकांची प्रगट महंती । येकांची कानकोंडीं ॥ २३ ॥
आचारविचारेंविण । जें जें करणें तो तो सीण ।
धूर्त आणि विचक्षण । ते चि शोधावे ॥ २४ ॥
उदंड बाजारी[2] मिळाले । परी ते धूर्तें चि आळिले[3] ।
धूर्तापासीं[4] कांहीं न चले । बाजाऱ्याचें ॥ २५ ॥
याकारणें मुख्यें मुख्य । तयांसी करावें सख्य ।
येणेंकरितां असख्य । बाजारी मिळती ॥ २६ ॥
धूर्तासि धूर्त चि आवडे । धूर्त धूर्तीं च पवाडे ।
उगे चि हिंडती वेडे । कार्येंविण ॥ २७ ॥
धूर्तासि धूर्तपण कळलें । तेणें मनास मन मिळालें ।
परी हें गुप्तरूपें केलें । पाहिजे सर्वें ॥ २८ ॥
समर्थाचें राखता मन । तेथें येती उदंड जन ।
जन आणि सज्जन । आर्जव करिती ॥ २९ ॥

---

१ जाणते जे आहेत ते हें सर्व जाणतात. २ सामान्य लोक, अनुयायी. ३ आपलेसे केले. ४ पुढारी.

बोळखीनें बोळखी साधावी । बुद्धीनें बुद्धि बोधावी ।
नीतिन्यायें वाट रोधावी । पाषांडाची ॥ ३० ॥
वेष धरावा बावळा । अंतरीं असाव्या नाना कळा ।
सगट लोकांचा जिव्हाळा । मोडूं नये ॥ ३१ ॥
निस्पृह आणि नित्य नूतनें । प्रत्ययाचें ब्रह्मज्ञान ।
प्रगट जाणता सज्जन । दुल्लभ जगीं ॥ ३२ ॥
नाना जिनसपाठांतरें । निवतीं सकळाचीं अंतरें ।
चचळपणें तैदनतरें । सकळां ठाईं ॥ ३३ ॥
येके ठाईं बैसोन राहिला । तरी मग व्याप चि बुडाला ।
सावधपणें ज्याला त्याला । भेटि द्यावी ॥ ३४ ॥
भेटभेटों उरी राखणें । हे चातुर्याचीं लक्षणें ।
मनुष्यमात्र उत्तम गुणें । समाधान पावे ॥ ३५ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे चातुर्यलक्षणनाम समास प्रथम ॥ १ ॥

---

॥ श्रीराम ॥

पृथ्वीमधें मानवी शरीरें । उदंड दाटलीं लाहानथोरें ।
पालटती मनोविकारें । क्षणक्षणा ॥ १ ॥
जितुक्या मूर्ती तितुक्या प्रकृती । सारिख्या नस्ती आदिअंतीं ।
नेम चि नाहीं पाहावें किती । काये ह्मणोनी ॥ २ ॥
कित्येक म्लेंच होऊन गेले । कित्येक फिरंगणांत आटले ।
देशभाषानें रोधिले । कितीयेक ॥ ३ ॥

---

१ निस्पृह असून नित्य नूतन ठिकाणीं हिंडणारा २ जिन्नस, काव्यातील उत्तम उत्तम वेंचे. ३ आणि मग एका ठिकाणीं बसून न राहतां सर्वत्र संचार करावा. ४ वारवार भेटून हि पुन्हा भेटण्याची इच्छा शिल्लक राखणें ५ कित्येकांचा देशभाषेनें रोध झाला आहे, ह्मणजे स्वभाषा विसरून परभाषाप्रवीण झाले आहेत, असा अर्थ कोणी करितात प्रांताप्रांताची भाषा निरनिराळी असल्यामुळें परम्परांचें मनोगत परस्परांस कळत नाहीं, असा दुसरे कित्येक अर्थ करितात.

म-हाष्टदेश थोडा उरला। राजकारणें लोक रुधिला।
अवकाश नाहीं जेवायाला। उदड कामें ॥ ४ ॥
कित्येक युद्धप्रसगीं गुंतले। तेणें गुणें उन्मत्त जाले।
रात्रंदिवस करूं लागले। युध्यचर्चा ॥ ५ ॥
उदिम्यास व्यासंग लागला। अवकाश नाहींसा जाला।
अवघा पोटधंदा च लागला। निरतर ॥ ६ ॥
शहदर्शनें नाना मतें। पाषांडें वाढलीं बहुतें।
पृथ्वीमधें जेथतेथें। उपदेसिती ॥ ७ ॥
स्मार्थीं आणि वैष्णवीं। उरलीं सुरलीं नेलीं आघवीं।
ऐसी पाहातां गथागोवी। उदड जाली ॥ ८ ॥
कित्येक कामनेचे भक्त। ठाइं ठाइं जाले आसक्त।
युक्त अथवा अयुक्त। पाहातो कोण ॥ ९ ॥
या गल्बल्यामधें गल्बला। कोणीं कोणीं वाढविला।
त्यास देखों सकेनासा जाला। वैदिक लोक ॥ १० ॥
त्याहिमधें हरिकीर्तन। तेथें वोढले कित्येक जन।
प्रत्ययाचें ब्रह्मज्ञान। कोण पाहे ॥ ११ ॥
या कारणें ज्ञान दुल्लभ। पुण्यें घडे अलभ्य लाभ।
विचारवता सुल्लभ। सकळ कांहीं ॥ १२ ॥
विचार कळला सागतां न ये। उदंड येती अंतराये।
उपाये योजिता अपाये। आडवे येती ॥ १३ ॥
त्याहिमधें जो तिक्षण। रिकामा जाऊं नेदी क्षण।
धूर्त तार्किक विचक्षण। सकळां माने ॥ १४ ॥
नाना जिनस उदंड पाठ। वदों लागला घडघडाट।
अंऱ्हाट चि केली वाट। सामर्थ्यबळें ॥ १५ ॥

---

१ काहीं अनुभव आला तर तो सागता येत नाहीं २ विघ्नें. ३ तीक्ष्ण. ४ " ले " चा " ला " केला आहे. ५ मोठी, विस्तीर्ण.

प्रबोधशक्तीचीं अनंत द्वारें । जाणे सकळांचीं अंतरें ।
निरूपणें तदनंतरें । चटक लागे ॥ १६ ॥
मतें मतांतरें सगट । प्रत्यये बोलोन करी सपाट[1] ।
दंडक साडून नीट । वेधी जना ॥ १७ ॥
नेमकें भेदकें वचनें । अखंड पाहे प्रसंगमानें ।
उदास वृत्तीच्या गुमानें । उठोन जातो ॥ १८ ॥
प्रत्यये बोलोन उठोन गेला । चटक लागली लोकाला ।
नाना मार्ग साडून त्याला । शरण येती ॥ १९ ॥
परी तो कोठें आडळेना । कोणे स्थळीं सापडेना ।
वेष पाहाता हीन दीना । सारिखा दिसे ॥ २० ॥
उदंड करी गुप्तरूपें । भिकाऱ्यासारिखा स्वरूपें ।
तेथें येशकीर्तिप्रतापें । सीमा साडिली ॥ २१ ॥
ठाइं ठाइं भजन लावी । आपण तेथून चुकावी ।
मछरमतांची गोवी । लागों च नेदी ॥ २२ ॥
[2]खनाळामधें जाऊन राहे । तेथें कोणी च न पाहे ।
सर्वत्राची चिंता वाहे । सर्वकाळ ॥ २३ ॥
अवघड स्थळीं कठीण लोक । तेथें राहाणें नेमक ।
सृष्टीमधें सकळ लोक । धुंडीत येती ॥ २४ ॥
तेथें[3] कोणाचें चालेना । अनुमात्र अनुमानेना ।
कैद्द[4] घालून राजकारणा । लोक लावी ॥ २५ ॥
लोकीं लोक वाढविले । तेणें अमर्याद जाले ।
भूमंडळीं सत्ता चाले । गुप्तरूपें ॥ २६ ॥
ठाइं ठाइं उदंड तांबे[5] । मनुष्यमात्र तितुकें झोंबे ।
चहुंकडे उदंड लांबे । परमार्थबुद्धि ॥ २७ ॥

---

१ अनुभवाचें भाषण करून मतें, मतांतरें नाहींशीं करितो २ खनाळ=कडेकपाट, दुर्गम स्थळ. चाफळची रामघळ, चंद्रगिरींतील गुहा किंवा शिवथरची घळ अशा सारख्या ठिकाणीं ३ त्याच्यापुढें. ४ एकोपा करून. ५ तांबा=समुदाय

उपासनेचा गजर । स्थळोस्थळीं थोर थोर ।
प्रत्ययानें प्राणीमात्र । सोडविले ॥ २८ ॥
ऐसे कैवाडे उदंड जाणे । तेणें लोक होती शाहाणे ।
जेथें तेथें प्रत्यये बाणे । प्राणिमात्रासी ॥ २९ ॥
ऐसी कीर्ति करून जावें । तरी च संसारास यावें ।
दास ह्मणे हें स्वभावें । संकेतें बोलिलें ॥ ३० ॥

इति श्रीदासबोधे निस्पृहव्यापलक्षणनाम समास दुसरा ॥ २ ॥

---

॥ श्रीराम ॥

मुळापासून[1] सेरावेरा । अवघा पंचीकर्ण पसारा ।
त्यांत साक्षत्वाचा[3] दोरा । तो हि तत्वरूपें ॥ १ ॥
दुरस्ता दाटल्या फौजा । उच सिंहासनीं राजा ।
याचा विचार समजा । अंतर्यामीं ॥ २ ॥
देहमात्र अस्तिमांशाचें । तैसें चि जाणावें नृपत चें ।
मुळापासून सृष्टीचें । तत्वरूप ॥ ३ ॥
रायाचे सत्तेनें चालतें । परन्तु अवघीं पचभूतें ।
मुळीं आधिक जाणीवेचें तें । अधिष्ठान आहे ॥ ४ ॥
विवेकें बहुत पैसावले । ह्मणोन अवतारी बोलिले ।
मनु चक्रवती जाले । येणें चि न्यायें ॥ ५ ॥

---

१ प्रकार २ मूळमायेपासून. ३ जाणीवेचा तंतु. ४ तो हि पचभूतातला च म्हणजे कूटस्थ आहे. ५ दुसरी ओंवी पहिलीचा दृष्टान्त आहे दुतर्फा फौज असून मध्यभागीं जसा राजा असावा, तद्वत् पचीकरणाचा हा जो जगद्रूपी फौजेसारखा पसारा आहे त्यात साक्षी हा राजासारखा आहे ६ ज्याप्रमाणें फौज आणि राजा हीं उभयतां अस्थिमांसाचीं असतात, त्याप्रमाणें च जगत् आणि साक्षी हीं उभयता तत्त्वरूप होत ७ राजाच्या सत्तेनें फौज चालते किंवा साक्षी हा सर्व जगाला वर्तवितो तरी पण ते सर्व पचभूतात्मक च आहेत. मग राजा आणि प्रजा किंवा साक्षी आणि जगत् यांत फरक कोठें उरला ? फरक हा च कीं ज्यांत जास्त जाणीव तो राजा किंवा साक्षी असतो. ८ ज्ञान, जाणीव ९ ज्ञान किंवा जाणीव ही अधिक असते ह्मणून त्यांना अवतारी ह्मणतात.

जेथें उदंड जाणीव । ते चि तितुके सदेव ।
थोडे जाणीवेनें नदैव[1] । होती लोक ॥ ६ ॥
व्याप आटोप करिती । धक्के चपेटे सोसिती ।
तेणें प्राणी सदेव होती । देखतदेखता ॥ ७ ॥
ऐसें हें आता वर्ततें । मूर्ख लोकांस कळेना तें ।
विवेकी मनुष्य समजतें । सकळ कांहीं ॥ ८ ॥
थोर लाहान बुद्धीपासीं । सगट कळेना लोकासी ।
आधीं उपजलें तयासी । थोर ह्मणती ॥ ९ ॥
वयें धाकुटा नृपती । वृद्ध तयास नमस्कार करिती ।
विचित्र विवेकाची गती । कळली पाहिजे ॥ १० ॥
सामान्य लोकांचें ज्ञान । तो अवघा च अनुमान ।
दीक्षादंडकांचें[2] लक्षण । येणें चि पाडें ॥ ११ ॥
न्हवे कोणास ह्मणावें । सामान्यास काये ठावें[3] ।
कोणकोणास ह्मणावें । किती ह्मणोनी ॥ १२ ॥
धाकुटा भाग्यास चढला । तरी तुछ्य करिती तयाला ।
याकारणें सलगीच्या लोकांला । दुरी धरावें ॥ १३ ॥
नेमस्त कळेना वचन । नेमस्त नये राजकारण ।
उगे चि धरिती थोरपण । मूर्खपणें ॥ १४ ॥
नेमस्त कांहीं च कळेना । नेमस्त कोणी च मानीना ।
आधीं उपजलें त्या थोरपणा । कोण पुसे ॥ १५ ॥
वडिलां वडिलपण नाहीं । धाकुट्यां धाकुटपण नाहीं ।
ऐसें बोलती त्यांस नाहीं । शाहाणपण[4] ॥ १६ ॥

---

१ निर्दैव, करंटे २ रूढीचें ३ सामान्य लोक वृद्धाला च वडिल ह्मणतात, तेव्हां हें बरोबर नाहीं असें कोणकोणाला सांगावें ? सामान्य लोकाना काय समजणार आहे ? ४ वयानें धाकटा पण ज्ञानवान् , वयानें वृद्ध अशा मनुष्यास ज्ञानाच्या गोष्टी सांगू लागला तर वृद्ध मनुष्य लगलीं च ह्मणतो कीं " आता वडिलाना वडिलपण व धाकट्यांना धाकटेपण उरलें नाहीं, " पण असें ह्मणणारे मूर्ख समजावे

गुणेंविण वडिलपण । हें तों आवघें च अप्रमाण ।
त्याची प्रचित प्रमाण । थोरपणीं ॥ १७ ॥
तथापि वडिलांस मानावें । वडिलें वडिलपण जाणावें ।
नेणतां पुढें कष्टावें । थोरपणीं ॥ १८ ॥
तस्मात् वडिल अंतरात्मा । जेथें चेतला तेथें महिमा ।
हें तों प्रगट चि आहे आह्मा । शब्द नाहीं ॥ १९ ॥
याकारणें कोणीयेकें । शाहाणपण सिकावें विवेकें ।
विवेक न सिकता तुकें । तुटोन जाती ॥ २० ॥
तुक तुटलें ह्मणिजे गेलें । जन्मा येऊन काये केलें ।
बळें चि सादीस घातलें । आपणासी ॥ २१ ॥
सगट बायेका सिव्या देती । सांदीस पडिला ऐसें म्हणती ।
मूर्खपणाची प्राप्ती । ठाकून आली ॥ २२ ॥
ऐसें कोणीयेकें न करावें । सर्व सार्थक चि करावें ।
कळेना तरी विवरावें । ग्रन्थांतरीं ॥ २३ ॥
शाहाण्यास कोणीतरी बोहाती । मूर्खास लोक दवडून देती ।
जीवास आवडे संपत्ति । तरी शाहाणे व्हावें ॥ ॥ २४ ॥
आहो या शाहाणपणाकारणें । बहुताचे कष्ट करणें ।
परंतु शाहाणपण सिकणें । हें उत्तमोत्तम ॥ २५ ॥
जो बहुतांस मानला । तो जाणावा शाहाणा जाला ।
जनीं शाहाण्या मनुष्याला । काये उणें ॥ २६ ॥
आपलें हित न करी लोकिकीं । तो जाणावा आत्मघातकी ।
या मूर्खायेवढा पातकी । आणिक नाहीं ॥ २७ ॥
आपण संसारीं कष्टतो । लोकांकरवीं रागेजोन घेतो ।
जनामधें शाहाणा तो । ऐसें न करी ॥ २८ ॥
साधका सिकविलें स्वभावें । मानेल तरी सुखें घ्यावें ।
मानेना तरी सांडावें । येकिकडे ॥ २९ ॥

---

१ प्रगट झाला, प्रकाशित झाला. २ वजन, मर्यादा ३ बोलावतात

तुम्ही श्रोते परम दक्ष । अलक्षास लाविता लक्ष ।
हें तों सामान्य प्रत्यक्ष । जाणतसा ॥ ३० ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे श्रेष्ठअंतरात्मानिरूपणनाम समास तृतीय ॥

---

॥ श्रीराम ॥

पृथ्वीपासून जालीं झाडें । झाडापासून होतीं लांकडें
लांकडें भस्मोन पुढें । पृथ्वी च होये ॥ १ ॥
पृथ्वीपासून वेल होती । नाना जिनस फापावती ।
वाळोन कुजोन मागुती । पृथ्वी च होये ॥ २ ॥
नाना धान्यांचीं नाना अन्नें । मनुष्यें करिती भोजनें
नाना विष्ठा नाना वमनें । पृथ्वी च होये ॥ ३ ॥
नाना पक्षादिकीं भक्षिलें । तरी पुढें तैसें चि जालें ।
वाळोन भस्म होऊन गेलें । पुन्हा पृथ्वी ॥ ४ ॥
मनुष्यें मरतां च ऐका । क्रिमि[1] भस्म का मृत्तिका ।
ऐशा काया पडती अनेका । पुढें पृथ्वी ॥ ५ ॥
नाना तृणें पदार्थ कुजती । पुढें त्याची होये माती ।
नाना किडे मरोन जाती । पुढें पृथ्वी ॥ ६ ॥
पदार्थे दाटले अपार । किती सांगावा विस्तार ।
पृथ्वीवांचून थार । कोणास आहे ॥ ७ ॥
झाड पाले आणि तृण । पशु भक्षितां होतें सेण ।
खात मूत भस्म मिळोन । पुन्हा पृथ्वी ॥ ८ ॥
उत्पत्तिस्थितिसंव्हारतें । तें तें पृथ्वीस मिळोन जातें ।
जितुकें होतें आणि जातें । पुन्हा पृथ्वी ॥ ९ ॥
नाना बीजांचिया रासी । विरढेनें[2] लागती गगनासी ।
पुढें सेवटीं पृथ्वीसी । मिळोन जाती ॥ १० ॥
लोक नाना धातु पुरिती । बहुतां दिवसां होये माती
सुवर्णपाषाणाची गती । तैसी च आहे ॥ ११ ॥

---

१ क्रमी. २ विरुढणें=अंकुर येणें, उंच वाढणें.

मातीचें होतें सुवर्ण । आणी मृत्तिकेचे होती पाषाण ।
माहा अग्निसंगें भस्मोन । पृथ्वी च होये ॥ १२ ॥
सुवर्णाचें जर होतें । जर सेवटीं कुजोन जातें ।
रस होऊन वितुळतें । पुन्हा पृथ्वी ॥ १३ ॥
पृथ्वीपासून धातु निपजती । अग्निसंगें रस होती ।
तया रसाची होये जगती । कठीणरूपें ॥ १४ ॥
नाना जळासी गधी सुटे । तेथें पृथ्वीचें रूप प्रगटे ।
दिवसेंदिवस जळ आटे । पुढें पृथ्वी ॥ १५ ॥
पत्रें पुष्पें फळें येती । नाना जीव खाऊन जाती ।
ते जीव मरता जगती । नेमस्त होये ॥ १६ ॥
जितुका कांहीं जाला आकार । तितुक्यास पृथ्वीचा आधार ।
होती जाती प्राणीमात्र । सेवट पृथ्वी ॥ १७ ॥
हें किती ह्मणौन सांगावें । विवेकें अवघें चि जाणावें ।
खाजणीभाजेणीचें[2] समजावें । मूळ तैसें ॥ १८ ॥
आप आळोन पृथ्वी जाली । पुन्हा आपीं च विराली ।
अग्नियोगें भस्म जाली । ह्मणोनियां ॥ १९ ॥
आप जालें तेजापाशुनी । पुढें तेजें घेतलें सोखुनी[3] ।
तें तेज जालें वायोचेनी । पुढें वायो झडपी ॥ २० ॥
वायो गगनीं निर्माण जाला । पुढें गगनीं च विराला ।
ऐसें खाजणीभाजणीला । बरें पाहा ॥ २१ ॥
जें जें जेथें निर्माण होतें । तें तें तेथें लया जातें ।
येणें रितीं पंचभूतें । नाश पावती ॥ २२ ॥
भूत ह्मणिजे निर्माण जालें । पुन्हा मागुतें निमालें ।
पुढें शाश्वत उरलें । परब्रह्म तें ॥ २३ ॥
तें परब्रह्म जों कळेना । तों जन्ममृत्य चुकेना ।
चत्वार खाणी जीव नाना । होणें घडे ॥ २४ ॥
जडाचें मूळ तें चचळ । चंचळाचें मूळ तें निश्चळ ।
निश्चळासी नाहीं मूळ । बरें पहा ॥ २५ ॥

---

१ प्रथम " भस्म " होतें त्याचें " रस " केलें आहे. २ बेरीजवजाबाकी, उभारणीसंव्हारणी ३ शोषून.

पूर्वपक्ष ह्मणिजे जालें । सिद्धांत ह्मणिजे निमालें ।
पक्षातीत जें संचलें । परब्रह्म तें ॥ २६ ॥
हें प्रचितीनें जाणावें । विचारें खुणेसी बाणावें ।
विचारेंविण सिणावें । तें चि मूर्खपण ॥ २७ ॥
ज्ञानी भिडेनें दडपला । निश्चळ परब्रह्म कैंचें त्याला ।
उगा च करितो गल्बला । मायेमधें ॥ २८ ॥
माया निशेष नासली । पुढें स्थिति कैसी उरली ।
विचक्षणें विवारिली । पाहिजे स्वयें ॥ २९ ॥
निशेष मायेचें निर्शन । होतां आत्मनिवेदन ।
वाच्यांश नाहीं विज्ञान । कैसें जाणावें ॥ ३० ॥
लोकांचे बोलीं जो लागला । तो अनुमानें च बुडाला ।
याकारणें प्रत्ययाला । पाहिलें च पाहावें ॥ ३१ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे शाश्वतब्रह्मनिरूपणनाम समास चतुर्थ ॥ ४

---

॥ श्रीराम ॥

दोघां ऐसीं तीन चालती । अगुणी अष्टधा प्रकृती ।
अधोर्ध सांडून वर्तती । इंद्रफणी ऐसीं[2] ॥ १ ॥

---

१ जगत् झालें आहे, तें सत्य आहे हा पूर्वपक्ष तें नाहींसें झालें, तें मिथ्या आहे हा सिद्धांत. २ देवाधिदेव जो राजा निर्विकार । जेथ अणुमात्र गोवा नसे ॥ १ ॥ अहं स्फुरण चि मूळमाया तेथें । नभांतरीं वात तैशापरी ॥ २ ॥ वायु ते प्रकृती जाणीव तो पुरुष । दोघां सामरस्य सर्व कर्ते ॥ ३ ॥ त्रिगुण त्रिदेव या दोघाचे मतें । करिती कर्तृत्व सृष्टीक्रम ॥ ४ ॥ भूतसह गुण अष्टधा भासली । टाकुनी वर्तती आधऊर्ध्व ॥ ५ ॥ जड भाग आध ऊर्ध्व ते निश्चळ । चंचळता खेळ मध्यभागीं ॥ ६ ॥ हे तिघे वर्तती इंद्रफणी ऐसे । विपटाचा सोस सव्यवत ॥ ७ ॥ इंद्र तो मार्जार इंद्रशुक फणी । वर्तती नोकुनी तैसे हे ही ॥ ८ ॥ न लक्षुनि येकमेका ते वर्तती । दुजा अर्थ श्रोतीं आणा ध्याना ॥ ९ ॥ आपुली च पिलीं आपण भक्षिती । ऐसी स्थिति गती सृष्टीक्रम ॥ १० ॥ सत्य अर्थ आता रवि खेळे जेवी । अधोर्ध्व हे तेवी नातळती ॥ ११ ॥ परंतु तमोगुण जाणीवा निवटी । सत्वा करी कष्टी रजोगुण ॥ १२ ॥ खटपटी हे होतां राजा निर्विकार । न दिसे अणुमात्र चोरलासे ॥ १३ ॥ घेतां पंचीकर्णमहावाक्यशोध । होईल विशद अर्थ तेव्हां ॥ १४ ॥ मुख्य **आत्मारामीं** जडलिया ध्यान । बिंबे तेव्हां पूर्ण अनुभव ॥ १५ ॥ **श्रीदासविश्रामधाम**

पण[1]तोंडें भक्षितो पणजा । मूळ बापास मारी बोजा[2] ।
चुकाऱ्या गेला राजा । चौघा जणांचा ॥ २ ॥
देवें[3] देवाळयां[4]मधें उपाला । देऊळ पूजिता पावे त्याला ।
सृष्टिमधें ज्याला त्याला । ऐसें चि आहे ॥ ३॥
दोनी नामें[5] येकास पडिलीं । लोकीं नेमस्त कल्पिलीं ।
विवेकें प्रत्ययें पाहिलीं । तों येक चि नाम ॥ ४ ॥
नाहीं पुरुष ना वनितां[6] । लोकीं कल्पिलें तत्वंता[7] ।
त्याचा बरा शोध घेतां । काहीं च नाहीं ॥ ५ ॥
स्त्री नदी पुरुष खळाळ । ऐसें बोलती सकळ ।
विचार पाहातां निवळ । देह नाहीं[8] ॥ ६ ॥
आपण आपणास कळेना । पाहों जातां आकळेना ।
काशास काहीं च मिळेना । उदडपणें ॥ ७ ॥
येकला चि उदंड जाला । उदंड चि येकला पडिला ।
आपणासि आपला गलबला । सोसवेनो ॥ ८ ॥
येक असोन फुटी पडिली । फुटी असोन स्थिति येकली[10] ।
विचित्र कळा पैसावली । प्राणिमात्रीं ॥ ९ ॥

---

१ श्री कल्याणमहाराजांच्या मठांतील एका जुन्या बाडांत पुढील मजकूर आहे –" वनस्पती आदिकरून पदार्थ हे पणतु, पृथ्वी बाप, उदक आजा व पणजा अग्नि " २ बोजा=चातुर्यानें ३ अंतरात्मा. ४ देहा मध्यें. ५ प्रकृति व पुरुष हीं दोन नांवें कल्पिलेलीं आहेत, परतु वस्तुत. दोन्ही नावें एका मायेचीं च आहेत. ६ प्रकृति म्हणजे कोणी स्त्री व पुरुष ह्मणजे कोणी पुल्लिंगी देह असा मुळीं च भेद नाहीं. ७ ही केवळ लोकानीं कल्पना केलेली आहे.
८ नदीला स्त्रीनाम दिलें आहे व खळाळाला पुरुषनाम दिलें आहे, ह्मणून नदी व खळाळ याच्या ठिकाणीं कांहीं स्त्रीपुरुषाचा देह आहे असें मुळी च नाहीं, उभयता मिळून केवळ पाणी च आहे. ९ आधीं उपाधी त्यानें च ( ब्रह्मानें ) केली व तिचा त्याला कंटाळा आला, असा अर्थ, किंवा आपण वास्तविक ब्रह्मस्वरूप असून हि घोंटाळ्यात पडलों आहोंत आणि तेणेंकरून आपणास उपाधी सहन करवत नाहीं, असा अर्थ. १० चैतन्य एक असून भिन्न दिसत आहे, तें भिन्न जरी दिसत आहे तरी एक च आहे.

वल्लीमधें जळ संचरे । कोरडेपणें हें वावरे ।
वोलेवांचून न थिरे । कांहीं केल्यां ॥ १० ॥
झाडांमधें केलीं आळीं । झाडें धावती निराळीं ।
कित्येक झाडें अंतराळीं । उडोन जाती ॥ ११ ॥
भूमीपासून वेगळीं जालीं । परी तें नाहींत वाळलीं ।
निराळीं च वळावलीं । जेथतेथें ॥ १२ ॥
देवा[3]करितां चालती झाडें । देव नस्तां होती लांकडें ।
नीट चि आहे कुवाडें । सर्वथा नव्हे ॥ १३ ॥
झाडापासून झाडें होती । ते हि अंतरीक्ष जाती ।
मुळानें भेदिली जगती । कदापि नाहीं ॥ १४ ॥
झाडास झाडें खातपाणी । घालून पाळिलीं प्रतिदिनीं ।
बोलकीं झाडें शब्दमथनीं । विचार घेती[6] ॥ १५ ॥
होणार तितुकें आधीं च जालें । मग कल्पकल्पून बोलिलें[7] ।
जाणतयासी समजलें । सकळ कांहीं ॥ १६ ॥
समजलें तरी उमजेना । उमजलें तरी समजेना ।
प्रत्ययेंविण अनुमानेना । सकळ कांहीं ॥ १७ ॥
सर्वत्राचा वडिल कोण । हे चि पाहावी वोळखण ।
भेटे आपणास आपण । जगदांतरें ॥ १८ ॥
अंतरनिष्ठाची उंच कोटी । बाहेरमुद्राची संगती खोटी ।
मूर्ख काये समजेल गोष्टी । शाहाणे जाणती ॥ १९ ॥

---

१ वल्लीमध्यें जळ असतें तें दिसत नाहीं ह्मणून कोरडेपणें ह्मटलें आहे २ खरीं झाडें जशीं आळ्यामध्यें च राहतात तशीं देहरूपी झाडें राहत नाहींत, पक्ष्यादिकांची देहरूपी झाडें आकाशांत उडतात. ३ अंतरात्म्याच्या योगानें. ४ ही गोष्ट सरळ आहे यांत कोडें काहीं च नाहीं ५ हीं जीं देहरूपी झाडें आहेत त्यांच्या मुळ्या जमिनींत मुळी च जात नाहींत ६ हीं झाडें बोलकीं असून शब्दाचें मंथन करून परस्परांस आपआपला भाव व्यक्त करितात. ७ जगत् हें आधीं च झालेलें आहे, नंतर सांगणारांनी आपआपल्यापरी कल्पना करून त्याची उत्पत्ति सांगितली ८ द० १५।३।२८ पहा ९ जे बहिर्मुख असतात ते, ज्यांचीं इंद्रियें अंतर्मुख झालीं नाहींत ते, जे अंतरात्म्याचा कधीं च विचार करीत नाहींत ते

अंतरें राखता राजी । भलत्यास भलता च नेत्राजी ।
अंतरें न राखतां भाजी । मिळणार नाहीं ॥ २० ॥
ऐसें वर्ततें प्रत्यक्ष । अलक्षीं लावावें लक्ष ।
दक्षास भेटता दक्ष । समाधान होतें ॥ २१ ॥
मनास मिळता मनें । पाहोन येती निरजनें ।
चचळचक्र उलंघून । पैलाड जाती ॥ २२ ॥
येकदा जाऊन पाहोन आले । मग तें संनिध देखिलें ।
चर्मचक्षीं लक्षिलें । न वचे कदा ॥ २३ ॥
नाना शरीरीं चचंळ । अखंड करी चळवळ ।
परब्रह्म तें निश्चळ । सर्वां ठाईं ॥ २४ ॥
चंचळ धावे येकीकडे । वोस पडे दुसरेकडे ।
चंचळ पुरे सर्वांकडे । हें तों घडेना ॥ २५ ॥
चचळ चंचळास पुरेना । आवघें चचळ विवरेना ।
निश्चळ अपार अनुमाना । कैसें येतें ॥ २६ ॥
गगनीं चालिली हवावी । कैसी पावेल पार पदवी ।
जातां मधें चि विझावी । हा स्वभाव चि तिचा ॥ २७ ॥
मनोधर्म येकदेसी । कैसा आकळिल वस्तुसी ।
निर्गुण सांडून अपेसी । सर्व ब्रह्म ह्मणे ॥ २८ ॥
नाहीं सारासारविचार । तेथें अवघा अधकार ।
खरें सांडून खोटें पोर । नेणतें घेतें ॥ २९ ॥
ब्रह्मांडाचें माहाकारणें । तेथून हें पचीकर्ण ।
माहावाक्याचें विवर्ण । वेगळें असे ॥ ३० ॥

---

१ नावाजतो २ भाजीसारखा अल्प पदार्थ देखील. ३ मीतूपण नाहींसें झालें ह्मणजे, अंतरात्मा एक च आहे हें समजलें ह्मणजे किंवा गुरुशिष्याचा ऐक्यभाव झाला ह्मणजे. ४ परब्रह्म ५ हृदयात किंवा सर्वत्र. सदा सर्वदा देव संनीध आहे ॥ याचा मग अनुभव येतो ६ जीव किंवा माया ७ पुरें पडतें ८ बाण ९ अपयशी, करंटा. १० मूळमाया.

महत्तत्व महद्भूत । तो चि जाणावा भगवंत ।
उपासना हे समास । येथून जाली ॥ ३१ ॥
कर्म उपासना आणि ज्ञान । त्रिकांड वेद हें प्रमाण ।
ज्ञानाचें होतें विज्ञान । परब्रह्मीं ॥ ३२ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे चचळलक्षणनिरूपण समास पचम ॥५॥

---

॥ श्रीराम ॥

पीतां[3]पासून कृष्ण[4] जालें । भूमंडळीं विस्तारलें ।
तेणें[5]विण[6] उमजलें । हें तों घडेना ॥ १ ॥
आहे तरी स्वल्प लक्षण । सर्वत्रांची[7] साठवण ।
अद्धम आणी उत्तम गुण । तेथें चि असती ॥ २ ॥
महीसुत[8] सरसाविला । सरसाऊन द्विधा केला ।
उभयेता मिळोन चालिला । कार्यभार्गी ॥ ३ ॥
श्वेताश्वेतास[9] गाठी पडतां । मधें कृष्ण मिश्रित होता ।
इहलोकसार्थकता । होत आहे ॥ ४ ॥
विवरतां याचा विचार । मूर्ख तो चि होये चतुर ।
सद्यप्रचित साक्षात्कार । परलोकींचा ॥ ५ ॥
सकळास जें मान्य[10] । तें चि होतसे सामान्य ।
सामान्यास अनन्य । होइजेत नाहीं ॥ ६ ॥

---

१ महत्तत्व ह्मणजे च महद्भूत. तो च भगवंत. 'एको विष्णुर्महद्भूतम्'. २ उपासनेच्या ठिकाणीं द्वैताची अपेक्षा असते व महत्तत्वापलीकडे द्वैत उरत नाहीं, ह्मणून उपासना ही महत्तत्वापाशीं समाप्त होते, पुढें जात नाहीं ३ दिवा. ४ काजळ. ५ काजळ नसतें तर पोथ्या नसत्या, वेदपुराणादि ग्रन्थ नसते तर ज्ञान झालें नसतें, तेव्हा सर्वत्र ज्ञानप्रसार होण्यास हें काजळ च कारण आहे. ६ कृष्णावाचून ७ बोरू ८ येकदा पुसतां पुरविले व्छ । पीत दीप तो कृष्ण काजळ । भूपुत्र बरु द्विधा तासिल । कारभार सकळ लिहिण्यागुणे ॥ श्रीदासविश्रामधाम ९ श्वेताश्वेता=श्वेत+अश्वेत =पांढरा कागद+काळा बोरू. १० लोक साराला असार समजतात व असाराला सार समजून असार मान्य करितात

उत्तम मध्यम कनिष्ठ रेखा । अदृष्टीची गुप्त रेखा[1] ।
चत्वार अनुभव सारिखा[2] । होत नाहीं ॥ ७ ॥
चौदा पीड्यांचे[3] पैवाडे[4] । सांगती ते शाहाणे कीं वेडे[5] ।
ऐकल्यानें घडे कीं न घडे । ऐसें पाहावें ॥ ८ ॥
रेखा तितुकी पुसोन जाते[6] । प्रत्यक्ष प्रत्यया येतें ।
डोळेझांकणी करावी ते । कायेनिमित्य ॥ ९ ॥
बहुताचे बोलीं लागलें । तें प्राणी अनुमानीं बुडालें ।
मुख्य निश्चये चुकलें । प्रत्ययाचा ॥ १० ॥
उदडाचें उदड ऐकावें । परी तें प्रत्ययें पाहावें ।
खरेंखोटें निवडावें । अंतर्यामीं ॥ ११ ॥
कोणासी नव्हे ह्मणों नये । समजावे अपाये उपाये ।
प्रत्यये घ्यावा बहुत काये । बोलोनियां ॥ १२ ॥
माणुस हेंकाड आणी कच्चें । मान्य करावें तयाचें ।
येणें प्रकारें बहुताचें । अतर राखावें ॥ १३ ॥
अंतरीं पीळ पेच वळसा । तो चि वाढवी बहुवसा ।
तरी मग शाहाणा कैसा । निवऊं नेणे[7] ॥ १४ ॥
वेडें करावें शाहाणें । तरी च जिणें श्लाघ्यवाणें ।
उगें च वादाग वाढवणें । हें मूर्खपण ॥ १५ ॥
मिळोन जाऊन मेळवावें । पडी घेऊन उलथावें ।
कांहीं च कळों नेदावें । विवेकबळें ॥ १६ ॥

---

१ ललाटरेखा. २ चौघांचें नशीब कांहीं एकसारखे नसतें, कोणाची ललाटरेखा उत्तम, कोणाची मध्यम व कोणाची कनिष्ठ असते. ३ पिढ्यांचे. ४ कीर्ति. ५ पूर्वजांची नुसती कीर्ति वर्णन करितात ते वेडे च ह्मणावयाचे. हल्लीं आपल्या हातून कांहीं होत आहे का नाहीं याचा श्रोत्यानें विचार करावा ६ सर्व रेषा पुसतो येतात ही जर गोष्ट खरी आहे तर ललारेटषा पुसता येणार नाहीं असें, डोळे मिटून का खरें मानावें. ७ आपल्या मनांतला पीळ जर वाढविला तर मग तो कसला शहाणा, त्याला लोकांचे समाधान करितां येणार नाहीं.

दुसऱ्याचे चालणीं चालावें । दुसऱ्याचे बोलणीं बोलावें ।
दुसऱ्याचे मनोगतें जावें । मिळोनियां ॥ १७ ॥
जो दुसऱ्याच्या हितावरी । तो विपर्ट कांहिं च न करी ।
मानत मानत विवरी । अंतर तयाचें ॥ १८ ॥
आधीं अंतर हातीं घ्यावें । मग हळुहळु उकलावें ।
नाना उपायें न्यावें । परलोकासी ॥ १९ ॥
हेंकाडास हेंकाड मिळाला । तेथें गल्बला चि जाला ।
कळ्हो उठतां त्यातुर्याला । ठाव कैंचा ॥ २० ॥
उगी च करिती बडबड । परी करून दाखवणें हें अवघड ।
पैरस्थळ साधणें जड । कठिण आहे ॥ २१ ॥
धके चपेटे सोसावे । नीच शब्द साहात जावे ।
प्रस्तावोन परावे । आपले होती ॥ २२ ॥
प्रसंग जाणोनि बोलावें । जाणपण कांहीं च न घ्यावें ।
लीनता धरून जावें । जेथतेथें ॥ २३ ॥
कुग्रामें अथवा नगरें । पाहावीं घरांचीं घरें ।
भिक्षामिसें लाहानथोरें । परीक्षून सोडावीं ॥ २४ ॥
ैबहुतीं कांहींतरी सांपडे । विचक्षण लोकीं मित्री घडे ।
उगें च बैसतां कांहीं च न घडे । फिरणें विवरणें ॥ २५ ॥
सावधपणें सर्व जाणावें । वर्तमान आधीं च घ्यावें ।
जाऊं ये॑ तिकडे जावें । विवेकें सहित ॥ २६ ॥
नाना जिनसपाठांतरें । निवती सकळांचीं अंतरें ।
लेहोन देता परोपकारें । सीमा सांडावी ॥ २७ ॥
जैसें जयास पाहिजे । तैसें तयास दीजे ।
तरी मग श्रेष्ठ चि होइजे । सकळां मान्ये ॥ २८ ॥

---

१ विटुर, वाईट २ मोक्षभुवन किंवा शत्रूचा किल्ला. ३ पुष्कळांच्या ठिकाणीं काहींना कांहीं तरी घेण्यासारखा गुण अढळतो. ३ जाऊं ये=जाण्याला योग्य.

भूमंडळीं सकळांस मान्य । तो ह्मणों नये सामान्य ।
कित्येक लोक अनन्य । तया पुरुषासी ॥ २९ ॥
ऐसीं चातुर्याचीं लक्षणें । चातुर्यें दिग्विजये करणें ।
मग तयास काये उणें । जेथतेथें ॥ ३० ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे चातुर्यविवरणनाम समास षष्ठ ॥ ६ ॥

---

॥ श्रीराम ॥

नाना विकाराचें मूळ । ते हे मूळमाया च केवळ ।
अचचळीं जे चंचळ । सूक्ष्मरूपें ॥ १ ॥
मूळमाया जाणीवेची[1] । मुळींच्या[2] मूळ संकल्पाची[3] ।
ओळखी शडगुणैश्वराची । येणें चि न्यायें ॥ २ ॥
प्रकृतिपुरुष शिवशक्ती । आर्धनारीनटेश्वर ह्मणती ।
परी ते आवघी जगज्जोती । मूळ त्यासी ॥ ३ ॥
संकल्पाचें जें चळण । तें चि वायोचें लक्षण[4] ।
वायो आणी त्रिगुण । आणी पचभूतें ॥ ४ ॥
पाहातां कोणीयेक वेल । त्याच्या मुळ्या असती खोल ।
पत्रें पुष्पें फळें केवळ । मुळाचपासीं ॥ ५ ॥
याहिवेगळे नाना रंग । आकार विकार तरंग ।
नाना स्वाद अतरग । मुळामध्यें ॥ ६ ॥
तें चि मूळ फोडून पाहातां । कांहीं च नाहीं वाटे आतां
पुढें वाढतां वाढतां । दिसों लागे ॥ ७ ॥
कड्यावरी वेल निघाला । अधोमुखें वळें चालिला ।
फापावोन पुढें आला । भूमंडळीं ॥ ८ ॥

---

१ जिच्यांत जाणीव आहे अशी मूळमाया. २ ब्रह्माच्या. ३ प्रथम स्फुरणाची. ४ प्रथम 'लक्षण' होतें, त्याचें 'चळण' केलें आहे. ५ प्रथम 'ते चि मूळमाया जाण' असा चरण होता.

तैसी मूळमाया जाण । पंचभूतें आणी त्रिगुण ।
मुळीं आहेत हें प्रमाण । प्रत्ययें जाणावें ॥ ९ ॥
अखंड वेल पुढें वाढला । नाना विकारीं शोभला ।
विकाराचा विकार जाला । असंभाव्य ॥ १० ॥
नाना फळ[1]गरें फुटलीं । नाना जुबाडें वाढलीं ।
अनंत अग्रें चालिलीं । सृष्टीमधें ॥ ११ ॥
कित्येक फळें तीं पडती । सवें चि आणीक निघती ।
ऐसीं होती आणी जाती । सर्वकाळ ॥ १२ ॥
येक वेल चि वाळले । पुन्हा तेथें चि फुटले ।
ऐसे आले आणी गेले । कितीयेक ॥ १३ ॥
पानें झडती आणी फुटती । पुष्पें फळें तेणें चि रीतीं ।
मध्यें जीव हे जगती । असंभाव्य ॥ १४ ॥
अवघा वेल चि कर्पतो । मूळापासून पुन्हा होतो ।
ऐसा अवघा विचार जो तो । प्रत्यक्ष जाणावा ॥ १५ ॥
मूळ[2] खाणोन काढिलें । प्रत्ययेज्ञानें निर्मूळ केलें ।
तरी मग वाढणें चि राहिलें । सकळ कांहीं ॥ १६ ॥
मुळीं बीज सेवटीं बीज । मध्यें जळरूप बीज ।
ऐसा हा स्वभाव सहज । विस्तारला ॥ १७ ॥
मुळामधील ज्या गोष्टी । सांगताहे बीजसृष्टी[3] ।
जेथील अंश तेथें[4] कष्टी । न होता जालो[5] ॥ १८ ॥
जातो येतो पुन्हा जातो । ऐसा प्रत्यावृत्ति करितो ।
परंतु आत्मज्ञानी जो तो । अन्यथा न घडे[6] ॥ १९ ॥

---

१ फांद्या २ वासनारूपी मूळ. ३ बीजसृष्टी ह्मणजे बीजापासून झालेला पत्र-पुष्पफलादि जो विस्तार, त्यावरून मूळमायेच्या स्वरूपाचा आपणांस बोध होत आहे. ४ " तेथील " ला हरताळ लावून " तेथें " केलें आहे. ५ जें ज्यापासून निर्माण होतें तें तेथें सहज लय पावतें. ६ परंतु आत्मज्ञानी जो आहे त्याला हे फेरे करावे लागत नाहींत, प्रत्यावृत्तीचे कष्ट त्याला नाहींत.

न घडे ऐसें जरी ह्मणाव । तरी काहींतरी लागे जाणावें ।
अंतरीं च परी ठावें । सकळास कैंचें ॥ २० ॥
तेणेंसीं च कार्यभाग कारिती । परतु तयास नेणती ।
दिसेना ते काये कारिती । बापुडे लोक ॥ २१ ॥
विषयेभोग तेणें चि घडे । तेणेंविण काहीं च न घडे ।
स्थूळ साडून सूक्ष्मीं पवाडे । ऐसा पाहिजे ॥ २२ ॥
जें आपलें चि अंतर । तद्रूप चि जगदांतर ।
शरीरभेदाचे विकार । वेगळाले ॥ २३ ॥
आंगोळीची आगोळीस वेधना । येकीची येकीस कळेना ।
हात पाये अवेव नाना । येणें चि न्यायें ॥ २४ ॥
अवेवाचें अवेव नेणे । मा तो पराचें काये जाणे ।
परातर याकारणें । जाणवेना ॥ २५ ॥
येका चि उदकें सकळ वनस्पती । नाना अग्रेंभेद दिसती ।
खुडिलीं तितुकीं च सुकती । येर ते टवटवित ॥ २६ ॥
येणें चि न्यायें भेद जाला । कळेना येकाचें येकाला ।
जाणपणें आत्मयाला । भेद नाहीं ॥ २७ ॥
आत्मत्वीं भेद दिसे । देहप्रकृतिकरिता भासे ।
तरी जाणत चि असे । बहुतेक ॥ २८ ॥
देखोन ऐकोन जाणती । शाहाणे अंतर परीक्षिती ।
धूर्त ते अवघें च समजती । गुप्तरूपें ॥ २९ ॥
जो बहुताचें पाळण करी । तो बहुतांचें अतर विवरी ।
धूर्तपणें ठाउकें करीं । सकळ कांहीं ॥ ३० ॥
आधीं मनोगत पाहाती । मग विश्वास धरिती ।
प्राणीमात्र येणें रितीं । वर्ततांहे ॥ ३१ ॥

---

१ त्याला मुळीं च कष्ट पडत नाहींत असें मात्र नव्हे, कारण त्याला तरी ज्ञान हें व्हावें च लागतें. २ अंतरात्मा अंतरीं च आहे, परतु तो सर्वांना कळत नाहीं. ३ अग्रांचे भेद. ४ ज्ञान झालें ह्मणजे. ५ आत्म्याच्या ठिकाणीं जो भिन्नभाव दिसत आहे तो भिन्न भिन्न देहप्रकृतीमुळें होय.

स्मरणामागें विस्मरण । रोकडी प्रचित प्रमाण ।
आपलें ठेवणें आपण । चुकताहे ॥ ३२ ॥
आपलें च आपणा स्मरेना । बोलिलें तें आठवेना ।
उठती अनंत कल्पना । ठाउक्या कैंच्या ॥ ३३ ॥
ऐसें हें चंचळ चक्र । कांहीं नीट कांहीं वक्र ।
जाला रंक[1] अथवा शक्र । तरी स्मरणास्मरणें ॥ ३४ ॥
स्मरण[2] ह्मणिजे देव । विस्मरण ह्मणिजे दानव ।
स्मरणविस्मरणें मानव । वर्तती आतां ॥ ३५ ॥
ह्मणोनि देवी आणि दानवी । संपत्ति द्विधा जाणावी ।
प्रचित मानसीं आणावी । विवेकेंसहित ॥ ३६ ॥
विवेकें विवेक जाणावा । आत्म्यानें आत्मा वोळखावा ।
नेत्रें नेत्र चि पाहावा । दर्पणींचा ॥ ३७ ॥
स्थूळें स्थूळ खाजवावें । सूक्ष्में सूक्ष्म समजावें ।
खुणेनें खुणेसी बाणावें । अंतर्यामीं ॥ ३८ ॥
विचारें जाणावा विचार । अंतरें जाणावें अंतर ।
अंतरें जाणावें परांतर । होउनियां ॥ ३९ ॥
स्मरणामाजीं विस्मरण । हें चि भेदाचें लक्षण ।
येकदेसी परिपूर्ण । होत नाहीं[3] ॥ ४० ॥
पुढें सिकें मागें विसरे । पुढें उजेडे मागें अंधारे ।
पुढें स्मरे मागें विस्मरे । सकळ कांहीं ॥ ४१ ॥
तुर्या जाणावी स्मरण । सुषुप्ति जाणावी विस्मरण ।
उभयेतां शरीरीं जाण । वर्तती आतां ॥ ४२ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे अर्धोर्ध[4]निरूपणनाम समास सातवा ॥७॥

---

१ प्रथम 'राव' होतें त्याचें 'रंक' केलें आहे २ ज्ञानरूप तें स्मरण, अज्ञानरूप तें विस्मरण ३ पूर्ण ज्ञान होत नाहीं, जें ज्ञान होतें तें एकदेशी होतें ह्मणून हा भेद उत्पन्न झाला आहे ४ मूळमाया, प्रकृतिपुरुष १५वें पहा.

॥ श्रीराम ॥

रेणूहून सूक्ष्म किडे । त्याचें आयुष्य निपट चि थोडें ।
युक्ति बुद्धि तेणें चि पाडें । तयामधें ॥ १ ॥
ऐसे नाना जीव असती । पाहों जातां न दिसती ।
अंतःकर्णपंचकाची स्थिती । तेथें हि[3] आहे ॥ २ ॥
त्यांपुरतें त्याचें ज्ञान । विषये इंद्रियें समान ।
सूक्ष्म शरीरें विवरोन । पाहातो कोण ॥ ३ ॥
त्यास मुंगी माहा थोर । नेणों चालिला कुंजर ।
मुंगीस मुताचा पूर । ऐसें बोलती ॥ ४ ॥
तें मुंगीसमान शरीरें । उदड असती लाहानथोरें ।
समस्तांमध्यें जीवेश्वरें । वस्ति कीजे ॥ ५ ॥
ऐसिया किड्यांचा संभार । उदंड दाटला विस्तार ।
अत्यंत साक्षपी जो नर । तो विवरोन पाहे ॥ ६ ॥
नाना नक्षत्रीं नाना किडे । त्यांस भासती पर्वतायेवढे ।
आयुष्य हि तेणें चि पाडें । उदड वाटे ॥ ७ ॥
पक्षायेवढें लाहान नाहीं । पक्षायेवढें थोर नाहीं ।
सर्प आणि मछ पाहीं । येणें चि पाडें ॥ ८ ॥
मुंगीपासून थोरथोरें । चढतीं वाढतीं शरीरें ।
त्यांचीं निर्धारिता अंतरें । कळों येती ॥ ९ ॥
नाना वर्ण नाना रग । नाना जीवनाचे तरग ।
येक सुरंगें येक विरंगें । किती ह्मणौनि सांगावें ॥ १० ॥
येकें सकुमारें येकें कठोरें । निर्माण केलीं जगदेश्वरें ।
सुवर्णासारिखीं शरीरें । दैदिप्यमानें ॥ ११ ॥
शरीरभेदें आहारभेदें । वाचाभेदें गुणभेदें ।
अतरीं वसिजे अभेदें । येकरूपें ॥ १२ ॥

---

१ अगदीं. २ मानानें. ३ 'चि' ची 'हि' केली आहे. ४ हत्ती ५ गोळाबेरीज. ६ चांगला रंग. ७ वाईट रंग ८ 'आहारा' बद्दल प्रथम 'अहंकार' होतें. ९ 'गुणा' बद्दल प्रथम 'देह' होतें.

येक त्रासकें येक मारकें । पाहों जातां नाना कौतुक ।
कितीयेक आमोलिकें । सृष्टीमध्यें ॥ १३ ॥
ऐसीं अवघीं विवरोन पाहे । ऐसा प्राणी कोण आहे ।
आपल्यापुरतें जाणोन राहे । किंचितमात्र ॥ १४ ॥
नवखंड हे वसुधरा । सप्तसागरांचा फेरा ।
ब्रह्मांडाबाहेरील नीरा । कोण पाहे ॥ १५ ॥
त्या नीरामधें जीव असती । पाहों जाता असंख्याती ।
त्या विशाळ जीवांची स्थिती । कोण जाणे ॥ १६ ॥
जेथें जीवन तेथें जीव । हा उत्पत्तीचा स्वभाव ।
पाहातां याचा अभिप्राव । उदंड असे ॥ १७ ॥
पृथ्वीगर्भीं नाना नीरें । त्या नीरामधें शरीरें ।
नाना जिनस लाहानथोरें । कोण जाणे ॥ १८ ॥
येक प्राणी अंतरिक्ष असती । तेहीं नाहीं देखिली क्षिती ।
वरीच्यावरी उडोन जाती । पक्ष फुटल्यानंतरें ॥ १९ ॥
नाना खेचरें आणि भूचरें । नाना वनचरें आणि जळचरें ।
चौऱ्यासि योनीप्रकारें । कोण जाणे ॥ २० ॥
उष्ण तेज वेगळें करुनी । जेथें तेथें जीवयोनी ।
कल्पनेपासुनी होती प्राणी । कोण जाणे ॥ २१ ॥
येक नाना सामर्थ्यें केले । येक इछेपासून जाले ।
येक शब्दासरिसे पावले । श्रापदेह ॥ २२ ॥
येक देह बाजीगरीचे । येक देह वोडंबरीचे ।
येक देह देवतांचे । नाना प्रकारें ॥ २३ ॥
येक क्रोधापासून जाले । येक तपापासून जन्मले ।
येक उश्रापें पावले । पूर्वदेह ॥ २४ ॥
ऐसें भगवंताचें करणें । किती ह्मणोन सांगणें ।
विचित्र मायेच्या गुणें । होत जातें ॥ २५ ॥

नाना अवघड करणी केली । कोणीं देखिली ना ऐकिली ।
विचित्र कळा समजली । पाहिजे सर्वें ॥ २६ ॥
थोडें बहुत समजलें । पोटापुरती विद्या सिकलें ।
प्राणी उगें च गर्वें गेलें । मी ज्ञाता ह्मणोनी ॥ २७ ॥
ज्ञानी येक अंतरात्मा । सर्वांमधें सर्वात्मा ।
त्याचा कळावया महिमा । बुद्धि कैंची ॥ २८ ॥
सप्तकंचुक[1] ब्रह्मांड । त्यांत सप्तकंचुक पिंड ।
त्या पिंडामधें उदंड । प्राणी असती ॥ २९ ॥
आपल्या देहांतील न कळे । मा तें अवघें कैंचें कळे ।
लोक होती उतावळे । अल्पज्ञानें ॥ ३० ॥
अनुरेणाऐसें[2] जिनस । त्याचे आह्मी विराट पुरुष ।
आमचें उदंड चि आयुष्य । त्याच्या हिसेबें ॥ ३१ ॥
त्याच्या रिती त्याचे दंडक । वर्तायाचे असती अनेक ।
जाणे सर्व हि कौतुक । ऐसा कैंचा ॥ ३२ ॥
धन्य परमेश्वराची करणी । अनुमानेना अंतःकरणीं ।
उगी च अहंता पापिणी । वेढा लावी ॥ ३३ ॥
अहंता साडून विवरणें । कित्येक देवाचें करणें ।
पाहातां मनुष्याचें जिणें । थोडें आहे ॥ ३४ ॥
थोडें जिणें अर्धपुडी[3] काया । गर्व करिती रडाया ।
शरीर आवघें पडाया । वेळ नाहीं ॥ ३५ ॥
कुश्चीळ ठाईं जन्मलें । आणि कुश्चीळ रसें चि वाढलें ।
यास ह्मणती थोरलें । कोण्या हिसेबें ॥ ३६ ॥
कुश्चीळ आणि क्षणभंगुर । अखंड वेथा चिंतातुर ।
लोक उगे च ह्मणती थोर । वेडपणें ॥ ३७ ॥

---

१ कंचुक–वेष्टण. २ अणुरेणुइतके लहान. ३ अर्धक्षण टिकणारी, क्षणभंगुर.

काया माया दों दिसांची । आदिअंतीं अवघी ची ची ।
झाकातापा करून उगी चि । थोरीव दाविती ॥ ३८ ॥
झांकिलें तरी उपंदरें पडे । दुर्गंधी सुटे जिकडे तिकडे ।
जो कोणी विवेकें पवाडे । तो चि धन्य ॥ ३९ ॥
उगें चि कासया तंडावें । मोडा अहंतेचें पुडावें ।
विवेकें देवास धुडावें । हें उत्तमोत्तम ॥ ४० ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सूक्ष्मजीवनिरूपणनाम समास अष्टम ॥ ८

॥ श्रीराम ॥

चौखाणीचे प्राणी असती । अवघे उदकें चि वाढती ।
ऐसे होती आणी जाती । असंख्यात ॥ १ ॥
तत्वांचें शरीर जालें । अतरात्म्यासगट वळलें ।
त्याचें मूळ जों शोधिलें । तों उदकरूप ॥ २ ॥
शरत्काळींचीं शरीरें । पीळपीळों झिरपती नीरें ।
उभये रेतें येकत्रें । मिसळती रक्तीं ॥ ३ ॥
अन्नरस देहरस । रक्तरेतें बांधे मूस ।
रसद्रूयें सावकास । वाढों लागे ॥ ४ ॥
वाढतां वाढतां वाढलें । कोमळाचें कठीण जालें ।
पुढें उदक पैसावलें । नाना अवेवीं ॥ ५ ॥
संपूर्ण होता बाहेरी पडे । भूमीस पडतां मग तें रडे ।
अवघ्याचें अवघें च घडे । ऐसें आहे ॥ ६ ॥
कुडी वाढे कुबुद्धि वाढे । मुळापासून अवघें च घडे ।
अवघें चि मोडे आणी वाढे । देखतदेखता ॥ ७ ॥

---

१ संपत्ति २ जन्मकाळीं व मरणकाळीं ३ ( प्रेताला ) झाकून पाकून. ४ उघडें ५ ' शरत्काळींचीं शरीरें ' ह्मणजे नदी, नाले, असा अर्थ कोणी करितात व कोणी, शरत्काळीं घाम येऊन शरीरातून जसें पाणी झिरपतें, असा अर्थ करितात

पुढें अवयियांचें शरीर । दिवसेंदिवस जालें थोर ।
सुचों लागला विचार । कांहीं कांहीं ॥ ८ ॥
फळामधें बीज आलें । तेणें न्यायें तेथें जालें ।
ऐकतां देखता उमजलें । सकळ कांहीं ॥ ९ ॥
बीजें उदकें अकुरती । उदक नस्तां उडोन जाती ।
येके ठाईं उदक माती । होता बरें ॥ १० ॥
दोहिंमधें असतां बीज । भिजोन अंकुर सहज ।
वाढतां वाढला पुढें रीझे । उदड आहे ॥ ११ ॥
इकडे मुळ्या धावा घेती । तिकडे अग्रें हेलावती ।
मुळें अग्रें द्विधा होती । बीजापासून ॥ १२ ॥
मुळ्या चालिल्या पाताळीं । अग्रें धांवती अंतराळीं ।
नाना पत्रीं पुष्पीं फळीं । दगडलीं झाडें ॥ १३ ॥
फळांवडिल सुमनें । सुमनांवडिल पानें ।
पानावडिल अनुसधानें । काष्ठें आवघीं ॥ १४ ॥
काष्ठावडिल मुळ्या बारिक । मुळ्यांवडिल तें उदक ।
उदक आळोन कौतुक । भूमडळाचें ॥ १५ ॥
याची ऐसी आहे प्रचिती । तेव्हां सकळावाडेल जगती ।
जगतीवडिल मूर्ती । आपोनारायेणाची ॥ १६ ॥
तयावडिल अग्निदेव । अग्नीवडिल वायेदेव ।
वायेदेवावडिल स्वभाव । अंतरात्म्याचा ॥ १७ ॥
सकळावडिल अंतरात्मा । त्यासि नेणे तो दुरात्मा ।
दुरात्मा ह्मणिजे दुरी आत्मा । अंतरला तया ॥ १८ ॥
जवळी असोन चुकलें । प्रत्ययास नाहीं सोकलें ।
उगें चि आलें आणी गेलें । देवाचकरितां ॥ १९ ॥

---

१ रजन, आनंद. २ प्रथम "झाडें" होतें ३ क्रमानें ४ प्रत्यय पाहण्यास सोकलें नाहीं, ह्मणजे प्रत्यय पाहिला नाहीं ५ देवाच्या योगानें, अंतरात्म्याच्या मुळें, अंतरात्मा आहे ह्मणून

म्हणौन सकळांवडिल देव । त्यासी होतां अनन्यभाव ।
मग हे प्रकृतीचा स्वभाव । पालटों लागे ॥ २० ॥
करी आपुला व्यासंग । कदापि नव्हे ध्यानभंग ।
बोलणें चालणें वेग । पडों च नेदी ॥ २१ ॥
जें वडिलीं निर्माण केलें । तें पाहिजे पाहिलें ।
काये काये वडिलीं केलें । किती पाहावें ॥ २२ ॥
तो वडिलें जेथें चेतला । तो चि भाग्यपुरुष जाला ।
अल्प चेतनें तयाला । अल्पभाग्य ॥ २३ ॥
तया नारायेणाला मनीं । अखंड आठवावें ध्यानीं ।
मग ते लक्ष्मी तयापासुनी । जाईल कोठें ॥ २४ ॥
नारायेण असे विश्वीं । त्याची पूजा करीत जावी ।
याकारणें तोषवावी । कोणीतरी काया ॥ २५ ॥
उपासना शोधून पाहिली । तों ते विश्वपाळिती जाली ।
न कळे लीळा परीक्षिली । न वचे कोणा ॥ २६ ॥
देवाची लीळा देवेंविण । आणीक दुसरा पाहे कोण ।
पाहाणें तितुकें आपण । देव चि असे ॥ २७ ॥
उपासना सकळां ठाईं । आत्माराम कोठें नाहीं ।
याकारणें ठाइं ठाइं । रामें आटोपिलें ॥ २८ ॥
ऐसी माझी उपासना । आणितां नये अनुमानां ।
नेऊन घाली निरंजना । पैलिकडे ॥ २९ ॥
देवाकारितां कर्में चालती । देवाकारितां उपासक होती ।
देवाकारितां ज्ञानी असती । कितियेक ॥ ३० ॥

---

१ अंतरात्मा. २ प्रकाशरूप झाला. ३ सर्वत्र अंतरात्मा आहे ह्मणून सर्वांचें मनोगत जाणून त्यांना तोषवावें, याचें नांव उपासना. यावरून उपासना ह्मणजे विश्वाचा प्रतिपाळ करणें असा अर्थ होतो. ४ विश्वव्यापक अशी आमची उपासना आहे, कारण अंतरात्मा कोठें नाहीं ? सर्वत्र आहे. ५ आणि ह्मणून सर्वत्र राम भरला आहे ६ इतकी ती व्यापक आहे कीं तिचें अनुमान होत नाहीं. ७ अंतरात्म्याचे योगानें.

नाना शास्त्र नाना मतें । देव चि बोलिला समस्त ।
नेमकांनेमक वेस्तावेस्तें । कर्मानुसार ॥ ३१ ॥
देवास अवघें लागे करावें । त्यात घेऊं ये तितुकें घ्यावें ।
अधिकारासारिखें चालावें । ह्मणिजे बरें ॥ ३२ ॥
आवोहान विसर्जन । ऐसें चि बोलिलें विधान ।
पूर्वपक्ष जाला येथून । सिद्धांत पुढें ॥ ३३ ॥
वेदांत सिद्धांत धादात । प्रचित प्रमाण नेमस्त ।
पंचिकर्ण सांडून हित । वाक्यार्थ पाहावा ॥ ३४ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे पिंडात्पत्तिनिरूपणनाम समास नवम ॥ ९॥

॥ श्रीराम ॥

गगनीं अवघें चि होत जातें । गगनाऐसें तगेना तें ।
निश्चळीं चंचळ नाना तें । येणें चि न्यायें ॥ १ ॥
अंधार दाटला बळें । वाटे गगन जालें काळें ।
रविकिर्णें तें पिवळें । सवें चि वाटे ॥ २ ॥
उदंड हिंव जेव्हां पडिलें । गमे गगन थंड जालें ।
उष्ण झळेनें वाळलें । ऐसें वाटे ॥ ३ ॥
ऐसें जें कांहीं वाटलें । तें तें जालें आणी गेलें ।
आकाशासारिखें तगलें । हें तों घडेना ॥ ४ ॥
उत्तम जाणीवेचा जिनसें । समजोन पाहे सावकास ।
निराभास तें आकाश । भास मिथ्या ॥ ५ ॥

---

१ नेम, निम सर्व देवानें च केलें आहे, पण त्यांत घेण्यासारखें असेल तें घ्यावें. २ मायेचा उद्भव. ३ मायेचा संहार ४ ब्रह्मांडाची उभारणी व संहारणी कशी होते हें जाणणें हा च पूजाविधि होय; ही च उपासना होय, उपासना ह्मटली ह्मणजे तींत द्वैत आहे ह्मणून ती पूर्वपक्षांत च येते. ५ वेदांत ( शास्त्रप्रतीति ), सिद्धात ( गुरुप्रतीति ) व धादात ( आत्मप्रतीति ) यांत आत्मप्रतीतीचें प्रमाण मुख्य होय ६ पंचीकरणाचा त्याग करून हितकारक जें महावाक्य त्याचा अर्थ पाहावा. ७ उत्तम जाणीव ही च गोष्ट.

उदक पसर वायो पसरे । आत्मा अत्यंत चि पसरे ।
तत्वें तत्वें अवघें चि पसरे । अतर्यामीं ॥ ६ ॥
चळतें आणी चळेना तें । अंतरीं अवघें च कळतें ।
विवरणें चि निवळतें । प्राणीमात्रासी ॥ ७ ॥
विवरतां विवरतां सेवटीं । निवृत्तिपदीं अखंड भेटी ।
जालियानें तुटी । होणार नाहीं ॥ ८ ॥
जेथें ज्ञानाचें होतें विज्ञान । आणि मनाचें होतें उन्मन ।
तत्वनिर्शनीं अनन्य । विवेकें होतें ॥ ९ ॥
वडिलांस शोधून पाहिलें । तों चंचळाचें निश्चळ जालें ।
देवभक्तपण गेलें । तये ठाइं ॥ १० ॥
ठाव ह्मणतां पदार्थ नाहीं । पदार्थमात्र मुळीं नाहीं ।
जैसें तैसें बोलों कांहीं । कळावया ॥ ११ ॥
अज्ञानशक्ति निरसली । ज्ञानशक्ति मावळली ।
वृत्तिसुन्यें कैसी जाली । स्थिती पाहा ॥ १२ ॥
मुख्य शक्तिपात तो ऐसा । नाहीं चंचळाचा वळसा ।
निवांतीं निवांत कैसा । निर्विकारी ॥ १३ ॥
चंचळाचीं विकार वाॅलटें । तें चंचळ चि जेथें आटे ।
चंचळ निश्चळ घेनवटे । हें तों घडेना ॥ १४ ॥
माहावाक्याचा विचारु । तेथें सन्याशास अधिकारु ।
दैवीकृपेचा जो नरु । तो हि विवरोन पाहे ॥ १५ ॥

---

१ प्रथम " अंतरात्मा " होतें २ तत्वें तत्व=एकंदर तत्त्वें ३ ज्ञानरूपी द्वैत देखील जेथें उरत नाहीं. ४ अंतरात्म्यास ५ त्या ठिकाणीं देव आणि भक्त असा भिन्न भाव नाहींसा होतो असें वर ह्मटलें खरें, पण ' ठाव ' ठिकाण ह्मणून कांहीं पदार्थ च नाहीं. ६ भोंवरा. ७ मायेचा भ्रम नाहींसा झाल्यावर निर्विकारी असा हा, निवांत अशा ब्रह्मस्वरूपाच्या ठिकाणीं निवात होतो, ह्मणजे ब्रह्मपदाची त्याला प्राप्ति होते. ८ आळ चंचळ हें विकाररूप वाॅलटें आहे, ब्रह्माच्या ठिकाणीं चंचळाचा आळ आहे ९ चंचल आणि निश्चळ याचें सामानाधिकरण्य ( ऐक्य ) होईल असें नाहीं.

संन्यासी ह्मणिजे शडन्यासी । विचारवंत सर्व संन्यासी ।
आपली करणी आपणासी । निश्चयेंसीं ॥ १६ ॥
जगदीश बोलल्यावरी । तेथें कोण अनुमान करी ।
आतां असो हें विचारी । विचार जाणती ॥ १७ ॥
जे जे विचारी समजले । ते ते निःसंग होऊन गेले ।
देहाभिमानी जे उरले । ते देहाभिमान रक्षिती ॥ १८ ॥
लक्षीं बैसलें अलक्ष[1] । उडोन गेला पूर्वपक्ष ।
हेतुरूपें अतरसाक्ष । तो हि मावळला[2] ॥ १९ ॥
आकाश आणि पाताळ । दोनी नामें अतराळ ।
काढितां दृश्याचें चवंळ[3] । अखंड जालें ॥ २० ॥
तें तों अखड चि आहे । मन उपाधी लक्षून पाहे ।
उपाधीनिरासें साहे । शब्द कैसा ॥ २१ ॥
शब्दपर कल्पनेपर । मनबुद्धिअगोचर ।
विचारें पाहावा विचार । अंतर्यामीं ॥ २२ ॥
पाहातां पाहाता कळों येतें । कळलें तितुकें वेर्थ जातें ।
अवघड कैसें बोलावें तें । कोण्या प्रकारें ॥ २३ ॥
वाक्यार्थवाच्याश शोधिला । अलक्षीं लक्ष्याश बुडाला ।
पुढें समजोन बोला । कोणीतरी[6] ॥ २४ ॥

---

१ मनाच्या ठिकाणीं ब्रह्म बसलें, ब्रह्मविचारारूढ झाला. २ हेतुरूप ( जाणण्याची इच्छा धरून असलेला ) जो अतर्साक्ष ( अंतरात्मा ) तो मावळला, ह्मणजे जीवशिवाचें ऐक्य झालें. ३ तवा, पापुद्रा. दृश्यरूपी चवळ ह्मणजे पृथ्वी ही जर मधली काढून टाकली तर आकाश आणि पाताळ एक च आहेत. ४ आकाश पाताळ एक च आहेत पण काहींतरी उपाधीला धरून पाहण्याची मनाला संवय झालेली असते, परंतु ती उपाधी काढून टाकली तर मग आकाश आणि पाताळ असे निरनिराळे शब्द तरी कसे उरतील ? सर्व एक च. घटमठाची उपाधी नसली तर घटाकाश, मठाकाश असे शब्द कसे बनतील ? ५ शब्दानें जें कळलें तें व्यर्थ गेलें, कारण शब्द मिथ्या होत, ' कळलें ' असें वाटलें तरी तें व्यर्थ होय, हें ज्ञान देखील उरलें न पाहिजे. ६ महावाक्याचा जो अर्थ त्याचा जो वाच्यांश तो शोधून बाकी लक्षांश उरला, तो लक्षांश हि अलक्षीं बुडाला, मग आतां तुह्मी बोलणार कसे ?

शाश्वतास शोधीत गेला । तेणें ज्ञानी साच जाला ।
विकार सांडून मिळाला । निर्विकारीं ॥ २५ ॥
दु:स्वप्न उदंड देखिलें । जागें होतां लटिकें जालें ।
पुन्हां जरी तें आठविलें । तरी तें मिथ्या ॥ २६ ॥
प्रारब्धयोगें देह असे । असे अथवा नासे ।
विचार अंतरीं बैसे । चळेना ऐसा[1] ॥ २७ ॥
बीज अग्नीनें भाजलें । त्याचें वाढणें खुंटलें ।
ज्ञात्यास तैसें जालें । वासना[2]बीज ॥ २८ ॥
विचारें निश्चळ जाली बुद्धि । बुद्धिपासीं कार्यसिद्धि ।
पाहातां वडिलांची बुद्धि । निश्चळीं गेली ॥ २९ ॥
निश्चळास ध्यातो तो निश्चळ । चंचळास ध्यातो तो चंचळ ।
भूतास ध्यातो तो केवळ । भूतें[3] होये ॥ ३० ॥
जो पावला सेवटवरी । तयास हें कांहीं च न करी ।
अंतरनिष्ठा बाजीगरी । तैसी माया[4] ॥ ३१ ॥
मिथ्या ऐसें कळों आलें । विचारानें सदृढ जालें ।
अवघें भये चि उडालें । अकस्मात ॥ ३२ ॥
उपासनेचें उत्तीर्ण व्हावें[5] । भक्तजनें वाढवावें ।
अंतरीं विवेकें उमजावें । सकळ कांहीं ॥ ३३ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सिद्धांतनिरूपणनाम समास दाहावा॥१०

---

१ एकदा ज्ञान झाल्यावर मग देहाची मातब्बरी उरत नाहीं, प्रारब्ध असेल तोंपर्यंत देह राहील आणि मग जाईल, परंतु तो असो वा नसो, विचार ( ज्ञान ) कांहीं ढळत नाहीं. २ ज्ञात्याचें वासनाबीज ज्ञानाग्नीनें दग्ध होतें. ३ पंचतत्त्वांचें ध्यान करणारा पंचतत्त्वात्मक होतो, त्याचा जन्म चुकत नाहीं. ४ गारुड्याच्या तमाशाचें ज्याला इंगित ठाऊक असतें त्याला जसा त्या खेळानें मोह उत्पन्न होत नाहीं, तद्वत् जे ज्ञानी आहेत त्याना माया कांहीं करूं शकत नाहीं. ५ हें सर्व ज्ञान रामोपासनेच्या योगानें झालें म्हणून त्या उपासनेचे उपकार फेडले पाहिजेत; ते कसे फेडावे ? तर ती उपासना वाढवावी.

## ॥ दशक षोडश सप्ततिन्वयाचा ॥ १६ ॥

### ॥ श्रीरामसमर्थ ॥

धन्य धन्य तो वाल्मीक । ऋषीमाजी पुण्यश्लोक ।
जयाचेन हा त्रिलोक्य । पावन जाला ॥ १ ॥
भविष्य आणी शतकोटी । हें तों नाहीं देखिलें दृष्टीं ।
धांडोळितां सकळ सृष्टि । श्रुत नव्हे ॥ २ ॥
भविष्याचें येक वचन । कदाचित जालें प्रमाण ।
तरी आश्चिर्य मानिती जन । भूमंडळीचे ॥ ३ ॥
नसतां रघुनाथअवतार । नाहीं पाहिला शास्त्राधार ।
रामकथेचा विस्तार । विस्तारिला जेणें ॥ ४ ॥
ऐसा जयाचा वाग्विळास । ऐकोनी संतोषला महेश ।
मग विभागिलें त्रयलोक्यास । शतकोटी रामायेण ॥ ५ ॥
ज्याचें कवित्व शंकरें पाहिलें । इतरां न वचे अनुमानलें ।
रामउपासकासी जालें । परम समाधान ॥ ६ ॥
ऋषी होते थोर थोर । बहुतीं केला कवित्वविचार ।
परी वाल्मीकासारिखा कवेश्वर । न भूतो न भविष्यति ॥ ७ ॥
पूर्वीं केलीं दुष्ट[2] कर्में । परी पावन जाला रामनामें ।
नाम जपतां दृढ नेमें । पुण्यें सीमा सांडिली ॥ ८ ॥
उफराटें नाम ह्मणतां वाचें । पर्वत फुटले पापाचे ।
ध्वज उभारले पुण्याचे । ब्रह्मांडावरुते ॥ ९ ॥
वाल्मीकें जेथें तप केलें । तें वन पुण्यपावन जालें ।
शुष्क काष्टीं अंकुर फुटले । तपोबळें जयाच्या ॥ १० ॥
पूर्वीं होता वाल्हाकोळी । जीवघातकी भूमंडळीं ।
तो चि वंदिजे सकळीं । विबुधीं आणि ऋषेश्वरीं ॥ ११ ॥

---

१ "सप्ततिन्वयाचा" याचा अर्थ कसा करावयाचा? सोनेरी, मुद्गल, जयराम, उब्रज वगैरे सर्व जुन्या प्रतींत अशीं च अक्षरें आहेत. सप्तसप्ति ह्मणजे सूर्य व अन्वय ह्मणजे वंश तेव्हा सप्तसप्त्यन्वय ह्मणजे सूर्यवंश असा अर्थ होतो. गिरिधरांच्या ग्रन्थ-भावार्थांत 'तत्त्वान्वय' असें या दशकाचें नाव दिलें आहे. २ दुष्ट

उपरति आणि अनुताप । तेथें कैंचें उरेल पाप ।
देहांततपें[1] पुण्यरूप । दुसरा जन्म जाला ॥ १२ ॥
अनुतापें आसन घातलें । देहाचें वारुळ जालें ।
तें चि नाम पुढें पडिलें । वाल्मीक ऐसें ॥ १३ ॥
वारुळास वाल्मीक बोलिजे । ह्मणोनि वाल्मीक नाम साजे ।
जयाच्या तीव्र तपें झिजे । हृदय तापसाचें ॥ १४ ॥
जो तापसामाजीं श्रेष्ठ । जो कवेश्वरामधें वरिष्ठ ।
जयाचें बोलणें पष्ट । निश्चयाचें ॥ १५ ॥
जो निष्ठावतांचें मंडण । रघुनाथभक्तांचें[2] भूषण ।
ज्याची धारणा असाधारण । साधकां सदृढ करी ॥ १६ ॥
धन्य वाल्मीक ऋषेश्वर । समर्थांचा कवेश्वर ।
तयासी माझा नमस्कार । साष्टांगभावें ॥ १७ ॥
वाल्मीक ऋषी बोलिला नसता । तरी आह्मांसी कैंची रामकथा ।
ह्मणोनियां समर्था । काय ह्मणोनी वर्णावें ॥ १८ ॥
रघुनाथकीर्ति प्रगट केली । तेणें तयाची महिमा वाढली ।
भक्तमंडळी सुखी जाली । श्रवणमात्रें ॥ १९ ॥
आपुला काळ सार्थक केला । रघुनाथकीर्तीमधें बुडाला ।
भूमंडळीं उधरिला । बहुत लोक ॥ २० ॥
रघुनाथभक्त थोरथोर । महिमा जयांचा अपार ।
त्या समस्तांचा किंकर । रामदास ह्मणे ॥ २१ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे वाल्मीकस्तवननिरूपणनाम समास प्रथम ॥

---

॥ श्रीरामसमर्थ ॥

धन्य धन्य हा सूर्यवौंश । सकळ वौंशामधें विशेष ।
मार्तंडमंडळाचा प्रकाश । फांकला भूमंडळीं ॥ १ ॥

---

१ देहांततपें=देहाचा अंत होईपर्यंत केलेल्या तपानें. २ “ भक्तीचें ” होतें, त्याचें “ भक्तांचें ” केलें आहे.

सोमाआंगीं आहे लांछन । पक्षा येका होय क्षीण ।
रविकिर्णे फाकतां आपण । कळाहीन होये ॥ २ ॥
याकारणें सूर्यापुढें । दुसरी साम्यता न घडे ।
जयाच्या प्रकाशें उजेडे । प्राणीमात्रासी ॥ ३ ॥
नाना धर्म नाना कर्में । उत्तमें मध्यमें अधमें ।
सुगमें दुर्गमें नित्य नेमें । सृष्टीमधें चालती ॥ ४ ॥
वेदशास्त्रें आणी पुराणें । मंत्र यंत्र नाना साधनें ।
संध्या स्नान पूजाविधानें । सूर्येंविण बापुडीं ॥ ५ ॥
नाना योग नाना मतें । पाहों जातां असंख्यातें ।
जाती आपुलाल्या पंथें । सूर्यउदय जालियां ॥ ६ ॥
प्रपंचिक अथवा परमार्थिक । कार्य करणें कोणीयेक ।
दिवसेंविण निरार्थक । सार्थक नव्हे ॥ ७ ॥
सूर्याचें अधिष्ठान डोळे । डोळे नसता सर्व आंधळे ।
याकारणें कांहीं च न चले । सूर्येंविण ॥ ८ ॥
ह्मणाल अंध कवित्वें करिती । तरी हे हि सूर्याची च गती ।
थड जालियां आपुली मती । मग मतिप्रकाश कैचा ॥ ९ ॥
उष्ण प्रकाश तो सूर्याचा । शीत प्रकाश तो चंद्राचा ।
उष्णत्व नस्तां देहाचा । घात होये ॥ १० ॥
याकारणें सूर्येंविण । सहसा न चले कारण ।
श्रोते तुह्मी विचक्षण । शोधून पाहा ॥ ११ ॥
हरिहराच्या अवतारमूर्ती । शिवशक्तीच्या अनंत वेक्ती ।
यापूर्वीं होता गभस्ती । आतां हि आहे ॥ १२ ॥
जितुके संसारासी आले । तितुके सूर्याखालें वर्तले ।
अंतीं देहे त्यागून गेले । प्रभाकरादेखतां ॥ १३ ॥
चंद्र ऐलीकडे जाला । क्षीरसागरीं मथून काढिला ।
चौदा रत्नांमधें आला । बंधु लक्ष्मीचा ॥ १४ ॥

विश्वचक्षु हा भास्कर। ऐसें जाणती लाहानथोर।
याकारणें दिवाकर। श्रेष्ठांहून श्रेष्ठ॥ १५॥
अपार नभमार्ग क्रमणें। ऐसे चि प्रत्यहीं येणें जाणें।
या लोकोपकाराकारणें। आज्ञा समर्थाची॥ १६॥
दिवस नस्तां अंधकार। सर्वांसी नकळे सारासार।
दिवसेंविण तश्कर। कां दिवाभीत पक्षी॥ १७॥
सूर्यापुढें आणिक दुसरें। कोण आणावें सामोरें॥
तेजोरासी निर्धारें। उपमेरहित॥ १८॥
ऐसा हा सविता सकळांचा। पूर्वज होय रघुनाथाचा।
अगाध महिमा मानवी वाचा। काये ह्मणोनी वर्णावी॥ १९॥
रघुनाथवौंश पूर्वापर। येकाहूनि येक थोर।
मज मतिमंदास हा विचार। काये कळे॥ २०॥
रघुनाथाचा समुदाव। तेथें गुंतला अंतर्भाव।
ह्मणोनी वर्णितां महत्व। वाग्दुर्बळ मी॥ २१॥
सकळ दोषाचा परिहार। करितां सूर्यास नमस्कार।
स्फूर्ति वाढे निरंतर। सूर्यदर्शन घेतां॥ २२॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सूर्यस्तवननिरूपणनाम समास दुसरा॥२॥

---

॥ श्रीरामसमर्थ॥

धन्य धन्य हे वसुमती। इचा महिमा सांगों किती।
प्राणीमात्र तितुके राहाती। तिच्या आधारें॥ १॥
अंतरीक्ष राहाती जीव। तो हि पृथ्वीचा स्वभाव।
देहे जड नस्तां जीव। कैसे तगती॥ २॥
जाळिती पोळिती कुदळिती। नांगरिती उकरिती खाणती।
मळ मूत्र तिजवरी करिती। आणी वमन॥ ३॥
नासकें कुजकें जर्जर। पृथ्वीविण कैंची थार।
देहांतकाळीं शरीर। तिजवरी पडे॥ ४॥

बरें वाईट सकळ कांहीं। पृथ्वीविण थार नाहीं।
नाना धातु द्रव्य तें हि। भूमीचे पोटीं॥ ५॥
येकास येक संव्हारिती। प्राणी भूमीवरी असती।
भूमी साडून जाती। कोणीकडे॥ ६॥
गड कोठ पुरें पट्टणें। नाना देश कळती अटणें।
देव दानव मानव राहाणें। पृथ्वीवरी॥ ७॥
नाना रत्नें हिरे परीस। नाना धातु द्रव्यास।
गुप्त प्रगट कराव्यास। पृथ्वीविण नाहीं॥ ८॥
मेरुमांदार हिमाचळ। नाना अष्टकुळाचळ।
नाना पक्षी मछ व्याळ। भूमंडळीं॥ ९॥
नाना समुद्रापैलीकडे। भोंवतें आवर्णोदका कडें।
असंभाव्य तुटले कडे। भूमडळाचे॥ १०॥
त्यांमधें गुप्त विवरें। लाहानथोरें अपारें।
तेथें निबिड अंधकारें। वस्ती कीजे॥ ११॥
आवर्णोदक तें अपार। त्याचा कोण जाणे पार।
उदंड दाटले जळचर। असंभाव्य मोठे॥ १२॥
त्या जीवनास आधार पवन। निबिड दाट आणी घन।
फुटों शकेना जीवन। कोणेकडे॥ १३॥
त्या प्रभजनासी आधार। कठीणपणें अहंकार[1]।
ऐसा त्या भूगोळाचा पार। कोण जाणे॥ १४॥
नाना पदार्थांच्या खाणी। धातुरत्नांच्या दाटणी।
कल्पतरु चिंतामणी। अमृतकुंडें॥ १५॥
नाना दीपें[2] नाना खडें। वसती उद्वसें उदंडें।
तेथें नाना जीवनाची बडें। वेगळालीं॥ १६॥

---

१ तमोगुणापासून पंचतत्त्वें झालीं आहेत. अहंकार हा च तमोगुण, तो कठिण आहे. कठिण ह्मणजे अज्ञानमूलक. २ द्वीपें.

मेरुभोंवते कडे कापले । असंभाव्य कडोस पडिलें ।
निबिड तरु लागले । नाना जिनसी ॥ १७ ॥
त्यासन्निध लोकालोक । जेथें सूर्याचें फिरे चाक ।
चंद्राद्रि द्रोणाद्रि मैनाक । माहां गिरी ॥ १८ ॥
नाना देशीं पाषाणभेद । नाना जिनसी मृत्तिकाभेद ।
नाना विभूति छंदे[३] बंदें । नाना खाणी ॥ १९ ॥
बहुरत्न हे वसुंदरा । ऐसा पदार्थ कैचा दुसरा ।
अफाट पडिलें सैरावरा । जिकडे तिकडे ॥ २० ॥
अवघी पृथ्वी फिरोन पाहे । ऐसा प्राणी कोण आहे ।
दुजी तुळणा न साहे । धरणीविषीं ॥ २१ ॥
नाना वल्ली नाना पिकें । देसोदेसीं अनेकें ।
पाहों जातां सारिख्या सारिखें । येक हि नाहीं ॥ २२ ॥
स्वर्ग मृत्य आणी पाताळें । अपूर्व रचिलीं तीन ताळें ।
पाताळलोकीं माहां व्याळें । वस्ती कीजे ॥ २३ ॥
नाना वल्ली बीजाची खाणी । ते हे विशाळ धरणी ।
अभिनव कर्त्याची करणी । होऊन गेली ॥ २४ ॥
गड कोट नाना नगरें । पुरें पट्टणें मनोहरें ।
सकळां ठाईं जगदेश्वरें । वस्ती कीजे ॥ २५ ॥
माहा बळी होऊन गेले । पृथ्वीवरी चौताळले ।
सामर्थ्यें निराळे राहिले । हें तों घडेना ॥ २६ ॥
असंभाव्य हे जगती । जीव कितीयेक जाती ।
नाना अवतारपगती । भूमंडळावरी ॥ २७ ॥
सध्यां रोकडें प्रमाण । कांहीं करावा नलगे अनुमान ।
नाना प्रकारींचें जीवन । पृथ्वीचेनि आधारें ॥ २८ ॥
कित्तेक भूमी माझी ह्मणती । सेवटीं आपण चि मरोन जाती ।
कित्तेक काळ होता जगती । जैसी तैसी ॥ २९ ॥

---

१ अंधकार २ द्रव्य, संपत्ति किंवा रक्षा. ३ गुप्त ४ ठेवी ५ वसुंधरा, पृथ्वी

ऐसा पृथ्वीचा महिमा । दुसरी काये द्यावी उपमा ।
ब्रह्मादिकापासुनी आह्मां । आश्रयो चि आहे ॥ ३० ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे पृथ्वीस्तवननिरूपणनाम समास तिसरा ॥ ३

---

॥ श्रीराम ॥

आता सकळांचें जन्मस्थान । सकळ जीवांचें जीवन ।
जयास आपोनारायेण । ऐसें बोलिजे ॥ १ ॥
पृथ्वीस आधार आवर्णोदक । सप्तसिंधूचें सिंधोदक ।
नाना मेघीचें मेघोदक । भूमंडळीं चालिलें ॥ २ ॥
नाना नद्या नाना देसीं । वाहात मिळाल्या सागरासी ।
लाहानथोर पुण्यरासी । अगाध महिमे ॥ ३ ॥
नद्या पर्वतींहून कोसळल्या । नाना साकडीमधें रिचवल्या ।
धबाबां खळाळां चालिल्या । असभाव्य ॥ ४ ॥
कूप बावी सरोवरें । उदंड तळीं थोरथोरें ।
निर्मळें उचबळती नीरें । नाना देसीं ॥ ५ ॥
गायेमुखें पाट जाती । नाना कालवे वाहाती ।
नाना झऱ्या झिरपती । झरती नीरें ॥ ६ ॥
डुरें[1] विहीरे[2] पाझर । पर्वत फुटोन वाहे नीर ।
ऐसे उदकाचे प्रकार । भूमंडळीं ॥ ७ ॥
जितुके गिरी तितुक्या धारा । कोसळती भयंकरा ।
पाभळें[3] वाहाळा[4] अपारा । उकळ्या[5] सांडिती ॥ ८ ॥
भूमंडळीचें जळ आघवें । किती ह्मणोनी सांगावें ।
नाना कारंजीं आणावें । बांधोनी पाणी ॥ ९ ॥
डोहो डवकें खडाडीं टांकीं[6] । नाना गिरिकंदरीं अनेकीं ।
नाना जळें नाना लोकीं । वेगळालीं ॥ १० ॥

---

१ डहुरे, शेवड्या. २ मोठमोठे पाणदुरे. ३ झरा. ४ ओहोळ ५ फवारे.
६ लहान पाणटांकीं.

तीर्थें येकाहून येक । माहां पवित्र पुण्यदायक ।
अगाध महिमा शास्त्रकारक । बोलोनि गेले ॥ ११ ॥
नाना तीर्थांचीं पुण्योदकें । नाना स्थळोस्थळीं सीतळोदकें ।
तैसीं च नाना उष्णोदकें । ठाईं ठाईं ॥ १२ ॥
नाना वल्लीमधें जीवन । नाना फळीं फुलीं जीवन ।
नाना कंदीं मुळीं जीवन । गुणकारकें ॥ १३ ॥
क्षारोदकें सिंधोदकें । विषोदकें पीयूषोदकें ।
नाना स्थळांतरीं उदकें । नाना गुणाचीं ॥ १४ ॥
नाना युक्षदंडाचे रस । नाना फळांचे नाना रस ।
नाना प्रकारीचे गोरस । मद पारा गुळत्र[१] ॥ १५ ॥
नाना मुक्ताफळाचें पाणी । नाना रत्नीं तळपे पाणी ।
नाना शस्त्रामधें पाणी । नाना गुणाचें ॥ १६ ॥
शुक्लीत श्रोणीत लाळ मूत्र स्वेद । नाना उदकाचे नाना भेद ।
विवरोन पाहातां विशद । होत जातें ॥ १७ ॥
उदकाचे देह केवळ । उदकाचें चि भूमंडळ ।
चंद्रमंडळ सूर्यमंडळ । उदकाकारितां ॥ १८ ॥
क्षारसिंधु क्षीरसिंधु । सुरासिंधु आज्यसिंधु ।
दधिसिंधु युक्षरससिंधु । शुद्ध सिंधु उदकाचा ॥ १९ ॥
ऐसें उदक विस्तारलें । मुळापासून सेवटा आलें ।
मधें हि ठाईं ठाईं उमटलें । ठाईं ठाईं गुप्त ॥ २० ॥
जे जे बीजीं मिश्रित जालें । तो तो स्वाद घेऊन उठिलें ।
उसामधें गोडीस आलें । परम सुंदर ॥ २१ ॥
उदकाचें बाधा[२] हें शरीर । उदक चि पाहिजे तदनंतर ।
उदकाचा उत्पत्तिविस्तार । किती ह्मणोनी सांगावा ॥ २२ ॥

---

१ गुळत्र=गुळत्रय (राब-काकवी-गुळवणी). २ हें शरीर उदकाचा बाधा आहे व नंतर हि त्याला उदक (पिण्यास) पाहिजे च.

उदक तारक उदक मारक । उदक नाना सौख्यदायेक ।
पाहाता उदकाचा विवेक । अलोलीक आहे ॥ २३ ॥
भूमंडळीं धांवे नीरं । नाना ध्वनी त्या सुंदर ।
घबाबां धबाबा थोर । रिचवती धारा ॥ २४ ॥
ठाईं ठाईं डोहो तुंबती । विशाळ तळीं डबाबिती ।
चबाबिती थबाबिती । कालवे पाट ॥ २५ ॥
येकी पाळध्या गंगा वाहाती । उदकें सन्निध च्रि असती ।
खळाळां झरे वाहाती । भूमीचे पोटीं ॥ २६ ॥
भूमीगर्भीं डोहो भरले । कोण्ही देखिले ना ऐकिले ।
ठाईं ठाईं झोंबिरे जाले । विदुल्यतांचे ॥ २७ ॥
पृथ्वीतळीं पाणी भरलें । पृथ्वीमधें पाणी खेळे ।
पृथ्वीवरी प्रगटलें । उदंड पाणी ॥ २८ ॥
स्वर्गमृत्यपाताळीं । येक नदी तीन ताळीं ।
मेघोदक अंतराळीं । वृष्टी करी ॥ २९ ॥
पृथ्वीचें मूळ जीवन । जीवनाचें मूळ दहन ।
दहनाचें मूळ पवन । थोराहून थोर ॥ ३० ॥
त्याहून थोर परमेश्वर । महद्भूताचा विचार ।
त्याहून थोर परात्पर । परब्रह्म जाणावें ॥ ३१ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे आपनिरूपणनाम समास चौथा ॥ ४ ॥

---

॥ श्रीराम ॥

धन्य धन्य हा वैश्वानरु । होये रघुनाथाचा श्वशुरु ।
विश्वव्यापक विश्वंभरु । पिता जानकीचा ॥ १ ॥
ज्याच्या मुखें भगवंत भोक्ता । जो ऋषीचा फळदाता ।
तमहिमरोगहर्ता । भर्ता विश्वजनाचा ॥ २ ॥

१ प्रथम " निरंतर " होतें. २ झरे.

नाना वर्ण नाना भेद । जीवमात्रास अभेद ।
अभेद आणी परम शुध । ब्रह्मादिकासी ॥ ३ ॥
अग्नीकारितां सृष्टी चाले । अग्नीकारितां लोक धाले ।
अग्नीकारितां सकळ ज्याले । लाहानथोर ॥ ४ ॥
अग्नीनें आळलें भूमडळ । लोकांस राहाव्या जालें स्थळ ।
दीप दीपिका नाना ज्वाळ । जेथें तेथें ॥ ५ ॥
पोटामधें जठराग्नी । तेणें क्षुधा लागे जनीं ।
अग्नीकारितां भोजनीं । रुची येते ॥ ६ ॥
अग्नी सर्वांगीं व्यापक । उष्णें राहे कोणी येक ।
उष्ण नस्तां सकळ लोक । मरोन जाती ॥ ७ ॥
आधीं अग्नी मद होतो । पुढें प्राणी तो नासतो ।
ऐसा हा अनुभव येतो । प्राणिमात्रासी ॥ ८ ॥
असतां अग्नीचें बळ । शत्रु जिंके तात्काळ ।
अग्नी आहे तावत्काळ । जिणें आहे ॥ ९ ॥
नाना रस निर्माण जाले । अग्नीकारितां निपजले ।
माहांरोगी आरोग्य जाले । निमिषमात्रें ॥ १० ॥
सूर्य सकळाहून विशेष । सूर्याउपरी अग्नीप्रकाश ।
रात्रभागीं लोक अग्नीस । साहें करिती ॥ ११ ॥
अंत्यजगृहींचा अग्नी आणिला । त्यास दोष नाहीं बोलिला
सकळां गृहीं पवित्र जाला । वैश्वानरु ॥ १२ ॥
अग्नीहोत्र नाना याग । अग्नीकारिता होती सांग ।
अग्नी त्रुप्त होतां मग । सुप्रसन्न होतो ॥ १३ ॥
देव दानव मानव । अग्नीकारितां चाले सर्व ।
सकळ जनासी उपाव । अग्नी आहे ॥ १४ ॥
लग्नें करिती थोर थोर । नाना दारूचा प्रकार ।
भूमंडळीं यात्रा थोर । दारूनें शोभती ॥ १५ ॥

━ जिआले=जगले=जिवंत राहिले.

नाना लोक रोगी होती । उष्ण औशधें सेविती ।
तेणें लोक आरोग्य होती । वन्हीकारितां ॥ १६ ॥
ब्राह्मणास तनुमनु । सूर्यदेव हुताशनु ।
येतद्विषईं अनुमानु । कांहीं च नाहीं ॥ १७ ॥
लोकामधें जठरानळु । सागरीं आहे वडवानळु ।
भूगोळाबाहेर आवर्णानळु । शिवनेत्रीं विदुल्यता ॥ १८ ॥
कुपीपासून अग्नी होतो । उंचदर्पणीं अग्नी निघतो ।
काष्ठमथनीं प्रगटतो । चकमकेनें ॥ १९ ॥
अग्नी सकळा ठाईं आहे । कठीण घिसणीं प्रगट होये ।
आग्नेसर्पे[1] दग्ध होये । गिरीकदरें ॥ २० ॥
अग्नीकारितां नाना उपाये । अग्नीकारिता नाना अपाय ।
विवेकेंविण सकळ होये । निरार्थक ॥ २१ ॥
भूमंडळीं लाहानथोर । सकळांस वन्हीचा आधार ।
अग्नीमुखें परमेश्वर । संतुष्ट होये ॥ २२ ॥
ऐसा अग्नीचा महिमा । बोलिजे तितुकी उणी उपमा ।
उत्तरोत्तर अगाध महिमा । अग्नीपुरुषाचा ॥ २३ ॥
जीत असतां सुखी करी । मेल्यां प्रेत भस्म करी ।
सर्वभक्षकु त्याची थोरी । काये म्हणोनी सांगावी ॥ २४ ॥
सकळ सृष्टीचा सन्हार । प्रळय करी वैश्वानर ।
वैश्वानरें पदार्थमात्र । कांहीं च उरेना ॥ २५ ॥
नाना होम उदंड करिती । घरोघरीं वैशदेव चाळती ।
नाना क्षेत्रीं दीप जळती । देवापासीं ॥ २६ ॥
दीपाराधनें निळाजनें । देव वोवाळिजे जनें ।
खरें खोटें निवडणें । दिव्यें[2] होतां ॥ २७ ॥

---

१ मुखातून अग्नीच्या ज्वाळा निघतात अशी सर्पाची जात. २ तापलेल्या तेलाच्या कढईतून जो पैसा काढील तो खरा, जो न काढील तो खोटा, इत्यादि प्रकारानीं खऱ्याखोट्याचा निर्णय करण्याच्या पद्धतीला दिव्य म्हणतात.

अष्टधा प्रकुर्ती लोक तिन्ही । सकळ व्यापून राहिला वन्ही ।
अगाध महिमा वदनीं । किती म्हणोनी बोलावा ॥ २८ ॥
च्यारी श्रृंगें त्रिपदीं जात । दोनी शिरें सप्त हात ।
ऐसा बोलिला शास्त्रार्थ । प्रचितीविणें ॥ २९ ॥
ऐसा वन्ही उष्णमूर्ती । तो मी बोलिलों येथामती ।
न्यून्यपूर्ण क्षमा श्रोतीं । केले पाहिजे ॥ ३० ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे अग्नीनिरूपणनाम समास पांचवा ॥५॥

---

॥ श्रीरामसमर्थ ॥

धन्य धन्य हा वायदेव । याचा विचित्र स्वभाव ।
वायोकरितां सकळ जीव । वर्तती जनीं ॥ १ ॥
वायोकरितां श्वासोश्वास । नाना विद्यांचा अभ्यास ।
वायोकरितां शरीरास । चळण घडे ॥ २ ॥
चळण वळण प्रासारण । निरोधन आणी आकोचन ।
प्राण अपान व्यान उदान । समान वायु ॥ ३ ॥
नाग कूर्म कर्कश वायो । देवदत्त धनंजयो ।
ऐसे हे वायोचे स्वभावो । उदंड असती ॥ ४ ॥
वायो ब्रह्मांडीं प्रगटला । ब्रह्मांडदेवतांस पुरवला ।
तेथुनी पिंडीं प्रगटला । नाना गुणें ॥ ५ ॥
स्वर्गलोकीं सकळ देव । तैसे चि पुरुषार्थी दानव ।
मृत्यलोकींचे मानव । विख्यात राजे ॥ ६ ॥
नरदेहीं नाना भेदे । अनंत भेदाचीं श्वापदें ।
वनचरें जळचरें आनंदें । क्रीडा करिती ॥ ७ ॥
त्या समस्तांमधें वायु खेळे । खेचरकुळ अवघें चळे ।
उठती वन्हीचे उबाळे । वायोकरितां ॥ ८ ॥

---

१ असा जो शास्त्रार्थ आहे तो काय अनुभवावांचून आहे? २ कुकल. ३ उमाळे.

वायो मेघाचें भरण भरी । सवें च पिटून परतें सारी ।
वायो ऐसा कारबारी । दुसरा नाहीं ॥ ९ ॥
परी ते आत्मयाची सत्ता । वर्ते शरीरीं तत्वता ।
परी व्यापकपणें या समर्था । तुळणा नाहीं ॥ १० ॥
गिरीहून दाट फौजा । मेघ उठिले लोककाजा ।
गर्जगर्जों तडक विजा । वायोबळें ॥ ११ ॥
चंद्र सूर्य नक्षत्रमाळा । ग्रहमंडळें मेघमाळा ।
ये ब्रह्मांडीं नाना कळा । वायोकरितां ॥ १२ ॥
येकवटलें तें निवडेना । कालवलें तें वेगळें होयना ।
तैसें हे बेंचाड नाना । केवी कळे ॥ १३ ॥
वायो सुटे सरारां । असंभाव्य पडती गारा ।
तैसे जीव हे नीरा-। सरिसे पडती ॥ १४ ॥
वायुरूपें कमळकळा । तो चि आधार जळा ।
तया जळाच्या आधारें भूगोळा । शेषें धारिलें ॥ १५ ॥
शेषास पवनाचा आहार । आहारें फुगे शरीर ।
तरी मग घेतला भार । भूमंडळाचा ॥ १६ ॥
माहांकूर्माचें शरीर भलें । नेणों ब्रह्मांड पाळथें घातलें ।
येवढें शरीर तें राहिलें । वायोचेनी ॥ १७ ॥
वाराहें आपुलें दंतीं । पृथ्वी धारिली होती ।
तयाची येवढी शक्ती । वायुबळें ॥ १८ ॥
ब्रह्मा विष्णु महेश्वर । चौथा आपण जगदेश्वर ।
वायोस्वरूप विचार । विवेकी जाणती ॥ १९ ॥
तेतिस कोटी सुरवर । अठ्यासी सहस्र ऋषेश्वर ।
सिध योगी भारेंभार । वायोकरिता ॥ २० ॥

---

१ पंचभूतें जीं एकवटलीं आहेत तीं वायूच्या योगानें होत. तीं निवडलीं जात नाहींत व वेगळालीं करितां येत नाहींत.

मराठी ग्रंथ संग्रह
स्थळ प्रत
नं.
ता.

नव कोटी कात्यायणी । छेपन कोटी च्यामुंडिणी ।
औट कोटी भूतखाणी । वायोरूपें ॥ २१ ॥
भूतें देवतें नाना शक्ती । वायोरूप त्याच्या वेक्ती ।
नाना जीव नेणो किती । भूमंडळीं ॥ २२ ॥
पिंडीं ब्रह्मांडीं पुरवला । बाहेर कंचुकास गेला ।
सकळा ठाईं पुरवला । समर्थ वायु ॥ २३ ॥
ऐसा हा समर्थ पवन । हनुमंत जयाचा नदन ।
रघुनाथस्मरणीं तनमन । हनुमंताचें ॥ २४ ॥
हनुमंत वायोचा प्रसीध । पित्यापुत्रांस नाहीं भेद ।
ह्मणोनि दोघे हि अभेद । पुरुषार्थविषीं ॥ २५ ॥
हनुमंतास बोलिजे प्राणनाथ । येणें गुणें हा समर्थ ।
प्राणेंविण सकळ वेर्थ । होत जातें ॥ २६ ॥
मागें मृत्य आला हनुमंता । तेव्हां वायो रोधला होता ।
सकळ देवांस आवस्ता । प्राणांत मांडलें ॥ २७ ॥
देव सकळ मिळोन । केलें वायूचें स्तवन ।
वायो प्रसन्न होऊन । मोकळें केलें ॥ २८ ॥
ह्मणोनि प्रतापी थोर । हनुमंत ईश्वरी अवतार ।
याचा पुरुषार्थ सुरवर । पाहात चि राहिले ॥ २९ ॥
देव कारागृहीं होते । हनुमंतें देखिलें अवचितें ।
संव्हार करूनी लंकेभोंवतें । विटबून पाडिलें ॥ ३० ॥
उसिणें घेतलें देवाचें । मूळ शोधिलें राक्षसाचें ।
मोठें कौतुक पुछयकेताचें । आश्चीर्य वाटे ॥ ३१ ॥
रावण होता सिंह्यासनावरी । तेथें जाऊन ठोंसरे मारी ।
लंकेमधें निरोध करी । उदक कैचें ॥ ३२ ॥

१ ब्रह्मांडाला बाह्य आवरण करण्यास. २ येथून पुढील अकरा ओव्यांत अकराव्या रुद्र हनुमत याची स्तुति आहे ३ प्रसिद्ध पुत्र. ४ सूर्यबिंब ग्रासण्याच्या वेळीं इन्द्राचें वज्र हनुमताला लागून जेव्हा मूर्छना आली होती तेव्हां ५ राक्षसाकडून देवांचें उसणें घेणें राहिलें होतें तें श्री मारुतीनें घेतलें, म्हणजे राक्षसानीं देवाचा जो छळ केला होता त्याचें उट्टें काढिलें.

देवास आधार वाटला । मोठा पुरुषार्थ देखिला ॥
मनामधें रघुनाथाला । करुणा करिती ॥ २३ ॥
दैत्य आवघे संव्हारिले । देव तत्काळ सोडिले ।
प्राणीमात्र सुखी जाले । त्रयलोक्यवासी ॥ २४ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे वायोस्तवननिरूपणनाम समास साहावा ॥ ६

---

॥ श्रीरामसमर्थ ॥

पृथ्वीचें मूळ जीवन । जीवनाचें मूळ अग्न ।
अग्नीचें मूळ पवन । मागां निरोपिलें ॥ १ ॥
आतां ऐका पवनाचें मूळ । तो हा अंतरात्मा चि केवळ ।
अत्यत चि चचळ । सकळांमधें ॥ २ ॥
तो येतो जातो दिसेना । स्थिर होऊन बैसेना ।
ज्याचें रूप अनुमानेना । वेदश्रुतीसी ॥ ३ ॥
मुळीं मुळींचें स्फुर्ण[1] । तें चि अंतरात्म्याचें लक्षण ।
जगदेश्वरापासून त्रिगुण । पुढें जाले ॥ ४ ॥
त्रिगुणापासून जालीं भूतें । पावलीं पष्ट दशेतें ।
त्या भूतांचें स्वरूप तें । विवेकें वोळखावें ॥ ५ ॥
त्यामधें मुख्य आकाश । चौ भूतांमधें विशेष ।
याच्या प्रकाशें प्रकाश । सकळ काहीं ॥ ६ ॥
येक विष्णु महद्भूत । ऐसा भूतांचा संकेत ।
परंतु याची प्रचीत । पाहिली पाहिजे ॥ ७ ॥
विस्तारें बोलिलीं भूतें । त्या भूतांमधें व्यापक तें ।
विवरोन पाहाता येतें । प्रत्ययासी ॥ ८ ॥
आत्मयाच्या चपळपणापुढें । वायो तें किती बापुडें ।
आत्म्याचें चपळपण रोकडें । समजोन पाहावें ॥ ९ ॥

---

१ ब्रह्माच्या ठिकाणीं जें प्रथम स्फुरण झालें तें.

आत्म्यावेगळें काम चालेना । आत्मा दिसेना ना भाडळेना ।
गुप्तरूपें विचार नाना । पाहोन सोडी ॥ १० ॥
पिंड ब्रह्मांड व्यापून धरिलें । नाना शरीरीं विळासलें ।
विवेकी जनासी भासलें । जगदांतरीं ॥ ११ ॥
आत्म्याविण देहे चालती । हें तों न घडे कल्पांतीं ।
अष्टधा प्रकुर्तीच्या वेक्ती । रूपासी आल्या ॥ १२ ॥
मुळापासून सेवटवरी । सकळ कांहीं आत्मा च करी ।
आत्म्यापैलीकडे निर्विकारी । परब्रह्म तें ॥ १३ ॥
आत्मा शरीरीं वर्ततो । इंद्रियेंग्राम चेष्टवितो ।
नाना सुखदुःखें भोगितो । देह्यात्मयोगें ॥ १४ ॥
सप्तकंचुक हें ब्रह्मांड । त्यामधें सप्तकंचुक पिंड ।
त्या पिंडामधें आत्मा जाड । विवेकें वोळखा ॥ १५ ॥
शब्द ऐकोन समजतो । समजोन प्रत्योत्तर देतो ।
कठीण मृदं सीतोष्ण जाणतो । त्वचेमधें ॥ १६ ॥
नेत्रीं भरोनी पदार्थ पाहाणें । नाना पदार्थ परीक्षणें ।
उंच नीच समजणें । मनामधें ॥ १७ ॥
क्रूरदृष्टी सौम्यदृष्टी । कपटदृष्टी कृपादृष्टी ।
नाना प्रकारींच्या दृष्टी । भेद जाणे ॥ १८ ॥
जिव्हेमधें नाना स्वाद । निवडूं जाणे भेदाभेद ।
जें जें जाणे तें तें विशद । करुनी बोले ॥ १९ ॥
उत्तम अन्नाचे परिमळ । नाना सुगंध परिमळ ।
नाना फळांचे परिमळ । घ्राणइंद्रियें जाणे ॥ २० ॥
जिव्हेनें स्वाद घेणें बोलणें । पाणीइंद्रियें घेणें देणें ।
पादइंद्रियें येणें जाणें । सर्वकाळ ॥ २१ ॥
शिस्नइंद्रियें सुरतभोग । गुदइंद्रियें मळोत्सर्ग ।
मनेंकरूनी सकळ सांग । कल्पून पाहे ॥ २२ ॥

१ हा शब्द समासांत लिहिला आहे.

ऐसे व्यापार परोपरी । त्रिभुवनीं येकला चि करी ।
त्याची वर्णावया थोरी । दुसरा नाहीं ॥ २३ ॥
त्याविण दुसरा कैचा । जे महिमा सांगावा तयाचा ।
व्याप आटोप आत्मयाचा । न भूतो न भविष्यति ॥ २४ ॥
चौदा विद्या चौसष्टी कळा । धूर्तपणाच्या नाना कळा ।
वेद शास्त्र पुराण जिन्हाळा । तेणेंविण कैचा ॥ २५ ॥
येहलोकींचा आचार । परलोकीं सारासारविचार ।
उभय लोकींचा निर्धार । आत्मा च करी ॥ २६ ॥
नाना मतें नाना भेद । नाना संवाद वेवाद ।
नाना निश्चय भेदाभेद । आत्मा च करी ॥ २७ ॥
मुख्य तत्व विस्तारलें । तेणें तयांस रूप आणिलें ।
येणेंकरितां सार्थक जालें । सकळ कांहीं ॥ २८ ॥
लिहिणें वाचणें पाठांतर करणें । पुसणें सांगणें अर्थ करणें ।
गाणें वाजवणें नाचणें । आत्म्याचकरितां ॥ २९ ॥
नाना सुखें आनंदतो । नाना दुःखें कष्टी होतो ।
देहे धरितो आणी सोडितो । नानाप्रकारें ॥ ३० ॥
येकला चि नाना देहे धरी । येकला चि नटे परोपरी ।
नट नाट्यकळा कुसरी । त्याविण नाहीं ॥ ३१ ॥
येकला चि जाला बहुरूपी । बहुरूपी बहुसाक्षपी ।
बहुरूपें बहुप्रतापी । आणी लडी ॥ ३२ ॥
येकला चि विस्तारला कैसा । पाहे बहुविध तमासा ।
दंपत्येंविण कैसा । विस्तारला ॥ ३३ ॥
स्त्रियांस पाहिजे पुरुष । पुरुषासी पाहिजे स्त्रीवेष ।
ऐसा आवडीचा संतोष । परस्परें ॥ ३४ ॥

---

१ त्या सर्व गोष्टींना.

स्थूळाचें मूळ तें लिंग । लिंगामधें हे प्रसगं ।
येणें प्रकारें जग । प्रत्यक्ष चाले ॥ ३५ ॥
पुरुषांचा जीव स्त्रियांची जीवी । ऐसी होते उठाठेवी ।
परी या सूक्ष्माची गोवी । समजली पाहिजे ॥ ३६ ॥
स्थूळाकारितां वाटे भेद । सूक्ष्मीं आवघें चि अभेद[1] ।
ऐसें बोलणें निरुंध । प्रत्यया आलें ॥ ३७ ॥
बायेकोनें बायकोस भोगिलें । ऐसें नाहीं कीं घडलें ।
बायेकोस अतरीं लागलें । ध्यान पुरुषाचें ॥ ३८ ॥
स्त्रीसी पुरुष पुरुषास बधु । ऐसा आहे हा समंधु ।
याकारणें सूक्ष्म संवादु । सुक्ष्मीं च आहे ॥ ३९ ॥
पुरुषइछेमधें प्रकृती । प्रकृतीमधें पुरुषवेक्ती ।
प्रकृतीपुरुष बोलती । येणें न्यायें ॥ ४० ॥
पिंडावरून ब्रह्मांड पाहावें । प्रचीतीनें प्रचीतीस ध्यावें ।
उमजेना तरी उमजावें । विवराविवरों ॥ ४१ ॥
द्वैतइछा होते मुळीं । तरी ते आली भूमंडळीं ।
भूमंडळीं आणी मुळीं । रुजु पाहावें ॥ ४२ ॥
येथें मोठा जाला साक्षेप । फिटला श्रोतयांचा आक्षेप ।
जे प्रकृतीपुरुपाचें रूप । निवडोन गेलें ॥ ४३ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे महद्भूतनिरूपणनाम समास सातवा ॥ ७ ॥

---

॥ श्रीरामसमर्थ ॥

नमूं गणपती मंगळमूर्ती । जयाचेनि मतिस्फूर्ती ।
लोक भजती स्तवन करिती । आत्मयाचें ॥ १ ॥

---

१ लिंगभेदामुळें स्थूळामध्यें भेद निर्माण झाले आहेत. २ पुरुषांचा जीव व स्त्रियांची जीवी असें बोलण्याचा परिपाठ आहे, परंतु हा भेद स्थूळामुळें वाटतो, सूक्ष्मामध्यें असा भेद नाहीं. ३ निश्चित. ४ पुरुषाला प्रकृतीची इच्छा व प्रकृतीला पुरुषाची इच्छा ५ मूळमायेच्या ठिकाणीं.

नमूं वैखरी वागेश्वरी । अभ्यांतरीं प्रकाश करी ।
नाना भरोवरी विवरी । नाना विद्या ॥ २ ॥
सकळ जनामधें नाम । रामनाम उत्तमोत्तम ।
श्रम जाउनी विश्राम । चंद्रमौळी पावला ॥ ३ ॥
नामाचा महिमा थोर । रूप कैसें उत्तरोत्तर ।
परात्पर परमेश्वर । त्रयलोक्यधर्ता ॥ ४ ॥
आत्माराम चहुंकडे । लोक बावडे जिकडे तिकडे ।
देहे पडे मृत्य घडे । आत्मयाविण ॥ ५ ॥
जीवात्मा शिवात्मा परमात्मा । जगदात्मा विश्वात्मा गुप्तात्मा ।
आत्मा अंतरात्मा सूक्ष्मात्मा[1] । देवदानवमानवीं ॥ ६ ॥
सकळ मार्गें[2] चालती बोलती । अवतारपंगतीची गती ।
आत्म्याकरितां होत जाती । ब्रह्मादिक ॥ ७ ॥
नादरूप जोतीरूप । साक्षरूप सत्तारूप ।
चैतन्यरूप सस्वरूप । द्रष्टारूप जाणिजे ॥ ८ ॥
नरोत्तमु वीरोत्तमु । पुरुषोत्तमु रघोत्तमु ।
सर्वोत्तमु उत्तमोत्तमु । त्रयलोक्यवासी ॥ ९ ॥
नाना खटपट आणी चटपट । नाना लटपट आणी झटपट ।
आत्मा नस्तां सर्व सपाट । चहुंकडे ॥ १० ॥
आत्म्याविण वेडें कुडें । आत्म्याविण मडें बापुडें ।
आत्म्याविण थड़ें[3] रोकडें । शरीराचें ॥ ११ ॥
आत्मज्ञानी समजे मनीं । पाहे जनीं आत्मयालागुनी ।
भुवनीं अथवा त्रिभुवनीं । आत्म्याविणें वोस ॥ १२ ॥
परम सुंदर आणी चतुर । जाणे सकळ सारासार ।
आत्म्याविण अंधकार । उभय लोकीं ॥ १३ ॥
सर्वांगीं सिध सावध । नाना भेद नाना वेध ।
नाना खेद आणी आनंद । तेणेंचिकरितां ॥ १४ ॥

---

१ प्रथम 'सर्वात्मा' होतें त्याचें 'सूक्ष्मात्मा' केलें आहे. २ व्यवहार. ३ थडगों.

रंक अथवा ब्रह्मादिक । येक चि चालवी अनेक ।
पाहावा नित्यानित्यविवेक । कोण्हीयेकें ॥ १५ ॥
ज्याचे घरीं पद्मिणी नारी । आत्मा तवरी आवडी धरी ।
आत्मा गेलियां शरीरीं । तेज कैचें ॥ १६ ॥
आत्मा दिसेना ना भासेना । साक्षाकारें अनुमानेना ।
नाना मनाच्या कल्पना । आत्मयाचेनी ॥ १७ ॥
आत्मा शरीरीं वास्तव्य करी । आवघें ब्रह्मांड विवरी· भरी ।
वासना भावना परोपरीं । किती ह्मणोनी सांगाव्या ॥ १८ ॥
मनाच्या अनंत वृत्ती । अनंत कल्पना धरिती ।
अनंत प्राणी सांगों किती । अंतर त्यांचें ॥ १९ ॥
अनत राजकारणें धरणें । कुबुधी सुबुधी विवरणें ।
कळों नेदणें चुकावणें । प्राणीमात्रासी ॥ २० ॥
येकास येक जपती टपती । येकास येक खपती लपती ।
शत्रुपणाची स्थिती गती । चहुंकडे ॥ २१ ॥
पृथ्वीमधें परोपरीं । येकास येक सिंतरी ।
कित्तेक भक्त परोपरीं । परोपकार करिती ॥ २२ ॥
येक आत्मा अनंत भेद । देहेपरत्वें घेती स्वाद ।
आत्मा ठाईंचा अभद । भेद हि धरी ॥ २३ ॥
पुरुषास स्त्री पाहिजे । स्त्रीस पुरुष पाहिजे ।
नवरीस नवरी पाहिजे । हें तों घडेना ॥ २४ ॥
पुरुषाचा जीव स्त्रियांची जीवी । ऐसी नाहीं उठाठेवी ।
विषयसुखाची गोवी । तेथें भेद आहे ॥ २५ ॥
ज्या प्राण्यास जो आहार । तेथें चि होती तत्पर ।
पशूचे आहारीं नर । अनादरें वर्तती ॥ २६ ॥
आहारभेद देहेभेद । गुप्त प्रगट उदड भेद ।
तैसा चि जाणावा आनंद । वेगळाला ॥ २७ ॥

१ फक्की.

सिंधु भूगर्भींचीं नीरें । त्या नीरामधील शरीरें ।
आवर्णोदकाचीं जळचरें । अत्यंत मोठीं ॥ २८ ॥
सूक्ष्म दृष्टीं आणितां मना । शरीराचा अंत लागेना ।
मा तो अंतरात्मा अनुमाना । कैसा येतो ॥ २९ ॥
देह्यात्मयोग शोधून पाहिला । तेणें काहीं अनुमानला ।
स्थूळसूक्ष्माचा गलबला । गथागोवी ॥ ३० ॥
गथागोवी उगवाव्याकारणें । केलीं नाना निरूपणें ।
अंतरात्मा कृपाळुपणें । बहुतां मुखें बोलिला ॥ ३१ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे आत्मारामनिरूपणनाम समास ॥ ८ ॥

---

॥ श्रीरामसमर्थ ॥

पृथ्वीमधें लोक नाना । त्यास नाना उपासना ।
भावार्थे प्रवर्तले भजना । ठाईं ठाईं ॥ १ ॥
आपुल्या देवास भजती । नाना स्तुती स्तवनें करिती ।
जे ते निर्गुण ह्मणती । उपासनेसी ॥ २ ॥
याचा कैसा आहे भाव । मज सांगिजे अभिप्राव ।
अरे हा स्तुतीचा स्वभाव । ऐसा आहे ॥ ३ ॥
निर्गुण ह्मणिजे बहुगुण । बहुगुणी अंतरात्मा जाण ।
सकळ त्याचे अंश हें प्रमाण । प्रचित पाहा ॥ ४ ॥
सकळ जनासी मानावें तें । येका अंतरात्म्यास पावतें ।
अधिकारपरत्वें तें । मान्य कीजे ॥ ५ ॥
श्रोता ह्मणे हा अनुमान । मुळीं घालावें जीवन ।
तें पावे पानोपान । हे सध्या प्रचिती ॥ ६ ॥

---

१ नुसता देह किंवा नुसता आत्मा काहीं च करूं शकत नाहीं; देह आणि आत्मा याचा योग पाहिजे २ " सकळ आहे प्रमाण ।" असा चरण प्रथम होता. प्रस्तुतचा चरण हा स. शो. ३ अंतरात्मा एक च आहे हें खरें, तरी पण ज्याचा त्याचा अधिकार पाहून त्याप्रमाणें त्याच्याशी वर्तावें. सर्व अंतरात्म्याला पोंचतें ह्मणून भिन्न भिन्न अधिकार पहावयाचा नाहीं असें नाहीं.

वक्ता ह्मणे तुळसीवरी । उदक घालावें पात्रभरी ।
परी न थिरे निमिषभरी । भूमीस भेदे ॥ ७ ॥
थोरा वृक्षास कैसें करावें । सेंड्या पात्र कैसें न्यावें ।
याचा अभिप्राव देवें । मज निरोपावा ॥ ८ ॥
प्रजन्याचें उदक पडतें । तें तों मुळाकडे येतें ।
हात चि पावेना तेथें । काये करिती ॥ ९ ॥
सकळास मूळ सांपडे । ऐसें पुण्य कैचें घडे ।
साधुजनाचे पवाडे । विवेकीं मन ॥ १० ॥
तथापी वृक्षांचेनि पडिपाडें । जीवन घालितां कोठें पडे ।
ये गोष्टीचें सांकडें । कांहीं च नाहीं ॥ ११ ॥
मागील आशंकेचें निर्शन । होतां जालें समाधान ।
आतां गुणास निर्गुण । कैसे ह्मणती ॥ १२ ॥
[1]चचळपणें विकारलें । सगुण ऐसें बोलिलें ।
येर तें निर्गुण उरलें । गुणातीत ॥ १३ ॥
वक्ता ह्मणे हा विचार । शोधून पाहावें सारासार ।
[2]अंतरीं राहातां निर्धार । नांव नाहीं ॥ १४ ॥
विवेकें चि तो मुख्य राजा । आणी सेवकाचें नांव राजा[3] ।
याचा विचार समजा । वेवाद खोटा ॥ १५ ॥
कल्पांतप्रळईं जें उरलें । तें निर्गुण ऐसें बोलिलें ।
येर तें अवघें चि जालें । मायेमधें ॥ १६ ॥
सेना शार्हार[4] बाजार । नाना यात्रा लाहानथोर ।
शब्द उठती अपार । कैसे निवडावे ॥ १७ ॥

---

१ साम्यतेनें, दृष्टान्तानें २ निर्धार झाल्यावर 'निर्गुण' असें नाव तरी कोठें उरतें ? ३ सेवकाचें नाव राजा असतें ह्मणून तो काहीं राजा होत नाहीं. जेथें विवेक आहे तो राजा, भलत्याला राजा ह्मणून चालावयाचें नाहीं, तद्वत् सगुणाला च निर्गुण ह्मटल्यानें काहीं सगुणाचें निर्गुण होत नाहीं. ४ शहर.

काळामधें प्रव्यन्यकाळ । मध्यरात्रीं होतां निवळ ।
नाना जीव बोलती सकळ । कैसे निवडावे ॥ १८ ॥
नाना देश भाषा मतें । भूमंडळीं असंख्यातें ।
बहु ऋषी बहु मतें । कैसीं निवडावीं ॥ १९ ॥
वृष्टि होतां च अंकुर । सृष्टीवरी निघती अपार ।
नाना तरु लाहानथोर । कैसे निवडावे ॥ २० ॥
खेचरें भूचरें जळचरें । नाना प्रकारींचीं शरीरें ।
नाना रंग चित्रविचित्रें । कैसीं निवडावीं ॥ २१ ॥
कैसें दृश्य आकारलें । नानापरीं विकारलें ।
उदंड चि पैसावलें । कैसें निवडावें ॥ २२ ॥
पोकळीमधें गंधर्वनगरें । नाना रंग लाहानथोरें ।
बहु वेक्ति बहु प्रकारें । कैसीं निवडावीं ॥ २३ ॥
दिवसरजनीचे प्रकार । चांदिणें आणी अंधकार ।
विचार आणी अविचार । कैसा निवडावा ॥ २४ ॥
विसर आणी आठवण । नेमस्त आणी बाष्कळपण ।
प्रचित आणी अनुमान । येणें रीतीं ॥ २५ ॥
न्याय आणी अन्याय । होय आणी न होये ।
विवेकेंविण काये । उमजों जाणे ॥ २६ ॥
कार्यकर्ता आणी निकामी । शूर आणि कुकर्मी ।
धर्मी आणी अधर्मी । कळला पाहिजे ॥ २७ ॥
धनाढ्य आणि दिवाळखोर । साव आणि तश्कर ।
खरें खोटें हा विचार । कळला पाहिजे ॥ २८ ॥
वरिष्ठ आणी कनिष्ठ । भ्रष्ट आणी अंतरनिष्ठ ।
सारासारविचार पष्ट । कळला पाहिजे ॥ २९ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे नानाउपासनानिरूपणनाम समास नवम॥९

---

१ प्रथम " तंतु " होतें.

॥ श्रीरामसमर्थ ॥

पंचभूतें चाले जग । पंचभूतांची लगबग ।
पंचभूतें गेलियां मग । काये आहे ॥ १ ॥
श्रोता वक्तयास बोले । भूतांचे महिमे वाढविले ।
आणि त्रिगुण कोठें गेले । सांगा स्वामी ॥ २ ॥
अंतरात्मा पांचवें भूत । त्रिगुण त्याचें अंगभूत ।
सावध करूनियां चित्त । बरें पाहें ॥ ३ ॥
भूत ह्मणिजे जितुकें जालें । त्रिगुण जाल्यांत आलें ।
इतुकेन मूळ खडलें । आशंकेचें ॥ ४ ॥
भूतांवेगळें कांहीं नाहीं । भूतजात हें सर्व हि ।
येकावेगळें येक कांहीं । घडेचिना ॥ ५ ॥
आत्म्याचेनी जाला पवन । पवनाचेन प्रगटे अग्न ।
अग्नीपासून जीवन । ऐसें बोलती ॥ ६ ॥
जीवन आवघें डबाबिलें । तें रविमंडळें आळलें ।
वन्हीवायोचेन जालें । भूमंडळ ॥ ७ ॥
वन्ही वायो रवी नस्तां । तरी होते उदंड सीतळता ।
ते सीतळतेमधें उष्णता । येणें न्यायें ॥ ८ ॥
आवघें वर्मासी वर्म केलें । तरी च येवढें फांपावलें ।
देहेंमात्र तितुकें जालें । वर्माकारितां ॥ ९ ॥
आवघें सीतळ चि असतें । तरी प्राणीमात्र मरोनी जातें ।
आवघ्या उष्णें चि करपतें । सकळ कांहीं ॥ १० ॥
भूमंडळ आळोन गोठलें । तें रविकिर्णें वाळोन गेलें ।
मग सहज चि देवें रचिलें । उपायासी ॥ ११ ॥
ह्मणोनी केला प्रज्यन्यकाळ । थंड जालें भूमंडळ ।
पुढें उष्ण काहीं सीतळ । सीतकाळ आणावा ॥ १२ ॥

१ भूताचा समुदाय.

सीतकाळें कष्टले लोक । कपोंन गेले वृक्षादिक ।
ह्मणोन पुढें कौतुक । उष्णकाळाचें ॥ १३ ॥
त्याहिमधें प्रातःकाळ । माध्यानकाळ सायंकाळ ।
सीतकाळ उष्णकाळ । निर्माण केले ॥ १४ ॥
ऐसें येकामागें येक केलें । विलेनें[1] नेमस्त लाविलें ।
येणेंकरितां जगलें । प्राणीमात्र ॥ १५ ॥
नाना रसें रोग कठीण । ह्मणोनी औषधी केल्या निर्माण ।
परंतु सृष्टीचें विवरण । कळलें पाहिजे ॥ १६ ॥
देहमूळ रक्त रेत । त्या आपाचे होती दात ।
ऐसी च भूमंडळीं प्रचित । नाना रत्नांची ॥ १७ ॥
सकळांसी मूळ जीवन बांधा । जीवनें चाले सकळ धंदा ।
जीवनेंविण हरिगोविंदा । प्राणी कैचे ॥ १८ ॥
जीवनाचें मुक्ताफळ[2] । शुक्रासारिखें सुढाळ[3] ।
हिरे माणिकें इंद्रनीळ । ते जळें[4] जाले ॥ १९ ॥
महिमा कोणाचा सांगावा । जाला कर्दमु चि आघवा ।
वेगळवेगळु निवडावा । कोण्या प्रकारें ॥ २० ॥
परंतु बोलिलें कांहींयेक । मनास कळावया विवेक ।
जनामधें तार्किक लोक । समजती आघवें ॥ २१ ॥
आवघें समजलें हें घडेना । शास्त्राशास्त्रासीं पडेना ।
अनुमानें निश्चय होयेना । कांहींयेक ॥ २२ ॥
अगाध गुण भगवताचे । शेष वर्णूं न शके वाचें ।
वेदविधी ते हि काचे । देवेंविणें ॥ २३ ॥
आत्माराम सकळां पाळी । आवघें त्र्यलोक्य सांभाळी ।
तया येकेंविण[5] धुळी । होये सर्वत्रांची ॥ २४ ॥

---

१ विल्हेनें, व्यवस्थेनें, क्रमानें. २ मोतीं. ३ पाणीदार ( शुक्राच्या चांदणी प्रमाणें ). ४ " तेजाळें" होतें त्याचें " ते जळें" असें केलें आहे. ५ अंतरात्म्यावांचून.

जेथें आत्माराम नाहीं । तेथें उरों न शके कांहीं ।
त्रयलोकीचे प्राणी सर्व हि । प्रेतरूपी ॥ २५ ॥
आत्मा नस्तां येती मरणें । आत्म्याविण कैचें जिणें ।
बरा विवेक समजणें । अंतर्यामीं ॥ २६ ॥
समजणें जें विवेकाचें । तें हि आत्म्याविण कैचें ।
कोणीयेकें जगदीशाचें । भजन करावें ॥ २७ ॥
उपासना प्रगट जाली । तरी हे विचारणा कळली ।
याकारणें पाहिजे केली । विचारणा देवाची ॥ २८ ॥
उपासनेचा मोठा आश्रयो । उपासनेविण निराश्रयो ।
उदंड केलें तरी तो जयो । प्राप्त नाहीं ॥ २९ ॥
समर्थाची नाहीं पाठी । तयास भलता च कुटी ।
याकारणें उठाउठी । भजन करावें ॥ ३० ॥
भजन साधन अभ्यास । येणें पाविजे परलोकास ।
दास ह्मणे हा विश्वास । धरिला पाहिजे ॥ ३१ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे गुणभूतनिरूपणनाम समास दाहावा ॥ १० ॥

---

## ॥ दशक सप्तदश प्रकृतिपुरुषनाम ॥ १७ ॥

॥ श्रीराम ॥

निश्चळ ब्रह्मीं चंचळ आत्मा । सकळां पर जो परमात्मा ।
चैतन्य साक्षी ज्ञानात्मा । षड्गुणैश्वरु ॥ १ ॥
सकळ जगाचा ईश्वरु । ह्मणौन नामें जगदेश्वरु ।
तयापासून विस्तारु । विस्तारला ॥ २ ॥
शिवशक्ति जगदेश्वरी । प्रकृतिपुरुष परमेश्वरी ।
मूळमाया गुणेश्वरी । गुणक्षोभिणी ॥ ३ ॥
क्षेत्रज्ञ द्रष्टा कूटस्त साक्षी । अंतरात्मा सर्वलक्षी ।
शुद्धसत्व महत्तत्व परीक्षी । जाणता साधु ॥ ४ ॥

ब्रह्मा विष्णु महेश्वरु । नाना पिंडीं जीवेश्वरु ।
त्यास [1]भासती प्राणीमात्रु । लाहानथोर ॥ ५ ॥
देहदेउळामधें बैसला । न भजतां मारितो देहाला ।
ह्मणौनि त्याच्या भेणें तयाला । भजती लोक ॥ ६ ॥
जे वेळेसी भजन चुकलें । तें तें तेव्हां पछ्याडिलें ।
आवडीनें भजों लागले । सकळ लोक ॥ ७ ॥
जें जें जेव्हां [2]आक्षेपिलें । तें तें तत्काळ चि दिधलें ।
त्रैलोक्य भजों लागलें । येणें प्रकारें ॥ ८ ॥
पांचा विषयांचा नैव्यद्य । जेव्हा पाहिजे तेव्हां सिद्ध ।
ऐसें न करितां सद्य । रोग होती ॥ ९ ॥
जेणें काळें नैव्यद्य पावेना । तेणें काळें देव राहेना ।
भाग्य वैभव पदार्थ नाना । साडून जातो ॥ १० ॥
जातो तो कळों देईना । कोणास ठाउकें होयेना ।
देवेंविण अनुमानेना । कोणास देव ॥ ११ ॥
देव पाहावयाकारणें । देउळें लागती पाहाणें ।
कोठेंतरी देउळाच्या गुणें । देव प्रगटे ॥ १२ ॥
देउळें ह्मणिजे नाना शरीरें । तेथें राहिजे जीवेश्वरें ।
नाना शरीरें नाना प्रकारें । अनंत भेदें ॥ १३ ॥
चालतीं बोलतीं देउळें । त्यामधें राहिजे राउळें ।
जितुकीं देउळें तितुकीं सकळें । कळलीं पाहिजे ॥ १४ ॥
मछ कूर्म वाराह देउळें । भूगोळ धरिला सर्वकाळें ।
कराळें विक्राळें निर्मळें । कितियेक ॥ १५ ॥

---

१ तो लहानथोरांना जाणतो उंब्रज प्रतींत " भजती " असा पाठ आहे.
२ मागितलें.

कित्येक देउळीं सौख्य पाहे । भरता आवर्वे सिंध आहे[1] ।
परी तें सर्वकाळ न राहे । अशाश्वत ॥ १६ ॥

अशाश्वताचा मस्तकमणी । जयाची येवढी करणी ।
दिसेना तरी काये जालें धनी । तयासी च ह्मणावें ॥ १७ ॥

उद्धवोन्मुख[2] होता अभेद । विमुख होतां उदंड खेद ।
ऐसा अधोर्ध[3] सवाद । होत जातो ॥ १८ ॥

सकळाचें मूळ दिसेना । भव्य भारी आणी भासेना ।
निमिष्य येक बसेना । येके ठाइ ॥ १९ ॥

ऐसा अगाध परमात्मा । कोण जाणे त्याचा महिमा ।
तुझी लीळा सर्वोत्तमा । तू च जाणसी ॥ २० ॥

ससारा आलियाचें सार्थक । जेथें नित्यानित्यविवेक ।
येहलोक आणी परलोक । दोनी साधिले ॥ २१ ॥

मननसीळ लोकांपासीं । अखड देव अहिर्निशीं ।
पाहाता त्याच्या पूर्वसंचितासी । जोडा नाहीं ॥ २२ ॥

अखंड योग ह्मणोनि योगी । योग नाहीं तो वियोगी ।
वियोगी तो हि योगी । योगबळें ॥ २३ ॥

भल्याची महिमा ऐसी । जे सन्मार्ग लावी लोकासी ।
पोहणार असता बुडतयासी । बुडों नेदावें ॥ २४ ॥

स्थूळसूक्ष्मतत्वझाडा । पिंडब्रह्मांडाचा निवाडा ।
प्रचित पाहे ऐसा थोडा । भूमडळीं ॥ २५ ॥

---

१ भरितें आवर्वे सिंधु आहे । असा स्पष्ट चरण प्रथम असून " भरितें " चें " भरतां " व " सिंधु " चें " सिंध " मुद्दाम का केलें आहे, न कळे. समुद्राला भरती आली ( किंवा ओहोटी आली ) तरी तो समुद्र च होय तद्वत् अंतरात्म्याला देहांत राहून सुख होवो ( किंवा दु ख होवो ) तरी तो अंतरात्मा एक च आहे ही सुखदु·खाची भरती ओहटी क्षणिक असते २ उद्धव ह्मणजे ब्रह्म त्याशीं सन्मुख झालें ह्मणजे अभेद आहे ३ ब्रह्माकडे ज्यावेळेस तोंड करावें तेव्हां द्वैताकडे पाठ होते, व द्वैताकडे तोंड केलें तर ब्रह्माकडे पाठ होते.

वेदांतीचें पंचिकर्ण । अखंड तयाचें विवर्ण ।
माहांवाक्यें अंतःकरण । रहस्य पाहे ॥ २६ ॥
ये पृथ्वीमधें विवेकी असती । धन्य तयांची सगती ।
श्रवणमात्रें पावती गती । प्राणीमात्र ॥ २७ ॥
सत्संग आणी सत्शास्त्रश्रवण । अखड होतसे विवर्ण ।
नाना सत्सग आणी उत्तम गुण । परोपकाराचे ॥ २८ ॥
जे सद्कीर्तीचे पुरुष । ते परमेश्वराचे अंश ।
धर्मस्थापनेचा हव्यास । तेथें चि वसे ॥ २९ ॥
विशेष सारासार विचार । तेणें होय जग्गोद्धार ।
संगत्यागें निरंतर । होऊन गेले ॥ ३० ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे देवबळात्कारनाम समास ॥ १ ॥

---

॥ श्रीराम ॥

ब्रह्म निर्मळ निश्चळ । जैसें गगन अंतराळ ।
निराकार केवळ । निर्विकारी ॥ १ ॥
अंत चि नाहीं तें अनंत । शाश्वत आणी सदोदित ।
असंत नव्हे तें संत । सर्वकाळ ॥ २ ॥
परब्रह्म तें अविनाश । जैसें आकाश अवकाश ।
न तुटे न फुटे सावकास । जैसें तैसें ॥ ३ ॥
तेथें ज्ञान ना अज्ञान । तेथें स्मरण ना विस्मरण ।
तेथें अखंड निर्गुण । निरावलंबी ॥ ४ ॥
तेथें चद्र सूर्य ना पावक । नव्हे काळोखें ना प्रकाशक ।
उपाधीवेगळें येक । निरोपाधी ब्रह्म ॥ ५ ॥
निश्चळीं स्मरण चेतलें । त्यास चैतन्य ऐसें कल्पिलें ।
गुणसमानत्वें जालें । गुणसाम्य ऐसें ॥ ६ ॥

---

१ वरील ६ वी ओंवी पहा. अतरात्मा बळात्कारानें आपला कार्यभाग कसा साधून घेत असतो, याचें वर्णन या समासात आहे. २ त्याच्या ठिकाणीं तिन्ही गुण समानत्वानें राहिले आहेत; म्हणजे त्याच्या ठिकाणीं गुणमाया आहे.

गगनीं आली अभ्रछाया । तैसी जाणिजे मूळमाया
उद्भव आणी विलया । वेळ नाहीं ॥ ७ ॥
निर्गुणीं गुणविकारु । तो चि शड्गुणेश्वरु ।
अर्धनारीनटेश्वरु । तयास ह्मणिजे ॥ ८ ॥
आदिशक्ति शिवशक्ति । मुळीं आहे सर्वशक्ति ।
तेथून पुढें नाना वेक्ती । निर्माण जाल्या ॥ ९ ॥
तेथून पुढें शुद्धसत्व । रजतमाचें गूढत्व ।
तयास ह्मणिजे महत्तत्व । गुणक्षोमिणी ॥ १० ॥
मुळीं असेचिना वेक्ती । तेथें कैंची शिवशक्ती ।
ऐसें ह्मणाल तरी चित्तीं । सावधान असावें ॥ ११
ब्रह्मांडावरून पिंड । अथवा पिंडावरून ब्रह्मांड ।
अधोर्ध पाहाता निवाड । कळों येतो ॥ १२ ॥
बीज फोडून आणिलें मना । तेथें फळ तों दिसेना ।
वाढत वाढत पुढें नाना । फळें येती ॥ १३ ॥
फळफोडिता बीज दिसे । बीज फोडितां फळ नसे ।
तैसा विचार असे । पिंडब्रह्मांडीं ॥ १४ ॥
नर नारी दोनी भेद । पिंडीं दिसती प्रसिद्ध ।
मुळीं नस्तां विशद । होतील कैसीं ॥ १५ ॥
नाना बीजरूप कल्पना । तींत काये येक असेना ।
सूक्ष्म ह्मणोनि भासेना । येकायेकीं ॥ १६ ॥
स्थूळाचें मूळ ते वासना । ते वासना आधीं दिसेना ।
स्थूळावेगळें अनुमानेना । सकळ कांहीं ॥ १७ ॥
कल्पनेची सृष्टी केली । ऐसीं वेदशास्त्रें बोलिलीं ।
दिसेना ह्मणोन मिथ्या केली । न पाहिजेत कीं ॥ ८ ॥

१ मूळमायेंत, प्रकृतिपुरुषामध्यें

पडदा येका येका जन्माचा । तेथें विचार कळे कैंचा ।
परंतु गूढत्व हा नेमाचा । ठाव आहे ॥ १९ ॥
नाना पुरुषांचे जीव । नाना स्त्रियांचे जीव ।
येक चि परी देहस्वभाव । वेगळाले ॥ २० ॥
नवरीस नवरी नलगे । ऐसा भेद दिसों लागे ।
पिंडावरून उमगे । ब्रह्मांडबीज ॥ २१ ॥
नवरीचें मन नवऱ्यावरी । नवऱ्याचें मन नवरीवरी ।
ऐसी वासनेची परी । मुळींहून पाहावी ॥ २२ ॥
वासना मुळींची अभेद । देहसमधें जाला भेद ।
तुटतां देहाचा समंध । भेद गेला ॥ २३ ॥
नरनारीचें बीजकारण । शिवशक्तीमधें जाण ।
देह धरितां प्रमाण । कळों आलें ॥ २४ ॥
नाना प्रीतीच्या वासना । येकाचें येकास कळेना ।
तिक्षण दृष्टीनें अनुमाना । कांहींसें येतें ॥ २५ ॥
बाळकास वाढवी जननी । हें तों नव्हे पुरुषाचेनी ।
उपाधी वाढे जयेचेनी । ते हे वनिता ॥ २६ ॥
वीट नाहीं कंटाळा नाहीं । आलस्य नाहीं त्रास नाहीं ।
इतुकी माया कोठें चि नाहीं । मातेवेगळी ॥ २७ ॥
नाना उपाधी वाढऊं जाणे । नाना मायनें गोऊं जाणे ।
नाना प्रीति लाऊं जाणे । नाना प्रपंचाची ॥ २८ ॥
पुरुषास स्त्रीचा विश्वास । स्त्रीस पुरुषाचा संतोष ।
परस्परें वासनेस । बांधोन टाकिलें ॥ २९ ॥
ईश्वरें मोठें सूत्र केलें । मनुष्यमात्र गुंतोन राहिलें ।
लोभाचें गुंडाळें केलें । उगवेना ऐसें ॥ ३० ॥

---

१ एक एक जन्म हा एक एक पडदा आहे, असे जन्म जितके जास्त होत आहेत तितके तितके आपल्यामध्यें व ब्रह्मामध्यें जास्त जास्त पडदे पडत आहेत, त्यामुळें ब्रह्मस्वरूपाचा आपणास विचार उमजत नाहीं, परंतु निश्चित गोष्टी अशा च गूढ असतात, त्या सहज समजत नाहींत. २ तीक्ष्ण.

ऐसी परस्परें आवडी । स्त्रीपुरुषांची माहां गोडी ।
हे मुळींहून चालिली रोकडी । विवेकें पाहावी ॥ २१ ॥
मुळीं सूक्ष्म निर्माण जालें । पुढें पष्ट दिसोन आलें ।
उत्पतीचें कार्य चाले । उभयतांकरितां ॥ २२ ॥
मुळीं शिवशक्ती खरें । पुढें जालीं वधुवरें ।
चौर्‍यासि लक्ष विस्तारें । विस्तारलीं जे ॥ २३ ॥
येथें शिवशक्तीचें रूप केलें । श्रोतीं मनास पाहिजे आणिलें ।
विवरलियांविण बोलिलें । तें वेर्थ जाणावें ॥ २४ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे शिवशक्तिनिरूपणनाम समास दुसरा ॥ २

॥ श्रीराम ॥

थांवा थांवा ऐका ऐका । आधीं च ग्रंथ सोडूं नका [redacted]
सांगितलें तें ऐका । सावधपणें ॥ १ ॥
श्रवणामध्यें सार श्रवण । तें हें अध्यात्मनिरूपण ।
सुचित करून अंत.कर्ण । ग्रन्थामधें विवरावें ॥ २
श्रवणमननाचा विचार । निजध्यासें साक्षात्कार ।
रोकडा मोक्षाचा उधार । बोलों चि नये ॥ ३ ॥
नाना रत्नें परीक्षितां । अथवा वजनें करितां ।
उत्तम सोनें पुटीं घालितां । सावधान असावें ॥ ४ ।
नाना नाणीं मोजून घेणें । नाना परीक्षा करणें ।
विवेकी मनुष्यासी बोलणें । सावधपणें ॥ ५ ॥
जैसें लाखोलीचें धान्य । निवडून वेंचितां होतें मान्य
सगट मानितां अमान्य । देव क्षोभे ॥ ६ ॥
येकांतीं नाजुक कारबार । तेथें असावें अति तत्पर ।
त्याच्या कोटिगुणें विचार । अध्यात्मग्रन्थीं ॥ ७ ॥

१ मुळींत. २ ही ओंवी समासांत मागाहून लिहिलेली आहे. ह्यांचे अंक मुळांत बदलले नाहींत. ३ वाहातां. ४ अर्पितां.

काहिणी कथा गोष्टी पवाड । नाना अवतारचरित्रें वाड ।
त्या समस्त[1]मध्यें जाड । अध्यात्मविद्या ॥ ८ ॥
गत गोष्टीस ऐकिलें । तेणें काये हातास आलें ।
ह्मणती पुण्य प्राप्त जालें । परी तें दिसेना कीं ॥ ९ ॥
तैसें नव्हे अध्यात्मसार । हा प्रचितीचा विचार ।
कळतां अनुमानाचा संव्हार । होत जातो ॥ १० ॥
मोठे मोठे येऊन गेले । आत्म्याकारितां च वर्तले ।
त्या आत्म्याचा महिमा बोले । ऐसा कवणु ॥ ११ ॥
युगानयुगें येकटा येक । चाळवितो तिनी लोक ।
त्या आत्म्याचा विवेक । पाहिला च पाहावा ॥ १२ ॥
प्राणी आले येऊन गेले । ते जैसे जैसे वर्तले ।
ते वर्तणुकेचें कथन केलें । इछेसारिखें ॥ १३ ॥
जेथें आत्मा नाहीं दाट । तेथें अवघें सरसपाट ।
आत्म्याविण बापुडें काष्ट । काये जाणे ॥ १४ ॥
ऐसें वरिष्ठ आत्मज्ञान । दुसरें नाहीं यासमान ।
सृष्टीमधें विवेकी सज्जन । ते चि हें जाणती ॥ १५ ॥
पृथ्वी आणी आप तेज । याचा पृथ्वीमध्यें समज ।
अंतरात्मा तत्वबीज । तें वेगळें चि राहिलें ॥ १६ ॥
वायोपासून पैलिकडे । जो कोणी विवकें पवाडे ।
जवळी च आत्मा सांपडे । तया पुरुषासी ॥ १७ ॥
वायो आकाश गुणमाया । प्रकृतिपुरुष मूळमाया[3] ।
सूक्ष्मरूपें प्रचित येया । कठिण आहे ॥ १८ ॥

---

१ अखंड. २ आकाश ३ वायु, नंतर आकाश, नंतर गुणमाया, नंतर प्रकृति-पुरुष ह्मणजे च मूळमाया, हीं सर्व सूक्ष्म आहेत पृथ्वी, आप, तेज याना कांहींतरी रूप आहे, परंतु वायुपासून पलिकडे सूक्ष्म रूपें आहेत, ह्मणून तीं समजण्यास जरी कठीण आहेत, तरी तीं ज्याला समजतील त्याला च आत्मस्वरूपाचें ज्ञान होणार आहे.

मायादेवीच्या घादली । सूक्ष्मीं कोण मन घाली ।
समजला त्याची तुटली । संदेहवृत्ती ॥ १९ ॥
मूळमाया चौथा देह । जाला पाहिजे विदेह ।
देहातीत होऊन राहे । धन्य तो साधु ॥ २० ॥
विचारें ऊर्ध्व चढती । तयासी च ऊर्ध्वगती ।
येरां सकळां अधोगती । पदार्थज्ञानें ॥ २१ ॥
पदार्थ चांगले दिसती । परी ते सर्वे चि नासती ।
अतो भ्रष्ट ततो भ्रष्ट होती । लोक तेणें ॥ २२ ॥
याकारणें पदार्थज्ञान । नाना जिनसीचा अनुमान ।
सर्व साहून निरंजन । धुंडीत जावें ॥ २३ ॥
अष्टांग योग पिंडज्ञान । त्याहून थोर तत्वज्ञान ।
त्याहून थोर आत्मज्ञान । तें पाहिलें पाहिजे ॥ २४ ॥
मूळमायेचे सेवटीं । हरिसंकल्प मुळीं उठी ।
उपासनायोगें मिठी । तेथें घातली पाहिजे ॥ २५ ॥
मग त्यापैलिकडे जाण । निखळ ब्रह्म निर्गुण ।
निर्मळ निश्चळ त्याची खूण । गगनासारिखी ॥ २६ ॥
येथून तेथवरी दाटलें । प्राणीमात्रास भेटलें ।
पदार्थमात्रीं लिगटलें । व्यापून आहे ॥ २७ ॥
त्याऐसें नाहीं थोर । सूक्ष्माहून सूक्ष्म विचार ।
पिंडब्रह्मांडाचा संव्हार । होता कळे ॥ २८ ॥
अथवा पिंड ब्रह्मांड असतां । विवेकप्रळयें पाहों जातां ।
शाश्वत कोण हें तत्वता । उमजों लागे ॥ २९ ॥

---

[1] मूळप्रकृति हा ब्रह्मांडाचा चवथा देह होय. [2] सोनेरी व जयरामप्रतींत "धूर्त" असा पाठ आहे [3] मूळमायेच्या हि पलिकडे असणारें जें ब्रह्म (हरि), त्या ब्रह्माच्या ठिकाणीं जी इच्छा स्फुरण पावली तिला.

कूरून अवघा तत्वझाडा । सारासाराचा निवाडा ।
सावधपणें ग्रन्थ सोडा । सुखिनावें[1] ॥ ३० ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे श्रवणनिरूपणनाम समास तृतीय ॥ ३ ॥

---

॥ श्रीरामचंद्र ॥

बहुत जनासी उपाये । वक्तयास पुसतां त्रासों नये ।
बोलतां बोलतां अन्वये । सांडूं नये ॥ १ ॥
श्रोत्यानें आशंका घेतली । ते तत्काळ पाहिजे फेडिली ।
स्वगोष्टीनें स्वगोष्टी पेंचली । ऐसें न व्हावें ॥ २ ॥
पुढें धरिता मागें पेंचला । मागें धरितां पुढें उडाला ।
ऐसा सापडत चि गेला । ठाइं ठाइं ॥ ३ ॥
पोहणार चि गुचक्या खातो । जनास कैसा काढूं पाहातो ।
आशय लोकाचा राहातो । ठाइ ठाइ ॥ ४ ॥
आपण चि बोलिला संव्हार । आपण चि बोलिजे सर्वसार ।
दुस्तर मायेचा पार । टाकिलो[2] पाहिजे ॥ ५ ॥
जें जें सूक्ष्म नाम घ्यावें । त्याचें रूप विंवऊन द्यावें ।
तरी च वक्ता ह्मणवावें । विचारवंत ॥ ६ ॥
ब्रह्म कैसें मूळमाया कैसी । अष्टधाप्रकृती शिवशक्ति कैसी ।
शड्गुणेश्वराची स्थिति कैसी । गुणसाम्याची[3] ॥ ७ ॥
अर्धनारीनटेश्वर । प्रकृतिपुरुषाचा विचार ।
गुणक्षोभिणी तदनंतर । त्रिगुण कैसे ॥ ८ ॥
पूर्वपक्ष कोठून कोठवरी । वाच्यांशलक्ष्यांशाची परी ।
सूक्ष्म नाना विचार करी । धन्य तो साधु ॥ ९ ॥
नाना पाल्हाळीं पडेना । बोलिलें चि बोलावेना ।
मौन्यगर्भ[4] अनुमाना । आणून सोडी ॥ १० ॥

---

१ सुखेनैव, खुशाल २ टाकिला, गाठला.. ३ गुणसमानत्व जीत आहे अशी गुणमाया. ४ वाणीला जेथें मौन्य पडतें असें ब्रह्म.

घडी येक विमळ ब्रह्म । घडी येक ह्मणे सर्व ब्रह्म ।
द्रष्टा साक्षी सत्ता ब्रह्म । क्षण येक ॥ ११ ॥
निश्चळ तें चि जालें चचळ । चंचळ तें चि ब्रह्म केवळ ।
नाना प्रसंगीं खळखळ । निवाडा नाहीं ॥ १२ ॥
चळतें आणी निश्चळ । अवघें चैतन्य चि केवळ ।
रूपें वेगळालीं प्रांजळ । कदापी बोलवेना ॥ १३ ॥
उगी च करी गथागोवी । तो लोकांस कैसें उगवी ।
नाना निश्चयें नाना गोवी । पडत जाते ॥ १४ ॥
भ्रमास म्हणे परब्रह्म । परब्रह्मास म्हणे भ्रम ।
ज्ञातेपणाचा संभ्रम । बोलोन दावी ॥ १५ ॥
घाली शास्त्रांची दडपण । प्रचितिविण निरूपण ।
पुर्तों जातां उगा च सीण । अत्यंत मानी ॥ १६ ॥
ज्ञात्यास आणि पदार्थभिडा । तो काय बोलेल बापुडा ।
सारासाराचा निवाडा । जाला पाहिजे ॥ १७ ॥
वैद्य मात्रची स्तुती करी । मात्रा गुण कांहीं च न करी ।
प्राचितिविण तैसी परी । ज्ञानाची जाली ॥ १८ ॥
जेथें नाहीं सारासार । तेथें अवघा अंधकार ।
नाना परीक्षेचा विचार । राहिला तेथें ॥ १९ ॥
पाप पुण्य स्वर्ग नर्क । विवेक आणि अविवेक ।
सर्वब्रह्मीं काये येक । सापडलें नाहीं ॥ २० ॥
पावन आणि तें पतन । दोनीं मानिलीं तत्समान ।
निश्चये आणि अनुमान । ब्रह्मरूप ॥ २१ ॥
ब्रह्मरूप जालें आघवें । तेथें काये निवडावें ।
आवघी साकर चि टाकावें । काये कोठें ॥ २२ ॥
तैसें सार आणि असार । अवघा जाला येककार ।
तेथें बळावला अविचार । विचार कैंचा ॥ २३ ॥

स्वतःला ज्ञाता ह्मणवून तो पदार्थाची भीड ठेवतो, म्हणजे पदार्थाची अपेक्षा धरि

वंद्य निंद्य येक जालें । तेथें काये हाता आलें ।
उन्मत्त द्रव्यें जें भुललें । तें भलतें च बोले ॥ २४ ॥
तैसा अज्ञानभ्रमें भुलला । सर्व ब्रह्म ह्मणोन बैसला ।
माहांपापी आणि भला । येक चि मानी ॥ २५ ॥
सर्वसंगपरित्याग । अथवा सेवा विषयेभोग ।
दोघे येक चि मानितां मग । काये उरलें ॥ २६ ॥
भेद ईश्वर करून गेला । त्याच्या बाचेन न वचे मोडिला ।
मुखामधें घांस घातला । तो अपानीं घालावा ॥ २७ ॥
ज्या इंद्रियास जो भोग । तो तो करी येथासांग ।
ईश्वराचें केलें जग । मोडितां उरेना ॥ २८ ॥
अवघी भ्रांतीची भुंटकी । प्रचितिविण गोष्टी लटकी ।
वेड लागलें जे बटकी । ते भलतें चि बोले ॥ २९ ॥
प्रत्ययज्ञाता सावधान । त्याचें ऐकावें निरूपण ।
आत्मसाक्षात्काराची खूण । तत्काळ बाणे ॥ ३० ॥
वेडें वांकडें जाणावें । आंधळें पाडलीं वोळखावें ।
बाश्कळ बोलणें सांडावें । वैमक्त जैसें ॥ ३१ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे अनुमाननिर्शननाम समास चौथा ॥ ४ ॥

॥ श्रीराम ॥

येकवीस सहश्र सासें जपा । नेमून गेली ते अजपा ।
विचार पाहातां सोपा । सकळ काहीं ॥ १ ॥
मुखीं नासिकीं असिजे प्राणें । तयास अखंड येणें जाणें ।
याचा विचार पाहाणें । सूक्ष्मदृष्टीं ॥ २ ॥
मुळीं पाहातां येक स्वर । त्याचा तार मंद्र घोरें ।
त्या घोराहून सूक्ष्म विचार । अजपाचा ॥ ३ ॥

१ वाटेल तो, योग्य अयोग्य, मनसोक्त २ जगन्नियंत्या परमेश्वरानें जे नियम केले आहेत ते मोडून चालवयाचें नाहीं. ३ भुलावणी. ४ वमन. ५ मूळ एक स्वर असून त्याचे तार, मंद्र, घोर असे तीन प्रकार आहेत. तार=वरचा षड्ज ; निषाद, मंद्र=मधला षड्ज; मध्यम. घोर=खालचा षड्ज, खर्ज.

सरिगमपदनिस । सरिं मात्रुका सायांस[1] ।
प्रथम स्वरें मात्रुकांस । ह्मणोन पाहावें[2] ॥ ४ ॥
परेवाचेहून अतें । आणि पश्यतीखालतें ।
स्वराचें जन्मस्थानें तें[3]। तेथून उठे ॥ ५ ॥
येकांतीं उगें च बैसावें । तेथें हें समजोन पाहावें ।
अखंड घ्यावें सांडावें । प्रभंजनासी ॥ ६ ॥
येकांतीं मौन्य धरून बैसे । सावध पाहातां कैसें भासे ।
सोहं सोहं ऐसे । शब्द होती ॥ ७ ॥
उच्चारेंविण जे शब्द । ते जाणावे सहजशब्द ।
प्रत्यया येती परंतु नाद । कांहीं च नाहीं ॥ ८ ॥
ते शब्द सांडून बैसला । तो मानी ह्मणावा भला ।
योगाभ्यासाचा गल्बला । याकारणें ॥ ९ ॥
येकांतीं मौन्य धरून बैसला । तेथें कोण शब्द जाला ।
सोहं ऐसा भासला । अंतर्यामीं ॥ १० ॥
धारितां सो सांडितां ह । अखंड चाले सोहं सोहं ।
याचा विचार पाहातां बहु । विस्तारला ॥ ११ ॥
देहधारक तितुका प्राणी । श्वेतजउद्भिजादिक खाणी ।
स्वासोस्वास नस्तां प्राणी । कैसे जिती ॥ १२ ॥
ऐसी हे अजपा सकळांसी । परंतु कळे जाणत्यासी ।
सहज सांडून सायासीं । पडों च नये ॥ १३ ॥
सहज देव असत चि असे । सायासें देव फुटे नासे ।
नासिवंत देवास विश्वासे । ऐसा कवणु ॥ १४ ॥

---

१ ह्या सर्व मातृकांचा सायास करून पहा, ह्मणजे ह्मणून पहा. २ सप्त स्वरांपैकीं कोणता हि स्वर प्रथम धरून तेथून पुढचे ह्मणून पहावे. ३ परावाचा नाभिस्थानीं व पश्यती हृदयात आहे तेव्हा नाभी आणि हृदय यांच्या दरम्यान स्वराचें जन्मस्थान आहे ४ ही ओंवी समासात मागाहून लिहिलेली आहे ओंव्यांचे अंक मुळात बदलले नाहींत सातव्या ओंवीचा शेवट व नववीचा आरंभ पाहिला ह्मणजे ही ओंवी नि संशय मागाहून लिहिलेली आहे, हें पटतें.

जगदांतराचें दर्शन । सहज घडे अखंड ध्यान ।
आत्मइछेनें जन । सकळ वर्तती ॥ १५ ॥

आत्मयाचें समाधान । घडे तैसें चि आशन ।
सांडलें फिटलें समर्पण । तयासी च होये ॥ १६ ॥

अन्नपुरुष पोटीं वसती । तयास अवदानें सकळ देती ।
लोक आज्ञेमधें असती । आत्मयाचे ॥ १७ ॥

सहज देवजपध्यानें । सहज चालणें स्तुती स्तवनें ।
सहज घडे तें भगवांनें । मान्य कीजे ॥ १८ ॥

सहज समजायाकारणें । नाना हटयोग करणें ।
परंतु येकायेकीं समजणें । घडत नाहीं ॥ १९ ॥

द्रव्य चुकतें दरिद्र येतें । तळीं लक्ष्मी वरीं वर्ततें ।
प्राणी काये करील तें । ठाउकें नाहीं ॥ २० ॥

तळघरामधें उदंड द्रव्य । भिंतीमधें घातलें द्रव्य ।
स्तंभीं तुळवटीं द्रव्य । आपण मधें ॥ २१ ॥

---

१ जगदंतर जो अंतरात्मा त्याचें दर्शन घेतलें ह्मणजे साहजिक च अखंड ध्यान घडत असतें; आत्म्याची इच्छा जशी असते तसें च लोक वर्तन करीत असतात २ जेणें-करून आत्म्याचें समाधान होईल असें च त्याला आशन घडत आहे; आत्म्याला जें जें पाहिजे असतें तें तें त्याला लोक देत असतात. ३ जाणून बुजून जेवढें त्याला अर्पण होतें तेवढें च त्याला मिळतें असें नाहीं, तर सहज सांडलेलें किंवा टाकलेलें हें सर्व त्याला च समर्पण होत आहे उ० दूध सांडलें तरी तें त्याला च समर्पण होय. ४ अशा रीतीनें आपल्या हातून सहजगत्या परमेश्वराचा जप, ध्यान, स्तवन हीं घडत आहेत. सहज देखील आपण जें बोलतों ती परमेश्वराची स्तुति च होय व तो हि तसें च मानून घेतो. परंतु ह्या सर्व गोष्टी समजल्या पाहिजेत. ५ ह्या गोष्टी न समजल्याकारणानें " लक्ष्मीमधें करंटा नांदे " अशी मनुष्याची स्थिति होते द्रव्य असून हि तें कोठें आहे हें ठाऊक नसल्याकारणानें मनुष्य दारिद्य भोगतो, तळ्यामध्यें द्रव्य असतें व वरच्या बाजूस पाणी सोडलेलें असतें. द्रव्य कोठें आहे हें त्याला माहित च नसतें, त्याला तो काय करील ?

लक्ष्मीमध्यें करंटा नांदे । त्याचें दारिद्र आधीक सांदे ।
नवल केलें परमानदें । परमपुरुषें ॥ २२ ॥
येक पाहाती येक खाती । ऐसी विवेकाची गती ।
प्रवृत्ति अथवा निवृत्ती । येणें चि न्यायें ॥ २३ ॥
अंतरीं वसतां नारायेणें । लक्ष्मीस काये उणें ।
ज्याची लक्ष्मी तो आपणें । बळकट धरावा ॥ २४ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे अजपानिरूपणनाम समास पंचम ॥५॥

---

॥ श्रीराम ॥

आत्मा देहामध्यें असतो । नाना सुखदुखें भोगितो ।
सेवटीं शरीर सांडून जातो । येकायेकीं ॥ १ ॥
शरीरीं शक्ति तारुण्यपणीं । नाना सुखें भोगी प्राणी ।
अशक्त होतां वृद्धपणीं । दुःखें भोगी ॥ २ ॥
मरावेना ऐसी आवडी । हातपाये खोडूनें प्राण सोडी ।
नाना दुःखें अवघडी । वृद्धपणीं ॥ ३ ॥
देहआत्मयांची संगती । कांहींयेक सुख भोगिती ।
चर्फडचर्फडून जाती । देहांतकाळीं ॥ ४ ॥
ऐसा आत्मा दुःखदायेक । येकांचे प्राण घेती येक ।
आणी सेवटीं निरार्थक । कांहीं च नाहीं ॥ ५ ॥
ऐसा दों दिसांचा भ्रम । त्यास ह्मणती परब्रह्म ।
नाना दुःखाचा संभ्रम । मानून घेतला ॥ ६ ॥
दुःखी होऊन चर्फडून गेले । तेथें कोण समाधान जालें ।
कांहींयेक सुख भोगिलें । तों सर्वं चि दुःख ॥ ७ ॥

---

१ लक्ष्मी जवळपास असून हि दारिद्य भोगणें ह्मणजे हें विशेष आहे सांदे= सांदतें, पूर्ण होतें २ जे विवेकहीन असतात ते नुसते पाहत च राहतात व जे विवेकी असतात ते उपभोग घेतात. प्रपंचात काय आणि परमार्थात काय, एक च न्याय विवेक नाहीं त्यांचा प्रपच हि कष्टद होतो व परमार्थ हि अंतरतो ३ झाडून.

जन्मदारभ्य आठवावें । ह्मणिजे अवघें पडेल ठावें ।
नाना दुःख मोजावें । काये ह्मणोनी ॥ ८ ॥
ऐसी आत्मयाची संगती । नाना दुःखें प्राप्त होती ।
दैन्यवाणे होऊन जाती । प्राणीमात्र ॥ ९ ॥
कांहीं आनंद कांहीं खेद । जन्मवरी पडिला समंध ।
नाना प्रकारीं विरुद्ध । तेडातोडी ॥ १० ॥
निद्राकाळीं ढेकुण पिसा । नाना प्रकारीं वळसा[3] ।
नाना उपायें वळसा । त्यांस होये ॥ ११ ॥
भोजनकाळीं माश्या येती । नाना पदार्थ उंदीर नेती ।
पुढें त्याची हि फजिती । मार्जरें कारिती ॥ १२ ॥
वों [6]चामवा गोंचिड । गांधेलें कैंनटें उदंड ।
येकास येक चर्फड । दोहिकडे ॥ १३ ॥
विंचु सर्प वाग रिसें । सुसरी लांढिगे माणसास माणसें ।
परस्परें सुखसतोषें । येक हि नाहीं ॥ १४ ॥
चौऱ्यासि लक्ष उत्पत्ती । येकास येक भक्षिती ।
नाना पीडा दुःखणी किती । ह्मणौन सांगावें ॥ १५ ॥
ऐसी अंतरात्म्याची करणी । नाना जीव दाटले धरणीं ।
परस्परें संव्हारणी । येकयेकांची ॥ १६ ॥
अखड रडती चर्फडिती । विवळविवळों प्राण देती ।
मूर्ख प्राणी त्यास ह्मणती । परब्रह्म ॥ १७ ॥
परब्रह्म जाणार नाहीं । कोणास दुःख देणार नाहीं ।
स्तुति निंदा दोनी नाहीं । परब्रह्मीं ॥ १८ ॥
उदंड सिव्या दिधल्या । तितुक्या अंतरात्म्यास लागल्या ।
विचार पाहाता प्रत्यया आल्या । येथातथ्य ॥ १९ ॥

---

१ जन्मादारभ्य, जन्मापासून २ नाना प्रकारें विरुद्धपणा येतो, ताडातोडी होते. ३ त्रास ४ त्यांचा त्रास न होण्यासाठीं आपण उपाय करावा तर आपण त्यांना त्रास देतों असें होतें. ५ उवा. ६ त्वचेंत घुसणाऱ्या उवा. ७ एक जातीचा सर्प.

धगडीचा भटकीचा लवंडीचा । गधडीचा कुतरीचा बोंगळीचा ।
ऐसा हिसेब सिव्यांचा । किती म्हणोनि सांगावा ॥ २० ॥
इतुकें परत्रीं लागेना । तेथें कल्पना चि चालेना ।
तंडातोडीचें ज्ञान मानेना । कोणीयेकासी ॥ २१ ॥
सृष्टीमधें सकळ जीव । सकळांस कैचें वैभव ।
याकारणें ठायीठाव । निर्मिला देवें ॥ २२ ॥
उदंड लोक बाजारीचे । जें जें आलें तें तें वेंचे ।
उत्तम तितुकें भाग्याचे । लोक घेती ॥ २३ ॥
येणें चि न्यायें अन्न वसन । येणें चि न्यायें देवतार्चन ।
येणें चि न्यायें ब्रह्मज्ञान । प्राप्तव्यासारिखें ॥ २४ ॥
अवघे च लोक सुखी असती । ससार गोड करून नेती ।
माहाराजे वैभव भोगिती । तें करंट्यास कैचें ॥ २५ ॥
परतु अंतीं नाना दुःखें । तेथें होतें सगट सारिखें ।
पूर्वीं भोगिलीं नाना सुखें । अंतीं दुःख सोसवेना ॥ २६ ॥
कठिण दुःख सोसवेना । प्राण शरीर सोडिना ।
मृत्यदुःख सगट जना । कासाविस करी ॥ २७ ॥
नाना अवेवहीन जालें । तैसें चि पाहिजे वर्तलें ।
प्राणी अंतकाळीं गेलें । कासाविस होउनी ॥ २८ ॥
रूप लावण्य अवघें जातें । शरीरसामर्थ्य अवघें रोहातें ।
कोणी नस्तां मरतें । आपदआपदों ॥ २९ ॥
अतकाळ दैन्य दीन । सकाळिकास तत्समान ।
ऐसें चंचळ अवलक्षण । दुःखकारी ॥ ३० ॥
भोगून अभोक्ता ह्मणती । हे तों अवघी च फजिती ।
लोक उगे च बोलती । पाहिल्याविण ॥ ३१ ॥

---

१ असबद्ध. २ बेतास बेत, योग्यतेनुरूप. ३ नशिबानुसार. ४ " दु " ला हरताळ लावून " डु " केलें आहे. ५ प्रथम " जातें " होतें.

अंतकाळ आहे कठीण । शरीर सोडिना प्राण ।
बराड्यासारिखें लक्षण । अंतकाळीं ॥ २२ ॥
इति श्रीदासबोधे देहात्मनिरूपणनाम समास षष्ठ ॥ ६ ॥

---

॥ श्रीराम ॥

मुळीं उदक निवळ असतें । नाना वल्लीमधें जातें ।
संगदोषें तैसें होतें । आंब्ल तिक्षण कडवट ॥ १ ॥
आत्मा आत्मपणें असतो । देहसंगें विकारतो ।
साभिमानें भरीं भरतो । भलतिकडे ॥ २ ॥
बरी संगती सांपडली । जैसी उंसास गोडी आली ।
विषवल्ली फांपावली । घातकी प्राणी ॥ ३ ॥
अठराभार वनस्पती । गुण सांगावे ते किती ।
नाना देहाचे संगती । आत्मयास होये ॥ ४ ॥
त्यामधें कोणी भले । ते सतसंगें निघाले ।
देहाभिमान सांडून गेले । विवेकबळें ॥ ५ ॥
उदकाचा नाश चि होतो । आत्मा विवेकें निघतो ।
ऐसा आहे प्रत्यय तो । विवेकें पाहा ॥ ६ ॥
ज्यास स्वहित चि करणें । त्यास किती ह्मणौन सांगणें ।
हें ज्याचें त्यानें समजणें । सकळ कांहीं ॥ ७ ॥
आपला आपण करी कुडावा । तो आपला मित्र जाणावा ।
आपला नाश करी तो समजावा । वैरी ऐसा ॥ ८ ॥
आपलें आपण अन्हित करावें । त्यास आडवें कोणें निघावें ।
येकांतीं जाऊन जीवें । मारी आपणासी ॥ ९ ॥

---

१ बराडी=दुकळलेले, आशाळभूत. २ प्रथम 'निवाले' होतें, त्याचें 'निघाले' केलें आहे. ३ वर आत्म्याला उदकाचा दृष्टांत दिला, पण तो कमसल आहे, कारण उदकाचा नाश होतो, तसा आत्म्याचा होत नाहीं. आत्मा विवेकाच्या योगानें बुद्ध्यादि आवरणांतून निघतो ह्मणजे तो आवरणमुक्त होतो. तो शाश्वत आहे. ४ रक्षण.

जो आपला आपण घातकी । तो आत्महत्यारा पातकी ।
याकारणें विवेकी । धन्य साधु ॥ १० ॥
पुण्यवंतां सत्संगती । पापिष्टां असत्संगती ।
गति आणि अवगती । संगतीयोगें ॥ ११ ॥
उत्तम संगती धरावी । आपली आपण चिंता करावी ।
अंतरीं बरी विवरावी । बुद्धि जाणत्याची ॥ १२ ॥
इहलोक आणि परलोक । जाणता तो सुखदायेक[1] ।
नेणत्याकरितां अविवेक । प्राप्त होतो ॥ १३ ॥
जाणता देवाचा अंश । नेणता ह्मणिजे तो राक्षेस ।
यामधें जें विशेष । तें जाणोन घ्यावें ॥ १४ ॥
जाणता तो सकळां मान्य । नेणता होतो अमान्य ।
जेणेंकरिता होईजे धन्य । तें चि घ्यावें ॥ १५ ॥
साक्षपी शाहाण्याची संगती । तेणें साक्षपी शाहाणे होती ।
आळसी मूर्खांची संगती । आळसी मूर्ख ॥ १६ ॥
उत्तम संगतीचें फळ सुख । अद्धम संगतीचें फळ दुःख ।
आनंद सांडुनियां शोक । कैसा घ्यावा ॥ १७ ॥
ऐसें हें प्रगट दिसे । जनामधें उदंड भासे ।
प्राणीमात्र वर्ततसे । उभयेयोगें ॥ १८ ॥
येका योगें सकळ योग । येका योगें सकळ वियोग ।
विवेकयोगें सकळ प्रयोग । करीत जावे ॥ १९ ॥
कवचितें सांकडींत पडिलें । तरी तेथून पाहिजे निघालें ।
निघोन जातां जालें । परम समाधान ॥ २० ॥
नाना दुर्जनांचा संग । क्षणक्षणा मनभंग ।
याकारणें कांहीं रंग[2] । राखोन जावें ॥ २१ ॥

---

१ कृत्य. २ महत्त्व

शाहाणा येत्न त्याच्या गुणें । पाहों जाता काये उणें ।
सुख संतोष भोगणें । नाना श्लाघ्यता ॥ २२ ॥
आता लोकीं ऐसें आहे । सृष्टीमधें वर्तताहे ।
जो कोणी समजोन पाहे । त्यास घडे ॥ २३ ॥
बहुरत्न वसुंधरा । जाणजाणों विचार करा ।
समजल्यां प्रत्ययो अंतरा-। माजीं येतो ॥ २४ ॥
दुर्बळ आणी सपन्न । वेडें आणि वित्पन्न ।
हें अखंड दंडायमान । असत चि असे ॥ २५ ॥
येक भाग्यपुरुष मोडती । येक नवे भाग्यवंत होती ।
तैसी च विद्या वित्पती । होत जाते ॥ २६ ॥
येक भरे येक रितें । रितें मागुतें भरतें ।
भरतें हि रितें होतें । काळातरीं ॥ २७ ॥
ऐसी हे सृष्टीची चाली । सपत्ति दुपाराची साउली ।
वयेसा तरी निघोन गेली । हळुहळु ॥ २८ ॥
बाळ तारुण्य आपलें । वृधाप्य प्रचितीस आलें ।
ऐसें जाणोन सार्थक केलें । पाहिजे कोणियेकें ॥ २९ ॥
देह जैसें केलें तैसें होतें । येत्न केल्यां कार्ये साधतें ।
तरी मग कष्टावें तें । काये निमित्य ॥ ३० ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे जगजिवननिरूपणनाम समास सातवा ॥७

---

॥ श्रीराम ॥

नाभीपासून उन्मेषवृत्ती । ते चि परा जाणिजे श्रोतीं ।
ध्वनिरूप पश्यती । ह्रदईं वसे ॥ १ ॥
कंठापासून नाद जाला । मध्यमा वाचा बोलिजे त्याला ।
उच्चार होतां अक्षराला । वैखरी बोलिजे ॥ २ ॥

---

१ जो शहाणा आहे तो यत्न करितो, तेणेंकरून त्याला कांहीं कमी पडत नाहीं. २ ही अशी रहाटी चालत च आली आहे. ३ नाहींसे होतात. ४ दुःखी व्हावें. ५ स्फुरणरूप.

नाभिस्थानीं परा वाचा । तो चि ठाव अंतःकर्णाचा ।
अंतःकर्णपचकाचा । निवाडा ऐसा ॥ ३ ॥
निर्विकल्प[1] जें स्फुरणें[2] । उगें च असतां आठवण ।
तें जाणावें अतःकर्ण । जाणतीकळा ॥ ४ ॥
अंतःकर्ण आठवलें । पुढें होये नव्हेसें गमलें ।
करूं न करूं ऐसें वाटलें । तें चि मन ॥ ५ ॥
संकल्प विकल्प तें चि मन । जेणेंकारितां अनुमान ।
पुढें निश्चयो तो जाण । रूप बुद्धीचें ॥ ६ ॥
करीन चि अथवा न करी । ऐसा निश्चयो चि करी ।
ते चि बुद्धि हे अंतरीं । विवेकें जाणावी ॥ ७ ॥
जे वस्तुचा निश्चयें केला । पुढें तें चि चिंतूं लागला ।
तें चित्त बोलिल्या बोला । येथार्थ मानावें ॥ ८ ॥
पुढें कार्याचा अभिमान धरणें । हें कार्य तों अगत्य करणें ।
ऐस्या कार्यास प्रवर्तणें । तो चि अहंकार ॥ ९ ॥
ऐसें अंतःकर्णपंचक । पंच वृत्ती मिळोन येक ।
कार्येभागें प्रकारपंचक । वेगळाले ॥ १० ॥
जैसे पांच हि प्राण । कार्येभागें वेगळालें जाण ।
नाहीं तरी वायोचें लक्षण । येक चि असे ॥ ११ ॥
सर्वांगीं व्यान नाभीं समान । कंठीं उदान गुदीं अपान ।
मुखीं नासिकीं प्राण । नेमस्त जाणावा ॥ १२ ॥
बोलिलें हें प्राणपंचक । आतां ज्ञानइंद्रियेंपंचक ।
श्रोत्र त्वचा चक्षु जिव्हा नासिक । ऐसीं हें ज्ञानेंद्रियें ॥ १३ ॥
वाचा पाणी पाद शिस्न गुद । हे कर्मइंद्रियें प्रसिद्ध ।
शब्द स्परुष रूप रस गंध । ऐसें हें विषयपंचक ॥ १४ ॥
अतःकर्ण प्राणपचक । ज्ञानेंद्रियें कर्मेंद्रियें पचक ।
पांचवें विषयपचक । ऐसीं हे पांच पचकें ॥ १५ ॥

---

१ "ल्पी" चें "ल्प" केलें आहे. २ शून्याकार वृत्ति असतां जें स्फुरण होतें तें.

ऐसे हे पंचविस गुण । मिळोन सूक्ष्म देह जाण ।
याचा कर्दम बोलिला श्रवण । केलें पाहिजे ॥ १६ ॥
अंतःकर्ण व्यान श्रवण वाचा । शब्दविषये आकाशाचा ।
पुढें विस्तार वायोचा । बोलिला असे ॥ १७ ॥
मन समान त्वचा पाणी । स्पर्श रूप हा पवनीं ।
ऐसे हे भडाखे साधुनी । कोठा करावा ॥ १८ ॥
बुद्धि.उदान नयेन चरण । रूपविषयाचें दर्शन ।
संकेतें बोलिलें मन । घालून पाहीजे ॥ १९ ॥
चित्त अपान जिव्हा शिस्न । रसविषये आप जाण ।
पुढें ऐका सावधान । पृथ्वीचें रूप ॥ २० ॥
अहंकार प्राण घ्राण । गुद गंधविषये जाण ।
ऐसें केलें निरूपण । शास्त्रमतें ॥ २१ ॥
ऐसा हा सूक्ष्म देहे । पाहातां होईजे निसंदेहे ।
येथें मन घालून पाहे । त्यासी च हें उमजे ॥ २२ ॥
ऐसें सूक्ष्म देहे बोलिलें । पुढें स्थूळ निरोपिलें ।
आकाश पंचगुणें वर्तलें । कैसें स्थुळीं ॥ २३ ॥
काम क्रोध शोक मोहो भये । हा पंचविध आकाशाचा अन्वये ।
पुढें पंचविध वायो । निरोपिला ॥ २४ ॥
चळण वळण प्रासारण । निरोध आणि अकोचन ।
हें पंचविध लक्षण । प्रभंजनाचें ॥ २५ ॥
क्षुधा त्रुषा आलस्य निद्रा मैथुन । हे तेजाचे पंचविध गुण ।
आतां पुढें आपलक्षण । निरोपिलें पाहिजे ॥ २६ ॥
शुक्लीत श्रोणीत लाळ मूत्र स्वेद । हा पंचविध आपाचा भेद ।
पुढें पृथ्वी विशद । केली पाहिजे ॥ २७ ॥

---

१ मिश्रण २ "जे" समासात आहे ३ ही ओवी समासात मागाहून लिहिली आहे परन्तु ओव्यांचे अंक बदलले नाहींत ४ सहज वाचून जर हा समास समजत नसला तर आपण वाचतां वाचतां कागदावर टाचण करून मननपूर्वक समजून घ्या अर्थ लावून पाहिल्यास या समासात अवघड कांही नाहीं असें वाटेल.

अस्ति मांष त्वचा नाडी रोम । हे पृथ्वीचे पंचविध धर्म ।
ऐसें स्थूळ देहाचें वर्म । बोलिलें असे ॥ २८ ॥
पृथ्वी आप तेज वायो आकाश । हे पांचाचे पंचविस ।
ऐसें मिळोन स्थूळ देहास । बोलिजेतें ॥ २९ ॥
तिसरा देह कारण अज्ञान । चौथा देह माहांकारण ज्ञान ।
हे च्यारी देह निर्शिता विज्ञान । परब्रह्म तें ॥ ३० ॥
विचारें चौंदेहावेगळें केलें । मीपण तत्वांसरिसें गेलें ।
अनन्य आत्मनिवेदन जालें । परब्रह्मीं ॥ ३१ ॥
विवेकें चुकला जन्म मृत्य । नरदेहीं साधिलें महत्कृत्य ।
भक्तियोगें कृत्यकृत्य । सार्थक जालें ॥ ३२ ॥
इति श्री पंचीकर्ण । केलें चि करावें विवर्ण ।
लोहाचें जालें सुवर्ण । परिसाचेनयोगें ॥ ३३ ॥
हा हि दृष्टांत घडेना । परिसाचेन परीस करवेना ।
शरण जातां साधुजना । साधु च होइजे ॥ ३४ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे तत्वनिरूपणनाम समास अष्टम ॥ ८ ॥

---

॥ श्रीराम ॥

स्थूळ सूक्ष्म कारण माहाकारण । ऐसे हे चत्वार देह जाण ।
जागृति स्वप्न सुषुप्ति पूर्ण । तुर्या जाणावी ॥ १ ॥
विश्व तैजस प्राज्ञ । प्रत्यगात्मा हे अभिमान ।
नेत्रस्थान कंठस्थान ह्रदयस्थान । मूर्धनी ते ॥ २ ॥
स्थूळभोग प्रविक्तभोग[1] । आनंदभोग आनंदावभासभोग ।
ऐसे हे चत्वार भोग । चौदेहाचे ॥ ३ ॥
अकार उकार मकार । अर्धमात्रा तो ईश्वर ।
ऐस्या मात्रा चत्वार । चौदेहाच्या ॥ ४ ॥

---

१ प्रविविक्त भोग, उ॥ विरहित भोग.

तमोगुण रजोगुण । सत्वगुण शुद्धसत्वगुण ।
ऐसे हे चत्वार गुण । चौंदेहाचे ॥ ५ ॥
क्रियाशक्ति द्रव्याशक्ती । इछाशक्ति ज्ञानशक्ती ।
ऐशा चत्वार शक्ती । चौंदेहाच्या ॥ ६ ॥
ऐसीं हे बत्तिस तत्वें । दोहींचीं पन्नास तत्वें ।
अवघीं मिळोन ब्यासि तत्वें । अज्ञान आणी ज्ञान ॥ ७ ॥
ऐसीं हे तत्वें जाणावीं । जाणोन माइक वोळखावीं ।
आपण साक्षी निरसावीं । येणें रितीं ॥ ८ ॥
साक्षी ह्मणिजे ज्ञान । ज्ञानें वोळखावें अज्ञान ।
ज्ञानाज्ञानाचें निर्शन । देहासरिसें ॥ ९ ॥
ब्रह्मादीं देह कल्पिले । विराट हिरण्यगर्भ बोलिले ।
ते हे विवेकें निर्शले । आत्मज्ञानें ॥ १० ॥
आत्मानात्माविवेक कारितां । सारासारविचार पाहातां ।
पंचभूताची माइक वार्ता । प्रचित आली ॥ ११ ॥
अस्ति मांष त्वचा नाडी रोम । हे पांच हि पृथ्वीचे गुणधर्म ।
प्रत्यक्ष शरीरीं हे वर्म । शोधून पाहावें ॥ १२ ॥
शुक्लीत श्रोणीत लाळ मूत्र स्वेद । हे आपाचे पंचकभेद ।
तत्वें समजोन विशद । करून घ्यावीं ॥ १३ ॥
क्षुधा त्रुषा आलस्य निद्रा मैथुन । हे पांच हि तेजाचे गुण ।
या तत्वांचें निरूपण । केलें चि करावें ॥ १४ ॥
चळण वळण प्रासारण । निरोध आणी आकोचन ।
हे पांच हि वायोचे गुण । श्रोतीं जाणावे ॥ १५ ॥
काम क्रोध शोक मोहो भये । हा आकाशाचा परियाये ।
हें विवरल्याविण कायें । समजों जाणे ॥ १६ ॥

---

१ हीं वर सांगितलेलीं बत्तीस तत्त्वें व मागच्या समासांत सांगितलेलीं स्थूल देहाचीं पंचवीस व सूक्ष्मदेहाचीं पंचवीस मिळून पन्नास; बत्तीस आणि पन्नास मिळून ब्यायशी. शिवाय अज्ञान आणि ज्ञान, ह्मणजे कारण व महाकारण देह.

असो ऐसें हें स्थूळ शरीर । पंचविस तत्वांचा विस्तार ।
आतां सूक्ष्मदेहाचा विचार । बोलिजेल ॥ १७ ॥
अंतःकर्ण मन बुद्धि चित्त अहंकार । आकाशपंचकाचा विचार ।
पुढें वायो निरोत्तर । होऊन ऐका ॥ १८ ॥
व्यान समान उदान । प्राण आणी अपान ।
ऐसे हे पांच हि गुण । वायोतत्वाचे ॥ १९ ॥
श्रोत्र त्वचा चक्षु जिव्हा घ्राण । हे पांच हि तेजाचे गुण ।
आतां आप सावधान । होऊन ऐका ॥ २० ॥
वाचा पाणी पाद शिस्न गुद । हे आपाचे गुण प्रसिद्ध ।
आतां पृथ्वी विशद । निरोपिली ॥ २१ ॥
शब्द स्पर्श रूप रस गंध । हे पृथ्वीचे गुण विशद ।
ऐसे हे पंचविस तत्वभेद । सूक्ष्म देहाचे ॥ २२ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे तनुचतुष्टयेनाम समास नवम ॥ ९ ॥

---

॥ श्रीराम ॥

आवर्णोदकीं हटकेश्वर । त्यास घडे नमस्कार ।
महिमा अत्यंत चि थोर । तया पाताळलिंगाचा ॥ १ ॥
परंतु तेथें जाववेना । शरीरें दर्शन घडेना ।
विवेकें आणावें अनुमाना । तया ईश्वरासी ॥ २ ॥
सातां समुद्राचे [1]वेडे । उदंड भूमि पैलिकडे ।
सेवटीं तुटले कडे । भूमंडळाचे ॥ ३ ॥
सात समुद्र वोलांडावे । तेथें जाणें कैसें फावे ।
म्हणोन विवेकी असावे । साधुजन ॥ ४ ॥
जें आपणांस नव्हे ठावें । तें जाणतयास पुसावें ।
मनोवेगें [2]तनें फिरावें । हें तों घडेना ॥ ५ ॥

---

१ वेढे. २ स्थूल देहानें.

जें चर्मदृष्टीस नव्हे ठावें । तें ज्ञानदृष्टीनें पाहावें ।
ब्रह्मांड विवरोन राहावें । समाधानें ॥ ६ ॥
मध्यें आहे भूमीचें[१] चडळ । ह्मणौन आकाश आणी पाताळ ।
तें चडळ नस्तां अतराळ । चहुंकडे ॥ ७ ॥
तयास परब्रह्म ह्मणावें । जें उपाधीवेगळें स्वभावें ।
जेथें दृश्यमायेच्या नावें । सुन्याकार ॥ ८ ॥
दृष्टीचें देखणें दृश्य । मनाचें देखणें भास ।
मनातीत निराभास । विवेकें जाणावें ॥ ९ ॥
दृश्य भास अवघा विघडे । विवेक तेथें पवाडे ।
भूमंडळीं ज्ञाते थोडे । सूक्ष्मदृष्टीचे ॥ १० ॥
वाच्यांश वाचेनें बोलावा । न बोलता लक्ष्यांश जाणावा ।
निर्गुण अनुभवास आणावा । गुणाचेनयोगें ॥ ११ ॥
नाना गुणास आहे नाश । निर्गुण तें अविनाश ।
ढोबळ्याहून[२] विशेष । सूक्ष्म देखणें ॥ १२ ॥
जें दृष्टीस न पडे ठावें । तें ऐकोन जाणावें ।
श्रवणमननें पडे ठावें । सकळ कांहीं ॥ १३ ॥
अष्टधेचे[३] जिनस नाना । उदंड पाहातां कळेना ।
अवघें सगट पिटींवेना[४] । कोणीयेकें ॥ १४ ॥
सगट सारिखी स्थिती जाली । तेथें परीक्षा च बुडाली ।
चविनेंटानें[५] कालविलीं । नाना अन्नें ॥ १५ ॥
टोणपा नव्हे गुणग्राहिक । मूर्खास कळेना विवेक ।
विवेक आणी अविवेक । येक चि ह्मणती ॥ १६ ॥
उंच नीच कळेना ज्याला । तेथें अभ्यास चि बुडाला ।
नाना अभ्यासें प्राणीयाला । सुटिका कैंची ॥ १७ ॥

---

१ तुकडा. २ स्थूलाहून सूक्ष्म दृष्टीचें देखणें विशेष आहे ३ अष्टधा प्रकृति जी माया तिचें हें सारें जगत् आहे. ४ ( लोहार जसा ऐरणीवर वाटेल तो पदार्थ पिटतो, तद्वत् ) सर्व पदार्थ सारखे च मानतां येत नाहीत. ५ ज्याला चव नाहीं त्यानें.

बेड लागोन जालें बोंगळ । त्यास सारिख च वाटे सकळ ।
तें जाणावें बाश्कळ । विवेकी नव्हेती ॥ १८ ॥
ज्यास अखंड होतो नाश । त्यासी च ह्मणती अविनाश ।
बहुचकीच्या लोकांस । काये ह्मणावें ॥ १९ ॥
ईश्वरें नाना भेद केले । भेदें सकळ सृष्टी चाले ।
आंधळे परीक्षवंत मिळाले । तेथें परीक्षा कैंची ॥ २० ॥
जेथें परीक्षेचा अभाव । तो टोणपा समुदाव ।
गुण चि नाहीं गौरव । येईल कैंचें ॥ २१ ॥
खरें खोटें येक चि जालें । विवेकानें काये केलें ।
असार सांडून सार घेतलें । साधुजनीं ॥ २२ ॥
उत्तम वस्तूची परीक्षा । कैसी घडे नतद्रक्षा ।
दीक्षाहीनापासीं दीक्षा । येईल कैंची ॥ २३ ॥
आपलेन बोंगळपणें । दिशा करून शौच्य नेणे ।
बेद शास्त्रें पुराणें । त्यास काये कारिती ॥ २४ ॥
आधीं राखावा आचार । मग पाहावा विचार ।
आचारविचारें पैलपार । पाविजेतो ॥ २५ ॥
जें नेमकास न कळे । तें बाश्कळास केवी कळे ।
डोळस ठकती आंधळे । कोण्या कामाचे ॥ २६ ॥
पापपुण्य स्वर्गनर्क । अवघें च मानिलें येक ।
विवेक आणी अविवेक । काये मानावें ॥ २७ ॥
अमृत विष येक ह्मणती । परी विष घेता प्राण जाती ।
कुकर्में होते फजिती । सत्कर्में कीर्ति वाढे ॥ २८ ॥
इहलोक आणि परलोक । जेथें नाहीं साकल्य विवेक ।
तेथें अवघें च निरर्थक । सकळ कांहीं ॥ २९ ॥
ह्मणौन संतसंगें चि जावें । सत्शास्त्र चि श्रवण करावें ।
उत्तम गुणास अभ्यासावें । नाना प्रयेत्नें ॥ ३० ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे टोणपसिद्धलक्षणनाम समास दशम ॥ १० ॥

## ॥ दशक अष्टादश बहुजिनसी ॥ १८ ॥

॥ श्रीरामसमर्थ ॥

तुज नमू गजवदना । तुझा महिमा कळेना ।
विद्या बुद्धि देसी जना । लाहानथोरासी ॥ १ ॥
तुज नमूं सरस्वती । च्यारी वाचा तुझेन स्फूर्ती ।
तुझें निजरूप जाणती । ऐसे थोडे ॥ २ ॥
धन्य धन्य चतुरानना । तां[1] केली सृष्टिरचना ।
वेद शास्त्रें भेद नाना । प्रगट केले ॥ ३ ॥
धन्य विष्णु पाळण करिसी । येकांशें सकळ जीवांसी ।
वाढविसी वर्तविसी । जाणजाणों ॥ ४ ॥
धन्य धन्य भोळाशंकर । जयाच्या देण्यास नाहीं पार ।
रामनाम निरंतर । जपत आहे ॥ ५ ॥
धन्य धन्य इद्रदेव । सकळ देवाचा हि देव ।
इंद्रलोकींचें वैभव । काये ह्मणोनि सांगावें ॥ ६ ॥
धन्य धन्य येमधर्म । सकळ जाणती धर्माधर्म ।
प्राणीमात्राचें वर्म । ठाईं पाडिती ॥ ७ ॥
वेंकटेसीं महिमा किती । भले उभ्यां अन्न खाती ।
वडे घिरडीं स्वाद घेती । अतळस[2] आपालांचा ॥ ८ ॥
धन्य तू वो बनशंकरी । उदंड शाखांचिया हारी ।
विवरविवरों भोजन करी । ऐसा कैंचा ॥ ९ ॥
धन्य भीम गोळागुळा । कोरवड्यांच्या उदंड माळा ।
दहि वडे खातां सकळां । समाधान होये ॥ १० ॥
धन्य तूं गा खंडेराया । भंडारें होये पिंवळी काया ।
कादेभरीत रोटगे खाया । सिद्ध होती ॥ ११ ॥

---

१ त्वां, तू २ परिमळ ( हंसकोश ), किंवा कोणी अतळस हें एक पक्वान्न आहे, असें ह्मणतात ३ पक्वान्नविशेष. ४ उडदाच्या पिठाच्या वड्यांच्या.

धन्य तुळजाभोवानी । भक्तां प्रसन्न होते जनीं ।
गुणवैभवास गुणी । ऐसा कैंचा ॥ १२ ॥
धन्य धन्य पांडुरंग । अखंड कथेचा होतो धिंग ।
तानमानें रागरंग । नाना प्रकारीं ॥ १३ ॥
धन्य तूं गा क्षत्रपाळा । उदंड जना लाविला चाळा ।
भावें भक्ति करितां फळा । वेळ नाहीं ॥ १४ ॥
रामकृष्णादिक अवतार । त्याचा महिमा अपार ।
उपासनेस बहुत नर । तत्पर जाले ॥ १५ ॥
सकळ देवाचें मूळ । तो हा अंतरात्मा चि केवळ ।
भूमंडळीं भोग सकळ । त्यासी च घडे ॥ १६ ॥
नाना देव होऊन बैसला । नाना शक्तिरूपें जाला ।
भोक्ता सकळ वैभवाला । तो चि येक ॥ १७ ॥
याचा पाहावा विचार । उदंड लांबला जोजार ।
होती जाती देव नर । किती ह्मणोनि ॥ १८ ॥
कीर्ति आणि अपकीर्ति । उदंड निंदा उदंड स्तुती ।
सर्वत्रांची भोगप्राप्ती । अंतरात्म्यासी च घडे ॥ १९ ॥
कोण देहीं काये करितो । कोण देहीं काये भोगितो ।
भोगी त्यागी वीतरागी तो । येक चि आत्मा ॥ २० ॥
प्राणी साभिमानें भुलले । देहाकडे पाहात गेले ।
मुख्य अंतरात्म्यास चुकले । अंतरीं असोनी ॥ २१ ॥
आरे या आत्मयाची चळवळ पाहे । ऐसा भूमंडळीं कोण आहे ।
अगाध पुण्यें अनुसंधान राहे । काहींयेक ॥ २२ ॥
त्या अनुसंधानासरिसें । जळोनी जाईजे किल्मिषें[1] ।
अंतरनिष्ठ ज्ञानी ऐसे । विवरोन पाहाती ॥ २३ ॥
अंतरनिष्ठ तितुके तरले । अंतरभ्रष्ट तितुके बुडाले ।
बाह्याकारें भरंगळले । लोकाचारें ॥ २४ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे बहुदेवस्थाननिरूपणनाम समास प्रथम ॥ १ ॥

---

१ किल्मिष, पाप.

॥ श्रीरामसमर्थ ॥

नेणपणें जालें तें जालें । जालें तें होऊन गेलें ।
जाणतेपणें वर्तलें । पाहिजे नेमस्त ॥ १ ॥
जाणत्याची संगती धरावी । जाणत्याची सेवा करावी ।
जाणत्याची सद्बुद्धि घ्यावी । हळुहळु ॥ २ ॥
जाणत्यापासीं लेहों सिकावें । जाणत्यापासीं वाचूं सिकावें ।
जाणत्यापासीं पुसावें । सकळ कांहीं ॥ ३ ॥
जाणत्यास करावा उपकार । जाणत्यास झिजवावें शरीर ।
जाणत्याचा पाहावा विचार । कैसा आहे ॥ ४ ॥
जाणत्याचे संगतीनें भजावें । जाणत्याचे संगतीनें झिजावें ।
जाणत्याचे संगतीनें रिझावें । विवरविवरों ॥ ५ ॥
जाणत्यापासीं गावें गाणें । जाणत्यापासीं वाजवणें ।
नाना आळाप सिकणें । जाणत्यापासीं ॥ ६ ॥
जाणत्याचे कासेसी लागावें । जाणत्याचें औषध घ्यावें ।
जाणता सांगेल तें करावें । पथ्य आधीं ॥ ७ ॥
जाणत्यापासीं परीक्षा सिकणें । जाणत्यापासीं तालिम करणें ।
जाणत्यापासीं पोहणें । अभ्यासावें ॥ ८ ॥
जाणता बोलेल तैसें बोलावें । जाणता सांगेल तैसें चालावें ।
जाणत्याचें[1] ध्यान घ्यावें । नाना प्रकारीं ॥ ९ ॥
जाणत्याच्या कथा सिकाव्या । जाणत्याच्या युक्ति समजाव्या ।
जाणत्याच्या गोष्टी विवराव्या । सकळ कांहीं ॥ १० ॥
जाणत्याचे पेंच जाणावे । जाणत्याचे पीळ उकलावे ।
जाणता राखेल तैसे राखावे । लोक राजी ॥ ११ ॥
जाणत्याचे जाणावे प्रसंग । जाणत्याचे घ्यावे रंग ।
जाणत्याचे स्फूर्तीचे तरंग । अभ्यासावे ॥ १२ ॥

---

१ जाणता जसें ध्यान करितो तसें.

जाणत्याचा साक्षेप घ्यावा । जाणत्याचा तर्क जाणावा ।
जाणत्याचा उल्लेख समजावा । न बोलतां चि ॥ १३ ॥
जाणत्याचें धूर्तपण । जाणत्याचें राजकारण[1] ।
जाणत्याचें निरूपण । ऐकत जावें ॥ १४ ॥
जाणत्याचीं कवित्वें सिकावीं । गद्यें पद्यें वोळखावीं ।
माधुर्यवचनें समजावीं । अंतर्यामीं ॥ १५ ॥
जाणत्याचे पाहावे प्रबंद । जाणत्याचे वचनभेद ।
जाणत्याचे नाना संवाद । बरे शोधावे ॥ १६ ॥
जाणत्याची तीक्ष्णता । जाणत्याची सहिष्णता ।
जाणत्याची उदारता । समजोन घ्यावी ॥ १७ ॥
जाणत्याची नाना कल्पना । जाणत्याची दीर्घ सूचना ।
जाणत्याची विवंचना । समजोन घ्यावी ॥ १८ ॥
जाणत्याचा काळ सार्थक । जाणत्याचा अध्यात्मविवेक ।
जाणत्याचे गुण अनेक । आवघे च घ्यावे ॥ १९ ॥
जाणत्याचा भक्तिमार्ग । जाणत्याचा वैराग्ययोग ।
जाणत्याचा अवघा प्रसंग । समजोन घ्यावा ॥ २० ॥
जाणत्याचें पाहावें ज्ञान । जाणत्याचें सिकावें ध्यान ।
जाणत्याचें सूक्ष्म चिन्हें । समजोन घ्यावें ॥ २१ ॥
जाणत्याचें अलिप्तपण । जाणत्याचें विदेहलक्षण ।
जाणत्याचें ब्रह्मविवरण । समजोन घ्यावें ॥ २२ ॥
जाणता येक अंतरात्मा । त्याचा काये सांगावा महिमा ।
विद्याकळागुणसीमा । कोणें करावी ॥ २३ ॥
परमेश्वराचे गुणानुवाद । अखंड करावा संवाद ।
तेणेंकरितां आनंद । उदंड होतो ॥ २४ ॥
परमेश्वरें निर्मिलें तें । अखंड दृष्टीस पडतें ।
दिवरविचरों समजावें तें । विवेकी जनीं ॥ २५ ॥

1 सूण, स्वरूप.

जितुकें कांहीं निर्माण जालें। तितुकें जगदेश्वरें निर्मिलें।
निर्माण वेगळे केलें। पाहिजे आधीं॥ २६॥
तो निर्माण कारितो जना। परी पाहों जातां दिसेना।
विवेकवळें अनुमाना। आणीत जावा॥ २७॥
त्याचें अखंड लागतां ध्यान। कृपाळुपणें देतो आशन।
सर्वकाळ संभाषण। तदाशें चि करावें॥ २८॥
ध्यान धरीना तो अभक्त। ध्यान धरील तो भक्त।
संसारापासुनी मुक्त। भक्तांस करी॥ २९॥
उपासनेचे सेवटीं। देवा भक्तां अखड भेटी।
अनुभवी जाणेल गोष्टी। प्रत्ययाची॥ ३०॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सर्वज्ञसंगनिरूपणनाम समास दुसरा॥२

---

॥ श्रीरामसमर्थ ॥

दुर्लभ शरीरीं दुर्लभ आयुष्य। याचा करूं नये नास।
दास ह्मणे सावकास। विवेक पाहावा॥ १॥
न पाहातां उत्तम विवेक। आवघा होतो अविवेक।
अविवेकें प्राणी रंक। ऐसा दिसे॥ २॥
हें आपलें आपण केलें। आळसें उदास नागविलें।
वाईट संगतीनें बुडविलें। देखतदेखता॥ ३॥
मूर्खपणाचा अभ्यास जाला। बाष्कळपणें घातला घाला।
काम चांडाळ उठिला। तरुणपणीं॥ ४॥
मूर्ख आळसी आणी तरुणा। सर्वांविषीं दैन्यवाणा।
कांहीं मिळेना कोणा। काये ह्मणावें॥ ५॥
जें जें पाहिजे तें तें नाहीं। अन्नवस्त्र तें हि नाहीं।
उत्तम गुण कांहीं च नाहीं। अंतर्यामीं॥ ६॥
बोलतां येना बैसतां येना। प्रसग कांहीं च कळेना।
शरीर मन हें वळेना। अभ्यासाकडे॥ ७॥

---

१ परमेश्वरानें निर्माण केलेल्या वस्तु वगळून परमेश्वराचें स्वरूप जाणलें पाहिजे.

लिहिणें नाहीं वाचणें नाहीं । पुसणें नाहीं सांगणें नाहीं ।
नेमस्तपणाचा अभ्यास नाहीं । बाष्कळपणें ॥ ८ ॥
आपणास कांहीं च येना । आणी सिकविले हि मानेना ।
आपण वेडा आणी सज्जना । बोल ठेवी ॥ ९ ॥
अंतरीं येक बाहेर येक । ऐसा जयाचा विवेक ।
परलोकाचें सार्थक । कैसें घडे ॥ १० ॥
आपला संसार नासला । मनामधें प्रस्तावला ।
तरी मग अभ्यास केला । पाहिजे विवेकाचा ॥ ११ ॥
येकाग्र करूनिया मन । बळें चि धरावें साधन ।
येत्नीं आळसाचें दर्शन । होऊ च नये ॥ १२ ॥
अवगुण अवघे चि सांडावे । उत्तम गुण अभ्यासावे ।
प्रबंद पाठ करीत जावे । जाड अर्थ ॥ १३ ॥
पदप्रबंद श्लोकप्रबंद । नाना धाटी मुद्रा छंद ।
प्रसंगज्ञानें चि आनंद होत आहे ॥ १४ ॥
कोणे प्रसंगीं काये ह्मणावें । ऐसें समजोन जाणावें ।
उगें चि वाउगें सिणावें । कासयासी ॥ १५ ॥
दुसऱ्याचें अंतर जाणावें । आदर देखोन ह्मणावें ।
जें आठवेल तें गावें । हें मूर्खपण ॥ १६ ॥
ज्याची जैसी उपासना । तें चि गावें चुकावेना ।
रागज्ञाना ताळज्ञाना । अभ्यासावें ॥ १७ ॥
साहित संगीत प्रसंग मानें । करावीं कथेचीं घेमशानें[1] ।
अर्थांतर श्रवणमननें । काढीत जावें ॥ १८ ॥
पाठ उदंड चि असावें । सर्वकाळ उजळीत जावें ।
सांगितलें गोष्टीचें असावें स्मरण अंतरीं ॥ १९ ॥

---

१ लयलूट.

[stamp]

अखंड येकांत सेवावा । ग्रन्थमात्र धांडोळावा ।
प्रचित येईल तो घ्यावा । अर्थ मनीं ॥ २० ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे निस्पृहसिकवणनिरूपणनाम समास ॥ ३॥

---

॥ श्रीरामसमर्थ ॥

देह्याकरितां गणेशपूजन । देह्याकरितां शारदावंदन ।
देह्यांकरितां गुरु सज्जन । संत श्रोते ॥ १ ॥
देह्याकरिता कवित्वें चालती । देह्याकरितां अधेनें करिती ।
देह्याकरितां अभ्यासिती । नाना विद्या ॥ २ ॥
देह्याकरितां ग्रंथलेखन । नाना लिपीवोळखण ।
नाना पदार्थशोधन । देह्याकरिता ॥ ३ ॥
देह्याकरितां माहांज्ञानी । सिद्ध साधु ऋषी मुनी ।
देह्याकरितां तीर्थाटणीं । फिरती प्राणी ॥ ४ ॥
देह्याकरिता श्रवण घडे । देह्याकरिता मननीं पवाडे ।
देह्याकरितां देहीं आतुडे । मुख्य परमात्मा ॥ ५ ॥
देह्याकरितां कर्ममार्ग । देह्याकरितां उपासनामार्ग ।
देह्याकरितां ज्ञानमार्ग । भूमंडळीं ॥ ६ ॥
योगी वीतरागी तापसी । देह्याकरितां नाना सायासी ।
देह्याकरिता आत्मयासी । प्रगटणें घडे ॥ ७ ॥
येहलोक आणी परलोक । देह्याकरितां सकळ सार्थक ।
देहेंविण निरार्थक । सकळ कांहीं ॥ ८ ॥
पुन्हश्चणें अनुष्ठानें । गोरांजनें धूम्रपानें ।
सीतोष्ण पंचाग्नी साधणें । देह्याकरितां ॥ ९ ॥
देह्याकरितां पुण्यसीळ । देह्याकरितां पापी केवळ ।
देह्याकरिता अनर्गळ । सुचिस्मंत ॥ १० ॥

---

१ देह्याकरिता, देह आहे ह्मणून. २ अध्ययन.

देह्याकरितां अवतारी । देह्याकरितां वेषधारी ।
नाना बंडें पाषाडें करी । देह्याकरितां ॥ ११ ॥
देह्याकरितां विषयभोग । देह्याकरितां सकळ त्याग ।
होती जाती नाना रोग । देह्याकरितां ॥ १२ ॥
देह्याकरितां नवविधा भक्ती । देह्याकरितां चतुर्विधा मुक्ती ।
देह्याकरितां नाना युक्ती । नाना मतें ॥ १३ ॥
देह्याकरितां दांनधर्म । देह्याकरिता नाना वर्म ।
देह्याकरितां पूर्वकर्म । ह्मणती जनीं ॥ १४ ॥
देह्याकरितां नाना स्वार्थ । देह्याकरितां नाना अर्थ ।
देह्याकरितां होईजे वेर्थ । आणी धन्य ॥ १५ ॥
देह्याकरिता नाना कळा । देह्याकरितां उणा आगळा ।
देह्याकरितां जिव्हाळा । भक्तिमार्गाचा ॥ १६ ॥
नाना सन्मार्गसाधनें । देह्याकरितां तुटतीं बंधनें ।
देह्याकरितां निवेदनें । मोक्ष लाभे ॥ १७ ॥
देहे सकळामधें उत्तमु । देहीं राहिला आत्मारामु ।
सकळां घटीं पुरुषोत्तमु । विवेकी जाणती ॥ १८ ॥
देह्याकरितां नाना कीर्ती । अथवा नाना अपकीर्ती ।
देह्याकरितां होती जाती । अवतारमाळिका ॥ १९ ॥
देह्याकरितां नाना भ्रम । देह्याकरिता नाना संभ्रम ।
देह्याचेन उत्तमोत्तम । भोगिती पदें ॥ २० ॥
देह्याकरितां सकळ काहीं । देह्याविण काहीं नाहीं ।
आत्मा विरे ठाईं ठाईं । नव्हता च जैसा ॥ २१ ॥
देहे परलोकींचें तारूं । नाना गुणांचा गुणागरु ।
नाना रत्नाचा विचारु । देह्याचेनी । ॥ २२ ॥
देह्याचेन गायेनकळा । देह्याचेन संगीतकळा ।
देह्याचेन अंतर्कळा । ठाईं पडे ॥ २३ ॥

---

१ आत्मा जेथल्या तेथें नाहींसा होऊन जातो.

देहे ब्रह्मांडाचें फळ । देहे दुल्लभ चि केवळ ॥
परी या देह्यास निवळ । उमजवावें ॥ २४ ॥
देह्याकारितां लाहानथोर । करिती आपुलाले व्यापार ।
त्याहिमधें लाहानथोर । कितीयेक ॥ २५ ॥
जे जे देहे धरुनी आले । ते ते कांहीं करून गेले ।
हरिभजनें पावन जाले । कितीयेक ॥ २६ ॥
अष्टधा प्रकृतीचें मूळ । सकल्परूप चि केवळ ।
नाना संकल्पें देहेफळ । घेऊन आलें ॥ २७ ॥
हरिसकल्प मुळीं होता । तो चि फळीं पाहावा आतां ।
नाना देह्यांतरीं तत्वता । शोधितां कळे ॥ २८ ॥
वेलाचे मुळीं बीज । उदकरूप वेली समज ।
पुढें फळामधें बीज । मुळींच्या अंशें ॥ २९ ॥
मुळाकरिता फळ येतें । फळाकरितां मूळ होतें ।
येणेंकरिता होत जातें । भूमंडळ ॥ ३० ॥
असो काहीं येक करणें । कैसें घडे देह्याविणें ।
देहे सार्थकीं लावणें । ह्मणिजे बरें ॥ ३१ ॥
आत्म्याकरितां देहे जाला । देह्याकरितां आत्मा तगला ।
उभययोगें उदंड चालिला । कार्यभाग ॥ ३२ ॥
चोरून गुसरूपें करावें । तें आत्मयासी पडे ठावें ।
कर्तुत्व याचेन स्वभावें । सकळ कांहीं ॥ ३३ ॥
देह्यामधें आत्मा असतो । देहे पूजितां आत्मा तोषतो ।
देहे पीडितां आत्मा क्षोभतो । प्रतक्ष आतां ॥ ३४ ॥
देह्यावेगळी पूजा पावेना । देह्याविण पूजा फावेना ।
जनीं जनार्दन ह्मणोनी जना । सतुष्ट करावें ॥ ३५ ॥
उदंड प्रगटला विचार । धर्मस्थापना तदनंतर ।
तेथें च पूजेस अधिकार । पुण्यशरीरीं ॥ ३६ ॥

सगट भजन करूं येतें । तरी मूर्खपण आगीं लागतें ।
गाढवासी पूजितां कळतें । काये त्याला ॥ ३७ ॥
पूज्य पूजेसी अधिकार । उगे चि तोषवावे इतर ।
दुखऊं नये कोणाचें अंतर । ह्मणिजे बरें ॥ ३८ ॥
सकळ जगदांतरींचा देव । क्षोभतां राहाव्या कोठें ठाव ।
जनावेगळा जनास उपाव । आणीक नाहीं ॥ ३९ ॥
परमेश्वराचे अनंत गुण । मनुष्यें काये सागावी खूण ।
परंतु अध्यात्मग्रंथश्रवण । होतां उमजे ॥ ४० ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे देहेदुल्लभनिरूपणनाम समास चौथा ॥४॥

---

॥ श्रीरामसमर्थ ॥

धान्य उदंड मोजिलें । परी त्या मापें नाहीं भक्षिलें ।
विवरल्याविण तैसें जालें । प्राणीमात्रासी ॥ १ ॥
पाठ ह्मणतां आवरेना । पुसतां कांहीं च कळेना ।
अनुभव पाहातां अनुमाना-। मधें पडे ॥ २ ॥
शब्दरत्नें परीक्षावीं । प्रत्ययाचीं पाहोन घ्यावीं ।
येर ते अवघीं सांडावीं । येकीकडे ॥ ३ ॥
नावरूप आवघें सांडावें । मग अनुभवास मांडावें ।
सार असार येक चि करावें । हें मूर्खपण ॥ ४ ॥
लेखकें कुळ समजवावें । किंवा उगें च वाचावें ।
येणें दृष्टांतें समजावें । कोणींतरी ॥ ५ ॥
जेथें नाहीं समजावीस । तेथें आवघी कुसमुस ।
पुसों जातां वसवस । वक्ता करी ॥ ६ ॥
नाना शब्द येकवटिले । प्रचीतीवीण उपाव केले ।
परी ते अवघे चि वेर्थ गेले । फडप्रसंगीं ॥ ७ ॥

---

१ सरसकट भजनपूजन केलें असतां. २ कुल, सर्व कांहीं, परंतु हंसकोशकारांनीं ' अर्थज्ञान ' असा अर्थ दिला आहे. ३ समुदायामध्यें, आणीबाणीच्या वेळेला.

पसेवरी वैरण घातलें । तातडीनें जातें वेडिलें ।
तेणें पीठ बारिक आलें । हें तों घडेना ॥ ८ ॥
घांसामागें घांस घातला । आवकाश नाहीं चावायाला ।
अवघा बोकणा भरिला । पुढें कैसें ॥ ९ ॥
ऐका फडनिसीचें[1] लक्षण । विरंगे[2] जाऊं नेदी क्षण ।
समस्तांचें अंत:कर्ण । सांभाळीत जावें ॥ १० ॥
सूक्ष्म.नामें सुखें ध्यावीं । तितुकीं रूपें वोळखावीं ।
वोळखोन समजवावीं । श्रोतयांसी ॥ ११ ॥
समशा[3] पुरता सुखी होती । श्रोते अवघे आनंदती ।
अवघे क्षणक्षणा वंदिती । गोसावियांसी ॥ १२ ॥
समशा पुरतां वंदिती । समशा न पुरतां निंदिती ।
गोसांवी चिणचिण करिती । कोण्या हिशेबें ॥ १३ ॥
शुध सोनें पाहोन घ्यावें । कसीं लाउनी तावावें ।
श्रवणमननें जाणावें । प्रत्ययासी ॥ १४ ॥
वैद्याची प्रचित येना । वेथा परती होयेना ।
आणी रागेजावें जना । कोण्या हिशेबें ॥ १५ ॥
खोटें कोठें चि चालेना । खोटें कोणास मानेना ।
याकारणें अनुमाना । खरें आणावें ॥ १६ ॥
लिहिणें न येतां व्यापार केला । कांहीं येक दिवस चालिला
पुसता सुरनीस[4] भेटला । तेव्हां खोटें ॥ १७ ॥
सर्व आवघें हिशेबीं ठावें । प्रत्यय साक्षीनें बोलावें ।
मग सुरनीसें काये करावें । सांगाना कां ॥ १८ ॥
स्वयें आपण चि गुंते । समजावीस कैसी होते ।
नेणतां कोणीयेक ते । आपदों[5] लागती ॥ १९ ॥

---

१ राज्याचा हिशेब ठेवणारा असा अर्थ कोणी करितात किंवा कोणी फडप्रसगीं ज्याचें अंग असतें तो, असा अर्थ करितात. २ रिकामा किंवा लोकरंजनाशिवाय. ३ समस्या, चवथा चरण घालून श्लोक पुरा करण्याकरितां दिलेले पहिले तीन चरण, शंका. ४ हिशेब तपासणारा. ५ कष्टी होतात.

बळेंविण युध्यास गेला । तो सर्वस्वें नागवला ।
शब्द ठेवावा कोणाला । कोण कैसा ॥ २० ॥
जें प्रचीतीस आलें खरें । तें चि ध्यावें अत्यादरें ।
अनुभवेंविण जें उत्तरें । तें फलकटें जाणावीं ॥ २१ ॥
सिकऊं जातां राग चढे । परंतु पुढें ओंदळ घडे ।
खोटा निश्चय तात्काळ उडे । लोकामधें ॥ २२ ॥
खरें सांडुनी खोटें घेणें । भंकाधेस काये उणें ।
त्रिभुवनीं नारायणें । न्याय केला ॥ २३ ॥
तो न्याय सांडितां सेवटीं । अवघें जग चि लागे पाठीं [redacted]
जनीं भांडभांडों हिंपुटी । किती व्हावें ॥ २४ ॥
अन्यायें बहुतांस पुरवलें । हें देखिलें ना ऐकिलें ।
वेडें उगें चि भरीं भरलें । असत्याचे ॥ २५ ॥
असत्य ह्मणिजे तें चि पाप । सत्य जाणावें स्वरूप ।
दोहींमधें साक्षप । कोणाचा करावा ॥ २६ ॥
मायेमधें बोलणें चालणें साचें । माया नस्तां बोलणें कैंचें ।
याकारणें निशब्दाचें । मूळ शोधावें ॥ २७ ॥
वाच्यांश जाणोनी सांडावा । लक्ष्यांश विवरोन ध्यावा ।
याकारणें निशब्द मुळाचा गोवा । आडेंळेना ॥ २८ ॥
अष्टधा प्रकृती पूर्वपक्ष । साडून अलक्षीं लावावें लक्ष ।
मननसीळ परम दक्ष । तो चि जाणे ॥ २९ ॥
नाना भूस आणि कण । येक चि ह्मणणें अप्रमाण ।
रस चोवडिया कोण । शाहाणा सेवी ॥ ३० ॥
पिंडीं नित्यानित्य विवेक । ब्रह्मांडीं सारासार अनेक ।
सकळ शोधूनियां येक । सार घ्यावें ॥ ३१ ॥

१ अहल. २ बहकावण्यास. ३ नारायणानें न्याय, नीति करून ठेविली आहे तिच्याप्रमाणें वर्तावें. ४ लक्ष्यांश घेतल्यावर शब्दातीत जें परब्रह्म त्याचा घोटाळा पडत नाहीं. ५ रस आणि चोइट्या एक च समजुन कोण शहाणा रस टाकून चोइट्या सेवील ?

मायेकरितां कोणीयेक । अन्वय आणि वीतरेक ।
ते माया नस्तां विवेक । कैसा करावा ॥ ३२ ॥
तत्वें तत्व सर्व शोधावें । माहांवांकीं[1] प्रवेशावें ।
आत्मनिवेदनें पावावें । समाधान ॥ ३३ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे करटपरीक्षानिरूपणनाम समास पांचवा॥५॥

---

॥ श्रीरामसमर्थ ॥[2]

नाना वस्त्रें नाना भूषणें । येणें शरीर श्रृंघारणें ।
विवेकें विचारें राजकारणें । अंतर श्रृंघारिजे ॥ १ ॥
शरीर सुंदर सतेज । वस्त्रें भूषणें केलें सज्ज ।
अंतरीं नस्तां च्यातुर्यबीज । कदापी शोभा न पवे ॥ २ ॥
तुंड हेंकाड कठोरवचनी । अखंड तोले साभिमानी ।
न्याय नीति अंत:कर्णीं । घेणार नाहीं ॥ ३ ॥
तऱ्हे सीघ्रकोपी सदा । कदापि न धरी मर्यादा ।
राजकारण संवादा । मिळों चि नेणे ॥ ४ ॥
ऐसे लौंद बेइमानी । कदापि सत्य नाहीं वचनीं ।
पापी अपस्मार जनीं । राक्षेस जाणावे ॥ ५ ॥
समयासारिखा समयो येना । नेम सहसा चालेना ।
नेम धरिता राजकारणा । अंतर पडे ॥ ६ ॥
अति सर्वत्र वर्जावें । प्रसग पाहोन चालावें ।
हटनिग्रहीं न पडावें । विवेकी पुरुषें ॥ ७ ॥
बहुत चि करितां हट । तेथें येऊन पडिले तट ।
कोणीयेकाचा सेवट । जाला पाहिजे ॥ ८ ॥
बरें ईश्वर आहे साभिमानी । विशेष तुळजाभोवानी ।
परंतु विचार पाहोनी । कार्य करणें ॥ ९ ॥

---

१ महावाक्यीं. २ अफझुलखानाचा वध करून महाराज श्रीसमर्थांच्या दर्शनास आले असतां हा समास सांगितला.

अखंड चि सावधाना । बहुत काये करावी सूचना ।
परंतु कांहीं येक अनुमाना । आणिलें पाहिजे ॥ १० ॥[1]
समर्थापासीं बहुत जन । राहिला पाहिजे साभिमान ।
निश्चळ करूनियां मन । लोक असती ॥ ११ ॥
म्लेंच्छ दुर्जन उदंड । बहुतां दिसाचें माजलें बंड ।
याकारणें अखंड । सावधान असावें ॥ १२ ॥
सकळकर्ता तो ईश्वरु । तेणें केला आंगिकारु ।
तया पुरुषाचा विचारु । विरुळा जाणे ॥ १३ ॥
न्याय नीति विवेक विचार । नाना प्रसंगप्रकार ।
परीक्षिणें परांतर । देणें ईश्वराचें ॥ १४ ॥
माहायेत्न सावधपणें । समईं धारिष्ट धरणें ।
अद्भुत चि कार्य करणें । देणें ईश्वराचें ॥ १५ ॥
येश कीर्ती प्रताप महिमा । उत्तम गुणासी नाहीं सीमा ।
नाहीं दुसरी उपमा । देणें ईश्वराचें ॥ १६ ॥
देव ब्राह्मण आचार विचार । कितेक जनासी आधार ।
सदा घडे परोपकार । देणें ईश्वराचें ॥ १७ ॥
येहलोक परलोक पाहाणें । अखंड सावधपणें राहाणें ।
बहुत जनाचें साहाणें । देणें ईश्वराचें ॥ १८ ॥
देवाचा कैपक्ष घेणें । ब्राह्मणाची चिंता वाहाणें ।
बहु जनासी पाळणें । देणें ईश्वराचें ॥ १९ ॥
धर्मस्थापनेचे नर । ते ईश्वराचे अवतार ।
जाले आहेत पुढें होणार । देणें ईश्वराचें ॥ २० ॥
उत्तम गुणाचा ग्राहिक । तर्क तीक्षण विवेक ।
धर्मवासना पुण्यश्लोक । देणें ईश्वराचें ॥ २१ ॥

---

१ हें विशेषण निःसंशय शिवाजीराजांना अनुलक्षून आहे. सबंध समास च याची साक्ष देत आहे.

सकळ गुणांमधें सार । तजविजा विवेक विचार ।
जेणें पाविजे पैलपार । अरत्रपरत्रींचा ॥ २२ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे उत्तमपुरुषनिरूपणनाम समास साहावा॥६

---

॥ श्रीरामसमर्थ ॥

जनाचा लालचा स्वभाव । आरंभीं च ह्मणती देव ।
ह्मणिजे मला कांहीं देवें[1] । ऐसी वासना ॥ १ ॥
कांहीं च भक्ती केली नस्ता । आणी इछिती प्रसन्नता ।
जैसें कांहीं च सेवा न करितां । स्वामीस मागती ॥ २ ॥
कष्टेंविण फळ नाहीं । कष्टेंविण राज्य नाहीं ।
केल्याविण होत नाहीं । साध्य जनीं ॥ ३ ॥
आळसें काम नासतें । हें तों प्रत्ययास येतें ।
कष्टाकडे चुकावितें । हीन जन ॥ ४ ॥
आधीं कष्टाचें दुःख सोसिती । ते पुढें सुखाचें फळ भोगिती ।
आधीं आळसें सुखावती । त्यासी पुढें दुःख ॥ ५ ॥
येहलोक अथवा परलोक । दोहिंकडे सारिखा चि विवेक ।
दीर्घ सूचनेचें कौतुक । कळलें पाहिजे ॥ ६ ॥
मेळविती तितुकें भक्षिती । ते कठीण काळीं मरोन जाती ।
दीर्घ सूचनेनें वर्तती । ते चि भले ॥ ७ ॥
येहलोकींचा संचितार्थ । परलोकींचा परमार्थ ।
संचितेंविण वेर्थ । जीत मेलें ॥ ८ ॥
येकदां मेल्यानें सुटेना । पुन्हा जन्मोजन्मीं यातना ।
आपणास मारी वांचविना । तो आत्महत्यारा ॥ ९ ॥
प्रतिजन्मीं आत्मघात । कोणें करावें गणीत ।
याकारणें जन्ममृत्य । केवीं चुके ॥ १० ॥

---

१ देवो.

देव सकळ कांहीं करितो । ऐसें प्राणिमात्र बोलतो ।
त्याचे भेटीचा लाभ तो । अकस्मात जाला ॥ ११ ॥
विवेकाचा लाभ घडे । जेणें परमात्मा ठाईं पडे ।
विवेक पाहाता सांपडे । विवेकी जनीं ॥ १२ ॥
देव पाहातां आहे येक । परंतु करितो अनेक ।
त्या अनेकास येक । ह्मणों नये कीं ॥ १३ ॥
देवाचें कर्तुत्व आणि देव । कळला पाहिजे अभिप्राव ।
कळल्याविण कितेक जीव । उगे च बोलती ॥ १४ ॥
उगे च बोलती मूर्खपणें । शाहाणपण वाढायाकारणें ।
तृप्तिलागीं[1] उपाव करणें । ऐसें जालें ॥ १५ ॥
जेहीं उदंड कष्ट केले । ते भाग्य भोगून ठेले ।
येर ते बोलत चि राहिले । करटे जन ॥ १६ ॥
करंट्याचें करट लक्षण । समजोन जाती विचक्षण ।
भल्याचें उत्तम लक्षण । करंट्यास कळेना ॥ १७ ॥
त्याची पैसावली कुबुद्धी । तेथें कैंची असेल शुद्धी ।
कुबुद्धी ते चि सुबुद्धी । ऐसी वाटे ॥ १८ ॥
मनुष्य[2] शुद्धीस सांडावें । त्याचें काये खरें मानावें ।
जेथें विचाराच्या नावें । सुन्याकार ॥ १९ ॥
विचारें यहलोक परलोक । विचारें होतसे सार्थक ।
विचारें नित्यानित्य विवेक । पाहिला पाहिजे ॥ २० ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे जनस्वभावनिरूपणनाम समास सातवा ॥ ७ ॥

---

॥ श्रीरामसमर्थ ॥

ब्रह्म निराकार निश्चळ । आत्म्यास[3] विकार चंचळ ।
तयास ह्मणती सकळ । देव ऐसें ॥ १ ॥

---

१ भोजन झाल्यावर तृप्ती सहज होते, तृप्तीसाठीं कांहीं निराळा उपाय करावा लागत नाहीं. तद्वत् शहाणपण जगात मिरवावें लागत नाहीं. २ मनुष्यानें. ३ " आत्मा सविकार " असा पाठ प्रथम होता.

देवाचा ठाव चि लागेना । येक देव नेमस्त कळेना ।
बहुत देवीं अनुमानेना । येक देव ॥ २ ॥
ह्मणोनी विचार असावा । विचारें देव शोधावा ।
बहुत देवांचा गोवा । पडों चि नये ॥ ३ ॥
देव क्षेत्रीं पाहिला । त्यासारिखा धातूचा केला ।
पृथ्वीमधें दंडक चालिला । येणें रीतीं ॥ ४ ॥
नाना प्रतिमादेवांचें मूळ । तो हा क्षत्रदेव चि केवळ ।
नाना क्षेत्रें भूमंडळ । शोधून पाहावें ॥ ५ ॥
क्षत्रदेव पाषाणाचा । विचार पाहातां तयाचा ।
तंत लागला मुळाचा । अवताराकडे ॥ ६ ॥
अवतारी देव संपले । देहे धरुनी वेर्तोन गेले ।
त्याहून थोर अनुमानले । ब्रह्मा विष्णु महेश ॥ ७ ॥
त्या तिही देवांस ज्याची सत्ता । तो अंतरात्मा चि पाहाता ।
कर्ता भोक्ता तत्वता । प्रतक्ष आहे ॥ ८ ॥
युगानयुगें तिन्ही लोक । येक चि चालवी अनेक ।
हा निश्चयाचा विवेक । वेदशास्त्रीं पाहावा ॥ ९ ॥
आत्मा वर्तवितो शरीर । तो चि देव उत्तरोत्तर ।
जाणीवरूपें कळिवर । विवेकें वर्तवी ॥ १० ॥
तो अतर्देव चुकती । धांवा घेऊन तीर्था जाती ।
प्राणी बापुडे कष्टती । देवास नेणतां ॥ ११ ॥
मग विचारिती अतःकर्णीं । जेथें तेथें धोंडा पाणी ।
उगें चि वणवण हिंडोनि । काये होतें ॥ १२ ॥
ऐसा ज्यासी विचार कळला । तेणें सत्संग धरिला ।
सत्संगें देव सांपडला । बहुत जनासी ॥ १३ ॥
ऐसीं हे विवेकाचीं कामें । विवेकी जाणतील नेमें ।
अविवेकी भुल्ले भ्रमें । त्यास हें कळेना ॥ १४ ॥

---

१ क्षेत्रीं २ "वर्ती लागले" असा पाठ प्रथम होता

अंतरवेधी अंतर जाणे । बाहेरमुद्रा कांहीं च नेणे ।
ह्मणोन विवेकी शाहाणे । अंतर शोधिती ॥ १५ ॥
विवेकेंविण जो भाव । तो भाव चि अभाव ।
मूर्खस्य प्रतिमा देव । ऐसें वचन ॥ १६ ॥
पाहात समजत सेवटा गेला । तो चि विवेकी भला ।
तत्वें साडुनी पावला । निरंजनीं ॥ १७ ॥
आरे जें आकारासी येतें । तें अवघें च नासोन जातें ।
मग गल्बल्यावेगळें तें । परब्रह्म जाणावें ॥ १८ ॥
चंचळ देव निश्चळ ब्रह्म । परब्रह्मीं नाहीं भ्रम ।
प्रत्ययज्ञानें निभ्रम । होईजेतें ॥ १९ ॥
प्रचीतीविण जें केलें । तें तें अवघें वेर्थ गेलें ।
प्राणी कष्टकष्टों चि मेले । कर्मकचाटें ॥ २० ॥
कर्मावेगळें न व्हावें । तरी देवास कासया भजावें ।
विवेकी जाणती स्वभावें । मूर्ख नेणे ॥ २१ ॥
कांहीं अनुमानलें विचारें । देव आहे जगदांतरें ।
सगुणाकारितां निर्धारें । निर्गुण पाविजे ॥ २२ ॥
सगुण पाहाता मुळास गेला । सहज चि निर्गुण पावला ।
संगत्यागें मोकळा जाला । वस्तुरूप ॥ २३ ॥
परमेश्वरीं अनुसंधान । लाविता होईजे पावन ।
मुख्य ज्ञानें चि विज्ञान । पाविजेतें ॥ २४ ॥
ऐसीं हे विवेकाचीं विवरणें । पाहावीं सुचित अंतःकर्णे ।
नित्यानित्यविवेकश्रवणें । जगदोधार ॥ २५ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे अंतर्देवनिरूपणनाम समास आठवा ॥ ८ ॥

---

॥ श्रीरामसमर्थ ॥

वंदूनिया आदिपुरुष । बोलों निद्रेचा विळास ।
निद्रा आलियां सावकास । जाणार नाहीं ॥ १ ॥

निद्रेनें व्यापिली काया । आळस आग मोडे जाभया ।
तेणेंकरिता बैसावया । धीर नाहीं ॥ २ ॥
कडकडा जाभया येती । चटचटां चटक्या वाजती ।
डकडका डुकल्या देती । सावकास ॥ ३ ॥
येकाचे डोळे झाकती । येकाचे डोळे लागती ।
येक ते वचकोन पाहाती । चहुंकडे ॥ ४ ॥
येक उलथोन पडिले । तिहीं ब्रह्मविणे फोडिले ।
डुडकांचे टुकडे जाले । सुधी नाहीं ॥ ५ ॥
येक टेंकोन बैसले । तेथें चि घोरों लागले ।
येक उताणे पसरले । सावकास ॥ ६ ॥
कोणी मुकुंडी घालिती । कोणी कानवडें निजती ।
कोणी चक्रीं फिरती । चहुंकडे ॥ ७ ॥
येक हात हालविती । येक पाये हालविती ।
येक दात खाती । कर्कराटें ॥ ८ ॥
येकाचीं वस्त्रें निघोनि गेलीं । ते नागवीं च लोळों लागलीं ।
येकाचीं मुडासीं गडबडिलीं । चहुंकडे ॥ ९ ॥
येक निजेलीं अव्यावेस्तें । येक दिसती जैसीं प्रेतें ।
दांत पसरुनी जैसीं भूतें । वाईट दिसती ॥ १० ॥
येक वोसणत चि उठिले । येक अधारीं फिरों लागले ।
येक जाऊन निजेले । उकरड्यावरी ॥ ११ ॥
येक मडकीं उतरिती । येक भोई चाचपती ।
येक उठोन वाटा लागती । भलतीकडे ॥ १२ ॥
येक प्राणी वोसणाती । येक फुदफुंदों रडती ।
येक खदखदां हांसती । सावकास ॥ १३ ॥

१ वाद्यविशेष. २ शुद्धि.

येक हाका मारूं लागले । येक बोंबलित उठिले ।
येक वचकोन राहिले । आपुले ठाईं ॥ १४ ॥
येक क्षणक्षणा खुरडती । येक डोई खाजविती ।
येक कंढों[1] लागती । सावकास ॥ १५ ॥
येकाच्या लाळा गळाल्या । येकाच्या पिका सांडल्या ।
येकीं लघुशंका केल्या । सावकाश ॥ १६ ॥
येक राउतें सोडिती[2] । येक कर्पट ढेंकर देती ।
येक खांकरुनी थुंकिती । भलतीकडे ॥ १७ ॥
येक हागती येक वोकिती । येक खोंकिती येक सिंकिती
येक ते पाणी मागती । निदसुऱ्या स्वरें ॥ १८ ॥
येक दुस्वप्में निर्बुजले । येक सुस्वप्में संतोषले ।
येक ते गाढमुद्रीं पडिले । सुषुप्तिमधें ॥ १९ ॥
इकडे उजेडाया जालें । कोण्हीं पढणें आरंभिलें ।
कोणीं प्रातस्मरामि मांडिलें । हरिकीर्तन ॥ २० ॥
कोणीं आठविल्या ध्यानमूर्ति । कोणी येकांतीं जप करिती ।
कोणी पाठांतर उजळिती । नाना प्रकारें ॥ २१ ॥
नाना विद्या नाना कळा । आपलाल्या सिकती सकळा ।
तानमानें गायेनकळा । येक गाती ॥ २२ ॥
मार्गें निद्रा संपली । पुढें जागृति प्राप्त जाली ।
वेवसाईं बुद्धि आपुली । प्रेरिते जाले ॥ २३ ॥
ज्ञाता तत्वें साडून पळाला । तुर्येपैलिकडे गेला ।
आत्मनिवेदनें जाला । ब्रह्मरूप ॥ २४ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे निद्रानिरूपणनाम समास नवम ॥ ९ ॥

---

१ कण्हूं. २ अपान वायु.

॥ श्रीरामसमर्थ ॥

कोणीयेका कार्याचा साक्षेप । कांहीं तऱ्ही घडे विक्षेप ।
काळ साहे तें आपेंआप । होत जातें ॥ १ ॥
कार्यभाग होत चालिला । तेणें प्राणी शोकें जाला ।
विचार हि सुचों लागला । दिवसेंदिवस ॥ २ ॥
कोणीयेक प्राणी जन्मासी येतो । कांहीं तऱ्ही काळ साहे होतो ।
दुःखाउपरी सुख देतो । देव कृपाळुपणें ॥ ३ ॥
अवघा चि काळ जरी सजे । तरी अवघे चि होती राजे ।
कांहीं सजे कांहीं न सजे । ऐसें आहे ॥ ४ ॥
येहलोक अथवा परलोक । साधता कोणीयेक विवेक ।
अद्भुत होये स्वभाविक । देणें ईश्वराचें ॥ ५ ॥
ऐकिल्याविण कळलें । सिकविल्याविण शाहाणपण आलें ।
देखिलें ना ऐकिलें । भूमंडळीं ॥ ६ ॥
सकळ कांहीं ऐकतां कळे । कळता कळतां वृत्ति निवळे ।
नेमस्त मनामधें आकळे । सारासार ॥ ७ ॥
श्रवण ह्मणिजे ऐकावें । मनन ह्मणिजे मनीं धरावें ।
येणें उपायें स्वभावें । त्रयलोक्य चाले ॥ ८ ॥
श्रवणाआड विक्षेप येती । नाना जिनस सांगों किती ।
सावध असतां प्रत्यय येती । सकळ कांहीं ॥ ९ ॥
श्रवणीं लोक बैसले । बोलतां बोलता येकाग्र जाले ।
त्याउपरी जे नूतन आले । ते येकाग्र नव्हेती ॥ १० ॥
मनुष्य बाहेर हिंडोनी आलें । नाना प्रकारींचें ऐकिलें ।
उदङ गलबलूं लागलें । उगें असेना ॥ ११ ॥

---

१ वक्त साह्य असला ह्मणजे. २ उल्हास, आवड. ३ अनुकूल होईल. ४ ऐहिक किंवा पारलौकिक कोणती हि गोष्ट एकादे वेळीं सहज साध्य होते, तेव्हां आपणांस त्याचा चमत्कार वाटतो. परंतु ही श्रीरामाची सहज कृपा होय.

प्रसंग पाहोन चालती । ऐसे लोक थोडे असती ।
श्रवणीं नाना विक्षेप होती । ते हे ऐका ॥ १२ ॥
श्रवणीं बैसले ऐकाया । अडों लागलीसे काया ।
येती कडकडां जाभया । निद्राभरें ॥ १३ ॥
बैसले सुचित करूनि मना । परी तें मन चि ऐकेना ।
मागें होतें ऐकिलें नाना । तें चि धरुनी बैसलें ॥ १४ ॥
तत्पर केलें शरीर । परी मनामधें आणीक विचार ।
कल्पना कल्पी तो विस्तार । किती ह्मणौनी सांगावा ॥ १५ ॥
जें जें काहीं श्रवणीं पाडिलें । तितुकें समजोन विवरलें ।
तरी च काहीं सार्थक जालें । निरूपणीं ॥ १६ ॥
मन दिसतें मा धरावें[1] । ज्याचें त्यानें आवरावें ।
आवरून विवेकें धरावें । अर्थांतरीं ॥ १७ ॥
निरूपणीं येऊन बैसला । परी तो उदक जेऊन आला ।
बैसतां च कासाविस जाला । तृषाक्रांत ॥ १८ ॥
आधीं उदक आणविलें । घळघळां उदक घेतलें ।
तेणें मळमळूं लागलें । उठोनी गेला ॥ १९ ॥
कर्पट ढेंकर उचक्या देती । वारा सरतां मोठी फजिती ।
क्षणक्षणा उठोनी जाती । लघुशंकेसी ॥ २० ॥
दिशेनें कासावीस केला । आवघें चि सांडून धाविला ।
निरूपणप्रसगीं निधानी गेला । अखंड ऐसा ॥ २१ ॥
दृष्टांतीं कांहीं अपूर्व आलें । अंत:कर्ण तेथें चि राहिलें ।
कोठवरी काये वाचिलें । कांहीं कळेना ॥ २२ ॥
निरूपणीं येऊन बैसला । तो विंचुवें फणकाविला ।
कैचें निरूपण जाला । कासावीस ॥ २३ ॥
पोटामधें तिडिक उठिली । पाठीमधें करक भरली ।
चाकक चिखल्या पुळी जाली । बैसवेना ॥ २४ ॥

---

१ मन ही दृश्य वस्तु थोडी च आहे तर त्याला धरतां येईल !

पिसोळा चाऊन पळाला । तेणें प्राणी दुश्चीत जाला ।
कोणें नेटें[1] गल्बला केला । तेथें चि धावें ॥ २५ ॥
विषइ लोक श्रवणीं येती । ते बायेकांकडे च पाहाती ।
चोरटे लोक चोरून जाती । पादरक्षा ॥ २६ ॥
होये नव्हे वादवेवाद । तेणें उदड जाला खेद ।
सिव्या गाळी अप्रमाद । होता चुकला ॥ २७ ॥
कोणी निरूपणीं बैसती । सावकास गोष्टी लाविती ।
हरिदास ते रें रें करिती । पोटासाठीं ॥ २८ ॥
बहुत जाणते मिळाले । येकापुढें येक बोले ।
लोकाचे आशये राहिले । कोण जाणे ॥ २९ ॥
माझें होये तुझें नव्हे । ऐसी अखंड जयास सेवे ।
न्याये नीति सांडून धावे । अन्यायाकडे ॥ ३० ॥
आपल्या थोरपणासाठीं । अच्यावाच्या तोंड पिटी ।
न्याये नाहीं ते सेवटीं । परम अन्याई ॥ ३१ ॥
येकेकडे अभिमान उठे । दुसरेकडे उदड पेटे ।
ऐसे श्रोते खरे खोटे । कोण जाणे ॥ ३२ ॥
ह्मणोन जाणते विचक्षण । ते आधीं च धरिती नेणपण ।
मूर्ख टोणपा आपण । कांहीं च नाहीं ॥ ३३ ॥
आपणाहून देव थोर । ऐसा जयास कळला विचार ।
सकळ कांहीं जगदातर[2] । तेहिं राखावें ॥ ३४ ॥
सभेमधें कल्हो जाला । शब्द येतो जाणत्याला ।
अतरें राखों नाहीं सिकला । कैसा योगी ॥ ३५ ॥
वैर करिता वैर चि वाढे । आपणास दुःख भोगणें घडे ।
ह्मणोनि शाहाण्याचे कुकडे[3] । कळों आलें ॥ ३६ ॥
अखंड आपणा सांभाळिती । क्षुल्लकपण येऊं नेदिती ।
थोर लोकास क्षमा शांति । अगत्य करणें ॥ ३७ ॥

---

१ एकाएकीं　२ संशय. ३ गूढ विचार.

अवगुणापासीं बैसला गुणी । आवगुण कळतो ततक्षणीं ।
विवेकी पुरुषाची करणी । विवेकें होते ॥ ३८ ॥
उपायें परियाये दीर्घ प्रेत्न । विवेकबळें नाना येत्न ।
करील तयाचें महिमान । तो चि जाणे ॥ ३९ ॥
दुर्जनीं वेवदरून घेतला । बाश्कळ लोकीं घसारेला ।
विवेकापासून चेवला । विवेकी कैसा ॥ ४० ॥
न्यायें परियायें उपायें । मूर्खास हें कळे काये ।
मूर्खाकरिता चिवडा होये । मज्यालसीचा ॥ ४१ ॥
मग ते शाहाणे नीट करिती । स्वयें साहोन साहविती ।
स्वयें करून करविती । लोकाकरवीं ॥ ४२ ॥
पृथ्वीमधें उदंड जन । जनामध्यें असती सज्जन ।
जयाकारितां समाधान । प्राणीमात्रासी ॥ ४३ ॥
तो मनोगताचीं आंगें जाणे । मान प्रसंग समये जाणे ।
सतसालागीं निवऊं जाणे । नाना प्रकारें ॥ ४४ ॥
ऐसा तो जाणता लोक । समर्थ तयाचा विवेक ।
त्याचें करणें कांहीं येक । जनास कळेना ॥ ४५ ॥
बहुत जनास चाळवी । नाना मंडळें हाळवी ।
ऐसी हे समर्थपदवी । विवेकें होते ॥ ४६ ॥
विवेक येकांतीं करावा । जगदीश धारणेनें धरावा ।
लोक आपला आणी परावा । ह्मणों चि नये ॥ ४७ ॥
येकांतीं विवेक ठाईं पडे । येकांतीं येत्न सापडे ।
येकांतीं तर्क वावडे । ब्रह्मांडगोळीं ॥ ४८ ॥
येकांतीं स्मरण करावें । चुकलें निधान पडे ठावें ।
अंतरात्म्यासरिसें फिरावें । कांहीं तरी ॥ ४९ ॥

---

१ पर्याय, हा नाहीं तो. कार्य साधेपर्यंत निरनिराळे उपाय योजावयाचे. २ विवाद करकरून बेजार केलें ३ सभेचा.

जयास येकात मानला । अवघ्या आर्धी कळे त्याला ।
त्यावेगळें वडिलपणाला । ठाव चि नाहीं ॥ ५० ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसवादे श्रोताअवलक्षणनिरूपणनाम स.द.॥१०॥

---

## ॥ दशक शिकवणनाम एकोनविंशति ॥ १९ ॥

॥ श्रीरामसमर्थ ॥

ब्राह्मणें बाळबध अक्षर । घडसुनी करावें सुंदर ।
जें देखता चि चतुर । समाधान पावती ॥ १ ॥
वाटोळें सरळें मोकळें । वोतलें मसीचें[1] काळें ।
कुळकुळीत वळी चालिल्या ढाळें । मुक्तमाळा जैशा ॥ २ ॥
अक्षरमात्र तितुकें नीट । नेमस्त पैस काने नीट ।
आडव्या मात्रा त्या हि नीट । आर्कुलीं वेलांड्या ॥ ३ ॥
पहिलें अक्षर जें काढिलें । ग्रंथ संपे तों पाहात गेलें ।
येका टांकें चि लिहिलें । ऐसें वाटे ॥ ४ ॥
अक्षराचें काळेपण । टांकाचें ठोंसरपण ।
तैसें चि वळण वांकाण । सारिखें[2] चि ॥ ५ ॥
वोळीस वोळी लागेना । आर्कुली मात्रा भेदीना ।
खालिले वोळीस स्पर्शेना । अथवा लंबाक्षर ॥ ६ ॥
पान शिषानें रेखाटावें । त्यावरी नेमक चि ल्याहावें ।
दुरी जवळी न व्हावें । अंतर वोळीचें ॥ ७ ॥
कोठें शोधासी आडेना । चुकी पाहातां सांपडेना ।
गरज केली हें[3] घडेना । लेखकापासुनी ॥ ८ ॥
ज्याचें वय आहे नूतन । त्यानें ल्याहावें जपोन ।
जनासी पडे मोहन । ऐसें करावें ॥ ९ ॥

---

१ मसी=शाई २ सारख्या, किंवा शोभेनें ३ ज्यानें लिहिलें त्याची च गरज वाचून पाहण्यास पडूं नये, असा अर्थ कोणी करितात. परंतु लेखकानें लिहिण्यांत हयगय केलीं असें कधीं नसावें, असा हि अर्थ, कित्येक करितात

बहु बारिक तरुणपणीं । कामा नये व्यातारपणीं ।
मध्यस्त लिहिण्याची करणी । केली पाहिजे ॥ १० ॥
भोंवतें स्थळ सोडून द्यावें । मधें चि चमचमित ल्याहावें ।
कागद झडतां हि झडावें । नलगे चि अक्षर ॥ ११ ॥
ऐसा ग्रंथ जपोनी ल्याहावा । प्राणीमात्रास उपजे हेवा ।
ऐसा पुरुष तो पाहावा । ह्मणती लोक ॥ १२ ॥
काया बहुत कष्टवावी । उत्कट कीर्ति उरवावी ।
चटक लाउनी सोडावी । कांहीं येक ॥ १३ ॥
[1]घट्य कागद आणावे । जपोन नेमस्त [2]खळावे ।
लिहिण्याचे सामे असावे । नानापरी ॥ १४ ॥
सुऱ्या कातऱ्या [3]जागाईत । [4]खळी [5]घोटाळें [6]तागाईत ।
नाना सुरग मिश्रित । जाणोनि घ्यावें ॥ १५ ॥
नाना देसीचे बरु आणावे । घटी बारिक सरळे घ्यावे ।
नाना रंगाचे आणावे । नाना जिनसी ॥ १६ ॥
नाना जिनसी टांकतोडणी । नाना प्रकारें रेखाटणी ।
चित्रविचित्र करणी । सिर्सलोळ्या ॥ १७ ॥
हिंगुळ संग्रहीं असावे । वाळले आळिते पाहोन घ्यावे ।
सोपें भिजउनी वाळवावे । संग्रह मसीचे ॥ १८ ॥
तँगटी इतिश्र्या कराव्या । बदरी फँळ्या घोटाव्या ।
नाना चित्रीं चिताराव्या । उंच चित्रें ॥ १९ ॥
नाना गोप नाना बासनें । मेणकापडें सिंदुरवर्णें ।
पेट्या कुलपें जपणें । पुस्तकाकारणें ॥ २० ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे लेखनक्रियानिरूपणनाम समास प्रथम ॥ १

१ घट्ट २ घोटावें ३ समासफळी ४ खळ. ५ कागद घोंटण्याचा घोटा. ६ कागद चिवट करण्यासाठीं खळ्याचें सामान, असा अर्थ कोणी करितात कोणी तागाईत=बई, सुदां, असा अर्थ करितात. ७ शेवटीं. ८ बदरी=परदेशातून ( उ० मलबार वगैरे ठिकाणाहून ) आलेल्या. ९ सिंदूरवर्णाचें मेणकापड असावें. ( यावरून श्रीमारुतीची उपासना व्यक्त होत आहे. )

॥ श्रीरामसमर्थ ॥

मागां बोलिले लेखनभेद । आतां ऐका अर्थभेद ।
नाना प्रकारीचे संवाद । समजोन घ्यावे ॥ १ ॥
शब्दभेद अर्थभेद । मुद्राभेद प्रबंदभेद ।
नाना शब्दाचे शब्दभेद । जाणोनी पाहावे ॥ २ ॥
नाना आशंका प्रत्योत्तरें । नाना प्रचित साक्षात्कारें ।
जेणेंकरितां जगदांतरें । चमत्कारती ॥ ३ ॥
नाना पूर्वपक्ष सिद्धांत । प्रत्ययो पाहावा नेमस्त ।
अनुमानाचें खस्तवेस्तं । बोलों चि नये ॥ ४ ॥
प्रवृत्ति अथवा निवृत्ती । प्रचितीविण अवघी भ्रांती ।
गळंग्यांमधील जगज्जोति । चेतेल कोठें ॥ ५ ॥
हेत समजोन उत्तर देणें । दुसऱ्याचे जीवींचें समजणें ।
मुख्य च्यातुर्याचीं लक्षणें । तें हें ऐसीं ॥ ६ ॥
च्यातुर्येंविण खटपट । ते विद्या चि फलकट ।
सभेमधें आटघाट । समाधान कैचें ॥ ७ ॥
बहुत बोलणें ऐकावें । तेथें मोन्य चि धरावें ।
अल्पचिन्हें समजावें । जगदांतर ॥ ८ ॥
बाष्कळामध्यें बैसों नये । उद्धटासीं तंडों नये ।
आपणाकरितां खंडों नये । समाधान जनाचें ॥ ९ ॥
नेणतपण सोडूं नये । जाणपणें फुगों नये ।
नाना जनाचें हृदये । मृद शब्दें उकलावें ॥ १० ॥
प्रसंग जाणावा नेटका । बहुतांसीं झाड्डा घेऊं नका ।
खरें असतां चि नासका । फड होतो ॥ ११ ॥
शोध घेतां आळसों नये । भ्रष्ट लोकीं बैसों नये ।
बैसलें तरी टाकूं नये । मिथ्या दोष ॥ १२ ॥

---

१ बाष्कळ. २ गळाठ्यामध्यें अग्नि जसा चेतत नाहीं, तद्वत् अनुमानानें जगज्जोति चेतावयाची नाहीं. ३ (वायफळ) अटापिटा, श्रम. ४ निंद्य दोष पुढें आणू नयेत.

अंतर आर्ताचें शोधावें । प्रसंगीं थोडें चि वाचावें ।
चटक लावनी सोडावें । भल्या मनुष्यासी ॥ १३ ॥
मं[1]ज्यालसींत बैसों नये । समा[2]राधनेसी जाऊं नये ।
जातां येळील[3]वाणें होये । जिणें आपुलें ॥ १४ ॥
उत्तम गुण प्रगटवावे । मग भल्यासीं बोलतां फावे ।
भले पाहोन करावे । शोधून मित्र ॥ १५ ॥
उपासनेसारिखें बोलावें । सर्व जनासी तोषवावें ।
सगट बरेंपण राखावें । कोण्हीयेकासी ॥ १६ ॥
ठाईं ठाईं शोध घ्यावा । मग ग्रामीं प्रवेश करावा ।
प्राणीमात्र बोलवावा । आप्तपणें ॥ १७ ॥
उच नीच ह्मणों नये । सकळांचें निववावें हृदय ।
अस्तमानीं जाऊं नये । कोठें तऱ्ही ॥ १८ ॥
जगामधें जगमित्र । जिव्हेपासीं आहे सूत्र ।
कोठें तऱ्ही सत्पात्र । शोधून काढावें ॥ १९ ॥
कथा होती तेथें जावें । दुरी दीनासारिखें बैसावें ।
तेथील सकळ हरद्दै[4] घ्यावें । अंतर्यामीं ॥ २० ॥
तेथें भले आडळती । व्यापक ते हि कळों येती ।
हळुहळु मदगती । रीग करावा ॥ २१ ॥
सकळामधें विशेष श्रवण । श्रवणाहुनी थोर मनन ।
मननें होये समाधान । बहुत जनाचें ॥ २२ ॥
धूर्तपणें सकळ जाणावें । अतरीं अंतर बाणावें ।
समजल्याविण सिणावें । कासयासी ॥ २३ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे विवरणनिरूपणनाम समास दुसरा ॥ २ ॥

---

१ सभेमध्यें. २ मुक्तद्वार असतें तेथें. ३ निर्फळ, ओशाळें. ४ हार्द, हुन्नर, अभिप्राय.

॥ श्रीरामसमर्थ ॥

सुचित करुनी अंतःकर्ण । ऐका करटलक्षण ।
हें त्यागितां सदेवलक्षण । आंगीं बाणे ॥ १ ॥
पापाकरितां दरिद्रे प्राप्त । दरिद्र होये पापसचित ।
ऐसें चि होत जात । क्षणक्षणा ॥ २ ॥
याकारणें करटलक्षणें । ऐकोनी त्याग चि करणें ।
ह्मणिजे कांहीं येक बाणे । सदेवलक्षण ॥ ३ ॥
करंट्यास आळस आवडे । येत्न कदापी नावडे ।
त्याची वासना वावडे । अधर्मी सदा ॥ ४ ॥
सदा अमिष्ट निदसुरा । उगें चि बोले सैरावैरा ।
कोणीयेकाच्या अंतरा । मानेचिना ॥ ५ ॥
लेहों नेणे वाचूं नेणे । सवदासुत घेऊं नेणे ।
हिशेब कितेब राखों नेणे । धारणा नाहीं ॥ ६ ॥
हारवी सांडी पाडी फोडी । विसरे चुके नाना खोडी ।
भल्याचे संगतीची आवडी । कदापी नाहीं ॥ ७ ॥
चाट गडी मेळविले । कुकर्मी मित्र केले ।
खट नट येकवटिले । चोरटे पापी ॥ ८ ॥
ज्यासीं त्यासीं कळकटों । स्वयें सदाचा चोरटा ।
परघातकी धाटामोटा । वाटा पाडी ॥ ९ ॥
दीर्घ सूचना सुचेचिना । न्याय नीति हे रुचेना ।
परअभिळासीं वासना । निरंतर ॥ १० ॥
आळसें शरीर पाळिलें । परतु पोटेंविण गेलें ।
सुडकें मिळेनासें जालें । पांघराया ॥ ११ ॥
आळसें शरीर पाळी । अखंड कुसी कांडोळी ।
निद्रेचे पाडी सुकाळीं । आपणासी ॥ १२ ॥

---

१ भांडणारा, कलह करणारा. २ धष्टपुष्ट. ३ खाजवी.

जनासीं मीत्री करीना । कठीण शब्द बोले नाना ।
मूर्खपणें आवरेना । कोणीयेकासी ॥ १३ ॥
पवित्र लोकांमधें भिडावे । वोंगळामधें निशंक धांवे ।
सदा मनापासून भावे । जननिंद्य क्रिया ॥ १४ ॥
तेथें कैचा परोपकार । केला बहुतांचा संव्हार ।
पापी अनर्थी अपस्मार । सर्वअबद्धी ॥ १५ ॥
शब्द सांभाळून बोलेना । आवारितां आवरेना ।
कोणीयेकासी मानेना । बोलणें त्याचें ॥ १६ ॥
कोणीयेकास विश्वास नाहीं । कोणीयेकासीं सख्य नाहीं ।
विद्या वैभव काहीं च नाहीं । उगा चि ताठा ॥ १७ ॥
राखावीं बहुतांचीं अंतरें । भाग्य येतें तदनंतरें ।
ऐसीं हें विवेकाचीं उत्तरें । ऐकणार नाहीं ॥ १८ ॥
स्वयें आपणास कळेना । सिकविलें तें ऐकेना ।
तयासी उपाय नाना । काये करिती ॥ १९ ॥
कल्पना करी उदंड काहीं । प्राप्तव्य तों कांहीं च नाहीं ।
अखंड पडिला संदेहीं । अनुमानाचे ॥ २० ॥
पुण्यमार्ग सांडिला मनें । पाप झडावें काशानें ।
निश्चय नाहीं अनुमानें । नास केला ॥ २१ ॥
कांहींयेक पुतें कळेना । सभेमधें बोलों राहेना ।
बाष्कळ लाबाड ऐसें जना । कळों आलें ॥ २२ ॥
कांहीं नेमकपण आपुलें । बहुत जनासी कळों आलें ।
तें चि मनुष्य मान्य जालें । भूमंडळीं ॥ २३ ॥
झिजल्यावांचुनी कीर्ति कैंची । मान्यता नव्हे कीं फुकाची ।
जिकडे तिकडे होते ची ची । अवलक्षणें ॥ २४ ॥
भल्याची सगती धरीना । आपणासी शाहाणे करीना ।
तो आपला आपण वैरी जाणा । स्वहित नेणे ॥ २५ ॥

---

१ भावतो, आवडून घेतो.

लोकांसी बरें करावें । तें उसिणें सवें चि घ्यावें ।
ऐसें जयाच्या जीवें । जाणिजेना ॥ २६ ॥
जेथें नाहीं उत्तम गुण । तें करटपणाचें लक्षण ।
बहुतांसीं न मने तें अवलक्षण । सहज चि जालें ॥ २७ ॥
कार्यकारण सकळ कांहीं । कार्यंविण तों कांहीं च नाहीं ।
निकामी तो दुःखप्रवाहीं । वाहात चि गेला ॥ २८ ॥
बहुतांसीं मान्य थोडा । त्याच्या पापासी नाहीं जोडा ।
निराश्रई पडे उघडा । जेथ तेथें ॥ २९ ॥
याकारणें अवगुण त्यागावे । उत्तम गुण समजोन घ्यावे ।
तेणें मनासारिखें फावे । सकळ कांहीं ॥ ३० ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे करटलक्षणनिरूपणनाम समास तिसरा ॥ ३

---

॥ श्रीरामसमर्थ ॥

मागां बोलिलें करटलक्षण । तें विवेकें सांडावें संपूर्ण ।
आतां ऐका सदेवलक्षण । परम सौख्यदायेक ॥ १ ॥
उपजतगुण शरीरीं । परोपकारी नानापरी ।
आवडे सर्वांचे अंतरीं । सर्वकाळ ॥ २ ॥
सुंदर अक्षर लेहों जाणे । चपळ शुद्ध वाचूं जाणे ।
अर्थांतर सांगों जाणे । सकळ कांहीं ॥ ३ ॥
कोणाचें मनोगत तोडीना । भल्यांची संगती सोडीना ।
सदेवलक्षण अनुमाना । आणून ठेवी ॥ ४ ॥
तो सकळ जनासी व्हावा । जेथें तेथें नित्य नवा ।
मूर्खपणें अनुमानगोवा । कांहीं च नाहीं ॥ ५ ॥
नाना उत्तम गुण सत्पात्र । ते चि मनुष्य जगमित्र ।
प्रगट कीर्ती स्वतंत्र । पराधेन नाहीं ॥ ६ ॥
राखे सकळांचें अंतर । उदंड करी पाठांतर ।
नेमस्तपणाचा विसर । पडणार नाहीं ॥ ७ ॥

नम्रपणें पुसों जाणे । नेमस्त अर्थ सांगों जाणे ।
बोलऐसें वर्तों जाणे । उत्तम क्रिया ॥ ८ ॥
जो मानला बहुतांसी । कोणी बोलों न शके त्यासी ।
धगधगीत पुण्यरासी । माहापुरुष ॥ ९ ॥
तो परोपकार करितां चि गेला । पाहिजे तो ज्याला त्याला ।
मग काये उणें तयाला । भूमंडळीं ॥ १० ॥
बहुत जन वास पाहे । वेळेसी तत्काळ उभा राहे ।
उणें कोणाचें न साहे । तया पुरुषासी ॥ ११ ॥
चौदा विद्या चौसष्टी कळा । जाणे संगीत गायेनकळा ।
आत्मविद्येचा जिव्हाळा । उदंड तेथें ॥ १२ ॥
सकळांसीं नम्र बोलणें । मनोगत राखोन चालणें ।
अखंड कोणीयेकाचें उणें । पडों चि नेदी ॥ १३ ॥
न्याय नीति भजन मर्यादा । काळ सार्थक करी सदा ।
दरिद्रपणाची आपदा । तेथें कैची ॥ १४ ॥
उत्तमगुणें श्रृंगारला । तो बहुतामधें शोभला ।
प्रगट प्रतापें उगवला । मार्तंड जैसा ॥ १५ ॥
जाणता पुरुष असेल जेथें । कळहो कैचा उठेल तेथें ।
उत्तम गुणाविषीं रितें । तें प्राणी करंटें ॥ १६ ॥
प्रपचीं जाणे राजकारण । परमार्थीं साकल्य विवरण ।
सर्वांमधें उत्तम गुण । त्याचा भोक्ता ॥ १७ ॥
मागें येक पुढें येक । ऐसा कदापी नाहीं दंडक ।
सर्वत्रांसीं अलोलिक । तया पुरुषाची ॥ १८ ॥
अंतरासी लागेल ढका । ऐसी वर्तणूक करूं नका ।
जेथें तेथें विवेका । प्रगट करी ॥ १९ ॥
कर्मविधी उपसनाविधी । ज्ञानविधी वैराग्यविधी ।
विशाळ ज्ञातृत्वाची बुद्धी । चळेल कैसी ॥ २० ॥

---

१ अपूर्वता. तो पुरुष ज्याला त्याला पाहिजे.

पाहाता अवघे उत्तम गुण । तयास वाईट ह्मणेल कोण ।
जैसा आत्मा संपूर्ण । सर्वां घटीं ॥ २१ ॥
आपल्या कार्यास तत्पर । लोक असती लाहान थोर ।
तैसा चि करी परोपकार । मनापासुनी ॥ २२ ॥
दुसऱ्याच्या दुःखें दुखवे । दुसऱ्याच्या सुखें सुखावे ।
आवघे चि सुखी असावे । ऐसी वासना ॥ २३ ॥
उदंड मुलें नानापरी । वडिलांचें मन अवघ्यावरी ।
तैसी अवघ्यांची चिंता करी । माहापुरुष ॥ २४ ॥
जयास कोणाचें सोसेना । तयाची निःकांचन वासना ।
धीकारिल्यां धीकारेना । तो चि माहापुरुष ॥ २५ ॥
मिथ्या शरीर निंदलें । तरी याचें काये गेलें ।
ज्ञात्यासी आणि जितिलें । देहेबुद्धीनें ॥ २६[1] ॥
हें अवघें अवलक्षण । ज्ञाता [2]देहीं [3]विलक्षण ।
काहीं तऱ्ही उत्तम गुण । जनीं दाखवावे ॥ २७ ॥
उत्तम गुणास मनुष्य वेधे । वाईट गुणासी प्राणी खेदे ।
तीक्षण बुद्धि लोक साधे । काये जाणती ॥ २८ ॥
लोकीं अत्यंत क्षमा करिती । आलियां लोकाचे प्रचिती ।
मग ते लोक पाठी राखती । नाना प्रकारीं ॥ २९ ॥
बहुतांसी वाटे मी थोर । सर्वमान्य पाहिजे विचार ।
धीर उदार गंभीर । माहापुरुष ॥ ३० ॥
जितुके काहीं उत्तम गुण । तें समर्थाचें लक्षण ।
अवगुण तें करंटलक्षण । सहज चि जालें ॥ ३१ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सदेवलक्षणनिरूपणनाम समास ॥ ४ ॥

---

१ ज्ञाता असून तो देहबुद्धीनें जिंकला गेला असें कोठें झालें आहे ? २ प्रथम "दोहीं" होतें. ३ ज्ञाता देहापासून निराळा आहे.

॥ श्रीरामसमर्थ ॥

मातीचे देव धोंड्याचे देव । सोन्याचे देव रुप्याचे देव ।
काशाचे देव पितळेचे देव । ताब्याचे देव चित्रलेपे ॥ १ ॥
रुविंच्या लाकडाचे देव पोंवळयांचे देव । बाण तांदळे नर्मदे देव ।
शालिग्राम काश्मिरी देव । सूर्यकांत सोमकांत ॥ २ ॥
तांब्रनाणीं हेमनाणीं । कोणी पूजिती देवार्चनीं ।
चक्रांगीत चक्रतीर्थाहुनी । घेऊन येती ॥ ३ ॥
उदंड उपासनेचे भेद । किती करावे विशद ।
आपलाले आवडीचा वेध । लागला जनीं ॥ ४ ॥
परी त्या सकळाचें हि कारण । मुळीं पाहावें स्मरण ।
तया स्मरणाचे अंश जाण । नाना देवतें ॥ ५ ॥
मुळीं द्रष्टा देव तो येक । त्याचे जाहाले अनेक ।
समजोन पाहाता विवेक । उमजों लागे ॥ ६ ॥
देहावेगळी भक्ति फावेना । देहावेगळा देव पावेना ।
याकारणें मूळ भजना । देहे चि आहे ॥ ७ ॥
देहे मुळीं च केला वाव । तरी भजनासी कैंचा ठाव ।
ह्मणोनी भजनाचा उपाव । देहात्मयोगें ॥ ८ ॥
देहेंविण देव कैसा भजावा । देहेंविण देव कैसा पुजावा ।
देहाविण मोहछाव कैसा करावा । कोण्या प्रकारें ॥ ९ ॥
अन्न गंध पत्र पुष्प । फल तांबोल धूप दीप ।
नाना भजनाचा साक्षेप । कोठें करावा ॥ १० ॥
देवाचें तीर्थ कैसें घ्यावें । देवासी गंध कोठें लावावें ।
मंत्रपुष्प तरी वाहावें । कोणे ठाईं ॥ ११ ॥
ह्मणोनी देहाविण आडतें । अवघें सांकडें चि पडतें ।
देहाकरितां घडतें । भजन कांहीं ॥ १२ ॥

---

१ गोपीचंदन किंवा गंधगोळ्या यांच्या मूर्ति; तसबिरी, भिंतीवर काढलेली चित्रें. २ रुईच्या. ३ वाहावें.

देव देवता भूत देवतें । मुळींचें सामर्थ्य आहे तेथ ।
अधिकारें नाना देवतें । भजत जावीं ॥ १३ ॥
नाना देवीं भजन केलें । तें मूळ पुरुषासी पावलें ।
याकारणें सन्मानिलें । पाहिजे सकळ कांहीं ॥ १४ ॥
मायावल्ली फांपावली । नाना देहेफळीं लगडली[1] ।
मुळींची जाणीव कळों आली । फळामध्यें ॥ १५ ॥
ह्मणोनी येळीलें न करावें । पाहाणें तें येथें चि पाहावें ।
ताळा पडतां राहावें । समाधानें ॥ १६ ॥
प्राणी संसार टाकिती । देवास धुंडीत फिरती ।
नाना अनुमानीं पडती । जेथ तेथें ॥ १७ ॥
लोकांची पाहातां रीती । लोक देवार्चनें करिती ।
अथवा क्षत्रदेव पाहाती । ठाईं ठाईं ॥ १८ ॥
अथवा नाना अवतार । ऐकोनी धरिती निर्धार ।
परी तें अवघें सविस्तर । होऊन गेलें ॥ १९ ॥
येक ब्रह्माविष्णुमहेश । ऐकोन ह्मणती हे विशेष ।
गुणातीत जो जगदीश । तो पाहिला पाहिजे ॥ २० ॥
देवासी नाहीं थानेमान । कोठें करावें भजन ।
हा विचार पाहातां अनुमान । होत जातो ॥ २१ ॥
नसतां देवाचें दर्शन । कैसेन होईजे पावन ।
धन्य धन्य ते साधुजन । सकळ जाणती ॥ २२ ॥
भूमंडळीं देव नाना । त्यांची भीड उलंघेना ।
मुख्य देव तो कळेना । कांहीं केल्यां ॥ २३ ॥
कर्तुत्व वेगळें करावें । मग त्या देवासी पाहावें ।
तरी च कांहींयेक पडे ठावें । गोप्यगुह्य ॥ २४ ॥
तें दिसेना ना भासेना । कल्पांतीं हि नासेना ।
सुकृतावेगळें विश्वासेना । तेथें मन ॥ २५ ॥

१ "लीगडली" चें लगडली केलें आहे २ कंटाळा. ३ ठावठिकाण. ४ सूक्ष्म पदार्थ.

उदंड कल्पिते कल्पना । उदंड इच्छिते वासना ।
अभ्यांतरीं तरंग नाना । उदयासें पावती ॥ २६ ॥
म्हणोनी कल्पनारहित । ते चि वस्तु शाश्वत ।
अंत नाहीं म्हणोन अनंत । बोलिजे तया ॥ २७ ॥
हें ज्ञानदृष्टीनें पाहावें । पाहोनी तेथें चि राहावें ।
निजध्यासें तद्रूप व्हावें । सगत्यागें ॥ २८ ॥
नाना लीळा नाना लाघवें । तें काये जाणिजे बापुड्या जीवें ।
संतसंगें स्वानुभवें । स्थिति बाणे ॥ २९ ॥
ऐसी सूक्ष्म स्थिति गती । कळतां चुके अधोगती ।
सद्गुरुचेनि सद्गती । तत्काळ होते ॥ ३० ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे देहेमान्यनिरूपणनाम समास ॥ ५ ॥

॥ श्रीराम ॥

परमार्थी आणि विवेकी । त्याचें करणें माने लोकीं ।
कां जे विवरविवरों चुकी । पडों चि नेदी ॥ १ ॥
जो जो संदेह वाटे जना । तो तो कदापी करीना ।
आदिअंत अनुमाना । आणून सोडी ॥ २ ॥
स्वतां निस्पृह असेना । त्याचें बोलणें चि मानेना ।
कठीण आहे जनार्दना[1] । राजी राखणें ॥ ३ ॥
कोणी दाटून उपदेश देती । कोणी मध्यावर्ती[2] घालिती ।
ते सहज चि हलु पडती[3] । लालचीनें ॥ ४ ॥
जयास सांगावा विवेक । तो चि जाणावा प्रतिकुंचक[4] ।
पुढें पुढें नासक । कारबार होतो ॥ ५ ॥
भावास भाऊ उपदेश देती । पुढें पुढें होते फजीती ।
वोळखीच्या लोकांत महंती । माडूं चि नये ॥ ६ ॥

---

१ जनीं जनार्दना, लोकांना. २ मध्यस्ती. ३ फिके पडतात. ४ प्रतिकूल.

पहिलें दिसे परी नासे । विवेकी मान्य करिती कैसे ।
अविवेकी ते जैसे तैसे । मिळती तेथें ॥ ७ ॥
भ्रतार शिष्य स्त्री गुरु । हा हि फटकाळ विचारु ।
नाना भ्रष्टाकारी प्रकारु । तैसा चि आहे ॥ ८ ॥
प्रगट विवेक बोलेना । शाकातापा करी जेना ।
मुख्य निश्चय अनुमाना । आणूंच नेदी ॥ ९ ॥
इकीसरिसा भरीं भरे । विवेक सागता न धरे ।
दुरीदृष्टीचे पुरे । साधु नव्हेती ॥ १० ॥
कोण्हास काहीं च न मागावें । भगवद्भजन वाढवावें ।
विवेकबळें जन लावावे । भजनाकडे ॥ ११ ॥
परांतर रक्षायाचीं कामें । बहुत कठीण विवेकवर्में ।
स्वइछेनें स्वधर्में । लोकराहाटी ॥ १२ ॥
आपण तुरुक गुरु केला । शिष्य चाभार मेळविला ।
नीच यातीनें नासला । समुदाव ॥ १३ ॥
ब्राह्मणमडळ्या मेळवाव्या । भक्तमंडळ्या मानाव्या ।
संतमंडळ्या शोधाव्या । भूमंडळीं ॥ १४ ॥
उत्कट भव्य तें चि घ्यावें । मळमळीत अवघे चि टाकावें ।
निस्पृहपणें विख्यात व्हावें । भूमडळीं ॥ १५ ॥
अक्षर बरें वाचणें बरें । अर्थांतर सांगणें बरें ।
गाणें नाचणें अवघें चि बरें । पाठांतर ॥ १६ ॥
दीक्षा बरी मीत्री बरी । तीक्षण बुधी राजकारणीं बरी ।
आपणास राखे नानापरी । अलिप्तपणें ॥ १७ ॥
अखंड हरिकथेचा छंदु । सकळास लागे नामवेदु ।
प्रगट जयाचा प्रबोधु । सूर्य जैसा ॥ १८ ॥

---

१ पहिल्यानें थाटमाट दिसतो पण तो अखेरीस नाहींसा होतो, असा अर्थ कोणी लावतात व ओळखीच्या लोकाना याचें पूर्व चरित्र माहित असल्यामुळें याची महती त्यांना मान्य होत नाहीं, असा अर्थ कित्येक करितात लोकाना उघड रीतीनें विवेक सागत नाहीं व सांगितला तरी तो गुप्त ठेवण्यास सांगतो.

दुर्जनासी राखों जाणे । सज्जनासी निवऊ जाणे ।
सकळांचे मनींचें जाणे । ज्याचें त्यापरीं ॥ १९ ॥
संगतीचें मनुष्य पालटे । उत्तम गुण तत्काळ उठे ।
अखंड अभ्यासीं लगटे । समुदाव ॥ २० ॥
जेथें तेथें नित्य नवा । जनासी वाटे हा असावा ।
परंतु लालचीचा गोवा । पडों चि नेदी ॥ २१ ॥
उत्कट भक्ति उत्कट ज्ञान । उत्कट च्यातुर्य उत्कट भजन ।
उत्कट योग अनुष्ठान । ठाईं ठाईं ॥ २२ ॥
उत्कट निस्पृहता धरिली । त्याची कीर्ति दिगांतीं फाकली
उत्कट भक्तीनें निवाली । जनमंडळी ॥ २३ ॥
काहीं येक उत्कटेविण । कीर्ति कदापि नव्हे जाण ।
उगें च वणवण हिंडोन । काये होतें ॥ २४ ॥
नाहीं देहाचा भरंवसा । केव्हा सरेल वयसा ।
प्रसंग पडेल कैसा । कोण जाणे ॥ २५ ॥
याकारणें सावधान असावें । जितुकें होईल तितुकें करावें ।
भगवत्कीर्तीनें भरावें । भूमंडळ ॥ २६ ॥
आपणास जें जें अनकूळ । तें तें करावें तत्काळ ।
होईना त्यास निवळ । विवेक उमजावा ॥ २७ ॥
विवेकामधें सांपडेना । ऐसें तों कांहीं च असेना ।
येकांतीं विवेक अनुमाना । आणून सोडी ॥ २८ ॥
अखंड तजवीजा चाळणा जेथें । पाहातां काये उणें तेथें ।
येकांतेविण प्राणीयांतें । बुद्धि कैंची ॥ २९ ॥
येकांतीं विवेक करावा । आत्माराम वोळखावा ।
येथून तेथवरी गोवा । कांहीं च नाहीं ॥ ३० ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे बुद्धिवादनिरूपणनाम समास साहावा ॥ ६

॥ श्रीरामसमर्थ ॥

कथेचें घमड भरून द्यावें । आणी निरूपणीं विवरावें ।
उणें पडों चि नेदावें । कोणीयेकविषीं ॥ १ ॥
भेजणार[1] खालें पडिला । तो भेजणारीं जाणितलें[2] ।
नेणता लोक उगा च राहिला । टकमकां पाहात ॥ २ ॥
उत्तर विलंबीं पडिलें । श्रोतयास कळों आलें[3] ।
ह्मणिजे महत्व उडालें । वक्तयाचें ॥ ३ ॥
थोडें बोलोनी समाधान करणें । रागेजोन तरी मन धरणें ।
मनुष्य वेधीं च लावणें । कोणीयेक ॥ ४ ॥
सोसवेना चिणचिण केली । तेथें तामसवृत्ती दिसोन आली ।
आवघी आवडी उडाली । श्रोतयाची ॥ ५ ॥
कोण कोण राजी राखिले । कोण कोण मनीं भंगिले ।
क्षणक्षणा परीक्षिले । पाहिजे लोक ॥ ६ ॥
शिष्य विकल्पें रान घेतो । गुरु मागें मागें धांवतो ।
विचार पाहों जातां तो । विकल्प चि अवघा ॥ ७ ॥
आशाबद्धी क्रियाहीन । नाहीं च्यातुर्याचें लक्षण ।
ते महतीची भणभण[4] । बद नाहीं ॥ ८ ॥
ऐसे गोसावी हळु पडती[5] । ठाईं ठाईं कष्टी होंती ।
तेथें संगतीचे लोक पावती । सुख कैचें ॥ ९ ॥
जिकडे तिकडे कीर्ति माजे । सगट लोकांस हव्यास उपजे ।
लोक राजी राखोन कीजे । सकळ कांहीं ॥ १० ॥
परलोकीं वास करावा । समुदाव उगा च पाहावा ।
मागण्याचा तगादा न लवावा[6] । कांहीं येक ॥ ११ ॥

---

१ लोकांना ज्ञान सांगणारा, कीर्तन करणारा. २ "लीं" चें "लें" केलें आहे. ३ ज्ञानी मनुष्याची चुकी ज्ञानी मनुष्याला च उमजणार. ४ अशा महंतीची भणभण होते, तिला बध नसतो, म्हणजे तिला कोणी पुसत नाहीं, तिचा बोजवार होतो. ५ त्यांचें महत्त्व नाहीसें होतें. ६ "ल" चा "ल" केला आहे.

जिकडे जग तिकडे जगन्नायेक । कळला पाहिजे विवेक ।
रात्रींदिवस विवेकी लोक । साभाळीत जाती ॥ १२ ॥
जो जो लोक दृष्टीस पडिला । तो तो नष्ट ऐसा कळला ।
अवघे च नष्ट येकला भला । काशावरुनी ॥ १३ ॥
वोस मुलकीं काये पाहावें । लोकांवेगळें कोठें राहावें ।
तन्हे खोटी सांडतें ध्यावें[1] । कांहीं येक ॥ १४ ॥
तस्मात लोकिकीं वर्तता न ये । त्यास महंती कामा नये ।
परत्र साधनाचा उपाये । श्रवण करून असावें ॥ १५ ॥
आपणासी बरें पोहतां न ये । लोक बुडवावयाचें कोण कार्य ।
गोडी आवडी वायां जाये । विकल्प चि अवघा ॥ १६ ॥
अभ्यासें प्रगट व्हावें । नाहीं तरी झांकोन असावें ।
प्रगट होऊन नासावें । हें बरें नव्हे ॥ १७ ॥
मद हळु हळु चालतो । चपळ कैसा अटोपतो ।
अरबी फिरवणार तो । कैसा असावा[2] ॥ १८ ॥
हे धकाधकीचीं कामें । तिक्षण बुद्धीचीं वर्मे ।
भोळ्या भावार्थे संभ्रमें । कैसें घडे ॥ १९ ॥
सेत केलें परी वाहेना[3] । जबारं केलें परी फिरेना ।
जन मेळविलें परी धरेना । अंतर्यामीं ॥ २० ॥
जरी चढती वाढती आवडी उठे । तरी परमार्थ प्रगटे ।
घसघस करितां विटे । सगट लोकु ॥ २१ ॥
आपलें लोकांस मानेना । लोकाचें आपणांस मानेना ।
अवघा विकल्प चि मना । समाधान कैचें ॥ २२ ॥
नासक दीक्षा सितरें लोक । तेथें कैचा असेल विवेक ।
जेथें बळावला अविवेक । तेथें राहणें खोटें ॥ २३ ॥

---

१ अभिमान खोटा, पद घ्यावी २ आरबी घोडा चपळ असतो, तेव्हां वर बसणारा हि चपळ च पाहिजे, मंद उपयोगी नाहीं. ३ निगा करीना ४ जवाहिराचा व्यापार. ५ ठक

बहुत दिवस श्रम केला । सेवटीं अवघा चि वेर्थ गेला ।
आपणास ठाकेना गल्बला । कोणें करावा ॥ २४ ॥
सगीतें[1] चालिला तरी तो व्याप । नाहीं तरी अवघा चि संताप ।
क्षणक्षणा विक्षेप । किती ह्मणौनि सागावा ॥ २५ ॥
मूर्ख मूर्खपणें भरगळती । ज्ञाते ज्ञातेपणें कल्हो करिती ।
होते दोहींकडे फजीती । लोकांमधें ॥ २६ ॥
कारबार आटोपेना करवेना । आणि उगें हि राहेना ।
याकारणें सकळ जना । काये ह्मणावें ॥ २७ ॥
नासक उपाधीस सोडावें । वय सार्थकीं घालावें ।
परिभ्रमणें कंठावें । कोठें तरी ॥ २८ ॥
परिभ्रमण करीना । दुसऱ्याचें कांहीं च सोसीना ।
तरी मग उदंड यातना । विकल्पाची ॥ २९ ॥
आतां हें आपणाचिपासीं । बरें विचारावें आपणासी ।
अनकूळ पडेल तैसी । वर्तणूक करावी ॥ ३० ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे येत्ननिरूपणनाम समास सातवा ॥ ७॥

---

॥ श्रीरामसमर्थ ॥

सृष्टिमधें बहु लोक । परिभ्रमणें कळे कौतुक ।
नाना प्रकारीचे विवेक । आडळों लागती ॥ १ ॥
किती प्रपंची जन । अखड वृत्ति उदासीन ।
सुखदुखें समाधान । दंडळेना ॥ २ ॥
स्वभावें चि नेमक बोलती । सहज चि नेमक चालती ।
अपूर्व बोलण्याची स्थिती । सकळांसि माने ॥ ३ ॥
सहज चि ताळज्ञान येतें । स्वभावें चि रागज्ञान उमटतें[3] ।
सहज चि कळत जातें । न्यायेनीतिलक्षण ॥ ४ ॥

---

१ उपाधी. आपल्याला जर उपाधी होत नाहीं तर कशास करावी ! २ व्यवस्थेशीर सुरळीत. ३ " उमटे " चें " उमटतें " केलं आहे.

जिकडे जग तिकडे जगन्नायेक । कळला पाहिजे विवेक ।
रात्रीदिवस विवेकी लोक । सांभाळीत जाती ॥ १२ ॥
जो जो लोक दृष्टीस पडिला । तो तो नष्ट ऐसा कळला ।
अवघे च नष्ट येकला भला । काशावरुनी ॥ १३ ॥
वोस मुलकीं काये पाहावें । लोकांविगळें कोठें राहावें ।
तऱ्हे खोटी साडतें घ्यावें । कांहीं येक ॥ १४ ॥
तस्मात लोकिकीं वर्ततां न ये । त्यास महंती कामा नये ।
परत्र साधनाचा उपाये । श्रवण करून असावें ॥ १५ ॥
आपणासी बरें पोहतां न ये । लोक बुडवावयाचें कोण कार्य ।
गोडी आवडी वायां जाये । विकल्प चि अवघा ॥ १६ ॥
अभ्यासें प्रगट व्हावें । नाहीं तरी झाकोन असावें ।
प्रगट होऊन नासावें । हें बरें नव्हे ॥ १७ ॥
मंद हळु हळु चालतो । चपळ कैसा अटोपतो ।
अरबी फिरवणार तो । कैसा असावा ॥ १८ ॥
हे धकाधकीचीं कामें । तिक्षण बुद्धीचीं वर्में ।
भोळ्या भावार्थें संभ्रमें । कैसें घडे ॥ १९ ॥
सेत केलें परी वाहेनां । जवारें केलें परी फिरेना ।
जन मेळविलें परी धरेना । अतर्यामीं ॥ २० ॥
जरी चढती वाढती आवडी उठे । तरी परमार्थ प्रगटे ।
घसघस करिता विटे । सगट लोकु ॥ २१ ॥
आपलें लोकांस मानेना । लोकाचें आपणास मानेना ।
अवघा विकल्प चि मना । समाधान कैचें ॥ २२ ॥
नासक दीक्षा सितरुं लोक । तेथें कैचा असेल विवेक ।
जेथें बळावला अविवेक । तेथें राहणें खोटें ॥ २३ ॥

---

१ अभिमान सोडा, पड घ्यावी. २ आरबी घोडा चपळ असतो, तेव्हा वर बसणारा हि चपळ च पाहिजे, मंद उपयोगी नाहीं. ३ निगा करीना ४ जवाहिराचा व्यापार. ५ ठक

बहुत दिवस श्रम केला । सेवटीं अवघा चि वेर्थ गेला ।
आपणास ठाकेना गेल्बला । कोणें करावा ॥ २४ ॥
सगीतें[1] चालिला तरी तो व्याप । नाहीं तरी अवघा चि संताप ।
क्षणक्षणा विक्षेप । किती ह्मणौनि सागावा ॥ २५ ॥
मूर्ख मूर्खपणें भरगळती । ज्ञाते ज्ञातेपणें कळ्हो करिती ।
होतें दोहींकडे फजीती । लोकांमधें ॥ २६ ॥
कारबार आटोपेना करवेना । आणि उगें हि राहेना ।
याकारणें सकळ जना । काये ह्मणावें ॥ २७ ॥
नासक उपाधीस सोडावें । वय सार्थकीं घालावें ।
परिभ्रमणें कठावें । कोठें तरी ॥ २८ ॥
परिभ्रमण करीना । दुसऱ्याचें काहीं च सोसीना ।
तरी मग उदंड यातना । विकल्पाची ॥ २९ ॥
आतां हें आपणाचिपासीं । बरें विचारावें आपणासी ।
अनकूळ पडेल तैसी । वर्तणूक करावी ॥ ३० ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे येत्ननिरूपणनाम समास सातवा ॥ ७॥

---

॥ श्रीरामसमर्थ ॥

सृष्टिमधें बहु लोक । परिभ्रमणें कळे कौतुक ।
नाना प्रकारीचे विवेक । आडळों लागती ॥ १ ॥
किती प्रपंची जन । अखंड वृत्ति उदासीन ।
सुखदुखें समाधान । दंडळेना ॥ २ ॥
स्वभावें चि नेमक बोलती । सहज चि नेमक चालती ।
अपूर्व बोलण्याची स्थिती । सकळांसि मानें ॥ ३ ॥
सहज चि ताळज्ञान येतें । स्वभावें चि रागज्ञान उमटतें[3] ।
सहज चि कळत जातें । न्यायेनीतिलक्षण ॥ ४ ॥

---

१ उपाधी आपल्याला जर उपाधी होत नाहीं तर कशास करावी । २ व्यवस्थेशीर, सुरळीत. ३ " उमटे " चें " उमटतें " केलें आहे

येखादा आडळे गाजी । सकळ लोक अखंड राजी ।
सदा सर्वदा आवडी ताजी । प्राणीमात्राची ॥ ५ ॥
चुकोन उदंड आडळतें । भारी मनुष्य दृष्टीसी पडतें ।
महंताचें लक्षणसें वाटतें । अकस्मात ॥ ६ ॥
ऐसा आडळतां लोक । चमत्कारें गुणग्राहिक ।
क्रिया बोलणें नेमक । प्रत्ययाचें ॥ ७ ॥
सकळ अवगुणामधें अवगुण । आपले अवगुण वाटती गुण ।
मोठें पाप करंटपण । चुकेना कीं ॥ ८ ॥
ढोळें चि काम होतें सदा । जें जपल्यानें नव्हे सर्वदा ।
तेथें पीळपेंचाची आपदा । आडळेचिना ॥ ९ ॥
येकासी अभ्यासितां न ये । येकासी स्वभावें चि ये ।
ऐसा भगवंताचा महिमा काये कैसा कळेना ॥ १० ॥
मोठीं राजकारणें चुकती । राजकारणीं वेढां लागती ।
नाना चुकीची फजीती । चहुंकडे ॥ ११ ॥
याकारणें चुकों नयें । ह्मणिजे उदंड उपायें ।
उपायाचा अपायें । चुकतां होये ॥ १२ ॥
कायें चुकलें तें कळेना । मनुष्याचें मन चि वळेना ।
खवळला अभिमान गळेना । दोहिंकडे ॥ १३ ॥
आवघे फड चि नासती । लोकांचीं मनें भंगती ।
कोठें चुकते युक्ती । कांहीं कळेना ॥ १४ ॥
व्यापेंविण आटोप केला । तो अवघा घसरत चिं गेला ।
अकलेचा बंद नाहीं घातला । दुरीदृष्टीनें ॥ १५ ॥
येखादें मनुष्य तें सिळें । त्याचें करणें चि बावळें ।
नाना विकल्पाचें जाळें करून टाकी ॥ १६ ॥

---

१ ही ओवी समासात मागाहून लिहिलेली आहे परंतु पुढील ओव्याचे अंक बदलले नाहींत. २ सहज रीतीनें किंवा तेजानें, प्रभावानें.

आपणासी उकलेना । दुसऱ्यास कांहीं च कळेना ।
नाचे विकल्पें कल्पना । ठाईं ठाईं ॥ १७ ॥
त्या गुप्त कल्पना कोणास कळाव्या । कोणें येऊन अटोपाव्या ।
ज्याच्या त्यानें कराव्या । बळकट-बुद्धि ॥ १८ ॥
ज्यासी उपाधी आवरेना । तेणें उपाधी वाढवावीना ।
सावचित करूनियां मना । समाधानें असावें ॥ १९ ॥
धावधांवीं उपाधी वेष्टी । आपण कष्टी लोक हि कष्टी ।
हे कामा नये गोष्टी । कुसमुसेची ॥ २० ॥
लोक बहुत कष्टी जाला । आपण हि अत्यंत त्रासला ।
वेर्थ चि केला गल्बला । कासयासी ॥ २१ ॥
असो उपाधीचें काम ऐसें । काहीं बरें कांहीं काणोसें[१] ।
सकळ समजोन ऐसें । वर्ततां बरें ॥ २२ ॥
लोकांपासीं भावार्थ कैचा । आपण जगवावा तयांचा ।
सेवट उपंढेर[२] कोणाचा । पडों चि नये ॥ २३ ॥
अतरात्म्याकडे सकळ लागे । निर्गुणीं हें कांहीं च न लगे ।
नाना प्रकारीचे दगे । चंचळामधें ॥ २४ ॥
शुद्ध विश्रांतीचें स्थळ । तें येक निर्मळ निश्चळ ।
तेथें विकार चि सकळ । निर्विकार होती ॥ २५ ॥
उद्वेग अवघे तुटोनी जाती । मनासी वाटे विश्रांती ।
ऐसी दुल्लभ परब्रह्मस्थिती । विवेकें साभाळावी ॥ २६ ॥
आपणास उपाधी मुळीं च नाहीं । रुणानबधें मिळाले सर्व हि ।
आल्यागेल्याची क्षिती नाहीं । ऐसें जालें पाहिजे ॥ २७ ॥
जो उपाधीस कंटाळला । तो निवांत होऊन बैसला ।
आटोपेना तो गल्बला । कासयासी ॥ २८ ॥
कांहीं गल्बला कांहीं निवळ । ऐसा कंठीत जावा काळ ।
जेणेंकरितां विश्राती वेळ । आपणासी फावे ॥ २९ ॥

---

१ वांकडें. २ ढोंगाची उघडकी ; फजिती.

उपाधी कांहीं राहात नाहीं । समाधानायेवढें थोर नाहीं ।
नरदेहे प्राप्त होत नाहीं । क्षणक्षणा ॥ ३० ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे उपाधीलक्षणनिरूपणनाम समास ॥८॥

---

॥ श्रीरामसमर्थ ॥

ज्ञानी आणी उदास । समुदायाचा हव्यास ।
तेणें अखंड सावकाश । येकांत सेवावा ॥ १ ॥
जेथें तजवीजा कळती । अखंड चाळणा निघती ।
प्राणीमात्राची स्थिती गती । कळों येते ॥ २ ॥
जरी हा चाळणा चि करीना । तरी कांहीं च उमजेना ।
हिसेबझाडा चि पाहीना । दिवाळखोर ॥ ३ ॥
येक मिरासी साधिती[1] । येक सींध्या गर्वाविती[2] ।
व्यापकपणाची स्थिती । ऐसी आहे ॥ ४ ॥
जेणें जें जें मनीं धरिलें । तें तें आधीं च समजलें ।
कृत्रिम अवघें चि खुंटलें[3] । सहज चि येणें ॥ ५ ॥
अखंड राहतां सलगी होते । अतिपरिचयें अवज्ञा घडते ।
याकारणें विश्रांती[4] ते । घेतां नये ॥ ६ ॥
आळसें आळस केला । तरी मग कारबार चि बुडाला ।
अंतरहेत चुकत गेला । समुदायाचा ॥ ७ ॥
उदंड उपासनेचीं कामें । लावीत जावीं नित्यनेमें ।
अवकाश कैंचा कृत्रिमें । करावयासी ॥ ८ ॥
चोर भांडारी करावा । घसरतां च सांभाळावा ।
गोवा मूर्खपणाचा काढावा । हळु हळु ॥ ९ ॥

---

१ सिद्ध झालेल्या, साधलेल्या, मिळविलेल्या. सोनेरी प्रतींत " थित्या " असा पाठ आहे. थित्या ह्मणजे असलेल्या. २ गमाविती. ३ दुसऱ्यानें मनांत आणलेलें कृत्रिम जर आधीं च उमजलें तर तो कृत्रिम काय करणार ? ४ या साठीं एका ठिकाणीं च राहू नये.

या अवघ्या पहिल्या च गोष्टी । प्राणी कोणी नव्हता कष्टी ।
राजकारणें मंडळ वेष्टी । चहुंकडे ॥ १० ॥
नष्टासी नष्ट योजावे । वाचाळासी वाचाळ आणावे ।
आपणावरी विकल्पाचे गोवे । पडों च नेदी ॥ ११ ॥
कांटीनें कांटी झाडावी । झाडावी परी ते कळों नेदावी ।
कळकटेपणाची पदवी । असों द्यावी ॥ १२ ॥
न कळतां करी कार्य जें तें । तें काम तत्काळ चि होतें ।
गचगचेंत पडतां तें । चमत्कारें नव्हे ॥ १३ ॥
ऐकोनी आवडी लागावी । देखोनी बळकट चि व्हावी ।
सलगीनें आपली पदवी । सेवकामधें ॥ १४ ॥
कोणीयेक काम करिता होतें । न करिता तें मागें पडतें ।
या कारणें ढिलेपण तें । असों चि नये ॥ १५ ॥
जो दुसऱ्यावरी विश्वासला । त्याचा कार्यभाग बुडाला ।
जो आपण चि कष्टत गेला । तो चि भला ॥ १६ ॥
अवघ्यास अवघें कळलें । तेव्हां तें रितें पडिलें ।
याकारणें ऐसें घडलें । न पाहिजे कीं ॥ १७ ॥
मुख्य सूत्र हातीं घ्यावें । करणें तें लोकाकरवीं करवावें ।
कित्तेक खेळक उगवावे । राजकारणामधें ॥ १८ ॥
बोलके पहिलवान कळकटे । तयासी च घ्यावे झटे ।
दुर्जनें राजकारण दाटे । ऐसें न करावें ॥ १९ ॥

---

१ ह्या गोष्टी कांहीं नवीन नाहींत, त्या पूर्वींच्या च आहेत. २ कोणाला हि कष्टी न करिता राजकारणामध्यें सर्व लोकांना गोवून घ्यावें. ३ भांडखोरपणाची पदवी जेथल्या तेथें च असूं द्यावी ह्मणजे भांडखोरपणा करूं नये, असा अर्थ कित्येक करितात व कार्य करून हि तें कोण करतो हे कळूं न देतां, आपण आपल्याकडे अजागळपणा घ्यावा असा अर्थ कोणी करतात. ४ जें कार्य करावयाचें असतें तें जर, सर्वांना कळलें तर तें कार्य होत नाहीं. तात्पर्य, ज्याच्यापासून जितकें काम घ्यावयाचें असेल तितकी च माहिती त्याला द्यावी. ५ कारस्थानी लोक ६ राजकारणामध्यें ज्याचा जितका उपयोग होण्यासारखा असेल तितका करून घ्यावा.

श्रीमण्य वर्मी सांपडावें । रगडून पीठ चि करावें ।
करूनि मागुती सांवरावें । बुडऊं नये ॥ २० ॥
खळदुर्जनासी भ्यालें । राजकारण नाहीं राखिलें ।
तेणें अवघें प्रगट जालें । बरें वाईट ॥ २१ ॥
समुदाव पाहिजे मोठा । तरी तनावा असाव्या बळकटा ।
मठ करुनी ताठा । धरूं नये ॥ २२ ॥
दुर्जन प्राणी समजावे । परी ते प्रगट न करावे ।
सज्जनापरीस आळवावे । महत्त्व देउनी ॥ २३ ॥
जनामधें दुर्जन प्रगट । तरी मग अखंड खटखट ।
याकारणें ते वाट । बुझूनि टाकावी ॥ २४ ॥
गनीमाच्या देखतां फौजा । रणशूरांच्या फुर्फुरिती भुजा ।
ऐसा पाहिजे कीं राजा । कैपक्षी परमार्थी ॥ २५ ॥
तयास देखतां दुर्जन धाके । बैसवी प्रचीतीचे तडाखे ।
बंडपाषांडाचे वाखे । सहज चि होती ॥ २६ ॥
हे धूर्तपणाचीं कामें । राजकारण करावें नेमें ।
ढिलेपणाच्या संभ्रमें । जाऊं नये ॥ २७ ॥
कोठें च पडेना दृष्टीं । ठाईं ठाईं त्याच्या गोष्टी ।
वाग्विळासें सकळ सृष्टी । वेधिली तेणें ॥ २८ ॥
हुंब्यासीं हुंबा लाऊन द्यावा । टोणप्यास टोणपा आणावा ।
लौंदास पुढें उभा करावा । दुसरा लौंद ॥ २९ ॥
धटासी आणावा धट । उत्धटासी पाहिजे उत्धट ।
खटनटासी खटनट । अगत्य करी ॥ ३० ॥
जैशास तैसा जेव्हां भेटे । तेव्हां मज्यालसी थाटे ।
इतुकें होतें परी धनी कोठें । दृष्टीस न पडे ॥ ३१ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे राजकारणनिरूपणनाम समास नवम ॥९॥

---

१ तट. २ ताणदोर, खेंच, पुरवठा, आक्रमणशक्ति. ३ कैवारी. ४ वाखे होतीं = नाहींसे होतात.

॥ श्रीरामसमर्थ ॥

जेथें अखंड नाना चाळणा । जेथें अखंड नाना धारणा ।
जेथें अखंड राजकारणा । मनासी आणिती ॥ १ ॥
सृष्टीमधें उत्तम गुण । तितुकें चाले निरूपण ।
निरूपणाविण क्षण । रिकामा नाहीं ॥ २ ॥
चर्चा आशंका प्रत्योत्तरें । कोण खोटें कोण खरें ।
नाना वग्त्रुत्वें शास्त्राधारें । नाना चर्चा ॥ ३ ॥
भक्तिमार्ग विशद कळे । उपासनामार्ग आकळे ।
ज्ञानविचार निवळे । अंतर्यामीं ॥ ४ ॥
वैराग्याची बहु आवडी । उदास वृत्तीची गोडी ।
उदंड उपाधी तरी सोडी । लागों च नेदी ॥ ५ ॥
प्रबंदाचीं पाठांतरें । उत्तरासी सगीत[1] उत्तरें ।
नेमक बोलता अतरें । निवती सकळांचीं ॥ ६ ॥
आवडी लागली बहु जना । तेथें कोणाचें काहीं चालेना[2] ।
दळवटें[3] पडिला अनुमाना । येईल कैसा ॥ ७ ॥
उपासना करूनिया पुढें । पुरवलें[5] पाहिजे चहुकडे ।
भूमंडळीं जिकडे तिकडे । जाणती तया ॥ ८ ॥
जाणती परी आडळेना । काये करितो[4] तें कळेना ।
नाना देसीचे लोक नाना । येऊन जाती ॥ ९ ॥
तितुक्यांचीं अंतरें धरावीं । विवेकें विचारें भरावीं ।
कडोविकडीचीं[6] विवरावीं । अंतःकर्णें ॥ १० ॥
किती लोक तें कळेना । किती समुदाव आकळेना ।
सकळ लोक श्रवणमनना । मध्यें घाली ॥ ११ ॥
फड समजाविसी करणें । गद्यपद्य सांगणें ।
परांतरासी राखणें । सर्वकाळ ॥ १२ ॥

---

१ समर्पक २ लोकांचें ज्याच्यावर प्रेम बसलें असतें त्याच्यापुढें कोणाचें कांहीं चालत नाहीं. ३ समुदाय, वरदळ. ४ त्याच्याकडे पुष्कळ लोक येतात, परंतु त्याच्या अंतःस्वरूपाचें अनुमान कोणास होत नाहीं. ५ उपासनेला पुढें करून जो सर्वत्र पुरून उरतो, ह्मणजे उपासनेसाठीं जो सर्वत्र परिभ्रमण करितो. ६ खुबीनें, उत्कट रीतीनें.

ऐसा ज्याचा दंडक । अखंड पाहाणें विवेक ।
सावधापुढें अविवेक । येईल कैचा ॥ १३ ॥
जितुकें कांहीं आपणासी ठावें । तितुकें हळुहळु सिकवावें ।
शाहाणे करूनि सोडावे । बहुत जन ॥ १४ ॥
परोपरीं सिकवणें । आडणुका सागत जाणें ।
निवळ करुनी सोडणें । निस्पृहासी ॥ १५ ॥
होईल तें आपण करावें । न होतां जनाकरवीं करवावें ।
भगवद्भजन राहावें । हा धर्म नव्हे ॥ १६ ॥
आपण करावें करवावें । आपण विवरावें विवरवावें ।
आपण धरावें धरवावें । भजनमार्गासी ॥ १७ ॥
जुन्या लोकांचा कंटाळा आला । तरी नूतन प्रांत पाहिजे धरिला ।
जितुकें होईल तितुक्याला । आळस करूं नये ॥ १८ ॥
देहाचा अभ्यास बुडाला । म्हणिजे महंत बुडाला ।
लागवेगें नूतन लोकांला । शाहाणे करावें ॥ १९ ॥
उपाधींत सांपडों नये । उपाधीस कंटाळों नये ।
निसुगपण कामा नये । कोणीयेकविषीं ॥ २० ॥
काम नासणार नासतें । आपण वेडें उगें च पाहातें ।
आळसी हृदयसुन्य तें । काये करूं जाणे ॥ २१ ॥
धकाधकीचा मामला । कैसा घडे अशक्ताला ।
नाना बुद्धि शक्ताला । म्हणोनी सिकवाव्या ॥ २२ ॥
व्याप होईल तों राहावें । व्याप राहाता उठोन जावें ।
आनंदरूप फिरावें । कोठें तऱ्ही ॥ २३ ॥
उपाधीपासुनी सुटला । तो निस्पृहपणें बळावला ।
जिकडे अनकूळ तिकडे चालिला । सावकास ॥ २४ ॥
कीर्ति पाहाता सुख नाहीं । सुख पाहाता कीर्ति नाहीं ।
केल्याविण कांहीं च नाहीं । कोठें तऱ्ही ॥ २५ ॥

---

१ प्रथम "साहे" होतें, तें खोडून समासांत "शाहाणे" लिहिलें आहे.

येरवीं काय राहातें । होणार तितुकें होऊन जात ।
प्राणी मात्र अशक्त तें । पुढें आहे ॥ २६ ॥
आधीं च तकवा सोडिला । मधें चि धीवसा सांडिला ।
तरी संसार हा सेवटाला । कैसा पावे ॥ २७ ॥
संसार मुळीं च नासका । विवेकें करावा नेटका ।
नेटका करितां फिका । होत जातो ॥ २८ ॥
ऐसा याचा जिनसानां । पाहातां कळों येतें मना ।
परंतु धीर सांडावाना । कोणीयेकें ॥ २९ ॥
धीर सांडिता काये होतें । अवघें सोसावें लागतें ।
नाना बुद्धि नाना मतें । शाहाणा जाणे ॥ ३० ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे विवेकलक्षणनिरूपणनाम समास दाहावा ॥

---

## ॥ विसावा पूर्ण दशक ॥ २० ॥

॥ श्रीराम ॥

प्राणी व्यापक मन व्यापक । पृथ्वी आप तेज व्यापक ।
वायो आकाश त्रिगुण व्यापक । अंतरात्मा मूळमाया ॥ १ ॥
निर्गुण ब्रह्म तें व्यापक । ऐसें अवघें च व्यापक ।
तरी हें सगटे किं काये येक । भेद आहे ॥ २ ॥
आत्मा आणि निरंजन । येणें हि वाटतो अनुमान ।
आत्मा सगुण किं निर्गुण । आणि निरंजन ॥ ३ ॥
श्रोता संदेहीं पडिला । तेणें संदेह वाढला ।
अनुमान धरून बैसला । कोण तो कैसा ॥ ४ ॥

---

१ व्हावयाचें तें होतें च, परंतु मनुष्य मात्र विनाकारण आपल्याकडे दुर्बळपण घेतो. २ नेटका केला तरी तो फिका पडतो. ३ जिन्नसमासला, प्रकृति, स्वभाव. ४ जयराम, सोनेरी, मुद्गल व उंब्रज या चारी प्रतींत हि "प्राणी" असा च पाठ आहे; व तो च बरोबर आहे असें पुढील साहव्या ओवीवरून हि ठरतें. ५ सर्व सारखे च ६ "ढ" चा "ट" केला आहे ७ आत्म्याला निरंजन म्हणतात याबद्दल संशय वाटतो.

ऐका पहिली आशंका । अवघा गल्बला करूं नका ।
प्रगट करून विवेका । प्रत्यये पाहावा ॥ ५ ॥
शरीरपाडें सामर्थ्यपाडें । प्राणी व्याप करी सिवाडें ।
परी पाहाता मनायेवढें । चपळ नाहीं ॥ ६ ॥
चपळपण येकदेसी । पूर्ण व्यापकता नव्हे त्यासी ।
पाहातां पृथ्वीच्या व्यापासी । सीमा आहे ॥ ७ ॥
तैसें चि आप आणि तेज । अपूर्ण दिसती सहज ।
वायो चपळ समज । येकदेसी ॥ ८ ॥
गगन आणि निरंजन । तें पूर्ण व्यापक सघन ।
कोणीयेक अनुमान । तेथें असेचिना ॥ ९ ॥
त्रिगुण गुणक्षोभिणी माया । माईक जाईल विलया ।
अपूर्ण येकदेसी तया । पूर्ण व्यापकता न घडे ॥ १० ॥
आत्मा आणि निरंजन । हें दोहिकडे नामाभिधान ।
अर्थान्वये समजोन । बोलणें करावें ॥ ११ ॥
आत्मा मन अत्यंत चपळ । तरी हें व्यापक नव्हे चि केवळ ।
सुचित अंतःकर्ण निवळ । करून पाहावें ॥ १२ ॥
अंतराळीं पाहातां पाताळीं नाहीं । पाताळीं पाहातां अंतराळीं नाहीं ।
पूर्णपणें वसत नाहीं । चहुकडे ॥ १३ ॥
पुढें पाहातां मागें नाहीं । मागें पाहाता पुढें नाहीं ।
वाम सव्य व्याप नाहीं । दशदिशा ॥ १४ ॥
चहुकडे निशाणें माडावीं । येकसरीं कैसीं सिवावीं ।
याकारणें समजोन उगवी । प्रत्ययें आपणासी ॥ १५ ॥
सूर्य आला प्रतिबिंबलीं । हा हि दृष्टांत न घडे वस्तुला ।
वस्तुरूप निर्गुणाला । ह्मणिजेत आहे ॥ १६ ॥

---

१ लहान, मोठें, जसें शरीर आणि सामर्थ्य असेल त्या मानानें, शरीरानुसार व सामर्थ्यानुसार. २ आत्मा आणि निरंजन हीं नावें जीव आणि शिव या उभयतांना आहेत, तेव्हां कोणत्या ठिकाणीं कोणत्या अर्थानें त्यांचा प्रयोग केला आहे तो संदर्भा-वरून जाणावा ३ सूर्य उदयाला आल्यावर त्याचें प्रतिबिंब जलादिकाचे ठिकाणीं पडतें व ब्रह्माचें प्रतिबिंब जीव आहे, ह्मणून ब्रह्माला सूर्याचा दृष्टान्त द्यावा तर तो कमकस आहे, कारण, सूर्याला अस्त आहे तसा ब्रह्माला नाहीं.

घटाकाश मठाकाश । हा हि दृष्टांत विशेष ।
तुळूं जातां निर्गुणास । साम्यता येते ॥ १७ ॥
ब्रह्मींचा अंश आकाश । आणी आत्म्याचा अंश मानस ।
दोहींचा अनुभव प्रत्ययास । येथें घ्यावा ॥ १८ ॥
गगन आणी हें मन । कैसे होती समानें ।
मननसीळ माहाजन । सकळ हि जाणती ॥ १९ ॥
मन हें पुढें धावडे । मागें आवघें चि रितें पडे ।
पूर्ण गगनास साम्यता घडे । कोण्या प्रकारें ॥ २० ॥
परब्रह्म हि अचळ । आणि पर्वतास हि ह्मणती अचळ ।
दोनी हि येक केवळ । हें कैसें ह्मणावें ॥ २१ ॥
ज्ञान अज्ञान विपरीतज्ञान । तिनी कैसीं होती समान ।
याचा प्रत्ययो मनन । करून पाहावा ॥ २२ ॥
ज्ञान ह्मणिजे जाणणें । अज्ञान ह्मणिजे नेणणें ।
विपरीतज्ञान ह्मणिजे देखणें । येकाचें येक ॥ २३ ॥
जाणणें नेणणें वेगळें केलें । ढोबळें पंचभूतिक उरलें ।
विपरीतज्ञान समजलें । पाहिजे जीवीं ॥ २४ ॥
द्रष्टा साक्षी अंतरात्मा । जीवात्मा चि होये शिवात्मा ।
पुढें शिवात्मा तो चि जीवात्मा । जन्म घेतो ॥ २५ ॥
आत्मत्वीं जन्ममरण लागे । आत्मत्वीं जन्ममरण न भंगे ।
संभवामि युगे युगे । ऐसें हें वचन ॥ २६ ॥

---

१ सूर्याचा दृष्टांत बरोबर लागूं पडत नाहीं, परंतु आकाशाचा दृष्टांत मात्र त्याहून ज्यास्त कसोटीला उतरतो. आकाशाची आणि निर्गुणाची तुलना केली तर त्यांच्यांत साम्यता दिसून येते. २ ब्रह्मापासून आकाश व आत्म्यापासून मन. यांत मनाची व आकाशाची बरोबरी होत नाहीं ( तर मग आकाशाचें वडील जें ब्रह्म त्याची बरोबरी मनाला कशी होणार ? ) ३ " न घडे " अशीं अक्षरें पडलीं होतीं, त्यांतील " न "ला हरताळ लाविली आहे ४ आपणांस पंचभूतात्मक जो पसारा दिसत आहे, हें ज्ञान हि नव्हे व अज्ञान हि नव्हे, तर तें विपरीतज्ञान होय; कारण तें आहे एक व आपणांस दिसत आहे भलतें च. ५ द्रष्टा ह्मणजे साक्षी ह्मणजे अंतरात्मा ह्मणजे जीवात्मा, तो च शिवात्म्याला मिळतो ६ .जीवात्म्याच्या ठिकाणीं जन्ममरण संभवतें.

जीव येकदेसी नर । विचारें जाला विश्वंभर ।
विश्वभरास ससार । चुकेना कीं ॥ २७ ॥
ज्ञान आणी अज्ञान । वृत्तिरूपें हें समानें ।
निवृत्तिरूपें विज्ञान । जालें पाहिजे ॥ २८ ॥
ज्ञानें येवढें ब्रह्माड केलें । ज्ञानें येवढें वाढविलें ।
नाना विकाराचें वळलें । तें हें ज्ञानें ॥ २९ ॥
आठवें देह ब्रह्माडीचें । तें हें ज्ञान साचें ।
विज्ञानरूप विदेहाचें । पद पाविजे ॥ ३० ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे पूर्णापूर्णनिरूपणनाम समास प्रथम ॥ १ ॥

---

॥ श्रीराम ॥

मूळमाया नस्ता चचळ । निर्गुण ब्रह्म तें निश्चळ ।
जैसें गगन अंतराळ । चहुकडे ॥ १ ॥
दृश्य आलें आणि गेलें । परी तें ब्रह्म संचलें ।
जैसें गगन कोंदाटलें । चहुकडे ॥ २॥
जिकडे पाहावें तिकडे अपार । कोणेकडे नाहीं पार ।
येकजिनसी स्वतंत्र । दुसरें नाहीं ॥ ३ ॥
ब्रह्मांडावरतें बैसावें । अवकाश भकास अवलोकावें ।
तेथें चचळ व्यापकाच्या नावें । सुन्याकार ॥ ४ ॥
दृश्य विवेकें काढिलें । मग परब्रह्म कोंदाटलें ।
कोणासी च अनुमानलें । नाहीं कदा ॥ ५ ॥

---

१ ब्रह्माडाची उपाधि धारण करणारा जो ईश्वर त्याचा, हें सारें ब्रह्मांड हा संसार च होय. २ ज्ञान ही एक वृत्ति आहे व अज्ञान हि वृत्ति च आहे, तेव्हां ज्ञान आणि अज्ञान हीं वृत्तिरूप असल्यामुळें समान च ह्मणावयाचीं. ३ ज्ञान हें विकारात्मक च होय. ४ पिंडातील चारी देह हे अनुक्रमें ब्रह्माडांतील चारी देहांशीं अनुरूप असल्यामुळें ज्ञान ह्मणजे हि माया च होय. त्या ज्ञानाचें विज्ञान झालें पाहिजे. ५ ब्रह्माडाच्या पलिकडे जाऊन पहावें; ब्रह्माड नाहीं अशी कल्पना करून पहावें. ६ अनुमान मनानें होणार, तें मन आहे एकदेशी व ब्रह्म आहे पूर्ण व्यापक, त्यामुळें ब्रह्माचें अनुमान कोणाला च होत नाहीं.

अधोर्ध पाहातां चहुंकडे । निर्गुण ब्रह्म जिकडे तिकडे ।
मन धांवेल कोणेकडे । अंत पाहावया ॥ ६ ॥
दृश्य चळे ब्रह्म चळेना । दृश्य कळे ब्रह्म कळेना ।
दृश्य आकळे ब्रह्म आकळेना । कल्पनेसी ॥ ७ ॥
कल्पना ह्मणिजे कांहीं च नाहीं । ब्रह्म दाटलें ठाइंचा ठाइं।
वाक्यार्थ[1] विवरत जाइं । ह्मणिजे बरें ॥ ८ ॥
परब्रह्मायेवढें थोर नाहीं । श्रवणापरतें साधन नाहीं ।
कळल्याविण कांहीं च नाहीं । समाधान ॥ ९ ॥
पिप्लीकामार्गें हळु हळु घडे । विहंगमें फळासी गांठी पडे ।
साधक मननीं पवाडे । ह्मणिजे बरें ॥ १० ॥
परब्रह्मासारिखें दुसरें । कांहीं च नाहीं खरें ।
निंदा आणी स्तुतिउत्तरें । परब्रह्मीं नाहीं ॥ ११ ॥
ऐसें परब्रह्म येकजिनसी । कांहीं च तुळेना तयासी ।
मानुभवें[2] पुण्यरासी । तेथें पवाडती ॥ १२ ॥
चंचळें होते दुःखप्राप्ती । निश्चळायेवढी नाहीं विश्रांती ।
निश्चळ प्रत्ययें पाहाती । माहानुभाव ॥ १३ ॥
मुळापासून सेवटवरी । विचारणा केली च करी ।
प्रत्ययाचा निश्चयो अंतरीं । तयासी च फावे ॥ १४ ॥
कल्पनेची सृष्टी जाली । त्रिविधें[3] प्रकारें भासली ।
तिक्षण बुद्धीनें आणिली । पाहिजे मना ॥ १५ ॥
मूळमायेपासून त्रिगुण । अवघें येकदेसी लक्षण ।
पांचा भूतांचा ढोवळा[4] गुणें । दिसत आहे ॥ १६ ॥
पृथ्वीपासून च्यारी खाणी । चत्वार वेगळाली करणी ।
सकळ सृष्टीची चाली येथुनी । पुढें नाहीं ॥ १७ ॥

---

१ महावाक्याचा अर्थ. २ महानुभाव ३ सृष्टि तीन प्रकारची आहे ह्मणजे तिच्या तीन पायऱ्या आहेत :– (१) मूळमायेपासून तों त्रिगुणापर्यंत, (२) त्रिगुणापासून तों पृथ्वीपर्यंत, (३) पृथ्वीपासून तों चारी खाणी, चारी वाणीपर्यंत. ४ स्पष्ट दशेला पावलेलीं पंचभूतें.

सृष्टीचें विविध लक्षण । विशद करूं निरूपण ।
श्रोतीं सुचित अंतःकर्ण । केलें पाहिजे ॥ १८ ॥
मूळमाया जाणीवेची । मुळीं सूक्ष्म कल्पनेची ।
जैसी स्थिती परे वाचेची । तद्रूप चि ते ॥ १९ ॥
अष्टधा प्रकृतीचें मूळ । ते हे मूळमाया च केवळ ।
सूक्ष्मरूप बीज सकळ । मुळीं च आहे ॥ २० ॥
जड पदार्थ चेतवितें तें । ह्मणौन चैतन्य बोलिजेतें ।
सूक्ष्म रूपें सकेतें । समजोन घ्यावीं ॥ २१ ॥
प्रकृतिपुरुषाचा विचार । अर्धनारीनटेश्वर ।
अष्टधा प्रकृतीचा विचार । सकळ कांहीं ॥ २२ ॥
गुप्त त्रिगुणाचें गूढत्व । ह्मणौन संकेत महत्तत्व ।
गुप्तरूपें शुद्धसत्व । तेथें चि वसे ॥ २३ ॥
जेथून गुण प्रगटती । तीस गुणक्षोभिणी ह्मणती ।
त्रिगुणाचीं रूपें समजती । धन्य ते साधु ॥ २४ ॥
गुप्तरूपें गुणसौम्य । ह्मणौनि बोलिजे गुणसाम्य ।
सूक्ष्म संकेत अगम्य । बहुतांस कैंचा ॥ २५ ॥
मूळमायेपासून त्रिगुण । चचळ येकदेसी लक्षण ।
प्रत्ययें पाहातां खूण । अंतरीं येते ॥ २६[1] ॥
पुढें पंचभूतांचीं बंडें । वाढलीं विशाळें उदडें ।
सप्तद्वीपें नवखडें । वसुंधरा हे ॥ २७ ॥
त्रिगुणापासून पृथ्वीवरी । दुसऱ्या जिनसाऱ्याची पैरी ।
दोनी जिनस याउपरी । तिसरा ऐका ॥ २८ ॥

---

१ " करून " होतें, त्यातील " न " ला हरताळ लाविली आहे. २ जाणीवरूप मूळमाया ह्मणजे ब्रह्माच्या ठिकाणीं " एकोऽहं बहु स्याम् " ही जी प्रथम स्फूर्ति झाली ती. नाभिस्थानीं परा वाणीचें जसें प्रथम स्फुरण होतें, तद्वत् ब्रह्माच्या ठिकाणीं मायेचें प्रथम स्फुरण होतें. ३ प्रकार, पायरी.

पृथ्वी नाना जिनसाचें बीज । अंडज जारज श्वेतज उद्भिज ।
च्यारी खाणी च्यारी वाणी सहज । निर्माण जाल्या ॥ २९ ॥
खाणी वाणी होती जाती । परन्तु तैसी च आहे जगती ।
ऐसे होती आणी जाती । उदंड प्राणी ॥ ३० ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सृष्टित्रिविधलक्षणनिरूपणनाम समास॥२॥

---

॥ श्रीराम ॥

मुळींहून सेवटवरी । विस्तार बोलिला नानापरी ।
पुन्हां विवरत विरतें माघारी । वृत्ति न्यावी ॥ १ ॥
च्यारी वाणी च्यारी खाणी । चौऱ्यासि लक्ष जीवयोनी ।
नाना प्रकारीचे प्राणी । जन्मास येती ॥ २ ॥
अवघे होती पृथ्वीपासुनी । पृथ्वीमधें जाती नासोनी ।
अनेक येती जाती परी अवनी । तैसी च आहे ॥ ३ ॥
ऐसें हें सेंड्याकडिल खाडें । दुसरें भूतांचें बंडें ।
तिसरें नामाभिधानें उदंड । सूक्ष्मरूपें ॥ ४ ॥
स्थूळ अवघें सांडून द्यावें । सूक्ष्मरूपें वोळखावें ।
गुणापासून पाहिलें च पाहावें । सूक्ष्मदृष्टीं ॥ ५ ॥
गुणाचीं रूपें जाणीव नेणीव । पाहिला च पाहावा अभिप्राव ।
सूक्ष्मदृष्टीचें लाघव । येथून पुढें ॥ ६ ॥
शुद्ध नेणीव तमोगुण । शुद्ध जाणीव सत्वगुण ।
जाणीवनेणीव रजोगुण । मिश्रित चालिला ॥ ७ ॥
त्रिगुणाचीं रूपें ऐसीं । कळों लागलीं अपैसीं ।
गुणापुढील कर्दमासी । गुणक्षोभिणी बोलिजे ॥ ८ ॥

---

१ "हें" चा "न्हा" केला आहे २ लीन होत होत. ९।२।३४ पहा. ३ भाग. मागच्या समासांत ज्या तीन पायऱ्या सांगितल्या त्यांतील शेवटची पायरी, म्हणजे चारी खाणी चारी वाणी. ४ त्यावरची पायरी पंचभूताची. ५ त्या पंचभूताच्या वरची पायरी मूळमायेपासून तों त्रिगुणापर्यंतची. हीं सूक्ष्म आहेत व त्यांचीं नाना तऱ्हेचीं नांवें आहेत.

रज तम आणि सत्व । तिहींचें जेथें गूढत्व ।
तें जाणिजे महत्तत्व । कर्दमरूप ॥ ९ ॥
प्रकृति पुरुष शिवशक्ती । अर्धनारीनटेश्वर ह्मणती ।
परी याची स्वरूपस्थिती । कर्दमरूप ॥ १० ॥
सूक्ष्मरूपें गुणसौम्य । त्यास बोलिजे गुणसाम्य ।
तैसें चि चैतन्य अगम्य । सूक्ष्मरूपी ॥ ११ ॥
बहुजिनसी मूळमाया । माहांकारण ब्रह्मांडीची काया ।
ऐसिया सूक्ष्म अन्वया । पाहिलें चि पाहावें ॥ १२ ॥
च्यारी खाणी पांच भूतें । चौदा सूक्ष्म संकेतें ।
काये पाहाणें तें येथें । शोधून पाहावें ॥ १३ ॥
आहाच पाहातां कळेना । गरज केल्यां समजेना ।
नाना प्रकारीं जनाच्या मना । संदेह पडती ॥ १४ ॥
चौदा पांचै येकोणीस । येकोणीस च्यारी तेविस ।
यांमधें मूळ चतुर्दश । पाहिलें चि पाहावें ॥ १५ ॥
जो विवरोन समजला । तेथें संदेह नाहीं उरला ।
समजल्याविण जो गल्बला । तो निरार्थक ॥ १६ ॥
सकळ सृष्टीचें बीज । मूळमायेंत असे सहज ।
अवघें समजतां सज्ज । परमार्थ होतो ॥ १७ ॥
समजलें माणुस चावळेना । निश्चइ अनुमान धरीना ।
सावळगोंदा करीना । परमार्थ कदा ॥ १८ ॥
शब्दातीत बोलतां आलें । त्यास वाच्यांश बोलिलें ।
शुद्ध लक्ष्यांश लक्षिलें । पाहिजे विवेकें ॥ १९ ॥
पूर्वपक्ष ह्मणिजे माया । सिद्धांतें जाये विलया ।
माया नस्तां मग तया । काये ह्मणावें ॥ २० ॥

---

१ सूक्ष्म मूळमायेचीं चौदा नांवें. कोणी चौदा ब्रह्म असा अर्थ करितात, परंतु पुढील समास ५ व ९ वाचतां मूळमायेचीं चौदा नांवें असा च अर्थ इष्ट वाटतो. २ मूळमायेचीं चौदा नांवें. ३ पंचभूतें. ४ चारी खाणी

अन्वये आणी वीतरेक । हा पूर्वपक्षाचा विवेक ।
सिद्धांत ह्मणिजे शुद्ध येक । दुसरें नाहीं ॥ २१ ॥
अधोमुखें भेद वाढतो । ऊर्धमुखें भेद तुटतो ।
निःसंगपणें निर्गुणी तो । माहांयोगी ॥ २२ ॥
माया मिथ्या ऐसी कळली । तरी मग भीड कां लागली ।
मायेचे भिडेनें वसरली । स्वरूपस्थिती ॥ २३ ॥
लटके मायेनें दपटावें । सत्य परब्रह्म सांडावें ।
मुख्य निश्चयें हिंडावें । कासयांसी ॥ २४ ॥
पृथ्वीमधें बहुत जन । त्यामध्यें असती सज्जन ।
परी साधूस वोळखतो कोण । साधुवेगळा ॥ २५ ॥
ह्मणौन संसार सांडावा । मग साधूचा शोध घ्यावा ।
फिरफिरों ठाइं पाडावा । साधुजन ॥ २६ ॥
उदंड हुडकावे संत । सांपडे प्रचितीचा महंत ।
प्रचितीविण स्वहित । होणार नाहीं ॥ २७ ॥
प्रपंच अथवा परमार्थ । प्रचितीविण अवघें वेर्थ ।
प्रत्ययेज्ञानी तो समर्थ । सकळांमध्यें ॥ २८ ॥
रात्रदिवस पाहावा अर्थ । अर्थ पाहेल तो समर्थ ।
परलोकींचा निजस्वार्थ । तेथें चि घडे ॥ २९ ॥
ह्मणौन पाहिलें चि पाहावें । आणि शोधिलें चि शोधावें ।
अवघें कळतां स्वभावें । संदेह तुटती ॥ ३० ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सूक्ष्मनामाभिधाननाम समास ॥ ३ ॥

॥ श्रीराम ॥

सकळ जनास प्रार्थना । उगें च उदास करावेंना ।
निरूपण आणावें मना । प्रत्ययाचें ॥ १ ॥

---

१ मायेकडे पाहिलें तर. २ ब्रह्माकडे पाहिलें तर. ३ ब्रह्मस्वरूपाचा निश्चय झाल्यावर मग वणवण करीत संशयखोराप्रमाणें कां हिंडावें ?

प्रत्यये राहिला येकेंकडे । आपण धावतो भलतेकडे ।
तरी सारासाराचे निवाडे । कैसे होती ॥ २ ॥
उगि च पाहाता सृष्टी । गल्बला दिसतो दृष्टीं ।[1]
परी ते राजसत्तेची गोष्टी । वेगळी च ॥ ३ ॥
पृथ्वीमधें जितुकीं शरीरें । तितुकीं भगवंताचीं घरें ।
नाना सुखें येणें द्वारें । प्राप्त होती ॥ ४ ॥
त्याचा महिमा कळेल कोणाला । माता वांटून कृपाळु जाला ।[2]
प्रत्यक्ष जगदीश जगाला । रक्षितसे ॥ ५ ॥
सत्ता पृथ्वीमध्यें वांटली । जेथें तेथें विभागली ।
कळेनें सृष्टि चालिली । भगवंताचे ॥ ६ ॥[3]
मूळ जाणत्या पुरुषोंची सत्ता । शरीरीं विभागली तत्वता ।[4]
सकळ कळा चातुर्यता । तेथें वसे ॥ ७ ॥
सकळ पुराचा ईश । जगामध्यें तो जगदीश ।[5]
नाना शरीरीं सावकास । करूं लागे ॥ ८ ॥[6]
पाहातां सृष्टीची रचना । ते येकाचेन चालेना ।
येक चि चालवी नाना । देह धरुनी ॥ ९ ॥
नाहीं उंच नीच विचारिलें । नाहीं बरें वाईट पाहिलें ।[7]
कार्ये चालों ऐसें जालें । भगवंतासी ॥ १० ॥

---

१ जगामध्यें चाललेल्या व्यवहाराकडे सहज नजर फेंकली तर नुसता गल्बला आपल्या दृष्टीस पडतो, परंतु हा सर्व व्यवहार इतक्या सुरळीत रीतीनें चालण्यास कारण जी परमेश्वराची सत्ता ती आपणांस प्रत्यक्ष दृग्गोचर जरी होत नसली तरी पण ती असते. २ प्राणीमात्रांना माता वाटून देऊन त्यांच्या द्वारें प्रत्यक्ष परमेश्वर च कृपाळूपणें जगाचें रक्षण करीत आहे. ३ जशी माता मुलाचें संगोपन परमेश्वराच्या सत्तेनें करिते, त्याप्रमाणें सर्व ठिकाणीं परमेश्वराची सत्ता वाटून दिलेली आहे आणि परमेश्वराच्या च कळेनें हें जग चाललें आहे. ४ जाणत्या पुरुषाची=जगदीशाची. ५ प्रथम मुळांत "पुरुषाचा" होतें त्याचें श्रीसमर्थांनीं "पुराचा" केलें आहे पुराचा=देहपुराचा ६ जगदीश नाना शरीरीं वास्तव्य करून जगाचा व्यवहार चालवीत आहे. ७ अनेक देह धारण करून जगाचा व्यवहार चालवितांना ईश्वरानें लहान, मोठें, किंवा बरें, वाईट याचा विचार केला नाहीं सर्व योनींत ईश्वराचें वास्तव्य आहे.

किंवा नेणणें आडवें केलें । किंवा अभ्यासीं घातलें ।
हें कैसें कैसें केलें । त्याचा तो चि जाणे ॥ ११ ॥
जगदांतरीं अनुसंधान । बरें पाहाणें हें चि ध्यान ।
ध्यान आणी तें ज्ञान । येकरूप ॥ १२ ॥
प्राणी संसारास आला । कांहीं येक शाहणा जाला ।
मग तो बिवरों लागला । भूमडळीं ॥ १३ ॥
प्रगट रामाचें निशाण । आत्माराम ज्ञानघन ।
विश्वंभर विद्यमान । भाग्यें कळे ॥ १४ ॥
उपासना धुंडून वासना धरिली । तरी ते लांबत चि गेली ।
महिमा न कळे बोलिली । येथार्थ आहे ॥ १५ ॥
द्रष्टा ह्मणिजे पाहाता । साक्षी ह्मणिजे जाणता ।
अनंतरूपी अनंता । वोळखावें ॥ १६ ॥
संगती असावी भल्याची । थाटी कथा निरूपणाची ।
कांहीं येक मनाची । विश्रांती आहे ॥ १७ ॥
त्याहिमधें प्रत्ययेज्ञान । जाळून टाकिला अनुमान ।
प्रचितीविण समाधान । पाविजेल कैंचें ॥ १८ ॥
मूळ संकल्प तो हरिसंकल्प । मूळमायेमधील साक्षेप ।
जगदांतरीं तें चि रूप । देखिजेतें ॥ १९ ॥
उपासना ज्ञानस्वरूप । ज्ञानीं चौथा देह आरोप ।
याकारणें सर्व संकल्प । सोडून द्यावा ॥ २० ॥

---

१ ईश्वरानें सृष्टीचा हा एवढा व्यवहार चालविला आहे तो कसा, हें त्याचें त्याला च माहित; कां अज्ञानापासून त्यानें हें जग निर्माण केलें, कां त्याला हा अभ्यास च आहे, कोण जाणे! २ जगदंतरीं असणाऱ्या व्यापक ईश्वराचें योग्य रीतीनें अनुसंधान ठेवणें, ह्मणजे प्राणिमात्राच्या ठिकाणीं ईश्वरस्वरूप पाहणें, याचें नाव ध्यान. ३ रामाचें निशाण गुप्त नसून जगावर फडकत आहे, तो आत्माराम ज्ञानस्वरूप आहे, तो च विश्वंभर आहे, तो सर्वत्र विद्यमान आहे आणि त्याची प्राप्ति भाग्यानें होते. ४मार्गे, प्रकार. ५ हरिसंकल्प ती च मूळमाया, तो च ईश्वर. मूळमाया ह्मणजे मूळप्रकृति. मूळप्रकृति हा ब्रह्मांडांतील चवथा देह, हा पिंडातील चवथा देह जो महाकारण ह्मणजे ज्ञान त्याच्याशीं अनुरूप आहे. यावरून ईश्वराची उपासना ज्ञानस्वरूप आहे व तें ज्ञान ह्मणजे हरिसंकल्प, मूळमाया. मूळमायेचा तर त्याग करावयाचा आहे. तात्पर्य, सर्व संकल्प सोडून द्यावा हें च खरें.

पुढें परब्रह्म विशाळ । गगनासारिखें पोकळ ।
घन पातळ कोमळ । काये ह्मणावें ॥ २१ ॥
उपासना ह्मणिजे ज्ञानें । ज्ञानें पाविजे निरंजनें ।
योगियांचें समाधान । येणें रितीं ॥ २२ ॥
विचार नेहटूनैसा पाहे । तरी उपासना आपण चि आहे ।
येक जाये येक राहे । देह धरुनी ॥ २३ ॥
अखंड ऐसी घालमेली । पूर्वापार होत गेली ।
आतां हि तैसी च चालिली । उत्पत्ति स्थिती ॥ २४ ॥
बनावरी बनचराची सत्ता । जळावरी जळचरांची सत्ता ।
भूमंडळीं भूपाळां समस्तां । येणें चि न्यायें ॥ २५ ॥
सामर्थ्य आहे चळवळेचें । जो जो करील तयाचें ।
परंतु येथें भगवताचें । अधिष्ठान पाहिजे ॥ २६ ॥
कर्ता जगदीश हें तों खरें । परी विभाग आला पृथकाकारें ।
तेथें अहंतेचें काविरें । बाधिजेना ॥ २७ ॥
हरिर्दाता हरिर्भोक्ता । ऐसें चालतें तत्वता ।
ये गोष्टीचा आतां । विचार पाहावा ॥ २८ ॥
सकळ कर्ता परमेश्वरु । आपला माइक विचारु ।
जैसें कळेल तैसें करू । जैगदांतरें ॥ २९ ॥

---

१ उपासनेच्या पुढें, ज्ञानाच्या पुढें, मूळमायेच्या पलिकडे. २ मूळमाया=मूळप्रकृति=महाकारण=ज्ञान. उपासना येथवर आहे, पुढें नाहीं, कारण उपासनेला द्वैत लागतें, तें पुढें नाहीं. ३ मायेच्या च योगानें पुढें निरंजनाची प्राप्ति होते. ४ निक्षून, खोल. ५ जीव हा च शिव आहे, ह्मणजे उपासना ज्याची करावयाची तो च आहे. ६ उपास्य आणि उपासक असे दोन देह आहेत, त्यापैकीं एक जातो व एक राहतो, म्हणजे उपासक जाऊन उपास्य बनतो. ७ द्वैताची. ८ सकलकर्ता परमेश्वर आहे हें खरें आहे, परंतु परमेश्वर स्वत काहीं करीत नाहीं, तर त्याच्या सत्तेचा विभाग प्राणिमात्राच्या ठिकाणीं असून त्याच्या करवीं परमेश्वर कार्यें घडवून आणतो, तेव्हां कोणतें हि चांगलें कार्य आपल्या हातून घडलें, तर तें आपण केलें अशी अहंता न धरता, हरिर्दाता हरिर्भोक्ता असें च मानलें पाहिजे. ९ जगदंतर जो परमेश्वर त्याच्या इच्छेनें जसें जसें कळेल तसें तसें करू. मी कोण काय करणार, सकळ कर्ता परमेश्वर आहे, तो जसें कार्य हातून घडवील तसें होईल.

देवायेवढें चपळ नाहीं । ब्रह्मायेवढें निश्चळ नाहीं ।
पाइरीनें पाइरी चढोन पाहीं । मूळपरियंत ॥ ३० ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे [1]आत्मानिरूपणनाम समास चतुर्थ ॥४॥

---

॥ श्रीराम ॥

येथून पाहातां तेथवरी । चत्वार जीनस अवधारीं ।
येक चौदा पांच [2]च्यारी । ऐसें आहे ॥ १ ॥
परब्रह्म सकळांहून वेगळें । परब्रह्म सकळांहून आगळें ।
नाना कल्पनेनिराळें । परब्रह्म तें ॥ २ ॥
परब्रह्माचा विचार । नाना कल्पनेहून पर ।
निर्मळ निश्चळ निर्विकार । अखंड आहे ॥ ३ ॥
परब्रह्मास कांहीं च तुळेना । हा येक मुख्य जिनसाना[3] ।
दुसरा जिनस नाना कल्पना । [4]मूळमाया ॥ ४ ॥
नाना सूक्ष्मस्वरूप । सूक्ष्म आणी कर्दमरूप ।
मुळींच्या संकल्पाचा आरोप । मूळमाया ॥ ५ ॥
हरिसंकल्प मुळींचा । आत्माराम सकळांचा ।
संकेत नामाभिधानाचा । येणें प्रकारें ॥ ६ ॥
निश्चळीं चंचल चेतलें । ह्मणौनि चैतन्य बोलिलें ।
गुणसमानत्वें जालें । गुणसाम्य ऐसें ॥ ७ ॥
अर्धनारीनटेश्वर । तो चि शड्गुणेश्वर ।
प्रकृतिपुरुषाचा विचार । शिवशक्ती ॥ ८ ॥
शुद्धसत्वगुणाची मांडणी । अर्धमात्रा गुणक्षोभिणी ।
पुढें तिही गुणाची करणी । प्रगट जाली ॥ ९ ॥

---

१ प्रथम ' शिवशक्ति ' होतें त्याचें ' आत्मा ' श्रीसमर्थांनीं केलें. २ एक ब्रह्म, मूळमायेचीं चौदा नावें, पाच भूतें व चारी खाणी, असे एकंदर चार जिन्नस आहेत. ३ पहिला जिन्नस ब्रह्म, दुसरा जिन्नस अनंतकल्पनारूप मूळमाया. ४ त्या मूळमायेचीं चौदा नावें येणें प्रमाणें —चैतन्य, गुणसाम्य, अर्द्धनारीनटेश्वर, षड्गुणेश्वर, प्रकृतिपुरुष, शिवशक्ति, शुद्धसत्त्व, गुणक्षोभिणी, सत्त्व, रज, तम, मन, माया, अंतरात्मा. तसें च २० × १ पहा

मन माया अंतरात्मा । चौदा जिनसांची सीमा ।
विद्यमान ज्ञानात्मा । इतुके ठाइं ॥ १० ॥
ऐसा दुसरा जिनस । अभिधानें चतुर्देश ।
आतां तिसरा जिनस । पंचमाहाभूतें ॥ ११ ॥
येथें पाहातां जाणीव थोडी । आदिअंत हे रोकडी ।
खाणी निरोपिल्या तांतडी । तो चौथा जिनस ॥ १२ ॥
च्यारी खाणी अनंत प्राणी । जाणीवेची जाली दाटणी ।
च्यारी जिनस येथुनी । संपूर्ण जाले ॥ १३ ॥
बीज थोडें पेरिजेतें । पुढें त्याचें उदंड होतें ।
तैसें जालें आत्मयातें । खाणी वाणी प्रगटतां ॥ १४ ॥
ऐसी सत्ता प्रबळली । थोडे सत्तेची उदंड जाली ।
मनुष्यवेषें सृष्टी भोगिली । नाना प्रकारें ॥ १५ ॥
प्राणी मारून स्वापद पळे । वरकड त्यास काये कळे ।
नाना भोग तो निवळे । मनुष्यदेहीं ॥ १६ ॥
नाना शब्द नाना स्पर्श । नाना रूप नाना रस ।
नाना गंध ते विशेष । नरदेह जाणे ॥ १७ ॥
अमोल्य रत्नें नाना वस्त्रें । नाना यानें नाना शस्त्रें ।
नाना विद्या कळा शास्त्रें । नरदेह जाणे ॥ १८ ॥
पृथ्वी सत्तेनें व्यापिली । स्थळोस्थळीं अटोपिली ।
नाना विद्या कळा केली । नाना धारणा ॥ १९ ॥
दृश्य अवघें चि पाहावें । स्थानमान सांभाळावें ।
सारासार विचारावें । नरदेहे जालियां ॥ २० ॥
येहलोक आणी परलोक । नाना प्रकारींचा विवेक ।
विवेक आणी अविवेक । मनुष्य जाणे ॥ २१ ॥
नाना पिंडीं ब्रह्मांडरचना । नाना मुळींची कल्पना ।
नाना प्रकारीं धारणा । मनुष्य जाणे ॥ २२ ॥

---

१ " ढ " ची " डीं " केली आहे.

अष्टभोग नवरस । नाना प्रकारींचा विळास ।
वाच्यांश लक्ष्यांश सारांश । मनुष्य जाणे ॥ २३ ॥
मनुष्यें सकळांस आळिलें[1] । त्या मनुष्यास देवें पाळिलें ।
ऐसें हें अवघें कळलें । नरदेहयोगें ॥ २४ ॥
नरदेह परम दुल्लभ । येणें घडे अलभ्य लाभ ।
दुल्लभ तें सुल्लभ । होत आहे ॥ २५ ॥
बरकड देहे हें कावाड । नरदेह मोठें ववाड ।
परंतु पाहिजे जाड । विवेकरचना ॥ २६ ॥
येथें जेणें आळस केला । तो सर्वस्वें बुडाला ।
देव नाहीं वोळखिला । विवेकबळें ॥ २७ ॥
नर तो चि नारायेण । जरी प्रत्ययें करी श्रवण ।
मननशीळ अंतःकर्ण । सर्वकाळ ॥ २८ ॥
जेणें स्वयें चि पोहावें । त्यास कासेस नलगे लागावें ।
स्वतंत्रपणें शोधावें । सकळ कांहीं ॥ २९ ॥
सकळ शोधून राहिला । संदेह कैंचा तयाला ।
पुढें विचार कैसा जाला । त्याचा तो चि जाणे ॥ ३० ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे चत्वारजिनस नाम समास पंचम ॥ ५ ॥

---

॥ श्रीरामसमर्थ ॥

पाहों जातां भूमंडळ । ठाईं ठाईं आहे जळ ।
कित्तेक ते निर्मळ माळ । जळेंविण पृथ्वी ॥ १ ॥
तैसें दृश्य विस्तारलें । कांहींयेक जाणीवेनें शोभलें ।
जाणीवरहित उरलें । कितीयेक दृश्य ॥ २ ॥
च्यारी खाणी च्यारी वाणी । चौऱ्यासी लक्ष जीवयोनी ।
शास्त्रीं अवघें नेमुनी । बोलिलें असे ॥ ३ ॥

---

१ आकलन केलें, ताब्यांत ठेवलें.

श्लोकः[1]–जलजा नवलक्षाश्च दशलक्षाश्च पक्षिणः ।
क्रुमयो रुद्रलक्षाश्च विंशल्लक्षा गवादयः ॥
स्थावरास्त्रिंशल्लक्षाश्च चतुर्लक्षाश्च मानवाः ।
पापपुण्य समं कृत्वा नरयोनिषु जायते ॥ १ ॥

मनुष्यें च्यारी लक्ष । पशु वीस लक्ष ।
क्रिम आक्रा लक्ष । बोलिलें शास्त्रीं ॥ ४ ॥
दाहा लक्ष ते खेचर । नव लक्ष जळचर ।
तीस लक्ष स्थावर । बोलिलें शास्त्रीं ॥ ५ ॥
ऐसी चौऱ्यासी लक्ष योनी । जितुका तितुका जाणता प्राणी ।
अनंत देह्याची मांडणी । मर्यादा कैंची ॥ ६ ॥
अनंत प्राणी होत जाती । त्यांचें अधिष्ठान जगती ।
जगतीवेगळी स्थिती । त्यास कैंची ॥ ७ ॥
पुढें पाहातां पंचभूतें । पावलीं पष्टदशेतें ।
कोणी विद्यमान[2] कोणी तें । उगी[3] च असती ॥ ८ ॥
अंतरात्म्याची वोळखण । ते चि जेथें चंपळपण[4] ।
जाणीवेचें अधिष्ठान । सावध ऐका ॥ ९ ॥
सुखदुख जाणता जीव । तैसा चि जाणावा सदा शिव ।
अंतःकर्णपंचक अपूर्व । अंश आत्मयाचा ॥ १० ॥
स्थुळीं[5] आकाशाचे गुण । अंश आत्मयाचे जाण ।
सत्व रज तमोगुण । गुण आत्मयाचे ॥ ११ ॥
नाना चाळणा नाना धृती । नवविधा भक्ति चतुर्विधा मुक्ती ।
अलिप्तपण सहजस्थिती । गुण आत्मयाचे ॥ १२ ॥
द्रष्टा साक्षी ज्ञानघन । सत्ता चैतन्य पुरातन ।
श्रवण मनन विवरण । गुण आत्मयाचे ॥ १३ ॥

---

१ हा सबंध श्लोक समासांत मागाहून लिहिला आहे. २ दृश्य. ३ गुप्त. ४ जेथें चपळपण आहे तेथें अंतरात्मा आहे अशी अंतरात्म्याची ओळखण समजावी ५ देहाचे ठिकाणीं

दृश्य द्रष्टा दर्शन । ध्येय ध्याता ध्यान ।
ज्ञेय ज्ञाता ज्ञान । गुण आत्मयाचे ॥ १४ ॥
वेदशास्त्रपुराणअर्थ । गुप्त चालिला परमार्थ ।
सर्वज्ञपणें समर्थ । गुण आत्मयाचे ॥ १५ ॥
बद्ध मुमुक्ष साधक सिद्ध । विचार पाहाणें शुद्ध ।
बोध आणी प्रबोध । गुण आत्मयाचे ॥ १६ ॥
जागृति स्वप्न सुषुप्ति तुर्या । [1]प्रकृतिपुरुष मूळमाया ।
पिंड ब्रह्मांड अष्टकाया । गुण आत्मयाचे ॥ १७ ॥
परमात्मा आणी परमेश्वरी । जगदात्मा आणी जगदेश्वरी ।
महेश आणी माहेश्वरी । गुण आत्मयाचे ॥ १८ ॥
सूक्ष्म जितुकें नामरूप । तितुकें आत्मयाचें स्वरूप ।
संकेतनामाभिधानें अमूप । सीमा नाहीं ॥ १९ ॥
आदिशक्ती शिवशक्ती । मुख्य मूळमाया सर्वशक्ती ।
नाना जीनस उत्पती स्थिती । तितुके गुण आत्मयाचे ॥ २० ॥
पूर्वपक्ष आणी सिद्धांत । गाणें वाजवणें संगीत ।
नाना विद्या अद्भुत । गुण आत्मयाचे ॥ २१ ॥
ज्ञान अज्ञान विपरीतज्ञान । असद्वृत्ति सद्वृत्ति जाण ।
ज्ञप्तिमात्र अलिप्तपण । गुण आत्मयाचे ॥ २२ ॥
पिंड ब्रह्मांड तत्वझाडा । नाना तत्वांचा निवाडा ।
विचार पाहाणें उघडा । गुण आत्मयाचे ॥ २३ ॥
नाना ध्यानें अनुसंधानें । नाना स्थिति नाना ज्ञानें ।
अनन्य आत्मनिवेदनें । गुण आत्मयाचे ॥ २४ ॥
तेतिस कोटी सुरवर । आठ्यासी सहस्र ऋषेश्वर ।
भूत खेचर अपार । गुण आत्मयाचे ॥ २५ ॥
भूतावळी औट कोटी । च्यामुंडा छपन्न कोटी ।
कात्यायेणी नव कोटी । गुण आत्मयाचे ॥ २६ ॥

---

१ या चरणाऐवजीं प्रथम 'आत्मरूप' असें होतें २ मूळमाया.

चंद्र सूर्य तारामंडळें । नाना नक्षत्रें ग्रहमंडळें ।
शेष कूर्म मेघमंडळें । गुण आत्मयाचे ॥ २७ ॥
देव दानव मानव । नाना प्रकारींचे जीव ।
पाहातां सकळ भावाभाव । गुण आत्मयाचे ॥ २८ ॥
आत्मयाचे नाना गुण । ब्रह्म निर्विकार निर्गुण ।
जाणणें येकदेसी पूर्ण[1] । गुण आत्मयाचे[2] ॥ २९ ॥
आत्मारामउपासना[3] । तेणें पावले निरंजना ।
निसंदेहे अनुमाना । ठाव चि नाहीं ॥ ३० ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे आत्मागुणनिरूपणनाम समास साहावा ॥६

---

॥ श्रीरामसमर्थ ॥

अनुर्वाच्य समाधान जालें । तें पाहिजे बोलिलें ।
बोलिल्यासाठीं समाधान गेलें । हें तों घडेना ॥ १ ॥
कांहीं सांडावें लागत नाहीं । कांहीं मांडावें लागत नाहीं ।
येक विचार शोधून पाहीं । म्हणिजे कळे ॥ २ ॥
मुख्य कासीविश्वेश्वर । श्वेतबंद[4] रामेश्वर ।
मलकार्जुन भीमाशंकर । गुण आत्मयाचे ॥ ३ ॥
जैसीं मुख्य बारा लिंगें । यावेगळीं अनंत लिंगें ।
प्रचित जाणिजेत जगें । गुण आत्मयाचे ॥ ४ ॥
भूमंडळीं अनंत शक्ती । नाना साक्षात्कार चमत्कार होती ।
नाना देवांच्या सामर्थ्यमूर्ती । गुण आत्मयाचे ॥ ५ ॥
नाना सिद्धांचीं सामर्थ्यें । नाना मंत्रांचीं सामर्थ्यें ।
नाना मोहरेवल्लीत[5] सामर्थ्यें । गुण आत्मयाचे ॥ ६ ॥
नाना तीर्थांचीं सामर्थ्यें । नाना क्षत्रांचीं सामर्थ्यें ।
नाना भूमंडळीं सामर्थ्यें । गुण आत्मयाचे ॥ ७ ॥

---

१ एकदेशी जाणणें किंवा पूर्ण जाणणें २ गुण आत्मयाचे ह्याचा अर्थ असा कीं, हीं इतकीं आत्म्याचीं रूपें आहेत, आत्मा या सर्व रूपांनीं नटला आहे. ३ अंतरात्म्याची उपासना. ४ सेतुबंध ५ मोहरा म्हणून औषधी मणी आहे.

जितुकें कांहीं उत्तम गुण । तितुकें आतमयाचें लक्षण ।
बरें वाईट तितुकें जाण । आत्म्याचकरितां[1] ॥ ८ ॥
शुद्ध आत्मा उत्तमगुणी[2] । सबळ आत्मा अवलक्षणी ।
बरी वाईट आवघी करणी । आतमयाची ॥ ९ ॥
नाना साभिमान धरणें । नाना प्रतिसृष्टि करणें ।
नाना आपउआपलक्षणें । आतमयाचेनी ॥ १० ॥
पिंडाचा बरा शोध घ्यावा । तत्वांचा पिंड शोधावा ।
तत्वें शोधितां पिंड आघवा । कळों येतो ॥ ११ ॥
जड देह भूतांचा । चचळ गुण आतमयाचा ।
निश्चळ ब्रह्मावेगळा ठाव कैचा । जेथें तेथें ॥ १२ ॥
निश्चळ चंचळ आणी जड । पिंडीं करावा निवाड ।
प्रत्ययावेगळें जाड । बोलणें नाहीं ॥ १३ ॥
पिंडामधून आत्मा जातो । तेव्हां निवाडा कळों येतो ।
देहे जड हा पडतो । देखतदेखतां ॥ १४ ॥
जड तितुकें पडिलें । चंचळ तितुकें निघोनी गेलें ।
जडचंचळाचें रूप आलें । प्रत्ययासी ॥ १५ ॥
निश्चळ आहे सकळां ठाईं । हें तों पाहाणें नलगे कांहीं ।
गुणविकार तेथें नाहीं । निश्चळासी ॥ १६ ॥
जैसें पिंड तैसें ब्रह्मांड । विचार दिसतो उघड ।
जड चंचळ जातां जाड । परब्रह्म चि आहे ॥ १७ ॥
माहाभूतांचा खंबीर[3] केला । आत्मा घालून पुतळा जाला ।
चालिला सृष्टीचा गलबला । येणें रितीं ॥ १८ ॥
आत्मा माया विकार करी । आळ घालिती ब्रह्मावरी ।
प्रत्ययें सकळ कांहीं विवरी । तो चि भला ॥ १९ ॥

---

१ आत्म्याच्या योगानें, आत्मा आहे म्हणून २ उदाहरणार्थ, साधूच्या ठिकाणचा तो शुद्ध व दुर्जनांतला तो शबल, अशुद्ध. ३ मूस, मूर्ति.

ब्रह्म व्यापक अखंड । वरकड व्यापकता खंड ।
शोधून पाहाता जडें[१] । कांहीं च नाहीं ॥ २० ॥
गगनासी खंडता नये । गगनाचें नासेल काये ।
जरी जाला माहाप्रळये । सृष्टीसंन्हार ॥ २१ ॥
जें संन्हारामधें सापडलें । तें सहज चि नासिवंत जालें ।
जाणते लोकीं उगविलें । पाहिजे कोडें ॥ २२ ॥
न कळतां वाटे कोडें । कळतां आवघें दिसे उघडें ।
म्हणोनी येकांतीं निवाडे । विचार पाहावा ॥ २३ ॥
मिळतां प्रत्ययाचे संत । येकांतापरीस येकात ।
केली पाहिजे सावचीत । नाना चर्चा ॥ २४ ॥
पाहिल्यावेगळें कळत नाहीं । कळतां कळता संदेह नाहीं ।
विवेक पाहाता कोठें चि नाहीं । मायाजाळ ॥ २५ ॥
गगनीं अभाळ आलें । मागुती सवें चि उडालें ।
आत्म्याकरिता[२] दृश्य जालें । उडेल तैसें ॥ २६ ॥
मुळापासून सेवटवरी । विवेकी विवेकें विवरी ।
तो चि निश्चय थावरी । चळेना ऐसा ॥ २७ ॥
वरकड निश्चय अनुमानाचे । अनुमानें बोलतां काये वेंचे ।
जाणते पुरुष प्रचितीचे । ते तों मानीतना ॥ २८ ॥
उगें च बोलणें अनुमानाचें । अनुमानाचें कोण्या कामाचें ।
येथें सगट विचाराचें । काम नाहीं ॥ २९ ॥
सगट विचार तो अविचार । कित्येक ह्मणती येकंकार ।
येककार भ्रष्टाकार । करूं नये ॥ ३० ॥

---

१ समजण्याला कठीण, दुर्बोध. २ आत्म्याच्या अधिष्ठानसत्तेनें जें दृश्य भासत आहे तें भ्रमनिरसन होता च उडून जाईल.

कृत्रिम अवघें सांडावें । काहीं येक शुद्ध घ्यावें ।
जाणजाणों निवडावें । सारासार ॥ २१ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे आत्मनिरूपणनाम समास ॥ ७ ॥

---

॥ श्रीरामसमर्थ ॥

विधीप्रपंचतरु[1] वाढला । वाढतां वाढतां विस्तीर्ण जाला ।
फळें येतां विश्रांती पावला । बहुत प्राणी ॥ १ ॥
नाना फळें रसाळें लागलीं । नाना जिनसी गोडीस आलीं ।
गोडी पाहावया निर्माण केलीं । नाना शरीरें ॥ २ ॥
निर्माण जाले उत्तम विषय । शरीरेंविण भोगितां नये ।
ह्मणोनी निर्मिला उपाये । नाना शरीरें ॥ ३ ॥
ज्ञानइंद्रियें निर्माण केलीं । भिन्न भिन्न गुणाचीं निर्मिलीं ।
येका शरीरासी लागलीं । परी वेगळालीं ॥ ४ ॥
श्रोत्रइद्रिईं शब्द पडिला । त्याचा भेद पाहिजे कळला ।
ऐसा उपाये निर्माण केला । इद्रियामधें ॥ ५ ॥
त्वचेइंद्रियें सीतोष्ण भासे । चक्षुइंद्रियें सकळ दिसे ।
इद्रियांमधें गुण ऐसे । वेगळाले ॥ ६ ॥
जिव्हेमधें रस चाखणें । घ्राणामधें परिमळ घेणें ।
इद्रियांमधें वेगळाल्या गुणें । भेद केले ॥ ७ ॥
वायोपंचकीं अंतःकर्णपचक । मिसळोनि फिरे निशंक ।
ज्ञानइंद्रियें कर्मइंद्रियें सकळिक । सावकास पाहे ॥ ८ ॥
कर्मइंद्रियें लागवेगीं । जीव भोगी विषयालागीं ।
ऐसा हा उपाये जगीं । ईश्वरें केला ॥ ९ ॥
विषय निर्माण जाले बरवे । शरीरेंविण कैसे भोगावे ।
नाना शरीराचे गोवे । याकारणें ॥ १० ॥

---

१ ब्रह्मदेवाचा प्रपचवृक्ष, जगत्.

अस्तीमांशाचें शरीर । त्यामधें गुणप्रकार ।
शरीरासारिखें यंत्र । आणीक नाहीं ॥ ११ ॥
ऐसीं शरीरें निर्माण केलीं । विषयभोगें वाढविलीं ।
लाहानथोर निर्माण जालीं । येणें प्रकारें ॥ १२ ॥
अस्तिमांशाचीं शरीरें । निर्माण केलीं जगदेश्वरें ।
विवेकें गुणविचारें । करूनियां ॥ १३ ॥
अस्तिमांशाचा पुतळा । जेणें ज्ञानें सकळ कळा ।
शरीरभेद वेगळा । ठाईं ठाईं ॥ १४ ॥
तो भेद कार्याकारण । त्याचा उदंड आहे गुण ।
सकळ तीक्षण बुद्धीविण । काये कळे ॥ १५ ॥
सकळ करणें ईश्वराला । ह्मणोनी भेद निर्माण केला ।
ऊर्धमुख होतां भेदाला । ठाव कैंचा ॥ १६ ॥
सृष्टिकर्णीं आगत्य भेद । संव्हारें सहज चि अभेद ।
भेद अभेद हा संवाद । मायागुणें ॥ १७ ॥
मायेमधें अंतरात्मा । नकळे तयाचा महिमा ।
जाला चतुर्मुख ब्रह्मा । तो हि संदेहीं पडे ॥ १८ ॥
पीळ पेंच कडोविकडी । तर्क तीक्षण घडीनें घडी ।
मनासी होये तातडी । विवरण करितां ॥ १९ ॥
आत्मत्वें लागतें सकळ कांहीं । निरंजनीं हें कांहीं च नाहीं ।
येकातकाळीं समजोन पाहीं । ह्मणिजे बरें ॥ २० ॥
देहेसामर्थ्यानुसार । सकळ करी जगदेश्वर ।
थोर सामर्थ्यें अवतार । बोलिजेती ॥ २१ ॥

---

१ हा अस्थिमांसाचा पुतळा ज्ञानाच्या योगानें सकलकलाप्रवीण झाला आहे. २ आवश्यक, जरूर तितका च. ३ ब्रह्माकडे दृष्टि वळविली ह्मणजे मग भेद कोठचा उरणार ? ४ सृष्टि निर्माण करतेवेळीं भेद होतो, परंतु सृष्टीचा संहार होतां च सर्व अभेद आहे. ५ निकरानें. ६ घाई ७ अंतरात्म्याचें विवरण करितांना घटकोघटकीं मनाला घाई होऊन, पीळ, पेंच बसून, तें अगदीं निकरावर येतें. ८ हें सर्व सांगितलेलें आत्म्याच्या ठिकाणीं लागू पडतें.

शेष कूर्म वऱ्हाव जाले । येवढे देहे विशाळ धरिले ।
तेणें करिता रचना चाले । सकळ सृष्टीची ॥ २२ ॥
ईश्वरें केवढें सूत्र केलें । सूर्यबिंब धावाया लाविलें ।
धुकटाकरवीं धरविलें । अगाध पाणी ॥ २३ ॥
पर्वताऐसे ढग उचलती । सूर्यबिंबासी अछ्यादिती ।
तेथें सर्वें चि वायोची गती । प्रगट होये ॥ २४ ॥
झिडकाझिडकुं धांवे वारा । जैसा काळाचा ह्मणियारा[1] ।
ढग मारुनी दिनकरा । मोकळे करी ॥ २५ ॥
बैसती विजाचे तडाखे । प्राणीमात्र अवचिता धाके ।
गगन कडकडून तडके । स्थळांवरी[2] ॥ २६ ॥
येहलोकासी येक वर्म केलें । महद्भूतें महद्भूत आळिलें[3] ।
सकळा समभागें चालिलें । सृष्टिरचनेसी ॥ २७ ॥
ऐसे अनंत भेद आत्मयाचे । सकळ जाणती ऐसे कैंचे ।
विवरता विवरतां मनाचे । फडके होती[4] ॥ २८ ॥
ऐसी माझी उपासना । उपासकीं आणावी मना ।
अगाध महिमा चतुरानना । काये कळे ॥ २९ ॥
आवाहन विसर्जन । हें चि भजनाचें लक्षण[5] ।
सकळ जाणती सज्जन । मी काये सांगों ॥ ३० ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे देहेक्षत्रनिरूपणनाम समास आठवा ॥८॥

---

॥ श्रीरामसमर्थ ॥

मृतिकापूजन करावें । आणी सर्वें चि विसर्जावें ।
हें मानेना स्वभावें । अतःकर्णासी ॥ १ ॥
देव पूजावा आणी टाकावा । हें प्रशस्त न वटे जीवा ।
याचा विचार पाहावा । अतर्यामीं ॥ २ ॥

---

१ आज्ञाधारक सेवक, दूत २ " त " चा " ब " केला आहे ३ लय केला. ४ विवरण करतां करता मनाचे धुडके उडतात ५ मायेपासून मांडणी करणें हें आवाहन व पुन्हां संहार करणें हें विसर्जन ही च आमची उपासना.

देव करिजे ऐसा नाहीं । देव टाकिजे ऐसा नाहीं ।
ह्मणोनि याचा कांहीं । विचार पाहावा ॥ ३ ॥
देव नाना शरीरें धरितो । धरुनी मागुती सोडितो ।
तरी तो देव कैसा आहे तो । विवेकें वोळखावा ॥ ४ ॥
नाना साधनें निरूपणें । देव शोधायाकारणें ।
सकळ आपुलें अंतःकर्णें । समजलें पाहिजे ॥ ५ ॥
ब्रह्मज्ञानाचा उपाये । समजल्याविण देतां नये ।
पदार्थ आहे मा घे जाये । ऐसें ह्मणावें ॥ ६ ॥
सगट लोकांचे अंतरींचा भाव । मज प्रतक्ष भेटवावा देव ।
परंतु विवेकाचा उपाव । वेगळा चि आहे ॥ ७ ॥
विचार पाहाता तगेना । त्यास देव ऐसें ह्मणावेना ।
परंतु जन राहेना । काये करावें ॥ ८ ॥
थोर लोक मरोनि जाती । त्याच्या सुरता करुनी पाहाती ।
तैसी च आहे हे हि गती । उपासनेची ॥ ९ ॥
थोर व्यापार ठाकेना जनीं । ह्मणोनि केली रेखतवानी ।
राजसपदा नयाचेनी । प्राप्त कैंची ॥ १० ॥
ह्मणोनि जितुका भोळाभाव । तितुका अज्ञानाचा स्वभाव ।
अज्ञानें तरी देवाधिदेव । पाविजेल कैंचा ॥ ११ ॥
अज्ञानासी ज्ञान न मानें । ज्ञात्यास अनुमान न मानें ।
ह्मणोनि सिद्धांचीये खुणें । पावलें पाहिजे ॥ १२ ॥
माया साडून मुळास जावें । तरी च समाधान पावावें ।
ऐसें न होतां भरंगळावे । भलतीकडे ॥ १३ ॥
माया उलघायाकारणें । देवासी नाना उपाय करणें ।
अध्यात्मश्रवणपथें चि जाणें । प्रत्ययानें ॥ १४ ॥

---

१ ब्रह्मज्ञान ह्मणून कांहीं पदार्थ थोडा च आहे तर त्यासंबंधानें घे आणि जा असें ह्मणतां येईल. ब्रह्मज्ञान समजणें हें च त्याचें देणें. २ शाईचा व्यापार. ३ ह्मणून सिद्धाच्या च मार्गानें गेलें पाहिजे. ( भोळाभाव उपयोगी नाहीं ).

ऐसें न करितां लोकिकीं । अवघी च होते चुकामुकी ।
स्थिति खरी आणि लटकी । ऐसी वोळखावी ॥ १५ ॥

खोट्याचे वाटे जाऊं नये । खोट्याची संगती धरूं नये ।
खोटें संग्रहीं करूं नये । काहींयेक ॥ १६ ॥

खोटें तें खोटें चि खोटें । खऱ्यासीं तगेनात बाल्टें ।
मन अधोमुख उरफाटें । केलें पाहिजे ॥ १७ ॥

अध्यात्मश्रवण करीत जावें । ह्मणिजे सकळ कांहीं फावे ।
नाना प्रकारीचे गोवे । तुटोनी जाती ॥ १८ ॥

सूत गुंतलें तें उकलावें । तैसें मन उगवावें ।
मानत मानत घालावें । मुळाकडे ॥ १९ ॥

सकळ काहीं कालवलें । त्या सकळाचें सकळ जालें ।
शरीरीं विभागलें । सकळ कांहीं ॥ २० ॥

काये तें येथें चि पाहावें । कैसें तें येथें चि शोधावें ।
सूक्ष्मांचीं चौदा नांवें । येथें चि समजावीं ॥ २१ ॥

निर्गुण निर्विकारी येक । तें सर्वां ठाईं व्यापक ।
देहामधें तें निष्कळंक । आहे कीं नाहीं ॥ २२ ॥

मूळमाया संकल्परूप । तें अंतःकर्णाचें स्वरूप ।
जड चेतनी चैतन्यरूप । तें हि शरीरीं आहे ॥ २३ ॥

समानगुण गुणसाम्य । सूक्ष्म विचार तो अगम्य ।
सूक्ष्म साधु जाणते प्रणम्य । तया समस्तांसी ॥ २४ ॥

द्विधा भासतें शरीर । वामांग दक्षणांग विचार ।
तो चि अर्धनारीनटेश्वर । पिंडीं वोळखावा ॥ २५ ॥

---

१ आळ, खोटें. २ आपलें मन अधोमुख होऊन मायेकडे व मायेच्या पुढच्या पसाऱ्याकडे पहात आहे, तें ऊर्ध्वमुख करून ब्रह्माकडे लावलें पाहिजे ३ जडचंचलादिकांचा कर्दम होऊन त्यापासून पिंड आणि ब्रह्मांड हीं झालीं आहेत. ४ शरिरात, पिंडास. ५ सूक्ष्म अशा मूळमायेचीं.

तो चि प्रकृतिपुरुष जाणिजे । शिवशक्ती वोळखिजे ।
शडगुणईश्वर बोलिजे । तया कर्दमासी ॥ २६ ॥
तयासी च ह्मणिजे महत्तत्व । जेथें त्रिगुणाचें गूढत्व ।
अर्धमात्रा शुद्धसत्व । गुणक्षोभिणी ॥ २७ ॥
त्रिगुणें चालतें शरीर । प्रतक्ष दिसतो विचार ।
मुळींच्या कर्दमाचें शरीर । ऐसें जाणावें ॥ २८ ॥
मन माया आणि जीव । हा हि दिसतो स्वभाव ।
चौदा नामांचा अभिप्राव । पिंडीं पाहावा ॥ २९ ॥
पिंड पडतां अवघें चि जातें । परंतु परब्रह्म राहातें ।
शाश्वत समजोन मग तें । दृढ धरावें ॥ ३० ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सूक्ष्मनिरूपणनाम समास नवम ॥ ९ ॥

---

॥ श्रीरामसमर्थ ॥

धरूं जाता धरितां न ये । टाकूं जातां टाकितां न ये ।
जेथें तेथें आहे च आहे । परब्रह्म तें ॥ १ ॥
जिकडे तिकडे जेथें तेथें । विन्मुख होतां सन्मुख होतें ।
सन्मुखपण चुकेना तें । कांहीं केल्यां ॥ २ ॥
बैसलें माणुस उठोन गेलें । तेथें आकाश चि राहिलें ।
आकाश चहुंकडे पाहिलें । तरी सन्मुख चि आहे ॥ ३ ॥
जिकडे जिकडे प्राणी पळोन जातें । तिकडे आकाश चि भोंवतें ।
बळें आकाशाबाहेर तें । कैसें जावें ॥ ४ ॥
जिकडे जिकडे प्राणी पाहे । तिकडे तें सन्मुख चि आहे ।
समस्तांचे मस्तकीं राहे । माध्यान्नीं मार्तंड जैसा ॥ ५ ॥
परी तो आहे येकदेसी । दृष्टांत न घडे वस्तुसी ।
कांहीं येक चमत्कारासी । देउनी पाहिलें ॥ ६ ॥

---

१ मन, माया आणि अंतरात्मा हीं शरीरांत स्वाभाविकपणें आहेत च.

नाना तीर्थें नाना देसीं । कष्टत जावें पाहाव्यासी ।
तैसें नलगे परब्रह्मासी । बैसले ठाईं ॥ ७ ॥
प्राणी बैसोनी च राहाता । अथवा बहुत पळोन जातां ।
परब्रह्म तें तत्वता । समागमें ॥ ८ ॥
पक्षी अंतराळीं गेला । भोंवतें आकाश चि तयाला ।
तैसें ब्रह्म प्राणीयाला । व्यापून आहे ॥ ९ ॥
परब्रह्म पोकळ घनदाट । ब्रह्म सेवटाचा सेवट ।
ज्यासी त्यासी ब्रह्म नीट । सर्वकाळ ॥ १० ॥
दृश्या सबाहे अंतरीं । ब्रह्म दाटलें ब्रह्मांडोदरीं ।
आरे त्या विमळाची सरी । कोणास द्यावी ॥ ११ ॥
वैकुंटकैळासस्वर्गलोकीं । इंद्रलोकीं चौदा लोकीं ।
पन्नगादिकपाताळलोकीं । तेथें हि आहे ॥ १२ ॥
कासीपासून रामेश्वर । आवघें दाटलें अपार ।
परता पैरता पारावार । त्यास नाहीं ॥ १३ ॥
परब्रह्म तें येकलें । येकदां चि सकळासी व्यापिलें ।
सकळांस स्पर्शोन राहिलें । सकळां ठाईं ॥ १४ ॥
परब्रह्म पाउसें भिजेना । अथवा चिखलानें भरेना ।
पुरामधें परी वाहेना । पुरासमागमें ॥ १५ ॥
येकसरें सन्मुख विमुख । वाम सव्य दोहिंकडे येक ।
आर्धऊर्ध प्राणी सकळीक । व्यापून आहे ॥ १६ ॥
आकाशाचा डोहो भरला । कदापी नाहीं उचंबळला ।
असंभाव्य पसरला । जिकडे तिकडे ॥ १७ ॥
येकजिनसी गगन उदास । जेथें नाहीं दृश्यभास ।
भासेंविण निराभास । परब्रह्म जाणावें ॥ १८ ॥

१ पलिकडे, त्याच्या पलिकडे, असे किती हि गेलें तरी त्याला पार नाहीं
२ अधोर्ध्व. ३ शून्य, जेथें दृश्यभास नाहीं.

संतसाधुमाहानुभावां । देवदानवमानवां ।
ब्रह्म सकळांसी विसांवा । विश्रांतिठाव ॥ १९ ॥
कोणेकडे सेवटा जावें । कोणेकडे काये पाहावें ।
असभाव्य तें नेमावें । काये ह्मणोनी ॥ २० ॥
स्थूळ नव्हे सूक्ष्म नव्हे । कांहीं येकासारिखें नव्हे ।
ज्ञानदृष्टीविण [2]नव्हे । समाधान ॥ २१ ॥
पिंडब्रह्मांडनिरास । मग तें ब्रह्म निराभास ।
येथून तेथवरी अवकास । भकासरूप ॥ २२ ॥
ब्रह्म व्यापक हें तों खरें । दृश्य आहे तों हें उत्तरें ।
व्याप्तेंविण कोण्या प्रकारें । व्यापक [3]ह्मणावें ॥ २३ ॥
ब्रह्मासी शब्द चि लागेना । कल्पना कल्पूं शकेना ।
कल्पनेतीत निरंजना । विवेकें वोळखावें ॥ २४ ॥
शुद्ध सार श्रवण । शुद्ध प्रत्ययाचें मनन ।
विज्ञानीं पावतां उन्मन । सहज चि होतें ॥ २५ ॥
[4]जालें साधनाचें फळ । संसार जाला सफळ ।
निर्गुणब्रह्म तें निश्चळ । अंतरीं बिंबलें ॥ २६ ॥
हिसेब जाला मायेचा । जाला निवाडा तत्वांचा ।
साध्य होतां साधनाचा । ठाव नाहीं ॥ २७ ॥
स्वप्नीं जे जें देखिलें । तें तें जागृतीस उडालें ।
सहज चि अनुर्वाच्य जालें । बोलतां न ये ॥ २८ ॥
ऐसें हें विवेकें जाणावें । प्रत्ययें खुणेसी बाणावें ।
जन्ममृत्याच्या नांवें । सुन्याकार ॥ २९ ॥

---

१ अमर्याद जें ब्रह्म त्याची मर्यादा काय करावी ? २ " तें नव्हे " असें होतें, त्यांत " तें " ला हरताळ लाविली आहे. ३ दृश्याच्या सापेक्षतेनें ब्रह्माला आपण व्यापक ह्मणतों, परंतु दृश्य च जर मिथ्या आहे, तर मग ब्रह्माला व्यापक कसें ह्मणावें ? ४ प्रत्यहीं दोन समास नित्य नियमानें वाचल्यावर या ओवीपासून शेवटपर्यंत ह्मणण्याचा सांप्रदायांत परिपाठ आहे. नंतर आरती करावयाची.

भक्तांचेनि साभिमानें । कृपा केली दाशरथीनें ।
समर्थकृपेचीं वचनें । तो हा दासबोध ॥ ३० ॥
वीस दशक दासबोध । श्रवणद्वारें घेतां शोध ।
मननकर्त्यास विशद । परमार्थ होतो ॥ ३१ ॥
वीस दशक दोनीसें समास । साधकें पाहावें सावकास ।
विवरतां विशेषाविशेष । कळों लागे ॥ ३२ ॥
ग्रथाचें करावें स्तवन । स्तवनाचें काये प्रयोजन ।
येथें प्रत्ययास कारण । प्रत्ययो पाहावा ॥ ३३ ॥
देहे तत्वं पांचा भूतांचा । कर्ता आत्मा तेथीचा ।
आणी कवित्वप्रकार मनुशाचा । काशावरुनी ॥ ३४ ॥
सकळ करणें जगदीशाचें । आणी कवित्व चि[1] कार्य मानुशाचें ।
ऐशा अप्रमाण बोलण्याचें । काये घ्यावें ॥ ३५ ॥
सकळ देह्याचा झाडा केला । तत्वसमुदाव उडाला ।
तेथें कोण्या पदार्थाला । आपुलें ह्मणावें ॥ ३६ ॥
ऐसीं हें विचाराचीं कामें । उगें च भ्रमों नये भ्रमें ।
जगदेश्वरें अनुक्रमें । सकळ केलें ॥ ३७ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे विमळब्रह्मनिरूपणनाम समासदाहावा॥ १०



---

१ " चि काय " हीं अक्षरें समासांत मागाहून श्रीसमर्थांनीं स्वहस्तें घातलीं आहेत.

॥ श्री ॥

## ॥ आरती दासबोधाची ॥

वेदांतसंमतीचा काव्यसिंधु भरला ।
श्रुति शास्त्रग्रन्थ गीता साक्ष संगम केला ।
महानुभाव संतजनीं अनुभव चाखीला ।
अज्ञान जड जीवा मार्ग सुगम जाला ॥ १ ॥
जय जया दासबोधा ग्रन्थराज प्रसिद्धा ।
आरति वोवाळीन विमळज्ञान बाळबोधा ॥ ध्रु० ॥
नवविधा भक्तिपंथें रामरूप अनुभवी ।
चातुर्यनिधी मोठा मायाचक्र उगवी ।
हरिहरहृदयींचें गुह्य प्रगट दावी ।
बद्ध चि सिद्ध जाले असंख्यात मानवी ॥ २ ॥
वीस हि दशकींचा अनुभव जो पाहे ।
नित्यनेम विवरितां स्वयें ब्रह्म चि होये ।
अपार पुण्य गांठीं तरी श्रवण लाहे ।
कल्याणलेखकाचे भावगर्भ हृदई ॥ ३ ॥

---

॥ श्री ॥

## ॥ धांवा श्रीसमर्थांचा ॥

धांव रे रामदासा । गुरुवर्या सर्वेशा ।
पडलों भवडोहीं । काढीं आपुल्या दासा ॥ ध्रु० ॥
नरदेहीं येउनीयां । नाहीं केलें सार्थक ।
भुललों विषयांमाजी । कैंचा होईल विवेक ।
कृपाळुवा दिनानाथा । तारक चि तूं येक ॥१॥ धांव रे० ॥
चौऱ्यांसी फिरतां वा । बहु श्रम पावलों ।
विश्रांतीचा लेश नाहीं । दुःखार्णवीं लोटलों ।
सुखकर्ता संकटहर्ता । बहु शिणलों भागलों ॥२॥ धांव रे० ॥
सद्गुरु श्रीस्वामीराया । कल्याणरूपा अद्वया ।
जगज्जीवनप्रभो स्वामी । तारीं तारीं सखया ।
जन्ममृत्यु दूर करीं । नेईं निजपदठाया ॥३॥ धांव रे० ॥

॥ श्री ॥

## ॥ भेट श्रीसमर्थांची ॥

उदासीन हें जाहलें चित्त माझें ।
मनीं वाटतें सर्व संसार वोझें ।
उठे मानसीं प्रीति हे दर्शनाची ।
घडो भेटि कृष्णातिरीं स्वामियाची ॥ १ ॥
बहुसाल या वैभवीं चाड नाहीं ।
जनीं राघवेंवीण तो सीण पाहीं ।
असे सोडिली आस सर्वै जनाची ।
घडो भेटि कृष्णातिरीं स्वामियाची ॥ २ ॥
क्रमेना घरीं आवडे रान चित्ता ।
असे वेधला जीव हा सर्व आतां ।
करूं सांडि या पुत्रदारादिकांची ।
घडो भेटि कृष्णातिरीं स्वामियाची ॥ ३ ॥
मनीं येक हें धातसे वाटताहे ।
मनीं खाति तो कंठ तो दाटताहे ।
जळें लोटलीं दाटलीं डोळयाची ।
घडो भेटि कृष्णातिरीं स्वामियाची ॥ ४ ॥
जनीं रातले मातले कामरंगें ।
तयासीं कदा गोष्टि आतां न संगे ।
तुटो संगती सर्व ही दुर्जनाची ।
घडो भेटि कृष्णातिरीं स्वामियाची ॥ ५ ॥
सखीं पारखीं पारखीं दीसताती ।
जनासारिखीं सारिखीं भासताती ।
मनीं बैसली मूर्ति सर्वोत्तमाची ।
घडो भेटि कृष्णातिरीं स्वामियाची ॥ ६॥
कितीयेक लोकीक सांडूनि मागें ।
फिरावें प्रभूच्या सवें मागमागें ।
बहु ऐकिली कीर्ति हे उत्तमाची ।
घडो भेटि कृष्णातिरीं स्वामियाची ॥ ७ ॥
शुका सारिका चातका चक्रवाका ।
चकोरा वृका जंबुका आणि काका ।
शकुनासि हे शुद्धि सांगा तयाची ।
घडो भेटि कृष्णातिरीं स्वामियाची ॥ ८ ॥

मनीं ध्यास तैसें चि हें स्वप्न देखें ।
जनीं सांगतां बोलती सर्व लोकें ।
नसे आप्त कोणी च माझ्या जिवाचीं ।
घडो भेटि कृष्णातिरीं स्वामियाची ॥ ९ ॥

उदासें कसें चित्त हें वेधिलेंसे ।
परत्रैक हें चित्त हें बोधिलेंसे ।
चरित्रें विचित्रें बरीं गाउं त्यांचीं ।
घडो भेटि कृष्णातिरीं स्वामियाची ॥ १० ॥

मनीं वेध हा खेदसा वाढतो रे ।
घडीनें घडी कंठ हा दाटतो रे ।
विवेकें चि हे सांडि होते मनाची ।
घडो भेटि कृष्णातिरीं स्वामियाची ॥ ११ ॥

बसेना चि मत्तांतरीं चित्त माझें ।
कसें चित्त हें वेधिलें योगिराजें ।
कथाकीर्तनीं आवडे मूर्ति त्यांची ।
घडो भेटि कृष्णातिरीं स्वामियाची ॥ १२ ॥

ध्वनी नाद कल्होळ स्वप्नांत येती ।
घडीनें घडी जयजयकार होती ।
मनीं बैसली रामनौमी तयांची ।
घडो भेटि कृष्णातिरीं स्वामियाची ॥ १३ ॥

मनीं वाटतें अवचितें स्वामि आले ।
रघूवीरसे शब्द सर्वत्र जाले ।
ध्वनी पेकिली रम्य श्लोकाक्षरांची ।
घडो भेटि कृष्णातिरीं स्वामियाची ॥ १४ ॥

हरीभक्त वीरक्त येती तयांतें ।
पुसे आवडीनें तया स्वामियातें ।
मनासारिखीं कीर्तनें होत त्यांचीं ।
घडो भेटि कृष्णातिरीं स्वामियाची ॥ १५ ॥

समर्थें सुखें स्वप्न हें दाविलेंसे ।
शिरीं हस्त ठेऊनि संबोखिलेंसे ।
सभामंडपीं दाटि हे सज्जनांची ।
घडो भेटि कृष्णातिरीं स्वामियाची ॥ १६ ॥

असें काय मी चाळऊं केविं चित्ता ।
निघों दर्शना येक वेळे चि आतां ।
असों कायसी लाज या लोकिकाची ।
घडो भेटि कृष्णातिरीं स्वामियाची ॥ १७ ॥
भवस्वर्ग हें तुछ वाटे मनातें ।
कृपें दाखवीं सीघ्र निरंजनातें ।
कसी काय ते शुद्धि सांगा प्रभूची ।
घडो भेटि कृष्णातिरीं स्वामियाची ॥ १८ ॥
निघा रे निघा सर्व संसार वायां ।
चला रे चला सर्व विश्रांतिठायां ।
करा रे करा सांडि या वैभवाची ।
घडो भेटि कृष्णातिरीं स्वामियाची ॥ १९ ॥
उदासी गिरी सर्व धुंडीत गेले ।
तयालागि ते स्वामि संतुष्ट जाले ।
पदें धूतसे नित्य कृष्णा तयांची ।
घडो भेटि कृष्णातिरीं स्वामियाची ॥ २० ॥

॥ श्री ॥

## ॥ आरती श्रीसमर्थांची ॥

आरती रामदासा । सद्गुरु सर्वेशा ।
कायावाचामनोभावें । वोवाळूं परेशा ॥ १ ॥
रामदास मूर्तिमंत । रामचंद्रअवतार ।
कलियुगीं अवतरोनी । केला भक्तांचा उद्धार ॥ २ ॥
वैराग्य भक्ति ज्ञान । शांति क्षमा विरक्ती ।
विवेक सालंकृत । क्षमा दया सर्व भूतीं ॥ ३ ॥
सच्चिदानंदघन । रामदास केवळ ।
दिनकरकृपायोगें । रामचंद्र निर्मळ ॥ ४ ॥

श्रीरामचंद्रार्पणमस्तु

श्रीमत्

# दासबोधांतील विषयांची सूची

( पहिला अंक दशकाचा, दुसरा समासाचा व पुढील ओव्यांचा समजावा )


## अ

ॐ १२-५-९; १३-३-६
अक्कल १२-९-२८।२९
अग्निस्तवन १६-५
अजन्मा ६-१०-३६।५८; ८-८-३३
अजपा १७-५
अजामेळ ४-३-१७
अत्रि ५-६-२४
अद्वैतग्रन्थ ७-९
अधिकारी ३-६-७, ५-३-३४।३६; ८-८-५७; ९-४-२८
अध्यात्म ७-१-५४
अध्यात्मग्रन्थश्रवण १८-४-४०, २०-९-१४।१८
अध्यात्मनिरूपण ५-३-८; १७-३
अन्न वाया दवडणें १२-१०-१
अनुग्रह ६-१-३१
अनुताप १२-७-१४
अनुभव ६-१०-२७।३४, नाना लोकाचे ८-१०
अनुमान " संशय " पहा
अपाय करणें च तर कसा करावा ११-५-१७
अभाविक ३-१०-२३।३७
अभिमान १-१-२३।२६, ६-४-१७।१८, १५-१-१९।२१
अभ्यास ७-७-७२।७४
–साचा मुगुटमणी ८-९-२१
अमर ३-९-५९
अमरावती ४-१०-१३।२२; १०-५-१७
अर्चनभक्ति ४-५
अर्धनारीनटेश्वर १०-९-१०, १७-२-८; २०-५-८; " माया " पहा
अवगुणांत अवगुण १९-८-८
अवतारी १०-६-३९, १०-७-१।११, ११-९-९।११; १५-३-५; १८-८-६।७
अवधूतगीता १-१-१८; ७-७-३४
अशक्त १९-१०-२२
अष्टधा प्रकृति " प्रकृति " पहा
असच्छिष्य ५-३-५३।९६
अहंकार ८-७-५६, " देहबुद्धि " पहा
–राची व्याख्या १७-८-९
अहंता १५-८-३३।४०" देहबुद्धि" पहा
अहं ब्रह्मास्मि ९-१०
अज्ञान ६-१-१९, ७-२-२२, ७-१०-९।२७; ९-४
–नाचें लक्षण १२-१०-२८
अंत्यज ५-१-१६
अंतर्निष्ठ १८ १-२३।२४
अंतरात्मा १०-१०-३६।५०;११-१-१९। ३१, ११-४,११-८, ११ ९-

१४।१९; ११-१०-१।३,१५-८, १५-९; १६-७; १६-९; १७-६, १८-१-१६।२४,१८-२-२३;१८-८-८।११; "आत्मा" पहा

अंतराळ १७-१०-७

अंतःकरण

–णाची व्याख्या १७-८-४

सकळांचे एक १०-१,११-९-१६, १५-७-२३।२८,१६-८

## आ

आकाश व स्वरूप ८-५-३६।६९; ९-९-१७।२१

आचार ५-२-५६।५७

आचारविचार १३-१०-१६;१७-१०-२५

आत्मत्वीं भेद का १४-८-१८; १६-८-२३, १७-२-२०।२३

आत्मनिवेदन ४-९, ५-६-४६।५१; ६-२-३९, ६-३-२४; ६-३-२१।२२, ८-८-७।१९, १३-२- २८; १३-६-३१; १४-९-१८; १७-८-३१; १८-५-३३; १८-९-२४

कसें करावें ८-८-१३।१९

–नाचे तीन प्रकार १२-५-१६।२२

–नाचे महत्व ४–९–२५

आत्मवत् परावें १२-१०-२२

आत्महत्यारा ५-६-५५; ८ ७-२३।२४; १०-८-१९; ११-८-७; १८-७-९।१०

आत्मज्ञान ५-४-३२।३६, ५-६, ५-६-४४।४५; ६-१-१९।२३; ६-२-२८।४५, १०-९-२२।२३; १०-१०-६३।६६; १७-३.

–नाची महती ६-२-१।५;७-१-२६।२८

–नाची व्याख्या५-६-१;५-६-१०; ५-६-१४

मिथ्या आहे काय? ७-७-३०।४२

आत्मज्ञानी ३-९-५९

आत्मा ६-१०-१४।१५, ८-८-४९, १३-१-१।२०; १३-६-११।१२; १३-९, १६-७, १६-८; १६-१७, १७-३; १७-६, १८-१-१६।२४, "देव" पहा

गुणनिरूपण २०-६

चत्वार ८-७-४४।५५

–त्म्याचीं रूपें २०-६, २०-७; २०-८

आत्माराम १६-८,१६-१०

"अंतरात्मा", "आत्मा" पहा

आदिदैविक ताप ३-८

आदिनाथ ५-६-२५

आदिभूतिक ताप ३-७

आध्यात्मिक ताप ३-६

आपला आपण १७-५-७।१२

आपस्तवन १६-४

आयुष्य १८-३-१

आवाहन विसर्जन २०-८

आळस ७-८-४८।४९; ८ ६-२९।४०; ११-३-१०।१३, १२-९-६; १२-१०-११,१८-३-३।५,१२, १८-७-४।५;१९-३-४,११,१२,१९-९-७;२०-५ २७

## इ

इहलोक साधायास साधन १२-३ २

इष्टदेव १८-१-६

## ई


ईश्वर १०-४-१६।२८
-राचें देणें १८-६-१४।२१, १८-१०-५


## उ


उत्तम लक्षण २-२
उद्वेगाचें मूळ तुटे ११-३-२८
उन्मन २०-१०-२५
उपदेश दाटून न करावा १४-१-३३
उपदेशपर २-२; ११-३, ११-५; १२-१-११।२०, १२-२, १२-९-८।३०; १२-१०, १३-१० २२।२९, १४-१; १४-६; १५-१; १८-२, १८-३, १९-१, १९-२, १९-७, १९-९; १९-१०
उपदेशलक्षणें ५-४, ६-२
उपाधी ११-५-९; १९-८-१९।२२, २७। ३०; १९-१०-२०
उपासना ८-१-९।१०; १५-९-२६।२९; १६-९; १६-१०-२८।३०; १७-३-२५, १९-२-१६, १९-१०-८, २०-४-१५, २०, २२, २३; २०-८-२९।३०, २०-९
-नेचा अभिमान ६-४-१२
-नेच्या शेवटीं १८-२-३०
सगुण ६-६-५४।५५, ६-६ ६०


## ऊ


ऊर्ध्वमुख २० ८-१६, २०-९ १७


## ए


एकंकार १७-४-२१।२९, २०-७ ३०
एकांत ११-१० १७, १८ ३-२०; १८-१०-४७।५०, १९ ६ २८।३०, २० ७-२३।२४ २०-८-२०


## क


कथा १९-२-२०।२१, १९-७-१
कर्ता १३-८
कर्म ११९-११२
इंद्रियें १७-८-१४
करमणूक ७-९-५७
करून अकर्ता ९-३
करटा १२-९-११४, १४-६-२५, १८-७-१६।१९
—त्याचीं लक्षणें १९-३
—त्यानें काय करावें १२-९
कलयुग ६-४-२
कल्पना ७-३-४८।५१, ७-५-१७।४०
कवित्व १४-३
धीट १४-३-८, १४-३-१०।२१
पाठ १४-३-९, १४-३-१०।२१
प्रासादिक १४-३-२२।३४
लक्षणें १४-३-३५।५४
कवीश्वरस्तवन ११७
कष्ट ११-१०-२०, १२-७-२५; १८-७-११५, १६; १९-१-१२ १९-९-१६, “ यत्न ” पहा
कामना ५-२-४१।४३
काहाणी १३-५
काळ १८-१०-११४
ह्मणजे काय १२-८-२।१७
कांतावियोग ३-२-५९।६३
किडे सूक्ष्म १५-८
कीर्तन ४-२, ४-२-२३
पोटासाठीं ५-८-१९; १४-१ ४५, १४-१-५५
लक्षणें १४-४
कीर्ति ३-९-४४, ११-८-२७, १२-१०-

१३;१२ १०-१८।१९; १५-२-२०, १९-३-२४, १९-६-२४; १९-१०-२५
कुविद्येचीं लक्षणें २-३
कुळधर्म ४-५-१५।१६
कूटात्मक १५-५ ११२, १५-६-११४
कृतायुग ६-४-१
कृष्ण ६-८-२९
कैलास ४-१०-१२; १०-५-१७
कोहं ६-३-३४।३५
कौशल्यता ५-५-३२
क्रियेविण शब्दज्ञान १२-१०-३०

## ख

खांजणी भांजणी १५-४-१८।२३, " ब्रह्मांडाची उभारणी व संहारणी " पहा
खंडेराया १८-१-११

## ग

गणपती " गणेश " पहा
गणेश
महिमा १-२-३।७, १-२-२६।२९
स्तवन १-२-१, १-२-२५, २-१-१, ४-१-१, ७-१-११६, १६-८-१; १८-१-१
स्वरूप १-२-८।२४
गभस्ति " सूर्य " पहा
गर्भवास ३-१-२९।४७
गर्व १५-८-२७।३५
गाणें १४-४
ण्याचे प्रकार १२-५-६
गीता १-१, ७-७ ३३।३७
गुण ९-४-४, ९-४-१५।१७
अगातुक २-८-३१; १४-६
सहज १४-६-२।४
-साम्य २०-२-२५, २०-५-२०
-क्षोभिणी १७-२-१०; २०-२-२४, २०-५-९
गुरु ५-१-६, ५-२-६६।७२ " सद्गुरु " पहा
अडक्याचे तीन ५-२-२१
—गीता १-१-१८, ७-७-३३; ७ १०-४३
—त्व १४-७-२९,३४,३६
नीच यातीचा ५-२-५८।६३
व शिष्य १९-६-४।१३
स्वयातीचा ५-२-६४
गृहस्थाश्रम १४-७-१।६
गोरक्षमुनी ५-६-२५
ग्रन्थ ७-९-३०।६०
ग्रामाधिपती ६-१-८
ची भेट ६-१-२।७

## घ

घर १-१०-३४।५०
घ्राण २०-८-७

## च

चक्रवती ६-१-९।१०
चत्वार
अभिमान १७-९ २
अवस्था १७-९-१
गुण १७-९-५
देह १७-८, १७ ९-१
भोग १७-९-३
मात्रा १७-९-४
शक्ती १७-९-६

स्थान १७-९-२
चतुरानन " ब्रह्मा " पहा
चमत्कार १-९-५, १-१०-६।१०, ९-८-६।१०; १०-४-२२।२७; १०-६-३७; १०-७-१।११; १०-९-२०।२१, १५-८-२२।२४
चळवळीचे सामर्थ्य २०-४-२६
चक्षु २०-८-६
चातुर्यलक्षणें १५-१ १५-६, १९ २-६।७
चातुर्वर्ण्य ४-३-२४
चांगदेव १-१०-९
चित्त १७-८-८
चुकणें-१९-८-११।१४
चैतन्य २०-२-२१, २०-५-७
चौऱ्यासी लक्ष जीवयोनि २०-६-३।६
चंचळ ११-२; " माया " पहा
नदी ११-७
व निश्चळ १५-५; १५-१०

## ज

जगज्जोती " जाणीव " पहा
जगदीश २०-४-८
जगमित्र १९-२-१९
जनक ५ ६-१३
जनींजनार्दन १८ ४-३५
जन्म ३-१- १।१०; ८-७-५६
–दुःख ३ १-२९।४७
–मृत्यु ७-१०-२८।३०, ८-७-६६; ९-७-८।४३, २०-१० २९
जन्माची विफलता २ ४-१४।२६
जन्माची सार्थकता १-९-२५, १-१०-६१ २-४ ५, १३, ३-९-४४, ६-२ ३७; ७-१०-३९, १२-८-२२।२३, १५ २-३०; १७-१-२१. १७-७-२९; २०-१०-२६
जयंति ४ ७-१८
जागृति ५-६-६९।७१
जाणणें ९-४
व्याख्या ९-४-४०
जाणता १७ ७-१४।१५; १८-२, १८-१०-३३, ४५
जाणती कळा " जाणीव " पहा
जाणीव ९-६-३, ९-६-१२।१३, १०-१-१२, २६।३०, १०-९-९।१८, ११-१-२६, १४-८-१३; १५-३-६ १७-८-४, १८-८-१०
–नेणीव ९-६-३, १०-१-२८।३०
जिन्नस
–तीन १०-२-१५।३०
–चार २०-१
जिव्हा १९-२-१९, २० ८-७
जीव ८-३-१८, ९-६-३५
चत्वार ११-१-३४।३५
जीवन्मुक्त ६ ९-३३
जीवयोनी २०-६-३।६

## त

तत्त्वें १७-९ १।८
तमोगुण २-६
–णाचा परिणाम २ ५-२, १-६-३९
–णाचीं उदाहरणें २-६-२।३८
तत्त्वज्ञान १७ ३-२४
तापत्रय ३-६-८
तारुण्य ३ २-३५।५८, ११-३-३
तीर्थक्षेत्रें ४-५-१७, ७-१०-११, ८-१-३।४, १४-५-८, १८-८-११।१२; २०-१०-७

तुर्या ७-४-४९; ७-५-५; १५-७-४२
तुळजाभोवानी १८-१-१२; १८-६-९
त्रिगुण २-५-११५; ९-६; १०-३-६।९
—णाचा परिणाम २-५-२
त्रेतायुग ६-४-१
त्वचेंद्रिय १०-८-६

थ

थोर कोण १५-३-९।१७

द

दारिद्य ३-४-११३४
दास "रामदास" पहा
दासबोध७-१-२९।५३,२०-१०-३०।३५
ग्रन्थाचे नांव १ १-२
ग्रन्थाला आधारभूत ग्रन्थ १-१-१८।१९
ग्रन्थातील प्रतिपाद्य विषय १-१-२।१२
रचनाकाल ६-४-७।८
—स्तवन २०-१०-३३
श्रवणाचे फळ १-१-२८।३७
दास्यभक्ति ४ ७
दिनचर्या ११-३, १२-९-९।१३
दुरात्मा १५ ९-१८
दुर्जन प्राणी १९-९-२३।२४
दुश्चीतपणा ८ ६-१९।४०
दुष्काळ ३-५-४।११
दृश्य सत्य कां मिथ्या ६-८,७-४-११।१३,९-२-१,८
मिथ्या, तर दिसतें कां ? ६-८-३८।४४;६-९
देव ४-८,८-१-२२।२३,८-१-२९।४२,८-३-१८;९-३-३०।३१,१०-३-९।११;१०-९-२०।२१,११-८,११-९-९।११; १३-७-२१।३०,१४-८-३।२३ १८-२-२६।२७,१८ ७-११।१४,१९-५-६।१३;
" आत्मा " पहा
कोण १२-३
चत्वार ११-२-२८।३४,१९-५-१८।१९
निर्गुण ६-२-२६।२८,६-६-४७।४८,११-२-३७।४०
—पूजा १५-९-२५
प्रत्यक्ष भेटावा २०-९-७
प्राणाहून श्रेष्ठ ४-८-८
बळात्कार १७-१
मातेहून श्रेष्ठ ४ ८-२४
सहज १७-५-१४।१५
देवता १०-३-९।११, १०-९-२०।२१,१९ ५-५।१३
देवतें १०-३-९।११, १०-९-२०।२१,१९-५-६।१३
देशस्थिति तत्कालीन ३-५-२७।३४'१४-७-३१।४०,१५ २-३।११,१८-६-१२
देशाधिपती ६-१०८
देह १-१०-५१।६०, ३-१-११।२७;६-३-२०, १९-५-७।१२, १९-६-२५, २०-८
—आत्मायोग १३ ९,१८-४-३२।३५, १९-५-८
आहे ह्मणून १८-४
— कष्ट १९-१-१३
कारण १७-८-३०
चत्वार १७-८, १७-९
देऊळ १७-१

—बुद्धि ६-२-३६, ६-८-४०।५०, ६-१० १६।१७,७-१-२३। २५,७ २-२०।४०,७-६-५०।५४, ७-७ ४३।५६; ८-१-१४,८-७ ५।१७;९-२-१५।१९

—बुद्धि कशी झडते ११-८-२३

महाकारण १७ ८-३०

शृंगार १४-६-९,१८।१९,१८-६-१२

सार्थकीं लावावें १८ ४-३१

सूक्ष्म १७-८-१।२२,१७-९-१७।२२

स्थूळ १७-८-२३।२९,१७-९-१२।१७

दंडक १८-८-४

द्वापार युग ६-४-१

द्विज ५-१-९

## ध

धर्मस्थापना १७—१-२९; १८-४—३६

धर्मस्थापनेचे नर १०-४-४२;१८-६-२०

धीर १९ १०-२७।३०

ध्यान २०-४-१२

अखंड १४-८-१।२४

दंडक १४-८-३०,४१।४८

मूर्ति १४-८-२५।३६

## न

नमस्कार " वंदनभक्ति " पहा

—राचा महिमा ४-६-१४।२१

नरदेह १-१०; २-४-१।२, ३-१०-२५, ३-१०-३८,८-७ १८।२९,११-३ १,१८-३-१,२० ५-१७।२७

नवविध भजन ४-११९,८-८ ६

नामस्मरण ४-३

नारद ५-६-२३

निजध्यास " श्रवणमनननिजध्यास " पहा

निद्रा १८ ९

निपुत्रिक ३-३-३१।४६

निर्गुण ह्मणजे काय १६-९-४,१३,१६

निरभिमान १५ १-२१

निरूपण ४-२-२।

निवृत्ति १२-८-१९

निश्चय ५-१०-२८।३९

निश्चळ ११-२ " ब्रह्म " पहा

निष्काम भजन १०-७-१९।२५

निष्ठुर बोलणें १२-७-१

निस्पृह १९-६-३,१५

—लक्षणें १९-६-१६।३०

—वर्तणूक ११-१०

—व्यापलक्षणें १५-२

—शिकवण १४-१; १८ ३

—ह्यानें काय करावें १४-१-५९

निस्पृहतेचीं लक्षणें १४-२-२१

नृपती " राजा " पहा

नेणणें ९-४

नेणता १७-७-१४।१५

नेणीव ९-६-३; १०-१-२७।३०

नेम १८-६-६

## प

पढतमूर्ख " मूर्ख " पहा

परब्रह्म " ब्रह्म " पहा

परमात्मा " ब्रह्म " पहा

परमार्थ " आत्मज्ञान " पहा

—ची तुळना ७-८-४९

—चें जन्मस्थान ७-१०-२८

—चें मुख्य लक्षण ६-७-१०
—चें साधन ७ ८, ११-३-३०
—चें स्तवन १-९
—चीं काय पाहिजे ११-३-२९
—स ताळू ७-९-२८
—स मूळ ११-४-१०
परलोक साधायास साधन १२-३-२
परावलंबन १९-९ १६
परा १७-८-१,३
परांतर १२-१०-९,१२–१०–२०,१५–१-४,८,१४
अनुसार वर्तावें १५-६-१३।१७
परिभ्रमण १४-१-६, १४-२-८।१०;१५-१-३४, १५-६-२५।२६, १९-७-२८।२९,१९-८-१, १९-१०-१८।२३
परोपकार ११-५-१०,११–५–१५,१२–१०–५।६, १२-१० २१,१९-४-२२
पशुदेह १-१०-२१
पशुपति "शंकर" पहा
पश्यंती १७-८ १
पाताळलिंग १७-१०-१
पादसेवन ४-४
पाप १०-१०-५३।५६, १८-५-२६
पारतंत्र्य १४-१-२२
पाषांडमत ५-१-१७
पाडव ४-१०-७
पाडुरंग १८-१-१३
पिपीलिकामार्ग २० २-१०
पिंड २०-७-११
—डासारखी ब्रह्मांडरचना ९-५; १६ ७-४१।४२
—डीं निश्चळ, चंचळ आणि जड २०-७-१२।१६
पुढारी १५-१-२५।२८
पुनर्जन्म ३-५-५४।५५; ९ ७-८।४३; ९-८
पुण्य १०-१०-५३।५६
पुस्तकज्ञान १२ ६-३०
पूजा ४-५-१८।२९
मानस ४-५-३२।३३
पूर्णापूर्ण २०-१
पूर्वपक्ष १०-२-२४;१५-४-२६;२०-२-२०।२१
पृथ्वी १५-४-११।१७
—स्तवन १६-२
पोरपण ३-२-२०।३४
पंचकें पाच १७ ८
पंच प्रळय १०-५
पंचभूतिक माया ८-४, ८-४-४०।४२
पंचभूतें १०-३-१२।२०, १२ ६-१०।१५;१३-६–१।१०;१३–८-२६।२८;१६-१०
—ताची उत्पत्ती ११-१-१।१०
—तांचीं रूपें ८-४-१०।१२
—तांचीं लक्षणें ८-५
—ताचे पंचवीस ८-४-१३।३८
—तांत जाणीव आहे ९-६-२०।२३
पचवटिका ६-८-२७
पंचीकरण १७ ८
प्रकृती ६-२-१४,८–४–४२,९–२–३८।३९;११-१-९।१०
व्याख्या ११-१-७

प्रकृतिपुरुष १०-९-७।८, १६-७-४०।४३; २०-५-८
प्रचीति ६-९-२५।२७; ९-५-१५।१८; १०-२-८।१०, १०-८; १०-१०-५३।५४; १०-१०-६७।६८; १२-९-१५; १३-६-३०; १३-७-१३।२०; १४-७-१८।१९, १५-१-७; १५-४-२७।३१; १८-५-१।९; १८-८-२०; १९-२-४।५, २०-३-२७।२८; २०-४-१८
प्रतिमादेव "मूर्ति" पहा
प्रत्यय "प्रचीति" पहा
प्रपंच ११-३-२
आणि परमार्थ १२-१-११।१०, १२-८-२१
–चीं काय पाहिजे ११-३-२९
–ची जन १९-८-२।५
प्रबोधशक्ती १२-१०-३८।३९
चीं द्वारें १५-२-१६
प्रयत्न "यत्न" पहा
प्रयोजकता ७-९-१०।२४
प्रल्हाद ४-३-१७
प्रवृत्ती १२-८-१९
प्रळय १०-५; ११-१-१८, १३-४
प्राकृत "मराठी" पहा
प्राणपंचक १७-८-११।१२
प्रात.काळीं उठत जावें ११-३-१५. १२-९-९
प्रास्ताविक ३-१०-३८।७४, १२-८-२८

ब

बद्ध ५-७, ८-७-३।१७
बद्रिकाश्रम ४-१०-९
बद्रिकेदार ४-१०-१०
बद्रिनारायण ४-१०-९
बनशंकरी १८-१-९
बहुताच्या बोलें लागला १२-६-२९।३
बहुधा ज्ञान ५-५
बाह्याकार १८-१-२४
बाळपण ३-२-२।१९, ११-३-३
बुद्धि १५-१-१५; १५-१०-२९; १७-८-६-७
बोलणें मृदु "मृदु वचन" पहा
बोलणें व चालणें एक १२-९-२३, १२-१०-३, १२-१०-३९
बोलणें सप्रचीत १४-१-२
ब्रह्म १-५-२।१४, ६-२; ६-३; ६-४-२३; ६-५; ६-१०-७।८; ७-२; ७-४; ८-८-१।५, ९-१; ९-२; ९-९; १०-४-११।१४; १०-६-१।३; १०-१०; ११-२; ११-४, ११-९-२०।२५; १२-३-१८।२२; १२-५-१३।१५; १२-६-१।३, २०; १३-२-१४।२७ १४-९-११।३०; १५-४-२३।२६; १६-४-३०।३१; १७-२-१।५; १७-३-२६।२९, १७-६-१८।२१, १७-१०-८, १८-८; २०-२-१।१४; २०-५-२।४; २०-७-१६; २०-९-३०, २०-१०
अहमेव ९-१०
आणि अंतरात्मा ११-४
आणि आकाश ८ ५-३६।६९, ९-९-१७।२१; २०-१०-३।६, २०-१० १७।१८
आणि दृश्य २०-२-७
आणि पञ्चभूतें २०-१
आणि मन २०-१

आणि माया २०-१
कसें ओळखावें ७ ७
कसें पावावें ८-८-२५, ९-२-३२।३३, ९-९-३०।३५
देहातीत ८-८-२८।३०
प्राप्ति, माया व देह असून हि ८-८-३५-४७
ह्याची अखंड स्थिति ६-४-११।१
ह्याचीं चौदा नावें ७-३
ह्याची व्यापकता २०-१०-२३
ब्रह्मज्ञान "आत्मज्ञान" पहा
ब्रह्मा १०-४-३१।३६; १२-६-८, १८।१-२
ह्याचा दिवस ६-४-२
ब्रह्मांड ९-६
उत्पत्ति ६-३-१२।१४; ८-१-२६। २८,
उभारणी ११-१-११।१०; १२-६-९।१७, १२-३, १४-९ ६।१०
—कर्ता कोण १३-८
संहारणी ११-१-११।१७, १२-६-१८।१९; १३-४, १४ ९-६-१०
ब्रह्मांडीं तें चि पिंडीं ९-५
ब्राह्मण ५-१-६।१८; १०-२-१७, १४-७-३०; १८ ६-१९
गुरु ५-१-६
-णाची व्याख्या ६-४-२४
-णाची सद्यःस्थिति १४-७-३१। ४०
-णाचे मंत्र ५-१-८

भ

भक्त ३-१-५२; ३-१-८।१२, ३-१०-२१। ३२, १२-३; १८-२-२९
-काची व्याख्या ४-९-६; ११-८-१३
भक्ति १४-५ २९-३०, "भजन" पहा
भक्तिमार्ग १४-५-२९।३०; १४-७-६।१२
भगवद्गीता १-१-१९, ७-७ ३७, १३-७-२३
भगवद्भजन ३-५-५६, ३-१०-७१
भगवत २०-४-४१६
ताचें अधिष्ठान २०-४-२६
भजन ४-११९, ८-८-६
निष्काम १०-७-१९।२५
भागवत १-१-१९; ७-७-३६
भाग्य १४-२-१९, १४-७-१०
—ग्याचें लक्षण ९-४-१७
—पुरुष ४-६-२५
भाव ३-१०-१३।१९; ४-६-२४, ५-१-१४
भोळा २०-९-११
भाविक "भक्त" पहा
भाषाभेद ७-१-४१।४४
भिकारी १-९-२३
भिक्षा १४-१-८; १४-१-५०, १४-१-५६, १४-२, १५-६-२४
आठ दिवसांची १४-२-७
आणि वार १४-१-५६, १४-२-६
भोंद १४-९-२४।२९, १५-१-७
भीम १८-१-१०
भूतें १०-३ ९।११; १० ९-२०।२१
भेदाभेद १३-१०-८।२१ १७-१०-२०। २९. २०-८-१७
कसे झाले ९-४, १७ ७-२५।३०
भोळा भाव २०-९-११

भोळा शंकर “ महेश ” पहा

भ्रम १०-६

## म

मठपती १४-१-५८

मत्सर १२-७-११, १२-७ १५।१६

मध्यमा १७-८-२

मन १७ ८-५।६;१८-१०-१७,२०-१-६, ° २०-९-१५

मनन ५-६-५९, ७-८ ४२।४३

पुन्हपुन्हा ७-८-४७

प्रत्ययाचें २०-१०-२५

मनोगत १२-२-३।४, ८।९,१३-१०-२८।२९;१८-१०-४४

मरण ११-३-६; १२-२-२६,१२ ८-२८: ३२।३३; १२-१०-१३; १४ १ १०,१९-६-२५

मराठी १-६-१२, ७-१-३२।४२,७ १०-४६।४९

महत्तत्व १७ २-१०, २०-३-९

महद्भूत १६-७

महंत १२ ९-२३,२७,१३-१०-२९;१४-१, १४-१-८०; १९-५-८; १९-१०-१९

–ताचीं लक्षणें ११-६, १२-१-११।२०; १२-२, १२-१०

–ताची वर्तणूक ११-१०

महानुभाव १२-१०

महापुरुष १९-४-२४,२५,३०

महाराजा ६-१-१

महावाक्य ८-८-२४

–क्याचा विचार करण्याचा अधिकार १५-१०-१५

महेश १०-४ ४३।४४; १२-६ ९, १८-१-५

–शाचें फळ ६-४-३

महोत्सव ४-७-१८

मातृप्रेम ३-४-३५।४३, १७-२-२६।२८

मान १८-१-३१

मानसपूजा ४-५-३२-३३ “ पूजा ” पहा

माया ६-५,७-१-५५।६०,९-६,१०-४-९।१०, १०-९-११।१०;११ २, १२-३-१०।१७;१२-६-४।५, १५-७-११।१८,१७ २-६।९; २० ३;२०-९-१३।१४

नदी ११-७

पंचभूतिक ८ ४-४०।४२

–येचा उद्भव ६ ३-१२; ८ २; ८-३; १०-३

–येचीं चौदा नांवें २०-५ ४।१०, २०-९-२७।२९

–येचीं नांवें १०-१०-५।२४

–येचे दृष्टांत १४ १०

–येचें मिथ्यात्व ६ ४-१३।१६

–विश्रम ७-१०-१

–वेल १५-७-११।१८

मारुती ४ ६-६, १६-६-२४।२४

मी कोण १२-३-२२।२६

मीपण “ देहबुद्धि ” पहा

मुक्त ७-६-४५।४६,९-४-२५।२७

असून बद्ध ७-६-५१।५३

मुक्ति ८-७-३,८-७-५७,८-८-५६।६९

चत्वार ४-९-२८।२९;४-१०-२३।३१

मुमुक्षु ५-८

मूर्ख १-९-२५;१-१० १३,१८-३-४।१०

पढत २-४-९२,२-१०,३-१०-३०, ५२,५-३-५४;१४-५-१०

परम २-१०-४०

—लक्षणें २-१; ८-६-३६
मूर्ति १८-२-२६।२७;१८-८-४।६,१६
मूर्तिध्यान १४-८-२५।३६
मूर्तिपूजा ६-२-२६।२८;६-६-३२।४५;
६-७-४३,८-१-२२।२३,२९-४२,
९-३-३०।३१;११-९-५।६,१९-
५-११४, २०-९
मूळमाया “ माया ” पहा
मृत्तिकापूजन २०-९-१
मृत्यु ३-९; १७-६-२६।३२
मृदुवचन १२-१०-६।७,२३।२६;१४-
१-३५; १४-२-२१
मेरु ४-१०-४।११;१०-५-१६,१८
मोलकीर्तन १४-१-४५
मोलपुजारी १४-१-५७
मोलयात्रा १४-१-५६
मोलें सुकृत १४ १-५७
मोक्ष “ मुक्ति ” पहा
मौनी १७-५-९
मंदक्रया १९-६-१४
मंत्र ९-८-३३।३७; १४-१-२
मंत्रोपदेश ६-४
म्लेंच्छ १८-६-१२

य

यत्न ११-३-११; ११-६-१२,११-१०-
२०,१२-२-६;१२-९, १५-३-७;
१७-७-३०
काय करावा ११-३-१४।२३
येककार “ एकंकार ” पहा
येकांत “ एकांत ” पहा
येमधर्म १८-१-७
योग १७-३-२४; १७-५-९
हट १७-५-१९
योगी १७-१-२३
महा १२-७-१८

र

रघुनाथ “ राम ” पहा
रजोगुण २-५
—णाचा परिणाम २-५-२
—णाचीं उदाहरणें २-५-८।२४,
२ ७-१८
राजकारण ९-४-३५, ११-५, ११-६-४,
१२-२-२९;१५-२-४,२५;१८-
६-१,६;१९-४-१७
राजा ६-१-९
राजी राखणें १३-१०-२३
राज्यधारी १-९-२३
राम ३-१०-५५।६३,४-३-२१।२२,६-
७-२१।२२
—कथा १२-९-२६
कर्ता ६-७-३३।३७
कृपा १०-१०-६८
कृष्ण १८-१-१५
नाम १६-८-३
भजन ६-७-२८।३२;३९,४३
वंश १६-२
रामदास १-६-१२।२३,१-८-२६।२७;
५-६-४१।४२; ६-७-२१।२२,
१०-८-२७, ११-१०-२४, १४-
१-२,१६-१-२१,१६-२-२१
१६-५-३०
सांची उपासना १०-८-२७, १५-
९-२६।२९;२०-८-२९।३०
सांची प्रतिज्ञा १२-१०-३४
साचें बोलणें १४-१-२
रावण ६-८-३०

राक्षसांची माव ६-८-२७।३२
रेखा १२-५ १

## ल

लग्न “ संबंध ” पहा
लघुबोध १३-६
लहानथोर ६-४-१४।२०; १५-३ ९।१७
लक्ष्यांश ६-१०-२५, ९-२-२२।२५, १३-२-२९ १७-१०-११; १८-५-२८
लिहावें कसें ११-६-११२ १९-१
लेखनक्रिया “ लिहावें कसें ” पहा
लोकपरीक्षा १२-२-१०
लोकप्रवाह ११-२-१३।२६
लोकभ्रम ७-१०-९।२७
लोक राजी राखणें १९-७-१०
लोकसंग्रह ११-५-१८
लोकस्थिति ११-२-१३।२६
लोकाप्रमाणें वागावें ११-२-४०, १२-१०-४२
लौंद १८-६-३।५

## व

वक्ता ४-२-२४, १७-४-१।६, १८-५-६, १९-१।६७-३
वटवट १२-९-१०
वर्णसंकर १४-१-७६
वस्तु “ ब्रह्म ” पहा
वसिष्ठ ५-६-२३
वसिष्ठसार ७-७-३६
वसुमती “ पृथ्वी ” पहा
वाक्यभेद ६-६-२६
वाचन १८-३-२०
वाच्यांश ६-१०-२५; ९-२-२२।२५, १३-२-२९; १७-१०-११, १८-५-२८; २०-३-१९
वाणी चत्वार १२-५-८
वादविवाद ८-९-२८
वामदेव ५-६-२४
वायुस्तवन १६ ६
वाल्मीक १-७-२३, ५-६-२४; ४-३-१९
स्तवन १६-१
वासना १७-२-१७।३४
विचार “ विवेक ” पहा
विदेह ६-९-३३
विरक्त २-९
–त्याचा अभ्यास २-८-३२
–त्याचीं लक्षणें २-९-६।४१
–त्याचें महत्त्व २-९-१।६
विवरण १८-५-११९
विवेक ६-९-२४।३१, ८-७-६५, १०-९-२७।२८; १३-७-२७।२९, १८-३-११२, १८-६-११२२, १८-७-२०, १८-८-१४।१६, २५, १८-१०-४६।४८, १९-६-२७।३०, २०-७-२५, २७; २०-१०-३७
आणि वैराग्य १२-४
आत्मानात्म- १३-१-११२०, १३-७-११९०, १८-९-३
नित्यानित्य– १३-१-२११२८, १३-६ १५, १८-५-३१
वैराग्यावांचून-१२-४-८।१०, १९-
सारासार-१३ २; १३-६-१६, १४-९-३; १८-५-३१
–हीन १२-७-३; १२-८-१८
विश्रांतीचें स्थळ १९-८-२५।२६, २०-१०-१९
विषय ३-१०-६१, ६२, ६४।६७
–त्याग १२-७

–त्यागाची लक्षणें १२-७-२७
–दारीचा वराडी ५-३-५५।७०
–पचक १७-८-१४
–लोभी १२-७-२२।२३
विष्णु १०-४-३९।४२, १०-९-१२।१८, ११-९-१३।१४, १२-६-७, १८-१-४
--ष्णूची घटिका ६-४-२
विष्णोःस्मरण "नामस्मरण" पहा
विसर्जन २०-८
विस्मरण १५-७-३५
विहंगममार्ग २०-२-१०
विज्ञान ७-४-५०;३-१२-३-२७।३२
वृद्धपण ३-५ ३६।५४, ११-३-४
वेंकटेश १८-१-८
वेद ७-६-२०।३६
वेदांत ५ ६-३६।३८
वेदाज्ञा ५-१ १०
वैकुंठ ४-१०-१३, १०-५-१७
वैखरी १७-८ २
वैद्य १०-२-९ १०-८-१८, १७-४-१८, १८ ५-१५
वैराग्य १-६-६१, १२-७ १७
विवेकावांचून १२-४-२१७,१९
वैश्वानर "अग्नि" पहा
व्दनभक्ति ४-६
व्यर्थनिंद्य १३-१०-२०
व्यास १-७ २३; ५-६-२३

श

शक्तीचें अवें फळ ६-४-४
शब्द आणि अर्थ ६-१०-१८।२३,७-१-४१।४४
शब्दचमत्कार १४-४
शरीर २०-८ "देह" पहा
शहाणपण १५-३-२०।२८
शारदा
महिमा १ ३-२।२३
स्तवन १ ३-१;१-३-२६,२-१-२; ४-१-२;७-१-७।११, १६-८-२,१८-१-२
स्वरूप १-३-२४
शांति १२-१०-१६,१८
शिव ८-३-१८, ९-६-३५
शक्ति १०-९-८; २० ५-८, "माया" पहा
शुक ५-६ २३, ७-६
शुद्ध सत्वगुण २०-५-९
शूद्र ५-१-९
शूद्रांचे ब्राह्मण ५ १-८
शून्यत्व ८-१०-६४।७८
शौनिक ५-६-२४
शंकर ४-२-१५, ४ ६ ६
श्रवण ४-१,५ ६-५९;७-२-७;७ ५-४२. ७ ८; ८ ६-७, १३ ७ १२,१७-३-२।३,१८-१०-६।८;२०-२-९, २०-१०-२५
काय करावें ७-९
कैसें करावें ७-९
णाआड विक्षेप १८ १०-९।२९
पुन्हपुन्हा ७-८-४७
मननिजध्यास ११-१-४१, १७ ३-३ १८-१०-८,१९ २-२७
श्रीपति ४-६-६
श्रेष्ठ ११-६-१०
श्रोतृस्तवन १-६
श्रोत्रेंद्रिय २०-८-५

ष

षड्गुणेश्वर २० ५-८ "माया" पहा

स

सख्यभक्ति ४-८
सगुण उपासना ६-६-५४।५५,६०,६-७-८३, १०-७-१६।३१
सगुणनिर्गुण १४-५-९, १६-९-१३
सगुणमूर्ति १४-१-१२
सगुणें पाविजे निर्गुण १४-९-१३,१७-१०-११ १८-८-२२।२३
सत्य लोक ४-१०-१३, १०-५-१७
सत्वगुण २-७
–णाचा परिणाम २-५-२;२-७-८६।८७
–णाचीं उदाहरणें २ ७-९।८५
–णाचें महत्त्व २-७-११७
सच्छिष्य ५-३
–ष्याचें मुख्य लक्षण ५-३-१९
सत्संग १-९-२,२०;६-१-१५,६-२ ४५; ६-६-५५।५६,६-९-१९।२०; ७-१-३८।४०; ७-१०-३६, १४-७-२६; १७-१ २८, १८-८-१३
-गापासून किती दिवसांनीं मोक्षप्राप्ति ८ ६;८ ६-४३।४९;८-७-५९
सदेवपणाचें लक्षण ११-३-२४,१५-३-६।७, १९-४
सद्गुरु ८ ५-२०;४-३-९,४-७-२८;४-८-३२,५-१-२१।२२ ३९।४४, ५; २-९।१९,२२,३०,४८।५२,७३; ७-६-४४. ७-१०-२८।४४,१९-५ ३०
करावा १०-९-२५
– कृपा ५-६-३३।३५,७-२-१३। १५
देवाहून मोठा ५-३-४०।४६
–महिमा १-४,४ ४ ४।२१,५ १; ५-१ ११४
–रूचे गुण ५-२-५२
–रूचे ठाईं अनन्यता ५-६-५२
–रूचें भजन ५-६-५३
–रूस काय पुसावें १२-३
–वचन ५-६-३९।४०; ८-८-३३
–वांचून ज्ञान नाहीं ५ १-२१,३४, ४४,६-१०-१०;७ २-१२ १०-९-२४
–स्तवन १-४;४-१-३;७-१-११। १८
सद्विद्येचीं लक्षणें २-८-१।३०
सनक ५-६-२५
सभास्तवन १-८
समर्थ १९-४-३१; २०-३-२९
पदवी १८-१०-४६
समाधान ६-१०; २०-९-१३; २०-१०-२१
समाधी ६-१०-१२; १०-६-३८
समीपतामुक्ति ४-१०-२४
समुदाय ११-५-१४; ११-१०-१८; १२-१०-३२।३३,१९-९-१
कसा व्हावा १२-१०-३६।३७
सरस्वती "शारदा" पहा
सर्वब्रह्म १७-४-२०।२९
सर्वसाक्षिणी ७-४-४९, ७-५-५
सलोकतामुक्ति ४-१०-२३।२४
साधक ४-६ २४ ५-६-७२; ५-९

संसारिक ५-१०-११७
साधनें ५-१ २४।३२,३६,५ ३ ११४,
६-२-२५,४०;८-६-४१,१६-१०-
३१
अवश्य करावीं ७-७-५३।७१
साधु ७-२-३१, २०-३-२५।२७
" सद्गुरु ", " सिद्ध " पहा
सामर्थ्य २०-४-२६
सायोज्यमुक्ति ४-१०-२७।३१, ८-८-
१९, ११-१-४२
सारासार ११-४-१३।३०,
" विवेक " पहा
सावधान १२-१-१३।१४
साक्षात्कार १७-३-३
सिद्ध १-१०-११।१२, ५-१०. ९-३
असून बद्ध ५-६-७३,७-६-५१।५३
-ह्याचें मुख्य लक्षण ८-९-९
-लक्षणें ८-९
सिद्धांत १५-४-२६
सुखदुःख १३-७-२१।३०
दुसऱ्याचें तें च आपल १४-६-२३
भोक्ता १३-९
सुषुप्ति १५-७-४२
सूचना दीर्घ १८-७-६।७
सूत्रधार १९-९-१८
सूर्य ४-६-६
-दर्शन १६ २-२२
-स्तवन १६-२
सूक्ष्म आधीं मग स्थूल ९-७-१।७
सूक्ष्म जीव १५-८
सृष्टि
-कर्ता १३ ८
त्रिविध २०-९ १५।३०
मिथ्या, तर दिसते का ६-८
मिथ्या, मग भजन कां ६ ७
-ष्टीची उत्पत्ति १२-६;१३ २
-ष्टीचे अष्ट प्रकार ६-६-५०।५३
सत्य का मिथ्या ६-६
सोहं ६-३-३५
संगत्याग १३-२-१७, १९-५-२०
संगतीचा महिमा १७-७
संचित १८-७ ८
संत ६-१-१६।१८,२४,१३-२-२६,
" सिद्ध " पहा
-महिमा १-५, ६-५-२५।२६
-स्तवन १-५
संध्येंतील चोवीस नामें ४-५-१०।१२,
११-९-३।४
संन्यासी १५-१०-१५।१६
संपत्ति १७-७-२८
संबंध
प्रथम ३-२-३५।५८
द्वितीय ३-३-१।३०
तृतीय ३-५-१२।२६
संशय ५-१०-१२।२६, ६-९-३४,७-८-
४१,९-५-१५।१८,३६,३८,१०-
८,१७ ४,२०-७-२८।३०
संसार २-१०-४०, ३-२।५, ३-९-१;
३-१०-११६,३८।५२; ४-८-७,
५-३-१०११०३, ६-९-२४;७-
१-२० १४-७-९,२५,
१७-१-२१, २०-३-२६
करून हि परमार्थलाभ १२ ८-
२९।३१
-रांचा बाजार १२-८ ३४
संसारिक ७-१ ४९।५०
स्मरण १५-७-३५

स्वतंत्रता १४-१-२३
स्वधर्म ८ ९-५४
स्वरूपतामुक्ति ४-१०-२४
स्वामीद्रोह ५-३-७२
स्वावलंबन १९-९-१६

### ह

हटकेश्वर १७-१०-१
हनुमंत १६-६-२४।२४ " मारुती " पहा
हरिकथा
—कशी करावी १४-५
—येंत रागज्ञान १४-५-३०।३६
—येंत स्त्रीवर्णन १४-५ २१।२५
भाविक जनापुढें १४-५-२०
सगुण मूर्तीपुढें १४-५-१२।१८
साधुजनापुढें १४ ५-१९
हरिकथानिरूपण ११-५-४, ११-६-४; १२-२-२९, १२-९-१७, १२-१०-४
हरिदास १४ ५ ४१
हरिसंकल्प २०-४-१९
हित ७-२-३७
हिमाचळ ४-१०-७
हीन विवेक १२-७-३; १२-८-१८
हंसगीता १-१-१९; ७ ७-३५

### क्ष

क्षत्रपाळ १८-१-१४
क्षमा १२-१०-८।१०

### ज्ञ

ज्ञान ९ ८, "बहुधाज्ञान", " आत्म-ज्ञान " पहा
अज्ञान, विपरीत ज्ञान २०-१-२२।२४
—नेंद्रियें १७-८-१३
श्रेष्ठ, मग उपासना का ६-७
ज्ञानावाचून मोक्ष नाहीं ५-१-३५;५-४-३१,५-५-१;७-६ ६३;८ ७-२५, ९-४-२८; ९-७-४०; २०-१०-२१
ज्ञानेश्वर १-१०-९; ५-९-५१




REFBK-000287

२८५०

॥ श्रीराम ॥

# रामदास आणि रामदासी

## ❋ ग्रंथमाला ❋

| भाग | | किंमत |
|---|---|---|
| ( १ ) | श्रीमत् दासबोध [ आवृत्ति ६ वी ] | ३–० |
| ( २ ) | श्री समर्थांचीं दोन जुनीं चरित्रें ... | [ शिल्लक नाहीं ] |
| ( ३ ) | श्री रामदासांची कविता .. | २–० |
| ( ४ ) | श्री रामीरामदासांची कविता ... ... | २–० |
| ( ५ ) | श्री श्लोक मनाचे [ आवृत्ति ५ वी ] ... | ०–८ |
| ( ६ ) | श्री स्वानुभवदिनकर .. ... | १-१२ |
| ( ७ ) | श्री दासविश्रामधाम [ संपूर्ण ग्रंथ ] ... | ११ ० |
| ( ८ ) | श्री समर्थप्रताप .. ... .. | ०-१२ |
| ( ९ ) | श्री संप्रदायाचीं कागदपत्रें, प्रथम खंड ... | ३–० |
| ( १० ) | श्री करुणाष्टकें ... ... ... | १–८ |
| ( ११ ) | श्री समर्थांचीं लघु काव्यें | [ तयार व्हावयाचीं आहेत ] |
| ( १२ ) | श्री सीतास्वयंवर ... ... ... ... ... | ० १० |
| ( १३ ) | श्री रामदासपंथक्रमसार... ... ... ... | [ शिल्लक नाहीं ] |
| ( १४ ) | श्री निवृत्तिराम. . ... ... . . | १–० |
| ( १५ ) | श्री सांप्रदायिक विविध विषय, प्रथम खंड ... | १–८ |
| ( १६ ) | श्री दिनकरांची स्फुट कविता ... ... ... | १–८ |
| ( १७ ) | श्री सांप्रदायिक विविध विषय, द्वितीय खंड ... | १–० |
| ( १८ ) | श्री रामसोहळा [ मेरुस्वामीकृत ]... ... ... | ३–८ |
| ( १९ ) | श्री संप्रदायाचीं कागदपत्रें, द्वितीय खंड ... ... | २–० |
| ( २० ) | श्रीमत् दासबोधाची किल्ली .. ... ... | ०–८ |

☞ श्री रामदास आणि रामदासी नावाचें मासिक पुस्तक निघत असून वरील १३ व्या भागापासून पुढील सर्व भाग त्यांतून च प्रसिद्ध झाले आहेत व यापुढें नवीन भाग प्रसिद्ध होत आहेत. १८४८ च्या ज्येष्ठापासून मासिकास दहावें वर्ष लागणार व सर्व विषय नवीन सुरू होणार. तरी सर्वांनीं वर्गणीदार व्हावें अशी विनंति आहे. वार्षिक वर्गणी ट. हं. सह रु. ३

चिटणीस, सत्कार्योत्तेजक सभा–धुळें